महाराष्ट्रातील आणि त्यातही प्रामुख्याने मराठवाड्यात राहणाऱ्या अस्पृश्य समाजातील तरुण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे दालन खुले करून देण्याकरिता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून दिनांक १९ जून १९५० रोजी औरंगाबाद येथे एक महाविद्यालय सुरू केले. या महाविद्यालयाला पुढे त्यांनी मिलिंद असे नाव दिले. मिलिंद हा बौद्ध संस्कृतीतील एक महान तत्त्ववेत्ता होता. महाविद्यालयासाठी हे नाव आंबेडकरांना त्यांच्या सुविद्य पत्नी सविता आंबेडकर ह्यांनी सुचविले होते. सविता ह्या पूर्वाश्रमीच्या शारदा कबीर सारस्वत ब्राह्मण म्हणजेच महारेतर होत्या. मिलंद महाविद्यालयाच्या उभारणीत आंबडेकरांना अनेक महारेतरांनी सहकार्य केले होते. त्यांच्या कार्याचा आढावा घेणे हा प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे.

डॉ. म. भि. चिटणीस

आंबेडकरी चळवळीतील एक नि:स्वार्थ व प्रामाणिक व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वपरिचित असलेले डॉ. म. भि. चिटणीस हे मिलिंद महाविद्यालयाचे जणू आधारस्तंभ होते. महाविद्यालयाची संपूर्ण जबाबदारी आंबेडकरांनी चिटणीसकडे सोपविली होती. आंबेडकरांच्या आदेशावरून ते खालसा महाविद्यालयातून सिद्धार्थ कॉलेजमध्ये आले होते. आंबेडकरांनी आता त्यांना सिद्धार्थ कॉलेजमधून मिलिंद महाविद्यालयात पाठविले होते. केवळ आंबेडकरावरील निष्ठेपोटी चिटणीस मुंबईतील स्वत:ची आणि पत्नीची नोकरी सोडून औरंगाबाद सारख्या मागासलेल्या भागात आले होते. सुरुवातीच्या काळात मिलिंद महाविद्यालय छावणी भागातील लष्करी इमारतीमध्ये भरत होते. चिटणीसांनी चित्रे व पाटणकरांसोबत स्वत: येऊन ह्या इमारती निश्चित केल्या होत्या. लष्करी भागात महाविद्यालय उभारता येणार नाही अशी हरकत एका लष्करी अधिकाऱ्याने घेतल्यावर चिटणीसांनी तसे ताबडतोब आंबेडकरांना दिल्लीस कळविले होते. तेव्हा आंबेडकरांनी तत्कालीन संरक्षणमंत्री सरदार बलदेव सिंह यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळवून चिटणीसांना पाठविले होते. महाविद्यालयाच्या प्रारंभीच्या काळात आंबेडकरांना लष्कराची फार सहकार्य मिळाले त्यामुळे भारतीय लष्करप्रमुख जनरल नागेश हे औरंगाबादला आले असता आंबेडकरांनी त्यांना मेजवानी दिली होती. त्यावेळी चिटणीससुद्धा आवर्जून उपस्थित होते.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

महाविद्यालयाकरिता कायमस्वरूपी जागा शोधण्याची जबाबदारी आंबेडकरांनी चिटणीस यांच्याकडे सोपविली होती. चिटणीसांनी औरंगाबाद येथे महाविद्यालयासाठी अनेक जागा बघितल्या. शेवटी आंबेडकरी चळवळीतील औरंगाबाद येथील चांभार जातीतील कार्यकर्ते आसाराम डोंगरे यांनी म. भि. चिटणीस यांना महाविद्यालयासाठी पाणचक्कीजवळील जागा दाखविली. ती जागा आंबेडकरांना सुद्धा आवडली. त्यामुळे त्यांनी ती जागा महाविद्यालयाच्या कायमस्वरूपी इमारतीसाठी निश्चित केली. जवळपास पावणेदोनशे एकर असलेली काही जमीन हैद्राबदचा संस्थानिक निजाम याच्या मालकीची होती तर काही जमीन सखाराम कावळे या ढोर जातीतील व्यक्तीच्या मालकीची होती. निजामाकडून जमीन खरेदी करण्यासाठी आंबेडकरांनी भाऊराव गायकवाडांसह चिटणीसांनाही हैद्राबादला पाठविले होते. सखाराम कावळे यांच्याकडून जमीन खरेदी करण्याच्या संदर्भातसुद्धा चिटणीसांची महत्त्वाची भूमिका बजावली होती. आंबेडकरांचे हितचिंतक असलेले औरंगाबादचे प्रशासक एल. जी. राजवाडे यांनी ह्या जमीन हस्तांतर प्रक्रियेत मोलाची मदत केली. राजवाड्यांना ही जमीन दाखविण्याची जबाबदारी आंबेडकरांनी चिटणीसांकडेच सोपविली होती. निजामाने आपल्या संस्थानातील अस्पृश्यांच्या विकासासाठी उभारलेल्या एक कोटी रुपयांच्या शेड्युल्ड कास्ट ट्रस्ट फंडमधून बारा लाख रुपये महाविद्यालयाच्या विकासासाठी दिले होते. याविषयीच्या अर्जाचा मसुदा चिटणीसांनीच तयार केला होता. या शिवाय स्वत: हैद्राबादला जावून चिटणीसांनी मिलिंद महाविद्यालयास उस्मानिया विद्यापीठाची परवानगी मिळविली होती. सांगायचे तात्पर्य असे की, मिलिंद महाविद्यालयाचे शुन्यातून विश्व निर्माण करण्यासाठी म. भि. चिटणीसांनी जीवापाड मेहनत घेतली होती. सांगायचे तात्पर्य असे की, मिलिंद महाविद्यालयाचे शुन्यातून विश्व निर्माण करण्यासाठी म. भि. चिटणीसांनी जीवापाड मेहनत घेतली होती.

दिनांक १ सप्टेंबर १९५० रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते महाविद्यालयाचा कोनशिला समारंभ करण्यात आला. या समारंभास चिटणीस नुसते उपस्थित नव्हते तर महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून हा समारंभ पूर्णपणे यशस्वी करण्याची जबाबदारीसुद्धा त्यांच्याचकडे होती. ती त्यांनी समर्थपणे पार पाडली. महाविद्यालयाची विद्यार्थिसंख्या वाढावी म्हणून ते सतत दक्ष राहात होते. आसपासच्या परिसरातील शाळांच्या तसेच प्रतिष्ठित नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांना महाविद्यालयाची माहिती सांगून विद्यार्थी पाठविण्याची ते विनंती करीत असत. बाहेरगावच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय शोधण्यास त्रास होऊ नये म्हणून दहावीचा निकाल लागून महाविद्यालयाची प्रवेशप्रक्रिया सुरू झाली की, ते महाविद्यालयाच्या शिपायांना रेल्वे स्टेशनवर विद्यार्थ्यांना आणण्यासाठी पाठवीत असत. महाविद्यालयातील वातावरण सौहार्दपूर्ण राहावे म्हणून चिटणीस वेगवेगळे उपक्रम राबवीत. आंबेडकरांच्या सूचनेवरून त्यांनी महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनासाठी 'युगयात्रा' हे सामाजिक नाटक लिहिले होते. त्यांच्याच प्रेरणेने महाविद्यालयात 'बोधी अभ्यास मंडळा'ची स्थापना करण्यात आली होती. या मंडळाद्वारे आंबेडकरांसह शंकरराव देव इत्यादींची व्याख्यानेसुद्धा आयोजित करण्यात आली होती. चिटणीसांच्याच मार्गदर्शनाखाली नागोरी नावाच्या विद्यार्थ्याने स्पृश्य-अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या सहभोजनाचा

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

कार्यक्रम आयोजित केला होता. चिटणीसांच्याच कुशल नेतृत्वाखाली मिलिंद महाविद्यालयाच्या लहानशा रोपट्याचे लवकरच विशाल बोधिवृक्षात रूपांतर झाले होते यात जराही शंका नाही.

जे. एच. सुबय्या

आंबेडकरांचे कर्नाटकातील एक तडफदार सहकारी, पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे सदस्य जे. एच. सुबय्या यांचासुद्धा महाविद्यालयाच्या निर्मितीत सिंहाचा वाटा होता. महाविद्यालयासाठी बांधकाम निधी गोळा करण्यात त्यांनी मोलाची मदत केली होती. निजामाच्या एक कोटी रुपयांच्या शेड्युल्ड कास्ट ट्रस्ट फंडमधून बारा लाख रुपये महाविद्यालयासाठी मिळवून देण्यात सुबय्या यांचे प्रयत्नच कारणीभूत ठरले होते. शिवाय महाविद्यालयाला उस्मानिया विद्यापीठाची परवानगी मिळवून देण्याच्या कार्यात त्यांनी चिटणीसांना सहकार्य केले होते. महाविद्यालयासाठी लागणारे फर्निचर आंबेडकरांनी सुबय्या यांच्या माध्यमातूनच मागविले होते. महाविद्यालयाच्या कोनशिला समारंभातसुद्धा सुबय्या यांनी उपस्थित राहून बरेच सहकार्य केले होते. समारंभासाठी लिहिलेल्या भाषणाची एक प्रत आंबेडकरांनी आधीच सुबय्या ह्यांना दिली होती. तेंव्हा सुबय्या त्यांनी सुचविल्याप्रमाणे आंबेडकरांनी आपल्या भाषणातील निजामविषयीचा काही वादग्रस्त भाग वगळला होता. त्यामुळे या समारंभात निजामाने महाविद्यालयास पन्नास हजार रुपयांची वैयक्तिक मदत देण्याचे घोषित केले होते. सुबय्या यांच्या सहकार्यामुळे मिलिंद महाविद्यालयाच्या विकासास उल्लेखनीय हातभार लागला होता.

इतर महारेतरांचे सहकार्य

आंबेडकरी चळवळीतील इतरही महारेतर पुढारी तसेच कार्यकर्त्यांनी महाविद्यालयाच्या विकासकार्यात मोलाची मदत केली होती. कमलाकांत चित्रे यांचेसुद्धा महाविद्यालयाच्या उभारणीत महत्त्वाचे योगदान होते. अस्पृश्यांच्या शैक्षणिक विकासासाठी मराठवाड्यात एक महाविद्यालय काढण्याची इच्छा आंबेडकरांनी बोलून दाखविल्यानंतर चित्र्यांनीच चिटणीसांना मराठवाड्याच्या दौऱ्यावर पाठवून महाविद्यालयासाठी योग्य ठिकाण शोधण्यास सांगितले होते. औरंगाबाद येथे महाविद्यालय काढण्याचे निश्चित झाल्यानंतर त्यांनी स्वत: तेथे जाऊन लष्कराच्या इमारती किरायाने घेण्याचे ठरविले होते. पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे सचिव या नात्याने चित्रे हे महाविद्यालयाच्या विकासाकडे जातीने लक्ष देत होते. सिद्धार्थ कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. पाटणकर यांची महाविद्यालयाच्या प्रारंभिक काळात मोलाची मदत झाली होती. प्रयोगशाळेसाठी लागणारी उपकरणे, रसायने व इतर साहित्य त्यांनी स्वत: निवडून औरंगाबादला पाठविले होते. सिद्धार्थ कॉलेजचे प्राचार्य असून मिलिंद महाविद्यालयासाठी त्यांनी जे सहकार्य केले ते केवळ आंबेडकरांच्या अस्पृश्यांच्या शैक्षणिक विकासाच्या उदात्त ध्येयाने प्रेरित होऊनच केले होते. मोरेश्वर वासुदेव दोंदे यांनी महाविद्यालयाच्या जागेविषयी आंबेडकरांना योग्य असा सल्ला दिला होता. पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे एक पदाधिकारी म्हणून दोंदे यांनी नेहमीच महाविद्यालयाच्या कार्यास प्रोत्साहन दिले होते. एन. शिवराज व पांडुरंग नाथुजी राजभोज या आंबेडकरी चळवळीतील पुढाऱ्यांनी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी निधी गोळा करण्यात बरीच मदत केली होती. महाविद्यालयाच्या कोनशिला समारंभासाठीसुद्धा त्यांनी सहकार्य केले होते. सोसायटीचे सदस्य व आंबेडकरांचे

 ISSN 2231 4342

स्पृश्य सहकारी म. बा. समर्थ व व्ही. जी. राव हेसुद्धा महाविद्यालयाच्या कार्यात नेहमीच लक्ष देत असत. औरंगाबाद येथे 'गोरगरिबांचे डॉक्टर' म्हणून प्रसिद्ध असलेले आंबेडकरांचे एक हितचिंतक डॉ. ख्रिश्चन यांनीही महाविद्यालयाच्या कार्यकारी समितीचे सदस्य म्हणून महाविद्यालयाच्या कार्यास वेळोवेळी प्रोत्साहन दिले होते. अशाप्रकारे आंबेडकरी चळवळीतील प्रत्येकजण मग तो महार असो की महारेतर असो मिलिंद महाविद्यालयाच्या विकासासाठी अविरत झटत होता.

प्राध्यापक व कर्मचाऱ्यांची भूमिका

मिलिंद महाविद्यालयात कार्यरत असलेले प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि महाविद्यालयाशी सबंधित असलेले इतरही अनेकजण महाविद्यालयाच्या विकासाकरिता सतत प्रयत्नशील होते. प्राचार्य म्हणून डॉ. म. भि. चिटणीसांनी खंबीरपणे महाविद्यालयाचे नेतृत्व केले होते. शिवाय इतरही प्राध्यापकांनी आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली होती. प्रा. रा. भी. जोशी यांनी राजवाडे यांना महाविद्यालयासाठीची जमीन दाखविण्यासाठी चिटणीसांना मदत केली होती. महाविद्यालयाची विद्यार्थि संख्या वाढावी म्हणून तेसुद्धा परिसरातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच शाळांना भेटी देत असत. प्रा. आर. एस. गुप्ते हे महाविद्यालयातील 'बोधी अभ्यास मंडळा'चे कार्याध्यक्ष होते. या मंडळामार्फत त्यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या हिताकरिता विविध उपक्रम राबविले होते. चिटणीसांच्या 'युगयात्रा' नाटकाच्या वेळी त्र्यंबक महाजन व प्रा. भालचंद्र फडके यांनी विशेष सहकार्य केले होते. फडके यांनी नाटकाच्या नभोवक्त्याची भूमिका बजावली होती. आंबेडकरांनी भारतातील विविध प्रांतांतील अनेक विद्वान प्राध्यापकांना महाविद्यालयात नियुक्त केले होते. कर्नाटकातील प्रा. डॉ. मरळीहळ्ळी, डॉ पाटील, केरळमधील प्रा. नायर, तामिळनाडूमधील प्रा. अय्यर, काश्मिरमधील प्रा. कुरेशी इत्यादी प्राध्यापक मंडळींनी आपला प्रदेश, आपले घरदार, आपली माणसे सोडून औरंगाबादसारख्या मागासलेल्या भागातील महाविद्यालयात सेवा देऊन महाविद्यालयाच्या शैक्षणिक कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. प्रा. मे. पु. रेगे, प्रा. चिखलीकर, जी. सी. सुर्वे, के. ए. ठकार, डी. व्ही. जोग, व्ही. एन. माथूर, व्ही. व्ही. खरे, शेंबवणेकर, वडजीकर इत्यादी महाराष्ट्रातील विविध भागांतील प्राध्यापकवृदांनी सुद्धा मिलिंद महाविद्यालयात सेवा देवून अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण दान देण्याचे महान कार्य केले. महाविद्यालयाचे ऑफिस सुपरीटेंडेंट ठेंगे त्याचप्रमाणे लिपिक एस. एस. मनोहर, आप्पा जुमडे हे वसतिगृहाचे रेक्टर यांनीसुद्धा महाविद्यालयाच्या विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य केले होते. महाविद्यालयातील ड्रायव्हर जयराम माने, महाविद्यालयाच्या प्रत्येक कार्यक्रमाचे फोटो काढणारे फोटोग्राफर महमंदभाई यांचे सुद्धा महाविद्यालयाच्या कार्यात अल्पसे का होईना परंतु अत्यंत महत्त्वपूर्ण आणि उल्लेखनीय असे योगदान होते.

ISSN 2231 4342

अन्य महारेतरांचे योगदान

आंबेडकरी चळवळीतील महारेतर अनुयायांनी मिलिंद महाविद्यालयाच्या उभारणीत विशेष कार्य केले त्याचबरोबर आंबेडकरी चळवळीमध्ये कार्यरत नसलेल्या परंतु आंबेडकरी चळवळीचे आणि आंबेडकरांचे हितचिंतक असलेल्या इतरही अनेक महारेतरांचे मिलिंद महाविद्यालयाच्या कार्यात उल्लेखनीय योगदान लाभले होते. आपल्या हैद्राबाद संस्थानातील अस्पृश्यांसाठी असलेल्या एक कोटी रुपयांच्या शेड्युल्ड कास्ट ट्रस्ट फंडमधून बारा लाख रुपये कर्ज म्हणून का होईना निजामाने महाविद्यालयास आर्थिक मदत करून सहकार्य केले होते हे विसरता येण्याजोगे नाही. शिवाय आपल्या मालकीची जागासुद्धा त्याने महाविद्यालयासाठी विकत दिली होती. सखाराम कावळे या ढोर जातीतील व्यक्तीनेसुद्धा महाविद्यालयासाठी आपली जमीन विकत दिली होती. निजाम व सखाराम कावळे या दोघांनीही अप्रत्यक्षपणे महाविद्यालयासाठी अविस्मरणीय असे योगदान दिले होते.

भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी आंबेडकरांच्या शब्दाखातर दिल्लीहून औरंगाबादला येऊन आपल्या हस्ते महाविद्यालयाची कोनशिला बसवून एक महान कार्य केले होते. तत्कालीन शिक्षणमंत्री म्हणून मौलाना अब्दूल कलाम आझाद यांनीसुद्धा मिलिंद महाविद्यालयाच्या प्रारंभिक विकास कार्यात बहुमुल्य सहकार्य केले होते. तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल, तत्कालीन संरक्षण मंत्री बलदेवसिंग, याशिवाय केंद्रीय मंत्री गोपालस्वामी अयंगार, हैद्राबाद प्रांताचे मुख्यमंत्री बेलोडी तसेच रामचंद्र राव, विनायकराव कोरटकर, शेषांद्री इत्यादी मंत्री, मुख्य न्यायाधीश रामचंद्र नाईक व स्टेट सेक्रेटरी बुच इत्यादीं महारेतर मंडळींनी मिलिंद महाविद्यालयास वेळोवेळी भेटी देऊन महाविद्यालयाची सामाजिक व शासकीय प्रतिष्ठा वाढविण्याच्या कार्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली होती.

मूल्यमापन

आंबेडकरी चळवळीमध्ये महार जातीतील अनुयायांसह अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यात सहभागी असलेल्या विविध जाती, धर्म आणि पंथातील महारेतर अनुयायी, कार्यकर्ते, सहकारी आणि हितचिंतक यांनी आंबेडकरी शैक्षणिक चळवळीतील उल्लेखनिय योगदान दिले आणि केवळ आंबेडकरी चळवळीतीलच नाही तर चळवळीशी फारसा संबंध नसलेल्या महारेतर मंडळींनी सुद्धा अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रचार-प्रसार व्हावा या हेतूने प्रेरित होऊन आंबेडकरी शैक्षणिक चळवळीस विशेष सहकार्य केले. परिणामी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालये अल्पावधीतच नावारूपास आल्या. या शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालयाच्या माध्यमातून अस्पृश्य समाजाचा झपाट्याने शैक्षणिक विकास घडून आला. हे सर्व महारेतर मंडळींच्या सहकाऱ्यानेच शक्य झाले असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

ISSN 2231 4342

संदर्भ सूची

आंबेडकर सविता, डॉ आंबेडकरांच्या सहवासात, तथागत प्रकाशन कल्याण, सुधारित द्वितीय आवृत्ती २०१३, पृ. १९५

निंबाळकर वामन, सामाजिक क्रांतीच्या दिशा, प्रबोधन प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती २००७, पृ. ४०६

बागुल योगीराज, आठवणींतले बाबासाहेब, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती २००८, पृ. ४०३

गायकवाड महेंद्र, सहवास बाबासाहेबांचा, चिन्मय प्रकाशन २०१३, पृ. १६१

सुरवाडे विजय, समकालीन सहकाऱ्यांच्या आठवणीतील आंबेडकर, लोकवांग्मय गृह मुंबई, द्वितीय आवृत्ती २००७, पृ. २८३

निंबाळकर, उपरोक्त, पृ. ३८४

कित्ता, पृ. ४०२

गायकवाड उपरोक्त, पृ. १८८

कित्ता, पृ. १८४

निंबाळकर, उपरोक्त, पृ. ४०९

सुरवाडे, उपरोक्त, पृ. ३०९

कीर, डॉ बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, सहावी आवृत्ती १९८९, पृ. १४७

'पर्यटनाच्या दृष्टिकोनातून फलटणचा मुधोजी मनमोहन राजवाडा'

प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम
इतिहास विभाग प्रमुख
एस. बी. आर. कॉलेज, म्हसवड
संलग्न: शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
मो. नं. 9423802560

प्रास्ताविक :-

प्राचीन काळापासून मानवाला प्रवास म्हणजे पर्यटन करण्याची आवड निर्माण झालेली आहे. आज वाहतुकीच्या क्षेत्रात फार मोठी प्रगती झाल्यामुळे पर्यटन सुव्यवस्थित, सुलभ आणि आनंददायी झाले आहे. त्यामुळे आज जगात पर्यटनाला फार-फार महत्त्व प्राप्त झाले आहे. पर्यटनाचे स्वरूप भौगोलिक, धार्मिक व ऐतिहासिक आहे व त्याची व्याप्तीही फार मोठी आहे.

महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्रामध्ये ऐतिहासिक पर्यटनाला महत्त्वाचे स्थान आहे. जास्तीत जास्त पर्यटकांना आकर्षित करणारी स्थळे ही ऐतिहासिक आहेत. ऐतिहासिक गोष्टी जाणुन घेण्यामध्ये मानवाला नेहमीच रुची राहिली आहे. महाराष्ट्रातील ऐतिहासिक स्मारकांनी पर्यटन क्षमता विकसित केली आहे.

सातारा जिल्ह्यातील फलटण तालुका हा प्राचीन कालखंडापासून ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनाचे आकर्षण केंद्र असल्यामुळे सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट, शिलाहार या बरोबरच मध्ययुग आणि शिवकालीन कालखंडात फलटण तालुक्यात धार्मिक पर्यटनाचा उत्तरोत्तर विकास झालेला आहे. एखाद्या प्रदेशाची किंवा त्या प्रदेशातील इतिहासाची संस्कृतीची सभ्यतेची ओळख समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था, राजव्यवस्थेची ओळख आणि जाणीव ही एखाद्या पर्यटकाला, संशोधकाला, अभ्यासकाला त्या प्रदेशातील पर्यटनावरून होत असते. आपल्या भव्य इतिहासाच्या अंतरंगामध्ये आपण पर्यटनाच्या अंतदृष्टीने पाहू शकतो केवळ आर्थिक व्यवसाय यापेक्षाही महत्त्वपुर्ण घटक म्हणजे पर्यटन पर्यटकांना आपल्या इतिहासाची उकल करण्याचे ऐतिहासिक भाष्य देत असतो.

पर्यटन अर्थ व व्याख्या :-

मानवाने विविध ठिकाणी केलेला हेतुपुर्वक प्रवास व वास्तव्य यालाच पर्यटन असे म्हणतात. आधुनिक काळात पर्यटनाला व्यवसायाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. अत्याधुनिक काळात पर्यटन व्यवसायाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. पर्यटन हा शब्द इंग्रजीतील Tourism या शब्दाचे मराठी रूपांतर आहे. Tourism हा शब्द Tour या शब्दापासून आणि Tour हा शब्द लॅटीन भाषेतून Tourm या शब्दापासून तयार झालेला आहे. Tourism याचा अर्थ प्रवास असा होतो. हा प्रवास जागेसंबंधी शोध घेणे शिकणे, अभ्यास करणे तसेच व्यवसाय किंवा आनंदासाठी होत असतो. पर्यटन या शब्दाचा वापर प्रथम सन 1643 मध्ये झाला.[1] एका ठिकाणाहून दुसऱ्या

 ISSN 2231 4342

ठिकाणी जाणे किंवा वर्तुळाकार प्रवास करणे. Tours हा शब्द Torah या हिब्रु ज्यु धर्मियांच्या भाषेतून आलेला आहे. फ्रेंच भाषेत Grant tour हा शब्द वापरला जातो. जागतिक पर्यटन संघटनेने पर्यटक या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. पर्यटन म्हणजे माणसाने त्याच्या नेहमीच्या राहत्या ठिकाणापासून इतर ठिकाणी केलेले अल्पकालीन स्थलांतर होय.[2] पर्यटन राष्ट्रीय संपत्तीच्या खर्चाशिवाय परकिय चलन मिळवून देणारा उद्योग आहे. पर्यटनातून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते. पर्यटनामुळे स्थानिक बेकारांना रोजगार मिळतो. तसेच स्थानिक व प्रादेशिक व्यवस्थापनाचे लक्ष केंद्रीत होते.

स्विस शास्त्रज्ञ प्रा.कर्पे यांच्या मते कायम स्वरूपाची वस्ती न करण्याच्या हेतूने व उत्पादनाशी संबंधित नसलेली अपरिचित व्यक्तीच्या भ्रमंतीतून प्रस्थापित झालेले अपूर्व घटना म्हणजे पर्यटन होय. जर्मन तज्ञ क्याराफ यांच्या मते पर्यटन हे आर्थिक संबंधाचे जाळे आहे. पर्यटन म्हणजे सामाजिक प्रक्रिया आहे. भारतातील पर्यटन व्यवसायाच्या विकासा संदर्भात पहात असताना भारताचे भौगोलिक पर्यावरण पर्यटन व्यवसाय विकसित होण्यासाठी खूपच अनुकूल आहे. भारताची ऐतिहासिक पाश्र्व वभूमी, खगोलशास्त्रीय स्थान, विविधतेतील विषमता या कारणांनीच भारत देश पर्यटकांना हवासा वाटतो. सन 1945 या वर्षात सर जॉन सार्जंट यांच्या नेतृत्वाखाली समितीने भारतातील पर्यटन विकासाचा सविस्तर अहवाल सन 1945 मध्ये ब्रिटीश सरकारला सादर केला. त्याची कार्यवाही मात्र स्वातंत्र्योत्तर काळात सुरू झाली. आणि भारतीय पर्यटन विकास महामंडळ स्थापन झाले आणि ख·या अर्थाने भारतातील या पर्यटन व्यवसायाच्या विकासास सुरूवात झाली. मॅक्स मूलर या जग प्रसिध्द आँग्ल विद्वानाने भारतीय पर्यटनाबद्दल म्हटले आहे की, जगातील सर्वात संपन्न शक्तिशाली व सुंदर देश कोणता असेल तर तो भारत देश होय.

फलटण संस्थानचा पुर्वइतिहास :-

आधुनिक भारताच्या इतिहासात सातारा जिल्ह्यातील फलटण शहर एक सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे शहर आहे. सन 1948 पूर्वी फलटण हे एक संस्थानिकांचे राजधानीचे ठिकाण होते. फलटण संस्थान हे भारतातील एक प्राचीन संस्थान समजले जात होते. त्याची स्थापना सन 1284 मध्ये पहिल्या निंबराज याने केली. या नाईक निंबाळकर घराण्यात एकंदर 25 राज्यकर्ते होऊन गेले.

फलटण हे फलटण संस्थानच्या राजधानीचे ठिकाण होते. फलटण या राजधानीच्या नगराची स्थापना इ.स.1330 ला दुसरा निंबराज याने केली.[3] फलटण नगर जहागिरीचे मध्यवर्ती ठिकाण असून हवामान कोरडे व आल्हाददायक होते. तसेच कोकण आणि देश याच्यामधील मध्ययुगीन काळातील एक प्रमुख व्यापारी केंद्र होते. शहराला पाणी पुरवठा सुव्यवस्थित होतो म्हणून नाईक निंबाळकरांनी फलटण शहराची स्थापना सुरक्षित ठिकाणी करून शहराभोवती तटबंदी बुरूज, खंदक काढले होते.[4]

फलटण संस्थानातील ऐतिहासिक स्थळे-

 ISSN 2231 4342

फलटण संस्थानात नाईक निंबाळकर घराण्याची सत्ता होती. या घराण्यात एकुण 25 सत्ताधिश सन 1948 पर्यंत होऊन गेले. या घराण्यातील पहिला निंबराज ते शेवटचे दोन अधिपती श्रीमंत मुधोजी महाराज व श्रीमंत मालोजीराजे यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक ऐतिहासिक वास्तूंची महत्त्वपूर्ण बांधकामे केलेली आहेत.[5] म्हणून पुर्वीच्या फलटण संस्थानच्या वैभवाची साक्ष देणाऱ्या अनेक वास्तू आपणास आजही पहावयास मिळतात. त्यामध्ये नाईक निंबाळकरांचा मनमोहन राजवाडा, लक्ष्मीविलास पॅलेस, मध्यवर्ती तुरूंग, सिटी बिल्डींग, व्हिक्टोरिया डायमंड लायब्ररी(शिवाजी वाचनालय), निरगुडी पाणी पुरवठा योजना, खजिन्याचा हौद, विमानतळ, जुनी मंडई या ऐतिहासिक वास्तू आहेत.[6] तर माणकेश्वर मंदिर, त्रिजटेश्वर मंदिर, जबरेश्वर मंदिर, माळजाई मंदिर, श्रीराम मंदिर, दत्त मंदिर, नागेश्वर मंदिर, महादेव मंदिर, तळ्यातील देवी, बादशाही मस्जिद अशी अनेक मंदिरे व मस्जिद तसेच फलटण ही महानुभाव धर्माची दक्षिण काशी असल्याने फलटण शहरात कृष्ण मंदिर, आबासाहेब मंदिर, बालाजी मंदिर अशी अनेक महानुभाव मंदिरे आहेत.[7]

तसेच फलटणला जैन समाजाची दक्षिण काशी म्हटले जाते. त्यामुळे या समाजाची एकुण दहा मंदिरे आहेत. याशिवाय फलटण संस्थानच्या परिसरात धुळदेव, निंबळकची निमजाई देवी, गुणवरेयेथील श्रीनाथ मंदिर, गिरवीचे गोपाळकृष्ण मंदिर, तसेच फलटणच्या जवळ असणारा वारूगड किल्ला व संतोषगड हे महत्त्वाचे किल्ले आहेत. ब्रिटीश राजवटीमध्ये भाटघर धरणावर आणि फलटण संस्थानातून जात असलेला निरा उजवा कालवा या सर्व वास्तू ठिकाणे फलटणच्या प्राचीनतेची व गतवौभवाची साक्ष देतात.[8]

या वरील महत्त्वपूर्ण ठिकाणांपैकी सर्वात महत्त्वाचे ठिकाण म्हणजे फलटणच्या मध्यभागी असणारा आणि ज्याठिकाणी या संस्थानचे अधिपती वास्तव्यास होते ते ठिकाण म्हणजे मुधोजी मनमोहन राजवाडा होय. ही सर्व ठिकाणे पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहेत. यामधील मुधोजी मनमोहन राजवाड्याची माहिती पुढीलप्रमाणे :-

मुधोजी मनमोहन राजवाडा:-

भारतात असलेल्या अनेक संस्थानांपैकी फलटण या संस्थानाने नाईक निंबाळकर हे अधिपती त्यांनी उभारलेला राजवाडा ही फलटणच्या वास्तू वैभवात भर घालणारी वास्तू आहेत. महाराष्ट्रात जे काही थोडे राजवाडे अस्तित्त्वात आहेत त्यामध्ये फलटणच्या मुधोजी मनमोहन राजवाड्याचे नाव आदराने घेतले जाते. श्रीमंत मुधोजी महाराज यांनी आपल्या कारकिर्दीत या राजवाड्याचेबांधकाम दोन भागामध्ये केलेले आहे. त्यामधीलराजवाड्याच्या जुन्या भागाच्या बांधकामाचा प्रारंभ दि.22मे 1861 मध्ये करून दि. 6 मे 1875 मध्ये ते पुर्ण झाले.[9] जुन्या राजवाड्यात प्रवेश करण्यासाठी घडीव दगडाचे पुरूसभर उंचीचे दगडी जोते. आतील डाव्या बाजूस शिसवी लाकडाचे व अत्यंत कलाकुसर असलेले खाजगी देवघर आहे. त्यासाठी आपत्कालीन परिस्थितीत धान्यपुरवठा करता यावा यासाठी किमान 10000/- पोती धान्य साठवून ठेवता येईल एवढे तळघर आहे. तत्कालीन युवराज व्यंकटराव नाईक साहेब यांची भव्यदिव्य अशी तालीम आहे. महिलांच्या निवासस्थानासमोर सकाळी उठल्याबरोबर देवदर्शन व्हावे म्हणून देखणा असा तुळशी चौक आहे. आत विश्रांती

 ISSN 2231 4342

घेणाऱ्या राजा राण्यांना बाहेर उभे राहून आत वारा घालता यावा म्हणून शयनकक्षाला लाकडी फिरक्यांची सोय आहे. संपूर्ण राजवाड्याचेवैशिष्ट्यअसे की, राजवाड्याच्या बांधकामास एकही मातीची वीट वापरण्यात आलेली नाही. धनाढ्यसंस्थानिकांच्या या राजवाड्याच्यावर कोठेही लक्ष्मीचे शिल्प मुद्रींत केले नसून राजवाड्याच्यापूर्वेकडील सज्जावर विद्येचे प्रतिक म्हणून सरस्वतीची मूर्ती तर विद्येचा अधिपती म्हणून उत्तर सज्जावर गणपतीची भव्यदिव्य मूर्ती कायमस्वरूपी कोरण्यात आलेली आहे.दरबार हॉलमधील छताचे नक्षीकाम अप्रतिम असून दरबार हॉलमधील तत्कालीन राजसिंहासन राज शुभचिन्हांसह कोरण्यात आलेले आहे.[10]

तर नव्या भागाचा शुभारंभ इ.स.1909 रोजी करून इ.स.1911 मध्ये ते पुर्ण झाले. राजवाड्याचाजुना भाग हा सव्वा लाख चौरस फुटांचा परिसर आहे. तर राजवाड्याच्यानव्या भागाचे बांधकाम सहा लाख चौ.फुट इतके आहे. या मुधोजी मनमोहन राजवाड्यात रामाचा चौक, दसऱ्याचा चौक, मुदपाक चौक खाजगीचा हॉल, पागा चौक, नजरबाग असे चौक आहेत. तसेच गुलाबी हॉल, हिरवा हॉल, बदामी हॉल, हमखासे हॉल, इंग्रजी हॉल अशा बैठकीच्या खोल्या असून एकंदर 24 शयनगृहे, सात खणी लक्ष्मी टेरेस, टॉवर हुजूर ऑफीस खाजगी फड, तालीम देवघर, माजघर, खजिना असे भाग आहेत. ब्रिटीश बनावटीचे उच्च प्रतीचे नक्षीदार फर्निचर, बिल्लोरी आरसे, झेकॉस्लाव्हाकियान क्रिस्टलची झुंबरे, वेगवेगळ्या आकाराच्या हंडा, भिंतीवरील तैलचित्रे, चांदीचे फर्निचर व झोपाळा, शयनगृहामधील शिसवी पलंग, कपाटे, ड्रेसिंग टेबल आहेत. राजवाड्यात अनेक भुयारे आहेत राजवाड्यातएकुण चौदा जिने आहेत.

राजवाडयाच्या हत्ती दरवाजावरील दगडी अंबारी प्रवेश करताना मन मोहून घेते. राजवाडयाच्या आजूबाजूला हत्तीखाना, नगारखाना, जामदारखाना, दिवाणखाना, रथखाना, पोषाख, खानपागा, राजवाडयाच्या पुर्वेला गेस्ट हाऊस आहे.[11] या राजवाडयाने राजकीय इतिहासात महत्वाची भूमिका बजावलेली आहे. फलटण संस्थात भारतीय लोकशाहीमध्ये विलीन होताना श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी 64 लाखाची रक्कम भारत सरकारला सुपूर्द याच वाडयात केली. त्यांनी याच राजवाडयात विनोबा भावेंच्या भुदान चळवळीसाठी दहा हजार एकर जमीन सरकारला दान केली. या राजवाडयाला सर विश्वेश्वरय्या भारतरत्न महर्षी धोंडोकेशव कर्वे, भारतररत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साहित्यिक न.चिं.केळकर, पंतप्रधान मोरारजी देसाई, इंदिरा गांधी, आचार्य प्र.के.अत्रे, महात्मा गांधी, कवी माधव ज्युलियन, रामानंद गर्दे, पंजाबराव देशमुख, राष्ट्रपती व्हि.व्हि.गिरी, सरदार वल्लभभाई पटेल, बाळासाहेब खेर,रँग्लर परांजपे, यशवंतराव चव्हाण तसेच दक्षिण महाराष्ट्रातील अनेक संस्थांनांचे अधिपती, ब्रिटीश साम्राज्याचे अनेक पॉलिटिकल एजंट, गव्हर्नर यांनी या राजवाडयाला भेटी दिलेल्या आहेत.[12]

मध्यंतरीच्या काळामध्ये या राजवाडयाच्या देखभालीकडे दुर्लक्ष झालेले होते. परंतु महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर, फलटण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्रीमंत रघुनाथराजे नाईक निंबाळकर, सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर यांनी लक्ष घालून राजवाडयाला गतवौभव प्राप्त करुन दिल्यामुळे या राजवाडयाची बॉलीवूडलाही भुरळ पडलेली आहे. या

राजवाडयात अनेक चित्रपटांचे चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये अक्षयकुमारचा खट्टा-मिठ्ठा, सुश्मिता सेनचा देख भाई देख, तसेच झाशीची राणी, नऊ महिने नऊ दिवस, पांढर, एक होता राजा, कुंकू, गाढवाचं लग्न, शंभू माझा नवसाचा, तीन बायका फजिती ऐका, नाना पाटेकर, अक्षयकुमार, सुश्मिता सेन, मिलींद गुणाजी, कॅतरिना कैफ, ग्रेसी सिंग, अरुणा इराणी, रिमा लागू, क्रांती रेडकर, मकरंद अनासपुरे, मृणाल कुलकर्णी यासारखे अनेक कलाकार या राजवाडयात येऊन गेलेले आहेत. याशिवाय अनेक मालिकांचे चित्रीकरणही या राजवाडयात झालेले आहे.[13]

सारांश :-

फलटण संस्थानात असणाऱ्या वरील ऐतिहासिक वास्तुंमुळे अनेक पर्यटक फलटणला येत असतात. याशिवाय मुधोजी मनमोहन राजवाडयात होणारे विविध चित्रपटांचे चित्रीकरण यामुळे आजही फलटण आणि आसपासच्या भागामधील अनेक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहली फलटण येथे भेट देत आहेत. तसेच महानुभाव व जैन बांधवही मोठया संख्येने यात्रेसाठी फलटणमध्ये येत असतात. म्हणून फलटण हे पर्यटनाच्या बाबतीत अलीकडील काळात महत्वपूर्ण ठिकाण बनलेले आहे.

संदर्भ ग्रंथ

1) काबरा किसन, मॅनेजिंग टुरिस्ट डिस्टेन्सन, कनिष्क पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, न्यू दिल्ली, 2001, पान 8,9
2) साखरे विजया, ऐतिहासिक पर्यटन, अक्षरलोण प्रकाशन, सोलापूर, 2012, पान 8.
3) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल सन 1941-42,पृ.22
4) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल सन 1934-35,पृ.2
5) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल सन 1931-32,पृ.22
6) पाटील बाळासाहेब: सत्यवादी - दक्षिणी संस्थान खास विशेषांक अंक 1947,
7) फलटण संस्थानचा वार्षिक प्रशासकीय अहवाल सन 1941-42, पृ.21, 22
8) आदेश अंक सन 1971
9) पाठक अरुणचंद्र (संपा),सातारा जिल्हा गॅझेटियर,महाराष्ट्र रा.सा.व संस्कृती प्रका.मंडळ मुंबई 1983 पान.708
10) नाईक निंबाळकर देवस्थान ट्रस्ट यांचेकडील रेकॉर्ड
11) प्रत्यक्ष भेट, सर्वेक्षण व श्री. लालासाहेब नाईक निंबाळकर यांची मुलाखत दि. 6/9/2018
12) प्रत्यक्ष भेट, सर्वेक्षण व प्रा.डॉ.मधुकर जाधव यांची मुलाखत दि. 1/9/2018
13) शिवदे (डॉ) सदाशिव स., महाराष्ट्रातील ऐतिहासिक वाडे. भाग.2,स्नेहल प्रका., पुणे.2015 पान.270, 271

ISSN 2231 4342

महात्मा जोतीराव फुले : सत्यशोधक समाज चळवळ आणि वर्तमानस्थिती

प्रा. डॉ. संजय बाबुराव वाकळे
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग
प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय
चिंचोली (लिं), ता.कन्नड, जि.औरंगाबाद.

प्रास्ताविक :-

महाराष्ट्रातील समाज सुधारणेच्या चळवळीत सत्यशोधक समाजाने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण योगदानाने स्वत:चे स्थान निर्माण केलेले आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकिय परिवर्तनामध्ये सत्यशोधक समाजाचे योगदान फार मोठे आहे. महाराष्ट्राच्या समाज सुधारणेच्या चळवळीमुळे बहुजन समाजातील अंधकार कमी होण्यास सुरुवात झाली. सत्यशोधक समाजाची स्थापना करतांना महात्मा ज्योतीबा फुले यांनी व्यापक समाज हिताचा विचार केला होता.

सत्यशोधक समाजाची स्थापना करुन त्याद्वारे समाजातील अस्पृश्यता, अज्ञानीपणा, दारिद्रय दूर करण्यासाठी त्यांनी कार्य केले. बालहत्या, बालविवाह, केशवपन, सतीप्रथा इत्यादी सर्व प्रथा ह्या स्त्रियांवर लादलेल्या आहे. त्या दूर करण्यासाठी स्त्री शिकली पाहिजे म्हणून त्यांनी मुलींसाठी शाळा काढल्या. महात्मा फुलेंचे हे कार्य तत्कालिन काळात क्रांतीकारी मानले गेले. मुलींना शिक्षण देण्यासाठी स्त्री शिक्षिका आवश्यक आहे म्हणून त्यांनी प्रथमत: आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिकविले, प्रशिक्षण दिले व त्या मुलींच्या शाळेत अध्यापनाचे कार्य करु लागल्या. स्त्री शिक्षिका असल्यामुळे बरेच पालक आपल्या मुलींना शाळेत पाठवू लागले व सावित्रीबाई ह्या पहिल्या शिक्षिका म्हणून ओळखल्या जावू लागल्या. फुलेंच्या या कार्याला सनातनी समाजाचा प्रचंड विरोध असूनही फुले दांम्पत्याने आपले कार्य पुढे चालविले. 1853 पर्यंत महात्मा फुले यांनी तीन शाळा सुरु केल्या. शिक्षणाबरोबर फुलेंनी समाजातील अनिष्ट प्रथांच्या विरोधात बंड पुकारले होते. त्यात भृणहत्या, अस्पृश्यता, विधवा पुनर्विवाह, बालहत्या प्रतिबंधक गृह इत्यादी.

महात्मा ज्योतीबा फुले यांनी दलित समाज आणि स्त्रियांच्या उद्धाराचेच कार्य केले नाही तर त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन करुन त्यांच्यामार्फत समाजातील अज्ञान नाहिसे करुन समाज परिवर्तनासाठी आयुष्यभर प्रतिगामी विचारांचा समाजाशी लढा दिला. त्यांनी समतेसाठी चळवळ सुरु केली. या चळवळीत ते यशस्वी झाले. म्हणूनच त्यांचा समाज क्रांतीचे जनक या नावाने उल्लेख केला जातो. आज मुलभूत हक्क आणि अधिकारासाठी ज्या चळवळी चालू आहेत त्या चळवळींची पायाभरणी महात्मा ज्योतीबी फुले यांनीच केली आहे.

ISSN 2231 4342

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

1) महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाज निर्मितीची पार्श्वभूमी समजावून घेणे.
2) सत्यशोधक चळवळीची वाटचाल कशा पद्धतीने होत गेली याचा आढावा घेणे.
3) सत्यशोधक चळवळीचा समाज परिवर्तनासाठी झालेला फायदा अभ्यासणे.

सत्यशोधक समाजाच्या चळवळींची पार्श्वभूमी :-

इंग्रज भारतात व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले. इथे त्यांनी सत्ता प्रस्थापित केली. त्या कालखंडात परकियांनी सहजासहजी सत्ता हस्तगत करावी असेच वातावरण होते. ध्येयनिष्ठ छत्रपती शिवाजी महाराजांनी हिमतीने साकार केलेले स्वराज्य पेशव्यांनी इंग्रजांच्या हवाली केले. पेशव्यांना फक्त आपलेच हित ठाऊक होते. मौजमजा, ऐषआराम एवढेच त्यांचे स्वप्न होते. रंगेल, आळशी जीवन जगत होते. आपलेच भले करुन घेण्यात सारी यंत्रणा गुंतली होती. सत्ताधुंद पेशव्यांची सत्तेवर फार अशी मजबूत पकड नव्हती. याचाच फायदा इंग्रज राज्यकर्त्यांनी घेतला आणि 1818 मध्ये पुण्याच्या शनिवार वाड्यावर युनियन जॅक फडकवला. मराठ्यांची सत्ता संपुष्टात आली आणि इंग्रजांनी आपली सत्ता घोषित केली.

इंग्रजांची सत्ता आली. पुढे सत्तांतर झाले. परंतू तंत्र सारखेच होते. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे सर्वसामान्यांचा छळ चालूच होता. धर्माचा आधार घेवून कनिष्ठ जातीच्या लोकांवर अन्याय, अत्याचार, जुलूम केला जात होता. त्यांना गुलामाप्रमाणे जीवन जगावे लागत होते. अन्याय, अज्ञान, दारिद्रयाच्या दाट अंधारात सामान्य माणसे जगत होती, धडपडत होती. परंतू त्यांच्या या जगण्याकडे, धडपडीकडे पाहण्यासाठी वेळ कुणाजवळच नव्हता. बहुजन समाजातला माणूस हा माणसासारखा असूनही त्याला तसे जगता येत नव्हते. अशावेळी बहुजन समाजाला पददलित समाजाला आणि शुद्रातिशुद्रांना हजारो वर्षांच्या गाढ निद्रेतून जागे करण्याच्या विचारांची सुरुवात 1828 मध्ये राजाराम मोहन रॉय यांनी स्थापन केलेल्या 'ब्राम्हो समाजा' पासून झाली असली तरी त्यांना आपल्या न्याय, हक्कांची जाणीव करुन देण्याचे काम खऱ्या अर्थाने महात्मा ज्योतीराव फुले यांनी केले.

सत्यशोधक समाज चळवळीचे उद्दिष्ट्ये :-

1) बहुजन समाजाला जागृत करणे.
2) शुद्रातिशुद्र कनिष्ठ जातीच्या लोकांची ब्राह्मण पुरोहितांकडून होणारी पिळवणूक थांबवावी.
3) शुद्रातिशुद्रांना मानवी हक्कासाठी लढण्याचे सामर्थ्य निर्माण करणे.
4) माणसामाणसातील उच्च-नीच भेदाभेद नाहीसा करुन सामाजिक समतेचा पुरस्कार करणे.

धर्माच्या नावाखाली चालणारी कडवट सामाजिक व सांस्कृतिक विषमता नष्ट करण्याचा नि सर्व समाज एकसंघ करण्याचा प्रयत्न सत्यशोधक समाजाने उच्चनीचता, भेदभाव नष्ट करुन व्यक्तीचा सामाजिक दर्जा समान करणे यावर भर दिला. सत्यशोधक समाजाने बहुजन समाजाचे प्रबोधन करण्याच्या हेतूने कार्य केले. सर्व समाजाची या

दास्यातून मुक्तता व्हायला पाहिजे अशी समाजाची भूमिका होती. बहुजन समाजाला सन्मानाने जगता यावे यासाठी सत्यशोधक समाजाने प्रयत्न केल्याचे दिसून येते.

सत्यशोधक समाजाची तत्वे :-

1) ईश्वर एक असून तो सर्वव्यापी निर्गुण, निर्विकार आहे आणि त्याचे सर्व मानव प्राणी लेकरे आहेत.
2) ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक व्यक्तीस पूर्ण अधिकार आहे. त्यास त्रयस्थ दलालाची आवश्यकता नसते.
3) कोणतीही व्यक्ती जातीने श्रेष्ठ नसून गुणांनी श्रेष्ठ ठरते.
4) कोणताही धर्मग्रंथ ईश्वर निर्मित नाही.

सत्यशोधक समाजाची कार्ये :-

1) समाजातील जातीभेदाच्या भावना कमी करण्याचा प्रयत्न केला.
2) विभिन्न ठिकाणी शुद्रांसाठी शाळा स्थापन केल्या.
3) ब्राह्मणांशिवाय व मराठीतून मंगलाष्टके म्हणून विवाह करण्यास प्रारंभ केला.
4) सत्यशोधक समाजाने प्रथमच सामाजिक परिवर्तनासाठी चळवळ सुरु केली.
5) सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरी व अन्यायाविरुद्ध सामाजिक परिवर्तनाची मागणी प्रथमच केली.

सत्यशोधक समाजाची वाटचाल :-

महात्मा ज्योतीराव फुले यांनी जे सामाजिक परिवर्तनाचे कार्य हाती घेतले होते त्या कार्याच्या यशस्वीतेसाठी संघटनात्मक प्रयत्न करणे आवश्यक होते. यासाठी महात्मा फुलेंनी 24 सप्टेंबर 1873 रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. म.फुल्यांचा सत्यशोधक समाज हा मानवता बुद्धीप्रामाण्य व व्यक्तिस्वातंत्र्य या प्रमुख तत्वावर आधारीत होता. प्रचलित धर्मभेद, जातीभेद, प्रांतभेद, लिंगभेद हे खोटे, अन्यायी व मानवी विकासातील अडथळे आहेत या भूतलावरील समस्त स्त्री-पुरुष हे एक असून त्यांनी परस्पर बंधूभावाने, एकजुटीने समान वर्तन करावे असे त्यांचा मानवतावादी मत होते. सत्यशोधक समाज चळवळी ह एका विशिष्ट समाज व धर्माचे नेतृत्व करणारी चळवळ नसून ती सर्वसामान्य अस्पृश्य समाजाची एक कार्य प्रवृत चळवळ होती. या चळवळीत प्रामुख्याने भट, जोशी, ब्राह्मण यांच्या दास्यातून शुद्रातिशुद्रांची मुक्तता करणे, शुद्रांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे व समाजामध्ये जाती व्यवस्थेमुळे निर्माण झालेली सामाजिक विषमता नष्ट करणे, समाजातील बहुजन समाजाला एक व्यासपीठ तयार केले जावे आणि या व्यासपीठावरुन सत्याचा आग्रह धरुन समाज जागृती करावी असा महात्मा ज्योतीराव फुलेंचा विचार होता. या विचाराला अनुसरुनच त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

सत्यशोधक समाजाची वर्तमानस्थिती :-

महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाने धर्मसुधारणेचे कार्य केले. त्यास तेवढे यश आले नाही. स्वतंत्र बुध्दीने सत्याचा शोध घेण्याकरिता आणि सत्याचा पाठपुरावा करण्याकरिता ही चळवळ ज्योतीबांनी सुरु केली पण त्यांच्या मागे या चळवळीचा मुळ उद्देश बाजूला राहून तिचे रुपांतर ब्राह्मणेतर चळवळीत झाले. आजही समाजात समता रुजलेली नाही. सामाजिक अभिसरणात वर्गवारी व रुढी परंपरांचा प्रभाव अडसर होत असे. आजच्या पिढीने सत्यधर्माची व सामाजिक समतेची ज्योत हातात घेणे खूप महत्वाचे आहे. आज विविध हुंडा विरोधी अभियान, बलात्कार विरोधी मंच, शिक्षणाच्या क्षेत्रात विविध योजना, कापूस एकाधिकार योजना, मुस्लिम सत्यशोधक समाज स्थापन होत आहेत. महात्मा फुले व त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्याला यश आलेले असले तरी समाजात अद्यापही आवश्यक तो वैचारिक बदल होत नाही. साहजिकच यज्ञयाग, बुवाबाजी, दंगल, धार्मिक दंगे नित्याची बाब झाली आहे. भारतीय समाजाचा खऱ्या अर्थाने विकास करणे गरजेचे वाटत असले तरी त्यासाठी महात्मा फुले व सत्यशोधक समाजाची सर्वार्थाने आवश्यकता आहे हेच खरे.

समाज सुधारकांच्या कार्याचा व सर्व प्रकारच्या चळवळींचा आढावा घेतला असता समाज सुधारकांची व प्रबोधनाची परंपरा हरवत चाललीय असे म्हणायला काहीच हरकत नाही. कारण सद्यस्थिती कोणताही ठोस क्रांतीकारक विचार ठेवणाऱ्या व संपूर्ण समाजाचे हित साधले जावून समाजावर दुरगामी सकारात्मक परिणाम करणाऱ्या प्रभावी व मोठ्या चळवळी सध्या तरी अस्तित्वात असलेल्या दिसत नाहीत. काही चळवळी सुरु आहेत परंतू त्या फारसा प्रभाव पाडू शकलेल्या नाहीत. याचे कारण म्हणजे पूर्वी स्वातंत्र्यपूर्व काळात समाज सुधारकांनीही जाती-धर्माचा भेदभाव न करता एकीने व परस्परपूरक कार्य केले. आजच्या चळवळीच्या उभारणीचा पायाच कच्चा आहे. त्यांच्याकडे निष्ठावंत कार्यकर्ते नाहीत. समाज गटातटात विभागला गेला. धुर्त राजकारणी स्वार्थासाठी, सत्तेसाठी या गटबाजीचा फायदा उठवत आहेत.

सद्यस्थिती समाज सुधारकांच्या चळवळी व प्रबोधनाची परंपरा हरवत चालली असली तरी समाज प्रबोधनाचे कार्य अनेक क्षेत्रात संस्था, संघटना व व्यक्तिगत पातळीवर अखंड सुरुच आहे.

समारोप :-

अशाप्रकारे सत्ता, शिक्षण, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांचे बळ नसलेल्या बहुजन समाजासह संपूर्ण समाजाला नवीन दिशा देण्याचे कार्य सत्यशोधक समाजाने केले. धर्मसंस्थेतील दलालांचे उच्चाटन करण्याचा महात्मा ज्योतीबा फुले यांचा कृतिकार्यक्रम, स्वर्ग नरकाच्या संकल्पनांवरील दुबळेपणा उघड करणे आणि नैवेद्य, मंत्र, तंत्र, जादुटोणा, ईश्वरोपासनेचा मार्ग अवलंबण्याने होणारे शोषण उघड करणे हे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे महत्वाचे योगदान होते.

म्हणून शेवटी असे म्हणावेसे वाटते की, महात्मा फुलेंनी सांगितलेले हे विचारधन तत्कालिन समाजाला गतीशिलता देवून एका उन्नत अवस्थेत नेणारे होते. त्यांनी प्रतिपादिलेल्या सिद्धांतातील महती कालातीत स्वरुपाचे असल्यामुळे समस्याग्रस्त मानवी समुदायाला नेहमीच मार्गदर्शन करणारे आहे.

संदर्भसूची :-

1) भा.ल.भोळे - महात्मा फुले वारसा आणि वसा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2009
2) फडके य.दि. (संपा.) - महात्मा फुले समग्र वाङ्‌मय, प्रकाशक सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, नविन प्रशासन भवन, मुंबई, 1991.
3) रा.ना.चव्हाण - महात्मा फुले, सत्यशोधक समाज आणि सामाजिक प्रबोधन, अक्षर श्रध्दांजली, पुष्पा-15, संपादक प्रकाशन, रमेश रा.चव्हाण, कोथरुड, पुणे, 2009.
4) जोशी पं. - महादेवशास्त्री खंड-9 (भारतीय संस्कृती कोश)
5) ग्रोवर बी.एल. आणि बेल्हेकर एन.के. - आधुनिक भारताचा इतिहास : एक नवीन मुल्यांकन, एस.चंद एण्ड कंपनी लि., रामनगर, नई दिल्ली, द्वितीय आवृत्ती, 2007.
6) श्री.सावंत व गरुड - महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
7) कठारे अनिल - आधुनिक भारताचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, 1998.
8) चौधरी के.के. - आधुनिक भारताचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2015.
9) डॉ.उमेश शिंदे - महात्मा ज्योतीराव फुले यांचे राजकिय विचार, सायन पब्लिकेशन्स प्रा.लि., पुणे, 2015.
10) प्रा.वसंत जाधव, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, विद्या प्रकाशन, औरंगाबाद, 2012.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

Name of the Reasearch paper

क्रांतिवीर शिवराम जानबा कांबळे यांनी सोमवंशीय मित्रच्या माध्यमातून देवदासी, मुरळी प्रथे विरुद्ध दिलेले योगदान

Dr. Vandana Rajesh Shinde
(Assistant Professor)
History Department
Address - 526/202 Rameshwar Colony, Rameshwar Plaza, Kharepatan, Tal-Kankavli, Dist-Sindhudurg
Pin Code-416703
2020-2021 Ph no -9850574176

प्रस्तावना- महाराष्ट्र व कर्नाटकामध्ये स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी अनेक सामाजिक सुधारणा चळवळी झाल्या. कारण या चळवळीचा हेतू नवीन समाज निर्माण करणे हा होता.एकंदरीत स्त्रीमुक्ती चळवळीमध्ये अनेक समाजसुधारकांनी आपआपल्या परीने कार्य केल्यामुळे ही चळवळ टप्प्याटप्प्याने बदलत गेली. सुरुवातीच्या काळात राजा राम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, गोपाळ गणेश आगरकर, न्या. रानडे ,लोकहितवादी, महर्षी कर्वे या समाजसुधारकांनी सती प्रथा, बालविवाह ,केशवपन या प्रश्नाविरुद्ध चळवळी केल्या व स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली आणि स्त्रीवर्गात जागृती केली. स्त्रियांना शिक्षण, त्यांच्यासाठी स्वातंत्र्य, न्याय ,समता,समानता याचा पुरस्कार केला व स्त्रियांच्या प्रश्नांवर समाजाला विचार करायला भाग पाडले. त्याचाच परिणाम होऊन पुढील काळात स्त्रिया शिकल्या त्यामुळेच सुशिक्षित घराण्यातील काही स्त्रिया राजकारण व समाजकारणात पडल्या व त्या इतर स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी पुढे आल्या.त्यातूनच पंडिता रमाबाई सारख्या महान समाजसुधारक स्त्रीने १८८२ मध्ये 'आर्य महिला समाज' नावाची पहिली स्त्री संघटना स्थापन करून त्या काळात जाचक बंधनात गंजलेल्या स्त्रीयांना घरातून बाहेर काढले व त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे काम केले . पुढे १८८९ मध्ये शारदा सदन ही संस्था स्थापन करून विधवा, परित्यक्ता व वेश्याव्यवसायातून मुक्त झालेल्या निराधार स्त्रियांचे पुनर्वसन केले .त्यामुळे स्त्रीमुक्ती चळवळीलाही जोर आला.सन १९०२ मध्ये रमाबाई रानडे यांनी स्त्रीयांसाठी सामाजिक वाड्मयीन चर्चा मंडळ काढले, सन१९०५ मध्ये सुमतीदेवीनी कलकत्त्याला महिला समिती स्थापन केली. सन १९०९मध्ये डॉ.भांडारकर , न्या.रानडे, न्या. तेलंग यांनी सेवा सदनाची स्थापना केली या संस्थेने सती ,विधवा-पुनर्विवाह, बालविवाह,

केशवपन ,पडदा पद्धती, स्त्रीशिक्षण या संबंधित चळवळी केल्या वरील सर्व समस्या मुख्यत: हिंदू धर्मातील उच्चवर्णीय स्त्रियांशी संबंधित होत्या. परंतु महात्मा फुले ,शिवराम जानबा कांबळे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपवाद वगळता दलीत स्त्रियांचे देवदासी,मुरळीसारखे प्रश्न सोडवण्यासाठी फारसा कोणी प्रयत्न केला नाही. त्यामध्ये दलित समाजातील क्रांतीवीर शिवराम जानबा कांबळे यांनी देवदासी, मुरळी प्रथेविरुद्ध सोमवंशीय मित्रच्या माध्यमातून उल्लेखनीय कामगिरी केली होती. त्याचा थोडक्यात आढावा प्रस्तुतच्या शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

संशोधनाची पद्धत-सदरच्या शोध निबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती वापरली आहे प्रस्तुतच्या संशोधनात देवदासी मुक्ती संघटनेचे अध्यक्ष प्रा. विठ्ठल बन्ने, डॉ.अच्युत माने यांची प्रत्यक्ष मुलाखती, सोमवंशीय मित्रचे अंक, शिवराम जानबा कांबळे यांचे चरित्र, काही प्राथमिक व दुय्यम साधने, मासिके, वर्तमानपत्रे यांचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाची गरज-आत्तापर्यंत अभ्यासकांनी व संशोधकांनी स्त्रियांशी संबंधित असलेल्या सती प्रथा, बालविवाह, केशवपन, बहुपत्नीत्व ,पडदापद्धती या अनिष्ट प्रथांचा विविध प्रकारे अभ्यास केला आहे. पण भारतीय समाजव्यवस्थेत देवदासी, मुरळी ही सुद्धा स्त्रियांशी संबंधित असलेली एक अनिष्ठ प्रथाच होती आणि आहे .याकडे बऱ्याच संशोधकांनी व अभ्यासकांनाही दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. तळागाळातल्या एकूणच समाजाने समाजाच्या प्रगत प्रवाहाशी वंचित ठेवलेल्या स्त्रियांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. या दृष्टिकोनातून प्रस्तुतच्या शोधनिबंधामध्ये दलित, मागासवर्गीय व अस्पृश्य जातीतील देवदासी, मुरळ्या या स्त्रियांसाठी शिवराम जानबा कांबळे यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून दिलेले योगदान अभ्यासणे गरजेचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे-

१)शिवराम जानबा कांबळे यांनी देवदासी, मुरळी प्रथेविरुद्ध दिलेले योगदान तपासणे.

२) क्रांतीवर कांबळे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेणे.

३) शिवराम जानबा कांबळे यांचे स्त्रीमुक्तीचे कार्य अभ्यासणे.

४) एक थोर दलित समाज सुधारक या नात्याने क्रांतिवीर कांबळे यांची भूमिका अभ्यासणे.

१९ व्या शतकात जरी महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा चळवळी मोठ्या प्रमाणात झाल्या असल्या तरी समाजात त्याकाळात देवदासी प्रथा व अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात होती. त्यावेळी अस्पृश्य, मागासलेला दलित समाज हा परंपरागत रुढी, अज्ञान, अंधकार व अंधश्रद्धेच्या जात्याखाली भरडला जात होता. नानाप्रकारचे उपास-तापास, अनिष्ट चाली ,नवस यांनी पछाडलेला होता. दलित समाजाचे हे अधःपतन दूर करण्यासाठी १९०८ पासून अनेक सामाजिक कार्यकर्ते प्रयत्न करीत होते.त्यामध्ये लोकजागृती व समाज प्रबोधन व्हावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे परमस्नेही क्रांतिवीर शिवराम जानबा कांबळे यांनी "सोमवंशीय मित्र"हे मासिक चालवून त्याद्वारे दलितांवर, देवदासी, मुरळ्यांवर होणारे अन्याय, अत्याचार कसे अमानुष आहे ते इतरांच्या लक्षात आणून दिले. त्यांनी प्रथम या मासिकात देवाला मुली सोडण्याच्या अनिष्ट प्रथेविरुद्ध लेख लिहून१९०८ मध्ये प्रथमता: बंड

पुकारले. "सोमवंशीय मित्र"या मासिकामुळे दलित समाजाला व अस्पृश्य स्त्रियांना देवदासी ,मुरळयांना चांगलीच जाग आली.कारण ज्या काही देवदासी, मुरळया होत्या त्यांची संख्या दलित समाजातच मोठ्या होती.

पुढे शिवराम जानबा कांबळे यांच्या लेखाची प्रतिक्रिया चांगली होऊन शिवबाई वल्लद जाधव नावाच्या एका मुरळीने आपल्या विवाहापूर्वी अतिशय उध्दबोधक असे पत्र शिवराम जानबा कांबळे यांना पाठवले .त्यामध्ये तिने देवाला सोडलेल्या मुरळी मुलीचे दुःख काय असते हे सांगितले आहे. या पत्रामध्ये ती म्हणते," सोमवंशीय जातीमध्ये देवदासी, मुरळया सोडण्याची जी घातक चाल पडली आहे .त्यामुळे आई-वडील आपल्या पोटच्या मुलींना खंडोबाची मुरळी व रेणुका देवीस देवदासी म्हणून अर्पण करतात. परंपरागत रूढी, अज्ञान, अंधश्रद्धा यामुळे देवाला व देवीला देवदासी, मुरळया सोडण्याची ही शिक्षा आई-वडील आपल्या मुलींना देतात. त्यामागे देवदासी होणाऱ्या मुलीची काहीच चूक नसते त्याबद्दल आई-वडील दोषी असतात. पण त्यांना तरी दोष कसा द्यायचा कारण ते धर्मातील रूढी परंपरेचे पालन करतात. खरं तर याला आपला धर्मच जबाबदार आहे. सर्वजणी मुरळया नसतात बहुतेकजणी कुलीन स्त्रीप्रमाणे वर्तन करतात..... याशिवाय देवदासी, मुरळया मुसलमान व ख्रिश्चन धर्मात जाऊन राहू लागल्या तर त्यांना या धर्मात सामावून घेतले जाते त्यांना व त्यांच्या मुलांना या धर्मामध्ये चांगली वागणूक मिळते पण आपल्या हिंदू धर्मामध्ये मुरळयांना किंवा त्यांच्या मुलांना सामावून घेतले जात नाही. इतकेच नव्हे तर त्यांच्या मुला-मुलींना महार समाजातील कोणीही मुली देत नाहीत व आमच्या मुली आपल्या मुलांना कधीच करीत नाहीत. तेव्हा तुमच्यासारख्या पुढाऱ्यांनी आमच्यावर टीका करून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी वाट चुकलेल्या आणि दुष्ट रूढीच्या फेऱ्यात सापडलेल्या अंतरलेल्या व शरण आलेल्या आम्हां मुरळयांची, देवदासींची जननींदेच्या कचाट्यातून सोडवणूक करून त्याचा शेवट गोड करण्यासाठी देवदासी , मुरळयांना पंचांनी चांगल्या मार्गाला लावावे व ती प्रथा मोडून काढावी ......उच्च वर्गामध्ये आता पुनर्विवाह होतात, काडीमोड होतात, स्त्रियांचे मुंडन वगैरे कधीच नाहीत, सती जात नाहीत हा जसा बदल झाला आहे तशीच मुरळया सोडण्याची पद्धत बंद करावी.[१]

शिवूबाई जाधव या मुरळीचे पत्र सोमवंशीय मित्रच्या १ डिसेंबर १९०८ च्या अंकात प्रसिद्ध केले.ते पत्र प्रसिद्ध झाल्यानंतर या वृत्तपत्राचे संपादक शिवराम जानबा कांबळे यांच्याकडे बऱ्याच वाचकांची प्रतिक्रियात्मक पत्रे आली . यामध्ये श्रीपतराव थोरात यांनी मुरळी प्रथा बंद करण्याविषयी लिहिलेले पत्र अत्यंत उल्लेखनीय आहे. थोरात यांनी हिंदू धर्मामध्ये देवदासी, मुरळी सोडण्याची अनिष्ट रूढी महार ,मांग ,ढोर, चांभार इ. दलित जातींमध्ये आहे तिला पायबंद घातला पाहिजे. असा आशावाद व्यक्त करून या अनिष्ट रूढीविरुद्ध जे कडक शब्दात आसूड ओढले आहे ते महत्वपूर्ण आहेत. खंडोबाच्या, यल्लमाच्या, कृपाप्रसादाने मुलं होतात ही लोकांची वेडी समजूत आहे. त्यातून मुलगी झाली तर तीही देवाचीच असते. मग तिचे खंडोबा व यल्लमाशीच कसे काय लावले जाते असा परखड सवालही श्रीपतराव थोरात यांनी केला आहे.[२]

शिवराम जानबा कांबळे यांची शिवूबाई जाधवच्या पत्रावरील प्रतिक्रिया सुद्धा अतिशय महत्त्वाची होती. त्यांनी सर्व समाजाला, दलितांना असे आवाहन केले की, मुरळी सोडण्याच्या अनिष्ट प्रथेचा मुलींच्या आईवडिलांनी, ज्ञाती बांधवांनी नीट विचार करावा मुरळया सोडणे हा आपल्या जातीला लागलेला मोठा कलंक आहे तो सर्वांनी

ISSN 2231 4342

धुवून काढावा असा उपदेश केला. त्यांच्या या उपदेशांचा लोकांच्या मनावर मोठ्या प्रमाणात परिणाम होऊन शिवराम तांबटे यांनी पत्र पाठवून शिवराम जानबा कांबळे यांचे या कार्याबद्दल आभार मानलेले दिसते. शिवराम तांबटे आपल्या पत्रात म्हणतात की, आपल्यात अत्यंत नीच चाल आहे. आपल्यातील भोळे भाविक लोक मुलींना देवदासी,मुरळ्या करतात.या नीच चालीमुळे सोमवंशी जातीतील पुष्कळ भगिनी नीतीमार्ग सोडून उघडपणे कसाबपणा करतात. त्यामुळे पुढे त्यांची दुर्दशा होते. म्हणून मुलींना देवदासी, मुरळ्या करू नयेत व ज्या झालेल्या आहेत त्यांना पवित्र करून घ्यावे मुरळ्यांना चांगल्या मार्गावर आणण्याचा प्रयत्न करावा.[३]

पुढे शिवराम कांबळे यांनी ही पत्रे केवळ सोमवंशी मित्रच्या अंकात प्रसिद्ध करून गप्प बसले नाहीत तर त्यांनी १ मार्च १९०९ च्या अंकात एक विनंती पत्रिका काढून ती प्रसिद्ध करून समाजाला जाहीररित्या आव्हान केले त्या विनंती पत्रिकेत ते म्हणतात, देवदासी, मुरळ्यांच्या संबंधाने आमच्या वर्तमानपत्रातून मागे जी चर्चा झालेली आहे ती फक्त कागदावरच राहू नये म्हणून आमच्या ज्ञातीने आपल्या मुली खंडोबाच्या मुरळ्या व यल्लमाच्या देवदासी म्हणून सोडण्याबाबतचा सारासार विचार करावा त्यांनी मुलींना देवदासी, मुरळ्या सोडू नये यापूर्वीच्या ज्या देवदासी, मुरळ्या सोडल्या गेल्या आहेत त्यांच्याबरोबर लग्न करण्याची इच्छा ज्या पुरुषांची आहे त्यांना ज्ञातीपंचायतीकडून परवानगी असावी या दोन गोष्टी मान्य असणाऱ्यांनी फॉर्म भरून त्यावर सही करावी व तो फॉर्म आमच्याकडे पाठवून द्यावा.[४] असे जाहीर निमंत्रण शिवराम कांबळे यांनी विनंती पत्रिकेत केले होते व त्याखाली आपले ज्ञाती बांधव म्हणून शिवराम जानबा कांबळे, श्रीपतराव रामजी थोरात, जोरदास भालेराव यांची नावे दिलेली होती.

अशा सुधारणावादी काळात शिवराम जानबा कांबळे यांनी विनंती पत्रिकेबरोबरच सरकारने एक जाहीरनामा काढून देवदासी, मुरळी प्रथेला पायबंद घालावा अशी मागणी केली होती. पुढे सरकारने जाहीरनामा काढून असे जाहीर केले की, इंडियन पिनल कोडच्या कलम ३७३ प्रमाणे जो कोणी १६ वर्षाच्या आतील आज्ञान मुलीस वेश्येचा धंदा करण्यास किंवा कोणत्याही अनीतिच्या कामासाठी विकेल किंवा तसा प्रयत्न करेल त्यास १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा देण्यात येईल म्हणजे पालकांनी आपल्या मुलींना मुरळ्या करू नये व त्यांना सन्मार्गाला लावले पाहिजे अन्यथा सरकार अशा गुन्हेगार पालकांना दंड वा शिक्षा ठोठावेल. पुढे त्यांनी सोमवंशी मित्रमध्ये ही माहिती देऊन सरकारला अशी विनंती केली की, सरकारने सध्या ज्या मुरळ्या आहेत त्यांचे एक रजिस्टर ठेवावेत त्यात मुरळ्यांची नावे नोंदवावी व मुरळ्या झाल्याचा दाखला घेऊन त्यावर मामलेदाराची सही घ्यावी म्हणजे यामुळे कोणी आपली मुलगी नव्याने मुरळी करून ती पूर्वीच मुरळी झाली होती म्हणून सरकारला फसवू नये सरकारने आणखी एक महत्वाची गोष्ट करावी की मुरळ्या, जोगतीणी वगैरे स्त्रिया रस्त्यावर बीभत्स लावण्या गाऊन भीक मागतात त्यालाही बंदी करावी व कसबीणी संबंधी जे कायदे करण्यात येतील ते सर्व मुरळ्यांनाही लागू करावेत कारण त्याही उघडपणे कसबिणीच अशी विनंती शिवराम जानबा कांबळे यांनी सरकारकडे केली होती.

वरील कार्यावरून शिवराम जानबा कांबळे व इतर राज्यकर्ते आपल्या समाजातील स्त्रियांच्या प्रश्नाविषयी किती जागरूक होते याची प्रचिती येते.सर्वात महत्त्वाचे म्हणजे दलित समाजातील सुधारक नुसते भाषणावीर

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal **ISSN 2231 4342**

नव्हते तर ते कृतीशूरही होते. भाषणा पेक्षाही ते आपल्या कृतीला महत्त्व देणारे होते.देवाला सोडलेल्या देवदासी, जोगतीणींचे जीवन सुधारावे म्हणून शिवराम जानबा कांबळे, श्रीपतराव थोरात, जोरदार भालेराव इ.कार्यकर्त्यांनी पश्चिम महाराष्ट्राच्या पुणे जिल्हातील जेजुरी या ठिकाणी सोमवंशीय लोकांची परिषद भरवली या परिषदेत देवदासींच्या समस्येवर विचार करण्यात आला व ज्ञातीबांधवांनी आपल्या मुली देवदासी, मुरळी म्हणून सोडू नयेत असे ठराव पास करण्यात आले. त्यानंतर या कार्यकर्त्यांनी गावोगावी फिरून जनजागृती केली. समाजप्रबोधन व प्रचार केला. आपल्या मुलींना देवदासी, मुरळी न सोडण्याबद्दल गावोगावच्या पंचाकडून,ज्ञाती पंचायतीकडून ठराव पास करून घेतले.[५] त्यामुळे दलित समाजाचा मुरळीकडे पाहण्याचा दृष्टिकोनही हळूहळू बदलू लागला. एकूणच शिवराम जानबा कांबळे व त्यांच्या सहकारी मित्रांनी चालविलेल्या चळवळीचा व प्रचाराचा दलित समाजावर चांगलाच परिणाम झाल्याचे दिसून येते.

कदाचित त्यांच्या या बदललेल्या दृष्टिकोनामुळे बहुतांशी लोक पुढे येऊन मुरळ्यांशी विवाह करण्याची तयारी दर्शवित होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे १९०९ मध्ये शिवूबाई जाधव या मुरळीचा खडकीच्या गणपतराव हनुमंतराव गायकवाड या तरुणाशी विठ्ठल रामजी शिंदे व शिवराम जानबा कांबळे यांच्या मदतीने झालेला विवाह.[६] तो देशातील असा पहिला विवाह मानला जातो.कोल्हापुरात देखील त्यांची मर्जी असेल त्या मुरळ्यांचे विवाह घडवून आणण्याचे प्रयत्न अस्पृश्य जाती करू लागल्या . अशा तऱ्हेने मुरळ्यांचे विवाह स्वजातीत करून घेणारे तरुण पुढे येत असतानाच मुसलमान धर्मातील लोक मुरळ्यांची निवड करुन त्यांना हक्काचं घर व संसारसुख देत होते. याचे उदा. श्रीपतराव थोरात यांनी १ ऑगस्ट १९०९ च्या सोमवंशीय मित्राच्या अंकात दिले आहे. थोरात म्हणतात की, १९ जुलै १९०९ रोजी कामठीपुऱ्यातील विठाबाई नावाच्या मुरळीने मुसलमान धर्माची दीक्षा घेऊन आपल्या मुसलमान प्रियकरासोबत निकाह लावला. हे वृत्त देऊन थोरात म्हणतात ,परधर्मात जाऊन निकाह लावण्यापेक्षा आपल्या जातीमध्ये राहून लग्न करणे लावणे वाईट आहे का?[७] या गोष्टीचा सुधारणावाद्यांनी विचार करावा असे आवाहन त्यांनी या पत्रात केलेले दिसते.

एकंदरीत पश्चिम महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यात जेजुरी हे ठिकाण खंडोबा या देवतेचे प्रमुख केंद्र आहे. त्या खंडोबाच्या देवळातही दरवर्षी जत्रेच्या वेळी मुरळ्या सोडण्यात येत असत. या प्रथेविरुद्ध लोकमत जागृत करण्यासाठी शिवराम थांबा कांबळे यांनी १९०९ साली पुणे जिल्ह्यातील जेजुरी येथे सोमवंशीय, महार लोकांची मोठी परिषद भरवून लोकांना आपल्या मुलींना देवदासी, मुरळी करू नये आणि जे लोक मुरळ्याबरोबर लग्न करण्यास प्रवृत्त होतील त्यांना जातीकडून अडथळा होऊ नये असा ठराव सर्व गावच्या महार लोकांकडून पास केला. मुरळी प्रथेविरुद्ध जे लोकमत जागृत होते त्याचाच परिणाम येथील खंडोबाच्या जत्रेच्या वेळी पुढील वर्षी दिसून आला. त्यावर्षी एकही मुरळी सोडण्यात आली नाही. पण मात्र अशी प्रथा बंद करण्याच्या प्रयत्नाला सार्वत्रिक मान्यता मिळणे ही गोष्ट कठीण होती. कारण शिवूबाई जाधव या मुरळीचे लग्न खडकीच्या गणपतराव हनुमंतराव गायकवाड यांच्याशी लावल्याने काशीराम बटलर महार गोसावी हा ग्रहस्थ संतप्त झाला. तो गायकवाड यांच्या घरी गेला त्याने शिवूबाईला ओढून रस्त्यावर आणले व गायकवाड आपल्या बायकोला

सोडविण्यात आले असता त्यांनाही मारहाण केली. पण येसूबीन काशीराम बटलरवर गुन्हा शाबीत होऊन खडकी कॅन्टोन्मेंट मॅजिस्ट्रेटने त्याला दीड महिना सक्तमजुरीची शिक्षा दिली होती.[८]

त्या काळातही देवदासी, मुरळी करण्यावरही खटले कसे भरले जात होते याविषयी शिवराम जानबा कांबळे आपल्या १ डिसेंबर १९०९ च्या अंकात म्हणतात की, मुंबई येथील कामठीपुऱ्यातील पहिल्या गल्लीत महालू नावाची सोमवंशीय बाई राहत होती. तिने स्वतः पालन करीत असलेल्या सुंद्री नावाच्या ११ वर्षीय मुलीस मुरळी केले. सुंद्रीच्या भावाने मरताना माझ्या बहिणीस मुरळी कर असे आपणास सांगितले असे जवानी महालू या सोमवंशीय बाईने दिली तरी महालूला चार महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. कोंडाबाई व रामा या दोघांनी सुंद्रीस मुरळी होण्यास मदत केली म्हणून त्यांच्यावर खटला भरण्यात आला होता. पण पुराव्याच्या अभावी ते दोघे सक्तमजुरीची शिक्षेतून सुटले.९ असे जरी असले तरी सोमवंशीय मित्रच्या माध्यमातून क्रांतीवीर शिवराम जानबा कांबळे यांनी देवदासी मुरळी यांसाठी उल्लेखनीय कामगिरी केल्याचे दिसून येते.

निष्कर्ष - अशाप्रकारे पतित स्त्रियांना मुक्त करण्यासाठी ज्या समाजसुधारकांनी प्रयत्न केले त्यात क्रांतिवीर शिवराम जानबा कांबळे यांचे कार्य अतिशय उल्लेखनीय होते. महाराष्ट्राच्या इतिहासात अतिशूद्र जातीच्या हितासाठी , देवाला सोडलेल्या देवदासी व मुरळी मुलींच्या संरक्षणासाठी व त्यांच्या मुक्ततेसाठी सोमवंशीय मित्रच्या माध्यमातून त्यांच्या समस्यांना वाचा फोडणारे एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे शिवराम कांबळे होते.ते स्वतः दलित कुटुंबात जन्मलेले असल्याने त्यांना तळागाळातील दलित शुद्र स्त्रियांची स्थिती माहिती होती.त्यामुळे सुधारणा चळवळीत अग्रेसर असतानाच एक दलित समाजसुधारक या नात्याने त्यांनी देवदासी व मुरळ्यांच्या प्रश्नावर शासनाला सुद्धा विचार करायला भाग पाडले व पतीत स्त्रियांच्या प्रश्नांना सोमवंशीय मित्रच्या माध्यमातून वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून दिला.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्वी दलित चळवळीचा पाया घालणारे व देवदासी स्त्रियांच्या मुक्ततेसाठी अहोरात्र प्रयत्न करणारे शिवराम कांबळे हे त्या काळातील एकमेव समाजसुधारक होते. त्यांनी आपले विचार सोमवंशीय मित्रमध्ये परखडपणे मांडले व त्या मासिकामध्ये एक धाडसी भूमिका पार पाडली.तसेच महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज लोकमान्य टिळक या नेत्याबरोबरच त्यांनी आपल्या स्वतःच्या विचारांची एक वेगळी झलक दाखवली. म्हणून तर त्यांना खऱ्या अर्थाने देवदासी,मुरळी मुक्ती प्रथेचे क्रांतिवीर व सुधारणा चळवळीचे आद्य प्रवर्तक म्हटले तरी त्यात वावगे ठरणार नाही.

संदर्भ साधने:-

१) उर्मिला पवार व मीनाक्षी मून-आम्हीही इतिहास घडविला, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे ,दुसरी आवृत्ती, ८ मार्च २००० पृ. क्र.३४,३५.

२) श्री. वसंत राजस-देवदासी शोध आणि बोध, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे प्रथमावृत्ती ,जुलै१९९७,पृ. क्र.४५

३) उपरोक्त, उर्मिला पवार व मीनाक्षी मून पृ.क्र.३५

४) बळवंत कांबळे-भारतातील देवदासी प्रथा ,चळवळ आणि पुनर्वसन, श्रीविद्या

ISSN 2231 4342

प्रकाशन,२५०, शनिवार पेठ ,पुणे ,प्रथमावृत्ती १८ मे २००० पृ. क्र. ३९

५) प्रा. निंभूके सी. डॉ. आंबेडकर पूर्व समाजसुधारक शिवराम जानबा कांबळे, पायल प्रकाशन , नागपूर ,प्रथमावृत्ती २००० पृ.क्र. २०

६) गो.मा.पवार- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य, न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन, सयानी रोड, प्रभादेवी , मुंबई ,प्रथमावृत्ती मे,२००४ पृ. क्र.२५०

७) उपरोक्त ,ऊर्मिला पवार व मीनाक्षी मून पृ. क्र. ३७

८) उपरोक्त ,गो. मा. पवार. पृ. क्र.२५०

‘कोळगिरी (जि. सांगली) येथील वैशिष्ट्यपूर्ण वीरगळ शिल्पे’

श्री. सचिन पांडुरंग शिंदे
पीएच.डी. संशोधक, प्राचीन भारतीय इतिहास,
संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र विभाग
सामाजिक शास्त्रे संकुल
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर
विद्यापीठ, सोलापूर
ई-मेल :- sachinps811@gmail.com
मो.नं. :- 9657687940

प्रस्तावना :-

कोळगिरी ता. जत जि. सांगली येथे महादेवाचे प्राचीन मंदिर असून या ठिकाणी मंदिर परिसरात ही वैशिष्ट्यपूर्ण अशी वीरगळाची शिल्पे आहेत. वीरगळ शिल्पकलेच्या अभ्यासाचे एक महत्त्वाचे पुरातत्त्वीय साधन आहे. भारतात प्राचीन काळापासून स्मारके बनविण्याची प्रथा आहे. महाराष्ट्रात ती विविध प्रकारे उभारली जातात. स्तंभ, देवळी, घुमटी किंवा छत्री, समाधी, वृंदावन, शिवलिंग, सतीशिला आणि वीरगळाच्या स्वरुपात आपण ती पाहातो. त्यापैकी वीरगळ व सतीशिला हे दक्षिणेकडील कर्नाटकपासून उत्तरेकडील राजस्थान पर्यंत तसेच काश्मिर, हिमाचल प्रदेश, आंध्रप्रदेश, तामिलनाडू आणि बंगाल पर्यंत पहायला मिळतात. विशेष म्हणजे कर्नाटक आणि राजस्थान मध्ये वीरगळ व सतीशिलांवर तीथी व नांवे कोरलेली दिसतात, पण महाराष्ट्रातील वीरगळांवर नावे नसल्यामुळे त्याचा ऐतिहासिक घटकांशी संदर्भ जुळवता येत नाही असे जरी असले तरी भारताच्या प्राचीन व मध्ययुगीन इतिहास संशोधनात जी अनेक साधने उपलब्ध आहेत. त्यामध्ये चित्रमयस्मृती शिल्प म्हणजे वीरगळ याचाही समावेश होतो. (टेटविलकर सदाशिव : २०१४;१५)

एखाद्या शूरवीरास कोणत्या कारणास्तव वीरगती प्राप्त झाली आहे त्याचे चित्रण ज्या शिळेवर शिल्पांकित केले जाते तीला 'वीरगळ' असे म्हणतात. वीरगळांचा कालखंड हा इ.स.१२वे शतक ते इ.स.१५वे शतक असा ठरतो. Hero Stone किंवा A Stone Image या नावाने इंग्रजीत परिचीत असलेला हा शब्द कानडीत कल्लू, केरळीत ततरी, मराठीत वीरगळ या नावाने उल्लेखला जातो. 'वीरांचा दगड' या अर्थाचा 'वीर-कळ' ह्या कन्नड शब्दावरुन 'वीरगळ' हा शब्द महाराष्ट्रात रुढ झाला आहे. (कुलकर्णी बी.डी.:१००४, ६८) वीरगळ ही स्मारकशिला म्हणून निर्माण झाले आहे. ज्या शुरास वीरमरण प्राप्त झाले आहे. त्याच्या स्मरणार्थ अशा स्मारक शिला उभ्या करण्याची पध्दत भारतात प्राचीन काळापासून चालत आली असली तरी दक्षिणापथात आठव्या नवव्या शतकापासून या प्रथेने जोर धरलेला दिसतो आहे. कल्याणी चालुक्य, राष्ट्रकुट, शिलाहार,

कदंब, यादव या राजवटी क्रमाने १३ व्या शतकाच्या अखेर पर्यंत राज्य करीत होत्या. त्यांची वीरगळे आपणाला पाहावयास मिळतात. (टेटविलकर सदाशिव:२०१४;२२,२३)

- **वीरगळाची रचना :**

वीरगळाच्या शिळेची रचना विशिष्ट पध्दतीने केली जाई. वीरगळ हे ३ ते ५ कप्प्यांचे असते. तळाशी युध्द प्रसंग किंवा वीरगळ निर्मितीचे कारण युध्द प्रसंग, पशु प्रसंग, पशु रक्षण इत्यादी प्रसंग असतात. दुसऱ्या कप्यामध्ये मरण पावलेल्या वीराला अप्सरा स्वर्गात घेऊन जातात हे दाखवलेले असते. वरच्या भागात परमेश्वराची पूजा करतात दाखवितात. त्यास स्वर्गप्राप्ती झाली आहे असे सांगावयाचे असते. यामध्ये शिवलिंग परमेश्वर रुपात दाखवतात. एकंदरीत वीरगळ म्हणजे वीर पुरुषाचा एक संक्षिप्त चित्रपट असतो. त्यातून विशिष्ट घटनेची स्मृती जतन करण्याचा प्रयत्न असतो.

- **वीरगळ तयार करावयाची पध्दत :**

वीरगळ तयार करायची एक विशिष्ट पध्दत आहे. आकाराने सामान्यत: ६० सें.मी. ते १०० सें.मी. उंचीच्या उभट शिळेवर एकावर एक असे तीन किंवा चार चौकोन खोदून त्यात त्या वीराच्या कथेचे अंकन केलेले असते. यामध्ये सर्वांत महत्त्वाचे म्हणजे दगडी शिळा होय. बहुतांशी वीरगळ हे बेसाल्ट दगडात कोरलेले आहेत.
वीरगळाच्या रचनेत सर्वांत खाली तो वीर मृत्युमुखी पडलेला दाखवतात या ठिकाणी सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो वीर कोणत्या कारणास्तव मरण पावला आहे ते सूचित केलेले असते. यामध्ये गायी, गुरे, खिलारे याच्या बरोबर वीर धारातीर्थी पडलेला आहे असे चित्रण कोरलेले असते. याच्या वरील कप्यात लढाई प्रसंग असतो. यामध्ये वीर हातामध्ये तलवार, ढाल धारण करुन एखाद्या प्राण्यावर स्वार झाला असेल तो घोडा, हत्ती इ. चे चित्रण तसेच वीराच्या चेहऱ्यावरचे हावभाव, लढाईचा वेग, प्राण्याचा वेग, चपळपणा, हल्ला करण्याची पध्दत, तलवारींच्या वारांचा प्रकार, भाला फेकण्याची पध्दत अशा सर्व गोष्टीचे बारकाईने शिल्पांकन केलेले असते. त्याच्या वरच्या कप्प्यात वीराचं स्वर्गारोहण असते. यात अप्सरांची संख्या, त्यांची वेशभूषा, केशभूषा, आभुषणे, हातातील आयुधे वीराला नेण्याची पध्दत जसे पालखी वगैरे कोरलेले असते. तर सर्वांत वरच्या स्वर्गप्राप्ती कप्प्यात संबंधीत वीर कोणत्या पंथाचा आहे. त्याची इष्ट देवता कोरण्याची पध्दत असते. जसे शिवलिंग म्हणजे तो वीर शिवमय झाला असे प्रसंग कोरतात. स्वर्गाचा प्रतिनिधी म्हणून पुरोहित, त्याची केशरचना, मुखरचना वगैरे प्रसंग कोरतात म्हणजे एकूण सर्व पूजेच्या प्रसंग चित्रीत केलेला असतो. यावरती कलश कोरुन कलशा शेजारी सूर्य, चंद्र कोरण्याची पध्दत असते. म्हणजे कलश हा मोक्ष प्राप्तीचा संदेश असतो. तर सूर्य, चंद्र म्हणजे जोपर्यंत आकाशात सूर्य, चंद्र आहेत. तोपर्यंत वीराचे स्मरण/किर्ती राहिल असा त्याचा अर्थ असतो. जर वीराबरोबर त्याची पत्नी सती गेली असेल तर त्या वीरगळावर स्त्रीचा हात कोरलेला असतो. तिच्या हातावर बांगड्या असतात. त्यांना सतीशिळा म्हणतात. थोडक्यात सांगावयाचे झाले तर वीरगळ म्हणजे वीर पुरुषाचा एक संक्षिप्त चित्रपट असतो. (दुधाणे अ.कि.:२०२०; १५)

१. शिकार निदर्शक वीरगळ :

एखादा वन्यप्राणी, पशू मारत असताना तो प्राणी बचावासाठी प्रतिस्पर्धीवरती हल्ला करतो व त्यात तो मनुष्यप्राणी जखमी होऊन मरण पावतो. यात श्वापदामुळे तो वीर शिकार करताना मरण पावतो. त्यास शिकार निदर्शक वीरगळ म्हणतात.

या शिल्पात खालील भागात एक व्यक्ती समोरील प्राण्यावर उजव्या हातातील शस्त्राने व अन्य हाताने वाघ या प्राण्याला पकडले आहे. त्यावर हल्ला करीत आहे. या भागातील काही भाग भग्न झाला आहे.

दुसऱ्या भागातील कप्प्यात पहिल्या शेवटच्या कप्प्यातील हल्ला करीत असलेले व्यक्तीची त्या पशूवर पुढची चाल झालेली अंकित करण्यात आली आहे. त्यावेळी त्या व्यक्तीने शस्त्र हे सदरील वाघ या प्राण्याच्या गळयाला मारलेले आहे. व डाव्या हाताने त्याच्या मस्तकाच्यावर पकडलेले आहे. मात्र या झटापटीत हा व्यक्ती जखमी होऊन मृत्यूमुखी पडला. त्याला स्वर्गलोकातून आलेल्या दोन अप्सरा स्वर्गात नेताना चित्रित केले आहे.

याच्या वरच्या कप्प्यात या व्यक्तीला पालखीमध्ये बसवून या अप्सरा स्वर्गात नेत आहे. असा स्वर्गारोहणाचा प्रसंग दाखविणत आला आहे. शेवटी हा व्यक्ती शिवलिंगाची उपासना करताना दाखविले गेले आहे.

२. लढाई निदर्शक वीरगळ (पायदळ, घोडेदळ, हत्तीदळ) :

हे वीरगळ शिल्पकलेचा अद्भुत उत्तम आणि वैशिष्टयपूर्ण नमुना आहे. एकूण ५ भागात हा वीरगळ आहे. या वीरगळाचे वैशिष्टय म्हणजे पायदळ, घोडदळ, हत्तीदळ याबरोबरच उंटाचा देखील या युध्द प्रसंगात उपयोग केला गेला आहे.

वीरगळाच्या तळाच्या कप्प्याशी पायदळाच्या लढाईचे चित्रण आहे. दोन सत्ताधीशांच्या सैनिकांमध्ये हे युध्द चालू आहे. यामध्ये दोन्ही सैन्याकडील सैनिक तलवार, भाला आणि ढाल यांच्या साहाय्याने प्रतिस्पर्ध्यावर आक्रमकपणे हल्ला चढवत आहेत. यामध्ये एक सैनिक/वीर आडवा पडलेला, म्हणजे गतप्राण झालेला दाखवलेला आहे.

दुसऱ्या भागातील कप्प्यात हत्तीदळाची लढाई याचा प्रसंग असून यामध्ये स्वत: राजा या रणसंग्रामात प्रत्यक्ष सहभागी झाला आहे. हत्तीवर उभा राहिलेला राजा आपल्या हातातील धनुष्य बाणाच्या सहाय्याने प्रतिस्पर्धी सैनिकांवर मारा करत आहे. तसेच समोरील हत्तीवर बसलेला दुसरा राजा हाही बाणाच्या साहाय्याने सैनिकांवर बाणांचा मारा करीत आहेत. हत्तीच्या मानेवर बसलेले दोन योध्दे एकमेकांवर भाल्याच्या साहाय्याने हल्ला करीत आहेत. राजा बसलेल्या व उभा असलेल्या ठिकाणी राजाला सहाय्य करण्यासाठी त्यांचे अंगरक्षक पाठीमागे शस्त्रे घेऊन उभे आहेत. हत्तींच्या पायांची हालचाल ही हत्ती आक्रमकपणे एकमेकांवर धावत आहेत व एकमेकांच्या सोंडीचा एकमेकांवर हल्ला करण्यासाठी हत्ती उपयोग करीत आहेत. या भागात एकूण ३ हत्ती आणि त्यावरुन युध्द करणारे राजा, सेनापती आणि सैनिक दाखवण्यात आले आहेत. यातील एका हत्तीला पायदळातील सैनिक जखमी करण्यासाठी हातातील तलवार आणि ढालीच्या साहाय्याने प्रयत्न करत आहे.

तिसऱ्या कप्प्यातील भागात घोडदळाची लढाई रंगविण्यात आली आहे. यामध्ये घोडे पाठीमागील पायावर उभे राहून आक्रमकपणे समोर चाल करीत आहेत. घोडयावर स्वार सैनिक डाव्या हातात घोडयाचा लगाम धरुन व डाव्या हातातील भाला, तलवार यांच्या साहाय्याने आक्रमकपणे हल्ला करीत आहेत. यामध्ये एकूण चार वीर योध्दे धारातीर्थी पडलेले दाखविले आहे. या कप्प्यात एकूण ५ घोडेस्वार सैनिक व १ उंटावर स्वार झालेला सैनिक अत्यंत कौशल्यपूर्ण युध्दनितीने युध्द करीत आहेत. घोडयावर बसण्यासाठी आवश्यक असलेले खोगीर, लगाम यांचे उत्तम कोरीव काम वीरगळ तयार करणाऱ्या कोरक्यांनी केले आहे.

वीरगळाच्या चौथ्या कप्प्यात स्वर्गारोहणात स्वर्गातून दोन अप्सरा आल्या असून त्या वीरास पालखीतून स्वर्गाकडे नेण्यासाठी आल्या आहेत. मात्र या अप्सराबरोबर आणखी दोन स्वर्गलोकी चा मरधारी पुरुष आहेत. तसेच सनई वादक, मृदूंग वादक, ढोलकी वादक तसेच हलगी वादक यांचीही शिल्पे या स्वर्गरोहणात आहेत.

सर्वात वरच्या कप्प्यात स्वर्गप्राप्तीचा देखावा आहेत. मधोमध शिवपिंड असून स्वर्गात शिवपिंडीसमोर वीर आसनस्थ आणि नमस्कार मुद्रेत आहे. त्याच्या पाठीमागे एक उलटा चामर धरलेला पुरुष आणि स्त्री आहेत. स्वर्गाचा प्रतिनिधी पुरोहित हातामध्ये डमरु व चामर धरुन शिवलिंगाची पूजा करीत आहे. त्याच्या पाठीमागे त्याचा सहकारी उभा आहे.

३. लढाई निर्देशक वीरगळ-घोडदळ :

दगडी शिळेवर चार कप्प्यात या वीरगळाची विभागणी असून तळाच्या कप्प्यात घोडदळ लढाई, त्यावरती पुन्हा घोडदळ लढाई, त्याच्यावर स्वर्गरोहणाचा व शेवटी स्वर्गप्रातीचा प्रसंग आहे.

तळाच्या कप्प्यात वीर घोडयावर स्वार होऊन भाल्याच्या साहाय्याने शत्रु सैन्यांवर हल्ला करीत असून समोर शत्रुसैन्यातील घोडयावर स्वार सैनिक व पायदळातील सैन्य वीरावरती तलवार आणि भाल्याच्या सहाय्याने आक्रमकपणे हल्ला करत आहेत. घोडयाच्या पाठीवर खोगीर व इतर आवश्यक साहित्य याने घोडा सजलेला आहे.

दुसऱ्या वरील कप्प्यात एकूण तीन घोडेस्वार वीर योध्दे हातात ढाली व तलवारी घेऊन शत्रु सैन्यांवर हल्ला करीत आहेत. यामध्ये शत्रु सैन्यातील एक घोडा जमीनीवर मृत अवस्थेत आडवा पडलेला आहे. तसेच एक योध्दा जमीनीवर धारातीर्थी पडला आहे.

यानंतर वरच्या भागातील कप्प्यात स्वर्गरोहणाचा प्रसंग दाखविला गेला आहे. वीराला या लढाईमध्ये वीरमरण आल्यानंतर त्या वीर योध्दाला स्वर्गात घेऊन जाण्यासाठी अप्सरा व इतर त्यांचे सहकारी आलेले चित्रित करण्यात आले आहे. या वीराला पालखीत बसवून या अप्सरा स्वर्गाकडे घेऊन जात आहे.

शेवटच्या वरच्या कप्प्यात शिवलिंगाची प्रार्थना करताना वीर व पुरोहित दाखविण्यात आले आहेत.

४. लढाई निर्देशक वीरगळ (पायदळ व घोडदळ) :

या वीरगळात खालील कप्प्यात पायदळ लढाईचे चित्रण असून यात तीन वीर हातात तलवार व ढाल घेऊन समोरील तिन्हीही सैनिकांवर हमला करत आहेत. याच्या वरच्या कप्प्यात प्रत्येकी दोन घोडेस्वार वीर

ISSN 2231 4342

आमने-सामने आले असून तलवार, भाल्याचा वापर करुन हल्ला करीत आहेत. यामध्ये घोडयाच्या पायात एक वीर मरण पावलेला असून तो जमिनीवर पडलेला आहे. सर्व चारही घोडेस्वारांनी डाव्या हातात लगाम पकडून उजव्या हातात लढाई करण्यासाठी तलवार व भाले घेतले आहेत. याच्या वरच्या कप्प्यात पालखीतून दोन अप्सरा दोन वीरांना स्वर्गात नेत आहेत. सर्वात वरील कप्प्यात मधोमध शिवलिंग असून याच्या दोन्ही बाजूस दोन वीर व शिवलिंगावर अभिषेक करणारा स्वर्गाचा प्रतिनिधी पुरोहित दाखविण्यात आला आहे. हे वीरगळ स्पष्टपणे आपणांस पाहावयास येते.



क्र. १. शिकार निदर्शक वीरगळ



क्र. २. लढाई निदर्शक वीरगळ (पायदळ, घोडेदळ, हत्तीदळ)

 ISSN 2231 4342



क्र. ३. लढाई निर्दशक वीरगळ-घोडदळ



क्र. ४. लढाई निर्दशक वीरगळ (पायदळ व घोडदळ)

निष्कर्ष

या वीरगळ निर्मितीचा काळ साधारणपणे १३वे ते १४वे शतक या दरम्यानचा आहे. येथील प्राचीन मंदिर हे यादव काळातील आहे. या काळातील राजकीय उलाढाली पाहिल्यास येथे वीरगळ निर्मिती मोठ्या प्रमाणात का झाली हे स्पष्ट होते. १३व्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रात बरेच राजकीय चढउतार झालेले दिसतात. यातूनच नित्य लढाया, गावाचे रक्षण, पशु रक्षण यासाठी, लढाया होत असाव्यात म्हणून विविध प्रकारचे वीरगळ या ठिकाणी मिळतात.

या वीरगळातील शिल्पावरून असे स्पष्ट होते की, लढाई प्रसंगी पायदळ, घोडेदळ, हत्तीदळ अशा प्रकारची सैनिकांचे विविध विभाग होते. त्यावेळी युध्द करण्यासाठी हत्ती, घोडे याचबरोबर इतर कोणत्याही वीरगळावर अत्यंत कमी प्रमाणात दिसणारा उंट या प्राण्याचाही उपयोग लढाईत केला गेला आहे, हे सिध्द होते. शिकार निर्दशक वीरगळात वाघ या प्राण्याची शिकार करताना वीर दाखवण्यात आला आहे. यावरुन आपल्या असे लक्षात येते की, त्यावेळी हा परिसर जंगलाने व्यापलेला होता व असे अनेक हिंस्त्र पशु मानवी वस्तीवर हल्ला करीत असत. वीरगळामध्ये अंकित करण्यात आलेले घोडे, हत्ती, उंट या प्राण्यांची लढाई करण्यासाठी यांना आयात केले गेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. घोड्यावर चामड्याचा जीन, खोगीर व लगाम येथे घातलेला पाहावयास मिळतो. हत्तीवर शिल्पांकित केलेली मोठ्या घुंगरुची माळ दिसते. म्हणजे येथील समाजात विविध प्रकारची जिन्नस बनवण्यात पारंगत अशी कलाकार माणसे होती. तसेच सनई, मृदंग, ढोलकी, हलगी ही वाद्ये आढळतात.

या वीरगळांमध्ये कोरण्यात आलेली अनेक शस्त्रे येथे पाहावयास मिळतात. यामध्ये तलवार, भाला, ढाल, धनुष्य बाण इ. च्या सहाय्याने लढाई करत आहेत. या वीरगळ शिल्पामुळे विविध अलंकार आभुषणे जसे

की, चक्रकार केशरचना, केस पाठीमागे एकत्र करुन बांधलेला बुचडा, पायात तोडे, हातात कंकण व कमरेला कटिवस्त्र, कानात कुंडले, डोक्यावर असलेले मुकुट यासारखी अलंकार, आभुषणे दिसत आहेत.

या लढाईतील वर्णनावरुन हे युध्द दोन मोठ्या राजकीय सत्ताधीशांमध्ये झाल्याचे जाणवते. वीरगळ हे वीर योध्द्याच्या स्मरणार्थ कोरले जात असले तरी ही वीरगळे अनेक वीर योध्दाची आपल्या-आपल्या भूमीसाठी धारातीर्थी पडल्याचे दिसते. कारण ही मोठ्या लढाईची शिल्पे कोरण्यात आली आहेत.

सर्व वीरगळांवर वरील बाजूस शिवलिंग यांची उपासना करताना पुरोहित व वीर दाखवण्यात आलेले आहेत. यावरुन असे स्पष्ट होते की, हे राजकीय सत्ताधीश शैव पंथाशी निगडीत होते. या भागावर शैव पंथाचा प्रभाव होता. अशा प्रकारची महत्त्वपूर्ण माहिती प्राप्त होते.

संदर्भग्रंथ सूची :-

१) डॉ. कुलकर्णी बी.डी. : संपादित शोधनिबंध संग्रह, अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, १२वे अधिवेशन, प्रकाशन, अंबरनाथ, २००४.

२) दुधाणे अ.कि. : इतिहासाचे मूक साक्षीदार-वीरगळ आणि सतीशिळा, मराठीदेशा फाऊंडेशन, पुणे-२०२०.

३) डॉ. देशपांडे प्र.नं. : प्रा. हजिरनीस व ग., संशोधक इतिहासाचार्य वि.का. राजवाडे, संशोधन मंडळाचे त्रैमासिक, मार्च-२००१.

४) टेटविलकर सदाशिव : महाराष्ट्रातील वीरगळ, श्रीकृपा प्रकाशन, मुंबई-२०१४.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

महात्मा गांधीजींची शिक्षण विचारधारा आणि वर्तमान स्थिती

प्रा. डॉ. केशव अंबादास लहाने
विभागप्रमुख, इतिहास विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय पाथ्री
7020996611, 9923722628
keshavlahane@gmail.com

महात्मा गांधी यांचे जीवन विविध अनुभवांनी समृद्ध व संपन्न आहे. त्यांच्या जीवनातून व कार्यातून अनेकांना स्फूर्ती मिळालेली आहे. तेव्हा त्यांनी केलेल्या कार्याचे स्मरण करून आजच्या वर्तमान स्थितीमध्ये लागणारी प्रेरणा व स्फूर्ती मिळविणे आवश्यक आहे. पहिला प्रश्न आपल्या समोर उभा राहतो तो असा की, गांधीजींनी शिक्षण विचार कोणत्या भूमिके वरून मांडले, म्हणजे त्यांचा याक्षेत्रात अधिकार काय होता, स्वतःगांधीजी आपणास शिक्षणतज्ञ समजत नसत. शिक्षण विषयक निराळ्या पद्धतीचा शास्त्रीय दृष्ट्या अभ्यास करणारे शिक्षणशास्त्री ते नव्हते. त्यांनी स्वतः म्हटले आहे" मी शिक्षण क्षेत्रात एक अनधिकारी व्यक्ती आहे व शिक्षणाचा जो रूढ व तांत्रिक अर्थ आहे त्यात अनभिज्ञ आहे.[1]

रूढार्थाने जरी गांधीजी शिक्षण शास्त्री नव्हते, तरी त्यांच्या शिक्षण विषयक विचारांना शिक्षणक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर महत्व प्राप्तझाले आहे. सर्वसामान्य लोकांना त्यांची शिक्षण विषयक विचारधारा विशेष माहित झाली ती ऑक्टोंबर 1937 मध्ये वर्धा याठिकाणी झालेल्या शिक्षण परिषदे पासून. त्यावेळी गांधीजींनी आपले शिक्षणा विषयीची मतसुसूत्रपणे मांडल्याचे दिसून येते. ते म्हणतात, मी आजपर्यंत हिंदुस्थानला ज्याअनेक गोष्टीदिले आहेत त्यामध्येही शिक्षण योजना व पद्धती सर्वात मोठी गोष्ट आहे. आणि मला नाही वाटत की, याहून अधिक चांगली अशी दुसरी कोणती गोष्ट मी राष्ट्रास देऊ शकेन.[2] शिक्षणशास्त्रातील विद्वाना पेक्षागांधीजींचा शिक्षण विचारवेगळाहोता. शैक्षणिक दृष्टिकोन हा विकासाच्या मार्गाने नेणारा होता. त्यातुलनेत आजचे शैक्षणिक एक धोरण हे पुस्तकी आहे असे दिसून येते.गांधीजींची शिक्षण कल्पना हीश्रम, नीती व ज्ञान यावर आधारित होती. सगळा समाज, विशेषता कष्टकरी जनता स्वावलंबी व स्वाभिमानी बनूशकेल अशी शिक्षण व्यवस्था त्यांना हवी होती. हे शिक्षण मुख्यतामातृभाषेतूनच असावे यासाठी ते आग्रही होते. त्यांच्या 'वर्धा शिक्षण योजने'[3] ने शिक्षण क्षेत्रात एकक्रांती केलेली आपणास दिसून येते. गांधीजींचे हे सर्वस्पर्शी व सर्वउपयोगी शिक्षण विचार जाणून घेणे आपणासाठी महत्त्वपूर्ण व आवश्यक वाटते.

तत्कालीन शिक्षणाचीचिक्कीचा गांधीजींनी केली व शिक्षण कसे सदोष आहे याचा बारकाईने विचार केला. त्यांनी म्हटले आहे की," शिक्षणा बद्दल जरी एवढे विलक्षणआकर्षण वाटत असले, तरी शिक्षण ही काय **वस्तू**आहे,आजपर्यंतमिळालेल्या शिक्षणाने आम्हाला लाभ झाला की आमचे नुकसान झाले किंवा यासाठी जेवढी मेहनत घेण्यात आली तेवढा फायदा झाला आहे की नाही, याबद्दल क्वचित विचार केला जातो." त्यांनी पुढे

शिक्षणा विषयी विचार मांडताना म्हटले आहे की,"शिक्षण हे काही साध्य नव्हे, ते एकसाधनआहे, ज्या शिक्षणामुळेआपण चारित्र्य संपन्न होतो तेच खरे शिक्षणआहेअसे म्हणता येईल. आजच्या काळात दिले जाणाऱ्या शिक्षणाने हा परिणाम घडून येतो. असे कोणीच म्हणूशकणार नाही. शाळेत जाऊन चारित्र्य गमावून बसण्याची अनेक उदाहरणे आपण समाजात पाहतो आहे. एका निपक्षपाती इंग्रज लेखकाने म्हटले आहे की एका निपक्षपाती इंग्रजलेखकाने म्हटले आहे की हिंदुस्थानात जोपर्यंत शाळा व घर यांच्यात सामंजस्य निर्माण होणार नाही तो पर्यंत विद्यार्थी दोहों नाही मुकतील. शिक्षणाचे सत्यस्वरूप स्पष्ट करताना गांधीजी म्हणतात आपण का य शिकतो याकडे फारसे आई-वडिलांचे लक्ष नसते परीक्षेसाठी केलेली हमाली म्हणजे अभ्यास असेच मानले जाते. परीक्षा संपली की केलेला अभ्यास लवकरच विसरून जाण्याचा प्रयत्न केला जातो. या दोषाचे मूळ शोधताना गांधीजींनी म्हटले आहे, या परिस्थितीच्या कारणांचा विचार केला तर मला असे वाटते की मुख्य दोष आम्हाला इंग्रजीद्वारा मिळणाऱ्या शिक्षणाचा आहे. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण करावयाला साधारणपणे सोळा वर्षे लागतात. इतक्या वर्षात आम्हाला सामान्य ज्ञान फारच थोडे मिळते. परंतु आमचा प्रयत्न त्या ज्ञानाचा व्यवहाराशी मेळघालण्याचा त्यांचा उपयोग करून घेण्याचा असत नाही. आमची सारी धडपड असते यानात्याप्रकारे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवण्याची. शालेय शिक्षणाच्या स्थिती विषयी गांधीजी पुढे म्हणतात 'जर आम्ही केवळ शाही शोषक टिपकागद बनलो नसतो तर पन्नास वर्षाच्या शिक्षणानंतर सर्वजनतेत काही नवीन हालचाल प्रवृत्ती दृष्टीस पडली असती आम्ही जनतेला ओळखत नाही. जमत नाही आम्हाला सभ्य- सुधारलेले समजून बाजूस काढीत आहे, आम्ही सर्व लोकांना रानटी समजून स्वच्छतेच्या दृष्टीने त्यांच्याकडे बघतो.

शिक्षण म्हणजे समतोल विकास

गांधीजींच्या मते शिक्षण म्हणजे शरीर, मन व हृदय यांचा समतोल विकास होता. शिक्षण आणि बुद्धी वाढते तसे शरीर ही मजबूत व्हायला हवे. वर्ध्याची विशालताही वाढावी. 'साविद्यायाविमुक्तये' असे आपल्याकडे म्हणतात. त्याचा अर्थ आहे सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका, ज्ञान हे आपले व्यक्तिगत स्वार्थासाठी नसते ते सर्वसामान्य लोकांच्या उपयोगी पडण्यासाठी असते.

असे शिक्षण केवळ शाळेतच मिळते असे नाही तर ते यासृष्टीत सर्वत्र मिळते. शिक्षणातून माणसाला निसर्ग करावा, माणसातले माणूसपण हळूहळू जागृत व्हावे, माणसाला माणूस बनविण्यासाठी मुख्यता शिक्षण आहे. या शिक्षणामुळे बुद्धी, कृती व भावना यांचा समतोल विकास होत गेला की कुणी ह्या माणूस बनण्याच्या प्रक्रियेच्या अगदी जवळ पोहोचतो. माणसातली सहिष्णुता, क्षमा, समता, सहकार्य इत्यादी समाज उपयोगी गुणवाढले पाहिजेत. त्याला एक स्वयंपूर्णता लावावी, त्याचे चरित्र निष्कलंकअसावे व आपले जीवन आणि ज्ञान सर्वसामान्यांच्या मदतीसाठी आहे याचे भान वाढावे. या साठी शिक्षण आहे. गांधीजींचे हे विचार आजवाचतांना त्यांनी केलेली शिक्षणाची चिकित्सा किती मार्मिक होती व आज वर्तमानतेत तिला त्यातील दोष दूर करणे कसे आवश्यक आहे याचे शिक्षणतज्ञाने मनन व चिंतन करणे आवश्यक वाटते.

मातृ भाषा हेच शिक्षणाचे माध्यम

गांधीजी मातृभाषेतूनच शिक्षण द्यावे यासाठी आग्रही होते. त्यांचा इंग्रजी भाषेला विरोध नव्हता. ते स्वतः उत्तम इंग्रजी जाणत होते. पण शिक्षणाचे माध्यम कुठलीही परकी भाषा असावी हे त्यांना मान्य नव्हते. "भारतीय भाषा खुप समृद्ध आहेत व त्यात ज्ञान आणि कल्पनांची मोठी भांडारे आहेत, पण दुर्दैवाने इंग्रज राज्यात आपण या भाषांच्या वैभवाकडे दुर्लक्षकेले. खरे म्हणजे त्यांना देशोधडीला लावले.आपले मातृभाषेला विसरणारा, तिची उपेक्षा करणारा, तिच्या विषयी लाज बाळगणारा किंवा आपले उत्कृष्ट विचार आपले मायबोलीत प्रगट करता येणार नाहीत असे म्हणणारा एकही भारतीय मला खपणार नाही" असे गांधीजी स्पष्टपणे म्हणत असे. गांधीजींना अभिप्रेत असलेली शिक्षणाची उद्दिष्टे गाठण्यासाठी त्यांनी आपली शिक्षण योजना आखली. त्यामध्ये मातृभाषेचा अभ्यास अध्यक्ष स्थानी असून मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम योजले आहे. त्यामध्ये हिंदी भाषेला स्थान आहे. अंकगणित, निसर्गपरिचय, समाजपरिचय, चित्रकला व संगीत याचाही समावेश आहे, विशेष म्हणजे हे सर्व विषय उत्पादक उद्योगाच्या माध्यमातून शिकवायचे आहेत. आणि त्या उद्योगामुळे शिक्षण स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनवायचे आहे. शिक्षण व उद्योग यांचा संबंध जोडला जावा असे अनेक शिक्षणतज्ज्ञांनी म्हटले आहे. पण एकमध्यवर्ती उत्पादक उद्योग हे शिक्षणाचे माध्यम असावे ही गांधीजींची अभिनवव क्रांतिकारी कल्पना होती ती सर्वांना पटली नाही. तिच्या विषयी गैरसमज पसरले आणि टीकाही झाली. उद्योगाचे माध्यम स्वीकारल्याने शिक्षण कृतीम व कंटाळवाणे होईल. वांड:मयीन शिक्षणाकडे दुर्लक्ष होईल, ही कल्पना मध्ययुगीन असूनती यंत्रयुगात विसंगत आहेत.

गांधीजींनी पुरस्कारलेली मुलोदयोगी शिक्षणाची योजना आज जरी व्यवहारात आली नसली तरी ते क्रांतिकारी स्वरूपाची व आदर्श तत्वावर आधारलेली आहे असे त्या योजनेचे टीकाकारही मान्य करतात. या योजनेच्या अपयशास अनेक कारणे आहेत. मुख्यता गांधीजींनी या योजनेची जीपत्ती सांगितली होती ती पाळली गेली नाहीत. जुन्याचा कोरे कायमच राहिल्या आणि योजने मागील जीवन विषयक नवविचारांची जी बैठक आहे ती आकलन करणारा शिक्षक वर्ग आणि अधिकारी वर्ग पुरेशा प्रमाणावर तयार झाला नाही, या कारणांमुळे ही योजना मागे पडले असे म्हणता येईल. गांधीजींना असे वाटत होते की" आमचे शिक्षण पूर्णतः विदेशी आहे, राष्ट्रीय शिक्षणावाचून सर्व काही व्यर्थ आहे. स्वराज्य आज मिळेल व उद्यामिळेल पण राष्ट्रीय शिक्षणा शिवाय ते टिकू शकणार नाही, त्यांच्या मते राष्ट्रीय शिक्षणात -

१) शिक्षण मातृ भाषेतून दिले जावे

२) शिक्षण आणि घरची परिस्थिती या दोहोंत वेळ असावा.

३)ज्यामुळे अनेक लोकांच्या गरजा पूर्ण होतील असे शिक्षण असावे.

४)प्राथमिक शाळेतील अगदी पहिल्या वर्गापासूनचे शिक्षक चारित्र्यवान असावेत.

५) शिक्षण मोफत असावे.

६) शिक्षण व्यवस्थेवर लोकांचा अंकुश असावा.

७) केवळ परीक्षावर जोर देणारे पुस्तके शिक्षण नको.

 ISSN 2231 4342

८) शिक्षण मुख्यत आश्रम आधारित असावे

९) शिक्षण हे जीवन उपयोगी आणि नैतिक मूल्य जोपासणारे असावे.

गांधीजींनी म्हटले आहे" गावातील हस्तव्यवसायाचे शिक्षण हा शिक्षणाचा मध्य बिंदू मानण्याची किती आवश्यकता आहे ह्याबद्दल मलामुळीच संदेह नाही. भारतातील शिक्षण संस्थांमध्ये जी पद्धती स्वीकारण्यात आली तिला मी शिक्षण म्हणू शकत नाही. मनुष्याच्या बुद्धीतील सर्वोत्कृष्ट अंशाचा ती विकास करीत नाही. ते पुढे म्हणतात " विद्यापीठाने सुद्धा आपल्या विद्यार्थ्यांना समाजाच्या शेवेचे क्षेत्र पुरविले पाहिजे आणि त्यांचा उदरनिर्वाह होईल अशी साधने तयार केली पाहिजेत. उदरनिर्वाह हे शिक्षणाची उद्दिष्टे बनवू नये, पण विद्येचे ते फळ असले पाहिजे. विद्येचा हेतू आत्मविकास हा आहे. जेथे आत्मविकास आहे तेथे उपजीविका ही आलीच" विद्यापीठीय शिक्षणा संबंधी गांधीजी म्हणतात की,-

"आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे आपले जीवन समर्पित करतील असेच सच्चे जनसेवक निर्माण करणे, हे आपल्या विश्वविद्यालयीन शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे."

गांधीजींची शिक्षण विषयक विचारधारा ही त्यांच्या स्वतःच्या अनुभवावर आणि शिक्षण विषय प्रश्नाच्या सतत चिंतनावर आधारित होती. त्यांनी वेळोवेळी सांगितलेल्या तत्त्वातून ते प्रकट होते की, शिक्षण हे जीवनाशी निगडित कसे राहील यावर त्यांनी विशेष भर दिला होता व शिक्षणात नैतिक मूल्य आणि चारित्र्य संवर्धन यांचा परिपोष झाला पाहिजे. इकडे त्यांचा कटाक्ष होता. शिक्षणाकडे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन म्हणून पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन होता. हे त्यांचे विचार आजच्या परिस्थितीमध्ये सुद्धा आपणास मार्गदर्शक आहे. याचा उल्लेख महाराष्ट्रशासनाच्या शिक्षणविषयक श्वेतपत्रिकेत आला आहे. "या महान उद्दिष्टांना जीवनात साकार करण्याच्या उद्देशाने राष्ट्रपिता महात्मा गांधींनी त्यांच्या जीवन शिक्षणाची योजना देशा समोर मांडली. प्रथम ती प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर स्वीकारण्यात आली. या पुढे शिक्षणाच्या सर्व स्तरावर तिची उद्दिष्टे प्रतीत होतील" या महान कार्यात सर्वांच्या सहकार्याची गरज आहे.

समारोप

गांधीजींना पुस्तके शिक्षणाची कल्पना मान्य नव्हती. गांधीजींची शिक्षण कल्पना ही श्रम, नीति व ज्ञान यावर आधारित असल्याचे दिसून येते. मातृभाषेतून शिक्षण, ते कि शिक्षण नको, कमीत कमी पाठ्य पुस्तके, 14 वर्षापर्यंत इंग्रजी शिकण्याची आवश्यकता नाही, आणि श्रम आधारित शिक्षण ही गांधीजींच्या उत्तम शिक्षणाची मुख्य सूत्रे होती. गांधीजींनी नैतिक मूल्य असलेल्या शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. खऱ्या शिक्षणात नीती पहिल्या स्थानावर असते असे गांधी जी म्हणत. गांधीजींच्या दृष्टीने शिक्षण म्हणजे शरीर, मनव हृदय यांचा समतोल विकास होय. मातृभाषेतून शिक्षण द्यावे या विषयी गांधीजी आग्रही होते. राष्ट्रीय व्यवहार सुकर होण्यासाठी देशातल्या सर्वांना गम्य व सहज समजेल अशा राष्ट्र भाषा वापराचा त्यांनी पुरस्कार केला. श्रिया, मुले, रोड प्रौढ ,हरिजन व शेतकरी या सर्वांना कसे व कोणते शिक्षण द्यावी याचा स्वच्छविचार गांधीजींनी केलेला आपणास दिसून येतो. शिक्षणाच्या माध्यमातून उच्चनीच, श्रेष्ठ कनिष्ठ, जात धर्म या विषयीचा भेदभाव नष्ट व्हावा असा आग्रह गांधींचा होता. गांधीजींना धर्म आणि शिक्षण यांची सांगड व्हावी अशी नेहमी वाटत असेल.

 ISSN 2231 4342

यामागे मुख्य उद्देश म्हणजे सर्व धर्माची तत्वे आदर भावाने व उदार सहिष्णू वृत्तीने समजावून देऊन त्यांची आकलन करू न देण्याची वृत्ती विद्यार्थ्यात निर्माण व्हावी व ती जोपासली जावी हा होता. विद्यार्थ्यांना काम विज्ञान शिकवावे म्हणजे विद्यार्थ्यांना आत्म संयमाचे महत्त्व कळेल. असे गांधीजींनी सांगितले. शिक्षणाने ग्रामीण उद्योगांचा रास थांबवावा. शिक्षणाला अध्यात्मिक पाया असावा. विद्यापीठाचा उद्देश विद्यार्थ्यांना आपले जीवन देशकार्यासाठी वाहण्यास शिकवावे हा आहे. थोडक्यात, गांधीजींचे शिक्षण विषयी चिंतन हे आजच्या वर्तमान स्थितीत मार्गदर्शक आहे. ते आजच्या अभ्यासकांनी व संशोधकांनी नव्याने अभ्यासण्याची आवश्यकता वाटते.

संदर्भ ग्रंथ

१) महात्मा गांधी - गौरव ग्रंथ,(संपा) दा.न. शिखरे, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे, 1952.
२) म. गांधी, माझ्या स्वप्नाचा भारत, (संपा) कानिटकर माधव, परम हाऊस प्रकाशन, वर्धा, 1995.
३) कानिटकर ग.ना., गांधी शिक्षण माला, नवजीवन पब्लिकेशन हाऊस, अहमदाबाद.
४) धर्माधिकारी चंद्रशेखर, शोध गांधींचा, अक्षर प्रकाशन, मुंबई.
५) डॉ. गरुड अण्णा साहेब, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
६) भगतरा. तू., शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, 2005.
७) जाधव व्ही. के., आधुनिक भारताचा इतिहास, विद्याप्रकाशन, नागपूर, 2004.
८) रजनी पाम दत्त, आज कालचा भारत, डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2006.
९) जावडेकर श.द., आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टलप्रकाशन, पुणे, 1938.
१०) गांधीजी, हिंद- स्वराज्य, परंधाम प्रकाशन, पवनार, 2012.
११) डॉ. शहामु.ब.,गांधी विचार,यशवंत राव चव्हाण महाराष्ट्रमुक्त विद्यापीठ, नाशिक, 2007.
१२) सरकार सुमित, आधुनिक भारत, राजकम लप्रकाशन, नई दिल्ली, पटना, 2003.
१३) Raghavan E.Iyer, moral and politics thought of Mahatma Gandhi, Oxford University press.
१४) महात्मा गांधी, माझ्या स्वप्नांचा भारत, परंधाम प्रकाशन, पवनार.
१५) गांधी मो.क.,सत्याचे प्रयोग - आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, 1999.
१६) डॉ. तांबोळी एन. एस. व पवार व्ही.पी., आधुनिक भारत, (१७५०ते२००९) निराली प्रकाशन, पुणे, 2010.
१७) महात्मा गांधी- गौरवग्रंथ,(संपा) दा.न. शिखरे, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी,पुणे, 1952.

ISSN 2231 4342

हैदराबाद संस्थानाचे अखेरचे पंतप्रधान : मीर लायक अली

श्रीनिवास सातभाई
इतिहास विभाग
शासकीय विदर्भ ज्ञान संस्था ,अमरावती
भ्रमणध्वनी :९३५९५५६७२०
shrisatbhai@gmail.com

युरोपच्या इतिहासात तुर्कस्तानला युरोपचा रुग्ण(Sickman of Europe) असे संबोधले जाते,या तुर्कस्तानच्या सम्राटाप्रमाणे भारताच्या इतिहासात हैदराबादचा निजाम हा संस्थानिक एकप्रकारे आजारी संस्थानिकच (Sickman)होता.मीर उस्मान अली खान (१९११-१९४८)या अखेरच्या निझामाच्या काळात हैदराबाद राज्य भारतीय संघराज्यात विलीन करण्यात आले ,याचा एक साक्षीदार म्हणून पंतप्रधान मीर लायक आली हे होते.तैनाती फौजेच्या आधारे ब्रिटिशांनी निजामाला आपल्या नियंत्रणात ठेवले,ना जगू दिले ,ना मरू दिले! या अर्थाने निजाम sickman of India होता.

इ.स.१९११ मध्ये राज्यावर आल्यानंतर निझामाने सर्व सत्ता आपल्या हाती केंद्रित करण्याचा प्रयत्न केला.परंतु ब्रिटीशांच्या दबावाने त्याला मंत्रिमंडळाची नियुक्ती करावी लागली.वारंवार पंतप्रधान किंवा दिवाण बदलून सत्ता आपल्या हाती ठेवण्याचा निजामाचा प्रयत्न असे.१९३७ ते १९४७ या अवघ्या दहा वर्षांच्या काळात सहावेळा पंतप्रधान निजामाने बदलले.यात महाराजा किशन प्रसाद,सर अकबर हैदरी,छत्तारीचे नवाब सईद अहमद ,मिर्झा इस्माईल (प्रशासक) व मीर लायक अली यांचा समावेश होता. दि.२८ नोव्हेंबर १९४७ ला पंतप्रधान पदावर आलेल्या मीर लायक अलींचा कार्यकाळ फारच अल्प म्हणजे उण्या पुऱ्या दहा महिन्यांचा! परंतु फार महत्त्वाचा होता.हैदराबाद राज्याचे विलीनीकरण त्यांच्याच काळात घडून आले. मिर्झा इस्माईलने प्रशासक पद सोडताच त्याच्या जागी छत्तारीचे नवाब यांची दुसऱ्यांदा दिवाण पदी नियुक्ती करण्यात आली.यावेळी भारत सरकार व निजाम यांच्यात वाटाघाटींचे गुऱ्हाळ सुरु होते आणि कासीम रझवीच्या इत्तेहादुल मुसलमीन या संघटनेचा प्रभाव वाढत होता,याच प्रभावातून मीर लायक अली हे पंतप्रधान पदावर आले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संस्थानाचे भारताशी सबंध कसे असावेत याबाबत वाटाघाटी सुरु होत्या .भारताबरोबर कायम संबंधाचा करार होण्यापूर्वी वर्षभरासाठी जैसे थे करार करावा या निष्कर्षापर्यंत येऊनही निजामाने त्यावर स्वाक्षरी करण्यास टाळाटाळ चालविली होती.तर हैदराबादच्या शिष्टमंडळास भारताशी करार करण्यासाठी जाऊ दिले जाणार नाही अशी भूमिका इत्तेहादुल मुसलमीन या कासीम रझविच्या संघटनेने घेतलेली होती,एवढेच नव्हे तर वाटाघाटीसाठी हैदराबाद संस्थानतर्फे जाणाऱ्या प्रतिनिधीबरोबरच पंतप्रधान छ्त्तारी यांच्या घरालाही वेढा घालण्यात आला होता.

ISSN 2231 4342

अशा परिस्थितीत निजामाने इत्तेहादुल मुसलमीन या संघटनेच्या प्रभावातून पंतप्रधान छ्त्तारी यांना दिल्लीला जाणे रद्द करण्यास सांगून आपल्या भेटीस तात्काळ बोलावले.तातडीने बोलावलेल्या या मंत्रिमंडळाच्या बैठकीस कोणत्याही वैधानिक पदावर नसलेल्या कासीम रझविची उपस्थिती होती,यातच सर्व काही आले होते.कासिम्र रझवीचा जैसे थे करारास विरोध होता हे लक्षात घेऊन छत्तारीचे नवाब सईद अहमद यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि या पदावर निजामाने लगेचच कासीम रझवीच्या सल्ल्याने इत्तेहादुल मुसलमीन या संघटनेला आर्थिक बळ पुरविणारे उद्योगपती मीर लायक अली यांची नियुक्ती केली.अशा धामधुमीच्या काळात मीर लायक अली पंतप्रधान पदावर आले. सर अकबर हैदरी पंतप्रधान असताना सहाय्यक अभियंता या पदावर नोकरी सुरु करणाऱ्या मीर लायक अलीचा अभियंता ,कंत्राटदार ,उद्योगपती व पंतप्रधान असा प्रवास आश्चर्यकारक होता. Hyderabad Construction Company ,Nizam Sugar Factory, Sirpur paper mills, Deccan Airways इ.अशा अनेक उद्योगात व्यस्त असणाऱ्या मीर लायक अलीचे नशीब १९४७ ला फळफळले.

मीर लायक अली व मोहम्मद अली जीना यांचे स्नेहाचे सबंध होते ,जीनांच्या आग्रहाखातर त्यांनी पाकिस्तानात जगातल्या विविध उद्योगपतींना गुंतवणूक करण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी जाण्याचेही मान्य केले होते,परंतु नियतीच्या मनात वेगळेच होते.हैदराबाद राज्याच्या अस्तित्त्वाचा प्रश्न व कासीम रझवीचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन मीर लायक अलींनी आपले आर्थिक हितसंबंध व व्यवसायहित लक्षात घेता कासीम रझवीबरोबर जुळवून घेण्याचा व्यवहार्य निर्णय घेतला.त्याचवेळी कासीम रझवीने आपल्या इशाऱ्यानुसार काम करणारा पंतप्रधान म्हणून मीर लायक अलीची नियुक्ती करणे निजामास भाग पडले व प्राप्त हतबल परिस्थितीत निजामाने रझवीची सूचना मान्य केली.

पंतप्रधान पद स्वीकारावे की नाही? या बाबत जीनांचा सल्ला घेण्यासाठी मीर लायक अली दिल्लीतील पाकिस्तानचे वकील जाहेद हुसेन यांच्या मदतीने निर्वासितांना घेऊन जाणाऱ्या एका विमानातून लाहोरला पोहोचले.त्यावेळी जीना आजारी होते,त्यांनी असा सल्ला दिला की ,पंतप्रधान पदाचे ओझे डोक्यावर घेण्यापेक्षा तुम्ही खूप चांगल्या गोष्टी करू शकाल ,परंतु निझामाने फारच गळ घातली तरच या पदाचा विचार करावातसेच फाळणीमुळे भारतातील काही मुस्लीम पाकिस्तानात जात आहेत,त्यातील काही हैदराबाद संस्थानात गेले तर तेथील मुस्लिमांचा आत्मविश्वास वाढेल असेही सुचविले.हा सल्ला घेऊन मीर लायक अली हैदराबादला पोहोचले व निजामाचा मंत्रिमंडळ बनवण्याचा आदेश स्वीकारला.

१ डिसेंबर १९४७ ला मीर लायक अलीचे नवे मंत्रिमंडळ सत्तेवर आले,यात ४ मुस्लीम,४ हिंदू व ४ सरकारचे प्रतिनिधी असे बारा लोक असावेत असे ठरले.मासिक वेतन म्हणून रु.६०००/- निश्चित करून पंतप्रधान पदी नियुक्ती करण्यात आली.हे मंत्रिमंडळ पुढीलप्रमाणे होते...

- पंतप्रधान : **मीर लायक अली**
- उप पंतप्रधान : पिंगल व्यंकटराव रेड्डी
- अर्थ व परराष्ट्र : नवाब मोईन नवाज जंग

 ISSN 2231 4342

- महसूल : नवाब फजल जंग
- विधी : राजा मोहनलाल
- पोलीस : अब्दुल हमीद खान
- रेल्वे : अब्दुल करीम
- नियोजन व विकास : इकरामुल्ला
- शिक्षण : बी.एस.व्यंकटराव
- आरोग्य : मल्लिकार्जुन अप्पा तोडकरी
- व्यापार व उद्योग : जे.व्ही.जोशी

या अखेरच्या मंत्रिमंडळात नवाब व मुल्लांचाच भरणा अधिक होता.नियोजन मंत्री इकरामुल्ला हा तर राझाकारांचा म्होरक्याच होता.लोकनियुक्त मंत्रिमंडळाचा हा देखावा होता, कारण यात सरकार नियुक्त सदस्यच अधिक होते.मीर लायक अलींनी दक्कन रेडीओ वरून असे आवाहन केले की ,स्टेट कॉंग्रेसच्या सर्व नेत्यांना तुरुंगातून मुक्त करण्यात येत असून स्टेट कॉंग्रेसने मंत्रिमंडळात सामील व्हावे.परंतु स्टेट कॉंग्रेसने नकार दिला व निवडणुकांवर बहिष्कार टाकला.

मीर लायक अलींना १ डिसेंबर १९४७ ते १७ सप्टेंबर १९४८ असा साडेनऊ महिन्यांचा कालावधी मिळाला .या काळात जैसे थे करार,रझाकारांचे अत्याचार,भारत सरकारची पोलीस कारवाई इ.महत्त्वाच्या घटना घडल्या होत्या.एका बाजूला कासीम रझवी तर दुसऱ्या बाजूला निझामाच्या तालावर नाचणे मीर लयक अलींना भाग पडले.या काळात इत्तेहादुल मुसलमीनचे ते आश्रित पंतप्रधान बनले होते.हैदराबाद ची आर्थिक परिस्थिती अतिशय वाईट होती,जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली होती.विमान उड्डाणे बंद होऊन भारतीय रेल्वेवर रझाकारांनी हल्ले सुरु केले होते.या परिस्थितीवर मात करण्यासाठी इंग्लंड अमेरिका या देशानाही मदतीची याचना करणारी पत्रे मीर लायक अलींनी पाठवली पण त्यास यश आले नाही.

हैदराबाद्चे स्वतंत्र अस्तिव टिकवण्याचा पंतप्रधान या नात्याने मीर लायक अलींनी अखेरपर्यंत प्रयत्न केला,त्यासाठी पंडित नेहरू,सरदार पटेल,व्ही.पी.मेनन ,माउंटबॅटन यांच्या गाठी भेटी घेतल्या .सरदार पटेलांनी तर मीर लायक अलींना असे सुनावले की ,.......आम्ही तुमच्याशी मैत्री प्रस्थापित करू इच्छितो याचा अर्थ तुमचे स्वातंत्र्य आम्ही मान्य करू असे समजू नका ... भारत सरकारने दिलेले दोन्ही पर्याय म्हणजे ,भारतात सामील होणे अथवा जबाबदार राज्यपद्धती लागू लागू करणे यास मीर लायक अलींनी नाकारले.अखेरचा प्रयत्न म्हणून संस्थानी खात्याचे प्रमुख सचिव व्ही.पी.मेनन व माउंटबॅटन यांच्याशी १३ ते २५ मे १९४८ रोजी चर्चा केली व जबाबदार सरकार स्थापने बाबत नवीन करार केला परंतु तो प्रत्यक्षात येऊ शकला नाही.कारण निजामाला अद्यापही स्वतंत्र राहण्याची आशा वाटत होती.

दि.१७ ऑगस्ट १९४८ ला मीर लायक अलींनी पंडित नेहरूंना एका पत्राद्वारे असे कळवले की ,'भारत सरकार जैसे थे कराराचा भंग करीत आहे' अशी तक्रार आपण संयुक्त राष्ट्राकडे करणार आहोत.त्यास उत्तर म्हणून भारत सरकारने असे कळवले की,हैदराबाद हे स्वतंत्र राष्ट्र नसल्याने युनो यात दखल देऊ शकत

 ISSN 2231 4342

नाही.अमेरिकेने मध्यस्थी करावी असाही प्रयत्न मीर लायक अलींनी करून पाहिला.भारतीय सैन्याच्या विरोधात लढण्याची हैदराबाद्च्या सैन्याची क्षमता नाही ,याची जाणीव लायक अलींना होती.संयुक्त राष्ट्रसंघ व पाकिस्तान यांच्या मदतीची आशा त्यांना अखेरपर्यंत वाटत होती.त्यामुळे मोहम्मद अलीं जीनांच्या भेटीसाठी मीर लायक अली बिदरहून कराची व नंतर क्वेट्टा येथे पोहचले .जीनांची प्रकृती चिंताजनक असल्याने भेट होऊ शकली नाही. पंतप्रधान लियाकत अलींची भेट झाली परंतु मदतीबत कोणतेही ठोस आश्वासन पाकिस्तान कडून मिळू शकले नाही,दरम्यान जीनांचे निधन झाले.

संयुक्त राष्ट्रे व अन्य देशांशी मीर लायक अलींचा पत्रव्यवहार व निजामाच्या हालचाली पाहताभारत सरकारने १३ सप्टेंबर १९४८ ला हैदराबादेत सैन्य पाठवण्याचा अंतिम निर्णय घेतला व अवघ्या चार दिवसात म्हणजे १७ सप्टेंबर १९४८ ला हैदराबाद राज्य निजामाच्या जोखडातून मुक्त करून भारतीय संघराज्यात सामील केले व खऱ्याअर्थाने भारतीय स्वातंत्र्याचा लढा पूर्ण झाला.अखेरच्या निझामाने हैदराबाद रेडीओ वरून शरणागती स्वीकारल्याचे भाषण वाचून दाखवले.निजामाच्या वतीने भारतीय सैन्याच्या अधिकाऱ्यांना शरणागतीचा निरोप देण्यासाठी भेटलेल्या शिष्टमंडळात लायक अली नव्हते कारण त्यांना १९/९/१९४८ रोजी त्यांच्या राहत्या घरी स्थानबद्ध करण्यात आले होते,मात्र त्यांच्यावर कोणताही खटला भरण्यात आला नव्हता .पुढे १७ महिने ही स्थानबद्धता चलू होती.त्यांच्या मुक्ततेसाठी अब्दुल कावी या वकिलाने पाकिस्तानचीही मदत घेण्याचा प्रयत्न केला.

अखेरीस आजारी पडल्याचे सोंग घेऊन एके दिवशी मीर लायक अली बुरखा धारण करून स्त्री वेशात गुलबर्गा (आताचे कलबुर्गी)येथे मोटारीने पोहचले व तेथून रेल्वेने पत्नीसह मुंबईला गेले.मुंबईहून मीर लायक अली विमानाने तर पत्नी बोटीने कराचीला पोहचले.दुसऱ्या दिवशी मीर लायक अली पाकिस्तानात पोहचल्याची बातमी पाकिस्तान रेडीओने दिली व भारतात त्यानंतर ७ मार्च १९५० ला हैदराबादच्या पंतप्रधानाच्या पलायनाची बातमी समजली.

मूळचा उद्योग व्यवसायाचा पिंड असलेल्या मीर लायक अलींना आपले अस्तित्त्व टिकवण्यासाठी अनेक तडजोडी कराव्या लागल्या , वास्तविक ते उच्चभ्रू वर्गात वावरणारे व रीतीरिवाज जपणारे मवाळ मुस्लीम नेते व व्यावसायिक होते.हैद्राबादच्या इत्तेहादुल मुसलमीन या संघटनेच्या नेतृत्वासाठी ज्यावेळी संघर्ष झाला होता त्यावेळी जहाल कासीम रझवी ऐवजी संयमी व्यक्तीच्या हाती नेतृत्त्व असावे म्हणून त्यांनी विरोधही केला होता.परंतु नियतीने त्यांना कासीम रझवीच्याच तालावर नाचायला भाग पाडले.जीनांनी सल्ला देऊनही ते पंतप्रधान पदाचा मोह टाळू शकले नाहीत.जीना ,रझवी व निजाम यांच्याशी तडजोडी करीत आले अर्थविश्व उभारले,सांभाळले व पंतप्रधान पद मिळवून अवघ्या अल्प कालावधीत अखेरच्या घटका मोजणाऱ्या हैदराबादचे स्वतंत्र अस्तित्त्व अबाधित राखण्याचा अयशस्वी प्रयत्न केला व अखेरचा पंतप्रधान हे बिरूद सार्थ केले.उद्योगपती व पंतप्रधान असलेल्या मीर लायक अलींना शेवटी बुरखा पांघरून देशाबाहेर पळून जावे लागले,हा नियतीने त्यांचेवर उगवलेला सूड होता.

❖ **संदर्भ सूची :**

१.Meer Laiq Ali- Tragedy of Hyderabad;1962.Published by Pakistan Co operative Book Society.

२ कदम सतीश : असे झुंजलो आम्ही ,कैलास प्रकाशन औरंगाबाद,२०१४

३ .केतकर कुमार :कथा स्वरांत्र्याची,पुणे

४ कुरुंदकर नरहर :हैदराबाद विमोचन व विसर्जन ,मराठी साहित्य परिषद ,आंध्र प्रदेश ,१९८५

५ .चपळगावकर नरेंद्र:संस्थानी माणसं,मौज प्रकाशन गृह ,मुंबई २०१३

६ .देऊळगावकर वि.पा.:स्वामी रामानंद तीर्थ-हैदराबाद मुक्ती संग्रामातील आठवणी,पोपुलर प्रकाशन मुंबई.१९७६

७ .पटवर्धन विश्वनाथ अनंत:संस्थानातील लोकशाहीचा लढा,संस्थानी स्वराज्य कचेरी,पुणे,१९४०

८ .पटेल शंकर भाई : हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम ,१९९३

९ .फडके य.दि.: विसाव्या शतकातील महाराष्ट्र ,खंड ६ .मौज प्रकाशन गृह,मुंबई,२००७

१०.बिंदू दिगंबरराव:हैद्राबाद राज्याचे विसर्जन ,साकेत प्रकाशन ,औरंगाबाद

११. भालेराव अंनंत:हैदाराबाचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा ,मौज प्रकाशन गृह ,मुंबई,२००१

-----------------------------*----------------------------

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

21 व्या शतकातील शैक्षणिक दृष्टीकोन

डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ
इतिहास विभाग प्रमुख
बीडी . काळे महाविद्यालय ., घोडेगाव
ताआंबेगाव ., जि.पुणे .
मो9421001178 .नं.
ईमेल - nathamokate123@gmail.com

प्रस्तावना –

मानवी विकासाचा केंद्रबिंदू हा शिक्षणात असतो म्हणूनच प्राचीन काळापासून तर आजच्या आधुनिक काळाचा विचार केला तर मानवाची उत्क्रांती ही शिक्षणामुळे झालेली दिसून येते. प्राचीऩ काळी भारतात वर्णव्यवस्था होती. या व्यवस्थेत प्रत्येक वर्णामध्ये कामाची विभागणी केली होती. अध्ययन व अध्यापनाचे काम ब्राम्हणांकडे राज्यकारभार आणि संरक्षणाचे काम क्षत्रियाकडे शेती आणि व्यापार वैश्यांकडे आणि वरील तिन्ही वर्णाची सेवा करण्याचे काम शुद्रांकडे होते. वेदाचे अध्ययन करण्याचा अधिकार फक्त ब्राम्हणांना होता. त्यामुळे तिन्ही वर्णावर प्रभुत्व ब्राम्हणाचे होते. शिक्षणाच्या अभावामुळे इतरांची दयनीय अवस्था होता. या काळात गुरूकुल पध्दती होती. शिक्षण देण्याची जबाबादारी राज्यकर्त्यांची नव्हती. त्यामुळे ब्राहणेत्तरांना शिक्षण घेता येत नसे. शिक्षणाची जबाबदारी फक्त ब्राम्हणाची होती. इंग्रजांच्या आगमनानंतर भारतातील सर्व जाती धर्मातील लोकांना शिक्षण देण्यास सुरूवात झाली. इंग्रजांनी भारतात शिक्षण सुरू करण्यामागे त्यांचा स्वार्थ होता. भारतात सत्ता टिकविण्यासाठी इंग्लंडमधून कारकून आणणे त्यांना परवडणारे नव्हते. म्हणून त्यांनी भारतीयांनाच शिक्षण देण्यास सुरूवात केली. शिक्षणामुळे भारतात उच्चविभूषित वर्ग तयार झाला व समाजाता प्रबोधन चळवळी सुरू झाल्या.[1]

शिक्षण हा मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा घटक आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शिक्षण महत्वाचा टप्पा आहे.[2] ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात शिक्षणाच्या प्रसारासाठी सन 1813 च्या कायद्याने प्रतिवर्षी 1 लाख रूपये शिक्षणावर खर्च करण्याची तरतूद केली.[3] पुढे लॉर्ड मेकॉले यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. सन 1854 मध्ये बूड खलित्यानुसार शिक्षणाचा प्रसार केला. सन 1982 मध्ये शिक्षणाचा आढावा घेण्यासाठी ग. ज. लॉर्ड रिपनने सर विल्यम हंटरच्या नेतृत्वाखाली समिती नेमली. पुढे रॅली कमिशन नेमण्यात आले. इ.स. 1904 मध्ये विद्यापीठ कायदा पास करून शिक्षणातील गोंधळ दुर करण्याचा प्रयत्न केला. सन 1919 च्या कायद्यानुसार शिक्षण विषय प्रांताकडे सोपविला. पुढे 1937 मध्ये मुलोद्योग शिक्षण पध्दती आली. नंतर सरकारने राष्ट्रीय शिक्षण योजना स्थापना केली.[4]

 ISSN 2231 4342

15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला. शिक्षण क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी थोर शिक्षण तज्ञ व विचारवंत डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला. त्यांनीच विद्यापीठ अनुदान आयोगाची शिफारस केली. पुढे 1964 मध्ये डॉ. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला. पुढे 1986 मध्ये नवे शैक्षणिक धोरण जाहीर केले.[5] चरितार्थ चालवण्यापुरते शिक्षण ही संकल्पना नको तर त्याने व्यक्तीचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. विद्यार्थ्यांना त्यांच्या संस्कारक्षम वयातच राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधीलकी या सर्व गोष्टींची जाणीवपुर्वक भावना रूजवायला हवी. हेच देशाचे आधारस्तंभ होणार आहेत. विद्यार्थी हा सुशिक्षित, सुसंस्कृत, निरोगी मनाचा तयार करणे ही शिक्षण संस्थांची, शिक्षकांची नैतिक जबाबदारी आहे. हीच खरी देशसेवा आहे.[6] सरकारने विस्तारधारित आणि भविष्याचा वेध घेणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला प्राधान्य दिले. नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार करण्याचे काम आव्हानात्मक आणि मोठे होते. दोन समित्यांनी हे आव्हान स्वीकारले. शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या तळागाळातील लोकांपासून त्यांचे म्हणणे सावधपणे ऐकून घेण्यात आले. तसेच या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला घेतला. या प्रक्रियेत सर्व राज्यसरकारांना विश्वासात घेण्यात आले. नवे शैक्षणिक धोरण केंद्रीय मंत्रीमंडळासमोर मंजुरीला जाण्यापुर्वी धोरण दस्तऐवजांची वेळोवेळी चाचणी घेण्यात आली आणि अनेकदा त्यात सुधारणा करून घेण्यात आल्या.[7]

राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (आरयूएसए) ही राज्याच्या उच्च शिक्षणात सुधारणा करण्यासाठी वास्तू उभारणीसाठी नियोजन व नियंत्रण करणारी मोहीम केंद्र शासनाने 2013 मध्ये सुरू केली. त्यामध्ये राज्यातील दर्जेदार विद्यापीठ व महाविद्यालयांना स्वायत्तता देऊ केली आहे. भारतीय विद्यापीठ व विदेशी विद्यापीठांमध्ये शैक्षणिक प्रगतीसाठी संवाद साधणे गरजेचे आहे. 2014 नंतर विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्वीच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आढावा घेण्यासाठी 2016 मध्ये माजी केंद्रीय सचिव टी. एस. आर. सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय धोरण समिती नेमली. डिस्ट्रिक्ट प्रायमरी एज्युकेशन प्रोग्रॅम (डीपीईपी), सर्वशिक्षा अभियान, राईट टू एज्युकेशन, नॅशनल प्रोग्रॅम फॉर गर्ल्स अट एलिमेंटरी लेव्हल, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, माध्यमिक स्तरावर अपंगांसाठी इन्क्लुझिव एज्युकेशन फॉर दी डीसेबल्ड फॉर सेकंडरी स्टेज, प्रौढ साक्षर भारत, उच्च शिक्षण विकासासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान. 29 जुलै 2020 मध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मंजुरी देऊन ते संपूर्ण देशात लागू केले आहे. इस्त्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली 9 समितीय सदस्यांनी या नव्या धोरणाचा मसुदा तयार केला आहे. यानुसार शालेय शिक्षणाची रचना 10 + 2 ऐवजी 5 + 3 + 3 + 4 अशी करण्यात आली आहे. यामध्ये पहिली 3 वर्ष पूर्व प्राथमिक व 2 वर्ष पहिली व दुसरी असणार (वय वर्षे 3 ते 8), पुढील 3 वर्ष तिसरी ते पाचवी असणार (वय वर्षे 8 ते 11), त्यानंतरची 3 वर्ष सहावी ते आठवीपर्यंत असणार (वय वर्षे 11 ते 14) आणि शेवटची 4 वर्षे नववी ते बारावी (वय वर्षे 14 ते 18) अशा एकूण 15 वर्षांमध्ये शालेय शिक्षणाची रचना अथवा आकृतीबंध आखण्यात आला आहे. सुरूवातीचे 3 ते 6 वर्ष वयोगटात असलेले मुले आतापर्यंत शालेय अभ्यासक्रमांतर्गत येत नव्हती. परंतु नवीन शैक्षणिक धोरणामुळे त्यांचा शालेय अभ्यासक्रमांतर्गत समावेश करण्यात आला आहे. 2016 मध्ये भारतीय युवकांसाठी आखलेली प्रधानमंत्री कौश्लय विकास योजना ही पूर्वीच्या योजनांशी जोडल्यास युवा

 ISSN 2231 4342

विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती साधणे या सुधारित राष्ट्रीय धोरणाने शक्य होणार आहे. या धोरणात संशोधनावर जास्तीत जास्त भर देण्यात आले असून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे, त्यांचा सर्वांगीण विकास करणे, त्यांना स्वत:च्या पायावर उभे करणे, त्यांच्या आर्थिक विकासाला प्राधान्य देणे इत्यादी कार्यक्रम आखण्यात आले आहे. सर्वांना शिक्षण, चांगले शिक्षण, शिक्षणाची समान संधी, आवाक्यातील शिक्षण आणि शिक्षणक्षेत्रातील सर्व घटकांचे उत्तरदायित्व निश्चित करणे या प्रमुख पाच सूत्रांवर धोरणाचा पाया आहे.[8]

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची वैशिष्ट्ये

1) विद्यार्थ्यांवर कोणतीही भाषा लादली जाणार नाही.

2) एक भारत श्रेष्ठ भारत या उपक्रमांतर्गत इयत्ता सहावी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना 'भारतातील भाषा' या प्रकल्पामध्ये सहभाग घेता येणार आहे.

3) विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण स्तरावर विविध विदेशी भाषांचा पर्याय दिला जाणार आहे.

4) भारतीय भाषांमध्ये इ-कोर्सेस उपलब्ध होणार आहेत.

5) शिक्षण विभागाद्वारे पाली, पर्शियन आणि प्राकृत भाषांसाठी राष्ट्रीय संस्था उभारली जाणार आहे.

6) पूर्व प्राथमिक शाळांसाठी एनसीइआरटीकडून अभ्यासक्रम आखला जाणार असून हा अभ्यासक्रम देशातील सर्व पुर्व प्राथमिक शाळांना लागू असणार आहे. पूर्वप्राथमिकचे शिक्षण आंतरराष्ट्रीय दर्जाचे करण्याचे प्रयत्न आहे.

7) इयत्ता तिसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना संख्या व अक्षरांची ओळख होऊन त्यांना ते वाचता येईल, यावर भर देऊन यापुढे हेच मुलभूत शिक्षण म्हणून मानले जाणार आहे.

8) अंगणवाडी आणि पूर्व प्राथमिक शाळा नवीन अभ्यासक्रम राबविण्यात अपयशी ठरणार आहेत. त्या ठिकाणी सर्व सोयी-सुविधांसह नवीन स्वतंत्र पूर्व प्राथमिक शाळा उभारली जाणार आहे.

9) सरकारी व खाजगी शाळांमधील शिक्षणात समानता असणार आहे.

10) शिक्षण धोरणामध्ये 6 ते 14 वर्षे वयोगटातील विद्यार्थी शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत येत होते. मात्र नवीन धोरणानुसार 3 ते 14 वर्षे असा वयोगट करण्यात आला आहे.

11) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी भारतीय सांकेतिक भाषा संपूर्ण देशात प्रमाणित करण्यात येणार आहे.

12) नवीन धोरणानुसार शालेय निकाल पत्रावर केवळ गुण, श्रेणी व शिक्षकांच्या शेरा या व्यतिरिक्त त्यामध्ये स्वत विद्यार्थी व वर्गमित्र यांचाही शेरा असणार आहे. तसेच शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचे जीवन कौशल्येसुध्दा नमुद करावे लागणार आहे.

13) एसएससी आणि एचएससी या दोन बोर्डाच्या परीक्षी घेतल्या जात होत्या. त्या परीक्षा वर्षातून एकदाच होत होत्या. मात्र आता नवीन धोरणानुसार इयत्ता नववी व बारावीपर्यंतच्या परीक्षा वर्षातून एकदा न घेता, त्या एकूण 8 शालेय अर्धवर्षामध्ये विभागून घेण्यात येणार आहे.

14) शिक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांला दहावीनंतरचे शिक्षण कला, वाणिज्य व विज्ञान यापैकी कोणत्याही एकाच शाखेत प्रवेश मिळून त्याला त्याच शाखेतील विषय शिकविले जात होते. नवीन धोरणात बदल केले असून विद्यार्थी एखाद्या शाखेत प्रवेश घेऊन दुसऱ्या शाखेतील काही आवडीचे विषयही त्याला घेता येणार आहे.
15) शिक्षण धोरणांतर्गत शालेय शिक्षण, उच्च शिक्षण याबरोबरच कृषी शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कायदा शिक्षण, तांत्रिक शिक्षण इत्यादी व्यावसायिक शिक्षणाला कार्यक्षेत्रात आणले आहे.

16) देशातील महाविद्यालयांना श्रेणी देण्यासाठी उच्च शिक्षण नियामक ही संस्था स्थापली जाणार आहे.
17) नवीन शैक्षणिक धोरणानुसार विदेशी विद्यापीठांना भारतामध्ये आपल्या शाखा उघडता येणार नाही.
18) शालेय शुल्क आकारणी रक्कम निश्चित केली जाणार आहे.

19) सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, लिंग, अपंगत्व इत्यादी घटकांमध्ये भेदभाव न करता आर्थिक दृष्ट्या वंचित गटांवर विशेष भर दिला जाईल.

20) शिक्षकांची भरती सक्षम पारदर्शक प्रक्रियेद्वारे केली जाऊन बहुस्त्रोत नियमित कामगिरी मुल्यांकन, उपलब्ध प्रगतीचे मार्ग इत्यादी गुणवत्तेवर आधारित शिक्षकाची शैक्षणिक प्रशासक म्हणून बढती दिली जाईल.
21) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी आणि एसईडीजी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस प्रोत्साहन दिले.

तसेच राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलचा विस्तार करून शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांचा मागोवा घेतला जाईल. त्यानुसार सर्वकश महाजालकावरील शिक्षण आणि डिजीटल शिक्षण या पर्यायी शैक्षणिक सुज्जता सुनिश्चित केली जाणार आहे.

व्यावसायिक शिक्षणासह उच्च शिक्षणामध्ये गुणोत्तर वाढविणे, देशातील सर्व अशिक्षित तररूण व प्रौढ यांना 100 टक्के साक्षर करणे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे उद्दिष्ट आहे. त्याप्रमाणे एकविसाव्या शतकातील प्रमुख कौशल्ये, आवश्यक शिक्षण आणि चिकित्सात्मक विचार विद्यार्थ्यांमध्ये वाढविण्यासाठी अभ्यासक्रम कमी करणे आणि अनुभवातून शिक्षणालक अधिक लक्ष केंद्रीत करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा शिकविण्याच्या पध्दतीचा व शालेय अभ्यासक्रमाचा उद्देश आहे.

राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी राज्यात स्टार्स प्रकल्पाच्या सारथीने प्रयत्न केले जाणार आहेत. या प्रकल्पांतर्गत अभ्यासक्रमात आमुलाग्र बदल सुसज्ज पायाभूत सुविधा पुरविण्यात भर दिला जाणार आहे. राज्यातील शिक्षण पध्दतीचे अध्यापन, अध्ययन आणि परिणाम यांचे बळकटीकरण करणे हा प्रकल्पाचा उद्देश आहे.[9] काळ एका जागी कधीच थांबत नाही. तो सारखा बदलत असतो. आपण मात्र न बदलता म्हणत असतो, काळ किती बदललाय................. ! जे काळाबरोबर बदलायचं नाकारतात ते जीवनाच्या शर्यतीत मागे पडतात. एक यशस्वी आणि परिपूर्ण आयुष्य जगायचं असेल तर काळासोबत बदलणं आवश्यक आहे.[10] बदलत्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र सरकारने अर्थसंकल्प 2021-22 चा सादर करताना, नवीन शिक्षण धोरणाचे सर्व निकश करत 15 हजार शाळांना बळ देणार, 100

नव्या सैनिकी शाळा सुरू करणार, आदिवासी भागात 750 एकलव्य शाळा उभारणार अनुसूचित जातीत मोडणाऱ्या विद्यार्थ्यांना दहावीनंतर शिष्यवृत्ती लेहमध्ये केंद्रीय विद्यापीठ स्थापन करणार देशात उच्च शिक्षण आयोगाची निर्मिती करण्यासाठी कायद्यात सुधारणा करणार.[11]

निष्कर्ष –

1) शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल होणार.

2) नवीन शिक्षण धोरण हे सर्वांगीण विकास करणारे आहेत.

3) विद्यार्थी स्ववलंबी बनतील भाषा व व्यवसाय शिक्षण उपलब्ध होईल.

4) विद्यार्थ्यांना कोणतीही भाषा सक्तीने लादली जाणार नाही.

5) गुणाऐवजी श्रेणी पध्दत अस्तित्वात येईल.

6) विद्यार्थ्यांचे जीवन कौशल्याचा विकास होईल.

7) विद्यार्थ्यांना विषय निवडण्याचे पुर्ण स्वातंत्र्य मिळाले.

8) कृषी, वैद्यकीय, कायदा, तांत्रिक शिक्षण हे व्यावसायिक क्षेत्रात आणले.

9) विदेशी विद्यापीठांना भारतात शाखा स्थापन करण्यास परवानगी.

10) शिक्षण क्षेत्रात सर्वांना समानसंधी उपलब्ध होईल.

11) नियमित व गतीशील प्रयत्नांनी अध्ययन सुधारणार.

12) शैक्षणिक व्यवस्था पारदर्शक बनली जाईल.

13) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण क्षेत्र खाजगीकरणाकडे वाटचाल सुरू झाली.

संदर्भसूची –

1) कीर धनंजय मालशे स.गं. आणि फडके य. दी. (संपादन) महात्मा फुले समग्र वाङ्‌मय, महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई, सहावी आवृत्ती, नोव्हेंबर 2006, पृ. 263.

2) भालेकर कैलास, महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक, राजकीय, प्रशासकीय व आर्थिक जीवनाचा समग्र आढावा, द युनिक इन्स्टिट्युट पुणे 2013, पृ. 949

3) घाडगे शा.म. व इतर, आधुनिक भारत, सक्सेस पब्लिकेशन, पुणे 2013 पृ. 503

4) डॉ. तांबोळी एन. एस. आधुनिक भारत, निराली प्रकाशन, प्रथम आवृत्ती, पुणे 2014, पृ. 58

5) डॉ. ग्रोवर बी. एल., डॉ. एन. के. बेल्हेकर (अनुवाद) आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद आणि कंपनी लि. रामनगर, नवी दिल्ली, प्रथम संस्कार 2003, पृ. 313.

ISSN 2231 4342

6) डॉ. अनिल सावंत, शिक्षण पध्दती : सद्यस्थती व आव्हाने, वसंत वर्षा पब्लिकेशनचे त्रैमासिक, जाने-मार्च 2020, पृ. 44.

7) संजय धोत्रे, नवीन शैक्षणिक धोरण – 2020, योजना मासिक, सप्टेंबर 2020, पृ. 5, 6

8) INTERNET गेडाम सं.ग्या. समीक्षक

9) दै.सकाळ पुणे, रविवार दि. 31/1/2021 पृ. 2

10) प्रसाद कुलकर्णी, काळाबरोबर बदला, यशाचं गुपित काय? संवेदना प्रकाशन, प्रथम आवृत्ती, पुणे – 2018, पृ. 52.

11) दै. सकाळ, पुणे मंगळवार दि. 2/2/2021 पृ II

आधुनिक काळामध्ये वस्तुसंग्रहालयाची बदलती भूमिका

Mrs. Deshmukh Sujata Sachin
Shrimant Babasaheb Deshmukh
Mahavidhyalaya Atpadi
Tal- AtpadiDist-Sangli
Maharashtra
Pin No- 415301
Mo. No. 9130817933
rajshri.sujata13@gmail.com

सारांश-

वस्तुसंग्रहालयास मानवी जीवनात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक व पर्यटनाच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे. वस्तुसंग्रहालय ही काळ व वेळ या दोन संस्कृतींना जोडणारी आणि वर्तमानाला दिशा देणारी संस्था म्हणून ओळखली जाते. वस्तुसंग्रहालये ही एक प्रकारे समाजाचे प्रतिबिंब आहेत. ज्यामध्ये मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रातील प्रगतीचा उल्लेख मिळतो. त्यामुळे वस्तुसंग्रहालये ही भावी पिढीला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारी एक संस्था आहे. म्हणून आधुनिक काळामध्ये वस्तुसंग्रहालयाची बदलती भूमिका महत्वाची आहे.

की वड्र्स- वस्तूसंग्रहालयाची भूमिका, उत्पत्ती, महत्व, स्वरूप, उपयोग इत्यादी

प्रस्तावना -

एकोणिसाव्या शतकात संग्रहालयाचे स्वरूप थोडे बदलू लागले म्हणजे त्यातील वस्तूचे वर्गीकरण, सूचीकरण, संरक्षण, जतन, जोपासना, संशोधन होऊ लागल्यामुळे वस्तुसंग्रहालयाला एक शिस्तबद्ध स्वरूप प्राप्त झाले. हे संस्कृती संवर्धनाचे काम जनतेच्या हितासाठी असले, तरी ते चार भिंतीच्या आत चालत असल्यामुळे जनतेचा काहीच सहभाग नव्हता त्यामुळे संग्रालय ही संकल्पना सर्वसामान्य लोकांना फार ओळखीची वाटली नाही.

मात्र विसाव्या शतकात ही परिस्थिती बदलू लागली 1946 मध्ये इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ म्युझियम आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन झाली. या संघटनेनुसार म्युझियम ही एक चिरंतन संस्था असून समाजाशी संवाद साधणे व आपल्या सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करणे ही प्रमुख भूमिका आहे.

- **वस्तूसंग्रहालयाची उत्पत्ती**

इंग्रजीतील म्युझियम या शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेतील "म्युझेस" या शब्दापासून झाली आहे. म्युझेस ही ग्रीकांची बुद्धी व कलेची देवता होती. या देवतेच्या निवासस्थानास म्युझिऑन असे म्हणतात. त्यापासूनच इंग्रजीत म्युझियम हा शब्द आला आहे. पुढील काळात या अर्थाची व्याप्ती वाढून ज्या ठिकाणी वस्तूंचा संग्रह,

जोपासना व चांगल्या प्रकारे वस्तूंचे प्रदर्शन संस्थेत केले जाते, त्यास म्युझियम हा शब्द वापरतात. म्हणूनच अशा वस्तुसंग्रहालयांना डॉ. कार्क "बौद्धिक महत्त्वाकांक्षा पूर्णत्वास नेणारे पवित्र मंदिर" असे गौरवाने म्हणतात. म्युझियम या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ - A museum is a place where interesting and valuable objects illustrating history and science etc.are exhibited .

- **व्याख्या –**

1. "वस्तुसंग्रहालय म्हणजे सर्वसाधारण जनतेच्या हितसंवर्धनासाठी, अभ्यासासाठी, कलावस्तूंचे जतन करण्यासाठी कायमस्वरूपी यंत्रणा. येथे विविध कलात्मक वस्तू शास्त्रीय व तंत्रज्ञानविषयक वस्तूंचा संचय करणारी संस्था ज्यात कला-संस्कृती, वनस्पती, प्राणिसंग्रहालय, मत्स्यालय इत्यादींचा समावेश होतो. तसेच जनतेला शिक्षण, आनंद देणारी आणि वस्तूंचे प्रदर्शन करणारी संस्था म्हणजे वस्तुसंग्रहालय होय" युनोस्को
2. मानवी जीवनाचा भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ या सर्व व्यवहारासंबंधी वस्तूचे हेतूनिष्ठ शास्त्रीय संग्रहण करून त्यांचे तत्व वा उद्देशानुसार जनतेच्या सर्व वा विशिष्ट वर्गासाठी पद्धतशीर वर्गीकरण, प्रदर्शन व संरक्षण करून मनोरंजन व ज्ञान या साधनांनी मानवी प्रगतीस मदत करणारी संस्था म्हणजे संग्रहालय होय". श्री. श. म. केतकर
3. आम जनतेला सदैव खुली असलेली आणि जनतेच्या सेवेसाठी व विकासासाठी जी केवळ नफा मिळवण्यासाठी उभारलेली नाही अशी कायमस्वरूपी संस्था कार्यरत असते ती संस्था म्हणजे वस्तुसंग्रहालय होय." जॉन एम. ए. थॉमस
4. "In the past a museum was known merely as a collection of monuments of antiquity or other objects interesting to the scholars and men of science,arranged and displayed in accordance with scientific method.I am giving the accepted defination of a museum is more than that. The morden museum is a veritable domicile of learning of,a collage of education.It is a teaching in stution and is entitled to be recognized and organized as a university which through its various branches is functioning for the advancement of education." महाराष्ट्र शिक्षणतज्ञ बाळासाहेब ग. खेर

❖ **वस्तुसंग्रहालयाचा उदय**

1) प्राचीनकालखंड-

वस्तूसंग्रहालयाची सुरुवात इ. सन पूर्व तिसऱ्या शतकात इजिप्तमधील अलेक्झांड्रिया येथे स्थापन करण्यात आलेले ग्रंथालय हेच जगातील पहिले संग्रहालय होय. या संग्रहालयात पन्नास हजारापेक्षा जास्त भूर्जपत्र व चर्मपत्रावरील हस्तलिखिते संग्रहित करण्यात आलेली आहेत. पुढील काळात राजघराण्यातील व्यक्तींनी आपापला रोब, श्रीमंती दाखवण्यासाठी खाजगी संग्रह स्थापन करण्यास सुरुवात केली त्यांचे पुढे जाऊन वैयक्तिक संग्रहालयात रूपांतर झाले. या वस्तूचे फारसे वर्गीकरण न करता ओळीने मांडल्या जात. उच्च प्रभू

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

लोकांनाच या वस्तू कौतुकाने दाखवल्या जात. यानंतरच्या काळात याचे स्वरूप बदलून ही खाजगी संग्रहालये सार्वजनिक करण्यात आली. तरीदेखील तेथील प्रवेश केवळ अभिजन वर्ग पुरता मर्यादित राहिला.

2) मध्ययुगीनकालखंड—

मध्ययुगीन कालखंडामध्ये वस्तुसंग्रहालये अस्तित्वात नसली तरी ख्रिश्चन धर्मगुरुंच्या कलाकृतीतून धार्मिक भावना जागृत होऊन ज्ञान मिळत होते. चर्चमध्ये ख्रिश्चन धर्मगुरूंनी धार्मिक प्रसंगावरील चित्र, कलाकुसर, कथांचे चित्रण, केलेले दिसून येते. त्यामुळे चर्च ही प्रार्थनेची ठिकाणी न राहता धार्मिक नीतिमत्तेची शिक्षण देणारी ठिकाणे झाली. पुढे 14, 15, 16 व्या शतकामध्ये विद्येचे पुनरुज्जीवन होऊन दरम्यान राजे-महाराजे, सरदार, श्रीमंत इत्यादींनी अनेक दुर्मिळ वस्तू आपल्या महाल, प्रासाद, दिवाणखान्यात सर्वांच्या नजरेस पडतील अशा रीतीने ठेवण्यास सुरुवात केली. पुढील काळात वरील ठिकाणे ही वस्तुसंग्रहालयच बनली. यानंतरच्या कालखंडामध्ये कलादालनाची (आर्ट गॅलरी) ची सुरुवात झालेली दिसून येते. तत्कालीन अनेक राज्यकर्त्यांनी आपापल्या चित्रकारांकडून राजवाड्यातील भिंतीवर चित्रे काढून ती रंगून घेतली. त्यामुळे आर्ट गॅलरी चा खरा विस्तार येथूनच झालेला दिसतो. त्यामुळे museoआणि आर्ट गॅलरी ही सध्या वस्तुसंग्रहालयाचे दोन पूर्वज म्हणता येतील.

3) आधुनिककालखंड—

या कालखंडातील मुख्य वैशिष्ट्य म्हणजे वस्तुसंग्रहालयातील वस्तूंचे वर्गीकरण आणि शास्त्रशुद्ध रचना होय. प्रत्येक वस्तूचा वेगळा असा स्वतंत्र संग्रह केला जाऊ लागला. ऐतिहासिक वस्तू, कलात्मक वस्तू, चित्रसंग्रह, शिल्पसंग्रह नाणी, शिल्पे, दगडी वस्तू, व्यक्तिचित्रे असे नाना प्रकारचे वर्गीकरण केले जाऊ लागले. तसेच या पुरातन वस्तू जनतेला पाहता येण्यासाठी वस्तू संग्रहालयात ठेवण्यात येऊ लागल्या. भारतात ब्रिटिशसत्ता स्थापन झाल्यानंतर 1784 मध्ये बंगाल येथे पुरातत्वीय वस्तूंचा अभ्यास करण्यासाठी एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल ची स्थापना सर विल्यम जोन्स यांनी केली. प्राचीन काळी भारतामध्ये श्रीमंत लोकांकडे वस्तुसंग्रहालये होती पण खऱ्या अर्थाने या संकल्पनेला चालना ब्रिटिश काळात आली. ब्रिटीशांच्या आधुनिक विचारसरणीमुळे इतिहासाच्या अभ्यासाला व संशोधनाला चालना मिळाली. आणि वस्तुसंग्रहालयाची प्रक्रिया गतिमान झाली.भारत स्वतंत्र झाल्यानंतर संग्रहालय विकासामध्ये आणखी प्रगती झाल्यामुळे भारतामध्ये 600 पेक्षा अधिक वस्तुसंग्रहालय स्थापन झालेली पहावयास मिळतात.

❖ वस्तुसंग्रहालयाचे स्वरूप —

राष्ट्राच्या आणि समाजाच्या उभारणीमध्ये वस्तुसंग्रहालययांना खूप महत्त्व आहे. जर वस्तूसंग्रहालयाचा उपयोग लक्षात घेतला तर तो ज्ञानाच्या दृष्टीने अन्य साधनपेक्षा अतिशय महत्त्वाचा आहे. कारण आज अनेक प्रगतशील राष्ट्रांनी आपली प्रगती वस्तुसंग्रहालयाच्या सहाय्याने केलेली आहे. म्हणून भारत जरी विकसनशील देश असला तरी वस्तुसंग्रहालयाच्या बाबतीत भारताने आपला ठसा उमटवला आहे. भारतात जवळजवळ 668 वस्तुसंग्रहालये आहेत. त्यातील जवळजवळ 39 वस्तुसंग्रहालये ही महाराष्ट्रात आहेत. त्यातील अनेक

ISSN 2231 4342

वस्तुसंग्रहालये ही खाजगी स्वरूपाची आहेत. त्यांची नावे तर दिलेलीच नाहीत मग ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, भारत जरी विकासाच्या मार्गावर असला तरी वस्तुसंग्रहालयाच्या बाबतीत पुढे आहे. वस्तूसंग्रहालयामध्ये अनेक विखुरलेल्या वस्तू एकत्र आणता येतात. आणि त्यांची सुरेख मांडणी करता येते. तसेच विविध प्रकारच्या वस्तू एकत्र आणून त्यांचा विशिष्ट हेतूसाठी उपयोग केला जातो. त्यामुळे कलेला, रचनेला संधी प्राप्त होऊन ज्ञान मिळते. व मनोरंजनही होते. मानवाला वस्तू गोळा करण्याची आवड असल्यामुळे तो अनेक आवडीच्या वस्तू जमा करून वस्तूंचे कलात्मक पद्धतीने प्रदर्शन करून वस्तूंचा ठसठशीतपणा मांडणीतून निर्माण करतो. संग्रहालये ही मानवाच्या दैनंदिन जीवनाचे प्रतिबिंब निर्माण करणारी केंद्रे आहेत. वस्तुसंग्रहालयामुळे मानवाचा स्वभाव, त्याची संस्कृती, सामाजिक परिस्थिती समजते. कारण त्याच्या पूर्वजांनी वापरलेल्या वस्तूंचा संग्रह संग्रहालयात असतो. या वस्तू नवीन पिढीस ज्ञानवर्धक ठरतात. विद्यार्थी आणि संशोधकांस तर वस्तुसंग्रहालये ही एक प्रकारचा आरसा आहेत. संग्रहालय ही स्वताः एक शिक्षण देणारी संस्था असल्यामुळे ती समाजाचे ऱ्हद्यस्थान बनली आहेत. त्यामुळे संग्रहालयातून सामाजिक प्रबोधनाचे कार्य केले जाते.

❖ **वस्तुसंग्रहालयाचे महत्व** –

राष्ट्राच्या जीवनांत जसे प्रयोगशाळा, ग्रंथसंग्रहालय यांना ज्या प्रमाणे अनन्य साधारण महत्व आहे. त्याप्रमाणे वस्तुसंग्रहालयाला ही अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे प्रयोगशाळा,ग्रंथालय आणि वस्तुसंग्रहालय ही राष्ट्राची महत्त्वाची ज्ञानेंद्रिये आहेत. ज्याप्रमाणे मानवाला जीवन जगण्यासाठी हवेची गरज असते. त्याप्रमाणेच प्रत्येक सुसंस्कृत राष्ट्राला संग्रहालयाची गरज असते. तसेच पुस्तकाच्या अनुक्रमणिकेवरून ज्याप्रमाणे पुस्तकाच्या अंतरंगाची कल्पना येते. त्याप्रमाणे राष्ट्ररुपी ग्रंथातील निराळ्या संग्रहालयाच्या प्रदर्शनाने राष्ट्राच्या भूतकाळाची, वर्तमानाची कल्पना येते. तसेच भविष्यकाळासंबंधी भाकित करणे शक्य होते. म्हणूनच वस्तुसंग्रहालय हा राष्ट्राच्या विकासाची नोंद करणारा मानदंड आहे. आणि तो योग्यच आहे. कारण वस्तुसंग्रहालय ही एकच अशी पुरातन संस्था आहे की, त्याठिकाणी आपल्या भूमीचा ऐतिहासिक व सांस्कृतिक ठेवा जपून ठेवला जातो या संग्रहालयातील वस्तूवस्तूतून आपल्या पूर्वजांनी केलेल्या कर्तबगारीची, मर्दानगीची व रचनात्मक कार्याची ओळख तरुण पिढीला सतत होत असते. म्हणूनच संग्रहालये ही जनतेला व भावी पिढीला कोणताही खंड पडू न देता मार्गदर्शन करणारी व सतत तेवत राहणारी अखंड ज्योत आहेत. इतिहासाच्या उदरामध्ये जरी राजे-महाराजे, चित्रकार, शिल्पकार, शास्त्रज्ञ, लेखक लोप झाले असले तरी त्यांनी निर्माण केलेल्या दुर्मिळ वस्तू, ऐतिहासिक पुरावे व साधने, कलासौंदर्य यांची अतुलनीय माहिती संग्रहालये शिक्षक, विद्यार्थी, अभ्यासक आणि संशोधक यांना अनंत कालापर्यंत देत राहतात. अशी माहिती एकंदरीत समाजासाठी उपयुक्त ठरते.

ISSN 2231 4342

❖ **वस्तूसंग्रहालयाचा उपयोग –**

वस्तूसंग्रहालयाचा उपयोग नानाविध प्रकारे होतो. वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळ्या पद्धतीने वस्तुसंग्रहालयाच्या उपयोग होतो. सुरुवातीच्या काळामध्ये वस्तुसंग्रहालयाचे उपयोग केवळ आणि केवळ वस्तू गोळा करून ठेवण्यासाठी आणि प्रतिष्ठा वाढविण्यासाठी होत असे. तसेच प्रसिद्धी मिळवणे, मोठेपणा मिळवणे हे एकच उद्दिष्ट होते. दुसऱ्या कालखंडामध्ये वस्तुसंग्रहालयाच्या उपयोग यामध्ये प्रगती झाली दरम्यान वस्तुसंग्रहालयातील वस्तूंची मांडणी, रचना, आवड व तंत्र यामध्ये बदल झाले. पण तरीदेखील म्हणावासा उपयोग वस्तुसंग्रहालयाच्या झाला नाही. कारण या मांडणीचा उपयोग फक्त हौशी लोकांसाठी झालेला होता. मात्र तिसऱ्या कालखंडामध्ये वस्तुसंग्रहालयातील वस्तू, रचना, उद्दिष्ट, उपयोग यामध्ये फारच बदल घडून आला. याच काळातील महत्त्वाचा उपयोग मनोरंजनाबरोबरच ज्ञान मिळाले पाहिजे हा नवीन दृष्टिकोन वाढत गेला.

वस्तूसंग्रहालयामुळे प्रेक्षकांचे, जनतेचे मनोरंजन होते. शिक्षकामध्ये ज्ञानवृद्धी करणे, विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल, जिज्ञासा निर्माण करणे, इतिहासकाराची अभ्यासदृष्टी विशाल बनवणे. संशोधकाला संशोधनासाठी उद्युक्त करण्यासाठीदेखील वस्तुसंग्रहालयाचा उपयोग होतो. राष्ट्रीय भावना, राष्ट्रीय वृत्ती, व राष्ट्रीय स्फूर्ती निर्माण करण्यासाठी वस्तुसंग्रहालयाचा उपयोग होतो. तसेच सर्व प्रकारच्या वस्तूंचे, कलांचे, स्थापत्यांचे, हत्यारांचे ज्ञान, ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्यासाठी वस्तूसंग्रहालयाचा उपयोग होतो. ज्ञानसंपादनाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना वस्तुसंग्रहालये दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करण्यासाठी उपयुक्त ठरतात.

❖ **वस्तुसंग्रहालयातील बद्ल –**

यांत्रिक युगाची सुरुवात आणि लोकशाहीचा उदय या प्रमुख दोन गोष्टींनी वस्तुसंग्रहालयात अमुलाग्र कायापालट घडवून आणला आहे. लोकशाहीसाठी जनता सुशिक्षित असणे गरजेचे असते. त्यासाठी समाजातील सर्व लोकांना ज्ञानाच्या विविध कक्षात प्रवेश देण्याची सुरुवात पहिल्या प्रथम संग्रहालयातून मिळाली. ज्ञानाचा शास्त्रशुद्ध अभ्यास पद्धतीने संग्रहालयाकडे पाहण्याचा परंपरागत दृष्टिकोन बदलला. वस्तुसंग्रहालयाकडे अजब वस्तूंचे घर, दुर्मिळ व चमत्कारिक वस्तूंचा संग्रह या दृष्टीने न पाहता जुन्या गोष्टींचे व वर्तमान काळाचे योग्य पुराव्याने सिद्ध होणारे आणि अखंड ज्ञान देणारे एक महत्त्वाचे साधन म्हणून पाहण्यास सुरुवात झाली. यांत्रिक युगाचा सुरुवातीमुळे वस्तुसंग्रहायाचा संख्येत व प्रकारात वाढ झाली आणि वस्तू प्रदर्शनात चित्तवेधकतेला महत्त्व मिळाले. तसेच वस्तू सुरक्षिततेच्या तंत्रात ही महत्वाची भर पडली. तांत्रिक प्रगतीमुळे वस्तुसंग्रहालयात नवीन वस्तूंचे पदार्पण वाढले, प्रदर्शित वस्तूंची चित्ताकर्षकता व उद्बोधक मांडणीत नाविण्याता आली. संग्रहालयाच्या वास्तूत आणि शिल्पांत बदल झाला. वस्तूंच्या वर्गीकरणाची सुरुवात झाली. वस्तूंची वास्तवपूर्ण मांडणी करण्यास मदत झाली. वस्तूची जपणूक व काळजी घेतली जाऊ लागली. संग्रहालय वाढीच्या दृष्टीने अनेक संघटनात्मक प्रयत्न केले जाऊ लागले. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रदर्शने भरवली जाऊ लागली. आणि राष्ट्रीय संग्रहालयाची उभारणीसुद्धा केली जाऊ लागली. अशा प्रकारे आधुनिक काळामध्ये वस्तुसंग्रहालयाची भूमिका बदललेली आपणास पहावयास मिळते.

ISSN 2231 4342

❖ **संदर्भ ग्रंथ –**

1. भडकमकर, रोचना. दिनमहिमा, प्रफुल्लता प्रकाशन, पूणे 2013. पृ. क्र. 162
2. कित्ता - पृ.क्र.163
3. डॉ. नवले, संजय विष्णू, पुणे शहरातील वस्तुसंग्रहालये : एक ऐतिहासिक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, 2013.
4. उपरोक्त भडकमकर, रोचना, दिनमहिमा. पृष्ठ क्र. 162
5. केतकर, श.म. संग्रहालयपरिचय, मुकुंद प्रकाशन, पुणे पृ. क्र. 11.
6. कित्ता पृ. क्र. 12
7. कित्ता पृ. क्र.70
8. कित्ता पृ. क्र.71
9. कित्ता पृ. क्र. 72
10. डॉ. बोरकर, रघुनाथ, संग्रहालयशास्त्र, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, 2013. पृ. क्र.92
11. डॉ. गणेशन, भारत के विविध संग्रहालय, पृ. क्र. 141.
12. केतकर, श.म. संग्रहालयपरिचय, मुकुंद प्रकाशन, पुणे, पृ. क्र.19.
13. बापट, दिवाकर, म्युझियम ध्यासातून साकारत जाणारा एक दुर्मिळ संग्रह, ऋग्वेदी प्रकाशन, 2004. पृ. क्र. 3
14. उपरोक्त डॉ. बोरकर, रघुनाथ, संग्रहालयशास्त्र, पृ. क्र. 17
15. उपरोक्त केतकर, श. म. संग्रहालयपरिचय पृ. क्र. 07
16. कित्ता पृ. क्र.22
17. कित्ता पृ. क्र. 23
18. कित्ता पृ . क्र. 24
19. कित्ता पृ. क्र.25
20. कित्ता पृ . क्र. 26
21. कित्ता पृ. क्र. 27

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

कन्नड ते चाळीसगाव दरम्यानच्या औट्रम घाटाचा इतिहास

प्रा. डॉ. सतीश कदम
अध्यक्ष अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद
9422650044

प्राचीन काळापासून खानदेश आणि मराठवाड्याला जोडणारा मार्ग म्हणजे गौताला अभयारण्याचा भाग असून या परिसरात वास्तव्य असणाऱ्या गौतम ऋषीमुळे याला गौताळा हे नाव पडले, तर काही इतिहासकारांच्यामते या परिसरात राहणाऱ्या गवळ्यामुळे याला गौताळा हे नाव पडले असावे. खरंतर मराठवाड्यातून खानदेशात जाताना येथे अजिंठ्याच्या डोंगर रांगातून एकदम खाली उतरावे लागते. त्यामुळे प्राचीनकाळी त्याला **खालदेश**[1] म्हणत असत, पुढे ल ऐवजी न शब्द रूढ झाला. तसं पहिलंतर खानदेश हे प्राचीन नाव नाही. कारण विश्वकोशाच्या चौथ्या खंडानुसार, या प्रदेशाला पूर्वी ऋषिक देश म्हणत, तर पुढे देवगिरीच्या यादवांच्या शिलालेखात याला सेऊण देश[2] म्हणून उल्लेखलेले आहे. काहींनी याला खानदेशात वाहणाऱ्या कान नदीवरून याला कानदेश[3] हे नाव मिळाल्याचे सांगितले आहे. कान चे पुढे खान झाले. मात्र काही इतिहासकारांनी थाळनेरचा फारुकी राजा मलिक नसीर याला 1417 साली गुजरातचा सुलतान पहिला अहमद याने " खान"[4] ही पदवी दिली, त्या खानाचा प्रदेश म्हणजे खानदेश असे सांगितले आहे. काहींनी याला पांडवकालीन खांडवदेश[5] म्हटले आहे, त्यातील खिंड किंवा खंडपासून खानदेश शब्द तयार झाला. असो, मराठवाड्याचाही असाच इतिहास आहे. मात्र येथील खिंड हा शब्द महत्वाचा असून खानदेश आणि मराठवाड्याला जोडणारी खिंड म्हणजे आजचा घाट आहे हे मात्र निश्चित आहे.

आज येथूनच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 211 वर 9 किमी लांबीच्या महाराष्ट्रातील प्रमुख घाटापैकी एक असणाऱ्या कन्नड चाळीसगाव दरम्यानच्या रांजनगाव किंवा ओट्रम घाटाच्या निर्मितीचा इतिहास मोठा रंजक आहे.[6] उत्तर भारतातून दक्षिणेत जाण्यासाठी अजिंठ्याचा डोंगर पालथा घालवा लागतो. याकरिता आपणास रांजनगाव आणि अजिंठा पास फर्दापूर येथून जावे लागते. प्राचीनकाळी मात्र खानदेशातून मराठवाड्यात येण्यासाठी विविध नावाने छोटे मोठे घाट होते.

1. कालघाट – पाटणा ते आंबा (कन्नडजवळील पाटणा गणितीतज्ञ भास्कराचार्यांचे गाव)
2. घायघाट – अहंकारी ते अंबाला
3. गणेशघाट – पाटणा ते कलंकी
4. हणवत घाट – पिंपळनेर ते लोध्रा
5. शेकसोंडा घाट – खर्डी ते लोध्रा

 ISSN 2231 4342

याप्रमाणे घाट असलेतरी आज फक्त औट्रम किंवा गौताळा घाटाचाच रहदारीसाठी वापर होतो आहे. ज्याला चाळीसगाव, रांजनगाव किंवा कन्नडचा घाटही म्हटले जाते.

औट्रम कोण होता

कागदोपत्री ज्याच्या नावाने हा घाट आहे, तो सर जेम्स औट्रम (Sir James Outram) हा ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्याचा भारतातील एक अधिकारी होता. लंडनमधील वेस्टमिस्टर येथे 29 जानेवरी 1803 रोजी त्याचा जन्म झाला. वडिलांचे लवकरच निधन झाल्यानंतर त्याच्या आईने त्याला वाढविले. आणि वयाच्या 22 व्या वर्षी तो लष्करात भरती होऊन तो भारतात लेफ्टनंट म्हणून दाखल झाला. 5 ऑगस्ट 1819 ला औट्रमला 4th Native Infantry Battalion[7] मध्ये भरती करून पुणे, राजकोट वगैरे भागात नोकरी केल्यानंतर त्याला इ.स. 1825 ला खानदेशात पाठविण्यात आले. तेथे औट्रम हा 23 Battalion चा कमांडर म्हणून दाखल झाला.

त्याकाळी धरणगाव हे खानदेशचे उपविभागीय केंद्र असलेतरी याठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलिस कार्यालय अशी महत्वाची कार्यालये होती. तेथेच औट्रमने आपले झोपडीवजा कार्यालय थाटले. प्रत्यक्षपणे 1825 ते 1836 पर्यन्त औट्रम[8] खानदेशात वास्तव्यास होता. पुढे त्याने आपल्या निवासस्थांनासाठी मोठा बंगला बांधला जो पुढे विविध कार्यालयासाठी वापरला जाऊ लागला. कंपनीने त्याच्या बंगल्याबाहेरील शिलालेखावर " हिंदुस्थानचे बेयर्ड , निष्कलंक व निर्दोष सरदार" होण्याचा पाया येथे घातला असे लिहिलेले आहे.

त्यावेळची खानदेशातील परिस्थिती - इंग्रजांच्या कालखंडात खानदेश (धुळे, नंदुरबार, जळगाव आणि एरोंडोल) हा एकच जिल्हा होता. प्रशासनाकरिता ब्रिटिशांची छावणी धरणगाव याठिकाणी होती. राज्यकारभार करताना सर्वात मोठी अडचण ही आदिवासी भिल्लांची होती. खानदेशातून वर जाताना या घाटामध्ये भिल्लांच्या टोळ्या लूटमार करायच्या. पुढे त्यांनी इंग्रजांच्या विरोधात उठाव करण्यास सुरुवात केली. काजीसिंग, भीमा, भागोजी, मेवाश्या, काळूबाबा, महादेव आणि खंडू नाईक, तंट्या भिल्ल इत्यादींच्या टोळ्यांनी इंग्रजांना मोठा उपद्रव देण्यास सुरुवात केली होती. मोगल, मराठा, निजाम असो की इंग्रज सर्वच सत्ता त्यांच्यापुढे हतबल झाल्या होत्या. याकामी इंग्रजांना बराचसा पैसा आणि सैन्य खर्च करावे लागत होते.[9]

भिल्लाविरोधात औट्रमची अनोखी शक्कल - खानदेशात नोकरी करताना त्याने अनेक नावीन्यपूर्ण योजना आखल्या. ज्या भिल्लांच्या विरोधात इंग्रजांना मोठी शक्ति खर्चावी लागत होती, त्याच 9 भिल्लांना औट्रमने आपले body guard म्हणून नेमले. एवढेच नाहीतर भिल्लाची स्वतंत्र फलटण (Bhill Crops)[10] उभी करून 1826 ला त्यांच्यासाठी धरणगावात मोठी वसाहत बांधली. आदिवासीचा आपल्यावर विश्वास बसावा म्हणून त्याने कधी कधी आपला मुक्काम त्यांच्यासोबत घनदाट जंगलात घालविला.

1825 ते 1830 या दरम्यान औट्रमने स्वत:ला धरणगाव परिसरात स्वत:ला गुंतवून घेतले. यावेळी बंडखोरांना शासन करणे, गुन्हेगारांना पकडणे यासारख्या धडक कारवाया केल्या. यासोबतच विविध जाती जमातीचे स्वतंत्र रजिस्टर बनवून भिल्ल टोळ्यांना खुश करण्यासाठी त्यांना जमीन देणे, इनाम, पेन्शन, बक्षीस देणे यासारखे उपक्रम सुरू केले.[11] त्याच्यातील अचाट साहसामुळे भिल्लांना तो आपल्या जवळचा वाटू लागला. त्यावेळी गौताळा अभयारण्यात जंगली श्वापदांचा मोठा वावर होता. त्यासाठी स्वत: हातात बंदूक घेऊन त्यांचा बंदोबस्त केला. 1825 ते 1836 च्या दरम्यान त्याने 235 वाघ, 16 चित्ते, 25 हरिण, 12 गवे मारल्याची नोंद सापडते.[12] आदिवासींचा विश्वास संपादन केल्यानंतर त्याने भिल्लांना पोलिस, जकात नाके अशा विविध नोकरीवर घेतले. एवढेच नाहीतर औट्रमने उभा केलेली भिल्ल रेजिमेंटचा वापर पुढे ज्या ज्या ठिकाणी आदिवासींचे उठाव व्हायला लागले तेथे होऊ लागला. औट्रामने सुरू केलेली फलटणीचे रूपांतर पुढे 1891 साली पोलिस दलात[13] करण्यात आले. आजही आपणास कन्नड आणि धरणगाव याठिकाणी भिल्ल फलटणीचे अवशेष पाहण्यास मिळतात. साहजिकच रांजनगाव, आंबा नावाने ओळखला जाणारा हा घाट आता लुटारूपासून सुरक्षित झाला. आपल्या हयातीत औट्रमने या घाटाची मोठ्या प्रमाणात दुरूस्तीही केली.

ईस्ट इंडिया कंपनीसाठी औट्रमचे कार्य - गुजरात, कलकत्ता, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, न्यूझीलंड, पाकिस्तान अशा अनेकठिकाणी त्याने आपले कार्य उत्तमरितीने पार पाडले. लखनौ आणि अवध संस्थानचे रेसिडेंट म्हणूनही काम पाहिले. स्वत:च्या हिंमतीवर पुढे तो लष्करातील लेफ्टनंट जनरल या पदापर्यंत पोहोचला. 1830 साली सूरत येथील डांग लोकांनी केलेल्या बंडात औट्रमने महत्वपूर्ण कामगिरी करत हा उठाव मोडीत काढण्यासाठी Bhill Regiment चा वापर केला. 1857 च्या उठावात त्याने केलेल्या कामगिरीबाबत लंडनच्या सभागृहाने औट्रमच्या अभिनंदनाचा ठराव पास करून त्याला रोख 1000 डॉलर आणि “ Baronet ” ही पदवी दिली. जुलै 1860 साली स्वत:चे एक लाख रुपये खर्चून त्याने कोलकत्ता येथे Outram Institute नावाने सैनिकासाठी एक संस्था सुरू केली. अशारितीने ईस्ट इंडिया कंपनीसाठी औट्रम हा इंग्रजांच्या गळ्यातील ताईत बनला.

औट्रमचा सन्मान - दुसऱ्या महायुद्धासह ज्या ज्या ठिकाणी गरज असेल तेथे औट्रम आपल्या लष्करी सेवेसाठी हजर राहिला. प्रकृती स्वास्थ्य ठीक नसल्याने शेवटी तो लंडनला परत गेला. 11 मार्च 1863 रोजी या महान सेनानीने जगाचा निरोप घेतला. यावेळी Times Of India ने औट्रमच्या दुख:द निधनाची बातमी देताना एक छान ओळ वापरली होती. “ No Lips will Open” सलग 40 वर्षे त्याने लष्कराची सेवा केली. शासकीय इतमामात त्याचा अंत्यसंस्कार करून त्याची कबर बांधल्यानंतर त्यावर कोरलेली अक्षरे फार बोलकी आहेत.

“Sir James Outran,

Lieutenant General Outran,

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

His Life was given to India, Faithful Servant of England

The Bayard of India"

पुढे 1863 ला लंडनमध्ये त्याचा पूर्णाकृती पुतळा उभा केला, कोलकत्ता येथेही घोड्यावर स्वार असलेला पूर्णाकृती पुतळा आहे. औट्रमच्या नावाने कोलकत्त्यात हुगळी नदीवर घाट बांधलेला आहे. त्याला Outran Ghat[14] म्हणतात, याठिकाणाहून देशपरदेशात जहाजाची ये जा चालू असते. आजही हा घाट अतिशय प्रसिद्ध आहे, सिंगापूरला औट्रमच्या नावाने रोड आहे, दिल्लीतील एका रस्त्याला औट्रमचे नाव आहे.त्याला Outran Line म्हटले जाते, पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील आजच्या जमशेदाबादचे नाव पूर्वी औट्रमच होते, न्यूझीलंडमध्ये डूनेनिन भागात औट्रम नावाने एक गाव आहे, शतरंज के खिलाडी नावाच्या सिनेमात औट्रमचे पात्र छान रेखाटले आहे. विशेष म्हणजे त्याची भूमिका रिचर्ड अटीनब्युरो ने पार पाडलेली आहे.

औट्रमच्या नावाने घाटाचे नामांतर - चाळीसगाववरून कन्नडला जाण्यासाठी आता जो घाट वापरला जातो त्याला पूर्वी आंबा घाट, रांजनगाव पास अशी विविध नावे आहेत. खरंतर 1681 साली औरंगजेबाने या घाटाला प्रथमत: दुरुस्त केलेले आहे. त्यानंतर इंग्रजांच्या काळात औट्रमने 1827 साली भिल्लांच्या मदतीने घाटाचे बरेचसे काम काम केले होते.

1869 -70 मध्ये खानदेशात मोठा दुष्काळ पडला होता. यासाठी सरकारने 1, 84, 260 रुपयाचा निधि मंजूर केला होता त्यातील चाळीसगाव कन्नड घाटासाठी 20,000 रुपये खर्च करण्यात आले होते. त्यामुळे प्रथमच हा घाट खडीकरण करून मजबूत झाल्याने तो मोटर गाडी जाण्यासाठी सज्ज झाला. तेव्हा 1872 ला खानदेशचे कलेक्टर एशबरनर (L. R. Ashburner) यांनी या घाटाचे उद्घाटन केले आणि यावेळी घाटाचे नामांतर " Outram Ghat " [15] असे केले, जे आज रुजू झालेले आहे. याविषयी इ.स. 1871 ला इंग्रज सरकारच्या General Report मध्ये एक अहवाल देण्यात आला होता त्यानुसार, "The opening of the Outram Ghat to traffic is the only other important work requiring separate notice. This Ghat is situated on the line connecting Chalisgaon and Kannad. The allotment for this work in the Budget was Rs. 20,000."[16] घाटाच्या वरच्याबाजूला कन्नडपासून निजामाची हद्द होती, त्यामुळे निजामानेही औट्राम घाटावर 1,45,106 रुपये[17] खर्च केल्याचा उल्लेख फसली 1331 म्हणजे इ. स. 1921 च्या General administration report सापडतो.

अलीकडे देशभरात अनेक मुख्य रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम सुरू असून त्यात औरंगाबाद धुळे रस्त्याचाही समावेश आहे. त्यानुसार बाकी इतर रस्त्याच्या कामासोबतच कन्नड चाळीसगाव दरम्यानच्या औट्रम घाटाचे कामही स्वतंत्रपणे प्रस्तावित असून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 211 वरील किमी क्रमांक 376 ते 390 या दरम्यान आता औट्राम घाटाचे रूपांतर औट्रम बोगद्यात होणार असून त्यासाठी National Highway Authority of India (NHAT) राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने यासाठी विशेष लक्ष घातले असून या कामाच्या सर्वेसाठी Amburg Engineering company, Switzerland या कंपनीला सर्वे आणि डिजाइनचे काम देण्यात आलेले

ISSN 2231 4342

असून त्यानुसार या बोगद्यातून आता एकाचवेळी रस्ते आणि रेल्वे वाहतूक होणार असून चौपदरी मार्गात दोन्ही बाजूला 7 -7 किमी रस्ता बनविला जाणार आहे. यासाठी 16,893,729,352 (1700 कोटी)[18] रुपये येणार असून 2022 पर्यन्त औट्राम बोगदा तयार होणार आहे. काही असो एका दूरदेशी माणसाने केलेल्या कामाची पावती म्हणून रस्ता असो बोगदा " औट्रम" चे त्यावर नाव कोरले जाईल हे निश्चित.

XXX

संदर्भ ग्रंथसूची

1. मोरवंचीकर रा. श्री. खानदेशचा इतिहास (प्राचीन कालखंड) का. स. वाणी मराठी प्रगत अद्ययन केंद्र, धुळे, पृ. 141
2. मराठी विश्वकोश, भाग 4, भूगोल
3. जगताप पी. डी. खानदेश इतिहास दशा आणी दिशा, प्राचार्य, नूतन मराठा महाविद्यालय, जळगाव, 1997, पृ. 9
4. शहा मु. ब. खानदेश नामचर्या – खानदेशाचा सांस्कृतिक इतिहास, खंड 1, का. स. वाणी, मराठी प्रगत अध्ययन केंद्र, धुळे, 2004, पृ. 141
5. जगताप पी. डी. उपरोक्त, पृ. 9
6. कदम सतीश, गाळीव इतिहास - औट्रम घाटाचा इतिहास, दैनिक पुण्यनगरी, दिनांक जानेवारी 2021
7. Goldsmid C. B. James Outram : A biography, Smith and Elder Co. London, 1881, P.32
8. Lion Trotter, The Bayard of India, William Black wood and sons, London, 1903, P. 27
9. तडवी अजिज रशीद, सातपुड्यातील आदिवासी तडवी, हर्षवर्धन प्रकाशन, बीड, 2016, पृ.

ISSN 2231 4342

10. A. H. A. Simcox, Khandesh Bhill Crops (1825 -1891) Thacker and Company, Bombay, P. 51
11. पाडवी वीरसिंग, भिल्ल आदिवासींचा उठाव, का. स. वाणी, मराठी प्रगत अद्ययन संस्था, धुळे, 2004, पृ. 5
12. Gazetteer of the Bombay Presidency Vol. XII, Khandesh, Govt. Central Press, 1880, P. 317
13. गारे गोविंद, आदिवासी वीर पुरुष, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, 1994, पृ. 17
14. Bose Arunava, Evincepus Publishing, Chhattinsgarh, 2019, P. 109
15. A. H. A. Simcox, Khandesh Bhill Crops, Ebid, P. 41
16. General Report of the Administration of the Bombay Presidency, Annual Report for the year 1871, 72, Govt. central Press, Bombay, P. 105
17. Report of the Administration of H.E.H. Nizam's Dominions, The superintendent, Govt Central Press, Hyderabad, 1925
18. Lokamat News Network, Aurangabad, 16 December 2017

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

सयाजी नगरीतील 'सयाजीकल्चर'

प्रा. पंकजा अहिरे
इतिहास विभाग प्रमुख
के. व्ही. एन. नाईक कॉलेज दिंडोरी, नासिक
mail -pankajakahire@gmail.com
Mobile No:9850803211
डॉ. जगदीश भेलोंडे
इतिहास विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय कन्नड,

प्रस्तावना:

समाज प्रबोधन व सामाजिक सुधारणा यांची प्रदीर्घ परंपरा भारताला लाभलेली आहे. 19 व्या शतकात व 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात या चळवळीला वेगळी दिशा व गती मिळालेली दिसते. पाश्चात्य विचारविश्वातून आणि चिंतनातून तत्कालीन सुधारकांनी व विचारवंतांनी प्रेरणा घेऊन त्या प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा प्रयत्न केला. राजाराम मोहन रॉय यांच्या पासून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत अनेक विचारवंत, सुधारक यांनी यासाठी सक्रीय प्रयत्न केले. सुधारणांची फार मोठी लाट या काळात निर्माण झाली. पण आजतागायत या विचारवंतांना अपेक्षित असणारे समाजस्वास्थ्य भारतभूमीला लाभलेले दिसत नाही.

आज समाजात मोठ्या प्रमाणात उलथापालथ होत आहे, सत्तेची भूक समाजाच्या सर्व गटात निर्माण झाली आहे , समाजाच्या सर्व अंगांवर राजकारणाचा प्रभाव दिसतो आहे. मतपेटीच्या व निवडणुकीच्या राजकारणातून नवे नवे प्रश्न निर्माण होत आहेत . याचा परिणाम समाजस्वास्थ्यावर होत आहे. आज भ्रष्टाचार, लोकसंख्यावाढ, ग्रामीण व दुर्गम भागातील सुखसोयींचा अभाव असे कितीतरी कठीणप्रश्न देशापुढे उभे आहेत. या सर्व समस्यांचीमूळ कारणे आपल्या वृत्तीत आहेत. आपण ७० वर्षापूर्वी स्वातंत्र्य झालो.पण विकृत वृत्तींच्या शृंखलेतून बाहेर पडण्यात अपयशी ठरलो आहोत. किंबहुना अशा वृत्तीत अधिक वाढ झाली असे दिसून येते. सामाजिक एकता व राष्ट्रीय एकात्मता निर्माण झाल्याशिवाय समाजस्वास्थ्य निर्माण होऊ शकत नाही. ज्यासुधारकांनी भारतीय आचार-विचारांना पुरोगामी दिशा देण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले त्यांच्या कार्याचा नव्या दृष्टिकोनातून अभ्यास करण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

श्रीमंत महाराज सयाजीराव:

भारताच्या इतिहासात महाराज सयाजीराव गायकवाड तिसरे यांचे बडोदे संस्थान हे 'आधुनिक भारताचा लोकशाहीची प्रयोगशाळा 'म्हणून ओळखले जाते. 1875 ते 1939 या 63 वर्षांच्या आपल्या कारकिर्दीत सामंतशाही राजवटीच्या परंपरेला तडा देऊन कल्याणकारी शासन पद्धतीचा आगळावेगळा प्रयोग 125 वर्षापूर्वीत्यांनी राबविला . स्वातंत्र्य- समता -बंधुत्व ही जीवनमूल्ये राज्यकारभारासह व्यवहारात रुजवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. राजकीय प्रशासकीय, सामाजिक, सांस्कृतिक, कायदेविषयक, क्रीडाविषयक अशा प्रत्येक

 ISSN 2231 4342

क्षेत्रात कितीतरी गोष्टींचे Ideal Model (नमुनादर्श) राजांनी निर्माण केले. बडोद्याच्या नव्हे तर भारताच्या प्रबोधनात्मक सुधारणावादी चळवळीत राजांचे महत्त्वाचे योगदान आहे. नव्या पिढीला तसेच राज्यकर्त्यांना ,समाजसुधारकांना, अर्थतज्ञ, प्रशासकीय कर्मचारी, व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ञ व इतर सर्वांना त्यांच्या कारकिर्दीतीलअनुभवांचा, प्रयोगांचा, दस्तऐवजांचा पथदर्शक म्हणून उपयोग होऊ शकतो. त्यांचा वारसा राज्याच्या व राष्ट्राच्या वर्तमान व भविष्य कालीन वाटचालीसाठी स्फूर्तिदायक ठरणारा आहे.

राजांचे पुरोगामित्व:

महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यात मालेगाव तालुक्यात कळवाणे या गावात जन्मलेल्या या थोर संस्थानिकाचा अभ्यास महाराष्ट्रात कमी प्रमाणात झालेला आढळतो. ते स्वतःला 'इंग्रजांचे अजिंक्य मित्र 'म्हणवून घेत मात्र त्यांचे दास न होता प्रजेचे जेवढे कल्याणकरता येईल तेवढे करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. प्रजेला सुजाण, सुसंस्कृत व सुशिक्षित बनवले. महाराजांची ज्ञानलालसा, विद्वत्ता, कलाभीरुची, वाचनाची आवड, अनेकवेळा सुधारलेल्याराष्ट्रातून केलेला प्रवास आणि समाज सुधारणे बाबतची तळमळ यामुळे पाश्चात्य राष्ट्रांना लाजवतील अशा सुधारणा त्यांनी बडोदे राज्यात केल्या. या सर्व सुधारणा त्यांनी स्वतंत्र भारताचे स्वप्न पुढे ठेवून केल्या. 'बडोदे आज करेल ते हिंदुस्तान उद्या करेल ' हे त्यांचे बोधवाक्य होते.

सामाजिक इतिहासावर राजकीय सत्तेचा प्रभाव पडतो. समाजाच्या जडणघडणीवर राजकीय धोरणांचा परिणाम होणे अपरिहार्य असते.काही वेळा सत्तेच्या राजकारणामुळे समाजाला वेगळे वळण लागते. सामाजिक इतिहास हा एका अर्थाने सांस्कृतिक इतिहासाचा एक भाग असतो. त्यात धार्मिक, आर्थिक, राजकीय अशा तत्सम सामाजिक पैलूंचा ही विचार येतोच. कोणत्याही समाजाच्या प्रतिभेचा सर्वांगीण असा सामूहिक अविष्कार त्या समाजाच्या सांस्कृतिक सांस्कृतिक मूल्यंमधून होत असतो. समृद्ध संस्कृतीमध्ये कालानुरूप बदल करणे तसेच तिच्यातील इष्ट बाबींचे जतन व जतन व विकसन करणे आवश्यक असते. हे सर्व आपोआप होऊ शकत नसल्याने त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. असे प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेबरोबर अनेक छोटे मोठे समूह आपापल्या परीने कार्य करत असतात. ही संस्कृती जितकी विलोभनिय, विविध अंगांनी समृद्ध, विशिष्ट दिशेने जाणारी असते तितकी प्रगत व प्रसन्न होत जाते. बडोद्यातील महाराज सयाजीराव या पुरोगामी राजाच्या शासन काळात अनिष्ट गोष्टी दूर करण्यात आलेल्या संघर्षातून एक विशेष संस्कृती विकसित झाली. जी आजही 'सयाजी कल्चर ' या नावाने जगप्रसिद्ध आहे. राजा व प्रजा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यांचे हितसंबंध ही एक असतात अशी सयाजीराजांची धारणा होती. विकासकामात प्रजेची सामीलकी हे त्यांच्या प्रशासननीतीचे खास वैशिष्ट्य होते. तसेच आपल्या प्रजेला योग्य सोयी सुविधा देणे-,त्यांची ज्ञानपिपासाशमवणे हे सरकारचे आद्य कर्तव्य समजुन राजधर्म व प्रजा धर्माचे केलेले पालन हे या संस्थानच्या विकासाचा ,उत्कर्षाचा मजबूत आधार ठरतो.

बडोद्याबाहेरील आणि भारताबाहेरील समाजाच्या संस्कृतींशी आदानप्रदान करीत, विज्ञानवादी व मानवतावादी विचारांवर भर देणारे, प्राचीन भारताच्या अभिमानास्पद विकासाची जोपासना करणारे तसेच नवनिर्मितीला प्रोत्साहन देणारे प्रकल्प उभे करून या राजाने समाजात इष्ट परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न

 ISSN 2231 4342

केला. मानवी जीवन सुखी व संपन्न करण्यासाठी जीवनाचा विविधांगी विकास करावा लागतो. केवळ मूलभूत गरजा मानवाच्या अस्तित्वाला आवश्यक असतात असे नाही तर त्याचे भावविश्व समृद्ध करण्यासाठी साहित्य, नृत्य, शिल्प, संगीत या कलांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. कोणत्याही देशाचे संस्कृतीक श्रेष्ठत्व त्या देशातील ललित कलांच्या विकासा वरुन स्पष्ट होते. या कला राष्ट्राच्या संस्कृतीची चिन्हे आहेत व त्यांच्यापासून राष्ट्राला चैतन्य प्राप्त होते असे सयाजीराजांचे मत होते . विविध देशांचा प्रवास करून शिक्षणाने व नव्या तंत्रज्ञानाने त्या देशाची झालेली प्रगती बघून ते आश्चर्यचकित झाले होते. एवढेच नाही तर या देशातील साहित्य व कला ,लोकसंस्कृतीचे विविध पैलू आणि मानवी प्रगतीसाठी त्यांनी केलेली धडपड राजांनी अभ्यासली. यातील ज्या ज्या गोष्टी शक्य आहे त्या त्या बडोद्यासाठी आणि तेथील प्रजेसाठी त्यांनी केल्या. साहित्य, शिल्प संगीत,नृत्य,चित्र ही समृद्ध जीवनाची अंगे आहेत आणि त्यांच्या संवर्धनासाठी, समृद्धीसाठी काम करणे हे राज्य प्रमुखाचे कर्तव्य आहे,त्यातून समृद्ध परंपरा निर्माण होते हे त्यांनी जगप्रवासात अनुभवले .त्याचा प्रत्यक्ष प्रयोग त्यांनी आपल्या संस्थानात केला .

राजांचे ललितकला विषयक कार्य:

ललितकला या मनुष्याच्या अनुभूतींचा विकास करतात. एकांगी शास्त्र अभ्यासाने फक्त बुद्धीचा विकास होतो तर ललितकलांमध्येआवड असेल तर मनोवृत्तीची वाढ होते, एकाकीपणाची भावना नाहीशी होऊन सहानुभूती व विश्व बंधुत्वाची कल्पना नकळत निर्माण होते. ज्याला सौंदर्यदृष्टी निर्माण होते त्याला कुठेही कुरुपता आढळत नाही. ललितकृतींच्या दर्शनाने, चिंतनाने, परिचयाने आदर्श ध्येय मनुष्याच्या मनात उतरतात व त्याचा परिणाम वर्तनावर होतो. म्हणूनच असे म्हटले जाते की खऱ्या चित्रकारासारखा व खऱ्या कवीसारखा दुसरा उपदेशक मिळणे कठीण. थोडक्यात,सर्वांगीण मानवी प्रगतीला ललित कलांच्या परिचयाचा अत्यंत उपयोग होतो. मनुष्याला रानटी स्थितीतून सुसंस्कृत स्थितीपर्यंत नेण्याचा तो एक सुलभ मार्ग आहे. एका संस्कृत श्लोकात ललितकलाविहीन मनुष्याला पशुवत म्हटले आहे . साधारण सर्वसंमत अशा सात ललितकला मानल्या जातात -1) स्थापत्य वास्तू किंवा बांधकाम 2) मूर्तिकला किंवा खोदकाम 3)चित्रकला किंवा आलेख कला 4) नृत्यकला 5) नाट्यकला 6) संगीतकला 7)साहित्य किंवा काव्य .मानवी संस्कृतीमध्ये ललितकलांचे हे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन राजांनी आपल्या संस्थानात या कलांना राजाश्रय दिला. अल्पकाळातच बडोद्यात कला व क्रीडाप्रेमींना राजाश्रय मिळाला .या कलाप्रिय राजाने कलेच्या व कलावंतांच्या क्षेत्रात बडोद्याला अग्रस्थान मिळवून दिले. आजही कलाकार व कलावंत बडोद्याला आपले माहेरघर समजतात.

1) **वांङमयसंवर्धन आणिसाहित्यविषयक कार्य:**

जगातील उत्कृष्ट वांङमय राजांनी आपल्या पूर्ण परिचयाचे करून घेतलेआणि त्याचा लाभ आपल्या देशबांधवांना करून देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असत .आपल्या प्रजेने केवळ साक्षरचनव्हे तर सुविद्य व्हावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर पुस्तके तयार झाल्याशिवाय शिक्षणाचे कार्य सिद्धीस जाणार नाही, चांगली पुस्तके न मिळाल्याने लोकांची प्रवृत्ती सदोष पुस्तके वाचण्याकडे जाते असे ते म्हणत.

देशी वांङमयनिर्मिती व ग्रंथालयांचा उदय- पुण्याप्रमाणे बडोद्यातही श्रावण महिन्यात गोरगरिबांना व विद्वानांना मोठ्या प्रमाणात दक्षिणा देण्याची परंपरा होती. या कामात बराच पैसा खर्च होई. राजांनी सत्ता ग्रहण केल्यानंतर लवकरच या गोष्टींकडे लक्ष घालून दक्षिणेचा विनियोग योग्य पद्धतीने केला. परीक्षा पद्धती सुरू करून नवीन ग्रंथ व निबंध लिहिणाऱ्यालादरवर्षी 2500/- रु.मदत दिली जाई. धर्मशास्त्रावरील पुस्तकांचे भाषांतर करण्यासाठी दरवर्षी 10000/- रु. दिले जात .यामुळे वरील दक्षीणाफंडाचा योग्य वापर होऊन अनेक उत्कृष्ट पुस्तके भाषांतरित होऊन देशी वांग्मययात भर पडली. रियासतकार सरदेसाई प्रा. गजर यांच्या मदतीने ग्रंथमालांच्या माध्यमातून वांग्मयाला उत्तेजन देण्यात आले. राष्ट्रकथामाला ,महाराष्ट्र ग्रंथमाला, श्रीसयाजी ज्ञानमंजुषा, शास्त्रीय ग्रंथवांग्मय अशा अनेक ग्रंथ मालिकेतून ग्रंथ निर्माण करण्यात आले.

1908 च्या दरम्यान भाषांतर शाखा निर्माण करण्यात आली. इंग्रजी ,संस्कृत भाषेतील उत्तम ग्रंथांची भाषांतरे करण्याची व्यवस्था राजांनी केली .संस्कृत प्रमाणेच जैन ग्रंथांचे ही संशोधनात्मक भाषांतर केले गेले .संस्थानाच्या निरनिराळ्या खात्यात उपयोगी पडणारी ग्रंथ तयार करण्यात आले .उदा.शिकारी संबंधीचे नियम ,अर्थव्यवस्थे संबंधीचे नियम अशी पुस्तके जी सामान्य लेखक लिहू शकणार नाही असे असामान्य वांङमयनिर्माण केले. तसेच वर्तमानपत्रे, मासिके सुद्धा संस्थानात प्रकाशित होत असत.

ग्रंथालयांचा प्रसार- हिंदुस्थानात ग्रंथालय चळवळीचा पाया विद्याप्रेमी सयाजीरावांनी घातला . युरोपातील मोफत वसार्वजनिक ग्रंथालयांनी केलेले काम पाहून आपल्या संस्थानात मोफत ग्रंथालयांची योजना सुरू केली. अमेरिकेतील ग्रंथालय शास्त्रातील निपुण डॉ .वार्डन यांच्या मार्गदर्शनाने संस्थानच्या विविध भागात सरकारच्या मदतीने सार्वजनिक मोफत ग्रंथालये व वाचनालये उघडली गेली . जेथे शक्य नाही तेथे फिरत्या ग्रंथालयांची योजना केली गेली .'सयाजी वैभव' या नावाने सुरू केलेली ही योजना अद्वितीय ठरली. संस्थानातील 70 % जनता या योजनेचा लाभ घेत असे. अशिक्षित लोकांना ज्ञान प्राप्ती व्हावी यासाठी दृक -पाठ -शिक्षण -शाखा उघडण्यात आल्या .निरक्षर जनतेसाठी उत्तम चित्रपट तयार करून ते गावोगावी दाखवण्याची व्यवस्था केलेली होती. लहान मुलांसाठी शिशु ग्रंथालयाची व्यवस्था केली गेली. सचित्र आणि मनोरंजक पुस्तकांबरोबरच मुलांच्या चौकसबुद्धीला वळण लागावे म्हणून विविध खेळांची योजना केली गेली .स्त्रियांसाठीही खास ग्रंथालयांची स्थापना करण्यात आली. स्त्रियांना उपयुक्त असणाऱ्या पुस्तकांचा व मासिकांचा यात भरणा होता उदा भोजनदर्पण, सूपशास्त्र इत्यादी. 1933 पर्यंत संस्थानातील 45 शहरे व 818 खेडेगावात मोफत ग्रंथालयांची व्यवस्था करण्यात आली. ग्रंथालयांचा एकूण ग्रंथसंग्रह 6,12,406 एवढा होता तर त्याचा फायदा 79406 लोक घेत होते.

ओरिएंटल लायब्ररी_ राजांच्या इच्छेनुसार 1915 साली या लायब्ररीची स्थापना झाली. संस्कृत, तमिळ, जैन ,प्राकृत, पाली ,अर्धमागधी असे अनेक भाषातील दुर्मिळ ग्रंथ काळाच्या ओघात नष्ट होऊ नये म्हणून शक्य होईल तेथून ते मिळवण्याचा प्रयत्न केला .त्यासाठी वाटेल ती रक्कम खर्च केली गेली .या ग्रंथांचे जतन करण्यासाठी या संस्थेची स्थापना केली .या ग्रंथांच्या प्रसिद्धीकरणाची योजना करून Gayakwad's Oriental Series या नावाने ती प्रसिद्ध झाली . या संस्थेच्या माध्यमातून अनेक ग्रंथ ,हस्तलिखिते, ताम्रपट सुव्यवस्थित

 ISSN 2231 4342

ठेवण्याचा प्रयत्न केला गेला .गायकवाड घराण्यातील संग्रहित 630 संस्कृत ग्रंथ या लायब्ररीला देणगीरूपात दिले गेले .महाराणींच्या देवघरातील 62 फूट लांबीचा महाभारत ग्रंथ, 84 फूट लांबीचे भागवत, 44 फूट लांबीचे हरिवंश हे ग्रंथ येथे आजही सुरक्षित आहेत. येथे 14,000 पेक्षा जास्त हस्तलिखिते सुरक्षित ठेवली आहे .भारतातच नव्हे तर जगाच्या पाठीवर जिथे कुठे प्राचीन विषय अभ्यासले जातात तिथे तिथे या संस्थेचा नावलौकिक आहे .

राजांनी ग्रंथत्तौजनासाठी लाखो रुपये खर्च केले .उत्तम ग्रंथ व ग्रंथकार यास बक्षिसे देऊन प्रोत्साहन दिले .काही पुस्तके सरकारी खर्चाने तर काही देणग्या देऊन तर काही सरकारी छापखान्यात छापून ग्रंथ निर्मितीला प्रेरणा दिली जाई .'वांङमयाचेछसयाजी युग'या शब्दात साहित्यिकांनी राजांचा गौरव केला आहे. बडोदे संस्थानात 'ग्रंथालय संघाची 'स्थापना करून संघाच्या गावोगावी शाखा स्थापन करण्यात आल्या .या संघामार्फत प्रमुख गावी संमेलने भरवली जात. त्यात पुस्तके ,मासिके ,नकाशे ,चित्रे व वस्तूंचे प्रदर्शन भरवले जाई . बडोदे संस्थानात Library Day साजरा केला जात असे .ही ग्रंथालय चळवळ संपूर्ण भारतात एक प्रेरणा ठरली.

2) **स्थापत्यकला:**

सयाजीरावांच्या कारकीर्दीत बडोदा राज्यात स्थापत्यकला प्रकर्षाने उदयास आली. सार्वजनिक बांधकाम करताना राजांनीजे धोरण राबवले त्यातून व्यावहारिक उपयुक्तता व सौंदर्य ही दोन तत्त्वे समोर ठेवून ती वास्तू शहराला भूषणावह व्हावी असे राजांचे मत होते .आपल्या राजधानीचे शहर सुंदर दिसावे यासाठी राजांनी हौसेने नगररचना इकडे लक्ष पुरवले .लोकांच्या सोयी पाहतांना कलेची दृष्टी व प्रगतीची दिशा समोर ठेवून पूर्वीच्या वनासनंदनवनाचे स्वरूप दिले .नगर -सुधार- विश्वस्त- मंडळ स्थापन केले गेले. प्रा.गेडीस या नामवंत नगररचना तज्ञांच्या सल्ल्यानुसारच नगराचे सौंदर्य खूलवले गेले .रुंद व लांब जाणारे रस्ते, विजेचे दिवे, वृक्षांच्या दाट छायेमुळे सुखद वाटणारे राजमार्ग , छोटी-मोठी उद्याने, आवश्यक सोयींनीयुक्त घरकुले, पाणीपुरवठ्याच्या योजना निर्माण केल्या गेल्या.

राजांच्या विवाहानंतर लक्ष्मीविलास राजवाडा बांधण्यात आला त्याचे काम 12 वर्षे चालू होते .इंडो-सीऱ्यानिकशैलीवर आधारित राजवाड्याचे डिझाईन रॉबर्ट यांनी केले .उत्तर-दक्षिण 512 फूट लांब व पूर्व-पश्चिम 200 फूट रुंद असा राजवाड्याचा विस्तार आहे .राजवाड्याच्या मनोऱ्याचीउंची 200 फूट आहे .यावरून राजवाड्याची भव्यता लक्षात येते .चार भागात विभागलेल्या या राजवाड्याभोवती बाग, कारंजे, फुलझाडे यामुळे राजवाडा अतिशय आकर्षक दिसतो. मकरापूर या जुन्या राजवाड्याचा विस्तार करून इटालियन धर्तीवर तो नव्याने बांधण्यात आला .त्याभोवती इटालियन पद्धतीची सुंदर बाग व फुलांचे मनमोहक ताटवे निर्माण केले गेले .प्रतापविलास राजवाडाही याच पद्धतीने बांधला गेला.

बडोद्यात अनेक सार्वजनिक इमारतींची बांधकामे केली गेली .बडोद्यातील कारागृह ही एक महत्त्वाची वास्तू मानली जाते . बबंदीवनांसाठीराजांनी हे उत्कृष्ट कारागृह बांधले .वर्तुळाकार असणाऱ्या या कारागृहात रुग्णालये ,कार्यालये ,व्यावसायिक शिक्षण देणारावर्ग ,शेतीकामासाठी विस्तृत आवर,अधिकारी वर्गाकरिता निवासस्थाने अशी सुविधा असलेले कारागृह बांधले गेले .नवसारी ,अमरेली, मेहसाणा, द्वारका याठिकाणीही

 ISSN 2231 4342

कारागृहे बांधण्यात आली .राज्य ...रोहणा नंतर प्रजेच्या आरोग्यासाठी उच्च प्रतीची रुग्णालये संस्थानात राजांनी बांधली .डफरिन इस्पितळ ही.. बडोद्यातील सर्वात विस्तीर्ण रुग्णालय 1886 ..बांधून पूर्ण झाले. पुढे 31 वर्ष या ....च्या विस्ताराचे काम चालू होते. पश्चिम हिंदुस्तानातील हे सर्वश्रेष्ठ रुग्णालय म्हणून त्याचे नाव झाले.

बडोद्यातील जागोजागी असलेलीउपवने व बगीचे शहराचे सौंदर्य खुलवतात .एकर जागेत 113 विश्वामित्री नदीच्या काठी राजांनी विस्तीर्ण बागेची निर्मिती केली. गगनचुंबी वृक्ष ,वेलींचे मंडप, अनेक हिरवळी, ठिकठिकाणी पुतळे ,बागेतून लांब व दूरच्या दूर दिसणारे रस्ते, विश्वामित्री नदीच्या वाहत्या पाण्यावरचा झुलता पूल अशा या उद्यानात प्रवेश केल्यावर सौंदर्य व आनंदाचा संगमझाल्याचा भास होतो .बागेच्या परिसरात चित्र संग्रहालय,Band Stand तसेच हिंदुस्थानातील सर्वात मोठे पदार्थ संग्रहालय येथे आहे .याशिवाय प्राणी व पक्षी संग्रहालय येथे असून त्यासाठी आवश्यक असणारी वन्यावस्था येथे निर्माण केलेली आहे .त्यात शेकडो प्रकारच्या कलाकुसरीचे नमुने ठेवलेले आहेत .याशिवाय जुबिली गार्डन ,नजरबाग सुवर्ण नारायण मंदिराभोवतीची बाग अशा अनेक छोट्या मोठ्या बागा बडोद्यात निर्माण केल्या. तसेच शाळा, कॉलेज ,सरकारी इमारती ,रुग्णालये या भोवती असलेल्या बगीचांमुळे शहराची शोभा अधिकच वाढलेली दिसते. गुजरात प्रांतात जलाशयाचा अभाव ,उष्ण हवामान यामुळे बागांना शक्य तेवढे पाणी पुरवण्याची सोय राजांनी काळजीपूर्वक केली आहे.

राजांनी कॉलेजची इमारत एक वैशिष्ट्यपूर्ण वास्तू बांधली मिस्टर चीझमयांनी इमारतीचे नकाशे तयार केले .आठ लाख रुपये खर्च करून बांधलेल्या या इमारतीचे वैशिष्ट्य म्हणजे या इमारतीच्या मध्यभागी असलेलागोलघुमटहोय. ब्रिटिश काळात हिंदुस्थानात पाश्चात्य शिल्पशास्त्रज्ञांनी अशी इमारत प्रथमच बांधली .विजापूरच्यागोल घुमटाच्या खालोखाल असणाऱ्या या इमारतीचा घुमट एक आश्चर्यकारक वास्तूवैशिष्ट्य मानला जातो .कॉलेजचे बाह्यस्वरूप मुसलमानी धर्तीवर आधारित आहे व आत आवडीनुसार बांधकाम केलेले आहे .हायस्कूलसाठी ही स्वतंत्र इमारत पौर्वात्य पद्धतीने बांधली आहे .एक थर लाल विटांच्या व एक पांढरा विटांचा अशा क्रमाने रचना असल्याने त्याचे बाह्य स्वरूप आकर्षक दिसते .त्याच्याच शेजारी जुबिली सायन्स इन्स्टिट्यूट हे मोठे कॉलेज राजांनी बांधले आहे .या इमारतीसाठी सहा लाख रुपये खर्च केला गेला. कलाशिक्षण देणारे कलाभवन या सुंदर इमारतींची निर्मिती ही मिस्टर चीझम यांनी राजांच्या मार्गदर्शनाने केली

सूरसागर तलावाच्या बाजूला म्युझिक कॉलेज त्याच्याच बाजूला कोपऱ्यात लाल दगडांनी एक इमारत मंडईसाठी बांधली गेली आणि ही इमारत इतकी सुंदर व आकर्षक झाली की त्यामुळे तिथे न्यायमंदिराची स्थापना केली गेली. खंडेराव मार्केट या नावाने प्रसिद्ध पावलेले वास्तू वास्तुशास्त्राचा एक अलौकिकनमुना ठरते .यात मंडईची उत्तम व्यवस्था करण्यात आली असून तिथे राजांचे पिताश्री महाराज खंडेराव यांचा मोठा पुतळा उभारण्यात आला आहे. कीर्ती भवन ,सेंट्रललायब्ररी ,कलाभवन अशा कितीतरी वास्तूराजांनी बडोद्यात व संस्थानातील इतर राज्यात बांधल्या. याव्यतिरिक्त पाटबंधारे, रेल्वे अशा कामांसाठी केलेल्या खर्चाचा आकडा 21 कोटी पर्यंत जातो.हा सर्व खर्च राजांनी केवळ रयतेच्या सुखासाठी, प्रगतीसाठी व लोकशिक्षणासाठी केला

3) **मूर्तिकला:**

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

आपल्या राज्यात मूर्तीकलेलाहीउत्तेजनदेण्याचा राजांनी प्रयत्न केला . त्यासाठीजॉर्ज, अल्बर्टटॅक्टया परदेशातील मूर्तिकारांना राजधानी बडोद्यास आणले व त्यांच्याकडून अप्रतिम पुतळे तयार करून घेतले. फणींद्रनाथ बोसबंगालीकारागिराला बडोद्यात बोलावून देशी कारागिरीला उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला .हिंदुस्थानातील मूर्तीकारातअग्रपूजेचा मान महाराष्महष्टीद्यावालागेल असे त्यांचे मत होते .म्हात्रे ,फडके ,गोखले ,करमरकर ,कोल्हटकर सर्वश्रेष्ठकारागिरांकडून पुतळे खरेदी करून राजांनी त्यांच्या कलेचा सन्मान केला .कोल्हटकर हे सर्वश्रेष्ठ कलाकार बडोद्यातील कलाभवनातूनचशिकून तयार झाले होते .काही पुतळेराजांनी जपान, ग्रीस यासारख्या देशातून मागवले .राजांचा अश्वारूढ पुतळा, कमळातील बुद्धांचा प्रचंड पुतळा ,रस्त्यावरील भिकारी असे कितीतरी उत्कृष्ट पुतळे आजही बडोद्यात विविध सार्वजनिक ठिकाणी ,राजवाड्यात ,संग्रहालयात बघायला मिळतात . मूर्तीकलेच्या उत्तेजनाचा सर्वात मोठा उपक्रम म्हणजे बडोद्यातील किर्ती मंदिर होय . Hall of Fame अशा वास्तूत देशातील प्रसिद्ध व्यक्तींचे पुतळे ठेवतात .त्यांचे कर्तृत्व पुढील पिढीला समजावे हा त्यामागचा उद्देश असतो .या कल्पनेवर आधारित बडोद्यात कीर्ती मंदिराची निर्मिती राज्यांनी केली .कर्तृत्ववान व्यक्तींच्या दर्शनाचा आनंद व प्रेरणा यातून लोकांना मिळावी हा त्यामागचा हेतू होता. त्याच बरोबर मूर्तीकलेला उत्तेजन देण्याचा प्रयत्नही त्यातून केला गेला. गायकवाड घराण्यातील अनेक पराक्रमी व्यक्तींचे पुतळे याठिकाणी आहेत.

4) **चित्रकला:**

युरोपच्या प्रवासात राजांनीतिकडची अनेक चित्रमंदिरे बघितली. त्यांचे सूक्ष्मपणाने अवलोकन केले .आपल्याकडेही लोकांच्या ज्ञानवर्धनासाठी व मनोरंजनासाठी एखादा चित्रसंग्रह असावा अशी त्यांची इच्छा होती .मिस्टर स्लीपमन मिस्टर डिबडिनयाचित्रसंग्रहतज्ञांच्या मदतीने युरोपातील प्रख्यात चित्रकारांची चित्रे खरेदी करून बडोद्यात मागवण्याची सोय केली. या चित्रसंग्रहालयासाठी विशेषदालनांची निर्मिती केली गेली. काही चित्रे राजवाड्यात काही मंदिरात ठेवली गेली .प्रत्येक चित्राची पार्श्वभूमी व त्याला अनुसरून छाया प्रकाशाची सोय केली गेली. या सर्व चित्रांची शतकवार मांडणी केलेली आहे . 17,18,19 व्या शतकातील चित्रे अनुक्रमे लावलेली आहेत .यासाठी त्यांनी हजारो रुपये खर्च केले.

पाश्चात्य चित्रकारांप्रमाणेच भारतीय चित्रकलेचा फार मोठा संग्रह याच इमारतीत आहे. यात जयपुरी ,मोगली, लखनऊ ,गढवाली ,कांग्रा व्हॅली वगैरे संप्रदायांच्या चित्रांचा संग्रह आहे .हिंदी चित्र विभागात 400 चित्रांचा संग्रह आहे. मॉरिस, फीथ,आर्च , फेलीसी, सीझर ,राजा रविवर्मा अशा अनेकप्राच्यवपाश्चात्य चित्रकारांचा चित्रसंग्रह येथे आहे .पूर्वीची जुनी चित्रे जी खराब झाली होती ती दुरुस्त करून सुबक केली गेली. त्याचबरोबर अनेक चित्रकारांना बोलावून चित्रे काढून घेण्याचे काम बडोद्यात अव्याहतपणे चालू असे .चित्रकलेबरोबरच फोटोग्राफी कलेलासुद्धा उत्तेजन देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. यासाठी विविधकलामंदिर नावाची फोटोग्राफीची संस्था स्थापन करण्यात आली. अशाप्रकारे फोटोग्राफी कलेलाही राजांनी उत्तेजन दिले.

5) **गायन कला:**

ISSN 2231 4342

'संगीत कलेचे आश्रयदाते 'असा लौकिक बडोदेकर राजांचा आहे. सत्ता ग्रहण केल्यानंतर त्यांनी लगेच कलावंतांचे स्वतंत्र खाते तयार करून त्यावरदेखरेख ठेवण्यासाठी एक दरोग्याची नेमणूक केली .फैजमोहम्मद, चंद्राबाई ,छगनजान,अल्लाउद्दीन, मौलाबक्ष, गुलाबसिंग यासारख्या 48 गुणीजनांचा या खात्यात समावेश होता. प्रसिद्ध गवई मौला बक्ष वत्यांचे पुत्र अल्लाउद्दीन यांना पाश्चात्य संगीत शास्त्राची माहिती करून घेण्यासाठी राजांनी विलायतेला पाठवले व तेथून ते परत आल्यावर या खात्यांची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली भारतीय संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण देणारी तालेवार संस्था बडोद्यात असावी अशी राज्यांची इच्छा होती अठराशे 87 चाली देशातील पहिले संगीत कॉलेज बडोद्यात सुरू झाले त्यासाठी त्यांनी म्युझिक कॉलेजच्या इमारतीची निर्मिती केली इमारती असून समोर सुंदर तलाव बांधला. तलावालालाभलेलेसंगीताचे सानिध्य यातील कलात्मकता सूचित करण्यासाठी या तलावाला सूरसागर तलाव हे नाव दिले या म्युझिक कॉलेजचे पहिले प्राचार्य संगीतकार मौलाबक्ष होते .सुरुवातीला संगीत शिक्षण विनामूल्य दिले जाई एवढेच नाहीतर प्रतिभावान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या ही दिल्या जात.

बडोद्यात होळीच्या सणाच्या वेळी गायनाचा मोठा उत्सव होत असे.राजांच्या कार्यकालापूर्वी बडोद्यात शेकडो तमासगीर लोक तमाशा घेऊन बडोद्यात येत असत . चुरशीने झुंडीच्या झुंडी या बिभत्स सोहळ्यात सहभागी होत. राजांनी हा पैशाचा अपव्यय व आरोग्याची होणारी हानी थांबवली. वर्षभरातील कामातून विश्रांती व करमणूक म्हणून राजे या सणात गाणी बजावण्याला पूर्ण मुभा देत असत मात्र या करमणूकीतअश्लीलता, बीभत्सपणा व असभ्यपणा याचा लवलेशही नसे .सर्व हिंदुस्थानातील गुणीजन आपली कला सादर करण्यासाठी येथे येत असत .प्रथम त्यांची परीक्षा घेऊन लायक व्यक्तिस कला सादर करण्याची परवानगी दिली जाई. राजे स्वता या कार्यक्रमांना हजर राहात असत.

याशिवाय महाराष्ट्रीय संगीतालाहीराजांनीमोठे उत्तेजन दिले .ते म्हणजे"गंधर्व नाटक मंडळी' ला दिलेला राजाश्रय होय. म्हणूनच नारायणराव -बालगंधर्व यांना स्वतःला 'बडोदेकरांच्या खास आश्रया खालील मंडळी 'असे म्हणून घेण्यात भूषण वाटत असे. दरवर्षी एक महिना हे मंडळ बडोद्यातील येऊनप्रयोग सादर करत असे .गायनशास्त्रातविकास व्हावा यासाठी संगीतनिष्णात श्री.भातखंडेयांच्याकडून गायन शास्त्रावरील अनेक पुस्तके तयार करून घेतली. काही पुस्तके हिंदुस्थानातील संगीत पाठशाळातून क्रमिक पुस्तके म्हणून अभ्यासली जात असत .अनंतफंदी ,होनाजी बाळा ,सगनभाऊ इत्यादी सुप्रसिद्ध लावणीकारांनागायकवाड घराण्याचा मोठा आसरा होता.

राजांनी प्रजेसाठी सर्वात प्रथम चित्रपटगृह निर्माण केले तेच पुढे शिवाजी चित्रभवन व नंतर प्रिन्स टॉकीज या नावाने प्रसिद्ध झाले .1934 एक दिवससाली बडोदे आकाशवाणीच्या स्थापनेची घोषणा राजांनी केली होती.1880 साली कलाजगताचा गौरव करण्याच्या दृष्टीने कलाभवन ही संस्था स्थापन केली .कला व तंत्रज्ञानाचे शिक्षण देणाऱ्या या संस्थेत चित्रकला ,शिल्पकला, वास्तुकला, मृत्तीकाशिल्प (सिरॅमिक),सौंदर्यशास्त्र, रंगकाम, बिर्चींग क्यालीकोप्रिंटिंग, फाईन आर्ट अशा विविध कलांचे शिक्षण देण्याची राजांनी सोय केली .शिल्पतज्ञ श्री कोल्हटकर, चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके हे याच कला भवनात तयार झाले.

 ISSN 2231 4342

समाज प्रबोधन व विकासासाठी असे अनेक प्रकल्प बडोद्यात राबवले गेले.ष्ट्र साहित्य सालीमहारा 1909 परिषदेचे6 वे आणि चे 1921 10वेअधिवेशन,1916 साली अखिल भारतीय संगीत परिषदेचे आयोजन 1950 आली संस्कृत परिषदेचे आयोजन ,1915 साली आरोग्यविषयक प्रदर्शन ,1936 सालीग्रामोध्दार व उद्योगविषयक प्रदर्शन अशी विविध प्रदर्शने ,संमेलने ,अधिवेशने, व्याख्याने यांचे बडोद्यात आयोजन करुन बडोदेवासियांना अनेक बुध्दिवंत व विचारवंत ,साहित्यिक ,कवी ,नाटककार ,कलाकार यांचा सहवास राजांनी उपलब्ध करून दिला.

अशी उत्तमोत्तम कामे करून राजांनी सिद्ध केले की ते केवळ एक राजा नाही तर प्रजावत्सल ,प्रजापालकपिता आहेत .ते स्वतःला बडोदा नगरीचे 'विश्वस्त 'म्हणत असत .बडोदे नगरीला संस्कार नगरीचासन्मान मिळवून देण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले .राजे एक परिपूर्ण समाज समर्पित जीवन जगले .माझा देश ,माझे राज्य व माझे जनता या भावनेने प्रेरित होऊनच ते कार्य करत असत .सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन करणाऱ्या इतर राजे महाराजांपेक्षा सयाजीरावांचे कर्तुत्व फार वेगळे होते .त्यांचे पुरोगामी विचार ,वागण्यातील सुसंस्कृतपणा ,रितीरिवाज ,आदरतिथ्य ,त्यांची रसिकता यांचा येथील लोकजीवनावर झालेला परिणाम आजतागायत टिकून आहे .यालाच 'सयाजी कल्चर 'असे म्हणतात.

संदर्भ ग्रंथ:

1) सरदेसाई गो. स .,1956 ,सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासात
2) आपटे दाजी नागेश , 1936,श्री महाराज सयाजीराव ,चरित्र खंड 1, 2,3
3) भागवत अनंत नारायण ,1905, श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे चरित्र
4) सयाजीरावांची निवडक पत्रे व भाषणे
5) इप्सित ,बडोदा विशेषांक

______*___________*________

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal **ISSN 2231 4342**

21 व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरुप —एक अभ्यास

डॉ. योगेश अ. पाटील
अर्थशास्त्र विभाग,
म.शि.प्र. मंडळाचे,श्रीमुक्तानंद महाविद्यालय
गंगापुर जि. औरंगाबाद.
मो.क्र. 9970997058
yogesh.girgaonkar@rediffmail.com

प्रास्ताविक

भारत एक कृषिप्रधान देश असून आजही देशातील सुमारे 65 टक्के लोकसंख्याही कृषीक्षेत्रावर अवलंबूनआहे. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यादशकात जागतिक पातळीवर अनेक घडामोडी घडल्या. दुसऱ्या महायुध्दात जर्मनीचा पूर्ण पराभव झाला. पूर्वजर्मनी व पश्चिमजर्मनी असे जर्मनीचे दोन भागात विभाजन झाले. 1945 मध्ये महायुध्द संपले तेव्हा जगातील सर्वच देशांसमोर अनेक प्रश्न होते. पायाभुत सुविधा, आरोग्य, शिक्षण अशा सर्वच क्षेत्रातील प्रगती ही खालावलेली होती. भारताचीही परिस्थिती यापेक्षा काहीवेगळी नव्हती. थोडक्यात महायुध्दांनंतरच जगातील अनेकराष्ट्रांचा खऱ्या अर्थाने आर्थिक विकास होण्यास सुरूवात झाली.
1947साली भारताला स्वातंत्र्य मिळाले,गेल्या 70 वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल विकासाच्या दिशेने अविरतपणे सुरू आहे. कृषीक्षेत्रात स्वयंपूर्णता, अवकाश संशोधनातील प्रगती,संरक्षण, शिक्षण अशासर्वच क्षेत्रात भारताने प्रगती राखली मात्रदुसऱ्याबाजुने दारिद्र्यबेकारी,भ्रष्टाचार,कुपोषण अशा अपप्रवृत्तीवर मात्र आजही आपण मात करुशकलो नाही. परंतु तरीही कृषी, उद्योग, व्यापार, सेवा, दळणवळण इ. क्षेत्रात देशामध्ये घडुन आलेली क्रांती निश्चितच नेत्रदिपक अशा स्वरुपाची आहे. थोडक्यात भारतीय अर्थव्यवस्था, भारतीय अर्थव्यवस्थेची विकसनशीलेतून विकसितपणे होत चाललेली वाटचाल यांचा आढावा सदरील शोधनिबंधामध्ये घेण्यात आलेला आहे.

अभ्यास विषयाची उद्दिष्टे

1. भारतीय अर्थव्यवस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
2. भारतीय अर्थव्यवस्थेचे विकसित देशांशी तुलनात्मक विश्लेषण करणे.
3. आर्थिक महासत्ता बनण्याच्या दृष्टीने काही उपाय योजनांचा आढावा घेणे.

भारतीय अर्थव्यवस्था — ऐतिहासिक पार्श्वभूमी

200 वर्षापुर्वी जगातील अनेक देशांमधील आर्थिक स्थितीमध्ये असमानता होती. परंतू आज या सर्वदेशांचे विकसित आणि अविकसित असे वर्गीकरण झालेले आहे. भारतात ब्रिटिशांच्या आगमनामुळे मुख्यत्वेकरुन व्यापार आणि प्रशासनात तीव्र परिर्वतन घडुन आले. परंतू ब्रिटिशांनी भारताला गुलाम बनविले होते. अर्थतज्ञांच्या मते, गुलामगिरीही कोणत्याही राष्ट्रासाठी अतिशय दुर्भाग्यपूर्ण अवस्था असते. यामुळे

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

भारतासहित जगातील अनेक राष्ट्रांना तेथील शासनकर्त्यांनी गुलामी आणि शोषणाद्वारे अल्पविकसित व दरिद्री बनूवन टाकले. याशोषित राष्ट्रातील आर्थिक स्थितीचे नियंत्रण शासनकर्त्यांव्दारे केले जात असे. भारतात ब्रिटीश राज्यकर्त्यांनी एक नवीन अशी राजकीय व आर्थिक व्यवस्था अस्तित्वात आणली. भारताची आर्थिक व्यवस्था 1757 ते 1858 पर्यंत ईस्ट इंडीया कंपनी व त्यानंतर 1858 ते 1947 पर्यंत ब्रिटिश सरकारद्वारे अंमलात आणली गेली. 1947 साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य प्राप्तीच्यावेळी देशाला ब्रिटिश शासनाने पोहचविलेल्या जबरदस्त आर्थिकहानीचा सामना करावा लागला. देशातील एकूण लोकसंख्येच्या 72 टक्के जनताही शेतीवर निर्भर होती व ब्रिटिशांनी कृषीक्षेत्राकडे केलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळे भारतीय शेतीची अवस्था अतिशय बिकट बनलेली होती. स्वातंत्र्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेला सामर्थ्यशाली बनविण्यासाठी विकास व प्रगतीचा हेतूसमोर ठेवुन नियोजित विकासाला सुरूवात करण्यात आली. 1951 ते 56 च्या काळात देशात पहिली पंचवार्षिक योजना पार पडली. ज्यामध्ये कृषीक्षेत्राच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. अशाच पध्दतीने भारतात आजपर्यंत 12 पंचवार्षिक योजना पूर्ण झालेल्या असून नियोजनाचे पुढीलकार्य नितीआयोगाद्वारे केले जात आहे. 1991सालीखाजगीकरण, जागतिकीकरण व उदारीकरणाचा पाया रोवला गेला व मुक्त अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून देशाची विकसितपणाकडे वाटचाल सुरू झाली. थोडक्यात 1991 च्यानवीन आर्थिक धोरणाने भारतात खऱ्या अर्थाने आर्थिक विकासाला सुरूवात झाली.

भारतीय अर्थव्यवस्थेचे तुलनात्मक विश्लेषण

2008-09 मध्ये आलेल्या जागतिक महामंदीमुळे भारताचा विकासदर 8.2 वरुन 6.7 टक्के इतका झाला होता. परंतु पुन्हा एकदा भारतीय अर्थव्यवस्था तेजीने विकासाच्या मार्गावर धावु लागली आहे. आंतरराष्ट्रीय नाणे निधीनेही भारताच्या विकासदरात 4.2 वरुन वाढ होवुन तो7.7 टक्के इतका अपेक्षित असल्याचे सांगितले. यातुलनेत 2021-22 मध्ये विकसित देशांचा वृध्दीदर 5.8टक्के राहणार असल्याचे आंतररष्ट्रीय नाणे निधीचे म्हणणे आहे. एका अंदाजानुसार 2025 पर्यंत भारत जगातील सर्वाधिक तरुणवर्ग असणाऱ्यांचा देश होणार आहे. आज चीनचा आर्थिक वृध्दी दर भारतापेक्षा जरी अधिक असला तरीही आगामी 10 वर्षात चीनचा वृध्दी दर घटून भारताचा वृध्दी दर अधिक राहील व कालांतराने काहीकाळातच दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर समान पातळीवर येईल.

कोणत्याही देशातील आर्थिक वृध्दीचा व संपन्नतेचा आढावा घेण्यासाठी प्रमुख 4 घटक विचारात घ्यावे लागतात. ते म्हणजे 'स्थुल देशांतर्गत उत्पन्न, लोकसंख्या, उर्जा आणि त्यादेशाचे एकुण क्षेत्रफळ' या चारहीघटकांवरुन त्यादेशातील अर्थव्यवस्थेचे आकलन होते. अमेरिकन अर्थव्यस्थेचा एकूण जागतिक अर्थव्यस्थेत वाटा 18 प्रतिशत आहे. तर जागतिक कर्जामध्ये त्यांचा वाटा 25 प्रतिशतच्याही पुढे आहे. वास्तविक पाहता, विकसित देशांचे कर्जहे त्यांच्या एकूण अर्थव्यस्थेच्या आकारा पेक्षा 2 ते 3 पट अधिक आहे. यातुलनेत भारतसारख्या विकसनशील देशांची स्थिती मात्र अधिक समाधनकारक म्हणावी लागेल. चीनचा जागतिक अर्थव्यवस्थेत 15.6 प्रतिशत हिस्सा आहे. तर कर्जामध्ये त्यांचा हिस्सा केवळ 2.3 प्रतिशत आहे.भारताचा जागतिक अर्थव्यवस्थेत हिस्सा 8.6 प्रतिशत आहे, तर जागतिक कर्जामध्ये हिस्सा 2 प्रतिशत आहे. यावरुन स्पष्ट

होते की, विकसित देशांच्या तुलनेत भारताची विकासाच्या दृष्टीने वाटचाल निश्चितच सकारात्मक आहे. स्थूल देशांतर्गत उत्पादना मध्ये (GDP) अमेरिका, युरोपीय संघ आणि चीननंतर भारताचा जगात चौथा क्रमांक लागतो. शिक्षणाच्या क्षेत्रात तर भारताची प्रगती वाखण्या जोगी आहे. साक्षरतेच्या बाबतीत आपण पूर्णत: यशस्वी झालो नसलो तरी शिक्षण याबाबीवर ज्यापध्दतीने आपण लक्ष केंद्रीत करीत आहोत, त्यावरुन तरी माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचे 'भारत-एकमहासत्ता' हे स्वप्न नक्कीच पूर्ण होणार असल्याचे दिसते. थोडक्यात स्वातंत्र्यानंतर भारताला एक शक्तीशाली राष्ट्र बनविण्याचे राष्ट्रनिर्मात्यांचे स्वप्न आता पूर्ण होऊ लागलेले आहे. परंतू येणाऱ्या काळात भारत जरी विकसित राष्ट्र बनला तरीही भारता समोर नक्षलवाद, साथीचेरोग, दहशतवाद यासारख्या समस्या असतील ज्यावर सरकारने आजपासून कठोरपाऊले उचलण्याची गरजआहे. सर्वसमस्यांचे निराकरण करता आले तर जागतिक मंचावर भारताचा विकास कोणीही थांबवू शकणार नाही.

उपाययोजना

भारताची आर्थिक विकासाबाबतची वास्तविकता व विकासीत देशांशी तुलनात्मक अध्ययन अभ्यासल्यानंतर असे लक्षात येते की, आर्थिक महासत्ता बनवण्यासाठी भारताला येणाऱ्या काळात काही उपाय योजना करणे आवश्यक आहे.त्यापुढीलप्रमाणे :-

1. भारताच्या सध्याच्या (2020) मानव विकास निर्देशांकात (HDI) 0.64 वरुन 0.80 म्हणजेच जवळपास दुप्पट वाढ करावी लागेल.
2. सन 2019-20च्या आकडेवारी नुसार, भारतातील वीलवापरा पासुन वंचित असलेल्या (32.4टक्के) जनतेचे प्रमाण शुन्य टक्क्यांपर्यंत आणावे लागेल.
3. विकसित देशातील सरासरी आर्युमानाचा विचारकरता भारताचे सरासरी आर्युमान 20 वर्षानीवाढवावेलागेल. यासाठी विकसित देशांचा विचार करता भारतात आरोग्यावरील खर्च 67 पटीने वाढवावा लागेल. परिणामी बाल मृत्यूही कमी होईल.
4. शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाचा अवलंब करुन भारतातील कृषी कार्यरत असणाऱ्या 65 टक्के लोकसंख्येपैकी जवळपास 55 टक्के लोकसंख्येला रोजगारासाठी सेवाक्षेत्रात वळवावे लागेल.
5. भारत वैश्विक ज्ञानसत्तेचे केंद्र बनण्यासाठी भारताचा शिक्षणावर होणारा सार्वजनिक खर्च 4.6 टक्के वरुन 8टक्क्या पर्यंत म्हणजेच जवळपास दुप्पट वाढवावा लागेल.

सारांश :

येत्या काही वर्षात भारत जगातील सर्वाधिक वाढीच्या देशांपैकी एक असेल असा अंदाज IBM Institute Of Business Value नेव्यक्त केला आहे. अर्थव्यवस्था, जागतिकीकरण, अनुकुल लोकसंख्याशास्त्र आणि आर्थिक योजना व सुधारणांच्या पार्श्वभूमीवर भारताचा जीडीपी वित्तीय वर्ष 2025-26 पर्यंत 5 ट्रीलीयन अमेरीकन डॉलर पर्यंत पोहेचल आणि उच्च मध्यम उत्पन्नाची स्थिती प्राप्त करेल, तसेच प्राईस वॉटर हाऊसकूपर्सच्या अहवालानुसार 2025 पर्यंत क्रयशक्तीची क्षमता (PPP) च्या बाबतीत भारतीय अर्थव्यवस्था अमेरीकन अर्थव्यवस्थेला मागे टाकुन दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनेल.

ISSN 2231 4342

संदर्भ :-

1. रुद्र, दत्त व सुन्दरम :- भारतीयअर्थव्यवस्था, एस. चन्दपब्लिशर्स, नवीदिल्ली (2020-11).
2. एन.के. जैन - सार्वजनिकवित्त, संजीवप्रकाशन, मुंबई (2008).
3. डॉ. मुकूंदमहाजन- भारतीयआणिजागतिकआर्थिकविकासनिरालीप्रकाशन, पुणे - 2010.
4. भारताचेआर्थिकसर्वेक्षण 2019-20भारतसरकार.
5. अर्थविश्व - संपादन, डॉ. विकाससुकाळे व प्रा. धीरजका.स. नांदेड - 2011.
6. प्रतियोगितादर्पण - भारतीयअर्थव्यवस्थाविशेषांक

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

पहिला बाजीराव पेशवे- एक अपराजित योध्दा
पालखेड मोहिम ऐतिहासिक अभ्यास (1728)

प्रा. श्रीकांत पांडुरंग तळेकर
राजश्री शाहू कला वाणिज्य
विज्ञान महाविद्यालय, पाथ्री
मो.क्र.9284618022
मेल आयडी—shrikanttalekar2010@gmail.com

डॉ. शरद गावंडे,
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख
इतिहास विभाग, वि.पा.शि.प्र.मं.सं. कला
वाणिज्य,व विज्ञान महाविद्यालय, कन्नड
मो.क्र.9423688255

प्रस्तावना —

सर्व जगाच्या इतिहासात मराठयांचा इतिहास अतिशय स्फुर्तिदायक समजला जातो. पेशव्यांचा इतिहास हा मराठयांच्या इतिहासाचा भाग असून हा इतिहास वस्तुत: छत्रपती शिवाजी पासुनच सुरु होतो. ज्या कठिण परिस्थीतीत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. ती परिस्थीती लक्षात घेता शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हा एक चमत्कारच समजला पाहिजे. पहिल्या बाजीरावांच्या काळात काय किंवा अगदी छत्रपती शिवाजी पासून मराठी सत्तेच्या अखेरच्या दिवसापर्यंत मराठयांच्या इतिहासात फक्त मोहिमाच दिसून येतात. या मोहिमांमध्ये अनेक महापुरुषांच्या व सेनानींच्या कर्तबगारीचा इतिहास सामावलेला आहे. त्यात पहिला बाजीराव पेशवा यांचा समावेश करावा लागेल. पाहिला बाजीराव पेशवा याच्या कालात मराठी सत्ता दक्षिणेकडुन उत्तरेपर्यंत पसरली होती. त्यामुळे मराठी सत्तेच्या विस्तारामध्ये पहिला बाजीराव पेशवा यांची युध्दनिती महत्वपुर्ण ठरली आहे.

आपण मराठयांचा अभ्यास करतो त्यावेळेस असे दिसुन येते की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कलात गनिमी कावा या युध्दनितीचा उपयोग झाला. परंतु श्रीमंत बाजीराव पेशवे राज्याचे प्रमुख बनले त्यावेळेस त्यांनी चपळ घोडदळाचा प्रामुख्याने उपयोग केला. यामागचे कारण म्हणजे कुठलीही रणनिती निर्माण् करण्यासाठी तिन गोष्टींचा विचार करावा लागतो.

1) आपला शत्रु कोण ? आणि त्याची ताकद काय ? 2) आपलं सैन्य बळ

3) ज्या युध्दभुमीवर लढायचे तीची रचना, भौगोलिक परिस्थीतीची ओळख.

<u>पालखेडची लढाई — (1728)</u>

बाजीरावांच्या युध्द कौशल्याचा एक उत्तम नमुना म्हणजे पालखेडची निजामा विरुध्द झालेली लढाई. बाजीराव पेशव्यांच्या जीवनातील प्रामुख्याने नोंद घ्यावी अशी प्रचंड मोहीम म्हणजे पालखेड. या मोहिमेमुळे बाजीरावांचे अस्तित्व आणि त्यांचा पराक्रम संपूर्ण हिंदुस्थानाला दिसला. पालखेडच्या लढाईत निजामाने मराठयांमध्ये फुट पाडुन शाहू आणि त्यांच्या बंधुना वेगवेगळे केले. निजामाने इ.स.1727 मध्ये जयपूरच्या सवाई जयसिंगाला खलिता पाठवून आपला हेतु सांगितला आहे, त्यात तो लिहीतो, शाहुचा प्रतिस्पर्धी कोल्हापूरकर संभाजी राजा यास आम्ही बोलावून जवळ आणले आहे आणि त्यास साहय्् करुन शाहुला गादीवरुन काढण्याचा उद्योग आरंभला आहे.[1] तसेच सातारकऱ्यांशी झालेला तह अमान्य करावा असं म्हटलं आहे. तो तह

ISSN 2231 4342

म्हणजे दि.30 डिसेंबर 1725, पौष शुध्द सप्तमी गुरुवार रोजी झालेला सातारकर शाहु महाराज आणि कोल्हापूरकर संभाजी महाराज यांच्यातला सात कलमी तह [2]. कारण हा तह म्हणजे कोल्हापूरकरांचे राज्य मर्यादित ठेवण्याचा सातारकरांचा प्रयत्न आहे, असं म्हणुन तह मोडण्यास निजामाने संभाजीराजांना उद्युक्त केले. त्याच बरोबर निजामाने बाजीराव विरुध्द गैरसमज पसरविला की, हा तरुण कोकणस्थ ब्राम्हण पेशवा आणि खंडेराव दभाडे सेनापजी तुम्हांस दगा करणार यामुळे शाहु महाराजांचा गैरसमज झाला खरा आणि म्हणुनच छत्रपती शाहुनी अंबाजी पंत पुरंदऱ्यांना पत्र लिहुन बाजीरावांना समज देण्याविषयी सांगितले [3]. त्यावर बाजीरावाने कर्नाटकातुन येवून अंबाजीस तातडीचे पत्र लिहले की, सत्वर येणे, आमचा घात न करणे या वरुन निजामाने कळ लावल्यामुळे बाजीरावांची कशी धांदल उडाली होती याची कल्पना येते.

हैद्राबादच्या सुभ्यात मराठयांचे येणे बंद करावे असे निजामाने मनात आणून प्रतिनिधीच्या मार्फत महाराजास द्रव्य व बालाघाटातील काही मुलुख कबुल केला. आणि प्रतिनिधीला वऱ्हाडात जागीर दिली. यामुळे निजामावर अंकुश बसविण्याचे आपले साधन नाहिसे झाल्याने बाजीरावास खुप राग आला. संभाजी व शाहु यांच्यातील कलहाचा फायदा घेवून शाहुचा चौथाई व सरदेशमुखीचा ऐवज निजामाने अटकवून ठेवला. ही लबाडी बाजरावाने शाहुचे मनात पक्की भरवून महाराजांचे आज्ञेने छ. 1 सफर म्हणजे 26 ऑगस्ट रोजी तो निजामाच्या स्वारीवर निघाला [4] .

<u>तोफा विरुध्द गनिमी कावा</u> –

एकदा खात्री पटल्यावर शाहुने मोहिमेचा सिध्दता करण्यात बिलकुल कसूर केली नाही. 1727 च्या दसऱ्या पासुन महाराष्ट्राचा सुर वेगाने पालटत गेला. शाहू व बाजीराव मनापासून धडपड करीत आहे. असे पाहुन लहान मोठे सरदार त्यांच्या मदतीला धावून आले. 13 ऑक्टोबर रोजी शाहुने सरदारांस पत्र पाठविले की, संभाजी राजे व निजाम उलमुल्क एकत्र होवून चालुन येत आहेत, या करीता समस्त गडकऱ्यांना कामगिरीच्या विशिष्ट सुचना ता.7 नोव्हे.रोजी शाहुने रवान्या केल्या [5].

निजामाने ही शाहुची तयारी पाहून मराठयांवर चालुन जाण्याची सिध्दता केली. इ.स.1727 च्या आरंभी निजाम बिड येथे व पुढे जुन पासुन धारुरला तिन महिने होता. नंतर तो धारुरहुन ऑक्टोबर मध्ये तिन मजला आलीकडे आल्याची बातमी आली [6]. निजाम मराठयाना चकवा देऊ पाहत होता, तो औरंगाबादला जाता जाता अचानक बिडला आला आणि सरदारांना जुन्नर च्या दिशेने पाठविले. निजामाकडे तोफखाना होता तसा मराठयांकडे तोफखाना नव्हता. (गनिमी कावा हे मराठयांचे प्रमुख व परिणामकारक हत्यार होते.) केवळ धावपळीच्या गनिमी काव्यापलीकडे निजामास आळा घालण्याचे काहिच साधन मराठयांच्या हाती नव्हते. म्हणुन निजामास हैराण करण्यासाठी गांधील माशाप्रमाणे एकच दंगल उठवून देणे एवढाच एक पर्याय बाजीरावास होता. तोफ खान्याच्या बळावर किल्ले घेण्याची पध्दत निजामला पूर्ण अवगत असून ऐवज खान, घियास खान वैगेर निष्णात अधिकारी हाताखाली होते. तेंव्हा एकाच जागी ठासून उभे राहून निजामाच्या तोफाखान्यास तोंड देणे मराठयांना शक्य झाले नसते. यासाठी शाहूच्या आज्ञेने दोन वेगळे कार्य भाग बाजीराव व चिमाजी या दोघा बंधुनी वाटून घेतले. उत्तरेकडची बाजू बाजीरावाने आपल्याकडे घेवून, नाशिकपासुन सातारा मिरजे पर्यंतचे प्रदेशाची

 ISSN 2231 4342

व्यवस्था चिमाजीकडे सोपविली. आणि त्याच्या मदतीला सिंदे, होळकर, पवार, कदमबांडे, हे मात्तब्बर सरदार नेमुन दिले. जुन्नर, पडेगांव, पाटस, खेड ही ठाणी ठासून सांभाळण्याची ताकीद बाजीरावाने चिमाजीस व सरदारांस केली. राणोजी शिंदे एका पत्रात बाजीरावास कळविले, ज्या प्रकारची आज्ञा होईल, त्याप्रमाणे वर्तू भिऊन पुढे चालावयास अंतर करणार नाही. प्रसंग पडलाच तर स्वामीचे पूण्य समर्थ आहे. आमचा सांभाळ ईश्वर करीतच आहे [7]. ऑगस्ट 1727 च्या पावसाळयात ऐवजखान [8] नाशिक जवळ असतांना सिन्नरला तुकोजी पवारांनी त्याचा चांगलाच समाचार घेतला [9].

इ.स. 1727 च्या अखेरीस निजाम पुण्यात शिरला आणि पुणे प्रांतात त्याने धुमाकुळ घातला यावेळी चिमाजी अप्पा स्वत: पुरंदर गडावर शाहुराजांसह होते. पुण्यावरुन निघुन निजामाने सुपे, पाटस, बारामती जिंकले तेव्हा बाजीराव पुण्याच्या दिशेने येत आहे. अश्या बातम्या आल्याने निजाम पडेगांव मार्गे नगरला गेला. यावेळेस बाजीराव खांन्देशात होते. बाजीराव पुण्याकडे येण्याच्या आत निसटावे या विचाराने निजामाने आपला तोफखाना नगरलाच मागे सोडला. आणि 22 फेंब्रुवारी 1728 ला औरंगाबादच्या मार्गाने निघाला. त्याच वेळेस बाजीरावाने गनिमी कावाने निजामाचा मुलुख उद्वस्थ करण्याचा सपाटा लावला. बाजीरावाने जालना आणि सिंदखेड हे निजामाचे परगणे जाळून बेचिरांख केले बाजीरावाला निजामाच्या सर्व हलचालीच्या बातम्या वेळोवेळी मिळत होत्या. ऐवज खान बाजीरावांवर चालुन आल्यावर आता बऱ्हाणपूर जाळुन खाक करतो अशी हुल उठुन बाजीराव थेट पूर्वेकडे वळुन माहुर, वाशिम, मंगरुळ वैगेरे भागात धांदल उठवून दिली. 6 नोव्हेंबर 1727 ला जालन्यानजीक ऐवज खानाला बगल देऊन बाजीराव गुजरातच्या रोखाने निघाला [10]. त्यानंतर बाजीराव जानेवारी 1728 च्या सुरुवातीला तापी उतरुन भडोचला निघाला आणि सुरतेवर चालुन येत आहे. असे भासवून सरबुलंद खानाला चकवा दिला. 14 फेब्रुवारीला बाजीराव धुळयाजवळ बेटावदला दाखल झाला.

बाजीरावाच्या वरील रननितीमध्ये काय उद्देश होता तो अभ्यासातुन लक्षात येतो. तो म्हणजे निजामास उत्तरेकडुन मिळणारी रसद तोडुन त्याला पुणे सोडुन उत्तरेत येणे भाग पडेल असा बाजीरावाचा डाव होता. व तो डाव सफल होत होता बाजीराव बऱ्हानपुरला लुटणार ही बातमी खरी वाटून निजाम त्या दिशेने लगबगीने निघाला. पण मध्ये अंजिठयाच्या डोंगर रांगेतुन खाली उतरतांना अचानक आलेल्या बाजीरावांच्या फौजांनी निजामाला अक्षरश: हैरान केले. निजामास कोठे तरी सोयीच्या जागी दोन फौजांच्या चिमटयात पकडावा हा बाजीरावाचा चतुराईचा उद्देश सुरुवातीपासुन ठरविलेला होता. मोठमोठया मजला करीत निजाम सुरत पर्यंत बाजीरावांवर चालत गेला. परंतु बाजीरावाने निजामास चुकवून पुन्हा पलायन केले. तेव्हा निजाम परत फिरुन पुण्यावर चालुन गेला. निजाम नगर पर्यंत येता येता त्यास बातमी मिळाली की, बाजीरांव औरंगाबादवर चढाई करुन गेला. तेव्हा निजाम आपल्या राजधानीच्या बचावासाठी परत फिरला दरम्यान बाजीरावाने कासार बारीने पुढे येऊन, गंगापूर,वैजापूर वैगेरे प्रदेश उध्वस्त केला. त्यापूर्वीच मराठे सरदारांनी निजामाच्या दोहो बाजुंनी छापे टाकुन निजामाला हैरान केले. सावजाला चारही बाजुंनी हुसकाऊन पारध्याच्या आटोक्यात आणन्याचा हा डाव निजामास उमगला नाही. तोफखान्याच्या बळावर तो निर्धास्त राहीला पण तोफखाना मागे नगरला सोडुन निजाम पुढे आला होता. अश्या स्थितीत निजामाला वेढा बसून तारीख 25 फेब्रुवारी 1728 रोजी मराठयांनी पालखेड

ISSN 2231 4342

नजिक निजामाला घेरुन त्याचा कोंडमारा केला [11]. पालखेड हे स्थळ औरंगाबादच्या पश्चिमेस 20 मैल व वैजापूरच्या पूर्वेस 10 मैल आहे. निजामाचा तोफखान दुर मागे राहिला. आणि बाहय प्रदेशाशी असलेला त्याचा संपर्क व दळणवळण पूर्णपणे तुटले. रस्त्यातील नदी नाले होते त्यांचे उतार बाजीरावाने अडविले त्यामुळे निजामास दाणावैरण, अन्नपाणी काहीच मिळेनासे होऊन त्याची मोठी फजिती झाली. त्या संबंधी बाजीराव लिहतो आज आम्ही व नवाब येथे आलो. त्यास आम्हांस दो कोसाचे अंतर आहे जवळच जोगनिचे डोंगर डावे पडतसी उत्तम वाट लिहुन पाठविणे. रंभाजी कदम व दावलजी सोमवंशी डावे बाजुस व उजवेबाजुस पिलाजी जाधव असे राहणे. समय पाहुन वागणे. मोगल पुढे चालतच आहे तुम्ही फौजेनिशी आम्हां जवळ येणे [12].

पालखेडच्या या मोहीमेची सांगता दि. 6 मार्च 1728 रोजी बाजीराव आणि निजाम यांच्यामध्ये मुंगी शेवगांव येथे तह करुन झाली [13]. निजाम दाती तृण धरुन बाजीरावास शरण आला. बाजीरावांच्या मागण्या मान्य करण्या शिवाय त्याच्याकडे कोणताही पर्याय नव्हता. या तहात ऐकुण 17 कलम ठरली.

या तहाचे सर्वात मोठे यश हे होते की, मराठी राज्याचे पुढारीपण शाहुकडे आहे. त्याच्या शिवाय दुसऱ्या कोणाचा वारसा आपण मान्य करणार नाही अशी कबुली या तहाने निजामाने दिली. अश्या प्रकारे युध्द पुकारतांना मराठी राज्यांचा वारसा शाहु कि संभाजी असा जो प्रश्न निजामाने पुढे आणला होता तो पुरता निकालात निघाला. आणि शाहुची मराठी राज्याची मालकी निर्बाधित झाली. तसेच दक्षिणेच्या 6 सुभ्या वरील चौथाई-सरदेशमुखीच्या[14]. मराठयांच्या हक्कांस निजामाकडुन मान्यता मिळाली. स्वराज्यातील मोगलांच्याकडे जो प्रदेश अदयाप राहीला होता त्याचा कब्जा ही या वेळी मराठयांनी घेतला. यामध्ये मावळ प्रांत रंभाजी निंबाळकराच्या ताब्यात होता तो निजामाने लगेच रंभाजीकडुन काढुन पेशव्यांच्या हवाली केला[15].

निष्कर्ष

या मोहिमेतुन छत्रपती शाहु हेच मराठा दौलतीचे प्रमुख आणि वारस आहेत या वर शिक्कामोर्तब झाले.

- छत्रपती शाहुच्या तुलनेत कोल्हापूरकर संभाजी अगदी उणा ठरला आणि केवळ शाहुच्या कृपेमुळेच त्याचे राज्य राहिले. आपण कोणीतरी स्वतंत्र सत्ताधिश आहोत ही त्याची घमेंड पार नाहिशी झाली .
- चंद्रसेन जाधवाची[16] पुरती नाचक्की झाली व त्यास शेवट पर्यंत पेशव्यांशी गोडी ठेवूनच जगावे लागले.
- बाजीरावाला पेशवे पद नाकारणारे प्रतिनिधी, कान्होजी भोसले, दाभाडे, सरलष्कर निबांळकर हे जुने सरदार अकर्तृत्वामुळे नामशेष होऊन मागे पडले.
- दावलजी सोमवंशी[17] याने चांगले युध्द कौशल्य दाखविले म्हणुन निबांळकरांचे सरलष्करपद काढुन दावलजीस देण्यात आले.

या मोहिमेचा परिणाम म्हणजे पालखेडच्या प्रसंगाने बाजीरावाची छाप चहुकडे पसरली आणि शाहु राजाचा व राष्ट्राचा विश्वास बाजीरावावर कायमचा बसला. पालखेड मोहिमेचा एक महत्वाचा परिणाम म्हणजे तोफखाना विरुध्द गनिमा कावा हा प्रयोग वरील युध्दात चांगलाच निर्देशनास आला. निजामाने तोफाच्या जोरावर पुणे प्रातांत अवघड स्थळे जिंकली तसा तोफखाना आपल्याकडे नसुन

 ISSN 2231 4342

त्याची उणिव बाजीरावाने चपळ घोडदळाच्या धावपळीच्या युध्दाने भरुण काढली. आणि शिवाजी-संताजीच्या नंतर त्या कलेचा मुख्य पुरस्कर्ता असा नाव लौकीक इतिहासात कमविला. त्याच्या चपळ घोडदळाची करामत पाहुन निजामही आश्चर्य चकित झाला होता. मोगलांचे सैन्य दिवसाला 10 ते 12 किलो मिटर पुढे जायाचे त्याच वेळेस बाजीरावांच्या सैन्याचा पुढे जाण्याचा वेग हा मोगलांच्या चौपट्ट म्हणजे दिवसाला 40 ते 50 किलो मिटर असा होता. याचे कारण म्हणजे त्याच्या बरोबर युध्द सामुग्री व्यतिरिक्त फारसे साहित्य नसायचे .

श्रीमंत बाजीराव पेशवे हे भारतातील सर्वात कुशल घोडदळाचे सेनापती होते असे युरोप मधल्या फिल्ड मार्शल मॉन्टेगोमोरी या युध्द कुशल सैन्य अधिकाऱ्यांनी बाजीरावांच्या युध्द कौशल्याचे कौतुक केले आहे.

थोडक्यात बाजीराव पेशव्यांनी त्या काळाला योग्य ठरेल अशी युध्द निती वापरुन त्यावेळचे निजाम, मोगल व इतर शत्रुचा पराभव केला त्यामुळेच त्याचे इतिहासातील स्थान अढळ आहे.

संदर्भ सुची

1. सरदेसाई गो.स., मराठी रियासत, 3, पृ.290
2. काव्येतिहास संग्रह पत्रे यादी, ले. 14.
3. तत्रैव,ले.16
4. हेरवाडकर र.वि.,थोरले शाहु महाराज चरित्र, पृ.63
5. शाहु रोजनिशी 30, इ.सं.पे.द.पृ.23
6. तत्रैव,29,30,32.
7. पेशवे दप्तर 10, ले.41
8. कस्तुरे कौस्तुभ, शहामतपनाह बाजीराव, राफ्टर प्रकाशन, 2020.
9. पेशवे दफ्तर, उपरोक्त ले.46
10. कस्तुरे कौस्तुभ, उपरोक्त
11. राजवाडे वि.का., मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड-2 (नविन खंड 7) पृ.40
12. पेशवे दफ्तर, उपरोक्त, 51
13. पेशवे दफ्तर, 15, पृ. 89 ते 91
14. सरदेसाई गो.स., उपरोक्त, पृ 107
15. राजवाडे वि.का., उपरोक्त, खंड-6, ले. 27
16. सरदेसाई गो.स., उपरोक्त, खंड-5, पृ 107.
17. कित्ता, पृ.107

ISSN 2231 4342

भारतातील आदिवासी समाज व नक्षल वादीचळवळ

डॉ. आर.आर. पिंपळपल्ले
इतिहास विभाग ,आदर्श महाविद्यालय, हिंगोली
mob-9970414332
drpraju.2006@gmail.com

भारत विविधते नेनटलेला देश आहे. भारतात अनेक धर्म, वंश आणि संस्कृतीचे लोक वास्तव्य करतात. भारतामध्ये जवळपास 6000 पेक्षा जास्त जाती आणि उपजाती राहतात. इतरजाती जमाती प्रमाणे आदिवासी समाजामध्ये सुध्दा अनेक जाती व उपजाती अस्तित्वात आहेत. प्रा. गुहा यांच्या मते, "आट्रीक भाषा बोलणारे लोक हे आदिवासी अशा गटा मध्ये मोडतात ." भारतातील जवळपास सर्वच प्रांतामध्ये आदिवासी लोक वास्तव्य करतात. इ.स. 1950 मध्ये भारतामध्ये 14 राज्यामध्ये 210 आदिवासी जमाती ST प्रवर्गामध्ये समाविष्ट केल्या आहेत. इ.स. 2001 च्या जनगणनेनुसार ती संख्या 210 वरुन 550 झाली आहे. त्यांची लोकसंख्या 8.20% एवढीआहे.1 आदिवासी समाज हा जंगल, पर्वतमयप्रदेश, दऱ्याखोऱ्या मध्ये वास्तव्य करतो. त्यांच्या जीवनशैलीवर प्राचीन काळापासून कोणत्याही प्रकारची बंधने नव्हती. परंतु ब्रिटिशांच्या सत्तास्थापनेनंतर मात्र त्यांच्या जीवन पध्दतीवर अनेक प्रकारची बंधने आली. त्यांचे जंगली स्वातंत्र्य जमीनदार व सावकारांनी ब्रिटीशांच्या सहकार्याने हिरावून घेतले. त्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात शोषण झाले होते.

A Tribe is a social group of simple, kinds, the member of which speak a common dialect and act together in such common purpose as welfare.-Dr Revers

आदिवासी समाजातील शासन प्रणाली:

आदिवासी समाजामध्ये राजकिय प्रणालीचा विकास प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे दिसून येते. त्यांचे कायदे व नियम न हे परंपरागत कायद्याव्दारे निर्माण झालेले आहेत. नवीन कायदा करण्याचा प्रयत्न दिसून येत नाही. पण परंपरागत प्रथा परंपरेचे लोक मनोभावाने पालन व जतन करतात. त्यांचे जीवन हे साधे व सरळ असल्याचे दिसून येते.

आदिवासी समाजामध्ये शासनाचे स्वरुप हे वेगवेगळे असल्याचे दिसून येते.

1)अल्पजन्यशासन – लहान समुहाच्या हाती सत्ता असणे.

2)राजशासन – राजाच्या हाती सत्ता असणे

.3)वृध्दजन्यशासन राजकिय सत्ता ही वृध्द व्यक्तीच्या हाती असणे

.4)लोकशासन – पंचायती मार्फत शासन चालविणे.

5)धर्मशासन – अलौकिक व्यक्तीच्या प्रभावा खाली पुरोहीत वर्गाने शासन चालविणे.

 ISSN 2231 4342

वरील प्रमाणे आदिवासी समाजव्यवस्थेमध्ये शासन प्रणाली दिसून येते.

शोध निबंधाचे उद्दिष्ट्ये:

1) आदिवासी समाजातील नक्षलवादी चळवळीचा शोध घेणे.
2) आदिवासी या समाजातील नक्षलवादी चळवळीची व्याप्तीचा अभ्यास करणे.
3) आदिवासी समाजामध्ये जोमाने प्रसारीत होणाऱ्या या चळवळी करता उपाययोजना करणे.
4) आदिवासी समाजावर झालेले नक्षलवादी चळवळीचे परिणाम अभ्यासणे.

तथ्य संकलन:

आदिवासी समाजामध्ये नक्षलवादी चळवळीचा झालेला प्रसार व त्याचे आदिवासी समाज जीवनावर झालेले परिणाम यांचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक, दुय्यम साधन सामुग्रीचा आधार घेतला जाणार आहे. यात प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, जर्नल्स, इंटरनेट व दैनिकांचाही वापर करुन प्रस्तुत शोध निबंधाचे लेखन केले जाणार आहे.

संशोधन पध्दती:

प्रस्तुत शोधनिबंधाकरीता विश्लेषणात्मक, वर्णनात्मक संशोधनपध्दतीचा वापर केला जाणार आहे. त्याकरीता सामाजिकशास्त्रीय संशोधनपध्दतीचा वापर करुन आवश्यकता असल्यास इतर संशोधन पध्दतीचाही वापर केला जाणार आहे.

गृहितके:

1) आदिवासी समाजातील गरीबी व दारिद्र्यामुळे ही चळवळ आदिवासी समाजामध्ये तयार होऊन प्रसारीत झाली आहे.
2) नक्षलवादी हे कांही वर्गाच्या आदेशावरुन किंवा चिथावणी वरुन हे हिंसक कृत्य करतात.
3) आदिवासी समाजामध्ये प्रसारीत झालेल्या नक्षलवादी चळवळीमुळे आदिवासी समाजावर दुरगामी परिणाम झाले आहेत.
4) आदिवासी समाजाच्या शोषणा विरुध्द निर्माण झालेल्या नक्षलवादी चळवळीने व्यवसायिक रुप धारण केले आहे.

नक्षलवादाची निर्मिती व व्याप्ती:

भारतीय राज्यकर्त्यांच्या आधुनिक काळामध्ये सतावणारी प्रमुख समस्यांपैकी एक समस्या म्हणजे नक्षलवादी चळवळ होय. नक्षलवादी ही चळवळ भारताच्या अनेक राज्यामध्ये प्रसारीत झाली आहे. याचळवळीचा उदय 1967 मध्ये बंगाल मधील नक्षलीबारीया खेड्या पासून झाला आहे.4 स्वातंत्र्य प्राप्ती नंतर संपूर्ण भारता मध्ये साम्यवादी चळवळीने जोर धरला होता. आदिवासी समाजामध्ये सामाजिक विषमता टोकाला पोहचली होती. आहिरे व नाहीरे अशी समाजाची दोन गटात विभागणी झालेली होती.

3 मार्च 1967 मध्ये पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातील सिलगुडी तालुक्यातील नक्षीलबारीया गावातून चारुमुजुमदार, रामप्रसादसिंग, कानुसन्याल, जंगलसन्याल, जे.पी. इव्हेरचर यांच्या नेतृत्वाखाली

आदिवासी वर्गाने बडामनिरामज्यांती नावाच्या गावावर हल्ला केला तेंव्हा पासून या क्रांतीकारी कम्युनिष्ठ पक्षाच्या चळवळीच्या सशस्त्र उठावाला नक्षलवादी आंदोलन हे नाव पडले.5 भारतामध्ये प्रसारीत असलेली ह्या चळवळीचा आरंभ प. बंगाल नंतर केरळ, आंध्रप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र्या सारख्या राज्यामधील आदिवासी समुदाय या चळवळीमध्ये सहभागी झाला आहे. चेराबंडाराजूच्यापहाडी आवाजातील लोकगीताने आदिवासी समाजाच्या समस्यांना जाणीव पूर्वक फुंकर घातली आहे.6 भारतातील नक्षलवादी चळवळीला आदिवासी समाजाचा आधार मिळत आहे. जमीनदाराच्या जमीनी वाटपात सरकारला आलेले अपयश आदिवासी मुजरा चे होणारे शोषण, दुष्काळ, पुर अशा आपत्तीच्या वेळी सरकारची निष्क्रीयता यामुळेआदिवासींना नक्षलवादा बद्दल आत्मीयता वाटणे हे स्वाभाविकच असे होते. त्यामुळे भारताच्या अनेक राज्या मध्ये याचळवळीचा प्रभाव वाढलेला आहे. नक्षलवादी हे प्रामुख्याने आदिवासी वर्गाची दिशाभूल करत आहेत. त्यांना कायदेभंग आणि गून्हेकरण्याकरीता प्रवृत्त करत आहेत. आदिवासी समाजाला हे नक्षलवादी जमीनदारांकडून जमीनी मिळवून देऊन त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करीत आहेत. समाजातील आदिवासी कडून इतर समाजावर दाबदडपशाहीचा वापर करीतआहेत.

भारतातील नक्षल वाद्यांच्या कार्य प्रणाली:

1) दलम् : माहितीच्या आधारावर कारवाई करणारे सशस्त्र आणि गणवेशातील दल.
2) संघम्म : गावात काय चालले आहे याची आपल्या गटात खडान्खडा माहिती पुरविणारे दल.7

नक्षल वाद्यांच्या या दोन्ही दलामध्ये प्रामुख्याने आदिवासी समाजातील तरुणवतरुणींचा मोठया प्रमाणात सहभाग आहे.

आदिवासीच्या जीवनावर नक्षलवादी चळवळीचा प्रभाव:

1) नक्षलवादी चळवळीमुळे आदिवासी वर्गाचे व्यापारी व सावकार वर्गाकडून होणाऱ्या लुटीस पायबंद बसला आहे.
2) नक्षलवादी चळवळीच्यामुळे प्रशासन विशेषत: पोलीस प्रशासना कडून मोठया प्रमाणात दळ केला जात आहे.
3) आदिवासी समाजातील लहान व युवा पीढी मोठ्या प्रमाणात (मुले व मुली) या गटात सामील झाले आहेत.
4) आदिवासी समाजाच्या समस्यांची दखल होण्यास या चळवळीने शासनाला भाग पाडले आहे.
5) नक्षलवादी वर्गाने वापरत असलेल्या दमण पध्दतीमुळे आदिवासी समाजाच्या राजकिय व आर्थिक जीवनावर दुरगामी परिणाम केले आहेत.
6) आदिवासी समाजाचा या चळवळीमध्ये सक्रीय सहभाग वाढला आहे.
7) आदिवासी समाजाच्या शैक्षणिक विकासाला खिळ बसली आहे.
8) आदिवासी भागामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण होऊन कायदा- सुव्यवस्थेच्या प्रश्नाने जन्म घेतला आहे. त्यामुळे आदिवासी विकास खुंटत चालला आहे.

 ISSN 2231 4342

9) नक्षलवादी चळवळीमध्ये आदिवासी स्त्रीयांनी सहभाग घेतल्यामुळे आदिवासी संस्कृती व जीवनमानाचा ऱ्हास केला आहे.

आदिवासी समाज व्यवस्थेवर नक्षलवादी . प्रत्येक घरातून एक मुलगा किंवा मुलगी या चळवळीमध्ये सामावून घेण्याची सक्ती नक्षलवाद्यां कडून केली जात आहे. नाही तर उचलून नेऊ अशी धमकी देणारे नक्षलवादी तयार झाले आहेत. 8 आदिवासींच्या बालकांना वयाच्या 8 ते 10 वर्षापासून हे प्रशिक्षण दिले जात आहे.

खालील प्रमाणे नक्षलवादी कारवायामध्ये नागरीक बळी पडलेले आहेत.9

अ.क्र.	**वर्ष**	**नागरीक**	**अ.क्र.**	**वर्ष**	**नागरीकबळी**
1	1994-95	17238	9	2012	252
2	2005	1212	10	2013	142
3	2006	1118			
4	2007	1013			
5	2008	1030			
6	2010	759			
7	2011	429		**एकूण**	23914

शिफारशी किंवा उपाय योजना:

1) आदिवासी विकासा करीता योजनांची व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे.
2) आदिवासी समाजास शासकीय स्तरावर मानसिक दृष्ट्या समजावून घेऊन त्यांच्या विकासा करीता वेगवेगळी धोरणे राबविणे गरजेची आहेत.
3) नक्षलवादी / आदिवासी भागामध्ये सेवाकरणाऱ्या अधिकाऱ्यास पुरेशी सुरक्षा व हमी पुरविणे गरजेचे आहे.
4) दुर्गम अशा भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवा करीता रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे अत्यावश्यक आहे.
5) नक्षलवादी आपले उद्दिष्ट गाळण्या करीता ज्या तळमळीने आपले कार्यक्रम राबवितात त्याप्रमाणे सरकार, प्रशासन व NGO नी कार्य करणे आवश्यक आहे.
6) आदिवासी समाजाच्या मनात पोलीस प्रशासनाची निर्माण झालेली दहशत कमी करण्यासाठी या पोलीसात आदिवासींना सामावून घेणे काळाची गरज आहे.
7) गरीबी, अन्याय व शोषणा विरुध्द शासनाने उपायात्मक ठोस योजना राबवून सामाजिक समता, स्वातंत्र्य व बंधु भाव निर्माण करावा.

आदिवासी समाजामध्ये जशी नक्षलवाद्यां बद्दल सहानुभूती निर्माण झाली होती तशी भिती देखील निर्माण झाली आहे. आदिवासी समाज सभेला आला नाही, त्यांना मदत केली नाही म्हणून नक्षलवादी त्यांना ठार करतात. सभेला गेले नाही म्हणून भिती, गेले तर पोलीसांच्या चौकशीची भिती, माहिती दिली नाही तर पोलीस मारतात, पोलीसांना माहिती का दिली म्हणून नक्षलवाद्यांकडून हत्या अशा दूहेरी दुष्ट चक्रात आदिवासी समाज अडकलेला आहे.

निष्कर्ष:

1) नक्षलवादी चळवळ ही आदिवासी समाजाच्या विकासा करीता एक मोठा अडथळा आहे.
2) शासनाकडून आदिवासी समाजाच्या सुरक्षीततेची हमी मिळत नाही किंवा सुरक्षीत तेचा अभाव आहे.
3) नक्षलवाद्यांच्या वैयक्तीक स्वार्थापायी आदिवासींचे शोषण वाढले आहे.
4) नक्षलवादी चळवळ ही आदिवासी वर्गासाठी वरदान नसून शापठ रली आहे.
5) नक्षलवादी चळवळीचा ज्या हेतू साठी उदय झाला होता आज तो उदेश दूर झालेला दिसतो
6) नक्षलवादी चळवळी ही फक्त आदिवासी समाजाच्या सुरक्षीत तेचा प्रश्न नसून ती भारताच्या अंतर्गत सुरक्षेतेचा प्रश्न झाली आहे

संदर्भ ग्रंथ

1) डॉ अनिल कठारे –आधुनिक भारताचा इतिहास (1858-1947) प्रशांत पब्लिकेशन जळगाव प्रथम आव्रती. 5 जुन 2015 पान क्र309

2)Dr. Revers - Races and culture of India, Asia Publishing House, Bombay 1958, P.No. 356

3) डॉ अनिल कठारे –आधुनिक भारताचा इतिहास (1858-1947) प्रशांत पब्लिकेशन जळगाव प्रथम आव्रती. 5 जुन 2015 पान क्र 314

4)डॉ विनोद जाधव –नक्षलवाद आणि भारताची अंतर्गत सुरक्षा –अरुणा प्रकाशन लातूर .30ऑगस्ट 2013 पान क्र 377

5) किता- पान क्र 377

6)कित्ता-पान क्र. 181-182

7)कित्ता-पान क्र. 181-182

8)ब्रिगेडीअर हेमंत महाजन-नक्षल वाद्यांचे आव्हान व चीनचे भारताशी छुपे युद्ध- निचीकेत प्रकाशन नागपूर पान क्र. 90

9) नक्षलवाद विकिपीडिया

ISSN 2231 4342

"21 व्या शतकातील आव्हाने"

डॉ. गंगणे अमोल उत्तमराव
इतिहास विभाग,
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर
ता.अंबाजोगाई, जि.बीड
मो.8180972831

डॉ. दळवे अरुण यादवराव
प्राचार्य,
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर
ता.अंबाजोगाई, जि.बीड
मो.9923019540

प्रस्तावना :

21 वे शतक गतीमान आणि प्रगतीशिल म्हणून ओळखले जात आहे. या शतकात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय, औद्योगिक, आर्थिक, तांत्रिक, दळणवळण, अंतरजाल, कृषी इत्यादी क्षेत्रामध्ये प्रगती घडून येत आहे. या सर्वांगीन प्रगतीमुळे देशाचा भौतिक आणि तांत्रिक विकास प्रखडपणे निदर्शनास येत आहे.

21 व्या शतकात मानव स्वप्नातील जग प्रत्यक्षात साकार करण्याकरिता सातत्याने प्रयत्न करीत आहे. या करीता तो नैतिकता, मानवता, कर्तव्य, या कडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे भौतिक व तांत्रिक विकासामुळे प्रगती जाणवत असली तरी या प्रगतीमुळे दहशतवाद, आतंकवाद, भ्रष्टाचार, जागतिकीकरणाची स्पर्धा, प्रदुषण, बेरोजगारी, लिंगभेदाचा असमतोल, अतिरिक्त लोकसंख्या, धुम्रपान, कुटुंब विघटन इत्यादी आव्हाने निर्माण झाली आहेत. या आव्हाणांना समोरे जाताना मानव आणि मानवी मुल्ये संपूष्टात येत आहेत. म्हणूनच 21 व्या शतकातील भौतिक आणि तांत्रिक प्रगतीच्या पाठी मागील आव्हाने व त्यांचे स्वरुप स्पष्ट करण्याच्या उद्देशाने संबंधीत शोध निबंधाची मांडणी करण्यात आली आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या मांडणी करीता पुढीलप्रमाणे उद्दिष्टांची मांडणी करण्यात आली आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

1) 21 व्या शतकातील भौतिक व तांत्रिक विकासाचा आढावा घेणे.
2) 21 व्या शतकातील अव्हानांच्या स्वरुपाचे अध्ययन करणे.
3) अव्हानांच्या घटकांचे अध्ययन करणे.
4) अव्हानांच्या निर्मुलनाकरिता उपाय योजना सुचविणे.

सदरील उद्दिष्टांच्या अध्ययनाकरिता पुढील प्रमाणे गृहितकृत्यांची मांडणी करण्यात आली आहे.

गृहितकृत्य :

1) विकास प्रक्रियेतून समस्यांची निर्मिती झाली आहे.
2) भौतिक आणि तांत्रिक विकास मानवी मुल्यांच्या ऱ्हासाला कारणीभूत आहे.

ISSN 2231 4342

3) संघटित स्वरुपातून अव्हानांचे निर्मुलन करता येते.

सदरील गृहितकृत्यांच्या पडताळणी करीता खालीलप्रमाणे संशोधन पध्दतीचा आवलंब करण्यात आला आहे.

संशोधन पध्दती :

सदरील शोध निबंधाच्या मांडणीकरिता प्रमुख्याने दुय्यम स्त्रोताताचा अवलंब करण्यात आला आहे. या मध्ये संदर्भग्रंथ, क्रमीक पुस्तके, मासिके, वार्षिक अंक, नियतकालिके, वर्तमानपत्रे, शासकीय व निम्म शासकीय संस्थांचे अहवाल इत्यादीचा आवलंब करण्यात आला आहे. त्याच बरोबर अप्रकाशित तथ्यामध्ये एम.फील, पीएच.डी प्रबंध, इंटरनेट, खाजगी संस्थांनी अप्रकाशित केलेली माहिती यांचाही उपयोग करण्यात आला आहे.

सदरील शोध निबंधाच्या मांडणी करिता प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा आवलंब करण्यात आला आहे. सदरील आराखडयाच्या माध्यमातून संकलीत सांख्यिकीय तथ्यांना शाब्दिक स्वरुपात मांडण्याची प्रक्रिया पूर्णत: करण्यात आली.

विषय प्रतिपादन :

21 व्या शतकातील आव्हानांचा आढावा घेत असताना समाज, मानव, राष्ट्र यांना कोणकोणत्या समस्या प्रामुख्याने जानवत आहेत. याचा चिकित्सक शोध घेणे उचित ठरते. यामध्ये आव्हानात्मक पुढील घटक दिसून येतात.

1) **दहशतवाद :**

21 व्या शतकात सर्वांगीन विकास घडून येत असला तरी या विकासात काही जाती, धर्म, समुदाय वंचीत आहेत. असे वंचीत घटक सांघीक बळाचा आवलंब करुन समाज, राष्ट्र समुदाय यांना वेटीस धरुन आपल्या मागण्या मान्य करुन घेत आहेत. त्याच बरोबर विकास प्रक्रिया मध्ये आपल्याला आधिक संधी मिळाली पाहिजे, या करीता दहशतवादातुन आपले वर्चेस्व निर्माण झाले पाहिजे या करीता दहशतवादातुन आपले वर्चेस्व निर्माण करीत आहेत. यामध्ये बॉम्बस्फोट करणे, स्कुलबस, प्रवासी बस यांचा अपघात घडवून आनणे. समुदायातील काही कत्तलकरणे इत्यादी स्वरुपातील दहशतवादाचे आव्हान समोर आले आहे.

2) **आंतकवाद :**

विकास प्रक्रिया मध्ये सर्वच मानव, समाज, समुदाय प्रांत यांना समान संधी मिळालेली नाही. त्यामुळे ज्या व्यक्ती, समाज, समुदाय, प्रांत विकासापासून वंचीत आहेत. ते आपल्या मागण्या मान्य करुन घेण्याकरिता आंतकवाद करीत आहेत. यामध्ये कार्यालयांची जाळपोळ, प्रवाशी वाहतुक बंद करणे, प्रवासी गाड्या जाळणे, शासकीय संपत्तीची लूट करणे, नेता, अधिकारी यांची हत्या करणे अशी आव्हाने समोर येत आहेत.

3) **भ्रष्टाचार :**

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

विकास घडवून आण्ाण्ो ही प्रत्येक व्यक्तीची महत्वकांक्षा आहे. ही आकांक्षा पूर्ण करण्याकरिता मानव अनैतिक मार्गाने पैसा मिळवित आहे. यामध्ये लाचलुचपत घेणे. शासकीय योजनात घोटाळे करणे, शासनाच्या वस्तु विकणे, अतिरिक्त बिले काढणे. यामुळे सामान्य नागरीकांना जीवन आवश्यक वस्तु मिळत नाहीत. म्हणून भ्रष्टाचार हे एक प्रमुख आव्हान समोर आले आहे.

4) **जागतिकीकरणाची स्पर्धा :**

विकास प्रक्रियेत सर्वच देश खुल्या बाजारपेठेचे धोरण स्विकारत आहे. या खुल्या बाजारपेठे मध्ये ज्याची कमी किंमत त्याला आधिक ग्राहक, त्याचची आर्थिक विक्री हे सुत्र विकसीत झाले आहे. या स्पर्धेत आपले अस्तित्व टिकवण्याकरिता प्रत्येक देश मुलभुत सुविधाकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे सामान्य नागरीकांना उपासमार, भुकबळी, उपोषण, या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

5) **लोकसंख्यावाढ :**

मालथस या लोकसंख्या शास्त्रज्ञाने नमुद केल्याप्रमाणे भौतिक सुविधा, अन्नधान्य हे गणितातील बेरजेप्रमाणे वाढते तर लोकसंख्या गुणाकार पध्दतीने वाढते. त्यामुळे कितीही विकास घडवून आण्याचा प्रयत्न केला तरी वाढत्या लोकसंख्यामुळे तो सातत्याने अपूर्ण पडतो. ही वाढीव लोकसंख्या आणि अपूर्ण विकास यातून अनैतिक मार्गाला दिशा मिळुन विकास संपूष्टात येवून देश अद्योगतीकडे वळतो. त्यामुळे वर्तमान काळात लोकसंख्याचा विस्फोट हे आव्हान उभे राहिले आहे.

6) **लिंगभेदाचा असमतोल :**

21 व्या शतकात तांत्रिक विकास मोठ्या प्रमाणात घडून आला आहे. या विकासातून लिंग चिकित्सा आणि स्त्रीभ्रूणहत्या यावर अधिक भर देण्यात आला त्यामुळे देशातील मुलीच्या जन्माचे प्रमाण 1000 मुला मागे 920 आहे. त्यामुळे लिंगभेदाची असमानता निर्माण झाल्यामुळे अनेक पुरुषांना अविवाहित जीवन जगावे लागत आहे. तर कामवासना पुर्तते करीता नैतिकमुल्ये, नातेबंध यांची पायमल्ली केली जात आहे. यातून सामाजिक हिंसा, हत्या, खुन, आत्महत्या घडू येत आहेत.

7) **बेरोजगारी :**

विकास प्रक्रिया ही तांत्रिक व यांत्रीकीकरणाच्या माध्यमातून घडून येत आहे. त्यामुळे शासन नोकर भरतीकडे पूर्णत: दुर्लक्ष करीत आहे. खाजगी कंपन्या, गुत्तेदार हे यंत्राद्वारे आपली कामे करीत आहेत. त्यामुळे सुशिक्षतांना रोजगाराची व नोकऱ्यांची संधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे अभियांत्रिकी, आय.टी.आय, आर्ट, कॉमर्स पदवीधर, व्यावसायिक पदवीधर इत्यादींना बेरोजगार म्हणून जीवन जगावे लागत आहे. ही बेरोजगारांची संघटना अतंकवाद,

 ISSN 2231 4342

दहशतवाद, अतिरेकी टोळया, गुंडगीरी अशा संघटनामध्ये सहभागी होवून हिंसक कृत्य करीत आहेत.

8) **व्यासनाधिनता** :

शासन देशातील नागरीकांचे आरोग्य सुद्दढ राहावे त्यांनी व्यासनाच्या अहारी जावू नये या करीता सातत्याने जनजागृती करीत आहे. त्याच बरोबर अमलीपदार्थावर बंदी घालीत आहे. तरीही वर्तमान काळात बालक, तरुण, वृध्द या गटातील मंडळी, दारु, गांजा, चरस, कोकीन, गुटखा, ब्राऊनशुगर, बीडी, सिगारेट तंबाखु इत्यादी अमली पदार्थाचा आवलंब करीत आहेत. या आमली पदार्थाकरिता अनेक आत्महत्या, खुन घडून येत आहेत. व्यासनाधिनतामुळे सामाजिक, नैतिक मुल्य पायदळी तुडवीली जात आहेत.

9) **प्रदुषण** :

विकास प्रक्रिया बरोबरच कारखाने, दळणवळणाची साधने, औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र, औषध निर्मिती कारखाने इत्यादीची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली आहे. या कारखान्यातून बाहेर पडणारे रासायनिक द्रव्य, कार्बन, शिसे, अमलीपदार्थ हे हवेत मिसळले जात आहेत. तेच मानवाच्या शरीरात जात आहेत. त्यामुळे फुफुसाचे आजार, दमा, मधुमिया, पेशीचे प्रमाण कमी अधिक होणे, त्वचा रोग इत्यादी प्रदुषणामुळे समस्या निर्माण झाल्या आहेत. त्याचबरोबर हवा, जल, ध्वनी प्रदुषण मोठ्या प्रमाणावर होत आहे.

10)**कुटुंब विघटन** :

ग्ातीमान विकास प्रक्रियामुळे मानव आत्मकेंद्रीत वृत्तीचा बनत चालला आहे. तो स्वत: पूर्ताच विचार करु लागला आहे. त्यामुळे तो मी माझी पत्नी आणि मुले यालाच महत्व देत आहे. यातून वृध्द व्यक्तींना अनाथ आश्रमात ठेवले जात आहे.पती पत्नी यांच्यात अधिकार समान हक्क यातुन मतभेद होवून घटस्फोट घडून येत आहेत. त्याच बरोबर पती-पत्नी मध्ये हत्या, आत्महत्या, खुन असे अनुचित प्रकार घडुन येत आहेत, आज देशात पश्चिमात्य संस्कृतीप्रमाणे कुटुंबाची परिस्थिती केंद्रीय झाली आहे.

11)**फुटीरतावाद** :

विकास प्रक्रियत काही समाज समुदाय प्रांत याकडे दुर्लक्ष होत आहे. ज्या घटकावर अन्याय अत्याचार झाला आहे. ते स्वतंत्र राज्य निर्माण झालेले आहे. जसे की, महाराष्ट्रात मराठवाडा, विदर्भ हे स्वतंत्र राज्याची मागणी करीत आहेत हीच परिस्थिती इतर राज्यात ही आहे. हा फुटीरतावादी दृष्टीकोन देशात निर्माण झाल्यामुळे विकास प्रक्रियेला मर्यादा निर्माण होत आहेत.

12) **कोविड-19** :

ISSN 2231 4342

सध्या देशात कोविड या व्हायरस चे थैमान निर्माण झाले आहे. या व्हायरसचे निमुर्लन करण्याकरिता अनेकवेळा देशात संचारबंदी करण्यात आली. त्यामुळे रोजगार व उद्योग धंद्ये बंद पडले. अनेक मजुर, गरीब नागरीक, वृध्द अपंग व्यक्ती उपासमारीला समोरे जात आहेत. कारखाने व दळणवळणाची सुविधा बंद असल्यामुळे देशातील आयात निर्यात बदं झाली. त्यामुळे देशाचे आर्थिक उत्पादन बंद झाले. देशाचा विकास थांबला आहे. देशात जीवन आवश्यक वस्तुंचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे गरीब व्यक्ती आत्महत्याला जवळ करीत आहेत. अशा कोविड-19 व्हायरसला समोरे जाणे सद्य: देशापुढील आव्हान आहे.

वरीलप्रमाणे 21 व्या शतकातील अव्हानाची मांडणी सविस्तरपणे करता येत असली तरी मांडण्यात आलेल्या तथ्यांचे महत्व थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडता येते.

महत्व :

सदरील शोध निबंधामध्ये मांडण्यात आलेली संक्षिप्त माहिती ही वर्तमान काळात देशापुढे 21 व्या शतकात निर्माण झालेली आव्हाने आहेत. या आव्हानांची तीव्रता सविस्तर पाहिली तर देशात सध्या किती प्रमाणात हिंसाचार, भ्रष्टाचार, हत्या, आत्महत्या, कोविड-19 चा परिणाम घडत आहे याची परिचीती येईल. त्यातून ह्या आव्हानांचे निर्मुलन करण्याचे उपाय शोधणे सोपे होईल.

सारांश :

21 व्या शतकातील आव्हाणे या शोधनिबंधामध्ये सद्य: स्थितीत देशापुढ प्रामुख्याने प्रखड स्वरुपात कोणत्या समस्या आहेत. त्या समस्यांची तीव्रता, त्यांचा परिणाम, या संबंधीचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. सदरील शोध निबंधातून मांडलेल्या आव्हानाचे शासनाने निर्मुलन केले तर देशाला विकास प्रक्रिया राबविण्यातकरिता अधिक गती मिळेल.

संदर्भसूची :

1) डॉ.काचोळे दा.धो.- 'संशोधन पध्दती' कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. 2000.
2) प्रा.गंदेवार एस.एन.- 'सामाजिक संशोधन पध्दती' अरुणा, प्रकाशन, लातूर.2005.
3) डॉ.दा.धो.काचोळे -'सामाजिक समस्या' कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद. 1997.
4) डॉ.उषा पाटील- 'भारता समोरील आव्हाणे' योजना मासिक, 2008.
5) किरण बेदी, 'देशाच्या संरक्षणातील समस्या' योजना मासिक, 2008.
6) जगदाळे अशोक- 'गुन्हा आणि गुन्ह्याची तीव्रता' दै.सम्राट 2006.
7) डॉ.भांगे कालीदास - 'विकासात्मक समाजशास्त्र' चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, 2019.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य

पंढरीनाथ पोपट शेजुळ
मेल आयडी- shejulp85@gmail.com
मो.क्र.9511620456

डॉ. शरद गावंडे
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख,
इतिहास विभाग,वि.पा.शि.प्र.मं.सं,
कला वाणिज्य व विज्ञान महा., कन्नड

प्रस्तावना :-

शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करतांना शिक्षण शास्त्रज्ञ म्हणतात. " जे पुस्तक उघडायला लावते ते शिक्षण आणि जे मन उघडायला लावते ते उच्च शिक्षण". म्हणुन शिक्षण आणि उच्च शिक्षण या दोन वेगवेगळया बाबी ठरतात. शिक्षणाचे सामाजिक महत्व सांगतांना प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ मार्शल म्हणतात, "एका व्यक्तिच्या शिक्षणामुळे दसऱ्याच्या कल्याणात वृध्दी होते म्हणजेच व्यष्टितुन समष्टीचा विकास साध्य होतो. थोडक्यात, शिक्षणाने समाजाला दृष्टी दिली पाहिजे त्यातून विविध मानसिक क्ष्मतांचा विकास साधला जावा. शिक्षण फक्त लिहीण्या वाचण्याचे साधन नसुन यशस्वी जीवन जगण्याचे तंत्र आहे. शिक्षणामुळे विवकनिष्ठ,विवेकनिष्ठ, बुध्दीप्रमाण्यवादी, कार्यप्रवण, कर्तव्यदक्ष, चारित्रवाण व नितीसंपन्न समाज घडु शकतो.

आधुनिक काळात पश्चिम महाराष्ट्रात बहुजन समाजाला शिक्षण देण्याचे पवित्र कार्य म. फुले, राजर्षी शाहु महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले होते त्याच प्रमाणे विदर्भात बहुजन समाजाला शिक्षण देण्याचे महत्वपूर्ण कार्य डॉ. पंजाबराव देशमुखांनी केले.आज अमरावती येथील श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती ही विदर्भातील एक अग्रगण्य शिक्षण संस्था म्हणुन ओळखली जाते. याचे सर्व श्रेय डॉ. पंजाबराव देशमुखांना जाते. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी त्यांच्या आयुष्यात सामाजिक, शैक्षणिक, राजकिय, कृषी इत्यादी विविध क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे. म्हणुन त्यांना वैदर्भिय समाज क्रांतीचा उद्गाता असा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. स्वत: शेतकऱ्याचा मुलगा म्हणुन त्यांना शेतकरी, कामकरी वर्गा विषयी जास्त आकर्षन होते. मराठा समाजाच्या विकासा विषयी पंजाबराव यांना राजर्षी शहु महाराजांचे उद्गार नेहमी आठवत, "ते म्हणाले होते, ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर चढावोढीच्या काळात मराठा समाजाचा टिकावा लागावा असे वाटत असेल तर मराठा विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या हायस्कूल बोर्डींग या सारख्या संस्था निर्मान व्हायला पाहिजे"[1]. या विचाराने त्यांचा पाठपुरावा केला होता म्हणुन शिक्षण पूर्ण करुन पंजाबराव जेंव्हा भारतात परत आले तेव्हा भारतातील विषमता आणि त्यामुळे भारतीय समाजाचे झालेले नुकसान याची जाणीव त्यांना झाली आणि जाती, धर्माच्या नावाखाली व अंधश्रध्देच्या काळोख्यात अडकलेल्या लोकांना स्वराज्याची चळवळ समाज कारणातुन सांगितली पाहिजे त्यासाठी त्यांना शिक्षण देवून जागे केले पाहिजे असे डॉ. पंजाबराव देशमुखांना वाटत होते [2]. यासाठी डॉ. पंजाबरावांनी आपले संपूर्ण लक्ष शिक्षणावर केंद्रीत केले होते.

ISSN 2231 4342

श्री. शिवाजी मराठा हायस्कुल, अमरावती.

महाराष्ट्रात शिक्षणाच्या बाबतीत खुपच विषमता होती. मराठा व इतर समाज मिळुन 70 टक्के असून त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण 1 टक्के एवढेच होते. यामुळे छत्रपती शाहुनी 1907 मध्ये भारतीय मराठा शिक्षण परिषदेची स्थापना केली होती. या परिषदेचे तिसेर अधिवेशन1908 मध्ये विदर्भात अमरावती येथे झाले. याच परिषदेतून प्रेरणा घेवून विदर्भात 1909 मध्ये वऱ्हाड मराठा शिक्षण समाज जन्मास आला होता. याचे प्रमुख आप्पासाहेब देशमुख व विश्वासराव देशमुख होते अशाप्रकारे श्री. शिवाजी मराठा हायस्कुलच्या स्थापनेचे मुळ 1908 मध्ये दिसून येते. 1918 मध्ये खामगांव येथ रायबहादुर केशवराव जामराव देशमुख यांच्या प्रयत्नाने भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे ऐतिहासीक अधिवेशन छत्रपती शाहु यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले या परिषदेमुळे बहुजन समाजात शैक्षणिक जागृतीची लाट उसळली.

बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसारासाठी विदर्भात एक हायस्कुल सुरु करावे अशी कल्पना या परिषदेतुन पुढे आली. यासाठी छत्रपती शाहुनी 10,000/- रु. उदार देणगी जाहिर करताच शिक्षण प्रेमी लोकांकडुन 25,000/- रु. जाहिर देणगी मिळाली. यासाठी असिस्टंट कलेक्टर माधवराव देशमुख व तहसिलदार यशवंत वाटाणे यांनी पूढाकार घेतला. परिणामी 1919 मध्ये **"बेरार मराठा शिक्षण संस्था [3]"** वऱ्हाडात जन्माला आली.

1935 पर्यंत विदर्भात बहुजन समाजाचे एकही विद्यालय नव्हते. विदर्भातील पंढरीनाथ पाटील व नानासाहेब अमृतकर यांनी ब्राम्हणेत्तर कॉग्रेसचे अधिवेशन अमरावती येथे घेवून एक मराठा हायस्कुल उघडावे असे अधिवेशनात जाहिर केले. त्यासाठी मराठा शिक्षण परिषदेचा गोळा झालेला निधीची माधवराव देशमुख यांच्याकडे मागणी करण्यात आली. 1 जुलै 1925 रोजी श्री. शिवाजी मराठा हायस्कुल ही संस्था वऱ्हाडात उदयास आली होती. या संस्थेच्या स्थापनेस आप्पासाहेब देशमुख, रावसाहेब वाटाणे, गोपाळराव देशमुख, रंगराज शास्त्री व काशीराव बापू देशमुख या महत्वाचा वाटा आहे [4]. या मराठा हायस्कुलचे उद्घाटन 1 जुलै 1925 रोजी वऱ्हाडचे कमीशनर जी.ए.शान यांच्या हस्ते झाले [5]. या हायस्कुलचे पहिले मुख्याध्यापक इ.ए.गांवडे झाले होते. अशा प्रकारे श्री शिवाती मराठा हायस्कुल हे श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती या शैक्षणिक वटवृक्षाचे बीज होय.

डॉ. पंजाबराव देशमुख विदेशातुन भारतात परत आल्यावर त्यांनी वकिती व्यवसायला सुरुवात केली त्याच दिवशी त्यांनी श्री. शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये शिक्षण म्हणून पदार्पन केले होते. आणि तेही विनावेतन. कोर्टाच्या कामातुन वेळ मिळाला की, डॉ. पंजाबराव देशमुख हायस्कूल मध्ये शिकवायला जात असत. या शाळेला गोपाळराव यांनी आपली जागा भाडे न घेता दिली होती. तट्टे उभारुन ही शाळा उभी केली होती. म्हणुन तीला "तट्टा हायस्कुल" असे म्हणत असत. परंतु पुढे संस्थेची आर्थिक परिस्थीती खुपच बिकट झाल्यामुळे हायस्कुल बंद पडणार होती. त्यावेळेस डॉ. पंजाबराव देशमुखांनी सरकारचे अर्थ सहाय्य मिळवून दिले होते. शेवटी ही मदत देखील तोकडी पडली त्यामुळे संस्थेची आर्थिक बाजु डबघाईला आली. 1928 मुख्याध्यापक

असलेले हरी येवले यांनी लिहल्याप्रमाणे "जाहिर झालेल्या देणग्यांची वसुली होई ना, शाळेत राजकारण घुसले त्यामुळे शाळा सुरळीत चाले नाशी झाली म्हणुन बेरार मराठा शिक्षण संस्थेने 1932 पासुन हायस्कुल बंद करण्याचे ठरविले."[6]. शेवटचा उपाय शामराव गुंड व काशिराव बापू देशमुख काही शिक्षकांसह डॉ. पंजाबराव देशमुख यांना भेटुन संस्थेच्या हालाकिच्या परिस्थीतीचे कथन केले. ते ऐकुण डॉ. पंजाबराव देशमुख यांना खुप वाईट वाटले परंतु आशाही परिस्थीतीत संस्था बंद पडु नये यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शक्य तितकी मदत करण्याचे आश्वासन दिले. व एक नविन शिक्षण योजना आखली त्यानुसार शिक्षण योजनेच्या नावातुन मराठा हा जातीवाचक शब्द कमी करुन त्यानुसार 1 जुलै 1932 रोजी 'श्री. शिवाजी शिक्षण संस्था' नाव रुपास आली आणि डिसेंबर महिन्यात रजिस्टर्ड ही झाली [7]. या नव्या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. अन्नासाहेब ए.डब्लु. पाटील, उपाध्यक्ष एन.एम.महाजन, सचिव व्हि.के. देशमुख, सदस्य गुलाबराव देशमुख, बि.वाय.भोपळे, व्हि.जी.टाफोडे या शिक्षकांनी श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या पाया भरणीत मोलाचा सहभाग दिला. या सोबतच अनेक प्रतिष्ठीत व्यक्तीचा संबंध या संस्थेशी जोडला गेला होता. त्यात पंढरीनाथ पाटील, नानासाहेब कोरडे, दादासाहेब वाटाणे इत्यादीचा समावेश याशिवाय डॉ. पंजाबराव देशमुख यांनी चारही जिल्हा कौन्सिलच्या अध्यक्षांकडुन मोठया देणग्या मिळवून दिला होता.

1935 मध्ये श्री. शिवाजी मराठा हायस्कुलचा दशवार्षिक सोहळा अमरावती येथे डॉ. पंजाबराव देशमुख व इतर मान्यवरांच्या उपस्थिती मोठया थाटाणे पार पडला. पंढरीनाथ पाटील, बॅ. देशमुख, रावबहादुर कोरडे, यांनी व्यक्त केलेल्या ईच्छे प्रमाणे कमिंशनर हेन्री ग्रिनफिल्ड यांनी संस्थेला 15 एकर 15 गुंठे जमिन श्री.शिवाजी मराठा हायस्कुलला दिली. याच जागेत पुन्हा तट्टा हायस्कुल सुरु झाले. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विषयी बोलतांना हायस्कुलचे मुख्याध्यापक श्री. पाटील म्हणतात "ज्यांच्या मुळे लोक मोठे होतात तो खरा मोठा, डॉ. पंजाबराव हे असे आहेत.[8] " तट्टा हायस्कुल हे वंचितांचे मातृ स्थान होते. पुढे शाळेला आग लागुन तट्टा हायस्कुल खाक झाले. देशात आर्थीक मंदीची लाट आली. परिणामी श्री. शिवाजी मराठा हायस्कुल बंद करण्याचा निर्णय झाला. अश्या परिस्थीत काशिराव बापू देशमुख आणि शामराव गुंड डॉ. पंजाबराव देशमुख यांच्याकडे गेले व त्यांना "श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष पदाची सुत्र हातात घेऊन दैनंदिन कारभारात लक्ष घाला [9]" अशी विनंती केली. त्यांच्या विनंती मान देत डॉ. पंजाबराव देशमुख यांनी संस्थेची धुरा आपल्या खांदयावर घेतली. श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या नविन घटने प्रमाणे डॉ. पंजाबराव देशमुख 14 मार्च 1937 रोजी आजीव अध्यक्ष झाले [10]. संस्थेच्या परिस्थीती विषयी बोलतांना डॉ. पंजाबराव देशमुख म्हणाले होते की, "आमचा इतिहास म्हणजे अडचणीचा इतिहास येथील इंच इंच जागा मिळविण्यासाठी आम्हाला आतोनात कष्ठ करावे लागले. शिक्षकांना वेळेवर पगार मिळत नसुनही त्याची कोणतीही तक्रार वृत्तपत्रात आली नाही अश्या त्यागावरच ही संस्था वाढली."[11]

श्री. शिवाजी मराठा हायस्कुलची यशस्वी वाटचाल.

श्री. शिवाजी मराठा हायस्कुलचा फुटबॉल संघ त्यावेळी संपूर्ण विदर्भात प्रसिध्द होता. कारण शाळेचे मुख्याध्यापक हरी येवले हे क्रिडा प्रेमी होते. त्याच्या अथक प्रयत्न परिश्रमामुळे शाळेला हा लौकीक प्राप्त झालेला होता. यामुळे शाळे विषयी विद्यार्थ्यांमध्ये आकर्षन वाढुन विद्यार्थी संख्या वाढली याच काळात अन्नासाहेब पाटील यांनी स्थापन केलेली "विदर्भ हायस्कुल" ही शाळा पुढे श्री. शिवाजी मराठा हायस्कुल विलीन करण्यात आली. आणि अन्नासाहेब पाटील स्टेशन परिसरातील शाळेचे मुख्याध्यापक बनले [12]. शाळेचा विस्तार वाढल्यामुळे हैद्राबादच्या निजामाच्या मदतीने उभारलेल्या प्रिंस ऑफ बेरार होस्टेल या ईमारतीत शाळा भरु लागली.1937 मध्ये श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती अंतर्गंत, श्री. शिवाजी मराठा हायस्कुल, श्री. शिवाजी मराठा वस्तीगृह व अनाथ विद्यार्थ्यांसाठी श्री. श्रध्दानंद वस्तीगृह या अश्या तिन संस्था कार्यरत होत्या. आज श्री. शिवाजी मराठा हायस्कुल ही संस्था श्री. शिवाजी बहुउद्देशीय माध्यमिक व उच्च माध्यामिक शाळा मुख्य शाळा अमरावती म्हणुन ओळखली जाते.

श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती.

1914 मध्ये अमरावती शहरात हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाची स्थापना झाली. तरुणांच्या मनात स्वातंत्र लढयात भाग घेण्याची प्रेरणा व्यायाम व खेळाच्या माध्यमातुन या मंडळाने मोठया प्रमाणात निर्माण केली. भारतीय तरुन हा सशक्त व निरोगी असावा म्हणुन या मंडळाने बलोपासनेला महत्व दिले. त्यामुळेच या व्यायाम शाळेने आपले ब्रिद वाक्य "बलम उपास्व" निवडले आहे. श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाने शारीरीक शिक्षणा बरोबरच सामाजिक क्षेत्रात ही प्रशंसनिय कामगिरी केली आहे. स्वातंत्र पूर्व काळात भारतीय समाजातील जात, धर्म व पंथाची विषमता जुगारुन सर्व तरुणांना प्रवेश खुला होता. त्यामुळे महात्मा गांधीनी देखील या मंडळाचा गौरव केला होता. सेवा तपस्वी डॉ. शिवाजीराव पटवर्धन हे या मंडळाचे अध्यक्ष होते. त्यामुळे सेवा परमो धर्म हे समाज सेवेचे बाळकडु मंडळाला मिळाले. डॉ. पटवर्धन, अंबादास वैद्य, एकनाथराव मोहोड, डॉ. भाऊराव मोहोड, डॉ. असनारे, या उत्साही तरुणांनी श्री. हनुमान व्यायात प्रसारक मंडळाची मुहुर्त मेढ रोवली होती.

श्री. शिवाजी व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावतीची स्थापना.

डॉ. पंजाबराव देशमुख यांना श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळा विषयी सुरुवाती पासुनच कुतुहल होते. डॉ. पंजाबराव देशमुख यांना विद्यार्थी जिवनातच व्यायामाची आवड निर्माण झाली होती. व ती त्यांनी विदेशात असतांना सुध्दा कायम ठेवली होती. व्यायामाकडे त्यांनी दुर्लक्ष केले नव्हते. सद्दढ व निरोगी जिवनासाठी व्यायाम आवश्यक आहे असा दृढ विश्वास डॉ. पंजाबराव देशमुख यांचा होता. म्हणुन संपूर्ण समाजाचे आरोग्य सद्दढ व बलवान करण्याच्या व्यापक उद्देशाने त्यांनी प्रथम एक व्यायाम शाळा सुरु केली. पुढे दसऱ्यांच्या मुहुर्तावर 1926 मध्ये डॉ. पंजाबवराव देशमुखांनी व्यायाम प्रसारक मंडळाची स्वतंत्र संस्था निर्माण

 ISSN 2231 4342

केली [13]. व या बलोपासक मंडळाला त्यांनी श्री. शिवाजी व्यायात प्रसारक मंडळ असे नाव देऊन नोद करुन घेतली. "शिवाजी" या नावाचे डॉ. पंजाबराव देशमुख यांना नेहमीच आकर्षन वाटत होते. छत्रपती शिवाजी मराजांचा ज्वंलंत पराक्रम हेच डॉ. पंजाबराव देशमुख यांचे प्रेरणा स्थान होते. त्यामुळे त्यांनी व्यायाम प्रसारक मंडळाला शिव नामांकित केले होते. पुढे या संस्थेचे सभासद वाढत गेले त्यातुन सभासद वर्गणी गोळा करण्यात आली. व त्या वर्गणीतुन व्यायाम साहित्य जुळविण्यात आले गावोगावी शाखा सुरु करण्यात आल्या. या संस्थेत जाती धर्माच्या भेद-भावाला मुळीच वाव नव्हता. कारण डॉ. पंजाबराव देशमुख यांना समाजाच्या अगदी खालच्या तरुणांना संघटीत , शिस्तबंध्द, व सामर्थ्यशाली करण्याची तळमळ होती.

श्री. शिवाजी मराठा हायस्कुल ते श्री. शिवाजी व्यायाम प्रसाराक मंडळ अशी शिक्षण संस्थेची वाटचाल सुरु असतांना बेरार मराठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आप्पासाहेब देशमुख यांनी अमरावतीची व्यायाम शाळा संपूर्ण साहित्यासह ताब्यात घेतली. परंतु डॉ. पंजाबराव देशमुख निराश न होता त्यांनी ब्रिटीशांकडुन मालटेकडी येथे जागा मिळविली. व एक मोठी व्यायाम शाळा बांधली पुढे श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या अंतर्गत प्रत्येक शाळेत एक व्यायाम शाळा त्यांनी उभी केली. बौध्दिक शिक्षणा बरोबरच शारीरीक शिक्षण संपूर्ण विदर्भातील तरुणांना उपलब्ध करुन दिले.

श्री. शिवाजी लोकविद्यापीठ व जनता कॉलेजची स्थापना.

समाजातील प्रत्येकांच्या घरोघरी ज्ञानगंगा पोहचावी म्हणुन श्री शिवाजी लोकविद्यापीठाची स्थापना डॉ. पंजाबराव देशमुख यांनीच सुचविली. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी विदेशातील लोक शिक्षणाची रचना व कार्य पध्दतीचे अवलोकन केले होते. त्यामुळे 1950 मध्ये आपल्या सहकार्यासोबत चर्चा करुन एक शैक्षणिक योजना तयार केली. तिच श्री. शिवाजी लोकविद्यापीठ होय. ब्रिटन मध्ये 1969 मध्ये स्थापन झालेल्या पहिल्या मुक्त विद्यापीठा पुर्वी जवळपास 20 वर्षे अगोदर डॉ. पंजाबराव देशमुख यांनी 1950 लवचिक शिक्षण पध्दतीचे लोक विद्यापीठ अमरावती येथे स्थापन केले होते. या अर्थाने डॉ. पंजाबराव देशमुख हे मुक्त विद्यापिठाचे पहिले संकल्पक ठरतात. या लोक विद्यापिठाचे अमरावती येथे उद्घाटन तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रजी प्रसाद यांनी केले होते. यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख आपल्या भाषनात म्हणाले होते की, "निरक्षरता व अज्ञान, अंधश्रध्दा व भेकडपणा अनियमितता व चारीत्र्यहिनता या वर कडाडुन हल्ला करुन जन साधारणास या सर्व सोयी श्री. शिवाजी लोकविद्यापिठाव्दारे उपलब्ध करुन देण्याची आमची ईच्छा आहे"[14].

या लोकविद्यापिठाच्या विकासाची जबाबदारी सुरुवातील डॉ. ज्वाला प्रसाद व श.रा.लोंढे यांच्या सोपविली होती. याच श्री. शिवाजी लोकविद्यापिठा अंतर्गत विविध शिक्षण संस्थानी जन्म घेताला त्यापैकी जनता कॉलेज 1951, व रुरल इंस्टिटयुट 1956 या दोन प्रमुख संस्था होत्या.

 ISSN 2231 4342

1951 जनता कॉलेज ची स्थापना श्री.शिवाजी लोक विद्यापीठाची स्थापना झाल्या नंतर काही कालावधी नंतर झाली. लोक शिक्षणाच्या बाबतीत जनता कॉलेजने अभिनव,अत्यावश्यक व विधायक कार्य पार पाडले. 18 ते 30 वर्ष वयाच्या ग्रामीण प्रौढांसाठी शिक्षणाची व्यवस्था या जनता कॉलेज मध्ये केली गेली होती. 1952 मध्ये मॅट्रीक उत्तीर्ण झालेल्या पण गावातच राहणाऱ्या तरुणांसाठी वर्ग सुरु केले. 1953 मध्ये शेती करणाऱ्या मुलांसाठी कृषीवर्ग सुरु करण्यात आले. अल्पावधीतच जनता महाविद्यालयाच्या प्रगतीचे अनेकांनी भरपूर कौतुक केले.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे स्त्री शिक्षण विषयक कार्य.

स्त्री शिक्षणांचा प्रारंभ डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आपल्या घरापासुन केला होता. त्यांच्या सौ. विमलबाई या विवाहपूर्वी फक्त मॅट्रिक पास होत्या. डॉ. पंजाबराव देशमुखांनी विमलबाईना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले होते. त्यांनी सुध्दा शिक्षण घेऊन बि.ए., एल.एल.बी. पर्यंत शिक्षण घेऊन वऱ्हाडातील पहिल्या महिला वकिल होण्याचा मान मिळविला. स्त्री शिक्षणाचा खऱ्या अर्थाने विकास व्हावा म्हणुन विद्यार्थीनिना शिष्यवृत्ती मिळवून देण्याचा प्रयत्न डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केला होता. स्त्री शिक्षण हा स्त्री पुरुष समानतेचा महत्वाचा दुवा असल्याचे त्यांचे परखड मत होते व त्यासाठी त्यांनी अनेक शिक्षण संस्था स्थापन करुन स्त्रीयांचा शिक्षणांचा मार्ग सुकर व सुलभ केला होता [15]. त्याच बरोबर पात्रता धारक स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरच नोकरी मिळण्याचा अधिकार ही त्यांनी मान्य केला होता.

विदर्भात बहुजन समाजाला विकासाची नविन दिशा प्राप्त होऊ शकली कारण डॉ. पंजाबराव देशमुख यांनी विदर्भात केलेले सामाजिक व शैक्षणिक कार्ये त्यांनी स्थापन केलेल्या अनेक शिक्षक संस्था मधुन बहुजन समाजातील तरुण आपल्या पात्रतेनुसार पोट भरत आहेत. अनेकांना नोकरीस लावले. याच शाळेमधुन शिकुन अनेक जन उच्च पदस्थ होतील. त्यांच्या हयातीत हजारो जगले, त्याच्या पश्चात हजारो जगत आहे. आणि भविष्यात ही जगतील म्हणुन बहुजन समाजाला प्रेरणा देणारे व आदर्श ठरलेले भाऊसाहेब हे महाराष्ट्रातील कर्मविरांच्या परंपरेत शोभुन दिसणारे एक दैदिप्यमान व्यक्तिमत्व ठरले. त्यामुळे विदर्भ हा नेहमीच त्यांच्या ऋणात राहील.

संदर्भ सुची.

1. देशमुख सौ. कल्पना, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक योगदान, ऋचा प्रकाशन, नागपूर, प्रथमा वृत्ती, 26 डिसेंबर 1997, पृ.46
2. कडवे रघुनाथ, भारत कृषक भुषण : भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख, संस्कार प्रकाशन, रहाटे कॉलनी, वर्धा रोड, नागपूर, प्रथमा वृत्ती 1986, पृ.53
3. देशमुख सौ. कल्पना, उपरोक्त, पृ. 46
4. शिवाजी पत्रिका (पाक्षिक), अमरावती, खंड-4, दि. 1 एप्रिल 1958.

ISSN 2231 4342

5. मोहिते वीर उत्तमराव, जागतिक कृषक क्रांतीचा विधाता : लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख, प्रकाशक, प्रा. सौ. भाग्यरेखा देशमुख, अध्यक्ष मराठा विज्ञान मंदिर, शिवाजी नगर, अमरावती, 1983, पृ.109
6. सावरकर सुदाम ऊर्फ दामोधर तुकाराम, सुर्यकर रा.ब., भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख : जिवन व कार्य, प्रथम खंड, प्रकाशन श्री. श.रा.लोंढे, सचिव श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, 1964, पृ.336
7. तत्रैव, पृ.336
8. कित्ता, पृ.338
9. मोहिते वीर उत्तमराव, उपरोक्त पृ.326
10. फुले किशोर (संपा.), शिव संस्था (त्रैमासिक), डॉ. पंजाबराव देशमुख उपाख्य भाऊ साहेब देशमुख, विशेषांक, प्रकाशक, श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, 26 डिंसेबर 2011, पृ.33
11. सावरकर सुदाम ऊर्फ दामोधर तुकाराम, सुर्यकर रा.ब., तत्रैव पृ.338
12. शिवाजी पत्रिका (पाक्षिक), अमरावती, खंड-4, दि.1 एप्रिल 1958.
13. मोहिते वीर उत्तमराव, उपरोक्त पृ.114
14. मोहड वंदन (संपा.), पाने आठवणींची, प्रकाशन सौ. विमल मोहड, वंदन प्रकाशन, 366, पायवाट, मोतीनगर, अमरावती, 1996, पृ.121
15. सत्यनारायण निला (संपा), लोकराज्य (मासिक), डॉ. पंजाबराव देशमुख विशेषांक, माहिती जनसंपर्क महासंचानालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, मार्च 2001, पृ.16

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

छत्रपती शिवाजी राजांच्या स्वराज्याची अर्थनिती

प्रा. डॉ. श्रद्धानंद बा. माने
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
माधवराव पाटील महाविद्यालय, पालम.
जि.परभणी.
भ्रमणध्वनी : 8459096668
manesharad1997@gmail.com

प्रस्तावना :

इ.स. १६३० पूर्वी म्हणजे शिवपूर्व काळात माणसांचे व्यवहार कसे होते यासंबंधी विस्तृत माहिती तत्कालीन पाश्चात्य प्रवासी बर्नियर व टॅव्हर्नियर यांच्या प्रवास वर्णनात पुढीलप्रमाणे आहे. आपल्या प्रवास वर्णनात ते लिहीतात की, राजे, धनिक, व्यापारी, जमिनदार, सुलतान, उमराव वर्ग यांचे जीवन चैनीचे ख्याली खुशालीचे, ऐषोरामाचे, नाच, गायन व तरुणी यांच्यात मग्न झालेले, तर सामान्य वर्ग, मध्यमवर्ग, शेतकरी, कारागीर, श्रमिक व मजूर हे सदैव दारिद्रयाने पीडलेले होते. सामान्य माणसाचा अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा देखील भागवल्या जात नव्हत्या सामान्य माण्साला साधे खाद्यपदार्थ कांदा-भाकरी, चणे-फुटाणे, नाचणी, वऱ्याची रोटी, भुईमुगाच्या शेंगा तर नाहीच साधी मक्याची कणसे ही खायला मिळणे मुश्किल होते.

छ. शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यावेळी शहजारी राजे भोसले हे मागेलशाहीत पंचहजारी मनसबदार होते. त्यावेळी महाराष्ट्रात निजामशाही, आदिलशाही व मुघलशाही यांचे राज्य होते. छ.शिवाजी महाराजांच्या जन्मानंतर शहाजी राजे मोघलशाही सोडून निजामशाहीत आले. परंतु त्यांना या मुस्लीम राजवटींचा विट आला होता. त्यांना स्वत:चे राज्य हवे होते. परंतु परिस्थितीनुसार ते कार्य पार पाडू शकले नाहीत. त्यांनी हे कार्य शिवाजी महाराजांवर सोपवले. मुस्लीम राजवटीत हिंदू आणि सामान्य जनतेवर मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार केले जात होते. जबरदस्तीने कर आकारणी केली जात होती. हिंदू महिलांवर अत्याचार केले जात होते. शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात शेतसारा वसूल केला जात होता. या अन्यायापासून जनतेची सोडवणूक करण्यासाठी स्वराज्याची स्थापना करण्याचा संकल्प शिवाजी महाराजांनी केला. सतराव्या शतकात महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना करुन जनतेचे कल्याण करण्यासाठी आणि जुलमी मुस्लीम राजवटीतून जनसामान्यांची सुटका करणे आणि जनतेच्या कल्याणासाठी राज्य स्थापन केले.

संशोधनाची उद्दीष्ट्ये :

१) छ. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील अर्थनितीचा अभ्यास करणे.
२) स्वराज्यातील शेती व्यवस्थेचा अभ्यास करणे.
३) स्वराज्यातील व्यापाराचा अभ्यास करणे.

ISSN 2231 4342

४) स्वराज्यातील करांचा अभ्यास करणे.

गृहितके :

छ.शिवाजी महाराज हे लोककल्याणकारी राजे होते.

छ.शिवरायांच्या स्वराज्यात जनतेचे कल्याण हे अंतीम ध्येय होते.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधनांचा वापर केला असून, त्यामध्ये संदर्भग्रंथ आणि नियतकालीकांमधून प्रकाशित लेख यांचा वापर केला आहे.

इ.स. १६४० साली छ.शिवाजी राजे आपल्या मातोश्रीसह बेंगलोरला गेले तेथे दोन वर्षाच्या वास्तव्यात राज्यकारभार करण्यासाठी लागणारे प्रशिक्षण घेऊन दोन वर्षानंतर पुण्यास परतले आणि मावळातील लोकांच्या परिस्थितीचे अवलोकन करुन मावळापासुनच स्वराज्य स्थापनेस सुरुवात केली. शेतकरी, कष्टकरी प्रजा यांना आपलेसे केले. लोकांच्या मनात विश्वास निर्माण करुन स्वराज्य विस्तार केला. स्वराज्यासाठी स्वतंत्र अष्टप्रधान मंडळ नियुक्त करुन स्वतंत्र शक, स्वतंत्र नाणे, ध्वज, राज्यव्यवहार कोष निर्माण केला. शिवाजी राजांचे हुकूम हेच स्वराज्याचे कायदे असत. ते कोणी मोडू नये यासाठी खबरदारी घेतली जात होती.

स्वराज्यातील शेती :

शिवकालीन आर्थिक जीवन शेती व्यवसायाशी निगडीत होते. स्वराज्यापुढे शेतीशी संबंधित मुख्य तीन प्रकारची कामे होती. १) पडिक जमिन लागवडीखाली आणणे. २) शेतकरी आणि त्यांच्या पिकांचे रक्षण करणे. ३) स्वराज्यातील संपूर्ण जमिनीचे मोजमाप करुन सारा आकारणी करणे. शेतकरी हा स्वराज्यातील मुख्य उत्पादक घटक होता. तत्कालीन कागद पत्रात शेतकऱ्यांचा उल्लेख कुणबी, गुजारी, रय व रयत असा केलेला आढळून येतो. स्वराज्यात शेतकऱ्यांना प्राधान्य मिळाले. पडिक जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी मोठमोठ्या सवलती देण्यात आल्या. जो शेतकरी पडिक जमिन लागवडीखाली आणून पिक घेईल त्याला पहिले पाच वर्षे संपूर्ण शेतसारा माफ केला जाई. त्यापुढील कांही वर्षे एकूण शेतसाऱ्यात आठवा हिस्सा, कांही वर्षे सहावा हिस्सा, कांही वर्षे चौथा हिस्सा त्यानंतर निम्मा सारा आणि पूर्ण सारा आकरावा असे करार करण्यात आले. परिणामी पडिक जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी प्रोत्साहन मिळाले. स्वराज्याचा कणा म्हणजे शेतकरी स्वराज्याचा आर्थिक विकास हा शेती आणि शेतकरी यांच्याशी निगडीत आहे. हे ओळखून शिवाजी राजांनी शेतकऱ्यांना त्यांच्या कार्यास पोषक अशा विविध प्रकारच्या सवलती देऊन शेती विकासासाठी निश्चित पाऊले उचलली होती. शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही धक्का लागला नाही पाहिजे अशी शिवरायांची राजाज्ञा सर्वश्रुत आहेच. यावरुन स्वराज्यातील शेती आणि शेतकऱ्यांचे महत्व अधोरेखित होते.

स्वराज्यातील व्यापार :

शिवकालीन स्वराज्यात चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, वेंगुर्ले, पेण इत्यादी शहरे व्यापाराची प्रमुख

 ISSN 2231 4342

केंद्र म्हणून प्रसिद्ध होती. चौल येथे अफू, रेशीम आणि निळ यांचा व्यापार अतिशय समृद्ध होता. सतराव्या शतकात चौलचे रेशीम चिनी रेशमापेक्षा उत्कृष्ट समजले जात. संपूर्ण भारतात चौलच्या रेशमाला मागणी होती. एवढेच नाही तर परदेशातही रेशीम विक्रीसाठी जात असे. दाभोळ हे स्वराज्यातील अत्यंत भरभराटीस आलेले बंदर म्हणून प्रसिद्ध होते. कल्याण आणि भिवंडी सागवानाच्या उत्पादनात समृद्ध मानले जात असत. कल्याणला शिवाजी राजांच्या आरमारासाठी विविध प्रकारच्या नौका तयार होत होत्या.

शिवकालीन स्वराज्यातील व्यापारीपेठातून प्रामुख्याने पुढील प्रकारच्या वस्तूंचा व्यापार होत असे. अन्नधान्यामध्ये नाचणी, ज्वारी, बाजरी, मका, मुगडाळ, हरभरा, तीळ, शेंगदाणे आणि वेगवेगळ्या जातीचा तांदुळ या अन्नधान्याशिवाय ऊस, आंबा, पेरु, केळी, द्राक्षे, पपई, नारळ, सुपारी, डाळींब या फळांचा व्यापारही तेजीत होता. इतर भागातून कापड आणि वस्त्रे स्वराज्यात विक्रीसाठी येत असत.

स्वराज्यातील कर महसूल :

आपल्या राज्याचे उत्पन्न असे वाढेल याचा विचार शिवाजी राजांनी केलेला दिसून येतो. त्यासाठी विविध स्वरुपाचे कर आकारुन त्यांची वसुली केली जात असत. स्वराज्यात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर अस्तीत्वात होते. शेतसारा हा राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत होता. प्रत्यक्ष करांमध्ये इनामपट्टी, मिरासपट्टी, देशमुखपट्टी अशा प्रकारच्या करांचा समावेश होता. शिवाजी राजांच्या राज्याभिषेक प्रसंगी सिंहासनपट्टी किंवा तख्तपट्टी वतनदारांवर बसवण्यात आली होती.

याशिवाय स्वराज्याच्या उत्पन्नासाठी लूट, खंडणी, शासकीय दंड, व्यवसाय कर, भेटवस्तू आणि नजराणे, चौथाई आणि सरदेशमुखी या मार्गांचा अवलंब करुन स्वराज्य शकट चालवला जात होता.

एकंदरीत स्वराज्याचा अर्थनितीचा अंतीम उद्देश रयतेचे कल्याण साध्य करणे हाच होता. म्हणजे शिवरायांनी स्वराज्याच्या रुपाने कल्याणकारी राज्याची निर्मिती केली. म्हणुनच छत्रपती शिवाजी राजे हे प्लेटोच्या 'आदर्श राजा' आणि 'स्वराज्य' हे प्लेटोचे 'कल्याणकारी राज्य' संकल्पनेप्रमाणे आदर्शच होते. म्हणून शिवाजीराजे हे लोककल्याणकारी जाणते राजे तर स्वराज्य हे कल्याणकारी राज्य होते या म्हणण्याला पुष्टी मिळते.

निष्कर्ष :

१) शिवकालीन स्वराज्याची अर्थनिती आजच्या राज्यककर्त्यांना मार्गदर्शक आहे.
२) स्वराज्यात करांमध्ये विविधता होती त्यात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांचा समावेश होता.
३) स्वराज्य हे पूर्णपणे शेती व्यवसायावर अवलंबून होते. म्हणजे आजच्याप्रमाणे शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा होती.
४) स्वराज्यातील व्यापार हा कांही अंशी स्थानिक स्वरुपाचा तर कांही अंशी आंतरराज्य आणि अल्पप्रमाणात आंतरराष्ट्रीय होता.
५) शिवरायांनी स्वराज्याची स्थापना रयतेच्या संरक्षणासाठी आणि कल्याणासाठी केली. स्वराज्याचा

ISSN 2231 4342

अर्थनितीचा अंतीम उद्देश लोककल्याण हाच होता.

६) शेती हा एकमेव उत्पादक व्यवसाय होता. म्हणून या व्यवसायाला आणि शेतकऱ्यांना सतत प्रोत्साहन दिले.

संदर्भ :

१) अ.रा. कुलकर्णी- मध्ययुगीन महाराष्ट्र, पूणे-२००७.
२) अ.रा. कुलकर्णी- शिवकालीन महाराष्ट्र, पूणे-१९९७.
३) ह.श्री. शेणोलीकर व प्र.न. देशपांडे- महारष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड (शिवकाळ) भाग-१
४) वि.गो. खोबरेकर- महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड (शिवकाळ) भाग-१, मुंबई-२००६

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

शिखर महादेव मंदिर, तेर, ता. जि. उस्मानाबाद एक पुरातत्वीय अभ्यास

श्री. अमोल नारायण गोटे
(एम.ए. प्राचीन भारतीय इतिहास ,संस्कृती व पुरातत्वशास्त्र)
मु.पो. माढा, ता.माढा, जिल्हा सोलापुर
संपर्क - 9545442833, 8999009186
मेल - amolgote1990@gmail.com

प्रस्तावना

संत श्रेष्ठ श्री.संत गोरोबा काका यांचा सहवास लाभलेल्या तेर नगरीला ऐतिहासिक व धार्मिक वारसा आहे. येथे अनेक प्राचीन मंदिरे असून पुरातत्वीय अवशेष सापडलेले आहेत. प्राचीन काळी तगर हे प्रमुख व्यापारी केंद्र होते. याशिवाय संत परंपरेत तेर नगरीला अनन्य साधारण महत्व आहे. येथे बौध्द, जैन, शैव, शाक्त, वैष्णव अशा सर्व धार्मिक संप्रदायाशी निगडीत वास्तु आढळून येतात. आजपर्यंत तेरचे विविध पुरातत्वज्ञ, संशोधक यांनी अन्वेषण / उत्खनन केले आहे. यात सर्वात प्रथम तेरची पाहणी कझिंन्स यांनी नोव्हेंबर 1901 मध्ये करून 1902-03 च्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या वार्षिक वृत्तांमध्ये सविस्तर माहिती प्रसिध्द करून प्राचीन तगर म्हणजेच आजचे तेर होय हे सिध्द केले. यानंतर खऱ्या अर्थाने जगभरातील संशोधकांची पाऊले तेरकडे वळली व आजदेखील यावर संशोधन सुरूच आहे. आजपर्यंत तेर या ठिकाणी 1958 ते 2015 पर्यंत ८ वेळा उत्खनन करण्यात आले आहे. आजपर्यंत उत्खनन व इतर पुराव्यांच्या आधारे तेरची प्राचीनता इ.स.पूर्व बरीच मागे नेता आली आहे. तेरला असलेली देवालये इ.स.चे 5/6 वे शतकापासून ते इ.स.चे 17/18वे शतक या काळापर्यंत दिसून येतात. प्राचीन कालखंडापासुन (इ.स.चे 5/6 वे शतकापासून) तेरवर शैव संप्रदायाचा प्रभाव उत्तरेश्वर, कालेश्वर मंदिर, त्रिपुरांन्तेश्वर, सिध्देश्वर यांसारख्या शिव मंदिरातून दिसतो. तोच प्रभाव चंद्रेश्वर, अमृतेश्वर, शिखरेश्वर यांसारख्या शिवमंदिरातून इ.स.चे 17/18वे शतकात असल्याचे दिसते. प्रस्तुत संशोधन विषयातून तेर येथील शिखर महादेव मंदिरावर पुरातत्वीय अभ्यास करण्यात आला आहे.


स्थान-

शिखर महादेव मंदिर हे महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद शहरापासून 25 की. मी. अंतरावर असणाऱ्या तेर या गावातील तेरणा नदीकाठी स्थित आहे.

रचना - या मंदिराची रचना उंच पीठावर गर्भ गर्भगृह व शिखर अशी दिसुन येते. पीठ

हे मंदिर 11.30 मीटर लांब व 6.20 मीटर रूंद आहे. याची उंची पुर्वेकडे 1.11 मीटर व पश्चिमेकडे 1.80 मीटर एवढी आहे. या पीठावर चढण्यासाठी पुर्व व पश्चिम अश्या दोन्ही बाजुस 7 पायऱ्या आहेत. या

पीठाच्या स्थापत्यामध्ये घडीव बेसाल्ट दगडांचा वापर करण्यात आला असून बांधकामाकरीता चुना व वाळू मिश्रणाचा वापर केला आहे. हे मंदिर तेरणा नदीपात्रालगत असून उंच पांढरीच्या टेकडीवर उभारण्यात आले आहे. यावरूण असे दिसते की मंदिराचा पाया भक्कम होण्यासाठी अश्या प्रकारच्या पीठाची रचना करण्यात आली आहे.



मंदिराचा ग्राउंड प्लॅन

गर्भगृह

या उंच पीठावर असणाऱ्या मंदिराचे आकारमान लांबी 4.30 मीटर व रूंदी 4.25 मीटर एवढी आहे. मंदिराच्या भोवती 1.00 मीटर रूंदीचा प्रदक्षिणापथ आहे. तसेच समोर 0.38 मीटरच्या छोटया पीठावर लांबी 49 से.मी. व रूंदी 28 से. मी. असणारा नंदी विराजमान आहे. मंदिराच्या गर्भगृहाचा भाग आतुन चौरसाकृती असून ते 2.55 मीटर आहे. गर्भगृहाच्या फरशीची पातळी पीठाच्या वरती 1.09 मीटर एवढी आहे. पीठावरूण गर्भगृहात प्रवेश करण्यासाठी पुर्वेस 1.4 मीटर उंच व 0.65 मीटर रूंद प्रवेशद्वार आहे. हे प्रवेशव्दार अत्यंत या प्रवेशद्वारावर किर्तीमुख असून त्यावर मराठा कालखंडाचा प्रभाव दिसून येतो. यास पिळदार मिश्या दाखविण्यात आल्या असून कानात चक्राकार कर्णभुषण आहेत. ललाटबिंबावर गणेशाची प्रतिमा दिसून येते. त्यावर मराठेकालीन स्थापत्याचा प्रभाव दिसुन येतो. या गर्भगृहाच्या स्थापत्यामध्ये घडीव बेसाल्ट दगडांचा वापर करण्यात आला असून बांधकामाकरीता चुना व वाळू मिश्रणाचा वापर केला आहे.

शिवलिंग

:- गर्भ् गृहात असणारे शिवलिंग हे चौरसाकृती असून त्याची लांबी 1.08 मीटर व रूंदी 0.69 मीटर तर 0.84 मीटर उंच आहे. तेर या गावात आढळुन येणारी बहुतांश शिवलिंग ही आकाराने चौकोणी असल्याचे दिसते. यामध्ये प्रामुख्याने उत्त्रेश्वर मंदिर (इ.स.6 वे शतक), कालेश्व्रर मंदिर (इ.स. 6 वे शतक), सिध्देश्व्रर

मंदिर (इ.स. 13 वे शतक) यांचा समावेश होतो. तेर या गावात आजमितीस अस्तित्वात असणारी एकुण शिवमंदिरे यातुन इसवी सनाच्या 5 व्या ते 6 व्या शतकापासून तेरवरील शैव संप्रदायाचा प्रभाव ठळकपणे दिसून येतो.



शिवलिंग

गणेश मुर्ती

:- गर्भगृहात मागील बाजूस चौकोणी देवकोष्टात एक गणपतीची मुर्ती असून त्याची लांबी 58 से.मी. व रूंदी 40 से. मीटर आहे. ती स्थानक, चतुर्भुज आहे. या मुर्तीच्या हाततील आयुधे व इतर वैशिष्टये मुर्तीस अधिक शेंदुर लावल्याने दिसुन येत नाहीत.

शिखर

:- या मंदिराचे शिखर हेच या मंदिराची प्रमुख ओळख असल्याचे दिसून येते. या मंदिराचे शिखर हे 7.00 मीटर उंचीचे आहे. शिखरापर्यंतचा भाग हा दगडात असून शिखर हे विटांमध्ये बांधले आहे. या उंच शिखरावर सर्व बाजुस देवकोष्टात विविध देवतांच्या मुर्ती आहेत. या सर्व कामावर चुन्याचा गिलावा देण्यात आला आहे. या मंदिराची शिखर रचना ही मराठा कालखंडातील (इ.स.18 वे शतक) प्रामुख्याने उत्त्र मराठा कालखंडातील असल्याचे दिसून येते.

या शिखराची रचना पुढीलप्रमाणे दिसून येते. प्रत्येक दिशेला उलटया U आकाराचे नक्षीकाम असून वरील चार कोपऱ्यात चार मिनार असुन एक मिनार नामशेष् झाला आहे. प्रत्येक मिनाराच्या दोन्ही बाजुस 2 अश्या एकुण 8 प्राण्यांच्या प्रतिमा असल्याचे दिसून येते. सद्यस्थितीत त्या अवशेष स्व्रूपाने दिसतात. हे शिखर तीन टप्प्यात असुन पहील्या टप्प्यात चारी दिशांना चार आयताकार मुख्य देवकोष्टात पुर्व बाजुस महिषासुरमर्दिनी, पश्चिम बाजुस शिवपार्वती आसनस्थ् ,दक्षिण व उत्तर बाजुस जीर्ण झाल्यामुळे ओळख पटत नाही. तर उर्वरीत 24 देवकोष्टात विविध देवता दिसून येतात. यावरती उलटया U आकाराचे नक्षीकाम असून त्यावर छोटी आमलकाकृती एकुण 16 कलश दिसुन येतात. दुसऱ्या टप्प्यात पहील्या

 ISSN 2231 4342

टप्प्याचीच छोटी प्रतिकृती दिसुन येते. 28 देवकोष्टात विविध देवता असुण यातील 12 देवकोष्टांची रचना 6 महीरपी असल्याचे दिसुण येते. यावरती छोटी आमलकाकृती एकुण 16 कलश दिसुन येतात. यातील काही कलश नामशेष झाली आहेत. तिसऱ्या टप्प्यातही पहील्या टप्प्याचीच छोटी प्रतिकृती दिसुन येते. यात 28 देवकोष्टात विविध देवता असुण यावरती मध्यम आकाराची आमलकाकृती एकुण 8 कलश दिसुन येतात. सर्वात वरती आमलकाकृती मुख्य् कलश शिखर आहे. सद्यस्थितीत या मंदिराची मोठया प्रमाणात क्षती झाली आहे. गर्भगृहाचा काही भागात तडे गेले असून शिखरावर काही झाडे आल्याने तथा कालानुरुप बरीच झीज झाली आहे.



शिखर महादेव मंदिर पुर्व बाजु

तेर या ठीकाणी स्थित असणाऱ्या या मंदिराची शिखर हिच प्रमुख ओळख असल्याने तसेच या मंदिराचे शिखर तेर नगरीच्या बहुतांश् भागातुन अगदी सहजपणे नजरेस पडत असल्यामुळेच या मंदिरास शिखरेश्वर, तुंगेश्वर या नावाने स्थानिक लोक ओळखतात. ज्या भागात हे मंदिर स्थित आहे त्या भागास शिखर गल्ली हे नाव रूढ झाल्याचे दिसून येते.

ISSN 2231 4342


निष्कर्ष :-

या शिखर रचनेची साम्यता असणारी मंदिरे महाराष्ट्रात इ.स.18 वे शतक कालखंडात पुणे, सातारा व इतर भागात मंदिरे दिसुन येतात. अशी मंदिरे इ.स.18 वे शतक या कालखंडात दिसुण येतात. या कालखंडातील शिखर रचना यावर द्राविडीयन शैलीचा प्रभाव असल्याचे स्थापत्य रचना यातून दिसते. या संशोधन विषयाकरीता निवडण्यात आलेले शिखर महादेव मंदिर हे इ.स.18 वे शतक प्रामुख्याने उत्त्र मराठा कालखंडात बांधण्यात आल्याचे स्थापत्य शैलीवरुण दिसते. इसवी सनाच्या पुर्वीपासून तेरवर विविध कालखंडात वेगवेगळया संप्रदायाचा प्रभाव लिखित साधने, उत्खानित साधने तथा या परीसरात स्थित असणाऱ्या तत्कालीन कालखंडातील वास्तु तथा यातुन अधोरेखित होतो. यामध्ये बौध्द, जैन, शैव, शाक्त्, वैष्णव, गाणपत्य्, वारकरी यांचा प्रभाव दिसुण येतो. त्यामुळेच मोरवंचीकर यांनी सुवर्णनगरी तेर या पुस्तकाच्या प्रस्तावनेत "पैठण ही दक्षिणेची काशी असली तरी तेर ही महाराष्ट्राची मथुरा होय" असे केलेले विधान केले असावे. प्राचीन कालखंडापासुन (इ.स.चे 5/6 वे शतकापासून) तेरवर शैव संप्रदायाचा प्रभाव उत्त्रेश्वर मंदिर (इ.स.6 वे शतक), कालेश्व्रर मंदिर (इ.स. 6 वे शतक), त्रिपुरांन्तेश्वर (इ.स. 12 वे शतक), सिध्देश्व्रर मंदिर, (इ.स. 13 वे शतक) यांसारख्या शिव मंदिरातून दिसतो. तोच प्रभाव चंद्रेश्व्र महादेव मंदिर, अतृतेश्व्र महादेव मंदिर, शिखर महादेव मंदिर यांसारख्या शिवमंदिरातून इ.स.चे 17/18 वे शतकात असल्याचे दिसते.



शिखर महादेव मंदिर मागील बाजु

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342



मंदिराचा प्लॅन

संदर्भ :-

1) देव. शां. भा.(प्रकाशन वर्ष दिले नाही.) - तेर -
पुरातत्व्ा व वस्तुसंग्रहालये संचालनालय,महाराष्ट्र राज्य्, मुंबई. (प्रकाशन वर्ष दिले नाही.)
2) प्रा.सौ. सुलभा जामवाडीकर - सुवर्णनगरी तेर -
श्रीलक्ष्मी प्रकाशन, औरंगाबाद. (प्रकाशन वर्ष दिले नाही.)
3) डॉ. माया पाटील (शहापूरकर)-मंदिर - शिल्पे मराठवाडयातील काही शिल्पे आणि मंदिरस्थापत्य) - ग्रंथाली प्रकाशन, मुंबई (16 एप्रिल 2014)
4) AVINASH SOWANI - MARATHA ARCHITECTURE (During A.D.1650 and A.D. 1818) PHD Thesis.
5) मंदिराचे प्लॅन वास्तुविशारद श्री स्मिता कासार पाटील, नाशिक यांनी बनविले आहेत.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

छत्रपती शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन

प्रा. दिनेश आर. कचकुरे
श्री संत सावता माळी ग्रामीण
महाविद्यालय, फुलंब्री
मो. 9595274042
Email – dineshkachkure@gmail.com

जल हे सर्वकालीन मानवी संस्कृतीच्या समृद्धीचा पाया आहे. कारण नद्यांच्या काठावरच पाण्याच्या सानिध्यात प्राचीन मानवी संस्कृतीचा उदय झालेला दिसतो. प्राचीन काळापासून ते आजतागायत प्रतिकूल पर्यावरणाचा, दुष्काळी आपत्तीचा मानवी संस्कृतीला आणि राजसत्तांना तडाखा बसलेला आहे. त्यामुळे पाण्याच्या उपलब्धतेवर आणि पाण्याच्या संवर्धनावर तत्कालीन राजसत्तांनी भर दिला. भारतात प्रामुख्याने मौर्य काळापासून ते सातवाहन, गुप्त, राष्ट्रकुट, चालुक्य, यादव विजयनगर अशा राजवटीत जलसंवर्धनाचे कार्य झाले. या राजवटीनी राबविलेली जलव्यवस्थापनाची हीच परंपरा 17 व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी पुढे चालवली. स्वराज्यरूपी यशाची उंच शिखरे गाठायची असतील तर निसर्गाचे, पर्यावरणाचे पाठबळ हवे, हे शिवरायांनी ओळखले होते. म्हणूनच सह्याद्री पर्वत व त्याच्या विस्तीर्ण डोंगररांगा, घनदाट अरण्ये, दुर्गम दऱ्याखोऱ्या, अथांग सिंधू सागर अशा पर्यावरणीय परिस्थितीच्या आधारावर सुलतानी संकटावर मात करून शिवरायांनी रयतेच्या स्वराज्याचा पाया घातला. अशा स्वराज्याअंतर्गत दुष्काळासारख्या अस्मानी संकटावर मात करण्यासाठी तसेच शेती सिंचनासाठी शिवरायांनी दूरदर्शी व नाविन्यपूर्ण अशा जलव्यवस्थापन धोरणाची अंमलबजावणी केली.

शिवरायांच्या गडकिल्ल्यावरील जलव्यवस्थापनाचे रामचंद्रपंत अमात्य यांच्या अज्ञापत्रात बरचसे दाखले मिळतात. सह्याद्रीवरील गडकोट हे मराठेशाहीचे आधारस्तंभ होते. मराठेशाहीच्या उदय आणि विकासात सह्याद्री आणि त्यावरील अभेद्य आणि दुर्गम गडकोटांनी शिवरायांना निडरपणे साथ दिली. स्वराज्याच्या संपूर्ण राज्यकारभार गडावरूनच पहिला जात होता. त्यामुळे गडावर लोकांचा मोठ्या प्रमाणात राबता असे. मग अशावेळी गडाचे व्यवस्थापण करत असताना तेथे पाण्याची सोय पहावी लागत असे. रामचंद्रपंत अमात्य यांच्या अज्ञापत्रात शिवराय गडांच्या बांधकामासंबधी आज्ञा करतात की, “ गडावर आधी उदक पाहूनच किल्ला बांधावा.”[1] म्हणजेच शिवकाळात ज्या डोंगरावर पाणी आहे त्याच ठिकाणी किल्ल्याचे बांधकाम केले जात असे. पाण्याविना एखाद्या ठिकाणी दुर्ग बांधण्यात काहीच अर्थ नव्हता. पोर्तुगीजांनी खांदेरी बेटावर तटबंदी करण्याचा प्रयत्न केला होता, पण पाणी लागेना म्हणून प्रयत्न सोडून दिला. पुढे शिवरायांनी खांदेरी बेटाचे सुक्ष्म निरीक्षण केले तेव्हा पाण्याची सोय होण्याची शक्यता पाहून बेटावर दुर्ग बांधण्याची आज्ञा केली.[2] याशिवाय भरतगडाची पाहणी

 ISSN 2231 4342

केली असता तेथे पाण्याची सोय होणार नाही म्हणून त्या ठिकाणी किल्ला बांधणे रहित केले.[3] म्हणजेच पाण्याची उपलब्धता पाहूनच गडकोट बांधायला घेतला जात असे.

गडाचे बांधकाम झाल्यावर तेथे राहणाऱ्या लोकांसाठी पाणी उपलब्ध व्हावे म्हणून पाणी साठवणुकीला शिवरायांनी प्राधान्य दिले. आज्ञापत्रात उल्लेख येतो " पाणी नाही आणि ते स्थळ तो आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी खडक फोडून तळी, टाकी, पर्जन्यकाळापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरेल अशी मजबूत बांधावी."[4] अशाप्रकारे शिवरायांनी गडावरच पाण्याच्या साठवणुकीला प्राधान्य दिले. पावसाचे पाणी जमिनीपासून हजारो फुट उंचावर असणाऱ्या गडावर वाहून नेण्याची तत्काळात कोणतीही व्यवस्था नव्हती. म्हणून पावसाचे पाणी गडावरच साठविण्यासाठी खडकात तलाव, टाकी, हौद खोदून त्याद्वारे गडाची पाण्याची गरज पूर्ण करण्यावर भर दिला. सह्याद्रीच्या बेसाल्ट खडकाने शिवकाळातील गडकिल्ल्यावरील जलव्यवस्थापन प्रभावित झालेले दिसते. कारण बेसाल्टच्या विशिष्ट भौगोलीक विशेषतामुळे गडकिल्ल्यावर तलाव, टाकी बांधून त्यात पाणी साठविणे शक्य झाले. विशेष म्हणजे तत्काळात जलाभेद्य खडकाचे थर आणि पाझरणारे खडक यांच्या साह्याने पाणीसाठा करता येऊ शकतो, हे शिवरायांच्या लक्षात आल्याने त्यानी हरहुन्नरी पाथरवट लोकांकडून गडावर खाणी, हौद, खोल खड्डे निर्माण करून पाणी सतत पाझरत राहील याची व्यवस्था केली. यामुळे शिवनिर्मित प्रत्येक किल्ल्यावर वर्षभर पुरेल व प्रसंगी गडावर हल्ला झाला तर आणीबाणीच्या काळातही आवश्यक तो पाणीसाठा कसा राहील याची काळजी शिवरायांनी घेतलेली दिसते.

राजगडावरील पद्मावती तलाव, राणीवसा तलाव, चंद्रकोर तलाव, रायगडावरील गंगासागर तलाव, कुशावर्त तलाव, कोळींब तलाव, हनुमान टाके, बाराटाके, सिंहगडावरील देवटाके, प्रतापगडावरील भवानी तलाव, पुरंदरवरील राजाळे तलाव, पन्हाळगडावरील सोमाळे तलाव ही सर्व आजही अस्तित्वात असणारी जलस्थाने शिवरायांच्या जलव्यवस्थापन धोरणाची साक्ष देतात. चार महिने पडलेल्या पावसाचे पाणी या तलावात साठवून ते बारा महिने पुरविले जात असे. या पाण्याची नासाडी होऊ नये, पाणी खर्च होऊ नये म्हणून शिवराय रयतेला 'गडाचे पाणी बहुत जतन राखावे' अशी आज्ञा करून पाणी बचतीचा संदेश देतात. या बहुमोल संदेशाच्या अंमलबजावणीची आजच्या काळात नितांत आवश्यकता आहे.

1673 मध्ये इस्ट इंडिया कंपनीचा वकील टोमस निकल्स रायगडावर आला होता. त्याने केलेल्या रायगडच्या वर्णनात तो म्हणतो, "गडावर पाण्याकरिता खडकात खोदलेले मोठे तलाव असून ते पावसाळ्यात भरल्यावर पाणी वर्षभर पुरून उरेल इतके होते."[5] दक्षिण दिग्विजयावेळी शिवाजी महाराजांनी जुने किल्ले पाडून नव्याने दुर्ग बांधले, याचे वर्णन करताना जेस्वीट हा अधिकारी 1677 मध्ये आपल्या वृत्तांतात म्हणतो, "पाश्चात्यांच्या पद्धतीचा अवलंब करून शिवरायाने मोठे खडक फोडले आणि तलाव बनविले."[6] याशिवाय कवी भूषण च्या श्रीशिवराज भूषण या काव्य ग्रंथात रायगडचे वर्णन करताना तेथे विहिरी, सरोवरे, कूप विराजत आहे, असा उल्लेख आहे.[7] रायगडावरील जगदीश्वर मंदिराच्या भिंतीवर कोरलेल्या शिलालेखात वापी, कूप, तडाग असा उल्लेख गडावरील खोदलेल्या तलाव टाकी विहिरी या अनुषंगानेच आहे. अशाप्रकारे शिवरायांनी गडावर पाणी साठवण्यासाठी तलाव टाकी हौद विहिरी खोदून केलेल्या जलव्यवस्थापनाची दाखल टोमस निकल्स, जेस्वीट,

 ISSN 2231 4342

कवी भूषण यांनी घेतली आहे. किल्ल्यांच्या संरक्षणासाठी पाण्याचे महत्व शिवरायांनी ओळखले होते. त्यामुळे गगनबावडा दप्तरात आलेल्या नोंदीनुसार 1671 – 72 मध्ये शिवरायांनी रायगडावरील घरे व तलाव यांच्या बांधकामासाठी व दुरुस्तीसाठी 35 हजार होनांची तरतूद केली होती.[8] शिवाजी महाराज जलसंवर्धनाबद्दल किती संवेदनशील व जागरूक होते हे यावरून स्पष्ट होते. आज पाण्याप्रती अशाच संवेदनशीलतेने व जागरूकतेने शासनाने आणि सुजाण नागरिकांनी जलसंवर्धनाचे कार्य केले तरच भावी पिढीसाठी पाण्याचा वारसा टिकून राहू शकतो.

शिवरायांनी फक्त गिरीदुर्गावरच नव्हे तर जलदुर्गावरही गोड्या पाण्याच्या उपलब्धतेकडे लक्ष दिले. सिंधू सागरात किल्ला बांधताना टणक खडकाचा शोध घेणे, भरती ओहोटीची शक्यता पाहणे, सर्वात महत्वाचे म्हणजे जलदुर्गावर राहणाऱ्या लोकांसाठी गोड्या पाण्याचा साठा करणे या सर्व भौगोलिक बाबींचा अभ्यास शिवरायांनी केलेला होता. त्यामुळेच सिंधुदुर्ग किल्ल्यावर दुधबाव, दहीबाव, साखरबाव या नावाच्या तीन गोड्या पाण्याच्या विहिरी, गोड्या पाण्यासाठी निर्माण केलेल्या पद्मदुर्गावरील चार टाकी तसेच विजयदुर्गावरील सात विहिरी आपणास आजही पाहता येतात. अरबी समुद्राच्या खाऱ्या पाण्यात असलेल्या जलदुर्गावर गोड्या पाण्याची व्यवस्था करण्याचे अद्वितीय कार्य शिवरायांनी केले.

शिवरायांनी गिरिदुर्ग व जलदुर्गाप्रमाणेच स्वराज्यातील गडाखालील मैदानी मुलुखातही दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी तसेच शेती सिंचनासाठी जलव्यवस्थापन केले. त्याअंतर्गत धरणे बांधणे, विहिरी खोदणे, लघु व मध्यम पाटबंधाऱ्याची निर्मिती करणे यावर भर देण्यात आला. 1653 च्या पत्रात आलेल्या नोंदीनुसार शिवरायांनी खेड शिवापूर येथे आंब्याची बाग लावण्याकरीता धरणाचे काम सुरु केले होते.[9] म्हणजेच शिवरायांचे प्रथम वास्तव्यस्थान असलेले शिवापूर येथून वाहणाऱ्या शिवगंगा नदीवर 1653 – 55 या काळात धारण बांधून महाराजांनी शेती सिंचनासाठी व रयतेसाठी पाण्याची तजवीज केली होती. आज मात्र शिवापूर गावी या धरणाचे अवशेष आढळून येत नाहीत. पुणे जहागिरीतील कोंडवे गावी असेच धरणाचे काम सुरु केले असता धरणाचे पाणी मोठ्या धोंड्यामुळे अडून राहिले होते. तेव्हा तेथे हजर असणाऱ्या कोंडवेकर येस पाटलानी महाराजांच्या आज्ञेवरून तो धोंडा फोडून धरणाचे पाणी सुरळीतपणे बाहेर जाण्याची वाट मोकळी करून दिली. या कामाबद्दल शिवरायांनी कोंडवेकर पाटलास गावाची मोकादमी देऊ केली.[10] म्हणजेच धरणाच्या कामास उत्तेजन मिळावे म्हणून इनाम म्हणून जमिनीसोबत गावाची पाटीलकी सुद्धा दिलेली दिसते.

शिवाजी महाराजांनी स्वराज्यात तलाव, धरण, कालवे प्रमाणे विहिरी खोदण्यासही पुढाकार घेतला. त्यानी रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड गावी मासाहेब जिजाऊंच्या वाड्यात पाणीपुरवठ्यासाठी विहीर बांधून घेतली होती. या विहिरीच्या काठावर एक लहानसा चिरेबंदी ओटा बांधून तेथे टेकून बसायला एक सुबक तक्काही बांधलेला होता. त्यामुळे या विहिरीला तक्क्याची विहीर असे म्हटले जाते. पाचाडच्या सर्व गावकऱ्यांना पाणी वापरायला ही विहीर मुक्त होती. आलमगीर औरंगजेबाचा दरबारी इतिहासकार **खाफीखानने** आपल्या **'मुंतखबुल्लुबाब'** या फारसी ग्रंथात या विहिरीचे आणि शिवरायांच्या नैतिकतेचे वर्णन केले आहे. तो म्हणतो " रायगडाला लागूनच शिवाजीने एक वाडा बांधला होता. उन्हाळ्यात पाण्याची टंचाई भासे म्हणून शिवाजीने

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

वाड्याला लागून विहीर बांधली होती. विहिरीजवळ दगडाची बैठक होती. तेथे शिवाजी बसत असे. पाणी भरायला येणाऱ्या स्त्रीयांशी आस्थेवाईकपणे चौकशी करत असत. त्यांच्या मुलांना फळे देत. आपण आपल्या आईशी किवा बहिणीशी बोलतो तसे ते त्या स्त्रीयांशी बोलत."[11] शत्रूच्या लेखकाने केलेल्या या वर्णनावरून शिवरायांच्या जलनीतीबरोबरच त्यांचा स्त्रीयांविषयी उदार व वात्सल्यपूर्ण दृष्टीकोनही स्पष्ट होतो.

अशाप्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांनी अतिशय दूरदृष्टीपणे स्वराज्याच्या गिरीदुर्गावर व जलदुर्गावर आणि गडाखालील प्रदेशात आबदारखाने (जलस्थान) निर्माण करून स्वराज्याचा पाणीप्रश्न सोडविला. **'नागरेची रचावी जलाशये निर्मावी'** या संत ज्ञानेश्वराच्या ओवीचे शिवरायांनी आपल्या जीवनात प्रत्यक्ष आचरण केले. या दूरदर्शी व अभूतपूर्व जलव्यवस्थापन धोरणामुळे शिवरायांना स्वराज्यात सुलतानी संकटाबरोबरच अस्मानी संकटावर मात करता आली. आज उन्हाळ्यात गडकोटाच्या आसपास राहणारे लोक जलस्त्रोत आटले म्हणून पाण्यासाठी रानोमाळ फिरत असताना गडावरील तलाव, टाक्यात पाणी अस्तित्वात आहे. त्याचा वापर पायथ्याच्या गावांना सायफन पद्धतीने पाणी पुरवून केला जातो, हे शिवरायांच्या दूरदृष्टीचेच द्योतक आहे. त्यामुळे शिवराय हे तत्काळातले अत्युच्च कोटीचे जलतज्ञ, पर्यावरणतज्ञ, आपत्ती व्यवस्थापक होते, हे सिद्ध होते.

निष्कर्ष :

1. शिवछत्रपतींनी दुष्काळासारख्या अस्मानी संकटावर मात करण्यासाठी तसेच शेती सिंचनासाठी दूरदर्शी व नाविन्यपूर्ण अशा जलव्यवस्थापन धोरणाची अंमलबजावणी केली.
2. शिवरायांनी मराठेशाहीतील गडकिल्ल्यावर तलाव, टाकी, हौद, खाणी निर्माण करवून त्यात पाणी सतत पाझरत राहील याची व्यवस्था केली होती. आधुनिक काळात वापरात असलेल्या 'पाणी आडवा पाणी जिरवा' आणि 'जल पुनर्भरण' या पद्धतींचा अवलंब शिवरायांनी 370 वर्षापूर्वीच गडकिल्ल्यावर केला होता.
3. शिवनिर्मित प्रत्येक गडावर आबदारखाने निर्माण करून महाराजांनी गडावरील शिबंदीसाठी वर्षभर पुरेल आणि संकट काळात आवश्यक तो पाणीसाठा करण्यावर भर दिला.
4. जलसंधारण हा दुष्काळावरील कायमस्वरूपी उपाय असल्याने शिवरायांनी खेड शिवापूर आणि कोंडवे या गावी धरणे बांधून घेतली होती.
5. जलसंधारणाच्या कामात लोकसहभाग महत्वाचा मानला जात होता. कालवे खोदणे, धरण बांधणे यासाठी रयतेला प्रोत्साहन मिळावे म्हणून मोकादमी व जमिनी इनाम म्हणून दिल्या जात होत्या.
6. महाराजांनी पाचाडच्या वाड्यात बांधून घेतलेली तक्क्याची विहीर 'एक गाव एक पाणवठा' या नीतीचा प्रत्यय देणारी आहे.
7. शिवछत्रपतींनी मराठेशाहीत राबविलेले जलव्यवसथापन धोरण हे युगानुकूल आणि सद्यकाळात प्रासंगिक ठरते.

 ISSN 2231 4342

8. जलव्यवस्थापन, जलसंवर्धन, जलसंधारण ही आधुनिक काळाची गरज बनली आहे. या पाण्याच्या वारशाचे जतन व संवर्धन करून हा वारसा पुढील पिढीला हस्तांतरित करणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य ठरते.

संदर्भ :

1. ढेरे रामचंद्र चिंतामण (संपा), रामचंद्रपंत अमात्य प्रणीत स्वराज्यनीती आज्ञापत्र, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 2005, पृष्ठ 101.
2. बेंद्रे वा.सी., गड – कोट – दुर्ग आणि त्याची वास्तू, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, 1965, पृष्ठ 60.
3. कित्ता , पृष्ठ 61.
4. कित्ता, ढेरे रामचंद्र चिंतामण (संपा), पृष्ठ 101.
5. नरसिह चिंतामण केळकर आणि दत्तात्रय विष्णू आपटे (प्रका.), शिवकालीन पत्रसारसंग्रह (खंड 2), श्रीशिवचरित्र कार्यालय, पुणे, 1930, पत्र क्र. 1920.
6. Sen Surendra Nath (Edi.), Foreign Biographics of Shivaji (voll. 2), Kegan Paul, Londan, Pg. 413.
7. तिवारी दु. आ. (अनु.), भूषण कविकृत शिवराजभूषण, श्रीकृष्ण प्रेस, जळगाव, 1931, पृष्ठ 10.
8. राजवाडे वि. का. (संशो), मराठ्यांच्या इतिहासाची साधने (खंड 8), राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, 2002, लेखांक 22.
9. कित्ता, शिवकालीन पत्रसारसंग्रह (खंड 1), पत्र क्र. 657.
10. पोतदार दत्तो वामन आणि मुजुमदार गंगाधरराव (प्रका.), शिवचरित्र साहित्य (खंड 2), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, 1930, पृष्ठ 141.
11. खरे ग. ह. (संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह (खंड 3), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, 1941, पृष्ठ 91.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

अकोला जिल्हयातील ब्राम्हणेतर व सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते

डॉ. श्याम प्रकाश देवकर
पत्ता - गोपाळ नगर, हनुमान मंदिरजवळ,
खामगाव, जि. बुलडाणा. पिन 444303
मो. 9518345097 , 9552715291
shyam.deokar11983@gmail.com

आधुनिक भारतातील पुनर्जागरणाच्या चळवळीचे प्रवर्तक, भारतातील विवेकवादाचे जनक, पहिले समाजक्रांतीदूत, भारतातील सामाजिक लोकशाहिचा पाया घालणारे जोतीराव गोविंदराव फुले यांनी या मातीतल्या सर्व क्षेत्रातील अन्याय्य व्यवस्थेविरुध्द पुकारलेला एल्गार हीच खरी भारतीय लोकशाहीची पायाभरणी होती. महात्मा जोतीराव फुल्यांचा भारतीय वस्तूनिष्ठतावादाच्या क्षितिजावरिल उदय हा भारताचा खरा भाग्योदय होता. या प्रज्ञासूर्याने स्वयंप्रकाशीत होऊन अज्ञानाच्या तिमिराला जनसामान्यांच्या जिवनातून कायमचेच बाद केले व विवेकवादाच्या लख्ख प्रकाशात या अज्ञजनांना न्हाऊन काढले. ज्ञानसाधनेच्या बळावर भारतीय परिप्रेक्षामध्ये असलेल्या अश्लील, कूरतम, बिभत्स, हिन व अमानवी प्रथा परंपरांवर त्यांनी कठोर आसूड ओढले. नव्हे त्या प्रथा परंपरांच्या अन्याय्य शोषणाधारित डोलाऱ्याच्या पायाचे चीरे कायमचेच खिळखिळे केले. धर्म संस्कृतीच्या नावावर सुरु असलेल्या या बिभत्स अमानवी प्रथा परंपरेच्या पालखीचे भोई बनलेल्या सामान्य अज्ञजनांच्या वेदना त्यांनी जगासमोर मांडल्या. त्या वेदना हया गुलामगीरीच्या प्रथेपेक्षाही नीचतम पातळी गाठलेल्या असल्याचे दिसून येते. कारण किमान गुलामाची गुलामगीरी ही जन्माआधारित निश्चीत नव्हती याउलट भारतीय परिप्रेक्षातील लादलेल्या अपात्रता हया जन्माधारित होत्या व आहे शिवाय त्याला धर्माचे संरक्षण आहे. ज्याकारणाने शोषीत समूहाला सुध्दा ते धर्मकर्तव्य वाटते व चुकून एखाद्याच्या मनात दया वा सहानुभूती निर्माण झालीच तर आपण का म्हणून धर्मनियमांच्या आड यावे. जे विधीलिखित आहे ते टाळता येणार नाही. धर्मग्रंथ हे ईश्वर निर्मित आहे हा सिध्दांत अज्ञजनांच्या मनाच्या गाभाऱ्यात खोलवर कोरण्यात आल्यामुळे अपात्रता लादलेल्या समूहाने निमूटपणे ते मान्य करावे. काकतालिय योगायोग व सहज मानवी अपपवृत्तीचे एखादे जरी उदाहरण शोषीत समूहात आढळल्यास धर्मग्रंथाने लादलेल्या त्या विशिष्ट समूहावरिल अपात्रता कशा बरोबर आहेत याची भलामण करताना अनेक सडके मेंदू दिसून येतात. या सर्व आव्हानापलिकडे मानण्यात आलेल्या सिध्दांत व तत्वज्ञानाला आधुनिक काळातील पहिले आव्हान दिले ते महात्मा फुले यांनीच. थेट चार्वाक व तथागत गौतम बुध्दापासून ही परंपरा जोतीराव गोविंदराव फुले सारख्या पवित्र विचाराच्या महात्म्यापर्यंत येऊन पोहोचते. सत्याची आराधना व सत्याचा आग्रह व त्यासाठी समर्पणच नव्हे तर संघर्ष करून स्वत्वाला पणाला लावणारा महात्मा खरेच विरळाच. नुसते आव्हान देवून ते थांबले नाहीत तर त्यांनी त्याला संस्थात्मक चौकट दिली. सत्याचा निरंतर शोध घेऊन त्यासाठी संघर्ष करणाऱ्याचे संगठन म्हणजेच

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

सत्यशोधक समाज होय. या सत्यशोधक समाजाची स्थापणा पुण्यात 24 सप्टेंबर 1873 ला सायंकाळी बाणेकरांच्या तालमीच्या दक्षिण बाजुच्या चौकातील नाईकांच्या दुमजली घर क्रमांक 527 मध्ये जोतीरावांच्या मुशी विकण्याच्या दुकानात जुनागंजेत झाली. या पहिल्या सभेला महाराष्ट्रभरातून साठ लोक उपस्थित होते. या लोकांनी तळीभंडार उचलून त्याची सुरूवात केली. लवकरच महाराष्ट्रभरातून सत्यशोधक समाजाच्या अनेक शाखा सुरू झाल्या. मुंबई, ठाणे, भिल्लार, भांबुर्डे, हवेली, हडपसर, घोरपडी, वानवडी, नेऊरगाव, सासवड, खेड इ. ठिकाणी या शाखा सुरू झाल्या.[1] या तत्वज्ञानाच्या मुळाशी असणाऱ्या वर्णसंघर्ष व वर्गसंघर्षाची प्रेरणा घेऊन सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते लढत राहिले. समता प्रस्थापित करण्यासाठीचा हा संघर्ष न्यायाच्या भूमिकेतून व विवेकाच्या आव्हानातून करण्यात येत होता. जागतिक पातळिवर असा समता, न्याय व विवके आधारित संघर्ष प्रकशझोतात येत राहिला परंतू भारतातील हि न्यायाची चळवळ पाहिजे त्या प्रमाणात भारतात व जागतिक स्तरावर प्रकाशझोतात आली नाहि कारणही तसेच आहे, बंदिस्त वर्ग हि संकल्पना जी आमच्या समाजात आहे ती जगातही कोठेच नाहि व धर्मआधारित संरक्षण व जनमान्यता सुध्दा अश्या अनैतिक व अन्यायी व्यवस्थेला इतरत्र कोठेच नाही. तसेच हा एल्गार आर्थिक, धार्मिक, सामाजिक व राजकिय प्रस्थापित, सुसंपन्न व संगठित वर्गाविरूध्द असल्याने या व्यवस्थेविरूध्द झालेला सत्यशोधक समाजरूपी एल्गार प्रसिध्दिस येईल कसा? व त्याची दखल घेईल कोण? वास्तविक पाहिले असता मार्क्सने सांगितलेले विद्रोहाचे व समतेचे तत्वज्ञान त्याच्या आधी या आमच्या मातीतील म. फुले सारख्या महान नेत्याने मांडले असताना या मातीला व देशाला वेगळया मार्क्सच्या तत्वज्ञानाची गरजच नाहि. त्यामुळे आपणासाठी म. फुले भारताचे मार्क्सपूर्व मार्क्सच आहेत. फुल्यांच्या जिवनकाळातच त्यांनी स्थापन केलेली सत्यशोधक चळवळ वऱ्हाडाच्या मातीत पोहोचली होती. कारण बुलडाण्याचे बापूजी हरि शिंदे व रामचंद्र हरि शिंदे हे सुरूवातीपासूनच या चळवळीशी निगडित होते.[2] तत्कालिन मलकापूर तालुक्यात जिगावला नारायण मेघाजी लोखंडे यांनी तायडे नामक व्यक्तीच्या येथे दीर्घकालीन वास्तव्य करुन ही चळवळ वऱ्हाडात रुजवली. 1886 ला नारायण मेघाजी लोखंडे यांनी सत्यशोधक समाजाची शाखा जिगावला सुरु केली होती. ओतूर जिल्हा पुणे येथून शास्त्री नारोजी महाघट व शास्त्री धर्माजी रामजी डुंबरे यांनी 1901 साली वाडेगाव जि अकोला येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. त्यानंतर वाडेगाव हे चळवळीचे केंद्र बनले होते. राजंदयाचा राजंदेकर सत्यशोधक जलसा मोठा प्रसिध्द होता. वऱ्हाडात यादरम्यान करजगाव जि अचलपूर (आजचा जिल्हा अमरावती), बेलूरा जि अमरावती, नायगाव ता चांदूर जि अमरावती, वडगाव ता आर्वी जि वर्धा, नायगाव ता.जि. यवतमाळ, पातूर शेखबाबू जि अकोला, कसबे वाडेगाव याठिकाणी सत्यशोधक समाजाच्या शाखा सुरु झाल्या होत्या.[3]

या चळवळीतील कार्यकर्त्यांना सभासदत्व ग्रहण करण्याआधी अशी शपथ घ्यावी लागे की,

”आम्ही सारी एका परमेश्वराची लेकरे आहोत व आम्ही एकमेकांची भावंडेच आहोत असे मी सर्वांशी वर्तन करेन. पूजा अगर ध्यान करताना वा धार्मिक विधी करताना मी मध्यस्थ ठेवणार नाही व तसे इतरांनाहि प्रेरित

 ISSN 2231 4342

करेन. मी नेहमी राजनिष्ठेचे पालन करेन. माझ्या अपत्यांना मी सुशिक्षित करेन. सत्यस्वरूप ईश्वरास साक्ष मानून मी हि प्रतिज्ञा करत आहे. " [4]

सत्यशोधक चळवळीचे शाहू महाराजांचे काळात राजकीय क्षेत्रात आगमन झाले व विचारांनी ब्राम्हणेतर चळवळ व ब्राम्हणेतर पक्षाचे स्वरुपात आकार घेतला. या विचारांचे अनुयायी वऱ्हाडात मोठया प्रमाणात तयार झाले. अकोल्यात ब्राम्हणेतर व सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून अनेक परिषदांचे आयोजन करण्यात आले. कार्यकर्त्यांची मोठी फौज या काळात निर्माण झाली होती. अनेक सक्रिय कार्यकर्त्यांनी विदर्भाच्या कानाकोपऱ्यात ही चळवळ पोहचवली होती. या काळातील आयोजित केलेल्या अनेकानेक परिषदांच्या माध्यमातून समोर आलेल्या सक्रिय कार्यकर्त्यांची नावे समोर येणे आवश्यक होते. या परिषदांच्या मूळ पत्रकावरुन ही नावे घेतली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहे.

अ. 29 मे 1925 ला निंभोरा ता अकोला येथे झालेल्या अकोला जिल्हा 2 री ब्राम्हणेतर परिषदेतील सक्रिय व्यक्ती[5] पुढील प्रमाणे आहेत. - रावबहादूर दादासाहेब कोरडे चेअरमन लोकलबोर्ड मूर्तीजापूर, त्रिंबकराव लक्ष्मणराव पाटील निंभोरा ता अकोला, नथू माधाजी पाटील सांगवी बाजार, नथू मारोती पाटील सांगवी बाजार, पंढरी तुकाराम पाळोदीकर, सदाशिव पाटील घुसरकर, तुकाराम किसन वाघोलीकर, रामचंद्र शिवराम सिंदखेडकर, संपत सूर्यभान राजंदेकर, मोतीराम रावजी काळणे आगरकर, जयवंत सखाराम बापू रा भोंड, बळिराम अंबाजी कुचर अडत दुकान अकोला, मारोती सुरुशे बाखराबादकर, रामचंद्र लक्ष्मण गावंडे निंभोरा इ.

श्री सूर्यभानजी सखाराम खाजोने अकोट अकोला जिल्हयातील सत्यशोधक चळवळीचे सर्वात सक्रिय कार्यकर्ते होते.

ब. तुलंगा ता बाळापूर येथे 30 व 31 डिसेंबर 1927 ला झालेल्या 4 थ्या अकोला जिल्हा ब्राम्हणेतर परीषदेतील सक्रिय व्यक्ती[6] - नामदेव पाटील सुकळी, लक्ष्मण चहादू नेव्हळ, दानूजी गणूजी लांडे, नामदेवराव पाटील लावखेडकर, संभूजी पाटील दिग्रसकर, विठठलराव चान्नीकर, गणपतराव सूकळीकर, भालचंद्र पंढरीनाथ खेळकर, अब्दुल सत्तार खान वकिल इ.

क. अकोला जिल्हा 3 री ब्राम्हणेतर परिषद बहिरखेड पिंजर जवळ 30 31 डिसेंबर 1926 मधील सक्रिय कार्यकर्ते पुढीलप्रमाणे[7] - अमृतराव मनसाजी ठाकरे, केशवराव बाळाजी राहितकर, किसनराव उमरदरीकर, हरी पाटील जवळेकर, भिकाभाऊ बोरगावकर, सिताराम भावसिंग, भालचंद्र पंढरीनाथ खेळकर इ.

ड. ब्राम्हणेतर पक्षाचे अकोला जिल्हयातील कार्यकर्ते[8] — डॉ. के एच चव्हाण अकोला, डॉ. जी एच चव्हाण शिवाजी मराठा संघ अकोला व बाबुराव खेळकर संपादक मराठा समाचार अकोला

इ. वऱ्हाड प्रांतिक सत्यशोधक परिषद व 4 थी अकोला जिल्हा ब्राम्हणेतर परिषद करोडी, अकोट 7 व 8 एप्रिल 1928 मधील सक्रिय कार्यकर्ते[9] - श्रीमंत गुलाबराव पाटील जैनपूरकर, सातारकर वकिल प्रेसिडेंट डिस्ट्रक्ट कौन्सिल अकोला, सपकाळ वकिल, नामदेवराव वकिल, गोविंदराव पाटील, संपत सखाराम करोडी, त्र्यंबकराव पाटील निंबोरा, शिवराम पाटील वरुड, मारोतीराव धारेलकर, तुळशिराम पाटील तेल्हारा, श्रीराम पाटील वरुड, श्रावण सखाराम पाटील, मारुती रामजी पाटील, नारायणराव मानकर, मोतीराम रावजी काळणे

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

सेक्रेटरी सत्यशोधक समाज, डॉ. गो ह चव्हाण शिवाजी मराठा संघ अकोला व अकोला जिल्हा ब्राम्हणेतर संघ इ.

फ. अकोला जिल्हा ब्राम्हणेतर परिषद 5 वी पूर्णा व काटेपूर्णा संगमाजवळ भटोरी मूर्तीजापूर 30 व 31 डिसेंबर 1928 मधील सक्रिय कार्यकर्ते पुढीलप्रमाणे[10] - नथू पाटील कोरपे, ज्ञानराव पाटील, गुलाबराव कोरपे, देवरावजी नळकांडे, देवराव घुंगशीकर, सखाराम धनगर, भगवंतराव देशमुख, सखाराम पाटील हिरपूरकर, मारोतराम पाटील, रायभान बोळे, बोंदराजी धनगर, पांडुरंग सूर्यभान बोळे इ.

ग. अकोला जिल्हा ब्राम्हणेतर परिषद 6 वी व अकोला जिल्हा सत्यशोधक परिषद ठिकाण कॉटन मार्केटजवळ राजूरकर जीन अब्दूल करिम फॅक्टरी अकोला 29 व 30 डिसेंबर 1929 मधील सक्रिय कार्यकर्ते पढीलप्रमाणे[11] - तुकाराम जयराम केदार वकिल व नागपूर कायदे कौन्सिलचे माजी दिवाण, पुंडलिक सोनाजी ठाकरे, किसन पाटील उमरदरी, सिताराम पाटील बहिरखेड, भालचंद्र पंढरीनाथ खेळकर, जी व्ही पल्हाडे वकिल, किसन रामजी पांडव राजंदा, अवधूत पाटील उमरी, रामराव पाटील बाभूळगाव, मोतीरामजी काळणे, रामचंद्र तुकाराम बोरकर, डी डी जाधव सेक्रेटरी इ.

ह. अकोला जिल्हा ब्राम्हणेतर अधिवेशन 7 वे श्रीराम थिएटर ताजनापेठ अकोला दि 14 मे 1933 मधील सक्रिय कार्यकर्ते पढीलप्रमाणे[12] - श्री डि के म्हैसने बार ॲट लॉ अकोला, मोतिराम सोनाजी म्हैसने अकोला, नारायण केशव पाटील करोडी अकोट, जयराम बदरखे अकोला, काशिराव राजाराम ठाकरे मधापूर, नामदेवराव इधोळ अकोला, दत्तात्रेय धुंडिराज जाधव अकोला, संपतराव पाटील राजंदा, पुंडलीक सोनाजी पाटील बहिरखेड, मारोतीराव घाटोळे उमरी, पुंडलिकराव पाटील गोरेगाव, तुकाराम पाटील व्याळा, मारोती पाटील बाखराबाद, वामनराव देशमुख अकोला, शंकरराव दौलतराव फोकमारे वकिल अकोला इ.

च. अकोला जिल्हा महार सभा 22 फेब्रु 1931 रिधोरा मधील सक्रिय कार्यकर्ते पढीलप्रमाणे[13] -झाबू शाहू सिरसाट अकोला, मोती चंदू अकोट,चीना रायजी जस्तगाव, भगवान हिरामन बाळापूर,गुणा उकर्डा अकोला,शंकर संभू मंगरुळपीर व मसाजी अगनू मूर्तीजापूर.

छ. अकोट तालुका सत्यशोधक परिषद दापूरा अकोट 4 व 5 जानेवारी 1925 मधील सक्रिय कार्यकर्ते पढीलप्रमाणे[14] — केशवराव देशमुख तेल्हारा व शामराव किसनराव पाटील दापूरा.

याशिवाय कसबे वाडेगावच्या सत्यशोधक समाजाच्या कार्यकारिणीमधील कार्यर्त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. भगवान मोहनाजी पाटील मानकर (उपाध्यक्ष) सुखदेव दत्तूजी पाटील मानकर, यशवंतराव सूर्यभान पाटील व मोतीराम सिताराम पाटील राहणार सरप, तुकाराम पुंजाजी राहुडकर, सिताराम तुकाराम उगले, संभाजी दत्ताजी फाळके (अध्यक्ष), मारोती लक्ष्मण पाटील, उकर्डा जयराम पाटील, अमरसिंग पिलाजी पाटील मानकर, गणपतराव रायभान पाटील मानकर, झिनाजी महाराजजी फाळके, भटूजी जाणूजी लिकटे, खुशाल नारायण धुमाळ, सुखदेव रत्तूजी पाटील मानकर इत्यादी.[15] अकोला जिल्हयातील पातूर येथेसुध्दा सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन झाली होती व तीची कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष श्री गोविंदसिंग भगवानसिंग वर्मा राजपूत व इतरांमध्ये शंकरसिंग सरदारसिंग वर्मा राजपूत, फुलमाळी मंडळीचे अध्यक्ष देवाजी गिरमाजी पाटील इंगळे हे कारभारी मेंबर, लक्ष्मण विक्रमजी निलखन, मारोती लक्ष्मण उगले, चिनकाजी संभाजी पाटील, दानाजी गोमाजी

परमाळे, नवलाजी सहादू माहुलकर, दानाजी देवाजी पाटील इंगळे सेक्रेटरी, कृष्णाजी गोविंद निलखन मास्तर, मयाचार्य परशराम तुकाराम पांचाळ, नारायण सोनाजी उगले, चिनकाजी रामजी ढोणे, महादेव बापूजी राखोंडे, लक्ष्मण नवलाजी फुलारी, पुंजाजी रामजी इंगळे, महादू दानाजी पाटील, गणू बहिरजी बगाडे, सुर्यभान परशराम बोचरे, भगवान मारोती पाटील, विक्रम रामजी पाटील, नवलाजी गोविंद उगले, महादू पुंजाजी उगले, सदू ककूजी अत्तरकार, मारोती बापूजी अत्तरकार, गंगाराम सिध्दाजी इंगळे, तुकाराम भगवान पाटोलकर, जानजी नारायण बोंबटकार, विठू सहादू उमाळे, सिध्दाजी हिराजी खंडाळे इ सक्रिय कार्यकर्ते सत्यशोधक चळवळीमध्ये कार्यरत होते.[16]

शास्त्री नारोजी महाघट व शास्त्री धर्माजी रामजी डुंबरे यांनी वऱ्हाडात सत्यशोधक चळवळीचा मोठया प्रमाणावर प्रचार व प्रसार केला होता. कृष्णराव पांडुरंग भालेकर हे 1904 ते 1910 या काळात करजगाव, बेलूरा, शिंगणापूर, नायगाव व अकोला परिसरात सत्यशोधक चळवळीच्या प्रचार प्रसाराचे कार्य करण्यासाठी आलेले होते. या काळात काजीखेड ता बाळापूर, शिरसोली व भोकर ता अकोट तसेच नेर येथे शास्त्री नारोजी महाघट यांनी सभा घेऊन सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापन केल्या होत्या. काजीखेड ला 1906 साली आजुबाजूच्या 50 गावतील 1000 लोक महाघटांच्या व्याख्यानाला हजर होते. या कार्यक्रमाचे आयोजन सोनाजी परशराम पाटील हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष नारायणगीर गोपाळगीरबाबा वझेगावकर हे होते. लाल भारती, गुरुदौलत भारती, माळी उतराजी पानाजी घोंगडे, माळी बकारामजी रामजी, हरिभाऊ भोपू महानुभाव, उतराजी तानाजी माळी, श्रावण सोनाजी माळी, धनाजी उतखेडे, भिवाजी नागोजी विधाते, सूर्यभान नागोजी कडू, कृष्णाजी सोनाजी कोरडे, केशवराव देशमुख शिरसो मुर्तीजापूर, चिनकाजी रामजी ढोणे, महादेव बापूजी राखोंडे, तुकाराम भगवान पाटोलकर, श्रीनिवास नायडू बाळापूर व भगवान संभाजी सरडकार पातूर शेखबाबू यांनी सत्यशोधक चळवळीचा याकाळात प्रचार व प्रसार केला.[17] गणूजी खताडे अकोली अकोट हे सत्यशोधक जलश्यांमध्ये गाणी म्हणण्याचे काम करत असत. राजंद्याचा सत्यशोधक जलसा हा मोठा प्रसिध्द होता. याकाळात सत्यनारायणाच्या पूजा सत्यशोधक पध्दतीने करण्यात आल्या होत्या. अकोला जिल्हयातील पुंडा येथील पंढरीनाथ जायलो यांनी यावेळी पुरोहिताचे काम जिल्हाभर केले होते. पारस ता बाळापूर येथील संपतराव पाटलांच्या घरचे श्राध्द सत्यशोधक पध्दतीने झाल्याची नोंद आढळते. हातरुण ता बाळापूर येथील आकाराम चांभार यांच्या घराची वास्तूशांती सत्यशोधक पध्दतीने झाली होती. नायगावकरांच्या जलश्याचे प्रयोग दहिहांडा, केळीवेळी, करोडी येथे झाले होते. बाळापूरातील वाडेगाव येथे भिमराव महामुनींचे भीमपुराणाचा प्रयोग 3 व 4 एप्रिल 1906 ला पार पडला होता. 4 व 5 जानेवारी 1925 ला दापुरा येथे बजाबा गायकवाडांचा जलश्याचा कार्यक्रम पार पडला होता. तसेच अकोला व अमरावती जिल्हा ब्राम्हणेतर परिषदेच्या 30 व 31 डिसेंबर 1929 च्या हिंगणी संयुक्त अधिवेशनाचे वेळी नायगावकर व राजंदेकरांचा जलश्याचा कार्यक्रम पार पडला होता. 1932- 33 ला निंबा ता बाळापूर येथे सत्यशोधक समाजाच्या प्रेरणेतूनच येथील देशमुख लोकांनी हरिजनांसाठी पाणवठे खुले केले होते. अकोल्यात जाणोजी खंडारे यांनी 1884 ला फ्री बोर्डींग स्थापन केले होते ही दलितांची विदर्भातील पहिली संस्था होती.

 ISSN 2231 4342

यात्प्रकारे वऱ्हाडातील सर्वच भागात सत्यशोधक चळवळीने मोठी जागृती केल्याचे दिसून येते. या काळात सत्यशोधक पध्दतीने लग्न, वास्तूशांती, सत्यनारायण, मृत्युसंस्कार इ सर्व विधी पार पाडले गेल्याचे दिसून येते. तसेच हे सर्व कामे विना ब्राम्हण पुरोहिताची सत्यशोधक पध्दतीने ठरवून दिलेल्या पध्दतीने पार पाडली गेली. अकोला अमरावती वर्धा बुलडाणा व यवतमाळ या सर्व जिल्हयात सत्यशोधक चळवळीने मोठी गती याकाळात पकडली होती. याकाळातील अकोला जिल्हयातील कार्यकर्त्यांचा आढावा आपण याठिकाणी घेतला आहे.

निष्कर्ष - वऱ्हाडातील इतर जिल्हयाप्रमाणे अकोला जिल्हा सुध्दा सत्यशोधक चळवळीमध्ये सक्रिय होता. याकाळात जिल्हयात कार्यत्यांची मोठी फौज निर्माण झाल्याचे दिसून येते. जलसा, सत्यशोधक पुरोहितगीरी, सत्यशोधक प्रचारक, सत्यशोधक किर्तनकार, प्रबोधक या काळात जिल्हयात निर्माण झाले होते. अनेकानेक सत्यशोधक व ब्राम्हणेतर परिषदा व सभांचे आयोजन या काळात अकोल्यात झाल्याचे दिसून येते.

संदर्भसाधने -

1. उगले जी. ए., ***'सत्यशोधकाचे अंतरंग'***, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती 2017, पृ.क्र.36
2. वाठोरे सिध्दार्थ शिवाजी, ***'बुलडाणा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळ',*** (संशोधनपर लेख), हिस्टोरिकल रिसर्च जर्नल,सप्टेंबर 2017
3. चोपडे अशोक, ***'विदर्भातील सत्यषोधक चळवळीच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास'***, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती येथे 2001 ला सादर केलेला शोधप्रबंध, पान क्र 28 व 29.
4. बागल माधव खंडेराव, ***'सत्यशोधक हिरक महोत्सवी ग्रंथ'***, पुनःप्रकाशन नागपूर,2002,पृ.क्र 97
5. वतनदार प्रेस अकोला येथून छापलेल्या 29 मे 1925 च्या निंभोरा ता अकोला येथे झालेल्या अकोला जिल्हा 2 री ब्राम्हणेतर परिषदेच्या मूळ पत्रकावरुन
6. वतनदार प्रेस अकोला येथून छापलेल्या तुलंगा ता बाळापूर येथे 30 व 31 डिसेंबर 1927 ला झालेल्या 4 थ्या अकोला जिल्हा ब्राम्हणेतर परिषदेच्या मूळ पत्रकावरुन
7. वतनदार प्रेस अकोला येथून छापलेल्या अकोला जिल्हा 3 री ब्राम्हणेतर परिषद बहिरखेड पिंजर जवळ 30 31 डिसेंबर 1926 च्या मूळ पत्रकावरुन
8. ब्राम्हणेतर पक्षाचा जाहिरनामा जैन सुधाकर प्रेस वर्धा च्या मूळ पत्रकावरुन
9. वतनदार प्रेस अकोला येथून छापलेल्या वऱ्हाड प्रांतिक सत्यशोधक परिषद व 4 थी अकोला जिल्हा ब्राम्हणेतर परिषद स्थळ करोडी ता अकोट दि 7 व 8 एप्रिल 1928 च्या मूळ पत्रकावरुन
10. वतनदार प्रेस अकोला येथून छापलेल्या अकोला जिल्हा ब्राम्हणेतर परिषद 5 वी पूर्णा व काटेपूर्णा संगमाजवळ भटोरी मूर्तीजापूर 30 व 31 डिसेंबर 1928 च्या मूळ पत्रकावरुन

 ISSN 2231 4342

11. वतनदार प्रेस अकोला येथून छापलेल्या अकोला जिल्हा ब्राम्हणेतर परिषद 6 वी व अकोला जिल्हा सत्यशोधक परिषद ठिकाण कॉटन मार्केजवळ राजूरकर जीन अब्दूल करिम फॅक्टरी अकोला 29 व 30 डिसेंबर 1929 च्या मूळ पत्रकावरुन

12. वतनदार प्रेस अकोला येथून छापलेल्या अकोला जिल्हा ब्राम्हणेतर अधिवेशन 7 वे श्रीराम थिएटर ताजनापेठ अकोला दि 14 मे 1933 च्या मूळ पत्रकावरुन

13. सिटी छापखाना अकोला येथून छापलेल्या अकोला जिल्हा महार सभा 22 फेब्रुवारी 1931 रिधोऱ्याच्या मूळ पत्रकावरुन

14. वतनदार प्रेस अकोला येथून छापलेल्या अकोट तालुका सत्यशोधक परिशद दापूरा अकोट 4 व 5 जानेवारी 1925 च्या मूळ पत्रकावरुन

15. चोपडे अशोक, '***विदर्भातील सत्यशोधक चळवळीच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास'***, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती येथे 2001 ला सादर केलेला शोधप्रबंध, पान क्र 29

16. तत्रैव पान क्र 29, 30.

17. तत्रैव पान क्र 30, 31

ISSN 2231 4342

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी: अरुणा असफ अली

प्रो. डॉ. हणमंत महादेव लोंढे
प्रोफेसर आणि इतिहास विभागप्रमुख,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर जि. सोलापूर-४१३३०४
मो.न. ९६०४४०४२०५
Email. hmlondheppr@gmail.com

प्रस्तावना:

महात्मा गांधी एकदा म्हणाले होते, "भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास जेव्हा लिहिला जाईल तेव्हा भारतीय स्त्रियांनी केलेल्या त्यागाला त्यामध्ये अग्रस्थान असेल." भारतीय स्वातंत्र्य लढ्यात भारतीय स्त्रियांनी बजावलेली भूमिका अतिशय प्रशंसनीय आहे. भारतीय स्त्रियांनी प्राचीन काळात सामाजिक-धार्मिक जीवनात मानाचे स्थान मिळविले परंतु नंतर स्त्रीयांच्यावर अनेक बंधने लादण्यात आली. त्यामुळे तिचे स्थान घरापुरते मर्यादित राहिले. सती पद्धत, बालविवाह पद्धत, पडदा पद्धत या अनिष्ठ प्रथेमध्ये स्त्री पूर्णतः जखडून टाकली. परंतु ब्रिटीशांच्या आगमनानंतर ब्रिटीशांच्या सामाजिक धोरणामुळे आणि सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळीमुळे स्त्री हळूहळू सामाजिक बंधनातून मुक्त होऊन राजकारणात सहभागी होऊ लागली. विशेषतः महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली अनेक स्त्रियांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेतला व आपल्या कार्य-कर्तृत्वाची मोहर उमटविली. त्या अनेक स्त्रियांमध्ये अरुणा असफ अली या महत्वाच्या आहेत.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश ब्रिटीशांच्या जोखडातून मुक्त झाला. त्यासाठी भारतीयांना फार मोठा त्याग करावा लागला. भारतीयांनी प्रारंभी ब्रिटीश सत्तेच्या विरोधी अनेक उठाव केले. या उठावापैकी १८५७ चा उठाव अनेकार्थांनी महत्वपूर्ण होता. परंतु हा उठाव अपयशी ठरला. पुढे अल्पावधीत इ.स. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली आणि खऱ्या अर्थाने संघटनात्मक दृष्टीने भारतीय स्वातंत्र्य चळवळीला सुरुवात झाली. १८८५ ते १९४७ हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा गौरवशाली कालखंड म्हणून ओळखला जातो. प्रदीर्घ सांस्कृतिक परंपरा लाभलेला, वैविध्यातून एकता शोधणारा, अज्ञान, दारिद्र्य, विषमता यामुळे पोखालेला असूनही ब्रिटीशांना आव्हान देणारा भारत हा देश जगातील एकमेव उदाहरण आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही सर्वात मोठे जनआंदोलन होते. यामध्ये लाखो स्त्री-पुरुषांनी जात-पात, उच्च-निचता न पहाता स्वातंत्र्याच्या कुंडलात उडी घेतली आणि आपली आहुती दिली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे तीन कालखंड पाडले जातात. १८८५ ते १९०५ हा पहिला कालखंड मवाळ युग, १९०५ ते १९२० हा टिळक युग व १९२० ते १९४७ हा गांधी युग म्हणून ओळखले जातात. महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळ ही घराघरात पोहचली. ही लोकचळवळ बनली. अनेक स्त्रियांनी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य लढ्यामध्ये भाग घेऊन भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये महत्वाचे योगदान दिले. या सर्वांमध्ये अरुणा असफ अली यांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

जीवनचरित्र :



(१६ जुलै १९०९-२९ जुलै १९९६)

अरुणा धाडसी, कर्तृत्वान, ठाम निश्चयी व परंपरा धुडकावून लावणाऱ्या एक स्त्री होत्या.त्यांचा जन्म बंगाल प्रांतात १६ जुलै १९०९ रोजी उपेंद्रनाथ व अंबालिका देवी गांगुली यांच्या पोटी झाला. त्यांचे कुटुंब हे सधन ब्राह्मण असून ते परंपरागत-रूढीवादी विचारसरणीचे अनुसरून करणारे होते. परंतु अरुणाने ह्या परंपरा, चालीरीती झुगारून देऊन आपल्यापेक्षा वयाने दुप्पट असणाऱ्या असफ अली या सुप्रसिद्ध मुस्लीम वकिलाशी धर्म व चालीरीतींची बंधने तोडून विवाह केला. अरुणा यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये फक्त सहभागच घेतला नाही तर स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्वही केले. त्या जहालवादी विचारसरणीच्या नेत्या म्हणून प्रसिद्ध होत्या. ब्रिटीश सत्तेविरुद्ध आंदोलन करत असताना त्यांनी कोणतीही तडजोड केली नाही.

सविनय कायदेभंग चळवळ :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली अनेक चळवळी झाल्या. त्यापैकी एक महत्वपूर्ण चळवळ म्हणजे सविनय कायदेभंग चळवळ होय. सविनय कायदेभंग चळवळीमध्ये ब्रिटीशांनी केलेले जुलमी कायदे हिंसात्मक मार्गा ऐवजी स-विनयाने, नम्रतेने मोडणे अपेक्षित होते. सविनय कायदेभंग चळवळीमध्ये मिठाचा सत्याग्रह आणि धरासना सत्याग्रह महत्वाचे होते. १४ फेब्रुवारी १९३० रोजी कॉंग्रेस कार्यकारणीची बैठक साबरमती आश्रमात घेण्यात आली. या बैठकीत सविनय कायदेभंग चळवळ राष्ट्रीय स्तरावर सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. या चळवळीमध्ये कस्तुरबा गांधी, सरोजिनी नायडू, अरुणा असफ अली, कमलादेवी चट्टोपाध्याय, कमला नेहरू, हेम प्रभादास व सुचेता कृपलानी या प्रमुख महिलांनी सहभाग घेतला होता.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली इ.स.१९३० मध्ये सविनय कायदेभंग चळवळ सुरु झाली. या चळवळीमध्ये अरुणा असफ अली यांनी सहभाग घेतला होता. या चळवळीचा अविभाज्य अंग असलेल्या मिठाच्या सत्याग्रहामध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. मीठ बनविणे, मिरवणुका काढणे आणि सभांचे आयोजन करणे या जबाबदाऱ्या महात्मा गांधीनी अरुणा अली यांच्यावर सोपविल्या होत्या. त्यांनी त्या जबाबदाऱ्या चोखपणे बजावल्या होत्या. परिणामी अरुणा असफ अली यांना ब्रिटीश सरकारने अटक केली. त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला. चांगल्या वर्तवणूकीची हमी देऊन आपली सुटका करावी असे त्यांना सरकारने पोलीसामार्फत सांगण्यात आले. परंतु त्यांनी स्पष्ट त्यास नकार दिला. परिणामी त्यांना एक वर्ष कारावासाची शिक्षा ठोठवण्यात आली. गांधी- आयर्विन करारानुसार बहुसंख्य राजकीय कैद्यांची सुटका करण्यात आली.

ISSN 2231 4342

त्यावेळी पंजाबमधील लाहोर तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या अरुणाची सुटका करण्यास ब्रिटीश सरकार तयार नव्हते. त्यावेळी महात्मा गांधीना मध्यस्थी करावी लागली. महात्मा गांधीचे प्रयत्न व लोकांचे आंदोलन यामुळे ब्रिटीश सरकारला अरुणाची सुटका करावी लागली. १९३२ मध्ये त्यांना पुन्हा अटका करण्यात आली आणि दोन हजाराचा दंड ठोठावण्यात आला. अरुणाने दंड भरण्यास नकार दिला. तेव्हा पोलिसांनी त्यांच्या साड्या जप्त केल्या. राजकीय कैद्याची दयनीय अवस्था असलेल्या दिल्ली जिल्हा कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली.तुरुंगात सुधारणा घडवून आणण्याचा त्यांनी निश्चिय केला. राजकीय कैद्यांना चांगली वागणूक मिळावी म्हणून भूक हरताळ सुरु केला. तुरुंगाधिकाऱ्यांना त्यांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या. परंतु पुढे पोलिसांनी त्याचा फार छळ केला. त्यांची अंबाला तुरुंगात रवानगी करण्यात आली. त्या ठिकाणी त्यांना एकाकी कोठडीत ठेवण्यात आले.

चले जाव आंदोलन:

१९४२ च्या चळवळीमुळे अरुणा असफ अली यांच्या आयुष्याने एक वेगळेच वळण घेतले. ९ ऑगस्ट १९४२ रोजी चले जाव आंदोलन सुरु करण्याचे कॉंग्रेस कमिटीने निश्चित केले होते. तशा प्रकारचा ठराव ८ ऑगस्ट १९४२ रोजी मंजूर करण्यात आला. ब्रिटीश सरकारने हे आंदोलन दडपशाही मार्गाने संपवण्याचा निर्णय घेतला. ९ ऑगस्टलाच ब्रिटीश सरकारने महत्मा गांधी, पंडित नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, आचार्य कृपलानी, असफ अली या नेत्यांना अटक केली. कॉंग्रेसला बेकायदेशीर ठरविण्यात आले. नेतृत्वाच्या अभावी देशात उलथापालथ आणि राजकीय पोकळी निर्माण झाली. मुंबईच्या गोवालिया टॅंक मैदानावर अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीची बैठक बोलविण्यात आली. समितीने जनतेत जागृती निर्माण करण्यासाठी "चले जाव" ची घोषणा केली. या चळवळीचे नेतृत्व अरुणा असफ अलीने स्वीकारले. "दळणवळणाची साधने नष्ट करून सरकारची प्रशासकीय व्यवस्था खिळखिळी करून भारताला स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय हा लढा थांबवू नये" अशी गर्जना केली. त्यावेळी पोलिसांनी वेढा दिला होता. त्या वेढ्याला न जुमानता तिरंगा फडकावला आणि राष्ट्रीय ध्वज फडकावण्याच्या समारंभाची अध्यक्षीय जबाबदारी मोठ्या धैर्याने पार पाडली. ऑगस्ट क्रांतीची ती विरांगना बनली. पोलिसांनी जमावावर मोठ्या प्रमाणात लाठी हल्ला केला. अनेकांना अटक करण्यात आले. अरुणा भूमिगत झाल्या. भूमिगत क्रांतीचे नेतृत्व त्यांनी स्वीकारले.

स्वत:ला अटक होऊ न देता त्यांनी चार वर्षे भूमिगत चळवळीचे नेतृत्व केले. त्यांना पकडण्यात पोलिसांना यश येत नव्हते म्हणून ब्रिटीश सरकारने २६ डिसेंबर १९४२ रोजी त्यांचे दिल्लीतील घर संपत्ती, मोटार जप्त करून लिलाव केला. घराचा लिलाव २० हजार रुपये तर मोटारीचा लिलाव ३५०० रुपये झाला.या काळात त्या कलकत्ता येथे शांती कबीर या प्रा. हुमायून कबीर यांच्या पत्नीच्या घरी राहिल्या. तेथून त्यांनी कॉंग्रेसच्या अंतर प्रांतीय स्वरूपाच्या हालचालींना मार्गदर्शन केले. दिल्लीत असताना ५ जंतरमंतर रोडवर राहणाऱ्या या बहादूर सरदार वैशाखसिंग या सरकारी कंत्राटदाराने त्यांना मदत केली. ऑल इंडिया रेडीओच्या प्रेक्षपण करणाऱ्या तारा उध्वस्त करून टाकण्यावर अरुणाचा विशेष भर होता. अटक टाळण्यासाठी त्या सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत राहिल्या. कलकत्ता, मुंबई, दिल्ली, पुणे या ठिकाणी दौरा केले. सातारा येथे येवून क्रांतिसिंह नाना

ISSN 2231 4342

पाटील व वसंतदादा पाटील यांना प्रतिसरकारसाठी मार्गदर्शनही केले. १९४३ नंतर चळवळीला आलेली मरगळ दूर करण्यासाठी त्यांनी फार मोठे प्रयत्न केले. १९४४ मध्ये भूमिगत असतानाच त्या पुणे येथील निसर्गोपचार केंद्रात महात्मा गांधीजींना भेटण्यासाठी गेल्या होत्या. त्यांनी आपला पोषाख असा बदलला कि, पोलीस त्यांना ओळखू शकले नाहीत. डॉ. राम मनोहर लोहिया यांच्या सोबत भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या पश्चिम विभागाच्या "इन्कलाब" या दर महिन्याला निघणाऱ्या नियतकालिकेचे संपादन करीत असत. त्या लिहितात, "ही वेळ चर्चेची नाही, देशातील प्रत्येक नागरिकांनी जमेल तसे क्रांतीचा शिपाई झाले पाहिजे." अरुणा असफ अली यांना अटक करणे हे ब्रिटीश सरकार पुढे मोठे आव्हान होते. त्यांच्या अटकेसाठी पाच हजार रुपयेचे बक्षिस ही जाहीर करण्यात आले होते. त्या ब्रिटीश सरकारला कायम गुंगारा देऊन पलायन करीत होत्या.

अरुणा असफ अली भूमिगत राहून आंदोलनाचे नेतृत्व करीत होत्या. त्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत होता. रात्रं-दिवस प्रवास करावा लागत होता. या सर्व दगदगीमुळेत्यांची तब्येत खालावत चालली होती. याची बातमी म. गांधी यांच्या पर्यंत पोहचली. अरुणा असफ अलीचे देशप्रेम, असामान्य धैर्य, धाडसी वृत्ती, निडरपणा याबद्दलच्या आदराने महात्मा गांधीजीचे मन भरून आले. महात्मा गांधीना अरुणा बद्दल काळजी वाटू लागली.त्यामुळे न राहून त्यांनी अरुणाला सल्ला दिला. 'भूमिगत राहून मरण पत्करण्यापेक्षा प्रकट होऊन पोलिसांना शरण जा आणि तुझ्या अटकेसाठी लावलेले बक्षीस तूच जिंक,' आणि ते पैसे हरिजनोद्धारासाठी जपून ठेव" परंतु अरुणाने महात्मा गांधीजीचा सल्ला न मानता भूमिगत चळवळीचे काम जोमाने सुरूच ठेवले. शेवटी ब्रिटीश सरकारने २६ जानेवारी १९४६ रोजी त्यांच्यावरील अटक वॉरंट मागे घेतले. त्यानंतरच त्या प्रकट झाल्या. ब्रिटीश सत्ता उलथून टाकण्यासाठी क्रांतिकारी चळवळ संघटीत करता यावी म्हणून कॉंग्रेस पक्षाच्या झेंड्याखाली भारतात नवीन आझाद हिंद लष्कराची स्थापना करावी असे मत त्यांनी फेब्रुवारी १९४६ मध्येच सुचविले होते. १५ ऑगस्ट १९४७ मध्ये भारताला स्वतंत्र्य मिळाले आणि अरुणा असफ अलीच्या क्रांत्रीकारी कार्याचा शेवट झाला. क्रांतिकारी कार्याचा जरी शेवट झाला असला तरी त्यांनी आपल्या समाजवादी विचारसरणीच्या अनुशंगाने आपले सामाजिक आणि राजकीय कार्य चालूच ठेवले.

भारताला स्वतंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राजकारणात प्रवेश करावा कि करू नये हा त्यांच्या पुढे प्रश्न होता. १९४७ मध्ये दिल्ली कॉंग्रेस समितीच्या अध्यक्ष म्हणून त्या निवडून आल्या. नंतर त्यांनी कॉंग्रेस पक्षाचा त्याग करून १९४८ मध्ये समाजवादी पक्षात प्रवेश केला. त्यानंतर दोनच वर्षात त्यांनी समाजवादी पक्ष सोडला व कम्युनिस्ट चळवळीमध्ये सहभागी झाल्या. अशा महान स्वातंत्र्य सेनानीचा २९ जुलै १९९६ रोजी वयाच्या ८८ व्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. स्वतंत्र्य चळवळीतील एक धगधगते यज्ञकुंड शांत झाले.

मान-सन्मान:

त्यांच्यावरील कार्याची अनेक संस्थांनी दखल घेऊन त्यांना अनेक किताब देऊन गौरविण्यात आले. "दैनिक ट्रिब्युन" ने त्यांना "१९४२ ची झाशीची राणी" हा किताब देऊन गौरव करण्यात आला. १९५५ मध्ये सोव्हिएट लॅंड नेहरू पारितोषिक, १९७५ मध्ये लेनिन शांतता परितोषिक, १९९१ मध्ये आंतरराष्ट्रीय मैत्री आणि

समझौता जवाहरलाल नेहरू परितोषिक, १९९२ मध्ये पद्मविभूषण आणि १९९७ मध्ये भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.

समारोप :

अरुणा असफ अली यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान अतिशय महत्वाचे आहे. एका हिंदू कुटुंबात जन्म घेऊन धर्माच्या जातीच्या भिंती भेदून त्यांनी एका विद्वान मुस्लीम वकीला बरोबर विवाह केला. असफ अलीने त्यांना शेवटपर्यंत साथ दिली. अरुणाच्या क्रांतिकारी कार्यात त्यांनीही मोलाचा वाटा उचलला. अरुणा महात्मा गांधीजींच्या शिष्या होत्या. त्यांनी म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळ, चले जाव चळवळ यामध्ये भाग घेतला. केवळ सहभागच घेतला नाही तर चळवळीचे नेतृत्वही केले. चार वर्षे त्या भूमिगत होत्या. याकाळात त्यांना सुचेता कृपलानी, मृदुला साराभाई यांचे मोठे सहकार्य लाभले. कार्ल मार्क्स, लेनिन, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू व जयप्रकाश नारायण यांच्या विचाराचा त्यांच्यावर प्रभाव होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्वातंत्र्यसाठीचा लढा संपला असे त्यांना वाटत नव्हते. तर स्वातंत्र्याची कल्पनाच मुळी देशाच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक जीवनात व्यापक आहे, असे त्यांचे मत होते. देशप्रेमामध्ये त्यांनी कशाचीही तडजोड केली नाही. शेवट पर्यंत त्या देशप्रेमाने भारावलेल्या होत्या. अरुणा असफ अलीची वृत्ती अस्वस्थ, ठाम निश्चयी, धाडसी आणि परंपरा धुडकावून लावणारी होती. देशभक्ती, निधर्मीवाद आणि सामजिक न्याय यांच्याशी त्यांची बांधिलकी होती. अशा या महान स्त्री देशभक्ताला मानाचा मुजरा !!!

संदर्भ ग्रंथ:

१. स्त्री स्वातंत्र्यवादिनी:- विनया खडपेकर
२. स्त्री संघर्षाची नवी रूपे:- नंदिता गांधी
३. भारतीय इतिहासातील स्त्रियां :- डॉ. सौ. पद्मजा पाटील, डॉ. सौ.शोभना जाधव
४. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रीया :- नवाझ ब. मोदी(संपादक)
५. भारतीय महिला एव आझादी कि लढाई :- डॉ. रोहिणी गवाणकर
६. भारतीय स्वातंत्र्य आंदोलन मै महिलायो का योगदान:- एस. एल. नागोरी.
७. India's struggle for Independence:- Bipin Chandra

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

म्हसला तालूक्यातील उपेक्षित ऐतिहासिक स्थळांचे महत्व

प्रा. डॉ. संजय उत्तम बेंद्रे
वसंतराव नाईक कला , वाणिज्य
व विज्ञान महाविद्याल
म्हसला , जिल्हा – रायगड
9421166999, 8421654402

प्रस्थावना : महाराष्ट्र राज्याला सुमारे ७२० कि.मी. लांबीचा सागर किनारा लाभला असून हिरवी गर्द झाडी , लालमाती,गरजणारा दर्या, आणि रुपेरी वाळू याच लेणं लेवून ही किनारपट्टी पर्यटकांना वर्षाचे बारा महिने साद घालत असते. महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीचे प्रामुख्याने दोन भाग पडतात ते म्हणजे उत्तर कोंकण आणि दक्षिण कोंकण उत्तर कोकणामध्ये मुंबई ,ठाणे ,रायगड हे तीन जिल्हे येतात या पैकी रायगड जिल्हातील १५ तालुक्यामधील दक्षिणेला असलेला तालुका म्हणजे म्हसला होय. औधोगिक दृष्टीने मागास असलेला परंतु ऐतिहासिक दृष्टीने समृद्ध असणारा तालुका म्हणून म्हसला हा तालुका औळखला जातो. पर्यटनाच्या नकाशावर प्रशिध नसलेला परंतु पर्यटनाच्या असंख्य संधी असणारा तालुका हे या तालुख्याचे एक वैशीष्ठ सांगता येते. येथून जवळच असणारा जंजिरा किल्ला हा देशातच नव्हे तर जगात प्रशिध्य आहे. तसेच त्याच्या शेजारी शिवाजी महाराजांनी बांधलेला पद्मदुर्ग किल्ला हा ही प्रशिध आहे.नव्यानेच विकाशित होणारे दिघी व आगरदांडा बंदर या ऐतिहाषिक पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी सुमारे ५० ते ७५ हजार पर्यटक या तालुक्यातून प्रवास करीत असतात.

म्हसला तालुक्याचे स्थान व ऐतिहासिक स्थळे : कोकणात जाणारा प्रमुख महामार्ग म्हणून मुंबई –गोवा महामार्ग हा ओळखला जातो. या महामार्गावर माणगाव हे प्रमुख ठिकाण लागते, या ठिकाणापासून केवळ १५कि.मी. पश्चिमेला म्हसला तालुका सुरु होतो, याच तालुक्यात खालील प्रमाणे ऐतिहासिक स्थळे जे उपेक्षित आहेत ती खालील प्रमाणे

१) **पांडव कालीन शिवमंदिर :** म्हसला- श्रीवर्धन रस्त्यावर देवघर या ठिकाणी अमृतेश्वर मंदिर या नावाने प्रशिध असलेले पांडवकालीन शिवमंदिर आहे. या ठिकाणी महाशिवरात्रीला मोठी यात्रा असते. निसर्गाच्या सानिध्यात असणाऱ्या मंदिरा जवळच पावसाळ्यात वाहणारी नदी असून त्या नदीचे पाणी डोंगरावरून खाली येताना खूप मोठा धबधबा दृष्टीपथात पडतो. या मंदिराला शिवकाळात व पेशवे काळात अनेक हस्थिनी भेठी दिल्याचे पुरावे सापडतात. जंजिरा किल्ला जिंकण्यासाठी पुण्याहून पेशवे या मार्गाने जंजिर्याला गेले, जाताना या मंदिराला पेशव्यांनी भेट दिल्याचे जाणकार सांगतात.

२) **डोंगरावरील दत्त मंदिर व नदीकाठचे साई मंदिर :** म्हसला – श्रीवर्धन रस्त्यावरून प्रवास करताना देवघरकोंड या ठिकाणी डोंगरावरचे दत्त मंदिर असून या ठिकाणी गिर्यारोहणाचा आनंद घेता येतो.हे

ऐतिहासिक मंदिर निसर्गाच्या कुशीत वसलेल्या देवगरकोंड या कोंकणातील खेड्यातील ग्रामीण जीवन पर्यटकांना पाहता येते. सदर मंदिर मौर्य व कुशान काळात प्रशिध होते. पेशवे काळात येथे दत्त जयंती वेळी मोठी यात्रा भारत असे. तशेच देवघर येथे नदीच्या किनारी साई भक्तांची मनोकामना पूर्ण करणारे साई मंदिर असून त्याठिकाणी पर्यटक नदीच्या पत्रात डूबन्याचा आनंद घेऊ शकतात.

३) **कुडा-मांदाडच्या बौद्ध लेण्या** : मौर्य काळात उत्तर कोकणात बौद्ध धर्माच्या प्रसार सोबत व्यापाराचाही मोठ्या प्रमाणात विकास झाला. कारण बौद्ध भिक्कू हे त्या काळातील व्यापारीमार्गावरून मोठ्या प्रमाणात ये-जा करीत असत आणि ते व्यापाऱ्यांच्या तांड्या सोबत प्रवास करीत असत. या कालखंडात उत्तर कोकणात अनेक बंदरांचा व्यापारी दृष्टीकोनातून विकास झाला. म्हसला तालुक्याच्या सीमेवरील कुडा-मांदाड येथे सम्राट अशोकाच्या काळात येथे लेण्या खोदण्यात आल्या आहेत. परंतु येथे जाण्यासाठी बस व रस्ते यांची उणीव आहे. येथे विहार व स्तूप आहे.येथूनच बौद्ध भिक्कू महाड येथील गांधार पाले लेण्याकडे म्हसला मार्गे जात असत. महाड येथील लेण्यांच्या पुराव्यावरून सातवाहनांचे मांडलिक कान भोज (कुंभोज) यांचे वर्चेश्व होते हे दिसून येते. विद्यादेहेजीया या अभ्यासकाने या लेण्यामधील अक्षरांच्या धाटनीवरून इ.स.चे पहिले शतक या त्यांच्या निर्मितीचा कालखंड ठरविला आहे. इ.स. १३० मध्ये कुंभोज वंशीय विष्णू पुलित हा राजा या परिसरावर राज्य करीत होता.

४) **ऐतिहासिक घोणसे घाट** : माणगाव व मुंबईहून म्हसल्याकडे येताना म्हणजेच म्हसला तालुक्यात प्रवेश करताना आपणास चांदोरे गाव सोडल्या नंतर एक ऐतिहासिक घाट लागतो हा घाट म्हणजे घोणसे घाट या नावाने सुपरिचित आहे. या घाटाला ऐतिहासिक महत्व आहे कारण प्राचीन काळातील सातवाहन, भोज , चालुक्य घराण्याने याच घाटाचा वापर प्रवास करण्यासाठी केलेला दिसतो. इ.स. च्या २ व्या शतकात टोलेमी नावाच्या प्रवाशाने याच घोणसे घाटाचा वापर करून तो म्हसला येथे आला होता. शिवाजी महाराजांच्या काळातही जंजिर्याच्या सिद्दीवर लक्ष ठेवण्यासाठी मराठी सेना याच घोणसे घाटातून श्रीवर्धन व दिघी येथे जात असत. पेशवे काळातही याच घाटाचा वापर प्रवासासाठी होत असे. पेशवे हे श्रीवर्धनचेच असल्याने त्यांना प्रवासासाठी याच घाटाचा वापर करीत असत. पेशव्यांनी ज्या ज्या वेळी दंडराजपुरी व जंजिरा किल्ल्यावर स्वारी केली त्या त्या वेळी त्यांनी याच घोणसे घाटाचा वापर केला होता. या घाटात पर्यटकांना अनेक लहान मोठे धबधबे नजरेस पडतात त्यातील काही धबधब्याच्या ठिकाणी पर्यटक आपले वाहन रस्त्याच्या बाजूला उभे करून धबधब्यात भिजण्याचा आनंद घेऊ शकतात. या ठिकाणी विविध प्रकारचे पक्षी आपल्या चिव-चीवाटाने व वानरे आपल्या माकड चेष्टाने पर्यटकांचे मनोरंजन करताना देखिल आढळतात.

५) **धनगरमलई परिसरातील जंगले** : म्हासल्यावरून दिवेआगरला जाताना डाव्या बाजूला धनगरमलई फाटा लागतो तेथून ४ ते ५ कि.मी. आत गेल्यास रस्त्याला लागुनच घनदाट जंगल आढळते. ही जंगले अति प्राचीन असल्याचे जाणकार सांगतात. प्राचीन काळातील सातवाहन व भोज घराण्यातील राजांनी या जंगलांचा वापर युद्धाच्या वेळी लपण्यासाठी व युद्ध सामग्री दडवून ठेवण्यासाठी केला होता असे

ISSN 2231 4342

दिसून येते. पेश्व्यानीही याच जंगलांचा वापर करून जंजिर्याच्या सिद्दीला सालो कि पालो करून सोडले होते. याच जंगलातूनच मिळणाऱ्या वनस्पती पासून दवा(औषध) बनवला जात असे. या जंगलात साग, बांबू, आंबा, जांभूळ, काजू, खैर, वड, पिंपळ या सारखे मोठे वृक्ष तसेच अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती, विविध प्रकारचे पक्षी व प्राणी दृष्टीस पडतात. या जंगलात हौशी पर्यटकांना जंगल सफरीचा आनंद घेता येतो. या जंगला पासून जवळच वाघजाई देवीचे मंदिर आहे तेथेच गोमुख या नावाने वाहणारा पाण्याचा झरा आहे. या निसर्गरम्य वातावरणात पर्यटकांना काही क्षण घालविता येतात तर उन्हाळ्यात या ठिकाणी करवंदे, जांभळे विचून त्याची चव चाखण्याचा अनुभव मिळतो.

६) **पाभरे धरण** : म्हसला-तला प्रवास करताना आपणास पाभरे हे गाव लागते. गावाला लागुनच एक ऐतिहासिक धरण असून पाण्यात अनेक प्रकारचे मासे व मगरी पहावयास मिळतात. हे धरण नैसर्गिक असून मोठ्या प्रमाणात पाणीसाठा पावसाळ्यामध्ये साठवला जातो.पावसाळ्यात धरणाच्या भिंतीवरून पडणाऱ्या पाण्याचे रुपांतर धबधब्यात होते.अनेक वर्ष्यापासून या धरणाचे पाणी जनतेला पिण्यासाठी होतो, राज्यात व देशात कितीही दुष्काळी स्थिती असली तरी या धरणाचे पाणी अगधीच कमी होत नाही, हेच या धरणाचे वैशिस्थ आहे . या धरणावर इतर ४ ते ५ गावे पाण्यासाठी आवलुम्बून आहेत. जंजिरा संस्थानच्या वेळीही याच धरणातून पाणी पुरवठा केला जात होता असे जाणकार सांगतात. सद्यस्थितीत याच धरणातून म्हसला शहराला पाणी पुरवठ्या साठी योजना आखली असून लवकरच तो होणार आहे.

७) **कासारमलाई येथील कालिकामाता मंदिर** : तळकोकणातून मुंबईला जाताना जर आपण लोणेरे, गोरेगाव, खामगाव, कणघर या मार्गाने म्हस्ल्याकडे आलो तर कासारमलई नावाचे गाव लागते. तेथून डावीकडे २ कि.मी. आतमध्ये गेल्यास निसर्गाच्या सानिध्यात वसलेले आणि मुंबईच्या एका व्यापाऱ्याने स्व:खर्चाने बांधलेले कालिकामातेचे भव्य- दिव्य मंदिर दिसून येते. मंदिरात श्री कालिका मातेचे काळ्या पाषाणातील सर्वांग सुंदर मूर्ती असून महाराष्ट्रातून आलेले अनेक पुरोहित या ठिकाणे वास्तव्य करून देवीची उपासना करत असलेचे आढळतात. हे कालिका मातेचे मंदिर हे प्राचीन मंदिरा पैकी एक आहे . पेशव्यांचे सरदार येथे दर्शनाला येत असल्याचे अनेक पुरावे मिळाले आहेत. कासारमलई येथील तीन गावाची भरणारी आणि तीन दिवस चालणारी यात्रा व निघणारी पालखी पाहण्यासारखी असते. मंदिर परिसरात आंब्याच्या व काजूच्या बागा आढळतात हा भाग भीमशक्ती पीठ या नावाने सुपरिचित असून येथील निसर्ग वर्षभर हिरवागार व आल्हाददायक असतो.

८) **चिरेगणी देवीचे देवस्थान** : म्हसला- श्रीवर्धन बाह्य वळण रस्त्याने जाताना चिरेगणी हे गाव लागते. चिरेगणी येथे ऐतेहासिक चीरेगानिमातेचे मंदिर आहे. मध्ययुगात विशेषता शिवाजी महाराजांच्या काळात या देवीची भव्य- दिव्य यात्रा भरत असल्याचे पुरावे आपल्याला मिळाले आहेत. वास्तविक हा भाग जंजिर्याच्या सिद्दीच्या ताब्यात होता व सिद्दी धर्माने मुस्लीम होता परंतु या देवीची महती ऐकून त्यांनी कोणताही उपद्रव येथील भाविकांना दिला नाही. म्हसला गावातील अनेक समाजाचे लोक दरवर्षी देवी

दर्शनाला जात असतात. त्याच्याच पुढे गौलवाडी. दुर्गवाडी कोकणातील डोंगरात वसलेली खेडी आणि तेथील ग्रामीण जीवन प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळते.

९) **म्हसल्याचा ऐतिहासिक मासळी बाजार:** म्हसला तालूक्यातील सुक्या मच्छीचा बाजार हा ऐतिहासिक असून अनेक बाहेर गावातील व्यक्ती व व्यापारी म्हस्ल्यात येऊन सुकी मच्छी खरेदी करताना आढळतात. म्हसल्याचा हा ऐतिहासिक बाजार बुधवारी भरतो व तो सिद्दीच्या काळापासून भरत असल्याचे पुरावे जंजिरा ग्याझेट मध्ये आढळून येते. पर्यटन स्थळांचा विकास केल्यास या बाजारपेठेच्या विस्तारला मदत होईल. अश्या या मासळी बाजाराला स्थानिक प्रशासनाने मदत करणे गरजेचे आहे . आज अनेकाकडे स्व:ताच्या चार चाकी गाड्या झाल्याने ते दिघी, श्रीवर्धन, हरिहरेश्वर या ठिकाणी मासळी खरेदी सठी जातात परिणामी ग्राहकांची संख्या कमी झाल्याने अनेक व्यापारी या ऐतिहासिक बाजाराकडे फिरकेनासे झाले आहेत.

संदर्भ साधने

१) पराग पिंगळे ---- साद सागराची पृ. ४७
२) अर्थसंवाद ----- खंड ४०, अंक ४ एप्रिल – जून २०१४
३) Incredible India Brochure (2013) Govt. of India.
४) संतोष देशपांडे ----- रोड एटलस महाराष्ट्र

 ISSN 2231 4342

हैद्राबादच्या निजामाचे मराठवाड्यातील शेतकरी व शेतमजुरांविषयीचे आर्थिक धोरण व परिणाम

प्रा. डॉ. कोंडेकर आर. एस.
प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख,
संशोधन मार्गदर्शक,
राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड
जि.नांदेड
भ्रमणध्वनी – 9850881496
E-mail:Drkondekar9@yahoo.com

प्रस्तावना :

हैद्राबाद मुक्तीसंग्राम भारतीय स्वातंत्र्याचा अविभाज्य भाग होता. हैद्राबाद मुक्तीसंग्रामामुळे भारतीय राज्यघटनेला खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त झाला व लढ्यानंतरच्या काळात माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रयत्नाने देश एकसंघ बनला. त्याचे रूपांतर भारतीय संघराज्यात झाले. हैद्राबादच्या स्वातंत्र्य य लढ्यावर विभागीय पातळीरचे व सुक्ष्म पातळीवरचे संशोधन सुरू झालेले आहे. मात्र या संशोधनातून लढ्याचे अद्याप काही पैलू प्रकाशात येण्याचे राहून गेले आहे, कारण हैद्राबादचा लढा जनसामान्यांचा लढा होता. त्यात मराठवाड्यातील बहुसंख्य समाज सामील झाला होता. शेतकरी व शेतमजुरांची संख्या असामान्य होती. त्यांच्या संबंधाने तत्कालीन निजाम सरकारचे धोरण कशा प्रकारचे होते. त्यांची आर्थिक परिस्थिती कशी होती, निजाम सरकारच्या धोरणाचे तत्कालीन कृषीप्रधान समाजावर काय परिणाम झाले होते हे पाहणे अत्यंत महत्वाचे ठरते.

शेतकरी व शेतमजुरांची आर्थिक परिस्थिती :

निजाम सरकारच्या काळात कृषक समाजामध्ये विचार मांडण्यासाठी संघटना प्रस्थापित करणे आणि परिषदा घेणे व शेतकऱ्यांच्या प्रश्नाबद्दल विचार मांडणे यावर बंदी असल्यामुळे शेतकरी प्रतिकूल परिस्थितीमध्ये जीवन जगत होते.[1] 1920 ते 1932 या काळात जेव्हा लोक जागृती होऊन महाराष्ट्र परिषदेसारख्या सामाजिक संघटनेच्या स्थापनेस परवानगी दिली गेली आणि मराठवाड्यातील परतूर, लातूर, उमरी, औरंगाबाद व सेलू या ठिकाणी सामाजिक परिषदेची अधिवेशने होवू लागली. तेव्हा या विभागातील शेतकऱ्यांनी सामाजिक परिषदेच्या व्यासपीठाचा वापर आपले प्रश्न मांडण्यासाठी केला पण त्यासाठी सुद्धा निजाम सरकारची परवानगी घ्यावी लागत असे. अशा परिषदांमधून सामाजिक कार्यकर्ते सामान्य शेतकऱ्यांबद्दल विचार मांडू लागले. म्हणूनच 15 मार्च 1932, 19 मार्च 1932 च्या निजाम विजयामध्ये शेतकऱ्यांच्या आर्थिक संबंधात महाराष्ट्र परिषदेच्या व्यासपीठावरून केशवराव कोरटकर सारख्या कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रश्नांवर प्रकाश टाकलेला दिसतो व त्यास “निजाम विजय” या वृत्तपत्राने प्रसिद्धी दिल्याचे दिसते. त्यात केशवराव कोरटकर असे लिहितात

की, आमचे शेतकरी जमिनीचे मालक बनण्याऐवजी जमिनीवर राबणारे मजूर बनत चाललं आहे. दिवसेंदिवस त्यांच्या कब्ज्यातील जमिनी सावकारांच्या व इतर धनिक लोकांच्या ताब्यात जात आहेत.

शेतकरी अज्ञान व निरक्षर असल्यामुळे त्यांना योग्य परिस्थितीची जाणीव होणे कठीण आहे. परंतु त्यांची कारणे निश्चित करून काहीतरी उपाय योजना निश्चित केली पाहिजे. काही दिवसापूर्वी प्रो.अय्यंगर यांनी शेतकऱ्यांच्या परिस्थितीची चौकशी करण्याचा अहवाल दिला. पण तो अहवाल शितावरून भाताची परीक्षा या प्रमाणेच होता त्यामुळे त्याची अंमलबजवणी शक्य नाही.[2] यापुढे जावून शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा विचार करताना केशवराव कोरटकर पुढे लिहितात की, बरेचसे सरकारी अधिकारी स्वत:च जमीनदार बनत चालल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या हलाखीचा विचार सुचत नाही. विशेषत: तेलंगणात तर जमिनीचे पट्टे फार मोठ्या प्रमाणात देशमुख, देशपांडे, जमीनदार आणि अधिकारी अशा शेतीचा धंदा न करणाऱ्यांच्या नावाने आहेत. पट्टा खुद्द शेतकऱ्यांच्या नावाने असला पाहिजे, म्हणजेच सारावसुलीस थोडे कष्ट पडतात, परंतु त्याचा शेवट काय होणार ही कल्पना त्यांना येत नाही असे दिसते.

मराठवाड्यातील परभणी जिल्ह्याच्या बंदोबस्तासंबंधी एक रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यात सुनावणी झाल्यावर जमिनी, राजीनामा (कबुलीयतच्या नावाने) बदलण्याची परवानगी देण्यात आली व राजीनामा देण्याचा अधिकारही देण्यात आला.

थोडक्यात कर्जाच्या फेडी करण्यासाठी लोकांनी आपल्या जमिनी विकल्या व स्वत:स कर्जमुक्त करून घेतले. ज्या लोकांनी व वकिलांनी अशा जमिनी घेतल्या त्या त्यांच्या ताब्यात होत्या. त्यामुळे पूर्वीचे कर्जबाजारी आज सरकारच्या कर्जबाजाराच्या यादीत नाहीत.[3]

लक्ष्मण गोपाळ गानू यांनी शेतकऱ्यांच्या ऋणमुक्तीचा कायदा करावा अशी मागणी केली होती. त्यांचे असे म्हणणे होते की, मुंबई प्रांताचा कायदा व हैद्राबाद संस्थानचा कायदा ऋणमुक्तीच्या बाबतीत सारखाच आहे कारण कायद्याने शेतसाऱ्यास सावकाराच्या विरुद्ध मदत करण्याचे नाकारल्यास त्याची परिस्थिती “भिक नको पण कुत्रा आवर” असे म्हणण्यासारखी झाली होती.[4]

सरकारी को-ऑपरेटीव्ह खात्यातर्फे व बँकेकडून मदत न मिळाल्यामुळे शेतकरी अडचणीत येत होता. कोर्टात अपील करूनही न्याय मागितल्यास न्याय मिळणार नाही. त्यांच्या हक्कांशी पायबंद घालण्यात आला म्हणून ऋण मुक्तीचा कायदा सर्वंकष असावा. याशिवाय व्याजाचा दर शेतकऱ्याला दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या 18% ठरविण्यात आला आहे. हा ब्रिटिश हिंदुस्थानातील दरापेक्षा जास्त आहे. कर्ज फेडीसाठी जास्त सवड देणे, हप्ते बंदी करणे, व्याजाचा दर कमी करणे, जमिनीच्या कर्जाबद्दल डिक्री झाल्यास पुन्हा कर्जाची परतफेड करण्यास सवड देणे, व्याजदर कमी करण्याचा अधिकार कोर्टात देणे, 12 वर्षापूर्वी लिहून दिलेल्या विक्रीपत्रास रद्द करणे, रजिस्ट्री झालेल्या दस्ताऐवजावरून दावा असल्यास मुदत देणे, रोकडीचा दावा असल्यास सहा वर्ष मुदत देणे. या मागण्या शेतकऱ्यांच्या ऋणमुक्ती कायद्यात समाविष्ट कराव्यात अशी मागणी होती. पण याकडे सरकारचे लक्ष नसल्यामुळे शेतकऱ्यांची समाजात पत राहिलेली नव्हती. म्हणून पुढील काळात ज्या पाच

ISSN 2231 4342

सामाजिक परिषदा झाल्या (कवाना, हदगाव, नांदेड, गुलबर्गा व नांदेड) त्यामध्ये शेतकऱ्यांच्या परिस्थितीवर ठराव झालेले दिसतात.[5]

निजामाचे शेतीविषयक धोरण :

निजाम सरकारच्या शेतीविषयक धोरणात कधीही स्थिरता नसे. सरकारचे शेतसाऱ्याविषयक धोरण अस्थिर होते. ते राज्यकर्त्यांच्या लहरीनुसार बदलत असे.

1. बंगाल प्रांतातील कायमधारा सारखी पद्धत निजाम राज्यामध्ये नव्हती. एकूण उत्पन्नाचा 5/6 एवढा शेतसारा द्यावा लागत असे.
2. शेतीविषयक प्रशासनाचा खर्च जास्त होता. तोही शेतीच्या साऱ्यातून घेतला जात असे. त्यामुळे शेतकऱ्याला वेळेवर सारा भरणे शक्य हात नसे.
3. शेतकऱ्यास साऱ्याबरोबरच इतर कर भरावे लागत असे. त्यात अबकारी कराचा समावेश होता. दुष्काळ प्रसंगी निजाम सरकार दुष्काळाला तोंड देण्यासाठी काहीही उपाय योजना करीत नसे. त्यास सावकाराच्या दाराशी जावे लागत असे. 1935 ला तीव्र दुष्काळ पडला होता.
4. शेतकऱ्यास लेव्हीची जबरदस्ती मोठ्या प्रमाणात होती आणि खालसा, पागा, जहागिरीमधील महसूलाचे कायदे वेगवेगळे होते. बंदोबस्ताचा कायदा समान नव्हता.
5. ऋणमुक्तीच्या कायद्यातही निजाम सरकार शेतकऱ्यांऐवजी सावकारास संरक्षण देत असे.
6. सहकारी खाते आणि बँका शेतकऱ्यास मदत करत नसत.

व्याजाचा दर हा 18% हून जास्त होता. शिवाय सिंचनाच्या सोयीचा अभाव असल्याने शेतकऱ्याचे जीवन जिरायत शेतीवर अवलंबून होते. तो अंगवस्त्रालाही महाग होता असे शिवाय शेतीसाठी लागणारे अवजारे, बी-बियाणे व औषधी याचा तर पत्ताच नसे. म्हणून तर 9 मे 1933 निजाम विजयामध्ये पान नं.116 वर व्याजाचे दर कमी होतील काय? अशा प्रकारची मागणी केलेली दिसते. सर्वसाधारण शेतकऱ्याचे वार्षिक सरासरी उत्पन्न जास्तीत जास्त 225 रु. होते. त्यामुळे निजाम सरकारच्या विरोधात शेतकरी महाराष्ट्र परिषदेच्या व्यासपीठावर हजारोच्या संख्येने उपस्थित राहात आणि आपल्या प्रश्नांना वाचा फोडत असत. मात्र या काळातील शेतकऱ्यांची नैतीकता उच्च दर्जाची होती. म्हणूनच निजाम सरकारची शेतीविषयक धोरणे प्रतिकूल असूनही शेतकरी आत्महत्या करत नव्हते.

उलट सरकारकडे परिषदांकडून ठराव घेवून हक्कांच्या मागण्यासाठी लढा देण्यासाठी तयार होते. स्वातंत्र् य सेनानी गोविंदभाई श्रॉफ.[6] या काळातील शेतीविषयक विश्लेषण करताना म्हणतात की, मराठवाड्यात शेती न करणारे 4 लक्ष 76 हजार 715 पट्टेदार होते, त्याचे शेकडा प्रमाण 12.2 होते. शेती करणारे मालक 12 लक्ष 45 हजार 449 त्याचे प्रमाण 31.9 होते. शेतीवर राबणाऱ्या मजुरांची संख्या 16 लक्ष 15 हजार 158 त्याचे प्रमाण फक्त 2.5 एवढे होते. कोरडवाहू जमिनचे प्रमाण 47.6 पडीत जमिनीचे प्रमाण 14.4 तर एकूण जमिनीचे क्षेत्रफळ 64.5 होते. त्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी उदरनिर्वाह करू शकत नव्हता. कर्जाचे ओझे पेलू शकत नव्हता. शेतीवर राबणाऱ्या मजुरास 4 आणे, स्त्रियास 2 आणे तर मुलांना 1 आणा अशी मजुरी दिली जात होती.

 ISSN 2231 4342

दळणवळणाच्या सोयीचा अभाव होता. एकूण नागरांची संख्या 1662 होती. दळणवळण बैलगाडीने चाले. शेतीला पाणी देण्यासाठी 446 ऑईल इंजिन होते व बैलांची संख्या 34 लक्ष 37 हजार 12 होती. म्हणजे शेती बैलावरच आधारलेली होती. त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे उत्पन्न वर्षाला फक्त 150 रु. होते.[7] निजाम राज्यातील शेतकरी उपासमारीने ग्रस्त होते. बहुसंख्य शेतकरी समाजामध्ये असंतोष निर्माण झालेला होता.[8] अबकारी कराच्या बाबतीत निजाम सरकारने 25% पासून 75% पर्यंत वाढ केली होती. अफु, गांजा मध्ये सुद्धा 25% ची वाढ केली होती. सरकार असे सांगत असे की,

1. दारुची दुकाने कमीत कमी ठेवा.
2. दारू व इतर पदार्थंच्या वाटपासाठी रेशनींग दुकाने स्थापन करा.
3. त्यामधील एक्साईज ड्युटीमध्ये वाढ करा.
4. दारूची परवाने जास्त काळासाठी वाढवा.

जेणेकरून कमीत कमी दारू विक्री आणि जास्तीत जास्त नफा हे तत्व सांगितले जात होते. पण प्रत्यक्षात हैद्राबाद राज्यात दारूचा खप संस्थेच्या प्रमाणात देशाच्या इतर प्रांतापेक्षा खूप जास्त होता. त्यामुळे राज्यातील बहुसंख्य जनता आर्थिकदृष्ट्या गांजलेली होती. मात्र रेशनींगमुळे काही प्रश्न मिटणार नव्हता. निजाम सरकारने स्थापन केलेली ही व्यवस्था एक वर्षाच्या आतच संपुष्टात आली. कारण महसूलाधिकारी भ्रष्ट आणि अकार्यक्षम होते. त्यामुळे जरी उत्पन्न वाढले असले तरी शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच होती. सक्तीच्या लेव्हीच बाबतीतही असे घडत होते. सामान्य जनतेस रेशनींगचे धान्य मिळावे म्हणून 1944 च्या मे महिन्यात रेशनींग पद्धतीची स्वीकार केला गेला. त्यासाठी 8 लाखाचे बजेट दिले गेले. हे बजेट 1948 पर्यंत 15 लाखावर पोहोचले. शेवटी हा खर्च 21 लाखावर गेला. तरीही त्याचा फायदा फक्त मुस्लिमांनी घेतला. हिंदूंना मात्र उपासमारीला तोंड द्यावे लागले. 1948 मध्ये तर निजामचे महसूल उत्पन्न 9 कोटी रु. होते. त्यामध्ये दिवाणी महसूल, अबकारी कर, कंपलसरी लेव्ही आणि आयात या सगळया गोष्टी ध्यानात घेवूनही सामान्य जनतेपर्यंत काहीही पोहचत नव्हते. उपासमारीने त्रस्त झालेले बहुसंख्य शेतकरी निजाम सरकारविरुद्ध संधीची वाट पाहत होते. सक्तीच्या लेव्ही पद्धतीत 1945-46 मध्ये 17.22 लाख पल्ले धान्य, 1946-47 मध्ये 17.28 लाख पल्ले धान्य तर 1947-18 मध्ये 19.28 लाख पल्ले धान्य ज्याची किंमत रूपयांमध्ये 1945-46-328.59 लाख रू.1947-48-320.21 लाख रू. म्हणजेच लेव्हीचे उत्पन्न 7 कोटीच्या आसपास होते. प्रत्यक्षात शेतकऱ्यास मात्र उपासमारीला तोंड द्यावे लागले.[9]

निजाम सरकारचे कामगार विषयक धोरण :

मालकी शेती नसलेल्या मजुरांचा प्रश्न तसाच शिल्लक होता. शेती नसलेल्या मजुरांचे प्रमाण जवळ जवळ निम्मे होते. जमिनी नसलेल्या मजुरांचे प्रमाण सारखे वाढत राहते व त्यांचे प्रश्न सोडविल्याशिवाय शेतीविषयी आर्थिक स्थिती, असमाधान, असंतोष आणि व्देष हे प्रश्न तसेच शिल्लक राहतात. शिवाय शेतीला जोडून ग्रामीण उद्योगाकडे दुर्लक्ष केले गेले. मनुष्य बळाचा विकास खुंटला. रस्ते, वाहतूक, पाणीपुरवठा हे प्रश्न गंभीर बनले आणि त्यामुळे शेती क्षेत्रातील असंतोष सरकारच्या विरोधात कायम राहिल आणि सरकारच्या विरोधात शेतकरी संधीची वाट बघू लागला म्हणूनच निजाम राज्यात शेतकऱ्यांची बंडे झालेली दिसतात.[10]

अशाही परिस्थितीमध्ये निजामाच्या दु:खाला वाचा फोडण्यासाठी शेतकऱ्यांच्या संघटनांनी 'Food rationing is a democratic right of the people' असे म्हणून मागण्या केल्या होत्या.

1. निजाम सरकार साठेबाजावर उपाय योजना करू शकत नाही कारण सरकारचे धोरण त्यांना अनुकूल आहे.
2. सरकारचे अधिकारी भ्रष्ट असून ते जनतेचे व देशाचे शत्रू आहेत.
3. सरकारची अन्नधान्याविषयी कमकुवत धोरणे आणि रेशनींगमधला गोंधळ यामुळे जनतेच्या अडचणीत भर पडत होती.

अशा प्रकारचे हे पत्रक शेतकरी संघटनेच्या वतीने वितरीत जरी करण्यात आले तरी त्यामुळे निजाम सकारने गृह खात्यामार्फत 23 नं. चा हुकूम काढून 4-6-1944 ला त्यावर बंदी घातली म्हणून शेतकरी संघटनांनी रेड्डी हॉस्टेलमध्ये बैठक बोलावली व हैद्राबाद 'Food Relief Association' कायम करण्याचे ठरवले. 1943 मध्ये त्यासाठी कमिटी कायम करण्यात आली. कमिटीचे प्रमुख (1) राजबहादर व्यंकट रामारेड्डी, (2) पोलीस कमिशनर, (3) मिस पद्मजा नायडू, (4) मिर अकबर अलीखान, (5) नवाब बहादूर यार जंग, (6) बी.राम किशनराव, (7) काजी अब्दुल गफार, (8) एम. नरसिंगराव, (9) मकसूद अहमद, (10) मोहम्मद अली मुसावी हा संघटनेचा सेक्रेटरी होता.

कमिटीने प्रत्येक मुन्सीपल वार्डात स्वस्त धान्यांची दुकाने काढण्याचे ठरविले पण ही योजना फक्त एकच वर्ष चालली. गैरव्यवस्था आणि भ्रष्टाचार यामुळे ती नष्ट झाली. त्यामुळे कठीण परिस्थितीत सामान्य लोकांना सरकार अन्नधान्य पुरवू शकले नाही व यातून असंतोष निर्माण होवून मजूरांच्या संघटना तयार झाल्या.[11]

मराठवाड्यातील शेतकरी व शेतमजुरांमध्ये असंतोष जनक परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी ज्याप्रमाणे महाराष्ट्र परिषदेच्या व्यासपीठाचा उपयोग करत होते. तशा प्रकारची निकड शेतकऱ्यास जाणवली म्हणून सुरूवातीला काही औद्योगिक कामगारांच्या मदतीने 'कॅलेन्डर कंपनी वर्कर्स युनियन' ही मजूर संघटना सिकंदराबाद येथे स्थापन केली होती. त्यास कॉम्रेड असोसिएशन असे म्हटले जाते. सुरूवातीला या संघटनेचे अध्यक्ष पूर्वीचे राष्ट्रपती व्ही.व्ही.गिरी हे होते. सिकंदराबादच्या कामगारांच्या संघटनेत लालागुडा वर्कशॉपचे कामगार सामील झाले. याच धर्तीवर 1927 ते 1935 मध्ये औरंगाबादची गिरणी कामगार संघटना कायम केली गेली व त्यास मुंबई कामगार संघटना जोडली गेली. यावेळी मराठवाड्यातून कॉ.चौधरी, कॉ.व्ही.व्ही.देशपांडे, कॉ.अनंत नागापूरकर, कॉ.सय्यद मकदूम, कॉ.हबीबउद्दीन, कॉ.करूणा चौधरी, कॉ.विजयेंद्र काबरा, विठ्ठल जाधव, अतहर बाबर, मनोहर जवगावकर, डॉ.बी.पी.मिश्रा यांनी चळवळीत भाग घेवून ते यशस्वी केले. 1938 मध्ये मुंबई क्रॉनिकलचे संपादक सय्यद अब्दुल्ला ब्रेलव्ही यांच्या अध्यक्षतेखाली मजुरांची एक परिषद औरंगाबादेत झाली. त्यामुळे मजूर चळवळीला गती मिळाली. 1940 मध्ये नांदेड येथील उस्मानशाही मिल, औरंगाबादची कापड गिरणी तसेच जालना, वैजापूर, नांदेड व औरंगाबाद येथील बिडी कामगारांच्या संघटना नांदेड, पूर्णा, जालना व औरंगाबाद येथील रेल्वे व बस कामगार या चळवळीत सामील झाले आणि मजुरांचे एक

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

मोठे चळवळीचे केंद्र मराठवाड्यात स्थापन झाले. यांनीच पुढे औरंगाबाद आणि नांदेड या ठिकाणी निजाम सरकारच्या विरोधात लढे उभे केले व निजाम सरकारकडे खालील मागण्या केल्या होत्या.

1. आठ तासाचा कामाचा दिवस असावा.
2. पगार वाढ मिळावी.
3. चांगले राहणीमान व इतर सोयी मिळाव्यात यासाठी 72 दिवसांचा संप झाला.

निजाम सरकारने संप दडपण्याचा प्रयत्न केला आणि कॉम्रेड करूणा चौधरी, माणिकभाई कपाडीया, कॉ.सय्यद व कॉ.बन्सी झांगरे यांनी यात भाग घेतला. त्यांचे नेतृत्व राजबहादूर गवळी यांनी केली. या लढ्यात निरनिराळ्या कामगारांच्या संघटना सामील झाल्या. निजाम सरकारला याची दखल घ्यावी लागली व त्यांच्या मागण्या पूर्ण कराव लागल्या. हे केवळ निजाम सरकारच्या मजूर विरोधी धोरणाची परिणिती होती.[12]

रझाकारी केंद्रे आणि जकातनाके यावर शेतकऱ्यांनी केलेले हल्ले :

स्टेट कॉंग्रेसची जेवढी भूमिगत केंद्रे होती तेवढीच रझाकारांची पण केंद्रे स्थापन झालेली होती. शिवाय या रझाकारांना निजाम सरकारच्या आशीर्वादाने पोलीसांकडील स्वयंचलीत शस्त्रे देण्यात आली व त्यांचा पाठींबाही होता. शिवाय खाकसार आणि महसूलाधिकारी हे ही रझाकारी केंद्रावर सामील झाली होती. अशा प्रकारची रझाकारी केंद्रे मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात स्थापन झाली. सर्व रझाकारी केंद्रावरील रझाकारांची संख्या, त्यांचा नेता कासिम रझवी यांच्या प्रयत्नाने अडीच लाख झालेली होती. त्यामुळे मराठवाड्यातील ही रझाकारी केंद्रे उध्वस्त करण्याचे काम भूमिगत केंद्रावरील शेतकऱ्यांना लष्करी हल्ले करून केले व ती केंद्र उध्वस्त केली गेली.

जकात नाक्यावरील हल्ले :

सरहद्दीवर राज्याच्या सर्व बाजूंनी निजाम सरकारने जकात नाके कायम केलेली होती व जकात जबरदस्तीने वसूल कली जात असे. या ठिकाणी स्त्रियांचाही छळ केला केला जात असे म्हणून भूमिगत केंद्रावरील किसान दलानी त्यांच्यावर हल्ले करून 500 जकात नाके मराठवाड्यात उध्वस्त केले. शेतकऱ्यांच्या याच चळवळीला मोठ्या प्रमाणावर पाठबळ मिळाल्यामुळे दारूच्या मक्त्यावरील कर बुडविण्यासाठी शेतकऱ्यांनी मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यात सिंधीची झाडे तोडून जंगल सत्याग्रह केला. त्यामध्ये परभणी जिल्हा आघाडीवर होता. संपूर्ण मराठवाड्यात शेतकऱ्यांनी अडीच लाखाहून जास्त सिंधीची झाडे तोडून जंगल सत्याग्रह केला. त्यात पाटनूरचा जंगल सत्याग्रह खूपच प्रसिद्ध होता. तो पोलीस कारवाईच्या एक दिवस अगोदर करण्यात आला. एवढेच नव्हे तर निजाम सरकारची यंत्रणा खिळखिळी करण्यासाठी शेतकरी व शेतमजुरांनी मोठ्या प्रमाणावर निजाम सरकारच्या महसूल अधिकाऱ्यांना आपले लक्ष बनविले आणि त्यातूनच किसानदलांनी किरगूळ-बुजरूग, येताळा, इजळी, मेंडका, तुप्पा या ठिकाणी असलेले निजाम सरकारचे महसूलाधिकारी (तहसीलदार) यांच्यावर हल्ले करून त्यांना दगडांनी ठेचून मारले व आपला असंतोष शेतकरी व शेतमजुरांनी या कृतीव्दारे स्पष्ट केला.

ISSN 2231 4342

मराठवाड्यातील शेतकऱ्यांची बंडे :

मराठवाड्यातील सातही जिल्ह्यापेक्षा नांदेड जिल्ह्यामध्ये सशस्त्र चळवळ उग्र होती. त्याचे कारण नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा असंतोष होता. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारशी संघर्ष करून श्री गोविंदराव पानसरे हे अर्जापूर या ठिकाणी हुतात्मा झाले होते. रझाकार व पोलीसांवरील शेतकऱ्यांचा राग अनावर झालेला होता म्हणूनच गोविंदभाई श्रॉफ आपल्या मुलाखतीत असे म्हणतात की, ''मराठवाड्यातील नांदेड जिल्हा एक असा होता की, त्यांनी निजाम सरकार विरुद्ध बंडाचा झेंडा उभा केला. त्या मागची पार्श्वभूमी म्हणजे निजाम सरकारने शेतकऱ्यांवर केलेले अन्याय व अत्याचार होय. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून जनतेत जो असंतोष निर्माण झाला होता त्याचा पहिला उद्रेक नांदेडमध्ये झाला.''[13] नंतर तो इतर जिल्ह्यात पसरला.

नांदेड सरहद्दीवर विडूळ, उमरखेड, वाशिम, चांदा, धानोरा व शेंबाळप्रिंपी ही महत्वाची सशस्त्र केंद्रे होती. काँग्रेसचे बहुतेक कार्यकर्ते या केंद्राशी संबंधीत होते. त्यामुळे या जिल्ह्यातील कृती समितीचे कार्यक्रम सर्व केंद्रांना माहित असत. उमरखेड, विडूळ कॅम्पवर एकूण चारशे प्रशिक्षीत स्वातंत्र्य सैनिक असत. या केंद्राने उमरखेड, कोळी, इस्लापूर, सहस्त्रकुंड आणि उमरी या ठिकाणी रझाकारी केंद्रावर हल्ले चळविले आणि पूर्णा, तळणी, कोळी, मालेगाव या ठिकाणचे करोडगिरी नाके उध्वस्त केले. इस्लामपूरच्या रझाकारी केंद्रावर स्टेट काँग्रेसचे कार्यकर्ते आणि रझाकार यांच्या संघर्ष झाला. या हल्ल्यात दोनशे 'Village Home Guards' नी भाग घेतला. पण एकटे वायपनकर हल्ल्यात सापडले त्यामुळे त्यांना या ठिकाणी हौतात्म्य पत्करावे लागले.[14] नांदेड जिल्ह्यात अर्जापूर हे केंद्र सर्वात मोठे होते. या केंद्रावर अडीच हजार प्रशिक्षीत सैनिक होते. त्यामुळे केंद्र यावरील हालचालींकडे महाराष्ट्रातील अनेक लोकांचे लक्ष होते.[15]

चांदा कॅम्प :

चांदा कॅम्पवरील गोविंदभाई श्रॉफ, डॉ.मेलकोटे, प्राणेशाचारी, माडा पाटील रामचंद्रराव, व्ही.बी.राजू यांनी चांदा कॅम्पला भेटी देवून या ठिकाणच्या भूमिगतांची बौद्धीके घेतली. तसेच या कॅम्पला जयप्रकाश नारायण, कृती समितीचे अध्यक्ष डी.जी.बिंदू आणि अरूणा असफअली यांनी भेटी देवून बैठका घेतल्या.[16] या कॅम्पच्या कार्यकर्त्यांकडे रेल्वेसेवा विस्कळीत करण्याचे काम देण्यात आले होते. वरंगल ते चांदा रेल्वे लाईन, मनमाड ते नांदेड रेल्वे लाईन, वरंगल ते बेजवाडा आणि बल्लारशहा मोहरीया या दरम्यानचे रेल्वे लाईन व रेल्वे पूल उडवून देण्याचे काम केले. या घातपाती कारवाया फेब्रवारी 1948 मध्ये केल्या. परतीयाला हे बेट स्टेट काँग्रेसने निजामाच्या ताब्यातून स्वतंत्र केले होते. बिचकुंदा या ठिकाणी रझाकारांबरोबर असाच संघर्ष झाला. या संघर्षात सात निजामी पोलीस व एक सब इन्स्पेक्टर मारला गेला. कल्याळी या गावामध्ये देखील रझाकारांबरोबर संघर्ष झाला. हा संघर्ष कल्याळी गावातील शेतकरी, स्टेट काँग्रेसचे कार्यकर्ते यांनी गावच्या संरक्षणासाठी सतत तीन दिवस रझाकारांशी लढा दिला. त्यामध्ये 80 लोक हुतात्मा झाले व 100 रझाकारांना प्राण गमवावे लागले.[17]

3 मे 1948 ला मुगट आणि शिवणगाव या रेल्वे स्टेशनवर रझाकारांनी हल्ले चढविले पण काँग्रेस कार्यकर्त्यांनी ते परतावून लावले. भोकर, किवणा, अंबीवळसा या ठिकाणी रझाकारांबरोबर संघर्ष होवून स्टेट काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर हल्ले करून त्यांना पळवून लावले.[18]

निजाम सरकारने 27 जानेवारी 1948 ला स्वामी रामानंद तीर्थांना अटक केली.[19] त्याबद्दल '27 जानेवारी 1948 च्या टाईम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्रात असा उल्लेख आढळतो की, 'स्वामी रामानंद तीर्थ व हैद्राबाद स्टेट काँग्रेसचे अध्यक्ष यांना हैद्राबाद सुरक्षा कायद्यानुसार पोलीसांनी आज सकाळी अटक केली कारण स्वामीजींनी सभाबंदी हुकूम मोडून एक वाजता सभेत भाषण केले. त्यांच्या सोबत असलेले काशिनाथ वैद्य यांनाही अटक करण्यात आली. अटक होत असताना स्वामीजी म्हणाले सभाबंदीचा कायदा मोडलेला आहे. हा सशस्त्रा व अहिंसक लढा चालूच राहील.'

1948 मध्ये नांदेड जिल्ह्यात निजामी अधिकारी कायदे धाब्यावर ठेवून मन मानेल तसे शेतकऱ्यांवर लेव्हीची आकारणी करू लागले. शेतकऱ्यांनी पिकवलेले धान्य त्यांच्या उपयोगासाठी ठेवण्याचे दूरच पण आकारलेली लेव्ही देण्यासाठी त्यांना धान्यही खरेदी करावे लागत होते. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निजाम सरकारविरोधी असंतोष वाढत होता. शेतकरी व कार्यकर्ते जुलूमाला वाचा फोडत असत. नांदेड तालुक्यातील मेंडका या गावच्या सर्व शेतकऱ्यांची ज्वारी रामराव नावाच्या तहसीलदाराने जप्त केली. त्याची तक्रार शेतकऱ्यांनी कलेक्टरकडे केली. कलेक्टरने तहसीलदारास कार्यकर्त्यांसमोर बोलाविले. कलेक्टरने लेव्हीची ज्वारी ठरवून बाकीची परत करण्याचा हुकूम तहसीलदाराला दिला तरी त्याने मानले नाही. या तहसीलदाराने लेव्हीसाठी इजळी गावचे सारे धान्य एकत्र करून जप्त केले. इजळीचे शेतकरी चिडले. त्यामुळे मेंडका व इजळीच्या लोकांनी रामराव या तहसीलदाराचा राग प्रगट केला.[20]

नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यात जागृती करण्याचे काम अनंत भालेराव, जीवनराव बोधनकर, उमरी येथील काशिनाथ सेठी यांनी केले. शेतकऱ्यांनी घेतलेल्या निर्णयात असे ठरविण्यात आले की, शेतकरी आता अन्याय व जुलूम सहन करणार नाहीत आणि बेकायदेशीर मार्गाने लेव्ही आकारली जावू नये अशी मागणी केली. परंतु निजाम सरकारच्या अधिकाऱ्यांनी पोलीस बंदोबस्तासह लेव्ही वसूल करायची असा निर्णय घेतला.

लेव्ही वसूलीसाठी ते किरगुळ-बुजरूगला आले. 5 मे 1947 ला ही बातमी किरगुळमध्ये कळताच शेतकरी मोठ्या प्रमाणावर जमा झाले. आपल्याजवळ असलेली शस्त्र घेतली. लेव्ही मागणीसाठी शिपायाकडून पुकारा झाला की शेतकरी अधिकाऱ्यांकडे आपल्या हातातील शस्त्रे घेवून त्यांना जवळून रामराम करून जात असत. त्यामुळे अधिकारी चिडले. लेव्ही अधिकाऱ्यास शेतकऱ्यांनी वेढले आणि त्यांनी मुधोळला परत जावे असे सांगितले.

निष्कर्ष :

1. या सर्व परिस्थितीची जाणीव शेतकऱ्यांनी नांदेडचे कलेक्टर शहाबुद्दीन यांची भेट घेवून करून दिली. शेतकऱ्यांवरील फौजदारी खटले मागे घ्यावे असा निर्णय दिला गेला.
2. नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे नेते जीवनराव बोधनकर यांच्यावर मुधोळ तालुक्यात प्रवेश बंदीचा हुकूम बजावला व शहाबुद्दीन स्वत: दोन महिन्याच्या रजेवर निघून गेले. त्याच्या जागी 'विल्यम बट' ची नेमणूक करण्यात आली.

ISSN 2231 4342

3. बटने औरंगाबादचे कमिशनर बिलग्रामी यांच्या मदतीने पुन्हा करगुळ-बजुरूगमध्ये लेव्ही गोळा करण्याचा प्रयत्न केला पण तो असफल ठरला.
4. शेतकऱ्यांनी व त्यांच्या स्त्रियांनी लेव्ही देण्याचे नाकारले. तेव्हा तिथे गोळीबार करण्यात आला.
5. त्यामुळे शेतकरी चिडले, काय करायचे ते करा, मारा, लुटा पण आम्ही आमच्या हाताने लव्ही देणार नाही.
6. त्यामुळे निजामी अधिकाऱ्यांना रिकाम्या हाताने परत जावे लागले.
7. 1947 आणि 1948 मध्ये मराठवाड्यातील लोक विशेषत: शेतकरी स्वत:च्या जीवावर उदार होवून निजाम सरकारशी लढा देण्यास सज्ज झाले.
8. मेंडका, इजळी, येताळा, किरगुळ-बुजरूग या ठिकाणच्या शेतकऱ्यांचा व शेतमजुरांचा सिंहाचा वाटा होता.
9. निजाम सरकारला लेव्ही वसुलीच्या ऑर्डर्समध्ये 1948 ला फर्मान काढून बदल करावे लागले. पूर्वीच्या पेक्षा अर्धी लेव्ही घ्यावी असा उपाय काढण्यात आला.
10. हा शेतकरी व शेतमजुरांनी केलेल्या चळवळीचा विजय म्हटला पाहिजे.

संदर्भ :

1. Administrative Report of H.E.H. Nizam's Dominions 1937-38, Page No.37, 40, 42.
2. निजाम विजय – मगळवार, 15 मार्च 1932.
3. कित्ता- निजाम विजय – मगळवार, 15 मार्च 1932, पृ.20.
4. निजाम विजय- 28 फेब्रुवारी1933, खंड तिसरा, पृ.96.
   निजाम विजय- 7 मार्च 1933, लक्ष्मण गोपाळ गानू, लेखांक नं.2, पृ.97,98.
   निजाम विजय- 28 मार्च 1933, लक्ष्मण गोपाळ गानू, लेखांक नं.3, पृ.101, 102, 103.
5. निजाम विजय- 7 एप्रिल 1933, लक्ष्मण गोपाळ गानू, लेखांक नं.4, पृ.104, 105.
   निजाम विजय- 18 एप्रिल 1933, लक्ष्मण गोपाळ गानू, लेखांक नं.5, पृ.113, 114, 116.
6. निजाम विजय- 23 मे 1933, लेखांक नं.7, खंड तिसरा, पृ.130.
7. गोविंदभाई श्रॉफ – विचार पर्व, प्रकाश – विजय दिवाण, प्रथम आवृत्ती, 24 जुलै 2004, पृ.26/2.
8. गोविंदभाई श्रॉफ – विचार पर्व, प्रकाश – विजय दिवाण, प्रथम आवृत्ती, 24 जुलै 2004, पृ.26.
8. C.V.S. Rao – Review of Hyderabad Finance – Govt. Press Hyderabad 1951, Page No. 72, 73, 74, 75, 132, 133, 142.
10. C.V.S. Rao – Review of Hyderabad Finance – Govt. Press Hyderabad 1951, Page No. 143, 206, 207.

ISSN 2231 4342

11. गोविंदभाई श्रॉफ – विचार पर्व, प्रकाश – विजय दिवाण, उपरोक्त, पृ. 30, 31, 32.
12. V.H.Desai and C-Sudarhan – Saga of Hyderabad Liberation Struggle in Indian freedom movement S.R.T.M.C. Publication, Hyderabad, Page No.195, 196.
13. File No. 5 (7) P- (S) 1947 (Political and Constitutional) Group-1 (Secret)- Resident Herbert's Report from Hyderabad, National Archives, New Delhi, 1947, Page No. 1, 2.

    G.M. Shroff (Aurangabad) – Freedom Weekly, Page No.1.
14. साहेबराव बापू बारडकर व नरहर कुरुंदकर यांच्या व्यक्तिगत मुलाखती (डॉ.बी.एस.ढेंगळे यांनी घेतलेल्या मुलाखती)
15. सावरमैल जैन – किता.
16. P.V. Gadgil – Lokmanya Weekly, News Papers File, A.P. State Archives, Hyderabad, 1947, Page No.1.
17. Democrat Weekly – Sunday, 25-09-1948, Page No.4.
18. File No.91 (1948) – C.I.D. Report for the month of May 1948, C.I.D. Special Branch, (Secret 173) A.P. State Archives, Hyderabad, Page No.5.
19. मराठवाडा, दिवाळी अंक – किरगुळच्या शेतकऱ्यांचा लढा, लेखक जीवनराव बोधनकर, 1972, पृ. 163.
20. मराठवाडा, दिवाळी अंक – किरगुळच्या शेतकऱ्यांचा लढा, लेखक जीवनराव बोधनकर, 1972, पृ. 164.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal **ISSN 2231 4342**

सण, उत्सव व पर्यावण

Telsang Hanamant Bhimrao
(M.A.B.Ed. History, Ph.D. Apear)
Mo. No. -9975978224 , 8055322111
hanumanttelsang@gmail.com
At/Post-Akluj(Vyankatnagar)
Akluj Pin - 413101
Tal - Malshiras , Dist - Solapur

प्रस्तावना-

भारतीय सण म्हणजे निसर्गाची पूजा करणे,असे आपण म्हणतो आणि मानतो.भारतीय संस्कृती हिनिसर्गाच्या अधिक जवळ जाणारी संस्कृती आहे.पुरातनकाळापासून आजपर्यंत आपण सर्वजण मानतो की, भारतीय संस्कृती हि निसर्गाला खूप जवळ आहे.यामध्ये वृक्षाची पूजा करणे, सूर्याला नमस्कार करणे, पावसाची पूजा करणे इ.यामुळे भारतीय संस्कृती निसर्गाच्या सानिध्यात आहे.आपणनिसर्गाचा उपयोगच नव्हे, तर पुरेपूर फायदा करून घेतो. याचा निसर्गावर विपरीत परिणाम होत आहे. आधुनिक काळामध्ये जसा आपल्या दैनंदिन जीवन पद्धतीत बदल झालेला आहे, तसाचआपल्या सध्याच्या राहणीमानामध्ये आणि सण,उत्सव साजरा करण्याच्या पद्धतीमध्येसुद्धा अमुलाग्र बदल झालेले आहेत. ह्या बदलामुळे पर्यावरणाची खूप हानी होत आहे,पर्यावरणाचे नुकसान होत आहे. आपण सण-उत्सव साजरा करीत असताना पर्यावाणाची हानी होण्यामागे आपलाचहातभार आहे, यामध्ये बदल करणे गरजेचे आहे.

अभ्यासाचा उद्देश-

1)सण-उत्सवांचा पर्यावरणावर होणारा परिणामांचा अभ्यास करणे.

2) ध्वनी प्रदूषणाचा अभ्यास करणे.

3) सण—उत्सवामुळे मानवी जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे.

4) वायूप्रदूषण, जलप्रदूषण इ.चा अभ्यास करणे.

5) प्रदूषणाबाबत उपाययोजना करणे.

सण, उत्सव व पर्यावण-

माणूस हा निसर्गाचा पुजक आहे.यानिसर्गामध्येसण-उत्सव साजरे करीत असताना आपल्याला मानसिक प्रसन्नता मिळावी, आनंद घेता यावा,आपला लाभ व्हावा, हा यापाठीमागे माणसाचा उद्देश असतो. परंतुहे करीत असताना आपली संस्कृती लोप पावण्याच्या मार्गावर आहे. सण—उत्सव साजरा करीत असताना

निसर्गावर आघात करून आपण आनंद घेत आहोत. हाआनंद घेत असताना आपण निसर्गाचा व पर्यावरणाचा विचार न करता, त्यांचा पुरेपूर उपयोग करून घेत आहे. मात्र त्याचे विपरीत परिणाम होत आहेत.

आनंदघेताना पर्यावण बिघडते-

शहरातप्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये प्रदूषण होत असते. दिवाळी काळामध्ये मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतिषबाजी होते, त्यामुळे खूप प्रदूषण होते.यासाठी फाटाकेविरहित दिवाळी साजरे करणे गरजेचे आहे.हे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी जनतेमधूनच जन—जागृती होणे गरजेचे आहे.अतितीव्रतेच्या फाटाक्यामुळे काही लोकाना त्रासहोतो.लहान मुलांना,वृद्ध लोकाना याआवाजाचा त्रास होतो. वाढदिवसाचेकार्यक्रम करणे,लग्नाची वरात असो,निवडणुका जिंकणे असोकिंवा अन्य कार्यक्रम असो यावेळी आपण आनंद व्यक्त करतो.यादरम्यान आपण फटाक्यांची आतिषबाजी करतो. यांमुळे पर्यावरणाचे प्रदूषण होण्यासाठी आपण हातभार लावतो.फटाक्यांच्या आतिषबाजीनेच आपणाला आनंद साजरा करता येतो, असे नाही. कार्यक्रमअथवा सण-उत्सव प्रसंगीआपणाला अनेक समाजोपयोगी कामे करून देखील हा आनंद घेता येतो. यातून निसर्गाची जोपासना होऊ शकते. दिवाळीसारख्या सणाने नागरिकामध्ये एकोपा वाढीस लागतो. एकमेकांमध्ये असणारी कटुता कमी हाते.दुस-यांच्या जीवनामध्ये आनंद देता यतो,यामुळे आपणालाही छान वाटते.मात्र ध्वनी आणि वायुप्रदूषण निर्माण करणारे फटाके फोडल्यास आपणास मिळणा-या आनंदाला बाधा येते. यामधून क्षणिक आनंद मिळतो,परंतु कळत न कळत ध्वनी आणि वायुप्रदूषण होते. याचे मात्र आपल्यालाभान राहत नाही.

आपणाला नेहमी असे वाटते कि, आपण एकट्याने फटाके न वाजविल्यास पर्यावणाचे संतुलन थोडेच टिकणारआहे. दुसरे लोक पण फटाके वाजवितात, मग आपणाला कशाचे बंधन आहे.दिवाळी साजरी करताना फटके वाजवावेत, की न वाजवावेत हाप्रत्येकाचा वैयक्तिक प्रश्न आहे किंवा त्यांच्या आवडी-निवडीवर अवलंबून आहे.फटाक्यांच्या आतिषबाजीतून पर्यावरणाचे संतुलन बिघडते आणि आपल्याला आनंद मिळतो. दिवाळीमध्ये वायुप्रदूषण पेक्षाही मोठ्या प्रमाणात आवाज येणा-या फाटाक्यावरकायद्याने बंदी आहे. तरीसुद्धा लोक प्रदूषण करतात.

ध्वनीप्रदूषण तोटे -

ध्वनीप्रदूषण जास्त झाल्याने कमी ऐकू येणे, उच्च रक्तदाब, हार्ट अटॅक,
झोपेबाबतीतवेगवेगळ्या व्याधी मानवाला त्रास देतात. अचानक वाढणा-या ध्वनी प्रदूषणामुळे तात्पुरते किंवा कायमस्वरूपी बहिरेपणा येतो. फटाक्यापासूनवृद्ध माणसांना त्रास होतो. बालकाना अपंगत्व येते. फाटाक्यासाठी लागणारा कागद व्यर्थ जातो. याचबरोबर फटाक्यातील धुरांमुळे शरीरावर वाईट परिणामही होतात.

गणेशोत्सव—

भारताप्रमाणेच अनेक देशात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. आपण गणपतीला दैवत मानतो. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणेशाची विधिवत पूजा करून प्राण प्रतिष्ठापना करून त्याची मनोभावे पूजा करून वाजत-गाजत मिरवणूक काढून गणेशाचे आपण स्वागत करतो. लोकमान्यटिळकानीस्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सर्व सामान्य लोकानी एकत्र येऊन स्वातंत्र्य बाबतीत विचार विनिमय करण्यासाठी

ISSN 2231 4342

गणेशोत्सव व शिवजयंती सुरु केली आणि याला सार्वजनिक स्वरूप दिले. मात्र सध्याच्या काळामध्ये गणेशोत्सव साजरा करणे, हापर्यावरणाच्या दृष्टीकोनातून काळजी करण्यासारखे आहे. गणेशोत्सावातील पावित्र्य आणि पर्यावरण संरक्षण यासाठी गणेशोत्सव पर्यावणपूरक पद्धतीने साजरा होणे काळाची गरज आहे. काही लोक गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात, परंतुहा उत्साह साजरा करताना जलप्रदुषण, वायुप्रदूषणआणि ध्वनीप्रदुषण मोठ्या प्रमाणावर होते.

मुळात आपले भारतीय सण–उत्सव हे पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आहेत. पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करणे, हाच भारतीय संस्कृतीचा मूळ हेतू आहे. आपल्या सभोवतालचा परिसर जर निसर्ग संपन्न असेल, तरच आपल्याला सुखा-समाधानाने जगता येईल.प्राचीनकाळातील लोक खूप समाधानाने आणि आनंदाने जीवनजगत होते. कारणपूर्वीच्या काळामध्ये प्रदूषण नव्हते. निसर्गाच्या देणगीचा जास्त वापर होत नव्हता,मात्र आज आपणाला याचे भान राहिले नाही.यामुळे मानवाला आज अनेक संकटाना सामोरे जावे लागत आहे.

जलप्रदूषण –

गणेशचतुर्थीला पुजावायाची मूर्ती मातीचीच असावी,कारण यादिवशी पार्थिव पूजन करण्यास सांगितलेले आहे.मूर्ती छोटी असावी,पण त्यातील भक्ती-श्रद्धा मोठी असावी.पूर्वीच्या काळामध्ये गणेश उपासकांची आणि भक्तांची संख्या कमी होती.आताती खूप वाढली आहे. नदी,तलाव,सागर इ.स्वच्छराहावेत ही आपली जबाबदारी आहे. अनंत चतुर्दशीच्या दुस-या दिवशी सागराच्या किना-याची परिस्थिती बिकट असते. ती भयानक परिस्थिती सुधारावी म्हणून प्रयत्न केले पाहिजेत. ही पर्यावरणाची परिस्थिती सुधारणे आपलीच जबाबदारी आहे.

वायुप्रदूषण –

लोक कोणत्याही कार्यामध्ये अगरबत्ती आणि कापूर यांचा वापर करतात.सध्या बाजारामध्ये काही अगरबत्ती विक्रीस येतात.त्याअगरबात्तीमध्ये केमिकल्सचा वापर केलेला असतो.कापूर तयार करताना त्यामध्ये केमिकल्सचा वापर अधिक प्रमाणात केलेला असतो.यामुळे कापूर पेटविल्यानंतर खूप धूर होतो. परंतु, या धुरामुळे श्वसन विकाराचे अनेक आजार वाढलेले आहेत, हेटाळणे आवश्यक आहे.सण-उत्सव साजरा करताना पर्यावण टिकविण्यासाठी आपणाला पुढीलप्रमाणे उपाययोजना करता येतात.

प्रदुषणाबाबत उपाय योजना –

- पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे, त्याना आपण सहकार्य करावे.
- आपण साजरे करीत असणारे सर्व सण–उत्सव हे निसर्गवर्धक साजरेव्हावेत, यासाठी आग्रह असावा.
- शांततापूर्ण वातावरणात, सुरक्षाविषयक सर्व प्रकारची काळजी घेऊन, ध्वनी प्रदूषणविषयक सर्व कायदे काटेकोरपणे पाळून सण-उत्सव साजरे करता येतात.
- गणेशोत्सव काळामध्ये होणारा थर्माकोल आणि प्लॅस्टीकचा वापर पर्यावरणाला हानी पोह्चवितो, तो पूर्णपणे टाळायला हवा.

- प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या गणेश मूर्ती, मोठ्या आकाराच्या मूर्तीमुळे विसर्जनाच्या वेळी होणारे पाण्याचे प्रदूषण हे पर्यावरणाला धोकादायक आहे. त्यामुळे त्याचा गांभीर्याने विचार व्हावा.
- ध्वनीक्षेपकआणिडॉल्बीसारख्या मोठ्या आवाजातील वाद्यामुळे होणा-या ध्वनी प्रदूषणानेमानवी आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होतात.
- इकोफ्रेंडली गणपती तयार करताना कागद, टिश्यूपेपर, माती,वॉटर कलर, भाज्यांपासून तयार केलेले रंग,डींकापासूनतयारकेलेला गमइ.साहित्य वापरावे.
- दुष्परिणाम माहित असुनसुद्धाफटाके वाजविणे धोक्याचे आहे,हेफटाके वाजविणे टाळावे.
- पर्यावरणपुरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आपण स्वत: अधिकाधिक लोकाना प्रोत्साहित कारावे.
- प्रत्येकाने पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजारा करण्यावर भर द्यावा.
- वाढते वायूप्रदूषण, जागतिक तापमानवाढ, वाढते जलप्रदूषण, त्याचे होणारे परिणाम या पार्श्वभूमीवरपर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा.
- गणेशोत्सवाच्यावेळीआपले पोलीस सतर्क असतात,त्यामुळे पोलीसांना सहकार्य करावे.

निष्कर्ष-

1) सण-उत्सवाचा पर्यावरणावर होणा-या परिणामांचा अभ्यास करता आला.

2) ध्वनीप्रदूषणाची माहिती घेता आली.

3) सण-उत्सवामुळे मानवी जीवनावर जसे चांगले परिणाम होतात,तसे वाईटपरिणामही होतात, हे अभ्यासता आले.

4) वायू प्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनीप्रदूषणकसे होते, यांचा अभ्यास करता आला.

5) प्रदूषणामुळे मानवी जीवनावर परिणाम होतो यावर कोणत्या उपाययोजना आहेत,
याचे आकलन झाले.

संदर्भ –

1) सण–धार्मिक उत्सवआणि व्रते, अध्यात्म विश्वविद्यालयाचे पाठ्यपुस्तक, संकलक- प.पू.डॉ.जयंत आठवले आणि डॉ. सौ.कुंदा जयंत आठवले.

2)गणेशोत्सव, वर्तमानपत्रे.

3) वर्तमानपत्रे कात्रण.

4) धार्मिक ग्रंथ.

5) सनातन प्रभात, महाशिवरात्र विशेषांक,पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा आवृत्ती.

6) इंटरनेटलिंकिंग माहिती – लेखिका वर्षा फडके , माहिती स्त्रोत : महान्यूज.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

" खोती पध्दती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर "

प्रा. डॉ. गिरे संजय भाऊराव
(इतिहास विभाग प्रमुख)
वसंतराव नाईक महाविद्यालय नांदेड
ssanjay_a@rediffmail.com
Mob.9763239952

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक असामान्य प्रतिभावंत व्यक्तीमत्व म्हणून संपूर्ण जगाला परिचीत आहेत. कायदेतज्ञ, अर्थतज्ञ, इतिहासकार, समाजशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, पत्रकारिता व साहित्य इत्यादी अनेक क्षेत्रात त्यांनी अनमोल असे योगदान दिले. भारतीय राज्यघटनेचे ते शिल्पकार आहेत याच बरोबर सर्वात महत्वाचे म्हणजे ते चांगले कृषीतज्ञ सुध्दा होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना कृषी व्यवस्थेची चांगली जाण होती. सामुहिक शेतीचे ते पुरस्कर्ते होते. कृषीप्रधान भारतासारख्या देशात पाणी आणि विज याचा समानरित्या पुरवठा झाला तर भारत एक समृध्द देश होण्यास वेळ लागणार नाही असे त्यांचे मत होते. शेतीकडे उद्योग म्हणून बघण्याचा दृष्टीकोण समाजाचा असला पाहिजे हा त्यांचा विचार होता. शेतीचे चित्र बदलल्या शिवाय ग्रामीण भागात विखुरलेला समाज एक संघ होणार नाही याची त्यांना जाणीव होती. शेतकरी आणि राज्यकर्ते यांच्या उदरनिवाहाचे साधन म्हणजे शेती ही जी आपल्या समाजाची मानसिकता आहे ती बाबासाहेबांना मान्य नव्हती. शेती हे केवळ उपजीविकेचे साधन नसून राष्ट्रीय उत्पनाचा स्त्रोत आहे. ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचा केंद्रबिंदु आहे, शेतकऱ्यासह शेतमजुरांना रोजगार देणारे ते माध्यम आहे, हा विचार बाबासाहेबांचा होता. आर्थिकदृष्ट्या शेतकरी सक्षम बनला तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी येईल त्यातून राष्ट्राची अर्थव्यवस्थाही मजबूत होईल. रोजगारासाठी होणारे स्थलांतर देखील थांबतील हा विचार बाबासाहेबांचा होता.

कोकणामध्ये खोती पध्दती अस्तीत्वात होती, खोती पध्दतीमुळे शेती कसणाऱ्याचे प्रचंड शोषन होत असे. ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधूदुर्ग जिल्ह्यात ही पध्दत मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. ब्रिटिश सरकारचा खोतकरांना पाठींबा होता. खोताकडून जमिन कसावयास मिळणार की नाही मिळाली तर किती प्रमाणात सारा द्यावा लागेल निश्चित नव्हते. खोतकरांना वेगवेगळे नजराने द्यावे लागत होते. दिवसरात्र काबाड कष्ट करूनही खोती पध्दतीमुळे शेतकऱ्यांच्या हाती काहीच पडत नव्हते. उलट खोतांचा अन्याय आणि अत्याचार वाढत चालला होता. त्यातून शेतकऱ्यांची स्थिती अतिशय दयनिय बनली होती. या सर्व परिस्थितीचा आढावा घेवून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी खोती पध्दती नष्ट करून कुळास न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या प्रयत्नाची पराकाष्टा केली. एकंदरीत प्रस्तुत शोधनिबंधातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या खोती पध्दती बंदी विषयी केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

 ISSN 2231 4342

संशोधन पध्दती:

प्रस्तुत लघुशोध निबंध तयार करण्यासाठी पुस्तके, विविध ग्रंथ, वार्षीकांक, विविध लेख, वृत्तमानपत्रे साप्ताहीके व मासिके इत्यादी दुय्यम साधनांचा आधार घेण्यात आला आहे.

संशोधनाचा उद्देश :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अन्यायकारक असलेल्या खोती पध्दतीविषयी जनजागृती करून ही अन्यायकारक पध्दती कशा पध्दतीने नष्ट करण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा शेतकरी वर्गावर काय परिणाम झाला, याचा आढावा घेणे हा होय.

शेतकऱ्याचा मोर्चा व खोती पध्दतीवर बंदी :

गरीब दरिद्री शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२८ पासूनच शेतकऱ्यांचे प्रश्न आपल्या हाती घेतले. देशात समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी १९२७ मध्ये महाडचे आंदोलन केले होते. शेतकऱ्यांचा ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी १९२८ पासुनच त्यांनी कोकणातील शेतकऱ्यांची खोताच्या दास्यातून मुक्तता व्हावी म्हणून फार मोठी चळवळ सुरु केली. १४ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळून येथे एक शेतकरी परिषद आयोजीत केली होती. त्या परिषदेचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. या परिषदेला कुणबी, मराठे व अस्पृश्य वर्गातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोकण प्रदेशातील रत्नागिरी व कुलाबा या जिल्हयामध्ये खोती पध्दत अस्तीत्वात होती. या पद्धतीमुळे येथील शेतकरी वर्गाची परिस्थिती अत्यंत दयनिय व हालाखीची बनली होती. खोताकडून शेतकऱ्यांवर अनेक जुलूम केला जात होता. खोती पद्धतीमध्ये रत्नागिरी कुबाला, ठाणे, रायगड या जिल्ह्यांच्या काही भागात शेतसारा गोळा करण्यासाठी शासनाने खोताची नियुक्ती केली होती. यात जमिनीतून होणाऱ्या उत्पन्नाचा अर्धा भाग आणि वरकस जमिनीतील पिकाचा एक तृतियांश भाग खोताने कुळाकडून वसुल करावा अशी पद्धती होती. याशिवाय शेतसारा गोळा करण्याचा मोबदलाही वसुल करण्याचा अधिकार त्यांना होता. त्यामुळे खोताकडून कुळाचा त्रास मोठ्या प्रमाणात होत होता, तसेच काही खोतांच्या खाजगी जमिनी कुळाना वेठीस धरून विनामोबदला त्यांच्याकडून मशागत करून घेतला जात होत्या. अश पद्धतीने संपूर्ण कोकण प्रदेशात कुळाचे शोषन चालू होते. त्यामुळे येथील शेतकऱ्यामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. त्यांनी खोताविरूद्ध आंदोलन उभे केले. खोती पद्धत नष्ट करण्याची मागणी जोर धरू लागली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कोकणातील शेतकऱ्यावर होत असलेल्या अन्याया विरूद्ध व येथील खोतीदारी पद्धतीविरूद्ध शेतकऱ्यांचे आंदोलन उभारले व त्याचे नेतृत्व स्वत: केले.

१७ सप्टेंबर १९३७ रोजी जाचक खोती पद्धती बंद करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई विधीमंडळात एक विधेयक मांडले होते. या विधेयकामुळे शासन व भुधारक यांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होणार होता. पुढे १० जानेवारी १९३८ रोजी २५ हजार शेतकऱ्यांचा मोर्चा बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली विधिमंडळावर नेण्यात आला. हा मोर्चा अत्यंत यशस्वी स्वरूपाचा ठरला. ही चळवळ अधिक तीवृ करण्यासाठी व शेतकऱ्यांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहाणी करण्यासाठी बाबासाहेबांनी कोकण प्रांताचा दौरा केला. शेतकरी

 ISSN 2231 4342

वर्गाच्या अनेक सभा आयोजित करून त्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. एकंदरीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर सर्व जाती धर्माच्या शेतकऱ्यांसाठी चळवळ उभारली, खोती पध्दत नष्ट करून कुळाना जमीनीचे स्वामित्व मिळावे त्यांचे शोषन थांबावे हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा मुख्य उद्देश होता परंतु हा प्रश्न राज्यकर्त्यांनी रेंगाळत ठेवल्यामुळे बाबासाहेब त्यांना चालना देवू शकले नाही. शेतीतल्या खोती पध्दतीबदल व सावकारा विषयी भाष्य करतांना बाबासाहेब म्हणतात "शेतकऱ्यांचे कष्ट करायचे खोतकऱ्यांनी फुकटचे खायचे म्हणजेच 'आयत्या बिळावरचे नागोबा' अशा शब्दात त्यांनी खोतकरांवा टिका केल्या आहेत.''

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कोकणातील अनेक जिल्ह्यात खोतकरांच्या विरोधात कुळाच्या अनेक परिषदा घेतल्या. त्यामुळे खोतकरांनी कुळाचा अतोनात छळ केला. परंतु यातून एक गोष्ट साध्य झाली आणि ती म्हणजे कुळामध्ये जागृतता निर्माण होवून आपल्या हक्कांची त्यांना जाणीव झाली. आपले हक्क प्राप्त करण्यासाठी त्यांच्यात एकजूट निर्माण झाली. लवकरात लवकर खोती पद्धती नष्ट व्हावी आणि कुळाना योग्य न्याय व अधिकार मिळावा यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेवटपर्यंत प्रयत्न केले. स्वतंत्र भारतात कुळाना त्यांचे हक्क आणि अधिकार मिळाले. खोती पद्धती नष्ट झाली, याचे सर्व श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जाते.

सारांश :

भारतीय अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कोकणात अस्तीत्वात असलेल्या खोती पद्धती विषयी व्यापक जनजागृती करून ही अन्यायकारक व कुळाचे शोषण करणारी जाचक पध्दती नष्ट करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. कुळांना त्यांच्या जमीनीचे मालकी हक्क मिळावे, सर्व कुळांमध्ये एकजुटता निर्माण व्हावी, कायद्याच्या माध्यमातून त्यांचे हक्क अबाधीत व्हावेत यासाठी त्यांनी मुंबई कायदेमंडळात खोती बंदिसाठी विधेयक सादर केले होते. आज कुळांना जे अधिकार आणि हक्क मिळाले त्यांचा आर्थिक स्तर हो उंचावला, अन्यायकारक खोती पध्दती नष्ट झाली त्यात बाबासाहेबांचे योगदान अत्यंत महत्वाचे असल्याचे दिसून येते.

संदर्भसूची :

१) कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, व्दितीय आवृत्ती, १४ एप्रिल, १९७६.
२) कुबेर वा.ना., डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारधन, लोकवाङ्मयगृह प्रा.ली.मुंबई, १९८२.
३) गोखले द.न., डॉ.आंबेडकरांचे अंतरंग, मौज प्रकाशानगृह मुंबई, पृ.कृ.२१५.
४) कदम एस.पी., स्वातंत्र्यपुर्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादी विचार, प्रकाशन, बहुजन साहित्य विचारधारा, पुणे आवृत्ती, २०१२.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

महाराष्ट्रतील पर्यटन स्थळे : एक दृष्टीक्षेप

प्रा. डॉ. एच. टी. सातपुते
इतिहास विभाग प्रमुख
माधवराव पाटील महाविद्यालय,
पालमजि. परभणी.
email: drhtsatpute@gmail.com

प्राचीन काळापासून जगातील अनेक राष्ट्रांपैकी भारत पर्यटनाचा जागतिक केंद्रबिंदू ठरला आहे. देश विदेशातील पर्यटक, इतिहासप्रेमी,निसर्गप्रेमी भारतात वेळोवेळी येऊन गेल्याचीनोंदइतिहासात आढळते. यामध्ये चिनी प्रवासी फायीयान ह्यु-एन-त्संगइत्यादीच्याभारतभेटीचे वर्णन आढळते.या भेटीमध्ये राजकीय,सामाजिक,धार्मिकवसांस्कृतिक परिस्थितीचे वर्णन केले आहे. व्यापाराच्यानिमित्यानेग्रीक,रोमन संस्कृती व भारतीय संस्कृतीचा आपसात परिचय झाला.भारताला ऐतिहासिक वारसा स्थळांची देणगी लाभली आहे. त्याच बरोबर सुंदर समुद्र किनारा, हिमालय, सह्याद्री सारखे पर्वत, उंचावरून वाहणारे धबधबे, जंगल आणि यामधील पशु-पक्षीअशीनिसर्गाची देण भारताला लाभली आहे. ऐतिहासिक व नैसर्गिक वारसा जपण्याचे काम भारत सरकारच्या नेतृत्वाखाली विविध विभाग कार्य करीत आहेत. यामध्ये भारतीय पुरातत्व विभाग आणि भारतीय पर्यटन मंत्रालय यांच्या नेतृत्वाखाली राजस्तरीय महाराष्ट्र पर्यटन महामंडळाची स्थापना 1975 मध्ये करण्यात आली. महाराष्ट्र हा पर्यटकांना नेहमीच आकर्षित करत आला आहे. देश आणि विदेशातील लाखो नागरिक पर्यटनानिमित्य महाराष्ट्रात येत असतात. पर्यटनामध्ये ऐतिहासिक वारसा स्थळांचे पर्यटन,नैसर्गिकपर्यटन, धार्मिकपर्यटनव औद्योगिक पर्यटन यांचा प्रामुख्याने समावेश होतो.एकविसाव्या शतकात अशा या पर्यटन स्थळांचापर्यटन वाढीच्यादृष्टीने याठिकाणी आढावा घेण्यात आला आहे. जास्तीत जास्त पर्यटकांनी पर्यटनस्थळांना भेटी दयाव्यात जेणेकरून स्थानिक रोजगारांच्या संधी उपलब्ध होतील. तसेच भारताच्या अर्थव्यवस्थेत भर पडेल हा या पाठीमागचा दृष्टीकोण, हेतू आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये पर्यटनाचाआठ ते दहा टक्केवाटा आहे. यापुढेही जाण्याची आवश्यकता आहे.

पर्यटन म्हणजे फक्त तीर्थस्थळांना भेटी देणे ही संकल्पना शेकडोवर्षे रुजत गेली. परंतू आधुनिक कालखंडात पर्यटनाची व्याख्या बदलली.पूर्वीपर्यटनस्थळी फक्त स्थानिक लोकांचा वावर असे, पर्यटनाच्या जागतिकीकरणामुळे अनेक प्रकारची पर्यटनस्थळे उदयास आली. शारीरिक व मानसिक आरोग्य ठीक राहावे यासाठी पर्यटन, सहली हे माध्यम बनले. केवळ रमणीय किंवा ऐतिहासिक म्हणून कुठलेही ठिकाण पूर्वीच्या काळी पर्यटनस्थळ म्हणून प्रकाश झोतात आले नाही. महाबळेश्वर येथील कृष्णाबाईचे मंदिर १३ व्या शतकात यादवांनी बांधले आहे.तर महाबळेश्वराचे मंदिर त्याहून अधिक प्राचीन आहे.ही स्थळे प्रकाशझोतात आनण्याचे काम ब्रिटीश राजवटीत जन.लॉडवीकयांनी केले. आजहे स्थळधार्मिक स्थळाबरोबर थंड हवेचे ठिकाण म्हणून

 ISSN 2231 4342

प्रसिद्ध आहे. त्याचबरोबर वेरूळ येथील लेणी सुद्धा एका इंग्रज अधिकाऱ्यानेप्रकाशात आणल्या. सह्यांद्री पर्वतावरील अनेक धबधबे, टोके, पॉइंट याच राजवटीमध्ये विकसित करण्यात आले.धार्मिक,ऐतिहासिक आणि नैसर्गिक पर्यटन स्थळे विकसीत करण्यासाठी तत्कालीन राजकर्त्यांनी मेहनत घेऊन हा वारसा जतन करण्याचे काम केले. धार्मिक तीर्थस्थळ ठिकाणी पायऱ्या,धर्मस्थळे, रस्ते,घाट, कुंडे, विहिरी इ. निर्माण केले. अनेक वास्तूंचा व मंदिरांचा जीर्णोद्धार केला त्याचीच रि ब्रिटीश राजवटीने ओढली.ब्रिटिशांनीपर्यटनाची संकल्पना व्यापक केली,यामध्ये थंड हवेचे ठिकाणे,नैसर्गिक ठिकाणे, सुंदर सागर किनारे, ऐतिहासिक वास्तू, लेणी यांचा पर्यटन स्थळामध्ये समवेश होवू लागला.राखीवजंगले, पशु-पक्षी अभयारन्ये, धरणे, वस्तू संग्रहालये, उद्याने, स्मारक यांचा समवेश झाला. आता नव्यानेच महाराष्ट्र पर्यटन महामंडळानेकारागृहपर्यटन सुरु केले आहे. महाराष्ट्र पर्यटनामध्येसतत अग्रेसर राहिला आहे. पर्यटकांना मिळणाऱ्या सोयी सवलती, रजा, पास विद्यार्थी सहल सवलती तसेच विविध यात्रा कंपन्या यांच्या प्रयत्नामुळे पर्यटनाला अधिकची चालना मिळत आहे. महाराष्ट्र हा पर्यटनाची पंढरी म्हणून ओळखला जात आहे.

महाराष्ट्रात अडीचशेच्यावर विविध प्रकारचे किल्ले आहेत. यामध्ये गडकोट, भूईकोट, जलदुर्ग इ.यांचा समावेश होतो. चाळीसहून अधिक लहान मोठ्या प्राचीन लेण्या आहेत.विविध धर्माची अनेक तीर्थक्षेत्र आहेत.सुमारे साडेसातशे किलो मीटरचा समुद्र किनारा व बाजूला सह्याद्री पर्वताची रांग महाराष्ट्राला लाभली आहे. या ठिकाणी महाराष्ट्र पर्यटन महामंडळ आणि खाजगी स्वरुपाची निवासस्थाने उपलब्ध आहेत. पर्यटकाचा वाढता ओघ लक्षात घेऊन रस्ते, पूल, दळणावळणाची साधने मोठ्याप्रमाणवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. आपल्याकडे सर्व प्रकारची पर्यटनस्थळे आहेत यांचा पुरेपूर फायदा घेण्याचा विडा महाराष्ट्राने उचलला पाहिजे. २०२० हे वर्ष कोविड १९ मुळे पर्यटक व्यवसायासाठी हानिकारक ठरले याची भरपाई २०२१ मध्ये होईल अशी अपेक्षा आहे.

महाराष्ट्रातील विविध प्रकारची पर्यटनस्थळे:

लेणी:

१) वेरूळ२) अजिंठा ३) एलिफंटा ४) कार्ला भाजे ५) अंबेजोगाई ६) पितळखोराइत्यादी.

किल्ले:

रायगड, सिंधुदुर्ग, जंजीरा, पन्हाळा, देवगिरी, शिवनेरी, इ. असे शेकडो प्राचीन ऐतिहासिक किल्ले पर्यटनस्थळे म्हणून प्रसिद्ध आहेत.

नैसर्गिक पर्यटन स्थळे :

महाबळेश्वर, माथेरान, लोणावळा, लोणार सरोवर यासह संपूर्ण सह्याद्री पर्वतावरील पर्यटन स्थळे धबधबे सह्याद्रीच्या डोंगररांगातील पर्यटनस्थळे, पर्वत, नद्या अशा प्रकारच्या अनेक पिकनिक पॉइंट म्हणून नावारुपासआली आहेत.

पशु-पक्षी अभयारण्ये:

वन्यपशुअभयारण्यामध्ये राधानगरी, बोरीवली,नागझरा,तानसा,पाल,यावल,किनवट,चांदोली,कोलकास इ. आहेत.कर्नाळा, नवेगाव बांध, माळशेजघाट, नांदूर मधमेश्वर इ. वन्यपक्षी अभयारण्येआहेत.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

राष्ट्रीय उद्याने / राखीव जंगले :

ताडोबा वाघ्र प्रकल्प अभयारण्य, बोरीवलीतोतलाडोह, अंबोली हीअभयारण्य आहेत.याअभयारण्यामध्येपशु पक्षीप्रेमी हजारोच्यासंखेने भेटी देतअसतात. अंबागड, गारपेठ, कांडेबेरी, संबलपुर,उमझरी,प्रतापगड भीमाशंकर इ.राखीव जंगले आहेत.

या शिवाय महाराष्टातीलप्रत्येक जिल्ह्यात,व अनेक खेड्यात विविध प्रकाराचीपर्यटनस्थळे आहेत. ती मोठ्या प्रमाणावर विकसित करण्यात आली आहेत. या पर्यटनस्थळामध्ये प्राचीन मंदिरे, स्मारके, किल्ले तसेच नैसर्गिक पर्यटनस्थळे मोठ्या प्रमाणात अस्तिवात आहेत. याठिकाणीस्थानिक पातळीवरील आणि देश पातळीवरील पर्यटक भेटी देत असतात. पर्यटकांना सोई-सुविधा मिळाव्यात म्हणून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने अनेक ठिकाणी पर्यटक निवासस्थाने बांधण्यात आली आहते. याशिवाय, महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन महामंडळाने २०२१ पासून “कारागृह पर्यटन नव्याने सुरु केले आहे”

समुद किनारे :

महाराष्ट्राला साडेसातशेकिलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. एकीकडेउंच सह्याद्री आणि दुसरीकडे अथांग सागराचा समुद्र किनारा ही नैसर्गिक देण महाराष्ट्राला लाभली आहे. या समुद्र किनारी मोठ्याप्रमाणावर देशी व विदेशी पर्यटक येत असतात. या ठिकाणी हॉटेल, रिसॉर्टची सोय मोठ्या प्रमाणात आहे.

ऐतिहासिक पर्यटन स्थळे :

वेरूळ लेणी :

वेरूळ येथील प्राचीन ऐतिहासिक हिंदू, बौद्ध, जैनलेणी, मूर्ती आढळून येतात. प्राचीन काळापासून या लेण्यांना लाखोंच्या संखेने देश विदेशातील पर्यटक भेट देत असतात. राष्ट्रकुटकालीन या उत्कृष्ट लेणी आहेत. वेरूळ येथे एकूण ३४ लेण्या असून त्यापैकी १२ बौद्ध, ५ जैन धर्मीय लेण्या आहेत. बाकी सर्व हिंदू धर्मीय लेण्या आहेत.भारतीय पुरातत्व खात्यामार्फत या लेण्याचे संवर्धन केले जाते. महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळातर्फे याठिकाणी सर्व प्रकारच्या सोईसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

अजिंठा लेणी :

औरंगाबाद व जळगाव जिल्ह्याच्या सीमेवर असलेली सह्याद्रीची डोंगररांगही अजिंठा डोंगररांग म्हणून प्रसिद्ध आहे. अजिंठा लेणी या वेरूळ लेणी प्रमाणेच जगप्रसिद्ध आहेत. याबौद्धधर्मीय लेणी हीनयान व महायान पंथाशी संबधित आहेत.येथे एकूण ३० लेण्या आहेत. दरवर्षी याठिकाणी देशी व विदेशी पर्यटक लेण्या पाहण्यासाठी येतात. वेरूळ अजिंठा लेण्या या जागतिक वारसा म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.परंतुया ठिकाणी रस्ते आणि इतर सुविधा आणखी चांगल्या प्रकारच्या होण्याची गरज आहे.

एलिफंटा(धारापुरी) लेणी :

गेट वे ऑफ इंडिया (मुंबई) पासून समुद्रात १० किमी अंतरावर एक छोटेसे बेट आहे. या ठिकाणी घारापुरी किंवा एलिफंटा लेण्या आहेत. याठिकाणी भगवान शिवाच्या विविध स्वरूपातील सुबक मूर्ती शिल्प आहेत.ह्या लेण्या राष्ट्रकुट कालीनअसाव्यातअसे इतिहास तज्ञांचे मत आहे. याठिकाणी एकूण ५ लेण्या आहेत.त्यातील ५.२३ मी. उंचीचेत्रिमूर्ती हे शिल्प जगप्रसिद्ध आहे. याशिवाय अर्धनारीनटेश्वर, गंगावतरण आणि

 ISSN 2231 4342

शिवपार्वती विवाह ही शिल्प भव्य व सुंदर आहेत.याठिकाणी सापडलेल्या भव्य हत्तीच्या शिल्पावरून या लेण्यांना एलिफंटा केव्हेज असेही म्हणतात.या लेण्या ८ व्या शतकातील असाव्यात असे मानले जाते.मुंबई जवळ लेणी असल्यामुळे देशी व विदेशी पर्यटक या लेण्यांना भेटी देत असतात.या भेटीमुळे नौका विहार सुद्धा होते आणि लेण्याचे दर्शनही होते.

इतर पर्यटनस्थळे :

दौलताबादचा किल्लामराठवाड्यातील अनेक किल्यापैकी एक असलेला दौलताबाद किंवा देवगिरी हा इतिहासाची साक्ष देत उभा आहे.ज्यांचेदेवगिरी किल्यावर वर्चस्व त्यांचे दक्षिण भारतावर वर्चस्व असे एके काळी मानले जाई. हा किल्ला अभ्येद असून १८५ मी. उंचीवर पक्क्या खडकावर बांधला आहे. या किल्ल्यावर विविध ईमारती, मंदिरे, महालअस्तिवात आहेत.हाकिल्ला अतिशय भक्कम असून भारतातील अजिंक्य किल्ल्यापैकी एक आहे.म्हणून मोहमद गजनी ने या ठिकाणी आपली राजधानी स्थलांतरीत केली होती. पर्यटकाचे आकर्षण केंद्र म्हणून या किल्याकडे पाहिले जाते. औरंगाबादशहरापासून जवळ असल्यामुळे देशी व विदेशी पर्यटक तसेच विद्यार्थी सहली मोठ्या प्रमाणात भेटी देत असतात. तसेच औरंगाबाद शहरातील बिबीका मकबरा हे स्थळ प्रसिद्ध आहे.

गुरुद्वारा :

मध्ययुगीन कालखंडातील शिख धर्मियाचे जागतिक दर्जाचे पवित्र तीर्थ स्थळ म्हणून नांदेड येथील गुरुद्वारा प्रसिद्ध आहे.येथे देश व विदेशातील शिख भाविक व इतर धर्मीय लाखोच्या संखेने भाविक भेटी देण्यासाठी, दर्शनासाठीयेत असतात. या पर्यटकाच्या सोईसाठी नांदेड व परिसरात निवासाची व भोजनाची व्यवस्था केलेली आहे. थोडक्यात, देशाच्या पर्यटन विकासात नांदेड येथील गुरुद्वाराचे स्थान निश्चितच मोठे आहे.

शिर्डी/ शेगाव:

अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डीचे साई बाबा संस्थान राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक म्हणून ओळखले जाते.याचबरोबर शेगाव येथील गजानन महाराज संस्थान भाविकांचे श्रद्धा केंद्र आहे. पंढरपूरयेथीलविठ्ठलरुक्मीनी मंदिर प्रसिद्ध आहे. नागपूर येथील दीक्षाभूमीला लाखो भाविक भेटी देत असतात. हा धार्मिक पर्यटनाचा एक भाग आहे.

अशा प्रकारे आपण महत्त्वाच्या आणि मोजक्या विविध प्रकारच्या पर्यटनस्थळाची थोडक्यात माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे.

सारांश:

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी आणि राष्ट्रीय उत्पनात भर टाकण्यासाठी पर्यटन व्यवसायनकीच फायद्याचा आहे.याचा आपण कितपत फायदा करून घेतो. हे येथील राजकर्त्यांच्या धोरणावर अवलंबून आहे.

ISSN 2231 4342

संदर्भ:

१) प्रा.सु.ह. जोशी, महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रे, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

२) डॉ. ग.द.देशपांडे महाराष्ट्रातील किल्ले,डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

३) र. य. साने महाराष्ट्र पर्यटन कोश, विद्या विकासपब्लिकेशन्स, नागपूर.

४) डॉ. अनिल कठारे, डॉ.विजया साखरे, मंदिरे आणि मूर्ती शिल्प, अल्फा पब्लिकेशन्स, नांदेड.

५) Mr. Arun B. Godam, Current Golbal Revuewer Vol. 2 Shaurya Publication, Latur.

६) दै. लोकमत पेज क्र. ९ दि. ०२/०२/२०२१.

प्रतापगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व

डॉ. सुखदेव पांडुरंग शिंदे
इतिहास विभाग,
सहाय्यक प्राध्यापक,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर.
मो. नंबर : ९४२१११६१२६
Email:shindesp1963@gmail.com

प्रस्तावना :

मानव जातीच्या इतिहासात प्राचीन काळापासून किल्ल्यांना महत्वाचे स्थान आहे. महाराष्ट्रात सातवाहन काळापासून किल्ल्यांची माहिती मिळते. सातवाहन, राष्ट्रकुट, चालुक्य , शिलाहार आणि यादव राजघराण्यांनी महाराष्ट्रावर राज्य केले. त्यांनी ठिकठिकाणी किल्ले बांधून आपल्या राज्याचे संरक्षण केले. उदा. शिलाहार राजांनी कोल्हापूर, विशालगड, पांडवगड, भुदरगड, रांगणा-चंदन, वंदन, वसंतगड, सातारा, सामानगड, पन्हाळा, कल्याणगड इत्यादी किल्ल्याद्वारे शिलाहारांनी राज्याचे संरक्षण केले. शिलाहारांच्यानंतर देवगिरीच्या यादव राजांनी देवगिरी (दौलताबाद) किल्ला बांधला. किल्ले बांधण्याची हीच परंपरा आपणास शिवकाळापर्यंत सुरु असलेली दिसून येते.

महाराष्ट्रात शिवकाळात अनेक डोंगरी किल्ले बांधले गेले. शिवाजी महाराज स्वत:किल्ला बांधणी विशारद होते. सह्याद्रीवर नवे किल्ले बांधताना शिवाजी महाराजांनी दूरदृष्टीकोनातून बांधले. उदा. राजगड, रायगड, तोरणा व प्रतापगड इत्यादी किल्ल्याचे संवर्धन केले. शिवाजी महाराजांच्या काळात किल्ल्यांना फार महत्वाचे ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले.[१]

छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६५६ मध्ये चंद्रराव मोरे याचा पराभव करून जावळीचा प्रदेश जिंकून घेतला. जावळी प्रदेश घेतल्यानंतर वाई, सातारा व महाड या प्रदेशांनी व्यापलेल्या शास्त्रीयदृष्ट्या महत्वाच्या व भौगोलिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या जावळी प्रदेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक भक्कम किल्ला बांधण्याची गरज भासली होती.[२]

भौगोलिक स्थान :

महाबळेश्वराच्या पश्चिमेला १२ किलोमीटर आणि मेढ्याच्या वायव्येला ३२ किलोमीटर अंतरावर समुद्रसपाटीपासून ३५४३ उंचावर जावळी तालुक्यात प्रतापगड वसलेला आहे. हा किल्ला “भोरप्या डोंगर”वर आहे. तो महाबळेश्वर डोंगराच्या रांगांच्या कड्यावर बांधला आहे.[३]

ISSN 2231 4342

बांधकाम :

शिवाजी महाराजांनी मोरोपंत पिंगळे यांच्यावर प्रतापगड किल्ला बांधण्याची जबाबदारी सोपविली होती. जावळी मुलुखात प्रचंड संपत्ती हाती लागल्यावर शिवाजी महाराजांनी 'भोरप्या डोंगरावर' पार घाटाच्या मुखाशी किल्ला बांधण्याचा आदेश मोरोपंताला दिला. या किल्ल्याचे बांधकाम इ.स. १६६४ मध्ये सुरु केले व इ.स. १६६६ रोजी पूर्ण झाले. किल्ल्याचा प्रमुख स्थापत्य विशारद अर्जोजी यादव हा होता. बांधकामाची सुरुवात प्रथम येडका बुरुजापासून झाली. हाच प्रतापगड किल्ला होय. युद्धाच्या आक्रमणाच्या व संरक्षणाच्या दृष्टीकोनातून या किल्ल्याची बांधणी करण्यात आली होती. हा दुहेरी तटबंदी असणारा किल्ला आहे.[४]

अब्दुल्ला बुरुज :

प्रतापगड किल्ल्यावर अबदुल्ला बुरुजाचे बांधकाम केले आहे. हा बुरुज २००X२०० यार्ड लांबी रुंदीचा बांधलेला आहे. या किल्ल्याला मोठी भव्यता या बुरुजामुळे मिळाली आहे. किल्ल्याच्या पूर्वेकडील सर्वात बाहेरील भिंत येथे अफझलखानाचे शीर पुरले असावे. त्यावरून त्याला 'अबदुल्ला बुरुज' असे म्हणतात. सन १८९५ मध्ये हैद्राबादच्या निजामाने येथे एक प्रचंड थडगे बांधले आणि त्याच्या जवळ सय्यद बंडाचे थडगे आहे. या थडग्याची व्यवस्था अफझलखान समितीकडे आहे.[५]

भवानी मंदिर :

अफझलखान वधानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर भवानी मातेच्या मूर्तीची प्रतिस्थापना केली. त्यांनी मंबाजी नाईक पानसरे यांना नेपाळहून प्रतिमेसाठी आवश्यक असणारे दगड आणण्यास फर्मावले. पानसरे यांनी नेपाळ नरेश लालसेन यांची भेट घेऊन त्यांच्याकडून गंडकीशिळा आणली व नेपाळी मूर्तिकारांच्याकडून अतिशय सुरेख अशी भवानीची मुर्ती घडवून घेतली.[६] मोरोपंत पिंगळे एप्रिल १६६२ मध्ये पेशवा झाल्यावर तिची प्रतिस्थापना झाली. मुंबई प्रांत गॅझेटिअरनुसार सन १६६१ मध्ये हे मंदिर बांधले आहे. गाभाऱ्यात भवानीची गंडकी शिळेची मूर्ती असून ती मौल्यवान अशा रेशमी वस्त्रांनी सजवलेली आहे. मंदिराचे छप्पर आतून सापट असून बाहेरील बाजूस सातारचे छत्रपती राजा प्रतापसिंह(१८१८ ते १८३९) यांनी शिशाचे अच्छादन घातले आहे. या मंदिरात एक शिवलिंग आहे आणि जवळ गोड्या पाण्याचे दोन तळी आहेत.[७]

ऐतिहासिक घटना व महत्व :

शिवाजी महाराजांच्या आदेशावरून सन १६५६ मध्ये मोरो त्रिंबक पिंगळे याने कृष्णा नदीच्या उगमस्थानाजवळ प्रतापगड बांधला. त्यामुळे नीरा व कोयना नद्यांच्या दुआबात वर्चस्व प्रस्थापित करणे व पार खिंडीचे सरंक्षण करणे सुलभ झाले. सन १६५९ मध्ये प्रतापगडाच्या पायथ्याशी शिवाजी महाराज व विजापुरी सरदार अफझलखान यांची सुप्रसिद्ध भेट झाली आणि अफझलखानाचा वध झाला. शिवाजी महाराजानी आदिलशाही प्रदेश जिंकण्यास सुरुवात करून सुपा घेतला. याच दरम्यान त्याने काही सरदाराना आपल्या बाजूला

वळवून घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आदिलशहाने आपला बलाढ्य सरदार अफझलखान याला शिवाजीला धडा शिकविण्याचा आदेश दिला.

खान वाईचा सुभादार असल्याने त्याला या प्रदेशाची इत्थंभूत माहिती होती. तो जून १६५९ मध्ये वाईला पोहोचला. त्याने मावळ भागातील सरदारांना आपल्याला येऊन मिळण्याचे शाही फर्मान काढले. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या सरदारांच्यात,मुत्सद्यात व सर्वसामान्य लोकांमध्ये घबराट पसरली. मात्र या प्रतिकूल परिस्थितीत औरंगजेबाचे मैत्रीचे हात पुढे करणारे एक पत्र हा एक दिलासा ठरला.[८]

जावळीचा ताबा घेतल्यावर स्वराज्यावर वर्चस्व निर्माण करणे सहजशक्य आहे. याची खानाला जाणीव होती. त्यामुळे त्याने शिवाजी राजांची भेट घेण्याचे ठरविले. युद्धाऐवजी शिवाजी राजांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्याला कैद करण्याचा त्याचा डाव होता. परंतु शिवाजी राजांचा वकील पंताजी गोपीनाथ बोकील याला खानाच्या हेतूचा सुगावा लागल्याने त्याने शिवाजी राजांना अधिक सावध केले.

शिवाजी महाराज व अफझलखान यांच्यातील ही ऐतिहासिक प्रसिद्ध भेट प्रतापगडाच्या माचीवर गुरुवार, दि. १० नोव्हेंबर १६५९ रोजी दुपारी घेण्याचे निश्चित झाले. भेटीत खानाने शिवाजी महाराजांना अलिंगन देताना त्याला बगलेत दाबून त्याच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा प्रयत्न केला. परंतु शिवाजी महाराजांनी चिलखत घातले असल्याने त्यांना जखम झाली नाही. मात्र उलट शिवाजी महाराजांनी खानाच्या पोटात वाघनखे खुपसून त्याला ठार केले. कॅप्टन मोडक याने या प्रसंगाचे वर्णन शिवाजी राजांच्या धाडसी प्रतिकार शक्ती असे केले आहे.[९]

या असामान्य घटनेने शिवाजी राजांच्या अंगचे शौर्य, मुत्सद्दीपणा, उत्तम सेनानित्व आणि ध्येयवाद यांचे दर्शन घडविले.

या प्रसंगाची तुलना समर्थ रामदासांचा प्रभाव असणाऱ्या एका समकालीन शाहिराने अज्ञानदास कवीश्वराने ‘राम व रावण यांच्यातील युद्धाशी केली आहे. कॅप्टन मोडक यांनी घटनेला ‘प्रतापगडची लढाई’ असे संबोधून त्याची तुलना नेपोलियन बोनापार्टच्या युरोपातील जेना, ऑस्टरलिटस यासारख्या लढाईशी केलेली आहे. तरीही प्रतापगडची लढाई ध्येयधोरणाच्या दृष्टीने वरील युद्धांपेक्षा वेगळी आहे.[१०]

या प्रसंगी शिवाजी महाराजांनी खानाकडील ९५ हत्ती, १२०० उंट, ४००० घोडी, १८०० बैल, ७० बंदुका, तीन लाखाचा जवाहीर, ७ लाख रुपये रोख, १० हजारांचे कापडचोपड आणि अनेक शस्त्रांसह सुमारे १४००० तंबू हस्तगत केले.

या लढाई नंतर शिवाजी महाराजांनी वाई परगण्यातील लोकांना स्वराज्यात मुस्लिम राजवटीपेक्षा चांगली वागणूक देण्याचे आणि धर्मात ढवळाढवळ न करण्याचे जाहीर केले. प्रत्येकाला त्याच्या योग्यतेप्रमाणे नोकऱ्या दिल्या जातील. शिवाय मुस्लिमांच्या मशिदीच्या खर्चासाठीची अनुदाने पूर्ववत चालू राहतील असे सांगितले.[११]

सन १६६१ च्या पावसाळ्यात शिवाजी महाराज तुळजापूरच्या प्रसिद्ध भवानी मातेची दर्शनाला जाऊ शकले नाहीत म्हणून त्यांनी प्रतापगडावर भवानीचे भव्य मंदिर उभारण्याचे ठरविले. अशा प्रकारे शिवकाळात

ISSN 2231 4342

स्वराज्याचे रक्षण करणारा एक भक्कम किल्ला म्हणून प्रतापगड ओळखला जाऊ लागला. पुढे सन १७७८ मध्ये नाना फडणीस याने आपला प्रतिस्पर्धी सखारामबापू बोकील याला काही काळ प्रतापगडावर कैदेत टाकले होते.[१२]

सन १७९६ मध्ये दौलतराव शिंदे आणि त्याचे मंत्री बाकोळा कुंजर यांच्या कारास्थानापासून बचाव करण्यासाठी नाना फडणीस पुण्यावरून पळाला आणि महाडमार्गे प्रतापगडावर येऊन त्याने प्रचंड शिबंदी जमविली. प्रतापगडावर जरी प्रचंड शिबंदी होती तरीही सन १८१८ च्या मराठा-इंग्रज युद्धात प्रतापगड तहाच्या वाटाघाटीने मराठ्यांना सोडावा लागला.[१३]

पर्यटकांचे आकर्षण :

प्रतापगडने हिंदवी स्वराज्याची सुरुवात केली. मराठा कालखंडातील दक्षिणेतील सर्व किल्ल्यात प्रतापगडला नैसर्गिक सौदर्याची भव्य देणगी मिळाली आहे.

सन १९५७ मध्ये पर्यटकांच्या सोयीसाठी कुंभरोसी गावापासून थेट प्रवेशद्वारापर्यंत रस्ता तयार करण्यात आला आहे. ३० नोव्हेंबर १९५७ रोजी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या १७ फुट उंचीच्या ब्रांझच्या भव्य पुतळ्याचे अनावरण झाले. हा पुतळा २० फुट उंचीच्या चौथऱ्यावर बसविलेला आहे.

किल्ल्याच्या आग्नेयेला असलेल्या अफझलखान बुरुजापासून थोड्याच अंतरावर अफझलखानाचा दर्गा बांधलेला आहे. पुतळ्याशेजारी एक विश्रामगृह व राष्ट्रीय उद्यान उभारले आहे. अलीकडेच गडावर जाणाऱ्या पायऱ्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे.

सारांश :

दक्षिणेतील इतर अनेक किल्ल्यांपेक्षा प्रतापगड सुस्थितीत असून पर्यटकांना भेट देण्यात आणि सृष्टीसौंदर्य पाहण्यात एक आगळावेगळा आनंद मिळत असतो. महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणी आलेला पर्यटक वर्ग साहजिकच प्रतापगड या ऐतिहासिक स्थळाकडे आकर्षित झाल्यावाचून राहत नाही हे मात्र खरे आहे हा किल्ला ऐतिहासिक दृष्टीने शिवकाळात अत्यंत महत्वाचा आहे.

तळटीपा :

१. कदम विकास व शिंदे सुखदेव, ऐतिहासिक कागदपत्रे आणि स्थळे, अक्षर मुद्रण मंदिर प्रकाशन, सोलापूर, जुलै २०१६. पृष्ठ क्र. १००.
२. गायकवाड आर. डी. व इतर शिवाजी महराजांचे सहा किल्ले, २००९. पृ.-७६.
३. सातारा जिल्हा गँझेटिअर, १९६३. पान न. ८७३.
४. शिवछत्र निबंधावली, पुणे १९३०. पान न.१५०.
५. मुंबई प्रांत गँझेटिअर, पान न.५४५.
६. कित्ता, पान न. ५४५.

ISSN 2231 4342

७. मुंबई प्रांत गॅंझेटिअर, उपरोक्त खंड-१९, पान न.५४५.

८. गॅंट डफ, मराठ्यांचा इतिहास खंड-१, पान न.११९.

९. आपटे दिवाकर(संपा.), शिवचरित्र प्रदीप, पान न.२१.

१०.कॅप्टन मोडक, प्रतापगडचे युद्ध, पान न. ०५.

११. कित्ता, पान न.२९६.

१२. गॅंट डफ, उपरोक्त, पृ. १४४.

१३. कित्ता खंड २, पान न.३१.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

उत्तर कोकणातील आदिवासी समाजाचे होळी सणातील संस्कृतीदर्शन

प्रा. डॉ. एम. जी. मोरे,
इतिहास विभाग प्रमुख,
सिध्दार्थ महाविद्यालय जाफ्राबाद,
ता. जाफ्राबाद जि. जालना.

प्रस्तावना :

आर्यांनी अनर्यांना पराजीत करुन दक्षिणेकडील डोंगराळ भागात हाकलून दिले. आणि सप्तसिंधूच्या सकल भागात आर्यांनी आपला निवास केला. अनार्य मात्र डोंगरांच्या दऱ्याखोऱ्यात, जंगलात, नदी नाल्याशेजारी, छोट्या छोट्या वस्तीने राहू लागले. या सगळ्यांचा केंद्रबिंदू अनार्य म्हणजे आदिवासी होय.[१]

महाराष्ट्रामध्ये पूर्व महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र मराठवाडा व प्रामुख्याने कोकणात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आहे. सांस्कृतिक संबंधाने कोकणाचे दक्षिण कोकण, मध्य कोकण व उत्तर कोकण असे भाग पडतात. उत्तर कोकणात ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, वाडा, जव्हार, मोखाळा, नगरमधील संगमनेर घाटी, नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर व उत्तरेडील भाग व नंदुरबार जिल्हयातील घडगाव, अक्कलकुवा, तळोदा नवापूर तालुक्याचा समावेश होतो.

त्र्यंबकेश्वरजवळील कोलआंबा व कोकणा देवीचे मंदिर आहे, ती कोकण आदिवासींची कुलस्वामिनी आहे. त्यावरुन त्यांना कोकणा आदिवासी असे नाव पडले.[२]

हा समाज निर्भीड, निस्वार्थी, परोपकारी असा आहे. आहे त्या परिस्थितीत आनंदी आणि आपल्याच मस्तीत ते राहतात. पण दुःख, संकट, प्रसंगी ते सामुहिकतेने सामोरे जातात.

भारत देशातील विविध सगुदाय संस्कृतीमध्ये आदिवासी संस्कृतीने वेगळेपण जपले आहे. या संस्कृतीचे अनेक पैलू आहेत. त्यांची भाषा अलग-अलग आहे. त्यांचे वाक्प्रचार, म्हणी, उखाणे, गाणे, लोककथा, लोकगीते इतरांपासून भिन्न आहेत. जीवनातील दुःख-सुख, जन्म-मृत्य, लग्न, देवी-देवतांबद्दल आगळी वेगळी भावना आहे. त्यांच्या धार्मिक रूढी निसर्ग पूजेतून निर्माण झालेल्या आहेत. निसर्गात जे जे गूढ, अनाकल्पनिय ते सर्व त्यांना पूजनीय आहे.[३]

जीवनाचे कालचक्र जाणून घेण्यासाठी काळ वेळ दिवस महिना व वर्ष लक्षात राहावे म्हणून सात दिवसांचे नावे, बारा महिन्याचे नावे निसर्ग, पिकपाणी, जीवनासंबधी घटना व हंगाम यावर आधारित आहेत.

बारा महिन्याची नावे:

१. **बोलण्यू** - आदिवासी रितीरिवाजाप्रमाणे त्यांचे नवे वर्ष होळीपासून सुरु होत असते.
बोलण्यू म्हणजे जळणे त्या अर्थाने या महिन्याला नाव आहे.

२. **कालाठ्यू** — या महिन्यात खुप कडक ऊन पडते, पाणी आटते, काळ पडतो त्याची आठवण करुन देणारा महिना.

३. **औखात्यु** — औखात्यु म्हणजे शेतीची औजारे, साहित्य सामुग्री गोळा करणे या अर्थाने

ISSN 2231 4342

औखात्यु म्हणतात.

४. **डालडुक्यु** - या महिन्यात सर्व झाडाझुडपांना नविन पाली आलेली असते. रान गवत झुडपांनी डोलत असते म्हणून डालडूक्यु म्हणतात.

५. **राखू** - शेतातील पीके पिकून राखणीला आलेली असतात म्हणून या महिन्याला राखू म्हणतात,

६. **बुडबुवू** - या महिन्यात खुप पाऊस पडत असल्याने आकाश ढगांनी झाकलेला असतो. म्हणून याला बुडबूवू म्हणतात.

७. **केल्यु** - खुप काबाडकष्ट करुन शेतातील पिकाची कापणी करणे, थप्पी करणे हंगाम आवरण्याने खुप कष्ट पडतात म्हणून त्याला केल्यु म्हणतात.

८. **नोवाय दोहरु** - नविन पिकलेल्या धान्यांची पूजा-विधी करुन मग धान्याचे ग्रहण करतात.

९. **कातक्यु** - धान्य कापून उडवी करुन ठेवलेले असते. ते मळणी करुन काडीकचरा साफ करतात त्याला कातक्यु म्हणतात.

१०. **पहू** - हाताची ओंजळीला पहू म्हणतात. ती ओंजळ भरुन देव—देवतांसमोर ठेवतात त्याला पहू म्हणतात.

११. **उत्तराण्यू** — मकरसंक्रांतीला आदिवासी बोलीभोषेत ऊतराण म्हणतात. संक्रांतीपासून दिवसाला ऊतरण लागत असल्याने ऊत्तराण्यु म्हणतात.

१२. **दांडू** - ज्या ठिकाणी होळी जाळतात त्या ठिकाणी दांडा गाडतात म्हणून त्याला दांडू म्हणतात.

सात वार :

सोमवार - होमवार, मंगळवार - वाहापात, बुधवार - नामतापात, गुरुवार - वाहू, शुक्रवार-आट, शनिवार - फावर, रविवार - दितवार.[५]

होळी :

होळीपासून आदिवासींचे नववर्षाला प्रारंभ होतो. ते हा सण मोठया आनंद-उत्सवात साजरा करतात. होळीच्या एक महिना अगोदर त्याठिकाणी दांडू रोवला जातो. होळीसाठी माड, पोफळ, एरंड, आंबा, शेवरी किंवा बांबुचा उपयोग केला जातो. तो वृक्ष होळीसाठी तोडायचा तेथे प्रथम पूजा केली जाते, नंतर तो वृक्ष मोठ्या उत्सहात चार - पाच तरुण होळीच्या जागेपर्यंत आणतात. त्याची लांबी १५-२० हातापर्यंत असू शकते. त्या होळीला सजवतात. फुले, नारळ, खोबरे वाट्या, साखरेचे कंगन - हलवे लावली जातात. होळीच्या सभोवती

ISSN 2231 4342

जळन ठेवले जाते. जाळ लावल्यावर सर्व मंडळी तिची पूजा करायला सुरुवात करतात व जी काय बोंबाबोंब करायची ती करतात. काही अर्वाच्य उच्चार या वेळी होतात.[६]

होळी जाळल्यानंतर पाच दिवस काही ठिकाणी पंधरा दिवस सोंग, नृत्य सामुहिक पध्दतीने करतात. त्याचे प्रकार खालीलप्रमाणे -

मेलादा :

मेलादा म्हणजे लोकांचा मेळ हा नृत्याचा कार्यक्रम मोठ्या गावात असतो. मेलादची गावे ठरलेली असतात. मेलाद होळीच्या दुसऱ्या दिवशी सुरु होतो. तेथे रात्रभर सामुहिक नृत्य करतात. आजुबाजुच्या गावाचे लोक ढोल घेऊन तेथे येत असतात, सतत पाच दिवस पाच ठिकाणी हा कार्यक्रम असतो.

गेर :

गेर हा नृत्याचा प्रकार प्रत्येक गावात असतो. गावातील तरुण एकत्र येऊन होळी जाळल्यानंतर टोळक्याने सामुहिक नृत्य करतात. काही तरुण नव्या साडीचे कमरेला झगे करतात व गळ्यात स्त्रियांचे दागिने घालतात. डोक्यावर पागोटे बांधतात, वेशभूषा करून ढोल वाजतात. तर काही झांज पावरीच्या तालावर नाचतात. त्याला हार, कंगन बांधलेले असतात. ते सोबत घेउन नाचतात आणि भांग मागतात लोक त्यांना धान्याच्या रुपात भांग देतात.[७]

दिडंन :

दिडंन नृत्य हा गुजरात राज्यातील दांडीया नृत्यासारखाच एक प्रकार आहे. या नत्याचे अगोदर प्रशिक्षण दिले जाते. साडीसारखा झगा आणि डोक्यावर फेटा बांधतात आणि हातात खैराच्या झाडाचे टिपरे घेऊन नाचतात. एकजण देवीचा मुखवटा घालुन व हातात धनुष्यबाण घेऊन नाचतो.[८]

४. होळीपूजा गीत :

मावचाडी पाटी मे डांड रोप्यो माडी बाल
मावचाडी पाटी मे डांड रोप्यो माडी रेलो
ओलील आय काय लेती आबू माडी बाल
ओली आय काय लेती आवू रेलो
ओली आय खोबरा लनी आळू माडी बाल,
ओलील खोबरा लेनी आवू रेलो
ओली आय गुलाल डाल्या लेती आवू माडी बाल.

हे होळी तु आली आहे तुझ्यासाठी मी काय आणू ? मावचाडी जागेत तू उभी आहेस. खोबरे, खजुर, गुलाल, डाळ्या इत्यादी वस्तु मी तुझ्या पुजेसाठी आणते.[९]

होळीच्या नृत्याला खुप महत्व आहे. त्यामुळे देवीच्या कृपेने घरात सुखशांती व समृध्दी येत असते. अशाप्रकारे होळीच्या अगोदर व नंतर आदिवासी समाजाचे विविध नाच-नृत्य होत असतात. केवळ करमणुक व मौज-मजा करण्यासाठी नसते त्यामागे आगळी-वेगळी भावना असते.

ISSN 2231 4342

आपल्यातील भेदभाव, भांडण तंटे विसरुन सर्व एकत्र येतात. पाच दिवस सामुहिक नृत्य करतात, करमणूक करतात आणि आपण व आपले कुटुंब, गाव सुखी राहावे यासाठी पुढील वर्षाची होळी येईपर्यंत नवसंकल्प करतात. वर्षभर आपल्या कामधंद्यात विखुरलेला समाज एकत्र येतो. एक दुसऱ्याची सुख-दुःखाची विचारपूस करतात त्यामुळे समाज जोडला जातो. यातूनच उत्तर कोकणातील आदिवासी समाजाचे होळी सणातील सांस्कृतीक दर्शन घडते.

संदर्भ साधने :

१. निकम गौतम, क्रांतिकारी आदिवासी जननायक, विमलकिर्ती प्रकाशन, चाळीसगांव, पृ.क्र. १३.
२. कित्ता, पृ.क्र. १०.
३. जाधव सुदाम, सातपुड्यातील आदिवासी, सुलभा प्रकाशन औरंगाबाद, पृ.क्र.१८.
४. पाडवी विरसिंग, आदिवासी जीवनसंघर्ष, संतकृपा प्रकाशन, नंदुरबार, पृ.क्र.१६.
५. कित्ता, पृ.क्र.१७.
६. जोशी महादेवशास्त्री
७. पाडवी विरसिंग, आदिवासी जीवनसंघर्ष, संतकृपा प्रकाशन, नंदुरबार, पृ.क्र. ३०.
८. कित्ता, पृ.क्र.३१.
९. देवगरवकर शैलजा, महाराष्ट्रातील आदिवासीचे लोकसाहित्य, साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.१३८.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

भारताची सार्क संघटनेतील भूमिका

प्रा. डॉ. अंबादास नरहरी बिराजदार
राज्यशास्त्रविभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तुळजापूर
मोन. 9623190161
ambadasbirajdar70@gmail.co

प्रस्तावना

आज परराष्ट्र धोरण या संकल्पनेला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे कारण परस्परावलंबित्व खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहेत प्रत्येक राष्ट्र हे कोणत्यातरी राष्ट्रावर अवलंबून आहेजगात आज कोणतेही राष्ट्र स्वयंपूर्ण नाही त्यामुळे परराष्ट्र धोरण या संकल्पनेला महत्त्व प्राप्त झाले आहे तसेच आंतरराष्ट्रीय संबंध आणि परराष्ट्र धोरण हे विषय परस्पर संबंधित आहेत व आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाचा केंद्रबिंदू राष्ट्रीय हित हा आहे त्यामुळे आज प्रत्येक राष्ट्र हे आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांच्या संवर्धनासाठी तत्पर असल्याचे पाहावयास मिळते मग ते राष्ट्रीय संबंध सामाजिक राजकीय आर्थिक सांस्कृतिक नैसर्गिक संसाधने शैक्षणिक लष्करी इत्यादी स्वरूपाची असू शकतात

याचाच एक भाग म्हणून दक्षिण आशियाई सहकारी संघटनेची स्थापनाही 1980 च्या दशकात करण्यात आली या संघटनेचा मुख्य उद्देश हाजागतिक पटलावर दक्षिण आशिया खंडाची ओळख निर्माण करून जागतिक राजकारणावर आपला प्रभाव टाकने हा होतात्याकरिता त्याकरिता अगोदर दक्षिण आशियाई राहतात परस्पर सहकार्य करणे गरजेचे होते त्याकरिता आज सार्क संघटनेची स्थापना करण्यात आली या संघटनेचा मुख्य उद्देश हा दक्षिण आशियाई राष्ट्रात परस्पर सहकार्य वृद्धिगत वृद्धिगत करणे हा होता त्यामध्ये प्रामुख्याने दहशतवाद वांशिक संघर्ष निर्मूलन अमली पदार्थाच्या व्यापारावर निर्बंध पर्यावरण संरक्षण निर्वासितांचा प्रश्नइत्यादी बाबी वर सहकार्य प्रस्थापित करणे व परस्पर मैत्री मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करून दक्षिण आशियाई राष्ट्रातील मोट बांधण्याचा प्रयत्न या सारख्या माध्यमातून करण्यात आलाआणि ही संघटना आपल्या उद्देश पूर्ततेसाठी कटिबद्ध आहे

पार्श्वभूमी :

दक्षिण आशियाई देशांनी एकत्रित येऊन स्थापन केलेली संघटना. या देशांनी एप्रिल १९४७ ते डिसेंबर १९८५ या काळात प्रदीर्घ चर्चा करून दिनांक ८ डिसेंबर १९८५ रोजी सार्क संघटनेची ढाका येथे स्थापना केली. या बाबतीत बांगला देशाचे तत्कालीन अध्यक्ष जनरल इर्शाद यांनी अंतिम पुढाकार घेतला होता. सुरुवातीला भारत, बांगला देश, श्रीलंका, मालदीव, पाकिस्तान, भूतान आणि नेपाळ हे सात देश या संघटनेचे सदस्य होते. दक्षिण आशियातील देशांचे समाजकल्याण आणि तेथील लोकांचा जीवनविकास, आर्थिक स्थितीत सुधारणा इत्यादी

उद्दिष्टे समोर ठेवून ही संघटना तयार केली गेली होता. या सर्व देशांनी त्या वेळी कृषी, ग्रामीण विकास, दूरसंचार, हवामान, आरोग्य आणि लोकसंख्यावाढ या क्षेत्रांत एकात्मिक कृतिकार्यक्रम राबविण्याचे ठरविले. सार्कच्या स्थापनेनंतर अनेक देश या संघटनेत सदस्य किंवा निरीक्षक म्हणून सहभागी होण्यासाठी प्रयत्नशील होते. बऱ्याच वादावादीनंतर एप्रिल २००७ मध्ये अफगाणिस्तानला आठवा सदस्यदेश म्हणून या संघटनेत प्रवेश देण्यात आला. सध्या ऑस्ट्रेलिया, चीन, इराण, जपान, मॉरिशस, म्यानमार, दक्षिण कोरिया, अमेरिका हे आठ देश आणि युरोपियन युनियन ही संघटना यांना निरीक्षक देश म्हणून दर्जा देण्यात आला आहे. म्यानमारला लवकरच पूर्ण सदस्यत्व दिले जाईल, तर रशिया, दक्षिण आफ्रिका आणि टर्की हे देश निरीक्षक देशाचा दर्जा मिळावा म्हणून प्रयत्नशील आहेत.

रचना व कार्य :

नेपाळची राजधानी काठमांडू येथे १६ जानेवारी १९८७ रोजी सार्कच्या सचिवालयाची स्थापना करण्यात आली. सार्कच्या सरचिटणीसची नियुक्ती सदस्यदेशांमधून आळीपाळीने केली जाते. सदस्यदेशांमधल्या विविध शहरांतून विविध समित्यांमार्फत सार्कचे काम चालते. सार्कची वार्षिक परिषद (वर्षातून एकदा) देशांच्या नावाच्या आकारविल्हेनुसार त्या-त्या देशात भरते. तत्पूर्वी या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची वर्षातून दोनदा बैठक होते आणि त्या बैठकीला सदस्यदेशांचे राष्ट्रप्रमुख/पंतप्रधान उपस्थित राहतात. पूर्वी सदस्यदेशांतील मतभेदांमुळे या बैठका सौहार्दपूर्ण वातावरणात होत नसत. पाकिस्तान दहशतवाद्यांना देत असलेल्या पाठिंब्यामुळे आणि भारतात उरी येथील लष्करी तळावर झालेल्या हल्ल्यानंतर भारत, बांगला देश, भूतान आणि अफगाणिस्तान या देशांनी नोव्हेंबर २०१६ मध्ये पाकिस्तानात होणा-या सार्कच्या बैठकीवर बहिष्कार घातला होता. त्यामुळे ही बैठकच रद्द करावी लागली. सदस्यदेशांच्या अंतर्गत वादाचा सार्कच्या कामावर परिणाम होऊ नये म्हणून सार्कच्या बैठकीत युद्ध किंवा दोन देशांमधील संघर्ष यावर सहसा चर्चा होत नाही. पण संबंधित देशांना या बैठकीच्या वेळी परस्पर चर्चा करण्याची संधी सार्क देते. सार्कच्या शिखर परिषदांमध्ये दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी सदस्यराष्ट्रांच्या व्यापक सहकार्यावर नेहमीच भर देण्यात आला आहे. २०१५च्या आकडेवारीनुसार सार्कमध्ये जगाच्या क्षेत्रफळाच्या ३ टक्के भूभाग समाविष्ट होता, तर जगाच्या लोकसंख्येच्या २१ टक्के लोकसंख्या या देशांची होती. सदस्यदेशांमध्ये आर्थिक आणि क्षेत्रीय सहकार्य वाढावे यासाठी सार्क नेहमीच प्रयत्नशील असते. निरीक्षक या नात्याने सार्कचे संयुक्त राष्ट्रसंघाशी कायमस्वरूपी राजनैतिक संबंध आहेत. युरोपियन युनियन व अन्य अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांबरोबर सार्कने मैत्रीपूर्ण संबंध ठेवले आहेत.

सार्कने अल्पकाळात विविध आघाड्यांवर लक्षणीय प्रगती केली आहे. दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र या सार्क अंतर्गत संघटनेची (SAFTA) स्थापना २००६ मध्ये करण्यात आली. सदस्यदेशांमधील व्यापारवृद्धीबाबत या संघटनेला चांगलेच यश मिळाले आहे. सार्क अंतर्गत देशांमधील प्रवासासाठी व्हिसाच्या २४ प्रकारांच्या अटी शिथिल करण्यात आल्या. महिला व बालकल्याण, शांतता, विकास, दारिद्र्य निर्मूलन, पर्यावरणरक्षण आणि प्रादेशिक सहकार्य या क्षेत्रांत सार्कच्या कामात सहकार्य करणाऱ्यांना अनेक पारितोषिके जाहीर करण्यात आली.

ISSN 2231 4342

सदस्यदेशांतील नामवंत लेखक आणि युवकांसाठीही सार्क पुरस्कार जाहीर करण्यात आले. सार्क देशांतील ऐक्य अधिक दृढ करण्यासाठी सार्कचे गीत तयार करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

भारताने सार्क देशातील संपर्कासाठी एक दळणवळण-उपग्रह देण्याचे मान्य केले आहे. या उपग्रहासाठी २३५ कोटी रुपये खर्च येणार असून तो सर्व खर्च भारतच देणार आहे. पाकिस्तानचा या योजनेला विरोध आाहे. त्यामुळे पाकिस्तान वगळता अन्य सार्क देशांनी या उपग्रहाचा वापर करण्याचे ठरविले आहे. 'सीमाविरहित ज्ञान' असे घोषवाक्य असलेले एक दक्षिण आशियाई विद्यापीठ भारताने नवी दिल्ली येथे सुरू केले आहे. या विद्यापीठात अनेक विषयांतील संशोधनाची सोय असून अत्यंत समृद्ध असे ग्रंथालय उभे करण्यात आले आहे. सार्क आणि अन्य देशांतील विद्यार्थी २०१४ पासून या विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. सुमारे ७ हजार विद्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घेऊ शकतील. संघटनेच्या सदस्यदेशांमध्ये या विद्यापीठाच्या संलग्न शाखा असतील व तेथेही या विद्यार्थ्यांना संशोधन करता येईल. नवी दिल्लीतील इग्नू विद्यापीठ आणि असोला अभयारण्य यांच्या दरम्यान या विद्यापीठासाठी १०० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रस्तुत शोधनिबंध साठी सार्क संघटनेत भारताची भूमिका या विषयाची निवड करण्यात आली आहे प्रस्तुत विषयात सार्क मध्ये भारताने घेतलेल्या भूमिकेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात येणार आशोध**शोधनिबंधाचे उद्दिष्टे**

प्रस्तुत शोधनिबंध साठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येते

सार्क संघटनेत भारताच्या भूमिकेवर प्रकाश टाकने

सार्क संघटनेची निर्मितीची पार्श्वभूमी समजून घेणे

सार्क संघटनेचा उद्देश समजून घेणे

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे तसेच हे संशोधन हे संशोधन दुय्यम साधना वर आधारित आहे त्याचबरोबर प्रस्तुत शोधनिबंध साठी विविध आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय स्तरावरील परिषदांमधील प्रकाशित लेख विविध वर्तमानपत्रे संदर्भ ग्रंथ साप्ताहिके मासिके नियतकालिके यांचा वापर करण्यात आला आहे

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

सार्क आणि भारत

सार्क संघटनेच्या स्थापनेपासून ते आज पर्यंत भारताने त्यामध्ये महत्त्वाची आणि सक्रीय भूमिका निभावली आहे भारत सारसा सक्रिय सदस्य राहिला आहेत्यासाठी विविध माध्यमातून परस्पर संबंध वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करत आला आहे व्यापार आणि गुंतवणुकीसाठी भारत हा एक मोठा स्त्रोत प्रधान करतो

कारण तो समुद्र आणि जमिनीच्या द्वारे सर्व सहा सदस्य राष्ट्र बरोबर सामायिक संबंध असणारा एकमेव देश आहे त्यामुळे भारताची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते सातारच्या मुख्य उद्देश आम मध्ये दक्षिण आशियातील लोकांचे कल्याण कल्याण करणे आर्थिक व सामाजिक प्रगती करणे सर्व व्यक्तींना सन्मानजनक उपजिविकेचे साधने प्रदान करणे आणि दक्षिण आशियाई देशात आत्मनिर्भरता वृद्धिगतकरणे व त्यांच्यात विश्वास निर्माण करणे परंतु या उद्देशाच्या पुरतेच पुरते मधील सर्वात मोठा अडथळा म्हणजे गरिबी हा आहे त्याकरिता 2004 मध्ये इस्लामाबाद मधील परिषदेमध्ये 100 मिलियन डॉलरची मदत करून महत्त्वपूर्ण आर्थिक योगदान दिल

भारतानेसार्कमध्येराजकीयभूमिकादेखीलबजावलीआहेयामध्येप्रामुख्यानेसदस्यराष्ट्रमध्येराजकियस्थिरताप्रस्थापित करण्यासाठीसर्वतोपरीप्रयत्नकेलाआहे नेपाळ भूतान मालदीव हे देश राजकीय दृष्ट्या कसे स्थिर ठेवता येतील यासाठी नेहमी प्रयत्नशील असतो हे देश जर राजकीय दृष्ट्या अस्थिर राहिले तर आपला मूळ उद्देश साध्य करू शकनारनाहीतसेच राजकीय अस्थिरतेचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम हा शेजारील राष्ट्रांना भोगावा लागतो उदाहरणात पाकिस्तानमध्ये सतत राजकीय दृष्टीने अस्थिरता असते त्याचा विपरीत परिणाम हा शेजारील राष्ट्रावर राष्ट्रावर होताना दिसून येतो तसेच सारखच या अधिवेशनात जे राजकीय करार होतात त्याचे भारताने सतत पालन केले आहे त्यामुळे भारताचे राजकीय योगदान हे महत्त्वाचे आहे असे म्हणता येईल

तसेच सार्क सदस्य राष्ट्रातील ज्या सामाजिक समस्या आहेत त्यासंदर्भात भारताने सतत ठोस भूमिका घेताना दिसून येतो सार्क सदस्य राष्ट्रात सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात आहे ती विषमता मिटविण्यासाठी भारताने सारख्या व्यासपीठावरून महत्त्वाची भूमिका बजावली आहे ज्यामध्ये वेळोवेळी सारख्या अधिवेशनातून या विषयाची आपली भूमिका स्पष्ट केली आहे त्याचबरोबर भारताने सार्थ संघटनेमध्ये आर्थिक व व्यापारी दृष्टिकोनातून महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे आज पर्यंत सर्वात जास्त सार्क सदस्य राष्ट्रांना आर्थिक सहकार्य हे भारताने केले आहेत कारण भारत एक जलदगतीने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे त्यामुळे भारताकडे सार्क सदस्य राष्ट्रीय अपेक्षेने पाहत असतात व मदतीची अपेक्षा करत असतात आणि या अपेक्षांची पूर्तता भारताने सतत केली आहे कोट्यावधी रुपये भारताने आर्थिक मदत ही सार्क सदस्य राष्ट्रांना केले आहेत कारण सारख मधील सर्व राष्ट्रेही अविकसित आहेत आहेत त्यांना जर जगाच्या राजकारणात पुढे आणावयाचे असेल तर त्यांचा आर्थिक विकास झाल्याशिवाय हे शक्य नाही त्यामुळे भारताने आर्थिक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावली आहेत त्याच प्रमाणे दक्षिण आशियाई राष्ट्रात व्यापार वृद्धिंगत होण्यासाठी सतत प्रयत्नशील

आहे आयात निर्यात सुलभ होण्यासाठीसाप्ता नावाचा करार केला आहे ज्यामुळे व्यापारी संबंध मजबूत होण्यास मदत झाली आहे

भारताने सारख मध्ये लष्करीदृष्ट्या देखील महत्त्वाची भूमिका बजावली आहे सार्क सदस्य राष्ट्र कोणत्याही लष्करी करारात सहभागी होणार नाहीत याची दक्षता घेण्यात आली आहे त्याच बरोबर दक्षिण आशियाई क्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारताने महत्त्वाची भूमिका बजावली आहे

सार्क संघटनेमध्ये भारताने संस्कृतीक पर्यावरणीय दृष्ट्या अमली पदार्थाच्या व्यापारी संबंधी व विस्थापितांच्या समस्या विषयी वेळोवेळी महत्त्वाची भूमिका बजावली आहे

निष्कर्ष व समारोप

अशाप्रकारे प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सार्क संघटनेमध्ये भारताची नेमकी कोणती भूमिका राहिली आहे यावर प्रकाश टाकण्यात आला आहे यामध्ये हे स्पष्ट होते की भारताने या संघटनेच्या स्थापनेपासून ते आज पर्यंत वेळोवेळी सक्रिय भूमिका बजावली आहे तरीदेखील ही संघटना आपला प्रभाव जागतिक राजकारणावर पाडू शकली नाही कारण या संघटनेच्या सदस्य राष्ट्रांमध्ये मोठ्या प्रमाणात मतभेद आहेत त्यांच्या अंतर्गत विविध प्रकारचे संघर्ष आहेत त्यामुळे ही संघटना आपला मुख्य उद्देश साध्य करु शकली नाही या संघटनेला जर इतर प्रादेशिक संघटना सारखा आपला जागतिक प्रभाव निर्माण करायचा असेल तर आपले परस्पर मतभेद मिटवून कार्य करावे लागेल त्याशिवाय हे शक्य होणार नाही

भारत आणि अन्य सदस्यदेश यांची महत्त्वाची भूमिका असलेल्या अनेक जागतिक व प्रादेशिक संघटनांबरोबर सार्कचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामध्ये एशिया को-ऑपरेशन डायलॉग (ACD—३४ देश), साऊथ एशिया सब रीजनल इकॉनॉमिक को-ऑपरेशन (SASEC—६ देश), मेकाँग—गंगा को-ऑपरेशन (MGC—६ देश), इंडियन ओशन रिम असोसिएशन (IORA—२१ देश), बांगला देश, भूतान, भारत, नेपाळ सहकार्य (BBIN—४ देश) आणि बंगालच्या उपसागरानजीकच्या देशांची परिषद (BIMSTEC—७ देश) या संघटनांचा यात समावेश होतो. या संघटनांमुळे सार्कला स्थैर्य प्राप्त झाले आहे. दहशतवादाला उघडउघड पाठिंबा देणा-या पाकिस्तानमुळे सार्कमध्ये मतभेद निर्माण झाले असून या भूप्रदेशातील शांततेला बाधा निर्माण झाली आहे.
अफगाणिस्तान हा मध्य आशियातील देश असल्यामुळे त्याला प्रवेश देताना सार्कच्या सदस्यदेशांमध्ये खूपच वाद झाले होते. दक्षिण आशियाई देश कुणाला म्हणायचे, यावरून हा वाद निर्माण झाला होता.

सार्कमधील सर्वच देशांना विकासासाठी खूप वाव असल्याने अनेक देश निरीक्षक म्हणून या संघटनेत सहभागी झाले आहेत. धोरण आणि उद्दिष्टांची पूर्तता करण्याबाबत सार्कचा प्रभाव हा नेहमीच वादाचा विषय राहिला

संदर्भ ग्रंथ सूची

*www.saarc.org.

*योजना

*कुरुक्षेत्र

*Geolo.p. India and saarcengagement.gyan book pub

*डॉ संदीप कुमार डॉ गोपाल प्रसाद सार्क देशो मे मौलिक अधिकार

- http://www.saarc-sec.org/SAARC-Charter/5/ ; accessed on 1st May 2017-05-01
- quora.com/What-are-the-**functions**-of-**SAARC ; accessed on 1st may** 2017
- preservearticles.com/2012020222426/brief-notes-on...The organization structure of SAARC ; accessed on 1st May 2017
- **saarc**-sec.org; accessed on 1st May 2017

ISSN 2231 4342

निसर्गयात्री मंडळ-एक सामाजिक संस्था

डॉ. भारती कुमार सुडके,
सहाय्यक प्राध्यापक,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर.
Email: bharatibhuse1980@gamil.com

प्रस्तावना:

पंढरपूर हे भागवत धर्माचे परम आद्यपीठ आहे. भारताची दक्षिण काशी म्हणून ओळखले जाणारे पंढरपूर हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील महत्वपूर्ण तीर्थक्षेत्र आहे. श्री विठ्ठल देवता ही अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे. पंढरीची वारी हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. पंढरपूर शहराला प्रचीन ऐतिहासिक वारसा लाभला आहे. इ.स. पूर्व ५१६ चा शिलालेख हा पंढरपूर शहरासंबंधी सर्वात जुना ऐतिहासिक संदर्भ मानला जातो. पंढरपूर शहराला ज्याप्रमाणे अध्यात्मिक वारसा आहे त्याचप्रमाणे सामाजिक अधिष्ठान ही आहे. पंढरपुरात पुरोगामी विचारसरणीचा पुरस्कार करणाऱ्या सामाजिक चळवळी घडून आल्या. याशिवाय सेवाभावी वृत्तीने कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था पंढरपुरात आहेत. या अनेक संस्थांपैकी निसर्गातील सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी पर्यावरणातील पशुपक्षी, वन्यजीव संवर्धनासाठी सेवाभावी व निष्कामवृत्तीने निसर्गयात्री मंडळ कार्य चालू आहे. निसर्गातील सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी व पर्यावरण संतुलन राखण्यासाठी पर्यावरण संवर्धन करण्याचे महत्वपूर्ण कार्य पंढरपुरातील निसर्गयात्री मंडळ करीत आहे.

संस्थेचे स्वरूप:

निसर्ग संरक्षण, पशुपक्षी, वन्यजीव यांचे संवर्धन या हेतूने पंढरीतील काही निसर्गप्रेमी मंडळी एकत्रित आली. आपल्या कार्याला मूर्त रूप देण्यासाठी निसर्गप्रेमी मंडळानी दि. २९ जून १९९४ रोजी नोंदणी क्रमांक एफ ५१८३ सोलापूर या संस्थेची रीतसर नोंदणी केली. 'निसर्ग एव ईश्वर :' हे या संस्थेचे ब्रीद वाक्य आहे. श्री. गोविंद सबनीस हे या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. संस्थेचे संचालक मंडळ हे ऐच्छिक स्वरूपाचे असून सदस्य स्वत:च्या आवडीने सहभागी होतात. सर्वच सदस्यांच्या विनिमयातून पर्यावरण संरक्षण कार्याचे स्वरूप ठरते. एखादा उपक्रम राबवते वेळी आवश्यक असणारी आर्थिक गरज संस्थेतील सदस्य स्वखर्चाने भागवतात. पर्यावरण जागृती संदर्भात मोठा कायक्रम आयोजित करतेवेळी समाजातील काही दानशूर व्यक्तीकडून देणगी स्वीकारली जाते. निसर्गयात्री संस्थेच्यावतीने निसर्गप्रेमी मंडळींचा मेळावा आयोजित केला जातो. याचे मुख्य कारण म्हणजे अनेक निसर्ग प्रेमी मंडळी एकत्रित यावीत व सर्वांच्या सहकार्याने पर्यावरण संवर्धनाची जाणीव व जागृती समाजात करता यावी. पंढरपुरातील निसर्गयात्री मंडळ हे निसर्ग संवर्धन हीच खरी ईश्वर सेवा याद्दष्टीने कार्य करते. मानवाचा निसर्गाशी जवळीक साधण्याचा व निसर्गाचे महत्व पटवून देण्याच्या कार्यात निसर्गयात्री

ISSN 2231 4342

संस्थेचे कार्य महत्वपूर्ण आहे. या संस्थेमार्फत पर्यावरण संवर्धन, पशुपक्षी संवर्धन, वृक्ष संवर्धन यासारखे निसर्गाशी निगडीत अनेक उपक्रम राबविले जातात. या संस्थेचे वैशिष्ट्ये म्हणजे या संस्थेमार्फत हिमालय भ्रमण मोहीम राबविण्यात आली व १३५०० फुट उंचीवर गिर्यारोहण यशस्वी केले.

संस्थेची उद्दिष्ट्ये :

१. निसर्ग संवर्धन संबंधित नागरिकांमध्ये जाणीव जागृती करणे
२. पर्यावरण संतुलनाचे महत्व पटवून देणे.
३. विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, स्लाईड शो, निसर्ग प्रश्नमंजुषा, किल्ले स्पर्धा आयोजित करणे.
४. अल्प खर्चात निसर्ग दर्शन सहलीचे, शिबिराचे आयोजन करणे.
५. निसर्ग ज्ञानाविषयी लेख, माहिती संशोधन लेख प्रसिद्ध करणे.
६. पर्यावरण शास्त्र, वन्यजीव, वनस्पतीशास्त्र इत्यादी विषयावरील पुस्तकांचे ग्रंथालय निर्माण करणे.
७. पर्यावरण संबंधी विषय तज्ञांची व्याख्याने आयोजित करणे.

औषधी वनस्पतीचा अभ्यास करणे व औषधी वनस्पतीची लागवड करणे.

संस्थेचे अभिनव उपक्रम :

निसर्गयात्री संस्थेने अनेक अभिनव उपक्रम राबविले आहेत. ते पुढीलप्रमाणे :-

1 निसर्गयात्री मंडळ, पंढरपूर, नोंदवही
2 दैनिक संचार, सोलापूर, बुधवार, दि. २३ जून १९९३.
3 मुलाखत, सबनीस गोविंद रघुनाथ, संस्थास्पक अध्यक्ष, निसर्गयात्री मंडळ, पंढरपूर.

निसर्ग दर्शन सहल :

अप्रतिम निसर्ग सौदर्य, प्रत्यक्ष अनुभवास यावे, निसर्गाशी जवळीकता साधता यावी, निसर्गातील वन्य प्राणी, पक्षी यांच्या सवयी व याबाबत निरीक्षण करता यावे, निसर्गातील विविधतेचा अनुभव घेता यावा या हेतूने निसर्ग दर्शन सहलींचे आयोजन केले जाते. विद्यालयातील व महाविद्यालयातील विद्यार्थी, निसर्गप्रेमी मंडळी, नागरिक या सहलीत सहभागी होऊ शकतात. अतिशय अल्प दारात सर्व सोयीने युक्त अशा अनेक निसर्ग सहली या संस्थेने आयोजित केल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने हिमालय पर्वत, शुक्राचार्य पर्वत, सागरेश्वर, विविध दुर्ग भ्रमंती व कोयना अभयारण्य यासारख्या निसर्गरम्य ठिकाणी सहलींचे आयोजन या संस्थेमार्फत केले जाते. सहलींच्या कालावधीत त्या-त्या ठिकाणांची माहिती आणि त्यांची वैशिष्ट्ये यांचे ज्ञान तज्ञ व्यक्तींकडून सहभागी व्यक्तींना दिले जाते.

 ISSN 2231 4342

निसर्ग अभ्यास शिबिरे:

संस्थेमार्फत प्रत्येक वर्षी निसर्ग अभ्यास निवासी शिबिरे आयोजित केली जातात. या शिबिरांचा कालावधी दोन ते तीन दिवसांचा असतो. यामध्ये शालेय विद्यार्थी, युवक आणि निसर्गप्रेमी नागरिक सहभागी होऊ शकतात. या शिबिरांच्या आयोजनच्या पाठीमागे निसर्गातील विविधतेचे दर्शन व्हावे हा हेतू असतो. निसर्गाकडे चला हा महत्वपूर्ण संदेश निवासी शिबिरांच्या माध्यमातून देण्याचे कार्य संस्था करते. इ. स. १९९३ मध्ये संस्थेमार्फत आटपाडी तालुक्यातील शुक्राचार्य डोंगर याठिकाणी तीन दिवसांचे निवासी शिबीर आयोजित करण्यात आले होते. तर इ. स. १९९५ मध्ये चांदोली अभयारण्यात तीन दिवसाचे निसर्गदर्शन परिचय शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ७२ विद्यालयीन विद्यार्थी व ४२ निसर्गप्रेमी नागरिकांनी सहभाग घेतला. याशिबिरामध्ये अनेक तज्ञ व्यक्तींनी सहभागीना मार्गदर्शन करून झोळंबी पठारावरील पक्षी, वृक्ष, तृण. कीटकभक्षी, वनस्पती इत्यादींची प्राथमिक ओळख करून देण्यात आली.

वृक्ष संवर्धनाचा उपक्रम :

“वृक्षो रक्षिता रक्षत:” वृक्षाचे रक्षण केल्यास आपलेही रक्षण होईल म्हणून वृक्ष संवर्धन गरजेचे आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे राहत्या जागेचा प्रश्न मिटविण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड, जंगलतोड होत आहे. हे पर्यावरण घातक कृत्य थांबविण्यासाठी व नवीन वृक्षांची लागवड व संवर्धन करण्याच्या हेतूने या संस्थेने एक स्पर्धा आयोजित केली. पंढरपुरातील द. ह. कवठेकर प्रशालेतील ३०० विद्यार्थी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या रोपाचे वाटप केले. वाटप रोपातील ज्यांनी वृक्ष संवर्धन चांगल्या प्रकारे केले त्यांना परितोषिक देण्यात आले. तसेच द. ह. कवठेकर प्रशालेच्या प्रांगणात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. सर्वत्र वृक्ष तोड होत असताना निसर्ग यात्री संस्थेने खऱ्या अर्थाने निसर्गाशी जवळीक साधण्याचा व वृक्षांचे महत्व जनमानसात रुजविण्याचे कार्य केले. या व्यतिरिक्त संस्थेने पंढरपुरातील पद्मावती तळे परिसरातील ८० हेक्टर्स जागेत वृक्षारोपण केले.

प्रदूषण करणाऱ्या घटकांची होळी:

भारतीय परंपरेनुसार प्रतिवर्षी फाल्गुन पौर्णिमेला होळीचा उत्सव साजरा केला जातो. या उत्सवाचा प्रमुख आशय वाईट सवयी, वाईट प्रथा यांची जाहीर होळी करणे. पण या प्रथेत बदल होऊन लाकडाची होळी करून त्याभोवती शिव्या देत बोंब करणे ही प्रथा सुरु झाली. निसर्गयात्री मंडळीना ही बाब मान्य नसल्याने त्यांनी याविषयी जाणीवजागृती करण्याच्या कार्यास सुरुवात केली. आधुनिकतेच्या नावाखाली पर्यावरण संतुलन बिघडवणाऱ्या वाईट गोष्टी अस्तित्वात आल्या. उदा. पॉलिथिन वापराची संस्कृती, प्लास्टिक वापराची संस्कृती, रासायनिक खतांची संस्कृती, सिमेंटच्या जंगलाची संस्कृती, निसर्गयात्री मंडळाने दि. २५/०३/१९९४ रोजी प्रथमत: होळी पौर्णिमेदिवशी पॉलिथिन कॅरीबॅगा, केरकचरा याची पंढरपुरात शिवाजी चौकात होळी केली. ज्येष्ठ

 ISSN 2231 4342

पत्रकार व पंढरपुरचे तत्कालीन आमदार पांडुरंगतात्या डिंगरे यांच्या हस्ते प्रदूषण करणाऱ्या वस्तूंची होळी पेटविण्यात आली. यावेळी संस्थेने पॉलिथिन, केरकचरा, प्लास्टिक यांची होळी का? याविषयी नागरिकांमध्ये माहिती दिली व उपस्थित नागरिकांना अहवान केले कि, होळी सणानिमित्त पर्यावरण रक्षक लाकूड न जाळता पर्यावरण घातक वस्तूंची होळी करण्यात यावी.

व्याख्यानमाला व स्लाईड शो चे आयोजन :

पर्यावरण संवर्धन व वन्य पशु पक्ष्यांना अभय हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निसर्गयात्री संस्था पर्यावरण संबंधित तज्ञ व्यक्तीची वन्य प्राणी निरीक्षण, जागतिक पशु जीवन विविध अभयारण्य, दुर्गम किल्ले, पर्यावरणाचे महत्व, वनस्पतींचे ज्ञान, दुर्मिळ वनस्पती, आकाश नक्षत्र तारका इत्यादी विषयावर आधारित व्याख्याने आयोजित करते. प्रत्येक महिन्याला शाळा व महाविद्यालयातून पर्यावरण स्लाईड शो, फिल्म शो आयोजित केले जातात. विद्यार्थी,

1 दैनिक गोफण, पंढरपूर, दि. २६ डिसेंबर,१९९५.

2 निसर्ग यात्री मंडळ पंढरपूर कार्यालयीन माहिती.

3 साप्ताहिक पंढरी संचार प्रहर पंढरपूर, रविवार, दि. २७/०३/१९९४.

4 मुलाखत, कुलकर्णी नंदकुमार सदस्य निसर्गयात्री मंडळ, पंढरपूर

युवक व नागरिकांमध्ये पर्यावरण संबंधी जाणीव व जागृती निर्माण व्हावी व पर्यावरणाचे महत्व पटवून देण्यासाठी व्याख्याने व स्लाईड शो चे आयोजन केले जाते.

चंद्रभागा वाळवंट सुशोभिकरण आराखडा :

प्राचीन काळापासून संतमहंतांनी चंद्रभागेला लोकमाता, सर्व पाप विनाशनी, मोक्षदायिनी अशा स्वरुपात गौरविले आहे. परंतु या नदीचे पात्र, शहरातील गटारीचे पाणी, कारखान्यातील टाकावू रसायने, मानवी केरकचरा, वारी दरम्यान वाळवंटात घाणीचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात नदीपात्रात दिसते. नदी पात्रातील वाळू उपासामुळे नदीच्या पात्रात जागोजागी खड्डे पडले आहेत. यासंदर्भात निसर्गयात्री मंडळाने अनेक वेळा तकारी केल्या आहेत. पण त्याची दाखल घेतली जात नाही. नदी पात्रात कपडे धुणे, वाहन धुणे, वाळू उपसा यावर बंदी आहे. यासंदर्भात नियम मोडल्यास कडक कारवाई केली जाईल असे फलक वाळवंटात लावण्यात आले आहेत. पण याच फलकापुढे वरील सर्व गैरप्रकार चालू असतात. निसर्ग यात्री संस्थेने चंद्रभागा वाळवंट सुशोभिकरण कार्यात विशेष पुढाकार घेतला. पंढरपूर नगरपरिषदेत दिल्लीच्या इनटच संस्थेने चंद्रभागा नदीसुधार व विकास आराखडा तयार करण्यासाठी मान्यवरांची बैठक बोलावली. पण तेथे फक्त तोंडी चर्चा झाली. नंतर निसर्गयात्री संस्थेने सर्व बाबींचा विचार करून वाळवंट सुशोभिकरणाचा आराखडा तयार केला व तो नगरपरिषदेकडे दिला. या आराखड्याप्रमाणे कार्य झाल्यास पंढरीत येणाऱ्या भाविकांची स्नानाची सोय, वाळवंटातील घाणीचे साम्राज्य

 ISSN 2231 4342

नष्ट होईल व हजारो वर्षाची परंपरा असणाऱ्या चंद्रभागा नदीचे पावित्र्य जपले जाईल. वाळवंटाची शोभा वाढेल म्हणून या कार्यासाठी संस्था या आराखड्याप्रमाणे काम सुरु व्हावे अशी वारंवार शिफारस करीत आहे. पण अजूनपर्यंत हा प्रकल्प राबविला गेला नाही.

यमाईतळयाचे निसर्गरम्य वातावरणात रुपांतर :

पंढरीत यमाई तुकाई मंदिरासमोर यमाई तळ्याचा परिसर आहे. पूर्वी या तळ्याभोवती सर्व काटेरी झुडपे होती. या ठिकाणी ये-जा करण्यातही नागरिक भीत असत. तळ्यातील पाण्यावर जनावरे धुतली जात होती. तळ्यात पाण्यावर मोठ्या प्रमाणवर शेवाळ तयार झाले होते. निसर्गयात्री संस्थेने या परिसराचा अभ्यास केला. त्यावेळी त्यांच्या लक्षात आले कि या तळ्याच्या परिसरात वेगवेगळ्या ऋतूमध्ये सैबेरियापासूनचे १०५ जातीचे पक्षी आढळतात. या संस्थेचे अध्यक्ष गोविंद सबनीस यांनी यमाई तळ्याकाठी वनीकरण करून पक्षी अभयारण्य विकसित करावे अशी विनंती सोलापूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी प्रवीण परदेशी यांना केले. जिल्हाधिकारी पक्षिमित्र व निसर्गप्रेमी असल्यामुळे हा परिसर विकसित करण्याची क्षमता आर्थिकदृष्ट्या पंढरपुर पालिकेजवळ नसल्यामुळे मंदिर समितीकडे त्यांनी हे काम सोपाविले. नगरपालिका व विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती यांच्या समन्वयातून या योजनेच्या कार्याची सुरवात झाली. पावसाळा सुरु होण्यापूर्वी तळ्याकाठी वृक्षारोपण केले. पाण्यातील गाळ व शेवाळ काढण्यात आले. तळ्याच्या एका बाजूला शहरातील नागरिकांना फिरण्यासाठी ट्रॅक तयार केला. मुलांना खेळण्यासाठी जागा ठेवण्यात आली. या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना विविध पक्षांची माहिती व्हावी या हेतूने वेगवेगळ्या पक्षांची छायाचित्रे व त्या खाली पक्षांची माहिती असे अनेक फलक या ठिकाणी लावण्यात आले आहेत. यमाई तळे हे पंढरीतील नागरिकांसाठी निसर्ग रम्य ठिकाण निर्माण झाले.

सारांश :

मानवाच्या बदलत्या शैलीमुळे निसर्गाचे संतुलन बिघडत चालले. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ततेच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होऊ लागली. वन्यजीव पशुपक्षी यांचे अस्तित्व नष्ट होऊ लागले. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी ना नफा ना तोटा या तत्वाने निसर्गयात्री संस्थेचे कार्य चालू आहे. निसर्ग संवर्धनासंबंधी नागरिकांमध्ये जाणीव जागृती करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविले जाते. पर्यावरण बचाव व समाजहिताच्या दृष्टीने निसर्गयात्री संस्थेचे कार्य निस्वार्थपणे चालू आहे. पंढरपूर सारख्या ग्रामीण भागात निसर्ग पर्यावरणाचे शिक्षण, संतुलन व संवर्धन करण्याचे महत कार्य ही संस्था करीत आहे. त्यामुळे अल्पावधीतच ही संस्था लोकप्रिय झाली.

संदर्भ:

1 उपरोक्त, मुलाखत सबनीस गोविंद रघुनाथ
2 दै. सकाळ सोलापूर,दि. २८/०३/१९९६

ISSN 2231 4342

गांधीजींची आत्मकथा आणि महाराष्ट्र

प्रा. डॉ. गणेश राऊत
(प्रभारी प्राचार्य, एच. व्ही. देसाई महाविद्यालय, पुणे)
पत्ता : ५९६, बुधवारपेठ, पुणे- ४११००२
भ्रमणध्वनीक्रमांक : ८४५९७७२०१८
ई-मेल : gdrauthistory@gmail.com

मोहनदास करमचंद गांधी उर्फ महात्मा गांधी यांचे आत्मचरित्र 'सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा'[१]या शीर्षकाने मराठीत प्रसिद्ध आहे. या आत्मचरित्राला गांधीजींनी जी प्रस्तावना लिहिली आहे, त्या प्रस्तावनेची सुरुवातच मुळी महाराष्ट्राच्या संदर्भाने झाली आहे. मुंबई आणि येरवडा तुरुंग यांच्या संदर्भाने प्रस्तावना सुरू झाली आहे.

गांधीजी लिहितात, "चार किंवा पाच वर्षांपूर्वी निकटच्या सहकाऱ्यांच्या आग्रहावरून मी आत्मकथा लिहिण्याचे मान्य केले होते आणि आरंभही केला. परंतु फुलस्केपचे एक पान लिहितो न लिहितो, इतक्यात मुंबईची आग (इंग्लंडच्या प्रिन्स ऑफ वेल्सच्याआगमनप्रसंगीदंगल उसळली होती. दंगल थांबेपर्यंत गांधीजींनी उपोषण केले होते) भडकली आणि मी हाती घेतलेले काम अर्धवट राहून गेले. त्यानंतर मी एकामागून एक अशा व्यवसायात पडलो की शेवटी मला येरवड्याचे(येरवडा तुरुंग) स्थान मिळाले. मला जर माझ्या शिक्षेची पूर्ण मुदत येरवड्यामध्येच घालवण्याचे सद्भाग्य लाभले असते, तर मी खात्रीने तेथेच आत्मकथा लिहू शकलो असतो."[२]

गांधीजींनी वरील प्रस्तावना साबरमती आश्रमात लिहिली आहे. महाराष्ट्राचा आणि विशेषतः मुंबईचा पहिला उल्लेख प्रकरण ९ 'वडिलांचा मृत्यू' या प्रकरणात आलेला आहे. गांधीजींचे वडील भगंदरच्या विकाराने आजारी होते. "त्यांचे दुखणे वाढू लागल्यावर त्यांच्यावरील शस्त्रक्रिया मुंबईच्या त्यावेळच्या प्रसिद्ध सर्जनच्या हातून व्हावयाची होती...वडील मुंबईहून शस्त्रक्रिया करविल्याखेरीज व त्यासाठी खरेदी केलेले सर्व सामान बरोबर घेऊन परत आले."[३] गांधीजींचे घरोब्याचे वैद्य मध्ये पडले. त्यांनी शस्त्रक्रियेसंदर्भात नापसंती दर्शविली आणि ती शस्त्रक्रिया झाली नाही. याचा अर्थ वैद्यकीय सेवांच्या संदर्भात मुंबईत त्याकाळी अधिक चांगली परिस्थिती असणार, असे दिसते.

१८८७ च्या पुढे गांधीजींनी विलायतेला पुढील शिक्षणासाठी जाण्याची तयारी केली. त्यासाठी ते आयुष्यात प्रथमच मुंबईला पोहोचले. गांधीजींचे मुंबई संदर्भातील एकच वाक्य परिस्थितीची जाणीव करून देते. "मुंबईचे फाटक चटकन खुलण्यासारखे नव्हते."[४]गांधीजींनी असे लिहिण्याचे कारण म्हणजे ते मुंबईला पोहोचल्यावर त्यांना सगळ्या मित्रांनी सांगितले की, जून-जुलैमध्ये हिंदी महासागरात तुफान असते. त्यामुळे नोव्हेंबर मध्ये जाणे

 ISSN 2231 4342

उत्तम. गांधीजींची ही पहिलीच विलायत यात्रा होती. कुटुंबियांना कोणत्याही प्रकारचा धोका पत्करायचा नव्हता म्हणून त्यांनी बेत पुढे ढकलला. त्यामुळे गांधीजींना मुंबईत काही दिवस राहण्याचा निर्णय घ्यावा लागला.

या मुंबईतच त्यांच्यावर जो प्रसंग आला त्याला अनुसरून गांधीजींनी आपल्या आत्मचरित्रातील बाराव्या प्रकरणाला नाव दिले आहे 'जातीबाहेर.'[५]जे घडले त्याचा सारांश पुढीलप्रमाणे : गांधीजींच्या लिखाणानुसार तोपर्यंत मोढवाणिया जातीमधील कोणीही विलायतेला गेला नव्हता. त्यामुळे गांधीजींना मोढवाणिया ज्ञातीच्या वाडीमध्ये (भाग) बोलविण्यात आले. या ज्ञातीचे प्रमुख (शेठजी) गांधीजींच्या वडिलांचे मित्र होते. त्यांचे मत असे होते की, समुद्र ओलांडून जाण्यासाठी धर्माची परवानगी नाही. विलायतेत धर्मपालन शक्य नाही. गांधीजी म्हणाले की, "या बाबतीत ज्ञातीने मध्ये न पडणे बरे." शेठजींनी हुकूम सोडला, "या मुलाला आजपासून ज्ञातीबहिष्कृत समजण्यात येईल. जो कोणी त्याला मदत करील किंवा पोचवायला जाईल, त्याला ज्ञाती जाब विचारेल व त्याला सव्वा रुपया दंड होईल."[६]

हे ऐकून गांधीजी निघून आले. त्यांच्या घरच्यांनी गांधीजींच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला. ४ सप्टेंबर १८८८ रोजी गांधीजींनी मुंबई बंदर सोडले आणि ते आयुष्यात प्रथमच विलायतेला गेले. या ज्ञाती बहिष्कृततेचे पुढे काय झाले, यावर आत्मकथने मुग्धता पाळली आहे. १० जून १८९१ रोजी गांधीजींना बॅरिस्टर पदवी मिळाली. १२ जून १८९१ रोजी गांधीजी भारतात येण्यास निघाले आणि ते आसाम बोटीतून मुंबईत आले. मुंबईत उतरल्यावर गांधीजींना घेण्यासाठी त्यांचे थोरले बंधू आले होते. मुंबईला आल्यावर गांधीजींना त्यांच्या मातोश्रींच्या निधनाची वार्ता समजली. यासंदर्भात गांधीजींनी लिहिले की, "वडिलांच्या मृत्यूने पोचला त्याहूनही मला ही बातमी ऐकून फारच मोठा आघात पोचला."

'संसारप्रवेश' या प्रकरणात महाराष्ट्रातील नाशिक या तीर्थक्षेत्राचा उल्लेख आहे. गांधीजी विलायतेहून परतल्यावर त्यांच्या संदर्भातील ज्ञातीचा झगडा अजूनही संपला नव्हता. गांधीजी लिहितात, "...(ज्ञातीचे) दोन पक्ष पडले होते. एका पक्षाने मला लगेच जातीत घेतले; दुसरा पक्ष न घेण्याबद्दल भक्कम राहिला. मला जातीत घेणाऱ्या पक्षाचे समाधान करण्यासाठी वडील बंधू राजकोटला जाण्यापूर्वी मला नाशिकला घेऊन गेले. तेथे गंगास्नान करविले आणि राजकोटला पोहोचताच ज्ञातिभोजन घातले."[७]

गांधीजींच्या बंधूंनी गांधीजींकडून हे सगळे करवून घेतले. यात गांधीजींची इच्छा कोणीच लक्षात घेतली नाही. थोरल्या बंधूंची इच्छा म्हणून गांधीजींनी बहुतेक निमूटपणे हे काम केले असावे. परंतु तेथे जाऊन नक्की काय केले याबद्दल गांधीजी तपशील देत नाहीत. नाशिकला, विशेषत: त्र्यंबकेश्वरी लोक कशासाठी जातात हे सर्वज्ञात आहेच. काही वेळा घरातील मंडळींपुढे काहीच कसे चालत नाही, कर्त्या-धर्त्यांना कशी माघार घ्यावी लागते याचे हे उत्तम उदाहरण आहे. या संदर्भात गांधीजींचे एक वाक्य सूचक आहे. "माझी त्यांच्याबद्दलची (वडिलबंधू) आदरबुद्धीही तितकीच उत्कट होती अशी माझी खात्री आहे. म्हणून त्यांची इच्छा आज्ञारूप समजून मी यंत्राप्रमाणे डोळे मिटून त्यांच्या इच्छेप्रमाणे करीत गेलो."

मुंबईत राहण्याविषयी गांधीजी लिहितात की, "मुंबईचा खर्च मोठा." याच मुंबईत त्यांच्याकडे पहिली केस आली. केस खूप सोपी होती. गांधीजींनी केस स्वबळावर लढण्याचे ठरविले; परंतु कोर्टात त्यांना काही बोलताच येईना,

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

अशी परिस्थिती झाली. मुंबईतच त्यांनी एका शाळेत इंग्रजी भाषा शिकविणाऱ्या शिक्षकाच्या जागेसाठी अर्ज केला. त्यांना प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले. परंतु बी.ए. नसल्यामुळे त्यांना नोकरी मिळाली नाही. मुंबईसंदर्भातला एक अनुभव त्यांनी दिला आहे. त्याचा आणि आरोग्याचा निकटचा संबंध आहे. गांधीजी लिहितात, "गिरगावात बि-हाड होते. तरीपण मी क्वचितच कधी गाडीभाड्याचा खर्च करीत असे. ट्रॅममध्येही क्वचितच बसत असे. गिरगावाहून बहुधा नेहमी चालतच जात असे. त्याला चांगली पंचेचाळीस मिनिटे लागत. आणि परत घरीही बिनचूक पायीच येत असे. दिवसाचे ऊन लागे. ते सहन करण्याची शक्ती कमावली होती. अशा तऱ्हेने मी पुष्कळ पैसे वाचविले. आणि मुंबईत माझे पुष्कळ स्नेही आजारी पडत, पण मी एकही दिवस आजारी पडल्याचे मला स्मरण नाही. पैसे कमावू लागलो, तेव्हाही अशा तऱ्हेने ऑफिसात पायीच जाण्याची सवय मी शेवटपर्यंत कायम ठेवली. त्याचा लाभ मला आजमितीपर्यंत मिळत आहे."[८]

मुंबई त्यांना भरपूर चालण्याची आणि भरभर चालण्याची सवय लागली. ही सवय त्यांनी आयुष्यभर जपली. गांधीजींइतकेभरभरचालणारेनेतेक्वचितचअसतील. हे आपणास त्यांच्या संदर्भातउपलब्ध असणाऱ्या चित्रफितींमधून समजून येते. पुढे गांधीजी राजकोटला गेले. राजकोटला गेल्यावर त्यांना दक्षिण आफ्रिकेत जाण्याची संधी चालून आली. पुन्हा एकदा ते दक्षिण आफ्रिकेला जाण्यासाठी मुंबईत पोहोचले. दक्षिण आफ्रिकेत काही काळ राहिल्यानंतर त्यांना १८९६ मध्ये पुन्हा सहा महिन्यांसाठी भारतात येण्याची संधी मिळाली. भारतात आल्यावर त्यांचा मुक्काम राजकोटमध्ये होता. राजकोटमध्ये असताना त्यांना मुंबईत येण्याची संधी मिळाली.

"(हिंदुस्थानातील) मोठमोठ्या शहरी सभा भरवून लोकमताला विशेष चालना देण्याचा माझा विचार होता" असं गांधीजींनी म्हटले आहे. यासाठी ते न्यायमूर्ती रानडे[९]यांना भेटले. त्यांनी गांधीजींचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकून फिरोजशहा मेहता[१०] यांना भेटण्यास सांगितले. नंतर ते न्यायमूर्ती बद्रुद्दीन तय्यबजी[११] यांना भेटले. पूर्वीच वीरचंद गांधी यांनी बॅरिस्टर गांधीजींना या दोघांबद्दल सांगितले होते. फिरोजशहांच्या हुशारीचे कारण म्हणजे त्यांचे कायद्याचे अगाध ज्ञान आणि 'एव्हिडन्स ॲक्ट' तोंडपाठ. ३२ व्या कलमावरील एकन एक खटले त्यांना माहीत होते. फिरोजशहांच्या बुद्धिमत्तेने गांधीजी भारावून गेले. त्यांनी फिरोजशहांचा उल्लेख, 'मुंबईचा सिंह', 'मुंबईचे अनभिषिक्त बादशहा' असा केला आहे. त्याहीपेक्षा एका वाक्यातच गांधीजींनी फिरोजशहांबद्दलच्या भावना व्यक्त केल्या आहेत. एखाद्या कसलेल्या लेखकाचे जणू ते विधान आहे. गांधीजी लिहितात, "बाप ज्याप्रमाणे आपल्या तरुण मुलाला भेटतो, त्याचप्रमाणे ते मला भेटले."[१२] या एकाच वाक्यात फिरोजशहांचे व्यक्तिमत्त्व उभे राहते. या वाक्यातून दोघांच्या संबंधांवर प्रकाश पडतो. पहिल्याच भेटीत फिरोजशहांनी गांधीजींचे सगळे ऐकून घेतले आणि त्यांच्यासाठी एक सभा आयोजित केली. या सभेसाठी त्यांनी गांधीजींना लेखी भाषण घेऊन येण्याची आज्ञा केली. मुंबईत भाषणांचे रिपोर्टिंग व्यवस्थित होत नाही. त्यामुळे सभा आणि भाषणातून फलप्राप्ती हवी असेल, तर भाषण लिहून काढणे आणि छापणे हाच उपाय असल्याचे मेहता यांनी सुचविले. पुढे गांधीजींनी हा कित्ता आयुष्यभर गिरविला असे दिसून येते. सर कावसजी जहांगीर इन्स्टिट्यूटच्या हॉलमध्ये सभा झाली. गांधीजींना असल्या सभेचा अनुभव नव्हता. त्यांनी थरथरत्या आणि कापऱ्या स्वरात भाषण वाचायला सुरुवात केली. फिरोजशहांनी त्यांना उत्तेजन दिले; परंतु गांधीजींनी आपले भाषण जुने मित्र केशवराव देशपांडे यांच्याकडे

वाचायला दिले. श्रोत्यांनी 'वाच्छा वाच्छा' असा गजर केला. वाच्छा उठले आणि त्यांनी गांधीजींचे भाषण वाचून दाखविले. सर्वांनी शांतपणे भाषण ऐकून घेतले आणि योग्य तेथे टाळ्या, योग्य तिथे निषेध (शेम शेम) अर्थातच इंग्रज सरकारचा केला. फिरोजशहांना भाषण आवडल्यामुळे गांधीजींना 'गंगेत घोडे न्हाले' असे वाटले.[१३]

पुढे गांधीजी पुण्यात आले. ते लोकमान्य टिळकांना[१४]भेटून नामदार गोखले[१५]यांना भेटायला गेले. या संदर्भात गांधीजी लिहितात, "तेथून मी गोखल्यांकडे गेलो. ते फर्गसन कॉलेजमध्ये होते. ते मला खूप प्रेमाने भेटले, आणि त्यांनी मला आपलासा करून घेतले. त्यांचाही हा प्रथमच परिचय होता. पण का कोण जाणे, आमची पूर्वीचीही ओळख असावी, असा भास झाला. सर फिरोजशहा तर मला हिमालयासारखे वाटले; लोकमान्य समुद्रासारखे वाटले; गोखले गंगेसारखे वाटले. तिच्यात मला स्नान करता येण्यासारखे होते. हिमालय चढून जाणे अशक्य; समुद्रात बुडण्याची धास्ती असते; पण गंगेच्या मांडीवर खुशाल क्रीडा करावी; तिच्यावर होडी खेळवावी. गोखल्यांनी माझी बारीक चौकशी केली. एखादा विद्यार्थी शाळेत नवीन दाखल होण्यासाठी आला म्हणजे त्याची परीक्षा घ्यावी, त्याप्रमाणे कोणाकोणाला भेटावे, कसे भेटावे ते सांगितले. माझे भाषण पाहायला मागितले. मला कॉलेजची व्यवस्था दाखविली. वाटेल तेव्हा पुनः आपल्याला भेटायला सांगितले. डॉ. भांडारकरांचा जबाब कळविण्यास सांगितले आणि मला निरोप दिला. राजकीय क्षेत्रामध्ये जे स्थान गोखल्यांनी जिवंतपणी माझ्या हृदयात व्यापले, व देहावसान झाले तरी अजूनही व्यापून राहिले आहेत, ते स्थान दुसऱ्या कोणीही पटकावलेले नाही."[१६]

येथवर आपण जो आढावा घेतलेला आहे, तो शोधनिबंधाची मर्यादा पळून घेतलेला आहे. गांधीजींच्या आत्मचरित्रातील पहिल्या २८ प्रकरणांमधून चहा आढावा सादर केलेला आहे. महाराष्ट्र, महाराष्ट्रातील कर्तृत्ववान नेते आणि स्थानिक इतिहास यावर या शोधनिबंधातून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

१) या लेखासाठी मी सीताराम पुरुषोत्तम पटवर्धन यांनी अनुवाद केलेली प्रत वापरली आहे.

गांधी मो. क. 'सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा' हे आत्मचरित्र Gandhi M. K., AN AUTOBIOGRAPHY OR The Story of my experiments with truth' या इंग्रजी आत्मचरित्राचा अनुवाद आहे. इंग्रजी आत्मचरित्र मूळ गुजराती भाषेतून इंग्रजीत अनुवादित करण्यात आले आहे. गुजराती भाषेतून इंग्रजीत अनुवाद श्री. महादेवभाई देसाई यांनी केलेला आहे. नवजीवन ट्रस्टने ही प्रत प्रसिद्ध केलेली आहे. या लेखासाठी मी आत्मकथेची चौथी आवृत्ती (१९६९) वापरली असून ते ३५ वे पुनर्मुद्रण (२०१४) आहे. यामुळे पुढील संदर्भासाठी सोय म्हणून हा संदर्भ पुढील प्रमाणे वापरता येईल.

गांधी मो. क., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, (अनु. पटवर्धन सी. पु.) नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, २०१४

२) पूर्वोक्त, प्रस्तावना पृ. ५

३) पूर्वोक्त, पृ. २७

४) पूर्वोक्त, पृ. ३७

ISSN 2231 4342

५) पूर्वोक्त, पृ. ३७ ते ३९

६) पूर्वोक्त, पृ. ३८

७) पूर्वोक्त, पृ. ८५

८) पूर्वोक्त, पृ. ९१

९) पाहा, अधिक माहितीसाठी : मोहनराव यू. एस., गांधीजी, श्रद्धांजली आणि शब्दचित्रे, अनु. प्रकाश देशपांडे केजकर, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ति. आ. २०१३

या पुस्तकात महात्मा गांधींच्या लेखणीतून उतरलेली काही लोकोत्तर स्त्री आणि पुरुषांची शब्दचित्रे आहेत. या पुस्तकात एकूण ६८ व्यक्तींचा समावेश आहे.

मूळपुस्तक- Pen, Portraits and Tributes by Gandhiji

या पुस्तकात पृ. १२७ वर गांधीजी लिहितात, "श्री. रानडे हे समाज सुधारक होते आणि स्त्री उद्धाराच्या कार्यात त्यांना फार रस होता."

१०) पूर्वोक्त, पृ. ११४, ‘सर फिरोजशहा एम. मेहता’ या शीर्षकाच्या लेखात गांधीजी लिहितात, “आज माझ्यात काम करण्याची जी क्षमता आहे, ती त्यांच्या उपदेशामुळेच आहे, हे मला मान्य केले पाहिजे.”

११) पूर्वोक्त, पृ. ६७, ‘बदुद्दीन तय्यबजी’या लेखात गांधीजी लिहितात, “न्या. तय्यबजी यांनी विद्वत्तेत आणि कायद्याच्या क्षेत्रात जसे नाव मिळविले आहे, तसे सार्वजनिक क्षेत्रातही नाव मिळविले आहे. भारतात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून, विशेषतः मुस्लिमांमध्ये तो व्हावा म्हणून त्यांनी बरेच प्रयत्न केले."

१२) पूर्वोक्त, पृ. १६६

१३) पूर्वोक्त, पृ. १६८

१४) पूर्वोक्त,पृ. ११९ ते १२४- "...त्यांचे देशप्रेम फार जाज्वल्य होते. देशप्रेमाशिवाय दुसरा धर्म त्यांना माहित नव्हता." "...त्यांची इच्छाशक्ती पोलादी होती आणि ती त्यांनी देशाच्या कारणी लावली. त्यांचे जीवन हे एक उघडे पुस्तक होते. त्यांच्या आवडी फार साध्या होत्या. त्यांचे खाजगी जीवन निष्कलंक होते. त्यांनी आपली अचाट बुद्धिमत्ता देशाला वाहिली होती. लोकमान्यांनी ज्या सातत्याने आणि ठामपणे स्वराज्याची शिकवण दिली, तशी कुणीही दिली नाही. म्हणून त्यांच्या देशबांधवांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता. त्यांच्या धैर्याने त्यांना कधीही धोका दिला नाही. त्यांचा आशावाद अनावर होता. याची देही याची डोळा स्वराज्य स्थापन झालेले पाहावयास मिळेल अशी त्यांना आशा होती. ती फोल ठरली. पण तो त्यांचा दोष नव्हता. त्यांच्यामुळेच हे स्वराज्य लवकर येईल, हे नक्की. लवकरात लवकर दुप्पट प्रयत्न करून ते वास्तवात आणणे हे आता आपल्यासारख्या उरलेल्यांच्या हाती आहे." "...लोकमान्य ही एक वेगळीच श्रेणी होती. लोकांनी टिळक महाराजांना दिलेली ही पदवी कोणत्याही राजाने दिलेल्या पदवीपेक्षा हजारपटीने मौल्यवान आहे हे या देशाने सिद्ध केले आहे." "...ज्याने आपल्या मनाशी एक योजना तयार केली आणि पंचेचाळीस वर्षे त्याचा पाठपुरावा केला, ज्याने राष्ट्राच्या सेवेसाठी आपले शरीर झिजविले त्याला मरणानंतरही कोणी विसरत नाही. तो कधीही खऱ्या अर्थाने मरत नाही.

म्हणून आपल्या मरणातही लोकमान्यांनी आपल्या जगण्याचे रहस्य आपल्याला शिकविले आहे असेच आपण स्वतःला सांगितले पाहिजे."

१५) पूर्वोक्त, पृ. ११४- गांधीजी लिहितात, "श्री. गोखले हे निःस्वार्थी होते आणि ऋषी ही पदवी त्यांना शोभायची." पृ. ८५ते१०० "...दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांनी कृतज्ञतापूर्वक त्यांची आठवण ताजी ठेवली आहे कारण त्यांनी(गोखलेंनी) त्यांच्या लढ्याचे नेहमीच समर्थन केले आहे आणि त्यांच्या संकटकाळात त्यांना सहानुभूती दाखविली आहे. लोक त्यांची नेहमीच आठवण ठेवतील कारण त्यांच्यामुळेच नाताळसाठी भारतात मजुरांची करारनाम्याच्या अटीवर जी भरती होत असे ती थांबली. भारतातील सर्व मुलांना मोफत शिक्षण मिळावे म्हणून जे विधेयक त्यांनी व्हाइसरॉयच्या मंडळापुढे मांडले त्यात त्यांच्या अनेकविध सामर्थ्याचे दर्शन झाले." "...आपल्या कार्यातून त्यांनी निवृत्त व्हावे असा सल्ला वारंवार डॉक्टरांनी त्यांना दिला पण त्यांनी तो मानला नाही. ते म्हणाले, 'मरणाशिवाय कोणीही मला माझ्या कार्यापासून दूर करू शकत नाही'..."''...अंतकाळी त्यांनी तेथे उपस्थित असलेल्या सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या सभासदांना बोलावून घेतले आणि सांगितले, 'माझे चरित्र लिहिण्याच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नकाकिंवामाझेपुतळेउभारण्याच्याकामातआपलावेळवायाघालवूनका. तुम्ही जर खरे भारताचे सेवक असाल तर आपल्या ध्येयांच्या पूर्तीसाठी आणि भारताच्या सेवेसाठी आपले जीवन अर्पण करा'..." "...त्यांच्या मुखकमलावर जो सात्त्विक भाव मी पहिला त्याचा परिणाम अजूनही माझ्या मनातून पुसला गेला नाही." "...१८९६ मध्ये त्यांच्याशी संबंध आल्यानंतर गोखल्यांचे राजकीय जीवन हाच माझा आदर्श झाला आणि त्याचवेळी माझे राजकीय गुरु म्हणून त्यांनी माझ्या हृदयाचा ठाव घेतला." "...शिष्याची कृती हे त्याचे त्याच्या गुरुवरील भाष्य असते. गोखले हे माझे राजकीय गुरु आहेत, हे मी नेहमी सांगत आलो आहे. त्यामुळे मी त्यांच्याविषयी काही लिहिण्यास अपात्र आहे असे मला वाटते." "...गोखल्यांच्या संपर्कात आल्यावर मला जी मनःशांती लाभली ती कोणाकडूनही मला मिळाली नाही."

१६) गांधी मो. क., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, पृ. १७०-१७१

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

शिवकालीन शस्त्रे

डॉ. विनोद बाबुराव बोरसे
इतिहासविभाग
श्रीआसारामजी भांडवलदार महाविद्यालय
देवगाव (रं) ता. कन्नड.
drvinodborse@gmail.com
Mob.7588193439

प्रस्ताविक

शिवकाळात जी शस्त्रे वापरली जायची ती आता कालबाह्यझाली असली तरी एकेकाळी या शास्त्राच्या जोरावरच स्वराज्याची निर्मिती व रक्षण ही करण्यात आले होते.लढाईसाठी आवश्यक विविध शस्त्रे ही आपल्या विजयाची साधने असतात. शिवकाळात वापरलेली शस्त्रे ही मुख्यतः प्राचीन होती. राजांनी त्या मूळ शस्रात आवश्यकतेनुसार बदल करून तसेच काही नवीन शस्राची स्थानिक लोहार यांच्या परिश्रमातून नव्याने घडविली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे त्यांनी जनतेत प्रचंड आत्मविश्वास निर्माण केला होता. स्वधर्म, स्वसंस्कृती यांचा सार्थ अभिमान बाळगून पाऊल पुढे टाकले तर जगातील कोणतीही शक्ती दीर्घ काळ टिकाव धरू शकत नाही. हे त्यांनी राष्ट्राला शिकविले)खोबरेकर वि.गो.2006, 145(महाराजही जातीपातीला थारा न देता गुणवत्तेला महत्त्व देत म्हणूनच त्यांच्या सैन्यात सिद्दी हिलाल,नूरखा बेग, मदारी मेहतर, रुस्तुमे जमान)हनवते प्रेम 2010 ,79(अशा अनेक मुस्लिम सैनिक हे मोठ्या हुद्द्यावर काम करत होते.

शिवकालीन लष्कर

स्वार, पायदळ, तोफखाना व घोडेस्वार हे मराठ्यांचे चतुरंग सैन्य. सैन्याच्या या चार अगांपैकी त्यांचा मुख्य भाग हा घोडेस्वारवर असे. शिवकाळात मराठ्यांचे लष्करी बळ कमी असूनही पुष्कळ पटींनी मोठ्या अश्या मोगल सैन्याशि सामना देण्याचा प्रसंग आला होता. या स्थितीत मोगल सैन्यावर एकाकी छापा घालून त्यांचे नुकसान करण्यास व बाजू अंगावर आल्यास त्यांच्या पाठलागतून झुकांडी देऊन निसटून जाण्यास घोडेस्वार इतके चलाख साधन त्यांना दुसरे नव्हते. म्हणूनच महाराजांनी सुरुवातीस मावळी पायदळावर भिस्त ठेवावी लागली. तर हळूहळू त्यांनी आपले घोडेस्वार ही वाढवले).भावे वा कृ 1998 ,425(गतिमानता वाढविण्यासाठी पायद्लापेक्षा घोडदळाचीच त्यांना जास्त आवश्यकता भासत असे. गतिमानता असेल तरच शतू पक्षावर अचानक कारवाई) SurprisrAttact) करता येते आणि अचानक कारवाई हेच कोणत्याही युद्धात विजयाचे अंतिम सूत्रवाक्य ठरते. ही सर्व तत्त्वे लक्षात घेऊन महाराजांनी घोडदळ अधिक प्राधान्य)पवारजयसिंगराव 2011, 108(दिलेले आपणास दिसून येते. पायदळातील शिपाई 'मावळे' व हेटकरी या दोन जातीची असत. मावळे घाटमाथ्यावर राहणारे व हेटकरी कोकणात राहणारे. दोघेही अवघड जागी चढून जाण्यास मोठे पटाईत

असतात. बंदूक ढाल,तलवार- तीरकमटा हे प्रामुख्याने त्यांची हत्यारे असून ती त्यास आपल्या खर्चाने घ्यावी लागत. दारुगोळा मात्र सरकारातून)गर्गे सं मा2010, 374 (मिळत असेल.

शस्त्रासंबंधीचे ऐतिहासिक संदर्भ

शिवकालीन शस्त्रसंदर्भात शिवपुत्र संभाजीकृत बुधभूषणम् २००९ माने ग का),१७४ (.या ग्रंथातील उल्लेखावरूनगडावरील युद्धसाहित्यात चांगली धनुष्यबान क्षेपणी म्हणजे गोफणी, खडगे ,कणव ,त्रिशूळ, परशूचक्र ,प्रास,वेग .दोर ,कुऱ्हाडी ,वगैरे असावेत तसेच शत्रूचे दमन करण्यासाठी गडावर विषारी साप, सिंह व हिंस्र पक्षी, हेही निरनिराळ्या जागी बाळगावे असे म्हटले आहे. याशिवाय किल्ल्यावर कुदळीफा,वडी, कुऱ्हाडी , ,इळे ,कर्वती ,कोयतेपहारी,खुरपी , लाकडी व दोरीच्या सिड्या इत्यादी शास्त्राचा उल्लेख राज्यव्यवहार कोशात केलेला आपणास दिसून येतो.

शत्रूने किल्ल्याला वेढा दिल्यास प्रत्युत्तर म्हणून आपण कोणत्या शस्त्राचा वापर करावा याबाबत कवींद्र परमानंदकृत शिवभारत)माने ग का 2009 ,175(या ग्रंथात सांगतात. नांगर चाकेक,णे, मुसळे, गोटे , ,उखळेपेटलेली कोलीते, खैराच्या निखार्याचे ढीग, तापलेली तेले, तोफगोळे,बंदुका, दारूचे बाण, मोठमोठ्या शिळा,इत्यादीचा तटावरून शत्रूवर मारा केला जात असल्याचे नमूद करतात तसेच गोफणीतून दगडी ही फिरवलेली जात असत. रामचंद्र अमात्य शस्त्र संदर्भात म्हणतात,(रामचंद्र अमात्य 1960, 79(हत्यारमात्राची भेजणूक विद्या संपादून , वरचेवरी वर्जिस करीत जावी. हत्ती घोडे-फेरणे या श्रमास अंतर न करावे. तीर, कमान, बंदूखादी हत्यारे नूतन करणे ,भांडी बोतवाने ,बाण भरणे ,सुरंग लाऊन मोर्चे चालविणे,तसेच जीन, खोगीर बक्तरादि ,मुस्तैद करावयाचे संपूर्ण हुनेर अवगत करून ठेवण्यासंदर्भात सविस्तर मांडणी करताना याबरोबरच शस्त्रधारी सैन्यविषयी वा.भा . भट म्हणतात,(भट वा भा 2010, 176 (शस्त्रास्त्रसंयुक्तमनुष्यदिगणात्मिका

अर्थ - शस्त्रास्त्रांनी सज्ज अशी माणसे आणि त्यास उपयोगी जनावरे यांचा समूह म्हणजे सैन्य.

सैन्याची व्यवस्था केल्यावर सैन्याने निरनिराळे प्रकार, त्यांचे महत्त्व ,त्याकरिता राजाने आपल्या उत्पन्नापैकी खर्च करावयाच्या रकमेचे प्रमाण, रथ, हत्ती, यांचे प्रकार व लक्षणे, अश्वाचे प्रकार, त्यांची लक्षणे, त्यांचा खुराक, रोग व औषधे, शत्रूशी युद्ध करण्याकरिता पसंद करावयाच्या सैन्याची लक्षणे व संख्याअस्त्रे, व त्यांचे प्रकार, बाण, गदा, पट्टी, एकधारा, कुंत, चक्र पाश,कवच, करज , इत्यादी हत्यारांची वर्णन, युद्धाचे प्रकार, दैवी व मानुषीयुद्ध व ते करण्यास युक्त काळ इत्यादी बाबत सविस्तर विवेचन केलेले आहे.

तोफांच्या बाबतीत महाराजांचे लष्कर हे कमी पडत होते. त्यांना त्या बाबतीत युरोपीय व्यापाऱ्यावर अवलंबून राहावे लागत असे. तसेच त्यांना बंदुका आणि दारूगोळा त्यांच्याकडून खरेदी करावा लागत असे. महाराजांचे सैनिक शत्रूवर धोंड्याचा मारा करून, धोंडे ढकलून शत्रूंना दडून बसायला लावत .फ्रायरने)सेन एस. एन.2001, 84, 85(असे सांगितली आहे की ,किल्ल्याच्या अत्युच्च ठिकाणी दगड हीच शस्त्रे होती आणिती

निसर्गाने त्यांना दिली होती. हे दगड.धोंडे म्हणजे निसर्गाने दिलेले तोफेची गोळी होते- शिवकाळात दगड हे संरक्षक शस्त्र)सुरेंद्रनाथ 2015, 301(म्हणून वापरले जात असे.

शिवकालीन प्रमुखशस्त्र

तलवार

तलवार हे एकमेव शस्त्र भारतीय युद्धात सर्वात जास्त काळ वापरले आहे. तलवारीचे विविध प्रकार असून यात प्रामुख्याने मुल्हेरी, कर्नाटकी, बंगला, गारदी, जोधपुरी, गदरारा,तेगा , चापनेरी, जुनी गुजराती ,रीचलती , ,सकेला,मुग्रब सुसनपट्टा, शिसोही, बडोदेशाही , नागण ,हिराणी जफरतकिया, खंडा, पट्टीसाधो,प, निमचा, इत्यादी या सर्व तलवारीचे प्रकार त्यांचे ठेवण व त्या कोठे बनवल्यावरून ठरविण्यात आले आहेत.भारतामध्ये 60 प्रकारच्या तलवारी वापरल्या जात. तर 20 प्रकारच्या मोठीचा वापर होत असे. तलवार म्हणजे हातातला जोर सामर्थ्याने प्रकट करणारे हत्यार. तलवार हे नाव त्यावरून पडल आहे. तलवारीच्या प्रत्येक वारात किंवा घावात हात बळ वाढविण्याची क्रिया आहे. हाताचे बळ वाढविणे ती वस्तू म्हणजे करस्थ बल ती तलवार. या करस्थ बल वरूनच करबल -करवाला असा प्रवास करत तलवार असा शब्द तयार झाला आहे).काळे मुकुंद 2007, 86 (तलवार हे शस्त्र बघताना सर्वसाधारणपणे अंग, रूप,, जाती, नेत्र, भूमी, ध्वनी अरिस्त, व लक्षण अशा आठ बाजूंचा विचार केला जात असे२००७ काळे मुकुंद) , ८६

खांडा

भुवनेश्वरी तलवार या वर्गातील सर्वात महत्त्वाचे शस्त्र म्हणजे खांडा होय. यात खांडा म्हणजे जड, रुंद व एकेरी धारेची तलवार)माणिकराव 1942, 17(ही तलवार सरळ असून ती शरीरावर परिधान करण्यासारखी मुठीकडील भागावर असणाऱ्या या अनुकुचीदार टोकावरून ही समजणे ओळखता येतेखां.डा ही एक दुधारी सरळ पाते व मुठीकडील अरुंद असणारे शस्त्र आहे. ही तलवार भारताची राष्ट्रीय तलवार म्हणून ओळखली जात असे).रोडे सोमनाथ 2010, 172, 173(

धोप

खांडयाचेच चे रूपांतर म्हणजे धोप.पण हा जरा लांब असतो . बंगालमध्ये काही काळापर्यंत हे सामान्यता उपयोगात येणारी हत्यार होते. आपल्या लांब, सरळ व रुंद तलवारीस मराठेखाडा म्हणतात, ग्रँड डफ यांच्या मराठ्यांच्या इतिहास या पुस्तकात महान देशभक्त शिवाजी महाराज यांच्या खांड्याचे चित्र दिलेले आहे). माणिकराव 1942, 18 (

कर्नाटकी तलवार अथवा धोप

पूज्य शिवाजी महाराज यांना पोर्तुगीज लोकांनी तीन तलवारी भेट दिल्याचा दाखला सापडतो. त्यापैकी एक तलवार साताऱ्यात जलमंदिर मध्ये आहे. तर दुसरी तलवार प्रतापशस्त्रागार येथे आहे. त्या तलवारीवर पोर्तुगीज लिखित मजकूर आहे. तिसरी तलवार कोठेही आढळून आलेली नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अशा प्रकारच्या तलवारी घोड्यावरून वापरण्याकरिता तयार करविल्या होत्या. त्यालाच कर्नाटकी धोप असे म्हणतात. फ्रेंच व पोर्तुगीज लोक अशा तलवारींना सेफ म्हणतातआपल्याकडे या . .तलवारीला धूप म्हणतात हिची मूळ कर्नाटकी आहे)माणिकराव 1942, 46(

पट्टा तलवार

भारतीय पट्टा तलवार ही सर्वात परिणामकारक तलवार आहे. असे मानले जाते की, पट्ट्याचा नमुना हा लांबसर दक्षिण भारतीय खंजीरवरून आलेला आहे. त्याची मूठ आडवी आणि त्याला संरक्षक कवच होते. त्याला बारा जमदाडू असे म्हणत. मराठ्यांनी पट्टा तलवारीचा शोध लावला आणि दक्षिणेच्या पश्चिम भागात हळूहळू जिथे जिथे मराठ्यांनी शिरकाव केला तिथे त्यांनी तिचा प्रसार केला. हे एक मराठा शस्त्र असून ती मराठ्यांचा प्रभाव असलेल्या क्षेत्रात आढळते).भामरे सर्जेराव 2012, 214(

हे शास्त्र संपूर्ण पोलादा पासून बनविलेले असून एकूण पाच विभागात जोडलेले असते. खोबळा, चिमटा, पाती , मुठ व कडी असे हे पाच विभाग आहेतखोबळयाची. रचना पंजा व मनगटा पासून कोपरापर्यंत हाताचे रक्षण करण्यासाठी केलेले असते. शिवकाळात दांडपट्ट्याचा चा वापर सर्रास झाल्याचे दिसते .स्थानिक भाषेत त्याला दांडपट्टा असे म्हणतात. आणि इंग्रजीत gauntlet sword या पट्ट्याची मुठ हे तिचे खास वैशिष्ट्य आहे. तिला खोबळा असे म्हणत) भांबरे सर्जेराव 2012, 215(

भाला

पोलाद तसेच लोखंडापासून बनवलेले शस्त्र. पाते टोकदार, रुंद, दुधारी व टोकाकडे निमुळती असते. भाल्याचे प्रमुख तीन प्रकार आहे.

गजकुंतहा भा ....ला हत्तीवरून वापरण्यात येत असे.

अश्व कुंतहा भा .....ला घोड्यावरून वापरण्यात येत असे

पदातीकुंतहा भा ...ला पायदळ सैनिक वापरत असे)माणिकराव 1949 ,17(

बरछी भाला

या भल्याचे समोरचे पाते रुंद व धारदार असून विरुद्ध बाजूला ही टोक आसे. यालाच अंकुश असे म्हणतात हत्तीला टोचून त्यांच्याकडून कामे करून घेण्याकरता याचा उपयोग होत असे).भावे कृ.वा .1998, 437(

मांडू

मारचा अपभ्रंश मांडू असा झाल्याचे दिसते. ज्यावेळेस भारत देशात लोखंडाचा शोध लागला नव्हता त्यावेळेस दगड, बास, लाकूड आणि जनावरांची शिंगे याचा उपयोग युद्धात केला जात असे. हे शास्त्र खास मराठ्यांनी तयार केले असे म्हटले जाते. सांबराच्या एक किंवा दोन शिंगापासून हे शस्त्र तयार केले जायचे, शिंगाच्या टोकात अनुकुचीदार शेबी लावली जायची पैकी एक शिंगी माडूचा उपयोग फक्त पुढच्याला भोसकण्यासाठी होई. तर दोनसिंगी मांडूणे पुढून व मागून येणाऱ्या शतूचा वेध)काळे मुकुंद 2007,घेतला जात असे. पट्ट्याचे जे कार्य आहे तेच काही अंशी माडुचे आहे. हिंदीत याला भीडचीर)भामरे सर्जेराव 2011, 146 (म्हणतात.

वाघ नखे

हे शस्त्र अनेकांना खरोखरच वाघाच्या नखापासून बनवलेले हत्यार वाटते पण तसं नाही. वाघ नखे ही इतर शास्त्राप्रमाणे पोलादलोखडपासून, बनवले जायचे पण नखांचा अकार वाघाच्या नखा प्रमाणे वक्र आणि टोकदार असल्यामुळे त्याला वाघ नखे)काळे मुकुंद 2007 (असे म्हटले जात असे. ही वाघनखी पोलादाच्या पट्टीत विशिष्ट अंतराने बसविली जात असत. हे हत्यार हातात धरून मुठीत सहजपणे लपविता येत असे. वरून बघितल्यास ते बोटातील अंगठ्या वाटायच्या अशि गुप्त शस्त्राची रचना होती.

गुरुज

गुरुज म्हणजे गदा. मुसलमान लोक ज्याला गुरूज म्हणतात. त्यालाच भरत खंडातील लोक गदा म्हणत असत).माणिकराव 1949, 43 (गदा ह्या वजनदार असायच्या तसेच तत्कालीन लोकही शक्तिशाली होते. त्यामुळे त्यांना गदा हे शस्त्र सहज पेलवत असे.

सांग

सांग हे शस्त्र पोलाद तसेच लोखंडाचे असून ते स्थानिक लोहारा मार्फत तयार करून घेतले जाई. हे शस्त्र सरळ व बारीक असून त्याच्या दोन्ही बाजूस धारदार ठोके असायची. याची लांबी साधारण चार ते सहा फुटापर्यंत असून याचा वापर प्रामुख्याने पायद्‌लामध्ये केला जात असे .छत्रपती शिवाजी महाराजांची हे हत्यार वापरणाराची एक खास पायदळाची तुकडे असे).माणिकराव 1949, 50.(

वर्मन

वरमन म्हणजे चिलखत).साळुंखे 2010, 39(त्याचे विविध प्रकार असून ते पोलाद या धातूपासून तयार केलेली आहे. पोलादाच्या कड्या तयार करून त्या रीबिटाने जोडले जाई. धारदार तलवारीव टोकदार भाले याला छेद देऊ शकणार नाही अशी याची मजबूत होती).पुरवार शांतीलाल(

 ISSN 2231 4342

त्रिंक

नाशिकला एक वैशिष्ट्यपूर्ण हत्यार सापडले असून त्यास तीन.टोक असतात चार- कौटिल्याने त्यास त्रिक)गोखले शोभना 2009, 29(असे म्हटले जाई. हे शस्त्र जमिनीवर कसेही फेकले तरी त्याचे एक अनुकुचीदार टोक वर राहत असे. हे शस्त्र आकाराने खूप छोटे पण अत्यंत उपयोगी होते. किल्ल्यावर शतूचा अचानक हल्ला होत असल्यास त्याच्या मार्गावर तसेच किल्ल्याच्या प्रवेशद्वारासमोर हे शस्त्र फेकून दिली जाई. विशेष म्हणजे पहिल्या महायुद्धात देखील फ्रांसने घोडदळाची प्रगती थोपविण्यासाठी अशी त्रिके)गोखले शोभना 2930,30(वापरली होती

विटा

या शास्त्राच्या पाठीमागील कडीला दोरी बांधलेली असे. व या दोरीचे दुसरे टोक विटा हे शस्त्र फेकून मारणार्याच्या उजव्या मनगटाला बांधलेले असायचे. या दोरीचा फायदा म्हणजे 15 फुटावरून शतूला विटा फेकून मारल्यावर तो पुन्हा आपल्याकडे दोरीच्या साह्याने खेचून)काळे मुकुंद 2793,93(घेता येईल.

बिचवा

या शास्त्राचे विविध प्रकार असून काही आकाराने सरळकाही ,समोरच्या बाजूने वक्र असायची. योद्ध्यांनी कमरेत खेचायच्या शस्त्रांमध्ये बिचव्यालाही हक्काचं स्थान असायचं बिचवा म्हणजे तलवारीची लहान आवृत्ती)काळे मुकुंद 2007, 97(या शस्त्राचे पाते हे बिचव्याच्या नाणी प्रमाणे वक्र असल्यामुळे या शास्त्राला बिचवा असे म्हटले जाते. या शस्त्राचा तत्कालीन स्त्रियाही वापर करीत असत.

जंबिया

या शास्त्राचे पाते दुधारी तसेच निमुळते असे. मुठीची पकड नीट राहावी म्हणून मुठीच्या मागच्या टोकाला रुंदी वाढवलेली असे. किंवा मुठ डमरुच्या आकाराची केलेली असते. यामुळे हे शस्त्र हातातून सुटत अथवा निष्ठत नसे). काळे मुकुंद 2007 ,97(

कट्यार

हे शास्त्र बनविण्याचा मानही महाराष्ट्राकडे जातो. महाराजांची ही अतिशय आवडते शस्त्र होते. त्यामुळे त्यांच्या कमरेच्या दुशेल्यात कायमचे खोचलेले असायचे. मराठा पद्धतीची ही कटयार अखंड धातूत ओतलेली असायची. तिची लांबी दहा ते वीस इंच असून तिचा सुमारे अर्धा भाग हा मुठीतच असायचा. कारण आडवी मुठ आणि हाताच मनगटापर्यंत संरक्षण करण्याच्या दृष्टीकोनातून तिची घडण केलेली होती. त्यामुळे वेळप्रसंगी हात आडवा ठेवून तिचा ढालीसारखा देखील वापर केला जायचा).काळे मुकुंद 2007, 97(याबरोबरच अंगरख्यावरुन कमरेभोवती गुंडाळलेल्या रुमालात अगर पट्ट्यात अडकविण्याचे प्रसिद्ध शस्त्र असून पात्याची लांबी 10 ते 14 इंच)भावे 1998 ,436 (पर्यंत राहत असे.

करवाल

हे शस्त्र आकाराने लहान असून सहज लपविता येईल

खंजीर

हे शस्त्र लहान तलवारीसारखी असून या शस्त्राचा स्त्रियाही वापर करीत असत

गुप्ती

गुप्त हत्यार म्हणजे गुप्ती. बाहेरून दिसायला साधा लाकडी दांडा दिसायचा परंतु त्याच्या आत धारदार बारीक असे शस्त्र आहे.

ढाल

ढाल हे आत्मसंरक्षण व शत्रुचे वार झेलण्यासाठी वापरावी जात होती. युक्ती कल्पतरूत चर्माची म्हणजे ढालीची व्याख्या शरीरास झाकणारे किंवा शरीराचे रक्षण करणारे शस्त्र अशी दिली असून ढालीचे प्रमुख प्रकारात गेंड्याची, कासवाची, सिलेंटची, चामड्याची, हत्तीपगी पोलादाची, साध्या लोखंडाची, लाकडाची,(माणिकराव 1949, 21(यापासून बनविल्या जात असत. तसेच यावरविविध प्रकारचे नक्षीकाम देखील केले जाई.

हस्त कवच

हे पोलादापासून तयार केलेले असून याचा उपयोग हातच्या संरक्षणासाठी होत असे. त्याच प्रमाणे वेळप्रसंगी याचा उपयोग तलवारीचे वार झेलण्यासाठी केला जाई.

जिरेटोप

हे पोलादापासून तयार केलेले असून याचे वैशिष्ट्य म्हणजे याचा कानापासून ते खाद्यापर्यंतचा भागहा लवचिक असे.

संदर्भसूची

१.खोबरेकर वी. गो., महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड,शिवकाळ, भाग 01, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर 2006.

२ .हनवते प्रेम, शिवरायांचे निष्ठावंत मुस्लिम सैनिक, एमिटी पब्लिकेशन, कोल्हापूर, पुनर्मुद्रण,14 मे 2010.

3. भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती,1998.

4.पवार जयसिंगराव,(संपा(छत्रपती शिवाजी महाराज स्मृतीग्रंथ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती,2011.

5. गर्गे स .मा).संपा(मराठी रियासत, खंड 1,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण,2010.

ISSN 2231 4342

6.माने ग. का. आणि महाडिक, शिवकालीन किल्ल्याचा समग्र अभ्यास, शिवनेरी पब्लिकेशन्स अंड डिस्ट्रीब्यूटर, अमरावती, आवृत्ती पहिली,2009.

7.अमात्य रामचंद्रपंत, प्रणित आज्ञापत्र)संपा ढेरे(रा.ची., पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती,7 जून 1960.

8. भट वा.भा., शिवाजिची राजनीति.वि , का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, दुसरी आवृत्ती,10 जून 2010.

9. सेन एस. एन.मराठ्यांची लष्करी व्यवस्था,(अनु(शिवदे सदाशिव, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती,2001.

10.सेन सुरेंद्रनाथ, मराठ्यांची प्रशासकीय व्यवस्था,(अनु(शिवदे सदाशिव, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती,26 जानेवारी 2015.

11. माणिकराव, श्री प्रतापशास्त्रगार, प्रकाशक, बाजीराव विठ्ठलराव गायकवाड, सरकारी छापखाना, बडोदे, प्रसिद्धीकरण,9 जानेवारी 1942.

12. रोडे सोमनाथ,(संपा(अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, शोधनिबंधसंग्रह, प्रकाशक, दयानंद महाविद्यालय सोलापूर, डिसेंबर 2010.

13. काळे मुकुंद, इतिहासाचे साक्षीदार, मनोविकास प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, मार्च 2007.

14.भामरे सर्जेराव,(संपा(अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, संशोधन पत्रिका, प्रकाशक, भुसावळ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय भुसावळ,21 डिसेंबर 2012.

15.भांमरे सर्जेराव,(संपा(अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, संशोधन पत्रिका, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर,2011.

16. साळुंखे आ.ह., शिवराय संस्कार आणि शिक्षण, लोकायत प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती, डिसेंबर 2010.

17.गोखले शोभना, भारताचे संस्कृतीचे वैभव, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती,24 डिसेंबर 2009.

18.पुरवार शांतीलाल, संचालक, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तू संग्रहालय, औरंगाबाद यांची मुलाखत, दिनांक 12 नोव्हेंबर 2007..

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

सर्वव्यापी सुधारक महात्मा फूले यांच्या पुर्व आणि समांतर महाराष्ट्र: एक अभ्यास

डॉ. सुनिलचंद्र सोनकांबळे
इतिहास विभाग प्रमुख
लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय
धर्माबाद जि.नांदेड
मोबा.९४२३६२६२३४

आपल्या महाराष्ट्रात प्रबोधन चळवळीचे लोण बंगाल प्रांतातून आले. त्याची सुरुवात या चळवळीचे जनक राजाराम मोहन रॉय यांनी केली असा आपला सर्शुत इतिहास प्रवाह आहे.या प्रवाहाने पुढे संबध महाराष्ट्र आपल्या कवेत घेतला त्यामूळे आपल्या महाराष्ट्राला म.ज्योतिराव फूल्यांच्या थोडे अधी व समांतर काळातील धरुन साधारपणे दिडशे सुधारकांची परंपरा लाभली आहे. यातील बहूतांश मंडळी ब्राम्हण होती हे विशेष होय.यांनी नव्या विचारवादी लोकांचे हात पकडून मिळवलेल्या शहाणपणाद्वारे स्वधर्मातील स्वदेशातील मानवी संस्कृतीतील असंस्कृत पणावर हल्ले करुन हा महाराष्ट्र परिवर्तनाच्या क्षितिजाकडे नेला. या लोकांच्या सानिध्यात आल्याने यांना आपल्या पुर्वजांनी केलेल्या धार्मिक चुकांची दुरुस्ती करण्याची नामी संधी मिळाली ती त्यानी खरी करुन दाखविली.असे असले तरी या सुधारकांचा उदय होण्याच्या पुर्वी आपला हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य अचाराच्या तालमीत संस्कारीत झालेला.पर स्त्री माते समान आणि माणूस तो कोणीही असेल स्वराज्याचा स्वाभिमानी मावळा या ब्रीदाला धरुन वाढलेला पण पेशवाईच्या मगुर आणि बेधूंद राज्य शाहीच्या वैदीकादी यज्ञ कुंडात या आचारासह मानवीय संस्कृतीचा बळी देत. सन १८१८ साली शरणागत होऊन ब्रिटिशांच्या आमला खाली गेला होता. हे देखील तेवढेच खरे.

प्रस्तुत शोध निंबधात ब्रिटिश पुर्व पेशवाईचा शोध घेऊन सुधारकांच्या सुधारणावादी पार्श्वभूमीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

ब्रिटिश पुर्व बेधूंद पेशवाई

ब्रिटिश पुर्व काळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाने स्वराज्य अचाराची पेरणी झालेल्या आपल्या या " महाराष्ट्राने स्वराज्यातून पेशवाईत आणि पेशवाईतून ब्रिटिश आमलात पदार्पण केले असले तरी, पेशवाईने निर्माण केलेली वैदीक संस्कृती अजून पुर्णतः नष्ट झालेली नव्हती. राजकीय सत्ता ब्रिटिशांची सुरु झाली तरी सामाजिक सत्ता प्रत्यक्षात पेशवाईचीच नांदतच होती. ब्रिटिशांच्या आमलाने पेशवाईचा अस्त झाला असला तरी, पेशवाई मन महाराष्ट्रात जीवंत होते.ते आक्रमक होते.धर्मसत्तेची आणि राजसत्तेची बेहोषी अजून उतरलेली नव्हती.अहंकाराने अजूनही सनातन्यांच्या सोमरसात भिजलेल्या पापण्या जड झाल्या होत्या.अब्राम्हणाच्या सामाजिक छळाच्या कथांना खंड पडला नव्हता.धार्मिक गुलामगिरीतून जन्माला आलेली

सार्वत्रिक दुःख वहातच होते.शासकीय कचेऱ्या, सार्वजनिक स्थळे मंदीरे, विविध धर्म विधी यातून पेशवाई पिळवणूक सर्रास सुरु होती."१ काल्पनिक देवादिके आणि त्याच्या भाकडकथांनी रचलेल्या शास्त्रांची नावे बेधूंद व धर्मांध झालेल्या ब्राम्हण शाहीने पेशवाई रुपाने पोसलेली जाती निष्ठता एवढी बोकाळली होती की, ब्राम्हणादी वर्णातील लोक वगळता बाकी शुद्रांना आपला धर्म कोणता हेच मुळात कळत नव्हते. शिवाय आपला आमका एक धर्म आहे. म्हणून सांगण्याची सुध्दा त्यांना मूभा नव्हती.पेशवाई काळात हिंदू धर्माने आपल्या विषमतावादी वर्तनाचा मजला एवढा उंच चढवला होता की, त्यावर चढणे तर सोडाच त्यात काय साठवून ठेवलय याची साधी चौकशी करण्याचे आधिकारही कोणास नव्हते." एका श्वराचे कोट्यावधी देव झाले. त्यांना सोळा सोळा भोग देण्यापायी माणसांची उपासमार होऊ लागली. चार वर्णांचे रुपांतर चार हजार जातीत झाले आणि जाती जाती मध्ये द्वेष मत्सर वाढले."२ तमाम मनुष्य जीवन कर्मकांडी अनिष्ठ प्रथांच्या जाळयात रुतून बसले " माणूसकीला काळीमा फासणारे आचार धर्माच्या नावाखाली बोकाळले अत्यंज वर्गाला स्पृश्य करणे ही पाप मानले जाऊ लागले.एवढेच नव्हेतर त्यांच्याशी बोलणे किंवा त्यांची सावली अंगावर पडू न देणे अशाना देवळात मज्जाव होता. पाणवठ्यावर मज्जाव होता.शाळेत मज्जाव होता.या प्रकारे आपल्याच कोट्यावधी हिंदू बांधवाना पेशवाईने हिंदू धर्मापासून वंचित व बहिष्कृत केलेले होते.असे म्हणतात की,पेशवाईच्या काळात अस्पृश्यांच्या गळ्यात थुंकण्यासाठी एक मंडके व आपल्या पायाखालील रस्ता साफ करण्यासाठी कमरेला झाडाची फांदी बांधलेली असे "३ धर्माच्या नावाने चालवलेले हे अमानुष प्रचलन केवळ शुद्रांच्याच पाचवीला पुजलेले नव्हते.आज घडीला आपण मनुष्य जीवनाचे अर्धचक्र म्हणून ज्या स्त्रीयांकडे पहातो.या स्त्री जीवाचा तर पेशवाई काळाने खेळ खंडोबाच केला होता. बाजारातील भोगवस्तू म्हणून तिचे आयुष्य बाजारात मांडले होते. तीच्या इच्छा अकांक्षाची नासाडी करुन नाना तर्हेच्या अनिष्ठ प्रथांनी तीला जखडून टाकले होते.तीच्या नसीबातील बालविवाह,बाल जरठ विवाह, बहूपत्नी विवाह, सतीप्रथा, विधवा पध्दती, केशवपन या सारख्या प्रथांनी तर कहरच केला होता. मानवी जीवातील स्त्री एक स्वंतत्र व्यक्तीमत्व असते हे ब्रिटिश पुर्व महाराष्ट्राने विसरुनच गेले होते." यांच्या वाट्याला आलेली नव्हे मनू धर्माने लादलेली केशवपनाची चाल तर एवढी हिडीस भोंगळ व कुर की तिच्या स्मरणानेही अंगावर काटा यावा " एवढी ही अमानुष भ्रष्ट आपली राजसत्ता त्याहून अधिक धर्मसत्ता अंध व कुर झालेली होती."४ एकूणच काय तर ब्रिटिश येथे येण्या आधी या पेशवाईने महाराष्ट्राला अंधःकाराच्या खाईत ढकलून स्वतःला एकाहून एक अधिक बायकांच्या राज महालात सोमरसाच्या घोटात मांसाहाराच्या चाण्या तोडीत मशगूल करुन घेतले होते.अशा या बेधूंद पेशवाईचा झेंडा उतरवून ब्रिटिशांनी शनिवार वाड्यावर आपला झेंडा फडकवला आणि आपली राजसत्ता आमलात आणली. तरी ती केवळ राजकीय स्वरुपाचीच होती धार्मिक सत्ता मात्र पेशवाईचीच जीवंतच होती.

सुधारणावादाची पार्श्वभूमी

आपल्या पुर्व जन्मातील जन्मघडीचे पाप पुण्याचे भोग म्हणून वाट्याला आलेले जीवन जगण्याची सवय पाडून घेतलेल्या या महाराष्ट्रात पाश्चात्त्य आले. त्यांनी आपले आधुनिक प्रचलन सुरु केले. त्यांच्या येण्याने

 ISSN 2231 4342

पेशवाई राजसत्ता अधांतरी झाली. हे येथील पेशवाई ग्रस्त जनांसाठी अभ्युदयाची खूण असली तरी पेशवाईतील सोवळ्या ओवळ्यांना मात्र पारतंञ्याची जाणिव झाली.परंतु ते केवळ त्यांच्या वर आलेले राजकीयच पारतंञ्य होते. हे लक्षात घ्यावे लागेल." या पारतंञ्यांने पेशवाई प्रवृतीला बंदीस्त करुन त्यांनी प्राचीन काळापासून रुढीच्या नावाने बंदीस्त केलेल्यांना मात्र वाट मोकळी करुन दिली. त्यामूळे पेशवाईत्तर जनांसाठी हेच राजकीय पारतंञ्य हळू हळू सामाजिक दृष्टीने हितावह ठरले."५ कारण या पारतंञ्यानेच त्यांना प्रगतीची प्रेरणा दिली. विचार दिले. या पारतंञ्यातील नव अनुभूतीने सुधारकांची एक अख्खी पिढी उभी केली. त्यांच्या संपर्काने भारत मध्य युगातून अर्वाचीन युगात आला. लहरी बेबंद शाही गेली. कायद्याचे प्रभूत्व व समानता यावर आधारलेली नवी शासन पध्दती चालू झाली."६ त्यांची हीच नवी शासन पध्दती सुधारकांच्या विचारांचा परिपोष करणारी सुधारणावादाची खरी पार्श्वभूमी ठरली. "

ब्रिटिश हे बाहेरील देशाचे रहीवाशी.व्यापार उदीम करणे हेतू त्यांनी आपला मायदेश सोडून दुरवरच्या या आपल्या देशात पदार्पन केले होते. हळूहळू करुन त्यांनी आपल्या देशाचे घास घेत असताना त्यांच्या तोंडातील अखेरचा घास आपला महाराष्ट्र होता. तो त्यांनी घेतल्या नंतर संपुर्ण भारतावर त्यांचा एकछत्री आमल सुरु होण्याचे त्यांचे सर्व मार्ग जवळ पास मोकळे झाले म्हणून त्यांनी आपल्या उद्योग वाढीसाठी मोठ्या हालचाली सुरु केल्या." या देशाला कायदा शांतता व सुव्यवस्थीत राज्य सरकार या गोष्टी दिल्या. देशाला एकत्र आणणाऱ्या सडका आगगाड्या आणि टपाल तारा दिल्या.७ ईस्ट इंडीया कंपनीद्वारे भारतात आपले पाय मजबूत केल्यावर प्राधान्याने ख्रिस्ती धर्म प्रसारासाठी पावले उचलली. त्यासाठी मिशनरी त्यांच्या कडे होते.पण उद्योगात लागणाऱ्या मनुष्यबळाची पुर्तता त्यांना येथूनच करावयाची असल्याने कारकूनी शिक्षणाचे धडे देणाऱ्या शाळाही उघडल्या. त्याच शाळेत ब्रिटिश ओंजळीने ज्ञान प्राशन केलेल्या महाराष्ट्रातील ब्राम्हणादी उच्च जातीच्या तरुणाईला नवे ज्ञान मिळून त्यांच्यात एक वेगळेपणाचे चैतन्य संचारले. त्यामूळे येथील एकूण पारंपारिक जीवनचक्रच परिवर्तीत झाले. नवे लोक, नवे तंत्रज्ञान, नवे पर्याय, लोकजनांसाठी खुले झाले.नव्या विचारांची मांदीयाळी,शाळा, वर्तमान पत्रे, तारायंत्रे, बाजारपेठा उद्योगी बुध्दीचे तंत्र प्रथमच पेशवाई ग्रस्त लोकांच्या नजरी पडू लागले.उभ्या महाराष्ट्राच्या अवकाशात पाश्चिमात्य विचार घोंघाऊ लागले.

" १९१८ मध्ये लौकिक अर्थाने पेशवाईचा अस्त होऊन ब्रिटिश राजवट सुरु झाली. या राजवटीने पेशवाईतील सामाजिक जीवन आणि ब्रिटिश आमदानीतील सामाजिक जीवन या दोहोमधील ठसठसीत फरक नजरेस आणून दिला.बुध्दीमान लोकाना यातील फरकाचे कण उचलण्याची ही जणू नामी संधीच होती ती त्यानी कणाकणाने उचलणे सुरु केले.पाश्चात्त्य राष्ट्रे आपल्या पुढे कितीतरी तरी दूर निघून गेली. हे जसे त्यांच्या लक्षात आले त्यांची समाज स्थीती देखील आपल्या समाज स्थितीच्या मानाने कितीतरी प्रगत आहे हेही त्यांच्या ध्यानी आले.त्यामूळे आपल्या समाजव्यवस्थेत कोणत्या उणीवा आहेत हे शोधून काढून त्यांचे निराकरण करण्याचा व नवीन पायावर समाज रचना करण्याचा विचार त्यांच्या ठायी प्रबळ झाला."८

एकंदरीत पहाता पाश्चिमात्यांच्या आगणमनाने होणाऱ्या नानापरिच्या फेर बदलाचे हे घोंघावणे येणाऱ्या नव युगाची ही लक्षणेच होती.

ISSN 2231 4342

वास्तविक पहाता पाश्चात्त्य सुधारणेची पहीली किरणे बंगाल प्रांतावर पडली आणि नंतर त्यांचा प्रकाश महाराष्ट्रावर पसरला.हे खरे. या प्रकाशाने कित्येक शतके धर्मरुढीच्या मुजोर वर्तनात वाढलेल्या पेशवाई प्रवृत्तीला काही तरी अघटीत होणार याचे संकेत देऊन रुढीच्या अंधारात चाचपडणाऱ्यांना या प्रकाशात आशेचा एक किरण दिला.

या प्रकाशात न्हाऊन निघालेल्या मंडळीनी शहाणपणाचे बोट धरुन आपापल्या मताची बेधडक मांडणी करुन आपण कुठे चुकलो हे कबूल करुन त्यात सुधारणा करण्यासाठी पुढे सरसावले.या नव्या ज्ञान प्रकाशात या मंडळीचे रक्त सळसळू लागले होते. पाश्चिमात्यांनी आणलेली " विवेकवाद व्यक्तीस्वातंत्र्य लोकशाही या नव्या तत्वानी त्यांच्या प्रगल्भ मनाची पकड घेऊन मनाला टोचण्या दिल्याने त्यांच्या कडून स्वधर्माचे आत्म परीक्षण होऊ लागले.या परीक्षणाअंती त्यांच्या लक्षात आले की, पुर्व परंपरे विषयी आपण अभिमान बाळगावा पण अनिष्ट व हानीकारक प्रथा पुसून काढावे हेच खरे म्हणून तेच आग्रहाने मांडले जाऊ लागले "९ नव विचाराने प्रेरीत झालेल्या या मंडळीत प्रामुख्याने रानडे, आगरकर, गोखले, तर्खडकर, भांडारकर, चिपळूणकर, बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर गोपाळ हरी देशमुख वामन आबाजी मोडक कोल्हटकर यांच्या सारखी ब्राम्हणादी मंडळी होती.त्यांनी पुढे येऊन सभा सम्मेलने वर्तमान पत्रे, याबरोबरच सामाजिक संस्थेची बांधणी करुन स्वधर्मातील अनिष्ठ प्रथांवर जोरदार हल्ले केले.यांनी आपला धर्म बाजूला ठेऊन सुधारणावादाचा पुरस्कार केला.

सर्वव्यापी सुधारक म.फूले

या सुधारकांनी धर्म बाजूला ठेवला तरी त्यांच्या सुधारणा परंपरानिष्ठ होत्या. आपला धर्म बाजूला पण शाबूत ठेऊनच त्यांच्या सुधारणेची भाषा होती. त्यामूळे खालच्या तळापर्यंत म्हणजे हिंदू धर्माने प्रचालित केलेल्या चातुर्वर्ण्य व्यसस्थेतील अस्पृश्यांच्या दुःखाचा पाढा त्यांनी वाचलाच नव्हता. मानवतावाद या पेक्षा स्वधर्मातील कर्मकांडावर त्यांनी हाल्ले चढविले.असे असले तरी सुधारणा चळवळीची पार्श्वभूमी मात्र त्यांनी तयार केली. याच समांतर काळात ब्राम्हणेत्तरातून अस्पृश्योध्दारचा आवाज घेऊन पुढे आलेल्या म.फूल्यांनी " हिंदू समाजाचे मरण जातीयवादात आहे हे ओळखून त्यांनी या मूळ रोगावरच घाव घालण्यासाठी मानवतावादाच्या विशुद्ध पायावर उभ्या असलेल्या समतावादाचे अधिष्ठान महाराष्ट्राच्या सुधारणावादाला देण्याचा प्रयत्न केला.१० सुधारणावादी चळवळीत ब्राह्मणेत्तर जातीतून पुढे आलेले सर्वव्यापी सुधारक म्हणून आढळ स्थानी असलेले एकमेव व्यक्ती मत्व आहे. अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक म्हणून चर्चीला जात असलेला विषय असला तरी त्यासाठी परंपरा निष्ठतेचा त्याग करणे हा पर्याय ब्राम्हणादी सुधारकांच्या ध्यानी आला नव्हता. तो ध्यानी घेऊनच महात्मा फूल्यांनी हिंदू धर्माने निर्माण केलेल्या रुढी परंपरावर चौफेर हल्ले करुन समता चळवळीचा सर्वाधिक पुरस्कार केला. जे सत्य तेच करणार इस्ट असेल तेच बोलणार म्हणून त्यांनी आपल्या अखंड आयुष्यभरात हिंदू धर्माने अमानुषतेच्या बंदीकोषात जखडून ठेवलेल्या अस्पृश्य जनांसाठी अस्पृश्योध्दार चळवळ उभी केली." त्यांची दृष्टी सर्वव्यापी होती जे रंजले गांजले आहेत त्यांची बाजू त्यानी उचलून धरली.त्यांच्या साठी लेखणी उचलली. त्यांच्या साठी झगडले स्वतः अत्यंत हाल सहन केले.जीवनाचा धोका पत्करला. समाजाची

अप्रियता पत्करली. लोकभय राजभय टाकून केवळ सत्याचा झेंडा हाती धरला.अंधश्रध्देत बुडालेल्या हिंदू धर्मियांना नवी दृष्टी दिली.मानवतेचा संदेश दिला." ११ जरी म.फूल्यांनी अल्पशिक्षण घेतले असले तरी समाजा प्रतीच्या भावना दांडग्या होत्या." त्यावेळचा कर्मठपणा चिरेबंदी तटाप्रमाणे हिंदू समाजाभौवती कडेकोट उभा असतानाही त्यांनी अस्पृश्या साठी आपल्या घरातील पाण्याचा हौद खूला करुन दिला.स्त्रियांसाठी, अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या" १२ आपल्या पत्नीलाच स्त्री शिक्षिका बनविले.जेथे अस्पृश्यांची सावलीही विटाळ मानली गेली त्याच पुण्यात त्यांनी अस्पृश्यांना शाळेची वाट दाखवून त्यांना शिक्षित बनविण्याचा ध्यास घेतला.त्यामूळेच ते त्यांच्या समांतर काळातील सुधारकांमध्ये बंडखोर आणि सर्वव्यापी सुधारक झाले. एवढ्या वरच ते थांबले नाहीत तर ज्या कल्पकथानी हिंदू धर्मात विषम सूर भरविला त्या कल्प कथानकातील देवादिके आणि त्यावर स्वार होऊन पोटोबा बनलेल्या पुरोहितांची शेंडी धरुन त्यांना चव्हाट्यावर आणले.

भुकेल्यांची भूक तहानलेल्यांची तहान ओळखली.हिंदू धर्माने उपेक्षित केलेल्यां तहानलेल्या भूकेल्यां जीर्ण अत्म्यामांचा आवाज ऐकला म्हणून ते खरे सर्वव्यापी महात्मा झाले...

संदर्भ...

१) महात्मा ज्योतिराव फूले आणि विष्णू शास्त्री चिपळूणक-प्राचार्य गजमल माळी, राजमुद्रा प्रकाशन प्रा.लि.औरंगाबाद पृष्ठ१३१

२ .महाराष्ट्र जीवन,परंपरा आणि प्रगती-(खंड१) ग.बा.सरदार,जोशी आणि लोखंडे प्यकाशन पुणे पृष्ठ१५९

३. उपरोक्त पृष्ठ १५९

४. उपरोक्त पृष्ठ १५९

५. साहित्य विचार आणि समाजचिंतन - भालचंद्र शंकर भगणे,
ओरिएन्टल लाँगमन्स प्रकाशन मुंबई
पृष्ठ १६७

६. भारतीय प्रबोधन, भालचंद्र शंकर भगणे,समाज संशोधन संस्था पुणेपृष्ठ १२७

७. उपरोक्त पृष्ठ २४३

८. महाराष्ट्र जीवन -प्रगती आणि परंपरा(खंड २) -भालचंद्र शंकर भगणे , ओरिएन्टल लाँगमन्स प्रकाशन मुंबई पृष्ठ२९६

९. भारतीय प्रबोधन उपरोक्त, पृष्ठ २४३

१०. साहित्य विचार आणि समाज चिंतन पृष्ठ १७८

११. भारतीय प्रबोधन, पृष्ठ २४३

१२. महाराष्ट्र जीवन प्रगती आणि परंपरा भालचंद्र शंकर भगणे, (खंड दुसरा)पृष्ठ १७०

एकविसाव्या शतकातील गावगाडयाचे स्वरूप

डॉ. रामचंद्र झाडे,
मराठी विभाग,
शिवाजी महाविद्यालय, कन्न्ड
ता. कन्नड जि. औरंगाबाद.
मो. 8668438193

सारांश :

काळाच्या ओघात स्थित्यंतरे ही होत असतात. 1990 नंतर आलेल्या जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या लाटेत एकूणच समाज व्यवस्थेचे स्वरूप मोठ्या प्रमाणावर बदलले. विशेषतः रूढी, परंपरा यांचा पगडा असलेल्या ग्रामीण भागावर जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या लाटेचे मोठे आघात झाले. त्यामुळे गावगाड्याची पारंपरिक जीवन पद्धती आणि तिचे स्वरूप पार बदलून गेले. समाज, भाषा, संस्कृती, राजकारण, अर्थकारण, शेती, उद्योग, व्यवसाय अशा सर्वच पातळयांवर बदलाचे वारे वाहू लागले. विशेषत: एकविसाव्या शतकात तर हे प्रकर्षाने जाणवते आहे. या सगळया पार्श्वभूमिवर गावगाडयातील दृश्य्-अदृश्य् स्व्रूपातील बदल टिपण्याचा प्रयत्न् प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतीय समाजाचे प्रामुख्याने ग्रामीण आणि शहरी असे दोन स्तर पहायला मिळतात. गावगाडा हा ग्रामीण व्यवस्थेचा आत्मा म्हणून ओळखला जातो. विशिष्ट प्रकारची भौगोलिक आणि सामाजिक रचना, कृषी-आधारित जीवन पद्धती ही गावगाड्याची दोन प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील. पूर्वी "खेडे म्हटले की अगोदर चटकन काळीच डोळ्यापुढे उभी राहते. शेते, पिके, गवत, झाडे, गुरेढोरे, शेळ्यामेंढ्या, मेंढके, शेतकरी, गुराखी, पाट, बुडक्या, विहिरी, नांगर, कुळव, मोट, मळा, गोफण, जित्राब वगैरे बळीराजाचे वैभव. खेड्याचे नाव काढता इतके मन व्यापून टाकते की, खेड्यात शेतीखेरीज दुसरा रोजगार चालत असेल किंवा शेतकऱ्याखेरीज दुसरे कोणी राहत असेल असे एकाएकी मनातही येत नाही. पण कुणबी पुढे झाल्याखेरीज एकाही खेड्याची वसाहत झाली नाही. त्याने धान्य पैदा करून इतरांना खाण्याची तरतूद केली तेव्हा इतर गोळा झाले."1 त्र्यं. ना. अत्रे यांनी वर्णन केलेले हे गावगाड्र्याचे स्वरूप आज खूप मोठया प्रमाणावर बदलले आपणास दिसते. अत्रे यांनी या वर्णनात कुणब्याचे असलेले गावगाड्र्यातील महत्त्व्देखील अधोरेखित केले आहे.

पूर्वी गावात एसटी किंवा मोटर सायकल आली की त्या पाठीमागे कुतुहलाने धावणारी मुले दिसत. एखाद्या शहरी माणसाचे आगमन गावात झाले की लोक त्याच्याकडे उत्सुकतेने बघायचे. पण आता ज्या गोष्टी शहरात मिळतात त्या अगदी गावातही मिळू लागल्यात. कोल्ड्रींक, मोबाईल रिचार्ज, शहरातील खाद्य पदार्थ ही

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal **ISSN 2231 4342**

त्याची उदाहरणे सांगता येतील. पारावर गप्पा ठोकणारी मंडळी आता सोशल मीडियावर आपला वेळ घालवू लागली आहे. कबड्डी, कुस्ती, सूरपाटया यासारखे मैदानी खेळांऐवजी ग्रामीण भागातील मुलेही मोबाईल गेमच्या नादी लागलेली दिसतात. कालचा गावगाडा आणि आजचा गावगाडा यात जमीन-अस्मानाचा बदल घडून आलेला दिसतो.

स्वातंत्र्यानंतर गावगाड्यात मोठ्या प्रमाणात विकासाच्या सरकारी योजना आल्या. गावे थेट शहरांना जोडली गेली. पंचायतराजमुळे गावगाड्याच्या राजकारणाचे स्वरूप बदलले. दलित आणि स्त्रियांना पंचायतराजमध्ये मिळणारे आरक्षण हे त्याचे प्रमुख कारण होय. त्याचा सकारात्मक परिणाम झाला. पण त्याचबरोबर जातिव्यवस्थेलाही हादरे बसू लागले. सरंजामी मानसिकतेला दलित आणि स्त्रियांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा सहज पचनी पडत नाही. परिणामी यामुळे गावात संघर्षाचेही प्रसंग उद्भवतात.

शिक्षणाच्या प्रसारामुळे मुलांबरोबर मुलीही मोठ्या प्रमाणात शिक्षणासाठी बाहेर पडू लागल्या. क्रीडा, नोकरी व्यवसायातही ग्रामीण भागातील मुलांनी आपला ठसा उमटविण्यास सुरूवात केली आहे. कृषी आधारित आणि कृषिविरहित नवीन व्यवसाय येत आहेत. शेतीतून उत्पन्नाची हमी राहिली नसल्यामुळे शेतकरी शेतजमीनी विकून प्लॉटिंगच्या व्यवसायात जात आहेत. गावागाड्यात महत्वाचे स्थान असणाऱ्या अलुतेदार -बलुतेदार यांचे पारंपरिक व्यवसाय मोडीत निघाले. बड्या भांडवलदारांनी त्यांचे व्यवसाय हायजाक केले. साखर कारखानदारी, रोजगार हमीच्या कामामुळे ग्रामीण भागात अर्थव्यवस्था बदलली. फक्त् शेतीच्या कामावर अवलंबून असलेल्या मजुरांना कारखाने आणि रोजगार हमीच्या कामामुळे पर्यायी रोजगार मिळाला. त्याचा दुसरा परिणाम असा झाला की शेतीकामासाठी मजूर मिळणे कठीण होऊन बसले.

दारूचे दुकान, बार, गुटखा यामुळे ग्रामीण भागातही व्यसनाधीनता वाढली. संयुक्त कुटुंब व्यवस्था खिळखीळी झाली. परिणामी शेतीचे विभाजन झाले. शेतीचे उत्पन्न घटले, कर्जबाजारीपणा वाढला त्यातून शेतकऱ्यांना नैराश्य आले आणि तो आत्महत्येकडे वळू लागला. गावखेड्यात अशा प्रकारचा हे दुष्टचक्र सुरू झाला.

शेतीशी निगडित अनेक वस्तू, उपकरणे कालबाह्य होऊन त्यांची जागा नवीन वस्तू आणि उपकरणे घेत आहेत. पर्यायाने शब्द बोली भाषेतील मूळ शब्द जाऊन नवीन रूढ होत आहेत. मोट, नाडा, नांगर, दांड, पाट या शब्दांची जागा मोटर, ट्रक्टर, पाईप, ठिबक, हालर असे शब्द प्रचलित झाले. मोबाईल क्रांती, इंटरनेट आणि माहिती तंत्रज्ञानामुळे इंग्रजी शब्दांचीही भर पडू लागली आहे. शहरीकरणाचा वाढता वेग यामुळे गावेदेखील आता जणू काही छोटी छोटी शहरे बनू लागली आहेत.

वर उल्लेखिलेली स्थित्यंतरे गावगाडयात झाली असली, होत असली तरीही गावगाडयाचे ग्रामीणत्व् पूर्णांशाने जाणे अशक्य् आहे. कारण "ग्रामसंस्कृती ही प्रामुख्याने प्राचीन काळापासून कृषी संस्कृती होती. आज खेड्यापाड्यातून परिवर्तनाला प्रारंभ झाला आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु कितीही परिवर्तन झाले तरी कृषिकेंद्रित रचना हे ग्रामीण संस्कृतीचे प्रमुख वैशिष्ट्य राहील यात शंका नाही. म्हणून कृषी जीवन आणि शेतकरी हा ग्रामसंस्कृतीचा प्रमुख घटक पूर्वीपासून राहिलेला आहे. हा संपूर्ण गावगाडा शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून निर्माण

झाला आहे."2 कारण कृषिकेंद्रीतता ही न टाळता येणारी बाब आहे. गावगाडयाचे अस्तित्व् वेगळ्र या स्वरूपात आपल्या समोर येत आहे.

निष्कर्ष :

एकविसाव्या शतकातील गावगाडयाच्या स्वरूपाविषयी वरील ढोबळ निरीक्षणांच्या आधारे काही निष्कर्ष काढता येतात ते असे —

1. काळाच्या ओघात गावगाड्र्यात अनेक स्थित्यंतरे झाली आणि ही होत आहेत.
2. रूढी, परंपरा यांचा पगडा असलेल्या ग्रामीण भागावर जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या लाटेचे मोठे आघात झाले.
3. गावगाड्याची पारंपरिक जीवन पद्धती आणि तिचे स्वरूप पार बदलून गेले आहे.
4. समाज, बोलीभाषा, संस्कृती, राजकारण, अर्थकारण, शेती, उद्योग, व्य्वसाय अशा सर्वच पातळयांवर बदलाचे वारे वाहू लागले आहे.

संदर्भ् सूची

1. अत्रे त्र्यंबक नारायण, गावगाडा पृष्ठ 1, 2
2. नागनाथ कोतापल्ले, ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध स्वरूप प्रकाशन औरंगाबाद प्रथमावृत्ती 2010 पृष्ठ 11

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार

प्रा. सतीश कुंडलिकराव खरात
विभाग प्रमुख (इतिहास)
मिलिंद कला महाविद्यालय, नागसेनवन,
औरंगाबाद
मो. 7038925644
satishkharat7650@gmail.com

प्रस्तावना :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्ण नाव भिमराव रामजी आंबेडकर असे होते. त्यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ साली महु येथे झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उच्च शिक्षण घेऊन संपूर्ण जीवन सामाजिक कार्यास वाहून घेतले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकिय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कामगार, शेतकरी इ. विषयी विचार मांडले होते. फक्त विचार मांडून थांबले नाहीत तर प्रत्यक्ष कृतीकरून दाखविली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या विचारांची गरज संपूर्ण मानवजातीला जीवन जगतांना अत्यंत मोलाचे ठरत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कृषि विषयक मांडलेले विचार भविष्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत व्यावहारीक, दूर दृष्टीचे व मूलभूत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यावेळी मांडलेले कृषि विषयक विचार आजही वर्तमानकाळात अत्यंत मोलाचे ठरतांना पाहायला मिळतात. भारत देश प्राचीन काळापासून कृषि प्रधान देश म्हणून ओळखला जातो. कृषिवर आधारित अनेक छोटे-मोठे व्यवसाय भारतात प्राचीन काळापासून सुरू आहेत. शेतीचा विकास झाला तरच औद्योगिक क्षेत्राला फायदा होईल तसे झाले नाहीतर त्याचा परिणाम औद्योगिक क्षेत्रावर पडल्या शिवाय राहणार नाही. म्हणून कृषि विकास होणे अत्यंत महत्त्वाचे आहे, आवश्यक आहे. राष्ट्राच्या आर्थिक विकास साधावयाचा असल्यास शेतीकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. शेतीच्या विकासाशिवाय आर्थिक विकास होणे शक्य नाही. शेतीला अर्थ व्यवस्थेत प्राथमिक दर्जाचे स्थान असून शेती हे आर्थिक विकासाचा पाया आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इ.स.१९३६ मध्ये " स्वतंत्र मजुर पक्षाची " स्थापना केली. त्या पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करताना त्याजाहीरनाम्यात "भूमिहीन गरीब कुळे, शेतकरी नी कामगार ह्यांच्या निकडीच्या गरजा आणि गाऱ्हाणी मांडली होती."[१] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना करून कार्यक्रमाची आखणी करण्यास सुरूवात केली होती. तत्कालीन कामगारांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न पक्षाच्या जाहीरनाम्यातून मांडण्यास सुरूवात केली होती. एवढेच नाही तर त्यावर उपाय योजना आखून प्रत्यक्ष कार्यास सुरूवात केली होती. " शेत जमिनीचे झालेले तुकडे, शेत जमिनीवर वाढत्या लोकसंख्येचा पडलेला भार ही खरी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे आहेत. ह्याला उपाय म्हणून जुने धंदे जोमाने चालविणे आणि नवीन उद्योगधंदे सुरू करणे, उत्पादन शक्तीच्या कार्यक्षमतेत वाढ व्हावी म्हणून तांत्रिक

 ISSN 2231 4342

शिक्षणाची, व्यवसाय तसेच शासन यंत्रणेखाली चालणारा व्यवसाय सुरू करण्याचा आम्ही मोठा विस्तृत कार्यक्रम हाती घेणार आहोत अशी घोषणा पक्षाने केली होती."[२] स्वतंत्र मजुर पक्षाच्या जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर पक्षाच्या कार्यक्रमाची माहिती देण्यात आली होती. पक्षाचे कार्य कष्टकरी, कामगार, शेतकरी व इतर वर्गासाठीच्या कल्याणासाठी होते. शेतकरी, कामगार यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य स्वतंत्र मजुर पक्षाने केले होते." १९३७ ते १९४२ च्या काळात स्वतंत्र मजुर पक्षाने शेतकरी व कामगारांच्या प्रश्नाविषयी विधी मंडळात व बाहेर आवाज उठविला."[३] तसेच वतनदारी,खोतीची पद्धत रद्द करावी याविषयी सुद्धा त्यांनी आवाज उठविला होता.

खोती पद्धती नष्ट झाल्यानंतर तर खोतीचे वर्चस्व समाप्त होवून खोती मार्फत चालविलेले शोषण थांबेल व समृद्धी लाभेल. खोती पद्धतीत पिळवून निघालेला शेतकरी आर्थिकदृष्ट्या, सांपत्तीक दृष्ट्या दुर्बल बनतो. या पद्धतीच्या परिणामामुळेच खोती पद्धत ही गुलामगिरी पद्धती सारखीच आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकरी, कामगार यांच्या समस्या सोडविण्यासाठी लढा उभारला होता. त्याचबरोबर समस्या सोडविण्यासाठी ठोस भूमिका घेतली होती." शेतकऱ्यांकडून वसूल केला जाणारा शेतसारा, शेतीचे धारणक्षेत्र तसेच शेतीचा उद्योग म्हणून विचार करण्याची गरज शेती व्यवसायातील पारंपारिकता, लोकसंख्या वाढीमुळे शेतीवर वाढणारा बोजा, शेती व्यवसायातील श्रम आणि भांडवलाचे नियोजन, सामुदायिक नव्हे तर सहकार तत्त्वावर शेती, शेतीसाठीच्या पाटबंधाऱ्याची गरज, शेतीसाठी लागणाऱ्या आधुनिक सुविधांच्या उपलब्धता आदिंच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात अनेक चळवळी उभारल्या."[४] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आग्रही भूमिका घेतलेली दिसून येते. सरकारचे शेतकऱ्यांविषयी असलेले कर विषयक धोरणाला सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विरोध दर्शविला होता. कारण शेतीमधून निघणाऱ्या उत्पन्नाची पाहणी न करताच शासनाकडून शेती विषयक कर वसुल केल्या जात असे. शेतकऱ्यांकडून वसुल केल्या जाणाऱ्या शेतसाऱ्यात शासनाकडून वाढीमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासात बाधा येत होती. शेतसारा आकारत असताना शेतीच्या उत्पन्नाचा विचार करावा जेणे करून शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर त्याचा परिणाम होणार नाही, अडथळा येणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी चळवळी उभारल्या. शेतीमध्ये अधिक भांडवल शासनाने गुंतविले पाहिजे तसेच शेतीवर वाढत जाणारा लोकसंख्येचा भार औद्योगिक क्षेत्राकडे वळविला पाहिजे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शासनास सुचना केली होती. " अधिक आर्थिक ऐपत असणाऱ्यांना कर नाही हाच नियम शेतकऱ्यांना लागु करावा."[५] असे झाल्यास आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळेल तसेच दारिद्र्याने गांजलेल्या शेतकऱ्यांना सुद्धा यामधून सुटका मिळेल.

भारत देश हा कृषि प्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतातील खेड्यांची अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबून आहे. शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. शेतीमधून निघणाऱ्या उत्पादनावरच खेड्यांची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. "भू सुधारणा अर्थव्यवस्थेशी निगडीत असल्यामुळे हिंदूस्थानातील खेड्यातील शेतीत अद्यावत सुधारणा होण्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भर देतात."[६] देशातील अर्थव्यवस्थेचा विकास हा शेतीवर

अवलंबून अरतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अद्यावत शेती सुधारणेचा संबंध देशाच्या अर्थव्यवस्थेशी जोडला होता. देशाची अर्थव्यवस्था सुधारावयाची असेल तर भूसुधारणे मध्ये दिरंगाई करून चालणार नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बजावून सांगितले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेतीला एवढे महत्त्व देत असत की शेती हा राज्याचा प्रमुख व्यवसाय मानावा असे त्यांनी सुचविले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राला आर्थिक विकासाच्या संकल्पना दिल्या. देशात चालणारे उद्योगधंदे, शेतीमालाची प्रक्रिया करणारे तसेच कृषि क्षेत्रावर वाढत जाणारा लोकसंख्येचा बोजा कमी करणारे असावेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकरी व त्यांच्या समस्या व त्या समस्येवर उपाय योजनेसाठी कार्य केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नेहमीच लहान शेतकऱ्यांविषयी त्यांच्या शेती विषयक समस्या व स्थिती विषयी चिंता व्यक्त केली होती." भारतातील लहान धारणक्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांच्या उत्पादकतेवर गंभिर परिणाम होतात त्यामुळे शेतीचे राष्ट्रीयकरण करणे हाच उपाय आहे. शेतीत गुंतविण्यासाठी अत्यल्प भांडवल असेल तर उत्पन्नही अत्यल्पच असते. असे अल्प उत्पन्न सामाजिक अरिष्ठ ठरते. राष्ट्रीय उत्पन्नही घटते. शेतीवरील अतिरिक्त श्रमीक इतर उद्योगधंद्याकडे वळविले तर लहान धारण क्षेत्रावरील बोजा कमी होईल आणि अधिकचे भांडवल उपलब्ध होऊ शकेल. भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेतील अडसर दूर होईल असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे."[७] शेती व्यवसायाचा संबंध समाजव्यवस्थेशी जोडला होता. शेतीचे उत्पन्न घटले तर त्याचा परिणाम राष्ट्रीय उत्पन्नावर पडते. राष्ट्रीय उत्पन्न घटून आर्थिक विकासास बाधा निर्माण होईल. शेतीवर काम करणारे कामगार, मजुर यांनी औद्योगिक क्षेत्राशी कास धरण्यास लहान क्षेत्र असलेल्या शेतीवरील काम करणारी लोकसंख्या घटून कमी होण्यास मदत होईल. तसेच शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारल्यास शेतीवर काम करणारे शेतमजुर, कामगार व शेतीशी निगडीत असलेल्या सर्वच घटकांना आर्थिक सक्षमतेचा फायदा होऊ शकतो. शेतीतून अधिकचे उत्पन्न काढण्यासाठी शेतीला पाणी पुरवण्याची गरज आहे. जर पाणी पुरवण्याची पूर्तता नसेल तर शेती मधून निघणाऱ्या उत्पन्नावर परिणाम होतो. शेतीला योग्य प्रमाणात पाणी पुरवठा झाल्यास शेतीचा विकास होण्यास मदत होईल. जास्तीत जास्त बागायती शेतीत वाढ झाली पाहिजे. यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. शेतकरी, शेतमजुर, कामगारवर्ग आर्थिकदृष्ट्या सक्षम,समृद्ध झाला तरच देश समृद्ध होण्यास मदत होईल. त्याचबरोबर पीक पद्धती, पाण्याची उपलब्धता, उत्पादकते मध्ये वाढ, शेतीतून निघणाऱ्या मालाची साठवणूक करणे, शेतीमधून निघणाऱ्या मालाची विक्री, उत्पादनाला योग्य किंमत शासनाने दिली पाहिजे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचार मांडले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची व कार्याची गरज फक्त मानवाला, समाजालाच नव्हे तर संपूर्ण राष्ट्राला आहे. त्यांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, शेतकरी व कामगार विषयक इ. विचार राष्ट्रातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर मोलाचे व महत्त्वपूर्ण ठरतात..

ISSN 2231 4342

संदर्भसूची :

१. किर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि., झुलाबाई देसाई रोड, मुंबई – पृष्ठ क्र.३१६
२. कित्ता – ३१६
३. भिडे जी.एल., पाटील एम.डी., महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन,कोल्हापूर - पृष्ठ क्र. १५९
४. लुलेकर प्रल्हाद, अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा - दलितेत्तरांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सायन पब्लिकेशन,प्रा.लि.,सदाशिव पेठ,पुणे - पृष्ठ क्र. २८
५. कित्ता – ३०
६. पानतावणे गंगाधर, पत्रकार - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगत प्रकाशन,नागपूर - पृष्ठ क्र. २४४
७. लुलेकर प्रल्हाद, अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा - दलितेत्तरांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सायन पब्लिकेशन, प्रा.लि., सदाशिव पेठ,पुणे - पृष्ठ क्र. १५५

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

नरहर कुरुंदकरांचे हैदराबाद मुक्तिसंग्राम विषयक इतिहासलेखन

डॉ. क्षिरसागर बी. एस.
(इतिहास विभाग प्रमुख)
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली
मो. नं. 9850864010
Email:drkbs003@gmail.com

प्रस्तावना:

वैचारिक क्षेत्रामधिल मराठवाडयाचे मानबिंदु म्हणुन नरहरकुरुंदकरांकडे पाहिले जाते. मानवी जीवनाशी निगडीत प्रश्नांची उकलकरणा-यांमध्ये त्यांचे स्थानवरचे आहे. इतिहास,राजकारण,समाजकारणइ.क्षेत्रातील वाचनाचा वचिंतनाचा साक्षेपी अविष्कार त्यांच्या इतिहास लेखनातून प्रकटतो. प्रत्येक विषयाच्या मुळसंकल्पने पर्यंत जाऊन त्याचे सखोल विश्लेषन करण्याचे मुलभूतकार्य त्यांनी केले. याशिवाय मराठवाडयातील सांस्कृतिक विकासाचे दरवाजे खुले करुन मराठवाडयाची अस्मिताही जागविली. कुरुंदकरहे जीवनवादी विचारवंत म्हणुन सर्वज्ञात आहे. समाजामध्ये निर्माण झालेल्या प्रश्नांवर कुणाचीही भीड-भाड न मानता निर्भिडपणे त्यांनी आपले विचार मांडले आहे. नरहर कुरुंदकर म्हणजे एकचालते-बोलते विद्यापीठ होते. असे म्हटले तरी ती अतिशोक्ती होणार नाही.

भारताच्या इतिहासामध्ये हैदराबाद मुक्तिसंग्राम याघटनेला अनन्य साधारण महत्व आहे. हालढा म्हणजे भारताच्या प्रादेशिक अखंडतेचा लढा होता. म्हणुनच भारत सरकारने पोलिस ॲक्शन नंतर हैदराबाद संस्थान भारतात विलीन केले. हैदराबादचा मुक्तिसंग्राम हा फार मोठा इतिहास आहे. यालढयावर प्रकाश टाकण्याचे कार्य विविध विचारवंत, इतिहासकार यांच्या मार्फत झाले आहे, होत आहे. हैदराबाद मुक्तिसंग्राम बाबतचा वस्तूनिष्ठ इतिहाससमोर आणणा-या लेखकांमध्ये नरहरकुरुंदकर यांचेकार्य महत्वाचे आहे. हैदराबाद मुक्तिसंग्रामातील सर्वघडामोडिवर आधारीत त्यांनी ‘हैदराबाद :विमोचन आणि विसर्जन’ हाग्रंथ लिहिला आहे. याग्रंथात त्यांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामा विषयवस्तूनिष्ठ इतिहासकथन केला आहे. याशिवाय सेलु येथील भांगडीया स्मारक व्याख्यान मालेतील केलेली व्याख्याने म्हणजे हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा मागोवा आहे. कुरुंदकरांनी केलेले लेखन हे स्वामी रामानंद तिर्थ, गोविंदभाऊ श्राफ, अनंत भालेराव,दिगंबरराव बिंदु यांच्या सहवासातील चर्चेतून समोर आले आहे. नरहर कुरुंदकरांनी जेव्हा हैदराबाद मुक्तिसंग्रामा विषयलेखन केले तेव्हा तत्कालीन परिस्थितीत पाहिजे ती साधनेही उपलब्ध नव्हती. काही चरित्रग्रंथ, आठवणी यावरुन लढयाची हकिकत उपलब्ध होती. हिसाधन अपूरे होती, परंतू आज मात्र याघटने संदर्भातील माहितीचे अगणित भांडार आहे. त्यामुळेच हैदराबाद मुक्तिसंग्रामाबाबातचा संपूर्ण इतिहास समोर येत आहे. इतिहासाचे दालन प्रकाशाने उजळून निघेल याच धरतीवर कुरुंदकरांचे मुक्तिसंग्रामविषयक लेखन आहे. हैदराबाद मुक्तिसंग्राम हा भारतीय स्वातंत्र्य लढयाचाच एकभाग

आहे. हे केंद्र सरकाने स्पष्ट केल्यानंतर कुठे यालढयातील सत्य घटना समोर येऊ लागल्या. अशा परिस्थीती मध्ये कुरुंदकरांनी केलेल्या लेखनास अनन्य साधारण महत्व आहे. कुरुंदकरांनी हैदराबाद विषयक केलेले लेखन म्हणजे हैदराबाद मुक्तिसंग्रामचा सर्व इतिहास म्हणता येऊ शकत नाही. कारण हैदराबाद मुक्तिसंग्राम म्हणजे काय? तो कोठुन सुरु करता येईल, त्याला कोणत्या दृषिकोणात स्विकारायचे हे ठरविणे अवघड कार्य आहे. यादृष्ठीने हैदराबादसंस्थानच्या इतिहासाचे विवेचन करतांना कुरुंदकरांनी केलेले भाष्य महत्वाचे ठरते.

नरहरकुरुंदकर हे हैदराबाद मुक्तिसंग्रामात प्रत्येक्षभाग घेणारे व्यक्तिमत्व्. बालवया पासूनच त्यांचा यालढयाशी जवळचा संबंध आला आहे. यालढयामध्ये कुरुंदकरांनी पत्रके वाटणे,मित्रांचे संघटन करणे, निदर्शन करणे, बातम्या पुरविणे हेकार्य केले आहे.[1]तत्कालीन सर्व राजकीय घडामोडीवर त्यांचे बारीक लक्ष होते. इ.स. 1938 ते इ.स.1948 पर्यंत घडलेल्या घटनेवर कुरुंदकरांनी प्रकाश टाकला आहे. त्यामुळेच त्यांनी हैदराबादचा आरंभ बिंदु इ.स. 1938 पासून मानला आहे. कारण 24 ऑक्टोंबर 1938 ला गोविंदराव नानलयांनी 10 सहका-यांसह हैदराबाद येथे सत्याग्रह केला. हे जरी सत्य असले तरीही इ.स 1938 अगोदर हैदराबादेत सभा,संघटना,आर्यसमाज, हिंदुमहासभा यांच्या सहकार्याने इ.स. 1920 पासूनच अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिपत्याखाली सर्वपरिने जनतेत जनजागृतीचे कार्य झाल्याचे दिसून येते. अनंत भालेरावयांनी हीहैदराबाद मुक्तिसंग्रामाचा आरंभ बिंदुहा अप्रत्यक्षपणे 1938 च्या अगोदरील आहे असे नोंदविले आहे. इ.स. 1908 पासुनच सरकारच्या निषेधार्थ निदर्शने मराठवाडयात झाली आहे.[2]याचे उत्तम उदाहरण म्हणजे औरंगाबादेतील अनंत लक्ष्मण कान्हेरेने केलेला जॅक्सनचा खुन होय.

हैदराबादमुक्तिसंग्रामाचे विवेचनकरतांना कुरुंदकरांनी मराठवाडयाचे महत्व विशद केले आहे. मराठवाडयाला ऐतिहासिक व सांस्कृतिक, संत महात्म्यांच्या मोठा वारसा आहे. मराठवाडयामुळेच महाराष्ट्राचा एकजीवपणा टिकला आहे. नस्ता महाराष्ट्र अस्तित्वातच आला नसता. हैदराबाद विरोधात मराठवाडयाच्या जनतेने जो लढा लढला तो साधा सुधा लढा नव्हता तो करा या मरा या पध्दतीचा होता. "हैदराबाद मुक्तिसंग्राम हा केवळ संस्थानांच्याविलीनीकरणाचा लढा नव्हता तर तो भारताच्या प्रादेशिक अखंडतेचा लढा होता.”[3] मराठवाडयातील लोकांचा यालढयामधील सहभाग पाहता बलीदानाची परंपरा मोठी होती. मराठवाडा मुक्तिसंग्रामामध्ये हुतात्मा गोविंदराव पानसरे व हुतात्मा बहिर्जी नाईक हे बलिदान करणारे दोन हुतात्मे होय.[4] मराठवाडाही जिद्दीमानसांची भूमी आहे, असे अनंत भालेरावांनी नमुद केले आहे. कुरुंदकरांनी या लढयाचे दोन वैचारिक मतप्रवाह म्हणजे निजाम मीर उष्मान अलि खाँबहादुर व महात्मा गांधी आहेत असे नोंदविले आहे.

हैदराबादसंस्थानमध्ये 1940-42 पर्यंत शिक्षणाची वाईट स्थिती होती. प्राचीन बूरसटलेल्या, मागासलेल्या चालीरिती, प्रथा, वेठबिगार, अस्पृश्यता, गुलामगीरी इ. बाबी अस्तिवात होत्या. सुधारणेचा मागमुसही संस्थानात नव्हता माणूस म्हणून मानसाला संस्थानात महत्वच नव्हते. परंतू याचे कुठलेही सोयर-सुतक निजामास नव्हते. निजामाचा प्रथम उद्देश हा स्वतंत्र सार्वभौम राजा होण्याचा होता. इंग्रजां सोबत आमचे झालेले करार हे दोन मित्रांमध्ये झालेले आहे. इंग्रज एक सार्वभौम राष्ट्र असल्याने आपणही सार्वभौम आहोत. आम्हालाहीहिजमॅनेष्ट्रीलावण्याचा अधिकार आहे. यादृष्टीने कुरुंदकर नोंदवितात कि, निजामाचा विचार एक

ISSN 2231 4342

संस्थानिक म्हणून करु नये, तर त्याचा विचार अतिशय श्रीमंत व तेवढाच चिंगुस, महत्वाकांक्षी, पाताळयंत्री,चाणाक्ष, मुत्सुद्दी, कायदा सुव्यवस्थेचा तज्ञ व प्रजेचा शतु म्हणुन करावा.[5] ही निजामाच्या व्यक्तिमत्वाची वास्तूनिष्ठ ओळख ते आपल्या विवेचनात करतात. हैदराबादचा सार्वभौम राजा होण्याच्या दृष्ठीने निजामाने स्व:ची स्वतंत्र नाणे व्यवस्था, पोस्ट, टेलीग्राम, रेल्वे, स्वतंत्र सिव्हिल सर्व्हीस, स्वतंत्र्य विद्यापीठ अशी यंत्रना निर्माण केली होती. शिवाय इंग्लड, फ्रान्स, पोर्तुगाल, बेल्जीयम, इजिप्त, तूर्कस्थान, सौदी-अरब, अफगानिस्थान इ. राष्ट्रांमध्ये एकलॉबी तयार केली होती. जागतिक बँकेमध्ये निजामाच्या ठेवी होत्या. हे सर्व उद्योग पाहता निजाम किती चाणाक्ष, पाताळयंत्री होता याची जाणीव होते. म्हणजे त्याने एक स्वतंत्रराष्ट्र निर्माण होण्याच्या दृष्ठीने सर्व सिध्दता केली होती. प्रजेवर आपला जाब निर्माण राहावे यासाठी निजामाने 'दिनदार सिद्दीकअंजूमन' वइत्तहाद्दूलमुसलमीन'.[6] यादोनसंघटना निर्माण केल्या होत्या. तो प्रजेचा सर्वात मोठा शतु होता. जगातील श्रीमंतापैकी एक निजाम होता. परंतू त्यांचा हा पैसा प्रजाकल्याणासाठी नव्हता. हिंदु तर सोडा परंतू मुस्लिम प्रजेचेही त्यानेकल्याण केले नाही. मुस्लिम समाजातील फार मोठा वर्ग हा हलक्या प्रतीचाच व्यवसाय करीत होते. संस्थानात निजामाने गरजेपेक्षा जास्त सुधारणा होऊच दिल्या नाही. केवळ 10% प्रजा शिक्षित केली. म्हणूनच कुरुंदकर म्हणतात "निजामाचा अभ्यास म्हणजे मित्राचा नव्हे तर तो शतुचा अभ्यास आहे.[7] कारण एकुण निजामाचा सर्व प्रपंचहा स्वतंत्र सार्वभौम राजा होण्याचा होता. हा प्रपंच सिध्द झाला असता तर हैदराबाद संस्थान मधील प्रजेच्या अन्याय, अत्याचारास कोणी ही थांबवू शकले नसते. जन्मभर संस्थानातील जनतेला गुलामगीरीचे जिवन जगावे लागले असते.

हैदराबाद संस्थानच्या लढया विषयी मा. गांधी यांचा दृष्टिकोण महत्वाचा होता. गांधीजींचा संस्थांनाकडे पाहण्याचा सुरुवातीचा दृष्टिकोण चांगला होता. परंतू निजामाचा मुळचेहराजेव्हा त्यांच्या लक्षात आला तेव्हा गांधीच म्हणाले की, संस्थानिक हे भारतीय स्वातंत्र्याचे अवशेष नसून सर्व संस्थानिक हे आपल्यावर लादल्या गेलेल्या पारतंत्र्याचे खांब आहे. हेखांबगळूनपाडल्यासाठीजनता सुखी होऊ शकणार नाही. यामुळेच गांधीजींनी हैदराबादेतील जनतेला उद्देशुन म्हटले कि, भ्याडा प्रमाणे पळून जाण्या पेक्षा लोकशस्त्रे घेऊन लडत आहेत हे माझ्या अहिंसेत बसते.[8] परिणामता हैदराबाद लढयाला उग्रस्वरुप प्राप्त होऊन निजाम विरोधात वंदेमातरम चळवळ, हिंदुमहासभेचा सत्याग्रह, स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह, आर्यसमाजाचा सत्याग्रह आशी अनेक आंदोलने सुरु झाली म्हणजे गांधींच्या एकुण पाठींब्यामुळेच हया लढयाने जनआंदोलनाचे स्वरुप धारणकेले. हे कुरुंदकरांनी प्रामुख्याने समोर आनले आहे. जिना व गांधी यांच्यात तडजोडहोऊन माऊंटबॅटनने भारत-पाकफाळणीला मान्यता दिल्याने निजामास स्वतंत्र होण्यास कायद्याने बळकटी येणार होती. हा आधार होऊनच निजामाने फर्मान काढले की, हैदराबाद भारत अथवा पाकिस्तान यामध्ये विलीन न होता नवे राष्ट्र म्हणुन आम्ही स्वतंत्र राहणार आहे.[9] यानिजामाच्या घोषणेमुळे हा लढा किती प्राणंतिक होता. हे आपल्या लेखनातून स्पष्ट करतांना कुरुंदकर परांजपेच्या भाषणाचा संदर्भ देतात. देहाची ऊंची सोडे तिन हात आहे. हे यानंतर तुम्ही विसरावे ती उंची तिनच हात आहे, अर्ध्याहात उंचीचे डोके देहावर नाही असे समजून महामृत्यूंजयाचा जप करीत तुम्ही निर्भयपणे चला. यालढयात तुमच्या पैकी किती लोक मारले जातील याचा नेमनाही. जीवंत राहिल त्यांना साडेतिन हाताचा देह

मिळेल. जे मरतील तेदेशाच्या कारणासाठी मेले असे मानायचे.[10] यालढ्याची तिव्रता आणि उग्रता मोठी होती. भारतात इतर ठिकाणी अशी परिस्थती नव्हती. तुरुंगातील सत्याग्रहींची संख्या वीस हजार तर भुमिगत राहुन सशस्त्र आंदोलनात सहभाग घेतलेल्यांची ही संख्या वीसहजार होती. यावरुन यालढयाची व्याप्ती समजते.

कुरुंदकरांनी आपल्यालेखनातून हैदराबादच्यामुक्तिसंग्रामातील अनेक घटनांना उजाळा दिला आहे. 'गुंडा' बिदर, अर्जापूर' इ. गावांवर झालेल्या अत्याचाराचा मागोवा घेत कुरुंदकर पानसरे ते शोईबूल्लाखान यांच्या पर्यंत हुतात्माची फळी या संग्रामात कामी आली अशा प्रकारे संग्रामातील शहीदांच्या कार्याचेही तेमहत्वविशद करतात. याशिवाय उमरी बँक लूट घटनेतील अनेक गैरसमज दुर करुन ह्यालुटीतील एकहीपैसा इतरत्र गेला नाही हेस्पष्ट करतात. अशाप्रकारे हैदराबाद विलीनीकरणामागील सत्यता कुरुंदकरांनी प्रकाशात आणली. सर्वसामान्य लोकांना 'रझाकार' संघटनेचा प्रमुख कासीम रझवी हाच प्रथम शत्रु वाटते. परंतू ते खरे नाही, तर 'इत्तेहाद्दूलसंघटनाजन्मालाघालने, वाढविणे व रझाकारांचे स्वयंसेवक दल शासनाच्या पाठींब्यावर उभेकरणे हे सर्व उद्योग निजामाचे होते. रझवी वाट्टेल त्याघोषणा जरीकरीत असलातरी तेनिजामाच्या हातचे एकप्यादे होते.[11] धर्मांधता वाढविणे, भावनावेग पूर्ण विदेशी व कृत्वगाजविणे आणि मुस्लिमांचे संघटनकरणे यासाठी कनिष्ठ्बुध्दीचा, बेताल आणि बेछुट माणूसइतकेच निजामाच्याद्दष्टिने कासिम रझवीचे स्थानहोते. सर्वअत्याचाराचा कर्णधार हानिजामहोता. आपले सर्व उद्देश पूर्ण व्हावे. यासाठीच रझवीला इत्तेहाद्दूलमुसलमीन यासंघटनेचा अध्यक्ष निजामाने बनविले होते. म्हणजे निजामाच्या द्दष्टिमधिल रझवीचे स्थानकाय हेहीकुरुंदकरांनी आपल्या लेखनाद्वारे समोर आनले आहे.

हैदराबाद मुक्तीसंग्रामाचा लढा हा भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाचा एकभाग होता. कारण हैदराबाद संपल्या शिवाय भारताची प्रादेशिक अविभाज्यता सिध्द्झाली नसती. ही वस्तूस्थिती आहे. याबरोबरच कुरुंदकरांनी यालढयाच्या दोन बाजू स्पष्ट केल्या आहे. "हासंघर्ष जरी स्वामीजी व रझवीमध्ये दिसला तरी निजाम व महात्मा गांधीयांच्या मध्ये होता".[12] अशा पध्दतीने त्यांनी लढ्यातील मुळसंघर्षाचा बिंदू स्पष्ट केला. हैदराबाद एक स्वतंत्र राष्ट्र करण्याच्या द्दष्टिने निजामाचे सर्वपातळीवर प्रयत्न चालू होते. त्यामुळे सरळ मार्गाने हैदराबादचा प्रश्न सुटेलही आशाधूसर झाली होती. खरे म्हणजे हा प्रश्न पोलीस कारवाही शिवाय सुटणार नाही याची भारतीय नेत्यांना जाणीव होती. भारतीय नेते फक्त माऊंट बॅटन परत जाण्याची वाट पाहत होते. कारण त्या शिवाय ठोस कार्यवाही करणे, अडचणी निर्माण करणारे होते. ही तत्कालीन वस्तुस्थिती त्यांनी मांडली आहे. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतरही एका वर्षापेक्षा अधिक काळ हैद्राबादचा प्रश्न सोडविण्यासाठी लागला आहे. हा काळ सर्वसामान्य भारतीय जनतेला मोठा कालावधी वाटत होता. परंतु हैद्राबाद मधिल परिस्थिती पाहता हा कालावधी फार कमी आहे. कारण या लढयाची तिव्रता व दाहकता फार मोठी आहे. "हैद्राबादचा मुक्तीसंग्राम हे भारतीय स्वातंत्र्य लढयातील एक उज्ज्वल आणि लोकविलक्षण असे पर्वहोते.[13]अशा द्दष्टीने कुरुंदकर भारतीय स्वातंत्र्य लढयातील मुळ कणा हा हैदराबाद मुक्ति शिवाय साधनार नाही. व त्याशिवाय भारतीय अखंडता सुध्दा प्राप्त होणार नाही. असे मत व्यक्त करतात.

ISSN 2231 4342

भारत-पाकफाळणी नंतर काश्मिर प्रश्नावरुन पाकिस्तानने कुरापती सुरु केल्या. यामध्ये पाकिस्तानचा पराभव झाल्याने निजाम 'जैसेथे' करारावर सहीकरण्यास तयार झाला. परंतू वाटाघाटीचे गु-हाळसुरुच होते. तेसंपणारे नव्हते. 'जैसेथे' करार होणे म्हणजे हा दोन स्वतंत्र राष्ट्रामधील करार आहे. त्यासंबंधी ही वाटाघाटी होणे गरजेचे आहे. याशिवाय आमच्या विदर्भाचे काय असाही प्रश्न निजामाने समोर केला होता. म्हणजे यावाटाघाटी होणे अशक्य कोटीतील बाब होती. यावरुन हा प्रश्न केवळ पोलिसकारवाही शिवाय सुटणार नाहीहि सत्यता होती. वाटाघाटी न होणे यामध्येच भारताचे हित होते. कारण निजामाला शहाणपणा सुचलानाही हेच पथ्य भारताच्या माथी पडले. वाटाघाटी नुसार निजामाने अलियावर जंगच्या प्रस्तावाला मान्यता दिली असती तर महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश ही राज्य अस्तित्वात आली नसती. भाषावार प्रांत रचनाही झाली नसती. हैद्राबादच्या विलिनीकरणामध्ये महाराष्ट्र कर्नाटक व आंध्रप्रदेशाचे अस्तित्व होते. ही कुरुंदकरांची दृष्टी वास्तववादी आहे. खरे म्हणजे हैद्राबादचे भौगोलिक स्थान पाहताते स्वतंत्र्य राष्ट्र म्हणून निर्माण होऊ देणे हे भारतासाठी फार मोठे संकट होते. हेसंकट भारतीय नेत्यांनी मुत्सद्दीगीरीने संपविले. नेहरुंनी स्पष्ट केले कि,भारतामधून फक्त एक पाकिस्तान नवीन राष्ट्र अस्तित्वात येत आहे. पाक-भारत अशी दोन राष्ट्रे नव्हे. म्हणून पाक सोडून उरलेला भूप्रेदशहा भारताचा सार्वभौमभाग आहे. हि भूमिका आंतराष्ट्रीय स्तरावर सर्वांनामान्य करावी लागली.[14] यामुळे निजामाला बाहेरुन मदत मिळण्याचा अधिकृत मार्ग नेहरुंच्या मुत्सद्दीपनाने बंद झाला. तरीही झेकोस्लो-व्होकीयाने पोर्तुगालला शस्त्रे दिली. पोर्तूगालने ती गोवा येथे उतरुन घेतली. गोव्यातून हिशस्त्रे चोरुन पोहचवण्याचे काम प्रसिध्द आंतरराष्ट्रीय तस्कर सिडने कॉटन यांनी केले. परंतू विमानातून जातील अशीच शस्त्रे निजामहैदाबादला आनूशकला. तोफा, रणगाडे, रणगाडे विरोधी तोफा, विमान विरोधी तोफा अशी अवजड हत्यारे निजामाला मिळू शकली नाही.[15] हे सर्व नेहरुंच्या मुत्सद्दीपणाचे फळ आहे. नसता हैद्राबाद प्रकरण हेफार मोठे दुखने झाले असते.

दिनांक 21 मार्च 1948 नंतर माऊंटबॅटनच्या जागेवर राजगोपालचारी गर्व्हनर जनरल झाले. ब्रिटीश सेनापती ही गेले. जनरल करिअप्पा हे भारताचे सर सेनापती झाले. त्यानंतर भारताने निजामाची आर्थिक कोंडी आंतरराष्ट्रीय स्तरावरुन अधिकृत कोणी ही मदत करु शकणार नाही अशी परिस्थिती निर्माण केली. सर्व प्रथम हैद्राबादच्या नाण्याला भारतात बेकायदेशीर ठरविले. हैद्राबाद हा भारताचा अंतर्गत प्रश्न आहे. त्यामुळे अंतर्गत प्रश्नात इतर राष्ट्रांनी ढवळा-ढवळ केल्यास आम्ही त्या राष्ट्रास आंतरराष्ट्रीय कायद्या नुसार युनोत खेचू असे वातावरण तयार केले. नेहरु ब्रिटीश पंतप्रधानास म्हणाले कि, संस्थानला विदेश संबंध जोडता येणार नाही, हातुमचाच करार आहे. तो तुम्हीच मोडला तर तुमच्या 345 कोटीच्या भारतातील भांडवलाचे आम्हीही राष्ट्रीयीकरण करुन टाकु.[16] त्यामुळे ब्रिटीशांना भारताच्या बाजूने उभे राहावे लागले. कुरुंदकरांनी नेहरुंच्या राजकारणाचे खरे स्थान ओळखावे असेही. याद्वारे नमुद केले.

आर्थिक ताळेबंदी झाल्याने निजाम जागा झाला व माऊंटबॅटन प्रस्ताव मंजूर करुन वाटाघाटी करण्यास आपण तयारआहे, अशी शिफारस निजामाची होती. सरदार वल्लभभाई पटेलांनी निजामास कळविले. माऊंटबॅटन प्रस्ताव आता इंग्लंडला गेलाआहे. बिनशर्त विलीनीकरण ऐवढेच आताबाकी आहे.[17]शेवटी

 ISSN 2231 4342

निजामास कळविण्यास आले 24 तासाच्या आत विलीन व्हा नसता भारतीय फौजा संस्थानात घुसतील 13 सप्टेंबर 1948 ला भारतीय फौजा हैदराबादेत घुसुन हैदराबादचा प्रश्न संपविला. याघटनेला 'ऑपरेशनपोलो' असे सांकेतिक नाव देण्यात आले होते. अशा प्रकारे नरहरकुरुंदकर यांनी आपल्या विवेचनातून हैदराबाद मुक्तिसंग्रामचा इतिहास कथन केला आहे. हेत्यांचे कार्य ऐतिहासिक दृष्टया महत्वाचे आहे.

सारांश :

नरहर कुरुंदकरांनी हैदराबाद मुक्ति संग्राम विषयक लिखाणाद्वारे अनेक सत्य घटना समोर आणल्या. त्यांनी निजामी राजवटीतील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक एकुणच सर्वांगीण स्थितिवर प्रकाश टाकला. याशिवाय हैदराबाद स्टेट काँग्रसच्या चळवळी, विद्यार्थी चळवळी या सर्व घटणावर त्यांनी केलेली चर्चा महत्वाची ठरते. हैदराबादचा इतिहास कथनकरतांना संस्थानाची भौगोलिक स्थिति, निजामाचे उद्देश, हिन्दुमुस्लिम जनतेचे संस्थानातील स्थानयावर कुरुंदकरांनी टाकलेला प्रकाश त्यांच्या ऐतिहासिक ज्ञानाची पावती ठरते. याशिवाय म.गांधी पं. नेहरु, सरदार पटेलांचा निजामाकडे पाहण्याचा दृष्टीकोण काय? यावरही कुरुंदकरांनी दृष्टीक्षेप आहे. इत्तेहाद-उल-मुस्लमीन संघटनेचे स्वरुप, निजामाचे परराष्ट्र धोरण, लष्करी व्यवस्था समजण्यासाठी कुरुंदकरांचे विवेचन मौलिक स्वरुपाचे आहे. नांदेडचे झेंडा प्रकरण, उमरी बँक लूट प्रकरण या घटनांचा सत्य इतिहास त्यांच्या लेखनातून दिसून येते. त्यामुळे त्यांच्या लेखनास महत्व प्राप्त होते.

हैदराबाद मुक्ति संग्रामातील विविध प्रवाहाचा परामर्ष घेऊन त्यातील अनेक अदृष्य संबंधाचे - घटनांचे स्वरुप त्यांनी आपल्या लेखनातून स्पष्ट्केले आहे. कुरुंदकरांचे हैदराबाद मुक्तिसंग्राम विषयक लिखाण हे बरेचशे ऐकुव स्वरुपाचे असले तरी ते ज्या व्यक्तीं कडून त्यांच्याकडे आले त्या व्यक्तीचे व्यक्तीमत्व हेच या लिखानाचा दर्जा ठरविणारे आहे. स्वामी रामानंद तिर्थ, गोविंद भाई श्राफ, अनंत भालेराव, दिगंबरराव बिंदू यांच्या सहवासातील चर्चेतून कुरुंदकरांचे मुक्तिसंग्राम विषयक लेखन समोर आले आहे. कुरुंदकरांचाही बाल वयापासून प्रत्यक्ष लढ्यामध्ये सहभाग होता. त्यामुळे प्रत्येक घटनेची जाण त्यांना होती. त्यांनी आपल्या विवेचनाद्वारे हैदराबाद मुक्ती संग्रामामध्ये घडलेल्या अनेक घटनांना उजाळा दिला. कुरुंद करांच्या लिखनातून हैदराबाद लढा म्हणजे काय? त्याचे स्वरुप कसे होते, तोल ढा किती हिंसक व उग्र होता. याची जाणीव होते. कुरुंदकरांनी हैदराबाद मुक्ति संग्राम विषयक केलेले लिखान हे अत्यंत महत्वाचे आहे. ते वस्तूनिष्ठ स्वरुपाचे आहे. परंतू तो सर्व हैदराबादचा इतिहासही होऊ शकत नाही. कारण हैदराबाचा इतिहास हे इतिहासाचे फार मोठे व्यापक क्षेत्र आहे. त्यासाठी 700-800 पानांचा ग्रंथही कमी पडेल. असे असले तरीही त्यांचे हे विवेचन हैदराबाद मुक्ति संग्रामाच्या इतिहासाचे नव्या व्यापक दृष्टीने अभ्यास करण्यास लावणारे आहे. भारताच्या इतर प्रांतातील लढयापेक्षा हैदराबादसंस्थानातील लढयाचे स्वरुप निराळे होते. हा लढा म्हणजे मुस्लिम जातीय वादाच्या एका प्रबळ केंद्र विरुध्द चालू असणारा हिंदू प्रजेचा लढा होता. यामुळे हैदराबाद मुक्ति संग्रामाच्या इतिहासाचे नव्या दृष्टीने व्यापक स्वरुपात अभ्यास करण्याचेही आव्हाण कुरुंदकरांनी त्यांनी केले आहे.

ISSN 2231 4342

संदर्भसुची :

1. वाडीकर, भु. द.(2005). ज्ञानर्षी नरहर कुरुंदकर : नांदेड.संगतप्रकाशन. पृ. 44-45.
2. अनंत,भालेराव.(1957).हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा :औरंगाबाद. स्वामी रामानंद तिर्थ संशोधन संस्था आणि भारत मुद्रत प्रकाशकलिमिटेड. पृ. 44.
3. जोशी, द.प.(1998).हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन. पृ. (प्रस्ता).
4. अनंत, भालेराव.(1957). हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा :औरंगाबाद. स्वामी रामानंद तिर्थ संशोधन संस्था आणि भारत मुद्रत प्रकाशकलिमिटेड.पृ.04
5. जोशी,द.प.(1998).हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन.पृ.37
6. जोशी,द.प.(1998).हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन. पृ.179
7. जोशी,द.प.(1998).हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन. पृ.188
8. डोळे,ना.प. (1998). 'हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम :मुंबई. ग्रंथालीप्रकाशन.इंडियन एज्युकेशन सोसायटी. पृ.26
9.अनंत, भालेराव.(1957). हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा :औरंगाबाद. स्वामी रामानंद तिर्थ संशोधन संस्था आणि भारत मुद्रत प्रकाशक लिमिटेड.पृ.412
10. परळीकर, अशोक.(1975). हैदराबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा :पुणे. राजहंसप्रकाशन.(प्रस्ता), पृ. 25
11. जोशी,द.प.(1998). हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन.पृ.17
12. अनंत, भालेराव.(1957). हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा :औरंगाबाद. स्वामी रामानंद तिर्थ संशोधन संस्था आणि भारत मुद्रत प्रकाशक लिमिटेड. पृ. 166
13. परळीकर, अशोक.(1975).हैदराबाद मुक्ति संग्रामातील अज्ञात कथा :पुणे. राजहंसप्रकाशन.पृ. 17
14. अनंत, भालेराव.(1957). हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा :औरंगाबाद. स्वामी रामानंद तिर्थ संशोधन संस्था आणि भारत मुद्रत प्रकाशकलिमिटेड पृ. 415
15. जोशी,द.प.(1998). हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन.पृ 234
16. जोशी,द.प.(1998). हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन.पृ 135
17. जोशी,द.प.(1998). हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन :औरंगाबाद. रजतप्रकाशन.पृ 136

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

छत्रपती राजर्षी शाहू महाराजाचा आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय

प्रा. गायकवाड बाळू भिमराव
मु. पो. टाकळी शिकंदर
ता. मोहोळ जि. सोलापूर
पिन -४१३२४८
मो. नं. -९८८१७४१४२९
Email :balugaikwad789@gmail.com

प्रस्तावना :

छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी इ. स. १८९४ मध्ये कोल्हापूर संस्थानचा कारभार हाती घेतल्यानंतर त्याच्या लक्षात आले की, प्रशासनामध्ये फक्त ब्राम्हण वर्गाचाच अधिक समावेश आहे. तसेच मोक्याच्या जागा चित्पावन ब्राम्हणणांनी बळकावल्या होत्या. त्यामुळे राज्यकारभारामध्ये असमतोल निर्माण होऊन तो दूर व्हावा. तसेच होतकरू व हुशार ब्राम्हणेत्तरांना वावदेण्याचा विचार शाहु महाराजाच्या मनात आला मागास वर्गीयांच्या प्रगतीसाठी शासकीय व निमशासकीय विभागामध्ये शेकडा ५० टक्के जागा राखून ठेवण्याचे नमूद करण्यात आले.

बहुजनासाठी आरक्षणाचा निर्णय :

बहुजनांसाठी आरक्षण सर्व प्रथम राजर्षी शाहू महाराजांनी प्रत्यक्षामध्ये आणले. या बहुजनांना विकासाच्या प्रवाहामध्ये आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवल्याच पाहिजे अशी कल्पना सर्व प्रथम महात्मा फुलेंनी प्रथम मांडली. राजर्षी शाहु महाराजांनी संस्थानामध्ये समानता आणायची होती. त्यांनी महात्मा फुलेची कल्पना लगेच ओळखली होती. ही कल्पना महाराजांनी प्रत्यक्षात उतरवली "इ. स. १९०२ मध्ये त्यांनी कोल्हापूर संस्थानातील मागास जातीसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला."[१]

आरक्षणाचे महत्व :

या वेळेला वेदोक्त प्रकरण सुरूच होते. परंतु ते खालच्या वर्गासाठी नव्हते. खालच्या वर्गावर या प्रकरणाचा कसलाही परिणाम होत नव्हता. वेदोक्ताच्या ऐन धुमश्चक्रीमध्ये छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी हा एक मोठा धाडसी निर्णय घेतला. उपेक्षित, दुर्लक्षित, वंचित अशा बहुजन समाजाला पुढारलेल्या समाजाच्या बरोबरीने आणायचे असेल तर त्यांच्यासाठी आरक्षण दयावेच लागेल अशी भूमिका छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी घेतली.[२]

आरक्षणाचे स्वरूप :

तत्कालीन नेते केळकर रानडे, टिळक, गोखले, अँड. अभ्यंकर, प्रा. गोविंद विजापूरकर इत्यादींनी छत्रपती राजर्षी शाहु महाराजाच्या या निर्णयाला तीव्र विरोध केला. काही लोकांनी इंग्रज सरकारकडे राजर्षी शाहु महाराजा विरुद्ध तक्रार दाखल केली. परंतु छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी या सर्वांचा विरोध मोडून काढला.

 ISSN 2231 4342

आरक्षणाचा निर्णय कायम ठेवला. छत्रपती राजर्षी शाहु महाराजांना आरक्षणाचा जनक म्हणून ओळखले जाते. या निर्णयामुळे सर्वसामान्य हे फारच प्रभावित झाले होते. कारण वेदोक्ताचे प्रकरण छत्रपती राजर्षी शाहु महाराजाच्या डोक्यावरच होते. छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. त्यवेळी युरोपीन अधिकाऱ्यांनी राजीनामे देण्यास सुरवात केली. परंतु हिंदी अधिकारी आपल्या जागेलाच चिकटून होते. “प्रारंभापासुनच सरकारी नोकरीमध्ये मागासलेल्या लोकांचा भरणा करावा अशी इच्छा राजर्षी शाहु संस्थानातील एका जैन अंडर ग्रॅज्युटची छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी आपल्या खात्यामध्ये नेमणूक केली. परंतु तिला त्या काळच्या सरन्यायाधिशाने विरोध केला. विचारे इंजिनियर यांच्या नेमणूकीला कित्येकांकडून असाच विरोध झाला.”[३]

त्यावेळच्या कोल्हापूर संस्थानातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या यादीवर नजर टाकल्यास असे दिसून येते की, राज्यातील सर्व मुख्य पदावर युरोपियन अधिकाऱ्यामध्ये संस्थानचे एक्झ्यु इंजिनियर हॉनॉन, दरबार सर्जन सिक्लेअर, राजाराम कॉलेजचे प्रिन्सीपल कँडी, शिक्षण खात्याच्या मुख्य मिस लिटल, अलबर्ट एडवर्ड इत्यादी मंडळी होती. तर पारशी अधिकाऱ्यासं संस्थानचे दिवाण मेहरज तारापूरवाला व पोलीस प्रमुख दोराबाजी पालनजी हे प्रमुख मंडळी होती. आता उरलेल्या ज्या अधिकाऱ्याच्या जागा होत्या. त्या सर्व जागावर ब्राम्हण वर्गातील मंडळी बहुसंखेने होती. इ.स. १८८४ साली ब्राम्हण व ब्राम्हणोत्तर प्रमाण विषम होते.[४]

आरक्षणाचा आदेश :

प्रशासनामधील ब्राम्हण शाहीची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी मनोमन निश्चयच केलेला होता. इ.स. २८ जुलै १९०२ च्या जाहीरनाम्या मध्ये छत्रपती राजर्षी शाहु महाराज म्हणतात की, सध्या कोल्हापूरमध्ये सर्व वर्गाच्या प्रजेला शिक्षण देण्याबद्दल व त्यांना उत्तेजन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत. पण सरकारच्या इच्छेप्रमाणे मागासलेल्या लोकाच्या स्थितीमध्ये फारसे यश आले नाही. म्हणून दिलगिरी वाटते. या विषयाबद्दल काळजीपूर्वक विचार करून असे असा निर्णय घेतला की, उच्च प्रतीच्या शिक्षणापर्यंत महाराज सरकारच्या प्रजाजनापैकी मागासलेल्या संस्थानाच्या नोकरीचा आजपर्यंत चालू असल्यापेक्षा बराच मोठा भाग त्यांच्या करिता निराळा राखून ठेवणे हे इष्ट होईल. पुढे छत्रपती राजर्षी शाहु महाराज असे म्हणतात कि, रिकाम्या झालेल्या जागांपैकी शेकडा पन्नास टक्के या मागासलेल्या लोकांच्या भराव्यात. ज्या ऑफिसमध्ये मागासलेल्या वर्गाच्या अंमलदाराचे प्रमाण सध्या शेकडा पन्नास पेक्षा कमी असेल तर पुढची नेमणूक ह्या वर्गातील व्यक्तीची करावी.

या हुकुमाच्या प्रसिद्धीनंतर केलेल्या सर्व नेमणुका तिमाही पत्रक प्रत्येक खात्याच्या प्रमुखांनी सरकारकडे पाठवावे. सूचना “मागासलेल्या वर्गाचा अर्थ ब्राम्हण, प्रभु, शेणवी, पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्ग खेरीज करून सर्व वर्ग असा समजावा.[५] पन्नास टक्केचा निर्णय म्हणजे मागासलेल्या लोकांसाठी खूप मोठी आनंदाची बातमी होती. यामुळेच छत्रपती राजर्षी शाहु महाराज हे बहुजनांचे राजे होते.

 ISSN 2231 4342

आरक्षणाची अंमलबजावणी :

छत्रपती राजर्षी शाहु महाराजाच्या इ.स.१९०२ च्या आदेशानंतर केसरी हे वृर्तमानपत्रामध्ये लिहिले की, "कोल्हापूरच्या छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी आपल्या राज्यामध्ये इतरत्र रिकाम्या होणाऱ्या जागांपैकी ५० टक्के जागा मागासलेल्या लोकांस व अर्ध्या ब्राम्हण, शेणवी, प्रभु, पारशी वगैरे पुढारलेल्या लोकांस दयायच्या असा ठराव करून त्याची अंमलबजावणी होण्यासाठी नुकतेच प्रसिद्ध केले आहेत." इ.स.१९०२ च्या जाहीरनाम्याला ज्या-ज्या नेत्यांनी विरोध केला त्या नेत्यांनी वस्तुस्थिती पहिलीच नाही कोल्हापूर संस्थानातल्या फक्त तीन टक्के लोकसंख्या असलेल्या पुढारलेल्या जातींना राजर्षी शाहु महाराजांनी ५० टक्के जागा अद्यापही राखून ठेवल्या होत्या व उरलेल्या ५० टक्के जागा ९७ टक्के बहुजन समाजासाठी दिलेल्या होत्या.[६] परंतु ब्राम्हण वर्गाचे खरे दुखणे होते की, प्रशासनातील त्यांच्या आजपर्यंतच्या पूर्व मक्तेदारीसह दिला जाणारा होता व अजून एक धोका असा होता की, ब्रिटिश सरकारही ब्राम्हणांच्या मार्गामध्ये खोडा घालण्यासाठी व ब्राम्हणेत्तर जातींना आपल्या बाजूला वळविण्यासाठी असाच प्रकारचे राखीव जगाचे धोरण जाहीर केले तर व ब्रिटिश ब्राम्हणांना शतु मानत होते.

इ. स. २६ जुलै १९०२ पासून छत्रपती राजर्षी शाहु महाराजांनी संस्थानामध्ये आरक्षण लागू केले होते. परंतु पुढे ही छत्रपती राजर्षी शाहु महाराज निरनिराळे आदेश काढतच होते. दिनांक १६ ऑगस्ट १९१८ रोजी शाहु महाराजांनी असाच एक आदेश काढला होता. छत्रपती राजर्षी शाहु महाराज म्हणतात "हल्ली तलाठ्यांच्या नेमणुका चालल्या आहेत. त्यात अस्पृश्य लोकांना प्राधान्य देण्यात यावे या जातीतील लोकांना योग्य लायकी असल्यास दरबारातील कोणत्याही योग्य जागेवर म्हणजे महसुल, न्याय, पोलीस व सामान्य प्रशासन इत्यादी कोणत्याही विभागाच्या प्रमुख जागेवर नेमण्यात येईल."[७] अस्पृश्यांच्या कल्याणासाठी शाहु महाराज किती दक्ष होते. हे वरील उदाहरणा वरून लक्षात येते. शाहु महाराजांनी "मशा कोंडी मांग याला सैन्यामध्ये शिपाई म्हणुन घेतले होते.[७] असे अनेक उदाहरणे सापडतील की, छत्रपती शाहु महाराजांनी प्रत्येक जातीतील योग्य व लायक व्यक्तीला संस्थानामध्ये नोकरीवर घेतले.

राजर्षी शाहु महाराजांनी समानता आणण्यासाठी बहुजनांना ५० टक्के राखीव जागा ठेवल्या होत्या. परंतु बहुजनामध्ये लायक माणसे मिळण्याची फार मोठी अडचण होती. म्हणूनच शिक्षणाला प्रथम प्राधान्य दिले. शाळा काढल्या, वस्तीगृहे काढले व बहुजनांचा शिक्षणाचा टक्का वर आणला. शाहु महाराजाच्या सामाजिक कार्यामुळे सर्व महाराष्ट्रातील बहुजनामध्ये नवचैतन्य त्यावेळी निर्माण झाले होते.

संस्थानातील नोकऱ्याचे प्रमाण इ.सं.१८९४ साली मागासवर्गीयांचे जनरल खात्यातील प्रमाण फक्त ५.६३ टक्के होते. ते इ. स. १९२२ साली ६२.११ टक्क्यावर पोहचले."[९] वरील टक्कावरून असे लक्षात येते की, कोल्हापूर संस्थानातील ब्राम्हणाची सरकारी खात्यात जी मक्तेदारी होती तिला फार मोठा धक्का बसला.

या आरक्षणामुळे ब्राम्हण वर्गाची जी जुलूम जबरदस्ती होती ति मोडीत निघाली. शाहु महाराजांनी बहुजनांना हक्क व अधिकार दिले. शाहु महाराजांनी वेळोवेळी गरजू व्यक्तीला मदत केली. अस्पृश्यांसोबत जेवण केले. अस्पृश्यांची नावे बदलली यावरूनच राजर्षी शाहु महाराजांचा मोठेपणा लक्षात येतो.[१०]

ISSN 2231 4342

समारोप :

भारताच्या विषमताधिष्ठित समाजाच्या दुर्ष्टीने व हजारो वर्ष अधिकारापासून वंचित असलेल्या समाजासाठी हा एक क्रांतिकारक निर्णय होता. एवढेच करून शा०..हु महाराज थांबले नाहीत तर इ.स. १९२० साली त्यांनी नोकऱ्यातील राखीव जागांचे प्रमाण ९० टक्कापर्यंत आणले. दलित, अस्पृश्य, बहुजन समाजाच्या उद्धारासाठी व जातीभेद निर्मुलनासाठी टाकलेले हे एक खंबीर पाऊल होते.

संदर्भ ग्रंथ :

१) लोकराज्य (मासिक), सप्टेंबर २०१८ पृ.क्र.१२.

२) दै.सम्राट, २६ जून २०१८, पृ.क्र.०४.

३) दै.सत्यवादी, राजर्षी शाहु खास अंक १९७४, बाळासाहेब पाटील, कोल्हापूर, सांगली, पृ.क्र.०३.

४) पवार वसुधा जयासिंगराव, राजर्षी शाहु छत्रपती: एक अभ्यास, सुमेरू प्रकाशन टिळकनगर, डोंबिवली, २००४, पृ.क्र.२९.

५) डॉ.गव्हाणे किशोरकुमार, डॉ.शिंदे एस.पी. महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स ॲनड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद,२०१४ पृ.क्र.१५०.

६) दै.केसरी, ५ ऑगस्ट १९०२, पृ.क्र.५.

७) पवार जयासिंगराव, राजर्षी शाहु छत्रपती : जीवन व कार्य, संचालनालय, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर - २०१४ पृ. क्र. ४०.

८) करवीर सरकारचे गॅझेट, १६ ऑगस्ट १९१८, भाग २ रा, पुराभिमुख संचालनालय, महाराष्ट्र शासन, कोल्हापूर, हुजूर रेकॉर्ड इमारत टाऊन हॉलसमोर, कोल्हापूर पृ.क्र. १२३.

९) हुजूर ठराव क्र..९८ दिनांक २७/०९/१९१२, पुराभिलेख संचालनाल्य, महाराष्ट्र शासन, हुजूर रेकॉर्ड इमारत टाऊन हॉलसमोर, कोल्हापूर पृ.क्र. १८०.

१०) उपरोक्त, पवार वसुधा जयसिंगराव, पृ. क्र. २९.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

''रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांची इतिहास विषयक दृष्टी''

प्रा. विशाल रामदास रोकडे
इतिहास विभागप्रमुख,
श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज
ता.पारनेर, जि.अ.नगर, ४१४३०६
मो.नं. : ९९७०७१७१४८
ई-मेल : vish.unipune@gmail.com

प्रस्तावना :

डॉ.आर.सी. मुजुमदार यांनी म्हटल्याप्रमाणे भारतात ख-या अर्थाने इतिहास लेखनाची परंपरा १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सुरु झाली. हा ब-याच अंशी पाश्चात्य शिक्षणाचा व पाश्चात्य इतिहासाच्या अध्ययनाचा परिणाम होता. पाश्चिमात्य जगात प्रचलित असलेला शास्त्रशुध्द व तटस्थतावादी इतिहास लेखनाचा प्रवाह भारतात रुढ करणारे व त्यानुसार भारतीय इतिहासाचे अध्ययन व लेखन करणारे जे भारतीय विद्वान व साक्षेपी इतिहास अभ्यासक १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाले. त्यात रियासतकार सरदेसाई यांचे स्थान अग्रगण्य आहे. त्यांनी प्रामुख्याने मराठयांचा इतिहास हा आपला प्रांत निश्चित केला असला तरी इतिहासाच्या अध्ययनाबाबत लेखनाबाबत त्यांनी सखोल चिंतन केले होते. त्यामुळेच 'रियासतकार' ही त्यांना मिळालेली उपाधी समर्पक ठरते. सरदेसाई यांनी आपली दिर्घ हयात इतिहासाच्या सेवेत व्यतीत केली. मराठी सत्तेचा सलग इतिहास लिहीण्याचे मोलाचे कार्य सरदेसाई यांनी केले. त्यांच्यापुर्वी स्प्रिंगल, स्कॉट वायरिंग व मुख्यतः ग्रँट डफ यांनी मराठयांचा इतिहास ग्रंथित केला असला, तरी तो इतिहास किती तरी अधिक विस्ताराने, प्रचंड परिश्रम करुन सरदेसाईसारख्या मराठी माणसाने तो शब्दबद्ध केला. या दृष्टीने त्यांचे लेखन कार्य हे प्रशंसनीय ठरते.

सरदेसाई आपल्या 'माझी संसारयात्रा' या आत्मचरित्रात म्हणतात की, ''इतिहासकाराने आपली भूमिका न्यायाधिशाप्रमाणे सर्वथा निर्विकार ठेवली पाहिजे. जसा पुरावा पुढे येईल तसा तसा आपला निष्कर्ष बदलत जावा, त्यात पूर्वग्रह बिलकूल असू नये.'' यावरुनच आपणास लक्षात येईल की इतिहासविषयक त्यांचा असणारा दृष्टिकोन हा संकुचित वा स्थितप्रज्ञ असा नव्हता तर ते इतिहासाकडे शास्त्रीय व समिक्षात्मक दृष्टिकोनातून बघतात असे असले तरी ते शास्त्रीयतेचा अतिमारा न करता वैचारिक व तटस्थतावादी ऐतिहासिक दृष्टीकोनाचा अवलंब करताना दिसून येतात.

रियासतकार सरदेसाईची 'इतिहास' विषयक संकल्पना :

रियासतकार सरदेसाई म्हणतात की, ''इतिहास हा विषय इतका व्यापक, उपयुक्त व गहन आहे, की त्याच्या स्वरुपांचे वर्णन थोडक्यात करणे शक्य नाही. सृष्टिक्रमाच्या आरंभापासून आजपावेतो मनुष्याची प्रगती

 ISSN 2231 4342

कसकशी होत गेली हयांचे तात्वीक विवेचन म्हणजेच 'इतिहास' होय. इतिहास विषयक संकल्पनेद्वारे आपणास असे दिसून येते की, त्यांचा 'इतिहासाकडे' पाहण्याचा दृष्टिकोन हा संकुचित नसून व्यापक असाच आहे. तसेच त्यांच्या सबंध लिखानाद्वारे याचा परिचय आपणास येतो.

रियासतकार सरदेसाई यांचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन :

रियासतकार हे बडोद्यास सयाजीराव गायकवाड यांच्या सेवेत असताना सयाजीराव हे इ.स. १९०५-१९०६ मध्ये युरोपात प्रवास करुन आले व त्यांनी इतिहासाचे महत्त्व ओळखून सरदेसाई यांना 'प्राचीन ग्रीस देशाचा इतिहास' शब्दबद्ध करण्यास सांगितला यावेळी सरदेसाई यांनी तो अनेक साधनांच्या सहाय्याने लिहीला. यावेळी सरदेसाई हे ग्रिकांच्या इतिहास लेखनास महत्त्व देताना दिसतात. ते यावेळी असे मत मांडतात की, प्राचीन ग्रिक संस्कृती आधीही भारतीय तसेच चिनी संस्कृती ह्या अधिक विकसीत होत्या, परंतू असे असले तरी ग्रीक लोकांस महत्त्व येण्याचे कारण असे की ऐहिक व्यवहारात विचारशक्तीचा स्वतंत्र उपयोग हा प्रथम ग्रीक लोकांनी केला. उदाहरणार्थ - ग्रीक लोकांनी लहान लहान अनेक प्रजासत्ताक शहरे स्थापन केली. इतर अनेक राष्ट्रांत यावेळी लष्करी राजेशाही होती.

एकूणच असे दिसून येते की, वरवर पाहता सरदेसाई हे हिंदूत्ववादी दृष्टिकोन मांडताना दिसतात परंतू ग्रीकांची महत्तमता मान्य करुन ते शास्त्रीय व वैश्विक विवेकवादी दृष्टिकोनाचा अवलंब करताना दिसून येतात. सरदेसाई यांनी स्पेंन्सर, डार्विन, हेगेल या शास्त्रज्ञांच्या ग्रंथांचे वाचन केले. यावर सरदेसाई असे म्हणतात की, ''अशा चिकीत्सक व बौध्दिक विचारांची पुस्तके वाचल्यावर माझी पूर्वीची धार्मिक अंधश्रध्दा नाहीशी होऊन मी एक प्रकारचा निरीश्वरवादी, विचारास पटेल ते आचरणात आणणारा स्वतंत्र विचारी बनलो तसेच मी स्वतंत्र विचाराने शास्त्रीय शोधांचे ग्रहण करत आलो आहे.'' त्यांच्या या विचारांतून व लेखनशैलीद्वारे असे दिसून येते की, ऐतिहासिक मांडणीसाठी आवश्यक असणारी विचारसरणी त्यांनी अवलंबिली होती तसेच त्याद्वारे त्यांनी ऐतिहासिक दृष्टिकोनाचा अवलंब केल्याचे स्पष्ट दिसते.

सरदेसाई व मराठी इतिहासकारांची दृष्टी :

सरदेसाई यांनी ज्या काळात लिखानास सुरुवात केली त्यावेळी 'मराठा' इतिहासाविषयी झालेले लिखान हे केवळ राष्ट्रीय भावनेतून वा परिप्रेक्षातून झालेले दिसून येते. यावेळी 'मराठी' इतिहासकार हे दोन अवस्थांतून जाताना दिसतात. यात,

१) वसाहतवादी लिखानाविरुध्दची प्रतिक्रिया व
२) मराठी माणसांकडून मराठयांच्या इतिहासविषयक लिखान.

या दरम्यानच्या काळातच वा.कृ. भावे यांनी इ.स.१९२९ च्या दरम्यान 'पेशवेकालीन महाराष्ट्र' हे पुस्तक लिहिले. या लिखानाबरोबरच हळूहळू त्यादृष्टिने इतरही लिखान पुढे येताना दिसते. यावेळी या विद्वानांनी चालत आलेल्या राजकीय दृष्टिकोनाबरोबरच त्यात सामाजिक अंगाने मांडणी केलेली दिसून येते. सरदेसाईच्या लिखानाच्या बाबतीत विचार करता त्यांची सबंध मांडणी ही राजकीय विचारसरणीवरच आधारित असल्याचे दिसते. त्यात त्यांनी सामाजिक विचारसरणी कुठेही मांडलेली दिसून येत नाही. असे असले तरी त्यांची ही

 ISSN 2231 4342

कामगिरी एवढयाशा विचारांवरती कमी ठरते असे नाही तर त्यांचे सबंध लिखान हे एक प्रकारे नवीन इतिहासकार व तत्त्ववेत्यांसाठी मौलिक व सहाय्यभूतच ठरते.

एक इतिहासकार म्हणून सरदेसाई :

गिबन, मेकॉले, सरकार यांच्या तोडीचा इतिहासाचा प्रचंड उद्योग सरदेसाई यांनी केला. शेजवलकर यांनी 'जर्मन इतिहासकार मॉन्सेन याच्या तोडीचा उद्योग महाराष्ट्रात एकट्या सरदेसाई यांनी करुन दाखवला' अशी प्रशंसा करतात. वासुदेवशास्त्री खरे यांनी 'मराठयांचा चालताबोलता इतिहास' अशीच त्यांच्या कार्याची नोंद केलेली आहे. इतिहासाचार्य राजवाडे यांनी सरदेसाईंना 'इतिहासमार्तंड' असे संबोधले आहे. तर ज्यांना बंगालचे गिबन म्हणून ओळखतात व सरदेसाईंशी निकटचा संबंध असणारे सर जदूनाथ सरकार हे त्यांच्याबाबतीत '<u>The Gretest Living historian of Maharashtra</u>' म्हणजेच 'महाराष्ट्राचा हयात असलेला सर्वश्रेष्ठ इतिहासकार' असे संबोधतात. 'महाराष्ट्रातील कर्त्या पुरुषांची मोजदाद' या सांख्यिकी पध्दतीने मराठी समाजाची गुणवत्ता मोजणा-या आपल्या अतिशय प्रसिध्द निबंधात इतिहासाचार्य राजवाडे यांनी रियासतकार सरदेसाई यांची 'इतिहासलेखक' म्हणूनच गणना केलेली आहे.

सरदेसाईचे थोडे पण अर्थपूर्ण बोलणे हेच भाषाप्रभुत्व या श्रीहर्षाच्या उक्तीला उतरणारा 'पानिपत' प्रकरणाचा समारोप त्यांनी चार वाक्यांत केलेला दिसतो. यात ते म्हणतात की, ''पानिपतचा संग्राम मराठयांची किर्ती यावच्चंद्रदिवाकरौ उज्ज्वल राखील; कितीही राज्यक्रांत्या किंवा घडामोडी झाल्या तरी पानिपतच्या आठवणीने मराठयांच्या बाहूंस सदैव स्फुरण चढेल; आणि कोणत्याही देशाचे राज्य करण्यास मराठे सर्वथैव लायक आहेत, याची खात्री हा एकच प्रसंग निरंतर पटवीत राहील, यात तिळमात्र शंका नाही'' यासंदर्भात न.र.फाटक यांनी म्हटले आहे की, ''गिबन, मेकॉले, कार्लाइल, फ्रुड, फ्रीमन, ग्रीन, अर्नाल्ड हे इंग्रज इतिहासकार मार्मिक ज्ञानाच्या विपुलतेप्रमाणेच भाषासौष्ठवासाठीसुध्दा प्रख्यात आहेत. मराठीत अजून अव्वल दर्जाचा इतिहासकार झालेला नाही. नानासाहेब हेच काय ते इतिहासकार आहेत''.

'उत्तमा आत्मना ख्याता' या न्यायाने स्वतःच्या कर्तुत्त्वाने व कष्टाने सरदेसाई यांनी आपले इतिहासविषयक लिखान केले, म्हणूनच सरदेसाई यांना 'रियासतकार' ही पदवी मिळाली आहे. सरदेसाई यांची अवास्तव स्तुती, अर्थगौरव अथवा शब्दांची कसरत नव्हे तर ती वस्तुस्थिती आहे. ते एक इतिहासकारच होते. त्यांनी जे 'नानासाहेब पेशवे' चरित्र लिहीले त्यासाठी त्यांनी शेजवलकरांसारख्या विद्वानास त्यासाठी प्रस्तावना लिहावी असे सुचविले. शेजवलकरांसारख्या चिकीत्सक इतिहासाभ्यासकाने त्या चरित्राची चिकीत्सा करुन त्यास प्रस्तावना लिहील्याचे दिसते. यावरुनच असे दिसते की त्यांनी आपल्या लिखानात ऐतिहासिक पध्दती वापरल्याचे जाणवते.

समारोप :

भारतामध्ये एकोणिसाव्या शतकात ख-या अर्थाने वैचारिक परिवर्तन सुरु झालेले दिसून येते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मात्र इतिहासविषयक लिखानास गती मिळाल्याचे दिसते. यात रियासतकार सरदेसाई यांनी जे काही इतिहासविषयक लिखान केले त्याचाही अभ्यास करणे महत्त्वपूर्ण ठरते. रियासतकारांनी

ISSN 2231 4342

आपल्या ९५ वर्षाच्या काळातील पहिल्या साठ वर्षाच्या काळात सयाजीरावांच्या पदरी असताना इतिहास लिहीण्यास सुरुवात केली व पुढे जवळजवळ तीस वर्षे त्यांनी इतिहासाचे पवित्र असे कार्य केले.

एकांगी दृष्टिकोन, आपल्या सोयीप्रमाणे पुराव्यांचा उपयोग आणि ऐतिहासिक पद्धती; तसेच पूर्वग्रह आणि पक्षपातीपणा अशा अनेक दोषांपासून सरदेसाई यांनी मुक्त राहण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. तरीही मनुष्य स्वभावाला अनुसरुन त्यात काही विद्वान त्यांस 'संकलनकार' संबोधतात. तथापी असे दोष आपल्या लेखनात राहू नयेत असा मात्र त्यांनी बुद्धिपुरस्पर प्रयत्न केला आहे. तसेच त्यांच्या लिखानाची रित ही एक 'इतिहासकार' असल्याचेच दर्शविते. अर्थातच नव्या संशोधनाच्या प्रकाशात रियासतीत काही उणिवा आढळणेही स्वाभाविक आहे. परंतू त्या उणिवा काढून टाकण्याचा प्रयत्न करणे आणि रियासतीला अद्ययावत रुप देण्याचे आव्हान हे नवसंशोधक इतिहासकारांपुढे आहे. एकुणच रियासतकार सरदेसाईचा इतिहासविषयक दृष्टिकोनाचा विचार करता इतिहास हाच त्यांच्या लिखानाचा आत्मा असल्याचे दिसून येते.

संदर्भग्रंथसूची :

<u>प्राथमिक साधने :</u>

1) सरदेसाई गोविंद सखाराम, 'ग्रिस देशाचा संक्षिप्त इतिहास', प्रकाशक दामोदर सावळाराम आणि मंडळी, सन १९०८.
2) सरदेसाई गोविंद सखाराम, 'श्री.सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासांत', प्रकाशक एस्. जगन्नाथ आणि कंपनी, पुणे, सन १९५६.
3) सरदेसाई गोविंद सखाराम, 'माझी संसारयात्रा', प्रकाशक – केशव भिकाजी ढवळे, मुंबई, पहिली आवृत्ती १९५६.
4) सरदेसाई गोविंद सखाराम, 'मुसलमानी मराठी रियासत', खंड १ ते ८, संपादक, स.मा.गर्गे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सुधारीत आवृत्ती.
5) सरदेसाई गोविंद सखाराम, 'नानासाहेब पेशवे', प्रकाशक एम.एन.कुलकर्णी, भारतगौरव ग्रंथमाला, मुंबई, १ ऑगस्ट १९२६.
6) पंत अमात्य, 'बावडा-दफ्तर', संपादक – केशव गोविंद सबनीस, प्रकाशक – सेक्रेटरी ज.बावडा, कोल्हापुर, १९३७.
7) शेजवलकर यं.शं., 'शेजवलकरांचे लेख', प्रकाशक – ह.वि.मोटे, मुंबई, मुंबई, १९५९.
8) भावे वा.कृ. 'पेशवेकालीन महाराष्ट्र', प्रकाशक –भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, १९७६.

ISSN 2231 4342

दुय्यम साधने :

१) आपटे भा.कृ., हेर्लेकर सुलभा, गर्गे स.मा., 'मराठी वाड़मय कोश-खंड २, भाग१, संपादक, डॉ.गो.म.कुलकर्णी, प्रकाशक-सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २००३.
२) कोठेकर शांता, 'इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान', श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपुर, प्रथमावृत्ती २००५.
३) कुलकणी अ.रा., 'मराठयांचे इतिहासकार' , प्रकाशक-दत्तात्रेय ग.पाष्टे, डायमंड पब्लिकेशन, पुणे २००७.
४) पुराणीक श.श्री., 'रियासतकार गो.स.सरदेसाई', श्री.गंधर्व वेद प्रकाशन (महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष), पुणे, २०१०.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

महाभारतकालीन ब्रम्हवादिनी विदुला

वाघ जालिंदर पांडुरंग
संशोधक विद्यार्थी
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर
मोबा. न. ९९७०६९६२२९
jalindarwagh2016@gmail.com

प्रस्तावना:

भारतीय समाजाला प्रदीर्घ संस्कृतीचा वारसा लाभला आहे. प्राचीन काळात संहिता, ब्राम्हणके, अरण्यके, पुराणे, उपनिषदे, धर्मसुत्र,पुराने, महाकाव्ये इत्यादी साहित्य निर्माण झाले आहे. भारतीय परंपरेत महाकाव्य अनन्य साधारण आहे. भारतीय तत्वज्ञानाच्या दृष्टीने महाभारत ग्रंथाचे महत्व अलौकिक आहे. "जय"हे महाभारताचे मुळनाव आहे. मुळ महाभारत महर्षी व्यासांनी लिहिले भारतीय संस्कृती, भारतीय परंपरा, नीती कल्पना,सामाजिक धारणा, धर्म आचार, राजकारण, व्यावहार व जीवानाचे ध्येय इत्यादी गोष्टींचा महाभारताशी निकटचा संबध आहे. महाभारतकाळात गांधारी, कुंती, द्रोपदी, शाकुंतला, सुलभा, दमयंती, सावित्री, विदुलाअशा अनेक विद्वान स्त्रिया महाभारतात होऊन गेल्या. प्राप्त ज्ञानाच्या आधारे महाभारतातील स्त्रियांनी स्वताच्या व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणला.

महाभारतातील स्त्रियांच्या कर्तृत्वाचे अनेक दाखले देता येतील. महर्षी व्यासांनी द्रोपदीच्या मुखातून वनपर्वामध्ये पतीव्रताधर्माचेवर्णन केले आहे.[१]महाभारत काळात स्त्रियांनी राजकीय बाबतीत सल्ला दिल्याचा उल्लेख आढळतो. उदा. द्रोपदीने राजाभ्रष्ट झालेल्या धृतराष्ट्राला सल्ला देण्यासाठी नितीवाद सांगितला. सिंध राजापासूनपराभूत झालेल्या पुत्रसंजयला पुन्हा युद्ध करण्यासाठी प्रेरणा देणारी माता विदुला यांचे अनेक उदाहरणे आपल्याला सांगता येतील. महाभारताच्या अभ्यासकांनी महाभारतातील अनेक विषयावर संशोधन केले आहे परंतु महाभारतातील विदुषी स्त्रियांवर फारसे संशोधोन झाल्याचे दिसत नाही. म्हणूनमहाभारतातील काही प्रमुख विदुषीचा अभ्यास करणे गरजेचे वाटाते.[२]

विदुला:

भारतीय स्त्री ही माता म्हणून किती वत्सल आणि पत्नी म्हणून किती प्रेमळ असते. पण तीच वेळी किती कर्तव्य कठोर बनते याचे उदाहरण म्हणजे विदुला होय. विदुलेचे सामान्य माते प्रमाणे आपल्या मुलावर प्रेम नव्हते. ती वीर माता होती. महाभारतातीलउद्योगपर्वामध्ये माता कुंतीने कृष्णाजवळ आपल्या प्रतापी पाच मुलांना

ISSN 2231 4342

संदेश देत असताना वीर माता विदुलाच्या कथेचा उल्लेख केला आहे. सिंधराजापासूनपराभूत होऊन, निराश होऊन घरात बसलेल्या पुत्राला युद्ध करण्याची प्रेरणा देण्यासाठी माता विदुलाने आपला पुत्र संजय याला जो उपदेश दिला यावरून माता विदुलेची विद्वत्ता प्रतीत होते.

महाभारत उपकथनकातील विदुला यशस्विनी, कुलीन, क्षात्रधर्मरत, निग्राही, दुरदर्शिनी, राज्येसभेत विख्यात होती व शास्त्रवचने ऐकून बहुशुत झाली होती.[३]आपल्या पुत्राने भारतभर विजय प्राप्त करावा अशी विदुलाची आकांक्षा होती. विदुलाचामुलगा संजय याचा सिंधराजाने पराभव केला होता. संजय दिन होऊन बसला होता. तेव्हा विदुलाने केलेला उपदेश अतिशय प्रेरक व मौल्यवान आहे. संजययुध्द न करता घरात बसला आहे. हे विदुलेच्या बुद्धीला मान्य नव्हते. युध्द न करता शांत बसणाऱ्या संजयचा विदुलेने तीव्र शब्दात निषेध केला. विदुला संजयला म्हणते, “संजय, तुझ्या या कृतीमुळे तु शत्रूचा आनंद व माझे दु:ख वाढवीत आहेस तुला मीजन्म दिला नसून तु कुठुनतरी आमच्या कुळात आला आहे.ज्याला राग येत नाही तो माणूस सामान्य असतो. तुला स्वकल्यान साधायचे असेल तर कर्त्याव्याचीधुराहातात घे. स्वत: ला कमी लेखु नकोस. स्वत:च्या नावाला शोभेल असी महत्वकांक्षा बाळग. तुझ्या मानातील भीतीचा त्याग कर. छोट्याशा नदीला लवकर पुर येतो. थोड्याशा दाण्याने उंदराची मुठ लवकर भरते. त्याप्रमाणे भ्याड पुरुष थोदाक्यानेच संपुष्ट होतात. तुशत्रुरुपी सर्पाची दाढ उपटण्याच्या प्रयत्नात मरण पत्कर, प्राण संकटात पाड, पणतुझा पराक्रम दाखव.” या ठिकाणी वीर माता विदुला नैराश्य अवस्थेत बसलेल्या मुलाच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसते. कारण विदुला संजयला भयमुक्त होण्यास सांगते. स्वपराक्रामातूनस्वत:चे कर्तुत्व सांगते. विदुलाही क्षत्रिय वीर माता होती. ती संजयला क्षत्रियवृत्तीने लढण्यास सांगते. विदुलेला मुलाच्या प्राणापेक्षा त्याचा पराक्रम श्रेष्ठ वाटतो. यावरून विदुलाच्या तेजस्वी बाण्याची व अफाट मन:सामर्थ्याची कल्पना येते.[४]

संजयला स्वाभिमान व कर्तव्यपरायणता याची जाणीव व्हावी म्हणून विदुला संजयला म्हणते. “शत्रु तुझ्या छातीवर पाय देऊन उभा आहे तरी तु असा दीन होऊन बसला आहे. स्वाभिमानाने जगायचे असेल तर तर स्वपराक्रमाने स्वत:चे कर्तुत्व सिद्ध करून दाखव. जीवाच्या आशेने कोंड्याच्या अग्नीप्रमाणे ज्वालेशिवाय तु धुमसत राहू नको. दीर्घकाळ धुमसत राहण्यापेक्षा क्षणभर पेटून भस्म होणे चांगले. तु राजघराण्यात जन्माला आला आहेस शौर्य दाखव किंवा मृत्यू पत्कार. साम, दाम, दंड, भेद, दान यांचा वापर करून स्वत: विजय हो. चांगल्या प्रकारे राज्यकारभार कर. जर तुला राजधर्माचे पालन करता येत नसेल तर तुझा जगून तरी काय उपयोग?”येथेविदुलाने संजयला जो उपदेश केला यारून तिला राजनीतीचे ज्ञान असावे असे दिसते. माता विदुलाचे मुलावर आंधळे प्रेम नव्हते याची कल्पना येते. राजकारणातील अनेक डावपेचाचा आधार घेऊन यशस्वी राज्यकारभार करण्यास व कर्तुत्व सिद्ध करण्यास सांगणारी माता विदुला किती कर्तुत्ववान व धोरणी असेल याचा प्रत्येय येतो.[५]

एखाद्या हुशार वैद्याप्रमाने युत्कीप्रयुत्कीने संजयला युद्धासाठी व विजय प्राप्तीसाठी उत्साहित करणे हा चतुर विदुलेचा हेतू होता. म्हणूनती संजयला म्हणते, “युद्धात मनुष्याला शोभणारा अत्युत्तम पराक्रम दाखविल्याने

त्याला जरी विजय मिळाला नसला तरी तो धर्माच्या ऋणातून मुत्क होतो व स्वनिंदा टाळतो. आपण केलेल्या प्रयत्नाचे फळ मिळो अथवा न मिळो शहाणा मनुष्य त्यासाठी शोक करीत नाही. पणतो सतत उद्योग करीत राहतो. कारण प्रत्येक कार्याच्या फलप्राप्तीत अनिश्चितता असते. काही वेळेस फल प्राप्ती होते तर काही वेळेस होत नाही. पण सतत कर्म करणे अवश्यक असते. तेव्हा एक तर तु तुझा पराक्रम दाखव किंवा अंत गतीस जा."येथे विद्वान विदुलेने प्रयत्नातून यश प्राप्त होते हा विचार मांडल्याचे दिसते.[६]

संजयची स्तब्धता पाहून पुढे विदुला संजयला म्हणते, "आपणावर किती जरी संकटे आली तरी आपण खचून जाऊ नये. शेवट पर्यंत दम धरून राहणे हेच योग्य असते. तु धैर्य व अभिमान धर, आपले पौरुष्य दाखव आणि आपल्या कुळाचा उद्धार कर. विद्येने, तापाने, संपत्तीने, पराक्रमाने जो इतरास जिंकतो तोच पुरुष होय. राजाच्या शौर्याच्या आधारावर सामान्य लोकसुखी समृद्ध जीवन जगतात. स्व:तच्या बाहुबलाने या जगतातमानमान्यता मिळविणाऱ्यास स्वर्गात सहज प्रवेश मिळतो वतो विजयी होतो."या ठिकाणी विदुला संजयला दृढ विस्वास कायम ठेवण्यास सांगते तसेच धार्मिक गोष्टीचा आधार घेऊन संजयचाधाडस निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसते. यावरून विदुलाच्या व्यक्तिमत्वाची कल्पना येते.[७]

पुत्र संजयच्या अंगी असणारी अल्प संतुष्टेचीवृत्तीच त्याच्या विनाशास कारणीभूत होत असते हे विद्वान विदुलेने ओळखले होते. संजयची अल्पसंतुष्टता मिटविण्यासाठी माता विदुला संजयला म्हणते. "अल्प संतुष्ट व्याक्तीचा कधीही विकास घडून येत नाही. संजय तुझ्या या नेभळेपणामुळे तु राज्यभ्रष्ट होशील, आमची राज्यातून हाकालपट्टी होईल आणि स्थानभ्रष्ट व द्रव्यहीन झाल्यामुळे आपली अवस्था दीन होईल. म्हणून संजया तुअफाट विजयाची महत्वाकांक्षा बाळग, स्वराज्याचे, स्वजानाचे संरक्षण कर. अल्प संतोष हा संपत्तीचा नाश करतो. शतुविषयी दया बाळगणे किंवा शतुला भिऊन राहणे हे ही संपत्तीचा नाश करतात. निरिच्छ मनुष्याला कोणतेही मोठे पद प्राप्त होत नाही. पोलादाप्रमाणे काळीज कठीण करून शतूचा पराभव कर. तु एक राजा आहेस राजाप्रमाणे जीवन जग. शुर, तेज संपन्नसिंहाप्रमाणे पराक्रमी राजामरण पावला तरी त्याची प्रजा सुखी असते. जो आपल्या सुखाचा त्याग करून राज्याच्या विकासासाठी जगतो तोच खऱ्या अर्थाने जीवन जगतो"भविष्यकाळात आपल्या राज्यावर येणारे संकट टाळण्यासाठी विदुला संजयला फार महत्वकांक्षा बाळगून राज्याचा विकास करण्यास सांगते. यावरून विदुलेच्या विद्वत्तेची काकल्पना येते.[८]

संजय माता विदुलाचे भाषण ऐकुन विदुलाला म्हणतो, "माझीआई ईतकी निर्दयी कशी? तुमाझ्या राजावैभावाची काळजी करते आहेस. युद्धात मला मरण आले मी तुझ्या दृष्टीआड झालो तर तुला राजवैभवाचा काय उपयोग? यानंतर विदुलाने संजयला शांतपणाने दिलेले उत्तर मृताला संजीवनी देणारे आहे, "संजया तु जे वात्सल्य किंवा पुत्रप्रेम समजतोस किंवा माझे ठिकाणी जे असावे म्हणून समजतोस ते खरे वात्सल्य नव्हे. मायेपोटी पोराला पोटाशी कवटाळून बसने मी अज्ञान समजते. आणीबाणीच्या वेळी तुला प्रेरणा देत नाही ते कसले वात्सल्य? मीजी तुला प्रेरणा देत आहे ति निर्दय म्हणून नव्हे. माझ्या मते कुसंतानापेक्षानिसंतान बरे. वात्साच्या कल्याणाची बुद्धी म्हणजेच खरे वात्सल्य असते."[९]कर्तव्य परायण माता विदुलाने केलेली पुत्र

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

वात्सल्याची व्याख्या अतिशय सार्थ वाटते. यानंतरसंजयविदुलाला म्हणतो, "माझ्याजवळ पुरेसे सैन्यबळ नाही, मदतीला मित्रही नाहीत मग मी एकटा गेलेले राज्य कसे परत मिळवणार?" विदुला हुशार होती. ती संजयला त्याच्या पित्याच्या वैभवाची व शौर्याची जाणीव करून देऊन त्याला म्हणते, "तुझ्या पित्याने अपरंपार धन ठेवले आहे. राजकारणात अनेक क्लृप्त्या असतात. त्यांच्यासहाय्याने आपल्याला परिस्थिती हवी तसी बदलता येते. सिंध देशाच्या राजाचा तिरस्कार करणारे व त्याच्या वैभवाचा हेवा करणारे सर्व लोक तुला वश होतील. काही निरपेक्ष मित्रही तुला मदत करतील फक्त तुझ्याकडे आत्मविश्वास असणे अवश्यक आहे."येथे विदुलाने चाणक्य नितीप्रमाणे अतिशय महत्वाचा सल्ला संजयला दिल्याचे दिसते.[१०]

राजकीय ज्ञान संपन्न बुद्धिमत्ता लाभलेली विदुला संजयला म्हणते, "ज्ञानी पुरुष सफलता व असफलता यांचा विचार झटकून सफलता मिळेलच असा मनातदृढ विस्वास धरून कार्य करत असतात. क्षेत्रीयाला अभिप्रेत असलेला पुरुषार्थ संपादन करण्याची हीच वेळ आहे. जे कोणी क्रोधी, लोभी, दुर्बल, गर्विष्ठ अपमानित झालेले व स्पर्धा करणारे असतील त्यांना तु मोठ्या कौशल्याने जाणून घे. सर्वांच्या आधी त्यास त्यांचे वेतन देत जा. सततउत्साही व दक्ष राहून तु सर्वांशी गोडीगुलाबीने बोलत जा म्हणजे ते तुला आपला नेता मानतील.आपलाप्रतिपक्षी प्राणावर उदार झाला आहे. हे एकदा का शत्रुला कळाले कि मग शत्रु तुला घाबरेल. शत्रुबलांढ्य आहे त्याला जिंकणे शक्ये नाही. हे जर समजले तर तो वकृत्वकुशल दूत भांडण मिटावे म्हणून पाठवितो. आपण तात्पुरते शत्रूला क्षमा करावे पण भविष्यात शत्रूचा पराभव करण्याची इच्छा कायम बाळगावी. शत्रुला शांत केल्यामुळे आपणास स्वास्थ्य मिळून धनाची वृद्धी करता येते. धनवंताला अनेक मित्र मिळतात व राज्य चिरकाल टिकविता येते. कोणतीही आपत्ती अली तरी राजाने कधी धैर्य सोडू नये. कदाचित तो अंतर्यामी घाबरला तरी त्याने वरुन घाबरल्यासारखे करू नये. कारण राजाचे धैर्य नष्ट झालाले पाहून त्याचे सर्व सैन्य व अमात्य यांचेही धैर्य नष्ट होते. तुझ्या अंगी तु सामर्थ्य, पराक्रम, उत्साह निर्माण कर तुला विजय निश्चित मिळेल."या ठिकाणी विदुलाने संजयला जो उपदेश दिला आहे यावरून विदुषी विदुलाला मानवी स्वभावाचे योग्य ज्ञान व राजकारणातील डावपेच यांचे ज्ञान असावे असे दिसते. राजाला विजयाची प्राप्ती कसी करता येईल याची पद्धतशीर असी सखोल माहिती विदुलाने दिल्याचे दिसते.[११]

सारांश

विदुलाच्या प्रेरणादायी मार्मिक भाषणाचा संजयवर अपेक्षित परिणाम झाला. संजयमाता विदुलाच्या सल्ल्याने सर्व बेत आखु लागला व मोठ्या उमेदीने पुढील कामाला लागला. विदुषी विदुलाची विद्वत्ता महान होती. दीन होऊन बसलेल्या मुलाचा स्वाभिमान जागृत करून त्याला पराक्रम दाखविण्यास तिने प्रेरित केले. राजकारणात अनेक वर्ष कामकाज पाहणाऱ्या राजकीय व्यक्तीप्रमाने विदुलेचे राजकीय ज्ञान होते. क्षात्रधर्माप्रमाणे मुलाला वर्तन करण्यास ती सांगते. तिने केलेल्या उपदेशामुळे ती श्रेष्ठ विदुषी स्त्रीम्हणून ओळखली जाते. विदुलेचा उत्साहयुक्त उपदेश संसारातीलविपत्तीग्रस्त प्रत्येक व्यक्तीस प्रेरक आहे. विदुलाच्या उपदेशात

व्यावहारातील व राजकीय परिस्थितीतील उदात्त व उत्साहयुक्त नीती भरलेली आहे. विदुलेच्या या उपदेशावरून तिची विविधांगी बुद्धिमत्ता, व्यावहारकुशल व राजनीतीसंपन्न विद्वत्तेची कल्पाना येते.

संदर्भ ग्रंथ

१. डॉ साळुंखे, आ. ह. महाभारतातील स्त्रिया, भाग१, राकेशआ, ह. साळुंखे

'लोकायत' १३, यशवंत नगर, गेंडामाळ, सातारा, आवृत्ती, १९९३, पृष्ठ क्र. ५१.

२. प्रा. फाटक, नरहर रघुनाथ, संपादक, श्रीमन्ममहाभारताचे सुरस मराठी भाषांतर,

खंड –१, सुरेखा प्रकाशन, मुंबई, आदिपर्व, अध्याय – ७१, पृष्ठ क्र. १५७ – १५८.

३. वाळिंबे, रा. श., संपादक, महाभारतखंड, क्र. ४ था, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे,

प्रथम अवृत्ती – १९८४, उद्योगपर्व, अध्यायन १३३, पृष्ठ क्र. २९१.

४. कित्ता, पृष्ठक्र. २९२.

५. ह. भ. प. दांडेकर, शं. वा. संपादक, भारतातीलथोर स्त्रिया, ह. भ. प. दांडेकर प्रकाशन ९७४, पुणे, १९६३, पृष्ठ क्र. १८२.

६. उपरोक्तवाळिंबे, रा. श., संपादक, पृष्ठ क्र. २९२.

७. उपरोक्त, प्रा. ह. भ. प. दांडेकर, शं. वा. संपादक, पृष्ठ क्र. १८३.

८. उपरोक्तवाळिंबे, रा. श., संपादक, पृष्ठ क्र. २९३.

९. महामहोपाध्याय हरदास, बाळशास्त्री,भारतीय जिवानादर्शन, भाग – १, चंद्रकांत प्रकाशन, नागपूर १९७६ पृष्ठ क्र. १२३.

१०. उपरोक्त, प्रा. ह. भ. प. दांडेकर, शं. वा. संपादक, पृष्ठ क्र. १८४ – १८५.

११. उपरोक्तवाळिंबे, रा. श., संपादक, पृष्ठ क्र. २९९ – ३००.

 ISSN 2231 4342

भारताची अण्वस्त्रविषयक नीती — १९९८ पर्यंत

डॉ. श्रीरंग शामराव लोखंडे,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर.
राज्यशास्त्र विभाग,
मो. ९८२२३२६७२४
Email :-
lokhandeshrirangshamrao@gmail.com

❖ प्रस्तावना :

दुसऱ्या जागतिक महायुद्धात अमेरिकेने ६ व ९ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या दोन शहरांवर अणुबॉम्ब टाकल्यानंतर अण्वस्त्रामुळे होणाऱ्या भयंकर विध्वंसाची कल्पना जगाला आली. त्यानंतर १९४९ मध्ये रशियाने अण्वस्त्र चाचण्या घेवून अमेरिकेची एकाधिकारशाही मोडीत काढली. नंतरच्या काळात इंग्लंड, फ्रान्स, चीन यांनीही अण्वस्त्रविषयक तंत्रज्ञान संपादन केले. आज भारतासह दहा ते पंधरा राष्ट्राजवळ अण्वस्त्र तंत्रज्ञान आहेत.

पं. नेहरूंच्या नेतृत्वाखालील सरकारने निशस्त्रीकरणाला भारताच्या परराष्ट्र धोरणाचा एक मुख्य आधार म्हणून स्वीकारले होते. आदर्शवादी नेहरूंच्या काळात भारताच्या अण्वस्त्र विषयक धोरणाची फारशी प्रगती झाली नाही या धोरणात पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांच्या काळातही बदल झाला नाही. १९६५ साली भारताने अलिप्ततावादी चळवळीच्या व्यासपीठावरून आंतरराष्ट्रीय अप्रसाराच्या कल्पना मांडली. अणुसंपन्न राष्ट्रांनी अण्वस्त्र साठ्याचा त्याग करावा व अण्वस्त्र स्पर्धेपासून दूर राहावे अशी ती योजना होती. परंतु हक्क व कर्तव्य यांचा तोल स्वीकारला गेला नाही. याच काळात भारताच्या सुरक्षिततेच्या चिंता अधिकच बळावल्या. भारताने महासत्तांना याची जाणीव करून दिली, परंतु महासत्तांनी अपेक्षित प्रतिसाद दिला नाही.

❖ अण्वस्त्र प्रसारबंदी कराराला भारताचा विरोध :-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या नि:शस्त्रीकरण आयोगाने तयार केलेली योजना १९६८ साली युनो महासभेने स्वीकारली. तसेच महासभेने सदस्य देशांना योजनेला स्वीकृती देण्याची विनंती करण्यात आली. अण्वस्त्र प्रतिबंधक (N.P.T.) करारावर एकाच वेळी लंडन मॉस्को आणि वॉशिंग्टन येथे जुलै १९६८ मध्ये सह्या करण्यात आल्या. अमेरिका, रशिया सहित एकूण ४० देशांनी या या योजनेला मान्यता दिल्यावर प्रत्यक्षात ५ मार्च १९७० रोजी हा अण्वस्त्र प्रसारबंदी करार अस्तित्वात आला. यातील मुख्य तरतुदी....

अ) अण्वस्त्रधारी राष्ट्रेही अण्वस्त्र नसलेल्या राष्ट्रांना अण्वस्त्रे प्राप्त करण्यासाठी कोणतीच मदत करणार नाहीत.

ब) वरील संधी मान्य करणारी अण्वस्त्रहिन राष्ट्रे अण्वस्त्र बनविण्याचा कोणताच प्रयत्न करणार नाहीत.

क) करार मान्य करणाऱ्या राष्ट्रांना असैनिक कार्यासाठी म्हणजे विकासात्मक कार्यासाठी अणुउर्जा विकासाचा पुर्नाधिकार असेल.

ड) अण्वस्त्र चाचणी परीक्षण करण्यावर प्रतिबंध घालण्यासाठी आंतरराष्ट्रीय परमाणु उर्जा आयोग ही आंतरराष्ट्रीय व्यवस्था असते.

इ) अण्वस्त्रहिन राष्ट्रे वरील आंतरराष्ट्रीय उर्जा आयोगा बरोबर करार करून शांततापूर्ण अशा विकास कार्यासाठी अणुशक्तीचा वापर करतील.

❖ **अण्वस्त्रप्रसारबंदी करारावर केली जाणारी टीका :-**

१. अण्वस्त्रधारी राष्ट्रांची एकाधीराची व्यवस्था :-

या अण्वस्त्रप्रसारबंदी कराराद्वारे अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी अण्वस्त्रांवरील आपल्या एकाधीकार कायम ठेवण्याची व्यवस्था केली होती. चीनने म्हटले होते की, हा अण्वस्त्र प्रसारबंदी करार साम्राज्यवादी प्रवृत्तीची द्योतक आहे. कारण या कराराद्वारे इतर राष्ट्रांनी (अण्वस्त्रदिन) अण्वस्त्रांचा विकास करू नये अशी या करारात तरतूद होती.

२. फ्रान्स व चीनची टीका :-

अण्वस्त्रहिन राष्ट्रांबरोबरच चीन व फ्रान्स या अण्वस्त्रधारी राष्ट्रांनीही या करारावर टीका करून त्यावर सही करण्याचे नाकारले होते. फ्रान्सने कराराला मान्यता देण्यापूर्वी अशी अट घातली होती की, रशिया व अमेरिकेने प्रथम त्यांच्याकडे असलेली सर्व अण्वस्त्रे आंतरराष्ट्रीय निरीक्षणासाठी ठेवली पाहिजेत. किंवा ते नष्ट केली पाहिजेत. त्याशिवाय करारात सहभागी होणे कोणत्याही राष्ट्राच्या हिताचे नाही.

३. भेदभावपूर्ण करार :-

काहींच्या मते हा करार भेदभावपूर्ण असा होता. या कराराद्वारे महाशक्तीवर अण्वस्त्रविकासावर, अण्वस्त्र प्रयोगावर कोणत्याही प्रकारचे बंधन घातले नव्हते, परंतु अण्वस्त्र विहीन राष्ट्रांनी मात्र त्यापैकी काहीच करू नये अशा व्यवस्था करण्यात आली होती. यालाच दुहेरी नीतीचा सिद्धांत होतात.

४. भारताचा अणुप्रसारबंदी कराराला विरोध :-

अण्वस्त्रांचा प्रसार अनेक राष्ट्रात झाल्यास त्यांचा वापर होण्याचा धोका अधिक वाढल्याबद्दल शंका नाही. त्यामुळे हा करार महत्वाचा ठरतो. पण त्याच बरोबर या करारावर अशी टीका केली जाते तो अण्वस्त्र सज्ज राष्ट्रांची मक्तेदारी निर्माण करणारा आणि टिकविणारा करार आहे. इतर राष्ट्रांनी अण्वस्त्रे निर्माण करू नयेत असे ठरविणाऱ्या त्या करारात अण्वस्त्र सज्ज राष्ट्रांकडे आधीच अस्तित्वात असणारे प्रचंड अण्वस्त्रे

 ISSN 2231 4342

साठे कमी करण्याबाबत कोणतीही तरतूद नाही त्यामुळेच भारत या करारात सामील झाला नाही. भारताने करारात सामील व्हावे म्हणू बाध्य राष्ट्रांकडून विशेषतः अमेरिकेकडून आग्रह धरण्यात आला पण भारताने त्यात सामील होण्यासाठी पुढील अटी घातल्या.

अ) सर्व प्रकारच्या अण्वस्त्र चाचण्या थांबविण्यात याव्यात.

आ) अण्वस्त्रांचे उत्पादन पूर्णतः थांबवावे.

इ) अस्तित्वात असणारे अण्वस्त्र साठे नष्ट करण्याचा कार्यक्रम आखावा.

❖ **भारताची अण्वस्त्र तंत्रज्ञान प्राप्तीच्या दिशेने वाटचाल :-**

पंतप्रधान इंदिरा गांधीच्या शासनकाळात भारताच्या अण्वस्त्र धोरणात व्यापक बदल झाला. इंदिरा गांधीना जाणीव होती की, निशस्त्रकीकरणावर भर देणे आवश्यक आहे, परंतु त्या भारताच्या अण्वस्त्र कार्यक्रमास रोखू शकत नव्हत्या.

आंतरराष्ट्रीय दबावाला बळी न पडता पंतप्रधान इंदिरा गांधीनी अण्वस्त्र परीक्षणाला मान्यता दिली. त्यामुळे १८ मे १९७४ रोजी राजस्थानातील पोखरणजवळ अण्वस्त्र परीक्षण यशस्वी पार पडले. शांततापूर्ण उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी अण्वस्त्र परीक्षण करण्यात आल्याचे त्यावेळी भारताने जाहीर केले.

भारताच्या अण्वस्त्र परीक्षणाचा पाकिस्तानसारख्या देशांनी विरोध केला. परंतु सोविएत रशिया, युगोस्लाव्हिया, फ्रान्स तसेच विकसनशील देशांनी विभिन्न कारणाने या परीक्षणाचे समर्थन केले. अमेरिकेने अनुस्फोटाची जोरदार टीका केली. भारताला अण्वस्त्र कार्यक्रमात मदत देणारा कॅनडा यावर टीका करत म्हटले की, भविष्यात भारताला तोपर्यंत अण्वस्त्र तंत्रज्ञानात (परमाणु प्रौद्योगीकी) मदत देणार नाही की, योपर्यंत भारत आपली अण्वस्त्र संस्थांना आंतरराष्ट्रीय नियंत्रण प्रणालीत सामील करणार नाही. पोखरण परीक्षणानंतर असंतुष्ट अमेरिकेने पहिल्या करारांना सोडून देवून तारापूर अणुउर्जा संयत्रासाठी दिले जाणारे जड पाणी देण्यात कपात केली.

पंतप्रधान राजीव गांधीच्या काळात भारताची अण्वस्त्र नीती अलिप्ततावादी आंदोलनाखाली दबली गेली. त्यामुळे या काळात अण्वस्त्र विकासाला फारशी गती मिळाली नाही. १९८० व १९९० च्या दशकात भारताच्या सुरक्षिततेला शेजारील देशाकडून आव्हाने मिळत होती. या काळात पाकिस्तान अण्वस्त्र तंत्रज्ञानाच्या उंबरठ्यावर होता. अमेरिकेकडून पाकिस्तानला शस्त्रात्रांचा पुरवठा होतच होता. भारताच्या सुरक्षिततेचा प्रश्न त्यामुळे वरचेवर नाजुकचा बनत चालला होता. १९९५ साली पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव यांनी भारताच्या अण्वस्त्रविषयक विकासाच्या दिशेने लांब उडी घेण्याचा प्रयत्न केले खरा; परंतु आंतरराष्ट्रीय दबावाला बळी पडून अण्वस्त्रांच्या परीक्षणाचा विचार भारताला सोडून द्यावा लागला.

ISSN 2231 4342

❖ **व्यापक अण्वस्त्र चाचणी बंदी करार (CTBT) भारताची भूमिका :-**

अण्वस्त्र प्रसारबंदीचे पूर्वीचे करार लक्षात घेवून आणि त्याचाच आधार घेवून जून १९९६ मध्ये जिनीव्हा या ठिकाणी अण्वस्त्रधारी राष्ट्रे, अण्वस्त्रहिन राष्ट्रे आणि इतर राष्ट्राचे मिळून ६१ प्रतिनिधींची बैठक बोलावण्यात आली. या बैठकीत सी.टी.बी.टी. वर चर्चा करणायत आली. ऑस्ट्रेलियातील संयुक्त राष्ट्रसंघाचे राजदूत रिचर्ड बट्लर यांनी सी.टी.बी.टी. चा ठराव मांडला. त्यावर भारताच्या प्रतिनिधी अरुंधती घोष यांनी मत मांडले.

सी.टी.बी.टी. करारातील पक्षपाती स्वरूपाच्या तरतुदी आणि त्यांचे होणारे विपरीत परिणाम तसेच भारताच्या राष्ट्रीय सुरक्षिततेला असलेला संभाव्य धोका लक्षात घेवून भारताने सी.टी.बी.टी. करारास विरोध केले. आणि त्यावर सही करण्यास नकार दिला. आणि आपला अणुविकासाचा पर्याय खुला असल्याचे जाहीर केले.

भारताने सी.टी.बी.टी. करारास विरोध केलेला असला तरी संपूर्ण जगातील अण्वस्त्रे नष्ट व्हावीत, संपूर्ण जगच अण्वस्त्र मुक्त व्हावे या भूमिकेला भारत आजही बांधील असून सी.टी.बी.टी. बाबत आपली भूमिका ठाम ठेवली आहे.

❖ **१९९८ मधील भारताचे आण्विक परीक्षण :-**

१८ जून १९९६ मध्ये जिनीव्हा निःशस्त्रीकरण परीषदेमध्ये भारताने महासत्तांच्या अण्वस्त्रविषयक नीतीचा दुटप्पीपणावर भारताने कडाडून टीका करत सी.टी.बी.टी. वर सही करण्यास स्पष्ट नकार दिला. आणि आपला अण्वस्त्रविकासाचा पर्याय खुला असल्याचे जाहीर करण्यात आले. भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने टाकलेले ते एक यथार्थ पाऊल होते. याच काळात शेजारील राष्ट्रीय अण्वस्त्र विकासाचा कार्यक्रम चीन व उत्तर कोरियाच्या मदतीने पूर्णत्वाच्या दिशेने जात होता. यामुळे भारतालाही आता त्या दिशेने पाऊल टाकणे आवश्यक होते.

११ मे १९९८ व १३ मे १९९८ रोजी दोन आण्विक चाचण्या भारताने घेतल्या आणि भारत हा देश अण्वस्त्रधारी आहे, अशी घोषणा केली.

❖ **वर्तमानकालीन भारताची अण्वस्त्र नीती धोरण :-**

पोखरणमधील मे १९९८ मधील आण्विक चाचण्या घेतल्यानंतर भारत जगातील अण्वस्त्र संपन्न देशांच्या रांगेत आहे. भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी २७ मे १९९७ रोजी संसदेच्या दोन सभागृहात एक घोषणापत्र सादर केले आणि त्यामध्येच भारताच्या सद्यकालीन आण्विक/अण्वस्त्र धोरणावर एक विवरण सादर केले त्यात पुढील बाबी आहेत.

ISSN 2231 4342

१. भारत अण्वस्त्र कार्यक्रमात स्वावलंबी झाला. :-

भारताचे अण्वस्त्रविषयक धोरण निरंतरता व सातत्याचे प्रतिक आहे; १९९८ मधील आण्विक स्फोट त्याचे उदाहरण आहे. या आण्विक चाचण्यामुळे भारताच्या केवळ विचार व कृती करण्याच्या स्वातंत्र्याचा विकास झाला नसून, भारत या अण्वस्त्रनिर्मित क्षेत्रात स्वावलंबी बनला आहे.

२. अणुपरीक्षणावर आपणहून स्वेच्छेकरिता बंदी घातली. :-

मे १९९८ च्या आण्विक चाचण्यानंतर भारताने घोषणा केल्याप्रमाणे अणु परीक्षणावर आपणहून स्वतः बंदी घातली. भूमिगत आण्विक परीक्षण आपण यापुढे टाळणार आहोत. या घोषणेचे कायदेशीररित्या पालन करण्यास आम्ही तयार आहोत.

३. भारत एक अण्वस्त्रसंपन्न राष्ट्र आहे. :-

निःसंशय भारत आता एक अण्वस्त्र संपन्न राष्ट्र आहे. हा दर्जा आम्हाला कोणत्याही राष्ट्राने दिला नाही, तर आमच्या शास्त्रज्ञांनी आम्हाला गौरवांकित केले आहे.

४. भेदभावरहित जागतिक निशस्त्रीकरण प्रयत्नव्हावेत. :-

आण्विक चाचण्यानंतरही भारताने आपली शेजारील देश व इतर देशांच्या बाबतीत आपली धोरणे बदलली नाहीत. देश व इतर देशांच्या बाबतीत आपली धोरणे बदलली नाहीत. स्थिरतेसह शांतता स्थापन करण्यात आपण वचनबद्ध आहोत. निशस्त्रीकरणावर आजही भारताचा गाढ विश्वास आहे, परंतु निशस्त्रीकरणाचे प्रयत्न हे जागतिक शांततेसाठी भेदभाव रहित केले जावेत एवढीच अपेक्षा आहे.

संदर्भ ग्रंथ :-

१. भारताची विदेशी निती - प्रा. श्रीकांत वि. देशपांडे
प्रकाशक — श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

२. प्रचलित विदेश निती - प्रा. दि. वा. इंदापवार
प्रकाशक — श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

३. आंतरराष्ट्रीय संबंध - डॉ. शैलेंद्र देवळाणकर
प्रकाशक - विद्या प्रकाशन — औरंगाबाद.

४. स्वतंत्र भारताचा इतिहास १९४७ ते १९८० - डॉ. श.गो. कोलाटकर
प्रकाशक — श्री मंगेश प्रकाशन — नागपूर.

 ISSN 2231 4342

लोकसाहित्य् आणि माहिती तंत्रज्ञान

प्रा. डॉ. गजानन पांडुरंग जाधव
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
लोकसेवा एज्युकेशन सोसायटीचे,
कला व विज्ञान महाविद्यालय गारखेडा परिसर
औरंगाबाद.
मो.8275946866
Email. gajananpjadhav@gmail.com

सारांश :

लोकसाहित्य् हे लोकांचे, लोकांनी आणि लोकांसाठी निर्मिलेले साहित्य् असते. लोककथा, लोकगीतांची परंपरा नेमकी कधी सुरू झाली हे सांगणे कठीण आहे. तरी पण प्राचीन काळापासून लोककथा, लोकगीतांची परंपरा सुरू असावी. मानवी जीवनामध्ये लोकमानस, लोकविचार, लोकरूढी, कल्पनावैभव, लोकपंरपरा यावर श्रद्धा ठेवून समाजजीवन चालते. जीवन जगण्याच्या संस्कारामध्ये लोकसंस्कृतीचे चित्रण लोकगीत, लोककथांमधून आलेले दिसते. लोकगीते आणि लोककथांमधून भावोत्कटतेबरोबरच मानवी जीवनातील अनेक घटना-प्रसंगांचे हृदयस्पर्शी चित्रण झालेले असते. काळाच्या ओघात लोकगीत आणि लोकसंगीत हे अनेक बदल पचवीत नवीन रूप घेत टिकून असते. माहिती तंत्रज्ञानाच्या आगमनामुळे लोकगीत आणि लोककथांचे स्वरूप बदलून गेले आहे. त्याचा वेध घेण्याचा प्रयत्न् प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

……….

लोकसाहित्य् म्हणजे 'लोकां'च्या बहुआयामी प्रतिभेचा सार असतो. लोक अभिव्य्क्तीचे मौखिक रूप लोकसाहित्यात पाहायला मिळते. ही अभिव्यक्ती म्हणजे लोकांच्या अनुभवाचे सारतत्त्व् असते. लोकांच्या उत्स्व, यात्रा, सण, संस्कारविधी, श्रमपरिहार तसेच बालसंस्काराशी संबंधीत लोकगीत, लोककथा लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या आहेत. एकूण लोकसाहित्याच्या व्याप्तीचा विचार केला तर श्याम परमार यांची व्याख्या या ठिकाणी उद्द्धत करणे आवश्यक ठरेल. "आधुनिक साहित्य् की नवीन प्रवृत्तियों में लोक का प्रयोग गीत, वार्ता, कथा, संगीत, साहित्य् आदि से युक्त होकर साधारण जन समाज, जिसमें पूर्व संचित परंपराएँ, भावनाएँ, विश्वास और आदर्श सुरक्षित है तथा जिसमें भाषा और साहित्य्गत सामग्री ही नही, अपितु अनेक विषयों के अनगढ किंतु ठोस रत्न् छिपे है, के अर्थ में होता है."1 लोकसाहित्य् हे एकूणच मानवी जीवनाशी किती एकरूप आहे याची कल्पना आपण करू शकतो. लोकसाहित्याचा जसा विविध ज्ञानशाखांशी संबंध असतो. माहिती तंत्रज्ञानाची ज्ञानशाखाही त्याला अपवाद ठरत नाही. कारण लोकसाहित्य् हे जरी परंपरागत मूल्यांचे वाहक असले तरी लोकमानस काळानुरूप परिवर्तन आत्मसात करतात.

माहिती तंत्रज्ञानाने विश्वातील मानव जातीला एकमेकांच्या अत्यंत निकट आणले आहे. एवढेच नाही तर वैश्विक खेड्र्याची संकल्पना मांडली गेली. माहिती तंत्रज्ञानामुळे भौगोलिक अंतरही नाहीसे झाले. जगातील कोणताही माणूस जगभरातील लोकसाहित्याचा उद्देश्य् लोकरंजन आणि लोकमंगल हा असतो. तर तंत्रज्ञान म्हणजे वैज्ञानिक सिद्धांताचा व्यवहारात वापर करणे होय. म्हणजेचा विज्ञानाच्या सूत्रांचा दैनंदिन जीवनात उपयोग करणे होय. याच अनुषंगाने विचार केला तर तंत्रज्ञानदेखील लोकरंजन आणि लोकमंगल कार्य करते. जसे की रेडिओ, टीव्ही, संगणक, मोबाईल आदींच्या साह्याने कोणत्याही ठिकाणी आणि कधीही मनोरंजनाबरोबरच माहिती मिळते. माहिती आणि तंत्रज्ञान (आईसीटी) कृषि पद्धती, सामाजिक पायाभूत (शिक्षण, आरोग्य् आदी) उदयोन्मुख ज्ञान आधारित समाजनिर्मितीसाठी ग्रामीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. कृषि, पशुपालन, शिक्षण, आरोग्य् यासारख्या विषयांमध्ये लोकजागृती करण्यासाठी लोकसाहित्याचा उपयोग केला जात आहे.

असे ना. गो. नांदापूरकर यांनी म्हटले आहे की, “लोकवाङमय म्हणजे माझ्या दृष्टीने तरी लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त् झालेले जे वाङ्मय आहे तेच होय. याचा कर्ता अर्थात अज्ञात अशी लोकसमाजातील व्यक्ती असते. यास्तव लोकांनी केलेले लोकभाषेत केलेले आणि लोकांच्या परंपरेबरोबर चालत आलेले वाङ्मय होय.”2 या व्याख्येचा विचार केल्यास लोकपरंपरेने आलेले वाङमय जतन करण्यासाठी आज माहिती तंत्रज्ञान वरदान ठरले आहे. विशेषत: लोकगीत, लोककथा आणि लोकसंगीताचा माहिती, मनोरंजन आणि प्रबोधनात मोठ्र्याप्रमाणावर भूमिका बजावतात. पारंपरिक लोकगीत, लोककथा आणि लोकसंगीत यांचे पूर्वी विधिप्रसंगीच प्रयोग होत असत. आजी-आजोबा किंवा कुटुंबातील वडीलधारी मंडळी लहान मुलांना संस्कारक्षम लोकगीत आणि लोककथा सांगायचे. मौखिक किंवा लिखित परंपरेने लोकगीत, लोककथा लोकजीवनात निरंतर अस्तित्वात राहिल्या. पण आता पारंपरिक लोकगीते आणि लोककथा लोकजीवनाबरोबरच इंटरनेटवर, सोशल मीडियावरही सहजपणे उपलब्ध् होतात. मौखिक किंवा लिखित परंपरेने लोकगीत, लोककथा लोकजीवनात निरंतर अस्तित्वात राहिल्या. पण आता पारंपरिक लोकगीते आणि लोककथा अलीकडच्या पिढीला इंटरनेटवर डिजीटल रूपात सहजपणे उपलब्ध् होतात. पारंपरिक म्हणी, वाक्प्रचार, लोकोक्ती, लोकगीत यांना आधुनिकतेचा तडका देऊन ते व्हाटसअप, फेसबूक आदी सोशल मीडियावर प्रसारित केले जात आहे.

बहु-माध्यम (मल्टी-मीडिया)च्या माध्यमातून जास्तीत जास्त् चित्र व चल-चित्रांचा उपयोग करून लोकगीतांना अधिक आकर्षक रूप दिले जात आहे. वेबपेजच्या साहयाने इंटरनेटवर त्याचा मोठा प्रसार केला जातो. लोककथा, लोकगीत आणि एकूण लोकसंगीताच्या दृष्टीने विचार केला तर या सगळ्र यांना पारंपरिक वाद्यांबरोबरच आधुनिक वाद्यांचीही जोड मिळत आहे. पाश्चात वाद्य आणि भारतीय लोककलेचे फयूजन केले जात आहे.

लोकगीतांची ताल आणि लय सर्वांना खूपच आकर्षक करीत असते. अगदी लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत लोकगीत, लोकसंगीताचा ठेका धरतात. नैसर्गिक सुरावटींनी समृद्ध् हा ठेवा अनमोल आहे. आजवर मौखिक परंपरा आणि लिखित परंपरेने लोकसाहित्याचे संवर्धन होत आले आहे. मात्र आता माहिती

ISSN 2231 4342

तंत्रज्ञानामुळे लोकगीत-संगीताचे जतन सीडी, डीव्हीडीच्या माध्यमातून दृक-श्राव्य् स्वरूपात केले जात आहे. लोकसाहित्याच्या प्रयोगात विधी महत्त्वाचे असत. मात्र सोशल मीडियाचे आगमन झाले आणि लोकसाहित्याचेही स्वरूप बदलून गेलेले दिसते. सोशल मीडियाद्वारे लोकगीत, संगीताला एकाचवेळी जगभरातील श्रोता-प्रेक्षक वर्ग लाभत आहे. त्यांची संख्याही प्रचंड असते. व्यावसायिक लाभासाठी सवंग लोकप्रियता टाळली तर लोकसाहित्यासाठी माहिती तंत्रज्ञान हे फार उपकारक ठरू शकते.

निष्कर्ष :

वरीलप्रकारे लोकसाहित्य् आणि माहिती तंत्रज्ञान शाखेचा अनुबंध तपासला असता हे दोन्ही परस्परांसाठी पूरक आहेत. या मांडणीतून काही ठळक निष्कर्ष असे सांगता येतील-

1. लोकसाहित्य् हे एकूणच मानवी जीवनाशी किती एकरूप आहे.
2. माहिती तंत्रज्ञानाने विश्वातील मानव जातीला एकमेकांच्या अत्यंत निकट आणले आहे.
3. लोकसाहित्याचा माहिती तंत्रज्ञानाची ज्ञानशाखेशीही संबंध येतो.
4. लोकसाहित्य् हे जरी परंपरागत मूल्यांचे वाहक असले तरी लोकमानस काळानुरूप परिवर्तन आत्मसात करते.
5. माहिती तंत्रज्ञानामुळे लोकगीत-संगीताचे जतन सीडी, डीव्हीडीच्या माध्यमातून दृक-श्राव्य् स्वरूपात केले जात आहे.
6. सोशल मीडियाद्वारे लोकगीत, संगीताला एकाचवेळी जगभरातील श्रोता-प्रेक्षक वर्ग लाभत आहे.

संदर्भ सूची

1. श्याम परमार, भारतीय लोकसाहित्य्, पृ. 9
2. डॉ. मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद. पाचवी आवृत्ती 2009, पृ. 228

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

भारंबा येथील मुर्तीशिल्प

डॉ. नम्रता दिलीप भोसले
औरंगाबाद.
मो. 9130669179

प्रस्तावना :

सहाव्या शतकामध्ये वराहमिहीर यांनी 'बृहसंहीतेची' रचना केली. या ग्रंथामध्ये प्रतिमाचे विवरण चार अध्यायांमध्ये केलेले आहे. त्यामध्ये राम तसेच कृष्ण देवी-देवता सुर्याचा परिवार, शिव आणि बुद्ध यांच्या प्रतिमा निर्मितीचा उल्लेख केलेला आहे. सुत्रग्रंथामध्ये काही ठिकाणच्या प्रतिमा-पुजेच्या उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये विष्णु, महापुरूष विनायक, गणेश आणि यम यांची नावे मिळातात. मुर्तीशास्त्राची माहिती पुराण, आगम तसेच साहित्यातून होते सर्व पुराणांमध्ये प्राचीन मस्यपुराण असून त्यामध्ये मुर्ती विज्ञानाची चर्चा केलेली आहे. त्यामधील दहा अध्यायांमध्ये मुर्त्यांची बनावट आणि मापे यांचे वर्णन केलेले आहे. त्यामधील दहा अध्यायामध्ये मुर्त्यांची बनावट आणि मापे यांचे वर्णन केलेले आहे.

भारतीय मनाची पकड सुंदर कलाकृतींनी घेतली यांचे कारण फक्त त्यांचे कलेबद्दलचे प्रेम नसून या देशाची अध्यात्मिक विचार परंपरा हे आहे. भारतीय विचारधारेप्रमाणे उपासनेचे लक्ष निर्गुन परब्रम्हाशी एकात्मक संबंध स्थापन करणे हे आहे.

सगुण उपासना ही निर्गुणापर्यंत जाण्याची पायरी आहे. सगुण उपासनेचे प्रतिक मुर्ती हे होय. त्यामुळे मुर्ती विज्ञानाला व्यापकता मिळाली व ते भारतीय जनजीवनाचे अभिन्न अंग झाले.[1] भारतात निव्वळ पुजा म्हणून मुर्तीची प्रतिष्ठपना केलेली नसून या मुर्तीच्या नेमक्या शब्दात सांगायचे तर प्रतिमांच्या अनुषंगाने त्यांचे स्वातंत्र्य शास्त्र व विज्ञानही विकसित केले आहे. भारतीय कला, संस्कृती, इतिहास, धर्म यातील कसलाही विचार या प्रतिमाशास्त्रांच्या अभ्यासाविना अपूर्ण असतो. त्या-त्या भागातील सांस्कृतिक चहल-पहल, परकियांची आक्रमणे यांचाही परिणाम देव संकल्पनावर होत असतो. अनेक देवांच्या रूपात जसा आदिम अनागर संस्कृतीतील देवप्रतिमांच्या संकर झालेला दिसतो तसाच परकीय प्रतिमांचाही प्रभाव आढळतो. अर्थातच इथल्या मातीत त्या साऱ्या संकल्पना रूजल्या आणि त्यातुनच नव्या प्रतिमा आकाराला आल्या.[2]

मुर्तीशिल्पातील विविध अंगे त्यातील बारकावे यावरून त्या-त्या कालखंडातील सामाजिक, राजकीय, धार्मिक स्थितिचे आकलन होण्यास मदत होते. त्यामुळे इतिहासामध्ये मुर्तीशिल्पाचे स्थान महत्त्वाचे ठरते.

कन्नड तालुक्यातील भारंबा या गावी गावातुन वाहणाऱ्या गांधारी नदीच्या काठावर ग्रामस्थांना विष्णु मर्ती, उमामहेश्वर महिषासुर मर्दिनी असे देवी-देवतांचे अनेक मुर्तीशिल्प सापडले.

हे सर्व मुर्तीशिल्प गावातील मारोतीच्या मंदिरात एका भिंतीला उभे करून ठेवण्यात आलेले असून या सर्व मुर्तीशिल्पांना शेंदूर लावण्यात आलेला आहे. त्यामुळे त्या-त्या मुर्ती शिल्पातील बारकावे स्पष्टपणे दिसून

 ISSN 2231 4342

येत नाही. तरीही मुर्तीशिल्प काही चांगल्या अवस्थेत असल्यामुळे ते मुर्तीशिल्प कुठल्या प्रकारचे व कुणाचे आहेत हे समजते.

विष्णुमुर्ती :

विष्णुच्या सर्वसाधारण मुर्ती चतुर्भूज असतात. या रूपाची व त्यांच्या आयुधक्रमाची माहिती अग्निपुराण, पद्मपुराण स्कंन्दपुराण व बृहतसंहीता स्मृती या प्राचीन ग्रंथात जशी येते तशीच मध्ययुगीन इ.सनाच्या 12 ते 16 व्या शतकातील अपराजितपृच्छा 'अभिलाषितार्थ' चिंतामणी, चतुवर्ण: चिंतामणी व रूपमंडन इ. ग्रंथात येते. या ग्रंथाच्या आधारे मुर्ती साकारण्यात आल्या.[3] कन्नड तालुक्यातील पिशोर व भारंबा या गावी विष्णुच्या पाच मुर्तीशिल्प आढळून आले आहेत. त्यांच्या आयुधांचा-पद्म, शंख, चक्र, गदा असा क्रम आढळून आलेला आहे. चतुभुर्ज मुर्तीच्या खालील उजव्या हातात पद्म व वरील उजव्या हातात शंख तर वरील डाव्या हातात चक्र व खालील हातात गदा ससा या मुर्तीचा क्रम आढळून येतो.

1.**विष्णु :**

येथील विष्णुच्या मुर्तीची लांबीxरूंदी एकूण 39.17 से.मी. x1.1 इतकी आहे. ह्या मुर्तीचे स्वरूप चतुर्भूज आहे. मुर्तीच्या हात हा खंडीत झालेला आहे व मुर्ती ही वनमालाधारी आहे. दुसऱ्या उजव्या हातात खालच्या बाजुने गदा आहे. ह्या मुर्तीतील अस्पष्टरित्या मुर्तीची प्रभावक कर्णकुंडले, अंगवस्त्र अतिशय सुंदर रेखाटलेले आहेत. गरूडमुर्ती गुडघ्यावर बसलेल्या अवस्थेत नमन करताना दिसते.

2. **विष्णुमुर्ती :**

ही विष्णुची मुर्ती मुर्तीशिल्पाच्या रांगेमध्ये चौथ्या क्रमांकावर ठेवलेली असून ह्या मुर्तीची लांबी 30.16 से.मी. रूंदी 7.4 से.मी. आहे. ही मुर्ती वनमालाधारी आहे. विष्णुच्या हातात उजव्या बाजुने गदा आणि पद्म आहे तर डाव्या बाजुने हातात शंख आहे. विष्णुच्या उजव्या पायाजवळ एक मानवी आकृती आहे, परंतु ती स्त्री की पुरूष ते समजत नाही. ह्या मुर्तीशिल्पामध्ये मुर्तीला कटीवस्त्र असल्याचे दृष्टिस पडते. वैजयंतीमाला पोटाला, उदरबंद, कमरेस, मेखला इ. अलंकार आढळतात.

3. **विष्णुमुर्ती :**

हे मुर्तीशिल्प पाचव्या क्रमांकावर ठेवण्यात आलेले असून ह्या मुर्तीची लांबी 32.14 से.मी. तर रूंदी 7.5 से.मी. आहे. ह्या मुर्तीने किरीट मुकूट धारण केलेला असून कानात कुंडले आहेत. ह्या मुर्तीच्या उजव्या हातामध्ये शंख आहे. डाव्या बाजूच्या वरच्या हातात पद्म तर खालच्या हातात गदा स्पष्ट दिसते. ही विष्णुची मुर्ती चतुर्भूज आहे. ह्या मुर्तीशिल्पामध्ये वनमाला, पोटाला उदरबंद, कमरेला मेखला आहे. तसेच विष्णुची उजव्या बाजुने पायाजवळ हात जोडून मानव रूपातील गरूड बसलेला आहे.

4. **विष्णुमर्ती :**

ह्या शिल्पाची लांबी x रूंदी 23.5x12.5 सेमी आहे. हे विष्णुचे मुर्तीशिल्प बाकीच्या विष्णुच्या मुर्तीशिल्पामध्ये अतिशय साध्या अवस्थेत असलेले आढळते. ह्या मुर्तीशिल्पामध्ये विष्णुने वैजंयती माला धारण

ISSN 2231 4342

केलेली असून चतुर्भूज व उभ्या अवस्थेत असल्यामुळे ती विष्णुचीच आहे हे समजते. ही मुर्ती वनमाला विरहीत आहे, उजव्या हातात चक्र आहे व डाव्या हातात शंख व गदा आहे.

5. विष्णुमुर्ती :

हे विष्णुचे मुर्तीशिल्प रांगेतील नवव्या क्रमांकावर आहे. सर्व मुर्तीशिल्पामध्ये ह्या शिल्पाची लांबी जास्त आहे. या शिल्पाची लांबीxरूंदी एकूण 43.20x5.10 से.मी. आहे. हे मुर्तीशिल्प बाकी मुर्तीशिल्पापेक्षा स्पष्ट दिसते. ही मुर्ती देखील चतुर्भूज आहे व वनमालाधारी आहे. डोक्यावर किरीट मुकूट असून कानामध्ये कुंडले आहेत. दंडावर केयुर, हातात कंकण, गळयात अशी बारीक नक्षीकाम असलेली मेखला आहे. मुर्तीच्या डाव्या बाजुला छोट्या आकारात लक्ष्मी व उजव्या बाजुने मनुष्यरूपी गरूड हात जोडून उभे आहेत.

शेषयायी विष्णुमुर्ती :

शेषयायी हा विष्णुमर्तीचा शयनावस्थेत मोडणारा प्रकार आहे. वायुपुराणात ह्या काळाला एकर्वण स्थिती अथवा जलप्रलयाची स्थिती असे म्हटले आहे. विष्णु मुर्तीच्या या प्रकारास शेषशायिनी, अनंतशायिनी, जलशायिनी इ. नावाने सुद्धा ओळखतात. गुप्तकाळापासून अशा प्रतिमा आढळतात. या काळातील शेषयायी विष्णुचा उत्कृष्ठ नमुना देवगड येथे आहे.[4] कन्नड तालुक्यातील पिशोर येथील सिद्धेश्वर मंदिरात शेषयायी विष्णुचे मुर्ती शिल्प आहे. एका अखंड पाषाणामध्ये शेषयायी विष्णुची प्रतिमा आहे. ही मुर्ती शयन चतुर्भूज मुर्ती असून त्याची आयुधे, पद्म, शंख, चक्र, गदा आहेत. विष्णुच्या वरील डाव्या हातात चक्र आहे. व डाव्या हाताजवळ खाली शंख आहे. डोक्यावर किरीट मुकूट, कानात मस्त्यकुंडल, दंडात केयुर, हातात कंकण, गळयात लांब अशी वैजयंतीमाला, कमरेवर मेखला, पायात तोडे आहेत. विष्णुच्या पायाजवळ लक्ष्मी आसनस्थ असून त्याच्या उजव्या पायांचे संवाहन करता आहे. लक्ष्मीची केशरचना चक्राकार असून कानात कुंडले, गळयात हार, केयुर, कंकण, मेखला आदी आभुषणे आहेत. लक्ष्मीच्या बाजुला गरूड हात जोडून उभा आहे. विष्णु शेषावर शयन करत आहे. त्या शेषाचे पाच आडवे वेटोळे असून सहावा वेटोळा हाताजवळ आहे. विष्णुच्या डोक्यावर शेषाचे सात फणे आहेत.

अशा प्रकारच्या विष्णुचे मुर्तीशिल्प हे भारंबा व पिशोर येथील मंदिरात स्थित आहेत.

उमामहेश्वर (शिवपार्वती) :

उत्तर भारतातील मूर्ती शिव पार्वतीच्या असून मुर्तीत उमामहेश्वर प्रतिमेचा सर्वाधिक प्रसार झालेला दिसतो. ‘मस्यपुराण’, ‘अपराजितपृच्छा’, ‘देवतामुर्ती’ प्रकरण ग्रंथामध्ये उमामहेश्वराचे वर्णन मिळते. सरस्वरांना अलिंगन देत एकाच आसनावर बसलेल्या शिवपार्वती प्रतिमेला साधारणपणे उमामेश्वर म्हणून ओळखतात. शिव आणि पार्वती यांच्या पायाखाली त्यांची वाहने दाखवितात व रूची आणि जागेप्रमाणे गणपती, स्कंद, शिवगण, हडकुळा भुंगरिटी परिवार देवांच्या रूपाने दाखविलेला असतो.[5] या उमामहेश्वर (शिवपार्वती) हे मुर्ती शिल्पही भारंबा या गावी मिळाले आहे.

ISSN 2231 4342

उमामहेश्वर :

ह्या मुर्तीची लांबीxरूंदी एकूण 36.20 से.मी. x1.2 इतकी आहे. या शिल्पामध्ये शिव आसनस्थ असून उमा त्यांच्या डाव्या मांडीवर बसलेली दिसते शिवाच्या मुकूटामध्ये खालच्या थरावर कवट्यांची माळ आहे. या मुर्तीशिल्पात शिवाच्या प्रतिमेच्या पार्वतीची प्रतिमा फारच छोटी आहे. या मुर्तीमध्ये शंकर हे चतुर्भूज रूप दाखविण्यात आलेले आहे. त्यांच्या हातात त्रिशुल व साप तसेच कमळ आहे. डावी मांडी घालुन ललीता सनात बसलेला आहे व डाव्या हाताने पार्वतीला अलिंगन देत आहे. हे शिल्प एका मानवी प्रतिमेवर आसनस्थ आहे.

2. **उमा महेश्वर :**

मंदिरामध्ये ठेवलेल्या रांगेतील ही तिसऱ्या क्रमांकाची मूर्ती आहे. ह्या मुर्तीची लांबी 28.18 से.मी. तर रूंदी ही 1.3 से.मी. आहे. ह्या मुर्तीशिल्पामध्ये पहिल्या शिल्पापेक्षा शिव आणि पार्वती यांची उंची समप्रमाणात असल्याचे दिसते. शंकराच्या डाव्या मांडीवर पार्वती ही आसनस्थ आहे. पार्वती व शंकर दोघांनीही जटामुकूट परिधान केलेले आहेत. शंकराची ही मुर्ती देखील चतुर्भूज आहे. उजव्या हातात त्रिशुल, डमरू व डाव्या हाताची झीज झाल्यामुळे ते दिसत नाही. ह्या मुर्तीमध्ये शिवगण हा शंकराच्या पायथ्याशी बसलेला असून त्याने शंकराच्या डाव्या मांडीचा भारत स्वत:चा हातावर धरलेल्या अवस्थेत दाखविलेला आहे. हे मुर्तीशिल्प अतिशय सुंदर रेखाटण्यात आले आहे.

3. **उमामहेश्वर :**

हे उमा महेश्वराचे शिल्प सहाव्या क्रमांकावर ठेवण्यात आले आहे. ह्या मुर्तीची लांबी 28.18 से.मी. असून रूंदी 1.6 से.मी. आहे. ह्या मुर्तीशिल्पामध्ये देखील पार्वती शिवाच्या मांडीवर बसलेली आहे. शिवाचा जटामुकूट आहे व शिवाच्या गळयात उदरबंद आहे व पार्वतीच्या गळयात देखील अलंकार आहेत.

महिषासुरमर्दिनी मुर्तीशिल्प :

महिषासुरमर्दिनीने महिषासुराच्या नाश केला. ही देवी चतुर्भूज किंवा अष्टभुज असते. तिच्या हातात त्रिशुल, खोटक, धनुष्यबाण, शक्ती इ. आयुद्ये असतात.[6] भारंबा या गावी सापडलेले महिषासुर मर्दिनीचे हे शिल्प 3.16 से.मी. लांब व 1.4 रूंद आहे. ही मुर्ती चतुर्भूज देवीच्या खालील दोन्ही भागात त्रिशुल धरलेला असून ती महिषासुरास मारत आहे. त्याच्या पोटात त्रिशुल घालतानाचे हे दृष्य आहे व उजवा हात जीर्ण होऊन खंडीत झाल्यामुळे दिसत नाही. देवीच्या अंगावर कटीवस्त्र परिधान केलेले दाखविलेले आहे व गळयात माळा आहेत. देवीच्या मस्तकामागे प्रभावलय आहे.

 ISSN 2231 4342

निष्कर्ष / समारोप :

कन्नड तालुक्यातील भारंबा, पिशोर या गावी फार वर्षापुर्वी नदीच्या किनाऱ्यांवर सापडलेल्या ह्या देवी-देवतांचे मुर्तीशिल्प सध्या गावातील मारोतीच्या मंदिरात ठेवण्यात आलेले आहे. त्यामध्ये विष्णु, उमामहेश्वर, महिषासुर मर्दिनी, गणेश, पार्वती, शेषशायी विष्णु, नागदेवता, वीरगळ समुद्रमंथन इ. मुर्तीशिल्प हे दुर्लेक्षित अवस्थेत ठेवलेले आढळतात. व तसेच त्या मुर्तीशिल्पांना मोठ्या प्रमाणात शेंदुर लावल्यामुळे त्या मुर्ती शिल्पातील बारकावे, सुक्ष्मकलाकृती व त्यांचे मूळ सौदर्यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहेत. त्यामुळे हा इतिहासाच्या दृष्टिने महत्त्वाचा असणारा ऐतिहासिक ठेवा जपणे आवश्यक आहे.

संदर्भ यादी :

1. देगुलकर गो.ब. 'बिंबब्रम्ह आणि वस्तुब्रम्ह', विदर्भ संशोधन मंडळ नागपूर, 1997 पृ. 7.
2. डॉ. जोशी नी.पु. 'भारतीय मुर्तीशास्त्र' अ.रा. कुलकर्णी नियंत्रक प्रकाशक समिती, म.वि.ग्र.नि. मंडळ, पुणे – 301979 पृ. 12.
3. डॉ. उपाध्याय, वासुदेव, 'प्राचीन भारतीय मुर्तीविज्ञान', चौखम्बा सुरभारती प्रकाशन, के 037/117, गोपाल मंदिर, वाराणसी, पृ. 197.
4. डॉ. जोशी नी.पु. 'भारतीय मुर्तीशास्त्र' अ.रा. कुलकर्णी नियत्रंक प्रकाशक समिती, म.वि.ग्र.नि. मंडळ, पुणे – 30, 1979 पृ. 12
5. त्रिलोकेकर पुष्पा, 'देवांची जन्मकथा', विद्या प्रकाशन, 250 क/16, शनिवार पेठ पुणे, पृ. 5.
6. डॉ. पाटील माया, 'मंदिर शिल्पे', कथाली प्रकाशन माटूंगा (पं.) मुंबई, 16 एप्रिल 2014, पृ. 47.

कोरोना नंतरचे पर्यटन विश्व : एक अभ्यास

डॉ. डी. डी. कोल्हेकर
इतिहास विभाग प्रमुख
कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर
महाविद्यालय,उमरी. जि.नांदेड.
मो. नं. 9923359517
Email: dattakolhekar@gmail.com

प्रस्तावना :-

पर्यटनाला मानवी जीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. अगदी प्राचीन काळापासून ते आजच्या विज्ञान युगापर्यंत पर्यटनाला तेवढेच महत्त्व आहे. नव्हे आता अनेक सोयी आणि सुविधेमुळे अधिक महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसते. प्रारंभीचा पर्यटनाविषयीचा दृष्टीकोण बदललेला आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे व गरजेनुसार पर्यटनाचे स्वरूप बदलून ते व्यावसायिक बनलेले आहे पर्यटन हा सुंदर व किफायतशीर व्यवसाय बनलेला आहे आधुनिक सुबत्तेमुळे दळणवळणाच्या साधनांत मोठी उपलब्धता झालेली आहे. पर्यटनाकडे केवळ व्यवसायाच्या दृष्टीने पाहता कामा नये तर पर्यटनामुळे मानवाच्या विचार, आकलन, स्मरणशक्ती व दूरदृष्टीच्या कक्षा रुंदावतात सहाजिकच ज्ञानात भर पडते पर्यटनामुळे जागतिक संबंध व अनेक गोष्टींची देवाण घेवाण होण्यास मदत होते आहे. अशा अनेक गोष्टी लक्षात घेऊन युनोने 27 सप्टेंबर 1980 रोजी जागतिक पर्यटन दिन सुरू केलेला आहे. त्यामुळे तर पर्यटनाला अधिकच महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसते. कांही तज्ञांच्या मते प्रत्येक दहा माणसाच्या मागे एक व्यक्ती पर्यटक असतो जागतिक आकडेवारीनुसार 11 दशलक्ष पर्यटक भारतात दर वर्षी येत असतात व 24 दशलक्ष पर्यटक भारताबाहेर जातात. उद्देश मग कोणताही असो एवढा मोठा प्रचंड प्रतिसाद पर्यटनाला आहे. दुर्दैवाने 2020 हे वर्ष पर्यटनाच्यादृष्टीने अत्यंत वाईट ठरते कारण कोविड 19 मुळे हा व्यवसाय ठप्प झाला. जागतिक नाकेबंदी झाली. कोरोना या महामारीला रोखण्यासाठी वाहतूक व्यवस्था बंद करण्यात आली. परंतु या महामारीमुळे संपूर्ण जगातील मानवी जीवनावरच मोठा परिणाम झाला येथे आपणाला कोरोना महामारीमुळे पर्यटन व्यवसायावर कोणकोणते गंभीर परिणाम झाले व गोरगरिबावर कशी उपासमारीची पाळी आली या अनुषंगाने या शोधनिबंधाच्या माध्यमातून प्रकाश टाकण्याचा अल्पसा प्रयत्न करण्यात आलेला आहे

पर्यटन म्हणजे काय:-

पर्यटना विषयी अनेक तज्ञांनी अनेक प्रकारच्या व्याख्या केलेल्या आहेत त्यामुळे येथे अधिकचा वेळ न घेता थोडक्यात व सर्वमान्य व्याख्या सांगतो. मानवाने धकाधकीच्या जीवनातून थोडी मन शांतीघेण्यासाठी वा एखाद्या शोधासाठी ज्ञानासाठी आपला वेळ काढून एखाद्या स्थळी भेट देऊन घालवलेला वेळ

 ISSN 2231 4342

म्हणजे पर्यटन होय. त्यामुळे त्या जिवास मनशांती आनंद विरंगुळा मिळतो मग ते पर्यटन ऐतिहासिक स्थळांना भेटी देणे असो किंवा धार्मिक शैक्षणिक व्यवसायिक कृषी इत्यादी त्यास पर्यटन असे म्हणतात.

पर्यटन दिन :-

प्रारंभीचे पर्यटनाचे स्वरूप बदललेले आहे व्यवसायाबरोबरच फार मोठा आर्थिक लाभ व परकीय चलन प्रत्येक देशाला मिळू लागलेले आहे म्हणून युनोने 27 सप्टेंबर 1980 रोजी 27 सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन दिन म्हणून घोषित केलेले आहे व '**पर्यटन ग्रामीण संस्कृती**' हे आपले घोषवाक्य बनवलेले आहे. पर्यटनाला जागतिक पातळीवर अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

उद्देश :-

पर्यटन हा संशोधनाचा चांगला विषय बनला आहे. पूर्वीपेक्षा पर्यटनाकडे लोकांचा पाहण्याचा कलही बदललेला आहे. जागतिक पर्यटन व देश पर्यटन असे दोन पर्यटनाचे भाग पडतात. देशांतर्गत पर्यटन जेंव्हा होते तेंव्हा देशाचा भूभाग व त्याच्या प्रदेशात असणारी पर्यटन स्थळे आणि अशा स्थळांना भेटी देणे त्यामागचा उद्देश हा ऐतिहासिक शैक्षणिक करमणूक स्थापत्य संस्कृती जाणून घेणे असो वा व्यापार उद्योग देव देवतांचे दर्शन घेणे असो अशाप्रकारे अनेक उद्देश समोर ठेवून पर्यटन केले जाते पर्यटन हे अनुउत्पादकतेशी जरी निगडीत असले तरी त्यांचा देशाच्या उत्पन्नामध्ये हातभार लावण्यासाठी मोठी मदत होते. हे आपणाला मान्यच करावे लागेल परंतु कोरोना सारख्या महामारी मुळे पर्यटन क्षेत्राला मोठा फटका बसलेला आहे. म्हणून त्यास सावरण्यासाठी कोण कोणत्या उपाय योजना करता येतील हा उद्देश समोर ठेवून हा शोध निबंध लिहिलेला आहे.

संशोधनाचे महत्त्व :-

कोरोना सारख्या महामारी मुळे पर्यटनावर फार मोठा परिणाम झालेला आहे कोरोनाच्या भितीमुळे लोकात पर्यटना पेक्षा आपला जीव महत्त्वाचा आहे अशी त्यांची धारणा बनलेली आहे. म्हणून हळूहळू कोरोनाचे सावट दूर होण्यासाठी च्या शासनाच्या उपाय योजना लोकांना समजावून सांगणे व पर्यटकांना पुन्हा एकदा पर्यटनाकडे आकर्षित करणे गरजेचे आहे त्या अनुषंगाने हा एक छोटासा प्रयत्न मी येथे केलेला आहे.

विषयाची व्याप्ती :-

कोरोना या महामारीने संपूर्ण जगाला हादरून सोडलेले आहे. त्यामुळे ह्या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे संशोधनाच्या कांही मर्यादा असल्यामुळे या शोधनिबंधाच्या विषयाची व्याप्ती पर्यटन व्यवसायावर झालेले परिणाम एवढीच मर्यादित स्वरूपाची घेतलेली आहे. व कांही उपाय योजना सांगण्याचा या ठिकाणी प्रयत्न केल्या गेला आहे.

संशोधन पद्धती :-

या संशोधनासाठी उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे त्याच बरोबर रेडिओ व इंटरनेट सेवेचा ही आधार घेण्यात आलेला असून या शोध निबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

पर्यटनाचे प्रकार :-

 ISSN 2231 4342

पर्यटनाचे विविध प्रकार आहेत प्रामुख्याने धार्मिक पर्यटन, ऐतिहासिकपर्यटन, कृषी पर्यटन, शैक्षणिक पर्यटन, संस्कृती,व्यापार उद्योग, वनपर्यटन आणि समुद्र पर्यटन इत्यादी जागतिक पर्यटन व देशांतर्गत पर्यटन.

कोरोना महामारी व पर्यटन :-

कोरोना महामारीने जगात हाहाकार उडवून दिला. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राने आपले दरवाजे बंद करून घेतले. मानवी जीवनाच्या अस्तित्वालाच कोरोना महामारीने मोठे आव्हान दिले. म्हणून प्रत्येक राष्ट्राला हा निर्णय घ्यावा लागला सहाजिकच याचा परिणाम पर्यटन क्षेत्रावरही झाला. जान है तो जहाँन है या उक्ती प्रमाणे प्रथम जीव महत्त्वाचा आहे. कोरोनामुळे संपूर्ण जीवनमानच विस्कळीत झाले या वातावरणाचा परिणाम सर्वच क्षेत्राला झाला. म्हणून पर्यटन क्षेत्र त्याला अपुवाद ठरू नये. प्रचंड मोठ्या प्रमाणात या क्षेत्राला फटका बसलेला आहे. जगातील कांही देशांची अर्थव्यवस्थाच पर्यटनावर आधारित आहे अशा राष्ट्रांना सर्वाधिक झळा सोसाव्या लागत आहेत. फार मोठे नुकसान या महामारीमुळे झालेले आहे. कांही देश अधिकच प्रभावित झालेले आहेत कारण त्यांची अर्थव्यवस्थाच पर्यटनावर आधारित आहे. मागील वर्षी या क्षेत्राने 9.3% जी.डी. पी. जागतिक अर्थव्यवस्थेला दिलेला होता. यावर्षी त्यांची घसरण झालेली आहे. पर्यटनावर आधारित असणारे अनेक व्यवसाय उद्योगांचे मोठे नुकसान झाले आहे. या व्यावसायिकांना आपली घडी नीट करण्यासाठी पुढे कमीत कमी तीन ते चार वर्ष तरी लागतील. कोरोना विषयी लोकांच्या मनात भीती निर्माण झाल्यामुळे लोक पर्यटनासाठी लवकर घराबाहेर पडणार नाहीत असे वाटते म्हणून सर्वात अधिक नुकसान पर्यटनाचे झालेले आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये.

आव्हान :-

कोरोना सारखी महामारी पसरू नये म्हणून जागतिक पातळीवरून आव्हान करण्यात आलेले आहे की या महामारी मुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत मंग वाहतूक असेल हॉटेल्स असतील अशा अनेक सोयी सुविधा पर्यटकांना उपलब्ध होऊ शकत नाहीत. म्हणून हौशी पर्यटकांना देशाअंतर्गतच पर्यटन करण्याचा सल्ला देण्यात आलेला आहे भारतात धार्मिक पर्यटन मोठ्या प्रमाणात होत असते म्हणून पर्यटकांनी गर्दी टाळून घरूनच ऑनलाइन देव दर्शन करावे पर्यटन करावे दरवर्षी 11 दशलक्ष पर्यटक भारतात येत असतात व 24 दशलक्ष पर्यटक भारता बाहेर जात असतात एवढा मोठा प्रतिसाद पर्यटकांचा आहे तरी त्यांना विनंती की हळूहळू परिस्थिती निवळल्यानंतर पय´टनाला सुरुवात करावी जमल्यास गर्दी टाळून पर्यटन करावे धार्मिक स्थळी लोकांची होणारी गर्दी टाळावी त्यामुळे स्वतःचा जीव व इतराचेही जीव सुरक्षित राहतील याची काळजी घ्यावी.

परिणाम :-

पर्यटनावरच रोजीरोटी मिळवणारे अनेक गोरगरीब कामगार उघड्यावर आले. तसेच वाहतूकीवरही मोठा परिणाम झालेला आहे. पर्यटन स्थळावर छोटे छोटे व्यवसाय करणारे पण बाधित झालेले आहेत. छोटी मोठी हॉटेल्स पण बाधित झाली त्यांचेही फार मोठे नुकसान झालेले आहे. राजस्थान सारख्या एका राज्याचे पर्यटनामुळे वीस कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. तर मग जगाचे किती मोठे नुकसान झाले असावे याचा

विचार होणे गरजेचे आहे. काश्मिर सारख्या नंदनवनातील कांही कुटुंबावर तर उपासमारीची वेळ आली संपूर्ण जगातीक हा प्रश्न निर्माण झाला आहे. पर्यटन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी झिज झाली आहे.

पर्यटन क्षेत्राला नवी झळाळी देणे गरजेचे :-

कोरोना महामारी मुळे पर्यटन क्षेत्राला आलेली मरगळ आता दुर करणे अत्यंत गरजेचे आहे पर्यटकांच्या मनात भीतीचे वातावरण असले तरी ते दुर करून त्यांना पर्यटनाकडे आकर्षित केले पाहिजे. शासनाच्या सर्व नियमांचे पालन करून व त्या दृष्टीने सोयी सुविधा उपलब्ध करून देऊन पर्यटन क्षेत्राला पूर्वीची झळाळी आणली पाहिजे पर्यटकांनी भयमुक्त वातावरणात पर्यटन केले पाहिजे कोरोना महामारीचे सावट हळूहळू सावरताना दिसते आहे. लवकरच हे संकट दूर होऊन पुन्हा एकदा पर्यटनक्षेत्र पूर्वपदावर येईल अशी अपेक्षा बाळगतो.

निष्कर्ष :-

धकाधकीच्या जीवनात वेगाने धावणाऱ्या मानवाला थोडे स्थिर करून खरे जीवन जगण्याचा आनंद देण्याचा मार्ग म्हणजे पर्यटन होय असे मला वाटते. कारण पर्यटनाला आलेला प्रत्येक व्यक्ती आपली सर्व कामे चिंता टेन्शन सोडून देऊन त्या क्षणी तो आलेला असतो त्याच्या चेहऱ्यावर आनंद व उत्साह विलसत असतो म्हणून मानवी जीवनात पर्यटनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे परंतु अशा या माहामारीने संपूर्ण जगाला प्रभावित केले मोठे नुकसान या क्षेत्राचे झाले अनेक उपाययोजना करून या क्षेत्राला पुन्हा एकदा झळाळी देणे गरजेचे आहे.स्थानिक लोक व प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते म्हणून पुन्हा एकदा पर्यटनला सुरुवात करूया व पर्यटन क्षेत्राला गतवैभव प्राप्त करून देऊ या.

संदर्भ सूची :-

1. डॉ. बी. के. अग्निहोत्री, 2002,व्दि. आ., भारतीय इतिहास एलाईट पब्लिशर्स नई दिल्ली.
2. डॉ.कठारे, डॉ.पाटील, डॉ.साखरे,2015,व्दि. आ. , पुरातत्त्वविद्या वस्तुसंग्रहालय आणि पर्यटन विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद.
3. प्रा.बी. आर. जोशी,सुलभा तोरणेकर, 2007, डायमंड सामाजिक ज्ञानकोष, खंड दोन, डायमंड पब्लिकेशन पुणे.
4. संपा.पाठक अ. श., 2002, महाराष्ट्र इतिहास प्राचीन काळ खंड एक, दार्शनिक विभाग महाराष्ट्र शासन
5. डॉ. आर. एस. कोंडेकर,2018, पर्यटन, अरुण प्रकाशन लातूर.
6. चंद्र रमेश, 2001, भारत के ऐतिहासिक एवं पर्यटन स्थळ, नीलकंठ प्रकाशन नई दिल्ली.
7. रेडिओ मुलाखती - 2020.
8. इंटरनेट सेवा- 2021.

ISSN 2231 4342

'देवतात्मा हिमालय एक सकस आणि संपन्न प्रवासवर्णन'

प्रा. उगम उमेश परब
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
सरकारी कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय सांखळी गोवा.

'देवतात्मा हिमालय' हे प्रवासवर्णन सौ. सुनंदा रवींद्र नाईक यांचे आहे. या पुस्तकाच्या हस्तलिखिताला गोमंत विद्यानिकेतन मडगाव गोवा या संस्थेचा २०१० सालचा प्रथम पुरस्कार लाभलेला आहे. 'देवतात्मा हिमालय' हे एक अत्यंत कलात्मक रीतीने लिहिलेले प्रवासवर्णन असून गोमंतकीय प्रवासवर्णनामध्ये अत्यंत मोलाची भर घालणारे प्रवासवर्णन आहे असे म्हणावे लागेल. हे प्रवासवर्णन एका श्रध्दावंत भुमिकेतून लिहिले आहे त्यामुळे त्यांच्या लेखनाला एक प्रकारचा जिव्हाळा, आपुलकी लाभलेली दिसते. या प्रवासवर्णनात केदारनाथ, बद्रीनाथ, हृषिकेश, हरिद्वार अशी चार धाम यात्रा त्यांनी आपल्या चिन्मय मिशनच्या मंडळी बरोबर केली, त्याचेच हे प्रवासवर्णन त्यांनी लिहिले आहे. म्हणजेच, लेखिकेने आपल्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीमुळे हिमालयाचा घेतलेला शोध या प्रवासवर्णनातून चितारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा हा प्रवास मडगाव- मिरज- दिल्ली- हरिद्वार- बद्रीनाथ- केदारनाथ- हृषीकेश- उत्तरकाशी असा या क्रमाने झालेला आहे.

या प्रवासवर्णनात एकुण ३५ प्रकरणे आहेत. उदा:- साद देती हिमशिखरे, माझे वय हरवले; मी बालभावातून विश्‍व झाले, पायांना उभारी आली... अशी अर्थबोधक शीर्षकांची प्रकरणे त्यांनी दिली आहेत. तसेच काही प्रकरणांची शीर्षके अभंगाच्या ओळीवर आधारित आहेत तर काही संस्कृत श्लोकांतून घेतली आहेत.

'साद देती हिमशिखरे' हे 'देवतात्मा हिमालय' या प्रवासवर्णनातील पहिले प्रकरण आहे. त्या म्हणतात की, हिमालयाचे भव्योदत्त सौंदर्य, तिथला क्षणाक्षणाला आपले रूप पालटणारा, कधी रौद्र रूप घेणारा तर कधी शांतपणे मनाला आनंद देणारा निसर्ग पाहायची उत्कंठा त्यांच्या मनात शालेय जीवनापासून होती. हिमालयाविषयी त्या म्हणतात - हजारो वर्षांपासून उत्तरेकडील कडाक्याच्या शीत वाऱ्यांपासून हा हिमाद्रि स्वतः आडवा पसरून साऱ्या भारत वर्षाचे रक्षण करीत आहे. औषधी वनस्पतींचे तर हा आगरच आहे. त्याचे हे परोपकारी, पुण्यप्रद दर्शन म्हणजे प्रत्यक्ष सत्यं शिवं सुंदरमचेच दर्शन आहे. अशा परम पवित्र हिमालयात जाण्याची सुवर्णसंधी चालून आली हा सोळा सोमवार व्रताचा प्रताप समजतात. यावरुन त्यांची देवावरती असलेली श्रध्दा व आपुलकी लक्षात येते. त्यांच्या श्रध्देचं फळ त्यांना मिळालं असं त्यांना वाटतं. गुडघ्यांचे दुखणे, मानेचा स्पाँडलोसिसचा त्रास, डोकेदुखी इ. त्रास त्यांना होता. या सगळ्यावरुन मात करुन त्यांनी हा प्रवास केला.

यात लेखिकेने हरिद्वाराच्या गंगाघाटावर गेल्याचा उल्लेख केला आहे. त्यानंतर तिथे असलेल्या गंगेच्या कालव्याचे वर्णन केले आहे व तिथे ती सगळी मंडळी पहाटे पहाटे मुक्त भावविभोर होऊन कशी मनसोक्त भटकत होती ते सांगितले आहे. तिथल्या समाजजीवनावर भाष्य करताना गरीब व श्रध्दाळू लोकांचे वर्णन त्यांनी केले

आहे. “आत्मशक्ती आणि तिच्यामुळे पैदा होणारे पूर्ण वैराग्य, पूर्ण संतोष तितिक्षा वगैरे गुण इथल्या साधूंची अमूल्य संपत्ती आहे.” असे त्यांना वाटते.

त्या शहरातील घरे- गावातील घरे पक्की तशीच पत्र्यांच्या छपराची असे वर्णन केलेले दिसते. त्याचबरोबर तिथल्या शेती व्यवसायाचे पण त्यांनी वर्णन केले आहे. त्या म्हणतात की, ‘शेती तेथे कमीच तिही पर्वताच्या उताऱ्यांवर भात व बटाट्याचीही शेती डोंगर कड्यावर दिसत होती’. तसेच तिथल्या लोकांचे समाजजीवन दर्शविलेले आ. हे एकूणच ते लोक त्या त्या हवामानात किंवा ऋतूत काय करतात, त्यांची वेषभूषा काय आहे याची माहिती दिली आहे.

अलकनंदा गंगेचे महत्व स्पष्ट करताना अलकनंदा नदीच्या किनाऱ्यावर असलेल्या गौडपद शिलाचे वर्णन त्यांनी केले आहे. पुढे त्यांनी तिथल्या निसर्गाचे वर्णन केलेले दिसते. त्यातून त्या म्हणतात की, त्या प्रदेशातल्या दगड गोट्यात, झाडं झुडपात, तेथील प्रत्येकसजीव –निर्जीव गोष्टीत भगवंताचे निरामय अस्तित्त्व जाणवत होते.

लेखिकेच्या मनमोकळ्या स्वभावाबद्दल जाणून घेत असताना दिल्लीतील वास्तव्यात मंदिरामध्ये भजन, जप, आरती यामध्ये, त्यातील लोकांमध्ये त्या मिसळून गेलेल्या दिसतात. काली मंदिर आणि शीव मंदिरातील अनुभव त्या अत्यंत भक्तिभावपणे वर्णन करताना दिसतात. आगऱ्याला थंड हिरवळीवर बसून घेतलेले ताजमहालाचे दर्शन, वृंदावनामध्ये लहान-मोठी मंदिरे, धर्मशाळा, गोशाळा यांचे दर्शन. त्याचबरोबर एका महिलाश्रमात जाऊन परित्यक्ता, विधवा, अनाथ बायकांची घेतलेली भेट. या सर्वांचे अनुभवलेले मागासलेपण लेखिकेला चिंतनीय वाटते.

आपले सडेतोड मत व्यक्त करत असताना, दिल्लीत महागडी हॉटेल फिरुनही त्यांना कुठे चांगले जेवण मिळाले नाही याचा उल्लेख करायला लेखिका विसरत नाही. गंगेच्या काठावर खरेदी करताना काळोखात कोण कुठे आहे ते ओळखायला येत नव्हते. यावेळी आपापल्या बायकांना शोधताना पुरुषमंडळींची झालेली अवस्था एका विनोदपूर्ण प्रसंगात लेखिकेने वर्णन केली आहे. त्याचप्रमाणे हॉटेलवर रूममध्ये कॉट मोडून पडल्याचा प्रसंगही अत्यंत विनोदी आहे.

लेखिकेला अजून कुठेतरी माणुसकी, देवपण, सचोटी माणसांत आहे, हे त्यांना उत्तरखंडात फिरताना जाणवत होते. भ्रष्टाचार, लाललुचपत, काळाबाजार अगदी उताला आलेला रोज वर्तमानपत्रात वाचतो पण सर्वसामान्य माणूस दक्षिणेपासून अत्तरेपर्यंत अजून माणूसधर्म सांभाळून आहे, याची प्रचिती केदारनाथ, बद्रिनाथ प्रवासात अनेकवेळा आली. तो परिसरच इतका शुध्द आहे की खोटे विचार गळून पडावेत. ढोंगीपणा जळून जावा. भ्रष्टाचाराने आपले तोंडकाळे करावे म्हणून तो परिसर, देवभूमी पाहायला जायचे असं त्या म्हणतात.

उत्तरकाशीला त्यांचे शिबिर असल्यामुळे प्रिया व ड्रायव्हर ही मंडळी त्यांना पुढे भेटणार नव्हती म्हणूनच त्यांना प्रवासात मदत करणाऱ्या व साथ देणाऱ्या त्या दोघांविषयी लेखिका इथे कृतज्ञता व्यक्त करतात. प्रियाच्या धाडसाचे त्यांना कौतुक वाटते. अत्यंत रुपवान असलेल्या प्रियाने केदारनाथची उभी चढण कोणाच्याही

 ISSN 2231 4342

मदतीशिवाय चढली याचे लेखिकेला कौतुकमिश्रित आश्चर्य वाटते व घरापासून दूर राहून आपलं शिक्षण व व्यवसाय करणाऱ्या प्रियाची तुलना त्या नकळतपणे गोमंतकीय मुलींशी करतात.

"वातानुकूलित वर्गात बसून शिकवणाऱ्यांच्या वर्गातून भरमसाठ पैसे मोजून कधी वैध्य तर कधी अवैध्य मार्गाने प्रश्नपत्रिका मिळवून गुण मिळवले जातात" असे म्हणून लेखिका समाजावरती भाष्य करताना दिसतात. मनुष्य म्हणून जगताना आवश्यक जीवनमूल्ये या हिमालयातील थोर ऋषीशास्त्रज्ञांनी आपल्याला दिलेली आहेत त्याकडे आजची पिढी डोळसपणे पाहात नाही व भौतिक सुखामागे मग्न असते. स्वामी तपोवनम् हे एकांक वनप्रदेशात कसे राहिले याची माहिती देऊन, तपोवनम् महाराजांच्या सरोवराच्या यात्रेचे वर्णन लेखिकेने केले आहे व शेवटी त्यांनी स्वामी तपोवनमांचे निसर्ग सौंदर्य विषयक उद्‍गार मांडले आहेत. त्या उद्‍गारातून त्यांच्या 'अद्वैत दर्शनाचा ' वाचकांना नक्कीच प्रत्यय येतो.

'सीयाराममय सब जग जानी' व 'धन्य तो धर्मात्मा युधिष्ठिर' या प्रकरणांतून लेखिकेने पुराणातील अनेक संदर्भ देऊन भगवंताचे महत्त्व सांगितले आहे. आत्मोध्दाराचे महत्त्व त्या वर्णन करतात. त्यावरुन अध्यात्म, धर्म व पुराणे यावरील लेखिकेचे वाचन, चिंतन व मनन किती मोठे आहे याचा प्रत्यय येतो. हे सर्व सांगताना हिमालयाचं महात्म्य वर्णन करायला त्या विसरत नाही. हिमालय हा पर्वत नव्हे तर भगवंताचं रूप म्हणूनच त्या तेथील प्रत्येक वास्तुकडे श्रध्दापूर्ण नजरेने पाहताना दिसतात.

सौ. सुनंदा नाईक यांच्या 'देवतात्मा हिमालय' या प्रवासवर्णन लेखनातील वैशिष्ट्ये.

निसर्गचित्रण

हे प्रवासवर्णन वाचताना लेखिकेने केलेल्या निसर्गवर्णनाचा ठिकठिकाणी प्रत्यय येतो. उदा- 'माझी नजर गंगा टिपत होती' यात त्या म्हणतात की 'फॉरेस्ट रेस्ट हाऊसमध्ये चिला येथे जात असताना वाटेत जे डोंगर लागले त्या डोंगरातून पांढरे शुभ्र गोटे जणू काही फेव्हीकॉलने चिटकवल्यासारखे दिसत होते.' असे त्यांनी आपल्या लालित्यपूर्ण शैलीतून त्या बर्फाळ डोंगराचे वर्णन केले आहे.' मी तो यात्रिक हिमालयाची ' यात लेखिकेने केदारनाथच्या पर्वतांचे व तिथल्या निसर्गाचे जे वर्णन केले आहे त्यातून त्या निसर्गाचा जणू जिवंत प्रत्यय वाचकांना होतो. हे प्रकरण वाचताना अक्षरशः डोळ्यातून पाणी ओघळू लागते व आपणच त्या केदारनाथला चाललो आहोत असे वाटते . तिथला सगळा निसर्ग, सगळे पर्वत डोळ्यांपुढे येतात. एकुणच तिथले निसर्गचित्रच जणू डोळ्यापुढे उभे राहते.

समाजजीवन

लेखिकेने आपल्या सुक्ष्म निरिक्षण शक्तीद्वारे तिथल्या समाज जीवनावरती प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तिथल्या विधवा स्त्रीया व त्यांचे ते मळकट पांढरे कपडे लेखिकेने वर्णिले आहेत. यावरून तिथल्या मागासलेल्या मध्ययुगीन काळात वावरणाऱ्या समाजजीवनाचे दर्शन घडते. तसेच तिथल्या लोकांची भगवंतावर असलेली निस्सीम भक्ती, श्रध्दाळू मन व्यक्त होते. तिथल्या थंडगार बर्फासारख्या पाण्याने आंघोळ आणि मिळेल ते जेवण करणे, कडक उन्हाळा आणि हिमवर्षावातली थंडी सहन करुन तिथे वास्तव्य करणे यावरुन तिथल्या समाजजीवनाचा प्रत्यय वाचकांना येत राहतो. तिथल्या साधुंचे जीवन व्यक्त करीत त्या म्हणतात की, 'तिथले साधू

 ISSN 2231 4342

एकही पैसा जवळ नसताना, शरीर पोषणासाठी खाण्याची चिंता न करता केवळ भगवंतावर भरिभार टाकून निःशंकपणे फिरतात.'

व्यक्तीचित्रण

या प्रवासवर्णनात त्यांना भेटलेल्या काही व्यक्तींची रेखाचित्रं रेखाटली आहेत. लेखिकेचा स्वभाव बोलका असल्यामुळे वृत्ती आनंदी आणि हसरी असल्यामुळे त्या प्रवासात भेटलेल्या माणसांशी सहजपणे मिळून मिसळून जातात. त्यांची गाईड प्रियाच्या धाडसाचे त्यांना कौतुक वाटते. अत्यंत रुपवान असलेल्या प्रियाने केदारनाथची उभी चढण कोणाच्याही मदतीशिवाय चढली याचे लेखिकेला कौतुकमिश्रित आश्चर्य वाटते. ड्रायव्हरविषयी लिहिताना त्या म्हणतात "अगदी शांतपणे लिलया ती अवघड वळणे पार करत त्याने ती गाडी चालवली. जणू काय त्यांचा रथ हाकलायला त्याच्या रूपाने श्रीकृष्णच आलेला."

केदारनाथच्या वाहकंचे वर्णन त्यांनी केले आहे. त्या म्हणतात की केदारनाथला चढेपर्यंत आणि खाली उतरे पर्यंत त्यांनी फारच चांगल्या प्रकारे लेखिकेला वाहून नेले. वाटेत त्यांनी लेखिकेला खूप काही माहिती सांगितली. चढताना सावकाश दम खात चालणारे डोलीवाले आता अगदी पळत निघाले होते. स्वामिनी विमलानंदाच्या प्रवचनाबद्दल, त्यांच्या वाणीबद्दल सांगताना त्या म्हणतात 'प्रश्नोपनिषदाची सात दिवसांची श्रवणसाधना स्वामिनी विमलानंदांनी आपल्या तेजस्वी तीक्ष्ण वाणीने अशी काही घेतली की जणू काही गंगेचा ओघ पहाडातून खाली झरझर धावत समुद्राकडे निघाल्यासारखी त्यांची ज्ञानगंगारुपी प्रवचने सर्वांच्या काळजाला भिडली.' असे त्या म्हणतात. लेखिकेने आपल्या प्रवासात भेटलेल्या काही व्यक्तींची थोडक्यात पण ठसठशीत चित्रणं अत्यंत प्रभाविशक्तीने केलेली दिसतात.

भाषाशैली

लेखिकेने ओघवत्या शैलीतून हे प्रवासवर्णन लिहिलेले आहे. साध्या, सोप्या आणि सरळ भाषेतून वाचकांशी साधलेला भावनिक सुसंवाद हे त्यांच्या भाषाशैलीचे वैशिष्ट्य आहे. त्यांनी अधून-मधून म्हणींचा पण वापर केला आहे. उदा- साद देती हिमशिखरे यात त्या म्हणतात की, 'हिमालयावर जाऊन आलेल्यांनी लिहिलेली पुस्तके वाचून **दुधाची तहान ताकावर भागवण्याचा** प्रयत्न केला.' **'देव तारी त्याला कोण मारी'** अश्या काही म्हणी त्यांनी वापरल्या आहेत. तसेच आपला आशय आणखी स्पष्ट करून सांगण्यासाठी त्यांनी मधे-मधे संस्कृत श्लोक आणि अभंगाच्या ओळी वापरल्या आहेत. उदा- "मुकं करोती वाचालं पंगुंलंघयते गिरिम्। यत्कृपा तमहं वंदे परमानंद माधवम।।"; 'योगक्षेम वहाम्यहम्'; 'सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं ब्रज' असे कितीतरी श्लोक वापरून आपले प्रवासवर्णन अधिक प्रभावी बनवण्याचा प्रयत्न केला आहे.

अंभगाच्या ओळी त्या वापरतात. उदा- 'निर्गुणाच्या भेटी आलो सगुणासंगे', 'एकमेकांह्य करु अवघ्या धरु सुपंथ'; 'आहे मनोहर परी गमते रखरखीत', अशा काही अंभगाच्या ओळी लेखिकेने वापरलेल्या दिसतात. त्याच बरोबर त्यानी अत्यंत मोकळेपणाने, आत्मियतेने विनोदी शैलीचा वापर केला आहे. उदा 'बैसोनि निवांत शुध्द करी चित्त' यात त्या म्हणतात की 'त्यांच्या गाईडने महागातल्या महाग आणि वाईटातल्या वाईट हॉटेलात

ISSN 2231 4342

नेले व भरपूर पैसे देऊनही त्यांना जबरदस्तीने उपवास तिथे घडला' अशी विनोदी शैली या प्रवासवर्णनात ठिकठिकाणी आपल्याला सापडते व हसू आवरत नाही. 'चहुबाजूंनी हिरव्यागार वनश्रीने नटलेल्या गडद जांभळ्याशार भासणाऱ्या पर्वतांच्या मधून नितांत निर्मळपणे वाहणारी पूर्ण सलिला भागिरथी'. अशी प्रौढ भाषा व त्यात अलंकारीकता त्यांनी वापरली आहे. त्याचप्रमाणे पौराणिक कथांच्या आधारे, त्या स्थळांचा ऐतिहासिक उल्लेख त्यांनी आपल्या प्रभावी भाषाशैलीतून केलेला आहे. लेखिका या प्रवासवर्णनात आपल्या लेखनशैलीच्या कौशल्यातून वाचकांना मंत्रमुग्ध करुन ठेवते.

या प्रवासवर्णनाच्या प्रकरणांची नावे लेखिकेने अर्थपूर्णरूपाने व कलात्मकतेने दिली आहेत. म्हणून त्याचमुळे प्रवासवर्णन अधिक वाचनीय बनले आहे. या प्रवासवर्णनातून लेखिकेच्या व्यक्तीमत्वातील साऱ्या गुणविशेषांचा भरभरून प्रत्यय आपणास येत राहतो.

लेखिकेच्या दृष्टिने हिमालय म्हणजे साक्षात भगवंतच आहे. तोच ईश्वर हिमालय बनून आपल्या देशावर छत्र धरून उभा आहे. त्यानेच आपल्याला या दिव्य संस्कृतीचा आध्यात्मिक वारसा दिला आहे. त्याच नगाधिराजाने अनेक नद्यांचे पाणी आपल्या देशाला दिले आहे. हजारों वर्षांपासून आडवा पसरून शीत वाऱ्यापासून भारताचे रक्षण करीत आहे. म्हणून या प्रवासवर्णनाला त्यांनी ‘देवतात्मा हिमालय’ असे नाव दिले आहे.

लेखिका सामान्यांशी जशी उत्तमपणे बोलते त्याचप्रमाणे ठिकठिकांचे स्वामी, आचार्य, आणि साधूसंत यांच्या संबंधातही फार बारकाईने लिहिते. व्यक्ती चित्रणाबरोबरच गंगेच्या विशालपणाचं आणि पावित्र्याचं त्यांनी घडवलेलं विशाल दर्शन खरोखरच आगळं वेगळं म्हणावं लागेल. लेखिकेचा मुळ पिडंच चिंतनशीलतेचा आहे त्यामुळे ही चिंतनशीलता येते. या चिंतशीलते प्रमाणेच लेखिकेची निवेदन शैली किती साधी सोपी आहे त्याचाही प्रत्यय येतो. हे प्रवासवर्णन अखेरपासून शेवट पर्यंत वाचल्या शिवाय बाजूला ठेवता येत नाही त्याचं श्रेय सुनंदा नाईक यांच्या निवेदन शैलीला आहे. हे प्रवासवर्णन वाचल्यानंतर वाचकांचे मन प्रसन्न होते व त्याच्या मनात हिमालयात जाण्याची इच्छा, ओढ निर्माण होते.

प्रवासवर्णन म्हटले की केवळ प्रवासस्थळांचा परिचय अशी जी काही समजूत आहे ती दूर करण्याचे काम या प्रवासवर्णनामुळे होते. मनमोकळ्या गप्पागोष्टी, भेटलेल्या लोकांबरोबरचं बोलणं त्यांच्या वागण्या-बोलण्यातील वेगळेपण, प्रवासातल्या सगळ्या गमती जमती यांचं फार रमणीय वर्णन या प्रवासवर्णनात केलेलं दिसतं.

निष्कर्ष

- एकूणच या प्रवासवर्णनातून लेखिकेने दिल्ली ते हरिद्वारपर्यंत त्यांच्या प्रवासातील महत्वाची ठिकाणे, तेथील निसर्ग, तिथले वातावरण, तिथल्या लोकांचे समाजजीवन, तिथल्या लोकांचा स्वभाव व आपले अनुभव सांगितले आहेत.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

- तिथला निसर्ग, तिथली मंदीरे, तिथल्या विविध संस्थांची माहिती लेखिकेने दिली आहे व एकूणच त्या स्थळांचे वर्णन त्यांनी केलेले दिसते.
- तिथल्या निसर्ग सौंदर्याचा खजिना त्यांनी वर्णिलेला आहे व तिथल्या समाजजीवनाचे दर्शन घडवीत सगळी माहिती दिली आहे.
- तिथल्या परिसराचे, यात्रेकरुंचे, अरुंद वाटेवरील प्रवासाचे, वाहकांचे वर्णन केले आहे. त्याचप्रमाणे त्यांची भगवंताबद्दलची ओढ, श्रध्दा उत्कटतेने व्यक्त झाली आहे.
- या प्रवासवर्णनातून लेखिकेच्या अध्यात्मिक उन्नतीचा प्रत्यय येतो.
- तिथल्या स्थळांची वर्णने करून त्यांच्या निर्मितीविषयीची पुराणकथा लेखिकेने सांगितली आहे.
- केदारनाथ मंदीराचे वर्णन त्यांनी आपल्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीच्या आधारे अत्यंत सहज, सोप्या भाषेत केले आहे.
- या प्रवासवर्णनात लेखिकेने हिमालयातील सगळ्या शहरांची वर्णने त्यांच्या वैशिष्ट्यांसह केलेली आहेत.
- या प्रवासवर्णनामध्ये अनेक थोर व्यक्तीचे, संताचे, विचारवंतांचे, कवींचे उल्लेख येतात त्याचप्रमाणे त्यांच्या साहित्याचे संदर्भ येतात. त्यामुळे लेखिकेचं वाचन, चिंतन कीती मोठं आहे हे ध्यानात येतं.
- लेखिकेची निरीक्षण शक्ती, चिंतनशीलता, व्यासंगीवृत्ती किती वैविध्यपूर्ण स्वरुपाची आहे त्याचाही प्रत्यय या प्रवासवर्णनातून येतो.
- ज्या तीर्थस्थळांना लेखिकेने भेट दिली त्यांचे वर्णन करण्यावर लेखिकेचा भर असला तरी त्या तीर्थक्षेत्राच्या परिसरातील निसर्गवर्णनाचे दर्शन त्या अतिशय जिवंतपणे करतात.
- हिमालयातील समाजजीवन म्हणजेच तेथील माणसांचे आचार- विचार, श्रध्दा- समजुती, सण- उत्सव इत्यादींवर उत्तम प्रकारे प्रकाश टाकण्याचे काम या प्रवासवर्णनाने केले आहे.
- हे प्रवासवर्णन वाचल्यानंतर एक गोष्ट सहज लक्षात येते की, लेखिकेने रसिकतेने, मनमोकळेपणाने व आत्मियतेने प्रवासातील अनुभव टिपलेले आहेत.
- हिमालय आणि चारधाम यात्रेतील विविध स्थळे, व्यक्ती, निसर्ग जणु आपण प्रत्यक्षरित्या पाहातो अशी अनुभूती काही काळ येते. प्रवासातील अनुभव उत्कटतेने घेऊ शकणाऱ्या संवेदनशील, रसिक मन त्यांच्यापाशी आहे.
- सुनंदा नाईक या मुळच्याच नामवंत ललित लेखिका असल्यामुळे त्यांच्या प्रतिभाशक्तीचं पुरेपुर सामर्थ्य या प्रवासवर्णनातून प्रत्ययाला येणे हे देखील तितकेच स्वाभाविक आहे. केवळ गोमंतकीय मराठी प्रवासवर्णनाच्या क्षेत्रातच नव्हेतर अखिल मराठी साहित्यातील प्रवासवर्णनामध्ये उल्लेखनीय ठरावे इतके ते सकस आणि संपन्न आहे.

ISSN 2231 4342

संदर्भ ग्रंथ

- गंधारे द. के., *मराठी वाङ्मयप्रकार - स्वरुप व वाटचाल*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. २०१७
- नाईक सुनंदा, दे*वतात्मा हिमालय*, विद्यादीप मंडळ, मडगाव. प्रथमावृत्ती १४ आँगस्ट २०११
- सावंत वसंत, *प्रवासवर्णन- एक वाङ्मयप्रकार*, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. १९८७
- यादव आनंद, *प्रवासवर्णन*, प्रदक्षिणा खंड २, महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई.

चंद्रपूर नगरीची शिल्पकार - राणी हिराई

प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे
इतिहास विभागप्रमुख
रा.तु. महाविद्यालय, चिमूर, जि. चंद्रपूर
Mob.No. ९६८९९५२८७३
Email ID— rajurwadep९@gmail.com

प्रस्तावना:

इतिहास हा घडणा-या व्यक्तीच्या जीवनकार्यातून त्यांच्या कर्तुत्वातून साकार होतो. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात अनेक कर्तुत्ववान स्त्रिया होऊन गेल्या. त्यात राजमाता जिजाबाई, पराक्रमी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, रजिया सुलताना, अहमदनगरची चाँदबिबी, जहाँआरा बेगम अशा अनेक गुणवैशिष्ट्यासह त्यांनी केलेल्या कार्याची दखल इतिहासाने घेतली आहे. अशीच कर्तुत्ववान स्त्री चंद्रपूर जिल्ह्यात होऊन गेली राणी हिराई. चंद्रपूरच्या पाचशे वर्षाच्या इतिहासात राणी हिराईचे कर्तुत्व व पराक्रम झळकते.

गोंडराज्यात एकूण २३ जाने होऊन गेले. त्यात राणी हिराईला सर्वोच्च स्थान आहे. ऐतिहासिक कर्तबगार स्त्रियांच्या वाट्याला येणारी प्रतिकूल परिस्थिती, त्यावर मात करणारी विजयीवृत्ती, मुत्सदीपणा, बाणेदारपणा तिच्या ठायी होता. पती राजा बिरसिंग यांच्या मृत्यूनंतर, हत्येनंतर गादीवर दत्तकपूत्र रामशहा यास बसवून करारीपणे राज्य चालविले. रामसिंग (रामशहा) सज्ञान होताच राज्यकारभारातून मुक्त झाली. तिने आपल्या कार्यकाळात मंदिराच्या जिर्णोद्धारापासून तर अनेक वास्तू बांधकामांच्या उत्कृष्ट निर्मितीपर्यंत राणी हिराई प्रसिद्ध आहे.

चंद्रपूर जिल्ह्याची ऐतिहासिकता:

गोंड राजा खांडक्या बल्लाळशाह याने १३ व्या शतकात चंद्रपूर शहराची स्थापना केली. चंद्रपूरास चांदागढ किंवा चांदा असे म्हणत. गोंड राजा बहुतांश मोगलांचे मांडलीक होते. खांडक्या बल्लारशहा नंतर हिरासिंह महाप्रतापी राजा बनला. त्यानेच आपली राजधानी बल्लारपूरहून चंद्रपूर येथे नेली. हिरसिंह नंतर भूमासिंह, लोमासिंह, कोण्ड्यासिंह, करणसिंह, बाबाजी बल्लारसिंह या राज्यांनी इ.स. १५९७ पर्यंत राज्य केले. राजा रामसिंह (१६६७-१६८४) गादीवर असतांना औरंगजेबाच्या मांडलीकविरूद्ध बंड मोडून काढण्यासाठी पाठविले. या युद्धात किसनसिंह मारल्या गेला. रामासिंहाला वारस नव्हता. राजा किसनसिंह यांचा मुलगा बिरसिंह होय व त्याची सून म्हणजे राणी हिराई होय.

राणी हिराईचे माहेर मदनापूर, होशगांबाद होते. येथील मोगल सेनापती दिल्लनसिंह मडांवी यांची ती मुलगी होय. राणी हिराई सुंदर कुशाग्र बुद्धीची शस्त्रविद्यामध्ये पारंगत होती. विवाहाच्या वेळी बिरसिंग ८ वर्षाचा

ISSN 2231 4342

तर हिराई ६ वर्षाची होती. हिराई व बिरसिंग यांचे परंपरागत शिक्षण व्यवस्थित होण्याच्या दृष्टीने राजाने विद्वानाची नियुक्ती केली होती.

राणी हिराई - प्रसिद्ध विरांगणा:

मोगल बादशहा औरंगजेबाच्या काळात चंद्रपूरवर स्वारी करण्यासाठी नेमकखान यास पाठविले. यावेळी राणी हिराईने मराठा सरदार मालोजी शिंदे यांची मदत घेतली. चंद्रपूरजवळच्या रणसंग्रामात राणी हिराई व मालोजीने नेकनाम खानास पराभूत केले. पराभूत खानास अटकेत ठेवले. राणी हिराईने बादशहाचा सरदार नेकनाम खानास पराभूत केल्यामुळे त्याने रावमानसिंह बाबासाहेब जाधव यास चंद्रपूरला पाठविले. त्याने माणिकडचा किल्ला जिंकला. परंतु थोड्या अवधीतच हा किल्ला हिराईने परत मिळविला.

इ.स. १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाल्यानंतर महाराष्ट्रात छत्रपती शाहू स्वराज्यात राजगादीवर बसले. याचकाळात चंद्रपूरवर स्वारी करण्यास कान्होजी भोसले यास पाठविले. कान्होजी भोसले यांना वारसाने व-हाड गोंडवन प्रांतातील चैथाई व सरदेशमुखीची सनद मिळाली होती. चंद्रपूरच्या लढाईसाठी सोबत सरलष्कर हैबतराव निंबाळकर होते. गोंड व पठाण सैन्याचे नेतृत्व राणी हिराईने स्वतः केले. हे युद्ध चंद्रपूरजवळ झाले. या युद्धात हैबतराव निंबाळकर ठार झाले. सोबतच कान्होजीचा पराभाव झाला. ही लढाई १७१०-११ मध्ये झाली.

परंतु हा पराभव जिव्हारी लागल्यामुळे हैबतरावचा मुलगा सुलतानजी निंबाळकर याने राणीचा पराभव केला. या पराभवाला कारणीभूत ठरली होती. चंद्रपूरची आर्थिक परिस्थिती कारण सततच्या लढाईमुळे चंद्रपूरला फटका बसला होता. युद्धाची तयारी करणे कठीण गेले होते. पुढे चंद्रपूर राज्याची लष्करी व आर्थिक परिस्थिती कमकुवत झाल्याने कान्होजी भोसल्यानी लढाई केली. त्यात राणी हिराईचा पराभव झाला. पुढे तह झाला. तहात अर्धे राज्य देणे भाग पडले. पुढे कान्होजीने मिळविलेले राज्य परत मिळविण्यासाठी राणी हिराईने छत्रपती शाहू महाराजांशी वाटाघाटी केल्या. राणीने एक लाख रूपये खंडणी व वार्षिक दहा हजार रूपये सरदेशमुखी द्यावी असे ठरले व राज्य पुन्हा परत मिळाले.

उत्कृष्ट प्रशासक:

राणी हिराईने धडाडी आणि बुद्धीचार्तुयाने चंद्रपूरचा राज्यकारभार यशस्वीपणे सांभाळला. त्यांची कारकिर्द भरीव आणि महिलांना अभिमान वाटावी अशीच आहे. राजा बिरशहा व त्यांचे पूर्वज मोगलांचे मांडलिक होते. मांडलिकात खंडणी दरवर्षी विनाविलंब (खंडणीची) रक्कम भरावी लागत असे. खंडणी भरण्यास बिरशहा दरवर्षी उशिर करीत असे. परिणामी औरंगजेबाने बिरशहास कैदत टाकले. परंतु हिराईच्या चार्तुयामुळे बिरशहांची सहीसलामत सुटका झाली. औरंगजेबाच्या कैदेतून सुटका होणे यासारखे दिव्य त्या काळात दुसरे नव्हते.

कान्होजी भोसले यांचा पराभव केल्यानंतर लढाईच्या ठिकाणी जवळपास लहान-मोठे १५० लहान वीरगळे तयार केलीत. त्यावर मराठा व गोंड यांच्या प्रतिक मूर्त्या अंकित केलेल्या आहेत. त्यांचे रणागणांवर

 ISSN 2231 4342

कडवा संघर्ष व वाटाघाटीमधील कूटनिती या दोन्ही आघाड्यावर प्रभूत्व होते. प्रजेचे हित जोपासत उत्कृष्ट बांधकाम, शिक्षण याकडे विशेष लक्ष दिले. राज्याचा सर्वांगीण विकास केला. राज्यावर औरंगजेबाचा अमल असला तरीही राणीने राज्यात गोहत्या बंदी केली. तिने आपल्या बुद्धिमता, कौशल्यांनी राज्यात उद्धभवलेल्या बंडखोरांचा अंत केला. शत्रूवर विजय मिळवू शकतो; पण घराजवळच्या, घरातल्या शत्रूशी चार हात करण्याचे त्यांचे कौशल्य होते.

गोंडराणी हिराईची विकासदृष्टी :

राणी हिराईने चंद्रपूरात महाकालीचे भव्य व सुंदर मंदिर बांधले. सोबतच महाकाली यात्रा सुरू केली. ती यात्रा आजतागायत सुरू आहे. चंद्रपूरची महाकाली आणि माहूरची रेणुका माता ही दोन तीर्थस्थळे विदर्भ आणि मराठवाड्याला परंपरेने जोडतात. विदर्भातील आठ शक्तीपीठापैकी एक मानल्या जाते. महाकाली मंदिर चंद्रपूरातील गोंडकालीन इतिहासाची साक्ष देते. अंजिठा-वेरूळ लेण्यासारखी चित्रकारीता विदर्भात याच ठिकाणी आहे. रामायण, महाभारतातले प्रसंग चित्रण केले आहे. हे गुफा मंदिर आहे. या मंदिर उभारणीचा काळ इ.स. १७०७ ते १७०९ हा होता. महाकाली मंदिरासोबतच अंचलेश्वर, एकवीरा, खाटीचा गणपती मंदिर, वैरागड येथील भवानी मंदिर, मार्कंडादेव येथील मार्कंडामंदिर दुरस्त केले. काही इतिहासकारांच्या मते महाकालीचे मंदिर सातवहान काळातील असावे. या मंदिराची स्थापत्यरचना गोंड-भोसलेशैलीची आहे. गोंडकालीन इतिहास आणि अध्यात्माची परंपरा असा दुहेरी संदर्भ असलेले हे महाकाली मंदिर विदर्भाचीच नव्हे तर मध्य प्रांताची एक वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे. विदर्भ, मराठवाडा, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, छत्तीसगड, मध्यप्रदेश या भागातून हजारोंच्या संख्येत भावीक यात्रेत सहभागी होतात. या जथ्यात महार, मांग, गारोडी, कैकाडी, कुणबी असे अनेक जातीचे लोक येतात.

राजा बिरशहाच्या समाधीचे बांधकाम :

चंद्रपूर येथील गोंडराजे राजा बिरशहा यांच्या निधनानंतर त्यांच्या आठवणीखातीर राणी हिराईने राजा बिरशहाची समाधी बांधली. त्यांच्या प्रती असलेले प्रेम अजरामर केले. त्यास विदर्भातील दुर्लक्षित ताजमहाल असे म्हणतात. राणीने चंद्रपूर शहराच्या जवळ अकरा पराकोट बांधले आहेत. चंद्रपूर मोगल सम्राटाशी सबंधीत असल्यामुळे त्या शैलीचे प्रतिबिंब दिसते. नक्षीकामात गोंड संस्कृती दिसते. मधील मोठा घुमट व चार लहान घुमट मोगल वास्तुकलेची छाप दर्शवितात. बांधकामात वास्तूची भव्यता आढळते. राणी हिराईच्या व्यक्तीमत्वात युद्धप्रसंगी संघर्षाचा आवेश व शांततेच्या काळात धार्मिक अंर्तमुखता आढळून येते.

निष्कर्ष :

इतिहास हा अनंत असल्यामुळे काही पानावरच प्रकाश पडतो. अज्ञाताचा काळोख झुगारून काही प्रमाणात मानाचे सोनेरी पान हिराईचे आहे. मध्ययुगात अनेक धाडसी, स्वाभीमानी स्त्रियांनी आपल्या कर्तुत्वातून

ISSN 2231 4342

संघर्षमय लढा दिला. विरागंणा राणी हिराईनी सुद्धा मानवी मूल्यांच्या संघर्षासाठी प्रचंड लढा दिला. राणी अशिक्षित असूनसुद्धा बांधकामाची उत्तम जाण होती. राणी हिराईची कारकिर्द फक्त १५ वर्षाची होती. राणी हिराईने केलेल्या लोककल्याणकारी कार्याची दखल इतिहासाने घेतली आहे. परंतु त्यांच्या कार्याचा उचित गौरव झाला नाही. चंद्रपूरचा नावलौकीक देशभर पसरविला होता. त्यांच्या कारकिर्दीत पक्के रस्ते, आरोग्याकडे लक्ष देऊन पाण्याची सोय, औषधोपचारासाठी राजवैद्याची नेमणूक केली होती. अहिल्याबाई होळकर आणि राणी हिराईमध्ये बरीच साम्यस्थळे होती. परंतु त्यांचा इतिहास अजूनही उपेक्षित राहिला.

संदर्भ ग्रंथ :

(१) राजूरकर अ.ज., 'चंद्रपूर जिल्ह्याचा इतिहास', महाकाली प्रकाशन, चंद्रपूर

(२) हिराई स्मरणीका (संपा.), राणी हिराई-दत्ताजी तन्नीरवार यांचा लेख, २०१२, पृ. २३

(३) आत्राम उषाकिरण, 'गोंडवाना कीमहान विरांगणा', नागपूर, २०१५

(४) लोकमत न्युज नेटवर्क APR-06, 2018 गोंडराणी हिराईची विकासदृष्टी

(५) लोकसत्ता APR-19, 2013 चंद्रपूर प्रतिनिधी

(६) http//wikimapia.org - महाकाली मंदिर चंद्रपूर

(७) चंद्रपूर सप्तरंग - विदर्भातील प्रमुख शक्तीपीठ, चंद्रपूरचे महाकाली मंदिर, आॅक्टोबर

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

'वारकरी संप्रदाय आणि पेशवा द्वितीय बाजीराव'

लक्ष्मण गजानन गणगे
संशोधक विद्यार्थी
इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग ,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद
मो नं. ७७७४९७९८७७
Email id : lgange77@gmail.com

गोषवारा :

वारकरी संप्रदायाची पंरपरा तेराव्या शतकापासून चालत आलेली आहे. ती परंपरा टिकवण्यासाठी संतानीही मोलाची कामगिरी केली आहे, त्यावरही थोडक्यात प्रकाश टाकणार आहोत मुख्यत: या शोधनिबंधाचे दोन टप्पे पाडण्यात आले आहेत. पहिल्या टप्प्यात पेशवेकाळापूर्वीची शासनव्यवस्था आणि वारकरी संप्रदाय व समाजव्यवस्था याचा थोडक्यात विचार करण्यात आला आहे दुसरा आणि महत्त्वाचा टप्पा म्हणजे पेशवाईचा शेवटचा काळ होय. त्यातही द्वितीय बाजीराव आणि वारकरी संप्रदाय यावर सखोल विचार करण्यात आलेला आहे. संतानी वारकरी संप्रदायाला समानतेच्या सुत्रात बांधण्याचा प्रयत्न केला. परंतू पेशवा द्वितीय बाजीरावाच्या काळात संप्रदायाच्या एकतेवर हल्ला करण्यात आला संप्रदायात फूट पाडण्याचा प्रयत्न झाला. त्याचा वारकरी संप्रदायावर आणि समाजावर काय परिणाम झाले इत्यादी बाबींचा उहापोह या शोधनिबंधाच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

प्रस्तावना :

वारकरी संप्रदायाला उदयापासून ते आजतागायत वेगवेगळ्या राजवटीतून मार्गक्रमण करावे लागले. यादवकाळाच्या अखेरीस महाराष्ट्रात महानुभाव आणि वारकरी या दोन पथांचे प्राबल्य होते. त्यापैकी महानुभाव पंथाची पीछेहाट होऊन वारकरी संप्रदाय येथे लोकप्रिय झाला.[१] त्याला तसे कारणही होते. 'महानुभाव पंथाला यादवांच्या दरबारात मान्यता होती. वारकरी संतांनी मात्र राजाश्रयाची कधी फिरकीदेखील केली नाही. सामन्यजनांची सहानुभूती व त्यांचे सहकार्य हाच त्यांचा आधार होता. लोकांच्या चांगुलपणावर व गुणग्राहकतेवर त्यांचा विश्वास होता. राजमान्यतेचे त्यांना वावडे होते.[२] त्यांनी सामान्य जनतेसोबतची पकड मजबूत करण्यावर भर दिला होता.

वारकरी संप्रदायाच्या या लोकाभिमुख, समतावादी दृष्टिकोणाची एक महत्त्वाची फलशृती म्हणजे महाराष्ट्रात झालेलं सामाजिक अभिसरण; विविध संतानी जाती-जमातीत निर्माण झालेला स्नेहभाव नि परस्परांततील भेदभावाच्या भिंती नाहीशा करण्याची निर्माण झालेली एकात्मतेची मानसिकता या मानसिकतेची फार मोठी गरज एकविसाव्या शतकात आपल्याला भासणार आहे.[३]

इस्लामी आक्रमणांच्या कालखंडात वारकरी संप्रदाय तग धरेल का याची साक्षंकता होती, परंतू वारकरी संप्रदायाने 'इस्लामाच्या आक्रमणापासून भारतीय समाजाचा बचाव करण्याकरीता संत चळवळीला धर्माजागृती आणि धर्मसुधारणा करावी लागली त्यांनी आपल्या धर्म जागृतीचे लोण अगदी तळातल्या वर्गापर्यंत नेऊन पोहचविले.[४] इस्लामी प्रभावाखाली महाराष्ट्री समाज दबला नाही. याचे कारण महाराष्ट्रातील संत परंपराच होय. उलट संत परंपरेनेच कधी-कधी इस्लामाला आपल्या प्रभावाखाली खेचल्याचे दृष्टोपत्तीस येते.[५]

मुख्यत: या शोधनिबंधाच्या माध्यमातून मराठा शासनव्यवस्थेच्या शेवटच्या पर्वात म्हणजे पेशवाईच्या अंतिम टप्प्यात महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक व राजकिय जीवनात स्थित्यंतरे होण्यास सुरुवात झाली. मराठा शासनव्यवस्थेची दोर पेशव्यांच्या हाती गेल्यानंतर त्यांनी मराठेशाहीला 'ब्राम्हणी दौलतीचे'स्वरुप दिले. पेशवे सर्वाधिकारी झाल्यानंतर त्यांनी ब्राह्मण जातीला, विशेषत: स्वत:च्या जातीला, श्रेष्ठत्व प्राप्त करुन घेतले. पहिला बाजीराव हा सर्वसग्राहक वृत्तीचा आणि उदारमतवादी होता. पण चिमाजीअप्पा आणि नानासाहेब पेशव्यांपासून पुढचे पेशवे हे सनातनी असून ब्राम्ह्णी धर्माचे पुरस्कर्ते होते. मध्यंतरी ब्राह्मण जातीचे लुप्त झालेले श्रेष्ठत्व पेशव्यांनी पुन्हा प्रस्थापित केले. हे करत असतांन पेशव्यांमध्ये सत्तेवरुन गृहकलह सुरु झाले, त्याचा परिणाम अन्य मराठा सरदारांवर झाल्याशिवाय राहिला नाही. राजकीय सत्तेबरोबरच जातीय व पोटजातीय वैमनस्येही फैलावली देशस्थ्- कोकणस्थ-क-हाडे या ब्राह्मणांतर्गत पोटजाती यांनी एकमेकांची अप्रतिष्ठा करणे: ब्राह्मनांनी कायस्थ् सोनार, सारस्वत इ. ब्रामह्मण्यावर हक्क सांगणा-या जाती व जातींचा तो हक्क नाकारणे, मराठा सरदारांची शूद्र म्हणून संभावना करणे आणि अतिशूद्रांना अमानुष वागणूक देणे इ. प्रकार वाढीस लागले.[७] या सर्व घडामोडींचा परिणाम महाराष्ट्रातील सामाजिक धार्मिक क्षेत्रावर होणे साहजिक आहे आतापर्यंत झालेल्या मराठा शासकांनी धार्मिक क्षेत्रात हस्तक्षेप करण्याचे टाळले होते त्याला पेशवाई अपवाद ठरली असे म्हणावे लागेल. राज्यकर्त्यांनी धार्मिक असावे पण धार्मांध नसावे असे म्हटल्या जाते. नेमके बाजीराव हेच येथे विसरला होता आणि आपल्या मनमर्जीप्रमाणे कारभार हाकू लागला. त्यामुळे मराठा सत्ता दुबळी होऊन त्याचा: परिणाम समस्त महाराष्ट्राला भोगावा लागला.

प्रस्तुत शोधनिबंधावर संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग केला असून, विश्लेषणात्मक व वर्णनात्मक मांडणी करुन वस्तुनिष्ठ पद्धतीने संशोधन करण्यात आले आहे.

विषयप्रवेश :

बाजीरावाच्या धर्माचरणाच्या बाबतीत समकालिनांचे असे मत आहे की, तो धार्मिक किंवा धर्मभीरु, नसून धर्मभोळा होता. स्नानसंध्या, उपास-तापास व तीर्थयात्र अशा बाह्यचरणावर व विधिनिषेधादी कर्मकांडावर त्याचा भर असे. ब्राम्हण श्रेष्ठत्वाचा अहंकार कदाचित त्याच्या सनातन धर्मविषयक चुकीच्या धारणेतूनही निर्माण झाला असेल ते काहीही असो, देवभोळेपणामुळे म्हणा किंवा पारलौंकिकाचे पाठबळ लाभले म्हणून म्हणा बाजींराव वारक-यांच्या विठ्ठल देवतेकडे आकृष्ट झाला व आषाढी, कार्तिकीची पंढरीची वारीही करु लागला. पंढरीक्षेत्रात गोपालपु-याजवळ त्याची राजवैभवयुक्त छावणी असे अर्थात पंढरीला येताना राजकीय डावपेचांचे

ISSN 2231 4342

जोडे पुण्यातच काढून ठेऊन यायचे तारतम्य तो कधीच दाखवू शकला नाही.[८] उलट वारीमध्ये राजकिय डावपेच आखू लागला बाह्मण विरुद्ध ब्राह्मनेत्तर असा भेद तो करु लागला ज्या सांप्रदायाने समाजाला समानतेची शिकवण दिली, जातिभेद विसरुन सर्वांना एका छताखाली आणण्याचा प्रयत्न केला ज्या ईश्वराने सर्व प्राणिमात्रांना निर्माण केले मग तो उच्चनिच असा भेदभाव करणार नाही, हा विचार संप्रदायाने मांडला श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व किंवा जातिभेद यांना थारा दिला नाही परमेश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, हा विचार वारकरी संप्रदायाने मांडला वारकरी संप्रदायाच्या संतांची नावे पाहिली तर त्यामध्ये सर्व समावेशकता दिसते ज्ञानदेव, नामदेव, चोखोबा, बंका महाराज, नरहरी सोनार, सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी, तुकोबा वाणी, एकनाथ आदी संत झाले. त्याचप्रमाणे मुक्ताबाई, जनाबाई, निर्मळा, कान्होपात्रा, बहिणाबाई या संत कवयित्रीही आहेत. या नावांना सांप्रदायिक महत्व आहे तसेच सामाजिक महत्वही आहे. त्या काळी स्त्री-शुद्रांना भक्ती करण्याचा किंवा मोक्ष मिळविण्याचा अधिकार नाही असे मानणा-या प्रस्थापितांवर वारकरी संप्रदायाने काठोर प्रहार केलेला आपणास दिसतो. [९] असा संप्रदायाचा इतिहास असतांनाही बाजीराव संप्रदायामध्ये जातिभेदाची बिजे रोवू पाहत होता.

बाजीराव पंढरीच्या वारीला जाऊ लागल्यामुळे त्याच्या एक गोष्ट लक्षात आल्याशिवाय राहिली नाही ती म्हणजे, तुकोबांची लोकप्रियता एरवीही बाजीरावाला आवडणारी सगन होणाजीसारखी लावणीकार मंडळी तुकोबांची चाहती होतीच. पण पंढरीचा हा सार्वजनिक साक्षात्कार अधिक विलक्षण होता. शुद्र संताने एवढे लोकप्रिय असावे आणि ब्राह्मणांनी अभंग शिरोधार्य मानावे याचे त्याला वैषम्य वाटले आणि ब्राह्मणांनी त्याचे अंभग म्हणू नयेत असा आग्रह त्याने धरला. या आग्रहाचा प्रयोग खुद्द पेशव्यांचे नातेवाईक बारामतीकर नाईक यांच्यावर झाला कारण ते स्वत: तुकोबांच्या अभंगाचे चाहते होते.[१०]

बाजीराव ऐवढ्यावरच थांबला नाही तर त्यांने तुकोबांच्या अभंगांना विरोध तर केलाच तथा खुद्द देहू संस्थानामधून त्याने तुकोबांच्या अभंगाच्या वह्या मागवून घेतल्या होत्या. त्यावेळी संस्थानात एकूण पाच वह्या होत्या. सरकारची आज्ञा म्हणून चार वह्या दिल्या व एक तुकोबांच्या हातची व इंद्रायणीत तरलेली म्हणून लपवली ती आजतागायत सुरक्षित आहे.[११]

शेवटी बाजीरावाच्या पतनाला निमित्त झाले, ते त्याने श्रीश्रेत्र पंढरीत करवलेले पापकृत्य म्हणजे, इंग्रजांचा पाठिंबा असलेला बडोद्याचा वकील गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचा खून आणि हे कृत्यही त्याने केले ते भर आषाढी वारीत, विठ्ठल मंदिराच्या परिसरात इंग्रजांना हे निमित्त पुरेसे झाले 'अनायसे झाले निमित्त पंढरपुरास कजाला संकट पडले काही सुचेना प्रधान पुण्याला' असे प्रभाकर म्हणतो: तर गंगाधरशास्त्रावरुन राज्याचा नाश झाला, असे सगनभाऊ सांगतो. पुढे फेब्रुवारी इ. स. १८१८ मध्ये पंढरीनजिक पंधरा मैलावरील आष्टी या गावी झालेल्या लढाईत पेशव्यांचे सेनापती बापू गोखले पडले आणि मराठेशाही बुडाली. या प्रसंगावर त्यानंतर लगेचच रत्नू केरु नावाच्या शाहिराने चंद्रभागेच्या काठी हनुमंताच्या पारावर बसून पोवाडा रचला त्यातही बाजीरावाच्या पंढरीच्या वारीचा उपहास आहे चला करु पंढरीची वारी हे धृपद असलेल्या या पोवाड्याचा विषय आहे 'पेशव्यांचे पतन व इंग्रजांचा विजय'. गंगाधर शास्त्र्यांसारख्या वेदशास्त्रसदाचारसंपन्न प्रतिष्ठित ब्राह्मणाला देवाच्या द्वारी

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

आषाढी वारीत मारला, हे बाजीरावाच्या विनाशाचे कारण अशी लोकसमजूतच शाहिरांच्या काव्यातून ध्वनित झाल्याचे दिसून येते.[१२]

पंढरीच्या संदर्भातील पेशव्यांच्या धोरणांचा परिणाम म्हणून की काय विठ्ठलाच्या उपासनेचेही ब्राह्मणीकरण होऊ लागले काशीनाथ उर्फ बाबा प्याध्ये यांनी विठ्ठलाचा संबंध ऋग्वेदाशी लावून विठ्ठलाच्या नित्योपचाराचीही वैदिक पद्धतीही सिद्ध केली. हे प्याधे म्हणजे प्रसिद्ध 'धर्मनिर्णयसिंधु' कार होत 'धर्मनिर्णयसिंधु' हे शुतिस्मृतिप्रणीत आचारधर्मांचे एक सोपे संहितीकरण होय. याच बाबा प्याध्यांच्या संमतीने मल्लाप्पा वासकर यांनी तुकाराम महाराजांच्या साडेचार हजार अभंगाचा गाथा कायम केला[१३] अशी माहिती 'निबंधमालेत' देण्यात आलेली आहे

वारकरी संप्रदाय हा कोण एका जातीपुरता मर्यादीत नव्हता तर आठरापगड जातींना सोबत घेऊन चालणारा हा संप्रदाय आहे. या संप्रदायाने सर्व जातीधर्मातील लोकांना भक्तीचा मार्ग मोकळा करुन दिला. सर्व जाती धर्मांतील लोकांना एका भक्तीच्या छत्राखाली आणल्याने शेकडो वर्षे सामाजिक विषमतेच्या चटक्यांनी होरपळून गेलेल्या समाजात एक प्रकारचे नवचैतन्य निर्माण झाले. भा. प. बहिरट म्हणतात, संतांनी जाती मोडण्याची चळवळ केली नाही तर, जातींच्या ज्या वर्णांच्या गटात समावेश होतो ती वर्णव्यवस्थाच समाज रचनेतील समाजस्वास्थासाठी चालत आलेली व्यवस्था आहे, हे ओळखून त्यातील मुरलेल्या निचोच्च भावाचा दोष काढून टाकण्याचा प्रयत्न केला. तर गं. बा. सरदार म्हणतात, शास्त्रप्रामाण्यास व जातीव्यवस्थेला धक्का न लावता वारकरी पंथाने स्त्री शुद्रादिकांना आत्मविकासाचा मार्ग खुला करुन दिला. [१४] वारकरी संप्रदायाच्या आचारांत सामाजिक नितिमत्तेची पातळी उंचावण्यावर अधिक भर दिला गेल्यामुळे, दया क्षमा शांती या उदात्त तत्वांबरोबरच सत्य आणि अहिंसा या दोन तत्वांच्या आधारे चारित्र्य संपन्न अशा समाज जीवनाची उभारणी होण्यास मदत झाली. मात्र समाजजीवनाच्या आड येणा-या अहिंसेलाही त्यांनी थारा दिला नाही. 'भले तरी देऊ कांसेची लंगोटी* नाठाळाचे माथां घालू काठी' ही तुकोबांची उक्ती याचीच निदर्शक आहे.[१५] तुकोबांनी 'भक्तियुक्त सांसारिक कर्तव्यकर्मांचा हा उपदेश सर्व समाजाच्या कल्याणकरीता व त्याला अविनाशी सुख मिळावे, संसार हिमतीने करता यावा आणि शेवटी ईश्वरप्राप्ती व्हावी म्हणून केलेला असल्यामुळे तो पुर्णपणे समाजसंबद्ध आहे भक्तीने मिळणारा हा आनंद भोगण्याचा अधिकार या मार्गाकडे वळणा-या सर्वांना आहे.[१६] मुळात वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान लिहीण्याची ही जागा नव्हे मुद्दा हा आहे की, वारकरी संप्रदायावर लिखाण करत असतांना संप्रदायाच्या तत्वज्ञानावर दृष्टि गेल्याशिवाय राहत नाही या लेखात बाजीराव आणि वारकरी संप्रदाय यावर कायम दृष्टी ठेवायची आहे.

इ.स १८१८ मध्ये पेशवाई बुडाली. धर्माची आवड असलेल्या अखेरच्या पेशव्यांची इंग्रजांनी ब्रह्मवर्ताला रावानगी करुन त्याला देवदेव करण्यासाठी पूर्ण वेळ उपलब्ध करुन दिला. बाजीरावाने संप्रदायात सुरु केलेला भेदभाव पेशवाईच्या अंतानंतर संपला असे नाही. वारक-यांचे मुख्य तीर्थक्षेत्र पंढरपूर असले तरी तुकोबांच्या काळापासून कितीतरी वर्षे देहू हेच त्यांचे केंद्रस्थान राहिले होते. तुकोबांचे कनिष्ठ पुत्र नारायण बाबा यांनी देहू

ISSN 2231 4342

देवस्थानचे संस्थान केले. विशेष म्हणजे त्यांनी 'ज्ञानेश्वर आणि तुकाराम'या भजनाची जोड दिली. ज्ञानदेव आणि तुकाराम या संयुक्त पालखीचा म्हणजे दोन्ही संतांच्या पादुका एकाच पालखीत ठेवून आषाढी वारीसाठी पंढरीला प्रतिवर्षी जाण्याचा उपक्रम इ स १८३२ पर्यंत उव्याहतपणे चालू होता या दरम्यान तुकोबांच्या वंशजांमध्ये मानपान व वहिवाटीच्या हक्कांवरुन तटे सुरु झाले. प्रकरण अगदी इंग्रजांच्या कोर्टात जाऊ लागले. त्यांचा परिणाम पालखी-सोहळ्यावर होवू नये म्हणून ग्वाल्हेरकर शिंद्यांचे सरदार हैबतराव आरफळकर यांनी ज्ञानदेवांची पालखी स्वतंत्रपणे आंळदीहून पढरीला नेण्याची प्रथा सुरु केली.[१७] वास्तविक वारकरी पंथाची ज्ञानदेव-तुकाराम ऐक्याची जी मुख्य भूमिका होती तिला यामुळे तडा गेला. देहूकर मंडळींनी या गोष्टी इतक्या थराला जाऊ द्यायला नको होत्या ज्ञानदेवांना तुकोबांपासून बाजूला नेल्यामुळे ज्ञानदेवांच्या माध्यमातून पंथाचे ब्राह्मणीकरण करणे सोपे झाले.[१८] यावरुन एक गोष्ट लक्षात येते की, बाजीरावाने सुरु केलेली ब्राह्मणीकरणाची प्रक्रिया पुढेही सुरुच राहीली, आणि त्याचा परिणाम संप्रदायाच्या एकतेवर झाल्यापासून राहिला नाही.

निष्कर्ष:

प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून वारकरी संप्रदायात कशाप्रकारे स्थित्यंतरे झाली याचा प्रत्यय येतो. अठराव्या शतकापर्यंत संप्रदायामध्ये राज्यकर्त्यांनी फारसा हस्तक्षेप केला नाही. मात्र एकोणिसाव्या शतकात परिस्थिती काहीसी बदलण्यास सुरुवात झाली. बाजीरावाच्या धोरणामुळे संप्रदायाच्या एकतेवर प्रघात झाला. आणि ब्राह्मण विरुद्ध –ब्राह्मणेत्तर असा भेद होवू लागला. त्याचा परिपाक म्हणून की काय पूढील काळातही त्याची पुनरावृत्ती होऊ लागली. मध्यंतरीच्या काळात संत चळवळीमुळे पुरोहितशाही मागे पडली होती, ती आता पुन्हा डोके वर काढू लागली.

ISSN 2231 4342

संदर्भ सूची :

१) सरदार, गं. बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलशुती, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दहावी आ. २०१९ पृ. १७-१८

२) तत्रैव, पृ ४८-४९

३) पठाण, यू. म. मध्ययुगीन संतसाहित्य काही आयाम, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ, २००३. पृ. ९०

४) सुंठणकर, बा. रं, महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य, लोकवाङ्मय गृह, मुंबई, चौ. आ., २०१७ पृ. ८३

५) तत्रैव, पृ. ८३

६) तत्रैव, पृ.१०१

७) व्होरा राजेंद्र (सं.) मोरे सदानंद (ले़) आधुनिकता आणि पंरपरा: एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र, पतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००० पृ. २८

८) तत्रैव, पृ.२९

९) लोकराज्य — ऑगस्ट -२०१८, मधील ‘‘वारी एक आनंदयात्रा’ हा संदेश भंडारे यांचा लेख पृ.17-18

१०) व्होरा राजेंद्र, पूर्वोक्त, पृ. २९

११) मोरे, सदनंद. तुकाराम दर्शन, सकाळ प्रकाशन पुणे, पुन: प्रकाशन २०१४- पृ. १९५

१२) तत्रैव पृ 195.

१३) साठे, वासुदेव विनायक (सं) कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची निबंधमाला, चित्रशाळा प्रेस, पुणे. १९२६ पृ ४८१

१४) Historicity Research Journal, Vol. 3, Issue 2, Oct-2016, P 2.

१५) गोसावी , र. रा. पाच भक्तिसंप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, तृ. आ., २००८, पृ. २६६.

१६) पेंडसे, शं. दा. महाराष्ट्राचा भागवतधर्म साक्षात्कारी संत तुकाराम, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृ. आ. २०१९, पृ. १५४

१७) व्होरा राजेंद्र, आधनिकता आणि परंपरा, पूर्वोक्त पृ. ३४.

१८) तत्रैव. पृ. ३५

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

कारंजा लाड शहरातील ऐतिहासिक वास्तूंचे अध्ययन

अजिंक्य राजेंद्र वानखडे
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,
अमरावती.
एम. ए . इतिहास (द्वितीय वर्ष)
मो. न. ७७७३९८९७६४
इमेल. ajinkyawankhade24@gmail.com

कारंजा लाड हे महाराष्ट्रातील वाशीम जिल्ह्यातील नगरपरिषद असलेले एक शहर आहे. या अत्यंत प्राचीन असलेल्या नगरीचे महात्म्य स्कंदपुराणातील पातालखंडात आले आहे.[१]करंजऋषी वरूनच या नगरीला करंजपूर हे नाव मिळाले असे म्हणतात. करंजपुरचे कार्यरंजकपूर आणि नंतर कारंजा झाले. या नगरीत जैन लाड समाजाची वस्ती असल्याने 'कारंजा लाड' असा या गावाचा उल्लेख केला जातो. अलीकडे हे शहर विदर्भातील "गाणगापूर" म्हणून ओळखले जाते.[२]

वाकाटकपूर्व राजवटीपासून ते देवगीरीचे यादव,मोगल,निजामशाही,इमादशाही,नागपूरकर भोसले अशा अनेक राजवटी या नगरीने अनुभवल्या आहेत, या स्थानाचे प्राचीन महात्म्य दाखविणारी 'श्रीकरंजमहात्म्य' नावाची संस्कृत पोथी उपलब्ध आहे. या पोथीनुसार या स्थानाचे नाव वशिष्ठ ऋषीचे शिष्य असलेल्या करंज नामक ऋषीशी निगडीत आहे.[३] कारंजा येथे हस्तलिखित जैन ग्रंथाचे मोठे भांडार आहे. आतापर्यंत किल्ला म्हणून ओळखली जाणारी एक गढी अस्तित्वात होती. तिथे आता बिबिसाहेब दर्गा आहे. त्याचा दरवर्षी उरुस निघतो. या लगतच्या भागाला बिबि साहेबपुरा असे म्हणतात.[४] अहमदनगरच्या बादशहाच्या मुलीला स्त्रीधन म्हणून कारंजा आंदण दिले होते.

छत्रपती शिवरायांचे स्वराज्य कोकण व पश्चिम महाराष्ट्रात तसेच दक्षिणेपर्यंत पसरलेले होते. विदर्भातील संपन्न असा वऱ्हाड प्रांत मात्र शिवरायांच्या ताब्यात कधी आला नाही. काळी कसदार जमीन, मुबलक पाणी असल्यामुळे या प्रांताला वऱ्हाड अन सोन्याची कुऱ्हाड अशी म्हण प्रचलित झाली होती. याच वऱ्हाड प्रांतातील कारंजा शहर हे मोगल काळातील महत्वाची व्यापारपेठ व लष्करी ठाणे होते. छत्रपती शिवरायांनी दुसऱ्यांदा सुरतेची स्वारी केल्यावर वणी-दिंडोरी-जळगाव मार्गे आपला मोर्चा कारंजाकडे वळवला आणि कारंजा शहराची लूट केली तत्पूर्वी महाराजांनी बाळापूरचा किल्ला हस्तगत केला. ही सर्व संपत्ती वाहून न्यायला महाराजांना चार हजार बैल लागले.[५]

कारंजा येथे जवळपास सर्वच जातीधर्माचे लोक राहतात. येथील चारही वेशीच्या आतमध्ये मुळ गाव असून येथे बारा बलुतेदारांच्या वस्त्या आहेत त्यात साळीपुरा,माळीपुरा,कुंभारपुरा,तेलीपुरा,कासारपुरा,वाणीपुरा,इत्यादी आहेत. शहराचा मोठा विस्तार झालेला असून गावाशेजारीच नवीन वस्त्यांची उभारणी झालेली आहे. शहराच्या मुख्य

बाजारपेठेत खेड्यापाड्यातील नागरिकांची मोठी वर्दळ असते. शहराची आणखी एक ओळख म्हणजे कारंजा शहर हे वाशीम जिल्ह्यातील विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. या शहरात जैन समाज बांधवांच्या शाळा फार प्रसिद्ध आहेत. त्यामधे जयकुमार देविदास चवरे उर्फ जे.डी.चवरे विद्यामंदिर जे.सी.चवरे विद्यालय आहे . समंतभद्र महाराजांनी यांनी १९१८ मध्ये महावीर ब्रह्मचर्याश्रम हे जैन गुरुकुल पद्धतीने शिक्षण देणारे आश्रम स्थापन केले. तसेच विधवा आणि निराधार महिलांसाठी कंकूबाई श्राविकाश्रमाची स्थापना केली.

१) कान्नव हवेली

पोहा वेशीच्या वायव्येस शहरातील अत्यंत प्रसिद्ध अशी श्री कान्नव यांची हवेली आहे. १२१ वर्षापूर्वी सोने १७ रुपये तोळा होते त्यावेळी हा बंगला साडेतीन लाख रुपये खर्च करून बांधण्यात आला.कारंजा येथील कृष्णाजी कान्नव व्यापाराच्या निमित्ताने नेहमी मुंबईला जायचे. तेथिल ब्रिटीश व पोर्तुगीज शैलीतील वास्तू पाहून आपला बंगला बांधण्यास सुरुवात केली.१८९९ साली सुरवात केलेला हा बंगला १९०३ सालापर्यंत तयार झाला. या बंगल्याचा पाया खोदताना काळी माती असल्याने प्रत्येक आठ फुटांवर सहा इंचाचा शिशाचा थर टाकण्यात आला. त्याकाळी ब्रह्मदेशातील सागवानाचे लाकूड बांधकामासाठी सर्वोत्कृष्ट समजले जायचे. इंग्लंडच्या महारानीचा दिवाणखाना याच लाकडानी सजला आहे . या बंगल्याचे खांब एकसंघ बर्माटिकवूडचे आहेत.राजस्थानी कारागिरांनी बारीक नक्षी कोरून त्याला चार चांद लावले आहेत. बंगल्याचे विटाचुन्याचे बांधकाम काठेवाडी कारागिरांनी केले आहे .रंगरंगोटी मुंबई येथील प्रख्यात विठोबा पेंटर यांनी केल्याचा उल्लेख आहे ,बंगल्याचे प्रवेशद्वार सभामंडपासारखे आहे. समोरचे दोन्ही नक्षीदार स्तंभ कित्येक टन वजन असलेल्या ओतीव बीडाचे आहेत. [६]

फरसबंदी ही त्याकाळात दुर्मिळ असलेल्या इटालियन मार्बलचे आहे ,इटालियन मार्बल वापरणारे त्या काळातील कान्नव हे एकमेव गृहस्थ होते. वास्तूच्या मधोमध दोन्ही दालनांना लागून ३० बाय ३० चौरस फुटाचा चौक आहे. दुसऱ्या माळयावर ५० बाय ४० फुटांचा दिवाणखाना आहे. ही भौतिक श्रीमंती पाहिल्यानंतर हा बंगला पाहनाऱ्याशी बोलू लागतो. या बंगल्याची अलौकिक संपन्नता डोळे दिपवणारी आहे . दिवाणखान्यात कधीकाळी लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर बसले होते . याच दिवाणखान्यात कधी सतारीचे स्वर दरवळले ,तर कधी बालगंधर्वांचे नाट्यपद निनादून गेले . मास्टर दिनानाथांचा मालकंस रुनझुनला, बालगंधर्व,भाटेबुवा,शिरगोपीकर यांच्या खास मैफिली याच बंगल्यात रंगल्या. हिराबाई बडोदेकर,पंडित नारायण व्यास , जगन्नाथबुवा पंढरपूरकर , मनोहर बर्वे , केशवराव भोळे, पंडित दिनानाथ मंगेशकर यांचे स्वरही या दिवाणखान्यात अनुभवले.

दिनानाथ मंगेशकर यांची कंपनी कारंज्यात आली असता लता मंगेशकर ह्यांचा निवास कान्नव बंगल्यात होता. कीर्तन महोत्सवामध्ये घोंगडेबुवामहाराज कराडकर ,कोल्हटकर, पाठक,हिरवळकर,आयाचीतकर,निजामपूरकर,भालेराव,कुळकर्णीबुवा इत्यादी प्रसिद्ध कीर्तनकारांची कीर्तने या बंगल्यात झाली . केशवराव भोळ्यानसारख्या मराठी संगीतातील तालेवार गायकांची

ISSN 2231 4342

मैफिलही इथे सजली प्रत्येक मैफिलीनंतर कान्नवांकडे वऱ्हाडी परंपरेनुसार पुरणपोळीची पंगत असायची. एकदा केशवराव भोसल्यांसाठी मसाल्याची आमटी (सार) बनविली केशवरावाना ती एवढी आवडली की ते चक्क दहा वाट्या आमटी प्यायले परिणामी, घसा खराब होउन रात्रीची मैफल रद्द करावी लागल्याचा उल्लेख खुद्द केशवरावांनी एका दिवाळी अंकात केला होता.

कृष्णाजी कान्नवानी हा बंगला बांधल्यानंतर या बंगल्याची महती पार सातासमुद्रापार गेली. इंग्रजांच्या राजवटीत भारत आणि श्रीलंका हे दोन्ही त्यांच्या आधिपत्याखाली होते. तेव्हा श्रीलंकेच्या व्हाईसरॉयच्या निवासस्थानाच्या बांधकामासाठी कान्नवांच्या बंगल्यांचे बांधकाम करनारे कारागीर जहाजाने सिलोनला पाठविण्यात आले तिथे या बंगल्याची प्रतिकृती उभी राहिली व्हाइसरॉय हाउस म्हणून ओळखले जाणारे हे निवास्थान श्रीलंका स्वतंत्र झाल्यानंतर तिथले पहिले राष्ट्राध्यक्ष सिरिमाओ भंडारनायके यांचे शासकीय निवास्थान झाले.

२) कस्तुरी हवेली

मध्ययुगीन कालखंडात कारंजा शहर ऐश्वर्यसंपन्नतेच्या शिखरावर होते याची साक्ष देणारी कस्तुरी हवेली होय. लेकुर संगई नावाचा धनाढ्य व्यापारी कारंजा शहरात राहत होता. त्याने आपल्या वाड्याचे बांधकाम हाती घेतले होते तेव्हा उंटावरून कस्तुरी विक्रीसाठी घेऊन जाणाऱ्या व्यापाऱ्याला त्याने कुतुहलापोटी कस्तुरीची किंमत विचारली असता त्याने तुला परवडणार नाही असे उत्तर दिले त्या गर्विष्ठ व्यापाऱ्याचे गर्वहरण करण्याच्या हेतूने लेकुर संगईने त्याच्याजवळ असलेली सर्व कस्तुरी विकत घेतली आणि आपल्या वाड्याच्या बांधकामात वापरली . त्या कस्तुरीचा सुगंध हा वाड्याच्या भोवतीच्या गल्ली बोळातून दरवळत असे अशी आख्यायिका आहे. सद्यस्थितीत मात्र या हवेलीची अतीशय दुर्दशा झालेली असून त्याठिकाणी बाराद्वारी नावाची विहीर असून ज्यातून बारा वाटा निघतात इतकेच शिल्लक आहे.

३) नगरपालिकेची इमारत

कारंजा येथे नगरपालिकेची स्थापना १/४/१८९५ साली झाल्याचे प्रवेशद्वारावर अंकित आहे.सध्याची नगरपालिकेची इमारत ही कारंजा शहराचे तत्कालीन सुभेदार सुभान खान यांची गढी होती त्यांच्या नावाचा उर्दू भाषेतील उल्लेख नगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर अंकित केल्याचे दिसून येते याचठिकाणी हमामखाना म्हणजेच स्नानगृह होते तर त्याच्यासमोरच असलेल्या पोलीस ठाण्याची वास्तू म्हणजे हत्तीखाना असल्याचे सांगितले जाते .

४) जयस्तंभ चौक

१९४२ च्या चलेजाव आंदोलनात गांधीजीच्या मार्गदर्शनात तत्कालीन कारंजेकरानी सहभाग नोंदविला. जे.डी.चवरे विद्यामंदिरातील शिक्षक देवराव पासोबा काळे ह्यांनी इंग्रज सरकारविरुद्ध भाषणे दिली त्यामुळे त्यांना तेरा महिन्याचा तुरुंगवासही भोगावा लागला याच शाळेचे विद्यार्थी अवधूत शिंदे आणि उत्तमराव डहाके यांनाही तुरुंगवास भोगावा लागल्याचे नमूद आहे या चळवळीतील २०

ISSN 2231 4342

स्वातंत्र्यसैनिकांची नावे असलेला दगडी खांब स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्य जयस्तंभचौकात लावण्यात आला होता. आता तो जेसीज गार्डनमध्ये हलविण्यात आला आहे.

५) चार वेशी

कारंजा शहर हे वऱ्हाडातील व्यापाराचे प्रमुख केंद्र होते आक्रमणकर्त्यांच्या आक्रमणाचा सतत धोका असल्यामुळे बहामनी शासनकाळात शहराला तटबंदीची उभारणी करण्यात आली यासोबतच शहराच्या चार दिशांना चार प्रवेशद्वार उभारण्यात आले काळाच्या ओघात तटबंदी ढासळली असली तरीसुद्धा चारही वेशी आपले अस्तित्व टिकवून आहे या वेशीपैकी उत्तरेला दिल्ली वेश , दक्षिणेला मंगरूळ वेश, पूर्वेला दारव्हा वेश आणि पश्चिमेलापोहा वेश आहे . दिल्ली वेशीचे मुळ नाव फैझ दरवाजा आहे या वेशीवर 'बहाउद्दिन शाह वली मोहम्मद शाहउद्दीन परवेज अब्दुल वाहेद' असा उल्लेख आहे. हे तत्कालीन वेशींची निर्मिती करणाऱ्याचे नाव असावे असे जाणकार सांगतात या चारही बेशीच्या सौंदर्यीकरणासाठी निधी उपलब्ध झाला असून त्यापैकी मंगरूळ वेशीचे काम पूर्ण झाले असून पोहा वेश आणि दिल्ली वेशीचे काम प्रगतीपथावर आहे तर दारव्हा वेशीचे काम लवकरच सुरू होणार आहे तसेच पुरातत्व खात्याने या चारही वेशीना राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा दिला आहे .

६) जैन मंदिरे

कारंजा शहरात जैन समाजाची प्रामुख्याने वस्ती आहे. कारंजा शहर जैनाची काशी म्हणून देखिल ओळखल्या जाते. कारंज्यात तीन प्रमुख जैन मंदिरे आढळून येतात.

अ) दिगंबर जैन पार्श्वनाथ स्वामी सेनगण मंदिर .

आ) मुलसंघ चंद्रनाथ स्वामी दिगंबर जैन मंदिर .

इ) चंद्रनाथ स्वामी काष्ठसंघ दिगंबर जैन मंदिर .

प्राचीन काळी सेनगण, काष्ठसंघ आणि बालात्कर गण नावाने तीन भट्टारकांच्या गादया होत्या सेनगण सबंधित मंदिरामध्ये भगवान पार्श्वनाथ यांची मुलनायक प्रतिमा आणि ६२ पाषाण व ४९ धातू प्रतिमा आहेत. येथे नंदीश्वर दीप ग्लासमध्ये बनविला गेला आहे . काष्ठसंघाच्या मंदिरात भगवान चंद्रप्रभूजींची पद्मासन घातलेली मुद्रा आहे आणि लाकडाचा ४२ स्तंभाचा मंडप दर्शनीय आहे. बालात्कार गण मंदिरात चंद्रप्रभूची प्रतिमा आणि जीनालय आहे. [७]

७) हिंदू मंदिरे

अ) मोठे श्री राम मंदिर

श्री तुकाराम भगवान कान्नव ह्यांनी २८ एप्रिल १८७६ साली स्थापन केलेले मोठे श्रीराम मंदिर अतिशय प्रसिद्ध आहे. ह्या मंदिराचा मुख्य प्रवेशद्वाराचा आकार हा धनुष्यबाणाच्या आकाराचा आहे. तसेच सुर्योदयावेळी सूर्यप्रकाश थेट राम,लक्ष्मण, सीता यांच्या मुर्तीवर पडतो तशी व्यवस्था

ISSN 2231 4342

देखील करण्यात आली आहे. दरवर्षी रामनवमीनिमित्ययेथे मोठी यात्रा भरत असते. तसेच मंदिरासमोर तुकाराम कान्नव यांची समाधी आहे .

ब) रामदास स्वामीच्या शिष्यांचे दोन मठ आहेत. रोकडाराम म्हणून ओळखला जाणारा बाळकरामाचा मठ आणि दुसरा प्रल्हाद महाराजांचा मठ आहे.

क) प्राचीन सिद्धेश्वर मंदिर आणि शिवायनम: मठ देखील आहे . याशिवाय बालाजी मंदिर ,प्राचीन खोलेश्वर मंदिर , हरिहर मंदिर , बाराभाऊ राम मंदिर इत्यादी मंदिरे आहेत.

८) श्रीगुरूमंदिर

थोर दत्तावतारी नुर्सिंह सरस्वतीचे जन्मस्थान म्हणुन कारंजा लाड शहर प्रसिद्ध आहे.[८]याच करंजनगरीत श्री नुर्सिंह सरस्वती शके १३०० च्या सुमारास जन्मास आले. श्री गुरूच्या जन्म स्थानाचा शोध अलीकडेच लागला सध्याच्या गुरु मंदिराशेजारी घुडे यांचा वाडा आहे. बाळकृष्ण श्रीधर घुडे यांनी नगरनाईक काळे यांच्याकडून हा वाडा सन १८८० च्या सुमारास विकत घेतला. काळे यांचे वंशज सध्या काशीस असतात. यापैकी कोणालाच श्रीगुरुंच्या जन्मस्थानाची कल्पना नव्हती. हा वाडा चार मजली,भव्य व प्रेक्षणीय आहे .भिंतीची रुंदी चार फुटापासून सहा फुटापर्यंत आहे . दुसऱ्या मजल्यावर श्री गुरूच्या जन्मस्थानाची जागा आहे या वाड्याच्या शेजारच्या जुन्या माडीवर एक रात्र राहण्याचा योग आला असता श्री वासुदेवानंदाना श्री गुरूच्या वास्तव्याचा अंदाज आला.

मंदिर बांधण्यास प्रारंभ करण्यापूर्वी प्रथम पायाशुद्धी करण्यात आली त्याकरिता नाशिकचे रहिवासी श्री अण्णाशास्त्री वारे व श्रीधरशास्त्री तसेच काशीचे दोन विद्वान ब्राम्हण यांना पाचारण करून शास्त्रोक्त विधीपूर्वक काही ताम्रपट मंदिराच्या पायामध्ये ठेवण्यात आले . शके १८५५ मार्गशीर्ष मंदिराची कोनशीला बसविण्यात आली दिनांक ३ डिसेंबर १९३३ ह्या दिवशी दत्त जयंतीच्या मुहूर्तावर मंदिराच्या बांधकामास सुरुवात झाली . मुंबईवरून स्थापत्यशास्त्र निपुण श्री . आचरेकर यांना बोलाविण्यात आले होते. केवळ चारच महिन्यात मंदिराचे काम पूर्ण झाले.मंदिराकरिता लागणारे दरवाजे, खिडक्या, संगमरवरी दगड इत्यादी सामान मुंबईहून आणण्यात आले होते.

जयपूर येथून श्रीनुर्सिंहसरस्वतीची संगमरवरी पाषाणाची नयनमनोहर मूर्ती तयार करून ती श्री ब्रम्हानंद स्वामीनी मोटारीतून कारंजात आणली. शके १८५६ चैत्र शुद्ध १३ ला दिनांक १/४/ १८३४ ला मूर्तीची मंदिरात प्राणप्रतिष्ठा केली. त्याचबरोबर श्री दत्तात्रय , श्री चिंतामणी गणपती , श्री काशीविश्वेश्वरयांचीही स्थपना करण्यात आली.

कारंजा नगरीत ई.स.१३७८ मध्ये श्री दत्तात्रयाचा दुसरा अवतार समजल्या जाणाऱ्या नुर्सिंह सरस्वती स्वामींचा जेथे जन्म झाला त्या वासुदेवानंद सरस्वती यांनी शोधून काढलेल्या जन्मस्थानी स्वामीच्या अवतार तिथीपासून म्हणजे पौषशुद्ध द्वितीयेपासून ते माघ वद्य प्रतीपदेपर्यंत ४५ दिवस उत्सव साजरा केला जातो.तसेच शहरात नुर्सिंह सरस्वतीची पालखी काढण्यात येते.

 ISSN 2231 4342

९)व्यायामशाळा

कारंजा शहराला व्यायामशाळांचा मोठा इतिहास आहे सन १९०३ साली 'गवळीपुरा आखाडा'या नावाने व्यायामशाळेचे उद्घाटन खैरु उस्ताद शेकुवाले यांच्या हस्ते करण्यात आले, नंतर सन २००१ मध्ये व्यायामशाळेचे नाव शहीद अब्दुल हमीद व्यायामशाळा असे ठेवण्यात आले. याशिवाय लोकमान्य व्यायामशाळा ही देखील प्रसिद्ध व्यायामशाळा आहे ह्या इथे लेझीम , लाठीकाठी चे प्रशिक्षण देण्यात येते. याशिवाय जय बजरंग व्यायामशाळा शिवाजीनगर , श्रीराम आखाडा, महाराणा प्रताप व्यायामशाळा,महात्मा फुले व्यायामशाळा इत्यादी व्यायामशाळा आहेत.

१०)कृषी उत्पन्न बाजार समिती

कारंजा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना १८८६ मध्ये झाली. येथील कृषी उत्पन्न बाजार समिती ही आशिया खंडातील पहिली कृषी उत्पन्न बाजार समिती आहे. वऱ्हाडातील पांढरे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसाचा व्यापार येथे मोठ्या प्रमाणात होत होता. तसेच १९०४ मध्ये कापसाच्या वाहतुकीसाठी ब्रिटीशांनी मुर्तीजापूर-कारंजा-यवतमाळ ही (narrow gauze)शकुंतला रेल्वे सुरु करण्यात आली होती .

शोधनिबंध सादर करण्याचा हा पहिलाच प्रयत्न असल्याकारणाने सर्व ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन त्यांचा अभ्यास करून त्यांचे ऐतिहासिक महत्व जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

संदर्भसूची:-

१. स्कंदपुराण—गीता प्रेस गोरखपूर
२. श्रीकरंजमहात्म्य —श्री नुर्सिंह सरस्वती स्वामी महाराज संस्थान कारंजा लाड
३. श्रीकरंजमहात्म्य —श्री नुर्सिंह सरस्वती स्वामी महराज संस्थान कारंजा लाड ,मंगेश प्रकाशन, नवी रामदास पेठ नागपूर पान क्रमांक ४
४. प्राचीन विदर्भ व आजचे नागपूर — वि.भी. कोलते
५. राजा शिवछत्रपती उत्तरार्ध - बाबासाहेब पुरंदरे
६. www.eskal.com राम चौधरी दि.१५मे२०२०.
७. www.jaintourism.com
८. www.dattamaharaj.com

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

नविन कृषिविधेयक-फायदे—तोटे

प्रा. डॉ. कार्तिक पोळ
अर्थशास्त्र विभाग
यशवंतराव चव्हाण महाविदयालय
तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

1) प्रस्तावणा-आपला देश कृषी प्रधान आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून 73 वर्षे झालेलने असताना सुध्दा देशातील 60 टक्के लोक शेती व्यवसाय करतात. 1950-51 मध्ये 27 कोटी लोक शेती व्यवसाय करीत होते. तेच प्रमाण सध्या 81 कोटी लोक शेती व्यवसाय करतात. देशामध्ये औदयोगिकीकरणाचा वेग कमी असल्यामुळे व सेवाक्षेत्रातही रोजगाराच्या संधी कमी असल्या मुळे नाईलाजास्तव किंवा उत्पन्नाचे दुसरे कोणतेही सधन नसल्यामुळे अतिरिक्त लोकांना शेती व्यवसायाशिचाय पुसरा पर्याय नाही. सध्या देशातील 60 टक्के लोक व्यवसायकरातात परंतु राष्ट्रीय उत्पन्नात हिस्सा फक्त 13.70 टक्के आहे. याचे कारण शेतीतील आदानाच्या किमती भरमसाठ आढलेल्या असून त्याप्रमाणात शेतमालाच्या किमती वाढलेल्या नाहीत. यामुळे शेतीमध्ये नुकसानीचे प्रमाण पाढल्यामुळे शेतकऱ्याच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. शेतकऱ्याच्या मालाला चांगला भाव मिळावा व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण मकी व्हवे यासाठी केंद्रसरकारने 20 सप्टेंबर 2020 रोजी कृषी क्षेत्राशी संगंधित तीन विधेयक मंजूर केले. त्या कायदयांना जास्त करून पंजाब व हरियाणाया राज्यातील शेतकऱ्यांचा विरोध आहे. 26 जानेवारी 2021 रोजी प्रजासत्तक दिनी या अरांदोलनाला हिंसक वळण लागले. दि. 9 फेब्रुवारी 2021 रोजी या आंदोलनाला 75 दिवस पुर्ण झालेले असताना सुध्दा हे आंदोलन संपलेले नाही.

2) संशोधनाची उदिष्टये—

1) नविन कृषी विधेयकाच्या तरतुदी.
2) नविन कृषी विधेयका संबंधी सरकारच्या बाजूचे मते.
3) नविन कृषी विधेयक विरोधकांच्या बाजुचे मते.

3)संयाोश्रपध्दती—प्रस्तुत शोध निबंधात व्दितीय साधन सामुग्रीचा आधार घेतलेलो आहे. संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, वेगवेगळया वेबसाईट इ. चा आधार घेतला आहे.

4)नविन कृषी विधेयक तरतुदी—

योतकरी उत्पादने, व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहनवसुविधा), शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार, अत्यावश्यक वस्तू (दुरूस्ती) दकायदा.

केंद्र सरकारने शेती क्षेत्राशी संबंधीत तीन अध्यादेश आणले होते. ज्याचे रूपांतर आता कायदयात करण्यात आले आहे. या कायदयातील तरतुदी खालील प्रमाणे.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

1पहिला कायदा –शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सयुविधा) कायदा 2020.

हा कायदा कृषी मालाच्या विक्री संबंधी तरतुदी करतो. यातील प्रमुख तरतुदी खालील प्रमाणे.

1 कृषी उत्पन्न बाजार समितीने देलेल्या बाजारबाहेर ही मालाची खरेदी-विक्री.

2 कृषी मालाच्या राज्यांतर्गत व आंतरराज्य हालचालीतील अडथळे दुर करणे.

3 मार्केटींग आणि वाहतुक खर्च कमी करून शेतकऱ्यांना अधिक चांगली किंमत मिळवून देणे.

4 ई-ट्रेडिंगसाठी व्यवस्था उपलब्ध करून देणे.

शेतकऱ्यांना चांगली किमंत मिळावी आणि त्यांच्या मालाला लवकरात लवकर गिऱ्हाईक मिळावा यासाठी या सुविधा केल्या जात असल्याच सरकारच म्हणणे आहे. पण या बछदल कांही आक्षेपही आहेत.

विरोधकांचे आक्षेप काय आहेत.

1 APMC बाहेर विक्री झाल्यास बाजार शुल्क न मिळाल्याने राज्यांचनुकसान होईल.

2 बाजार समित्या हछदपार झाल्यास मध्यस्थ अडते यांचे काय होणार.

3. किमान आधार भुत किंमतीची यंत्रणा, यामुळे मोडकळीस येईल.

4.e – NAM सारख्याईट्रेडींग यंत्रणा बाजारावर अवलंबुन असतात. बाजारच नामशेष झाले तर त्या कशाचालतील.

2. दुसराकायदा-शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषि सेवा करार कायदा– 2020.

हा कायदा कंत्राटी शेतीबद्दल बोलतो. शेतक-यांना ते घेत असलेल्या पीकासाठी आगाऊ स्वरुपात करार करता येण्याची तरतुद यात केलेली आहे. भारतात सध्या हि कांही प्रमाणा अशा प्रकारचे शेती पाहायला मिळते. पण याला कायदेशिर स्वरुप देण्याचा प्रयत्न आहे.

1आपल्या पिकासाठी घाऊक विक्रते, प्रोसेसिंग इंडस्ट्री कंपन्याशी करता येईल. त्यासाठी किंमत ठरवता येईल.

2.5 हेक्टर पेक्षा कमी जमिन असणा-या शेतक-यांना कंत्राटाचा फायदा होईल.

3. बाजार पेठेतल्या अस्थिरथेचा भार शेतक-यांवर नाही त्यांचा भार कंत्राटदारांवर राहिल.

4. मध्यस्थांना दुर करुन शेतकरी पूर्ण नफा मिळवु शकतात.

विरोधकांचाआक्षेप

शेती क्षेत्राचा उदारीकरण करण्याचा हा प्रयत्न आहे. असे ही म्हटले जातय पण यात खरच शेतकरी फायदा करुन घेऊ शकतील का हि शंका उपस्थित केली जात आहे.

1.कंत्राटी वयवसथेत शेतकरी सखमपणे वाटाधार्टी करू शकतील का.

2अनेक लहान लहान शेतकऱ्यांशी करार करण्यात व्यावसायि कर सदाखवतील का.

3 तिसरा कायदा–

अत्यावश्यक वस्तू (दुरूस्ती) कायदा 2020. Essential commodities (Amendment)Bil – ò

ISSN 2231 4342

म्हणजे अत्यावश्यक वस्तु (दुरूस्ती) विधेयक हा तिसरा कायदा आहे. ज्यावरून वाद होतोय सरकारने अनेक कृषी उत्पादने या यादीतून वगळण्याचा निर्णय घेतला आहे. याच्या ता‌ुदीखालील प्रमाणे.

डाळी, कडधान्य, तेलबिया, कांदा, बटाटे, यांना अत्यावश्यक वस्तुंच्या यादीतून वगळणे यामुळे साठाकरण्यावर निर्बंध राहणार नाहीत.

अपवाद युध्द सदृश्य असामान्य परिस्थिती—

1 निर्बंध कमी झाल्याने परकीय गुंतवणूक तसेच खासगी गुंतवणूक दाराचा ओघ वाढेल.

2 किमती स्थिर राहण्यात मदत होइल . ग्राहक व शेतकरी दोघांचा फायदा होइल.

या तरतुदीमुळे शेतकऱ्यांचा नुकसान ओइल असाच आरोप केला जातो. नेमके काय आक्षेप आहेत ते खालील प्रमाणे—

विरोधकाचे आक्षेप—

1 मोठया कंपन्या वाटअेल तेवढा साठा करू शकतील.

2 शेतकऱ्यांना कंपन्यांच्या सांगण्या प्रमाणे उत्पादन करावे लागेल आणि कमी किंमत मिळण्याची भीती आहे.

3 कांदा निर्यात बंदी सारख्या निर्णयामुळे हा कायदा अमलात आणला जाईल या बददल साशंकता आहे.

5 कायदे करण्यामागे भारत सरकारची भूमिका—

1 शेती लहानत कडयात विभागली गेल्याने सलग होत नाही.

2 लहरी हवामानाला शेतऱ्यांना तोंड देता यावे.

3 किती पिकेल व काय भावाने विकेल या चिंतेतून शेतकऱ्याला सोडविणे.

4शेतीमध्ये मोठया उदयोज कांनी भांडवल गुंतवावे. दर्जेदार पिक तयार करून परदेशी विकता यावे व शेतीचे उत्पन्न वाडावे.

5 कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जाचक अटी काढून टाकण्यासाठी तसेच शेतकऱ्याला त्याचा शेतमाल त्याला हवे असणाऱ्या व्यापाराला विकता येण्यासाठी मुभा मिळणेसाठी.

6 शेती पूरक उदयोगा बरोबर शेतकरी थेट जोडला जावा, शेतमाल विकला जाण्यासाठी खर्च कमी करता यावा.

7जास्तीचेपिक-शेतमाल साठवून ठेवण्यासाठी गोदामे व शीत गृहे तयार करता यावीत, शेतमालावर प्रक्रीया करून तो परदेशी पाठवता यावा.

8 गोदामे, शीतगृहे, प्रक्रीया, मालाची परदेशी पाठवण आणि विक्री यात खासगी गुंतवणूकदारांनी त्यांची गुंतवणूक करावी यासाठी त्यांना आकर्शीत करण्यासाठी वरील प्रमाणे हे मूसमोर ठेवून ते पुर्ण करण्यासाठी हे तीन कायदे झाले आहेत.

ISSN 2231 4342

मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्टीट करून म्हटलं की, आत्ता पर्यंत खरेदी-विक्रीची जी व्यवस्था सुरू होती त्यात शेतकऱ्यांचे हातपाय बांधलेले होते. जुन्या कायदयाच्या आडून ताकदवान टोळ यातयार झाल्या होज्त्या. क्ष्यांनी शेतकऱ्यांचा गारुायदा घेतला होता. हेकुठवर चालणार होते. असा प्रश्नविचारत हेविधेयक मंजूर झाल्याबददल त्यांनी देशातील शेतकऱ्यांचे अभिनंदन केले.

केंद्र सरकारचे प्रमुख आर्थिक सल्लागार संजीव सन्याकयं ानी हिंदुस्तान टाईम्समध्ये लिहिलेल्या एका लेखात याविरोधकाचे समर्थन करताना म्हटलय "+iªÉÉ´É¶ªÉEòवस्तू कायदयात बदल करून निर्मला सितस रामण यांनी शेती क्षेत्रात लायसन्स, परमीटराज आणि इन्स्पेक्टर संपवण्याच्या दशिने पाउल टाकलंय.

किसान पुत्रआंदोलनाचे अमर हबीब यांनी बीबीसी शी बोलताना सांगीतले की, अत्यावश्यक वस्तुंच्या यादीतून कृषी माल व गळझ्याचे आम्ही स्वागत करतो पण त्याबरोबर चसी लींग कायदा ही रद झाला पाहीजे. 1960 पुर्वी बाजार समित्या शिवायच व्यवहार व्हायचे आता पुन्हा शेतकऱ्यांना तसा पर्याय उपलब्ध होणार असेल तर ती चांगली गोष्ट +É½äþ."

डॉ.भल चंद्रमुणगेकर यांनी दै.महाराष्ट्र टाईम्समध्ये दि. 29 सप्टेंबर 2020 रोजी दिलेल्या नवे कायदे शेतकरी Ê´É®úÉävÉÒSÉ"या लेखा मध्ये म्हटले आहे की, शेतकऱ्याला स्वातंत्र्य दिल्याचे सांगून जर त्यांच्या शेतमालाच्या खरेदीची हमी काढून घेतली जात असेल तर उदया व्यापारी आणि बडया कंपन्या शेतकऱ्यांची कोंडी करतील. आज देशभर शेतकऱ्शंचा जो संताप आहे तो सरकारच्या हमी भाव आणि कृषी उत्पन्नबाजार समिती या दोन व्यवस्था खिळखिळया करण्याच्या विरोधात आहे.

शनिवार दि. 6 फेगुवारी रोजी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या अधिवेशनात स्पष्टपणे सांगीतले आहे की, "ÊEò¬ÉÉxÉ हमी किंमत या अगोदर होती आता आहे व भविष्यात ®úÉÊ½þ±É" यामुळे शेतकऱ्यांचा जो याकायदयाला विरोध आहे त्याची भीती कमी होईल.

6समारोप—

भाजप सरकारतर्फे 5 जून 2020 रोजी तीन वटहुकूम निघाले. 17 ऑग्स्ट , 9 सप्टेंबर व 11 सपटेंबर रोजी त्याचा कायदा होण्यासाठी ते लोकसभे समोर आले. मंजूर झा ाले 19/20 सप्टेंबर दरम्यान ते राज्यसभे समोर आले मंजूर झाले. 27/28 सप्टेंबरच्या दरम्यान मा.राष्ट्रपती महोदय यांची सही/ मंजूरी होउ आता त्याचा कायदा झाला आहे.

कायदा मंजूर झा ाल्या पासूनच पंजाब व हरीयाणा येथील शंतकऱ्यांनी या कायदयाला विरोध केला, त्यासाठी आंदोलन केले. दि. 9 फेंबुवारी 2021 रोजी या आंदोलनाला 75 दिवस पुर्ण झा ालेले असताना सुध्दाहे आंदोलन संपलेले नाही.

शेतकरी संघटना व विरोधी पक्ष कायदा रदद करण्यासाठी अडून बसलेले आहेत तर सरकार कायदर रदद करण्यास तयार नाही. शेतकरी संघटनांनी याकायदयात सुधारणा सुचवाव्यात व सरकारने त्यात सुधारणा करून देशातील हे आंदोलन संपवावे.

ISSN 2231 4342

संदर्भ–

1. भारताचे राजपत्र - सी. जी. डी. एल. अ.
2. महाराष्ट्र टाईम्स– 29 सप्टेंबर 2020
3. ग़्ै.दिव्य भारती– 9 फेब्रुवारी 2021
4. w.w.w.66c.com
5. w.w.w.pi6.gov.in
6. ukedesai23@gmail.com
7. nanawaremr@gmail.com
8. vgkulkarniadv@gmail.com

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal **ISSN 2231 4342**

छत्रपती शाहूंच्या दरबारातील विरुबाईचे वेगळे स्थान

कु. फुगे कविता रामहरी
एम.ए., बी.एड्., सेट.
मो.नं. : ८६६९०९२६८०
ई. मेल : kavitaphug064@gmail.com

❖ प्रस्तावना:

शिवकालावधीत राजमाता जिजाऊंनी समस्त स्त्री वर्गाला सन्मानाची जागा मिळवून दिली. शिवरायांच्या साहाय्याने स्त्री वर्गावरील अत्याचारी वृतींना टाच बसवून स्त्रीयांवर अन्याय करणाऱ्यांना शंभर वेळा विचार करण्यास भाग पाडले. जिजाउँचा हा वारसा महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई यांनी जपला एवढेच नव्हे तर स्वपराक्रमाने पुरूष प्रधान संस्कृतीत व समाजात आपल्या कर्तबगारीने आपली वेगळी ओळख निर्माण केली. राज परिवारातील स्त्रियांनी पतीच्या निधनानंतर वैयक्तिक दु:खे बाजूला ठेवून पुत्रांना अश्वरोहण, युध्दकला, प्रजापालन, धर्मपालन या सारख्या विषयात तरबेज केले. राजमाता जिजाऊ, महाराणी येसुबाई, महाराणी ताराबाई या राजपरिवारातील स्त्रियांबरोबरच छत्रपती शाहूमहाराजयांच्या काळात एक दासी कन्या असूनही आपली वेगळी ओळख निर्माण करणारी व स्वत:च्या कार्यकर्तृत्वाने आपली छाप उमटवणारी दासी असूनही शाहू पत्नी झालेल्या विरुबाईंनी शाहू कालखंडात आपला प्रभाव निर्माण करून आपले वेगळे स्थान निर्माण् केलेले दिसून येते, इतिहास लेखनात स्त्रियांच्या कर्तबगारीची नोंद घेण्याची पध्दत नसल्याने स्त्रीयांच्या इतिहासातील योगदानाला योग्य न्याय मिळाला नाही. काळाच्या उदरात अशा स्त्रियांचा इतिहास अदृश्य झाला. २१ व्या शतकात समस्त स्त्री वर्गापुढे असंख्य आव्हाने आहेत. स्त्रियांची हतबलता, असाह्यता सर्वत्र दिसते. आज स्त्रिया असुरक्षित आहेत अशा वेळी इतिहासातील कर्तबगार स्त्रियांनी आपल्या कर्तबगारीने इतिहासाच्या पानांवर आपल्या कर्तृत्वाची उमटवलेली मोहर महत्त्वाची वाटते.

❖ संशोधनाची उद्दिष्टये :-

१) विरुबाईचे शाहूंच्या जीवनातील स्थान अभ्यासणे.
२) विरुबाईच्या कार्याचा अभ्यास करणे.
३) विरुबाईचा सातारा दरबारात असणारा प्रभाव याची चिकित्सा करणे.
४) विरुबाईच्या कामगिरींवर प्रकाश टाकणे.

❖ संशोधनाची साधने :-प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मराठी भाषेतील प्राथमिक, दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात येईल. तसेच वृत्तपत्रे, आत्मचरित्रे, प्रकाशित व अप्रकाशित पत्रे, इंटरनेट साधने इत्यादीचे साहाय्य घेण्यात येईल.

ISSN 2231 4342

- छत्रपती शाहूंच्या दरबारातील विरुबाईचे वेगळे स्थान:-

संभाजी महाराजांच्या हौतात्म्या नंतरमहारणी येसुबाईंनी अत्यंत धीरोदात्तपणे सर्व मराठामंडळा समोर निस्वार्थीपणाचा आदर्श घालून दिला, आणि स्वत: पुढे होऊन राजाराम महाराजांचे मंचका रोहण केले, यावेळी महाराणी येसुबाईंनी झुल्फिकारखानाच्या वेढ्यातून राजकुंटुंब वाचवण्यासाठी राजाराम महाराजांना जिंजीकडे जाण्यास सांगून स्वत: स्वराज्याच्या रक्षणासाठी आपले व आपल्या पुत्राचे भविष्य महत्त्वाचे न मानता अत्यंत औदार्याने, उदात्तपणे निर्णय घेतला. बाहेरील सहकार्याशिवाय महाराणी येसुबाईंनी आठ महिने किल्ला लढविला. परंतु शेवटी हतबल होऊन येसुबाईंनी रायगड मोगलांच्या ताब्यात दिला. येसुबाई, शाहू व इतर मंडळी यांना कैद करुन झुल्फिकारखानाने मोगलांच्या छावणीत नेले. औरंगजेबाने संभाजी महाराजांना अमानुषपणे ठार मारले असले तरी, त्यांच्या राणीस व पुत्रास सन्मानाने वागविले. औरंगजेबाची मुलगी झिनत उन्नीसा शाहूवर पुत्रवत प्रेम करी, औरंगजेबाने शाहूस 'राजा' ही पदवी बहाल करून सात हजारी मनसब दिली. शाहूराजांना आपल्या उमेदीची एकोणतीस वर्षे स्वराज्यासाठी कैदेत व्यतीत करावी लागली. एकोणतीस वर्षा पैकी सतरावर्षे महाराष्टात औरंगजेबाच्या छावणीत नजर कैदेत त्यांना रहावे लागले. जिथे छावणीचा तळ पडेल तिथे त्यादुर्दैवी मायलेकरांची फरफट होई. स्वराज्यात राहूनही त्यांना स्वातंत्र्य उपभोगणे नशिबात नव्हते.

- विरुबाई :-

छत्रपती शाहू राजांच्या जीवनात विरुबाई येण्यास मोगलांची कैदकारणीभूत ठरली. झिन्नत उन्नीसा या बादशहा कन्येमुळे औरंगजेबाने शाहूंचे लग्न मुसलमान मुलीशी करुन त्यांना बाटविण्याचे ठरविले. परंतु झिन्नत उन्नीसा व ज्योत्याजी केसरकरयांच्या विनंती वरुन शाहूसाठी हिंदू मुलगी शोधण्याची बादशहाने परवानगी दिली. रुस्तम राव जाधव यांची कन्या अंबिका व कण्हेरखेडकर शिंदे यांची कन्या सावित्रीबाई यांच्याशी छत्रपती शाहूंचा विवाह करण्यात आला. औरंगजेबाने या विवाहावर स्वत: खर्च केला विवाहा नंतर बादशहाने नववधू पाहण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु मराठी रितीरीवाजानुसार नव वधु परपुरुषांसमोर जात नाही. वधू वर बादशहा कडे गेल्यानंतर बादशहाने नव वधूस बाटवू नये म्हणून महाराणी येसुबाईंनी आपल्या घराण्याचा मान राखण्यासाठी कण्हेरखेडकर शिंदे यांच्याकडील आंदण दिलेल्या दासीची कन्या "विरुबाई" हिला उंची वस्त्रे, जवाहीरे, अलंकार घालून सजवून शाहूंची पत्नी म्हणून औरंगजेबा समोर हजर केले. बादशहाने नवदाम्पत्यांस आर्शिवाद देऊन अक्कलकोट, इंदापूर, सुपे, बारामती व नेवासे या पाचपरगव्याची जहागीरी दिली.

औरंगजेबाच्या कैदेत असतानाच अंबिकाबाई वारल्या व शाहू महाराजांची दुसरी पत्नी सावित्रीबाईंस महाराणी येसुबाई बरोबर दिल्लीस नेण्यात आले. औरंगजेबाच्या मृत्युनंतर शाहूंची मोगलां कडून सुटका करण्यात आली. छत्रपती शाहूंच्या सुटकेनंतर विरुबाई शाहू महाराजांबरोबर सातान्यास आल्या. या काळात

 ISSN 2231 4342

राणोजी शिर्क्यांची कन्या सकवारबाई व मोहित्यांच्या सगुणाबाई यांच्याशी शाहूंचा विवाह झाला. शाहूराजांचे विरुबाई शी प्रत्यक्ष लग्न झाले नसले तरी त्यांचा मान हा राणीसारखाच होता. शाहूंच्या दोन्ही राण्यांवर त्यांची देखरेख असे. विरुबाईंचा राजपरिवारात दरारा होता. जनान खान्यांची सर्वव्यवस्था विरुबाईंकडे असून त्यांची आज्ञा सर्वजण पाळत. शाहू राजांच्या घरातील विरुबाईही कर्तीकारभारीन होती. विरुबाई शाहू महाराजांच्या राणी वंशावरील अधिकरी "वसंतराव" हा वैश्यवाणी असून तो विरुबाईच्या चगावचार हिमतपुरचा रहिवासी होता. विरुबाई समुद्रस्नानास घोरागरास गेल्यानंतर त्यांनी मोठ्या प्रमाणात दानधर्म केला. कसबे निंबये थेविरुबाईंनी बाग व विहीर बांधली. त्याच प्रमाणे शंभू महादेवास एक दिपमाळ बांधली. विरुबाईनी परळी किल्ल्यावर समर्थ रामदास स्वामी यांच्या समाधी समोर एक तुळशी वृंदावन बांधले. परळी किल्ला हा इ . स. 1673 मध्ये, विजापूरच्या आदिलशहाकडून शिवाजी महाराजांनी जिंकला व त्यास महारजांनी "सज्जनगड" असे नाव दिले. विरुबाई छत्रपती शाहूंच्या इतर राण्यांत वयाने अधिक असल्यामुळे व तिच्यावर शाहु महाराजांची मर्जी असल्यामुळे ती शाहुमहाराजांची पट्टराणी सारखी राहत असे. राणी वंशावर विरुबाईंची हुकमत चाले. शाहु राजांच्या कारकिर्दीची 32 वर्षे विरुबाईंनी पाहिली. विरुबाईच्या हयातील राणीवंशात कलह झालेला आढळून येत नाही.

पेशवे व छत्रपती शाहूराजे यांचे गुरु ब्रम्हेंद्र स्वामीचा व शाहू महाराजांचा संबंध विरुबाई मुळेच घडून आला होता. ब्रम्हेंद्र स्वामींचा शाहूराजे व इतर राण्यांशी ही पत्रव्यवहार असे. पण विरुबाईशी अधिक पत्रव्यवहार असे. विशेष म्हणजे ही पत्रे राजकीय स्वरुपाची नसून घरगुती स्वरूपाची आहेत. शाहू राजांच्या राजवाड्याची बांधकामे, बागा, धर्मादाय, तीर्थयात्रा, परवाने, देणग्याइ. वर विरुबाईंची देखरेख असे. "कसबेनिंब" याठिकाणी शाहूराज्यांची सरकारी शेरी जमीनीत विरुबाईंनी मोठ्या प्रमाणात खर्च करुन अवाढव्य अशा प्रकारची दगडी विहीर बांधली आहे. तिची लांबी पूर्व - पश्चिम 112 फुट असून उत्तर-दक्षिण 48 फुट आहे. विहीरीत उतरण्यासाठी 37 पायऱ्या आहेत. विहीरीचे संपुर्ण बांधकाम दगडात असून आजही मजबुत स्थितीत आहे. विहिरीत उतरताना सुरूवातीला जो मोठा कमानी दरवाजा आहे, त्याच्या वरच्या जिण्यावर विरुबाईने आपल्या नावाची अक्षरे कोरुन लिहली आहेत. एकाच वेळी पंधरा मोटीने पाणी काढता येईल असे बांधकाम आहे. त्या परिसरात पंधरा मोटे ची विहीर म्हणून सध्या प्रसिध्द आहे.

विरुबाईंच्या स्वभावावर व कर्तत्वाव रप्रकाश टाकणारी प्रकाशित व अप्रकाशित वीस एक पत्रे उपलब्ध् आहेत. त्यापैकी बहुतेकपत्रे पेशवेवशाहू राजे यांचे गुरुब्रम्हेंद्र स्वामी यांच्याशी झालेल्या पत्र व्यवहारातील आहेत. बऱ्याच वेळा छत्रपती शाहू राजांबरोबर ही विरुबाईंचा पत्रव्यवहार होत असे. छत्रपती शाहू महाराजांच्या अनेक पत्रांची उत्तरे त्यांच्या तर्फे विरुबाईंच लिहीत. इ.स. 1728 मध्ये, ब्रम्हेंद्र स्वामींनी कोकण सोडलेव ते साताऱ्या जवळ घावडशी येथे स्थाईक् झाले. घावडशीला आल्यानंतर राजघराण्याचे व ब्रम्हेंद्र स्वामीचे संबंध अधिकच दृढ झाले. वस्तूंची देवाण घेवाण सुरू झाली. ब्रम्हेंद्र स्वामीं कडून फळा फुलांचे बी, रोपे शाहू महाराजांकडे येत. राण्यांकडून स्वामींना कपडे, दुलया जात. विरुबाईने मागितल्या बरोबर दोनह जार रुपये दिले. विरुबाई वर्षातून

ISSN 2231 4342

चारदा तरी मजकडे येते असे ब्रम्हेंद्र स्वामी गौरवाने लिहतो. छत्रपती शाहूराजे, राण्या कित्येकदा लवाजम्यासह एक दोन दिवस घावडशीला जाऊन राहत. शाहू महाराजांच्या अनेक पत्रांची उत्तरे त्यांच्या तर्फे विरुबाईच लिहीत. आपली कामे करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्याचा ब्रम्हेंद्र स्वामीचा पायंडाच होता. ब्रम्हेंद्र स्वामीला नीरा नदीवर पुल बांधायचा होता. पैसा व परवानगी साठी ब्रम्हेंद्र स्वामीने विरुबाईला पत्र लिहले. "पाच सात कामे जाहलीही तुम्हास पुसोनि केली हल्ली ही पत्रे पाठवली आहेत. तर आपले पतीस सांगून नीरे सदादर बांधावयास सांगणे दाद रासद्रव्य फार पाहीजे, त्याची चार घरे आणखी चौ दिशास मागोन तुमचे नावसांगेन कामचालवू दादर तुमच्या किर्तीचा आहे, नाव तुमचे आहे." विरुबाईला खुश करण्यासाठी ब्रम्हेंद्र स्वामी विरुबाई ची स्तुती करतो, ब्रम्हेंद्र स्वामी त्याच पत्रात पुढे म्हणतो. "तुम्ही उत्तम अन्न, दूध, भात जेविता आम्ही कंदमुळे खातो आम्ही जेवयास तुमची मर्जी असेल, तरी भुईमुग आम्हाला एक मण पाठवून दिले पाहिजेत. "विरुबाईने या पत्राचे उत्तर पुढील प्रमाणे दिले आहे." स्वामीने पुलनबांधणे म्हणून आज्ञा केली आहे. ब्रम्हेंद्र स्वामीने पूल न बांधणे, भुईमुग एक मण मागितले त्यास भुईमुगाचा तोटा आहे. याकरिता मुग वजन पक्के अर्धा मण देविले आहेत. सरकार निंबचे आणून ब्रम्हेंद्र स्वामीकडे पाठवतील. फत्तेसिंग भोसलेस विरुबाई आपला दत्तक पुत्र मानीत. याचाही उपयोग ब्रम्हेंद्र स्वामीने करुन घेतलेला दिसतो. माळशीरच्या एका चोरीच्या प्रकरणात तिथल्या एका बेरडाला झालेल्या ५० रुपयेत दंड फलेसिंग भोसलेनी केला होता. म्हणून ब्रम्हेंद्र स्वामीने विरुबाई तर्फे ती रक्कम परत मिळवण्याचा प्रयत्न केला. परंतु विरुबाईनी स्पष्टपणे लिहले की दंडाची रक्कम परत मिळणार नाही. व ब्रम्हेंद्र स्वामीने कृपा करून त्यागोष्टींचा पुन्हा पत्रात उल्लेख करू नये. विरुबाईच्या छत्रपती शाहू महाराजांवरील वजनाचा पुरेपुर उपयोग ब्रम्हेंद्र स्वामी करुन घेत असे. नीरा नदीवर पुलबांधण्याचे काम असो फलटण संस्थानातील इनामगावाचा तगादा, धावडशी, वीरभाडे, माळशीरया इनाम गावा तब्रम्हेंद्र स्वामी सामान्य माणसासारखा भांडतअसे. केरोजी पाटलाच्या खाजगीमालमत्तेत केलेली ढवळाढवळ असेल. इतक्या घटनांचा उल्लेख असूनही विरुबाईंची ब्रम्हेंद्र स्वामी संबंधी विशेष सहानु भुती असावी असे दिसते.

❖ विरुबाईचामृत्यु :-

फत्तेसिंग भोसलेहे छत्रपती शाहूराजांचे मानस पुत्र होते फत्तेसिंग भोसलेंचे संपूर्ण पालन पोषण विरुबाईंनी केले होते. फत्तेसिंग हे विरुबाईचे जीव की प्राण होते. फत्तेसिंगाचा स्वभाव छत्रपती शाहूसारखा शांत होता. फत्तेसिंग भोसले 1740 मध्ये, कर्नाटकाच्या स्वारीत असताना सातारच्या वाड्यात विरुबाईंनी 24 डिसेंबर 1740 रोजी अखेरचा श्वास घेतला. त्यांचे दहन संगम माहुलीस झाले. विरुबाईच्या मृत्युमुळे फत्तेसिंग भोसल्यांनी अतिशय करून परमशोक केला. तीन दिवस त्यांनी अन्न-पाणी ग्रहण केले नाही. शाहू राजांनी समजावले तरीही त्यांचा शोक सुटत् नव्हता. अर्थातच फत्तेसिंग भोसले यांचा लहानपणापासून सर्व सांभाळ विरुबाईने आई प्रमाणे केला होता. त्यामुळे त्यांना असा शोक होणे साहजिकच होते. यामध्ये फत्ते सिंगाच्या मनाचा हळवापणाही व्यक्त होतो.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

विरुबाईंचे फत्ते सिंगांवर पुत्र वत प्रेम असल्यामुळे त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे उत्तरकार्य फत्ते सिंगा कडून करविण्यात आले, म्हणुन त्यांची सर्व संपत्ती व त्यांच्या हयातीत खर्चासाठी तोडून दिलेल्या अक्कल कोटपरगण्याचा भाग फत्ते सिंग यांना मिळाला. विरुबाईची दौलत पायातील सोन्याच्या साखळ्यांचा जोड वगैरे फत्ते सिंगानी विरुबाईची सोन्याची मूर्तीकरून आपल्या देव्हाऱ्यात बसवली. ती अद्याप अक्कल कोट भोसल्यांच्या देव्हाऱ्यात आहे. विरुबाईच्या नावाने फत्ते सिंग भोसलेने संगम माहुलीस मोठा दान धर्म केला. साताऱ्यात संगममाहुली सविरुबाईची समाधी शंकराच्या देवळा समोर थोडे बाजुला छत्रपती शाहूंनी बांधली आहे. शाहू महाराजांची समाधी व विरुबाईंची समाधी आज प्रत्यक्ष पाहावयास मिळते.

❖ निष्कर्ष :-

प्राचीन काळापासून स्त्रीयांनी राज्यकारभार युध्द नीती, त्याग, औदार्य, पराक्रम, वेळ पडण्यास रणांगण गाजविणे, प्रसंगाला धैर्याने सामोरे जाणे प्रसंगी शत्रुच्या तावडीत सापडून अपमानित होण्या पेक्षा त्यांनी सन्मानाने मृत्युला देखील कवटाळले विरुबाई या दासी असुनही त्यांनी सातारा दरबारात व छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनात स्वत: चेवेगळे स्थान निर्माण केलेले दिसून येते. त्यांनी आपल्या कार्यक र्तृत्वाने, कर्तबगारीने आपल्या कार्यांची छाप जनमानसांवर उमटवलेली दिसून येते. फत्ते सिंग भोसले यांना विरुबाईच्या मृत्युनंतर झालेला शोक यावरुनच विरुबाईच्या प्रभावाची कल्पना येते. राजपरिवाराचा गंधही नसलेल्या व दासी असूनही विरुबाईंने आपली वेगळी ओळख छत्रपती शाहूमहाराज यांच्या जीवनात व मराठा राजकारणात उमटवलेली दिसून येते. ह्यातच त्यांचे मोठेपण आहे.

❖ संदर्भसाधने :-

❖ मराठी :-

१) सरकारजदुनाथ – औरंगजेब, खंड- 5
२) राजवाडे वि.का., भावेवि. ल., सरदेसाईगो. अ. – मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड- 2, मराठी दफ्तर, रुमाल -1, मराठीरियासत, खंड- 2
३) बेंद्रेवा. सी. – श्री छत्रपती संभाजी महाराजयांचे चिकित्सकचरित्र.
४) पारसनीसद.ब. – ब्रम्हेंद्र स्वामी चरित्र व पत्रव्यवहार लेखांक 14,112, डेक्कनकॉलेजपुणे, ऐतिहासिक ग्रंथालय, रुमाल 20
५) वाडपारसनीस – शाहू महाराज यांची रोज निशी लेखांक 90.

❖ इंग्रजीसाधने :-

१) Internet Sources.

ISSN 2231 4342

‘अणदुर (जि.उस्मानाबाद) येथील ३ कन्नड शिलालेखांचा अभ्यास’

श्री. किरण शहाजी वऱ्हाडे
एम.ए., पी.जी. डिप्लोमा इन इपिग्राफी
कन्नड संशोधन केंद्र
कर्नाटक विश्वविद्यालय धारवाड (कर्नाटक)
ई-मेल :-
kiranvarhade9@gmail.com
मो.नं. :- ९१६८४४४६८८

प्रस्तावना:-

प्राचीन काळी भारतामध्ये लेखनास महत्व असल्याचे दिसून येते. इतिहास आणि पुरातत्वीय दृष्टीकोनातून शिलालेख हा महत्वाचा भौतिक पुरावा म्हणून ओळखला जातो. एखाद्या राजाविषयी राजघराणे विषयीची उत्तमभुत व पारदर्शक, कालानुक्रमे माहिती यातून मिळते. त्याचबरोबर त्याचे कार्य, साम्राज्य, साम्राज्यांची नावे व वंशावळी यात नमूद केलेल्या असतात.

शिलालेख हे राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, गौरवप्रित्यर्थ, यशोगाथा अशा विविध प्रकारांतून लेखन प्राचीन काळी भारतामध्ये वेगवेगळ्या साम्राज्य सम्राटाने केलेले दिसून येते.

भारतात सर्वात प्राचीन शिलालेख सम्राट अशोकाचे होय. याची भाषा प्राकृत असून लिपी ब्राम्ही आहे. त्यानंतर महाराष्ट्रामध्ये प्राचीन लेख सर्वप्रथम सातवाहन घराण्याचे मिळतात. हे देखील ब्राम्ही लिपी व प्राकृत, संस्कृत भाषेत आहेत.

शिलालेखाचे वेगवेगळे प्रकार आहेत. शिलालेख, स्तंभालेख, पट्टलेख, लघुस्तंभालेख असे होय. हे प्रस्तरावरती कोरले जात. या मागचे कारण म्हणजे ते चिरकाल टिकावे व सर्वांना वाचता यावे. त्याचबरोबर हे गावातील चौकात आणि मंदिरामध्ये उभे केले जात असत. एखाद्या राजाने अथवा व्यापाऱ्याने दिलेले दान किंवा एखाद्या युध्दाचा गौरव अथवा सामाजिक कार्य किंवा एखाद्या लढावू सैन्याची शौर्यगाथा त्याचबरोबर राजकीय सभा समिती याचे आयोजन किंवा धार्मिक कार्यासाठी दिले गेलेले दान किंवा आर्थिक कर, जमिनीचे दान किंवा तलाव अथवा गावांचे पुनर्वसन अशा विविध प्रकारातून हे लेख कोरुन याची उभारणी केलेली असते. वीरमरण, गोरक्षण असे देखील वीर पुरुषांचे विरगळ याच प्रकारात येतात.

सर्वप्रथम उत्तम प्रतिचा प्रस्तर अखंड शिळेतून काढून घेतला जातो. हे नदी खोऱ्यातील प्रस्तरशिळा असतात. त्यानंतर त्याला आकार दिला जातो व घासून गुळगुळीत केले जाते. त्याचबरोबर त्यावर कोरल्याचा मजकूर अगोदर राजआज्ञेनुसार ठरविला जातो. यासाठी सर्वप्रथम राजाच्या आज्ञेनुसार पंडित मजकूर तयार

ISSN 2231 4342

करतो व लेखक लेखन करतो. हे लेखन त्या प्रस्तरावर लेखक लिहितो. त्यानंतर कोरक्या त्या प्रस्तरावर कोरतो आणि शेवटी ते प्रस्तर गावातील चौकात अथवा मंदिरामध्ये उभे केले जाते.

अणदुर या गावामध्ये हनुमान मंदिर येथे कन्नड भाषा आणि लिपी असलेले एकूण ३ शिलालेख उपलब्ध आहेत. गावामध्ये भग्न अवस्थेतील अनेक पुरातत्वीय अवशेष पहावयांस मिळतात. हे अवशेष चालुक्य (कल्याणी) व कलचुरी घराण्यांशी संबंधित आहे. येथे उत्तर यादव कालीन मंदिर असून ते सुस्थीतीमध्ये आहे. सदरील शिलालेखांच्या आधारे गावाचे प्राचीनत्व उत्तर चालुक्य काळापर्यंत मागे नेता येते.

प्रस्तुत वरील उपलब्ध् असलेल्या ३ शिलालेखांची माहिती संशोधन पेपरमध्ये देण्यात आलेली आहे. हे शिलालेख वेगवेगळ्या कालखंडातील असून याचे सर्व धार्मिक स्वरुपाचे आहे. शिलालेख क्र. १ ची लांबी १०२ से. मी असून रूंदी ६२ सं. मी आहे. शिलालेखाच्या पहिल्या भागामध्ये शिंवलिंग, तलवार, सुर्य, चंद्र, गायवासरू, नमस्कार मुद्रेमध्ये पुरोहित यांचे शिल्पअंकित केलेले आहे. तर दुसऱ्या भागामध्ये संपूर्ण मजकूर एकूण ३२ ओळीमध्ये कोरण्यात आलेला आहे. शिलालेख क्र. २ एकूण ७ ओळीमध्ये असून शिलालेख क्र. ३ एकूण ५ ओळीमध्ये कोरलेला आहे.



शिलालेख क्र. १
अणदूर

१) शिलालेख क्र. १

- **भाषा :-** हळे कन्नड
- **लिपी :-** कन्नड
- **राजा व राजवंश:-** त्रिभुवनमल्लदेव, कल्याणी चालुक्य
- **वर्ष :-** १६ डिसेंबर ११०७

ISSN 2231 4342

- **वार :-** सोमवार
- **संवत्सर :-** विक्रम ३२ संवत्सरे
- **विषय :-** धार्मिक (धार्मिक कार्यासाठी दान)

शिलालेखांच्या ओळी

१) श्री जयस्तुंग शिरश्चुंबि चंद्रचामरचारवे त्रैमोक्य नगरीरंभय मूल स्तुंभाय संभवे !!

२) स्वति समस्त भुवनाश्रयं श्री प्रथ्वीवल्लभ महाराजाधिराज परमेश्वर परमभट्टारक सत्या

३) श्रय कुळतिळकं चालुक्याभरणं श्रीमत्रिभुवनमल्लदेव विजयराज्य मुत्तरोत्तराभि

४) वैध्दी प्रवैर्ध्दमानमा चंद्रार्क तारंबरं सल्लुत्तामिरे कल्याणद नेलेविडीनोळु सुख

५) संकधा विनोददीं राज्यंगिय्युत्तमिरे स्वस्ति समस्त भुवन विख्यातं चालुक्यान्वय प्रसुतं परिजन पा

६) रिजातं रिपुराय कुवर बंगारं बप्वनंककारं कुवरंक भिमं नयनाभिराम

७) कुमार विश्वाभाजंग अय्यनसिंगि सरणांगत वज्रपंजरं कुमुर दिक्कुंजरं विरविदयाधरं

८) सकळ कळाधारं पदनाळगिरी प्रजदण्डं विसळराय कुवर जवदंडं महालक्मीदेवी लभ्ध

९) वर प्रासादं त्यागविनोदं मूरूराय कुमारहिस्तिल्ल साहसमल्लं श्रीमंत्रिभुवनम

१०) ल्ल पट्टमहादेवीयरणुगं नामादी प्रशस्ति श्रीमद्युवराज मल्लिकार्जुन देवरू !!

११) तत्वाद पदयोपजिवि स्वस्ति समाधिगत पंच महाशब्द महा सामंताधिपति महा प्र

१२) चंड दंडनायकं विव्दजन वरदायंक सकल गुणमणि भूषणं बंधुजन फोषणं

१३) आश्रित जन कल्ववैक्षं पतिकार्य दक्षं साहित्य विद्याप्रसंगं अययनसिंगं श्रीमंत्रि

१४) भुवनमल्लदेव पादाराधकं परबल साधकं नामादि समस्त प्रशस्ति सहितं श्रीम

१५) न्महाप्रधानं मनेवेर्ग्गडे दंडनायकं नाचिमरस (र) बिंनपदिं युवराज वल्लभं म

१६) ल्लिकार्जुनदवरु श्रीमच्यालुक्य विक्रम वर्षद ३२ नेय सर्वजितु संवस्तर मार्गसिरदमावास्ये

१७) आदित्यवार (रविवार) चुडामणि ग्रहण महापर्वद निमित्यादिं अणंदूरु श्री माणिकेश्वर

१८) देवरिगे अंगभोग धुप दिप नैवेद्य तंबुलक्के बिट्टी केत्रहौयूरं सर्व नमस्यवागि कोट्ट

१९) रिधर्ममं नाडधीकारिगळु स्वधर्मदीं प्रतिपालिसुरू श्री माणिकेश्वर देवरिगे बाळेय

२०) सेट्टीयरु बिट्टी कोल मत्तरू मूवत्तु सातय्यनायकन केरियोळु मत्तरु हन्नेरडु अंतु

२१) वर ------- दी नाल्वत्तेरडू मत्तरु केयुमं श्री मदनंतपाल दंडनायकन बेसदिंद

२२) वर सुंकवेर्ग्गडे सोमनाधय्यनायकरु दासिमरसंरु बिट्ट (छत्रछाया) सुंकमं

२३) श्रीमद्रयुवराज वल्लभ मल्लिकार्जुनदेवर बेसदीं मल्लप्वय्यनायकरु बिट्ट हेज्जुंकमुमं

२४) (५२५) एत्तींगे अणंदुरू ३०० र सुंकवेर्ग्गडे शोभननायकरु पुनर भ्भरणं मा

२५) डि सुंकिगर मालेगावुंडन मुख्य माडि सर्वभादा परिहार माडी बिट्टरु अरसुग

२६) ळुं मूवरु सेट्टीयारु नखरं तळात्त्ररुविऋुद आवतदमान सट्टग सहितमागी बि

२७) ट्टरू हंनवणरु एलेय हेत्र्रेंगे एले ५० होंगे ५ अडकेयुं देवसवाळ हसरद

२८) कोंदडके एरडेलेयुमं बिट्टरू केल्लीगरु चैत्रक्के गानदलु ओब्बळ एण्णेयुमं नंदादीवि

२९) गेगे देवसलंबुळीके ओदुममुं बिट्टरू १ द्रम्मक्कं नगर मूवरू सेट्टीयरु नाडधीकारीगळुं

३०) स्वधर्मदीं प्रतिपाळीसुवरू!! वोरंबद मागरसरु देवर्गे कालंगर्ची कोट्ट मत्तरू (१००)

३१) देवरपुरक्के नाडवोक्कललु चित्रक्के २० तेत्ती गे द्रम्मं ३ श्रावणक्के द्रम्म २ दिपावळीगे दम्म १

शिलालेखाचे भाषांतर :-

या शिलालेखामध्ये विक्रम संवत्सरे ३२ मार्गशिष मास अमावस्या रविवार असे नमुद केलेले असून चुडामणी ग्रहण होते असे देखील लेखन करण्यात आलेले आहे. या ग्रहाणा दिवशी माणिकेश्वर देवालयास दान दिल्याचा उल्लेख् यात मिळतो. अंगभोग, धुप, दिप, नैवैद्य, तांबुळ या करीता म्हण्जे नित्य पुजेकरीता या मंदिरास दान दिल्याचा उल्लेख यात केलेला आहे.

प्रस्तुत लेख (ओळ नं. १ ते १५)

यामध्ये कल्याण चालुक्य राजा श्री त्रिभुवनमल्लदेव यांना दिलेली बिरुदे आहेत. यांस अनेक बिरुदे देऊन राजाचा गौरव व त्याकाळातील त्यांच्या राज्याविषयी व कार्याविषयी गौरव दर्शविण्यात आलेला आहे. त्याच बरोबर त्यांची पत्नी महाराणी पट्टमहादेवी यांच्या नावाचा देखील उल्लेख आलेला आहे, व त्यांचा पुत्र युवराज महाप्रधान मल्लिकार्जुन अधिकारी असा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याच बरोबर माचिमरस (र) यापदी युवराज श्री मल्लिकार्जुन असा उल्लेख आहे. कदाचित हे एखाद्या ठिकाणाचे नाव असावे. ज्याचे नेतुत्व करीत असावेत.

(ओळ नं. १६ ते १८)

यामध्ये संवत्सरे म्हणजेच वर्ष त्याच बरोबर देवालयाचे नाव व दान दिल्याचा आणि ग्रहाणाचा उल्लेख आहे. माणकेश्वर असा या देवतेचा उल्लेख यामध्ये आढळतो.

(ओळ नं. २० ते २३)

यामध्ये सातय्यनायक हे अधिकारी याने मंदिरासाठी तीस व तलावासाठी बारा त्याचबरोबर मदनंतपाल दंडनायक याने बेचाळीस असे दान दिल्याचे उल्लेख यात मिळतात. सोमनाथनायक याने छत्रछायेसाठी दान दिल्याचा उल्लेख यामध्ये आढळतो. श्री मद्रयुवराज वल्लभ मल्लिकार्जुनदेव, पल्लप्वनायक यांनीही दान दिल्याचा उल्लेख आहे.

(ओळ नं. २४ ते ३१)

५२५, २०० अंक कोरलेले असून अणंदुर या ग्रामाची पुर्नरचना करण्याकरीता या गावाची मुख्य ठिकाण म्हणून निवड केल्याचा उल्लेख आहे. या गावाचे पुर्नरभरण येथून चाले.

त्याच बरोबर ६, ३ व्यापारी व्यापाराकरीता आणि स्थायी करण्यात आले व ११ इतर (५०) यांनी देखील देवालयास दान दिल्याचा उल्लेख आहे. तेलंग चैत्र महिन्यात तेल व्यापारी तेलनंदा दिपासाठी दान दिल्याचा उल्लेख आहे. (एक मण तेल) असा उल्लेख आहे.

त्याच बरोबर एक गाव (नगर) दान दिल्याचा उल्लेख आहे. राजाकडून १०० वार्षिक खर्च व मूर्ती करीता २० असा उल्लेख मिळतो. ३ महिन्यासाठी २ व श्रावण महिन्याकरीता २ दिपावलीसाठी १ असा मंदिराच्या दान खर्चासाठी असलेला उल्लेख या शिलालेखामध्ये आढळून येतो.

शिलालेख नं. २

भाषा	:	हळेकन्नड
लिपी	:	कन्नड
राजा	:	भुलोकमल्ल (सोमेश्वर तृतीय)
घराणे	:	कल्याणी चालुक्य
वर्ष	:	११३७
वार	:	सोमवार
संवत्सर	:	भुलोकवर्ष ११ वे नळ कार्तिक शुध्द पद्य
विषय	:	दान लेख

शिलालेखांच्या ओळी

१) स्वस्ति श्रीमच्चालुक्य भूलोक परिषद ११नेय नळ संवत्सरद कार्तिक शुध्द पाडिव सो

२) मवारदंदु श्रीमतु पिरियरसी पट्टमहादेवी राजलादेवियरगभोग

३) .... (अ) णंदूर हन्निपळीय हेर्गद्दे मल्लीयण्ण्नायक प्रमुख करणंग.

४) .... (अणं) दूर स्थळद आवटमुद्रेयल्ली श्री माणिकेश्वरदेवर नंदादीपिगेगे

५) .... (नं) गे बिट्ट गद्याण ५ इदे वर्षप्रति कोट्टरु इद नाडधिकारी

६) .... (प्रति) पालिसिदवरुं स्वर्गोपवर्ग्गगळंसुप भोगिपरु केडिसिद

७) .... (फल) मल्लु !!

प्रस्तावना :-

कल्याणी चालुक्य काळातील हा लेख असून यामध्ये चालुक्य भुलोकवर्ष ११ वे अशी कालगणना पध्दतीचा उल्लेख दिसून आलेला आहे. त्याचबरोबर नळ संवत्सरे असल्याचेदेखील उल्लेख आहे. इ.स. ११३७ मधील हा शिलालेख असून चालुक्य राजा भुलोकमल्ल (सोमेश्वर तृतीय) याचा हा लेख होय.

या राजाने आपल्या पत्नीच्या नावे दान दिल्याचा उल्लेख आहे. माणिकेश्वर मंदिरासाठी त्याने दान दिलेले आहे. त्याचबरोबर राणी पट्टमहादेवी राजलादेवी असे तिचे नाव यात अंकन केलेले दिसून येते व तिच्या हाताखालील हेग्गडे मल्लीयण्णयक हा पहिल्यांदाच याठिकाणी (अणदूर) येऊन श्री माणिकेश्वर देवालयास नंदादीपसाठी दान दिल्याचा उल्लेख यात करण्यात आलेला आहे.

ISSN 2231 4342

या शिलालेखाचा बराचसा भाग नष्ट झाल्याने संपूर्ण शिलालेख वाचणे व त्याचा अर्थ लावणे कठीण आहे. सुस्थितीत असलेल्या लेखावरुन वरील माहिती मिळालेली आहे.

धार्मिक कार्यासाठी दान दिल्याचे जरी दिसून आले तरी तत्कालीन व्यक्ति व राजा आणि तत्कालीन लोक व त्यांचे कार्य लक्षात येते.

शिलालेखाचे भाषांतर

(ओळ नं. १ ते २)

यामध्ये स्वस्ति नावापासून लेखाची सुरुवात केली असून चालुक्य संवत्सर, परिषद व नळ संवत्सर कार्तिकमास असा उल्लेख आहे.

त्यानंतर सोमवार असल्याचे राणी पट्टमहादेवी यांच्या नावे दान दिल्याचे लेखन दिसून येते.

(ओळ नं. ३ ते ४)

सुरुवातीचे अक्षर भग्न झाल्याने वाचणे शक्य नाही. नंतर अणंदूर या स्थळी हेगडी मल्लीयनायक प्रमुख याने नंतरचा भाग नष्ट असून त्यानंतरच्या ओळीमध्ये अणंदूर येथे आठ मुद्रा श्री माणिकेश्वर मंदिरास नंदादीपसाठी दिल्याचा उल्लेख आलेला आहे.

(ओळ नं. ५ ते ७)

तीनही ओळीचा समोरील भाग नष्ट झाल्याने अर्थ लावणे कठीण आहे. उर्वरीत उपलब्ध अचूक शब्दावरुन काढलेला अर्थ पुढीलप्रमाणे —

या वर्षासाठी ५दिले हे अधिकारी त्याचबरोबर स्वर्ग, उपस्वर्ग आनंददयी होवो असा उल्लेख आहे.

यावरुन असा अंदाज लावता येईल की, राजआज्ञेवरुन येथे दान दिले व मृत्यू नंतर स्वर्गामध्ये सुखाची प्राप्ती व्हावी अशी प्रार्थना केली असावी.

सर्वात शेवटी चक्राचे चिन्ह अंकन केले आहे.

शिलालेख क्र. ३

हा शिलालेख देवगिरी यादव घराणे यांचा आहे.

भाषा	:	हळेकन्नड
लिपी	:	कन्नड
राजा	:	भिल्लम दुर्जाय
घराणे	:	यादव
वर्ष	:	इ.स. ११८४
वार	:	गुरुवार
संवत्सरे	:	भिल्लमदेव वर्ष २६ वे क्रोधी संवत्सर

ISSN 2231 4342

शिलालेखांच्या ओळी

१) स्वति श्रीमतु यादव कुळतिलकं प्रताप चक्रवर्ती श्री

२) ……………………. भिल्लमदेव वर्षद २६ नेय क्रोधी संवत्सरद आ

३) ………………………. ब्रिहवारदंदु विशु संक्रमण मा

४) ………………………. श्री मान्महाप्रधानं गंधारय्य

५) ………………………. श्रीमतु राजधानी

प्रस्तावना :-

या लेखाचा बराचसा भाग नष्ट झाल्याने अचुक तर्क लावणे कठीण आहे. उर्वरीत उपलब्ध लेखावरुन वाचन करण्याचा पूर्ण प्रयत्न केल्यानंतर राजा घराणे व वर्ष इतकी माहिती उपलब्ध झालेली आहे.

प्रस्तुत लेख देवगिरी यादव घराण्याशी संबंधित आहे. यामध्ये सेऊन असा देखील उल्लेख आलेला आहे. राजा भिल्लम द्वितीय आणि इ. स. ११८४ त्याचबरोबर यादव राजा भिल्लम द्वितीय यांचा महाप्रधान गंगाधरय्यन इतका उल्लेख स्पष्टपणे दिसून येतो.

भाषांतर

(ओळ नं. १ ते ५)

स्वस्ति नावापासून सुरुवात केली असून यादवतिलक या नावाने भुषविण्यात आले आहे. प्रताप चक्रवर्ती श्री भिल्लम द्वितीय व भिल्लमदेव वर्ष २६ क्रोधी संवत्सर गुरुवार असा उल्लेख आहे.

श्री महाप्रधान गंगाधर इ. उल्लेख आहे.

निष्कर्ष :-

अणदूर येथे असलेले तिन्ही शिलालेख कन्नड असून विविध कालखंडातील आहेत. त्यांचे स्वरुप धार्मिक असून मंदिर कार्यास दान दिल्याचे उल्लेख यात मिळतात. म्हणजेच त्या काळात इतर कार्याबरोबर धर्मकार्य हे देखील महत्वाचे होते. हे या शिलालेखातून दिसून येते. त्याचबरोबर आर्थिक लेख म्हणून देखील संबोधता येते. व्यापार वाणिज्य याचाही उल्लेख यात दिसून येतो व सांस्कृतिक लेख असेही म्हणता येईल. कारण शेवटी सण, उत्सव, मास (महिना) याचा ही उल्लेख यात आलेला आहे.

त्या काळातील लोकांना संख्याज्ञान, त्याचबरोबर लेखन, वाचन येत होते. हे यातून दिसून येते व हे मंदिर शैव पंथाचे लोक राहत होते. त्याचबरोबर वैष्णव देखील असावेत. कारण मंदिराभोवती विष्णु, नृसिंह यांची देखील प्रतिमा आहेत. त्याचबरोबर भैरव, उमा महेश्वर आणि शिवलिंग, नागदेवता यांचे शिल्प आहेत. यावरुन असे म्हणता येईल की, येथे अनेक पंथांचे लोक येथे निवास करीत असावेत.

शिलालेखाच्या वरच्या भागात पुरोहित नमस्कार मुद्रेत असून एक शिवलिंग कोरण्यात आले आहे व खडग, सूर्य, चंद्र, गोवासरु असे शिल्प असल्याने हा राजा शैव पंथातील मंदिरासाठी दान दिला असावा असे

ISSN 2231 4342

म्हणता येते. या शिलालेखांच्या अभ्यासातून तत्कालिन राजकीय परिस्थितीचा आढावा घेता येतो. कल्याणी चालुक्याचे दोन शिलालेख तर एक शिलालेख यादव घराण्याशी संबंधित आहे. यावरुन असे लक्षात येते की या परिसरावर कल्याणी चालुक्य आणि नंतर यादव यांची राजकीय सत्ता होती.

संदर्भग्रंथ सूची :-

१) डॉ. व्ही.एन. उपाध्याय, डॉ. देवरकोंडारेड्डी, कन्नड विश्वविद्यालय शासन संपुट नं.-६ (कन्नड), (महाराष्ट्र व कन्नड शासनगळू), पब्लिकेशन : कन्नड विद्यालय हंपी,विद्यारण्य, २००१.

२) डॉ. शांताराम भालचंद्र देव, महाराष्ट्र व गोवे शिलालेख – ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची, पब्लिकेशन : व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,कोल्हापूर-४१६००३. यांच्याद्वारे मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने महाराष्ट्र राज्य मुंबई-४००००४ यांच्याद्वारे प्रकाशित, १९८४.

३) डॉ. देवरकोंडारेड्डी, लिपिय हुट्टु मत्तु बेळवणिगे (कन्नड), पब्लिकेशन : कर्नाटक सरकार, कन्नड पुस्तक प्राधिकार, बेंगळुरु-५६०००२. द्वितीय आवृत्ती २००९.

४) के. सत्यमुर्ती, टेक्स्ट बुक ऑफ इंडियन इपिग्राफी, पब्लिकेशन : लॉ प्राईस पब्लिकेशन २०१७.

ISSN 2231 4342

खूलताबाद (जि. औरंगाबाद) तालुक्यातील ग्रामनामांचा अर्थबोध – एक अभ्यास

रत्ना बाबूलाल राजपूत
मु.पो. जंगीपूरा, ता. जामनेर,
जि. जळगाव

प्रस्तावना :

खूलताबाद हे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील तालुक्याचे स्थळ आहे.हे एक धार्मिक आणि ऐतिहासिक परंपरा असलेले गांव आहे. भद्रा मारुती या धार्मिक स्थळासोबतच या गावात सूफी संत आणि इतर काही इतिहासकालीन राजघराण्यातील आणि सरदार घराण्यातील व्यक्तींच्या कबरी आहेत. खूलताबाद या गावाला 'रतनापूर' नावाने दखील ओळखले जाते. फार पूर्वी ह्या गावाचे नाव 'रौझा' असेही होते.[1] त्याचा अर्थ स्वर्गातील नंदनवन असा होतो.खुलताबाद चे क्षेत्रफळ 1044.00 हेक्टर आहे. 2001 च्या जनगणनेनुसार खुलताबादची लोकसंख्या 12,794 इतकी आहे.[2]

औरंगाबाद जिल्ह्यात एकूण 09 तालुके आहेत. (कन्नड, पैठण, औरंगाबाद, खुलताबाद, सिल्लोड, वैजापूर, गंगापूर, फुलंब्री व सोयगाव) खुलताबाद तालुक्यात एकूण 76 गावे येतात. खुलताबाद येथे दरवर्षी उरुस भरतो. खुलताबाद येथे जर्जरीबक्ष दर्गा आहे.खूलताबाद येथे औरंगजेबची कबर आहे.खुलताबाद तालुक्यातील गावाच्या उत्पत्तीचा शोध घेण्याचा प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

पुनरूक्त पध्दतीत नावे :

खूलताबाद तालुक्यातील गावांची नावे खुर्द, बुद्रुक अशी दोन-दोन वेळा आलेली आहे. देवळाना, निरगुडी, वडोद हे अनूक्रमे 03 गावे खुर्द, बुद्रुक अशी मध्ये येताता तर तांडा हे उपपद लागलेली गाव तिसगाव तांडा अशी 01 वेळा येतात. म्हणून 71 गावे ही भिन्न भिन्न नामाभिधाने दर्शवितात.

अक्षर वर्णानूसार गावाची नावे :

खूलताबाद तालुक्यातील गावांची नावे 'अ' चा स्वरात 02 तर 'म' व 'स' या व्यंजनात सर्वात जास्त 08 गावे येतात. सर्वात कमी ग्रामनामे घ, च, ज, झ या 04 व्यंजनात प्रत्येक 01-01 नावे येतात. 12 स्वर अक्षरांपैकी फक्त 'अ' व 'आ' यात अनूक्रमे 02 व 02 अशी नावे येतात. 'छ, ठ, ड, ढ, ण, फ, ह, ष, ळ, क्ष, ज्ञ' या 13 व्यंजनात खूलताबादच्या गावांची नावे येत नाही. 'ट, ध, ल, भ, र अनूक्रमे 02-02 नावे येतात 'द, न, व' या व्यंजनात प्रत्येक 03-03 नावे येतात.

स्वर / व्यंजना	अ	ब	च	झ	द	ध	ज	क	ग	ल	म	त	स	श	ट	व	य
ग्रांमसंख्या	2	5	1	1	3	2	1	5	4	2	8	4	8	4	2	5	1

झाडांवरून, वनस्पतीवरून गावांची नावे :

खूलताबाद तालूक्यातील गावांची नावे झाडांच्या नावावरून पडलेली आहेत. झाडांच्या नावावरून, झाडाजवळ असलेल्या वनस्पतीवरून, वस्तीवरून प्राप्त झाले असावे.प्राचीन काळातील नैसर्गिक वनसंपत्तीचे वैभव, दर्शविणारी ही गावाची नावे आढळतात. यात मोठी वृक्ष, वड, पिंपळ, चिंच इत्यांदीचा समावेश आहे.वनऔषधी वनस्पतीच्या नावांवरूनही नावे गावाला पडलेली दिसतात. गावांची बहुतांश नावे ही वृक्षांच्या नावावर आधारित असतात.[3]आखत ह्यात शब्दांचा अर्थ तांदुळ असा होता.तांदुळाच्या झाडांवरून आखतवाडा हे नाव पडले.पळस वनस्पतीवरून पळसगाव, पळसवाडी हे उपपद पळस व वाडी यावरून पळसगाव, पळसवाडी पडले.पिंपळ वृक्षावरून खाडी पिंपळगाव, बोर ह्या वनस्पतीवरून बोरवाडी, चिंच ह्या वरून चिंचोली, वड वृक्षावरून वडगाव अशी वनस्पती व झाडदर्शक 10 ग्रामनामे तालूक्यात आढळतात.

उंच सखल भौगोलिक परिस्थितीवरून ग्रामनाम :

खूलताबाद तालूका हा नद्या, नाले, तळे, पाणी, जमीन, वृक्ष, डोंगर इत्यादीवरून तसेच जमिनीचा प्रकार सूपीक-पडीक, खर असणारी रूक्ष जमीन यावरून गावाला नावे मिळालेली आहेत.[4]

दरी या उपपद वरून दरेगाव हे नाम दर्शवितो.झरा यावरून झरी हे ग्राम नाम विरमगाव हे नाव वरचे स्थान ठिकाण (उंच) स्थळ यावरून उंचावरील ग्राम दर्शविते.नदी, तळे यावरून तळ्याची वाडी हे ग्राम पडले असावे.भौगोलिक क्षेत्रावरून 05 गावे ही खूलताबाद तालुक्यात येतात.

पशुंपक्षावर अधारीत नावे :

तालुक्यात काही पशुपक्ष्यांवर आधारित ग्रामनामे आढळतात. बोडखा हे ग्रामनाम बोकडा ह्या वरून येते.घोडेगाव हे घोडा या प्राण्यावरून दर्शविते.म्हैसमाळ हे नाव म्ह – म्हैस उपपद म्हैस – पाळीव प्राणी दर्शक तर माळ हे स्थान दर्शविते.तालुक्यात पशू पक्ष्यांवर आधारित एकंदरीत 05 नामे आहेत.

व्यक्ती, मनुष्य, देवता, लोकर्शक नामे :

इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांनी स्थलनाम उत्पत्तीकोश या संदर्भात महाराष्ट्रातील आद्य वसाहतकार आर्य की अनार्य असा प्रश्न उपस्थित केला.त्याच्या उत्तरासाठी एक पध्दती सुचविली. आर्याची वस्ती महाराष्ट्रात होण्यापूर्वी महाराष्ट्र पशुतुल्य रानटी, अर्थवट आणि अल्प प्रमाणात सुधारलेली माणसांची वस्ती असेल विचार मांडले.[5]

खूलताबाद तालुक्यात लोकनामदर्शक नावे आहेत. अब्दुलपुर हे नाव अब्दुल शब्दावरून हे लोकनामदर्शक पनाम सुचविते.‘अब्दुल’ व ‘पुर’ हे उपपद तर ‘पुर’ हे प्रत्यपद दर्शविते. ‘भडजी’ हे शब्दश: अर्थ ब्राम्हण होते. ‘इंदापूर इंद्र देवता दर्शक नाम सुचविते.‘कनकशिल’ कनक, लक्ष्मी, शिळ – दगड या देवनामावरून प्रत्ययास येते.शंकरपूर – शंकर – शिव, शंभू ‘पूर’ उपपद लावून शंकरपूर देवतावाचक नाम दर्शविते.सूलतानपूर हे राजा, व्यक्तीनामदर्शक जाणवते.

ISSN 2231 4342

धर्मवाचक " दर्शक नावे :

मुस्लिम धर्मदर्शक प्रभाव जाणवणारी गावे तालुक्यात 19 आहेत. अब्दुलपूर, आझमपूर, इंदापूर, कागजीपूरा, खासपूर, खतनापूर, महमदपूर, मलकापूर, मंबापूर, ममनापूर, ममुराबाद, रसूलपूरा, शहजतपूर, शंकरपूर, शेकापूर, शेखपूर, सुलतानाबाद, सुलतानपूर, ताजनापूर, मुस्लिम कालखंडात वस्तीला 'पूर' अथवा 'पुरा'म्हणत यावरूनही नावे पडली. त्यात काही व्यक्तीनाम आहेत तर काही लोकनाम दर्शवितात. येलापूर आजचे वेरुळ.[6]

उपपद प्रत्यय :

खुलताबाद तालुक्यात वाडा, वाडी हे उपपद असलेली 05 गावे आढळतात. खेडा हे उपपद असलेली 04 गावे आढळतात. पूरा, पूर हे प्रत्यय असलेली 18 गावे आहेत. खुर्द, बुद्रुक नाम असलेली 03, 03 गावे, तांडा हे प्रत्यय पद गावे 01 कसबा व पेठ गावांच्या नामात प्रत्यय उपपदात आढळात नाही.

स्वर, व्यंजन	ग्रामनाम	संख्या	स्वर, व्यंजन	ग्रामनाम	संख्या
अ	अब्दुलपूर, आखतवाडा, आझमपूर	03	ज	जाफरवाडी	01
ब	बादलाबाई, बागकोट, बाजारसावंगी बोडखा, बोरवाडी	05	क	कागजीपूरा, कानडगाव, कनक शिळ, कसाबखेडा, कौटगाव	05
च	चिंचोली	01	ख	खांडी पिंपळगाव, खासपूर, खतनापूर, खीर्डीगाव खूलताबाद	05
ग	गदाना, गल्ले बोरगाव, गंधेश्वर, गोळेगाव	04	ल	लामणगाव, लोणी	02
ध	धामणगाव, धामनी	02	म	महमदपूर, मलकापूर, मंबापूर, ममनापूर, ममुराबाद, माटरगाव, मावसाळा, म्हैसमाळ	08
द	दरेगाव, देवळांना बू. देवळांना खू.	03	श	शहजतपूर, शंकरपूर, शेकापूर, शेखपूर	04
घ	घोडेगाव	01	न	नांद्रबाद, निरगुडी बु., निरगुडी खू,	03
इ	इंदापूर	01	प	पाडळी, पळसगाव, पळसवाडी, पिंपरी	04
र	रसूलपूरा, रेलगाव	02	स	सालुखेडा, सराई, सावखेडा,	08

				सुलिभंजन, सुलतानाबाद, सुलतानपूर,	
त	ताजनापूर, तळ्याची वाडी, तिसगाव, तिसगाव तांडा	04	ट	टाकळी रारा, टाकळी पैठण	02
व	वेरुळ, विरमगाव, वडगाव, वडोद बू. वडोद खू.	05	य	येसगाव	01
झ	झरी	01			

निष्कर्ष :

खूलताबाद तालुक्यात 71 गावे आहेत. सर्वात जास्त ग्रामनामांचा अर्थबोध हा झाडांवरून, वृक्षांवरून, वनस्पतीवरून गावांची उत्पत्ती दर्शविते.कसबा पेठ हे छोटेगाव व बाजार रूपदर्शक ग्राम खूलताबाद तालुक्यात आढळत नाही.मध्ययुगीन कालखंडातील मुस्लिम धर्माच्या गावांची संख्या 20 आहे. खूलताबाद तालुक्यात उपपद असलेली 07 गावे आढळतात. वाडा, वाडी हे उपपद असलेली 05 गावे आढळतात. खेडा हे उपपद असलेली 04 गावे आढळतात. पूरा, पूर हे प्रत्यय असलेली 03-03 गावे, तांडा हे प्रत्ययपद गावे 01 कसबा व पेठ गावांच्या नामात प्रयत्य उपपदात आळत नाही.

संदर्भ :

1. आंतरजाल माध्यम, खुलताबाद विकीपिडीया – 10-02-2021, 2.34 P.M.
2. आंतरजाल माध्यम, खुलताबाद सनसेक – 12-02-2021, 3.50 P.M.
3. ठोसर एच.आर., हिस्टोरिकल जिओग्राफी ऑफ महाराष्ट्र अॅण्ड गोवा, इपिग्रापिकल सोसायटी ऑफ इंडिया, म्हैसूर, 2004, पृ. 33.
4. देशमुख प्रशांत, जामनेर जिल्हा जळगाव तालुक्यातील ग्रामनामांचा अर्थबोध एक अभ्यास, मराठवाडा इतिहास परिषद, इतिहास संशोधन पत्रिका, अंक 14 वा, नोव्हेंबर 2009, पृ. 54.
5. शहा मु.ब., (संपा.) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य खंड आठवा, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे साहित्य मंडळ, धूळे, 1998, पृ. 397.
6. प्रा. एस. आर. हणमंते, अंजिठा बुध्दलेणी जागतिक वारसा, उरूवेल.
7. खूलताबाद तहसील ग्रामनाम सूची.

"डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व कार्य"

संतोष पंढरीनाथ कारभारी
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मो.नं-9975805865
Email:santoshpkarbhari@gmail.com

ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण होण्यासाठी शिक्षणाचे लोकशाहीकरण झाले पाहिजे.शिक्षणाच्या लोकशाहीकरणाची संकल्पना सर्वप्रथम विसाव्या शतकाच्या सुरवातीला डॉ.बाबासाहेबांनी केली होती.बाबासाहेबांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन आधुनिक होता.निरक्षरतेने जनतेला मानसिकदृष्टया गुलाम,नैतिकदृष्टया अध:पतित,सांस्कृतिकदृष्टया पंगुवत,आर्थिकदृष्टया दरिद्री आणि सामाजिकदृष्टया मागासलेले केले होते.त्यांच्या सामाजिक दर्जामुळे त्यांचे जगणे दु:खमय झाले होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला सतत शिकण्याची हाकाटी दिली.शिक्षणामुळे आपल्या जगण्यात आमुलाग्र बदल होवू शकतो,हे त्यांनी जाणले होते.त्यामुळे सामाजिक हेतूच्या गतिकीचे प्रेरित होवून डॉ.आंबेडकरांनी समाजातील अन्यायाविरुद्ध आसूड हाती घेतला.बाबासाहेबांनी सामाजिक परिवर्तनाचे हत्यार म्हणून शिक्षणाचा पाठपुरावा केला.निरक्षर जनतेला त्यांच्या गाढ झोपेतून जागे करण्याचे काम बाबासाहेबांना करायचे होते,तत्कालीन समाजव्यवस्थेने त्यांच्यावर कशी अमानुषता लादली होती याची जाणीव त्यांना करून दयावयाची होती.दलित समाजाला स्व:तामध्ये प्रगती घडवून आणण्यासाठी शिक्षण हे मोठे हत्यार आहे असे वाटत होते.मागासवर्गीयांच्या शिक्षणासंदर्भात बाबासाहेबांनी जे चिंतन केले तेही तितकेच मूलगामी स्वरूपाचे आहे.ज्ञानाअभावी व्यक्ती आणि समाजाचे नुकसान जसे होते,तसेच एखादी व्यक्ती वा समूहाला शिक्षण नाकारणे म्हणजे माणूस म्हणून त्याचे अस्तित्व नाकारून त्याच्या क्षमता मारून टाकणे होय;अशी बाबासाहेबांची शिक्षण विषयक धारणा होती.

इ.स.१९२४ मध्ये अस्पृश्यांच्या उद्धारासाठी डॉ.बाबासाहेबांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभे' ची स्थापना केली. "शिकवा! चेतवा!! संघटित व्हा!!! हे बहिष्कृत हितकारणी सभेचे घोषवाक्य होते.या सभेची प्रामुख्याने वसतिगृहे उघडून दलित वर्गात शिक्षणाचा प्रसार करणे.वाचनालये,समाजकेंद्रे आणि वर्ग किंवा अभ्यास मंडळे उघडून,दलित वर्गात संस्कृतीच्या प्रसाराचे प्रचालन करणे तसेच दलित वर्गाच्या आर्थिक आर्थिकस्थितीत सुधारणा करण्यासाठी औद्योगिक आणि कृषिशाळा सुरू करणे ही उद्दिष्टे होती.ह्या सभेने दलित विद्यार्थ्यांना मदत सुरू केली.इ.स.१९२७ मध्ये प्राथमिक शिक्षणाची गती फार मंद होत आहे अशी खंत बाबासाहेबांनी बोलून दाखवली होती.ते म्हणाले होते की, "ज्या रीतीने शिक्षणाची प्रगती होत आहे,त्याच वेगाने जर ती चालू राहिली तर ,शिक्षणाच्या कक्षेत आणण्यासाठी शाळेत जाणाऱ्या मुलांना चाळीस वर्ष आणि मुलींना तीनशे वर्ष लागतील"[१]तसेच बाबासाहेबांनी शिक्षणावर प्रत्येक व्यक्तीमागे फक्त चौदा आणे खर्च केले जात आहे हे दाखवून

ISSN 2231 4342

दिले.शिक्षणावर कमी खर्च आणि शिक्षणाच्या प्रक्रियेतील गळतीचे उच्च प्रमाण यांच्यात सरल दुवा होता ते ते दाखवून देतात.शिक्षणातील अपव्ययावार त्यांनी प्राथमिक शिकणावर अधिक खर्चासह 'सक्ती' हा उपाय सुचविला आहे.

शिक्षण हे सर्वांच्या आवाक्यात आले पाहिजे तसेच त्यासाठी शिक्षण विभागाने शिक्षण हे जितके स्वस्त करता येईल तितके केले पाहिजे, असे बाबासाहेबांचे मत होते.शिक्षणाच्या बाबतीत समानतेचे तत्व म्हणजे काय हे सांगताना बाबासाहेब सांगतात की,समानतेचा अर्थ म्हणजे निम्नस्तरीय वर्गाची पातळी उच्चस्तरीय वर्गाच्या पातळीपर्यंत आणणे होय.डॉ.बाबासाहेबांनी आपल्या जमातीचे शालेय शिक्षण भक्कम करण्यासाठी इ.स.१९२८ मध्ये दलितवर्ग शिक्षण संस्थेची स्थापना केली.ही शिक्षण संस्था मान्यता पावलेली संस्था होती.या संस्थेने शासनाकडून पाच वसतिगृह योजनेला मान्यता मिळविली.शिक्षण घेण्यासाठी अस्पृश बांधवांना प्रोत्साहित केलेल्या संस्थांमध्ये शिक्षणाचे मानवतेच्या दृष्टीने मूल्य जाणवणाऱ्या, दलित विदयार्थ्यांकडे सहानुभूतीने पाहणाऱ्या व त्यांच्या उन्नतीचा प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांची नेमणूक केली.अस्पृश्यांच्या विकासासाठी त्यांना विशेष सवलती मिळणे आवश्यक आहे याची डॉ.बाबासाहेबांना जाणीव होती.१९४५ मध्ये त्यांनी "पीपल्स एज्युकेशन सोसायटीची" स्थापना केली.तिने २० जून १९४६ रोजी सिद्धार्थ कला आणि विज्ञान विदयालय सुरू केले आणि भारतातील एक अग्रगण्य महाविदयालयअसल्याचे सिद्ध केले.त्याचप्रमाणे आपल्या कारकिर्दीत डॉ.आंबेडकरांनी १९५० मध्ये औरंगाबाद येथे 'मिलिंद कला आणि महाविदयालय' स्थापन केले.आपल्या आयुष्याच्या अखेरच्या काळात बाबासाहेबांनी स्वता:ला पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालाच वाहून घेतले.

डॉ.बाबासाहेबांनी शिक्षणालाच समाज परिवर्तनाचे साधन मानले आहे.बाबासाहेबांनी महिलांच्या शिक्षणाचाही आग्रह धरला.त्यासाठी ते सांगतात की मुलामुलींची लग्ने लवकर करू नका निदान त्यांना स्वत:च्यापायावर उभे राहू दया.बाबासाहेबांनी शिक्षणाच्या बाबतीत उच्च शिक्षणावर भर दिला आहे.डॉ.बाबासाहेबांनी १९२० च्या दशकात प्रत्येक प्रांतामध्ये उच्च शिक्षण देणारी विदयापीठे असली पाहिजे,अशी मागणी केली होती.उच्च शिक्षणाचा प्रसार वाढेल तेव्हाच लोकांना उच्च शिक्षणाची संधी संधी मिळेल,अशी त्यांची भूमिका होती.त्यासाठीच संख्यात्मक विकासाची मागणीही पहिल्यांदा झाली.आपल्या 'कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद' अधिवेशनातील भाषणात डॉ.बाबासाहेब सांगतात की, "समाज सुधारणेसाठी चांगल्या शिक्षणाची गरज आहे.एक मुलगा बी.ए.झाल्याने आपल्या अस्पृश्य समाजास जसा तो आधार होईल तसा एक हजार मुले चौथी शिकून झाले तरी होणार नाही"[२]ह्याचा अर्थ बाबासाहेबांनी सांगतात की प्राथमिक शिक्षण कमी महत्वाचे नाही.उच्च शिक्षण हे व्यक्तीला एका विशिष्ट उंचीवर घेवून जाते.ते प्राथमिक शिक्षणालाच राष्ट्रीयदृष्टया अत्यंत महत्वाचा प्रश्न मानतात.प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार हा राष्ट्रीय प्रगतीचा पाया ते मानतात.ज्यांना शिक्षणाचे महत्व कळत नाही ते याबाबतीत उदासीन असतात त्यांच्यासाठी बाबासाहेबांनी सक्तीच्या कायदयाची आवश्यकता सांगितली आहे.शिवाय शिक्षण सरसकट सर्वांसाठी मोफत न करता जे फी देवू शकतात त्यांच्याकडून ती घ्यावी

ISSN 2231 4342

म्हणजे सक्तीच्या शिक्षणाचा खर्च भागविण्यास मदत होईल,असे बाबासाहेबांचे मत होते.मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मदत म्हणून शिष्यवृत्ती देण्यात यावी हे सांगताना त्याचप्रमाणे बाबासाहेब सांगतात की,मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे पालक ही शिष्यवृत्ती देणगी समजून त्याचा दुरुपयोग करतात त्यामुळे सरकार किंवा खाजगी संस्थांनी वसतिगृहे चालविणे विद्यार्थीहिताचे होईल.बाबासाहेब त्याचप्रमाणे सांगतात की केवळ बाराखडी हेच शिक्षण नाही तर मुलांचे मने सुसंस्कृत करणारे दर्जेदार शिक्षण शाळांनी दिले पाहिजे असा खोलवर प्राथमिक शिक्षणाचा विचार बाबासाहेबांनी केला आहे.बाबासाहेबांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच सरकारकडून ३ लाख रूपयांचा निधी मिळविला होतात्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांनाशिष्यवृत्ती मिळू लागली होती.

शिक्षणाची संधी ही प्रत्येकाने साधावी असे बाबासाहेबांचे मत होते.डॉ.बाबासाहेबांनी देव,दैवत,भोळेपणा ह्या प्रवृत्तीवर हल्ला केला.बाबासाहेब सांगतात की, “आई-बाप मुलांना जन्म देतात.कर्म देत नाही हे म्हणणे ठीक नाही.आई-बाप मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलांच्या शिक्षणाबरोबर मुलींच्याही शिक्षणासाठी धडपड केली पाहिजे;तर आपल्या समाजाची प्रगती झपाटयाने होईल”[३]म्हणजेच बाबासाहेबांनी मुलांबरोबर मुलींच्याही शिक्षणाचा विचार केला आहे.वरती सांगितल्याप्रमाणे बाबासाहेबांनी मुलींच्या लवकर विवाहाला विरोध केला आहे.डॉ.बाबासाहेब स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते होते.त्यांचे हक्क,उन्नती आणि त्यांचा विकास साधण्यासाठी १९४८ मध्ये बाबासाहेबांनी कायदेमंडळापुढे ‘हिंदू कोड बिल’ सादर केले होते.

स्वाभिमान,स्वावलंबन आणि आत्मोद्धार हे परिणामकारक शिक्षणाचे ध्येय होय असे बाबासाहेब सांगतात.शिक्षणातून व्यक्तिमत्वाचा विकास होतो हे सांगताना बाबासाहेब सांगतात की,स्वता:चा विकास स्वता:नेच करावा ही आत्मोद्धाराची बाबासाहेबांची संकल्पना होती.वर सांगितल्याप्रमाणे बाबासाहेब शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे हत्यार मानतात.डॉ.बाबासाहेबांना नवमानतावादाचा संस्कार करणारे शिक्षण हवे होते.स्वातंत्र्य,स्वावलंबन,आत्मोद्धार हे सर्व शिक्षणातून तयार होईल या मताचे बाबासाहेब होते.बाबासाहेबांनी शिक्षणाला राष्ट्रीय उन्नतीचा मूलमंत्र मानले आहे.बाबासाहेब सांगतात की, “सामाजिक क्रांती घडवून आणायची असेल तर त्याची बीजे बालवयातच पेरली पाहिजे”[४]शिक्षणाला बाबासाहेबांनी सामाजिक क्रांतीचे प्रभावी साधन मानले आहे.बाबासाहेबांनी अशिक्षित माणसाला गुलामीची उपमा दिली आहे.डॉ.बाबासाहेबांच्या मते शिक्षण हे माणसाला घडवत असते.शिक्षण म्हणजे ज्ञान आणि प्रज्ञा यांचा सुरेख संगम.केवळ ज्ञान उपयोगाचे नाही, तर जे उपयोगी येते तेच खरे ज्ञान; अशी त्यांची धारणा होती.शिक्षणाचा परिणाम उत्तम चारित्र्य निर्माण करणे हा असावा असे ते सांगतात.तसेच बाबासाहेबांनाशिक्षण हे मूल्यधिष्ठित म्हणजेच उच्चतम नैतिक आचरण निर्माण करणारे असावे असे वाटते.त्यांच्या मते जी व्यक्ती आपल्या अपत्य आणि पत्नीपेक्षा शिक्षणावर अधिक प्रेम करते तो खरा शिक्षणप्रेमी होय.शिक्षण घेवून केवळ स्वउन्नती तर शिक्षण प्रसाराची मोठी जबाबदारी ही शिक्षित वर्गावर असल्याचे ते सांगतात.शिलाशिवाय शिक्षण म्हणजे शिक्षणरूपी शस्त्राचा गैरवापर असे बाबासाहेब सांगतात.

प्लेटो हा आदर्शवादाचा जनक मानला जातो. प्लेटो ने दृश्य वस्तू या सत्य नसून त्यांच्या मागे असलेल्या त्याच्या कल्पना याच सत्य आहेत,असा सिद्धांत मांडला.या संदर्भात डॉ.आंबेडकर सांगतात की,वास्तव डोळ्यासमोर असून ते कसे नाकारता येईल.व्यावहारिक जीवनात माणसाची पंचज्ञानेंद्रियेच सत्याचा निर्वाळा देतात हीच त्याच्या ज्ञानर्जनाची अंतिम साधने आहेत.आमच्या ज्ञानाची साधने जी ज्ञानेंद्रिये ती जगाच्या वास्तवाची आम्हाला जाणीव करून देत आहेत.असे सांगताना जगाचे अस्तित्व आम्हाला कसे नाकारता येईल?जर जगालाच अस्तित्व नसेल तर मला आणि तुम्हाला अस्तित्व कुठे उरते आणि माझ्या जाणिवेला तरी काय अर्थ राहतो?सत्य शोधून काढणे हा आदर्शवादाचा पाया आहे.मात्र,त्याची व्याख्या करताना जे डोळ्याला दिसते ते सत्य नाही असे म्हणणे चुकीचे आहे.शिक्षणाचा उद्देश आत्मसाक्षात्कार मानवाच्या पंचज्ञानेंद्रियाला व पंचकर्मेंद्रियांना अनुभवता आला पाहिजे.जे नाही त्याची केवळ कल्पना करून जाणीव करायची आहे.असे शिक्षणाचे ध्येय डॉ.आंबेडकरांना अभिप्रेत नाही.ज्ञानप्राप्तीसाठी,सत्य शोधण्यासाठी आपली पंचज्ञानेंद्रिये हेच एकमेव साधन आहे असा नव आदर्शवादी सिद्धांन्त त्यांनी शिक्षणात मांडला.[५] शिक्षणाने केवळ स्वत:चा विकास होत नाही तर समाजाचा देखील दर्जा उंचावतो हा महत्वाचा घटक बाबासाहेबांनी मांडला.शिक्षणातील आदर्शवाद ही संकल्पना डॉ.आंबेडकरांना शिलाशिवाय अपूर्ण वाटते.प्लेटो शिक्षणामुळे जीवनातील श्रेष्ठ मूल्य लाभतात असे मानतो.तो या मूल्यांना सत्य,सौंदर्य व शिव असे मानतो.तर डॉ.बाबासाहेब शिक्षणामुळे मनुष्य शीलवान होतो असे मानतात.

डॉ.बाबासाहेबांनी निसर्गवादाचे प्रारूप भारतीय समाजव्यवस्थेत रुजवले.शिक्षण हा सर्वांचा हक्क असून हजारो वर्षांची मक्तेदारी मोडून काढली.भारतीय राज्यघटनेत तसा कायदाच बाबासाहेबांनी केला.शिक्षणावर व्यक्तीची योग्यता ठरते जातीवरून नाही, ते त्यांनी संगितले.ती व्यक्ती एखादया जातीची म्हणून त्याला शिक्षणाचा अधिकार नाकारणे हे निसर्गनियमाविरुद्ध आहे असे बाबासाहेब सांगतात.डॉ.बाबासाहेबांच्या प्रयत्नातून भारतीय समाजात निसर्गवाद रूजला.शिक्षणासाठी जात,धर्म,वंश,लिंग हे भेद पुसले गेले.निसर्गवाद शिक्षणाचे ध्येय लोकनिष्ठ मानतो.डॉ.बाबासाहेबांनी ह्या ध्येयाला अनुसरून विचार मांडतात.त्यांच्या मते, आपला व्यक्तीविषयक लौकीक वाढविणे त्याचबरोबर आपल्या समाजाची योग्यता वाढविणे हे केवळ शिक्षणावर अवलंबून आहे.आदर्शवादाप्रमाणे शिक्षणाचे उद्दिष्टे परलोक प्राप्ती नसून स्वविकास व सामाजिक उन्नती असायला हवे असे बाबासाहेब सांगतात.तरच शिक्षण खऱ्या अर्थाने मानव उपयोगी ठरेल असे बाबासाहेब सांगतात.डॉ.बाबासाहेबांच्या शिक्षणविषयक विचारातील निसर्गवाद म्हणजे केवळ निसर्गावर अवलंबून राहणे नव्हे तर निसर्गातील एक घटक म्हणून त्यानुसार इतरांवर अवलंबून राहणे होय.

बाबासाहेबांना ज्ञान हाच प्रकाश आणि शक्ती वाटत होती.ज्ञान हे तलवारीसारखे होते.त्याचा चांगल्या किंवा वाईट कामासाठी वापर करता येतो.म्हणून त्यांचा आग्रह होता की, ज्ञानाला चारित्र्याची जोड मिळाली पाहिजे.ते सांगतात की,माणसाचे चारित्र्यच त्याला चांगले वा वाईट काम करण्यास भाग पाडते.शिक्षण हे मानवी सभ्यता आणि संस्कृतीचा खरा पाया करण्यासाठी; ज्ञान आणि चारित्र्य एकता आवश्यक होती.सुशिक्षित वर्गाकडे

 ISSN 2231 4342

जर चारित्र्य नसेल,तर त्यांच्या आत्मप्रगतीसाठी आणि दुबळ्या आणि वंचित वर्गांना अहितकारक अशा ज्ञानाचा उपयोग होईल.

देशातील विषमतेस डॉ.बाबासाहेब हे शिक्षणाच्या अभावास कारणीभूत मानतात.म्हणूनच बहिष्कृत वर्गात शिक्षणाचा प्रसार होणे गरजेचे आहे असे ते सांगतात.बाबासाहेबांनी मूकनायक(१९२०),बहिष्कृत भारत(१९२७),जनता(१९३०) आणि प्रबुद्ध भारत (१९५६) या चार वृत्तपत्रातून समाज प्रगतीसाठी तसेच अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी वारंवार विचार व्यक्त केले.

प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे करण्यावर बाबासाहेबांचा भर होता.तसेच उच्च शिक्षणाला बाबासाहेबांनी महत्वपूर्ण मानले आहे.पदवी व पदव्यूत्तर शिक्षणासंबंधी त्यांचे काय विचार होते हे पाहणे देखील महत्वाचे ठरते.बाबासाहेब सांगतात की,पदवी व पदव्यूत्तर हे वेगळे वेगळे असले पाहिजे आणि पदव्यूत्तर पासून पदवी शिक्षण वेगळे करणे म्हणजे संशोधन आणि अध्यापन वेगळे करण्यासारखे आहे.संशोधन आणि अध्यापन यांची फारकट म्हणजे करणे म्हणजे अध्यापनाचा दर्जा खालवणे होय.अध्यापन हे प्रामुख्याने पदवीपूर्व शिक्षणात महत्वाचे आहे आणि शिक्षणाबरोबर संशोधन हे पदव्यूत्तर शिक्षणात महत्वाचे आहे.पदव्यूत्तर शिक्षण हे संशोधनाबरोबर केले पाहिजे व पदवीपूर्व शिक्षणात संशोधनपयोगी विदयार्थ्यांचा कल बघून पदव्यूत्तर वर्गात त्यांची वाढ करता येणे हे पदव्यूत्तर आणि पदवीपूर्व शिक्षणात शिक्षणासाठी भाग घेणाऱ्या प्राध्यापकाला चांगले कळते म्हणून दोन्हींना शिकवणारे प्राध्यापक यांची यांची सांगड घालावी असे झाल्याने देवाण घेवाणमध्ये चांगली सुसंगती आणता येईल आणि होतकरू विदयार्थी पाहून त्याला पदव्यूत्तर वर्गासाठी प्रोत्साहन देता येईल.येथेही त्याला योग्य मार्गदर्शन करता येईल. “विदयापीठानेपदवीपूर्व वर्ग चालू करावेत त्यातून दर्जेदार असे शिक्षण विदयापीठाला जर पदव्यूत्तर वर्गासाठी स्वतंत्र्य असे शिक्षक वर्ग नेमावायचा असेल तर पदव्यूत्तर वर्गाला वेगळे प्राध्यापक नेमावेत”[६] असे बाबासाहेब सांगतात.बाबासाहेबांना उच्च शिक्षणातुन समता,स्वातंत्र्य,बंधुभाव ही मानवी मूल्ये स्वीकारलेला एक स्वाभिमानी आधुनिक समाज निर्माण करायचा होता.बाबासाहेबांच्या शैक्षणिक चळवळीचा हाच खरा मूलाधार होता.

डॉ.बाबासाहेब परीक्षेबाबत असे सांगतात की,कॉलेज मध्ये विदयार्थ्यांना तोंडी व लेखी परीक्षा असायला हव्यात.विदयापीठात शिक्षणाच्या विस्ताराचा भाग म्हणून त्यांनी मुंबई विदयापीठाने अभियांत्रिक,शेती,हस्तकौशल्य कला,तंत्रशिक्षण,संगीत या शाखा सुरू कराव्यात असे संगितले.सदयशिक्षण पद्धतीमध्ये प्राथमिक व माध्यमिक स्तरावर सकारीक व आकारीक मुल्यमापनाची सातत्यपूर्ण व सर्वंकष पद्धत आणली.असे त्यांनी दाखवून दिले.

डॉ.बाबासाहेबांनी प्राध्यापक आणि शिक्षकांबाबत आपले विचार मांडले आहेत.बाबासाहेब सांगतात की, शिक्षक हा प्राथमिक,महाविदयालयीन अथवा विदयापीठाचा असो त्याचे कर्तृत्व उत्तुंग आणि विदयार्थ्यांना अनुकरणीय असले पाहिजे.बाबासाहेब असेही म्हणतात की, “प्राध्यापकांनी अध्यापन आणि अध्ययनात स्वत:ला

इतके गुंतवून घ्यावे की,आपल्या घराकडेही बघण्याची सवड त्यांना मिळू नये.ते काम त्यांनी त्यांच्या पत्नीकडे सोपवावे.संशोधन करावे.त्याचप्रमाणे प्राध्यापक हा नुसताच विद्वान असून चालत नाही,तो बहुश्रुत असला पाहिजे.आपला विषय अधिकाधिक महितीपूर्ण आणि मनोरंजक करू अशी धमक त्याच्यात असली पाहिजे"[(७)]अशी गुणवैशिष्ट्ये बाबासाहेबांनी शिक्षक आणि अध्यापकाची सांगितली आहेत.

सारांश,

'शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा' या तीन तत्वात डॉ.आंबेडकरांच्या सर्व शैक्षणिक विचारांचे सार आहे.डॉ.बाबासाहेब असो किंवा इतर कोणताही समाजसुधारक असो क्रांतीसाठी लागणाऱ्या पूर्वआवश्यकता अशा सष्टपणे मांडाव्या लागतात.त्याच बाबासाहेबांनी मांडल्या.प्राथमिक,उच्च आणि विदयापीठीय शिक्षणासंबंधी विचार त्यांनी अत्यंत उपयुक्त असेच मांडले आहेत.भारतातील अस्पृश्य,स्त्रिया ह्यांच्या शोषणाविरुद्धचा उपाय म्हणजे शिक्षण असे त्यांनी संगितले.बाबासाहेबांची विशेषता अशी की,अलीकडील शिक्षणसम्राटाप्रमाणे त्यांनी आपल्या शैक्षणिक संस्थेस स्वत:चे किंवा आई वा वडिलांचे नाव दिले नाही.या संस्थेस पीपल्स एज्युकेशनसोसायटी व महाविदयालयांना सिद्धार्थ,मिलिंद ही नावे दिली.आजच्या युगात शिक्षणक्षेत्रात जी अराजकता दिसते,गुणवत्तेची घसरण होत आहे त्यासाठी बाबासाहेबांच्या शैक्षणिक विचारांचे अवलोकन होणे गरजेचे आहे.

तळटीपा

१)फडके.य.दी(संपा),डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रकाशन,मुंबई,पृ.क्र.४१४.

२)खैरमोडे चांगदेव भगवानराव,डॉ.भीमराव रामजी आंबेडकर,सुगावा प्रकाशन पुणे,पृ.क्र.३२

३)कित्ता,डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ,पृ.क्र.४२१.

४)कित्ता,डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ,पृ.क्र.४२३.

५)डॉ.निताळे.विनोद,मुंबई तरुण भारत,४ जुन २०२०.

६)Dr.A.B.R,W and S vol.2 Philosophy of Hinduism,education dept govt.of Maharashtra,page no.58

७)जोंधळे.बी.व्ही.,महाराष्ट्र टाइम्स (१३ एप्रिल २०१४)

ISSN 2231 4342

संदर्भ ग्रंथ

१)जाधव विजय,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र,मनोरमा प्रकाशन मुंबई,प्रथमावृत्ती २००७.

२)फडके.य.दि(संपा),डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई,प्रथमावृत्ती १९९३.

३)खैरमोडे भगवानराव चांगदेव,डॉ.भीमराव रामजी आंबेडकर चरित्र्यग्रंथ,सुगावा प्रकाशनपुणे,पहिली आवृत्ती जुलै १९९२.

४)कीर धनंजय,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र्यग्रंथ,पॉप्युलर प्रकाशन मुंबई,प्रथमावृत्ती१९६६.

५)Dr..A.B.R,W and S vol.2Philosophy of Hinduism,Departmentgovt.ofMaharashtra,1987.

६)डॉ.मेश्राम योगेंद्र,आंबेडकरवादी वाङ्मयीन जाणिवांची अक्षरसाक्ष,सुगावा प्रकाशन पुणे,प्रथमावृत्ती- २६ जानेवारी २०००.

७)डॉ.कसबे रावसाहेब,आंबेडकरवाद तत्व आणि व्यवहार,सुगावा प्रकाशन पुणे,प्रथमवृत्ती १९८९.

८)प्रा.जाधव मनोहर,प्रबोधन आणि परिवर्तन दशा आणि दिशा,नवीन उद्योग प्रकाशन पुणे,प्रथमावृत्ती १९९७.

९)महाराष्ट्र टाइम्स(वृत्तपत्र),१३ एप्रिल २०१४.

१०)मुंबई तरुण भारत(वृत्तपत्र),४ जुन २०२०.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

देकार्तेशियनवादाच्या प्रभावातून वस्तुनिष्ठ इतिहास लेखन

सहाय्यक प्राध्यापक - निळे सुधाकर विष्णु
पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय
प्रवरानगर,
लोणी खुर्द ता. राहता, जिल्हा अहमदनगर
भ्रमणध्वनी - 9623257283
nilesudhakar1975@gmail.com

प्रस्तावना: मध्ययुगीन इतिहास लेखनावर ईश्वर व धर्म यांचा प्रभाव होता. यामुळे काही कल्पनेतील गोष्टीही स्वीकारल्या होत्या. राजा धर्मगुरू ईश्वर यांच्या भोवती इतिहास फिरत होता. सामान्य व्यक्तीचा अभ्यास केला जात नव्हता. परंतु मध्ययुगाच्या शेवटच्या कालखंडात रेने देकार्ते या तत्ववेत्तयाचा उदय झाला. तो गणिती तज्ञ म्हणून प्रसिद्ध होता. ज्या पद्धतीने गणिताचे नियम जड पदार्थांना लागू होतात, तसेच मानवालाही लागू पडतील का ? असा विचार पुढे आला, आणि त्या दृष्टीने अनेक शास्त्रांचा उपयोग करून तर्कपद्धती व गणिताचे नियम लावून इतिहास लेखन करण्याचा प्रयत्न सुरू झाला.

गृहितके:

१ देकार्तेशियनवाद व इतिहास यांचा घनिष्ठ संबंध आहे.

२ इतिहासावर मध्ययुगात स्कॉलेस्टिकवादाचा प्रभाव होता.

३ रेने देकार्तेच्या विचाराने इतिहास लेखनासाठी इतर शास्त्रांच्याबरोबरच गणिती नियम व तर्कशास्त्र यांचा वापर केला जाऊ लागला.

संशोधनाची उद्दिष्टे:

१ वस्तुनिष्ठ इतिहास लेखन पद्धतीवर रेने देकार्तेच्या विचारांचा प्रभाव आहे, हे स्पष्ट करणे.

२ मध्ययुगाच्या शेवटी निर्माण झालेल्या देकार्तेशियनवादाच्या प्रभावाने निर्माण झालेली स्थित्यंतरे स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती: सदर शोधनिबंधसाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. यासाठी रेने देकार्तच्या तत्वज्ञानाच्या संबंधी उपलब्ध ग्रंथांचा आढावा घेतला आहे. व त्या आधाराने दुय्यम साधनांचा वापर करून अन्वयार्थ स्पष्ट केला आहे.

 ISSN 2231 4342

विश्लेषण:

मध्ययुगात युरोपातील समाजावर धर्मसंस्थेचे वर्चस्व होते. सर्वच क्षेत्रात राजसंस्था धर्मसंस्था व ईश्वर यांना महत्व आल्याने इतिहास देखील ईश्वर, धर्मसंस्था व राजसत्ता यांच्या भोवती फिरत होता. मध्ययुगाच्या शेवटच्या काळात काही विचारवंत समाजात निर्माण झाले. विविध शास्त्रे उदयास आली. समाजशास्त्र, मानसशास्त्र, नीतिशास्त्र, विज्ञान, गणित, भूमिती अशा शास्त्रांच्या अभ्यासाला सुरुवात झाली. गणितशास्त्राचा विकास झाल्याने गणिती पद्धती व तर्कशास्त्र यांचा वापर इतर शास्त्राच्या अभ्यासासाठी करावयास हवा, असे निकष लावले जाऊ लागले[१]

मध्ययुगात स्कॉलेस्टिकवाद अस्तित्वात होता. स्कॉलेस्टिकवाद याचा अर्थ धर्म व देव यांच्याविषयी श्रद्धा बाळगून धर्मशास्त्रात जे सांगितले आहे ते खरे आहे असे म्हणून कर्मकांड व चुकीचे सिद्धांत स्वीकारले गेले होते. लोकांची त्याबाबत श्रद्धा होती त्याला **स्कॉलेस्टिकवाद** असे म्हटले जाते. जर्मन इतिहासकार व्हॅन लिओपोल्ड रॅंके यांनी " **साधने नाही तर इतिहास नाही** " अशी लेखन पद्धती निश्चित केली. इतिहास लेखनाचे शास्त्रशुद्ध तंत्र म्हणजे इतिहास लेखनशास्त्र विकसित केले. त्यासाठी इतर सामाजिकशास्त्रे व भौतिकशास्त्रे आहेत त्यांचा वापर करून इतिहास लेखन करावे, असे मत मांडले.

मध्ययुगाच्या शेवटच्या काळात गणिताच्या आधारे सर्वच जड पदार्थांच्या उत्पत्तीबाबत निष्कर्ष काढता येऊ लागले, यामुळे विद्वानांचा गणिती पद्धतीवरील विश्वास वाढू लागला. परंतु ईश्वर व आत्मा अशा सचेतन पदार्थांना ही पद्धती लागू करता येईल का ? किंवा भौतिक विश्व व दैवी विश्व वेगळे मानून त्यांच्या उत्पत्तीबाबत वेगवेगळे नियम लावायचे का ? असा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी संधिकाळात **व्दैतवादाचा** पुरस्कार केला. भौतिकशास्त्राचे नियम धर्मशास्त्र व नितीशास्त्रांना लावायचे नाहीत, असा संकेत पाळला गेला. परंतु नवीन युगातील बुद्धिवंतांना असा दुजाभाव मान्य नव्हता. ज्ञान संपादन करण्याचा मार्ग हा सर्व विषयासाठी एकच असला पाहिजे, व तो मार्ग बुद्धीला पटणारा गणिती पद्धतीचा मार्गच योग्य आहे. असे विद्वानांचे मत होते. ईश्वर, नीती, व आत्मा इत्यादी गोष्टींचा उलगडा करण्यास तो मार्ग समर्थ आहे. अशा तत्त्वज्ञानाला बुद्धिवादी तत्वज्ञान असे म्हणतात. या तत्त्वज्ञानाचा प्रसार यूरोपात फ्रान्स, स्पेन व जर्मनी इत्यादी देशांमध्ये झाला. बुद्धिवादी विद्वान ऐकीव गोष्टीवर विश्वास ठेवण्यास तयार नव्हते ते स्वतःच्या आत्मज्ञानावर विश्वास ठेवतात. मानवी मनातील इच्छा आकांक्षा या गोष्टीना फार महत्त्व देत नाही. नीती व धर्म विषयक प्रश्न बुद्धीच्या आधारे सोडविण्याचा प्रयत्न करतात. फ्रेंच गणिती शास्त्रज्ञ रेने देकार्ते यांनी बुद्धिवादाचा पुरस्कार केला. परंतु धर्मशास्त्र व नीतिशास्त्र याबाबत तर्कशास्त्राचा आधार घेऊन ईश्वराचे अस्तित्व मान्य केले. त्यांनी चर्च या संस्थेला आव्हान दिले नाही. पुढे देकार्तेने मांडलेल्या विचारांचा पुरस्कार **स्पिनोझा** व **लायबनीझ** यांनी केला. व देकार्तेचे कार्य पुढे चालविले. देकार्तेच्या विचाराला देकार्तेशियनवाद असे म्हणतात.[२]

ISSN 2231 4342

रेने देकार्ते :- रेने देकार्तेचा जन्म फ्रान्समध्ये १५९६ मध्ये झाला. विद्यार्थी दशेत शिक्षण घेत असताना, त्याला गणित विषयाची गोडी लागली. शिक्षण संपल्यानंतरही आपणास काही येते. असे त्यास वाटेना. म्हणून त्याने जग रूपी पुस्तकाचा अभ्यास करण्यासाठी त्याने अनेक देशांना भेटी दिल्या. काही काळ सैनिकी व्यवसायही त्यांनी स्वीकारला. १६१९ मध्ये न्यूबर्ग येथे त्याला आत्मज्ञानाचा साक्षात्कार झाला. तेव्हा त्याचे मन शांत झाले. त्यावेळी त्याने वर्गीकृत भूमितीचा शोध लावला. पुढे त्याने हॉलंडमध्ये वास्तव्य केले. त्याने अनेक पुस्तके लिहिली. तो एकांतवासात राहून, प्रस्थापित ज्ञान जसेच्या तसे न स्वीकारता. तो ते स्वतः प्रयोग करून पडताळून पहात असे. त्याला आत्मानुभव प्राप्त झाला तर, तो ते स्वीकारत असे. त्याचे ग्रंथालय म्हणजे प्रयोगशाळा होती. त्यात झुरळे कोंबड्या इतर वस्तूंची चिरफाड करून त्याची माहिती घेत असे. त्याने शास्त्रीय पद्धतीचे विवेचन, तत्वज्ञानावरील चिंतने, तत्वज्ञानातील तत्वे (चार भाग), मनोविकार, ज्ञान मार्ग इत्यादी पुस्तके लिहिली. ज्ञानमार्ग हा ग्रंथ छापण्यास टाकला. त्यावेळी गॅलिलिओला तुरुंगात टाकल्याची बातमी आली. या ग्रंथात गॅलिलिओच्या विधानांना रेनेने पाठिंबा दिला होता. पृथ्वी गोल आहे असे मत व्यक्त केले होते. तुरुंगवासाची भीती वाटल्याने त्याने ग्रंथ छापण्याचे रद्द केले. तो ग्रंथ त्याच्या मरणानंतर प्रसिद्ध झाला. रेने नाजूक प्रकृतीचा असल्याने त्याला हॉलंडमधील थंड हवामान सहन न झाल्याने व योग्य वेळी उपचार न मिळाल्याने तो मरण पावला.[३]

*** रेने देकार्तेचे तत्त्वज्ञान :-** रेने देकार्तेच्या मते ज्ञानार्जन करणाऱ्या व्यक्तीने प्रथम आपला मार्ग ठरवावा. यासाठी त्याने शंका पद्धती सांगितली आहे. कोणतीही गोष्ट एकदम खरी आहे असे न मानता, ती खोटी आहे असे समजून सुरुवात करावी. या पद्धतीनुसार ज्ञानाच्या शक्यतेविषयी त्याने प्रथम शंका घेतली. पूर्वीच्या तत्ववेक्त्यानी अनेक मते मांडली होती. त्यामुळे खरे व खोटे काय आहे. हा प्रश्न निर्माण झाला होता. ज्ञानार्जन करण्यासाठी इंद्रियावर विसंबून राहणे योग्य नाही, कारण यामध्ये चूक होऊ शकते. म्हणून आत्मज्ञान व विचारशक्तीच्या आधारे ज्ञानप्राप्ती करावी, हे त्याने सुचविले. अध्यात्मिक ज्ञान मानवी बुद्धीला कमी लेखणारे आहे. अध्यात्मिक ज्ञान सर्वांनाच मोक्ष प्राप्तीचा मार्ग सांगते व मानवी बुद्धीची हेटाळणी करते असे असले तरी चर्च या धर्मसंस्थेविरोधी मत व्यक्त करण्याचे रेने देकार्तेने टाळले आहे. जगरूपी ग्रंथाचे वाचन करून विचारशक्तीच्या आधारे ज्ञान प्राप्त करून अनेक पूर्वग्रहाचे उच्चाटन करणे शक्य आहे. असे तो मानतो. तत्त्वज्ञानाची भक्कम इमारत उभारण्याच्या हेतूने त्याने त्याच्या संशय पद्धतीचे चार नियम सांगितले आहे. ते पुढील प्रमाणे

१ स्पष्ट व ठळक नसलेली कोणतीही गोष्ट खरी न मानणे.

२ प्रत्येक प्रश्नाचे पृथकरण करून त्याचे भाग पाडणे.

३ विचारांची दिशा साध्या गोष्टीकडून गुंतागुंतीच्या गोष्टीकडे वळवीत नेणे.

४ सर्व घडामोडींची नि:शेष नोंद करणे.

* **गणिती पद्धती :-** स्वतः सिद्धता स्थापन करणे व निगमन पद्धतीचा वापर करणे. जी तत्वे स्वतः सिद्ध आहे. अशी तत्वे स्वयंभू आहे. त्याविषयी संशय राहत नाही अशी तत्वे गणितात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. म्हणून त्या शास्त्राच्या मदतीने ज्ञान प्राप्त करण्याला त्याने अधिक महत्त्व दिले आहे.

सत्याचा शोध :- रेने देकार्तेने सत्याचा शोध घेण्यासाठी व ज्ञान प्राप्त करण्यासाठी एक पद्धती सांगितली आहे. भूतकाळात कितीही मोठे तत्वज्ञ होऊन गेले असतील. त्यांनी महान तात्विक प्रणाल्या सांगितल्या असतील. ते सर्व खरे आहे असे मानले नाही. किंवा ज्या तत्वामागे धर्मशक्ती उभ्या असतील, त्या कितीही प्रभावी असल्या तरी, त्यावर विसंबून राहू नये. त्यातील काहीही मान्य करू नये असे त्यास वाटते. सत्याचा शोध घेण्यासाठी काही तत्त्वे सांगितली आहे

१ कोणीही सांगितलेले अथवा प्रस्थापित केलेले तत्व असो, अथवा परंपरा, ग्रंथ, व संस्था सत्य आहे असे मानू नये. जोपर्यंत ते स्पष्टपणे व स्वच्छपणे आपल्या बुद्धीला पटत नाही त्याचा स्वीकार करू नये.

२ खरे ज्ञान निसंदिग्ध व स्पष्ट असणारे असावे.

३ आपल्या कल्पना संदिग्ध, अनिश्चित, अर्थविहीन असू नये, त्या स्पष्ट व निश्चित असल्या पाहिजे. या नियमांचे पालन करून शोध घेतला तर निश्चित ज्ञान मिळते.[४]

* **आत्म्याचे अस्तित्व :-** रेने देकार्ते आत्म्याचे अस्तित्व मानतो. देकार्ते म्हणतो, मी जगातील सर्वच गोष्टीविषयी संशय घेतो, संशय घेणारा मी आहे. आत्मा आणि शरीर या दोन स्वतंत्र वस्तू आहेत. मला आत्मानुभव होतो. याचा अर्थ आत्मा आहे.

* **उपजत कल्पना :-** काही कल्पना मानवी मनात आतूनच येतात. त्या बाह्यांगाकडून मानवी मनात आलेल्या नसतात. त्यांना उपजत कल्पना म्हणतात. मला निर्माण करणारी एखादी परिपूर्ण शक्ती आहे. अशी शक्ती फक्त ईश्वरच असू शकेल. ही कल्पना मनात निर्माण झाली अशा कल्पनांना उपजत कल्पना म्हणतात.

* **मिथ्याज्ञान :-** मिथ्या ज्ञानाचा उदय संकल्प शक्तीतून होतो. कोणतीही कल्पना सत्य किंवा असत्य नसते. जेव्हा त्याविषयी प्रतिपादन केले जाते. तेव्हा काही मते मान्य किंवा अमान्य केली जाते तेव्हा ती सत्य किंवा असत्य ठरते.

उदा. हिंदी महासागरात वणवा पेटला, असे म्हटले तर ते खोटे ठरेल, परंतु हिंदी महासागरात वनवा पेटला होता असे पुराणात सांगितले असे म्हटले तर, ते सत्य ठरते. कारण धर्मसंस्थेविरुद्ध किंवा श्रद्धे विरुद्ध बोलणे योग्य मानले जात नाही.

* **ईश्वराचे अस्तित्व :-** रेने देकार्ते म्हणतो, मी जाणतो म्हणून मी आहे. माझे अस्तित्व नाही असे मानले तर ते मान्य होत नाही. कारण मी अनेक गोष्टींचा अनुभव करतो. मी जाणतो म्हणून मी आहे. शरीर व मन या दोन

 ISSN 2231 4342

वेगळ्या गोष्टी आहे. मी म्हणजे आत्मा आहे. मला निर्माण करणारी किंवा सृष्टीला निर्माण करणारी एखादी शक्ती आहे. ती परिपूर्ण आहे आणि परिपूर्ण फक्त ईश्वरच असू शकतो. ईश्वर म्हणजे द्रव्यशक्ती, त्याला आकार नाही त्यामुळेच हे विश्व चालत आहे. असे रेने देकार्ते मानतो.

* **यांत्रिकता :-** रेने देकार्तेने जगाविषयी तटस्थ ईश्वरवादी संकल्पना मांडली आहे. ईश्वराने सृष्टी निर्माण केली व त्यातून आपले अंग काढून घेतले. गतीच्या नियमानुसार जगातील व्यवहार यांत्रिक पद्धतीने होतात. ईश्वर त्यामध्ये हस्तक्षेप करत नाही तो अलिप्त राहतो [५]

* **रेने देकार्तेचे ऐतिहासिक स्थान व कामगिरी:-** देकार्तेने तत्वज्ञानाच्या क्षेत्रात नवी क्रांती केली. मध्ययुगात देव, धर्म व राजसत्ता यांचा समाजावर प्रभाव होता. त्याकाळात रेने देकार्तेने ज्ञान मिळविण्यासाठी संशयपद्धती निर्माण केली. प्रस्थापित ज्ञान, विचार, व सिद्धांत जसेच्या तसे न स्वीकारता, त्याविषयी संशय घेऊन ते तपासून पाहणे. ते निसंदिग्ध व स्पष्ट होत नाही, तोपर्यंत त्याचा स्वीकार करू नये. केवळ इंद्रियावर विसंबून न राहता, आत्मज्ञानाच्या आधारे त्याची चिकित्सा करणे व ते स्पष्ट होत नाही तोपर्यंत त्याचे पृथकरण करून प्रत्येक भागाचा स्वतंत्रपणे विचार करणे. यामुळे मध्ययुगाच्या संधिकाळात बौद्धिक दृष्टिकोन निर्माण झाला. बुद्धीप्रामाण्यवाद्यानी याला नवीन स्कॉलेस्टिकवाद संबोधले, कारण देकार्तेने ईश्वरी शक्ती मानली व धर्मसंस्थेविरोधात त्याने चिकित्सा केली नाही. म्हणून भित्रेपणाचा आरोप त्याच्यावर केला जातो. परंतु त्याने मांडलेल्या संशयपद्धतीचा इतिहासातील सत्य शोधण्यासाठी उपयोग होतो. ही त्याची महत्त्वपूर्ण कामगिरी आहे.[६]

* **देकार्तेशियन पद्धती / वाद:-** देकार्तेशियन पद्धती म्हणजे निश्चित व साध्या नियमांचा संग्रह होय, की ज्याचे पालन केल्याने व असत्याला सत्य समजण्याची चूक होणार नाही. मानवी मनाच्या योग्य क्षमता व क्रिया यांचा योग्य वापर केल्यास सत्य शोधता येते. मानवी मनाला इतर बाह्य घटकांनी प्रभावित न केल्यास ते आपले कार्य योग्यरीतीने करेल, व सत्य शोधता येईल. पूर्वग्रहदूषित शिक्षण व अवाजवी घाई ज्ञान प्राप्त करणाऱ्याने केल्यास मन अंध होते. व नैसर्गिक कार्य योग्य रीतीने करण्यास असमर्थ होते. म्हणून अशा नियमांचा संग्रह उपयुक्त ठरतो. अर्थात हे नियम मनाच्या क्षमता व कार्यशक्ती हे आहे.

देकार्तेच्या या विचारांना जेसुइट व कॅथोलिक चर्चची मान्यता मिळाली. रेने देकार्तेच्या मृत्यूनंतर त्याचे तत्त्वज्ञान मान्य असलेल्या अनुयायी वर्गात उत्साह निर्माण झाला. त्यांनी जे तत्वज्ञान निर्माण केले. त्याला देकार्तेशियनवाद असे म्हणले जाते. जुन्या स्कॉलेस्टिकवादाची जागा देकार्तेशियनवाद घेऊ शकेल अशी शक्यता निर्माण झाली. देकार्तेचे स्वतंत्र विचार व मुक्तचिंतन यामुळे पदार्थविज्ञान व वैद्यकशास्त्रात मोठी सुधारणा घडून आली. हा विचार केवळ त्याच्या अनुयायांना पुरता मर्यादित न राहता इतर क्षेत्रात वेगवेगळ्या देशांमध्ये त्याचा प्रसार झाला. ग्युलिंक्स, मालब्रान्श, स्पिनोझा, लायब्निझ, व वोल्फ यासारख्या विचारवंतांनी या मार्गाने संशोधन केले. रेने देकार्तेच्या विचारांचा प्रसार आपल्या लेखनातून केला.[७,८]

ISSN 2231 4342

निष्कर्ष :- १ रेने देकार्तेच्या विचारानेच इतिहासातील सचेतन पात्रांना गणिती पद्धती व तर्कशास्त्राचे नियम लावण्यास सुरुवात झाली.

२ देकार्तेशियनवादाच्या प्रभावातून वस्तुनिष्ठ इतिहास लेखनाची सुरुवात झाली.

संदर्भ:-

१ वासुदेव पुरुषोत्तम पटवर्धन, युरोपिय तत्त्वज्ञानाचा संक्षिप्त इतिहास, व्हीनस प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती १९६५, पृष्ठ क्र. ११२ ते ११७

२ कित्ता --------- पृष्ठ क्र. ११७ ते ११८

३ कित्ता --------- पृष्ठ क्र. ११८ ते ११९

४ डॉ. ग. ना. जोशी, पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास, खंड 3, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ,कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती १९७८, पृष्ठ क्र. ५५५ ते ५६८

५ कित्ता पृष्ठ ----------- क्र. ५६८ ते ५८३

६ कित्ता ------------ पृष्ठ क्र. ५८३ ते ५८९

७ कित्ता -------------- पृष्ठ क्र. ५९० ते ६००

८ डॉ. आर पी भामरे, इतिहासाची ओळख ब्रेन टॉनिक प्रकाशन नाशिक पृष्ठ क्र. १४९ ते १५०

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

महात्मा फुले यांचे शेतकरी विषयक कार्य - एक आढावा

प्रा. डॉ. महादेव गणपत देशमुख
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
यशवंतराव चव्हाण, महाविद्यालय,
तुळजापूर, जि. उस्माणाबाद.
संपर्क क्र.९०११४७१९६६
mahadevdeshmukh००७@gmail.com

प्रस्तावना :

महाराष्ट्रातील सामाजिक कार्यकर्त्यांचा नामोल्लेख होतो तेव्हा महात्मा फुलेंचा उल्लेख आवर्जून करावा लागतो. फुलेंच्या काळी समाजावर वर्णव्यवस्थेचा मोठा पगडा होता. वरिष्ठ वर्गाकडून कनिष्ठ वर्गावर अन्याय अत्याचार होत असत. याच अन्यायाविरुद्ध कनिष्ठ वर्गाला जागरुक करण्याचे आणि या अन्यायाला वाचा फोडण्याचे महत्कार्य म. फुलें यांनी केले.

समाजात परिवर्तन घडवून आणायचे असल्यास शुद्रातिशुद्रांना सुशिक्षित करण्याचे कार्य हाती घेण्याचे योजले आणि त्यादृष्टिने वाटचाल केली. समाजातील कष्टकरी. शेतकरी वर्गाला जर समाजाच्या जाचातून मुक्त करायचे असेल तर त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे हे फुले यंानी जाणले होते.

शेतक-यांविषयी फुलेंना असणारा कळवळा आपणास त्यांच्या कार्यावरुन स्पस्ट होतो. त्यांनी शेतक-यांच्या स्थितीविषयी व ती सुधारण्यासाठी काही योजनांची मांडणी त्यांच्या शेतक-यांचा असूड या ग्रंथात केली आहे. शेतक-यांच्या हक्कासाठी विविध ठिकाणी संप घडवून आणले. त्यांच्यामध्ये मिळून मिसळून त्यांच्यात जागृती केली.

शेतक-यांचा असूड हा जोतीरावांचा ग्रंथ अनेक दृस्टींनी अपूर्व आहे. या गं्रथात त्यांनी शेतक-यांच्या अवनत स्थितीचे विदारक चित्र रेखाटून त्या अवनत स्थितीची मूलगामी मिमांसा केली आहे. आणि ती सुधारण्यासाठी सर्वांगीण उपाययोजनाही सुचविली आहे. जमिनीची सुधारणा कशी करावी, जमिनीची धूप थांबविण्यास काय करावे, पाटबंधारे कोठे बांधावे, गुरांची उत्तम निपज कशी करावी, अन्य सुधारलेल्या राष्ट्रात शेती कशी केली जाते, शेतातून चो-या झाल्यास पोलीसांना दंड का केला पहिजे, ब्रिटिश भांडवलदारांचे अव्वाच्या सव्वा व्याज का बंद केले पाहिजे, इ. अनेक सुचनांतील अनुभवी सुक्ष्मपणा लक्षात घेतल्यास जोतीरावांच्या पारदर्शक दृस्टीचा प्रत्यय येतो.

शेतक-यांच्या सर्वांगीण विकासासाठी फुलेंनी त्यांना शिक्षण तसेच शेतीविषयक ज्ञान देण्याचे कार्य केले. वरिष्ठ वर्ग तसेच सावकार मारवाड्याकडून होणा-या जाचातून शेतक-यांची सुटका करण्यासाठी त्यांनी अनेक सभा घेऊन शेेतक-यांना त्याची जाणीव करुण दिली. तसेच अन्यायाविरुद्ध संप, बहिस्कार इ. मार्ग खुले केले. जोतीरावांनी शेतक-यांसाठी केलेल्या कार्याचा आढावा प्रस्तूत शोधनिबंधात घेतला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. महात्मा फुलेंच्या शेतकरी विषयक विचारांचा अभ्यास करणे.

२. महात्मा फुलेंच्या शेतकरी विषयक कार्याचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहितके :

१. महात्मा फुलें यांनी शेतक-यांविषयी महत्वपुर्ण विचार मांडले आहे.

२. महात्मा फुलंेनी शेतक-यांच्या विकासासाठी महत्वपूर्ण कार्य केले आहे.

शेतकरी शिक्षणास प्राधान्य :

शेतक-यांच्या स्थितीचे, त्यांच्या मागासलेपणाचे खरे कारण हे त्यांंच्या अज्ञानात आहे. शिक्षणाने जीवनातला अंधार दूर होण्यास मदत होते. शिक्षण हा शेतक-यांच्या सर्व समस्यांवरील एकमात्र उपाय आहे असे फूलेंचे स्पष्ट मत होते म्हणूनच त्यांनी आपल्या सामाजिक कार्यात शिक्षणाला प्रथम प्राधान्य दिलेले बघावयास मिळते.

शेतकरी अक्षरशुन्य असल्यामुळे समाजातील ब्राम्हण वर्ग धार्मिक विधींमधून, संस्कारामधून शेतकरी वर्गाला लूबाडतात, अज्ञानी शेतक-यांना पोटभर आमटी पोळी मिळण्याची सुध्दा मारामार पडते त्या शेतक-याला हा वरिष्ठ वर्ग धर्माच्या नावाखाली लुटतो.१ असे फुलेंनी सर्वप्रथम मांडले.

फुलेंच्या मतानुसार कष्टकरी, कनिष्ठ वर्गातील लोकांसाठी अशा शिक्षणाची आवश्यकता होती की, जेणेकरुन ते आपल्या सामाजिक समतेच्या व व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कासाठी झगडण्यास तयार होतील.२

समाजातील शंद्रातिशंूद्राना कोणत्या अडचणींमधून जीवन जगावे लागते हे तेच जाणतात. यासंदर्भात फुले म्हणतात, जिस तन लागे आग, वही तन जाने, बीजा क्या जाने गव्हारा रे. यापुढे फुले सांगतात की, मनुष्य जीवनात दु:ख, दारिद्रय निर्माण होण्याचे कारण विद्याहीनता होय.३

जगांतील एकंदर सर्व देशांचे इतिहास एकमेकांशी ताडुन पाहता, हिंदुस्थानातील अज्ञानी शुद्र शेतक-यांची स्थिती मात्र इतर देशांतील शेतक-यांपेक्षा निकृष्ट अवस्थेस पात्र आहे.४ शिक्षण समाजातील क्र्रांतीचे एक

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

मुख्य साधन आहे. बुरसटलेल्या विचारांनी व अनिष्ट चालीरीतींना सर्वात मोठा धक्का देण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे.५ तसेच समाजात वेगाने स्थित्यंतर घडवून आणण्याचे सामर्थ्यही त्यात आहे. त्यामुळे समाजातील सर्व शोषित लोकांना शिक्षण देणे गरजेचे आहे असे फुलेंचे मत होते.

अज्ञानापोटी कष्टक-यांना, शेतक-यांना दुस-यांच्या आेंजळीने पाणी पिणे भाग पडते. ते स्वत: विचार करु शकत नाहीत किंवा नेमके प्रश्नही विचारु शकत नाहीत. जीवनाशी निगडीत असलेल्या असंख्य गोस्टीत रस घेऊ शकत नाहीत.६ इ. मुळे शिक्षणाची गरज फुलंंेच्या लक्षात आली आणि यामुळेच विविध शाळांमधून शेतक-यांस सुशिक्षित करण्याचे कार्य फुलेंनी केले.

शेतक-यांच्या शोषणाविरुध्द तळमळ :

महात्मा फुले शेतक-यांबाबतीत अतिशय पोटतिडकीने लिहितात. आजुबाजूच्या समाजाकडे डोळसपणे पाहतांना त्यांना दारिद्रयाने आणि अज्ञानाने थैमान घातले आहे असे त्यांच्या लिखानावरुन दिसते. या संदर्भातील त्यांच्या लेखनाला धार प्राप्त झाली आहे. त्यास अनेक कारणे आहेत.७ वरिष्ठ वर्णातील लोकांनी कायमच या कनिष्ठ वर्गातील व कष्टकरी कुणब्यांच्या मनावर स्वत:ची वतनदारी बसवावी यासाठी नानाप्रकारचे उपाय योजले व ते सर्व सिध्दीस गेले, कारण शिक्षणामुळे वरिष्ठ वर्ण कायमच कनिष्ठ वर्गावर वरचढ ठरला आणि अज्ञानामुळे शेतक-यांना त्यांच्यावर होणा-या अन्यायाची जाणीवही झाली नाही.८ भट लोकांनी कायमच शेतक-यांच्या भोळेपणाचा व अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांच्यावर अन्याय अत्याचार केले.

शेतकरी - कामकरी वर्गाच्या भयंकर दूरावस्थेला शिक्षणाचा अभावच कारणीभूत आहे, असा जोतीरावांचा अभिप्राय होता. ते पुढिल ओळींवरुन स्पष्ट होईल, विद्येविना मति गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गति गेली, गतिविना वित्त गेले,वित्तविना शुद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले.९ शेतक-यांच्या हालाखीच्या स्थितीचे वर्णन करतांना फुलंेनी वरिल ओळींत त्या स्थितीचे मूळ कारण हे अविद्या, अक्षरशून्यता असल्याचे आवर्जून नमुद केले आहे.

अन्न हे पुर्नब्रम्ह आहे. हे पुर्नब्रम्ह पिकवून देशाची खळगी भरणा-या कंगाल शेतक-यांची दीनहीन स्थिती ख-या अर्थाने सर्वात पहिल्यांदा फुल्यांनी वेशीवर टांगली, शेतक-यांच्या अन्यायाच्या संदर्भात कृतीतून आणि विचारातून आवाज बुलंद करणारे जोेतीराव हे पहिले भारतीय शेतकरी आहेत.१० फुलंेनी आपल्या लिखाणाव्दारे सर्वसामान्य शेतक-यांमध्ये त्यांच्यावर होणा-या अन्यायाची जाणीव करुन दिली आणि त्याचबरोबरीने त्यांनी काय करावे जेणेकरुन ते या अन्यायातून मुक्त होतील यासंदर्भात मार्गदर्शन ही केले.

फुलेंच्या मते. शेतक-यांची गुलामगिरी टिकविण्यासाठी जी हत्यारे शोषकवर्ग वापरीत असतात. त्यापैकी भाषा हे एक प्रभावी शस्त्र असते आणि शेतकरी अशिक्षीत असल्यामुळे त्यांची फसवणूक करणे - शोषण करणे,

 ISSN 2231 4342

वरिष्ठ वर्गाला सहज शक्य होत असे.११ फुलेंनी सर्व प्रकारच्या शोषणाचे, गरिबीचे मुख्य कारण अशिक्षीतपणा असल्याचे वारंवार आपल्या लिखाणातून आणि कृतीतून स्पस्ट केले.

ब्राम्हण, सावकारांवर बहिस्कार :

महात्मा फुलेंचा विरोध हा विशिष्ट जातीला नव्हता, तर धर्माच्या आणि जातीव्यवस्थेच्या नावाखाली जे लोक शुद्रातिशुद्रांना त्रास देत त्यांची पिळवणुक करत त्या लोकांना फुलेंचा विरोध होता. धर्माच्या नावाखाली गरिब जनतेची लूट करणा-या भट, तसेच निरक्षर जनतेची लूट करणा-या सावकार, मारवाडी लोकांची फुलेंना चीड येत असे. अज्ञान हे या शोषणाचे मूळ कारण होते हे फुलेंनी जाणले आणि शुद्रातिशुद्रांना शिक्षण देण्यास प्रांरभ केला. फक्त शिक्षण देऊन पूरेसे नाही तर या शेतक-यांना त्यांची कशी पिळवणूक होत आहे हेही सांगण्याचे काम फुलेंनी विविध सभामधून केले.

सभेत आलेल्या लोकांना फुले पुढिलप्रमाणे भाषणद्वारे सुचना करत, सभेतून परत गेल्यांवर आपआपल्या गावातून ब्रा्म्हण जातीवर पूर्ण बहिस्कार टाका, ते तुम्हाला सामाजिकदृष्टया नीच मानतात, तोपर्यंत त्यांना हलके मानून विहिरीवर अथवा सार्वजनिक ठिकाणी त्यांना येऊ देऊ नका. त्यांच्या हातून आपले धार्मिक विधी करु नका. आपला संसार काटकसरीने करा आणि प्रत्येक गावच्या श्रीमंत सावकारंाच्या जमिनी आपण पूर्ण पडीक पाडा. सर्वांचा सांपत्तिक दर्जा सारखा झाला पाहिजे. सावकार हे जुलमी राक्षस आहेत, त्यांच्यावर सुध्दा ब्राम्हणांप्रमाणेच गावात सामाजिक बहिस्कार घातला पाहिजे. ब्राम्हणांना व सावकारांना गावात परीट, न्हावी अथवा दूध, भाजी किंवा त्यांच्या कामावर मजूर मिळू देऊ नका.१२

शेतीसाठी उपाययोजना :

शेतकरी हा ख-या अर्थाने देशाचा पोशींदा, शेतक-यांनी निर्माण केलेल्या अन्न, वस्त्र आदिमुळे जनतेचे उदरभरण होते. विज्ञानाच्या तंत्रज्ञानाने अजून तरी भाकरीची जागा गोळीने घेतली नाही, त्यामुळे या श्रमिकाचे जनतेवर ऋण आहे. परंतु व्यवहारात या ऋणकोंचे फार मोठे शोषण होत असल्याची खंत फुलेंना होती.

हंटर कमिशनला दिलेल्या निवेदनात फुलेंनी अशी सुचना केली की, शेतकी संदर्भात बहुजनांची शिक्षण पध्दती आणावी, तसेच शिक्षण पध्दतीमध्ये अनमोल बदल करुन शेतकी अभ्यासक्रमाला प्राधान्य देण्यासाठी आदर्श शेतीची छोटीशी योजना आखली जावी.

शेती ही शेतक-यांसाठी नुसती जमीन नसून ती त्याची काळी आई आहे. कितीही हलाखीचे जीवन वाट्याला आले तरीही तो संस्कृतीशी आपले अतूट नाते सांगत असतो. याची जाणीव बहुधा शोषकांना असल्याने त्यांनी या मुकनायकास जमेल तसे लुटले. आता तरी शेती हा व्यससाय असल्याचा विचार रुजणे आवश्यक आहे. शेतीच्या नफ्यातोट्याचा विचार होणे आवश्यक आहे.१३ असे फुलेंचे मत होते.

ISSN 2231 4342

आपल्या देशातिल बहूजन समाजाचा उदरनिर्वाह मुख्यत्वे शेतीच्या धंद्यावर होत असल्याने प्रथम ह्या धंद्यात सुधारणा व्हावी म्हणून सत्यशोधक समाजाच्या मंडळीने ठिकठिकाणी सभा घेऊन चळवळ सुरु केली. शेतकरी लोकांनी चांगले बी, चांगले खत व चांगली मशागत करुन नवी सुधारलेली पिके काढावीत आणि सरकारने तलाव, विहिरी आणि पाटबंधारे बांधून शेतक-यांना नवीन झाडांची, बी-बीयाण्यांची व शेतीच्या मशागतीसाठी लागणारी मदत सढळ हाताने करावी, तसेच ठिकठिकाणी सरकारणे कालवे व पाटबंधारे बांधून शेतक-यांना बागाईतास भरपूर पाणी पुरवावे असा त्यांच्या बोलण्याचा व लेखणाचा कल असे.१४

सावकाराला पर्याय म्हणून शेतक-यांसाठी स्वतंत्र शेतकरी बॅंक काढण्याची कल्पना पुढे आली. तिला इंग्रज अधिकारी वेडरबर्न यांनी पाठिंबा दिला, शेतीचा धंदा किफायतशीर होत नाही, तोपर्यंत या बंॅका यशस्वी होणार नसल्याचे मत महात्मा फुल्यांनी व्यक्त केले होते. म्हणून अगोदर शेती किफायतशीर होण्याकडे त्यांचा कल होता.१५ शेती सुधारण्यासाठी त्यांनी शेतीसंबंधीचे अत्याधूनिक ज्ञान शेतक-यांना मिळाले पाहिजे, तत्संबंधीचे गं्रथ त्यांना उपलब्ध झाले पाहिजेत, उत्तम बैल त्यांना मिळाले पाहिजेत, जनावरांसाठी जंगले मोकळी राहीली पाहिजेत, वाहणा-या पाण्याला अडवून पोलीस व सैन्यामार्फत बंधारे घातले पाहिजेत, ठिकठिकाणी असणा-या पाण्याचा शोध घेतला पाहिजे, पिकांचे संरक्षण होण्यासाठी पिकांवर पहारे बसविले पाहिजेत इ. अनेकविध उपाय शेती सुधारण्यासाठी महात्मा फुले यांनी सुचविले आहेत. हे उपाय वाचतांना फुलेंच्या दूरदृष्टीचाही आपणास प्रत्यय येतो.१६

शेतक-या भोवतीच्या चक्रव्यूहाचे विवेचन :

धर्माच्या नावाखाली भट शेतक-यांना लुटायचे, तर अज्ञानामुळे सावकार, मारवाडाही लुटायचे त्यामुळे शेतक-यांची स्थिती वर्षानुवर्षापासून दरिद्रीच राहीली याचे स्पष्ट विवेचन फुलेंनी त्यांच्या लिखानातून सर्वसामान्यासमोर मांडले.

शेतक-यांच्या जन्मापासून ते मृत्युपर्यत ग्रामव्यवस्थेतील उच्चवर्णीय ब्राम्हण आपल्या उच्चवर्णियत्वाचा फायदा घेऊन आर्थिक शोषण कसे करतात याचे चित्रण अतिशय प्रभावी भाषेतून फुलेंनी केले.

शेतक-यांच्या मुलीस ऋतुप्राप्ती झाली की, ऋतुशांती केली पाहिजे हे भट ब्राम्हण शेतक-यांना पटवून देत, मुल जन्माला आले की, कंुडल्या करुन जपानुष्ठान करवून घेवून, लग्नाच्या वेळी, घर बांधतांना, मृत्यूच्या वेळीही हे भट-ब्राम्हण दक्षिणा घ्यायला तयारच असत. हे शेतक-यांच्या शोषणाचे ग्रामविभागातील प्राथमिक चक्र होते.

शेतक-यांच्या शोषणाचे दुसरे चक्र म्हणजे सरकारी खात्यामधून शिरलेल्या भट कामगारांचे महसूल खाते, जंगल खाते, न्याय खाते, शिक्षण खाते, पोलिस खाते अशी एकमेकांशी संबंधीत असणारी अनेकविध खाती

 ISSN 2231 4342

नव्यानेच सुरू झाली होती. धर्म दृष्टीने जो प्रतिष्ठित वर्ग होता तोच या खात्यामधून शिरला आणि या माध्यमातूनही शेतक-यांची आर्थिक लूट सुरु झाली.

याशिवाय एक तिसरे चक्रही नव्याने उदयास आले ज्यामुळे शेतक-यांच्या अडचणीत वाढच झाली. आधिच असलेल्या भट व सरकारी खात्यातील लुटीमुळे हवालदिल आणि कर्जबाजारी झालेल्या शेतक-यांस पैशासाठी सावकारंाकडे जाणे आणि घातलेल्या अटी पूर्ण करणे याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. या तिन्ही चक्रात शेतकरी पुरता अडकत असे. हे तिन्ही चक्र मिळून सरकारची दिशाभूल करीत.१७ इ. सर्व चक्रव्यूहाच्या शोषणांसंबंधी फुलेंनी लिखानातून आणि कृतीतून बंड पुकारले.

दुष्काळामुळे आणि टोळधाडीमुळे होणारे नुकसान कधीतरी भरुन निघेल, परंतु अशा पध्दतीने होत असलेले नुकसान मात्र कधीच भरुन न येणारे असते.१८ याची स्पष्ट जाणीव महात्मा फुले यांनी शेतकरी व कष्टक-यांना करुन दिली.

शेतक-यांच्या आर्थिक स्थितीबाबतची तळमळ फुलेंनी त्यांच्या लेखणातून आणि सभांमधील भाषणातून व्यक्त केली आणि त्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी शेतक-यांनी स्वत: कोणकोणते प्रयत्न करावेत याबद्दल सुचनाही केल्या.

सारांश :

महात्मा फुलेंच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतांना त्यांच्या शेतकरी विषयक कार्याचा उल्लेख आवर्जून केला जातो. महात्मा फुलेंनी शेतक-यांच्या व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाचे जवळून निरिक्षण केले. शेतक-यांच्या स्थितीला जबाबदार घटकांचा शोध घेऊन त्यावर उपाय योजन्याचे कार्य फुलेंनी केले.

विविध माध्यमांतून शेतक-यांचे होणारे शोषण थांबविण्यासाठी फुलेंनी शेतक-यांना शिक्षणाची गरज प्रतिपादीत केली. व शिक्षणासाठी त्यांना प्रवृत्त केले. धार्मिक विधिंमधून स्वत:ची लूट थांबवण्यासाठी शेतक-यांनी पुढाकार घेऊन भट ब्राम्हणावर बहिस्कार टाकावा, कुठल्याच धार्मिक विधीसाठी भटाला बोलावू नये असे केल्यास तूम्ही आर्थिक लूटीच्या चक्रातून स्वत:ची सुटका करुन घेऊ शकता असा आत्मविश्वास फुलेंनी शेतक-यांच्या मनात निर्माण केला.

शेतीचा विकास झाला तर शेतक-याचाही विकास होईल असा फुलेंना विश्वास होता. यामुळेच शेतीमध्ये सुधारणा करण्यासाठी फुलेंनी अनेक उपाय सुचविले. असे निदर्शनास आले आहे.

संदर्भसूची :-

१. फुले जोतीराव गोविंदराव, शेतक-यांचा असूड, प्रकरण १ले.

२. तांबोळी शमसुद्दीन व तांबोळी बेनझीर, प्रभावशाली शिक्षणतज्ञ-जागतिक-भारतीय-महाराष्ट्रीयशिक्षणतज्ञ-जागतिक-भारतीय-महाराष्ट्रीय पब्लिकेशन, पुणे, २३ मे २००९, पृ.३.

३. पेंडके प्रतिभा सुधीर, जागतिक शिक्षणतज्ञ, विद्या प्रकाशन, नागपूर, जानेवारी २०१०, पृ.२०.

४. फडके य.दि., महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १४ एप्रील १९९१, पृ.२५४.

५. देशपांडे के. ना. व माळी आ. ल., भारतीय शिक्षणतज्ञ आणि विचारवंत, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१४, पृ.३२.

६. भोळे भास्कर लक्ष्मण, महात्मा जोतीराव फुले वारसा आणि वसा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००१, पृ.११८.

७. नरके हरि व फडके य.दि., महात्मा फुले गौरव ग्रंथ, खंड पहिला, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, २८ नोव्हेंबर १९९१, पृ.५२७.

८. फडके य.दि., उपरोक्त, पृ.१२९.

९. भोळे भास्कर लक्ष्मण, उपरोक्त, पृ.८७.

१०. उगले जी. ए., महात्मा फुले - एक मुक्त चिंतन, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००१, पृ.५१.

११. भोळे भास्कर लक्ष्मण, उपरोक्त, पृ.८५.

१२. नरके हरि, आम्ही पाहिलेले फुले, महात्मा फूले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, ६ जून १९९३, पृ.३९.

१३. उगले जी. ए., उपरोक्त, पृ.६१.

१४. पाटील पं. सि., महात्मा जोतिराव फुले, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९३८, पृ.४२.

१५. सरदार गं. बा., महात्मा फुले - व्यक्तित्व आणि विचार, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९८१, पृ.१९३.

१६. नरके हरि व फडके य.दि., महात्मा फुले गौरव ग्रंथ, उपरोक्त, पृ.५३६.

१७. कित्ता, पृ.५३२,५३३.

१८. कीर धनंजय व मालशे स.ग., महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९६९, पृ.२१३.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

महाराष्ट्रातील बहुजन वृत्तपत्रांचा इतिहास

डॉ. वैशाली नानाभाऊ बागुल
उपप्राचार्या तथा इतिहास विभागप्रमुख,
श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर
जि.औंरगाबाद

प्रस्तावना : मराठी वृत्तपत्रांच्या वाटचालीत सत्यशोधक – ब्राह्मणेत्र – दलित चळवळीच्या मुखपत्रांची कामगिरी महत्वाची ठरते. इंग्रजी सत्तेचा अंमल सुरु झाल्यानंतर प्रबोधनाला सुरुवात झाली. त्यांला समग्रपणे 'भारतीय प्रबोधन' म्हटले जाते. 19 वे शतक सामाजिक, धार्मिक सुधारणा चळवळी, स्वातंत्र्य आंदोलन व आधुनिकतेचा आरंभकाळ समजला जातो. देशपातळीवर घडणारी ही प्रक्रिया प्रादेशिक पातळीवर मराठी भाषकांवर व भाषेतही घडून आली. धार्मिक, सामाजिक चळवळी गतिमान होत असतांना या चळवळीनी प्रसार व प्रचाराची माध्यमं विकसीत केली. 'वृत्त्पत्र' हे चळवळीच्या प्रसार, प्रचार आणि प्रबोधनाचे महत्वाचे माध्यम बनले.

महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज महाराज सयाजीराव गायकवाड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून आणि पाठबळातून बहुजन पत्रकारिता विकसीत झाली. कृष्णराव भालेकर यांनी सुरु केलेलया "दीनबंधू" या पहिल्या बहुजन वृत्त्पत्रापासून सुरु झालेली ही परंपरा पुढे अधिक विस्तारत गेली. एकामागून एक बहुजन वृत्तपत्रे सुरु झाली. या वृत्तपत्रांनी प्रामुख्याने बहुजन समाजाला जागरुक करण्याचे काम केले.

बहुजन वृत्तपत्रांची एक मालिकाच निर्माण झाल्याचे आढळते. दीनमित्र (मुकुंदराव पाटील, सोमठाणे), जागरुक (वालचंद कोठारी, पुणे) जागृती (भगवंतराव पाळेकर, बडोदा) विजयी मराठा (श्रीपतराव शिंदे, कोल्हापूर), विश्वबंधू (बळवंतराव पिसाळ), मूकनायक व बहिष्कृत भारत (डॉ.बाबासाहेब आंबेडकर), कैवारी, तेज, तरुण मराठा (दिनकरराव जवळकर), गरीबांचा कैवारी (बापूराव यादव), राष्ट्रगीत (शामराव देसाई), प्रबोधन (केशवराव ठाकरे), शिवछत्रपती (केशवराव बागडे व किर्तीवानराव निंबाळकर), हंटर (खंडेराव बागत), ब्राह्मणेतर (वामनराव घोरपडे), शिवसंदेश (भाऊसाहेब देशमुख) इत्यादींचा यात समावेश होता.

बहुजन पत्रकारितेत सत्यशोधक, ब्राह्मणेत्र व दलित वृत्तपत्रे असे तीन प्रवाह दिसून येतात. महात्मा फुले यांच्या प्रेरणेने सुरु झालेली व सत्यशोधक चळवळीला पाठिंबा देणारी वृत्तपत्रे त्याकाळात सुरु झाली. शाहु महाराजांच्या काळात सत्यशोधक चळवळ व वृत्तपत्रे जोमदारपणे वाटचाल करीत होती. याचा काळात पुढे ब्राह्मेणतरांच्या त्या चळवळीची पाठराखण करणारीही काही वृत्तपत्रे सुरु झाली.

सत्यशोधक व ब्राह्मणेतरांच्या वृत्तपत्रांमध्येही दलित समाजाच्या प्रश्नांना पुरेसा वाव मिळत नव्हता. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित पत्रकारितेचा तिसरा प्रवाह उदयास आला. या वृत्तपत्रांनी केलेल्या कार्यातून वंचित बहुजन समाज जागृत झाला. मात्र 1930 नंतरच्या काळात सत्यशोधक व

 ISSN 2231 4342

ब्राह्मणेतर चळवळीचा जोर ओसरला. त्यामुळे या चळवळीसाठी चालणारी वृत्तपत्रेही निष्प्रभ झाली. दलित चळवळीला मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे समर्थ नेतृत्व् लाभले. त्यामुळे दलित चळवळ व पत्रकारिता टिकून राहिली. स्वातंत्र्योत्त्र काळात मात्र पत्रकारितेचे स्वरुप बदलल्याने बहुजन पत्रकारितेचा प्रभाव कमी झाला.

वृत्तपत्रांची परंपरा : 06 जानेवारी 1832 रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी पहिले मराठी वृत्त्पत्र सुरु झाले. त्यानंतर तब्ब्ल 55 वर्षांनी दीनबंधू हे पहिले बहुजन वृत्त्पत्र सुरु झाले. या परंपरेमागे महात्मा फुले यांची प्रेरणा होती. "महाराष्ट्राच्या वृत्तपत्राच्या इतिहासामध्ये बहुजन वृत्तपत्रांची उज्ज्व्ल अशी परंपरा आहे. 24 सप्टेंबर 1873 रोजी जोतीराव फुले यांनी पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. आणि महाराष्ट्राच्या समाजजीवनावर अस्मितेचे नवे पर्व सुरु झाले.

बहुजन वृत्तपत्रे : स्वातंत्र्यपूर्व काळात बहुजन वृत्तपत्रांनी समाजाचे प्रबोधन करण्याची व बहुजन चळवळीला पाठबळ देण्याची महत्वपूर्ण कामगिरी केली. बहुजनांनी शिक्षणाची संधी मिळाल्यानंतर जी पिढी निर्माण झाली. त्यावेळीच बहुजनांची वृत्त्पत्रे सुरु होण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. महात्मा फुले यांच्यानंतरच्या काळात बहुजन वृत्तपत्रांना प्रेरणा देण्याचे कार्य शाहू महाराज, महाराज सयाजीराव गायकवाड व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.

त्या काळात सामाजिक क्षेत्रात कार्य करणा-या सर्वच चळवळींना आपल्या चळवळीच्या प्रसारासाठी वृत्त्पत्राची गरज वाटत होती.

"परमहंस सभा, सार्वजनिक सभा, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज इत्यादी चळवळींना मुखपत्रांची गरज भासली. महात्मा ज्योतीराव फुले यांची सत्यशोधक चळवळही त्यांना अपवाद नव्हती. महात्मा फुले एकटे नव्हते. या चळवळीत पहिले वृत्त्पत्र सुरु करण्याचा मान् कृष्णराव भालेकर यांच्याकडे जातो. कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, विजयी मराठाकार, श्रीपतराव शिंदे, जागृतीकार भगवंतराव पाळेकर, तेज-कैवारीकर दिनकरराव जवळकर इत्यादी अनेक ब्राह्मेतर पत्रकारांचा उल्लेख करावा लागेल. सत्यशोधक, ब्राह्मणेतर, दलित, स्त्रीवादी चळवळ, पश्चिम-दक्षिण महाराष्ट्र, खान्देश व व-हाडात पसरली."

1. **दीनबंधू:** कृष्णराव भालेकर यांनी 01 जानेवारी 1877 रोजी दीनबंधू हे बहुजनांचे पहिले वृत्त्पत्र सत्यशोधक विचाराचा प्रसार करण्यासाठी सुरु केले. बहुजन समाजात वृत्तपत्राची अशी कुठलीही परंपरा नसल्यामुळे हे वृत्त्पत्र चालविणे अतिशय अवघड जबाबदारी होती. ती जबाबदारी त्यांनी जवळपास सव्वातीन वर्ष अनेक अडचणींना सामोरे जात सांभाळली. "बहुजन समाजाला शिक्षणाची संधी नुकतीच मिळाली होती. त्यामुळे साक्षरांची संख्या जेमतेम होती. अशा स्थितीत वृत्तपत्राला मोठ्या प्रमाणात वाचक मिळणे व आर्थिक स्थिती सुधारणे शक्य् नव्हते. जबाबदारी पेलवणे अशक्य् झाल्यानंतर कृष्णराव भालेकरांनी कामगार चळवळीतील नेते नारायण मेघाजी लोखंडे यांच्यावर हे वृत्त्पत्र पुढे चालू ठेवण्याची जबाबदारी सोपविली. लोखंडे यांनी 09 मे 1880 रोजी मुंबईहून दीनबंधूचा पहिला अंक प्रसिध्द केला. त्यानंतर 09 फेब्रुवारी 1897 रोजी त्यांचा मृत्यू होईपर्यंत या प्रकाशनात खंड पडला नाही. श्री.लोखंडे अतिशय निर्भीड वृत्तीचे आणि तिखट लेखणीचे संपादक होते. त्यांनी त्यांच्या काळातील मान्य्वर व्यक्ती

 ISSN 2231 4342

आणि प्रमुख संपादक यांच्यावरही टीकेचे आसूड ओढलेले आढळतात. महात्मा फुलेही त्यांच्या टीकेतून सुटले नाहीत.”

जानेवारी 1877 ते एप्रिल 1880 पर्यंत भालेकरांनी पुण्यास चालविलेले हे वृत्तपत्र लोखंडे यांनी 09 ते 1880 ते 09 फेब्रुवारी 1897 पर्यंत मुंबईस उमेदीने चालविले व सत्यशोधक समाज कार्याचे निशाण डौलाने फडकवत ठेवले. वृत्तपत्र चालवून हे निशाण फडकवत ठेवणे भालेकरांना केवळ अशक्य् झाल्यामुळे त्यांच्या हातातून खाली पडणारे हे निशाण लोखंडे यांनी जिद्दीने सावरले व समाजातील अज्ञान, समाजावर होणारा अन्याय दूर करण्याची लढाई त्यांनी चालूच ठेवली. गिरणी कामगारांच्या जीवनात स्थैर्य आणण्यासाठी फॅक्टरी ॲक्ट तर उदयाला आणलाच, पण शेतक-यांना तगाई मिळवून देण्याची, ब्राह्मणेतरांना, शिक्षणाची सुविधा प्राप्त् करुन देण्याची हिंदु मुस्लिम दंग्यात समेट घडवून आणण्याची खटपट अहोरात्र केली. इ.स.1896-97 मध्ये प्लेगने घातलेला धुमाकूळ शमविण्याची काय काय तरतूद करता येईल व लोकांना कसा धीर देता येईल. याकामी गढून गेलेले लोखंडे समाजसेवा करता करताच इ.स.1897 मध्ये मृत्यूमुखी पडले. या काळात दीनबंधु चालवितांना भालेकरांना जो अनुभव आला तोच लोखंडे यांनाही आला. त्यावेळी डॉ.लाड यांनी पैशाची भरपूर मदत करुन दीनबंधु पत्र पडू दिले नाही. दीनबंधू प्रित्य्र्थ डॉ.लाड यांनी आपली सारी स्वकष्टार्जित संपत्ती अर्पण केली.

2. सत्यशोधक विचाराचा प्रसार करण्यासाठी हे वृत्तपत्र कृष्णराव भालेकरांनी त्यांचे भाचे गणपतराव पाटील यांच्या सहकार्याने 1888 साली दीनमित्र हे नियतकालिक सुरु केले. गणपतराव पाटील यांच्या अकाली निधनाने दीनमित्राचा पहिला अवतार 1892 साली समाप्त् झाला. दीनमित्रच्या अंकात कृष्णराव भालेकर यांची बळीबा पाटील ही कादंबरी प्रसिध्दी झाली.

श्री.गणपतराव पाटील यांनी दत्तक दिलेले कृष्णराव भालेकरांचे पुत्र मुकूंदराव पाटील यांनी 23 नोव्हेंबर 1910 रोजी अहमदनगर जिल्हयातील सोमठाणे येथून दीनमित्रचे पुनरुज्जीवन साप्ताहिक स्वरुपात केले. त्यानंतर दीनमित्र जवळजवळ 1940 पर्यंत चालले. दीनमित्र म्हणचे निर्भयपणे विचार करणारे, विचार मांडणारे पत्र होते. महात्मा फुले आणि सत्यशोधक समाजाच्या विचारांचा दीप हातात घेऊन दीनमित्र हे पत्र चालले होते. एक तत्वनिष्ठ वृत्त्पत्र असा या पत्राचा उल्लेख करावा लागेल. रा.के. लेले यांनी मराठी पत्रकारितेचा इतिहास या ग्रंथात म्हटले आहे की, “ समाजहित, जागरुकता या द्दष्टीने दीनमित्र केसरीपेक्षा कोणत्याही द्दष्टीने कमी नव्हता.”

किर्लोस्क्रर मासिकाचे संपादक शंकरराव किर्लोस्क्र यांनी या वृत्तपत्राविषयी म्हटले आहे, “दीनमित्र हे ब्राह्मणांना नावे ठेवणारे एक ब्राह्मणेतरांचे पत्र आहे व वर्गनिष्ठा हाच त्या पत्राचा प्रधान हेतू आहे, असा आक्षेप त्यावर कोणी घेत असतील तर तर घेवोत, पण मी तरी असा आक्षेप केंव्हाही घेणार नाही. दीनमित्राच्या हातात आसूड आहे व त्याचे फटके सोवळेपणाचे अवडंबर माजविणा-या ढोंगी ब्राह्मणांना जसे बसतात, तसे हटवादी व देवसकीच्या नादी लागलेल्या अब्राह्मणांना बसतात आणि हे फटके देतांना दीनमित्राची सुडबुध्दी व्यक्त न होता, त्यांची सुधारणा व्हावी या विषयी आस्थाच प्रगट होते. गरीब

ISSN 2231 4342

श्रमजीवी वर्गाबद्दलचे ममत्व् दीनमित्राच्या प्रत्येक लेखात दिसते व या ममत्वामुळेच दीनमित्र हे नाव सार्थ वाटते.

3. **अंबालहरी :** कृष्णराव भालेकरांच्या प्रेरणेने सुरु झालेले दीनमित्र महिन्यातून एकदा निघत असे. ब्राह्मणेत्र लोकांची उन्नती होण्यास पुण्यामध्ये आणखी एखादे साप्ताहिक वर्तमानपत्र असावे, असे कृ.पां.भालेकर, ग.स.पाटील, ह.ना.नवलकर, सी.र.तारकुंडे यांना वाटू लागले व त्यानुसार त्यांच्यात वाटाघाटी झाल्या. मुख्य अडचण पैशांची होती. ती अडचण अंबाप्रसाद छापखान्याच्या मालकाच्या मदतीने सोडवयाची ठरली. अंबाप्रसाद हा छापखाना एका वंजारी गृहस्थाच्या मालकीचा होता. भालेकरादी मंडळी व अंबाप्रसाद छापखान्याचे मालक यांच्याकडे असे ठरले की, वर्तमानपत्रात मंडळींनी लेख लिहावेत व वर्तमानपत्राची वर्गणी व वर्तमानपत्रात येणा-या जाहिरातींचे उत्पन्न् अंबाप्रसाद छापखान्याच्या मालकाने घ्यावे व अंबाप्रसाद छापखान्यातून निघणा-या वृत्तपत्राचे नाव अंबालहरी हे ठेवायचे असेही ठरले व भालेकरांनी सुरु केलेल्या वृत्तपत्राचे हे तिसरे भावंड पुण्यात निघू लागले.

अंबालहरी चा खप वाढल्याने त्याचे उत्पादनही वाढले. साहजिकच अंबाप्रसाद छापखान्याच्या मालकाच्या तोंडास पणी सुटले व सबब त्याचा फायदा मला मिळताच पाहिजे, असे तो म्हणू लागला. त्यावरुन अंबाप्रसाद छापखान्याचे मालक व ग.स.पाटील यांच्यात तंटे व बाचाबाची होऊ लागली. भालेकर, नवलकर यांनी दोघांची समजूत काढण्याचा प्रयत्न् केला, पण अंबाप्रसाद छापखान्याच्या मालकाने अंबालहरी वर्तमानपत्र छापण्याचे सोडून दिले. छापखाना दुस-याच्या मालकीचा असल्यामुळे भालेकरांचा सत्तेपुढे शहाणपणा चालेनासा झाला व अखेर अंबालहरी बंद पडले. अंबाप्रसाद या आश्रय सुटल्यावरही ग.स.पाटील यांनी अंबालहरी दुसरीकडे छापवून काही दिवस चालविले. पण खर्च भागेना, त्यामुळे त्यांनी ते बंद करुन टाकले. प्रतिकूल परिस्थितीतही ब्राह्मणेतरांसाठी वृत्त्पत्र चालविण्याची भालेकरांची तळमळ या धडपडीतून व्यक्त होते.

अंबालहरीचे पहिले पृष्ठ इंग्रजी लेखांनी भरलेले असे. त्यात अग्रलेख, इंग्लिश एडिटोरियल नोट्स असत. या इंग्रजी मजुकरांचे एडिटर नारायणराव रघुनाथ् नवलकर हे होते. अंबालहरीच्या दुस-या व तिस-या पृष्ठावर मराठी लेख येत असत. अंबालहरी मधून येणा-या लेखातून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे मार्मिक विवेचन केलेले असे व सरकारकडे तशी मागणी केलेली असे. अंबालहरीत येणा-या जोरदार लेखांमुळे हे पत्र खूपच लोकप्रिय झाले व त्याचा प्रसार सर्व महाराष्ट्रभर झपाट्याने झाला. अंबालहरीच्या लोकप्रियतेचा परिणाम दीनमित्रवर झाला व दीनमित्रचे वर्गणीदार कमी झाले.

4. **अंबाप्रसाद:** "अंबालहरी प्रमाणेच अंबाप्रसाद हे आणखी एक सत्यशोधक समाज मताचे पत्र या अंबाप्रसाद छापखान्यात छापले जात असे. या पत्राशीही कृष्णराव भालेकरांचा संबंध होता. असे रा.के.लेले यांनी म्हटलेले आहे."

5. **शेतक-यांचा कैवारी:** भालेकरांनी शेतक-यांच्या कैवारी हे वृत्त्पत्र दामोदर सावळाराम यंदे व रामजी संतुजी आवटे यांच्या सहकार्याने इ.स.1881 मध्ये मुंबई येथे सुरु केलेले होते. साहजिकच इ.स.1884 मध्ये

शेतक-यांचा कैवारी बंद पडले. आपण सुरु केलेले वृत्तपत्र बंद पडल्याची हळहळ आवटे यांना वाटू लागली. म्हणून इ.स.1982 मध्ये त्यांनी माजगाव प्रिंटींग प्रेसचा लिलाव पाच हजार रुपयांना घेतला व त्या छापखान्याचे नाव शेतक-यांचा कैवारी असे ठेवले. हा छापखाना व वर आणखी दोनशे रुपये रोख त्यांनी भालेकरांच्या स्वाधीन केला व शेतक-यांचा कैवारी हे वृत्तपत्र काढण्यास सांगितले. अशा रितीने भालेकरांच्या संपादकत्वखाली शेतक-यांचा कैवारी इ.स.1893 मध्ये पुन्हा सुरु झाला. भालेकरांनी शेतक-यांचा कैवारी हे पत्र दोन वर्षे चालविले. पण या दोन वर्षाच्या काळात भालेकरांनी खर्च करण्यासाठी दिलेले पैसे तर खर्च केलेच, पण छापखान्यावर हजार रुपयांचा बोजा करुन ठेवला. आवटे यांनी छापखान्यावरील हा बोजा निवारण केला व शेतक-यांचा कैवारी बंद करुन छापखाना बडोदा येथे नेला. वृत्तपत्र चालविण्याच्या कामी नेहमीप्रमाणेच याहीवेळी कर्ज झाल्यामुळे भालेकरांना शेतक-यांचा कैवारी पुढे चालविता आला नाही असे दिसते.

भालेकरांनी मुंबईत चालविलेल्या शेतक-यांचा कैवारी या पत्रावर प्रथमपासूनच मराठी नावाप्रमाणेच द ॲडव्होकेट ऑफ ॲग्रीक्ल्चरिस्ट असे इंग्रजी नावही छापलेले असे. मराठीप्रमाणेच इंग्रजी भाषेमध्येही मजकूर असलेले हे वृत्तपत्र शुक्रवारी प्रसिध्द होई. ज्यांना मराठी भाषा समजते त्यांच्यासाठी व ज्यांना इंग्रजी समजते त्यांच्यासाठी इंग्रजी भाषेचा भालेकरांनी स्वीकार केल्याचे दिसते. बहुजन समाजाची विद्याहीन अवस्था, त्यांची दु:खे, गा-हाणे इंग्रज सरकारला कळावित म्हणूनही त्यांनी वृत्त्पत्रासाठी इंग्रजी भाषेचा अवलंब केल्याचे दिसते.

6. **जागरुक:** सत्यशोधक विचाराच्या प्रसारासाठीच वालचंद कोठारी यांनी 19 जुलै 1917 रोजी जागरुक नावाचे पत्र पुण्यातून सुरु केले. “जागरुक पत्रात सत्यशोधक समाजाच्या तीन तत्वांचा प्रामुख्याने पुरस्कार करण्यात येत असे — (1) देव आणि भक्त यांच्या दरम्यान मध्यस्थाची जरुरी नाही. देवापर्यंत स्वतंत्रपणे पोहोचण्याचा प्रत्येक भक्ताला — मग तो कोणत्याही जातीचा असो- हक्क आहे. (2) मनुष्याची योग्यता त्याच्या गुणावरुन ठरवावी. जन्माशी त्या योग्यतेचा संबंध असता कामा नये. केवळ जन्मामुळे काहींना अस्पृश्य समजण्याची रुढी सत्यशोधकांना मान्य् नाही. (3) सर्व प्रकारची विद्या संपादन करण्याचा सर्वांना हक्क् आहे आणि ती सर्वांनी संपादन केली पाहिजे, त्याशिवाय सामाजिक विषमता नाहीशी होणार नाही.”

7. **जागृति:** भगवंतराव बळवंत पाळेकर यांनी 17 ऑक्टोबर 1917 रोजी जागृति पत्र बडोदा येथे सुरु केले व सुमारे 32 वर्षे मोठ्या चिकटीने व सामर्थ्यनिशी चालविले. पहिला अंक गुरुवार, दि.24 नोव्हेंबर 1917 रोजी दुस-याच्या मुहूर्तावर प्रसिध्द झाला. पुढे दर शनिवारी पत्र प्रकाशित पत्र प्रकाशित होऊ लागले.

आपल्या पत्राचे धोरण स्पष्ट करतांना त्यांनी म्हटले होते, “जागृती पत्राचे धोरण देशहितबुध्दीची जाणीव ठेवून राष्ट्रीय बाण्याचे ठेवले आहे. म्हणून ज्या-ज्या वेळी जातिविशिष्ट चळवळीला ऊत येईल, त्या- त्या वेळी मी जोरात विरोध केला होता. त्यामुळेच जेथे मॅन्शनमध्येही दोनवेळा जागृती पत्राची होळी करण्यात आली. पण कागद जळाला म्हणून विचारांची राखरांगोळी होत नाही”.

"जागृती पत्र बडोद्याहून प्रसिध्द होत असले तरी स्थानिक प्रश्नाबरोबर महाराष्ट्रातील घडामोडींचाही परामार्श त्यात घेण्यात येत असे. पत्राचे सर्वसाधारण धोरण सत्यशोधक मताचे असले तरी त्यात एकांगीपणा नसेल. जागृतीपत्राचे धोरण आरंभापासून देशहितबुध्दी ध्यानी घेऊन राष्ट्रीय बाण्याची ठेवली होती. आणि म्हणून ज्या ज्या वेळी जाती विशिष्ट चळवळीला ऊत येई. त्या त्या वेळी जागृतीने त्यास विरोध केला. सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेत्र चळवळीतील नेते व कार्यकर्त्यांनाही वेळप्रसंगी समज देण्याचे कार्य जागृतिने केले".

जागृती हे वृत्त्पत्र समतोल विचाराने चालले. महाराष्ट्रातील घडामोडींवर त्यात सविस्तर मजकूर छापला जात असे.

8. **विजयी मराठा:** ब्राह्मणेत्तरांचा केसरी असा ज्याचा उल्लेख केला जात असे त्या विजयी मराठा पत्राचा पहिला अंक 1 डिसेंबर 1919 रोजी पुणे येथून प्रसिध्द झाला. श्रीपतराव शिंदे यांच्या संपादकत्वाखाली हे वृत्त्पत्र सुरु झाले. केसरी या वर्तमानपत्रात त्याविषयीची जाहिरात प्रसिध्द झाली होती. त्यात म्ह्टले होते, "विजयी मराठा या नावाने वर्तमानपत्र ता.1 डिसेंबर 1919 पासून सुरु होणार आहे. या पत्रात मराठा व विद्येत मागासलेल्या वर्गाच्या उन्नतीकरिता राजकीय, सामाजिक, धार्मिक व शिक्षणादी विषयांवर निर्भिड, मार्मिक, भारदस्त व जोमदार असे लेख प्रसिध्द होतील".

"विजयी मराठा पत्र सत्यशोधक चळवळ व ब्राह्मणेत्र पक्ष यांच्या पुरस्कारासाठी अस्तित्वात आले होते. त्याच्या संस्थापक संपादकांची मते त्याबाबत ठाम होती. यामुळे सुरुवातीपासून त्याचे धोरण निश्चित होते. सामाजिक व धार्मिक स्वरुपाच्या चळवळीला राजकीय अंगही जोडले गेल्याने विजयी मराठा पत्राला राजकीय प्रश्नांना महत्व् द्यावे लागले. विजयी मराठा पत्र पुण्यात निघाले तेव्हा लोकमान्य् टिळकांचे नेतृत्व् सर्व देशभर गाजत होते व महाराष्ट्रात तरी त्यांच्याविरुध्द् उभे राहणे सोपे नव्हते. टिळकांच्या हाती केसरीसारखे वर्तमानपत्र होते व त्याचा दबदबा सर्वत्र होता. पण विजयी मराठा पत्राला टिळकांशी व केसरीशी दोन हात करावे लागणे अपरिहार्य होते आणि विजयी मराठा पत्राने तसे दोन हात केलेही".

विजयी मराठामध्ये दिनकरराव जवळकर हे भवानी तलवार या टोपण नावाने 'तलवारीचे वार' हे सदर लिहित असत.

"त्या काळात सत्यशोधक चळवळीला शाहू महाराजांच्या पुढाकाराने खूपच चालना मिळून तिचा प्रसार सर्वत्र झाला होता व जनतेतही त्यामुळे बरीच जागृती झाली होती. परंतु त्यांच्या पश्चात ब्राह्मणेत्र चळवळीच्या बाजूने ठामपणे उभे राहून, विरोधकांशी मुकाबला करण्यात विजयी मराठा पत्राने विशेष कामगिरी केली. ब्राह्मणेत्तरावरील अन्यायांना वाचा फोडून त्याबाबत सरकारला हस्तक्षेप करण्यास भाग पाडण्यात विजयी मराठ्याला फार मोठा होता. या पत्राचा खडोपाडी प्रसार झाला असल्याने लोकांना त्याचा मोठा आधार वाटत असे".

"विजयी मराठा पत्राने बजावलेल्या अशा कामगिरीमुळे त्याचा सार्वत्रिक बोलबाला होणे अपरिहार्य होते. विजयी मराठ्याचे मत म्हणजे ब्राह्मणेतर पक्षाचे मत असेच सर्वत्र मानले जाऊ लागले.

अधिकृत मतांसाठी विजयी मराठ्यातील लेखांचे उतारे टाइम्स् ऑफ इंडिया, बॉम्बे क्रॉनिकल इत्यादी इंग्रजी पत्रे मुद्दाम उदधृत करीत असत".

9. **प्रबोधन:** सामाजिक प्रबोधन करणारे एक ध्येयवादी पत्रकार म्हणून केशव सीताराम ठाकरे यांचा उल्लेख केला पाहिजे. प्रबोधनकार ठाकरे या नावानेच ते प्रख्यात झाले. त्यांनी प्रबोधन हे पाक्षिक ऑक्टोबर 1921 मध्ये सुरु केले. त्यांचे ध्येयधोरण स्पष्ट करतांना संपादकांनी म्हटले होते. प्रबोधन हा पक्का नवमतवादी आहे. नवयुगात या अफाट हिंदी राष्ट्राने सर्व जगाला चकीत करुन सोडण्यासाठी अनुभत कर्तबगारी, उदात प्रगमनशीलता आणि विश्वव्यापक धर्माचे साम्राज्य् प्रस्तृत करण्याची प्रेमपूर्ण तडफ दाखवावी अशी प्रबोधनाची महत्वाकांक्षा आहे. ती साध्य् होण्यासाठी हिंदु समाजाच्या धार्मिक आणि सामाजिक उदारपणा, लवचिकपणा..भ्रातृभाव यांची खरीखुरी जाणीव उन्नत करण्याची कामगिरी प्रथम चोखाळण्याचे प्रबोधनाने ठरविले आहे. राजकीय सुधारणा झाली म्हणजे इतर सर्व सुधारणा आपोआप होतील या गोंडस त्त्वावर प्रबोधनाचा मुळीच विश्वास नाही".

1923 साली प्रबोधनकारांनी साता-याजवळ पाडळी येथे स्थलांतर केले. ब्राह्मणेत्र पक्षाचे एक नेते धनजी शहा कपूर यांनी त्यांना तेथे सर्व सेवा पुरविल्या".

पुण्यात त्यांनी प्रबोधनाचे मासिकात रुपांतर केले आणि लोकहितवादी नावाचे साप्ताहिकही सुरु केले. या साप्ताहिकाचे उद्दिष्ट सांगतांना प्रबोधनकारांना पहिला मुजरा शिवरायाला केला. दुसरा मुजरा महाराष्ट्राला केला आणि तिसरा मुजरा गुरुवर्य लोकहितवादी सरदार गोपाळराव हरी देशमुख यांच्या स्वर्गस्थ् आत्म्याला केला. ठाके म्हणतात, विचार, उच्चार, आचाराची माझ्या मनाची जी कमावण झाली तिचे सारे श्रेय लोकहितवादीच्याच विपुल ग्रंथसामुग्रीला मी कृतज्ञ भावनेने देत आहे. आज साप्ताहिक स्वरुपात बाहेर पडणारा लोकहितवादी एक प्रकारे त्यांचेच चालते बोलते जागृत स्मारक होय. त्याचबरोबर महाराष्ट्रात एकवेळ गाजलेल्या कै.आगरकरांच्या सुधारक पत्राचा जीर्णोध्दार करणे हेही लोकहितवादी धोरण राहील".

श्री.ठाकरे यांची लेखणी प्रखर होती आणि लेखशैली सर्व अर्थाने स्वतंत्र होती. झणझणीत शब्दात टीका करुन प्रतिपक्षचे विचार कसे सदोष आहेत हे सांगतांना ते बिनतोड युक्तीवाद करीत असत. प्रबोधन हे केवळ 5-6 वर्षाचे चालू राहिले पण त्या अल्पावधीतही त्याने अनेक सामाजिक सुधारणांचा विचार मांडला आणि देखावा करणा-या सुधारकांचा निर्भीडपणे परामर्श घेतला."

10. **कैवारी:** 1928 साली मुंबईत 'कैवारी' नावाचे साप्ताहिक दिनकरराव जवळकर यांच्या संपादकाखाली निघाले. ते 1929-30 असे चालले." **1927 ते 1928 च्या** प्रारंभी काही महिने जेधे व जवळकरांनी एकजुटीने काम केले. 1928 च्या आरंभी दिनकरराव जवळकर यांच्या संपादकात्वाखाली 'कैवारी' पत्र मुंबईत चालू करण्याचे ठरले. या पत्राच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष होते भास्करराव जाधव, उपाध्यक्ष बाबुराव जेधे व सल्लागार मंडळात केशवराव जेधे होते. सल्लागार मंडळाच्या संमतीने 'कैवारी' पत्राचे धोरण ठरविले जाईल असे जाहीर आश्वासन देण्यात आले होते. मुंबईत नवे वृत्तपत्र काढण्याची

आवश्यकता का भासली याबद्दल जाहिरातीत स्पष्टीकरण देण्यात आले होते. "पुढील दोन वर्षात सायमन कमिशनच्या नेमणुकीमुळे ज्या राजकीय उलाढाली होणार आहेत त्यावेळी ब्राह्मणेत्र पक्षामध्ये संघटना, शिस्त् उत्पन्न् करण्याकरिता आज अशा सामुदायिक व जबाबदार पत्राची अत्यंत आवश्यकता आहे."

11. **शिवस्मारक:** श्री.केशवराव जेधे यांनी छत्रपती मेळा काढून ब्राह्मणेत्त्र चळवळीचा दरारा बसविलेला होता व शिवस्मारक या नावाचे एक वर्तमानपत्रही काढले होते. या साधनांच्या योगाने सत्यशोधक चळवळीस भयंकर पाठिंबा मिळाला व 1925 साली गणपतीच्या 10 दिवसात पुण्यावर सत्यशोधकांचेच राज्य् आहे की काय असे वाटू लागले. या मेळ्यांमध्ये सत्यशोधक विचाराची गाणी म्हटली जात असत.

12. **मजूर:** दिनकरराव जवळकर जेव्हा कामगार चळवळीत कामे करु लागले तेंव्हा त्यांनी मजूर हे नवीन वृत्त्पत्र सुरु केले. या कार्यात अर्थात केशवराव जेधे यांची त्यांना साथ होती. जवळकराची मती आणि धृती आणि जेध्यांची उदार बुध्दी आणि संपत्ती यांचा अपूर्व संगम झाल्यामुळे सत्यशोधक नावात जादू आली व या जादूस तरुण मंडळी दिपत आहेत, भाळत आहेत, वश होत आहेत. याच प्रसंगी 'मजुर पत्र' निघुन त्याने या चळवळीचे लोन घरोघरी पोहोचविले आणि याच वेळी ब्राह्मणेतरांच्या या घासाधिशीत श्री.जवळकर यांच्यावर खटला होवून ते तुरुंगात गेले.

13. **तेज:** दिनकरराव जवळकर यांनी 9 मे 1939 रोजी त्यांनी मुंबईत 'तेज' नावाचे नवे साप्ताहिक सुरु केले. जवळकर जसे बोलत तसे वागत असत. जेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी काळाराम मंदिराचा सत्याग्रह हाती घेतला तेंव्हा अनेक ब्राह्मणेतर नेते मागे हटले मात्र जवळकरांनी या सत्याग्रहात सहभाग घेतला. "15 मार्चला नाशिकला झालेल्या काळाराम मंदिर प्रवेशाच्या सत्याग्रहात दादासाहेब गायकवाड, राजभोज वगैरेंच्या बरोबर श्री.जवळकर यांनी भाग घेतला. अस्पृश्य् सत्याग्रहींना सनातनी हिंदूनी मारहाण केली. त्यात जवळकरांनाही मारहाण झाली."

तेज या वर्तमानपत्रामध्ये जवळकरांनी जे लिखाण केले त्यातील भाषा अतिशय प्रखर असे. विरोधकांना नामोहराम करणारे विचारते अगदी सडेतोडपणे मांडत असत. त्यांनी या वृत्त्पत्रात ब्राह्मणेतर चळवळीविषयी लिहिले होते. "महाराष्ट्रात आजपर्यंत जी ब्राह्मणेतर चळवळ झाली. तिच्याकडे पाहण्याच्या अनेक दृष्टी आहेत. महात्मा फुले यांचा सत्यशोधक समाज व त्याला 1916-17 सुमारास दिसलेला राजकीय पेहराव यामुळे जो घोटाळा जडणे अपरिहार्य आहे तो उडाला. कै.महात्मा फुले, भालेकर, लोखंडे, पाटील, डुंबरे वगैरे सत्यशोधकांचे आद्यप्रवर्तक यांचे नुकतेच सामाजिक कार्य होते. त्यावेळचा काळही समाजकारणाचा होता. अगदी मोठे राजकारण म्हणजे इंग्रजी बहादूरांच्या जी दूरदृष्टी होती. तिचीच फळे आज ब्राह्मणेत्र जनतेला दिसत आहे. सामाजिक स्वरुपात तिचे राजकारणात रुपांतर करतांना मात्र तिला जे पुढारी लाभले त्यांच्या परिस्थितीने भांबावुन किंवा कोणत्यातरी कारणाने एक मोठी घोडचूक झाली आणि त्या घोडचुकीमुळे ब्राह्मणेत्र चळवळ थंडावत चालली आहे." तेजमधील सत्यशोधक , महात्मा गांधी, कोल्हाटकर आणि शाहू छत्रपती खरी सत्ता हवी. दिखावूपणा नको, कोल्हापूर संस्थानाचा कारभार,

 ISSN 2231 4342

हिंदूस्थानचा शेतकरी आणि भावी स्वराज्य् यासारख्या अग्रलेखामध्ये त्यांनी ज्या सडेतोडपणाने लेखन केले आहे आणि मोठ्या पुढा-यांना देखील सोडलेले नाही हे पाहता त्यांच्या लेखणीची धार लक्षात येईल.

अनेकांनी जवळकरांच्या भाषेबद्दल नाराजी व्यक्त केली. मात्र ज्ञान प्रकाशकारांनी मात्र जवळकरांच्या कामगिरीचे भरघोस कौतुक केले होते. त्यांनी म्हटले आहे की, “जी गोष्ट कै.ज्योतिबा फुले यांना घडवून आणता आली नाही, जी घडवून आणण्यासाठी श्री शाहू छत्रपतींची सत्ता व संपत्ती अपुरी पडली, जी साध्य करण्यासाठी लठ्ठ- जाधवरावांचे पुढारीपणही कमकुवत ठरले ती ब्राह्मणेत्र शेतकरी वर्गाची — बहुजन समाजाची जागृती श्री दिनकररावांनी आपल्या वक्तृत्वाने जीवापाड मेहनतीने व कमालीच्या युक्त्या- प्रयुक्त्यांनी अगदी अल्प् काळात घडवून आणली.”

दिनकरराव जवळकर यांनी म्हटले आहे, “चळवळीतील पाठीवर पुढा-यांचे गुडवील नसेल तर ती चळवळ कशीही असो, यशस्वी होणे कठीण असते. तत्व् कितीही उन्नतीप्रद असो पण ध्येय व तत्व् जर ध्येयनिष्ठ, सच्चा पुढा-यांकडून प्रतिपादले जात नसेल तर त्याला यश येणार नाही. ब्राह्मण- ब्राह्मणेतर पुढा-यांची कुणी तुलना करु लागला तर आज ब्राह्मणेतर पक्ष ब्राह्मण समाजाला सारखा चौफेर रेटीत नेत आहे. याचे इंगीत तत्व्निष्ठ ब्राह्मणेतर पुढा-यांना प्रामाणिकपणे सापडेल.”

दिनकरराव जवळकर यांनी म्हटले आहे, लोकछंदानुवृत्ताची पर्वा महात्मा जोतीरावांनी केली असती तर शाहू महाराज उत्पन्न् झाले नसते आणि राजर्षि शाहू महाराजांनी लोक बोले आप चाले असा पाठ घेतला असता तर ब्राह्मणेत्र पक्षच समूळ नाहीसा झाला असता. सद्सद्विवेकबुध्दी आणि लोकमताचे अनेकवेळा पटत नसते. अशावेळी लोकमतापेक्षा सत्यमतालाच मान दिला पाहिजे.

“जेध्यांची पुण्याई हे तर ब्राह्मणेतर पक्षांचे भांडवल आहे. हे भांडवल, ही पुण्याई नसती तर ब्राह्मणेत्र पक्षाची स्थिती केविलवाणी झाली असती. महात्मा फुले, भालेकर, लोखंडे वगैरे पहिल्या पिढीनंतर सत्यशोधक समाज ऐकू सुध्दा येत नव्हता. त्याचप्रमाणे शाहू महाराजांच्या नंतरही तसे झाले असते परंतु ब्राह्मणेतर समाजाचे सुदैव असे की, अनेक पुढारी उत्पन्न् झाले.”

14. **राष्ट्रवीर:** महाराष्ट्राबाहेर जी मराठी वृत्त्पत्रे त्याकाळात सुरु झाली. त्यामध्ये बेळगाव येथील राष्ट्रवीर याचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल. 09 मे 1921 रोजी शामराव भोसले यांच्या संपादनाखाली हे वृत्त्पत्र सुरु झाले. बहुजन समाज व गरीब कष्टकरी शेतकरी, कामगार यांच्यात सुधारणा घडाव्यात, अस्पृश्यता नष्ट व्हावी यासाठी या वृत्तपत्रांनी लेखन केले.

“ब्राह्मणांच्या समाजकारणाबरोबर त्यांच्या राजकीय आंकाक्षा निर्माण करणे व त्या उत्तरोत्त्र वाढविण्याचे कार्य करणे यातून समाज जागृती होऊन ब्राह्मणेतर पक्षाला निवडणुकीत जिल्हयात यश मिळविण्यास मदत झाली.

सारांश : दीनबंधू, जागृती, पुढारी, विजयी मराठा यासारख्या बहुजन वृत्तपत्राच्या माध्यमातून बहुजन विचाराची जोपासना झाली. कृष्णराव भालेकर, भगवंतराव पाळेकर, वा.रा.कोठारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, के.सी.ठाकरे, मुकुंदराव पाटील, श्रीपतराव शिंदे, दिनकरराव जवळकर, केशवराव जेधे, भास्करराव जाधव

यांच्यासह त्या काळातील विविध बहुजन पत्रकारांनी अनेक अडचणींना सामोरे जात आपले कार्य पुढे नेले. अभिजनांच्या पत्रकारितेला राजकीय, धार्मिक, आर्थिक क्षेत्रातील उच्चवर्णीयांकडून सर्वोतोपरी मदत मिळत होती. उलटपक्षी बहुजन पत्रकारितेला तत्कालीन अभिजन व्यक्तींकडून व भांडवलदारांकडून कुठल्याही प्रकारचे सहकार्य मिळू शकले नाही. बहुजन समाजातील अज्ञान, आर्थिक दुरावस्था, धर्म व वर्ण व्यवस्थेचा पगडा आणि समाजाची दैववादी दृष्टी यासारख्या परंपरागत कारणांमुळे बहुजन पत्रकारितेला बहुजन समाजाचेही पुरेसे पाठबळ लाभू शकले नाही. भविष्य् काळात बहुजन पत्रकारिता व बहुजन चळवळी या माध्यमातूनच बहुजन समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य घडू शकते. त्यामुळे बहुजन पत्रकारिता ही आजची आणि उद्याची आवश्यक गरज आहे.

संदर्भ :

1. आढाव बाबा: (कार्यकारी संपादक) पुरोगामी सत्यशोधक, जुलै-सप्टेंबर 1996
2. लेले रा.के.- मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
3. खांदवे भाऊसाहेब – दीनबंधु कृष्णराव भालेकर, गाज प्रकाशन, अहमदनगर
4. फडके य.दि.- दिनकरराव जवळकर, समग्रा वाङ्मय, महात्मा जोतिराव फुले, समता प्रतिष्ठान, पुणे.
5. किर धनंजय – राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
6. बगाडे उमेश- 'विचार किरण्' दीन मित्रमधील अग्रलेख, भाग-1, दीन मित्रकार मुकूंदराव पाटील स्मारक समिती, तरवंडी ता.नेवासा.
7. मोरे सदानंद – जागृतीकार पाळेकर, महात्मा फुले, समता प्रतिष्ठाण, पुणे
8. मोरे सदानंद – 'लोकमान्य – महात्मा' खंड (2), राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे
9. फडके य.दि. – 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' श्रीविद्या प्रकाशन, पुणे

ISSN 2231 4342

हैद्राबाद मूक्ति संग्राम लढयातील- महाराष्ट्र परिषदांचे कार्य

प्रा. डॉ. साबणे अशोक जी.
इतिहास विभाग प्रमुख
कै. बा. पा. ए. ग्रा. महाविद्यालय
ईमेल-sckhistory@gmail.com
मो.नं.९४२०९१४०११

प्रस्तावना-

हैद्राबाद संस्थानातील जनता सामाजिक व धार्मिक चळवळीतून एखादे राजकीय व्यासपीठ निर्माण करण्यासाठी धडपडत होती. पण १९३८ पर्यंत येथील कार्यकर्त्यांनी व पुढा-यांना भरीव असे काहीच कार्य करता आले नाही १९२३ मध्ये काकीनाडा येथे अखिल भारतीय कॉग्रेसचे अधिवेशन झाले. त्यावेळी बॅरिस्टर राघवेंद्ररॉय शर्मा यांनी हैदराबाद संस्थानची पहिली राजकीय परिषद अयोजित केली. लोकनायक माधव श्रीहरी ऊर्फ बापूजी अणे हे या परिषदेच्या अध्यक्षस्थानी होते. श्री.वामनराव नाईक यांनी या परिषदेत बराच पुढाकार घेतला होता. या परिषदेचे दुसरे अधिवेशन १९२६ मध्ये मुंबईत भरले तर तिसरे पुण्यात १९२८ मध्ये. संस्थानच्या हाद्दीबाहेर राजकीय परिषद भरविण्यात पुढाकार घेतल्याबद्दल राघवेंद्ररॉय शर्मानी निजाम सरकारने हद्दपार केले. बरीच वर्षे त्यांना पुण्यात काढावी लागली. ५ मे १९२८ रोजीहैदराबाद राजकीय परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात तात्यासाहेब केळकरांनी या संस्थानातल्या कार्यकर्त्यांनी प्रथम राजनिष्ठेचा ठराव मंजूर करुन सनदशीर मार्गाने चळवळ सुरु करावी असा सल्ला दिला. संस्थानातील कार्यकर्त्यांनी 'व-हाडाच्या बि-हाडप्रमाणे रानोमाळ आपले बि-हाड घेऊन पळू नये तसेच संस्थानात भरभक्कम पाया रोवा व पया ठेचून ठेचून मजबूत करा.'' अशी सूचना केळकरांनी केली. चौथी राजकीय परिषद अकोला येथे झाली. त्या परिषदेस मराठवाडयातील अनेक लोक उपसिथत होते. तेथे प्रथमच जबाबदार राज्यपध्दतीचे मागणी करणारा ठराव पास झाला. त्यानंतर 'आंध्र संघमची' स्थापना झाली. हिंदू स्टँडिग कमिटीच्या व्यासपीठाद्वारे वामनराव नाईक आणि काशिनाथराव वैद्य यांनी सुरुवातीचे काम केले.

१९३५ मध्ये 'निजाम सब्जेक्टर लीग' स्थापना करण्यात आली. आ.कृ.वाघमारे व अनंतराव कुलकर्णी यांनी 'महाराष्ट्र संघाची' स्थापना केली. आंध्र महासभेच्या शादनगर अधिवेशनात कर्नाटकासाठी 'कर्नाटक संघाची' व मराठवाडयात 'महाराष्ट्र परिषद' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलो. (इस.१९३६)

 ISSN 2231 4342

महाराष्ट्र परिषदेचे परतूर अधिवेशनः-

जून १९३७ मध्ये परतूर येथे (जि.जालना) महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन घेण्याचे ठरले. परतूर ही किशनप्रसाद यांची जहागीर असून सचिव श्री.गुंडेराव हे राष्ट्रीय वृत्तीचे होते. १ जून ते ३ जून १९३७ रोजी अधिवेशन झाले. या परिषदेचे अध्यक्ष गोविंदराव नानल हे होते. स्वागताध्यक्ष म्हणून केंदळीचे शेतकरी श्री.गोविंदराव घारे वि.वा.देसाई हे स्वागत चिटणीस यळवटेच श्यामराव यळवटकर आणि पैठणचे तुळजापूरकर यांचे योगदान मोलाचे ठरले. या अधिवेशनासाठी मराठवाडयाच्या सर्व जिल्हयातून अनेक पुढारी व कार्यकर्ते आले होते. या परिषदेसाठी औरंगाबाद येथून गोविंदभाई श्रॉफ,माणिकचंद पहाडे, स.कृ.वैशपायन,चंद्रगुप्त चौधरी, अच्युतभाई देशपांडे, नांदेडहून गोपाळशास्त्री देव, श्यामराव बोधनकर, रामदासराव कोळनूरकर, शंकरराव टेकळीकर, बीड जिल्हयातून स्वामी रामानंद तीर्थ, पुरुषोत्तमराव चपळगावकर, नारायणराव जोशी, बाबासाहेब परांजपे, उस्मानाबादहून-राघवेंद्र दिवाणी, डॉ.नीळकंठवार, परभणीहून-दादासाहेब चारठाणकर, विनायकराव चारठाणकर, श्रीनिवासराव बोरीकर, श्रीनिवासराव औंढेकर, मुकुंदराव पेडगावकर, दाजीसाहेब मोहरीर, विश्वनाथ कातनेश्वरकर, वासुदेव बरसोले,सखारामपंत पत्की, डॉ.बाबूराव देशपांडे,रंगनाथराव बंगाळे, काशिनाथराव आंबेकर इत्यादी पुढारी , कार्यकर्ते आणि हजारो संख्येने लोक उपस्थित होते या परिषदेत अनेक विषयांवर निर्भीडपणे चर्चा झाली. सार्वत्रिक शिक्षण, उर्दू माध्यमाला विरोध हे ठराव गाजले. लोकसंख्येच्या प्रमाणात हिंदूना नोक-या मिळाव्यात अशी मागणी करण्यात आली. तसेच वेठबिगारी व जाहगिरीतील जनतेवर होत असलेला अन्याय यासंबंधी भाषणे झाली. नागरी हक्कांचा पुरस्कार आणि जामीनदारी व जहागीरदारी नष्ट करण्याचा आग्रह प्रतिपादन करण्यात आला. या अधिवेशनाचे वैशिष्टय म्हणजे यळवटचे श्यामराव पाटील यांनी जहागिरी व पायगा भागातील शेतक-यांचे प्रश्न मांडले. गोविंदराव नानल यांनी शेतक-यांचे प्रश्न मांडून सहकारी चळवळीचा पुरस्कार केला. त्यांचे भाषण अत्यंत अभ्यासू व प्रभावी होते.

या परिषदेवर स्वामी रामानंद तीर्थ, आ.कृ.वाघमारे, अच्यतुभाई देशपांडे, गोविंदभाई श्रॉफ, श्रीनिवासराव बोरीकर, दिगंबरराव बिंदू यांच्या जहाल विचारांची छाप पडली. तसेच या परिषदेत महाराष्ट्र परिषेदेची संघटना बांधण्याच्या दृष्टीने महत्वाचा विचार करण्यात आला. स्वामी रामानंद तीर्थ यांचा सहभाग बराच मूलगामी स्वरुपाचा होता. त्यांना सरचिटणीसपद स्वीकारण्याचा आग्रह करण्यात आला. पण त्यांनी नकार दिला. त्यामुळे त्यांच्याकडे घटना समितीचे काम सोपविले गेले. त्यांनी महाराष्ट्र परिषदेची घटना तयार करण्यासाठी अंबाजोगाई येथे बैठक घेऊन विचारमंथन केले. येथून पुढे स्वामीजीचे नेतृत्व उदयास येत गेले. परिषदेत मंजूर झालेले ठराव मांडणा-यामध्ये आणि अनुमोदन देणा-यांमध्ये गोपाळशास्त्री देव, मुकंदराव पेडगावकर, माणिकचंद पहाडे, विठ्ठल देशपांडे, नारायण चवहाण, नारायणराव जोशी वगैरेंचा समावेश होता. या परिषदेमुळे महाराष्ट्र परिषदेचे कार्य संपूर्ण मराठवाडयात फोफावू लागले . निजामी राजवटीविरुध्द संघटित होण्याचे मनोधैर्य या अधिवेशनामुळे जनतेत तनर्माण झाले. गोविंदराव नानल यांनी दौरा ठिकठिकाणी

ISSN 2231 4342

परिषदेच्या शाखा स्थापन केल्या. या अधिवेशनामुळे अपरिचित लोक एकत्र आले. त्यामुळे परस्परांच्या विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी प्राप्त झाली. स्वातंत्र्यासाठी कोणतेही बलिदान देण्याची तयार असणारी मंडळी एकत्र येण्यास सहाय्य झाले. मराठवाडयातील प्रामाणिक कार्यकर्त्यांची एक फळी तयार झाली. थोडक्यात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी पडेल तो त्याग करणायांची शक्ती संघटित झाल्यामुळे लोकशाही संपादनाचा पुढील मार्ग सुकर झाला.

महाराष्ट्र परिषदेचे लातूर अधिवेशन (२ जून १९३८)-

लातूर येथे महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन घेण्यासाठी परवानगीचा अर्ज निजाम सरकारकडे करण्यात आला. एका महिन्यानंतर परवानगी देण्यात आली. हैदराबादचे बॅ.श्रीनिवास शर्मा हे अध्यक्ष होते. स्वागताध्यक्ष भास्कररावजी वकील (नळदुर्ग) होते. अध्यक्ष व स्वागताध्यक्ष यांची भाषणे अगोदर कलेक्टरला दाखवावीत व त्यांनी मान्यता दिलेलेच ठराव अधिवेशनात मांडण्यात यावेत अशी अट घालण्यात आलेली होती. या सर्व अडथळयांमुळे प्रतिनिधी संतापले होते. अध्यक्षाच्या छापील भाषणातील काही उतारेच वाचण्यास परवानगी देण्यात आली. झेंडावंदनाच्या कार्यक्रमासाठी वेगळी अनुमती घ्यावी लागेल असे ऐनवेळी सांगण्यात आले. याप्रमाणे शक्य तितके विघ्ने आणून अधिवेशनाचा बोजवारा उठवून देण्याचा निजामाच्या अधिका-यांची चंग बांधला होता. त्यामुळे सरकारच्या अन्यायी धोरणाच्या निषेधार्थ अधिवेशन अर्धवट सोडून द्यावे असा विचारप्रवाह प्रतिनिधीमध्ये निर्माण झाला. पण अधिवेशन अर्धवट टाकून देणे संयोजकाच्या जीवावर आले होते.

स्वागताध्यक्ष भास्कररावजी वकील यांनी सांगितले की, लेखन व मुद्रण स्वातंत्र्य, शिक्षणसंस्था व व्यायामशाळा आणि वृत्तपत्रे यावरील बंदीमुळे येथील जनतेची उपासमार होत आहे. सरकारने योग्य सुधारणा करुन जनतेस न्याय द्यावा अशी मागणी केली. ग्रामीण जनतेची उन्नती, चळवळीसाठी द्रव्यसंचय आणि हिंदू-मुस्मिल ऐक्य यावर त्यांनी भर दिला. बॅ.श्रीनिवास वर्मा यांनी आपल्या भाषणातील संस्थातील संस्थानातील अन्याय व प्रशासन यावर भरपूर टीका केली. तसेच त्यांनी संस्थाने व फेडरेशन,हिंदू-मुस्लिम दंगे व त्यांची कारणे, शिक्षण, शेतकयांचे उत्पन्न वाढविणे, शेतमालाला अधिक किंमत देणे, हरिजनांचे प्रश्न, मद्यपान बंदी इत्यादी प्रश्नांवर चर्चा केली. त्यांच्या भाषणामुळे तरुणांमध्ये बरीच जागृती निर्माण झाली या अधिवेशनात पुढील ठराव मांडले गेले.

१) हैदराबाद शहरातील धुळपेठ येथे झालेल्या जातीय दंगलीची चौकशी करण्यता यावी. यासाठी आयोग नेमावा. हिंदू समाजावर जे अन्याय केले जात होते त्याची चौकशी करण्यात यावी २) जनतेला नागरी स्वातंत्र्य देण्यात यावे आणि जबाबदार राज्यपध्दती अमलात आणावी.

हे ठराव परिषदेपुढे मांडण्यास स्थानिक सरकारी अधिका-यांनी बंदी घातली. कलेक्टरशी झालेल्या ब-याच वादवादीनंतर नागरी स्वतांत्र्याच्या ठरावास परवानगी देण्यात आली. पण जातीय दंगलीची चौकशी

ISSN 2231 4342

करण्यात यावी हा ठराव मांडण्यास कलेक्टरने मनाई केली तेंव्हा त्याचा निषेध म्हणून अधिवेशनाचे कामकाजच थांबवावे असे १३३ विरूध्द ११ मतांनी ठरले.

३) या अधिवेशनात बहुसंख्य प्रतिनिधींनी सुचवले की, स्वामी रामानंद तीर्थ यांनी शिक्षणक्षेत्र सोडून राजकीय प्रश्नावर जनशक्ती संघटीत करावी. त्याप्रमाणे ९ जून १९३८ पासून स्वामीजींनी राजकीय क्षेत्रात पदार्पण केले. त्यामुळे मराठवाडयाच्या व हैदरबादच्या राजकारणास योग्य दिशा प्राप्त होत गेली. स्वामीजींनी सर्वत्र भ्रमण करुन निष्ठावान राजकीय कार्यकर्त्यांची एक सेनाच तयार केली. त्यात गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, आ.कृ.वाघमारे, देविसिंग चव्हाण, वैशपायन,राघेवंद्र दिवाण, निळकंठराव कुलकर्णी, दत्तात्रयराव शिवणगीकर अशा कित्येक कार्यकर्त्यांचा समावेश होता या अधिवेशनाद्वारे हे स्पष्ट झाले की, समाज अस्वस्थअसून त्यातून बाहेर पडण्याची तो वाट पाहत आहे. आपले हक्क व अधिकार हे सांगून व कर्तृत्व दाखविण्याची ऊर्मी दाटली होती. ती ऊर्मी १९३८ च्या सत्याग्रहाच्या निमित्ताने व 'वंदे मातरम्' च्या चळवळीच्या रुपाने प्रकट झाली

५) या अधिवेशनामुळे स्वामी रामानंद तीर्थ हे परिषदेचे चिटणीस बनले.

६) जबाबदार राज्यपध्दतीची मागणी करुन लातूर परिषदेने एक पाऊल टाकलेले आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

७) निजाम सरकारने 'महाराष्ट्र परिषद' ही जातीय संस्था आहे हे जाहीर केले.

उमरी (जिल्हा नांदेड) अधिवेशन (१९४१)-

महाराष्ट्र परिषदेचे तिसरे अधिवेशन औरंगाबादला घेण्याचे ठरले होते पण ऐनवेळी ते उमरी येथे घेण्यात आले. यावेळी महाराष्ट्र परिषदेचे अनेक नेते कारागृहात होते. त्यात गोविंदभाई श्रॉफ व आ.कृ.वाघमारे या श्रेष्ठ दिग्गजांचा समवेश होता. लव्हेकर हे स्वागताध्यक्ष होते. तर काशिनाथराव वैद्य हे परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांनी आपल्या भाषणात निजाम सरकारच्या सुधारणामधील उणिवांची सविस्तर चर्चा करुन जबाबदार राज्यपध्दतीस पर्याय सुचविले. त्यात महात्मा गांधीच्या रचनात्मक कार्यक्रमाचा समावेश होता. या अधिवेशनात परिषदेच्या वैचारिक भूमिकेस नवे वळण प्राप्त झाले. कुळांना संरक्षण देण्याचा स्वतंत्र ठराव येथे पारीत करण्यात आला. हैदराबाद संस्थानातील तेलगू, कानडी व मराठी या तीनही भाषिक परिषदांना एकत्र आणून मंडळ स्थापन करावे असे काशिनाथरावांनी सुचविले . या परिषदेचे वैशिष्टय म्हणजे हजारो शेतकरी या अधिवेशनास उपस्थित होते. त्यामुळे शेतक-यांच्या प्रश्नाबद्दल येथे विचारमंथन झाले. गुणात्मक दृष्टीने सरस मानले जाते.

उमरी अधिवेशनाची वैशिष्टये-

१) या अधिवेशनाला जोडूनच विद्यार्थी परिषदही घेण्यात आली. या परिषदेचे खादी प्रचार, अस्पृश्योध्दार,हिंदू-मुस्लिम ऐक्य, साक्षरता मोहीम हाती घेतली.

२) विद्यार्थी संघटनेचे नेतृत्व व्ही.देशपांडे यांनी केले. नांदेड जिल्हयात प्रथमच विद्यार्थी संघटनांचा सहभाग या मुक्ती लढयाला लाभला. त्यामुळे पुढील काळात विद्यार्थी चळवळ एक प्रबळ शक्ती ठरली.

३) या अधिवेशनास जोडून वैद्यक परिषद भरविली होती. त्यांचे नेतृत्व गोपाळ शास्त्री देव या वैद्याने केले होते.

महाराष्ट्र परिषदेचे औरंगाबादचे अधिवेशन (जून १९४३)-

जून १,२,३ तारखेला औरंगाबाद येथे महाराष्ट्र परिषदेचे चौथे अधिवेशन घेण्यात आले. त्याचे स्वागताध्यक्ष आ.कृ.वाघमारे, चिटणीस गोविंदभाई श्रॉफ तर अध्यक्ष बॅ.श्रीधर वामन नाईक होते. या परिषदेमुळे एकूण वैचारिक चळवळीचा मार्ग बदललेला आढळतो. या अधिवेशनात आर्थिक व राजकीय परिस्थितीसंबंधी आणि सरकारी अन्यायाविरुध्द, लेव्ही व खुश खरेदीविरुध्द आणि जीवनाश्वयक वस्तूंच्या पुरवठयाबद्दल ठराव पारित करण्यात आले. तसेच जबाबदार राज्यपध्दतीचा ठराव संमत करण्यता आला. बॅ.श्रीधरराव नाईक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शेतकयांच्या प्रश्नाला वाचा फोडली. धान्य व कापड स्वस्त दराने विकावे, स्वस्त धान्याची दुकाने काढावीत इत्यादी सूचना त्यांनी केल्या. त्यांनी शैक्षणिक प्रश्नांचीही दखल घेतली. त्यामुळे शिक्षणासंबंधी ठराव पास करण्यात आला आहे. त्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत् करावे, खेडयातून प्राथमिक शिक्षणाची मर्यादा सातवीपर्यंत वाढवावी,मातृभाषेतून शिक्षण दिले जावे, माध्यमिक शाळा काढण्यासाठी परवानगी घेण्याची गरज असू नये, माध्यमिक शिक्षण हे मातृभाषेतून द्यावे, शिक्षणावर जनतेचे पूर्ण नियंत्रण असावे, खाजगी महाविद्यालये काढण्यास परवानगी द्यावी,धार्मिक व नैतिक शिक्षण देण्याची नसावी, शेतकरी व व्यापारी कॉलेजेस स्थापन करावीत इत्यादी मागण्या होत्या.

या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष आ.कृ.वाघमारे होते,त्यांनी आपल्या भाषणात निजामाच दुटप्पी धोरण स्पष्ट करून कडाडून टीका केली. निजामी राजवट फॅसिस्ट आहे हा विचार त्यांनी मांडला. त्यामुळे प्रतिनिधींना निजाम सरकारच्या लबाड धोरणाची अधिक माहिती मिळाली. ग्रामीण भागात महाराष्ट्र परिषदेच्या शाखा स्थापन करण्याचे ठरले. तसेच हिंदू-मूस्लिम ऐक्य, स्थानिक प्रश्न व ग्रा-हाणी सोडवणे, अस्पृश्यता निवारण, जिल्हा अधिवेशने भरविणे, शिबिर घेणे इ. कार्यक्रम घेण्यात यावेत असे ठरले. येथे महिला संमेलनही घेण्यात आले. त्यांचे अध्यक्षपद पानकुंवर कोटेचा यांना देण्यात आले होते. कारागृहातून सुटलेल्या अठरा नेत्यांचे स्वागत या अधिवेशनात करण्यात आले. या अधिवेशनाचे वैशिष्टये म्हणजे येथून

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal **ISSN 2231 4342**

पुढे ठराव व्यापक बनत गेले. त्यात शेती,शेतक-यांचे प्रश्न, शिक्षण,महिलांचे प्रश्न इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.

महाराष्ट्र परिषदेचे सेलू येथील अधिवेशन-

परिषदेचे पाचवे अधिवेशन सेलू (जि.परभणी) येथे २४,२५,२६ मे १९४५ रोजी घेण्यात आले. हे अधिवेशन बीड येथे होणार होते. त्यासाठी औरंगाबादचे श्री.माणिकचंद पहाडे यांची अध्यक्ष म्हणून तर सरचिटणीस म्हणून गोविंदभाई श्रॉफ यांची निवड करण्यात आली होती. पण निजाम सरकारने त्या दोघांना स्थानबध्द करुन बीडा अधिवेशनास परवानगी नाकारली. त्यामुळे हे अधिवेशन सेलू येथे घ्यावे लागले. या अधिवेशनाचे अध्यक्ष हैदराबादचे श्री.दिगंबरराव बिंदू तर स्वागताध्यक्ष श्री.मुकुंदराव पेडगावकर, स्वागत चिटणीस श्री.विनायकराव चारठाणकर होते. परिषदेचे सरचिटणीस म्हणून श्री.स.कृ.वैशंपयन यांची निवड झाली.

या अधिवेशनाचे उद्घाटन स्वामीजींच्या हस्ते झाले. स्वागताध्यक्ष मुकुंदराव पेडगावकर यांनी तत्कालीन परिस्थितीचा आढावा घेतला. मुकुंदराव पेडगावकरांनी त्यांच्या अस्खलीत वाणीतून ‘‘हैदराबाद सरकार म्हणजे दिल्ली एक्सप्रेरला जोडलेला एक जुनाट व खिळखिळा झालेला डबा होय’’. हा विचार मांडला. हे शब्द सेलूतच नव्हे तर भारतभर निनादले. याशिवाय त्यांनी हैदराबाद संस्थानातील लोकस्वातंत्र्याचा प्रश्न हा भारतीय स्वातंत्र्याच एक भाग आहे हा अत्यंत महत्वाचा मुद्दा मांडून किसान, मजूर,हरिजन, महिला व मातृभाषा माध्यम आदि प्रश्नांबासबत पुरोगामी दृष्टिकोन अत्यंत प्रभावीपणे मांडला. दिगंबरराव बिंदू यांचे अध्यक्षीय भाषण अत्यंत प्रभावी झाले. निजाम सरकारच्या जुलमी कारभारावर त्यांनी टीका केली. जबाबदार राज्यपध्दतीशिवाय दुसरा पर्याय नाही हे प्रतिपादन करुन त्यांनी शेतक-यांवरील अन्यायाचा परामर्श घेतला निजामाच्या एकछत्री प्रशासनावर टीका केली तसेच निजामाने संस्थानात लोकशाही कारभार व जबाबदार राज्यपध्दती सुरु करावी असे सुचवले. निजामाने तर जनतेच्या आकांक्षाचा विचार केला नाही तर जनता आंदोलनाद्वारे आपले सर्वस्व अर्पण करुन आपल्या मागण्या करुन घेण्यास मागेपुढे पाहणार नाही असा इशारा त्यांनी सरकारला दिला. शेतकरी,कष्टकरी व मध्यमवर्ग यांनी या लढयात आपल्या सर्व शक्तीसह सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. या अधिवेशनात स्वामी रामानंद तीर्थ, आ.कृ.वाघमारे , माणिकचंद पहाडे इत्यादी नेत्यांचीही भाषणे झाली. त्यांनी आपल्या भाषणात निजाम सरकारच्या धोरणावर कडक शब्दात टीका केली . याशिवाय मराठी माध्यम, जहागिरीच्या प्रदेशात शेतसारा कमी करणे, लोकसंख्येच्या प्रमाणात हिंदूना नौक-या देणे, विणकरांना माफक दरात सूत देणे इत्यादी मागण्या याठिकाणी मांडणयात आल्या. या अधिवेशनाला दहा हजाराहून अधिक लोक उपस्थित होते या अधिवेशनात स्वामीजी, बाबासाहेब परांजपे, गोविंदभाई श्रॉफ, आ.कृ.वाघमारे,राघवेंद्रराव दिवाण, काशीनाथराव वैद्य, श्रीधर नाईक, लक्ष्मणराव गानू, स.कृ.वैशंपायन, माणिकचंद पहाडे,व्ही.डी.देशपांडे,

 ISSN 2231 4342

भगवानराव गांजवे,नरहरराव अष्टीकर, कॅप्टन जोशी, फलचंद गांधी,विमलचंद गांधी, नरहरराव मालखरे, देविसिंग चव्हाण, नारायणराव लोहारेकर इत्यादी उपस्थित होते

महाराष्ट्र परिषदेचे सहावे लातूर अधिवेशन (मे १९४६)-

१५,१६,१७ मे १९४६ रोजी लातूर येथे महाराष्ट्र परिषदेचे सहावे अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनाचे अध्यक्ष आ.कृ.वाघमोर हे होते. तर चिटणीस श्री.स.कृ.वैशपायन होते. वाघमारे यांचे भाषण अत्यंत जहाल व शासनविरोधी होते त्यांनी आपल्या भाषणात अरब व रोहिले यांच्या जुलमी सावकारशाहीवर प्रखर टीका केली. निजाम सरकार त्यांना पाठिंबा देत असल्याचा आरोप त्यांनी केला. उर्दु माध्यम आणि मुस्लिम राज्य स्थापन करण्याची निजामाची भूमिका हे दोष जनतेसमोर त्यांनी मांडले तसेच 'आझाद हैदराबाद' या कल्पनेवर त्यांनी जोरदार हल्ला केला. येथे वीणकरांचे प्रश्न मांडण्यात आले.

या अधिवेशनात जबाबदार राज्यपध्दतीचा ठराव पास करण्यात आला. तसेच शोषणरहित आर्थिक व्यवस्था व लोकशाही समाजवादी रचना प्रतिपादन करण्यात आली. याशिवाय नागरी स्वातंत्र्य, राजकीय सुधारणा,तिन्ही भाषिक परिषदांचे एकत्रीकरण, विणकरांचे प्रश्न, लेव्ही व अन्नधान्याचा प्रश्न यासंबंधी ठराव करण्यात आले. शोषणरहित समाजव्यवस्थेवर भर देण्यास प्राधान्य देण्यात आले होते. धोरण आणि उद्दिष्टांतील विकास काम अतयंत लक्षणीय असल्याचे दिसते. " तुमच्यातून साताराचे नाना पाटील निर्माण होतील. बंदुका ठासून भरल्या तर भयाची गरज नाही." या अधिवेशनाचे वैशिष्टय म्हणजे यात जहालांचा प्रभाव वाढलेला आढळतो.

लातूर येथे १६, १७ मे १९७६६ रोजी मराठवाडा महिला संमेलनाचे दुसरे अधिवेशन झाले. सौ.पानकुंवर फिरोदिया या अध्यक्ष होत्या सौ.शैलजाताई कुलकर्णी, सौ.ताई दुरुगकर, सौ.उषा भूमकर या स्वागत मंडळातील महिला होत्या. त्यांनी आपल्या भाषणात जबाबदार राज्यपध्दतीवर भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी संघटितपणे व आत्मविश्वासाने सर्व भगिनींनी प्रयत्न करावेत असे सुचविले. मराठवाडयाच्या स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रीयांनीही आपल्या परीने धडपड केलेली आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

लातूर अधिवेशनाचे फलित-

या अधिवेशनामुळे संघटनेत अधिक चैतन्य आले. तालुक्यातून मोठया गावापर्यंत संघटना पोहोचली. दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे कार्यकर्त्यांनी आपले कार्य शिस्तीत पार पाडले. शेतकयांतील मरगळ दूर करण्यासाठी लेव्हीचा प्रश्न होती घेतला गेला. शेतकरी व शेतमजूरांचा मोर्चा हैदराबाद या राजधानीच्या शहरी नेण्याचे ठरले. त्याप्रमाणे फार मोठया संख्येने शेतकरी व विणकर हैदराबादला गेले. राजपथावरुन सरकारविरोधी घोषणा देत मोर्चा फिरला. हा मोर्चा अत्यंत शिस्तबध्द होता. प्रत्येक जथ्याजवळ

 ISSN 2231 4342

आपआपल्या जिल्हयाचा निदर्शक फलक व घोषणा फलक होता. त्यांच्यासह जिल्हा संघटक होते मागण्यांचे निवेदन देण्याच्या शिष्टमंडळात मराठवाडयातील गोविंदभाई श्रॉफ व भाऊसाहेब वैशपालन होते. निर्भयता व अन्यायाचा प्रतिकार करण्याची क्षमता घेऊनच मोर्चात सहभागी झालेले लोक आपआपल्या गावी परत आले. हा मोर्चा संस्थानात निघालेला सर्वात मोठा मोर्चा होता.

संदर्भसूची-

१) भालेराव अनंतराव-हैद्रबाद स्वासंग्राम आणि मराठवाडा स्वा.रा.ति.सं.संस्था

२) मेनन व्ही.पी- ए स्टोरी ऑफ दि इंटिग्रेशन ऑफ इंडिया स्टेट-१९८८

३) भालेराव अनंतराव- पेटलेले दिवस, श्री.विद्या प्रकाशन पुणे-१९८५

४) कुरूंदकर नरहर- हैद्राबादचे विमोचन आणि विसर्जन मराठी साहित्य परिसर, आंध्रप्रदेश-हैद्राबाद-१९८५

५) संपादक परभणी जिल्हा-स्वा.सैनिक समिती-१९९६६

६) डॉ.डेंगळे बी.एस- हैद्रबाद फ्रिडम स्ट्रगल, कल्पना प्रकाशन , नांदेड-१९९८

७) भालेराव अनंतराव ‘‘दैनिक मराठवाड’’ दिवाळी अंक -१९७२, जयहिंद प्रिटिंग प्रेस औरंगाबाद

८) वाजपेयी चंद्रशेख- ‘‘ हैद्राबादचा स्वा.संग्राम आणि गौरव समिती’’ प्रकाशन बीड-१९८५

९) ऑफ गोविंदभाई- ‘‘हैद्राबादचा स्वा.संग्राम एक सिंहावलोकन, दैनिक मराठवाडा दिवाळी अंक १९७२ सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

शोधनिबन्ध: महाराष्ट्रातील काही अप्रकाशित निवडक शिलालेख

नाव: अनिल किसन दुधाने
पत्ता:प्लॉटनं.१६, राजगड अपार्टमेंट, श्रीकृष्ण
कॉलनी, शिवतीर्थ नगर,
काळेवाडी फाटा, थेरगाव, पुणे- ४११०३३
Mob.: ७७९८१८७४७८ / ९७६२३७६४१४
Email: dudhane.anil@gmail.com

काही नविन मराठी शिलालेख

येथे नऊ मराठी शिलालेखांची माहीती दिलेली आहे. हे सर्व शिलालेख अप्रकाशित असून येथे प्रथमच प्रकाशीत होत आहेत. नऊ पैकी पाच लेख हे अहमदनगर जिल्ह्यातील व चार लेख पुणे जिल्ह्यातील आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील लेखांपैकी चार लेख श्रीगोंदा तालुक्यात विहीरींवर कोरलेल आढळले. पहीले पाच लेख हे अठराव्या शतकातील आहेत. सहाव्या लेखाचा काळ निश्चीत नाही तर शेवटचे तीन लेख १९ व्या शतकातील अगदी अलिकडचे आहेत. नऊपैकी पाच लेख विहीरींवर,तीन लेख मंदीरांवर व एक लेख घाटावर कोरलेला आहे.

लेख क्र. १ पुणे - चऱ्होली[१] शिलालेख

हा लेख पुणे शहरातील चऱ्होली परीसरात असलेल्या मंदिरात कोरलेला आहे. सध्या लेखाचा संपूर्ण फोटो घेणे किंवा व्यवस्थित ठसा घेणे शक्य होत नसल्याने जसे जमेल तसे तसे वाचन येथे देत आहे.

लेख पाच ओळींचा व उठावाने कोरलेला आहे.

वाचन:

१. श्री गणेशाय नमः श्रीमत् शालीवाहन शके १६४९ प्लवग नाम सवछरे
२. अस्विन सुध प्रतिपदा तदिनी _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _
३. पुत्र दामाजी खंडेराव _ **कुलकर्णी**
४. मौजे चरोली तर्फ हवेली प्रात पुणे दामाजी पिता व पुत्र रा
५. घो म - घ - यासी खोलेस्वराचे देउल बांधले

पुणे प्रांतातील हवेली तरफेतील मौजे चरोलीचे रहीवासी दामाजी कुलकर्णी व त्याचा मुलगा राघो कुलकर्णी खोलेश्वराचे मंदीर बांधले. मंदीराचे काम अश्विन शुद्ध १ शके १६४९ प्लवंग संवत्सरात झाले. संपूर्ण लेखाचे वाचन शक्य होत नसल्याने लेखाचा अर्थ जसा लागला तसा येथे दिला आहे.

 ISSN 2231 4342

कालोल्लेख[२]**:** अश्विन शुद्ध १ शके १६४९ = ५ सप्टेंबर १७२७ प्लवंग संवत्सर { मंगळवार }.

लेख क्र. २ खडकी पिंपळगाव[३] शिलालेख

हा लेख पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील खडकी पिंपळगाव येथे नदीवर असलेल्या घाटावर कोरलेला आहे. या गावातील दोन शिलालेख तेंडुलकरांनी प्रकाशित केले आहेत. हा लेख मात्र अप्रकाशित आहे.

लेख दोन ओळींचा व उठावाने कोरलेला असून सहज वाचता येण्यासारखा आहे. पहील्या ओळीतल काही अक्षरे नष्ट झाली आहेत.

वाचन:

१. • नो •न व बाबुराव पा॰ वागमारे • • •

२. भाडकी सके १६८० बहुधान नाम सवछर

बाबुराव वागमारे पाटील यानी शके १६८० बहुधान्य संवत्सरात या घाटाचे काम केले.

कालोल्लेख[४] **:**

शके १६८० = ८ एप्रिल १७५८ - २८ मार्च १७५९ बहुधान्य संवत्सर शनिवार बुधवार

पहील्या ओळीतील पहीला शब्द वाचता येत नाही. तेंडुलकरांनी प्रकाशित केलेल्या दोन लेखात अवचितराव बाबुराव पाटील वागमारे असे नाव आले आहे, पण येथे पहीले नाव अवचितराव नाही असे फोटोवरुन सहज कळून येते. यामुळे बाबूराव पाटील वागमारे असे वाचन घेतले आहे.

लेखात एक संक्षेप वापरलेला आहे. पा॰ - पाटील. खडकी नाव भाडकी असे कोरले आहे.

लेख क्र. ३ श्रीगोंदा शिलालेख

हा लेख श्रीगोंदा मांडवगण रस्त्यावर श्रीगोंद्यापासून ५ कि. मी वर असलेल्या विहीरीच्या मुख्य कमानीवर कोरलेला आहे. ही विहीर पवारांच्या मालकीची आहे.

लेख पाच ओळींचा व उठावाने कोरलेला असून सहजपणे वाचता येण्यासारखा आहे.

वाचन:

१. ॥ श्री रामचंद्र चरणी तत्प

२. र सगुणाबाई सीदे नी

३. रंतर शके १६९८ दुर्मुख

१आळंदीजवळचे एक गाव - चऱ्होली ., सध्या पुणे शहराचाच एक भाग.

.2IE VI pg. .257

.4IE VI pg. .320 - 318

४. नाम सवत्सर रान बेलवंडि

५५०००रु .

श्री रामचंद्र चरणी तत्पर असलेल्या सगुणाबाई सीदे यांनी शके १६९८ ईश्वर संवत्सरात बेलवंडी ५००० रु. खर्च करुन ही विहीर बांधली.

कालोल्लेख[५]**:** शके १६९८ = २० मार्च १७७६ - ७ एप्रिल १७७७.

दुर्मुख संवत्सर { बुधवार - सोमवार }

लेखात सर्वात शेवटी विहीरीच्या कामासाठी आलेल्या खर्चाचा आकडा रु. ५००० असा कोरलेला आहे.

लेख क्र. ४ ढोरजे शिलालेख

हा लेख अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोदा तालुक्यातील ढोरजे गावात एका विहीरीवर कोरलेला आहे. लेख विहीरीत उतरताना उजव्या बाजूस उंचावर आहे.

लेख सहा ओळींचा व उठावाने कोरलेला असून काही शब्द वगळता उर्वरीत लेख सहजपणे वाचता येतो.

वाचन :

१. श्री विस्वनाथ चरणि तत्पर
२. देवाजिराम व कासिराम व
३. • • वजिराम जोतिसी कुत्ळ
४. कर्णि मौजे ठोरज ता◌ा • • •
५. • • नीरतर सकु १७०४ शुभ
६. कृत स स्त्र रे मार्गेसीष

श्री विश्वनाथ चरणी तत्पर असलेल्या देवाजीराम, कासिराम व • • वजिराम कुळकर्णी जोतिषी यांनी मार्गशिर्ष शके १७०४ शुभकृत संवत्सरात या विहीरीचे काम चालू / पूर्ण केले.

कालोल्लेख[६]**:** येथे तिथी, पक्ष व वार कोरलेले नसल्याने किंवा बुजला गेल्याने वाचता येत नाही.
मार्गशिर्ष शके १७०४ = ५ डिसेंबर १७८२ - ३ जानेवारी १७८३ शुभकृत संवत्सर { गुरुवार शुक्रवार }.

लेख क्र. ५ भानगाव शिलालेख

हा लेख अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालूक्यातील भानगाव येथिल विहीरीत उतरताना डावीकडे कोरलेला आहे. शेजारीच महादेवाचे मंदिर आहे.

लेख सहा ओळींचा व उठावाने कोरलेला असून सहजपणे वाचता येतो. पहील्या ओळीत श्री च्या डाव्या उजव्या बाजूस सूर्य व चंद्र कोरलेले आहेत. पहीली ओळ वगळता इतर सर्व ओळींच्या सुरवातीस दोन उभे दंड कोरलेले आहेत.

वाचन :

१. श्री
२. ॥ श्री ज्योतिस्वरुप चरणि
३. ॥ तत्पर भागिरथिबाई सि
४. ॥ दे निरंतर शके १७०९
५. ॥ प्लवंगनाम सवत्सर आ
६. ॥ श्वीन शुध प्रतिपदाः

श्री ज्योतिस्वरुप चरणी तत्पर असलेल्या भागिरथिबाई सीदे यांनी अश्विन शुद्ध १ शके १७०९ प्लवंग संवत्सरात या विहीरीचे काम चालू / पूर्ण केले बांधली.

कालोल्लेख[७]: अश्विन शुद्ध १ शके १७०९ = १२ ऑक्टोबर १७८७ प्लवंग संवत्सर { शुक्रवार }.

लेखाची सूरवात श्री ज्योतिस्वरुप चरणि तत्पर अशी वेगळ्या पद्धतीने केलेली आहे.

लेख क्र. ६ देउळगाव शिलालेख

हा लेख श्रीगोदा मांडवगण रस्त्यावर श्रीगोंद्‌यापासून १५ कि. मी. वर असलेल्या देउळगाव येथे एका पायविहीरीवर कोरलेला आहे. शेजारी महादेवाचे मंदिर आहे.

---

5. IE VI pg. 354 - 356.

6. IE VI pg. 367 - 368.

7. IE VI pg. 377

लेख पाच ओळींचा व उठावाने कोरलेला असून सहजपणे वाचता येतो.

वाचन :
२ श्री जोतिस्चरणि
३ तत्पर राणोजि सु
४ त दमाजी सीदे स
५ के १७•• शावरि ना
६ म सवछरेः॥

श्री जोतिचरणी तत्पर असलेल्या दमाजी राणोजी सीदे यांनी शके १७•• शार्वरी संवत्सरात या विहीरीचे काम चालू / पूर्ण केले.

कालोल्लेख[८]: येथे शकांकाचे शेवटचे दोन अंक वाचता येत नसल्याने वर नक्की सांगता येत नाही. पण या काळात शके १७०२ व १७६२ ला शार्वरी संवत्सर होता. येथे दोन्ही दिनांक देत आहे.

शके १७०२ = ५ एप्रिल १७८० - २४ मार्च १७८१ शार्वरी संवत्सर { बुधवार शनिवार }.

शके १७६२ शके १७६२ = ३ एप्रिल १८४० - २३ मार्च १८४१ शार्वरी संवत्सर { शुक्रवार मंगळवार }.

या लेखाची सुरवातही श्री जोतिस्चरणी तत्पर अशी केलेली आहे.

लेख क्र. ७ नारायणगाव शिलालेख

हा लेख पुणे जिल्ह्या तील जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथे आहे. गावातील हरीबाबा समाधी मंदीराला लागून एक छोटे शिवमंदीर आहे. हा लेख याच शिवमंदीरात कोरलेला आहे. लेख बराचसा झिजलेला आहे.

लेख चार ओळींचा व खोदीव अक्षरांचा असून सहजपणे वाचता येतो.

वाचन:

१. श्री सीधेश्वराचे दे

२. श्रावण शु॥ १ शके १८१६

३. सेवक मनाजी विठो

४. बा सीपी खीरसागर

सिद्धेश्वराचा सेवक मनाजी विठोबा सीपी (शिंपी) खीरसागर (क्षीरसागर) याने श्रावण शुद्ध १ शके १८१६ रोजी मंदीर बांधले / मंदीराचे काही काम केले.

कालोल्लेख[९]: श्रावण शुद्ध १ शके १८१६ = २ ऑगस्ट १८९४ { जय संवत्सर गुरुवार }

एक संक्षेपाचा वापर दे - देउळ. सीपी - शिंपी. खीरसागर - क्षीरसागर.

लेख क्र. ८ पाबळ शिलालेख

हा लेख अहमदनगर जिल्ह्यातील तालुक्यातील पाबळ गावात असलेल्या महादेवाच्या मंदीराच्या गाभाऱ्याच्या वरच्या बाजूस कोरलेला आहे.

लेख तीन ओळींचा व खोदीव व स्पष्ट अक्षरांचा असून सहज वाचता येत

वाचन :

१ श्री

२ शके १८१६

३ चैत्र शुद्ध १

चैत्र शुद्ध १ शके १८१६ रोजी हे मंदीर बांधले असावे किंवा मंदीराचे काही काम केले असावे.

कालोल्लेख[१०]: चैत्र शुद्ध १ शके १८१६ = ७ एप्रिल १८९४ { जय संवत्सर शनिवार गुढी पाडवा }

लेख क्र. ९ कुंभारवळण शिलालेख

हा लेख पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील कुंभारवळण गावापासून थोड्या अंतरावरील शेतात असलेल्या विहीरीच्या मुख्य कमानीवर कोरलेला आहे. ही विहीर शिंप्याची विहीर म्हणून ओळखली जाते.

ISSN 2231 4342

लेख दहा ओळींचा व खोदीव अक्षरांचा असून सहजपणे वाचता येतो. पहील्या ओळीत श्री च्या डाव्या व उजव्या बाजूस चंद्र व सूर्य

---

8. IE VI 362 - 364 (for shake 1702) & AIE 82 - 84 (for shake 1762).

9. AIE pg. 191

10. AIE pg. 190

कोरलेले आहेत. प्रत्येक ओळीच्या सुरवातीस व शेवटी दोन उभे दंड कोरलेले आहेत.


वाचन :

२. ॥ श्री ॥
३. ॥ ही बारव शके १८१७ मन्मथ ॥
४. ॥ नाम संवत्सरे मार्गशिर्ष शुद्ध ५ ॥
५. ॥ तिर्थरुप रा. मारुती आड शिंपी ॥
६. ॥ सासवडकर व तिर्थरुप सौ. मातोश्री ॥
७. ॥ गयाबाई यांचे स्मरणार्थ बांधणार ॥
८. ॥ पुरुषोत्तम मारुती सबइंजिनिअर ॥
९. ॥ वामन मारुती • • द पा • व
१०. ॥ गणपत मारुती दं • ळे शिंपी ॥
११. ॥ २२-११-९५ ॥


पुरुशोत्तम मारुती यानी वडील मारुती आड शिंपी सासवडकर व आई गयाबाई यांचे स्मरणार्थ मार्गशिर्ष शुद्ध ५ शके १८१७ मन्मथ संवत्सर (२२/११/९५) या दिवशी विहीरीचे काम चालू / पूर्ण केले.

आठव्या व नवव्या ओळीत काही नावे कोरलेली आहेत पण त्याचे नक्की वाचन सांगता येत नाही.

कालोल्लेख[११] : मार्गशिर्ष शुद्ध 5 शके १८१७ = २२ नोव्हेंबर १८९५ मन्मथ संवत्सर { शनिवार }.


१.


२.


३.



४.


ISSN 2231 4342


५.



६.

11. *AIE pg. 193*


७.



८.


९.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांचे जनक -डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे

प्रा. डॉ. सोनवणे राजाराम रामदास
(सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख)
ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालय राजूर
ता अकोले, जि अहमदनगर
Email- sonawanerajaram123@gmail.com
Mob. No. 9767333391

राहुरी या खेड्यात 20 डिसेंबर 1914 रोजी सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे पाटील यांचा जन्म झाला. वयाच्या सातव्या वर्षापासून त्यांनी शिक्षणास प्रारंभ केला. त्यांचे शिक्षण इयत्ता चौथी पर्यंत झाले. कुटुंबात कोणाचा आदर्श नव्हता त्यामुळे येथेच शिक्षण बंद झाले. शिक्षण अर्धवट सुटल्यामुळे त्यांनी शेती व्यवसायावर भर दिला. त्यांच्यावर महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आदर्शाचा प्रभाव होता. राजर्षी शाहू महाराजांनी समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याच्या हेतूने समाजाचे नेतृत्व स्वीकारले हा प्रभाव डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे यांच्या वर पडलेला दिसतो. अहमदनगर जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीच्या प्रभावामुळे समाज सुधारणा विचारांचे वारे ग्रामीण भागात पसरले. जर आपणास एक नवा क्रांती दर्शन मार्ग अनुसरावयाचा असेल तर आपण उत्तम संघटन करून शिक्षण संस्था उभ्या कराव्यात. सहकारी चळवळीचा विकास करावा या भावनेने त्यांनी एक नवा दृष्टिकोन स्वीकारून कामास सुरुवात केली व ते आयुष्यभर प्रबोधन कार्य करत राहिले. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे समर्थक होते. त्यांनी सहकार चळवळ भक्कम करण्यासाठी डॉ. बाबुरावांना मार्गदर्शन केलेत्यामुळे त्यांचा उत्साह वाढू शकला.

स्वातंत्र्यलढ्यात उडी घेण्यापूर्वीच 1941 मध्ये त्यांनी सामाजिक कार्यास प्रारंभ केला.1941 मध्ये ते राहुरी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत उभे राहिले व प्रचंड मतांनी विजयी झाले पुढे ते सरपंच झाले हे सरपंचपद त्यांना फार काळ लाभले नाही कारण त्यांनी 1942 च्या चले जाव चळवळीत भाग घेतला म्हणून इंग्रज सरकारने त्यांना सहा महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा दिली. ती त्यांनी पुणे येथील येरवडा कारागृहात पूर्ण केली. समाज कार्यातून राजकारण हे त्यांचे जीवन सूत्र होते.

1948 मध्ये जिल्हा लोकल बोर्डावर लोकांनी त्यांना निवडून दिले. पुढे त्यांनी 1960 मध्ये अहमदनगर जिल्हा सहकारी बँक स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली ते बँकेचे संस्थापक संचालक बनले या बँकेचा उपयोग त्यांनी सर्वसामान्य लोकांना उभे करण्याकरिता केला.1960 मध्ये शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून तालुक्याचा शैक्षणिक विकास साधला.1962 मध्ये ते राहुरीचे आमदार म्हणून विधानसभेत निवडून गेले. सतत दहा वर्षे त्यांनी राहुरी तालुक्याचे प्रतिनिधित्व केले. स्वातंत्र्यपूर्व काळातील

मूल्यांचा त्यांच्या राजकारणावर प्रभाव होता. त्यामुळे त्यांनी राजकारण न करता समाजसेवेचे राजकारण ते करत असत.

प्रवरा सहकारी साखर कारखान्याची स्थापना झाल्यानंतर नगर जिल्ह्यात व महाराष्ट्रात सहकारी तत्त्वावर साखर कारखाने सुरू करण्याच्या प्रयत्नांनी मूळ धरले त्यातूनच कोपरगाव सहकारी साखर कारखाना उभा राहिला. डॉ. बाबुराव कुशल संघटक होते त्यांनी राहुरी तालुक्यातील कार्यकर्त्यांना एकत्र करून राहुरी सहकारी साखर कारखान्यासाठी परवाना मिळविला आणि 19 ऑक्टोबर 1957 रोजी मोठ्या जिद्दीने पहिला गळीत हंगाम सुरू केला. त्यांच्या नेतृत्वाखाली राहुरी सहकारी साखर कारखान्याने त्याकाळी राज्यात चांगला नावलौकिक संपादन केला होता. सहकारी चळवळ हे जनसामान्यांच्या विकासाचे फार प्रभावी साधन आहे याची जाणीव त्यांना होती त्यामुळे राहुरी तालुक्यात त्यांनी सहकारी संस्थांचे जाळे उभे केले. उदा.- राहुरी सहकारी जिनिंग प्रेसिंग संस्था व सूत गिरणी सुरू केली ती यशस्वीपणे चालविली. खाजगी व्यापाऱ्यांकडून कापूस उत्पादक शेतकऱ्यांची होणारी अडवणूक थांबविली.

1966 मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघाचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर शेतकऱ्यांची प्रगती या एकाच ध्येयासाठी ते झटत राहिले. सहकारी चळवळ हा विकासाचा मूलमंत्र आहे आणि सहकारी साखर कारखानदारी विकासाची कामधेनू आहे ही खूणगाठ मनाशी बांधून त्यांनी राज्यात सहकारी साखर कारखानदारीच्या वाढीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले त्यांच्या प्रयत्नातूनच अहमदनगर जिल्ह्यासह महाराष्ट्रात सहकारी साखर कारखानदारी बाळसे धरू लागली होती.

राहुरी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर उद्योग-धंद्याबरोबरच शेती सिंचनाखाली आणावयाची असे धोरण सरकारने स्वीकारले होते. शेती व शेतकरी सुखी व्हावा या हेतूने धरणे निर्माण झाली. सरकारच्या या धोरणानुसार डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे यांच्या प्रयत्नातून मुळा नदीवर मुळा धरण प्रकल्पास सन 1957 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली. मुळा नदीवर राहुरी तालुक्यात बारागाव नांदूर येथे 26 टीएमसी चे धरण बांधण्यात आले. त्यामुळे राहुरी तालुक्या बरोबरच नेवासा, शेवगाव, पाथर्डी या तालुक्यांना ही या धरणाचा लाभ झाला. त्यामुळे वरील तालुक्यातील क्षेत्र सिंचनाखाली आले. मुळा धरणामुळे जवळ जवळ 80810 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले. राहुरी तालुक्याचा विचार केला तर 27407हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे यांच्या प्रदीर्घ परिश्रमाचे हे फळ होय. शेतीला पुरेशी सिंचन सुविधा लाभल्यामुळे राहुरी तालुक्यात हरितक्रांती शक्य झाली. आज तालुक्यात शेतकरी कांदा, टोमॅटो, कापूस ही व्यापारी पिके घेऊ लागली आहेत.

अण्णासाहेब शिंदे केंद्र सरकारमध्ये अन्न व शेती खात्याचे राज्यमंत्री असताना त्यांनी परदेशात अनेक वाऱ्या केल्या. परदेशातील शेती विषयक सुधारणा पाहिल्या या सुधारणा आपल्या देशात करता येतील का म्हणून त्यांनी प्रयत्न सुरू केले. महाराष्ट्रात सहकारी चळवळीमुळे ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला होता. शिक्षण घ्यावयाचे ते नोकरीसाठी असे संकेत असायचे, भविष्यकाळात अशा पांढरपेशी नोकऱ्या मिळतील याची शाश्वती नव्हती म्हणून ग्रामीण तरुणाचे शेतीशी जन्मजात संबंध आहेत त्यांना नवीन शेती तंत्रज्ञानाची जाण यावी यासाठी शेतीमध्ये नवे संशोधन करणारी संस्थामहाराष्ट्रात असावी असे अण्णासाहेबांना

ISSN 2231 4342

वाटत होते त्या दृष्टीने हा विचार त्यांनी महाराष्ट्र सरकार पुढे मांडला व शेती संशोधनासाठी महाराष्ट्रात एक कृषी विद्यापीठ सुरू करावयाचे हे निश्चित झाले.

यावेळी डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे हे राहुरीचे आमदार होते. त्यामुळे शासनाचा हा निर्णय त्यांना समजला म्हणण्यापेक्षा निर्णय घेणार्यांपैकी ते एक होते. असे संशोधन केंद्र आपल्या जवळ असावे असे त्यांना वाटत होते. असे केंद्र जवळ असल्यामुळे परिसरातील शेतकरी ते पाहून आपल्या शेतीमध्ये सुधारणा करतील व परिसर समृद्धीकडे वाटचाल करील अशी त्यांची भावना होती. हे विद्यापीठ आपल्याकडे व्हावे असे महाराष्ट्रातील अनेक नेत्यांना वाटत होते.त्याप्रमाणे ही मंडळी प्रयत्नालाही लागली होती. परंतु विद्यापीठ काढताना काही नियम होते. विद्यापीठास बारामाही पाणीपुरवठ्याची सोय असावी, त्या ठिकाणी सर्व प्रकारच्या म्हणजे भारी, हलकी, चोपण, माळरान अशा प्रकारच्या जमिनी असाव्यात. राज्याचा मुख्य रस्ता जवळ असावा. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे या जमिनी शेतकऱ्यांनी सरकारला देण्याची तयारी दर्शविली पाहिजे. वरील नैसर्गिक परिस्थितीची पूर्तता करता येत नाही म्हणून बऱ्याच नेत्यांच्या अशा मावळल्या तरीसुद्धा काहींचा आग्रह होताच.

या आग्रही नेत्यांना डावलण्यासाठी त्यांनी ताबडतोब कृषी विद्यापीठाचा प्रकल्प आराखडा तयार करून तो केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला. केंद्रीय कृषी व अन्य खात्याचे राज्य मंत्री अण्णासाहेब शिंदे यांचे मार्गदर्शन व सल्ल्याने डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे यांनी प्रकल्पाचा नेटाने पाठपुरावा केला ते मुळातच कुशल संघटक असल्याने या प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी जिल्ह्यातील सर्व आमदार खासदार यांची एकजूट त्यांनी घडवून आणली. तेव्हाचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक, मंत्री बाळासाहेब देसाई, मधुकरराव चौधरी यांच्याकडे जिल्ह्यातील सर्व आमदारांनी राहुरी येथे कृषी विद्यापीठ स्थापनेची एकमुखी मागणी केली कारण विद्यापीठासाठी आवश्यक असलेले वरील सर्व घटक येथे उपलब्ध होते. या मागणीची तीव्रता कमी होऊ नये यासाठी ते सातत्याने दक्ष राहिले.

राहुरी येथे कृषी विद्यापीठाच्या स्थापनेची एकमुखी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली शेवटी राहुरीला कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची महाराष्ट्र सरकारची घोषणा झाली.1969 साली समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावाने विद्यापीठ स्थापन झाले.

राहुरी येथे विद्यापीठ मंजूर होण्याच्या अवस्थेत असतानाच महाराष्ट्रातील मराठवाडा, कोकण, विदर्भ या विभागांमधूनही प्रत्येक विभागास स्वतंत्र कृषी विद्यापीठ या मागणीने जोर धरला. राहुरी कृषी विद्यापीठ तर झालेच परंतु त्याचबरोबर जनमताच्या मागणीचा आदर करून प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठीमहाराष्ट्र सरकारने दापोली येथे कोकण कृषी विद्यापीठ, परभणी येथे मराठवाडा कृषी विद्यापीठ तरविदर्भातील अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ या आणखी तीन विद्यापीठांनाही मान्यता दिली. महाराष्ट्राच्या चारही विभागात कृषी विद्यापीठे स्थापन करण्याचा निर्णय सरकारला घ्यावा लागला याचे श्रेय डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे पाटील यांनाच द्यावे लागेल. म्हणून एका अर्थाने ते महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांचे जनकच आहेत. महाराष्ट्रात जीचार कृषी विद्यापीठे निर्माण झाली ती विद्यापीठे म्हणजे तनपुरे पाटलांच्या कर्तबगारीचा कळसच होय.

कृषी विद्यापीठामुळे महाराष्ट्राचा चेहरामोहराच बदलून गेला. ही विद्यापीठे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने साक्षात कृषी पंढरीच ठरली आहेत. कृषी विद्यापीठातील शिक्षण व संशोधन तेथील कुंपणात बंद न राहता प्रत्यक्ष शेतीवर त्याचे उपयोजन झालेले अनेक ठिकाणी दिसते त्यामुळे शेतीतील उत्पादनात प्रचंड वाढ झाली आहे.आजशेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करू लागले आहेत. त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढले आहे. महाराष्ट्र राज्य कृषी उत्पादनात देशात अग्रेसर बनले आहे यावरून डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे यांचा कृषी विद्यापीठाचा आग्रह किती सार्थ होता हे लक्षात येते. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ म्हणजे त्यांच्या कर्तबगारीचा कळस होय त्यांनी केलेल्या विविध कार्यापैकी हे एक चिरंतन स्वरूपाचे विकास कार्य होय. त्यांनी केलेल्या सामाजिक, शैक्षणिक व सहकाराच्या क्षेत्रातील महत्त्वाच्या नेत्रदीपक कार्याबद्दल राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाने "डॉक्टरऑफ सायन्स" ही पदवी देऊन सन्मानित केले आहे. या कृषी विद्यापीठांची प्रमुख उद्दिष्टे ठरविण्यात आली. शेती व शेतीच्या अनुषंगिक विषयाचे शिक्षण देणे, शेती व अनुषंगीक तत्सम विषय यावर संशोधन करणे आणि विस्तार कार्यकर्ते, अधिकारी, शेतकरी यांना प्रशिक्षण देणे जेणेकरून कृषी उत्पादनात वाढ व्हावी ही उद्दिष्टे लक्षात घेऊन विद्यापीठांनी आतापर्यंत वाटचाल चालविली आहे.

संदर्भ:-

1. जाधव गंगाधर "स्वयंभू", वर्षा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती 2003
2. थोरात भाऊसाहेब "महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांचे शिल्पकार", लेख, लोकसत्ता 20 जून 1998,पृष्ठ 5
3. पुरी सुभाष "शेतकऱ्यांची कृषी पंढरी- महात्मा फुले कृषी विद्यापीठ", लेख, साप्ताहिक संगम संस्कृती, आनंद प्रिंटर्स, संगमनेर, जुलै 2004,पृष्ठ 23
4. कृषीदर्शनी,2004,महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, जिल्हा अहमदनगर
5. सय्यद मुख्तार संपादक,"कै. डॉ. बाबुराव बापुजी तनपुरे गौरवग्रंथ", जून 1998

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

थोर समाजसुधारक बळीराम पाटील यांचे कार्य

प्रा. डॉ. दत्ता उध्दव जाधव
इतिहास विभाग प्रमुख
श्री रेणुका देवी महाविद्यालय, माहुर, जि. नांदेड.
jadhavdu24@gmail.com 7499968363

बळीराम पाटील यांचा जन्म १८९८ ला त्यांच्या पूर्वजाचे मूळगाव महाळुंगी या गावात झाला होता. महाळुंगी हे गाव तालुका आर्णी जिल्हा यवतमाळ मध्ये येते. त्याचे मूळ उपनाव राठोड आहे मांडवीच्या पाटीलकीचे अधिकार मिळाल्यामुळे ते पाटील नावाने ओळखले जाऊ लागले. बळीराम पाटलांचे वडील हिरामण राठोड यांना मांडवी गावाचा ईजारा मिळाल्याने त्याने ते गाव सोडले आणि मांडवी तालुका किनवट जिल्हा नांदेड या गावी येऊन स्थायिक झाले. नंतर बळीराम पाटलाने मांडवी गावची रचना शास्त्राला धरून त्याकाळात केली होती. हिरामन राठोड यांना वाटत होते की आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून वयाच्या सातव्या वर्षी बळीराम पाटील यांना शाळेत दाखल केले होते. व त्यांचे प्राथमिक शिक्षण चौथी पर्यंत झाले. बळीराम पाटील यांचे लग्न अंबाडीगावच्या चिमणनाईक याची कन्या द्रोपदाबाई सोबत झाले होते. या दांपत्याला पुत्र उत्तम राठोड, उल्हास राठोड, प्रकाश राठोड, अशोक राठोड, अनिल राठोडहे पाच मुले होते. आणि यमुनाताई, सुमनताई, मीनाताई या तीन मुली होत्या.

बळीराम पाटलांनी सामाजिक कार्य हे तीन प्रकारे करण्याचे ठरवले होते.

१. सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणले पाहिजे.
२. सर्व धर्माच्या व सर्वजातीच्या लोकासी प्रेमाने राहिले पाहिजे.
३. बंजारा समाजातील स्त्रियांच्या पोषाखात बदल घडवून आणले पाहिजे.

बळीराम पाटील यांनी बंजारासमाजात शैक्षणिक गोडी निर्माण केली. या राठोड घराण्याने केलेल्या सामाजिक परिवर्तन बंजारा समाजानी त्याकाळात स्विकारले नाही. या समाजात जे सुशिक्षित झाले. ही राठोडकरण्याची देणगी आहे. या अतिदुर्गम, आदिवासी आणि डोंगराळ परिसरातील बंजारा समाजात उच्च शिक्षित व साहित्य निर्मिती केली. ते सर्वत्या काळातील या घराण्याची पुण्याई आहे. भारतात पहिले असे बंजारा समाजातील प्रांजल व परिवर्तनवादी बळीराम पाटीलाचे घराणे होते. त्याच्या परिवर्तनवादी विचार समाजाने स्वीकारले पाहिजे होते, त्यांनी कर्मकांडाला महत्त्व दिले नाही. तेरवी सारख्या कार्यक्रमात बंजारासमाजात अगाऊ खर्च केला जातो. बळीराम पाटलांनी ती प्रथा बंद करायला लावली. आणि त्यांनी प्रत्यक्ष आपल्या घरातील कोणत्याही व्यक्तीची मृत्यू झाल्यानंतर तेरवी सारखे अन्नदानाचे कार्यक्रम करू नये असे सांगितले. व त्याघराण्यात आजही कोणाचेही तेरवीचा कार्यक्रम

ISSN 2231 4342

करीत नाही. त्यांचा हा प्रयोग बंजारा समाज त्याकाळात स्वीकारला असता, तर आज समाज फार प्रगत राहिला असता. पण ते सोडून बंजारा समाज फालतू इतर व्यसनात रमून गेला. त्या काळात त्या चांगल्या परिवर्तनवादी विचारांमुळे त्रास बळी राम पाटलांना सोसावा लागला. त्या काळात त्यांनी बंजारा समाजाची जुन्या रूढी, प्रथा बंद केली. जसे स्त्रियांच्या पेरावा मध्ये बदल केला. त्यांनी तो बदलण्यासाठी सामाजिक सुधारणा चळवळ चालविली. त्या काळात त्या परिवर्तनाला समोर जाणे आवश्यक होते. बळी राम पाटील यांनी असे नाही सांगितले की, तुम्ही हा पोशाख पूर्णपणे त्याग केला पाहिजे. त्यांनी सांगितले होते की, यात बदल झाला पाहिजे. यात सुधारणा झाली पाहिजे. त्या काळात भारतात ब्रिटिश सरकारच्या काळात परिवर्तनाची लाट चालू होती. आणि या तबदल झाले पाहिजे असे वाटत होते. हे बंजारा समाजा साठी हितकारक होते. बळी राम पाटील यांनी गोर बंजारा समाजाचा इतिहास हे पुस्तक १९३५ला लिहिले होते. बळी राम पाटीलांच्या इतिहासलेखनात हडप्पा संस्कृतीचा उल्लेख आला नाही. याचे कारण होते, त्या काळात या संस्कृतीचा उत्खनन झाले नव्हते. आणि इतिहासात लिखित स्वरूपात ते अजूनही उपलब्ध झाले नव्हते. म्हणून त्यांनी गोर बंजाराचा इतिहास राजपूत क्षत्रिया पासून सुरुवात केले. या काळात बंजारा समाजाची धारणा अशी होती की, आम्ही राजपूत क्षत्रिय राजपूत वंशज आहोत. नंतर या सिंधू संस्कृतीच्या उत्खनन झाल्यानंतर बंजारा समाज हा सिंधू संस्कृतीचा निर्माताआहे. हे लिहिले गेले. जगातील पहिली भाषा प्राकृत ही बंजारा समाजाचे होती. निजाम स्टेट मध्ये बंजारा गोर भाषा बोलली जात होती.

बळी राम पाटील यांच्या मोठा मुलगा उत्तम राठोड हे बंजारा समाजाचे पहिले खासदार होते. हिगोली लोकसभा मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले होते. साहेबांच्या काळ फार वेगळा होता. उत्तम राठोडाचे आम्ही त्याकाळात प्रचार करत असताना स्वतःच्या घरची भाकरी बांधून घेऊन जात होतो. आणि निस्वार्थ प्रचार करीत होतो. उत्तम राठोड यांचे चारित्र्य असे होते की, त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचे डाग नव्हते. निस्वार्थी व्यक्तिमत्व होते. आणि आजतो काळ राहिला नाही. लोकही तसे राहिले नाही. राठोड घरण्यासारखे निस्वार्थी घरानेच आता उरले नाही. उत्तम राठोडाचे लोकां सोबत संपर्क चांगला होता. सर्व जाती धर्मातील लोकांत मिसळून मिळून राहत होते. त्यांच्या घराण्यातील प्रफुल राठोड यांचे लोकां सोबत त्याच्या सारखा चांगला संपर्क आहे. तसेच त्यांच्या पत्नी सौ संध्या ताई या लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी भाजप या राजकीय पक्षातून कार्यकरीत आहे. असे बंजारा समाजाचे प्रसिद्ध साहित्यिक भिमणी पुत्र मोहन नाईक यांनी आपल्या मुलाखतीत सांगितले आहे.

बळी राम पाटील बंजारा समाजातील पहिले इतिहासकार, पहिलेप रिवर्तनवादी, पहिले धोरणात्मक निर्णय घेणारे, पहिले समाज सुधारक. होते. असे दुसरे सुधारक बंजारा समाजात झाले नाही. त्यांना अनेक लोकांनी प्रत्यक्ष पाहिले होते. त्यांच्या काखेत नेहमीच पुस्तक असायच्या. किर्लोस्करांचे मासिक सततत्याच्या जवळअसायची. त्यांना वाचनाची फार आवड होती. तसेच सगळ्याना नेहमी वाचत राहण्यासाठी सांगत होते. काही पुस्तक वाचण्यासाठी त्यांनी बोर्डिंग मधील वस्तीगृहात असलेल्या मुलांना देत होते. त्यांनी वस्ती गृहाच्या मुलासोबत येऊन बसत होते. त्यांनी या मुला कडून काही पुस्तक वाचून घेत होते. त्यांच्या या माध्यमातून या मुलांची परीक्षा

 ISSN 2231 4342

घेत असत. यांना वाचता येते की, नाही? त्या काळात कापूस वेचणी साठी मजूर लावत होते. आणि ते वेचून कापसाला एका कापडात बांधून शेतातून आणत होते. त्यांना बंजारा समाजात गठडी म्हणत होते. त्या मजुरांना किलो प्रमाणे मजुरीचे दर देण्यात येत होते. ती कापसाची गठडी मोजण्यासाठी वस्तिगृहातील मुलांना बोलवत होते. त्यांचा अर्थ असा होता की मुलांना गणितातील आकड्याच्या ज्ञान आहे का हे तपासायचे. त्या काळात पावकि, निमकी, पाऊनकी, असे गणिताचे आकडे होते. आणि मुलांना येते की, नाही. हे या माध्यमातून तपासत होते. ते त्याकाळात यामाध्यमातून मुलाची त्यांनी अशा प्रकारच्या चाचण्या घेत होते. म्हणजेच त्याकाळात बळी राम पाटलाची मनापासून इच्छा होती की, समाजातील मुले सुधारले पाहिजे. मोठे झाले पाहिजे. ही प्रांजळ इच्छा होती. आज तसे लोक राहिले नाहीत. मनातून करणारे, कृतीत उतरवणारे हे घराणे होते. आज चे कार्यकर्ते तकलादू झाले आहे. बळी राम पाटीलस काळी पूर्ण मांडवी गाव आपल्या काखेत फटका घालून फिरत होते. कोणाच्या काही समस्या आहेत काय? हे जाणून घेत होते. त्या काळात अनेक विरोधक होते. यात पणीनायकणपापलवाडी , गेम सिंग नाईक पालाई गुडा. यांच्या परिवर्तनाला विरोध होता. पोहरा देवी येथील महाराज लोकांनी ही बळी राम पाटलाला विरोध केला होता. पालाईगुडा येथे एक मेळावा भरवून त्यांना त्याकाळात तव्यावर जेवण खायला सांगितले होते. असे करणे म्हणजे, त्याकाळात समाजाचा बाहेर बहिष्कृत करणे होते. त्यात बळी राम पाटलांना काही सहकार्य करणारे लोकही होते. पण त्याची फार कमी संख्या होती. राम नाईक हे चांगले सहकार्य करणारे होते. तसेच दहेली येथील हेम सिंग नाईकांनी समर्थन केले होते. त्याकाळात त्यांच्याकडून जे शिकले ते आजही प्रगतशील आहे. त्यांच्या कडून शेती कसे करायचे हे सुद्धा काही लोकांनी शिकले होते . त्या काळात शेती लोक कसे करतात ते पाहायला लोकांच्या शेतात बळी राम पाटील स्वतः जात होते. पेरणीच्या तास तो सरळ काढतो की नाही? हे बारकाईने बघत होते. त्या काळात एखाद्या विद्यार्थी चांगला भाषण किंवा कुठल्याही स्पर्धामध्ये प्रथम आला तर त्यांना बोलावून त्यांचा सत्कार बळी राम पाटील करीत होते. अशाच एका स्पर्धेत प्रथम आल्यामुळे मोहन नाईक ला बळी राम पाटला ने बक्षीस दिले होते. त्यावेळेस त्यांना खाकी ड्रेस म्हणून बक्षीस स्वरूपात दिले होते. दर आठवड्यात वस्ती गृहात शनिवारला भाषणाची स्पर्धा ठेवली जात असे. मुलांना बोलता येते की नाही, याची चाचणी घेत असे. आणि जे चांगले बोलत असे त्यांना बक्षीसपण देत होते. मुलांचे कपडे फाटले तर त्याला शिवून घेण्यासाठी पैसे देत होते. मुलांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे अशी त्यांची मनातून तळमळ होती. पण लोकांच्या त्याकाळात लक्षात आले नाही. त्यांना समजून घेतले नाही. त्या काळात मांडवी या ठिकाणी सर्वोदय नावाचे बोर्डिंग वस्तीगृह त्यांनी काढले होते. यावस्तीगृहामध्ये सर्वजाती – धर्माचेमुले राहत होती. यात येथील काही मुस्लीम मुलेही होती. तसेच मोहन नाईक म्हणतो की माझ्या साहित्य लेखनाला जीमातीची सुगंध आहे, ती त्यांची देणगी आहे. त्या काळात बंजारा समाजाचा तोपरीस होता. परीसच्या संपर्कात लोखंड आले तर ते सोने होते. त्याचप्रमाणे जेही त्याकाळात बळी राम पाटील यांच्या संपर्कात आले ते सर्वप्र गत झाले.

बळी राम पाटील यांच्या दूसरा मुलगा प्रकाश पाटील तर बिना सत्तेचा दरबार होता. कुठलाही न्याय निवाडा तो करीत होता. त्याकाळात समाजचे सर्वांगीण विकास केला होता. त्यांनी संपत्ती सोबत समाजात नावही कमावले

 ISSN 2231 4342

होते. प्रकाश पाटलाचे घर त्या काळामध्ये लोकन्यायालय होते. गोरगरिबांना न्याय देण्यासाठी प्रकाश पाटील स्वतः त्या वेळेस आपल्या घरीच लोकन्यायालय भरवीत असे. आणि लोक सुद्धा त्या न्यायालयामध्ये जात होते. हे बिना सरकारी प्रायव्हेट न्यायालय होते. लोक सरकारी न्यायालयात जाण्यासाठी घाबरत होते. काही तर तिथे फार वेळ लागतो, म्हणून तिकडे जाण्यापेक्षा प्रकाश पाटलाच्या न्यायाला जात होते. त्या ठिकाणी निस्वार्थीपणे तडकाफडकी न्यायमिळत होता. म्हणून प्रकाश पाटील हा त्याकाळातील न्यायाधीश होता. आणि त्यांनी आपल्या बिना पगारी न्यायधीशाची भूमिका बजावीत होते..

बळी राम पाटील इतर समाजात जन्माला आले असते तर आज त्यांची फार मोठी व्यक्ती म्हणून ओळखले गेले असते. बंजारा समाज बळी राम पाटील यांच्या कार्याला समजून घेतले नाही. आता असा व्यक्ति मिळणे शक्य नाही. मुलीच्या शिक्षणासाठी त्यांनी मनातून प्रयत्न केले होते. बळी राम पाटलाने सांगितले होते, स्वतः चे मालक बनून काम करा स्वतः आपल्या पायावर उभे रहा असे म्हणत. आज जे मोदी सांगत आहेत. स्वतः निर्भय बना. ते त्याकाळात बळी राम पाटलाने सांगितले होते. भ्रष्टाचार आणि अनैतिक मार्गाने कधीच संपत्ती कमवायची नाही असे ते सांगत. स्वतःच्या हिमतीवर त्यांचा जास्त विश्वास होता. वसंतराव नाईक यांची दहा वर्षाच्या मुख्यमंत्रीच्या कार्यकर्तीत हा घराणा दबला गेला. याघराण्या पासून सुधारणेला सुरुवात झाली होती. त्यामुळे प्रफुल राठोड यांची मुलगी नेहा राठोड बंजारा समाजात पहिल्या महिला पायलट झाली. बंजारा समाज त्यांचा आदर्श घेतला पाहिजे.

बळी राम पाटील यांनी सर्वजातीच्या लोंकात सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न करत होते. बंजारा समाजाचे लोकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केला होता.

संदर्भग्रंथ:-

१. डॉ. दत्ता जाधव यांनी मोहन नाईक चिचखेड, कडून संग्रहित केलेली माहिती.
२. गोरबंजारा लोकांचाइतिहास— बळीरामपाटील—नवदुर्गाप्रकाशनगुजरात.
३. बंजारा समाज—डॉ. श्रीरामशर्मा- हैदराबाद प्रकाशन हैदराबाद.
४. आलेख समाज प्रगतीचा- बळीरामपाटील- कारंजाप्रकाशन.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

रोड मराठा समाजातील विवाहपद्धती

सन्मित बाबासाहेब पाटोळे
एम.ए., सेट, नेट-जे.आर.एफ.
मो. नं. ८६०५७७५५३५

प्रस्तावना:- १४ जानेवारी १७६१ मध्ये मराठी आणि अब्दाली यांच्यामध्ये पानिपतचे तिसरे युद्ध झाले. मराठ्यांचे सेनापती सदाशिवराव भाऊ होते. वीर मराठा आपल्या बायका-मुलांसह या मोहिमेवर आले होते. कुरुक्षेत्राची तीर्थयात्रा करणे हा त्यांना आणण्यामागील हेतू होता. युद्ध सुरू होण्यापूर्वी मराठ्यांनी आपल्या बायकामुलांना कुरुक्षेत्र येथे ठेवले होते. मराठ्यांचा हेतू हा होता की,लढाई जिंकल्यानंतर पवित्र स्नान करून परत जाणे. परंतु, भविष्यात काय लिहिले आहे, हे कोणालाच माहीत नव्हते. सुरक्षा कवच तुटल्यामुळे मराठ्यांची केंद्रीय सेना अब्दालीने घेरली. त्यामुळे मराठ्यांचे मोठे नुकसान झाले. पराभव झाल्यानंतर वाचलेले मराठा सैनिक महाराष्ट्रात परत गेले नाहीत. वाचलेल्या मराठ्यांकडे सुरक्षित परत जाण्याचा कोणताही मार्ग शिल्लक राहिला नव्हता. कारण त्यांच्या चारी बाजूंचे मुसलमान आणि स्थानिक शासक त्यांचे शतू झाले होते. मराठा ओळख कायम ठेवून कुरुक्षेत्रामध्ये राहणे सुरक्षित नव्हते. नाईलाजाने सुरक्षेसाठी त्यांना आपली ओळख लपवावी लागली. काही काळानंतर ते त्यांचे पूर्वज 'राजा रोड'ची आठवण म्हणून स्वत:ला 'रोड' म्हणू लागले. असाही संभव आहे की, मराठा जातीमध्ये 'रोड', 'रोडे' आडनावाचे परिवार आहेत. कदाचित त्यांचा नायक रोड आडनावाचा असावा. त्याने मराठा जात लपविण्यासाठी आपली जात रोड सांगितली असावी. सुरक्षेसाठी हे सैनिक कुरुक्षेत्राच्या दक्षिणेकडील जंगलात एका स्थानावरून दुसऱ्या स्थानी जात राहून कायम फिरत राहिले. भय आणि शर्मेच्या वातावरणामध्ये जगणे संस्काररुपाने आजसुद्धा रोड जातीमध्ये पहावयास मिळते. त्याचप्रमाणे त्यांच्या विवाह संस्थेचे वेगळेपण हरियाणामध्ये किंबहुना उत्तर भारतात प्रकर्षाने दिसून येते. या विवाह पद्धती व त्यातील विविध विधी, प्रथा, परंपरा यांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१) भारतीय इतिहासातील विवाह संस्थेचे महत्व अभ्यासणे.

२)रोड मराठा समाजाचे उत्तर भारतातील विवाह संस्थेचे वेगळेपण अभ्यासणे.

३)रोड मराठा समाजाच्या विवाहातील विविध विधी व परंपरांचा अभ्यास करणे.

संशोधनाची साधने:- प्रस्तुत शोधनिबंधामध्ये विषयास अनुसरून व उपयुक्त ठरणाऱ्या विविध प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला असून त्यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, चरित्र ग्रंथ, कादंबरी, स्मरणिका,वर्तमानपत्रे, नियतकालिके, सरकारी अहवाल, इंटरनेट स्रोत, इत्यादींचा अवलंब केलेला आहे.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

रोड मराठा समाजातील विवाहपद्धती

भारतीय इतिहासातील विवाह संस्थेचे महत्त्व:- भारतीय इतिहासात प्राचीन काळी विवाह नावाची प्रथा उदयास आली. नंतर विवाह हा एक संस्कार मानला गेला. या विवाह संस्कारातून विविध विधी, परंपरा निर्माण झाल्या. कालांतराने विवाह संस्काराचे विवाहसंस्थेत रुपांतर झाले. विविध समूहांमध्ये विविध प्रकारचे विवाह संस्कार आणि प्रकार उदयास आले. ती काळाबरोबर प्रत्येक समूहाची वेगळी ओळख बनली. आजही भारतामध्ये उत्तर भारतातील काश्मीरपासून ते दक्षिण भारतातील तामिळनाडू पर्यंत विवाह संस्थेचे स्वरूप स्थालसापेक्ष विभिन्न आहे. प्रत्येक समाज, समूह आपले विविध संस्कार, प्रथा, परंपरा जपण्याचे प्रयत्न करताना दिसतो. हरियाणातील रोड समाज त्यांच्या विविध प्रथा, परंपरा जपताना दिसतो.

हरियाणातील रोड समाजाचा परिचय:- महाराष्ट्रात मूळचे मरहट्ट हे राजघराणे क्षत्रिय आहेत. भारतातील मध्ययुगीन काळापासून विविध राज्यांनी आपला साम्राज्य विस्तार केला. हा साम्राज्य विस्तार होत असताना उत्तरेतील क्षत्रिय महाराष्ट्रात आले. यामध्ये प्रामुख्याने परमार, मौर्य, यादव, इत्यादि घराणी होती. त्यांचे महाराष्ट्रातील क्षत्रीयांबरोबर रोटी-बेटी व्यवहार सुरु झाले. कालांतराने परमार रजपूत न राहता पवार मराठा झाले. यादवांचे जाधव झाले आणि मौर्यांचे मोरे झाले. अशा प्रकारे मराठ्यांची ९६ कुळे बनली आहेत. महाराष्ट्रात मराठ्यांमध्ये रोड, रोडे आडनावाचे परिवार आजही आहेत. रोड राजा प्रजेसाहित महाराष्ट्रात गेला होता. ५५० वर्षानंतर त्या रोड राजाचे वंशजच मराठा सैनिकांच्या नायकाच्या रूपाने पानिपतला आले होते. मराठे भारतीय मोगल बादशहाच्या सुरक्षेसाठी विदेशी अफगाण आक्रमक अब्दालीचा सामना करण्यासाठी आले होते. महाराष्ट्रात मराठ्यांना अब्दालीपासून कोणताच धोका नव्हता. राष्ट्रीयता, भारतीयत्व यांचे संरक्षण करण्याच्या महान उद्देशाने आले होते. सर्व प्रथम रोड मराठा विचारधारा महाराष्ट्राच्या प्रमुख इतिहासकारांसमोर सन २००३ मध्ये आली. करनाल येथे सन २००५ मध्ये मराठा मीलन समारोह साठी मराठा समाजाचे चार लाख लोक जमले होते. डॉ. वसंतराव मोरे यांच्या संशोधनातून दिलेल्या पुराव्यांवरून हरियाणातील रोड समाज जो, पानिपतच्या तिसऱ्या युद्धातील वाचलेल्या मराठ्यांचा वंशज आहे हे सिद्ध केले आहे. या समाजाच्या विवाह पध्दती, प्रथा आणि परंपरा या हरियाणातील इतर समाजापेक्षा वेगळ्या आहेत.

मात्र आजपर्यंत हा समाज महाराष्ट्रा पासून दूर आणि सांस्कृतिकदृष्ट्या वंचीत होता. आता मागील दहा वर्षांपासून हा समाज प्रामुख्याने प्रकाशझोतात आला आहे. त्यांचे महाराष्ट्राशी असलेले साम्य आणि साधर्म्य यांमुळे रोड समाजाचे पुनरावलोकन करणे ही काळाची गरज आहे.

रोड समाजाचे विवाह समारंभातील विविध विधी, प्रथा आणि परंपरा:-

१)वराने ग्रामदैवतास जाणे:- महाराष्ट्रात प्रत्येक गावाचे एक ग्रामदैवत असते. याशिवाय अन्य देवतांचीही मंदिरे असतात. ग्रामदेवतेचे महत्व सर्वांत जास्त असते. हरियाणामध्ये जी रोड समाजाची गावे आहेत तेथे प्रत्येक गावात ग्रामदैवत असते, त्यास 'खेडा' असे म्हणतात. रोड समाजातही मराठ्यांप्रमाणे नवरदेव याच ग्रामदैवत

किंवा मंदिरात प्रथम जातो आणि दर्शन घेऊनच विवाह मंडपात येतो व नंतर लग्न लावतात. ही प्रथा उत्तर भारतामध्ये इतर समाजामध्ये जवळ जवळ नाहीच.

२)वधू आणि वरास मंगलस्नान घालणे:- मराठा समाजामध्ये वधू आणि वरास मंगलस्नान घालणे ही एक महत्वपूर्ण आणि पवित्र अशी प्रथा मानली गेली आहे. त्याप्रमाणे रोड समाजात नवरा व नवरी यांना विवाहापूर्वी मंगलस्नान घालतात. हे मंगलस्नान घालताना महिला विविध प्रकारची जुनी पारंपारिक गाणी म्हणतात. रोड समाजात घरचे सर्व नातेवाईक वधू आणि वरास प्रत्येकजण एक तांब्या पाण्याने त्यांना अंघोळ घालतात. ही प्रथा इतर कोणत्याही समाजात नाही.

३)विवाहानंतर वधू सोबत पाठराखण पाठविणे:- रोड समाजात लग्नानंतर जेव्हा नवरी प्रथम सासरी जाते, तेव्हा तिच्याबरोबर माहेरहून मुलगा किंवा मुलगी सोबत जाते. वाधूसोबत ती त्या परिवारात जोपर्यंत स्थिर व सुसह्य होत नाही तोपर्यंत ते राहतात आणि काही दिवसांनी ती किंवा तो परत येतात. या व्यवहारास मराठी मध्ये 'पाठराखण' किंवा 'पाठराखणी' म्हणतात. रोड समाजात ही प्रथा आहे. ते यास 'सोबडा जाना' म्हणतात. रोड समाजात ही परंपरा आजही कायम आहे.

४)मामाकडे स्वयंपाक घराची व कार्यावाह्क म्हणून प्रमुख जबाबदारी:- रोड समाजात लग्नसमारंभात वधू आणि वर यांच्या मामाला खूप महत्त्व आहे. विवाह समारंभासाठी अनेक लोक उपस्थित असतात. त्यांचे जेवण एकत्र केले जाते. या लग्नसमारंभाच्या स्वयंपाक घराचा प्रमुख वर आणि वधू यांचा मामा असतो. भोजनाच्या सुरक्षेसाठी ही प्रथा आहे. रोड समाज आणि मराठा समाज या दोन्ही समाजात ही प्रथा प्रचलित आहे.

५)वर आणि वधूच्या पाठीमागे मामा उभे राहणे:- रोड समाजात नवरीस विवाह मंडपात सप्तपदी संस्कारासाठी घेऊन मामाच येतो. नवरदेव ग्रामदैवत किंवा हनुमान मंदिरात प्रथम जातो व तेथे देवाच्या पाया पडतो. नंतर नवरदेव घोड्यावर बसून विवाह मंडपाजवळ येतो. त्याच्या हातामध्ये हत्यार किंवा कट्यार असते. नवरदेवाची सुरक्षा करण्यासाठी शस्त्रधारी 'करवला' नेहमी त्याच्या बरोबर असतो. त्याचप्रमाणे नवरीच्या सुरक्षेसाठी तिच्याबरोबर 'करवली' असते. तसेच मंगलाक्षताच्या वेळी नवरा व नवरीच्या मागे तलवार घेऊन त्यांचे मामा उभे असतात. महाराष्ट्राच्या अशांत वेळी ही परंपरा सुरू झाली. जेव्हा विवाह समारंभात नवरी पळविणे किंवा नवरदेवाला मारून वधूचे हरण केले जात होते तेव्हापासून हि प्रथा सुरु झाली होती. आता केवळ परंपरा म्हणून हे केले जाते. या विवाह परंपरा रोड आणि मराठा समाजात समानच आहेत.

६)विवाहामध्ये साट्यालोट्याची प्रथा:- रोड समाज या प्रथेस 'सिधे साटे' की प्रथा म्हणतात. काही लोक या प्रथेमुळे आपली मुलगी ज्या कुटुंबात देतात त्याच कुटुंबातील मुलगी आपल्या मुलास करतात म्हणजे ज्यावेळी आपली मुलगी ज्या कुटुंबाची सून होते त्याच कुटुंबाची मुलगी त्यांची सून होते. ही प्रथा राजपरिवार आणि सैनिक परिवार यामध्ये मोठ्या प्रमाणात आढळते. मराठा समाजामध्ये आजही महाराष्ट्रात ही प्रथा चालू आहे. अन्य समाजात ही प्रथा नाही. फक्त रोड समाज आणि मराठा समाजातच ही प्रथा आहे.

ISSN 2231 4342

७)रुखवतामध्ये मोठ्या लाडूंचे महत्त्व:- रोड समाजामध्ये लग्नातील रुखवतामध्ये जे लाडू बनविलेले असतात ते थोडे आकाराने मोठे असल्याचे दिसते. प्राचीन काळापासून महाराष्ट्रातील मराठा समाजामध्येही लग्नाच्या रुखवतामध्ये मोठे लाडू बनवतात. हे मोठे लाडू आपण आजही रुखवतामध्ये पाहतो. अशीच प्रथा रोड समाजात आहे. इतर कोणत्याही समाजात अशी प्रथा नाही.

निष्कर्ष:- भारतातील अनेक समाज किंवा समूहाने ज्याप्रमाणे त्यांच्या विवाहसंस्थेचे वेगळेपण जपले आहे त्याचप्रमाणे रोड समाजाने उत्तर भारतात असूनही आपली विवाहसंस्था जपली आहे. त्यांची विवाहसंस्था महाराष्ट्रातील विवाहसंस्थेशी मोठ्या प्रमाणात एकरूप आहे आणि रोड समाज आजही त्यांच्या विवाहसंस्थेस खूप महत्त्व देतो.

संदर्भसूची:-

हिंदी:-

१)ओम प्रकाश एवं महेंद्र सिंह आर्य, रोड मराठा इतिहास (एक झलक-एक संकेत), रोड मराठा एकता शक्ती करनाल, प्रथम, २००९.

२)कादियान सुरेंद्रसिंह, रोड: उद्भव एवं विकास, रोड चेतना मंच (रजि.)दिल्ली, प्रथम, २००३.

३)मोरे वसंतराव, पानिपत युद्ध के: रोड मराठों का इतिहास, शिवसंग्राम प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम, २००९.

४)मोरे वसंतराव, मराठों के शौर्यतीर्थ, भारती मुद्रणालय, कोल्हापूर,प्रथम, २०१९.

मराठी:-

१)पवार जयसिंगराव, शिवाजी व शिवकाळ, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पाचवी, १९९२.

२)मोरे वसंतराव, शौर्यतीर्थ पानिपत,शिवसंग्राम प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम, २००९.

३)शेजवलकर त्र्यं. शं., पानिपत १७६१, राजहंस प्रकाशन, पुणे, द्वितीय, १९९३.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

स्वा. सै. सीताबाई माणिकराव पाटील यांचा हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील सहभाग

मंजुश्री अप्पासाहेब जाधव
संशोधक विद्यार्थिनी (पीएच.डी.)

प्रा. डॉ. पंकजकुमार शंकर प्रेमसागर
मार्गदर्शक, श्रीमती जी. जी. खडसे
महाविद्यालय, मुक्ताईनगर

आधुनिक भारताच्या इतिहासात हैद्राबाद मुक्ती आंदोलन ही एक अनन्यसाधारण घटना मानली जाते. भारतीय स्वातंत्र्य लढ्याला पूर्णत्व प्राप्त करून देणारा एक महत्वपूर्ण ऐतिहासिक लढा म्हणून हैद्राबाद मुक्ती आंदोलनाकडे पहिले जाते. ब्रिटीशकालीन भारतात जि संस्थाने होती त्यापैकी दक्षिण भारतातील हैद्राबाद हे प्रादेशिक आकाराने मोठे व श्रीमंत संस्थान होते. इ. स. १७२४ ते इ. स. १९४८ हा हैद्राबाद संस्थानचा अस्तित्व काळ होता. हैद्राबाद संस्थानची स्थापना मोगलांचा दक्षिण भारतातील सुभेदार असलेल्या निजाम ऊल मुल्क याने मोगल सत्तेच्या दुर्बल काळात केली. हैद्राबाद संस्थानात बहुसंख्य प्रजा हिंदू असून सत्तेची सूत्रे मात्र धार्मिक आणि सरंजामी वृत्तीच्या निजाम सत्ताधीश व त्याच्या अनुयायांच्या हातात तसेच ब्रिटीश नियंत्रणाखाली होती. त्यांनी जनहिताच्या आवश्यक सुधारणा केलेल्या दिसून यत नाही. या सत्ताधीश वर्गाने जनहितविरोधी व भेदभावयुक्त राज्यकारभार केल्याने जनता ही राज्यकर्त्या वर्गाविरुद्ध गेली. त्यातून हैद्राबाद मुक्ती आंदोलन उदयास आले. हैद्राबाद मुक्ती आंदोलनात जसा मराठवाड्यातील स्त्रियांच्या सहभागाप्रमाणेच हैद्राबाद संस्थान हद्दी बाहेरील जळगाव जिल्ह्यातील स्त्रियांचाही सहभाग होता. त्यापैकी एक असलेल्या स्वा. सै. सीताबाई माणिकराव पाटील यांचा हैद्राबाद मुक्ती आंदोलनात सहभाग होता. म्हणून मी या शोध निबंधात स्वा. सै. सीताबाई माणिक पाटील यांचा हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील सहभाग यावर संशोधनात्मक विचार व्यक्त करीत आहे.

शोधनिबंधाचा हेतू:-स्वा. सै. सीताबाई माणिकराव पाटील यांचा हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील सहभाग समाजासमोर आणणे

शोधनिबंधाचे गृहीतक:- स्वा. सै. सीताबाई माणिकराव पाटील यांचा हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील सहभाग आहे.

शोधनिबंधाचे उद्दिष्ट:- स्वा. सै. सीताबाई माणिकराव पाटील यांच्या हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील सहभागविषयक संशोधनास चालना देणे

'इ. स. १७१३ मध्ये मुघल सम्राटाने मीर कमर उद्दीन याची दक्षिणेचा सुभेदार म्हणून नियुक्ती केली होती.याला नंतर आसफजहा म्हणून ओळखले जात होते. मुघल सम्राटाने त्याला निजाम-उल-मुल्क असा किताब दिला होता. त्याच्या कारवाया पाहता मोघल सम्राट त्यास पदावरून दु करण्यास अपयशी ठरला. इ. स. १७२४ मध्ये निजामाने स्वतंत्र्य घोषित केले. तो हैद्राबाद राज्याचा संस्थापक बनला.'[१] 'हैद्राबाद राज्याचे

 ISSN 2231 4342

भौगोलिक स्थान हे १५० १०' ते २०० ४०' उत्तर अक्षांश व ७४० ४०' ते ८१० ३५' पूर्व रेखांश असे होते.'[२] 'हैद्राबाद राज्य हे भारतातील सर्वात मोठे संस्थान होते. त्याचे क्षेत्रफळ ८२,३१३ चौ. मै. आणि लोकसंख्या १.८६ कोटी इतकी होती. यात ८९% जनता हिंदू होती.'[३]यातून हैद्राबाद संस्थानची राजकिय, भौगोलिक व सामाजिक परिस्थिती लक्षात येते.

शेवटचा निजाम मीर उस्मान आली खान बहाद्दूर हा इ. स. १९११ मध्ये निजामपदी आरूढ झाला. त्याच्या काळात सुधारणांपेक्षा सनातनी कारवायांची अंमलबजावणी जास्त झालेली दिसून येते. त्यातून हैद्राबाद राज्यातील जनता भारतीय स्वातंत्र्य संग्रामाशी समरूप झालेली दिसून येते. परिणामी विविध संघटना, म. गांधीजींच्या विचारांचा प्रभाव व त्यातून हैद्रबाद मुक्ती आंदोलन या घटनांचा जन्म झालेला दिसून येतो. निजाम, वित्तमंत्री अकबर हैदरी व इंग्रज यंधी दडपशाही व पक्षपातीपणा वाढीस लागला होता. याच काळात इत्तेहाद-उल-मुसलमीन या संस्थेचा उदय व विस्तार आणि कासीम रझवी व त्याच्या रझाकार सिनिकांच्या हिंसक कारवाया समाजाला घातक ठरत होत्या. यातून हैद्राबाद मुक्ती आंदोलनाने जोर पकडलेला दिसून येतो. हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील सहभागी स्त्रियांमध्ये जळगाव जिल्ह्यातील स्त्रियांचा समावेश आहे.

स्वा. सै. सीताबाई माणिकराव पाटील या खडकदेवळा, ता. पाचोरा, जि. जळगाव या ब्रिटीश हद्दीतील परंतु हैद्राबाद संस्थानच्या हद्दीस लागून असलेल्या गावातील रहिवाशी होत्या.त्यांचे निधन इ. स. २००२ मध्ये झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८७ वर्षे इतके होते. त्यांचे पती स्वा. सै. माणिकराव महारु पाटील हे खडकदेवळा गावचे पोलीस पाटील होते. त्यांच्याकडे गावाच्या सरंक्षणासाठी अकरा रायफलींचा परवाना होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हैद्राबाद मुक्ती आंदोलनाने जोर पकडला होता. निजामी हद्दीस लागून परंतु भारतीय हद्दीत हैद्रबाद स्टेट कॉंग्रेस माध्यमाने बॉर्डर कॅम्प उभारण्यात आले होते. देशभक्तांना तेथे लढाऊ प्रशिक्षण दिले जात असे. असा एक कॅम्प पातोंडा, ता. पाचोरा, जि. जळगाव येथे होता. काकासाहेब देशमुख या कॅम्पचे प्रमुख होते. त्यांच्या देशभक्त कार्यकर्त्यांमध्ये स्वा. सै. माणिकराव महारु पाटील हे सहभागी होते. राझाकारांना जशास तसे उत्तर देण्यासाठी काकासाहेब देशमुख व त्यांचे सहकारी रात्रीच्या वेळी श्री. माणिकराव महारु पाटील यांच्याकडील रायफली घेऊन जायचे व उजेड होण्या अगोदर त्या परत आणून द्यायचे. करोडगिरी नाका जाळण्यापासून ते विविध आंदोलनामध्ये श्री. माणिकराव महारु पाटील यांचा सहभाग होता. ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या हे लक्षात आल्याने श्री. माणिकराव पाटील यांची पोलीस पाटीलकी रद्द करण्यात आली होती. एका उल्लेखानुसार'हैद्राबाद मुक्ती लढ्यातील काही मोहिमांमध्ये माणिकराव महारु पाटील यांच्या पत्नीनेही सहभाग घेतला होता.'[४] पतीबरोबर स्वा. सै. सीताबाई माणिकराव पाटील यांचा हैद्राबाद मुक्ती आंदोलनात सहभाग होता.

हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील एका स्वातंत्र्य सैनिकाने आपल्या मुलाखतीत सांगितले की, 'सौ. सीताबाई माणिकराव पाटील या खडकदेवळा येथील रहिवाशी होत्या. त्यांनी आपल्या पतीसोबत हैद्राबाद मुक्ती आंदोलनात कार्य केलेले आहे.त्यांनी त्यांच्या घरी आलेल्या काकासाहेब देशमुख यांच्या हैद्राबाद मुक्ती

ISSN 2231 4342

आंदोलनातील क्रांतीकारकांना रायफली देणे व जमा करून घेणे, अशा क्रांतीकारकांना चहापाणी करणे व भोजन देणे अशी मदत केलेली आहे. पातोंडा येथील बॉर्डर कॅम्पमध्ये कार्य करणे व विविध कार्यात त्यांचा सहभाग होता. त्या त्यांच्या पतीसोबत राझाकारांविरुद्ध प्रत्यक्ष लढलेल्या आहेत.'[५]यातून स्वा. सै. सीताबाई पाटील यांचा पातोंडा बॉर्डर कॅम्पमधील कार्य व हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील सहभाग समजून येतो.

स्वा. सै. सीताबाई माणिकराव पाटील यांचे जेष्ठ चिरंजीव श्री. मधुकर माणिकराव पाटील यांनी आपल्या मुलाखतीत सांगितले की, 'स्वा. सै. सीताबाई माणिकराव पाटील यांनी आपल्या पतीसोबत हैद्राबाद मुक्ती आंदोलनात पातोंडा बॉर्डर कॅम्पचे प्रमुख श्री. काकासाहेब देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सक्रीय कार्य केलेले आहे. काकासाहेब देशमुख व त्यांचे सहकारी आमचे घरी लपूनछपून येत असत. सीताबाई पाटील या स्वत: रात्रीच्या वेळी या क्रांतीकारकांना रायफली काढून देत असे. क्रांतिकारक कधी घाई करीत घोड्यावर यायचे तर कधी स्त्री वेशात यायचे. त्यांच्या निवासाची तसेच भोजनाची व्यवस्था वेळकाळ ण पाहता सौ. सीताबाई पाटील या करीत असत. ब्रिटीश अधिकाऱ्यांनी श्री. माणिकराव पाटील यांचे पोलीस पाटील पद काढून घेतले होते. पोलिसांपासून सीताबाई पाटील यांना मोठा उपद्रव सहन करावा लागला होता. त्यांनी आपल्या पतीला हैद्राबाद मुक्ती आंदोलनात सक्रीय साथ दिली होती. हैद्राबाद मुक्ती आंदोलनात लढणारे कार्यकर्ते जेंव्हा भूमिगत असायचे तेंव्हा रात्रीबेरात्री घरी निरोप घेऊन येणाऱ्या क्रांतीकारकाला सर्व विचारपूस करून त्याचा आदरातिथ्य करून, सौ. सीताबाई पाटील या सर्व क्रांतिकारकांसाठी भोजन तयार करून, अंगावर काळी घोंगडी अथवा कांबळ घेऊन, त्या घोंगडीखाली भोजन लपवून ते भोजन स्वत: शेतात अथवा जंगलात लपून बसलेल्या क्रांतीकारकांपर्यंत पोहोचवीत असत. गावातील काही उपद्रवी लोकांना चकवून गुप्तपणे हे भोजन पोहचवावे लागत असे. सौ. सीताबाई पाटील यांच्या घरी तर कधी नदी पात्रात क्रांतिकारकांच्या गुप्त सभा अथवा बैठका होत असत तेंव्हा सीताबाई पाटील या त्या सर्वांच्या भोजनाची व्यवस्था करीत असत. त्या रझाकार व त्यांना सहकार्य करणाऱ्यांची माहिती व इतर आवश्यक निरोप क्रांतीकारकांपर्यंत पोहोचवीत असत. गावात व परिसरात सीताबाई पाटील या क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, छत्रपती शिवाजी महाराज व इतर आदर्श स्त्री-पुरुषांची नाटके तयार करून लोकांमध्ये राष्ट्रभावना विकसित करण्याचे व हैद्रबाद मुक्ती संग्राम विषयी माहिती पसरविण्याचे कार्य करीत असत. त्या पातोंडा बॉर्डर कॅम्पसंबंधी सभांना हजर राहत होत्या. सौ.सीताबाई पाटील यांनी गोंदेगाव, बनोटी व औरंगाबाद जिल्ह्यात राझाकारांविरुद्ध प्रत्यक्ष लढण्याचे कार्य केले आहे.'[६] यातून स्वा. सै. सीताबाई माणिकराव पाटील यांचा हैद्राबाद मुक्ती आंदोलनातील सक्रीय सहभाग लक्षात येतो.

<u>निष्कर्ष</u>:-स्वा. सै. सीताबाई माणिकराव पाटील या भारतीय हद्दीतील खडकदेवळा, ता. पाचोरा, जि. जळगाव येथील रहिवाशी असून त्या राष्ट्रीय वृत्तीच्या होत्या. हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले पाहिजे यासाठी त्यांनी हैद्राबाद मुक्ती आंदोलनात सहभाग घेतला होता. त्यांनी रझाकारांचा स्त्रियांना होणारा उपद्रव व हैद्राबाद संस्थानच्या सीमेस लागून असलेल्या भारतीय हद्दीतील गावात रझाकारांचा हैदोस बघितला होता. त्यांनी पातोंडा बॉर्डर कम्प मध्ये मदत कार्य केले आहे. त्या रझाकारांविरुद्ध प्रत्यक्ष लढलेल्या आहेत.

ISSN 2231 4342

संदर्भ :-

१. THE ENCYCLOPEDIA AMERICANA, VOLUME 14, AMERICANAs CORPORATION, NEW YORK, 1970, P. 633

२. IMPERIAL GAZETTEEROF INDIA, PROVINCIAL SERIES, HYDERABAD STATE, SUPERINTENDENT OF GAVERNMENT PRINTING, CALCUTTA, 1909, P. 1

३. महाजन विद्याधर, आधुनिक भारत का इतिहास, एस चंद एंड कंपनी लि., नई दिल्ली, १९९३, पृ. ७१४

४. भोसले अच्युत वि., झुंझार क्रांतिवीर काकासाहेब देशमुख लोकराजा मराठवाडा मुक्ती संग्रामातील सशस्त्र क्रांतीचा नेता, कौशल्य पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१२, पृ. २९

५. स्वा. सै. उत्तमराव मखाजी देसले, भडगाव, जि. जळगाव यांची मुलाखत, दि. १०/२/२०२१

६. श्री. मधुकर माणिकराव पाटील (स्वा. सै. सीताबाई माणिकराव पाटील यांचे जेष्ठ चिरंजीव, वय ८२ वर्ष, यांची मुलाखत, दि. ११/२/२०२१

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

डॉ. बाबासाहेब आंबडेकरांचे महिलांसाठी योगदान

संशोधक
सुलक्षणा किशनराव इंगोले
राजर्षी शाहू महाविद्याल, परभणी
मो.नं. 9096701135
Email ID : Sululicpbn@gmail.com
पत्ता : सुलक्षणा किशनराव इंगोले
C/O आर.एस. घोगंडे
संतसेना नगर, जायकवाडीच्या माघे, परभणी

प्रस्तावणा :

एकविसाव्या शतकातील स्त्री ही सर्वअर्थानी पुरूषाच्या खांद्याला खांदा लावुन सर्वच आघाडीवर सक्षमपणे वावरत आहे. असे कोणतेही श्रेय नाही की, जेथे स्त्रीचा कार्यक्षम नाहीत.स्त्रियांना या स्थितीत अनन्यायासाठी अनेक समाजसुधरकांचे योगदान नाकाराता येत नाही.

भारतीय समाजात पुरुष प्रधान संस्कृतीमुळे प्राचीण काळापासुन स्त्रियांना दुयम स्थान दिले आहे. धर्म, संस्कृती यातील नितिनियमांचा आधार घेऊन अत्यंत हिन दर्जाची वागणुक त्याकाळी स्त्रीयांना ना देण्यात येत होती. घराच्या चौकटीतच लिा डांबुन ठेवले होते. तिला स्वात:ची काही कते आहेत. तिही समाजाचा एक महत्वाचा घटक आहे. तिच्या बुध्दीचा समाजाला पर्यायाने देशाला काही उपयोग होऊ शकतो. याचा विचार त्या काळात कधीच झाला नाही. घरातील एकाही पुरूषाला तिच्यातील माणूसपणा कधी जाणवले नाही.

नंतरच्या काळात भगवान बुध्दांनी जी सामाजीक क्रांती केली व शुद्रांना जसे आपल्या धर्मात स्थान प्राप्त् करून दिले तेच स्थान करून दिले तेच स्थान महिलांनाही प्राप्त् झाले बुध्दांच्या पुर्वी स्त्रियांना पुरुषाप्रमाणे समान अधिकार नव्हते. त्यांना ज्ञानर्जनाचा अधिकार नव्हता. बुध्दानी स्त्रियांना सुध्दा भिक्खु संघात प्रवेश देऊन स्त्री / पुरुष समानता प्रस्थापित केली.

समाज व्यवस्थेतील दृष्टा चालिरिती, बालविवाह प्रथा, बहूपत्नित्व्, विधवांचे केशवपन सतिप्रथा, जठर विवाह, हुंडा प्रथा, घटस्फोटाची प्रथा, मालमत्तेच्या अधिकारापासुन वंचित, सति प्रश्न्न् आदी घटनांमुळे ती बंदिस्त् झाली होती. तिची कुंचबना होत होती. ब्रिटीश काळात इंग्रजानी प्रथम महत्वाचे पाऊल उचलले. मुलींसाठी शिक्षण सुरु केले. त्यामुळे स्त्रीयांमध्ये जागृती निर्माण झाली. सतीबंदी, बालविवाह बंदी होऊन विधवांना पुर्नविवाहास प्रोत्साहन मिळाले. 18 वे शतक हे क्रांतीचे ठरले तर 19 वे शतक सामाजिक क्रांतीचे ठरले तर 19 वे शतक सामाजिक क्रांतीचे किंवा परिवर्तनाचे ठरले. महात्मा फुजले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

यांनी सामाजिक परिवर्तनवादी चळवळीचे बिजारोपन केले. महाराष्ट्राच्या सुधारणावादी चळवहीच्या इतिहासात या महामानवांचे कार्य मोलाचे ठरले.

* डॉ. आंबेडकर आणि स्त्रिमुक्ती चळवळ.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्त्रीयांच्या उन्नतीसाठी, मुक्तीसाठी आणि स्वातंत्र्यासाठी लढणारे महान कैवारी होते. एका हातात कायदयाचे तर दुसऱ्या हातात चळवळीचे शस्त्र घेऊन सामाजिक क्रांती करणारे, स्त्री-पुरूष विषमता दुर करणारे व या देशात सामाजिक धार्मिक क्रांती घडवणारे द्रष्टे विचारवंत होते. स्त्रियांवरील अन्याय दुरु करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी हिंदु कोड बील हा कायदा आणुन आपले पांडित्य पनाला लावले. डॉ. आंबेडकरांनी सादर केलेले हिंदु कोड बील हे भारतीय महिलांसाठी सुरक्षा कवचच होते. समाजातील, कुटूंबातील किंमत वाढली, स्त्रीया आपल्या हक्कासाठी सजक झालेल्या दिसतात.

भारतीय समाज व्यवस्थेत द्दिर्भाया पध्दती असित्वात होती. पुरूष हा लहरी प्राणी आवडीची स्त्री घरी आणुन ठेवीत असे त्यामुळे मुळची पत्नीची अवस्था घरातील केरसुनीगत होत असे. तिचे अस्तित्व नष्ट् होत होते. हया स्त्रियांची वर्षानुवर्षा पासुन चालत असलेली मानहानी नष्टा करण्याचे कार्य हिंदु कोड बिलाच्या अनुषंगाने पुर्ण केले.

आज स्त्रीयांचे शिक्षण, स्त्रीयांचे सबलीकरण, स्वालंबन आदि स्वतंत्र्य हे सर्वत्र वाटचाल करतांना दिसते. याचे मुळ म्हणजे हिंदु कोड बील होय. तसेच कुटूंब नियोजन, स्त्री आरोग्य् प्रस्तुती सहारूय हे सर्व स्त्रियांना मिळणारे अनुषंगीक कायदे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळे स्त्रियांना प्राप्त् झाले.

स्त्री शक्तीचा , स्त्री संघटनेचा खरा साक्षात्कार प्रदान डॉ. आंबेडकरांना झालेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदे मंत्री असतांना स्त्रियांच्या अधिकाराचे संसदेत मंजुर झाले नाही म्हणून त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. हा त्याग त्यांनी स्त्रियांच्या हक्कासाठी केला. 1952 मध्ये त्यांच्यात मसुदयातुन चार स्वतंत्र कायदे बनविले व स्त्रिचळवळीचे बिजारोहन केले.

डॉ. बाबासाहे आंबेडकरांनी दलित समाजातील स्त्रियांचा दर्जा सुधारावा म्हणून आपल्या दलित स्त्रियांना क्रांतीकारी अवाहन केले. नवऱ्याला दारू सोडायला भाग पाडा, दारू पिउन नवरा घरात आला तर त्याला घरात घेऊ नका, असा संदेश दिला.

मुंबईतील कामाठी पुऱ्यातील वेश्यावस्तीतील वेश्यांना ठणकावले की, हा व्यवसाय सोडा, लग्न् करा, स्वाभीमानाने संसार करा. काही तरूणीचे दलित समाजातील तरूणासोबत लग्न् लावुन दिले.

डॉ. बाबासाहेब मजुर मंत्री असतांना कारखाने, खाणीख् सुतगिरण्या यातुन स्त्रियांना बरोबरीने वेतन मिळावे, बाळतंपणासाठी रजा मिळावी, कामाच्या ठिकाणी पाळणाघर असावे अश्या सुचना केल्या व समाज विकासाच्या समान संधीमुळैच आज दलित व इतर स्त्रियांना समान वेतन, आरोग्य वैद्किय सुविधा सर्व नियोजनाचे फायदे डॉ. आंबेडकरांनी उपलब्ध करून दिले.

दलितांना व स्त्रियांना मानवी कवाडे खुली केली. सर्वच स्त्रियांना मानवी हक्क, समानता, न्याय, स्वतंत्र बंधुता याची शिकवन दिली. स्त्रि स्वतंत्र नाकारणारी मनुस्मृती बाबासाहेबांनी जाळली.

ISSN 2231 4342

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रि शिक्षणाला अग्रक्रम दिला. एक माणुन शिकला तर तो एकटाच शिक्षीत होतो आणि एक स्त्रि शिकली तर ती संपुर्ण कुटूंबाला साक्षर करते. बाबासाहेबांची स्त्री शिक्षाणाची भुमीका तळमळीने आणि उदारमतवादी होती. त्याच्या या विचाराने स्त्री शिक्षणाला चालना मिळाली.

निष्कर्ष :-

हजारो वर्षापासुन समाजातील शोषीत, दलित आणि दुर्लबलांच्या हक्काचे संरक्षण करणे, त्यांना समाजाच्या मुख्या प्रवाहात आणने हे बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाचे प्रमुख उदिष्टा होते. दलितानंतर समाजात सर्वात शोषित महिलांच्या वर्ग होतो. म्हणून बाबासाहेबांनी भारतीय घटना निर्मितीच्या वेळी स्त्रियांच्या अधिकारांना व सरंक्षणाला सर्वाधिक महत्व दिले. स्त्रीयाच्या हिताच्या दृष्टीने बाबासाहेबांनी अलौकिक कार्य केले. या कार्यासाठी भारतीय स्त्रीया बाबासाहेबांच्या जन्मभर गृहिणी राहतील.

आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर दिसत आहे. विज्ञान तंत्रज्ञान, कृषी उद्योग, पोलीस, लष्क्र, शिक्षण, वैदि्कय इ. .क्षेत्रीय भारतीय स्त्रीयांचे फार मोठे योगदान आहे. हे सर्व बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या व कृतीतील व्यवस्थेचा परिणाम आहे. हजारो वर्षापासुन खितपत पडलेल्या स्त्रियांना सामाजिक व आर्थिक शोषणामुळे मुक्ती मिळाली.

संदर्भ :

1. न.म.जोशी – डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र आणि कार्य.
2. धनजंय किर- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉक्युलर प्रकाशन, मुंबई
3. चांगदेव खैरमोडे – डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल.
4. डॉ. धनराज डाइट – डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषण आणि विचार खंड-1
5. डॉ. स्मिता मेहेत्र – भारतीय स्त्री आणि मानवधिकार
6. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषणे खंड -2 गाजरे मा.फ
7. डॉ. लाजेवार ज्योती – फुले- आंबेडकर आणि स्त्री मुक्ती चळवळ, संकेत प्रकाशन, नागपुर आवृ. ऑक्टोंबर 2008

ISSN 2231 4342

डॉ. पंजाबराव देशमुख यांचे राज्यघटना समितीतील कार्य

डॉ. प्रशांत प्र. कोठे
इतिहास विभाग प्रमुख,
श्री शिवाजी कला , वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय अकोट. जि. अकोला
मो. नं. ९८२२४६१४१६
Email ID :
drprashantkothe@gmail.com
आजीवन सभासद क्र. १७५

....

आपल्या भारत देशासाठी संविधान निर्माण करण्यासाठी डिसेंबर १९४६ मध्ये भारतीय संविधान सभा अस्तित्वात आली. त्या समितीवर डॉ. पंजाबराव देशमुख कॉंग्रेसच्या वतीने मध्यप्रांत वऱ्हाडतून सदस्य म्हणून निवडून गेले. घटना समितीतील सर्व सभासद तज्ञ व विद्वान होते. तसेच विविध क्षेत्रातील अनुभवी होते. मात्र सर्व सदस्य जिद्दीने चर्चेत भाग घेत नव्हते. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे न्याय शास्त्राचे सखोल ज्ञान , भारतातील बहुसंख्य लोकांच्या भवितव्य व विकासाबाबतचे ठाम विचार, विशेष महत्त्वाचे म्हणजे इंग्रजीवरील प्रभुत्व इत्यादीमुळे चर्चा, विचारविनिमय यावेळी सर्वच सभासद त्यांच्या वक्तव्याकडे लक्ष ठेवून असतात. त्यांचे विधान सडेतोड व अभ्यासू असे असायची. निरनिराळ्या लोकशाहीप्रधान देशाच्या राज्यघटनांचा त्यांनी अभ्यास केला होता. शेतकरी व शेतमजूर अशा कष्टकरी जनसामान्यांची वस्तुस्थिती लक्षात घेण्यास व त्यानुसार आपल्या राज्यघटनेत योग्य तरतुदी करण्यास त्यांनी घटना समितीला भाग पाडले. एक संतुलित अशी राज्यघटना तयार करण्यासाठी जनसामान्यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांनी घटनेच्या मूळ आराखड्यात सर्वाधिक म्हणजे ५०० दुरुस्त्या सुचविल्या होत्या. त्यांनी सुचविलेल्या सूचना व दुरुस्त्या भारतीय संविधानाला आकार देणाऱ्या ठरल्या.

डॉ. पंजाबराव देशमुख यांची संविधानाचे संबंधित काही प्रश्न विषयीची वेगळी मते संविधान सभेतील बहुसंख्य सभासदांना पटत नव्हती. तरीही संविधानाच्या मसुद्यात दुरुस्त सूचवून ते ती मांडत असत. त्यांच्या दुरुस्ती सूचना बहुतेक वेळा फेटायला जात असत. कधी अन्य सदस्यांनी त्यांच्या सूचनेशी मिळतीजुळती दुसरी सूचना सुचली असेल तर ते आपल्या दुरुस्ती सुचना स्वतः मागे घेत असत. एखाद्या सदस्याने मांडलेल्या दुरुस्ती सूचनेशी ते सामत असले की ती जणू आपलीच दुरुस्ती सूचना असल्यासारखे तिचे हिरीरीने समर्थन करीत असत. ओरिसा तुन निवडून आलेले सदस्य लोकनाथ मिश्र यांनी संविधानाच्या मसुद्यातील ९१ व्या कलमात दुरुस्ती सुचविली तेव्हा डॉ. पंजाबराव देशमुख यांनी ही सूचना उचलून धरली. त्यांचे भाषण ह. वि. कामत यांना इतके आवडले की त्यावर अधिक काही बोलण्याची गरज नाही असे हरिभाऊ कामतांनी प्रशंसा केली. प्रांताच्या

घटनेचे प्रारूप कोणत्या तत्त्वावर आधारलेले असावेत हा विषय चर्चेला जात असताना उपराज्यपालाच्या नियुक्तीचा प्रश्न पुढे आला . निष्कारण चर्चा टाळावी या हेतूने गोविंद वल्लभ पंत आणि दुरुस्ती सुचवतात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आपली दुरुस्ती सूचना पंतांच्या सुचनेशी मिळतीजुळती असल्यामुळे मागे घेतली. अशाप्रकारे त्यांनी घटना समितीचा वे वाचवण्याचा प्रयत्न केला.

दि.१० सप्टेबर १९४९ ला डॉ. पंजाबराव देशमुख यांनी धार्मिक देवस्थाने व इतर विश्वस्त संस्था यांची संपत्ती सरकारने जमा करावी हा प्रस्ताव चर्चेसाठी सादर केला होता. ही निष्कारण पडून असलेली संपत्ती सरकारजमा केली आणि विकास कार्यात लावल्यास अनेक विकास योजना कार्यान्वित करता येतील. अशी या दुरुस्ती विधेयका मागील त्यांची धारणा होती. या प्रस्तावावर बोलताना ते म्हणतात , "Sir, the second amendent that I have moved refers especially to religious trusts. I know, sir, that most people are aware of the way in which these religious trusts are managed and I think it is necessary that the question of compensation cannot arise in thise case. The sooner we utilise these vast properties for the benefit of the nation, the better it would be. Thise is something that is extremely desirable, and I hope, Sir, that this addition that I have Proposed to article 24 would also be accepted." पण घटना समितीत देखील हे विधेयक पास झाले नाही.

दि. २ सप्टेंबर १९४९ रोजी बोलताना डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या हितसंबंधी आपले विचार मांडून शासनाने शेतकऱ्यांकडे केलेल्या दुर्लकक्षा संबंधी खेद व्यक्त केला .सरकार शेतकऱ्यांची अक्षम्य उपेक्षा करीत आहे. केवळ संख्याबळामुळे नव्हे, तर श्रेष्ठतम कार्यामुळे या भारत वर्षात शेतकऱ्यांना पूर्वापार प्राधान्य मिळत आले आहे. त्यामुळेच भारत शेतक-यांचा देश म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे. हे शेतकरीच खऱ्या अर्थाने भारताचे स्वामी आहेत. पण तरी सुद्धा त्यांच्या कल्याणाची कुणालाच असता नाही. कामगार वर्ग शेतकरी वर्ग यांच्या परिस्थितीचे तुलनात्मक दर्शन घडवून डॉ.पंजाबराव देशमुख म्हणतात, " Form thetime we have had special labour representation, form the time we have had lobour reperesentatives and labour Ministers, the welfare of the labourers has been an integral part of the labour portfolio and of our administration. Labourers form only a small number compared to agriculturists, but still we are solicitous that there should be hospitals for theme, air-conditioned factories for theme, provision for there medical relief, sanitation and all these things. And this huge mass of humanity, the agriculturists, on whose sweat all of us prosper, live and maintain ourselves, for these persons, not single welfare officer has yet been appointed. I am sorry to say-and I am glad also." ज्या प्रचंड मानव समूहाच्या -कृषीकांच्या घामावर आपण जगतो, विकास साधतो त्यांच्याकरिता अजूनही एक कल्याणकारी अधिकारी नाही याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. जेव्हापासून मजूर वर्गाला प्रतिनिधित्व मिळाले आहे, आपल्या शासन व्यवस्थेत मजूर मंत्रालय आहे. तेव्हापासून मजुरांचे कल्याण हा आमच्या शासनाचा जिव्हाळ्याचा विषय ठरला आहे. संख्येच्या मानाने कामगारांपेक्षा शेतकऱ्यांचा समाज

ISSN 2231 4342

कितीतरी मोठा असताना ज्या सोयी व सवलती स्वातंत्र्य मंत्रालय व कल्याण अधिकारी नियुक्त केल्यामुळे कामगार वर्गाला मिळाल्या त्यापैकी एकही शेतकऱ्यांच्या वाट्याला आली नाही. याबाबत डॉ. पंजाबराव देशमुख यांनी खेद व्यक्त करून शासनाने व संविधान सभेने शेतकऱ्यांच्या हिताकडे कर्तव्यभावनेने लक्ष दिले पाहिजे , असे कळकळीचे आवाहन केले. शेतकऱ्यांच्या पोटी जन्माला आलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्याच्या समस्यांचे चटके लहानपणी अनुभवले होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी लढणे हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असे. अहोरात्र दीन, दलित, शेतकऱ्यांच्या विकासाचा ध्यास घेतलेले डॉ. पंजाबराव शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत व हितरक्षणासाठी अशाप्रकारे नेहमी जागृत असत.

डॉ. पंजाबराव देशमुखांनी मसुदा समितीने चर्चेसाठी मांडलेल्या विविध विधेयकावर सखोल अभ्यास करून आपली स्पष्ट मते मांडली. विधेयक दुरुस्त्या सुचवल्या. तरी पण त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्या स्वीकारण्यात आल्या नाहीत. म्हणूनच मागास जाती संबंधात राज्य घटनेबाबत ते म्हणतात, "आम्ही ची घटना स्वीकारणार आहोत त्या घटनेत मागास जातीच्या हितसंबंध यांचा म्हणावा तितका , अपेक्षेप्रमाणे विचार झाला नाही. याबाबत मला दुःख होत आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, वन्य जमाती यांच्या सारखीच दयनीय स्थिती इतर अन्य मागासलेल्या जातीची देखील आहे. त्यामुळे अनुसूचित जाती जमातीला लाभलेली सहानुभूती इतर मागासलेल्या जातींनाही लाभली असती तर जास्त चांगले झाले असते. ही सहानुभूती आगामी कायद्यात दिसेल अशी आशा आहे." असे स्पष्ट मत त्यांनी मांडले होते. अशाप्रकारे डॉ. पंजाबराव देशमुख प्रत्येक मुद्दा , बाब कायद्याच्या दृष्टीने योग्य की अयोग्य आहे हे तपासून पाहत होते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, " पदलीत जातीव्यतिरिक्त भारतात आणखी काही अत्यंत दुर्लक्षित, असह्य अशा जाती आहेत याची जाणीव घटना समितीतील बहुसंख्य सभासदांना डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यामुळे झाली व म्हणून त्यांच्याही प्रगतीसाठी भारतीय संविधानात काही तरतुदी करता आल्या." यावरून डॉ. पंजाबराव देशमुख यांचे विचार भारतीय संविधानाला कसे दिशा देणारे ठरले याची कल्पना येते.

२२ नोवेंबर १९४९ ला भारतीय संविधान सभेमध्ये बोलताना डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भारताच्या घटना समितीने स्वतंत्र व सार्वभौम भारताला साजेशी गड राज्यघटना अतिशय परिश्रमपूर्वक तयार केली त्यानिमित्त संपूर्ण घटना समितीचे अभिनंदन केले. पण तसेच ते संविधानामधील त्रुटी दाखवितांना म्हणाले की, “This parliamentary democracy is essentially ments for maintating the status quo….we want to keep the various layers of society where they were….this constitution does not last long, because it does not answere the aspirations of the man in the street at the present time” या संविधानात सामान्य माणसाच्या महत्त्वाकांक्षा यांचा , अपेक्षांचा काही विचार केला नाही. समाजातील वर्ग व्यवस्थेवर या संविधानाचा परिणाम होऊ शकणार नाही, काही जबरदस्त चुका - त्रुटी या घटनेत राहिल्या आहेत. बदलत्या परिस्थितीनुसार आणि आवश्यकता, गरजेनुसार आपणास घटनेत नेहमी दुरुस्त्या कराव्या लागणार आहेत. त्यामुळे ही घटना फार दिवस टिकली नाही तर मला त्यात आश्चर्य वाटणार नाही. असे डॉ. पंजाबराव देशमुख यांनी त्या ठिकाणी सूचित केले होते.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी घटना परिषदेच्या कामकाजात किती दक्षतेने आणि जागरूकतेने भाग घेतला, प्रसंगी पक्षाचे आदेश बाजूला सारून ही आपल्या विवेकाला व मनोदेवतेला पटेल ते निर्भीडपणे सांगून घटना परिषदेच्या तशा एरव्ही रुक्ष अशा कामकाजात कसा जिवंतपणा कायम ठेवला. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या २५ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनेच्या संपूर्ण चर्चेनंतर उत्तरादाखल केलेल्या भाषणातून स्पष्ट केले आहे. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले की, “The proceedings of this Constituent Assembly would have been very dull if all members had yielded to the rule of party discipline. Party discipline, in all its rigidity, would have converted this Assembly into a gathering of yes' men. Fortunately, there were rebels. They were Mr. Kamath, Dr. P. S. Deshmukh, Mr. Sidhva, Prof sexena and Pandit Thakur Das Bhargava. Alongwith them I must mention Prof. K. T. Shah and Pandit Hirday Nath Kunzru. The points they raised were mostly ideological. That I was not prepared to accept their suggestions does not diminish the value of their suggestions nor lessen the service they have rendered to the Assembly in enlivening its proceedings. I am grateful to them. But for them, I would not have had the opportunity which I got for expounding the principles underlying the Constitution which was more important than the mere mechanical work of passing the Constitution.” डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे वक्तव्य म्हणजे एका घटना पंडिताने घटना तत्त्वांचे मूलगामी विवेचन घटना परिषदेत करणाऱ्या डॉ. पंजाबराव देशमुख या प्रतिभाशाली कायदे पंडिताचा केलेला गौरव आहे. यातच डॉ. पंजाबराव देशमुख यांचे अलौकित्व आहे ही गोष्ट स्पष्ट आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणण्या नुसार घटना परिषदेचे सर्व सभासद जर पक्षाच्या कडक शिस्तीने बांधले गेले असते तर परिषदेचे कामकाज अत्यंत रुक्ष व कंटाळवाणे झाले असते. पण सुदैवाने ही सभासदांनी पक्षाची शिस्त मोडून बंडखोरी केली, त्यामुळे चर्चेला रंग येत गेला. श्री कामत , डॉ. पी. एस.देशमुख, श्री सिध्वा, प्रो. सक्सेना आणि पंडित ठाकूरदास भार्गव या बंडखोर याप्रमाणेच प्रो. केटी शहा व पंडित हृदयनाथ कुंजरू यांच्यामुळे सभागृह सदैव चैतन्य खेळत राहिले. त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे बहुतेक वैचारिक स्वरूपाचे होते. मला त्यांचे विशेष आभार मानले पाहिजेत. कारण त्यांनी जर आपले अस्तित्व प्रगट केले नसते तर घटनेसंबंधी ची काही पायाभूत मुलतत्वे सभागृहाकडे मांडायची मला संधी मिळाली नसती. घटना यांत्रिक रीतीने पास करून घेण्यापेक्षा ते तत्व विवेचन माझ्या दृष्टीने अधिक मोलाचे होते.

अशाप्रकारे घटना समितीतील चर्चेत ते सक्रिय सहभाग घेत असत . ग्रामीण व शेतकरी लोकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या तरतूदी राज्यघटनेत करून घेण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. अशा प्रकारे भारताच्या राज्यघटना निर्मितीत डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचे बहुमूल्य योगदान आहे.

निषकश - f डॉ. पंजाबराव देशमुख यांनी संविधान निर्मितीच्या कार्यात तळागाळातील लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. पुरोगामी विचारांचे त्यांनी नेहमीच समर्थन केले तर चुकीच्या संकुचित विधेयकावर ते शत्रूवर तुटून पडणाऱ्या योद्ध्यासारखे तुटून पडले व संकुचित विधेयक मांडणार यास ते मागे

घेण्यास भाग पाडले. अत्यंत सुस्पष्ट विचार, विद्वत्तापूर्ण वकृत्व यामुळे सभागृहाला त्यांचे मत मान्य करण्यापलिकडे पर्याय उरला नसे. वर उल्लेख केलेल्या विधेयकासोबतच डॉ. पंजाबराव देशमुख संपत्ती कर, घटनेचे हिंदीत भाषांतर, सनदी नोकर, साखरेच्या दूर्मिळतेचा प्रश्न, अधिक धान्य पिकवा इत्यादी विषयावर आपली मूलगामी व विचारपूर्वक मते निर्भीडपणे मानून सभागृहाला प्रभावित करीत असत. आपला देश शेतकऱ्याचा देश आहे शेतकऱ्यांना आणि मजुरांना सत्तेत मोठा वाटा मिळायला हवा आणि सरकारवरही त्यांचे वर्चस्व असले पाहिजे असे त्यांचे मत होते डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख सहसा लांबलचक भाषणे करत नसत.

संदर्भ –

1) http://cadindia.clpr.org.in/constitution_assembly_debates/volume/8 ,20 May 1949.
2) http://cadindia.clpr.org.in/constitution_assembly_debates/volume/4 23 Jully 1947.
3) Londhe, Shri S. R. & Other's (Ed.), Dr. P. S. Deshmukh's Selected Speeches, Pub. By, Dr. Panjabrao Deshmukh Diamond Jubilee Celebration Committee, 1960, P. No. 21
4) Londhe, Shri S. R. & Other's (Ed.), Dr. P. S. Deshmukh's Selected Speeches, Pub. By, Dr. Panjabrao Deshmukh Diamond Jubilee Celebration Committee, 1960, P. No.13
5) मेघे, प्रा. ज्ञानेश्वर, पुत्र, सर्वश्रेष्ठ धन निर्मात्याचा डॉ. पंजाबराव देशमुख, नागपुर, स्वयम् प्रकाशन, २००४, पृ.क्र.२९४ .
6) सावरकर , सुदाम आणि रा. ब. सूर्यकर , भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख जीवन व कार्य खंड - २ अमरावती, श्री शिवाजी शिक्षण संस्था, १९६४, पृ. क्र. ४३
Londhe, Shri S. R. & Other's (Ed.), Dr. P. S. Deshmukh's Selected Speeches, Pub. By, Dr. Panjabrao Deshmukh Diamond
Jubilee Celebration Committee,P. No. 31.
7) http://cadindia.clpr.org.in/constitution_assembly_debates/volume-11, 25 Nov. 1949.

ISSN 2231 4342

बिडकीन येथील ऐतिहासिक बारव

प्रा. डॉ. सय्यद मुजीब मुसा
इतिहास विभाग प्रमुख,
कला महाविद्यलाय बिडकीन, ता.पैठण

प्रस्तावना:-

विहीर किंवा बारव म्हणजे ज्यातून पाणी, कच्चे खनिज तेल, नैसर्गिक वायु खारे पाणी किवा इतर पदार्थ जमिनीतून काढण्यासाठी केलेल्या खोदकामास वा खोल खोदलेल्या खड्ड्यास विहीर वा बारव असे म्हणतात. यास विविध नावांनी ओळखले जाते उदा. आड, बाव, बावडी , कुप इत्यादी. कन्नड भाषेत विहिरीला कल्याणी, पुष्करणी, मराठीत बारव गुजराती भाषेत वाव तर संस्कृत मध्ये वापी तसेच प्राचीन नाव दीर्घा असे होत. शिवाय वापिका, कर्कन्धु, इ. संस्कृत नावे होत. जमिनीतील पाणी मिळविण्याची प्रथा जगभर अतिप्राचीन काळापासून प्रचलित आहे. विहीर वा बारवचे पाणी गोड असल्यास पिण्यासाठी आणि पिकांच्या सिंचनासाठी वापरले जात होते.

ऋग्वेदात तसेच रामायण महाभारत अशा विख्यात ग्रंथात व निरनिराळ्या पुराणामध्ये ही जागोजागी विहीर किवा बरवांचा उल्लेख आढळतो. सिंधू संस्कृतीच्या शोधनंतर जे उत्खन्न झाले या उत्खन्नात प्रत्येक घरात एक विहीर असल्याचे आढळून आले. कोटीलल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथात जल प्रबधासाठी विहीर, बारव ची नोंद आढळते. प्राचीन व मध्यकाळात विविध शासकांनी आपल्या साम्राज्यातील प्रजेसाठी व कृषीसाठी तलाव, विहीर, बारव बांधल्याचे दिसते.

मानवी वसाहतीच्या स्थापनेचा इतिहास पाहील्यास असे लक्षात येते की ज्या ठिकाणी चांगला, गोड पाणी आहे अशा ठिकाणी मानवाने वसाहती निर्माण केल्या. उदा. सिंधू व गंगा या प्रसिद्ध नद्याकाठी निर्माण झालेल्या वसाहती. उपलब्ध पाणी स्त्रोत वगळता भूगर्भात पाण्याचे अनेक प्रवाह

असतात. त्याचा शोध कसा घ्यावयाचा याचे नेमके तंत्र भारतीय लोकांनी शोधलेले आहे. यात काही प्रमाणात अपयश ही येताना दिसतो. भूमी अंतर्गत जलशोध ही संकल्पना जस-जसी विकसित होत गेली तसतसे नदी अथवा निसर्ग निर्मित जलाशय नसताना देखील नवनव्या वसाहती उदयास आल्या. ज्या ठिकाणी विशिष्ट अशा अनुकूल भौगोलिक परिस्थितीमुळे नगरचा विकास करणे योग्य ठरले व अशा ठिकाणी मोठया प्रमाणात पाण्याचा शोध घेवून विविध प्रकारचे आड, विहीर

 ISSN 2231 4342

बारव व पोखरणी निर्माण करण्यात आल्या. आधुनिक काळात देखील अशा विहिरी बारव अनेक ठिकाणी दिसून येतात. या ठिकाणाहून उपलब्ध होणारा पाणी पिण्यासाठी, शेती व इतर कारणांसाठी वापरला जावू लागला. अशा विहिरी, बारवातून आज ही सदरील कामसाठी मोठया प्रमाणात पाण्याचा वापर होतांना दिसतो.

भारतात किवा महाराष्ट्रात एका विशिष्ट काळात मंदिरांची निर्मिती मोठया प्रमाणात झाली. उदा. यादवांचा काळ, म्हणूनच यादवांच्या काळातील मंदिरे यादव शैली, हेमांडपंथी म्हणून ओळखली जात. महाराष्ट्रात मोठया प्रमाणात या शैलीची मंदिरे पाहावयास मिळतात. या मंदिराच्या स्थापत्य कलेबरोबर मंदिराच्या परिसरातच बारव निर्माण होऊ लागले. या बारव निर्मितीची स्थापत्य कला विकसित झाली. या बारवांचा उपयोग धार्मिक कामासाठी होऊ लागला. इ.स. 9 ते 13 व्या शतकापर्यंतचा काळ हा राजकीय अंगाने सामंतांचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात प्रबळ अशी सत्ता दक्षिण भारतात अस्तित्वात नव्हती. धार्मिक दृष्टीने या काळात मंदिराचे महत्व वाढले.

दांनातून खूप पैसा मंदिरांना मिळू लागला व या पैशातून मंदिराचा व परिसरचा विकास होऊ लागला. या विकासाचा एक भाग म्हणून मंदिर परिसरात बारव ची निर्मिती होत गेली. मंदीरा लागत आड, कुंड ची निर्मिती झाली व मंदिरात जाण्यापूर्वी अशा जलाच्या ठिकाणी आंघोळ केली जात. याचे

उदा. मुखेड येथील मंदिरालगतची आड, निलांगा येथील निलकांठेश्वर मंदिरातील आड, जामखेड येथील शिवमंदिर इत्यादि म्हणजे बारवाच्या विकासात मंदिर स्थापत्य किवा मंदिराची निर्मित, विकास कारणीभूत आहे असे म्हणता येईल. असे असले तरी अनेक बारव, विहीर ही फक्त मंदिरासाठीच म्हणून बांधलेली नव्हती. काही बारव हया मानवी वसाहतींची गरज म्हणून निर्माण करण्यात आलेल्या होत्या. पावित्र्यांच्या दृष्टीने किवा लोकांनी बारवात घाण टाकू करून बारवातील पानी दूषित करू नये म्हणून काही बारवांमध्ये वेगवेगळ्या हिंदू देवी-देवतांच्या मूर्ति स्थापन करण्यात आलेल्या आहे तर काही बारवात हिंदू देवी-देवतांच्या मूर्ति दिसत नाही.इ.सनाच्या 8व्या,9व्या शतकात दक्षिण भारतात विशेषत: आधुनिक मराठवाडा परिसरात आलेल्या सूफी संतांनी आपल्या विचाराच्या प्रसाराकरिता खानकाह बांधली व अशा सुफीच्या दर्गाह वर हजारो भक्त गण येत असे. अशा अनेक दर्गा जवळच बारवाची निर्मिती करण्यात येत होती याची अनेक उदा. आधुनिक काळात खुलताबाद, परभणी, पाथरी, बीड इत्यादी ठिकाणी पाहावयास मिळते.

बिडकीन येथील ऐतिहासिक बारव:-

मराठवड्यातील औरंगाबाद शहरापासून 20 कि.मि. अंतरावर असलेले बिडकीन हे आधुनिक काळात MIDC व DMIC शहर म्हणून प्रसिद्धीस आलेले आहे. मार्च 1666 मध्ये छत्रपती शिवाजी महाराज मोगल बादशाह औरंजेबच्या भेटी करीता (आग्रा भेट) निघाले असता बिडकीन मार्गे औरंगाबाद व आग्रा असा प्रवास केला असल्याची नोंद सापडते. पाणी किवा जलाच्या बाबतीत पैठण

येथील जायकवडी धरण वगळता बिडकीनला समुद्री किवा नदीचा किनारा लागलेला नाही. आज ही बिडकीन शहरात पाणी टंचाई दिसून येते. ही पाण्याची गरज भागविण्यासठी निलजगाव रोड येथे

जो आठवडी बाजार भरतो या ठिकाणी मध्यभागी बाराव आहे. या बारवचा उपयोग पाण्याची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी तत्कालीन काळात केला जात होता. ज्या पद्धतीने बेल्हे, अंबड, जालना येथे वसाहतीची गरज म्हणून बारावची निर्मिती केलेली होती तशीच निर्मिती किवा उपयोग बिडकीन येथील बारवचा केला जात होता. या बारव मध्ये खाली पायऱ्या द्वारे उतरतांना उजव्या व डाव्या बाजूला एक देवकोष्ट आहे. यात आसरा दैवत असल्याचे स्थानिकांचा मत आहे. याला सेंदूर चा लेप लावलेला आहे.

बिडकीन येथील बाराव एक प्रवेश द्वार असलेली असून खाली उतरण्यासाठी प्रथम 2.50 बाय 19.6 बाय 9 इंच च्या चार पायऱ्या व नंतर तीन फुटाचा प्लेन टप्पा आहे. नंतर खाली चार पाच पायऱ्यांचा समूह आहे. बाराव चा आकार लंब वर्तुळकार असून तो वरून पाहताना शंकराच्या पिंडासारखादिसतो. बारवची लांबी 100 फूट आहे व व्यास 50 फूट, प्रवेश द्वारची रुंदी 19.6 फुटाची आहे. बारावच्या दगडी बांधकामाची जाडी ही 2 फुटाची आहे. बाराव मध्ये पाण्याची पातळी जमिनीपासून 40 ते 45 फूट खोल आहे.

सदरील बाराव मध्ये कोणताही शिलालेख कोरलेला आढळला नाही. त्यामुळे याचा काळ अंदाजे 10 ते 14 व्या शतकातील असावा. बाराव मधील पाण्याचा उपयोग वापरण्यासाठी किंवा लोकवस्तीच्या गरजेसाठी केला जात होता. कारण बारवच्या वरच्या बाजूला पाणी शेंदण्याची व्यवस्था केलेली आहे. बाराव परिसरात हनुमान व महादेवाचा मंदिर आहे. या मंदिराला ऐतिहासिक वारसा असल्याचे स्थानिकाचे म्हणणे असून, मंदिराचा जिर्णोद्वार केलेला आहे येथे दर बुधवारी आठवडी

बाजार भरतो. या बारव मधील पाणी जनावराच्या पिण्यासाठी वापरले जाते. बाराव मध्ये कचरा असल्यामुळे सदरील बाराव मधील पाण्याचा उपयोग पिण्यासाठी केला जात नाही. येथील कचरा

साफ केल्यास संपूर्ण बिडकीन शहराची तहान भागविण्याची क्षमता या बारव मध्ये आहे. कारण उन्हाळ्यात देखील या बारवमधील पाण्याची पातळी खोल जात नाही.

निष्कर्ष:-

1)प्राचीन काळात नगरे वा शहरांची स्थापना पाण्याची व्यवस्था पाहून झाल्याचे दिसून येते.

2)पाण्याच्या उपलब्धतेसाठी विहीर, बारवचा उपयोग केला जात होता.

3)धार्मिक कार्यासाठी मंदिर,दर्गा या ठिकाणी बारव, विहीरीची निर्मिती जास्त प्रमाणात होता होती.

4)बारव,विहीरीच्या धार्मिक वा स्वछ्ते बाबतच्या दृष्टीकोणातून विविध देवी-देवतांच्या मूर्तीची

स्थापना बारव मध्ये केली जात होती.

5)बिडकीन येथील बारवचा उपयोग परिसरातील लोक पाण्याची गरज भागविण्यासाठी करीत होते.

6)काही बारव मध्ये उतरण्यासाठी एकापेक्षा जास्त मार्ग होते व हे मार्ग पायऱ्या द्वारे तयार केलेले

असत, बिडकीन येथील बारव मध्ये उतरण्यासाठी एकच मार्ग आहे.

संदर्भ सूची:-

1. डॉ. पाठक अरुणचंद्र,'महाराष्ट्रातील बारव स्थापत्य', मराठवाडा संशोधन मंडळ, न्युस्नेहा आफसेट,लातूर-2001.

2) ग.ह. खरे, दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, पुणे-1934 खंड-2.

3) ब्रहमानंद देशपांडे, शोधमुद्रा, औरंगाबाद-1976.

4) यु. म. पठाण, मराठवाड्यातील मराठी शिलालेख, औरंगाबाद-1989.

5) प्रत्यक्ष निरीक्षण, पाहणी, स्थळभेट.

प्रा.डॉ.सय्यद मुजीब मुसा
इतिहास विभाग प्रमुख,
कला महाविद्यलाय बिडकीन,ता.पैठण
मो.9890906117,smujeeb.syed@gmail.com

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

जैन व बुद्ध धर्म नितीमुल्य आणि आधुनिक इतिहासातील योगदान

सहा.प्रा.सुनिता भगवान पाटील
(इतिहास विभाग प्रमुख)
कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय
चोपडा जि. जळगांव
मो.- ९९७५०१८००५

❖ प्रस्तावना-

आधुनिक युगाचा पाया हा प्राचीन काळापासून सुरु असलेल्या धर्म परंपरेमुळे आहे. परंपरागत धार्मिक विचारनासुधारनेचे नवे रूप देऊन त्याला व्यापक बनवण्याचे, जनसामान्याच्या आटोक्यात आणायचे, एका अर्थाने धार्मिक क्रांती घडवण्याचे कार्य सर्वत्र इ.स. पूर्व ६ व्या शतकात गौतम बुद्ध व जैन धर्माने केले. इ.स. पूर्व ६ वे शतक हे इतिहासातील 'धार्मिक क्रांतीयुग' म्हणून ओळखले जाते. अनेक धर्म उदयास आले होते. त्यापेकीजैन व बुद्ध या दोन्ही पंथाना समकालीन बदलांची अधिक सर्वाधिक जाण होती आणि त्यांनी पुर्वकालीनविचारसणी आणि निति पूर्णपणे दूर करून तात्कालिनबदलांच्यादबावाला अधिक संवेदनशील प्रतिसाद दिला. अध्यात्मिक व धार्मिक जीवनात एक पोकळी निर्माण झाली होती. या जनतेच्या आर्ततेचा फायदा घेऊन तिच्या अध्यात्मिक दुःखावर उपाय सांगणारे, जिज्ञासू मनाचे समाधान करणारे अनेक स्वयंसिद्ध आचार्य जनतेच्या वैचारिक गोंधळात भर घालत होते. सन्यास व भोगवाद, कर्मवादव अक्रीयावाद, तर्कवाद व संदेहवाद व नास्तिकवाद इत्यादी परस्पर विरोधी विचारधारा फार मोठ्या प्रमाणात वाढत होत्या. त्यामुळे सामान्य जनता गोंधळून गेली याच पार्श्वभूमीवर जैन व बुद्ध धर्माने आपले कार्य केले.

❖ संशोधनाची उद्दिष्ट्ये—

१]जैन व बौद्ध धर्म तत्वाचा अभ्यास करणे.

२] व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी चारित्र्य, भूतदया, करुणा, प्रेम, वात्सल्य असणे आवश्यक आहे व ते जैन आणि बौद्ध धर्मातून कसे विकसीत झाले याचा अभ्यास करणे.

३] अहिंसेच्या आचरणातून देशा- देशात, राज्या – राज्यात, समाजात शांती नांदू टाकते.

४] ज्ञानप्राप्तीतूनआत्मानंद प्राप्तीचा अभ्यास करणे.

ISSN 2231 4342

विषय विवेचन–

१] जैन धर्म नितीमुल्य–

हिंदू धर्मातून जन्मलेल्या जैन धर्म हा प्राचीन धर्मांपैकी एक. भगवान महावीर हे चोविसावेतिर्थकार जी म्हणजे विजय व जिन म्हणजे विजय मिळवणारा अर्थातच ज्यांनी ज्यांनी आपल्या वाणीवर, वासनेवर, मनावर, कामावर विजय मिळवला नियंत्रणात ठेवले ते जिन यानुसार तात्पर्य की जितेद्री यांचा धर्म किंवा त्याद्वारे प्रसारित झालेला धर्म होय.जैन धर्म असे म्हणतात की मनुष्य मनुष्येत्तर प्राणी वनस्पती हे सर्व सजीव व या सर्वांना समान वागणूक मिळाली पाहिजे विश्वातील सर्व प्राणी मात्राचे कल्याण हे या धर्माचे सार होय जैन धर्मचा पुनर्जन्मावर विश्वास असून देव किंवा धार्मिक कर्म करावे मनुष्याला फारसी मदत करणार नसून त्याएवजी श्रद्धा, योग्यज्ञान, योग्य वर्तणूक ही तत्वेमहत्वाची आहेत असे हा धर्म मानतो

अहिंसा या धर्माचा मूळ गाभा असून त्यानुसार नेहमी सत्य बोलणे कोणाचेही मन न दुखवणे, कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेचा लोभ सोडून भोगवादी न बनणे अशी तत्वे होती. या धर्मात दिगंबर व श्वेतांबर असे दोन पंथ असून भगवान महावीर २४ वे तिर्थकार होते. त्यांनी दिलेली शिकवण पाळणे म्हणजेच या धर्माचे अनुसरण करणे होय. भगवान महावीरांची जयंती मोठ्या उत्साहात या धर्माच्या अनुयायांकडून साजरी केली जाते २०११ च्या भारतीय जनगणनेनुसार अहवालातील नोदीनुसारमहाराष्ट्रतीलजैन समाजाची लोकसंख्या १४००३४९ (१.२५ %) आहे महाराष्ट्रतीलजैन हे राजस्थान व मारवड प्रांत आणि गुजरात राज्यातून आले असून वेरूळ लेणी परिसरात हिंदू आणि बुद्ध लेण्याच्या बाजूला काही जैन लेणी आहेत

तिर्थकार महावीर हे शाश्वतवादी होते. त्याच्यामते जीव व जड ही दोनच द्रव्य असून दोन्हीच्या संयोगातूनच विश्व म्हणजे संसार निर्मिलेला असून जिवाचे मूळ सत चित व आनंद असे त्रयात्मक आहे. व यातूनच जीवाला संसाराचे बंधन प्राप्त होते जीव आणि जड दोन्ही शाश्वत पण अनंत आहेत त्यांच्या नाश होत नाही संसारातील बरेवाईट अनुभव अज्ञानातुनघडणाऱ्या कर्मामुळे येतात कर्माचा नाश झाला म्हणजे जिवाची संसारदशा संपूर्ण अखेर जीवाचा तो जीव बनतो जीवाचा जीव घडून येण्यास सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रम्हचर्यव अपरिग्रह या पंचवृताचे आचरण महावीरांनीसांगितले. अहिंसा तप आणि संयम हाच खरा धर्म असून अहिंसाखालोखाल त्यांनी आत्मविजयालाप्राध्यान्य दिले.

जो सहस्संसहस्साणसंगामेदुज्जए जिणे।

एगंजिज्जेज्जअप्पाणंएससेपरमोजओ॥

(लाखो लोकांशी संग्राम करून विजय मिळवणे हा खरा विजय नसून आत्म्याशी युद्ध करून त्यावर विजय मिळवणे हाच खरा विजय आहे)

 ISSN 2231 4342

जैनाच्या मते प्रत्येक वस्तुत जीव आहे म्हणून वागतांना कोणत्याही आत्माचे हनन होणार नाही याप्रमाणे काळजी घ्यावी जीवाचे चैतन्य व ज्ञान हे लक्षण असून सर्व जीवात्मे सारखी नसतात. प्रत्येकाला कर्माची फळे भोगावीच लागतात संसारी जीवनात असलेले चैतन्य किंवा ज्ञान अंधकारमय असते इंद्रियदमन, देहदंडण, संयम, निग्रह, त्याग, चिंतन, अध्ययन व कठोर तपाचरणाने आत्म्याची विविधता नष्ठ होऊन तो चैतन्यमय ज्ञानी व कर्मयुक्त बनतो जैन धर्मात नय सिद्धातही सांगण्यात आला आहे. नय म्हणजे जाणण्याचा दृष्टीकोणमतिज्ञान, शुतज्ञान, अवधीज्ञान मन पर्याप्तज्ञानकेवलज्ञान हे पाच प्रकारचे ज्ञान असून विविध दुष्टी कोणातून झालेल्या ज्ञानास नय ज्ञान म्हटले आहे. या धर्मात व्रत, उपास, कठोरतपाचार्यालामहत्व दिलेले आहे तपस्ये मध्ये प्रायचीत्त, सेवा, विनिय, स्वाध्याय, ध्यान आणि शरीरत्याग यांचा समावेश असून मोक्ष हे अंतिम उदिष्ट्य मानले. कर्मामुळे जन्म मृत्यूच्या क्रमातून मुक्त होत. हया आत्म्याच्या अवस्थेला केवलज्ञान प्राप्ती निर्वाण किंवा मोक्ष अशी नावे दिली.जैन धर्मातील आचारमार्गाने जीवाचा कर्मनाश होऊनचैतन्य व ज्ञानरूपआत्माची अवस्था शिल्लक राहते हीच अहर्त—मोक्षअवस्था होय.

❖ **बुद्धधर्मनितीमुल्य-**

भगवान बुद्धाच्या उपदेशामध्ये आत्मकल्याण आणि परकल्याणआत्मार्थ आणि लोकसेवा या सगळयांचा मेळ घातलेला दिसतो.बुद्धांनीअंतरिक साधनेपेक्षा लोकसेवाला व लोककल्याणला अधिक महत्व दिले आणि अन्तमुर्खापेक्षाबहिमुर्खाकडे वळले. भगवान बुद्धाचे संपूर्ण जीवनच एक समाधीअवस्था होती.स्थविरने म्हटलेच आहे चालतानाही भगवान समाधी अवस्थेत झोपतानाही समाधी अवस्थेत बसतानाही समाधी अवस्थेत समाधीअवस्था हीच भगवान बुद्धाची संपदा आहे.विनम्रता हे त्यांच्या व्यक्तीमत्वाचे वैशिष्ट्ये होते भगवान बुद्धाचे सर्वाधिक महत्वाचे कार्य महणजे त्यांनी जातीभेदाला केलेला विरोध ते म्हणत की ‘’ एखाद्याक्षेत्रियाने अथवा एखाद्या ब्राम्हणाने चंदनाचे तुकडे एकमेकांवर घासून उत्पन्न केलेला अग्नी व एखाद्या चांडाळाने एरंडाच्या काठ्या घासून उत्पन्न केलेला अग्नी दोन्ही सारखेच तेजस्वी असतात त्यांनी भिक्षु संघात कोणताच भेदभाव केला नाही ते भिक्षुंना सांगत की, “ ज्याप्रमाणे गंगा, यमुना, सरभू, मही इत्यादी मोठ-मोठ्या नद्या समुद्रात जाऊन मिळाल्यावर त्यांची वेगवेगळी नावे नाहीशी होऊन त्यांना महासागर हे एकच नाव प्राप्त होते त्याप्रमाणे क्षत्रिय, ब्राम्हण, वैश्य व शुद्र या चारही वर्णातील लोक जेव्हा आपले घरदार सोडून भगवंतानी उपदेशिलेल्या धर्म विनयामध्ये प्रवेश करतात तेव्हा त्यांचे आधीच नाव गांव नाहीसे होऊन ते केवळ शाक्यपुत्रीयश्रमण या नावाने ओळखले जातात.

भगवान बुद्धाना जन्मापेक्षा कर्मावर विश्वास होता जातीवरून माणसांचे मोठेपण भगवान बुद्धाना मान्य नव्हते अंतकरणाची शुद्धता हाच श्रेष्ठ यज्ञ असल्याचे ते मानत

न जच्चावसलो होती, जच्चा होती ब्राम्हणो।

कम्मुनावसलो होती, कम्मुना होती ब्राम्हणो॥

 ISSN 2231 4342

(जन्माने माणूस शुद्र होत नाही, जन्माने ब्राम्हण होत नाही. कर्माने माणूस शुद्र होतो कर्माने माणूस ब्राम्हण होतो) भगवान बुद्धांनी जे जेसांगितले ते ते सर्व सुभाषित झाले आणि भगवान बुद्ध श्रेष्ठ वक्ता झाले आपल्या तेजस्वी व्यक्तीमत्वानेमानवतावादाचे धडे देऊन या दिप्तीने भारताच्या इतिहासावर सर्व प्रथम प्रकाश पडला मानवजिवनदु:खमय असून दु:खाचे एक पूर्ण चक्र आहे यातून मुक्त होण्यासाठी त्यांनी अष्ठाग मार्ग सांगितला भगवान बुद्ध आणि धम्म इतके एकरूप झाले की त्यांना वेगळे करणे अवघड आहे ते स्वतः अनेक वेळा सांगत की जो धर्माला पाहतो तो मला पाहतो आणि जो मला पाहतो तो धर्माला पाहतो

आजही बुद्ध धर्माचे फार मोठे वैशिष्ट्य म्हणता येईल की तो भगवान बुद्धांनी फार सुंदर प्रकारे (सुआठ्यात) तर्क शुद्ध आणि रसाळपणे सांगितला आहे स्वाख्यातो भागवतो धम्मो तो चिकित्सक बुद्धीच पटणारा आहे या अर्थाने तो भौतिक सुष्टीतलेनियम नैतिक सुष्टीला लावून दाखवणारा आहे. ज्ञानाप्रमाणे बौद्धमतही उन्नत होते बौद्ध धर्मात श्रद्धेचे स्थान ज्ञानाने घेतलेले असूनएहीपास्सिको म्हणजे प्रत्यक्ष अनुभवाला या धर्मात महत्व आहे लोककल्याण हे बुद्धाचे तत्वज्ञान होते सजीव ज्यात जीव आहे अशा सर्व प्राणी मात्राविषयीनिस्सीम प्रेम हे गौतम बुद्धाच्या उपदेशाचे सार आहे अल्बर्ट आईनस्टाईन म्हणतो भविष्य काळातील धर्म हा वैश्विक धर्म असेल तो व्यक्तिगत शरीरधारी ईश्वराच्या पलीकडचा ठाम निश्चित अशा परंपरेने पाळत असलेल्या मतप्रणाली तसेच पराप्राकृतिक ईश्वराचा शोध घेणाऱ्या शास्त्रांना बाजूला ठेवणारा असेल विज्ञानाच्या गरजांची जर कोणता धर्म परिपुर्ती करीत असेल तर तो फक्त बौद्ध धर्म आहे.

❖ **जैन आणि बुद्ध तत्वज्ञानाचा प्रभाव—**

१] बौद्ध आणि जैन धर्मातील अहिंसा, सर्व प्राणिमात्रा विषयी प्रेम व सहानुभूती इ विचारांचा सर्व धर्मावर प्रभाव पडला त्यामुळे पुढे वैदिक धर्मियांना अहिंसा या तत्वावर भर देणे भाग पडले भारतीय राज्यघटनेतही या तत्वाचा समावेश करून सर्व विश्वची माझे घर ही संकल्पना उदयास आली

२] वैचारिक स्वातंत्र्य हे जैन व बुद्ध धर्मात खोलवररुजलेले असून त्यांचा हिंदुच्या कोणताही प्रकारच्या शंका उपस्थीत न करता वैदिक परंपराचे पालन करण्याच्या पारंपारिक विचारपद्धतीवर परिणाम झाला कुणाचेही स्वातंत्र्य हिरावून न घेता कल्याण करावे व कोणालाही त्रास होणार नाही या प्रमाणे आचरण असे तत्व होते त्यांचा प्रभाव आधुनिक इतिहासात होऊन राज्य घटनेच्या कलम १९ मध्ये सर्वाना स्वातंत्र्य देण्यात आले

३] सद्‌गुणांचा विकास —

बौद्ध व जैन धर्माने सत्य, अहिंसा, अस्तेय इंद्रिय संयम व मारक पदार्थाचे सेवन करू नये हिपंचशिलतत्वे पालन करण्याचा नुसता उपदेश केला नाही तर जंगलातील रानटी प्राण्यासारखे जीवन बनेल या पायावरच या समाजाचे तत्त्वज्ञान आधारले होते यातूनच पुढे आंबेडकरानी माणसांनी माणसांशी माणसासारखे वागावे हा उपदेश केला.

ISSN 2231 4342

४] समता तत्वाचा प्रभाव –

तथागत गौतम बुद्ध व महावीर जैन यांनी जात, संप्रदाय, वर्ण व सामातिक दर्जा ह्या कोणत्याही बाबीचा विचार न करता सर्व व्यक्तीमध्ये समता (eduality) प्रस्थापित करण्याविषयी धर्मोपदेश केला. त्यांचा जाती व्यवस्थेवर आधारलेल्या पारंपारिक हिंदू समाजरचनेवर प्रभाव पडला माणूस जन्माने मोठा नसून कर्माने मोठा असतो धर्म, जात, लिंग, वंश, परंपरा महत्वाच्या नसून आज कर्मवादमहत्वाचा आहे.प्रत्येक मनुष्याची कर्मानुसार त्यांची उंची ठरते 'द बुद्ध अंड हिज धम्म' मध्ये आंबेडकर म्हणतात की बुद्ध समतेचा पुरस्कर्ता होता आज भारतीय राज्यघटनेत समता तत्वाचा स्विकार असून कायद्यासमोर न्यायदानकरतांना कोणीही उच्च निच्च नसून सर्वाना एका तराजूत तोलले आहे.

५] नैतिक सिद्धांताचा प्रभाव –

करुणा, प्रामाणिकपणा, प्रेम, परोपकार, अहिंसा, श्रमाशिलता, शीलसंवर्धन चारित्र्य यासारख्या नैतिक बाबीवर बौद्ध आणि जैन धर्मात भर घालण्यात आली आहे. डॉ आंबेडकरांनीही त्यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाद विद्या फूकाची असून चारित्र्यविहीन शिक्षणाची अनुपयोगिता त्यांनी सिद्ध केली आहे.

६] कलेतील योगदान –

वास्तूविद्या लेण्यांचे आणि विहारांचे खोदकाम आदि श्रेत्रांत बौद्ध व जैन धर्माचे योगदान मोठे आहे त्याकाळी विहारे, स्तुप, मंदिरे, लेणी (गुफा) खोदकाम यासारख्या वास्तुविद्याश्रेत्रातील निर्मितीचा स्फोट झाला होता त्यामुळे इतर धर्मियांच्या कला श्रेत्रातील निर्मितीलाही चालना मिळाली होती.

७] स्थानिक भाषेतील साहित्य विषयक योगदान –

बुद्ध, बौद्ध भिक्खू आणि बौद्ध धर्म प्रचारकांनी धार्मिक विचार हे लोकांच्या नेहमीच्या भाषेत (पाली) मांडल्यामुळे बौद्ध धर्माचा प्रसार जलद गतीने झाला.त्यावेळी प्रचलित असलेल्या पालीसारक्या प्राकृत भाषेचा मोठा विकास झाला.जैनवाङ:मय प्राचीन व विपुल असून अर्धमाधवी व जैन प्राकृत भाषांमध्ये जैनांचेतत्वज्ञान, पुराने, काव्य आणि गणित वैद्यक,योगशास्त्र, राज्यशास्त्र व्याकरण इत्यादी विषयावर जैन आचार्यांनी ग्रथ लिहले. त्यांना जैनांचे आगम म्हटले गेले.बौद्ध व जैनधर्माने धार्मिक पुस्तकाच्या लिखाणाच्या माध्यमातून साहित्य विकासास हातभार लावला.

८] आर्थिक विकासाला प्रोत्साहन –

या धर्मानी भारत देशाच्या आर्थिक विकासाला चालना देवून स्थापत्य व शिल्पकलेसारख्या नवीन व्यवसायाची भर पाडली. बौद्ध धर्मीय चक्रवर्ती अशोक सम्राट तर जैनधर्मियकलींग नरेश खारवेल यांचे साम्राज्य जगातील शक्तिशाली होते. जगाच्या एकूण अर्थव्यवस्थेत सर्वाधिक महणजे ३४ % वाटा हा सम्राट अशोकाच्या

ISSN 2231 4342

साम्राज्याचा होता आज भारताचा जागतिक अर्थव्यवस्थेतील वाटा कमी असला तरी चीन व जपान हे दोन बौद्ध राष्ट्रे जागतिक अर्थव्यवस्थेत अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानी आहेत.

सारांश–

गौतम बुद्धांनीव महावीरांनी धर्माची स्थापना करून वेदकालीन यज्ञ क्रियेतल्या पशुहत्यांना जन्मजात उच – निचतेला लगाम घालण्याचे काम करत समाजाला योग्य दिशा दाखविली. त्यामुळेच समाजात बहुजनांना दिलासा मिळाला आणि नव मानवतावादी धर्माकडे आकृष्ठ झाले. दया, अहिंसा, शांती, मानवतावाद आणि समानता या चिरंतन तत्वांनी जीवनातल्या खडतरतेवर आणि दुःखावरमात करता येते हे त्यांनी जगाला सांगितले पूर्व आशियातील अनेक देशांत आज हे धर्म फोफावले आहेत डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मातर करताना बौद्ध धर्माची निवड केली ते म्हणतात माझ्यामतानुसार बुद्धाचा धम्म श्रेष्ठ आहे दुसऱ्या कोणत्याही धर्माची त्याचेशी तुलना केली जावू शकत नाही जर एखाद्या विज्ञाननिष्ठ आधुनिक व्यक्तीला धर्म हवा असेल तर त्याला बौद्ध धर्मा शिवाय पर्याय नाही असे माझे पक्के मत सर्व धर्माचा २१ वर्ष सखोल अभ्यास केल्यावर झाले आहे.

बौद्ध आणि जैन धर्म निरीश्वरवादी असल्यामुळे हिंदू धर्मातल्या सारख्या अवतार ही संकल्पना या धर्मामध्ये स्पष्टपणे स्विकारलेली दिसत नसली तरी अप्रत्यक्षपणे ती दोन्ही धर्मामध्ये आपली मुळे धरून आहे. दोघांनीही तात्कालीन समाजजिवनातीलदुष्टरूढीविरुद्ध बंड करून श्रमण संस्थेला प्रतिष्ठापीत केले दोघांनीही राजापासूनरंकापर्यंत सर्व वर्गातले जातीतले शिष्य अनुयायी गोळा करून श्रमण संघाची स्थापना करून प्रचलित जातीव्यवस्थेवर कडाडून हल्ला केला. दोघांनीही जात, कुळ, धर्म याला महत्व न देता मानसाच्या उत्तम चारित्र्याला महत्व दिले. निर्वाण मोक्ष ही ईश्वराची देणगी व कृपा नसून सम्यक सवयीचा अवलंब करून प्रत्येकाने तो स्वतःच्यापुरुषार्थाने साध्य करून घ्यायचा असतो हेच दोघांनीही सांगितले

आधुनिक भारतीय इतिहासातील लोकशाही स्वातंत्र्य व समतेचा अग्निस्त्रोत असलेल्या जैन व बौद्ध धर्माचे योगदान मोलाचे आहे. देशाच्या स्वातंत्र लढ्यात गांधीजीनी अहिंसा हे तत्व स्वीकारून बलाढ्य साम्राज्याविरुद्ध लढा दिला.अनेक धर्मसुधारण आंदोलन राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, स्वामी विवेकानंद, शाहू महाराज, आंबेडकर, सयाजीराव गायकवाड अशा कितीतरी समाजसुधारकांचे धोरण अप्रत्यक्षपणे जैन व बुद्ध धर्मावर आधारित असून मानवतावादीदृष्टीकोण विकसित होण्यास मदत झाली. भारतीय राज्यघटनेतहिस्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्ष, लोकशाही,गणराज्य या संकल्पना आल्या.आज आपल्या भारतीय राष्ट्रध्वजात बुद्ध चक्र अंकित आहे यातच बुद्ध धर्माचे महात्म्य सामावले आहे.

ISSN 2231 4342

संदर्भ ग्रंथ —

१) डॉ. धनंजय आचार्य — प्राचीन भारत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर पृष्ठ क्र. ९८-१०८

२) रोमिलाथापर— प्राचीन भारताचा इतिहास, के सागर प्रकाशन पृष्ठ ६८

३) डॉ. अनिल कठारे- प्राचीन भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन पृष्ठ १४०-१७०

४) प्रा.ए.वायकोंडेकर— प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास, निरालीपब्लिशर्स, पृष्ठ क्र.१०-११

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद__ 27, 28 फेब्रुवारी 2019

आयोजक__शिवाजी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय कन्नड

शोधनिबंधाचे नाव__ स्थानिक इतिहास लेखन

डॉ. उर्मिला क्षीरसागर
श्रीमती. मथुबई गरवारे कन्या
महाविद्यालय सांगली
मो. 9970516679
ई-मेल kshirsagarurmila@yahoo.co.in

प्रस्तावना-------इतिहासाच्या संशोधनातून मानवी समूहाचे अस्तित्वाचे स्वत्वाचे समस्यांचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न निरंतरपणे घडत आला आहे. ऐतिहासिक ज्ञान वास्तवाला अनेक प्रकारे प्रभावित करत असते. व्यक्तीला स्वतःच्या सामाजिक अस्तित्वाची व अस्मितांची ओळख इतिहासातून घडत असते नव्या सामाजिक अस्मितांच्या उभारणीसाठी इतिहासाची नवी मांडणी आवश्यक ठरते.माणसामाणसांमधील नातेसंबंधाचे ज्ञान म्हणजे नीतिविचार ही इतिहासातून प्राप्त होत असतो. प्रचलित इतिहास लेखन प्रवाहांच्या मी माणसे मधूनच इतिहास लेखनाच्या नवनव्या शक्यता निर्माण होत असतात. इतिहास लेखनामध्ये स्थलं किंवा ठिकाण हा घटक महत्त्वाचा आहे .अलीकडे मानवी जीवनाशी निगडित सर्व विषयांची चर्चा इतिहासाच्या कक्षेत होऊ लागली आहे. इतिहासातील नव्या प्रवाहांनी इतिहास समृद्ध बनत चालला आहे. यातील स्थानिक इतिहास लेखन हा महत्त्वाचा इतिहास प्रकार व प्रवाह आहे. प्रस्तुत शोधनिबंधात स्थानिक इतिहास लेखनाचे महत्त्व अधोरेखित करण्याचाचा प्रयत्न केला आहे.

इतिहास म्हणजे काय-------------इतिहासात मानवाच्या वैशिष्ट्यपूर्ण घटनांचा विचार केला जातो. इतिहासाचा अर्थ चौकशी असा आहे, तसाच मानवी समाजातील वेगवेगळ्या बाबींचा शोध घेणे असाही अर्थ आहे .इतिहासकरांना भूतकाळ सजीव करावा लागतो .इतिहासात राजकीय घडामोडी बरोबरच समाजाची सांस्कृतिक प्रगती विविध काळातील आर्थिक सामाजिक परिस्थिती या गोष्टींना प्राधान्य दिले जाते. इतिहास भूतकाळ, वर्तमानकाळ यांच्यामधील अखंड संवाद आहेव्हॉल्टीरने इतिहासाचे तत्त्वज्ञान ही संज्ञा प्रथम वापरली. इतिहास सत्याशी निगडित व पुराव्यावर आधारित असतो. इतिहास हा समकालीन असतो. गतकाळाच्या चे मूल्यमापन करण्याची क्षमताही त्यामध्ये असते.

इतिहासाचेप्रकार-------------भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ जाणण्याच्या मानवी जिज्ञासेने मधूनच इतिहासाचा उदय झाला. आधुनिक काळात प्रत्येक विषयाच्या अभ्यासात विशेषीकरणआला खास महत्त्व आहे. आता केवळ राजकीय इतिहासावर भर न देता मानव समाजाच्या सर्व अंगांचा तपशीलवार अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली आहे. इतिहासाची व्याप्ती विशाल आहे. इतिहासाचे काटेकोर प्रकार पाडणे शक्य नाही तरी

ISSN 2231 4342

अभ्यासाच्या सोयीसाठी व आवश्यकते पोटी विचारवंतांनी काही प्रकार पाडले आहेत राजकीय, घटनात्मक, सामाजिक, वैचारिक, धार्मिक, आर्थिक ,भूगोल, समकालीन ,जगाचा इतिहास व स्थानिक इतिहास इत्यादी. इतिहासाचार्य राजवाडे यांनी देशिक,कालिक, वांशिक या तीन प्रकारात विभागणी केली आहे. काही इतिहासकारांनी इतिहासाचे विभाजन करताना काळाला महत्त्व देऊन प्राचीन ,मध्ययुगीन व आधुनिक असे प्रकार केले आहेत .इतिहासाची विभागणी इतिहासकारांनी आपल्या सोयीप्रमाणे केली आहे त्यामुळे त्याला चाकोरीबद्ध स्वरूप देता येणार नाही.

स्थानिकइतिहास--------------स्थानिक इतिहास हा इतिहासाचा प्रकार इतिहास लेखक व वाचक या दृष्टीने सापेक्ष आहे. आपण जगाचा व देशाचा इतिहास पाहतो पण आपण जेथले आहोत तेथील राजकीय ,सांस्कृतिक ,आर्थिक वगैरे घडामोडींचा अभ्यास ज्ञात असतोच असे नाही ,तो ज्ञात होण्यासाठी स्थानिक इतिहासाचे लेखन व अध्ययन होणे अत्यावश्यक आहे, कारण एकूण देशाचा इतिहास लिहिला जात असताना या सूक्ष्म बाबी अत्यंत दुय्यम ठरून दुर्लक्षणीय देखील ठरू शकतात त्यामुळे स्थानिक इतिहास हा महत्त्वाचा ठरतो.फ्रेंच राज्यक्रांतीनंतर अशा प्रकारच्या इतिहास लेखनाला महत्त्व आले.इंग्लंडमध्ये तर 1902 सालापासून शैक्षणिक अभ्यासक्रमात स्थानिक इतिहास सक्तीचा करण्यात आला आहे.

या प्रकारच्या इतिहासामुळे ज्यांना देशाच्या इतिहासात फारसे व उचित स्थान मिळालेले नसते अशा व्यक्ती, जमाती ,सांस्कृतिक वैशिष्ट्ये ,आर्थिक घडामोडी ,राजकीय घटना इत्यादीचा सखोल व विशाल प्रमाणात अभ्यास होतो. अर्थातच राष्ट्रीय इतिहासाला हा अभ्यास पूरकच असतो त्यामुळे स्थानिक इतिहासाला दिवसेंदिवस महत्त्व येत चालले आहे. स्थानिक इतिहास ज्या प्रादेशिक विभागाचा अभ्यास करतो त्या विभागाशी निगडित असलेल्या बाबींना प्राधान्य दिले जाते ,उदाहरणार्थ एखाद्या गावाचा स्थानिक इतिहास अभ्यासताना त्या गावची प्रसिद्धी ज्या गोष्टीबाबत असेल अशा गोष्टींच्या अभ्यासाला आपोआपच महत्त्व प्राप्त होते .स्थानिक इतिहासात स्थानिक दृष्टीने महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या गोष्टींचा अभ्यास विशेषतः केला जातो. स्थानिक इतिहासात प्रामुख्याने गाव शहर किंवा संस्थांचा विचार केला जातो त्यात सामाजिक ,राजकीय, सांस्कृतिक ,आर्थिक इत्यादी बाबींचा सखोल अभ्यास केलेला असतो. स्थानिक माहिती मिळविण्यासाठी त्यांचा फार उपयोग होतो इतिहास लेखन ही अखंडपणे चालणारी प्रक्रिया आहे. इतिहासाच्या जडणघडणीमध्ये समाजातील विविध घटकांचा देखील सहभाग असतो, कारण इतिहास हा घटक मुळातच व्यक्ती समाज स्थल व काल या चार घटकांनी मिळून बनलेला आहे. इतिहासामध्ये स्थलं किंवा ठिकाण हा घटक खूपच महत्त्वाचा आहे उदाहरणार्थ एखादी लढाई कोणत्या दोन सत्तामध्ये झाली याचा अभ्यास करताना ती लढाई जेथे झाली त्या ठिकाणचे भौगोलिक महत्त्व ही ध्यानात घ्यावे लागते . लेखनासाठी प्रत्येक गाव ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. प्रथम गावचे इतिहास लेखन मग तालुक्याच्या स्थळाचे इतिहास लेखन अशी मांडणी केल्यास प्रादेशिक व राष्ट्रीय इतिहासामध्ये भर घालता येईल.स्थानिक इतिहासामधील गावाचा इतिहास समाविष्ट केला जातो परंतु गावाच्या एखाद्या भागाचा किंवा एखाद्या पेठे चा इतिहास हा मुद्दा स्थानिक इतिहासामध्ये समाविष्ट करता येतो तसेच

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

एखाद्या विद्यापीठाचा इतिहास हा सुद्धा स्थानिक इतिहास म्हणून गणला जाऊ शकतो. स्थानिक इतिहासामध्ये इतिहास लेखनासाठी निवडलेल्या स्थानाच्या भौगोलिक घटका प्रमाणे सांस्कृतिक व मानसिक घटकही अतिशय महत्त्वाचे आहेत .डॉक्टर अरुण टिकेकर यांनी संपादित केलेल्या शहरपुणेसांस्कृतिक संचिताचा मागोवा, या पुस्तकाच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत स्थानिक इतिहासाची चर्चा केली आहे .स्थानिक इतिहास अथवा लोकलहिस्टरी ही पाश्चिमात्य देशांमध्ये प्रगत झालेली व आता मान्यता पावलेली संकल्पना आहे.लोकलहिस्ट्री ही संकल्पना नवीन असली तरी जुन्या काळातील अनेक लेखकांनी शहराविषयी संस्कृतिक केंद्रा विषयी लिहिताना ती अनुसरली आहे. आपल्याकडे स्थल महात्म्यसांगणाऱ्या अनेक पोथ्या मिळत होत्या, त्यांचा हा नवा व शास्त्रीय अवतार म्हणता येईल.त्यापोथ्याच्यालेखकांनाही स्थानीयइतिहासकार म्हणता येईल स्थानिक इतिहास लिहितानाइतिहासकार त्या भावना ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असलेल्या व्यक्ती यांच्या आधारे शब्दबद्ध करतो कधी स्वतःच्या स्मरणातून तर कधी इतरांना बोलके करून त्यांच्याकडून वदवून घेतलेल्या मौखिक इतिहासाच्या ओरलहिस्टरी रुपात मांडतो

गावाचे इतिहास लेखन करताना गावातील वास्तू महत्त्वाच्या ठरतात त्या इतिहास सांगणाऱ्या असतात वास्तूंनी त्या त्या काळाचे प्रतिनिधित्व केलेले असते .एखादी ऐतिहासिक वस्तू पाहताच अंगावर रोमांच उभे राहत असतील तर ते ऐतिहासिक पद्धतीने शब्दबद्धकरावयास हवेत. एडवर्ड गिबन हा इंग्रज इतिहासकार 15 ऑक्टोबर 17 64 रोजी रोम शहर पाहण्यासाठी गेला असता तेथील टेकडीवरच्या देवालयाचे भग्नावशेष पाहून त्याला रोमच्या ऱ्हासाचीकहाणी लिहावी ही कल्पना सुचली,तसे त्याने त्याच्या आत्मचरित्र मध्ये नमूद केले आहे. ते शब्दबद्ध करण्यासाठी त्याने पुढील अनेक वर्षे खर्च केली

स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा एक उपविभाग. एखाद्या स्थानाभोवतीकिंवा ठिकाणभोवतीकेंद्रित राहून त्या स्थानाचे इतिहास लेखन करणे म्हणजे स्थानिक इतिहास लेखन करणे होय .महाराष्ट्रातील इतिहास अभ्यासक, साहित्यिक ,पत्रकार इत्यादींनी आपल्या लेखांमधून स्थानिक इतिहास लेखनात योगदान दिले आहे .स्थानिक इतिहास लेखनाची ही दृष्टी आता प्रगत होत आहे.

स्थानिक इतिहास लेखनाचा आढावा------------इंग्लंडमध्ये सोळाव्या शतकात स्थानिक इतिहास लेखनाची प्रक्रिया सुरू झाली. त्याच वेळी फ्रान्समध्ये स्थानिक किल्ले आणि चर्च शस्त्रास्त्रे ,संग्रहालये, घराणी इत्यादीचा इतिहास लिहिला जाऊ लागला.एकोणिसाव्या शतकात हा लेखन प्रवाह अमेरिका खंडामध्ये पोहोचला .अमेरिकेमध्ये एकोणिसाव्या शतकामध्ये व्यापारी, उद्योगपती, प्रसिद्ध व्यक्ती चर्चचा कारभारपाहणारे अधिकारी व मिशनरी यांनी 1840 मध्ये आपापल्या क्षेत्रातील उद्योगांचा व व्यवसायाचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केली.इंग्लंडहुन अमेरिकेमध्ये स्थायिक झालेल्या लोकांनी स्थानिक पातळीवरील उद्योग, अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेले स्थानिक नेते, स्थानिक भौगोलिक घटकांचा अभ्यास करून त्याविषयीच्या स्थानिक इतिहासाची मांडणी केली.

 ISSN 2231 4342

महाराष्ट्र मध्ये गोविंद नारायणमाडगाव करांचा 1863 मध्ये प्रसिद्ध झालेला 'मुंबईचे वर्णन' हा ग्रंथ ना.वि.जोशी यांचा 1868 मध्ये प्रकाशित झालेला' पुणे शहराचे वर्णन' हा ग्रंथ याद्वारे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातच मराठीमध्ये स्थानिक इतिहासाचा पाया घातला गेला होता .विसाव्या शतकात ही परंपरा वृद्धिंगत झाली.नागो.चापेकर यांचे बदलापूर आमचा गाव- 1933,दे.गो. लांडगे यांचा नागपूरचा संस्कृतिकइतिहास-1954,राजूरकरांचा चंद्रपूर चा इतिहास- 1956 ,पु.पा.गोखलेयांचा जागृत सातारा -1962 ,या ग्रंथात पासून अरुण टिकेकर(संपादक) व अभय टिळक (सहाय्यक संपादक) यांच्या शहर पुणे एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा - 2000 द्विखंडीमोठ्या प्रकल्प पर्यंत स्थानिक इतिहासाची मोठी परंपरा मराठीत आढळते .शिवायम. श्री दीक्षित यांनी लिहिलेले खेडराजगुरुनगर-2003, हे पुस्तक स्थानिक इतिहास लेखनाचे उदाहरण डॉक्टर राजा दीक्षित यांचा पुणे विद्यापीठाचा इतिहास -1999 ,अरुण टिकेकर यांचा ऐसा ज्ञानसागरुबखर मुंबई विद्यापीठाची -2006, हे दोन्ही ग्रंथ शैक्षणिक स्थानिक इतिहास लेखनाची महत्त्वाची उदाहरणे आहेत.ही सर्व ग्रंथसंपदा स्थानिक इतिहास लेखन व संशोधनासाठी मार्गदर्शन पर व उपयुक्त आहे .स्थानिक इतिहासाविषयी संशोधन करताना ऐतिहासिक ,भौगोलिक ,सामाजिक ,धार्मिक व सांस्कृतिक ,आर्थिक ,राजकीय व प्रशासकीय इत्यादी विविहे पैलूंचा स्वतंत्रपणे अभ्यास केला जाऊ शकतो.

स्थानिक इतिहासाचे महत्त्व---------------सखोल अभ्यास करायचा तर स्थानिक इतिहास महत्त्वाचा ठरतो. स्थानिक इतिहासात स्थानिक दृष्टीने महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या गोष्टींचा अभ्यास विशेषतः केला जातो. इतिहासाचा व्यापक दृष्टिकोनातून अभ्यास करताना स्थानिक दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या गोष्टीकडे दुर्लक्ष होऊ शकते, हे टाळण्यासाठी स्थानिक इतिहास उपयोगी आहे. उदाहरणार्थ सातारा जिल्ह्यात 1942 चले जाव आंदोलन जोरात होते.क्रांतिकारकांनीप्रतिसरकारस्थापन केले, त्याचे स्थान व कार्य जिल्ह्यात मोठे आहे .भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास लिहितानाप्रतिसरकारच्या कार्याला योग्य न्याय दिला जाईलच असे नाही, परंतु तेच सातारचा स्थानिक इतिहास लिहितानाप्रतिसरकारच्या कार्याची योग्य दखल घेणे सहज शक्य होईल. स्थानिक इतिहास लिहिण्यासाठी प्रोत्साहितकरणाऱ्या काही संस्था व संघटना आहेत. उदाहरणार्थ अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद वगैरे अशा परिषदांमधून नवोदित अभ्यासकांना व संशोधकांना आपले शोधनिबंध सादर करण्याची उत्तम संधी मिळते .त्या विषयावर चर्चा चिकित्सा होऊन अभ्यास्काकडून मार्गदर्शन मिळते. अशा परिषदांचा एक फायदा म्हणजे त्यांच्या कडून स्थानिक इतिहासाच्या अभ्यासात गती प्राप्त होते. त्या त्या भागातील चालीरीती,परंपरा ,ऐतिहासिक व्यक्ती, त्यांचे कार्य ,संस्था या सर्वांचा अभ्यास चांगल्या प्रकारे होऊ शकेल .स्थानिक इतिहास लेखनासमहत्त्व देणाऱ्या हा इतिहास समाजापुढे आणण्यासाठी अशा प्रादेशिक संस्थांची समाजाला अत्यंत गरज आहे, त्यामुळे केवळ राष्ट्रीय इतिहासच महत्त्वाचा मानणे चुकीचे आहे .स्थानिक इतिहासाच्या पायावरच राष्ट्रीय इतिहासाची इमारत उभी राहिलेली असते.

प्रत्येकाला आपल्या गावाच्या शहराच्या विभागाच्या परंपरा, वैशिष्ट्ये, इतिहास यासंबंधी पुरेशी माहिती झाली तर त्याला त्या संबंधित रास्त अभिमान बाळगता येईल. ही माहिती स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाद्वारे चांगल्या

तऱ्हेने होईल. स्थानिक दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या गोष्टींचा सखोल अभ्यास होऊन त्या ठिकाणी घडलेल्या ऐतिहासिक घडामोडींना योग्य न्याय मिळेल. प्रसिद्ध व्यक्तींच्या कर्तृत्वाची खऱ्या अर्थाने दखल घेता येईल .या माध्यमातून नवोदितयांमध्ये इतिहासाच्या अभ्यासाची आवड निर्माण करता येईल.

समारोप--------स्थानिक इतिहास हा इतिहासाचा अलीकडे लोकप्रिय होऊ घातलेला एक इतिहासाचा प्रकार होय .आधुनिक काळात इतिहासाच्या संकल्पनेत बदल होत जाऊन इतिहासाचा संबंध मानवी प्रगतीशी जोडला गेला .मानवी समाजातील विविध बाबींचा शोध इतिहासात घेतला गेला. आधुनिक काळात नवे विचार नवे प्रवाह इतिहास लेखनात येत आहेत .एकूण देशाचा इतिहास लिहित असताना सूक्ष्म बाबी दुय्यम ठरून दुर्लक्षित राहतात त्यामुळे स्थानिक इतिहास महत्त्वाचा ठरतो .स्थानिकइतिहासाचे लेखन व अध्ययनहोणे अत्यंत आवश्यक वाटते.नवोदितांच्या मनात इतिहासाच्या अभ्यासाची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने स्थानिक इतिहास अतिशय महत्त्वाचा ठरतो. स्थानिक इतिहासाचे धागे राजकीय ,सामाजिक ,सांस्कृतिक, आर्थिक,स्वरूपाचे असू शकतात .शेवटी इतिहास अशा प्रकारच्या उभ्या आणि आडव्या धाग्यांनी बांधलेला असून या धाग्यांची वीण जेवढी दाट होईल तेवढे इतिहासाचे महावस्त्र अधिक तलम आणि पक्के होत .

संदर्भ-

1.जोशी लक्ष्मणशास्त्री,संपादक मराठी विश्वकोश खंड 2 महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई 1976

2.आठवले सदाशिव, इतिहासाचे तत्त्वज्ञान ,प्राज्ञ प्रकाशन,वाई 1967

3.देव प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, ब्रेन टॉनिक प्रकाशन ,नांदेड 2002

4.भांबुरकर जास्वंदी, संपादक, इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, पुणे 2014.

5.फडके य. दि. विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड पाचवा ,के सागर प्रकाशन ,पुणे 2012.

6.विश्वासराव प्रकाश, प्रकाशक, इतिहास लेखन मिमांसा, निवडक समाज प्रबोधन पत्रिका, खंड1, मुंबई 2010.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal **ISSN 2231 4342**

लोकचळवळीतून झालेले मुरुड- जंजिरासंस्थान विलीनीकरण

प्रा. डॉ. प्रभाकर गणपत गावंड
सुंदरराव मोरे महाविद्यालय
पोलादपूर, जि. रायगड
भ्रमणवनी 9423382078
ईमेल- pggawand@gmail.com

भारत हा प्राचीन काळापासून अनेक छोट्या-मोठ्या राजसत्तांमध्ये विखुरलेला देश होता.मध्ययुगीन कालखंडात अनेक परकीय सत्तांनी भारतीय प्रदेश हस्तगत करून आपले स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित केले.मुरूड-जंजिरा हे त्यातीलच एक स्वतंत्र राज्य (संस्थान) होय. जझिरा हा मूळ अरबी शब्द असून त्याचा अर्थ बेट असा होतो. याच शब्दाचा 'जंजिरा' हा अपभ्रंश होय. या प्रांताला हबसाण असेही म्हटले जाई.[1]

1857 च्या उठावानंतर संस्थानांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ब्रिटिश सरकारने आय.सी.एस.व लष्करातून निवडलेल्या व्यक्तींची पोलिटिकल सव्हिस ही यंत्रणा कार्यान्वित केली.प्रमुख संस्थानांसाठी रेसिडेंट व इतर संस्थानांमध्ये पोलिटिकल एजंट नेमले जाऊ लागले. त्यामुळे कुलाबा जिल्ह्याचा कलेक्टर हा जंजिरा संस्थानाचा पोलिटिकल एजंट 1869 पासून म्हणून काम पाहू लागला.[2] आणि येथपासूनच ख-या अर्थाने जंजिरा संस्थान हे इंग्रजांच्या मांडलिकत्वाखाली येण्यास सुरुवात झाली. 1857 च्या उठावातील अपयशानंतर भारतीयांमध्ये निर्माण झालेल्या राष्ट्रीयत्वाच्या जाणीवेतून भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी 1885 मध्ये एका देशव्यापी चळवळीने जन्म घेतला. भारतीय प्रदेशात स्वातंत्र्य प्रेमाचे वारे वाहत असताना जंजिरा संस्थानात मात्र राजकीय जागृतीचा लवलेशही नव्हता.मात्र संस्थानाच्या बाहेर ब्रिटिशांच्या विरोधातील चळवळीच्या बातम्या येथील लोकांपर्यंत पोहोचत होत्या.

19 व्या शतकाच्या अखेरीस मात्र संस्थानाच्या जुलमी कारभाराविरुध्द वाचा फोडण्याचा पहिला प्रयत्न झाला.सखाराम घैसास या संस्थानी प्रदेशातील नागरिकाने हा प्रयत्न केला.त्यांनी 'लोकसभा' नावाची संघटना स्थापन केली.[3]1918 मध्ये श्री.भास्कर पेंडसे यांनी पुढाकार घेऊन मुंबईमध्ये जंजिरा रयत सभा ही संघटना स्थापन केली.[4]ख-या अर्थाने राजकीय जागृतीची ही नवी पहाट होती.

1921 मध्ये महाराष्ट्राच्या दक्षिण भागातील स्वायत्त संस्थानांची परिषद 24 व 25 डिसेंबर रोजी पुणे येथे भरली.जंजिरा संस्थानचे प्रतिनिधीत्व सखाराम घैसास व भास्कर पेंडसे यांनी केले होते.या परिषदेत 'दक्षिणी हितवर्धक सभा' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.1926 मध्ये जंजिरा संस्थानातील म्हसळा येथे जंजिरा संस्थान प्रजा परिदेचे अधिवेशन भरले.श्री.गो. ह. साठ्यो हे या परिषदेचे अध्यक्ष होते. 1927 अखिल भारतीय संस्थान लोकपरिषद ही संघटना स्थापन झाली.

 ISSN 2231 4342

या परिषदेचे अधिवेशन मुंबईत 17 व 18 डिसेंबर 1927 रोजी भरले. त्यास देशभरातून 1500 प्रतिनिधी उपस्थित होते.[5] 1928 मध्ये राष्ट्रीय सभेच्या कलकत्ता येथील अधिवेशनात संस्थानी प्रजेला प्रातिनिधिक संस्थांवर आधारित जबाबदार राज्यपध्दती मिळावी अशी मागणी केली. संस्थानी प्रजेने आपल्या न्याय्य हक्कांसाठी चालविलेल्या लढ्याला राष्ट्रीय सभेचा पाठिंबा असेल असे जाहीर केले.

1930 मध्ये सविनय कायदेभंग चळवळ सुरू झाली.जंजिरा संस्थानातील अनेक तरुण मुंबई-ठाण्यामध्ये वास्तव्यास होते.त्यांनी या आंदोलनामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.मुंबई मध्ये वडाळा येथे मिठाचा सत्याग्रह करण्यात आला.जवळपास 15 हजार सत्याग्रही त्यात सहभागी झाले होते.[6] मुरूड मधील श्री.वामन रामचंद्र दिघे हे या सत्याग्रहात सामील झाले होते.1935 मध्ये सरकारने 'हिंदुस्थान सरकारचा कायदा' पास केला. या कायद्या‍ान्वये प्रांतांना स्वायत्तता देण्यात आली.[7]ब्रिटिशांनी संस्थानिकांना जे स्वायत्ततेचे अधिकार दिले होते ते त्यांना संघराज्यात सामील होऊन गमवायचे नव्हते. 1939 मध्ये युरोपात दुसरे महायुध्द सुरू झाले.1942 मध्ये महायुध्दाची धग भारताच्या सीमेपर्यंत आली.असताना आॅगस्ट महिन्यात महात्मा गांधींनी चलेजाव चळवळीची घोशणा केली.मुंबईत सुरू झालेल्या या आंदोलनाची धग जंजिरा संस्थानात पोहोचली नव्हती. भारत छोडो आंदोलनाची प्रेरणा घेऊन महादेव हणमंते या मुरूडमधील युवकाने क्रांतीची मशाल हाती घेऊन जंजिरा संस्थानात युवकांचे संघटन करण्यास सुरुवात केली.[8] जंजिरा संस्थानात कोणत्याही प्रकारच्या सभा, मिरवणूकांना यावेळी बंदी घालण्यात आली होती.

1946 च्या अखेरीस मुंबईमध्ये जंजिरा प्रजापरिषदेची सभा आयोजित करण्यात आली होती. संस्थानी प्रदेशात सभा बंदी असल्याने संस्थानातील बरेच प्रतिनिधी मुंबईच्या परिषदेसाठी हजर होते.[9] भारतीय स्वातंत्र्याचा कायदा 1947 संमत होईपर्यंत भारतीय संस्थानांना आपले स्वतंत्र स्थान आबाधित राहील असे वाटत होते. बॅ.जीनांनीही संस्थानिकांना उत्तेजन दिले होते.ब्रिटिशांची दिडशेवर्षांची गुलामगिरी नष्ट होऊन 15 आॅगस्ट 1947 ची नवी पहाट भारतामध्ये उगवली.संपूर्ण देशात भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला.भारत स्वतंत्र झाला त्या वेळी देशभरात 562 संस्थानं होती.[10] संस्थानातील प्रजेला आपले भवितव्य ठरविण्याचा अरिकार नव्हता.संस्थानिकाच्या मर्जीवरच प्रजेचे भवितव्य होते.

जंजिरा संस्थानच्या संस्थानिकाने मात्र याबाबत संदिग्ध भूमिका घेतली.जनमताचा रेटा लोकशाहीच्या बाजूने जात असतानाही जंजि-याच्या नवाबाकडून मात्र कोणत्याही प्रकारच्या हालचाली दिसत नव्हत्या.संस्थानी लढ्याचे नेतृत्व करणा-या श्री. हणमंते यांनी भास्करराव दिघे, नानासाहेब कुंटे यांच्या समवेत भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची भेट घेऊन जंजिरा संस्थानातील लढ्याची विस्तृत माहिती त्यांना दिली. जंजि-याचा नवाब भारत स्वतंत्र होऊन सहा महिने उलटले तरी कोणताच निर्णय घेत नव्हता. त्याने भारतात विलीनीकरणास नकार देऊन तो पाकिस्तानात सामील होण्याविषयी हालचाली करीत होता.[11] जंजिरा हे संस्थान अरबी समुद्राच्या किना-यावर असल्याने कराचीला सागरी मार्गाने संबंध ठेवणे सहज शक्य होते.

जंजिरा संस्थान पाकिस्तानात विलीन होणे ही भारताच्या दृष्टीने मोठी डोकेदुखी ठरली असती.भारत सरकार देखील विलीनीकरणाबाबत कोणतीही ठोस भूमिका घेत नव्हते.अशा परिस्थितीत संस्थानातील व

 ISSN 2231 4342

संस्थानाबाहेरचा तरुण वर्ग पेटून उठला व जंजिरा संस्थान मुक्तीची हाक देऊन संघर्षासाठी सज्ज झाला.महाड, माणगाव, गोरेगाव या परिसरातील अनेक कार्यकर्ते जंजिरा संस्थान भारतात विलीन करण्यासाठी पुढे सरसावले.महाड मुक्ती मोर्चाचे अग्रणी असलेले नानासाहेब पुरोहित यांनी याकामी पुढाकार घेतला. सोबत मोहन धारीया, हरिभाऊ भडसावळे, शिवाजीराव सावंत, राजाभाऊ चांदोरकर, केशवराव खांबेटे, मदन सावंत, रामभाऊ साठे आदी मंडळी त्यांच्या खांद्याला खांदा लावून पुढे आली.

❖ म्हसळा तालुका मुक्ती:-

जंजिरा संस्थानच्या नवाबाकडून स्वतंत्र भारतात विलीन होण्याबाबत काहीच निर्णय होत नसल्याचे पाहून संस्थानातील प्रजा मनातून धास्तावली होती.या संस्थानात म्हसळा, श्रीवर्धन व मुरूड असे तीन तालुके समाविष्ट होते.भारत-पाकिस्तान मधील धार्मिक विद्वेषाची लागण या काळात येथेही झाली होती.म्हसळा तालुक्यातील काही गावे ही मुस्लिम बहुल होती. या भागात काही बाहेरील गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी विद्वेषाचे बीज पेरले. त्यामुळे हिंदू-मुस्लिमांमध्ये परस्पर अविश्वास निर्माण झाला.हिंदूंना असुरक्षित वाटू लागले. अशा परिस्थितीत प्रजा परिषदेचे कार्यकर्ते असलेल्या केशवराव खांबेटे व बापूरावदातार यांनी महाडला येऊन नानासाहेब पुरोहित यांची भेट घेतली व त्यांना परिस्थितीची कल्पना दिली. पुरोहितांना याअगोदर ब्रिटिशशासनाच्या विरोधात काढलेल्या महाड मुक्ती मोर्चाचा दांडगा अनुभव होता.आपल्याला त्यांच्याकडून निश्चितच न्याय मिळेल अशी आशाम्हसळ्यातील लोकांना वाटत होती.

नाना पुरोहितांनी 28 जानेवारी 1948 रोजी म्हसळ्यातील परिस्थिती जाणून घेतली. त्यांनी म्हसळा तालुक्याच्या सरहद्दीवर असलेल्या खामगाव येथे आपली लष्करी छावणी उभारली.[12] तेथूनच जंजिरा संस्थानचे हंगामी सरकार स्थापन करून आपला स्वतंत्र कारभार सुरू केला. या हंगामी सरकारचे पंतप्रधान म्हणून ते स्वतः कारभार पाहू लागले या सरकारचे स्वतंत्र मंत्रिमंडळ स्थापन करून त्यात मोहन धारीया, सदाशीव बागाईतकर, हरिभाऊ भडसावळे, शिवाजीराव सावंत, राजाभाऊ चांदोरकर, केशव खांबेटे, मदन आबा सावंत, रामभाऊ साठे, जनार्दन भोकरे, श्रीपत चौधरी या सहका-यांचा समावेश होता.[13]

संस्थानी प्रदेशातून म्हसळा तालुका मुक्त करण्याची योजना आखण्यात आली.मात्र या योजनेची माहिती प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांनी नवाबापर्यंत पोहोचविली.त्याने संस्थानातील इसाक पठाण या पोलिस अधिका-याला म्हसळा येथे पाठविले.त्याच्यासोबत जवळपास एक हजार पोलिसांची मोठी कुमकही दिली.[14]खामगावच्या छावणीतील तरुणांची संख्या या पोलिस तुकडीपेक्षा निश्चितच जास्त होती.मात्र पोलिसांकडील शस्त्रास्त्रे पाहता सशस्त्र संघर्ष करणे व त्यात विजय संपादन करणे हे आवाक्याबाहेरचे काम होते.याची जाणीव नाना पुरोहितांनाही होती.त्यामुळे या प्रसंगाला धैर्याने व मुत्सद्दीपणे सामोरे जाणे गरजेचे होते.म्हणूनच गनिमी कावा वापरून आल्या प्रसंगाला तोंड देण्याचे त्यांनी ठरविले.

पुरोहितांनी आपल्या सर्व सहका-यांना एकत्र बोलावून त्यांच्याशी चर्चा केली.आपल्या गुप्तहेरांमार्फत याअगोदर संस्थानातील ब-याच गोष्टींची माहिती त्यांनी मिळविली होती.येथे मुसलमानांची संख्या अधिक असल्याने हिंदू लोक त्यांच्या दहशतीखाली होते.त्यामुळे अशा तंग वातावरणात संघर्ष करणे योग्य नाही असा

विचार चर्चेअंती ठरला. त्यामुळे आलेल्या पोलिस अधिका-यासोबत चर्चा करून सामंजस्याने त्याला आपले विचार पटवून देणे सयुक्तिक ठरेल, जर त्याला हे विचार पटले नाहीत तर त्याला चर्चेत गुंतवून ठेवावे व अचानक हल्ला करून विजय संपादन करावा असाही विचार पक्का झाला. त्यानुसार हंगामी मंत्रिमंडळातील मोहन धारीया या परराश्ट्र मंत्र्यांची याकामी नियुक्ती करण्यात आली.[15] त्यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ म्हसळ्यामध्ये पाठविण्यात आले.

जंजिरा हे संस्थान भारतात विलीन व्हावे अषी आमची मागणी असून त्याचसाठी आम्ही हंगामी सरकार स्थापन केल्याचे त्यास पटवून दिले.संस्थानिक स्वतःहून ते भारतात विलीन करण्यास तयार नसल्याने ते ताब्यात घेण्यासाठी आम्ही आलो आहोत असेही त्यांनी आवर्जून सांगितले.या परिस्थितीतून चांगला मार्ग निघावा या हेतूने आम्ही आलो आहोत. माझ्या हंगामी सरकारचे म्हणणे मी आपल्यासमोर मांडले आहे.इसाक पठाण यास शिष्टमंडळाचे विचार पटले व तो त्यास तयार झाला.तो आपल्या फौजफाट्यासह मुरूडकडे रवाना झाला.[16]शिष्टमंडळाने आपली कामगिरी चोखपणे बजावली होती.त्यांची शिष्टाई यस्वी झाली होती.ही बातमी छावणीत पोहोचताच त्यांनी एकच जल्लोश केला.जमावाने म्हसळ्याकडे धाव घेतली.नाना पुरोहितांच्या मुक्तीसेनेचा म्हसळ्यातील नवाबाच्या सर्वच अधिका-यांनी धसका घेतला होता.त्यांनी कोणत्याही प्रकारचा विरोध न करता शरण आले. 29 जानेवारी 1948 रोजी पहाटे म्हसळ्यातील संस्थानाच्या फौजदार, मामलेदार या सर्व महत्वाच्या प्रतिनिधींना त्यांनी नजरकैद केले.[17] या मुक्तीसेनेने सरकारी कचेरी व संपूर्ण म्हसळे गावाचा ताबा घेतला. गावातील सर्वसामान्य लोकांनी या मुक्तीसेनेचे स्वागत केले.

जंजिरा मुक्तीसंग्रामातील पहिला टप्पा अगदी अहिंसात्मक मार्गाने पार पडला होता.संस्थानाचा काही भाग नवाबाच्या ताब्यातून मुक्त करून तेथे आपला अंमल प्रस्थापित करण्यात मुक्तीसेना यशस्वी झाली.नानासाहेब पुरोहितांच्या नेतृत्वाखाली जंजिरा संस्थानाचा एक तुकडा 29 जानेवारी 1948 रोजी स्वतंत्र झाला. हरिभाऊ भडसावळे यांच्या अध्यक्षतेखाली तेथे तात्पुरता कारभार करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली.[18] नानांनी नवाबाच्या नोकरीत असलेल्या व नजरकैद केलेल्या मामलेदार श्री. कारखानीस व फौजदार श्री. मिसाळ यांना मुक्त करून आपल्या सरकारचे अधिकारी म्हणून नियुक्त केले.[19]

❖ श्रीवर्धन तालुका मुक्ती:-

म्हसळा तालुका संस्थानी अंमलातून मुक्त केल्याने मुक्तीसेनेचा आत्मविश्वास वाढला.त्याच दिवशी दुपारी श्रीवर्धन मधील बापूसाहेब गद्रे व काही मंडळी म्हसळ्याला आली.त्यांनी नाना पुरोहितांना म्हसळ्याप्रमाणेच श्रीवर्धनही मुक्त करण्याची विनंती केली.30जानेवारी 1948 रोजी ही सेना श्रीवर्धनकडे आली.येथे असणा-या संस्थानी अधिका-यांचा ठावठिकाणा काढून त्यांना या सेनेने नजरकैद केले.काही तासानंतर संस्थानी अधिका-यांचा विरोध मावळला आणि संपूर्ण श्रीवर्धन शहर मुक्तीसेनेच्या ताब्यात आले.सर्वांचा आनंद द्विगुणित झाला.

श्रीवर्धन नवाबी सत्तेच्या जोखडातून मुक्त होऊन स्वतंत्र झाले.या घटनेचा सर्वत्र आनंदोत्सव सुरू झाला.शेकडो वर्शांची गुलामी नष्ट झाली.श्रीवर्धनचा ताबा घेतल्यानंतर येथेही हंगामी सरकारचा कारभार सुरू

 ISSN 2231 4342

झाला. म्हसळा आणि श्रीवर्धन तालुके जंजिरा संस्थानातून मुक्त झाल्याची माहिती भारत सरकारला मिळाल्यानंतर कुलाबा जिल्ह्याचे त्यावेळचे त्यावेळचे जिल्हाधिकारी (कलेक्टर) झुल्फिकार अली झुबेदी पोलिसांच्या फौजफाट्यासह संस्थानामध्ये आले. त्यांनी श्रीवर्धन व म्हसळा या भागाचा ताबा आपल्याकडे मागितला.हंगामी सरकारने तो आनंदाने देऊ केला. अशा प्रकारे म्हसळा व श्रीवर्धनचा भाग भारत सरकारकडे येऊन तो स्वतंत्र भारतामध्ये विलीन झाला.[20]

- ❖ मुरूड-जंजिरा विलीनीकरणः-

म्हसळा आणि श्रीवर्धन हे दोन तालुके संस्थानाच्या ताब्यातून एव्हाना मुक्त झाले होते.आता थेट नवाबालाच आव्हान देण्याची वेळ आली होती. नाना पुरोहितांनी म्हसळा व श्रीवर्धन नवाबाच्या वर्चस्वाखालून मुक्त केल्याची बातमी तारेने भारताचे गृहमंत्री वल्लभभाई पटेल, मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर व मुरुडच्या नवाबाला कळविण्यात आली. दुस-या दिवशी मुरुडवर मोर्चा काढणार असल्याचेही सांगितले.या बातमीने मुरुडचा नवाब घाबरला.31 जानेवारी 1948 रोजी नवाब मुरुडहून मुंबईला गेला.मुख्यमंत्री बा. ग. खेर यांची भेट घेऊन त्याने मुरुड संस्थान भारतात विलीन करण्याची तयारी दाखविली.[21] आपण सामीलनाम्याच्या करारावर सही करण्यास तयारअसल्याचे सांगितले. मुरूडवर करण्यात येणारा हल्ला थांबविण्यात यावा अशी विनंतीही त्याने केली.मुख्यमंत्र्यांना नाना पुरोहितांची तार मिळालीच होती.नवाब सिद्दी महमद आता पूर्णपणे भेदरला होता.मुख्यमंत्र्यांनी ही बातमी त्वरेने नानांना कळविली.या बातमीने मुरुड संस्थानात आनंद पसरला.

नाना पुरोहितांनी पुढील पाच दिवस मुरुडचे पंतप्रधान म्हणून काम पाहिले.त्यांनी सर्वत्र शांतता प्रस्थापित करून प्रशासनव्यवस्था चोख ठेवली.मुंबई सरकारने कुलाब्याचे कलेक्टर श्री.झुल्फिकार अली झुबेदी यांना मुरुडचे मुख्य प्रशासक म्हणून नियुक्त केले.नाना पुरोहितांनी त्यांच्याकडे मुरुडचा रितसर कारभार सोपविला आणि ते 5 फेब्रुवारी 1948 रोजी महाडला परतले.मात्र विलीनीकरणाची प्रक्रिया अजून पूर्ण झाली नव्हती.अखेर 6 मे 1948[22] रोजी नवाब सिद्दी महमद याने विलीनीकरण करारावर सही केली आणि जंजिरा संस्थान कायदेशीरदृष्ट्या भारतीय संघराज्यात विलीन झाले.

अशा प्रकारे 150 वर्षाची ब्रिटिशसत्तेची गुलामगिरी संपवून स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असलेल्या भारतापुढे संस्थानांच्या विलीनीकरणाची बिकट समस्या उभी होती.बहुतांशी संस्थानांनी भारतात सामील होण्यास सहमती दर्शविली असताना काही संस्थानांनी आडमुठे धोरण स्वीकारून भारत सरकारला वेठीस धरण्याचा प्रयत्न केला.त्यावेळी भारत सरकारने लश्करी बळाचा वापर करून अशा संस्थानिकांना वठणीवर आणले.अशा परिस्थितीत भारत सरकारच्या मदतशिवाय संस्थानाबाहेरील लोकांनी उत्स्फूर्तपणे लढा उभारून जंजिरा संस्थान भारतात विलीन केले.रायगड जिल्ह्याच्या स्वातंत्र्य चळवळीतील हा एक महत्वाचा अध्याय ठरला.

ISSN 2231 4342

संदर्भ

1 चौधरी कि. का., (संपा.) रायगड जिल्हा गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्रशासन, 1993, पृ. 772

2 जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, खंड 6वा, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, वाई, 1985 पृ. 91

3 चिटणीस शरद, जंजिरा संस्थानचा इतिहास, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई, 1999, पृ. 63

4 चिटणीस शरद, पूर्वोक्त, पृ. 64

5 चिटणीस शरद, पूर्वोक्त, पृ. 70

6 गाठाळ (डाॅ.) एस.एस., भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, कैलाशपब्लिकेशन, औरंगाबाद, 2011, पृ.221

7 गायकवाड आर.डी., थोरात डी.डी., पुर्वोक्त, पृ. 228

8 दै. सागर, (जंजिरा संस्थान मुक्तीलढा विशेष पुरवणी) दि.5 फेबु्रवारी 2010

9 कुंटे नाना, वाटचाल, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1982, पृ. 78

10 दीक्षित नी.सी., आधुनिक भारत पिंपळापुरे अँण्ड कं, पब्लिशर्स, नागपूर, 2005, पृ. 336

11 चौधरी के. के., क्रांतीपर्व महाराष्ट्राचे योगदान, वसंत बुक स्टाॅल, मुंबई, 2013, पृ.217

12 चौधरी कि. का., (संपा.) रायगड जिल्हा गॅझेटिअर, पूर्वोक्त, 190

13 जोग गो. चि., तलाठी ज. छ., रायगड जिल्ह्याचा स्वातंत्र्य संग्राम, रायगड जिल्हा क्रान्ति-दिन सुवर्ण महोत्सव समिती, पेण, 1992, पृ. 102

14 चौधरी कि. का., (संपा.) रायगड जिल्हा गॅझेटिअर, पूर्वोक्त, 190

15 बिवलकर राम, पूर्वोक्त, पृ. 55

16 चौधरी के.के., क्रांतीपर्व महाराष्ट्राचे योगदान, पूर्वोक्त, पृ. 218

17 बिवलकर राम, पूर्वोक्त, पृ. 55

18 कित्ता

19 कित्ता

20 सामंत बाळ, महापर्व, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1986, पृ. 580

21 शहासने चंद्रकांत, देशभक्त कोश, बहुजन साहित्यधारा, पुणे, 2012, पृ. 452

22 चिटणीस शरद, पूर्वोक्त, पृ. 94

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

राष्ट्रीय एकात्मता: चिकित्सक अभ्यास

संशोधक
प्रा. पवार बंडू थावरा
कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय शिरूर [का], जि. बीड

प्रस्तावना:

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे लोकशाही स्वातंत्र्य समता बंधुता व न्याय या चार मूल्यावर आधारित आहे लोकशाहीचा प्राण किंवा आत्मा म्हणून निवडणुकीला ओळखले जाते यानिवडणुका जितक्या खेळीमेळीच्या वातावरणात होतील तितकी लोकशाही यशस्वी होते परंतु संसदीय लोकशाहीचा स्वीकार केलेल्या भारतीय देशांतर्गत असलेले प्रश्न यासारख्या अनेक समस्या आहेत यासमस्यांचा परिणाम राष्ट्रीय एकात्मतेवर व देशाच्या विकासावर होतो

उद्दिष्टे :

1.विविधतेचा अभ्यास करणे .

2.ऐक्याच्या भावनेचा अभ्यास करणे .

3.राष्ट्रीय एकात्मतेच्या अडथळ्याच्या अभ्यास करणे.

गृहितके:

1.भारतातील संस्कृती करण्याचा प्रभाव राष्ट्रीय एकात्मतेवर पडला आहे.

2.भाताच्या विविधतेचा प्रभाव एका त्मतेवर आहे भारतातील जातीयतेचा व धार्मिक तेचा वर्चस्व आहे.

संशोधन पद्धती:

सदरील शोध निबंधा साठी दुय्यम साधन सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे ज्यामध्ये वेगवेगळे संदर्भ ग्रंथ मासिके व वर्तमान पत्रे तसेच इंटरनेट वरील उपलब्ध माहितीचा उपयोग करण्यात आला आहे

राष्ट्रीय एकात्मता राष्ट्रीय एकात्मतेची समस्या जाणून घेण्यापूर्वी अभ्यासकाने राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना जाणून घेणे आवश्यक आहे एखाद्या विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या जनतेचे परस्पराशी सलोख्याचे संबंध असून भावी काळात एकाच प्रकारच्या शासनाखाली त्याची राहण्याची इच्छा म्हणजे राष्ट्रीय एकात्मता असा त्यांचा सर्व सामान्य अर्थ आहे

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे असे एकके की ज्यात कोणत्याही प्रकारचा सर्वकष सुद्धा वादाचा प्रभाव नसतो भारतीय लोक शाही समोर राष्ट्रीय एकात्मतेची समस्या इतर समस्या अपेक्षा महत्त्वपूर्ण ठरली आहे विस्तीर्ण भूभाग असलेल्या भारतातील प्राचीन संस्कृतीचा प्रभाव बहुवार्षिक लोकवस्ती जात धर्म भाषा प्रदेशयातील विविधतेमुळे राष्ट्रीय एकात्मतेची समस्या निर्माण झाली आहे मध्यंतरी स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात देशाच्या

ISSN 2231 4342

स्वातंत्र्याच्या ध्येयाने प्रेरित व्यक्ती मध्ये जात धर्म वंश पंथ आधी समस्या मागे पडल्या होत्या भारताचे स्वातंत्र्याचे ध्येयसाकार झाल्यानंतर पुन्हा भारतात संकुचित अस्मितेने ठोकेवर काढले स्वातंत्र्यप्राप्तीचे ध्येय साकार झाल्यानंतर पुन्हा भारतात स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी राष्ट्रीय एकात्मतेला तडा जाऊन मुस्लिम राष्ट्रवादाचा प्रभाव ठरला परंतु सध्या भाषेयेता जातीयता प्रांतइयत्ता अल्पसंख्यांकता दारिद्र्य आरक्षण आदी घटक राष्ट्रीय एकात्मता येतील अडसर बनत आहेत

व्याख्या:

मानसिक व शैक्षणिक प्रक्रियेने एकतेची भावना वाढीला लावणे एकत्रितपणा आणि सामंजस्य हे लोक रदयात निर्माण करणे समान नागरी तत्वाची भावना वाढीला लावणे एकत्रितपणा आणि सामंजस्य हे लोक रदयात लोक रदयात समावून घेण्याच्या प्रक्रियेला राष्ट्रीय एकात्मता असे म्हणतात स्वातंत्र्य प्राप्तीसाठी भारतातील जनतेने केलेले हे राष्ट्रीय आंदोलन म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचे एक विराट दर्शनच होते स्वातंत्र्य प्राप्ती साठी देशातील सर्वधर्माचे जाती भाषांचे प्रांतांचे लोक राष्ट्रीयत्वाच्या भावनेतून जागृत झाले होते राष्ट्रभिमान राष्ट्रसेवा राष्ट्रप्रेम याभावनेने सारा देश एकात्म झाला होता

स्वातंत्र्योत्तर राष्ट्रीय एकात्मतातिल अडथळे

1.स्वातंत्र्य पूर्वकाळात राष्ट्र बांधणीचे जे कार्य झालेते राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक होय राष्ट्रबांधणीची प्रक्रिया ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया होती स्वातंत्र्य पूर्वकाळात ज्या राजकीय-सामाजिक शैक्षणिक सुधारणा झाल्या जी सामाजिक परिवर्तने घडून आली आणि ज्याकार्यकर्त्यांनी बहुमोल कामगिरी केली त्यासर्वांच्या समावेश राष्ट्रबांधणीच्या प्रक्रियेत येतो कारण राष्ट्रबांधणीच्या कार्यातून स्वतंत्र राष्ट्रनिर्मितीचे ध्येय साकार झालेले आहेत.

2.स्वातंत्र्य पूर्वकाळात भारतीय जनतेत जी राष्ट्रीयत्वाची प्रखर भावना होती ती भावना स्वातंत्र्य प्राप्ती नंतर राहिली नाही चीन व पाकिस्तान या राष्ट्रांनी भारतावर केलेल्या आक्रमणाच्या वेळी राष्ट्रीय एकात्मतेची भावना दर्शन घडले परंतु हा यायुद्धाचा अपवाद काळ सोडला तर भारतात राष्ट्रीय एकात्मतेची भावना कमी झालेली आहे असे एकंदरीत परिस्थितीवरून लक्षात येते.

3. या काळात राष्ट्रात अनेक समस्या निर्माण झाल्या भाषावाद, जातीयवाद, प्रदेशवाद असे वाद निर्माण झालेत्यामुळे राष्ट्रीयत्वाची भावना कमी झालेली दिसून येते.

4. स्वातंत्र्यप्राप्तीनंत रभारताच्या विविध प्रदेशात विविधस्तरावर एक राष्ट्रीयत्वाची भावना जेवढ्या प्रमाणात वाढावयास पाहिजे होती तेवढ्या प्रमाणात ती वाढली नाही उलट भारतीयांच्या अनेक संकुचित भावना संकुचित अस्मितावर आल्या यापरिस्थितीमुळे अनेक धार्मिक, जातीय, प्रादेशिक तनाव, संघर्ष उद्भवले स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सारे भारतीय लोक एकात्मतेच्या भावनेने लढले भारतात भिन्नजातीचे, धर्माचे, भाषेचे, लोकअसतानाही त्यांनी विविधतेत एकता निर्माण केली.

 ISSN 2231 4342

आधारभूतघटक

आम्ही भारतीय अशी प्रखर भावना असे ऐवजी जनतेत आम्ही बंगाली गुजराती तामिळी पंजाबी महाराष्ट्रीयन अशी संकुचित भावना निर्माण झाली राष्ट्रीयत्वाची भावना कमी होत असल्याची चित्र पाहून पंडित नेहरूंनी म्हटले की "I Know There is India but I Want to know where are the Indians" राष्ट्रीयत्वाचा भावनीशिवाय देशात एकात्मता निर्माण होऊ शकत नाही तेव्हा राष्ट्रीय एकात्मतेची ढोबळपणे सांगितले जाणारे आधारभू तघटक

1. राष्ट्रीयत्वाचा आधार:

देशात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनातआपल्या राष्ट्र विषयी प्रेम असणे राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून आवश्यक आहे. त्यासाठी आपण सर्व एक आहोत ही संकल्प प्रत्येक भारतीयांच्या मनात निर्माण व्हावा लागेल. हा 'देश माझे मातृभूमी आहे' ही भावना दृढ करावी लागेल. त्यासाठी भारतातून फुटून निघणे किंवा सोयता मागणे ही वेगळेपणाची जाणीव मनातून काढून टाकावी लागेल.

2. सांस्कृतिक आधार:

भारतात अनेक जातीचे धर्माचे संस्कृतीचे लोक राहतात प्रत्येक समाज घटकांची स्वतःची वेगळी अस्मिता असते वेगळी वैशिष्ट्ये असते. या प्रत्येक समाज घटकाची आपापली भाषा, लिपी, रीती रिवाज, रूढी, परंपरा, प्रथा, जीवनमूल्य ,श्रद्धा, सत्य, जीवन पद्धती आहे या घटकांचा आपल्या संस्कृती विषयी आदर असतो. त्यांच्या संस्कृतीचे जतन झाले पाहिजे. त्याचा वारसा जपला पाहिजे.

त्यांच्या संस्कृतीचा मान सन्मान झाल्यास ते प्रवाहात सामील होण्यास तयार असतात. देशाच्या सुख-दुःखात एकरूप होतात. परिणामी देशाचे ऐक्य अबाधित राहण्यास मदत होते.

3. आर्थिक आधार:

हा माझा देश आहे प्रादेशिक ऐक्य भावनिक देशासाठी त्याग या सारख्या तत्त्वज्ञानाने राष्ट्रीय एकात्मता निर्माण होत नसते. भुकेले, तहानलेले, दुर्लक्षितसमाज, गरीब यांना एकात्मतेचे तत्वज्ञान पटणारे नाही त्यांच्या समोर स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. तो माणूस मातृभूमीच्या अस्तित्वाचा विचार करू शकत नाही म्हणून समाजातील तळागाळातल्या माणसापासून मध्यमवर्गीय पऱ्यांच्या व्यक्तींची आर्थिक प्रश्न सोडवले गेले पाहिजे.

4. सामाजिक न्यायाचा आधार:

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सामाजिक समता सर्वांना विकासाची संधी उपलब्ध करून देणे म्हणजे सामाजिक न्याय होय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत सामाजिक न्याय समान संधी या तत्त्वाचा समावेश करण्यात आला आहे सामाजिक न्यायाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वातयांची तरतूद करण्यात आली आहे

ISSN 2231 4342

भौतिक साधनांचे समान वाटप सत्तेचे विकेंद्रीकरण निराधारांना आश्रय बेकारांना काम भुकेलेल्यांना अन्न जीवनावश्यक वस्तूंचे वाटप माग असलेल्यांना प्राधान्य आरक्षण शैक्षणिक सवलती इत्यादींचा उल्लेख सामाजिक न्यायाच्या संदर्भात केला जातो.

5. सामाजिक मूल्य आणि नैतिकतेचा आधार:

राष्ट्रीय एकात्मतेच्या जडणघडणीत सामाजिकमूल्य आणि नीतिमत्ता यांना अनन्य साधारण महत्त्व असते समाजातील प्रस्थापित मूल्यांचे आणि नैतिकतिचे पावित्र्य राखले जाणे आवश्यक आहे कारण देशातील सामाजिक मूल्यावर राष्ट्रीय मूल्य व राष्ट्रीय चारित्र्य हे अवलंबून असते बदलत्या परिस्थितीनुसार काही मूल्य कालबाह्य होऊन त्याची जागा नवीन मूल्य घेतात काही मूल्य नैतिक मूल्यांना व सामाजिक मूल्यांना पायदळी उडवतात त्यामुळे समाजाची जडणघडण सामाजिक ऐक्य मूल्यांकन राष्ट्रीय ऐक्य निर्माण होत नाही.

6. समान नागरिकत्वाचा आधार:

राष्ट्रीय एकात्मता परिषदेत समान नागरिकत्वाचा आधार स्वीकारण्यात आला आहे राज्यघटनेतील कलम 15 (1) मध्ये जात धर्म वंश इत्यादीच्या आधारावर भेदभाव केला जाणार नाही असे नमूद करण्यात आले मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समान नागरी कायदा करण्याची तरतूद केली समान नागरिक त्यामुळे भावनिक ऐक्य वाढविण्यास मदत होते त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची प्रक्रिया सुरू होते परंतु राजकीय नेत्यांच्या वेळ काढू भूमिकांमुळे राज्यघटनेत अभिप्रेत असलेले समान नागरिकत्वाची कल्पना प्रत्यक्षात आलेली नाही.

7 .धर्मनिरपेक्षता आधार:

1973 मध्ये 42 व्या घटनादुरुस्तीने उद्देशपत्रिकेत धर्मनिरपेक्षता या शब्दाचा समावेश करण्यात आला धर्मनिरपेक्षता यांचा अर्थ राज्याला कोणताही धर्म असणार नाही धर्मही व्यक्तीची व्यक्तिगत बाब आहे याचा अर्थ धर्माच्या बाबतीत राज्यानेतटस्थ राहावे ही अपेक्षा आहे कायद्यामुळे सर्व धर्मातील लोकांना समान मानण्यात आले राष्ट्राबद्दल आपुलकी प्रेम भावनिक ऐक्य निर्माण होण्यास मदत झाली आहे

निष्कर्ष:

भारतात अनेक जाती धर्म पंथ असल्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचा अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत परंतु या भारत देशात विविधतेत एकता हे तत्व असल्यामुळे आजही भारत देशात राष्ट्रीय एकात्मता टिकवून आहे असे म्हणावे लागेल जरी अनेकवेळा जातीयदंगली घडविल्या जात असल्या तरी राष्ट्रद्रोही कृती करण्यास फारसे कोणी धजावत नाही असे जरी असले तरी आज देशात फार मोठी भावनिक पोकळी निर्माण होत आहे ही भावनिक पोकळी राष्ट्रीय एकात्मतेसाठी घातक ठरणार आहे यासाठी राष्ट्रीय राजकारणात जो कोणी नेता आपल्या नेतृत्वाचा गुणावर प्रभाव पाडून देशात राष्ट्रीय एकता प्रेम राष्ट्रभावना कशी वाटेल यासाठी प्रयत्न केले

ISSN 2231 4342

पाहिजे तर भविष्यात या देशात एकता टिकून राहील.

संदर्भ ग्रंथ:

1. डॉक्टर शुभांगी राठी भारतीय राज्यघटना कैलास पब्लिकेशन औरंगपुरा औरंगाबाद जानेवारी 2018.

2. डॉक्टर अलका देशमुख भारताचे शासन आणि राजकारण श्री साई प्रकाशन नागपूर जून 2017.

3. डॉक्टर मोहन दिवानव प्राध्यापक जयंत देवधर भारतातील राज्यांचे राजकारण विद्याप्रकाशन नागपूर डिसेंबर 2004

जळगाव जिल्ह्यातील बॉर्डर कॅम्प आणि हैद्राबाद मुक्ती संग्राम

संशोधक- जगन्नाथ देवराम गोपाळ,
एस.एस. एम.एम. महाविद्यालय, पाचोरा

आधुनिक भारतीय इतिहासात हैद्राबाद मुक्ती संग्रामास महत्वपूर्ण स्थान आहे. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनास हैदाबाद मुक्ती संग्रामामुळे पूर्णत्व आले असे दिसून येते. इ. स. १७२४ मध्ये मोगलांचा दखन विभागाचा सुभेदार मीर कमर उद्दीन उर्फ निजाम-उल-मुल्क याने मोगल सत्तेच्या दुर्बल काळात हैद्राबाद राज्याची स्थापना केली. हैद्राबाद संस्थानाच्या सत्ताधीशपदी एकूण दहा राज्यकर्ते होऊन गेले. मात्र त्यातील आठ सत्ताधीशांना निजाम म्हणून संबोधलेले आहे. निजामी राज्याने भारतातील इंग्रजी सत्तेशी तैनाती फौजेचा करार केला होता. अर्थात इंग्रजी सत्तेचे वर्चस्व हैद्राबाद संस्थानावर पर्यायाने हैद्राबाद संस्थानातील जनतेवर होते. शेवटचा निजाम मीर उस्मान अली (इ. स. १९११ ते इ. स. १९४८)याच्या काळातही इंग्रजांचे वर्चस्व निजामी राज्यात होते. इंग्रज, निजाम, सरंजामदार, निजामाचा प्रशासकीय वर्ग, पोलीस. रझाकार इ. सत्ताधीश म्हणून वावरणाऱ्या वर्गाच्या दडपणाखाली व जुलुमाखाली जनता भरडली जात होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर निजामाने हैद्राबाद राज्य स्वतंत्र राहील असे घोषित केले होते. परंतु भारतीय स्वातंत्र्य संग्रामाशी समरस असलेली हैद्राबाद राज्यातील जनता ही हैद्राबाद संस्थान भारतात विलीन व्हावे यासाठी लढत होती. निजाम हा हैद्राबाद मुक्ती संग्राम दडपू पाहत होता. त्याला रझाकारांची साथ हिंसक कृतीसह साथ मिळाली होती. हैद्राबाद मुक्ती संग्राम सुरुवातीस म. गांधी यांच्या विचारांवर आधारित सुरु होते. परंतु रझाकारांची जनतेवरील हिंसा व दडपशाही पाहता जशास तसे उत्तर द्यावे या विचारांनी हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या नेतृत्वात हैद्राबाद संस्थानच्या सीमावर्ती भागात परंतु भारतीय हद्दीत हैद्राबाद मुक्ती संग्रामात लढू इच्छिणाऱ्या क्रांतीकारकांना सशस्त्र प्रशिक्षण देण्यासाठी बॉर्डर कॅम्प उभारण्यात आले. असे बॉर्डर कॅम्प जळगाव जिल्ह्यात हैद्राबाद संस्थानास लागून असलेल्या सीमेजवळ होते. या बॉर्डर कॅम्पचे हैद्राबाद मुक्ती संग्रामात महत्वपूर्ण योगदान होते. म्हणून मी या शोधनिबंधात जळगाव जिल्ह्यातील बॉर्डर कॅम्प आणि हैद्राबाद मुक्ती संग्रामयाविषयी विचार व्यक्त करीत आहे.

<u>शोधनिबंधाचा हेतू</u>:- हैद्राबाद मुक्ती संग्रामात जळगाव जिल्ह्याचा सहभाग मांडणे.

<u>गृहीतक</u>:- हैद्राबाद मुक्ती संग्रामात जळगाव जिल्ह्यातील देशभक्तांचा सहभाग आहे.

हैद्राबाद संस्थानच्या सीमा पुढीलप्रमाणे होत्या. 'हैद्राबाद संस्थानच्या पूर्वेस चांदा जिल्हा व मद्रास प्रांतातील गोदावरी जिल्हा, पश्चिमेस अहमदनगर, सोलापूर, विजापूर व धारवाड हे जिल्हे, उत्तरेस खानदेश, मध्यप्रदेश व वऱ्हाड तर दक्षिणेस मद्रास प्रांतातील कृष्णा, गुंटूर व कर्नुल हे जिल्हे अशा प्रकारे हैद्राबाद राज्याच्या सीमा होत्या.'[१]या सिमांवरून असे दिसून येते की, हैद्राबाद संस्थानच्या सर्व बाजूंनी भारतीय प्रदेश होता. शेवटच्या निजामाचे धोरण हे स्वतंत्र भारताच्या विरोधी होते. 'हैद्राबाद संस्थानात ७०% हिंदू, १८% दलित, ११% मुसलमान

व १% इतर लोक राहत होते.'[२]तरीहीनिजाम धार्मिक कट्टरपंथीय धोरणानुसार राज्यकारभार करीत होता. रझाकार सैन्याने जनतेवरील अन्याय, अत्याचार करून हिंसेचा कहर केला होता. 'रझाकार सैन्यातील अरब व पठाण हे खेड्यात लुटालूट करून स्त्रियांना भ्रष्ट करण्याचे प्रकार करीत होते. निजामी अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही उपयोग होत नसे.'[३]म्हणूनच हैद्राबादस्टेट कॉंग्रेसने रझाकारांशी जशास तसे लढण्यासाठी व हैद्राबाद संस्थान भारतात विलीन करण्याच्या हेतूने सीमावर्ती भागात भारतीय हद्दीत बॉर्डर कॅम्प उभारले होते.निजामाचे लोक व रझाकार यांच्या हिंसेला आळा घालणे, रेल्वे रूळ उखडणे, करोडगिरी नाके उद्‌ध्वस्त करणे, पाटील व पटवारी यांची सरकारी दप्तरे जाळणेव हैद्राबाद मुक्ती संग्रामातील आंदोलकांची हिम्मत वाढविणे अशी बॉर्डर कॅम्पची कार्य पद्धत होती.

हैद्राबाद संस्थानच्या सीमेस लागून भारतीय हद्दीत जळगाव जिल्ह्यात 'पातोंडा, ता. चाळीसगाव'[४],'दिघी, ता. पाचोरा'[५], 'शेंदुर्णी, ता. जामनेर'[६], 'वाकोद, ता. जामनेर'[७]इ. ठिकाणी बॉर्डर कॅम्प होते. या सर्व बॉर्डर कॅम्पमध्ये हैद्राबाद मुक्ती संग्राम संबंधी कार्य जोमाने सुरु होते.'पातोंडा, ता. चाळीसगाव, जि. जळगाव येथील बोर्डर कॅम्पचे प्रमुख म्हणून पातोंड्याचे काकासाहेब देशमुख, भिकाजी चौधरी, रामसिंग भावसिंग घोरपडे, चाळीसगावचे देवराम रामजी पाटील, त्र्यंबक गोपाळ शिंपी हे कार्य पाहत होते. शेंदुर्णी, ता. जामनेर, जि. जळगाव येथील बॉर्डर कॅम्पचे प्रमुख म्हणून होनसिंग हजारी, कन्हैय्यालाल हजारी, विठ्ठलराव काशिनाथ देसाई, शिवराम खंडेराव देशमुख, भिकन संपत जाधव हे देशभक्त कार्य पाहत होते.'[८]याच संदर्भातील उल्लेखानुसार जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील दिघी येथे जुलै १९४८ मध्ये बॉर्डर कॅम्प उघडण्यात आला होता. दिघी बॉर्डर कॅम्पचे प्रमुख म्हणून श्री. मिश्रीलाल जवाहीरमल पहाडे हे जबाबदारी पार पाडीत होते. वाकोद, ता. जामनेर, जि. जळगाव येथे ता. ८/३/१९४८ रोजी बोर्डर कॅम्प स्थापन करण्यात आला. वाकोद बॉर्डर कॅम्पचे प्रमुख म्हणून श्री. विश्वनाथ भाले हे जबाबदारीने कार्य करीत होते.या सर्व बॉर्डर कॅम्पचे प्रमुख केंद्र मनमाड येथे होते. मनमाड केंद्रातून होत असलेल्या मार्गदर्शनानुसार हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे कार्य चालत असे.

हैद्राबाद मुक्ती आंदोलनात व पातोंडा बॉर्डर कॅम्पमध्ये सक्रीय असलेल्या स्वातंत्र्य सैनिकाने आपल्या मुलाखतीत संगितले की, 'पातोंडा, ता. चाळीसगाव येथील बॉर्डर कॅम्प सर्वात जास्त कार्यशील होता. पातोंडा येथे काकासाहेब देशमुख यांच्या नेतृत्वात १८ दिवस क्रांतिकारकांचे शिबीर भरविण्यात आले होते. हैद्राबाद मुक्ती संग्रामातील अनेक नेत्यांनी पातोंडा शिबिरास भेटी दिल्या होत्या. सौ. आशाताई वाघमारे यांचे यासंबंधी व्याख्यान संपन्न झाले होते. खडकदेवळा, ता. पाचोरा येथील पोलीस पाटील स्वा. सै. माणिकराव महारु पाटील यांचे कडून रायफली घेऊन निजामी हद्दीत जाऊन रझाकारांविरुद्ध लढले जात होते. पळाशी, ता. सोयगाव येथील चाऊसचे धान्याचे गोदाम उघडून क्रांतिकारकांनी ते धन्य जनतेत वाटून दिले होते. हे सर्व पातोंडा बॉर्डर कॅम्पमधील क्रांतिकारकांनी केले होते.'[९]'पातोंडा बॉर्डर कॅम्पमधील क्रांतिकारकांनी गोंदेगाव, ता. सोयगाव येथील करोडगिरी नाक्यावर हल्ला केला होता. दोन्ही बाजूंनी बंदुकींनी फायरिंग होत होत्या. दोन रझाकार या हल्ल्यात ठार झाले. तसेच एक क्रांतिकारक स्वा. सै. त्र्यंबक सहादू पाटील हे शहीद झाले.'[१०]यातून पातोंडा कॅम्पचे भरीव कार्य लक्षात येते.

ISSN 2231 4342

'शेंदुर्णी, ता. जामनेर येथील बॉर्डर कॅम्पमधील क्रांतिकारकांनी सोयगाव परिसरातील रझाकारांना जेरीस आणले होते. या क्रांतिकारकांनी सोयगाव पोलीस ठाण्यावर हल्ला चढवून शस्त्रास्त्रे पळवून आणण्याची योजना आखली. त्यानुसार एके दिवशी रात्री तीन वाजता पोलीस स्टेशनवर अमेरिकन ग्रेनेड फेकून हल्ला केला. परंतु हे ग्रेनेड फुटले नाहीत. पोलिसांना जग आल्याने त्यांनी क्रांतिकारकांचा पाठलाग केला. देवचंद परदेशी हा क्रांतिकारक पकडला गेला. यात राजहंस नावाचा क्रांतिकारक शहीद झाला.'[११]हा बॉर्डर कॅम्प शेंदुर्णीचे स्वा. सै. दत्तात्रय जगन गुजर यांच्या शेतात उभारण्यात आला होता. स्वा. सै. दत्तात्रय गुजर व त्यांचे कुटुंब व मित्र परिवार यांचे या कॅम्पला संपूर्ण सहकार्य होते.

वाकोद येथील बॉर्डर कॅम्पमधील देशभक्तांनी निजामी पोलिसांवर व रझाकारांवर दडपण आणण्यात यश मिळविले होते. ता.१३ जुलै १९४८ रोजी निजामाचा वजीर फर्दापूर येथे येणार होता. म्हणून ता. १२ जुलै १९४८ रोजी रात्री फर्दापूरचा पूल सुरुंग लाऊन उडवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु तो अपयशी ठरला होता.

दिघी, ता. पाचोरा येथील बॉर्डर कॅम्प मोठा सक्रीय होता. एका सरकारी अहवालानुसार 'ता. १७ नोव्हेंबर १९४७ रोजी पूर्व खानदेश जिल्ह्यातील दिघी या गावात रझाकारांच्या दोन अरब सैनिकांनी येऊन दादागिरीने दोन शेळ्या ताब्यात घेतल्या व गावकऱ्यांकडे संत्र्यांची मागणी केली. या अरबांनी यास विरोध करणाऱ्या एका गावकऱ्यास ठार केले. गावकऱ्यांनी एका अरबास ठार केले.'[१२] दिघी गावकऱ्यांच्या मनात रझाकारांविषयी मोठा राग होता. जुलै १९४८मध्ये दिघी येथे बॉर्डर कॅम्प स्थापन करण्यात आला. या कॅम्पमधील क्रांतीकारकांना दिघी गावकऱ्यांनी संपूर्ण मदत केली. निजामी पोलीस व रझाकार यांच्याविषयी गुप्त बातम्या पोहचविणे, कॅम्पमधील क्रांतीकारकांना भोजन व इतर मदत करणे, राझाक्रांविरुद्ध प्रखर भूमिका घेणे व हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झालेच पाहिजे असा प्रचार करणे असे कार्य दिघी गावातील देशभक्तांनी केले आहे.

निष्कर्ष:- हैद्राबाद संस्थानच्या सीमेस लागून जळगाव जिल्हा (पूर्व खानदेश) आहे. निजामी पोलीस, निजामाचे लोक व रझाकार यांचा जळगाव जिल्ह्यातील या सीमेजवळील गावांना उपद्रव होत होता. या सीमेजवळील गावांचे मराठवाड्यात नातेगोते व मित्र परिवार होता. हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले पाहिजे अशी प्रखर भावना जळगाव जिल्ह्यातील देशभक्तांच्या मनात होती. या भावनेतूनच या देशभक्तांनी बॉर्डर कॅम्प माध्यमाने हैद्राबाद मुक्ती लढ्यात सहभाग घेतला होता. या बॉर्डर कॅम्पमधील क्रांतीकारकांना स्थानिक देशभक्त जनतेने शिबिरासाठी जागा उपलब्ध करून देणे, त्यांच्या भोजनाची, पाण्याची व्यवस्था करणे, त्यांना प्रत्यक्ष सहकार्य करून त्यांचे आत्मबल वाढविणे, प्रत्यक्ष मोहिंमांमध्ये भाग घेणे, स्थानिक स्त्री-पुरुषांनी या कॅम्पमधील देशभक्तांना आवश्यक सहकार्य करणे असे कार्य केलेले आहे. यातून सिद्ध होते की, हैद्राबाद मुक्ती संग्रामात जळगाव जिल्ह्यातील देशभक्तांचाही सहभाग होता.

ISSN 2231 4342

संदर्भ

१. Googal.com-Hydrabad Mukti Sangram

२. THE ENCYCLOPEDIA AMERICANA, VOLUME 14, AMERICANAs CORPORATION, NEW YORK, 1970, P. 633

३. जाधव बाबुराव, जीवावर उदार, औरंगाबाद जिल्ह्याचा स्वातंत्र्य लढा, प्रकाशक- जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समिती, औरंगाबाद, १९९८, पृ. ३४

४. भोसले अच्युत वि., झुंझार क्रांतिवीर काकासाहेब देशमुख लोकराजा मराठवाडा मुक्ती संग्रामातील सशस्त्र क्रांतीचा नेता, कौशल्य पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१२, पृ. २५

५. अपसिंगेकर विनोद, मराठवाडा स्वातंत्र्य सुवर्ण महोत्सव विशेषांक, भारत मुद्रक आणि प्रकाशक लि., औरंगाबाद, १९९८, पृ. १०६

६. देव (डॉ.) प्रभाकर, हैद्राबाद मुक्तिसंग्राम, स्वातंत्र्य सैनिकांच्या मौखिक नोंदी,मुद्रा ऑफसेटप्रिंटर्स,नांदेड, पृ. ३८

७. अपसिंगेकर विनोद, उपरोक्त, पृ. १०३

८. पूर्वोक्त, पृ. ८१

९. देसले(स्वा. सै.) उत्तमराव मखाजी, भडगाव, जि. जळगाव यांची मुलाखत, दि. ९/२/२०२१

१०.राऊत (स्वा. सै.) दगाजी हरचंद, गोंदेगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांचे हस्तलिखित

११. जाधव बाबुराव, जीवावर उदार औरंगाबाद जिल्ह्याचा स्वातंत्र्य लढा, प्रकाशक- जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समिती, औरंगाबाद, १९९८, पृ. ६२

१२. Report on the RAZAKARS of Hyderabad, The Press of the Agent-General for India in Hyderbad, 1948, P.75

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

उस्मानाबाद जिल्ह्यातील शिवमंदिरे :एक ऐतिहासिक वारसा

सुनिल सुधाकरराव सुर्यवंशी
संशोधक विद्यार्थी
इतिहास विभाग,
ता. उमरगा, जि. उस्मानाबाद
मो.नं. 9970814671
sunil.suryawanshi1983@gmail.com

प्रस्तावना :-

भारतीय समाज जीवनाचा विचार करता भारतीय लोकांमध्ये धार्मिकतेला प्राधान्य देण्यात आल्याचे दिसते. धर्माने भारतीय इतिहासामध्ये मगने प्राचीन, मध्ययुगीन अथवा आधुनिक कालखंडामध्ये महत्पूर्ण भूमिका निभावली आहे. धर्मांचा भारतीय समाज जीवनावर जेवढा प्रभाव आढळतो तेवढा तो जगातील अन्य राष्ट्रामध्ये क्वचितच आढळत असेल.

प्राचीन भारताचा विचार करता प्राचीन भारतामध्ये वेदांवर आधारित धर्मकल्पनांना समाजमान्यता असल्याचे आढळून येते. याला पहिला हादरा हा बौद्ध व जैन धर्माच्या तत्वज्ञानाने दिल्याचे दिसून येते. मध्ययुगीन कालखंडात भारतामध्ये परकीय मुस्लीम शासकांचा प्रवेश झाल्यामुळे मुस्लिमांतर धर्माच्या लोकांमध्ये चलबिचल होऊन विविध धर्मामध्ये निरनिराळ्या पंथांचा व संप्रदायांचा उदय, विकास तसेच प्रसार झाल्याचे दिसते. परकीय मुस्लिम आक्रमणामुळे भारतीय समाज जीवनामध्ये धर्माचे महत्व संपुष्टात येण्याऐवजी लोकांच्या मनामध्ये धार्मिकता अधिक खोलवर रुजली गेल्याने धर्माचा भारतीय समाज जीवनावरील पगडा परकीय युरोपिय संतांच्या काळामध्ये सुद्धा टिकून असल्याचे दिसून येते.

कुठल्याही धर्मामध्ये त्या धर्माच्या प्रार्थना स्थळांना अनन्यसाधारण असे महत्व असते. इतकेच नव्हे तर व्यक्तिच्या धर्माची ओळखही तो कुठल्या प्रार्थना स्थळामध्ये जातो यावरुन ठरते. म्हणजेच प्रार्थना स्थळेही व्यक्तिच्या धार्मिक जीवनामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावताना दिसून येतात.

हिंदू धर्माचा विचार करता हिंदू धर्मामध्ये मंदिरांना 'धार्मिक प्रार्थना स्थळ' म्हणून सर्वत्रमान्यता प्राप्त झाली आहे. म्हणजेच मंदिरेही भारतात बहुसंख्य असलेल्या हिंदू समाज मनाचे धार्मिक प्रतिनिधित्व करतात. भारतातील बहुसंख्य हिंदू समाजातील लोकांमध्ये धार्मिकतेची भावना जोपासण्यात व वृद्धींगत करण्यात मंदिरांनी महत्वाची भूमिका बजावलेली आहे. मंदिरांनी केवळ लोकांमधील धार्मिकताच जोपासली नाही तर लोक शिक्षणाचे केंद्र म्हणून देखील महत्वपुर्ण अशी भूमिका पार पाडली आहे.

 ISSN 2231 4342

प्रस्तुत शोध निबंधाचा अभ्यास विषय हा याच धार्मिक दृष्ट्या महत्वपुर्ण अशा मंदिरांच्या संदर्भात घेण्यात आला आहे.

प्राचीन भारतात मंदिर बांधण्यास गुप्तकाळात खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. सहाव्या शतकात झांशी जवळी व देवगळ येथील गुप्तकालीन विष्णू मंदिर हे या काळातील मंदिर स्थापत्यातील उत्तम नमुना आहे. या मंदिर बांधकामात प्रामुख्याने दगडाचा वापर करण्यात येऊन एका वर एक दगड रचूनबां धकाम करण्यात आलेले आहे.

<u>मंदिर स्थापत्यामध्ये तीन शैलींची निर्मिती झाली :</u>

1) नागर शैली
2) द्रविडी शैली
3) वेस्सर शैली

दखनमध्ये निर्मित झालेली ही मंदिर शैली असून तिची निर्मिती नागर आणि द्रविड शैलीच्या प्रभावातून झालेली आहे. या दोन्ही शेलीची वैशिष्ट्ये वेस्सर शैलीत सापडतात. चालुक्य आणि राष्ट्रकुटकाळात वेस्सर शैलीतील मंदिरे महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये दिसून येतात.

महाराष्ट्रातील मराठवाड्यामध्ये या मंदिरांचे प्रमाण मोठ्याप्रमाणात दिसून येते. मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये देखील अशी शिवमंदिरे बहुसंख्येने आढळून येतात.

उदा :- महादेव मंदिर (उमरगा), मल्लिकार्जुन मंदिर (अचलेर), महादेव मंदिर (बलसुर), महादेव मंदिर (नारंगवाडी), त्रिविक्रम मंदिर (तेर)

संशोधनाची उद्दिष्टे :-

1) उस्मानाबाद जिल्ह्यातील चालुक्य कालीन शिव मंदिरांच्या स्थापत्य शैलीची वैशिष्ट्ये समजुन घेणे.
2) उस्मानाबाद जिल्ह्यातील शिव मंदिरांच्या स्थापनेत चालुक्यकालीन राजांचे योगदान
3) उस्मानाबाद जिल्ह्यातील चालुक्य कालीन शिव मंदिरांचे समाज जीवनातील, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील महत्व स्पष्ट करणे.

गृहितके :-

1) शिव मंदिरा मुळे भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते.
2) मंदिराच्या माध्यमातुन धार्मिक व सांस्कृतिक कलेचा अनमोल ठेवा जगासमोर येण्यास मदत होईल.
3) शिवमंदिरे हे आज ऐतिहासिक ठेवा आहे.

 ISSN 2231 4342

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनासाठी निरीक्षण, सर्वेक्षण, विश्लेषण संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे.

साधने :-

प्राथमिक व दुय्यमसा धनांचा उपयोग या शोध अभ्यासासाठी केला आहे.

उस्मानाबाद जिल्हा हा धाराशिवलेणीसाठी जरी प्रसिद्ध असला तरी उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये चालुक्यकालीन शिव मंदिरांची संख्या खुप मोठ्या प्रमाणात आहे. प्राचीन धाराशिवबद्दल अधिक माहिती मुनिकनकामर लिखित करकंडर चरिड या ग्रंथात मिळते.

धाराशिवनगरीस धाराशिवहे नाव का पडले याबद्दल काही अख्यायिका आहेत. करंडकराजाने धाराशिवनगरीच्या रक्षणासाठी दोन भिलांची नियुक्ती केली होती याची माहिती एका संस्कृत कथेत आढळून येते. काही ठिकाणी असे म्हटले आहे की धार आणि शिव नावाचे दोन राजे होऊन गेले. त्यांच्या नावावरून धाराशिव हे नाव पडले. धाराशिवलेण्यात दुसऱ्या क्रमाकांच्या लेण्यात एक जिवंत पाण्याचा झरा आढळून येतो त्यातील पाणी कधीच आटत नाही. हा झरा म्हणजे धारा आणि तेरचा राजा शिव याने करकंडराजास लेणी दाखवणे आणि इतर मदत केल्याने त्याचे शिव हे नाव जोडून धाराशिव हे नाव पडले असावे.

उस्मानाबाद जिल्ह्याच्या इतिहासाचा त्यानंतरचा पुरावा म्हणजे डेक्कन कॉलेज आणि पुरातत्त्व खात्याने इ. स. 1957-58 मध्ये तेरला केलेले उत्खनन होय. याउत्खननात इ. स. पूर्व चौथे शतक ते इसवी सनाच्या चौथ्या शतकातील कालखंड प्रकट झाला. सर्वात खालच्या स्तरात माती पासून तयार केलेल्या वस्तू मिळाल्या. त्यानंतरच्या स्तरात उत्तरेकडील काळी झिल ईदार खापरे (Northern Black Polished Ware अथवा N.B.P.) मिळाली. ही मौर्यकालीन वैशिष्ट्यपूर्ण खापरे आहेत. यावरून हे सिद्ध होते, की मौर्यकाळाच्या उल्लेख येतो. ह्या ताम्रपटातील लेख शके 615 म्हणजे इ. स. 693 यावर्षातील आहे.

धाराशिव जिल्ह्याचा अभ्यास करताना अश्मयुगापासून सुरुवात करावी लागेल. परंतु याजिल्ह्याचा अश्मयुगाचा अभ्यास अद्याप झाला नसल्याने अश्मयुगा बद्दलची निश्चित अशी माहिती अद्याप सांगता येत नाही. तरी पण ह्या जिल्ह्यातील नद्यांच्या खोऱ्यात अश्मयुगीन हत्यारे मिळू शकतील. उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर (प्राचीनतगर) येथील वसाहत मौर्य पूर्वकाळापासून होती हे सिद्ध झाले आहे. तेर येथे डॉ. मोरेश्वर दिक्षित यांनी केलेल्या उत्खनानुसार तेरच्या पहिल्या वस्तीचा कालखंड इ स वी पूर्व सुमारे 400 ते 200 म्हणजे मौर्य पूर्व ते मौर्य असा ठरवता येतो. यावस्तीचा नाश पुरामुळे झाला असे डॉ. दिक्षित यांचे म्हणणे आहे.

मौर्यकाळ- मौर्य कालखंडात सर्व जनपदे सम्राट अशोकाच्या अधिपत्याखाली येत होती. प्राचीन धाराशिव जिल्हाही अशोकाच्या साम्राज्यात मोडत होता.

 ISSN 2231 4342

सातवाहन कालखंड – महाराष्ट्रात राज्य करणारे पहिले महत्त्वाचे राजघराणे म्हणजे सातवाहन घराणे. इ. स. पूर्व दुसऱ्या शतकापासून इ. स. दुसऱ्या शतकापर्यंत सातवाहन घराण्याने राज्य केले. त्यांची राजधानी प्रतिष्ठान (सध्याचे पैठण) होती. सातवाहनांचे लेख नाशिक, नाणेघाट, कार्ले, कान्हेरी गुंफा येथे आढळतात. ह्या राजघराण्याचा मूळ पुरुष सिमुख हा होता. श्रीसात कर्णी, गौतमीपुत्र सातकर्णी, यज्ञश्री सातकर्णी इत्यादी पराक्रमी राजे या घराण्यात होऊन गेले. हाल या सातवाहन राजाने प्राकृत भाषेत गाथा सप्तशती हा ग्रंथ लिहिला. सातवाहन राज्यकर्ते हे वैदिक धर्माचे पुरस्कर्ते होते.

सातवाहन कालखंडात धाराशिव आणि परिसर अत्यंत भरभराटीस आला होता, याचे कारण म्हणजे तगर हे शहर व्यापारी पेठ म्हणून नावलौकिकास आले होते. तेरच्या इतिहासात हाकालखंड सुवर्ण अक्षराने लिहून ठेवण्यासारखा होता. याकाळात भारताच्या पश्चिम नकिनार्या वरील शूर्पारक (सोपारा), कल्याण, चेमूल्य (चौल) इत्यादी बंदरातून येणाऱ्या विविध रोमन बनावटीच्या वस्तू तेर येथे येऊन पोचत. यात रोमन नाणी, पुतळ्या, रोम बनावटीची झिलईदार व नक्षीदार लाल रंगाची मडकी, रोमन दिवे, ब्रॉन्झचे आरसे व हस्तिदंती वस्तू असत. तर तेरहून मलमल, गोणपाट, कापड इत्यादी निर्यात होत असे. प्रतिष्ठान आणि तगर ही दोन्ही शहरे मोठ्या व्यापारी पेठ होत्या.

गुप्त- वाकाटक काल – गुप्तांची प्रत्यक्ष अधिसता धाराशिव जिल्ह्यात नव्हती परंतु तेरला सापडलेल्या काही मृण्मय मूर्ती गुप्तशैलीच्या आढळतात. तेरचे त्रिविक्रम मंदिर (चैत्य गृहासारखे दिसणारे) गुप्तकाळाचे निदर्शक मानता येईल (देव शां.भ. :6). सातवाहना नंतर महाराष्ट्रावर राज्यकरणारे मोठे राजघराणे म्हणजे बाकाटकांचे होय. त्यांनी संपूर्ण विदर्भावर इ. स. 250 ते इ. स. 550 पर्यंत राज्य केले. विंध्य शक्ती हा वाकाटक घराण्याचा संस्थापक होता. प्रवरसेन प्रथम ह्या पराक्रमी राजाने सातवाहना नंतर विस्कळीत झालेल्या महाराष्ट्राचे राजकीय एकीकरण केले. वाकाटकांच्या मुख्यशाखेची राजधानी नंदिवर्धन होती. रुद्रसेन, पृथ्वीसेन, प्रवरसेन, द्रसेन हे काही महत्त्वाचे राजे या घराण्यात होऊन गेले.

राजे शैव पंथीय होते परंतु रुद्रसेन द्वितीयने आपली पत्नी चंद्रगुप्त द्वितीयची मुलगी प्रभावती गुप्त हिच्या प्रभावाखाली येऊन वैष्णव धर्म स्वीकारला. वाकाटकराजांनी शिवमंदिरे बांधली. देवटक येथे त्यांनी शिवमंदिर बांधले. प्रवरसेन द्वितीयने सेतूबंध हे प्राकृत काव्य रचले. वाकाटकांची वाशीम (प्राचीन वर्सगुम) येथे दुसरी शाखा होती. वाकाटकांचे बहुतेक राजे शैवपंथीय होते.

आभीर - इ. स. 250 च्या आसपास पश्चिम महाराष्ट्रात आभीरांचे राज्य होते. ह्या घराण्याचा संस्थापक राजन ईश्वर सेन हा होता. नाशिक लेण्यात याचा लेख आहे.

कलचूरी (इ. स. 550 ते 620) – महाराष्ट्राच्या इतिहासात विशेषत: धार्मिक इतिहासात महिष्मतीचे कलचूरी महत्त्वपूर्ण ठरतात. ह्याघराण्याचे जवळपास सर्व राजे वैश पंथीय होते. ह्याघराण्याचा संस्थापक कर्णराज हा होता. कलचूरीं नी गुजराथ, उत्तर महाराष्ट्र, कोकण व विदर्भावर राज्य केले.

ISSN 2231 4342

प्रथम राष्ट्रकूट – हे प्रथम राष्ट्रकूट मानपूरचे होते. त्यांनी कुंतल देशावर राज्य केले. प्राचीन काळी वरील कृष्णा खोऱ्याचे नाव कुंतल होते. या प्रदेशात सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील काही भाग येत होता.

शक – वाकाटक आणि प्रथम राष्ट्रकूटांच्या (कुंतल) समकालीन एक शक घराणे महिषक राज्यावर राज्य करत होते. उस्मानाबाद जिल्हा महिषक राज्यात येत असल्याने अर्थातच याघराण्याने उस्मानाबाद जिल्ह्यावर राज्य केले. ह्याघराण्याचा संस्थापक मानराजा होता. पुराणामध्ये त्याचा उल्लेख पराक्रमी राजा म्हणून आहे. त्याची काही नाणी हैद्राबादला सापडलेली आहेत. (महाराष्ट्र राज्य गॅझेयिटर, उस्मानाबाद जिल्हा 1972 :37)

बदामीचे चालुक्य – बदामीच्या चालुक्यांचा पहिला स्वतंत्र राजा पुलकेशी प्रथम हा होता. पुलकेशी द्वितीय हा एक पराक्रमी राजा होता. तो जैन धर्माचा उपासक होता, परंतु त्याने शैव संप्रदायाला मदत केली. विक्रमादित्य प्रथम, विनयादित्य, विजयादित्य, विक्रमादित्य द्वितीय आणि किर्ति वर्मन द्वितीय हे चालुक्य होऊन गेले आहे. बदामीच्या चालुक्यांचा पराभव करून राष्ट्रकूट राजा दंतिदुर्ग सत्येवर आला (इ. स. 753). बदामी चालुक्यांची राजवट उस्मानाबाद जिल्ह्यावर होती. बर्जेसच्या मते इ. स. सातव्या शतकात धाराशिव लेणी खोदली गेली, (गॅझेटियर, उस्मानाबाद जिल्हा 1972: 41)

राष्ट्रकूट (इ. स. 744 ते इ. स. 973) चालुक्य काळानंतर राज्यावर आलेले राष्ट्रकूट हे मुळात जुन्या उस्मानाबाद जिल्ह्यातील लत्तालूर (लातूर) येथील होते. दतिदुग्ग हा राष्ट्रकूटांचा पराक्रमी संस्थापक राजा होता. वेरूळ येथील शिलालेखावरून याच्या दक्षिणेतील पराक्रमाची माहिती मिळते. कृष्ण हा राष्ट्रकूटांचा पराक्रमी व कलासक्त राजा होऊन गेला. त्याच्या कारकिर्दीतच कैलास लेणे तयार झाले. विदर्भा मध्ये राष्ट्रकूट आणि अनेक मंदिरे बांधली. त्यातले एक महत्वपूर्ण मंदिर म्हणजे सध्याच्या गडचिरोली जिल्ह्यातील मार्कंडेय मंदिर होय. कृष्णा प्रथम, गोविंद द्वितीय, पूर्व, गोविंद तृतीय, अमोघवर्ष, इंद्र द्वितीय हे काही पराक्रमी राजे होऊन गेले. लत्त लूपुर व राधीश अशी उपाधी राष्ट्रकूट राजे लाबीत असत. ह्या उपाधी द्वारे राष्ट्र कूटांचे मूळ लातूर होते हे स्पष्ट होते.

शिलाहार – राष्ट्र कूटांच्या काळात पश्चिम महाराष्ट्रात शिलाहारांच्या तीन शाखा उदयास येत होत्या. 1) दक्षिण कोकणाचे शिलाहार 2) उत्तर कोकणचे शिलाहार 3) कोल्हापूरचे शिलाहार.

उत्तर कोकण व कोल्हापूर येथील शिलाहार नृपति आपल्या लेखात तगरपुर परमेश्वर किंवा तगरपुर वराघश्वर असा निर्देश करून आपण मूळचे तगरचे (उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर) असल्याचे दर्शवत (मिराशी 1974 : 5) याला वाङ्मयीन पुरावा दहाव्या शतकातील हरिषेणाचा बृहत्कथा कोशव अकराव्या शतकातील करकंड चरित्रमध्ये आहे. सर्व शिलाहार प्रथम एकच असावे आणि प्रथम ते तरगर वर राज्य करत असावेत. इ. स. 997 च्या शिलाहार घराण्यातील अपराजिताच्या लेखात तगरपुर परमेश्वर हे बिरुद आहे. तर इ .स. 1058 मधील शिलाहार घराण्यातील मारसिंहाने स्वत:ला तगरपुरवराधीश्वर ही पदवी वापरली आहे. याच लेखात याच राजघराण्यातील जतिग या दुसऱ्या राजाचा उल्लेख तगरनगर भूपालक असा केला आहे (देवशां. भा. :3).

 ISSN 2231 4342

कल्याणीचे चालुक्य – तैल द्वितीयने राष्ट्रकूटांची सत्ता उलथवून टाकत स्वत:ची सत्ता प्रस्थापित केली. त्याच्या नंतर सोमेश्वर प्रथम सत्तेवर आला. त्याने अनेक शैव मंदिरे बांधली. सोमेश्वर द्वितीय, विक्रमादित्य चतुर्थ, तैल तृतीय, सोमेश्वर चतुर्थ असे अनेक पराक्रमी राजे होऊन गेले. विक्रमादित्य सहावाच्या काळातील दोन शिलालेख विदर्भात सापडले आहेत. विक्रमादित्य सातव्या नंतर त्याचा मुलगा सोमेश्वर तृतीय गादीवर आला. उस्मानाबाद जिल्ह्यात चालुक्याचे राज्य होते.

- **उमरगा येथील महादेव मंदिर:-**

उमरगा येथील महादेव मंदिराला शिवमंदिर म्हणुन देखील ओळखले जाते. हे चालुक्य कालीन सुंदर मंदिर आहे. हे मंदिर गावाच्या मध्यभागी आहे. अतिशय कलात्मक अशा या मंदिराचा गाभा रात्रिदल आहे. मुख मंडप, मंडप, अंतराळ तीन गाभारे आणि उद्धस्तनंदी मंडप; अशी या मंदिराची एकंदरीत रचना आहे. मंदिराचा बाह्यभाग देखील खुपच सुरेख कोरीव केलेला आहे. परंतु आतील भागात खुपच सुंदर असे कोरीव नक्षी काम केलेले आहे. येथे प्रदक्षिणा पथ नाही. सहा पायऱ्या चढल्यावर मुखमंडप आहे. मुखमंडपाच्या स्तंभावर सुंदर असे मकर तोरण आहे. यामध्ये उमा-उमेश्वराची अलिंगन मुर्ती आहे. वेगवेगळ्या हत्तींची रांग, तसेच कोरीव स्तंभ आणि शंकर पाळ्याच्या आकाराची नक्षी इत्यादी प्रकाराने मुखमंडप शोभिवंत करण्याचा प्रयत्न केला आहे.

महादेव मंदिर उमरगा येथील सभा मंडप हा तीन गाभाऱ्याचा मिळुन बनला आहे. सभामंडपात चार नक्षीदार स्तंभ आहेत. एक नंदीमध्य भागी स्थानापन्न आहे. सभामंडपात आठ कोरीव देवकोष्टे आहेत. या मंदिरामध्ये एकुण चौदास्तंभ आहेत. त्यापैकी सभामंडपामध्ये मध्य भागी चार आहेत. यामंदिराच्या सभामंडपाचे वितान सुरेख आणि वैशिष्ट्यपुर्ण असे आहे. तेनवरंग प्रकारात मोडणारे आहे. मंदिराचे अंतराळ चौकोनी शंकरपाळाच्या आकाराचे आहे. मंदिराच्या तिन्ही गाभाऱ्याच्या कोपऱ्यामध्ये दोनस्तंभ आहेत. त्यास्तंभाच्या मध्यापर्यंत उंची असणाऱ्या दोन आकर्षक अशा सुरसुंदरी त्रिभंग अवस्थेत उभ्या आहेत. यांना स्तंभ पुतलिका म्हणतात.

मंदिराच्या गर्भगृह चौरस आकाराचे आहे. गर्भगृहात मधोमध शिवलिंग आहे. आणि मागील बाजुस भिंतीमध्ये विष्णुची केशवरुपातील मुर्ती आहे. गर्भगृहाच्या भिंती सपाट आहेत.चारही कोपऱ्यात भिंतीतील स्तंभ आहेत. गर्भगृहाची द्वारशाखा उत्कृष्ट आहे. याद्वाराला पाचशाखा आहेत. एक शंकरपाळ्याच्या आकाराची व चार व्याल शाखा आहेत.

मंदिराचा बाह्य भाग हा अधिष्ठानासारखा आहे. यामंदिराच्या बाह्यभागावर देवकोष्टे आहेत. म्हणजे एकुण नऊ देवकोष्टे आहेत. प्रत्येक बाजुस दोन स्तंभ आहेत. मुख्य गाभाऱ्याचे आणि उजवी कडील गाभाऱ्याचे द्वार पाल वैष्णव आहेत. अशा प्रकारे येथील महादेव मंदिराची रचना खुपच सुरेख आहे.

ISSN 2231 4342

- **महादेव मंदिर, बलसूर**

येथे दोन शिवमंदिरे आहेत. महादेव मंदिर उत्तर चालुक्य काळातील आहे. परंतु याची संपूर्णपणे पडझड झालेली आहे. काही महत्त्वाचे अवशेष उरले आहेत, त्यामुळे यामंदिराच्या प्राचीन समृद्धीची आणि उत्कृष्ट वास्तुरचनेची साक्ष पटते. नीलकंठेश्वर यानावाने ओळखले जाणारे दुसरे एक यादव कालीन मंदिर ही येथे आहे. महादेव मंदिराचे गर्भगृह, अंतराळ आणि सभामंडपाचा काही भागच आता शिल्लक आहे. परंतु प्राचीन काळी त्रिदल गाभारा असावा असे वाटते.

- **महादेव मंदिर, नारंगवाडी**

हे महादेव मंदिर या नावाने ओळखले जाणारे एक शिव मंदिर आहे. नारंगवाडी हे गाव उमरग्या पासून १९ कि. मी. अंतरावर आहे. पूर्वा भिमुख असणारे हे मंदिर इतर यादवकालीन मंदिरांसारखे आतून कोरीव परंतु बाहेरून एकदम साधे आहे. गर्भगृह, अंतराळ, सभामंडप, लहानसा मुख मंडप आणि समोरच लागून असलेला नंदी मंडप अशी या मंदिराची रचना आहे. या मंदिरात दोन शिलालेख आहेत.

मुखमंडप सभामंडपाच्या पुढे मुखमंडप आहे. सभामंडपाच्या भिंती पुढे जाऊन अध्ध्या झाल्या असून याचाच मुख मंडप बनला आहे. त्यावर दोन बुटके अर्धस्तंभ आहेत. मुखमंडपा समोर थोडासा सज्जा असून त्याला दोन्ही बाजूंनी पायऱ्या आहेत. या सज्जाला चिकटूनच नंदीमंडप आहे.

- **मल्लिकार्जुन मंदिर, अचलेर**

अचलेर या छोट्या गावात मल्लिकार्जुन म्हणून ओळख जाणारे एक शिवमंदिर आहे. ह्या मंदिराचे रूपांतर नवीन मंदिरामध्ये करण्यात आले आहे. मंदिराचा कळस देखील नव्याने बांधण्यात आला आहे. बाह्य भिंती व मुख मंडप यात ही बदल करण्यात आला आहे असे दिसते. हेमंदिरदक्षिणामुखअसूनमूळत्रिदलगाभाऱ्याचेअसावे. सध्या पश्चिमेकडील गाभारा अस्तित्वात असून पूर्वेकडील गाभाऱ्याच्या ऐवजी अर्धमंडप आहे. कदाचित मंदिराला पूर्वाभिमुख करण्याचा प्रयत्न असावा. परंतु मुख्य गर्भगृह मात्र दक्षिण मुखीच आहे.

- **त्रिविक्रम मंदिर**

तेर येथे गावाच्या मध्यभागी असलेले महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन मंदिर हे त्रिविक्रम मंदिर म्हणून ओळखले जाते. हे मंदिर संपूर्ण विटांचे आहे. ह्या मंदिरा भोवती प्राकार आहे. ते पूर्वाभिमुख आहे. गर्भगृह आणि सभामंडप असा अगदी साधा आराखडा या मंदिराचा आहे. हा सभामंडप गूढमंडप प्रकारात मोडणारा असून, मंदिराचा कालखंड इसवी सनाचे ५ वे -६वे शतक असा आहे. या मंदिराचा इतिहास खुप मोठा आहे. असे अनेक शिव मंदिरे उस्मानाबाद जिल्ह्यात आढळुन येतात. याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

ISSN 2231 4342

सारांश :

उस्मानाबाद जिल्ह्यातील शिवमंदिरे ही एक ऐतिहासिक वारसा म्हणुन जपण्याजोगे आहे. याचे संरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील शिव मंदिरे प्राचिन काळी धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक भुमिका बजावलेली आहे. आजच्या युगात ही मंदिरे आर्थिक बाबी मजबुत करण्यासाठी याचा वापर होऊ शकतो. व यामुळे स्थानिकांना रोजगार मिळु शकतो. चालुक्य कालीन शिवमंदिरामुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील धार्मिक जीवनाला एक सांस्कृतिक वळण मिळाले आहे.

संदर्भग्रंथ :-

1. प्राचीन हिंदी शिल्प शास्त्रसार-लेखक:कृष्णाजी विनायक व झो, वरदाप्रकाशन, प्रा.लि. 'वरदा' सेनापती बापट मार्ग, 397/1, वेताळबाबाचौकपुणे, 411016.
2. कला वस्तु आणि ग्रंथालय साहित्याचे जतन- मुळ लेखकओ. पी. अगरवाल, अनुवाद सुजलादेव, नॅशनलबुकट्रस्ट, इंडिया 1998.
3. महाराष्ट्राची मंदिर शैली, डॉ. भाग्यश्री काळे-पाटसकर डायमंड पब्लिकेशन 264/3 शनिवारपेठ, पुणे.
4. प्राचीन भारत, डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, पिंपळापुरे ॲण्डकं. पब्लीषम, नागपूर.
5. हेमाद्रि उर्फ हेमा डपंत (त्यांचे चरित्र) लेखक :केशव आप्पा पाध्ये, 'वरदा' सेनापती बापट मार्ग, 397/1 वेताळ बाबा चौक, पुणे, 411016.
6. मंदिर-शिल्पे मराठवाड्यातील काही शिल्प आणि मंदिर स्थापत्य, डॉ. मायापाटील (शहापूरकर), ग्रंथाली वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला, जे.के. सावंतमार्ग, यशवंतनाट्य मंदिरा शेजारी, माटुंगा (प), मुंबई 400016.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

"अनाथांचा नाथ संत एकनाथ"

संशोधक विद्यार्थी
कृष्णा बबनराव काळे
इतिहास, विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा,
विद्यापीठ औरंगाबाद
मो. ८४५९३७५८५२
kale.krushna90@gmail.com

प्रस्तावना:

"पैठणच्या एका सुखवस्तु घराण्यात जन्मलेला एक मुलगा एवढीच नाथांची व्यावहारिक किंमत, पंरतु जीवनाच्या भाव मुल्यावर नाथांची केवढी प्रचंड निष्ठा" नाथ षष्ठीला पैठणनगरीत केवढी वारकऱ्यांची गर्दी असते. नांथाच्या या पुण्यभुमीत जाऊन नाथ गुणवर्णन करुन आपल्या पापांची कबुली टाळ मृदंगाच्या माध्यमातून देत हे वारकरी पाहिले म्हणजे खरोखरच आनंद होतो. गोदेच्या परिसरातील वाळुच्या कणरुणातुन नाथांची महती आपल्याला ऐकू येईल. धर्म आणि कर्म कसे असते. तर राज्यकरणारे अनेक कर्मवीर राजे आले आणि गेले परंतु आपल्या भगवद्भक्तीचे लोकांच्या मनाचे मळे परंतु आपल्या भगवद्भक्तीचे लोकांच्या मनाचे मळे कुसिनित करणाऱ्या नांथाच्या नावाचा गजर आजही आपल्याला पैठणच्या गोदेकाठी नव्हे तर साऱ्या महाराष्ट्रामध्ये पहावयास, मिळतो. मराठी माणसाच्या मनावर पडलेल्या नाथांच्या धार्मिक कर्तृत्वाचा हा प्रभाव नाकारता येत नाही.

एकनाथांचे तब्बल चारशे वर्षापूर्वीचे समान कार्य आजही उल्लेखनीय आहे. रामेश्वराला, जातांना तहानलेल्या गाढवाला पाणी पाजले. तिथेच त्यांना रामेश्वर घडल्याचा साक्षात्कार झाला. महाराचे मूलकडेवर घेतले. श्रद्धासाठी तयार केलेला स्वयंपाक महारांना वाटून दिला समाज व्यवस्थेचा परंपरांगत जातीयवादी चौकट तोडून नाथांनी आपल्या आचरणातून एक आदर्शच उभा केला. बुद्धीवादाच्या गप्पा आणि जीवन मूल्यांच्या चर्चा आमची पोपटपंची यांना कुठेतरी आणि काहीतरी स्थान आहे काय: आज मानवतेच्या बद्दल केवळ घोषणा देतो. परंतु प्रत्यक्ष आचरणाच्या पातळीवर आपल्या लातसेवागता येत नाही. घोषणा बाजीच्यानी पोपटपंचीच्या दुर जाऊन नाथांनी. मानवतेचे समानतेचे कार्य आपल्या कृतीने करुन दाखविले. आपल्या मनात, मानवी मुल्यांबद्दल अतुटश्रद्धा असली तर प्रेमाचा भाव आपोआप फुलतो.

एक नाथांनी ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी' चे संपादन करुन महाराष्ट्रावरच नव्हे तर भारतावर अमोल उपकार केले आहेत हे त्यांनी आवर्जुन सांगितले आहे. ज्ञानेश्वरांनी ज्या सामाजिक कळकळीने जनांच्या कल्याणासाठी ज्ञानेश्वरी निर्माण केली, त्यांचेच कार्य एकनाथांनी पुढे चालविते. नाथांनी आपल्या

कुलपरंपरेप्रमाणे चालत आलेली श्री एकवीरारेणुका ही नाथांची देव्हाऱ्यात श्री दत्तात्रयानाही स्थान मिळाले. समान शिक्षण देण्याची मनातील जिद्द म्हणून त्यांनी पंढरीचा विठ्ठल स्विकारला."

ज्ञानेश्वरांनी सारा महाराष्ट्र आपल्या आर्ध्यात्मकततेने जागा केला. या जागृत झालेल्या लोकांना सतत सजग ठेवण्याचे कार्य नाथांनी केले. हे त्यांचे महनीय कार्य आपल्याला विसरता येणार नाही. कर्मकांडाचे धोतांड नाकारणे, जनसामान्यांच्या करुनेने व्यथित होणे हा नाथांचा प्रकृती पिंड अतिशय मोठा दयासागरासा होता. संत एक नाथ हे सर्व समभाव नेहमीच आपल्याला त्याच्या जीवनातुन दिसुन येते.

विषय प्रवेश :-

ज्याप्रकारे सुर्य उगवण्या अगोदर जसा प्रकाश प्रकट होतो. त्याच प्रकारे प्रौढ अवस्था येण्या अगोदरच परिपूर्ण होण्याच्या वयाच्या अगोदर बाल्य अवस्थेतच सवर्ज्ञनेचा संचार होतो, बुद्धीपक्क होण्या अगोदर सर्वविद्याचा प्रसाद आपोआपच मिळाला होता. आणि त्यांच्या तोंडातुन सर्व शास्त्र स्वभावत: प्रगट होतात. हा सिद्धांत संत एकनाथवर पूर्णपणे लागु होतो. त्यांच्या तोडीचा व सर्वगुण संपन्न् सर्जनशील प्रतिभेचा कवी महाराष्ट्रामध्ये आजपर्यंत जन्मला नाही. ते जितके उच्च कवी होता त्याहून अविक ते उच्च कोटीचे संत होते. खरोखरचतेएकअपूर्वअसेसंतहोते.

प्रवृत्ती आणि निवृत्तीचा असा संगम विलोभनीय समन्वय जगामध्ये कदाचित कोणी दुसऱ्या संतने संपादित केला असेल. त्याच्या अगोदर संत नामदेव आणि त्यांच्यानंतर संततुकाराम सुद्धा गृहस्थ होते. परंतु त्याची रुची संसारामध्ये नव्हती. ते विवाहबद्ध झाल्यामुळे ते या विवस्थेमुळे ते संसार करत होते. याच्याव्यतिरिक्त त्याचा संसार दारिद्रतापूर्ण आणि अशा अनेक समस्यांनी ओतप्रोत भरलेला होता. परंतु संत एकनाथ महाराज याला अपवा आहे. शेवटी हे दोन्ही संत गृहस्थी संसारा विषयी उदासीन राहिले होते. संत एकनाथ परमार्थ.

संत एकनाथ महाराजांनी पूर्ण सात्विक धार्मिक रुचिपरमार्थ साधनापूर्ण केली. घेऊन होती. त्यांनी गृहस्थाश्रमला कधी न परमार्थ पंथमारेकरी अनुभव केला न म्हटले I तेआदर्श गृहस्थ होते. तसेही ते भक्त होते. संत बहिणाईने आपल्या एक अंभग मध्ये खरेही म्हटलेआ हे.

ज्ञानदेव रचिला पाया
नामदेव उभारीले देवालया
एकनाथ झाला खांब
तुका झाले से कळस.

भागवत धर्म मंदिर संबबनून महागौरव संत एकनाथ. यांना खाबाची बनण्याचे महाभाग्य संत एकनाथला प्राप्त झाले होते. हे सुर्यप्रकाशासारखे स्पष्ट आहे. या कार्याचा श्री गणेशा संत ज्ञानेश्वर केले होते. संत एकनाथ महाराजाच्या जीवनातील काही प्रसंगावरुन संत एकनाथ महाराजाचा उदार अंतकरण आणि अनाथाचे नाथ कसे होते. हे आपल्या लक्षात येते. उदाहरणार्थ गोदावरीचे स्नान करुन आल्यावर यवन त्याच्या अंगावर थुंकला परंतु

त्यांनी आपल्या शांती ढळू दिली नाही. व शेवटी तो यवन नाण्यांना शरण आला. एकनाथ महाराजाची शांती भंग करण्यासाठी काही मंडळीनी २०० रुपयाचा पुरस्कार ठेवावा तरी सुद्धा त्यांना अपयश यावे. संत एकनाथ महाराजांचे वाड्याचे द्वार हे अक्षितांसाठी नेहमी खुले राहत असे. अन्नदान असो किंवा लोक शिक्षणाचे कार्य असो त्यांनी कधीही मतभेद जाती भेद केला नाही. त्यांनी सर्वांना समान आधिकार आणि हक्काची शिकवण दिली. त्यांनी तत्कालीन व्यवस्थेची पर्वा न करता महारांना पितृ श्राद्ध करता बनविलेले अन्न महारांना भोजन करविले त्यावेळी त्यांनी जाती पेक्षा जीवाला महत्त्व दिले. वडारी दाम्पत्याला सन्मान जे किर्तनासाठी आले व तसेच झोपी गेले. नाथांच्या शयन गृहात नाथ करुन त्यांना तृप्त केले. त्यावेळी नाथा विषयीचा भाव म्हणजे नाथ हे अर्नाथाचे होते. असे स्पष्ट होते. रामेश्वराहून आणलेले गंगेचे पाणी तहानलेला गाढवास पाजले व तेथेच रामेश्वराला पाहिले. भुतदया करुणा शांती समता अनेक एकना अनेक गुणांनी नाथाचे जीवन भरलेले आपल्या दिसुन येते. नाथांनी पैठणच्या वेश्या, सुंदर व हुशार होतो. परंतु जीवन नरकमय झाले होते. तिला पैठण व भक्तीचा मार्ग देऊन तिचे उर्वरित आयुष्याला दिशा दिली. चोरांचा सत्कार करणारा हे पहिले संत होते. महारा घरी भोजनास जाऊन जाति भेदाला छेद देण्याच कार्य नाथांनी केले म्हणून अनाथाचा नाथ संत एकनाथ महाराज आहे असे यावरुन दिसुन येते. नाथ महाराज गरजुना मदत करीत असत. उदार हस्ताने ते समाजकार्य करित असत.

संदर्भग्रंथ:

१) पोहनेरकर,न. शे, श्री एकनाथ दर्शन, श्री एकनाथ संशोधन मंदिर औरंगाबाद १९५२
२) लक्ष्मणनारायणगर्दे, एकनाथ चरित्र, काशी. इ.स. १९००.
३) देशपांडेप्रो. भी. गो. मराठी का भक्ती – साहित्य चौखला वाराणसी विद्याभवन - १.
४) गं. बा. सरदार, संतवाडमयांचीसामाजिकफलशुती.
५) जोशी, शांता. श्री. न. शे. पोहनेरकर यांचे शोधनिबंध, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट 2004,स्वरूपप्रकाशन औरंगाबाद.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणातील योगदान

उषाताई लक्ष्मण मगरे
संशोधक विद्यार्थिनी (इतिहास)
यशवंत महाविद्यालय, नांदेड
ushalmagare@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्री उध्दारकर्ते होते. त्यांनी बंदीस्त स्त्रियांच्या स्थितीचे बारकाव्याने निरीक्षण केले. आणि त्यांना या परिस्थितून बाहेर काढण्यासाठी प्रबोधन, कायदे या माध्यमातून स्त्री जागृती घडवून आणली. यातून स्त्रीस समता मिळवून देवून स्त्रीला विकासाची संधी प्राप्त करुन दिली.

प्राचीन काळापासून मानवनिर्मित धर्म व जातीने स्त्रीस गुलाम केलेले आहे. त्यामुळे तिला सदैव समाजात दुय्यम स्थानच मिळालेले आहे. स्त्रिचा विकास होऊ नये यासाठी तिला अज्ञानात ठेवण्यात आले. अज्ञानामुळे ती अंधश्रध्देत गुरफटली गेली. यामुळेच स्त्री जीवनात ''सतीप्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाहबंदी, केशवपन यासारख्या अनिष्ठ प्रथा प्रचलित झालेल्या होत्या. भारतीय स्त्रियांना संपत्तीविषयक अधिकार नव्हता, घटस्फोट घेण्याची परवानगी नव्हती, एखादे मुल दत्तक घेण्याचा किंवा दत्तक (मुलगी) म्हणून जाण्याचा अधिकार नव्हता. समाजातील अनिष्ठ निती नियमांनी त्यांचे जीवन बंदिस्त केले गेले होते. स्वतंत्रता आणि समानता हे शब्द तिच्यासाठी अर्थहीन ठरलेले होते.''[१] तिला ना शिक्षण घेण्याचा, ना समाजात व्यक्ती म्हणून कार्य करण्याचा अधिकार होता. त्यामुळेच ''पुरातन काळात गार्गी, मैत्रेयी झाल्या तरी त्यांना वैदिक संस्कृतीने गप्पच बसवले होते. मध्ययुगात स्त्रिची अत्यंत दयनीय अवस्था होती. 'पुत्रवती भवः' असा आशिर्वाद देणाऱ्या थोरा मोठ्यांनी स्त्रिचे अस्तित्व नाकारले होते.''[२] अशा विविध समस्येने स्त्रीस ग्रासले होते. त्यामुळे प्राचीन काळातील अशा परिस्थितीतून स्त्रीस मुक्त करून तिला समतेचे स्थान गौतम बुध्दांनी सर्वप्रथम स्त्रीस देवून क्रांती घडवून आणली. त्यामुळेच अशा स्वरूपाच्या परिवर्तनामुळे ''या देशातील स्त्रिमुक्ती चळवळ बुद्ध, कबीर, फुले या तीन गुरूंच्या वैचारिकतेतून निर्माण झाली''[३] असे म्हटले जाते, स्त्री सुधारणेसाठी अकबर, राजश्री शाहू महाराज यांनीही मोलाचे कार्य केलेले आहे.

असे असले तरीही ''धर्माने व्यक्तीच्या जीवनाची सर्व अंगे व्यापली होती. युरोपातील प्रबोधनाच्या चळवळीने धर्माची कक्षा अरुंद करत व्यक्तीला धर्माच्या जोखडातून मुक्त केले. व्यक्ती स्वयंभू बनवली. यातून निर्माण होत गेलेल्या व्यक्ती स्वातंत्र्याने लोकशाही विकसित होत गेली. भारतीय प्रबोधनाच्या चळवळीविषयी आदर राखून असेही म्हणता येईल की, तिला भारतीय व्यक्तीला धर्मजोखडातून पूर्णपणे मुक्त करता आले नाही. त्यामुळे भारतीय व्यक्तीचे आचार-विचार हे धर्ममूल्यांनी बध्द राहिले.''[४] अर्थात धर्माच्या वाईट विचारातून वर काढून फक्त धर्मातील चांगल्या बाबींचा स्वीकार करून व्यक्तीने स्वतःचा विकास करावयास हवा होता. पण धर्मातील अनिष्ट बाबींचा पगडा अद्याप काही व्यक्ती दूर करण्यास तयार नसलेल्या दिसतात.

 ISSN 2231 4342

त्यामुळे पुरुषांच्या मानसिकतेने स्त्रीस जाणून-बुजून जातिव्यवस्थेचा महत्त्वाचा वाहक घटक बनविले आहे मग त्यांना जर या स्थितीमधून वर काढण्यासाठी ज्या बहुजन समाजात महानायिका व महापुरुष झाले त्यांचा प्रेरणादायी इतिहास समजून सांगावा लागेल. जेव्हा स्त्री जातिव्यवस्थेच्या बंधनातून बाहेर पडेल त्यावेळेस कदाचित समाज परिवर्तन घडून येईल.

समाजातील जातीव्यवस्था कायम राहावी यासाठी मनुने मनुस्मृती ग्रंथाच्या माध्यमातून स्त्रियांवर बंधने लादली. त्या बंधनामध्ये ''विवाह, वारसा, विधवा पुनःर्विवाह, सहभोजन, स्त्रियांचे आदर्श, स्त्रियांचे समाजजीवनातील स्थान याबद्दल विविध कायदे तयार केले. डॉ. आंबेडकरांच्यामते हे सर्व कायदे स्त्रियांवर अन्याय करणारे, त्यांना तुच्छ आणि पशू लेखणारे आहेत"[५] अर्थात मनूने स्त्रीने जीवन व्यतीत करण्यासाठी विशिष्ट कायद्यांची निर्मिती केली होती. त्यामुळे बाबासाहेब म्हणतात, स्त्री दास्याचे मूळ भारतात ज्या रूढी परंपरा आहेत. त्यात मला दिसते. त्यामुळे स्त्रियांच्या शोषणाच्या मुळाशी गेल्यास आपणास ते मूळ जात आणि धर्म या व्यवस्थेत असलेले दिसते.

यासाठी बाबासाहेबांनी स्त्रिच्या प्रतिष्ठेस, स्वातंत्र्यास महत्त्व दिलेले दिसते. त्यामुळे बाबासाहेबांनी "स्त्रियांच्या सन्मानाला व स्वयंतेजाला नवे सामर्थ्य व स्वत्व मिळवून दिले. भारतीय स्त्रिच्या जीवनात आत्मशोध घेण्याची, स्वत्व शोधण्याची प्रेरणा देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे संवेदनशील मनाचे, प्रखर बुद्धिमत्तेचे, पुरोगामी विचारांचे आणि कृतिशील महापुरुष होते.''[६] अर्थात बाबासाहेब समता मूल्य केंद्रीभूत मानत असत त्यामुळे स्त्रीचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी ते सतत प्रयत्नशील राहत असत.

यासाठीच "त्यांनी जागतिक महिला विषयक प्रश्नांचा अतिशय सूक्ष्मपणे अभ्यास केला. पाश्चात्य स्त्रियांची स्थिती त्यातल्या त्यात दलित स्त्रियांच्या स्थितीची तुलना केली व तेथील स्त्रियांप्रमाणे माझ्याही देशातील स्त्रियांची स्थिती सुधारली पाहिजे व स्त्री मुक्त झाली पाहिजे, असे आंबेडकरांच्या मनात विचार येत असत."[७] अर्थात बाबासाहेबांना स्त्रीचा सर्वांगीण विकास घडून यावा असे वाटत असे. त्यासाठी सतत बाबासाहेब महिलांचे प्रबोधन करत असत. त्यामुळे स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्त्रियांकडे बाबासाहेब पाहत असत. महिलांचे संघटन यावर ते विश्वास व्यक्त करत असत.

हे घडून यावं म्हणून बाबासाहेबांना "पडदा पद्धत बंद झाली पाहिजे, महिला शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे, महिलांनी सामाजिक कार्यात सहभाग घेतला पाहिजे, समाजाची प्रगती महिलांवर अवलंबून आहे. महिलांनीही पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम केले पाहिजे, महिलांनी आपल्या हक्कांसाठी मनोबल वाढवून कंबर कसून पुढे आले पाहिजे, आपला पोशाख हा आपल्याला शोभेल असा असावा, महिलांनी दागिने वापरत असताना सोन्याचे व छोटेसे दागिने वापरले पाहिजे असे आंबेडकरांचे मत होते. बालविवाह, सतीप्रथा यांना सुद्धा त्यांचा विरोध होता."[८] अर्थात अनिष्ट रूढी बंद करून स्त्रियांनी आपली आत्मोन्नती करावी असे त्यांना वाटते.

 ISSN 2231 4342

बाबासाहेब स्त्रियांच्या समस्येचे सूक्ष्मपणे अवलोकन करत असल्यामुळे त्यांची एक इच्छा होती ती म्हणजे ‘‘औरंगाबाद येथे एक अनाथाश्रम काढून अनाथ, गरीब, परितक्त्या, कुमारी मातांनी टाकलेली मुले सांभाळावीत’’[९] अर्थात या विचारातून त्यांच्या वात्सल्याचा भाव दिसून येतो. या बरोबरच अन्याय होणा-या व शोषित स्त्रीस बाबासाहेबांनी माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. स्त्रियांचे (अनिष्ट प्रथा, परंपरा, जुलुमातून) रक्षण व्हावे म्हणून बाबासाहेबांना स्त्रियांनी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी व्हावे असे वाटत असे. त्याचा ते आग्रह पण करत असत.

‘‘मनूने मनुस्मृतीत हिंदू समाजाला कायद्याच्या निर्घृण चौकटीत अडकवून ब्राह्मण वर्गाला सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अधिकार देऊन शासनाच्या किल्ल्या त्यांच्याच ताब्यात दिल्या.’’[१०] अर्थात सर्व अधिकार मनूने ब्राह्मणास दिले होते. पण मनूने ‘न स्त्री-स्वातंत्र्य महरती’ म्हणून जाचक धार्मिक कायदे बनवून स्त्रियांना गुलाम बनविले होते.”[११] यासाठी मनूने ”स्त्रिच्या लहानपणात बाप तिचे पालनपोषण करतो, नवरा तिच्या तरुणपणात तिचे संरक्षण करतो आणि तिचे मुलगे तिच्या वृद्धावस्थेत तिचे संरक्षण करतात. स्त्री स्वातंत्र्याला केव्हाही लायक नसते.’’[१२] असा कायदा केला. तसेच “बालपणात स्त्री पीत्याच्या ताब्यात असावी, तारुण्यात पतीच्या आणि पती मृत्यू पावल्यानंतर मुलांच्या ताब्यात असावी. तिला स्वातंत्र्य कधीही देऊ नये.’’[१३] असाही एक नियम केला. अर्थात मनूच्या कायद्याच्या नियमातून स्त्रीस स्वातंत्र्य तर दिलेलेच नाही पण ति पारतंत्र्यात ही राहून चाकोरीबद्ध पणे वागावी यासाठी असे नियम बनवले गेले होते. अशाप्रकारे ‘‘हजारो वर्षापासून मनुस्मृतीच्या नियमानुसार स्त्रिला गुलामीत जीवन जगावे लागले. तिला मुक्त करून स्वाभिमानाचे जीवन जगण्याचा हक्क केवळ डॉ. बाबासाहेबांमुळेच मिळाला.’’[१४] त्यासाठी त्यांनी ‘‘मनुस्मृती ग्रंथ २५ डिसेंबर १९२७ ला (रात्री नऊ वाजता) जाळून महिला बाबतीत उल्लेखनीय कार्य केले.’’[१५] ‘‘स्त्रियांना माणूसपण नाकारणाऱ्या या संहितेला लावलेली आग म्हणजे स्त्रिदास्याच्या आंधकारालाच लावलेली आग होती. ब्राह्मणी मूल्य व्यवस्थेला सुरंग लावणाऱ्या ह्या ऐतिहासिक दिवसाची प्रेरणा स्त्रियांच्या शोषणाविरुद्धच्या स्त्रियांपर्यंत ती प्रेरणा पोहोचावी या हेतूने ‘२५ डिसेंबर’ हा दिवस ‘भारतीय स्त्रीमुक्ती दिन’ म्हणून घोषित करण्याची मागणी पुढे आली आहे.’’[१६] अर्थात या कायद्यास नष्ट केल्यामुळे स्त्रीला स्वातंत्र्य मिळालेले आहे.

स्त्री शिक्षण—

डॉ.बाबासाहेबांनी “२० जून १९४६ ला पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व त्यानुषंगाने मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालय, औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय काढले’’[१७] या माध्यमातून स्त्री व पुरुष या दोन्ही घटकांना त्यांनी शिक्षण दिले. मुलींसाठी तर काही योजनाही त्यांनी शिक्षणासाठी राबविल्या. कारण “डॉ. बाबासाहेब म्हणत पुरुष शिकला तर तो एकटा सुधारतो परंतु स्त्री शिकली तर ती दोन घरांमध्ये शिक्षणाचा प्रकाश निर्माण करू शकते. (माहेर व सासर)”[१८] अर्थात स्त्री शिक्षणातून कुटुंबांचा स्त्रीमार्फत उध्दार बाबासाहेब अपेक्षित करतात.

त्यामुळे "स्त्रियांना शिक्षित करणे, त्यांना जागृत करणे व माणुसकीचे जीवन प्रदान करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ध्येय होते. ज्या हक्कापासून स्त्री वंचित होती. ते सर्व अधिकार स्त्रियांना मिळावे या ध्येयाने त्यांनी अथक प्रयत्न केले. स्त्रियांना मूलभूत हक्क प्रदान करून त्यांच्या उन्नतीचे सर्व मार्ग त्यांनी मोकळे केले. डॉ. आंबेडकरांनी केवळ अस्पृश्य स्त्रियांमध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला असे नाही तर भारतातील समस्त स्त्रियांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला. डॉ. आंबेडकरांनी शेकडो वर्षापासून होणारी स्त्रिची विटंबना थांबवून त्यांच्यात स्वाभिमान, स्वविश्वास जागृत केला. समाजात ताठ मानेने जगण्याचे सामर्थ्य बहाल केले.''[१९] अर्थात शिक्षणाच्या माध्यमातून स्त्री सक्षम करण्याचा प्रयत्न बाबासाहेबांनी केला. त्यांनी शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून ज्या ठिकाणी ते भाषण देत त्या ठिकाणी तेथील स्त्रियांना उद्देशून म्हणत तुम्ही स्वतः शिक्षण घेऊन आपली प्रगती करावी. त्यासोबतच आपल्या मुला-मुलीत भेद न करता त्यांना शिक्षण तुम्ही दिले पाहिजे या प्रकारे ते स्त्रियांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत असत.

''डॉ.बाबासाहेबांनी विदेशात उच्च शिक्षण घेतले असल्यामुळे तेथील स्त्री-पुरुष समानता त्यांनी जवळून अनुभवली होती. त्यामुळेच ते स्त्री-पुरुषांची नीतिमत्ता शाबूत ठेवण्यासाठी वयाच्या सातव्या वर्षानंतर त्यांना वेगवेगळे शिक्षण द्यावे या पुराण मतवाद्यांच्या विचारास बाबासाहेबांचा विरोध होता. स्त्री-पुरुष सहशिक्षणामुळे स्त्रिया समाजात निर्भीडपणे वावरू शकतील असे बाबासाहेबांचे ठाम मत होते. स्त्री-पुरुष शिक्षणाची भूमिका त्यांनी १५ जुलै १९२७ च्या बहिष्कृत भारत मध्ये स्पष्ट केली आहे.''[२०] अर्थात सातव्या वर्षी मुलगा आणि मुलगी बाल्यावस्थेतच असतात. त्यामुळे त्यांच्यात समंजसपणा नसतो व त्यांच्यात फक्त लिंगावरून भेद करणे उचित नाही. त्यामुळे बाबासाहेब यास विरोध करतात. याबाबत बाबासाहेब म्हणत की, "एखाद्या तरुणास निर्जव वनात हिमालयासारख्या पर्वताच्या आसमंतात जर डांबून ठेवले तर तो आजन्म ब्रह्मचारी राहील याबाबत काही शंका नाही त्याचप्रमाणे एखाद्या नवतरूण महिलेस तुरुंगाच्या आत डांबून ठेवून (पडदा पद्धत) तिला पुरुषांच्या संपर्कात येऊ दिले नाही. तर ती सुद्धा अजन्म आध्वी जगू राहू शकेल परंतु त्याला काहीही अर्थ नाही, महिलाच्या सहवासात राहून ज्या पुरुषांचे पाऊल वाकडे पडणार नाही जो आपले मन काबूत ठेवू शकतो व पुरुषाच्या सहवासात राहून जी महिला आपले पाऊल वाकडे पडणार नाही याची जबाबदारी घेते अशा स्त्री-पुरुषांना नीतिमान व चारित्र्यसंपन्न म्हणता येईल."[२१] अर्थात स्त्री शिक्षणासारख्या चांगल्या कार्यासाठी पूर्वीच्या अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा दूर करून स्त्री शिक्षण द्यावे असे बाबासाहेबांना वाटते. स्त्री-पुरुष शिक्षणातूनच समाजाची प्रगती तर होईलच पण शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीमध्ये माणुसकी व शांतता या गुणांचा विकास होईल त्यातून चांगले नागरिक घडु शकतील.

२७ डिसेंबर १९२७ साली महाड सत्यागृहाच्या काळात स्त्रियांना संबोधून आपल्या भाषणात स्त्री शिक्षणाचे महत्व विशद करतांना बाबासाहेब म्हणतात, " तुम्ही आपल्या मुलींना शिक्षण दिले पाहिजे ज्ञान आणि विद्या ह्या गोष्टी काही पुरुषांसाठीच नाहीत तर त्या स्त्रीयांसाठीही आहेत. पुढे याच सभेत ते 'खान तशी माती' ह्या निसर्ग नियमांच्या संकेतांचा दाखला देवून म्हणतात ''आपली पिढी तुम्हाला सुधारावयाची असेल तर, तुम्ही

आपल्या मुलींना शिक्षण दिल्याशिवाय राहु नका' शिक्षणाने आत्मभान येते व आत्मविश्वास वाढतो. त्यातूनच अस्तित्वाचा उलगडा होतो ते विचार करुन थांबले नाहीत तर औरंगाबाद येथील महाविद्यालयात मुलांबरोबरच मुलींनाही महाविद्यालयात येण्यासाठी खास मोफत बस सुरु केली होती.''[२२] अर्थात स्त्री-पुरुष समानतेचे विचार बाबासाहेबांच्या विचारातून स्पष्ट होतात. महिलांनी शिक्षण घेवून स्वतःच्या कुटुंबापुरता विचार करु नये त्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजात जागृती घडवून आणण्यासाठीही करावा असे बाबासाहेबांना वाटते.

यासाठी "२० जुलै १९४२ रोजी प्रांतिक सरकारला विनंती केली, महिला वर्ग शिक्षणात मागासलेला आहे. मुलींसाठी वस्तीगृह काढले. उच्च शिक्षण घेवु इच्छिणाऱ्या मुलींना सरकारी व निमसरकारी शाळेमधून फ्रिशीप, स्कॉलरशिप देण्यास सरकारला अवलंब करावयास लावले. मुलींच्या शिक्षणासाठी औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालयाची स्थापना केली."[२३] तसेच सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठीही त्यांनी प्रांतिक सरकार मार्फत प्रयत्न केले अर्थात स्त्री मध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी स्त्री शिक्षणातील अडचणी बाबासाहेबांनी प्रत्यक्ष कृतीतून दूर केल्या.

स्त्री आरोग्यविषयक सुधारणा -

"स्त्रियांच्या आरोग्य विषयक प्रश्नांना वाचा फोडणारे डॉ. आंबेडकर हे पहिले सुधारक होते."[२४] त्यामुळेच "डॉ. आंबेडकर हे एकमेव राजकीय पुढारी होते. त्यांनी कुटुंब नियोजनाच्या पध्दतीचा गंभीरपणे आभ्यास केला व त्याचे विश्लेषण तर्कावर अधारीत, शास्त्रीय व व्यवहारवादी दृष्टीकोनातून केले होते."[२५] अर्थात स्त्रीयांच्या आरोग्याचा सूक्ष्मपणे अभ्यास बाबासाहेबांनी केलेला दिसतो. त्यातून आरोग्यविषयक सुधारणा त्यांनी केल्या.

स्वतंत्र मजुर पक्षातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वतीने "पी.जे. रोहम यांनी दि. १० नोव्हेंबर १९३८ रोजी मुंबई विधानमंडळात बाबासाहेबांच्या मार्गदर्शनानुसार 'संतती नियमन आणि कुटुंबनियोजन करण्याकरीता सरकारने जोमाने प्रचार करावा आणि कुटुंबनियोजनाची साधने मिळवण्याकरीता योग्य त्या सोयी कराव्यात' असा ठराव मांडला."[२६] हे विधेयक मुंबई विधानसभेत मांडले होते. हा ठराव मांडतांना आंबेडकरांनी निरनिराळ्या देशातील लोकसंख्या, या लोकसंख्येस मिळणाऱ्या वैद्यकीय सोयी व लोकांच्या घडून येणाऱ्या मृत्युच्या प्रमाणाची माहिती पी.जे.रोहम यांना दिलेल्या भाषणातून तुलनात्मक पध्दतीने मांडली. त्यातून कुटुंबनियोजन अत्यावश्यक कशा स्वरुपाचे आहे हे सांगितले. हे विधेयक मांडण्या मागचा बाबासाहेबांचा हेतू म्हणजे, "राष्ट्राच्या आर्थिक विकासातील अडथळा दूर करणे तसेच स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेणे हा होता. कुटुंबनियोजन स्त्रियांच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी या विधेयकाच्या अनुषंगाने पटवून दिले. अनेक मुलांना जन्म दिल्यामुळे स्त्रिया मृत्युमुखी पडतात. मुल नको असल्यास कृत्रिम गर्भपात करतांना स्त्रियांचे आरोग्य धोक्यात येते आणि भरमसाठ मुलांचे संगोपण व्यवस्थीत करता येत नाही हा दृष्टीकोन पुढे ठेवून ते म्हणाले की, 'कोणत्याही कारणास्तव का होईना ज्यावेळेस एखाद्या स्त्रिची मूल होऊ देण्याची ईच्छा नसेल त्यावेळी तिला

 ISSN 2231 4342

गर्भधारणा टाळण्याची मुभा असली पाहिजे आणि संतती जन्माला घालणे हे सर्वस्वी तिच्या इच्छेवर अवलंबून असले पाहिजे. त्याचबरोबर संतती नियमनाची साधनेही तिच्या आरोग्याच्यादृष्टीने सुरक्षित असली पाहिजे.' स्त्रियांच्या प्रती डॉ. आंबेडकरांची तळमळ, कारुण्य, ममत्व यांच्या या कृतीतून स्पष्ट होते."[२७]

बाबासाहेब म्हणत, "प्रस्तुतीपूर्व काळात स्त्रियांना ठराविक विश्रांती व सोयी मिळाल्या पाहिजे."[२८] संतती नियमाचे विधेयक मांडण्यामागची बाबासाहेबांची दृष्टी पाहत असतांना ते व्यक्तींच्या जन्मापेक्षा व्यक्तींस जगविण्याच्या स्थितीकडे अधिक लक्ष देत असत. यातून अस्पृश्य वर्गाचे भारतातील आरोग्य सुधारेल असा त्यांचा हेतु होता. या संतती प्रतिबंधाच्या उपायास श्री. दादासाहेब गायकवाड यांनी समर्थन दिले तर म. गांधी व गांधी विचारसारणीचे आरोग्यमंत्री कै.डॉ. गिल्डर यांनी तसेच मार्क्सवाद व समाजवादी विचारसरणीच्या व्यक्तींनीही बाबासाहेबांच्या विचारास विरोध केला. तसेच हिंदुमहासभा, मुस्लिम लिग, ख्रिश्चन या धर्मातील लोकांनी धार्मिक बाब पुढे करुन या ठरावास विरोध केला. त्यामुळे हा ठराव नामंजुर झाला. बाबासाहेब आपल्या गरीब जनतेवर विश्वास व्यक्त करुन म्हणत, "अनुसुचित जाती व जमातीच्या गरीब जमातींना कुटुंब नियोजनाची खरोखर नितांत आवश्यकता आहे."[२९] हा ठराव जरी संमत झाला नसला तरी तत्कालिन समाजाची कुटुंबनियोजन अपवित्र मानण्याची मानसिक स्थिती, बाबासाहेबांचे ठराव मांडण्याचे धैर्य कौतुकास्पद आहे. त्यातूनच त्यांच्या सूक्ष्मदृष्टीचा परीचय होतो.

हिंदु कोड बिल –

"हिंदु कोड बिलाचा अर्थ म्हणजे हजारो वर्षापासून-पुरातन काळापासून चालत आलेल्या सामाजिक विषमतेचे, भेदभाव, उच्च-निचतेचे आणि दुष्ट चालिरीतीचे मुळापासून उच्चाटन करणे होय. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळून हिंदु धर्मातील चातुर्वणव्यवस्था कायद्याने नाहीशी करणे होय."[३०] त्यामुळे "भारतीय जनसंखेचा अर्धा भाग स्त्री आहे. तिला समान संधी, समान वागणुक मिळावी यासाठी डॉ.आंबेडकरांनी आपल्या प्राणाची शर्थ लावली. 'हिंदु कोड बिलाच्या' रुपाने भारतीय स्त्रीला तिच्या हक्काची सनद बहाल केली. या बिलाचे एकुण नऊ भाग होते त्यात १३९ धारा (कलम) आणि सात सूची होत्या."[३१] अर्थात स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा जाहिरनामा यादृष्टीनेच बाबासाहेबांनी हिंदु कोड बिल लिहिले. "बाबासाहेबांनी १९४७ ते १९५१ या कालावधीत सतत ४ वर्षे १ महिना २६ दिवस परीश्रम करुन हिंदु कोड बील तयार केले."[३२] या बिलात दतक व विवाह, एकपत्नीत्व, घटस्फोट, महिलांना संपत्ती हक्क, पोटगी इ. बाबींच्या तरतुदी करण्यात आल्या होत्या. पण विरोधकांनी आंतरजातिय विवाह व एकपत्नीत्व या बाबी न आवडल्यामुळे यास विरोध केला. त्यामुळे हिंदु कोड बिलास मंजुरी न मिळाल्यामुळे २७ नोव्हेंबर १९५१ साली बाबासाहेबांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला.

स्त्री पुरुष समानता निर्माण व्हावी म्हणून बाबासाहेबांनी, "कायद्याच्या तरतुदीनुसार स्त्री दास्य विमोचन केले. धार्मिक आणि सामाजिक अंधश्रध्देवर निर्माण झालेल्या कडवट रुढीमुळे स्त्री ही पुरुषाच्या हातचे खेळणे बनली होती. पुरुषाच्या वासना तृप्तीची ती खेळणे मानली जात होती. धार्मिक कार्यक्रमात आणि उत्सवात

 ISSN 2231 4342

पुरुषाबरोबरचे कोणतेही समान स्थान तिला नव्हते. गुलाम म्हणूनच तिच्याकडे पाहिले जात होते तिची ही गुलामगिरी डॉ. आंबेडकरांनी दूर केली."[३३]

तसेच ''पती हाच परमेश्वर' ही संकल्पना त्यांना मान्य नाही. कारण यातून पत्नी ही दासी बनते. त्यामुळे आंबेडकरांनी संविधान निर्मितीमध्ये मुलभुत अधिकारांमध्ये समतेच्या आधिकाराचा समावेश केलेला आहे.''[३४] अर्थात समतेच्या अधिकारातून स्त्रीने व्यक्ती म्हणूनच जीवन जगावे असे त्यांना अभिप्रेत होते. त्यामुळेच "राज्यघटनेतील कलम १४, १५, १६ (स्त्री-पुरुष भेद दूर करणे), १९, २१, २३, २४, २५, २८, ३९ अ आणि कलम ४५ ह्या मधील तरतुदी महिला सक्षमीकरण होण्याच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाच्या आहेत. कलम १५ (इ) मध्ये महिलांच्या कल्याणासाठी तरतुदी आहेत. राज्यघटनेतील भाग ३ आणि भाग ४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने करण्यात आलेले कायदे महिलांच्या मानवी हक्क संरक्षणासाठी आणि महिला सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. अशा अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत करुन ठेवल्या आहेत."[३५] अर्थात राज्यघटनेच्या माध्यमातून एक व्यक्ती म्हणून स्त्रियांना बाबासाहेबांनी समतेने हक्क मिळवून दिलेले आहेत.

निष्कर्ष :

१. प्राचीन काळात धर्माने स्त्रीला गुलाम केले होते.
२. डॉ.बाबासाहेबांनी स्त्रिदास्याचे मुळ जात व धर्म आहेत हे स्पष्टकेले.
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कार्यातून स्त्रिचा सर्वांगीण विकास घडवून आणला.
४. डॉ.बाबासाहेबांनी स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांच्यात परिवर्तन घडवून आणले.
५. डॉ.बाबासाहेबांनी स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला.
६. स्त्री-आरोग्य याबाबत बाबासाहेबांनी कायद्याच्या स्वरुपात उपायोजना केल्या.
७. हिंदू कोडबिलाच्या निर्मितीतून बाबासाहेबांनी स्त्रियांना सामाजिक स्वातंत्र्य बहाल केले.

संदर्भग्रंथ सूची :

१. तंगलवाड डी.एम., सरोदे रवि एन.(संपा.), 'युगपुरूष डॉ. बाबासाहेब आंबेडकर', शिवानी प्रकाशन, प्रथम आवृत्ती, १४ एप्रिल २०१४, पृ.३६०.
२. कित्ता, पृ.३३१.
३. कित्ता, पृ.३३२.
४. लोंढे बबन, गायकवाड सुधाकर (संपा.), 'आंबेडकरी विचारधारा ('अस्मितादर्श' मधील निवडक वैचारिक लेखन')', गंथाली प्रकाशन, मुंबई, पहिला आवृत्ती, ४ ऑगस्ट २०१२, पृ.१४.
५. जाधव निर्मला (संपादन), 'भारतीय स्त्रीप्रश्न आकलनाच्या दिशेने', मैत्री पब्लिकेशन, दुसरी आवृत्ती २०१९, पृ.१९०.
६. गुंजकर सोमनाथ, कापसे शिवसांब (संपा). 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन आणि दृष्टिकोन', अनुराधा प्रकाशन, नांदेड. प्रथम आवृत्ती, एप्रिल २०१७, पृ. ५९.
७. तंगलवाड डी.एम., सरोदे रवि एन., पूर्वोक्त, पृ.३३२.
८. कित्ता, पृ. ३४४.
९. कित्ता, पृ. ३५१.
१०. लोंढे बबन, गायकवाड सुधाकर (संपा.), पूर्वोक्त, पृ. ४२९.
११. तंगलवाड डी.एम., सरोदे रवि एन. (संपा.), पूर्वोक्त, पृ. ३५६.
१२. आंबेडकर बाबासाहेब, 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती', सुगावा प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, १४ एप्रिल २०१३, पृ. २०.
१३. आंबेडकर भीमराव रामजी, 'क्रांती आणि प्रतिक्रांती', युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, पृ.९६.
१४. गुंजकर सोमनाथ, कापसे शिवसांब, पूर्वोक्त, पृ. ६२.
१५. तंगलवाड डी.एम., सरोदे रवि एन. (संपा.), पूर्वोक्त, पृ. ३५१.
१६. जाधव निर्मला (संपादन), पूर्वोक्त, पृ. १८९.
१७. तंगलवाड डी.एम., सरोदे रवि एन. (संपा.), पूर्वोक्त, पृ.५.
१८. गुंजकर सोमनाथ, कापसे शिवसांब, पूर्वोक्त, पृ. ६०.
१९. लोकराज्य, एप्रिल २०१६, पृ.३०.
२०. तंगलवाड डी.एम., सरोदे रवि एन.(संपा.), पूर्वोक्त, पृ.३५४.
२१. कित्ता, पृ.३४३, ३४४.
२२. कित्ता, पृ.३६५.
२३. कित्ता, पृ.३३६.
२४. लोकराज्य, एप्रिल २०१६, पृ.३०.
२५. लोकराज्य, १६ एपिल १९८१, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक', पृ.२७.

२६. मून वसंत, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर', नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, दिल्ली, नववी आवृत्ती, २०१३, पृ.८३.
२७. लोकराज्य, एप्रिल २०१६, पृ.३०.
२८. कित्ता, पृ.३०.
२९. लोकराज्य, १६ एप्रिल १९८१, पूर्वोक्त, पृ.२७.
३०. लांजेवार ज्योती, 'फुले-आंबेडकर आणि स्त्री-मुक्ती चळवळ', संकेत प्रकाशन, नागपूर, व्दितीय आवृत्ती, फेब्रुवारी २०१२, पृ.५२.
३१. कित्ता, पृ.५०.
३२. तंगलवाड डी.एम., सरोदे रवि एन.(संपा.), पूर्वोक्त, पृ.३५५.
३३. लोकराज्य, १६ एप्रिल १९८१, पूर्वोक्त, पृ.२३.
३४. तंगलवाड डी. एम., सरोदे रवि एन.(संपा.), पूर्वोक्त, पृ.३६१.
३५. कित्ता, पृ.३७०.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

अठराव्या शतकातील भारतीय समाजाची स्थिती

संशोधक विद्यार्थी
सचिन सखाराम पांडव
इतिहास पी.एच. डी.

अठराव्या शतकातील जगातील अधिकाधिक प्रदेशांमध्ये राष्ट्रे तयार झालीपूर्णपणे विकसित होण्यासाठी नवीन राष्ट्रांनी अंतर्गत संरक्षण आणि बाह्य अडथळा विरुद्ध संघर्ष केला संरक्षण व आत्मनिर्भर साठी राष्ट्रांमध्ये संघर्ष केला अठराव्या शतकात निसंशय भारतीय इतिहासाचा दुखी आणि मूळ काळ होता विशाल आणि मजबूत मोगल समाजात जवळजवळ दोन शतके काही प्रमाणात राजकीय ऐक्य कायम राहिले परंतु हळूहळू फुटून जाणे आणि मुघल साम्राज्याच्या विघटन व शेवटी रास पावला त्याचबरोबर भारतात उच्चकुलीन राजा नवाब यांनी आपला आपल्या पुरातन परंपरा आणि लोकसभेच्या भावना विसरल्या आणि त्यांच्या स्वार्थी व अशा प्रवृत्तीचा त्याग केला त्यामुळे तेथील सामाजिक व राजकीय दुर्दशा अत्यंत अनिश्चितता आणि घसरण याचे वातावरण निर्माण झाले होते खरं तर अठराव्या शतकात आणि दयनीय वर्षात मजबूत सरकारी सत्ता आणि प्रशासकीय व्यवस्था आणि शांतता गेलेली एक मोठी सामाजिक व्यवस्था आणि भारतात एक जंगल राज्य उदयकारनीभूत होते मोठे नुकसान झाले.

प्रशासकीय स्थिती

भारताचा इतिहास केंद्रीय राज्य स्थापनेचा ब्रिटनच्या भारत विजयाचा महत्त्वपूर्ण परिणाम होता त्यामुळे देशातील वास्तविक आणि मूलभूत राजकीय आणि प्रशासकीय एकात्मता झाली अठराव्या शतकात भारतामध्ये अशा एकात्मतेचा अभाव होताआणि वेगवेगळ्या सरंजामशाही प्रांतांमध्ये त्याची विभागणी सतत वाढत गेली अशोक सम्राट आणि अकबर यांच्यासारख्या राजांचा काळात संपूर्ण भारताला राजकीय सत्ता आणि प्रशासकीय व्यवस्था आणण्यासाठी नक्कीच प्रयत्न केले गेले ब्रिटिश शासन स्थापनेचा परिणामी विकसित झालेल्या राजकीय व प्रशासकीय त्याचा विविध क्षेत्रात परिणाम झाला हे मानसी यांच्या म्हणण्यानुसार ब्रिटिशांच्या अमलाखाली स्थापना झालेल्या प्रशासकीय व आर्थिक केंद्रे सांस्कृतिक संपर्क स्थळ म्हणून विकसित झाली कार्यक्षम राज्ययंत्रणा प्रणाली जय कायदेशीर व्यवस्था आणि न्यायव्यवस्था आधुनिक शिक्षण आणि प्रशिक्षण वरच्या वेस्टर्न इंडिया च्या जन्म जन्माच्या काळात पाश्चात्य सरकारच्या स्थापने बरोबरच विचार केला गेला ब्रिटिश अंतर्गत राजकीय प्रशासकीय विशेष अधिकारापासून वंचित राहिल्यामुळे जागरूकता आणि धार्मिक हक्काचा वापर करणे आवश्यक झाले एक संघ राष्ट्रीय अर्थव्यवस्था आणि चळवळीचे सर्व समावेशक व कार्यक्षम साधन नसतानाही ब्रिटिशभारताची अर्थपूर्ण राजकीय व प्रशासकीय एकता शक्य नव्हती केंद्रीय कृती रोपांच्या उदय यांच्या इतिहासावरुन हे स्पष्ट झाले आहे की अशा राजकारणाचा विकास अखंडपणे एकात्मिक राष्ट्रीय

अर्थव्यवस्थेशी आणि तीन चळवळीच्या गुळगुळीत चळवळीशी जोडलेला आहे भारतीय इतिहासात ब्रिटिश शासन स्थापन झाल्यामुळे देशातील व्यापक राजकीय आणि प्रशासकीय एकत्रितपणे एकत्रीकरण होऊ शकले ब्रिटिशांनी त्यांच्या राजकीय-सामाजिक विस्तार १५५७ ते १८५७ दरम्यान वाढविला त्यांनी वैधानिक एकत्रीकरण केले केंद्रीय कृत सरकारच्या काळात संपूर्ण देशाचे उत्तर उत्तरेकडील काश्मीर पासून ते कन्याकुमारी आणि पूर्वेतील आसामपासून पश्चिमेस पर्यंत एक झाली परसिक अल ग्रिफिन यांनी या संदर्भात लिहिली आहे ब्रिटिश राजवटीत भारतीय लोक एक कार्यक्षम व सामर्थ्यशाली सरकारच्या प्रभावाखाली आले ब्रिटिश सत्तेच्या सुरुवातीस कंपनीचे धोरण हे देशातील कायदे आणि अधिवेशने जपण्याचे होती या सिद्धांतानुसार भेटी सरकारने हिंदू व मुसलमान कायद्यांचे इंग्रजीत भाषांतर भारतातील न्यायाधीशांच्या मार्गदर्शनाखाली केली १७९० मध्ये कर्णवल इस मुस्लिम न्यायाधीशांना काढून टाकले खरं खरंतर देव नियुक्त मोहम्मद कायद्याला नागरी कायद्याची प्रक्रिया बनवणारे ते पहिले गव्हर्नर जनरल होते 1799 अधिनियमानुसार अशा प्रकारच्या आरोपाखाली मृत्यूदंडाची व्यवस्था केली गेली होती ज्यात पालकांवर त्यांच्या मुलांचा आणिमामांचा मालकांचा खून केल्याचा आरोप आहे अपघाती कोण हा देखील एक गंभीर गुन्हेगारी गुन्हा मानला जात होता ज्यात मध्ये सदर न्यायालय दया दाखवू शकेल किंवा शिक्षा कमी करू शकेल इंग्रजांनी सर्व देशात एकरूप न्याय व्यवस्था स्थापन केली त्यांनी कायदे बनवले आणि सविता बद्दल केले हे काय ते राज्यातील सर्व नागरिकांना लागू होते आणि न्याय कालीन पदानुक्रम मी अनुक्रमे लागू केले गेले.

समरूप मुद्रा व्यवस्था.

ब्रिटिश राजवटीत फक्त वस्तूचे उत्पादन होत असे पूर्वीपेक्षा भारत जागतिक बाजाराशी अधिक व्यापकपणे जोडला गेला देशांतर्गत व परदेशी व्यापार क्षेत्र आणि भारताचा विकास वाढला भांडवलशाही आधारावर आधुनिक उद्योगाचा सतत विकास झाला ब्रिटिशांनी सरकार व राज्य सारखे राज्य सरकारने भारतातील लोकांना आणि जनतेला एकत्र केले प्रथमच भारतीय लोकांचे बहुतेक आर्थिक आणि सामाजिक जीवन जागतिक आणि एकसमान कायदेशीर प्रणालीद्वारे संचलित होते अठराव्या शतकात ब्रिटिश राजवटीत भारताच्या राजकीय व प्रशासकीय एकतेचे वैशिष्ट्य म्हणजे ब्रिटिश संसदेच्या कायद्यानुसार तयार केलेल्या घटनेनुसार हे कार्य करणारे राजकारण वेगवेगळ्या टप्प्यावर विकसित झाली यांचा परिणामम्हणून भारतीय ब्रिटिश सरकार कायद्यानुसार आणि ब्रिटिश संसदेला नियम म्हणून जबाबदार होते आणि त्यांच्यावर त्यांनी राज्य केले त्या भारतीय लोकं वर नाही 1811 कमिशनच्या प्रयत्नांमुळे आणि अठराशे 35 ते 1870 च्या दरम्यान बनवलेल्या आयोगाच्या प्रयत्नांचा परिणाम म्हणून विविध कायदे सहित 1853 ते 1870 च्या दरम्यान तयार केल्या गेल्या इंग्लंडमधील लॉक मिशनच्या प्रयत्नाच्या परिणामी नागरी सहिता आणि 859 आणि अठराशे साठ मधील फौजदारी प्रक्रिया लागू केलीबेंथम च्या कल्पनेने प्रभावित लॉर्ड मेकाले यांनी सादर केलेल्या भारतीय दंड संहिता येणे भारतीय व्यवस्था व्यवसाय व्यवस्थेला एक पद्धतशीर आकार दिला खर्च प्रणालीची एक सुसज्ज रचना तयार केली गेली याद्वारे स्वातंत्र्य आणि समते समानतेच्या उदार विचारांवर आधारित भारताची ओळख

 ISSN 2231 4342

उदारमतवादी राष्ट्र म्हणून राष्ट्राच्या मूलभूत अपेक्षा असलेल्या म्हणजेच कायद्याची स्थापना आणि कार्यकारिणीवर कायदा किंवा विधान मंडळाचे नियंत्रण यावर आधारित आहे भारतीय इतिहासामध्ये प्रथमच ब्रिटिश राजवट स्थापन झाल्यामुळे देशाचे व्यापक आणि मूलभूत राजकीय प्रशासकीय आणि न्याय कालीन एकात्मता झाली 1857 पर्यंत बराचसा भाग थेट ब्रिटिश राजवटीत घेण्याची प्रक्रिया चालूच राहिली.

सामाजिक विभागणी-

अठराव्याशतकात, ब्रिटिश राजवटीतीलसामाजिक विभागणी हा नवीन सामाजिक अर्थव्यवस्था, नवीन सभ्यता, नवीन लोकशाही आणि नवीन शिक्षणाचा थेट परिणाम होता. पूर्वीच्या भारतीय समाजात नवीन वर्ग नव्हते. ब्रिटिशांच्या भारताच्या विजयामुळे आणि परकीय अर्थव्यवस्थेचा भारतावर होणारा परिणाम यामुळे यादेशात आलेल्या नवीन भांडवलशाही व्यवस्थेचे हे उत्पादन आहे. भारतीय समाजाच्या मूलभूत भांडवलशाहीच्या आर्थिक परिवर्तनाचा परिणाम म्हणून इथले लोक पुन्हा नव्या सामाजिक पक्षांत वनव्या वर्गात एकत्र आले. अशा प्रकारे भारतीय समाजाची विभागणी समाजाती लबर् याच विभागांमध्ये बदलली. ब्रिटीश सरकारच्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांमधील बदलांचा सामाजिक रचनेवर, उत्पादनावर, प्रणालीवर आणि प्रशासनावर फारसा परिणाम झाला नाही, परंतु ब्रिटीशांच्या अंमलात सर्व काही बदलले आणि एक सामाजिक-आर्थिक क्रांती घडवून आणली ज्यामुळे प्राचीन संस्था नष्ट झाली आणि नवीन सामाजिक. वर्ग आणि शक्तींचा उदय झाल्यावर कळस प्राप्त झाला.

भारतीय समाजातील विविध भाग आणि समुदायांमध्ये नवीन सामाजिक वर्गाची स्थापना करण्याची प्रक्रिया खूप विचित्र होती. यामागचे कारण असे होते की नवीन सामाजिक अर्थव्यवस्था काळाच्या आणि प्रमुखतेच्या दृष्टीने असमानपणे विकसित झाली, कारण त्याचा प्रसार भारतातील ब्रिटिश सार्वभौमत्वावर अवलंबून होता. ब्रिटीश राजवटीतील विविध प्रशासकीय आर्थिक धोरणांचा परिणाम म्हणून आणि नवीन शिक्षणप्रणाली लागू झाल्यामुळे भारतीय शहरे व खेड्यांमध्ये बरेच नवीन, व्यावसायिक वर्ग विकसित झाले. इतर गोष्टीं बरोबरच एक नवीन वर्ग, मध्यम वर्गीय, अनुत्पादक असल्याने औद्योगिक बुर्जु आसे भिन्न होता. भारतीय समाजातील विविध घटक त्यांच्या राजकीय गुलामीच्या क्रमवारीत भांडवलशाही बदलांच्या दिशे नेगेले. म्हणूनच, ब्रिटीश सरकारच्या प्रभावाखाली आलेल्या प्रांतां मध्ये हे सामाजिक वर्ग प्रथम उदयास आले.

स्त्रियांची स्थिती-

भारतात महिलांची स्थिती नेहमी सारखी नसते. वैदिक युगाचा काळ वगळता स्त्रिया नेहमीच पुरुषाच्या अधीन राहिल्या. धर्म आणि कायद्यात पुरुष आणि स्त्रिया आणि त्यांचे हक्क समान मानले गेले नाहीत. पुरुषांना समाजात काही हक्क होते ज्यात काही स्वातंत्र्य होते ज्यात स्त्रिया वंचित राहिल्या. स्त्री-पुरुषांच्या वैयक्तिक आणि सामाजिक आचरणासाठी चांगल्या आणि वाईट गोष्टींचे नियम वेगवेगळे होते. समाजाच्या वास्तविक भावनेचे मूल्यांकन करण्यासाठी, स्त्रियांच्या कर्तृत्व व उणीवा समजून घेणे हा स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास करण्याचा

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal **ISSN 2231 4342**

उत्तम मार्ग आहे. सामाजिक जीवनात आणि इतिहासात महिलांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. रणांगणात उच्च-गुणवत्तेच्या शिष्यवृत्ती पासून शौर्य पर्यंतच्या राष्ट्रीय क्रियाकलापांच्या प्रत्येक क्षेत्रात त्याची समान भूमिका आहे. पुराण आणि प्राचीन भारतीय इतिहासात असे स्पष्ट पुरावे उपलब्ध आहेत की समाजात महिलांचा आदर केला जात असे.

अठराव्या शतकातील महिलांच्या स्थितीचा अभ्यास करण्यापूर्वी स्त्रियांच्या पूर्वीच्या स्थितीचा उल्लेख करणे आवश्यक आहे. भारतीय पुरातन आदिवासी समाज वगळता इतर सर्व प्राचीन आणि मध्ययुगीन समाजां प्रमाणेच, ब्रिटीशांनी भारत जिंकण्यापूर्वी ही स्त्रिया पुरुषांच्या अधीन होती. जेव्हा ब्रिटीशांचे आगमन झाले तेव्हा भारतात नवीन अर्थव्यवस्था आणि नवीन कायदा व सुव्यवस्था स्थापन झाली आणि जेव्हा जर पश्चिमेकडील देशांच्या आधुनिक लोकशाहीवादी विचारशैलीशी भारत आली तर परिस्थिती नक्कीच बदलली.

धर्म आणि समाज -

अठराव्या शतकाचा इतिहास एक हृदय विचारवंत होता जिथे सामान्य जीवन होतेफक्त वेदना आणि विव्हळ वेदना दिल्या जात होत्या. सामाजिक आणि धार्मिक नवनिर्माण कार्यक्रमाचा अवलंब केला आणि संपूर्ण देश या चळवळींच्या तावडीत आला.

धर्म आणि समाज जैविक दृष्ट्या एकमेकांशी जोडलेले होते.केलेल्या सर्वसमावेशक शक्ती आणि अंतिम मुलाखतीमुळे भारताला अखंड जीवन प्रवाह आणि अमरत्व प्राप्त झाले आहे

अठराव्या शतकात धर्माचा अर्थ कठोर नियम आणि निर्बंध होते.

सामाजिक सुधारणां विषयी ब्रिटिश धोरण -

ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सामाजिक सुधारणेसाठी प्रयत्न केले, परंतु कोणताही ठोस कायदा किंवा विधेयक त्याचा संपूर्ण परिणाम भारतीय समाजावर सोडू शकला नाही. ब्रिटिश काळातील हिंदूसमाजात बऱ्याच क्रूर आणि लोकशाही घटकांचा समावेश होता. एस एन ए आय: एसएनएआय: हताश भारतीय देखील युरोपियन तत्त्वज्ञान, विज्ञान आणि राजकीय संस्थायांच्या संपर्कात आले आणि त्यांना जीवनाच्या आणि समाजातील प्रत्येक क्षेत्रात सुधारण्याची भावना वाटली. नंतर, राजकीय स्थैर्य आणि ब्रिटीश सत्तेच्या स्थिरते खाली अधिकृत प्रोत्साहनामुळे काही सामाजिक क्रांतिकारक सुधारवादी तरुणांना धैर्य आले आणि त्यांनी अनेक सामाजिक सुधारणे सुरू केल्या. ज्यामुळे भारतीय समाजातील बदल येणाऱ्या काळात प्रतिबिंबित होऊ लागले.

सामाजिक सुधारणांसाठी मुघल कोर्टाचे पहिले ब्रिटिश राजदूत सर थॉमस रो यांनी स्थानिक अधिवेशनात हस्तक्षेप न करण्याचे धोरण तयार केले .

 ISSN 2231 4342

हेस्टिंग्जला भारतीय समाज आणि संस्कृतीबद्दल उत्साही सहिष्णुता होती आणि ते इंग्रजी लोकांना भारताच्या स्वभावामध्ये किंवा निसर्गाशी जोडण्यासाठी एक प्रणाली तयार करण्याचा प्रयत्न करीत होते . 18 व्या शतकात सामाजिक सुधारणां विषयीच्या ब्रिटिश धोरणा मध्ये महत्त्वपूर्ण बदल होता. भारताच्या जुन्या संस्कृतीचे कौतुक असण्या व्यतिरिक्त बर्याच ब्रिटिश प्रशासक आणि शिक्षण तज्ज्ञांनाही भारताच्या प्रगतीच्या मार्गावर येणाऱ्या अडथळ्यांची जाणीव होती. परंतु भारताची सामाजिक परिस्थिती हाताळण्याचे त्यांचे कोणते ही निश्चित ध्येय नव्हते. काही ब्रिटिश प्रशासक त्यांच्या कारभारापेक्षा सामाजिक पद्धतींमध्ये बदल करण्याच्या मागणीला अधिक प्रतिसाद देतात, म्हणजेच त्यांनी सामाजिक बदलांच्या मागण्यांकडे तुलनेने अधिक लक्ष दिले. याचे मुख्य कारण म्हणजे हे बदल विद्यमान सामाजिक रचनेच्या बाह्यपरिघाला स्पर्शून गेले. तेथे ब्रिटीश प्रशासकांचा एक विभाग होता जो पुराणमतवादी आणि निर्मूलन करणार्यांमध्ये होता. त्यांनी विविध प्रमाणात उदारमतवादी किंवा ख्रिश्चन तत्त्वे स्वीकारली, भारतीय समाजात पाश्चात्य संस्कृतीची ओळख करण्यास उत्सुक होते, परंतु धैर्य आणि सावधगिरीने. .

अशा प्रकारे असे म्हटले जाऊ शकते की अठराव्या शतकात ब्रिटिश धोरणाचा भारताच्या सामाजिक सुधारणांवर संमिश्र परिणाम झाला. ब्रिटीश प्रशासकांनी काही अंशी भारतीय समाजाच्या संरचनेला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आणि ते पूर्ण न झाल्यास त्यांना अर्धवट यश मिळाले. ब्रिटीश धोरणामध्ये समाज सुधारणेकडे हळूहळू बदल होता. परिणामी, भारतातील सामाजिक सुधारणेचा मार्ग सुलभ झाला आणि भारतीय जनमत देखील सामाजिक सुधारणेवर विचार करण्यास भाग पाडले गेले..

संदर्भ ग्रंथ

१. जागीरदार महादेव गोविंद रानडे पृष्ठ क्रमांक ४८

२. रुप लाल चौधरी हिंदू विमेंस राईट टू प्रॉपर्टी

3. के. नाग और डी. वर्मन, वर्क ऑफ राजा राम मोहन राय पार्ट वन पृष्ठ क्रमांक ४०

४. एम. डी. वर्ल्ड हिस्टरी ऑफ द हिंदूस पृष्ठ क्रमांक ६१, ६२

५. आरसी मजुमदार गिलीटीस बंगाल सेंचुरी 1960 पृष्ठ क्रमांक १४

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

पटवर्धनकुरोली येथील दुर्लक्षित प्राचीन मूर्ती आणि शिल्पकला एक अभ्यास

ज्ञानेश्वर सतिश झरकर
(पीएच. डी. संशोधक विद्यार्थी,
प्रा. भा. इ. सं आणि पुरातत्वशास्त्र
विभाग, सामाजिकशास्त्रे संकुल, पु.अ.हो.
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर)

प्रस्तावना:-

पुरातन मानवी संस्कृतीचा अभ्यास म्हणजेच पुरातत्त्वशास्त्र होय. प्राचीन मानवाचे दैंनदिन व्यवहार, त्याचे सामाजिक संबंध, त्याने निर्माण केलेल्या वस्तू आणि वास्तू या सर्वांचा अभ्यास पुरातत्त्वशास्त्र करते. ह्या शाखेला विज्ञान शाखेचा देखिल आधार घ्यावा लागतो. यामध्ये प्राणी शास्त्र, वनस्पतीशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, हवामानशास्त्र, मानववंशशास्त्र यांचा आधार घ्यावा लागतो. भारतामध्ये इ.स. १७८४ साली एशियाटिक सोसायटीची स्थापना झाली. सर विल्यम जोन्स यांची पहिले प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. सन १८६० या साली भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणची स्थापना झाली.सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांची पहिले महानिदेशक म्हणून नेमणूक झाली होती. त्यांच्या नंतर जेम्स बर्जेस, जॉन मार्शल, रायबहादूर दीक्षित, सर मार्टिमर व्हीलर इत्यादींनी पुरातत्त्वखात्याचे महानिर्देशक म्हणून काम पाहिले. सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांनी आपल्या कार्यकाळात मध्यप्रदेश तसेच उत्तर प्रदेश मधील अनेक बौध्द स्थळांचा शोध लावला व त्याचे शास्त्रशुध्द पध्दतीने नोंदनी केली. तसेच इतर महानिदेशकांच्या कार्यकाळात अनेक महत्वपूर्ण उत्खनने झाली. सिंधू संस्कृतीच्या उत्खननामुळे भारतातील ताम्रपाषाणयूगीन अभ्यासास ख-या अर्थाने सुरूवात झाली. केवळ हडप्पा मोहंजोदाडो याठिकाणी नाहीतर पंजाबमध्ये रोपड, राजस्थान मधील कालिबंगन, सुरकोटडा, गुजरातमध्ये लोथल व उत्तर प्रदेशात अलमगीरपूर येथे सिंधू संस्कृतीचे अवशेष मिळतात.

प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्वशास्त्र अभ्यासासाठी पुरातत्त्वीय स्थळे आणि मंदिरे तसेच इतर लिखित पुरातत्वीय साधने महत्वाची आहेत. पुरातत्वशास्त्राच्या अभ्यासातून त्या त्या राज्यातील सामाजिक, धार्मिक, राजकीय, ऐतिहासिक, सांस्कृतिक इत्यादीवर महत्त्वपूर्ण प्रकाश टाकता येतो. भारतीय संस्कृतीला खूप मोठा पुरातत्वीय वारसा लाभलेला आहे. यामध्ये आश्मयुगापासून ते मराठा-इंग्रज कालखंडापर्यंतचा समावेश होतो. पुरातत्वीय स्थळे हे भारतामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर आढळून येतात.

प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृतीच्या अभ्यासासाठी मंदिर एक महत्त्वाचे पुरातत्वीय साधन आहे. मंदिराच्या अभ्यासातून भारतीय वास्तुकलेचा विकास, मूर्तीशास्त्राचा विकास, सामाजिक जीवन, धर्म समजुती, तंत्रज्ञान इत्यादी बाबी ज्ञात होतात. भारतीय नृत्य,नाट्य,संगीत आणि वास्तू या कला मंदिराच्या आश्रयानेच वाढल्या आहेत. मंदिराबरोबर मूर्तिशिल्पांचा अभ्यास खुप महत्वाचा आणि तितकाच आवश्यक आहे. कारण मूर्तिशिल्पांना मंदिरापासनू वेगळे करणे शक्यच नाही. मूर्ती आणि मंदिर एकमेकांचे संयुक्तिक प्राण आहेत.

 ISSN 2231 4342

मंदिरांचे सौंदर्य मूर्तीविना खुलत नाही तर मूर्ती मंदिराविना विरहिणीच वाटतात. त्यामुळे एकाबरोबर दुसऱ्यांना यावेच लागते. मंदिर शिल्पकले प्रमाणे मूर्तिशास्त्राचा किंवा मूर्तीचा अभ्यास बऱ्याच जणांनी केला आहे. (पाटील माया: मराठवाड्यातील काही मंदिर शिल्पे २०१४; १३, १४) म्हणून मंदिरांचा तसचे मंदिरामधील व बाहेरील मूर्ती, शिल्पे, शिलालेख तसेच मंदिरांवरील अंलकरण इत्यादीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. पंढरपूर तालुक्यात अनेक पुरातत्वीय स्थळे आहेत. यामधीलच एक गाव म्हणजे पटवर्धनकुरोली. या ठिकाणी सद्यस्थितीमध्ये प्राचीन मंदिरे दिसुन येत नाहीत, परंतु मंदिरामध्ये आढळणारे मूर्ती व शिल्पे या ठिकाणी दिसून येतात. या प्राचीन मूर्ती आणि शिल्पकलेचा अभ्यास या शोध निबंधामध्ये केला जाणार आहे.

उद्दिष्टे

१) मूर्ती आणि शिल्पांचा शोध घेणे.
२) मूर्ती आणि शिल्पांचा सखोल अभ्यास करणे.
३) मूर्ती आणि शिल्पकलेवरून त्यांचा कालखंड ठरविणे.

संशोधन पध्दती:-

या शोध निबंधामध्ये क्षेत्रीय सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग केलेला आहे.याबरोबरच माहिती संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे.

प्राथमिकस्त्रोत:-

१) संपूर्ण गावाचे सर्वेक्षण करून मूर्ती आणि शिल्पकेलेचा शोध घेणे.
२) मूर्ती आणि शिल्पकेलेचे छायाचित्रे आणि मोजमापे घेऊन सुक्ष्म अभ्यास करणे.
३) सूक्ष्म निरिक्षण आणि विश्लेषण.

दुय्यम स्त्रोत:-

विवधि ग्रंथालयात जाऊन संदर्भ ग्रंथांचा अभ्यास करून संबंधीत शोध निबंधासाठी संदर्भ घेण्यात आला आहे.

या प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांव्दारे गोळा केलेल्या माहितीचे परिक्षण, वर्गीकरण, सांकेतीकरण, व निष्कर्ष काढण्यात आला आहे.

मर्यादा:- पटवर्धनकुरोली या गावापूरतेच हे संशोधन मर्यादित आहे.

पटवर्धनकुरोली:-

पाटवर्धनकुरोली हे गाव पंढरपूर पासून उत्तरेस २९ कि.मी.अंतरावर आहे. हे गाव पंढरपूर - टेंभूर्णी रोडवर असणाऱ्या भोसे या गावापासून ११ कि. मी अंतरावर दक्षिणेस आहे.पटवर्धन कुरोली गावचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 4653.25 हेक्टर इतके आहे. (माहीती गुगल पेज येथून घेण्यात आली आहे.) हे गाव भीमा नदीच्या उजव्या तिरावर वसलेले आहे.गावाच्या मध्यभागी असणाऱ्या मारूती मंदिराशेजारी काही मूर्ती आणि

ISSN 2231 4342

शिल्पे पहावयास मिळतात. यामध्ये विष्णु, भैरव, गणेश (विघ्नेश्वर) आणि विरगळ यांचा समावेश आहे. या शिल्पांचा अभ्यास खालील प्रमाणे केलेला आहे.



पटवर्धन कुरोली या गावचे गुगल अर्थ येथून घेतलेले छायाचित्र

१)**विष्णु**



केशव (विष्णु)

स्थळ:- पटवर्धन कुरोली, ता. पंढरपूर, जि.सोलापूर.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

ठिकाण:- गावाच्या मध्यभागी असणा-या मारूती मंदिरा शेजारील मंदिरात ही प्रतिमा ठेवलेली आहे.

माध्यम:- काळा पाषाण (बसाल्ट)

मोजमाप:-रूंदी २४ सेंमी, उंची ४३ सेंमी.

मूर्तिवर्णन:- स्थानक, समभंग, समपद, चतुर्भुज.

आयुधे:- शंख, चक्र, गदा, पद्म.

आयुधांचा क्रम:- वरदमुद्रेतील खालील उजव्या हातात पद्म, वरील उजव्या हातात शंख, वरील डाव्या हातात चक्र आणि खालील डाव्या हातात गदा असा आयुधांचा क्रम आहे.

वस्त्रे:- कटिवस्त्र परिधान केलेले आहे. त्याचे काठ गुडघ्याच्या वर येतात आणि त्याचा सोगा मधोमध सोडलेला आहे.

आभुषणे :- विष्णुच्या मस्तकावर किरीट मुकुट आहे. परंतु सध्या तो झीजलेला आहे. कानामध्ये चक्र कुंडले, दंडावर केयुर, हातात कंकण, बोटात अंगुलिका, गळ्यात ग्रिविका, उदरापर्यंत येणारी माला आणि गुडघ्यापर्यंत रूळणारी वैजयन्तीमाला व यज्ञोपवीत, कमरेस उदरबंद, पायात तोडे, नुपुर, आणि अंगुलिका दिसुन येतात.

परिवार देवता:- मूर्तीच्या पायाशी अंजलीमुद्रेत गरूड आहे.

इतर तपशील:- विष्णुची मूर्ती प्रमाणबध्द असून ती थोडी झीजलेली आहे. त्यामुळे विष्णुने परिधान केलेले अलंकार व्यवस्थित ओळखू येत नाहीत.

कालखंड:- इ.स. १३ वे १४ वे शतक

२) **विष्णु**



केशव (विष्णु)

स्थळ:- पटवर्धन कुरोली, ता. पंढरपूर, जि.सोलापूर.

ठिकाण:- गावाच्या मध्यभागी असणाऱ्या मारूती मंदिरा शेजारील मंदिरात ही प्रतिमा ठेवलेली आहे.

माध्यम:- काळा पाषाण (बसाल्ट)

मोजमाप:- रूंदी ३६ सेंमी, उंची ५७ सेंमी.

मूर्तिवर्णन:- स्थानक, समभंग, समपद, चतुर्भुज.

आयुधे:- शंख, चक्र,गदा, पद्म.

आयुधांचा क्रम:- वरदमुद्रेतील खालील उजव्या हातात पद्म, वरील उजव्या हातात शंख, वरील डाव्या हातात चक्र आणि खालील डाव्या हातात गदा असा आयुधांचा क्रम आहे.

वस्त्रे:- कटिवस्त्र परिधान केलेले आहे. त्याचे काठ गुडघ्याच्या वर येतात आणि त्याचा सोगा मधोमध सोडलेला आहे.

आभुषणे :- विष्णूच्या मस्तकावर किरीट मुकुट आहे. परंतु सध्या तो झीजलेला आहे. कानामध्ये चक्र कुंडले, दंडावर केयुर, हातात कंकण, बोटात अंगुलिका, गळ्यात ग्रिविका, उदरापर्यंत येणारी माला आणि गुडघ्यापर्यंत रूळणारी वैजयन्तीमाला व यज्ञोपवीत, कमरेस उदरबंद, पायात तोडे, नुपुर, आणि अंगुलिका दिसुन येतात.

परिवार देवता:- मूर्तीच्या पायाशी अंजलीमुद्रेत गरूड आहे.

इतर तपशील:- विष्णुची मूर्ती प्रमाणबध्द असून ती थोडी झीजलेली आहे. त्यामुळे विष्णूने परिधान केलेले अलंकार व्यवस्थित ओळखू येत नाहीत.

कालखंड:- इ.स. १३ वे १४ वे शतक

३) **विघ्नेश्वर**



विघ्नेश्वर

स्थळ:- पटवर्धन कुरोली, ता. पंढरपूर, जि.सोलापूर.

ठिकाण:- गावाच्या मध्यभागी असणाऱ्या मारूती मंदिरा शेजारील मंदिरात ही प्रतिमा ठेवलेली आहे.

माध्यम:- काळा पाषाण (बसाल्ट)

मोजमाप:-रूंदी ३४ सेंमी, उंची ५५ सेंमी.

मूतीवर्णन:- आसनस्थ, अर्धपर्यंकासन, चतुर्भुज.

आयुधे:- उजव्या खालील हातात दंत आहे. उजव्या वरील हातात परशु आहे. डाव्या वरील हातात पाश आहे. डाव्या खालील हातात मोदकपात्र आहे.

अलंकार:- गणेशाच्या मस्तकावर करंडमुकुट आहे. गणेशाने ग्रिविका, केयुर, हातात कंकण, बाजूबंद, मेखला, कमरेस उदरबंद परिधान केलेला आहे. पायामध्ये पादवलय आणि तोडे परिधान केलेले आहे.

वाहन:- गणेशाचे वाहन मुशक खालील बाजूस दाखविले आहे.

इतर वर्णन:- मूर्तीला शेंदूर लावला असल्यामुळे मूर्तीचे मूळ रूप नष्ट झालेले आहे. त्यामुळे मूर्तीचे कोरीव काम व कलात्मकता ओळखू येत नाही.

कालखंड:- इ.स. १३-१४ वे शतक.

४) **विघ्नेश्वर**



विघ्नेश्वर

स्थळ:- पटवर्धन कुरोली, ता. पंढरपूर, जि.सोलापूर.

ठिकाण:- गावाच्या मध्यभागी असणा-या मारूती मंदिरा शेजारील मंदिरात ही प्रतिमा ठेवलेली आहे.

माध्यम:- काळा पाषाण (बसाल्ट)

मोजमाप:- रूंदी ४२ सेंमी, उंची ५९ सेंमी.

मूर्तिवर्णन:- आसनस्थ, अर्धपर्यंकासन, चतुर्भुज.

आयुधे:- उजव्या खालील हातात दंत आहे. उजव्या वरील हातात परशु आहे.डाव्या वरील हातात पाश आहे.डाव्या खालील हातात मोदकपात्र आहे.

अलंकार:- गणेशाच्या मस्तकावर करंडमुकुट आहे. गणेशाने ग्रिविका, केयुर, हातात कंकण, बाजूबंद, मेखला, कमरेस उदरबंद परिधान केलेला आहे.पायामध्ये पादवलय आणि तोडे परिधान केलेले आहे.

वाहन:- गणेशाचे वाहन मुशक खालील बाजूस दाखविले आहे.

इतर वर्णन:- मूर्तीला शेंदूर लावला असल्यामुळे मूर्तीचे मूळ रूप नष्ट झालेले आहे. त्यामुळे मूर्तीचे कोरीव काम व कलात्मकता ओळखू येत नाही.

कालखंड:- इ.स. १३-१४ वे शतक.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

५) **भैरव**



स्थळ:- पटवर्धन कुरोली, ता. पंढरपूर, जि.सोलापूर.

ठिकाण:- गावाच्या मध्यभागी असणा-या मारूती मंदिरा शेजारील मंदिरात ही प्रतिमा ठेवलेली आहे.

माध्यम:- काळा पाषाण (बसाल्ट)

मोजमाप:-रूंदी ४० सेंमी, उंची ५८ सेंमी.

मूर्तिवर्णन:-स्थानक, अर्धसमपद, व्दिभंग, चतुर्भुज, उजवा खालील हात वरद मुद्रेत.

आयुधे:-उजवा खालील हातात वरद मुद्रेत, उजव्या वरील हातात डमरू आहे. डाव्या वरील हातात त्रिशुळ आहे.डाव्या खालील हातात कपाल आहे.

अलंकार:-मस्तकावर मुकुट दिसून येत नाही. कानामध्ये चक्र कुंडले, गळ्यामध्ये नरमुंडमाळा, हातात कंकण, कमरेस हाडापासून बनविलेले उदरबंद, मेखला, पायात तोडे आणि पादवलय परिधान केलेले आहे.

वाहन:- भैरवाचे वाहन कुत्रा या ठिकाणी खालील आजूस दाखविले आहे.

इतर तपशील:- सध्या ही प्रतिमा सुस्थितीत आहे. परंतु प्रतिमेच्या चेहऱ्याची थोडी झीज झालेली आहे.

कालखंड:- इ.स. १३-१४ वे शतक.

६) **विरगळ**



 ISSN 2231 4342

विरगळ

स्थळ:- पटवर्धन कुरोली, ता. पंढरपूर, जि.सोलापूर.

ठिकाण:- गावाच्या मध्यभागी असणा-या मारूती मंदिरा बाहेरील बाजूस ही विरगळ ठेवलेली आहे.

माध्यम:- काळा पाषाण (बसाल्ट)

मोजमाप:-रूंदी ६८ सेंमी, उंची १.३८ मीटर.

वर्णन:- या विरगळीस चार कप्पे आहेत. या सर्व कप्पांमध्ये राजाच्या युध्दाच्या प्रसंगापासून ते त्याच्या स्वर्ग प्राप्ती पर्यंतचे प्रसंग या विरगळी मध्ये दाखविलेले आहेत.

कप्पा क्रमांक १ (खालुन):- या विरगळीचा खालील काहीसा भाग हा जमीनी मध्ये गेल्यामुळे खालील बाजूस काय कोरले असावे हे स्पष्ट होत नाही. जो थोडासा भाग दिसून येतो त्यामध्ये राजा हा अश्वावर आरूढ होऊनसमोरील शत्रुवर तलवारीने वार करीत असलेले दाखविलेले आहे.

कप्पा क्रमांक २ :- या कप्यामध्ये युध्दाचा प्रसंग दाखविलेला आहे. विरगळीच्या उजव्या बाजूस राजा असून तो समोरील शतूवर तलवारीने वार करित असल्याचे दिसून येते वर डाव्या बाजूस चार सैनिक असून त्यांच्या हातात ढाल आणि तलवार आहे.

कप्पा क्रमांक ३:- या कप्यामध्ये राजाला विरगती प्राप्त झोलेली दाखविण्यात आली आहे. राजा मध्यभागी असून त्याच्या दोन्ही बाजूस दोन - दोन अप्सरा असून, त्या राजाला स्वर्गात घेऊन जाताना दाखविल्या आहेत.

कप्पा क्रमांक ४:- या कप्यामध्ये राजा शिवपिंडाची पुजा करित असल्याचे दाखविण्यात आले आहे. शिवपिंडाच्या समोर शिवाचे वाहन नंदी दिसून येते.तर दोन्ही बाजूस अप्सरा दाखविण्यात आल्या आहेत. सर्वात वरील बाजूस शिखराचे कोरीव काम केलेले असून त्या खाली पुष्पाचे नक्षीकाम केलेले आहे.विरगळीच्या वरील बाजूस चंद्र व सूर्य दाखविण्यात आले आहे.

कालखंड:- इ.स. १३ वे १४ वे शतक

७)**विरगळ**



विरगळ

स्थळ:- पटवर्धन कुरोली, ता. पंढरपूर, जि.सोलापूर.

ठिकाण:- गावाच्या मध्यभागी असणा-या मारूती मंदिरा बाहेरील बाजूस ही विरगळ ठेवलेली आहे.

माध्यम:- काळा पाषाण (बसाल्ट)

ISSN 2231 4342

मोजमाप:-रूंदी ५१ सेंमी, उंची १.४० मीटर.

वर्णन:- या विरगळीस चार कप्पे असून यामध्ये युध्दाचे प्रसंग दाखविण्यात आला आहे.

कप्पा क्र. १(खालुन):- या कप्यामध्ये सर्वात खालील बाजूस तीन सैनिक व राजा असून विरगळीच्या उजव्या बाजूस राजा दाखविण्यात आला आहे. तो डाव्या बाजूकडील तीन सैनिकांपैकी एकाच्या डोक्याला डाव्या हाताने पकडलेले आहे.तर त्याच्या उजव्या हातात तलवार आहे.सर्व सैनिकांच्या उजव्या हातात तलवार तर डाव्या हातात ढाल आहे.

कप्पा क्र. २:- या कप्यामध्ये उजव्या बाजूस राजा आहे. तर डाव्या बाजूस तीन सैनिक राजावर हल्ला करताना दाखविले आहे.या मध्ये राजाच्या उजव्या हातामध्ये तलवार असून तो सैनिकांवर आक्रमन करताना दाखविण्यात आले आहे.राजाच्या डाव्या हातामध्ये ढाल आहे.तर तीनही सैनिकांच्या उजव्या हातामध्ये तलवार तर डाव्या हातामध्ये ढाल आहे.

कप्पा क्र. ३:- या कप्यामध्ये राजा युध्दामध्ये मरण पावलेला असून, अप्सरा राजास स्वर्गामध्ये घेऊन जात आहेत. यामध्ये राजा अप्सरांच्या मध्यभागी असून त्याच्या उजव्या व डाव्या बाजूस अप्सरा राजाला स्वर्गामध्ये घेऊन जाताना दाखविले आहे.

कालखंड:- इ.स. १३ वे १४ वे शतक

८) **विरगळ**



विरगळ

स्थळ:- पटवर्धन कुरोली, ता. पंढरपूर, जि.सोलापूर.

ठिकाण:- गावाच्या मध्यभागी असणा-या मारूती मंदिरा बाहेरील बाजूस ही विरगळ ठेवलेली आहे.

माध्यम:- काळा पाषाण (बसाल्ट)

मोजमाप:-रूंदी ५८ सेंमी, उंची १.१० मीटर.

वर्णन:- या विरगळीस तीन कप्पे असून यामध्ये युध्दाचे प्रसंग दाखविण्यात आला आहे.

 ISSN 2231 4342

कप्पा क्र. १(खालुन):- सर्वात खालील बाजूस युध्दाचा प्रसंग दाखविण्यात आला आहे. या मध्ये एकूण पाच व्यक्ति दाखविण्यात आल्या आहेत. उजव्या बाजूस राजा असून त्याच्या उजव्या हातात तलवार आहे तर डाव्या हाताने शत्रूचे डोके धरून तो तलवारीने त्याच्यावर हल्ला करीत आहे. राजाच्या मागील बाजूस त्याचा सेवक छत्र घेऊनउभा आहे.डाव्या बाजूस तीन सैनिक दिसून येतात, त्यांच्या उजव्या हातात तलवार तर डाव्या हातात ढाल आहे.

कप्पा क्र. २:- या कप्यामध्ये अप्सरा राजाला स्वर्गात घेऊन जाताना दाखविलेल्या आहेत. यामध्ये राजा मधोमध असून त्याच्या डाव्या व उजव्या बाजूस अप्सरा आहेत. त्या राजास स्वर्गात घेऊन जाताना दाखविल्या आहेत.

कप्पा क्र. ३:- या कप्यामध्ये राजा शिवपिंडाची पुजा करित असताना दाखविलेले आहे. शिवपिंडीच्या समोरील बाजूस नंदी दिसून येतो तर कप्याच्या उजव्या व डाव्या बाजूस भक्त दिसून येतात.वीरगळीच्या समोरील बाजूस मध्यभागी एक कलश असून, त्यामधून वेलबुट्टी बाहेर आलेली आहे.

कालखंड:- इ.स. १३वे १४ वे शतक

९)**विरगळ**



विरगळ

स्थळ:- पटवर्धन कुरोली, ता. पंढरपूर, जि.सोलापूर.

ठिकाण:- गावाच्या मध्यभागी असणा-या मारूती मंदिरा बाहेरील बाजूस ही विरगळ ठेवलेली आहे.

माध्यम:- काळा पाषाण (बसाल्ट)

मोजमाप:- लांबी ३६ सेंमी, उंची ६७ मीटर.

वर्णन:- सदर विरगळीस तीन कप्पे असून यामध्ये युध्दाचे प्रसंग दाखविण्यात आला आहे.

कप्पा क्र. १(खालुन):- या मध्ये युध्दाचा प्रसंग दाखविण्यात आलेला असून राजा अश्वावर आरूढ असून तो समोरील शत्रूवर तलवारीने हल्ला करित असताना दाखविण्यात आले आहे. तर समोरील शत्रु हा राजावर उलट वार करित असलेला दिसून येतो.

कप्पा क्र. २:- यामध्ये राजाला विरगती प्राप्त झालेली असून दोन अप्सरा राजाला स्वर्गात घेऊन जाताना दाखविल्या आहेत. या अप्सरा राजाला चामराने वारा घालत आहेत असे दाखविण्यात आले आहे.

कप्पा क्र. ३:- या मध्ये राजा स्वर्गामध्ये विलिन झालेला असून तो शिवपिंडाची पुजा करित असून तो हात जोडून बसलेला दाखविण्यात आले आहे.

कालखंड:- इ.स. १३वे १४ वे शतक

निष्कर्ष:-

पटवर्धनकुरोली गावामध्ये सर्वेक्षणादरम्यान गावाच्या मध्यभागी असणाऱ्यामारूती मंदिराला लागूनच असणाऱ्या एका मंदिरामध्ये विष्णुच्या दोन मूर्ती, भैरव एक आणि गणेश (विघ्नेश्वर) दोन तसेच शिल्पांमध्ये सोळा विरगळ आढळून आलेल्या आहेत. यातील तीन विरगळ या भग्नावस्थेत आहेत. तर एकावर चुन्याने रंग दिलेला आहे, तर तीन विरगळींचा खालील भाग हा जमिनीमध्ये रूतलेला आहे. तर राहिलेल्या नऊ विरगळ या चांगल्या अवस्थेत आहेत. या नऊ पैकी दोन विरगळ या चार कप्प्यांच्या आहेत, तर बाकी सर्व तीन कप्प्यांच्या दिसून येतात. तर बाकी विरगळ या भग्न झालेल्या आहेत. या सर्व विरगळींचा आशय हा युध्दांचा दाखविलेला असून, विर योध्याला युध्दामध्ये विरगती प्राप्त झालेली असून तो स्वर्गामध्ये विलीन झालेला आहे असे दाखविण्यात आले आहे. या सर्व विरगळ अंदाजे इ.स. १३ वे ते इ.स. १४ व्या शतकातील असाव्यात असे त्यांच्या अभ्यासावरून कळून येते.

पटवर्धनकुरोला येथे सर्वेक्षण दरम्यान आढळून आलेल्या मूर्तीमध्ये विष्णूच्या दोन मूर्ति आढळून आल्या आहेत. या दोन्हीही मूर्ति सुरेख असून त्यावरील कोरीव काम मूर्ति कोरणाऱ्याने अतिशय सुंदर रितिने केलेले आहे. हातातील आयुधांच्या क्रमानुसार विष्णुचे चोवीस रूपे आहेत. त्यातील पटवर्धनकुरोली या ठिकाणी आढळून आलेल्या मूर्ति या विष्णुच्या केशव रूपातील आहेत असे त्यांच्या आयुधांच्या क्रमावरून दिसून येते. या मूर्तिंच्या आयुधांचा क्रम हा शंख, चक्र, गदा, पद्म असा आहे. त्यामुळे या मूर्ति केशवाच्या आहेत हे स्पष्ट होते. मूर्तिच्या कलात्मकतेचा विचार केल्यास अशा प्रकारच्या मूर्ति या यादव राजांच्या कालखंडात निर्माण होत होत्या हे यावरून दिसून येते. म्हणजेच या मूर्तिंचा कालखंड हा अंदाजे इ.स. १३ वे ते इ.स. १४ वे शतक असावा.

या ठिकाणी एक भैरवाची मूर्ति आढळून आली आहे. ही मूर्ति सुरेख असून मूर्तीवरील अलंकारही तितकेच सुरेखरित्या कोरलेले आहेत. शिव मूर्तिंचे सौम्य, संयुक्त आणि उग्र असे प्रकार पडतात. सौम्य मूर्तीमध्ये केवलशिव, नटराज, उमामहेश्वर यांचा समावेश होतो तर संयुक्त मूर्तिमध्ये अर्धनारीश्वर, हरिहर आणि ब्रह्मेशाजनार्दनार्क तर उग्र मूर्तिमध्ये वधमूर्ती आणि भैरवाचा समावेश आहे. या पैकी पटवर्धनकुरोली येथे आढळलेली मूर्ति ही भैरवाची असून ती सैम्य स्वरूपात आहे.या मूर्तिचा कालखंड हा इ.स. १३ वे ते १४ वे शकत

 ISSN 2231 4342

असावा असे मूर्तिवरील कोरीव कामावरून दिसून येते.परंतु सध्या या मूर्तीची झिज झाल्यामुळे यावरील अलंकरण स्पष्ट दिसुन येत नाही.

वरील मूर्तींबरोबरच या ठिकाणी श्री.गणेशाची विघ्नेश्वराच्या रूपातील दोन मूर्ति आढळून आलेल्या आहेत. परंतु त्यावर सेंदुर लावला असल्यामुळे त्यावरील अलंकरण स्पष्टपणे दिसून येत नाही.मूर्ति घडविण्याच्या प्रकारावरून ही मूर्ति यादवांच्या कार्यकाळात म्हणजे अ.स. १३ वे ते १४ व्या शतकाच्या दरम्यान निर्माण केली गेली असावी असे वाटते.

एकूणच पटवर्धन कुरोली येथील मूर्तिे आणि शिल्पांचा अभ्यास करता या ठिकाणी प्राचीन काळी मंदिर होते, परंतु काळाच्या ओघात ती नष्ट झाली असावीत अथवा परकीय अक्रमाणामध्ये ती नष्ट झालेली असावीत. त्यामुळे ही मूर्ति व शिल्पे सद्य स्थितीत गावामध्ये विखुरलेली दिसून येतात. तसेच या मूर्ति मंदिरामध्ये देवकाष्टामध्ये ठेवल्या जात असाव्यात असे त्यांच्या आकारावरून दिसून येते.यागावामध्ये सध्या प्राचीन मंदिराचे अवशेष आढळून येत नसले तरी, या मूर्ती आणि शिल्पांवरून हे या ठिकाणी प्राचीन मंदिर असावे असे वाटते.तसेच शैव आणि वैष्णव मूर्तिवरून या ठिकाणी हे दोन्ही ही पंथ समाकालीन वास्तव्यास असावेत असे दिसून येते.अशी एकंदरीत माहिती अपणास या मूर्ति आणि शिल्पांचा अभ्यास केल्यावर समजून येते.

संदर्भग्रंथ सूची

1. खरे ग.ह. : मूर्तिविज्ञान, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे १९३९.
2. ढवळीकर म. के. : सिंधु संस्कृती कोणे एके काळी, राजहंस प्रकाशन, पुणे, २००६.
3. ढेरे रा. चिं. : विठ्ठल एक महासमन्वय, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९८४.
4. देगलूरकर गो. ब. : विष्णुमूर्ते नमस्तुभ्यंम्, श्रीव्दारकाधीश चॅरिटीज, कर्नाळा, जि. - रायगड, २००७.
5. देव शां. भा. : पुरातत्वविद्या, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७६.
6. पाटील माया: मराठवाड्यातील काही मंदिर शिल्पे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. २०१४

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

आधुनिक भारतीय शिक्षणात महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे योगदान

डॉ. शरद गावंडे,
इतिहास विभाग
वि.पा.शि.प.म.सं
कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय,
कन्नड

संशोधक विदयार्थी
श्री. संजय सदाशिव बनकर
मो. 9923475528

प्रस्तावना :

भारतामध्ये आधुनिक शिक्षणाचा पाया हा इंग्रज सरकारने रचला असे आपण मानत असलो तरी त्यांच्यावर येथीलच काही संस्थानातील कार्याची छाप होती हे स्पष्टपणे आपल्याला दिसते. 1857 च्या उठावाने कंपनी सरकारचे धाबे दणाणले आणि सुरू झाला आधुनिक भारताचा प्रवास असे म्हटले जाते. पुर्वीची भारतीय शिक्षण प्रणाली एवढी उत्तम होती की इंग्रजाना हे कळून चुकले होते की ती जर आपण बदलली नाही तर आपण या देशावर राज्यकरूच शकत नाही. नालंदा, तक्षशिला एवढीच विदयापीठ ही उदाहरणे समजुन घेण्यासाठी खुप आहे.

भारतात इंग्रजांनी लॉर्ड मेकॉलचा झिरपता सिध्दांत आणला. पुढे शिक्षणातील नवे प्रवाह आलेपण इंग्रजांना येथे आपला अंमल अबाधित ठेवण्यासाठी त्यांना पुरक शिक्षण प्रणाली हवी होती .याच वेळी भारतात विविध संस्थानात काही असे प्रयोग शिक्षण क्षेत्रात होत होते. त्याचा इंग्रंजांना धाक वाटत असे. त्यातील एक नाव म्हणजे सयाजी राव गायकवाड बडोदयाचे संस्थानिक.

सयाजीरावांनी आपल्या संस्थानात जे कार्य केले त्याची दखल केवळ इंग्रजांनीच घेतली नाही तर स्वातंत्र यानंतरही विविध घटक राज्यातील सरकारनी सुध्दा या योजनांची आपल्या राज्यात अंमल बजावणी केली. असा दुरदुष्टी राजा या देशात होऊन गेला. हे आपले भाग्य म्हणायला हवे. या संबंधीचे काही महत्वाचे मुददे आपण अभ्यासणार आहोत.

उदिदष्टे :

1) आधुनिक भारतीय शिक्षणाचा इतिहास समजुन घेणे.
2) शिक्षण प्रवाहातील विविध टप्प्यांची माहिती मिळविणे.
3) सयाजीराव गायकवाड यांचे शैक्षणिक विचार समजून घेणे.
4) सयाजीरावांचे आधुनिक भारतीय शिक्षणासाठी योगदान समजून घेणे.

महत्व व व्याप्ती :

प्रस्तुत शोध निबंधामध्ये आधुनिक भारतीय शिक्षणात सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचा कसा प्रभाव पडला व त्यामुळे तळागाळापर्यंत शिक्षणाची दारे जनसामान्यांना कशी खुली झाली याचा आपण अभ्यास करणार आहोत.

सयाजीरावांचा कार्यकाळ व त्यानंतर भारताच्या स्वातंत्र्य प्राप्ती नंतरच्या काही वर्षापर्यंतची व्याप्ती या शोध निबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

पार्श्वभूमी :

एके काळी भारत हा जगात शिक्षणाचे प्रमुख केंद्र होता. परंतु त्यानंतर बदलते सत्ताधिश व युरोपीयानांची आक्रमणे यामुळे येथील ही व्यवस्था पूर्णपणे उध्वस्त करण्याचे काम तत्कालीन सत्तधिशांनी केले. त्यात मोगल व युरोपीयन आक्रमणकारी होते.

पुढे इंग्रजांनी या देशाला एकसंघ केले हे मानावेच लागेल. त्यामुळे एक मोठी शक्ती आशिया खंडात अस्तित्वात येत होती. बरीच राज्ये प्राप्त करत असतांना जी-जी राष्ट्रे इंग्रजांनी मांडलीक झाली त्यांना इंग्रजांनी आश्रय दिले व संस्थानिक कारभार पाहु लागले.

ज्ञानाची पहाट :

ब्रिटीश राजवटीत पुणे येथे महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात एक नवसंजीवनी आणली. यात सावित्रीबाईचे योगदान कधीही न विसरता येणारे असे होते. आजवर या समुहाला शिक्षणाचा हक्क डावलण्यात आला होता. त्या समुहासाठी समाजाच्या विरोधात जाऊन ज्ञान यज्ञ तेवत ठेवण्याचे कार्य त्यांनी केले. त्याचा परिणाम म्हणजे आजची स्त्री ही पुरूषाच्या समान सर्व आघाडयांवर वावरताना दिसतेय.

त्याचप्रमाणे बडोदयात सयाजीरावांनी शिक्षणाची एक मशाल पेटविली होती. भावी पिढीच्या सर्वतोपरी संवर्धनाची जबाबदारी स्त्रियांवर आहे. स्त्रिया हया सुविद्य असल्या तरच उत्तम समाज घडेल, निरक्षर व निर्बुध्द स्त्रियांमुळे संसार निरस होण्याचा संभव अधिक असतो. स्त्रियास योग्य शिक्षण देणे गरजेचे हे त्यांनी ओळखले होते.

प्राथमिक शिक्षण मोफत :

महाराजांनी बडोदयाची सुत्रे हातात घेतली तेव्हा 1875 मध्ये स्वतंत्र शिक्षणाचे खाते सुरू करणारे ते राजे होते. एवढेच नाही तर जगात कोठेही मोफत शिक्षण नव्हते. इंग्लड, अमेरिकेसारख्या देशांनी सुध्दा कायदा केलेला नव्हता. तेव्हा सयाजीरावांनी आपल्या संस्थानात 1982 मध्ये सरकारी खर्चाने 180 प्राथमिक शाळा सुरू केल्या होत्या हे विशेष.

त्यांचा उद्देश एवढाच होता की गोरगरिबांना दोन वेळचे अन्न ही मिळत नसेल तर तो पैसे देऊन मुलांचे शिक्षण कसे काय करेल. म्हणून मोफत प्राथमिक शिक्षणाची संकल्पना प्रत्यक्ष राबवणारे पहिलेच राजे या देशात ते होते.

ISSN 2231 4342

इंग्रजांनी पुढे भारतात हंटर कमिशन मार्फत उच्च वर्गाला शिक्षण दयावे व ते नंतर तळागळापर्यंत नेतील, यागोष्टीला फुल्यांनी विरोध केला. त्यांच्या मते तळागळातील जनसामान्यांना प्रथम शिक्षण द्यावे हा होता. सयाजीरावांनी मात्र आपल्या संस्थानात तत्पुर्वीच ही तरतूद करून ठेवली होती. मोफत वसक्तीचा शिक्षणाचा कायदाच त्यांनी आपल्या संस्थानात केला होता.

अस्पृश्यांसाठी शिक्षणाची दारे खुली :

सयाजी राव गायकवाड हे एक दुरदृष्टीचे राजे होते. 19 वर्षाचे असताना राजाने रयतेच्या कल्याणासाठी 1882 सालीच शिक्षणा संबंधी पहिला क्रांतीकारी हुकुम काढला. बडोदयातील सोनगडया आदिवासी भागात अस्पृश्य आणि आदिवासी मुलांसाठी सरकारी खर्चाने शाळा व वसतिगृह सुरू केले. ब्रिटीशांनी इंग्लडमध्ये रयतेसाठी 1882साली सक्तिच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा पास केला. त्याच वर्षी सयाजीरावांनी एक पाऊल पुढे उचलून अस्पृश्य व आदिवासाठी कायदयाने ही मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली.

तसेच संपूर्ण बडोदयात पालकांनी मुलांना शाळेत पाठवले नाही तर पालकांना दंड केला जाईल असा नियम बनवला. याचा सुरूवातीला महाराजांना त्रास झाला. परंतु नंतर अधिका-यांच्या मदतीने समर्थपणे या कायदयाची अंमलबजावणी सुरू ठेवली.

गाव तेथे वाचनालय व ग्रंथालय :

सक्तीच्या व मोफत शिक्षणाने गावा गावात शिकणाऱ्यांची संख्या ही वाढत होती ती संख्या टिकवून ठेवण्यासाठी त्यांचे वाचन वाढावे यासाठी महाराजांनी आपल्या शिक्षण विभागात पुस्तक प्रकाशनाचे काम सोपवले. अनेक गावातील माणसांसाठी सोपी वाचन पुस्तके भाषांतरित करण्यासाठी भाषांतर हा विभाग स्थापन केला.

महाराजांनी अमेरिकेतील वाचनालयाचा अभ्यास केलाच होता त्याच धर्तीवर डॉ. बोर्डेनावाच्या तज्ञास बोलावून त्यांना ग्रंथालय संचालक नेमले व त्यांच्या मदतीने गावात वाचनालयाचे जाळे निर्माण केले. जे गाव छोटे असेल तेथे 25-30 पुस्तकांची पत्र्याची पेटी पुरवली.15 दिवसांनी ती पेटी बदलुन दुसरी तेथे आणली जाई हा फिरत्या पेटीतल्या वाचनालयाचा प्रयोग बडोदया पूर्वी फक्त स्कॉटलंड येथेच सुरू होता. त्यानंतर बडोदयात मध्यवर्ती पुस्तकालय(Central Library) आधुनिक पध्दतीने उभारले. एक लाख पुस्तकांचा हा संग्रह आशियातील सर्वात मोठा पुस्तक संग्रह असावा. ग्रंथ प्रसार व ग्रंथ प्रकाशन या दोन्ही कार्यात सर्व हिंदूस्थानातील अभिनव उपक्रम होता. त्या काळात एवढी पुस्तके एकाही प्रकाशकाने प्रकाशित केल्याचे दिसत नाही. मात्र सयाजीरावांनी बडोदे संस्थाना मार्फत शिक्षण, ग्रंथ प्रेम आणि ज्ञानलालसे पोटी केलेला हा विक्रमच म्हणावा लागेल.

सामाजिक कार्यात सढळ हाताने दान करणारा सयाजीरावां सारखा राजा होणे नाही.

ISSN 2231 4342

निष्कर्ष :

1) प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे हे भारतात सर्व प्रथम बडोदे संस्थानात सुरू झाले.
2) शिक्षणाच्या क्षेत्रात भारतात इंग्रजांनी आपल्या धोरणात ज्यांचे अनुकरण केले ते म्हणजे सयाजीराव गायकवाड होते.
3) भारतीतील विविध शैक्षणिक केंद्रांना सयाजीराव गायकवांडानी नवसंजीवनी देण्याचे कार्य केले.
4) मोठया प्रमाणात शिक्षणाबाबत कार्य घडवून आणणारे त्या काळातील सयाजीराव एकमेव राजे होते.
5) त्यांच्या कार्याची दखल महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, स्वामी विवेकानंद, जमशेदजी टाटा, या महान विभुतींनी घेतली.

संदर्भसूची :

1. बाबा भांड, (संपा), महाराज सयाजीराव गौरव गाथा, युग पुरूषाची, महाराष्ट्र शासन आवृती पहिली, 2017, पृ.क्र. 663, 664.
2. बाबा भांड, (2013), लोकपाळ राजा सयाजीराव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
3. अग्निहोत्री गणेश, (2003), श्रीमंत सयाजीराव गायकवाड, स्नेह वर्धन प्रकाशन, पुणे.
4. अग्निहोत्री/पुंडेद.दि. (2005), सयाजीराव नगरीतील साहित्य विचार भाग-1 व 2 स्नेह वर्धन प्रकाशनपुणे.
5. कॅप्टन अविनाश, (1995), नृपगोपाळ, श्रीप्रकाशन, मुंबई.
6. कुलकर्णीपु.बा (1963) मामापरमानंद आणि त्यांचा काळ.
7. कीर धनंजय, (1966) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
8. कुलकर्णीपु.बा. (1995), योगी अरविंद घोष.
9. गायकवाड सयाजीराव, श्री महाराज साहेब यांची भाषणे, श्री सयाजीराव साहित्य माला बडोदा,
10. सरदेसाई गो.स., (1956) माझी संसार यात्रा, केशव भिकाजी ढवळे, मुंबई.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

शेतमालाच्या किंमती आणि शेतमाल बाजारातील सुधारणा

डॉ. सुनिल अण्णा गोरडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय कन्नड.
मो. 9860714744
Email : sunilgorde1982@gmail.com

सारांश:

शेतकऱ्यांना मिळणारी शेतमालाची किंमत आणि ग्राहकांना द्यावी लागणारी शेतमालाची किंमत यामधील अंतर हे लक्षणीय असल्याचे दिसते. वाढत्या अंतरामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. शेतकऱ्यांना मिळणारी किंमत आणि बाजारातील ग्राहकांना द्यावी लागणारी किंमत यातील अंतर कमी करण्यासाठी शासनाच्या वतीने विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात आल्याचे दिसून येते. सदरील बाबीचा आढावा या संशोधनातून करण्यात आला आहे.

मुख्य शब्द: शेतमालाच्या किंमती, कृषी उत्पन्न बाजार समिती, शेतमाल बाजार सुधारणा

प्रस्तावना:

शेतकऱ्यांना शेतमालाच्या योग्य किंमती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून अनेक उपाययोजना करण्यात आल्याचे दिसून येते. शेतमाल विक्री व्यवस्थेतील अडचणी दूर करण्याच्या उद्देशाने संघटित स्तरावरती वेगवेगळ्या राज्यांमध्ये कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना करण्यात आली. कृषी उत्पन्न बाजार समित्या मुळे शेतमाल विक्री प्रक्रियेमध्ये पारदर्शकता निर्माण झाली. शेतमालाची विक्री करण्यासाठी लिलाव पद्धत, शेतमाल विक्रीनंतर पैसे मिळण्याची हमी, कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरामध्ये शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या सुविधा यासारख्या बाबी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध झाल्यात. लिलाव पद्धतीमध्ये अनेक दोष असल्याचे आपल्याला दिसून येतात. बाजार समितीतील वेगवेगळ्या प्रकारच्या शुल्कामुळे शेतकरी आणि ग्राहक या दोघांचेही आर्थिक नुकसान होत असल्याचे आढळून येते. आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी शासकीय स्तरावर उपाय योजना सुरु असल्याचे दिसून येते.

ISSN 2231 4342

संशोधनाची उद्दिष्टे:

1) कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना शेतमालाची मिळणारी किंमत आणि ग्राहकांना शेतमालासाठी द्यावी लागणारी किंमत यांचा आढावा घेणे.

2) शेतकऱ्यांना मिळणारी किंमत आणि ग्राहकांना द्यावी लागणारी किंमत यामधील वाढत्या अंतराच्या कारणांचा आढावा घेणे.

3) वरील बाबीतील वाढते अंतर कमी करण्यासंदर्भात शासकीय उपाययोजनांचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहितके:

1) कृषी उत्पन्न बाजार समितीमधील वेगवेगळ्या शुल्कामुळे शेतकऱ्यांना मिळणारी किंमत आणि ग्राहकांना द्यावी लागणारी किंमत यामधील अंतरामध्ये वाढ होते.

शेतमालाला बाजारांमध्ये मिळत असलेली किंमत आणि बाजारामध्ये ग्राहकाला शेतमाल उपलब्ध झाल्यानंतर द्यावी लागणारी किंमत यामधील अंतर मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे 1928 च्या रॉयल आयोगाच्या अहवालातून दिसून आले. शेतकऱ्यांना मिळणारी किंमत आणि ग्राहकांना द्यावी लागणारी किंमत यामधील वाढत जाणाऱ्या अंतराच्या कारणांचा आढावा संशोधकांनी घेतल्याचे दिसून येते. बाजार समितीचे शुल्क, हमाली, आडत, विशेष शुल्क यासारख्या बाजार शुल्काचा भार हा शेतकरी व ग्राहक या दोघांवर होत असल्यामुळे यातील अंतर वाढते. सुनील तांबे यांच्या अभ्यासानुसार 'भारतीय अन्न महामंडळाने पंजाब मध्ये एकशे सत्तर लाख टन गहू बाजार समित्यांमार्फत हमीभावाने खरेदी केला. बाजार समितीच्या नियमाप्रमाणे 2% आडतीचा विचार केल्यास साधारणपणे 654.5 कोटी रुपये आडत्यांना मिळाले', यावरून आडत शुल्क हे शेतकऱ्यांना मिळणारी किंमत आणि ग्राहकांना द्यावी लागणारी किंमत यातील अंतर वाढवत असल्याचे दिसून येते. कन्नड तालुक्यामध्ये मका पिकाखालील क्षेत्राचे एकूण लागवडीखालील क्षेत्राशी असलेले प्रमाण तुलनेने जास्त असल्यामुळे आणि बहुसंख्य शेतकऱ्यांच्या मका पिकाची खरेदी बाजार समिती मार्फत किमान आधारभूत किमतीला होत नसल्यामुळे कन्नड तालुक्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे दिसून आले.

लिलाव पद्धतीमध्ये स्पर्धात्मकता निर्माण करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना किमतीचे संरक्षण देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री अधिनियम 1963 मध्ये तरतुदी केल्याचे दिसून येतात. कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापन करण्याच्या अनुषंगाने राज्य सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे दिसून येते. नोंदणीकृत व्यापारी व त्यांच्या माध्यमातूनच व्यवहार होत असल्यामुळे शेतमाल विक्रीमध्ये मक्तेदारी व्यवस्था निर्माण होते. यामुळे शेतकरी व ग्राहक या दोघांचेही आर्थिक नुकसान होत असल्याने शेतमाल विक्री व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता निर्माण झाली. प्रदीप नणंदकर यांच्या मते, 'भुसार मालावर दोन टक्के,

 ISSN 2231 4342

भाजीपाल्यासाठी आठ ते दहा टक्के, तर फुलांसाठी पंधरा टक्क्यापर्यंत आडत असल्यामुळे शेतमालाचे भाव दिवसेंदिवस वाढत आहे'.

तक्ता क्रमांक 1

औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे उत्पन्न (रक्कम कोटी रु.)

कृषी उत्पन्न बाजार समिती/ वर्ष	2017-18	2018-19	2019-20
औरंगाबाद	3.27	3.33	3.87
फुलंब्री	0.53	0.26	1.17
गंगापूर	0.96	0.61	0.75
कन्नड	0.66	0..40	0.55
खुलताबाद	0.12	0.12	0.20
लासुर स्टेशन	1.85	1.41	2.01
पैठण	0.13	0.61	2.36
सिल्लोड	2.14	2.44	2.91
सोयगाव	0.09	0.09	0.08
वैजापूर	2.39	1.43	2.14
एकूण	12.59	12.7	16.04

आधार:महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वेबसाईटवरील सदरील कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी सादर केलेली माहिती

तक्ता क्रमांक एक वरून असे दिसून येते की, 2017-18 ते 2019-20 या कालावधीमध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्नामध्ये वाढ होत आहे. सदरील कालावधीमध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या खर्चामध्ये वाढ झालेली दिसून येते. बाजार समितीतील शुल्कामुळे

शेतमालाच्या किमतीमध्ये होणारी वाढ आणि बाजार समितीच्या उत्पन्न आणि खर्च यातील तूट या बाबीकडे लक्ष देता शेतमालाची खुली विक्री व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता लक्षात येते.

तक्ता क्रमांक 2

औरंगाबाद जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा खर्च (रक्कम कोटी रु.)

कृषी उत्पन्न बाजार समिती/ वर्ष	2017-18	2018-19	2019-20
औरंगाबाद	3.53	5.28	6.37
फुलंब्री	0.61	0.44	0.63
गंगापूर	0.96	0.61	0.75
कन्नड	0.85	0.71	0.71
खुलताबाद	0.21	0.22	0.22
लासुर स्टेशन	1.42	1.27	1.58
पैठण	0.61	1.06	0.98
सिल्लोड	1.59	1.78	2.14
सोयगाव	0.09	0.10	0.09
वैजापूर	1.40*	1.40	1.44
एकूण	11.27	12.87	15.18

आधार:महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वेबसाईटवरील सदरील कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी सादर केलेली माहिती

शेतमालाच्या विक्रीतून कृषी उत्पन्न बाजार समित्यांना उत्पन्न मिळते त्यातून त्या खर्च करतात हे तक्ता क्रमांक एक आणि दोन यावरून दिसून येते. किमान हमी भावाने शेतकऱ्यांचा सर्व माल कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये खरेदी करण्याची व्यवस्था नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.

 ISSN 2231 4342

शेतमाल बाजाराच्या अनुषंगाने आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी शासनाने काही उपाय योजनांची सुरुवात केल्याचे दिसून येते.

शासकीय उपाययोजना:

शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा व ते वाढविण्यासाठी आवश्यक बाबींचा अभ्यास करण्यासाठी व उपाय सुचविण्यासाठी राष्ट्रीय पर्जन्य क्षेत्र प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक दलवाई यांच्या अध्यक्षतेखाली 13 एप्रिल 2016 रोजी Doubling farmers income committee स्थापन करण्यात आली. या समितीने सविस्तर अभ्यास करून 14 खंडांमध्ये आपला अहवाल सादर केल्याचे दिसून येते. समितीने शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ करण्यासाठी सुचविलेल्या सात बाबींमध्ये शेतकऱ्यांना मिळणाऱ्या बाजारभावामध्ये सुधारणा करणे ही बाब निश्चित केल्याचे अहवालात दिसून येते.

शेतकऱ्यांना योग्य बाजार भाव मिळावा या उद्देशाने केंद्र सरकारने एप्रिल 2016 मध्ये पथदर्शी स्वरूपात राष्ट्रीय कृषी बाजार ई-नाम योजनेची सुरुवात केल्याचे दिसून येते. ई-नाम प्रणालीने शेतकऱ्यांना आपला शेतमाल ऑनलाइन पद्धतीने विना मध्यस्थ विकण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्याचे दिसते. कृषी बाजार समिती या प्रणालीतील प्रमुख घटक आहेत. कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी ई-नाम प्रणाली मध्ये सहभाग घेण्यासाठी संबंधित राज्याच्या एपीएमसी कायद्यात सुधारणा करावी लागते. मार्च 2019 पर्यंत 18 राज्य व 03 केंद्रशासित प्रदेशांनी या प्रणाली मध्ये सहभाग नोंदविल्याचे आढळून येते, तर एक हजार नोंदणीकृत बाजार आणि 155126 नोंदणीकृत व्यापारी असल्याचे दिसून येते. भारताच्या संदर्भात विचार करता 10.09 प्रतिशत बाजार समित्यांनी या प्रणालीमध्ये नोंदणी केल्याचे आढळून येते. महाराष्ट्र राज्याचा विचार करता 902 नोंदणीकृत बाजार समित्या व उपबाजार समित्यापैकी 60 बाजार समित्यांनी ई-नाम प्रणालीमध्ये नोंदणी केल्याचे दिसते. महाराष्ट्रामध्ये नोंदणीकृत बाजार समित्यांचे प्रमाण हे 6.65 प्रतिशत असल्याचे आढळते परंतु त्यांचे ऑनलाइन व्यवहार हे अत्यल्प असल्याचेही दिसून येते. लहान बाजाराकडे प्रथम लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येते.

शेतकरी एकत्र येऊन व्यापारी गट स्थापन करत असेल तर त्यांना 2017-18 च्या केंद्रीय अंदाजपत्रकामध्ये त्यांच्या परिसरामध्ये कृषी मालाचा संग्रह, वर्गीकरण, प्रतवारी व पॅकिंग सुविधा स्थापित करण्याची परवानगी देण्यात आल्याचे दिसून येते.

नवीन कृषी कायद्यामध्ये मध्यस्थांची संख्या कमी करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना केल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रामध्ये 2006 मध्ये महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री अधिनियम 1963 यात सुधारणा करून खाजगी बाजार, थेट पणन, शेतकरी ग्राहक बाजार व कंत्राटी शेती इत्यादी पर्याय उपलब्ध करून देण्यात आल्याचे

दिसून येते. शेतकरी ग्राहक बाजार स्थापन करण्यासाठी लिलाव ग्रह, निवारा, प्रसाधनगृह, अंतर्गत रस्ते यातील गुंतवणुकीचा निकष, दहा हजार रुपये परवाना फी, एक लाख रुपयांची बँक हमी, फळे व अन्नधान्य यांच्या विक्रीवरील नियंत्रणे यासारख्या बाबी शेतकरी बाजाराच्या विकासाच्या बाबतीत अनुकूल आणि प्रतिकूल असल्याच्या दिसून येतात. महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री अधिनियम 1963 कायद्यातील सुधारणेमुळे शेतकरी गट स्थापन होत असल्यामुळे विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची संख्या कमी होत आहे, त्यामुळे विकी खर्च व वाहतूक खर्च कमी होण्यास मदत होत असल्याचे दिसून आले. 2018 मध्ये किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी किमतीला शेतमाल खरेदी केल्यास 50 हजारापर्यंत दंड व एक वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री अधिनियम 1963 मध्ये समाविष्ट करण्यात आली.

शिफारस:

शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी शेतकऱ्यांना शेतमालाची मिळणारी किंमत आणि ग्राहकांना शेतमालासाठी द्यावी लागणारी किंमत यातील अंतर कमी करण्यासाठी शासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात.

शेतमाल बाजार व्यवस्थेमध्ये शेतकऱ्यांना शेतमालाचे योग्य भाव मिळण्यासाठी शासनाने सुरुवात केलेल्या वेगवेगळ्या उपाययोजनांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी व्हावी.

संदर्भसूची:

1) Agricultural marketing in India, A.K.Singhal, Anmol publications, New Delhi, 1989.

2) Report of the Royal commission on Agriculture in India, 1928, vol. I.

3) Agricultural development of India, Somu Giriappa M. Vivekananda, Ashish publication House New Delhi, 1984.

4) Marketing of Agricultural produce in India, A.P. Gupta, Vora and co., publishers private limited, Bombay, 1975.

5) Agricultural Marketing in Uttar Pradesh, Gupta AP, Unpublished Ph.D. thesis, Lucknow University, 1964.

6) Agricultural price policy and income distribution in India, Alain De Janvry, K.Subbarao, Oxford University press,1986.

7) महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम 1963, महाराष्ट्र राज्य.

ISSN 2231 4342

8) शेतकरी स्वातंत्र्याचा नवा 'बाजार' सुनील तांबे, ORF, 07 ऑक्टोंबर 2020.

9) बाजार समित्या कोणाच्या हिताच्या? प्रदीप नणंदकर, लोकसत्ता, 29 जानेवारी 2016.

9) महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची वेबसाईट. https://www.msamb.com/

10) राष्ट्रीय कृषी बाजार प्रणालीचे संकेत स्थळ https://www.enam.gov.in

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

स्वातंत्र्य आंदोलनात स्वदेशी चळवळीचे योगदान

डॉ. मनीषा जगदीशलाल वर्मा
एस.पी.डी.एम.महाविद्यालय,
इतिहास विभाग
शिरपूर,जिल्हाधुळे महाराष्ट्र
ईमेल warmamanisha@gmail.com

सारांश:

प्राचीन काळापासून भारतावर सतत परकीय आक्रमणे झाली, परंतु ईस्ट इंडिया कंपनी व इंग्रजांच्या आक्रमणाने भारतावर अनेक क्षेत्रात परिणाम झाले. ब्रिटिशांची जुलमी राजवट, प्रचंड प्रमाणात आर्थिक लूट व साम्राज्यवादी धोरण यामुळे अनेक राजकीय व सामाजिक विचारवंत पुढे आले व त्यांनी प्रबोधन केले.ह्यामुळे राष्ट्रवाद निर्माण होऊन राजकीय चळवळीला चालना मिळाली.इ.स. 1857 ते1947 या काळात भारतीय राष्ट्रीय चळवळ ही व्यापक चळवळ असून भिन्नभिन्न विचार प्रणाली व विविध विचार धारेने प्रभावित होऊन अनेक आंदोलने झाली. स्वातंत्र्य आंदोलनात स्वदेशी चळवळ ही आर्थिक विकासा बरोबर,आर्थिक विचार प्रणालीवर आधारित औद्योगिकरण्याच्या मार्गाने भारताचा विकास व प्रखर राष्ट्रवाद निर्माण होण्यास मदत झाली. राष्ट्रीय चळवळ सुरू करण्यासाठी देशव्यापी राष्ट्रीय नेतृत्व निर्माण करण्याची गरज होती ही जाणीव निर्माण झाली.राष्ट्रीयत्वाची भावना आणि राष्ट्र म्हणून स्वतंत्र जाणीव निर्माण होऊन जनता जेव्हा संघटित होते तेव्हा राष्ट्रीय चळवळीचे पहिले पाऊलपडते व तेम्हणजे राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होय. सुरुवातीला राष्ट्रीय काँग्रेस एक पक्ष म्हणूननव्हे तर चळवळ म्हणूनअस्तित्वातआली.याच ळवळीचे मुख्य हेतू वसाहत वादाच्या विरोधातील राष्ट्रीय विचार सरणी विकसित करून तिचा प्रसार करणे होय यातूनच स्वदेशी चळवळची निर्मिती झाली. भारतीयांना वसाहतवादी आर्थिक वर्चस्व व शोषण याची पूर्ण जाण झाली होती. वसाहतवादाच्या विरोधात भारतात अनेक उठाव, आंदोलन झाले त्यात राष्ट्रीय चळवळीच्या प्रगती मध्ये स्वदेशी चळवळीचे महत्त्वपूर्ण योगदान होते.

की वड्र्सस्वदेशी, राष्ट्रवाद,चळवळ,औद्योगीकरण, बहिष्कार.

संशोधनाचा उद्देश

1) भारतातील उद्योगधंदे व औद्योगीकरण या विषयी माहिती मिळविणे.

2) वसाहतवादाच्या आर्थिक शोषणा विषयी माहिती मिळविणे.

3) स्वातंत्र्य आंदोलनात स्वदेशी चळवळ विषयी माहिती मिळविणे.

4) भारतातील प्रखर राष्ट्रवाद व स्वदेशी चळवळीचा प्रसार या विषयी माहिती मिळविणे.

ISSN 2231 4342

गृहीतकृत्ये

1) स्वदेशी चळवळीने भारतातील उद्योगधंदे व औद्योगिकी करणाला चालना मिळाली.

2) स्वातंत्र्य आंदोलनात स्वदेशी चळवळीचे योगदान महत्त्वाचेआहे.

3) स्वदेशी चळवळीने राष्ट्रवादाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

4) विविध प्रांतात स्वदेशी चळवळीचा प्रसार झालेला होता.

संशोधन पद्धती

या शोधनिबंधाकरिता विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केला असून या विषयी निगडित साधनांचा वापर केला आहे. या साधनात प्राथमिक व द्वितीय साधनांच्या तसेच वृत्तपत्रे, मासिके, नियत कालिके,संशोधन पत्रिका,विविध संदर्भ ग्रंथ,संकेतस्थळाचा आधार घेऊन तथ्य संकलन केले आहे.

विषयवस्तु

ब्रिटिश पूर्व काळात भारतात अनेक उद्योगधंदे आणि हस्तव्यवसाय प्रस्थापित झालेले होते. राजधान्यांची ठिकाणे आणि व्यापारी केंद्रे निरनिराळ्या उद्योगा करिता प्रसिद्ध पावलेली होती. ज्यावेळी युरोपात उद्योगधंद्यांची प्रगती झालेली नव्हती त्याकाळात भारतात औद्योगिक आणि आर्थिक क्षेत्रात प्रगत झालेला असा देश असल्याचे मान्य केले जात होते. 1770 ते1870 या काळात उद्योग धंदे व हस्त उद्योग यांच्या उत्तरोत्तर ऱ्हास होत गेला. सुरुवातीला ईस्ट इंडिया कंपनीने हिंदुस्थानातील उपयुक्त असणाऱ्या उद्योगधंद्यांची प्रगती घडवून आणण्याचे धोरण स्वीकारले होते परंतु हिंदुस्थानाची औद्योगिक प्रगती झाली तर तीब्रिटनच्याआद्योगिक प्रगतीस मारक ठरेल आणि ब्रिटनच्या व्यापारावर ही अनिष्ट परिणाम होईल.इंग्रजांची सत्ता भारतात प्रस्थापित होऊ लागली आणि इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्याने इंग्लंड मधील उद्योगधंद्यांची उत्पादन क्षमता वाढली आणि उत्पादन कमी खर्चात करता येऊ लागले या उत्पादनाशी हिंदुस्थानातील पारंपारिक पद्धतीने चालविलेल्या उद्योगधंद्यांना आणि व्यवसायिकांना टक्कर देणे शक्य झाले नाही यामुळे भारतातील उद्योगधंद्यांच्या ऱ्हास झाला. 1800 ते 1850 ह्या काळात अनु उद्यौगीकरणाचा काळ असे म्हणतात.

ब्रिटिश सरकारने हिंदुस्थानातून ब्रिटनमध्ये आयात केल्या जाणाऱ्या कापडासारख्या पक्क्या वस्तूंवर जबर आयात कर लादूनआणि ब्रिटन मधून हिंदुस्थानात आयात होणाऱ्या वस्तू वर नाम मात्र आयात कर बसविण्यास कंपनी सरकारला भाग पाडून भारतीय उद्योग आणि व्यवसाय नष्ट करण्याचे धोरण स्वीकारले. हिंदुस्थानातून येणाऱ्या मालाच्या आयातीव ब्रिटनच्या सरकारने जे कर बसविले होते त्यात प्रत्येक वेळी पाचट क्के वाढ केली. 1883 च्या कायद्यानुसार आयातीवर किमती नुसार 18% एवढा सरसकट आयात कर लागू केला. त्यानंतरच्या काळात ही या करारात सतत वाढ होती. 1797 ते 1813 या काळात कपड्यांवरील आयात कर 40 टक्क्यांनी वाढून 85 टक्क्यावर नेला. श्री.रमेशचंद्र दत्त यांनी म्हटले की,"भारतातील उद्योग धंदे नष्ट करण्याच्या दृष्टीने, ईस्ट इंडिया कंपनीलामिळालेल्या राजकीय सत्तेचाहेतुपूर्वक वापर करण्यातआला".[1]तसेच अनेक भारतीय राष्ट्रीय नेत्यांनी व अर्थ तज्ञयांनी संपत्तीचे अपहरण,द्रव्य अपहरण याविषयी वेगवेगळे अंदाज दिलेआहेत. पावलोव्ह अंदाज सांगतात की 1930 च्या सुमारास इंग्रज साम्राज्यवाद्यांनी भारतातून फक्त शुल्कापोटी 13

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal **ISSN 2231 4342**

कोटीते 14 कोटी पौड्स पळविले. ह्या रकमेतून भारत दरवर्षी भिलाई सारखे तीन पोलाद कारखाने सुरू करूश कत होता.[2]

स्वदेशी ही संकल्पना भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रवादाच्या विकास होण्यासाठी महत्त्वाची ठरली होती. स्वदेशी आंदोलन म्हणजे परदेशी मालावर बहिष्कार घालण्यासाठी छेडलेले आंदोलन होय. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या विशिष्ट राजकीय व आर्थिक परिस्थितीतत्याला चालना मिळाली कारण अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात यूरोपमध्ये, विशेषतः इंग्लंडमध्ये, औद्योगिक क्रांती सुरू होऊन नव्या कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर तयार होणाऱ्या मालाला बाहेर बाजार पेठा मिळविणे आवश्यक होते. त्यातून कारखानदार कच्च्या मालासाठी परदेशांतील बाजारपेठा काबीज करू लागले. साहजिकच यूरोपीय राष्ट्रांत, विशेषतः ग्रेट ब्रिटनमध्ये कच्च्या मालाची उगमस्थाने व बाजारपेठा हस्तगत करण्यासाठी संघर्ष उद्भवला. त्यातून ग्रेट ब्रिटनमधून पक्का माल (उदा., कापड) भारतात येई व येथून कवडी मोल किंमतीला कच्चा माल (कापूस) ग्रेट ब्रिटनला जाई. तेव्हा या कापडावर बहिष्कार टाकण्याची मोहीम लोकहितवादी, सार्वजनिक काका, दादाभाई नवरोजी, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांनी सुरू केली आणि स्वदेशी माल—विशेषतः खादीचे कापड — वापरण्यासाठी आग्रही भूमिका स्वदेशी आंदोलनाद्वारे व्यक्त केली.

1906 मध्ये तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन याने बंगालची फाळणी केली त्याविरुद्ध बंगालमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली. टिळकांनी या प्रश्नाला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त करूनदिले. ब्रिटिश शासना विरुद्धची चळवळ तीव्र झाली पाहिजे,अशी जाणीव काँग्रेसच्या बहुतेक पुढाऱ्यांना झाली. कलकत्ता येथे झालेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात (1906) दादाभाई नवरोजी यांनी अध्यक्ष पदावरून स्वदेशीचा पुरस्कार केला आणिअधिवेशनात संमत झालेल्या ठरावातही ‘स्वदेशी’ व ‘बहिष्कार’ यांचा अंतर्भाव करण्यातआला. या आंदोलनात जमीनदार व वकिलांसोबत विद्यार्थी, शेतकरी, दुकानदार, एतद्देशीय सैनिक, पुजारी, नाभिक, परीटइत्यादींनी सहभागी होऊन परदेशी मालावर बहिष्कार केला आणित्यांनी परदेशी कापड, मीठ, साखर इत्यादींवरील बहिष्कार करायला प्रारंभ केला.

इंग्रजांनी भारतातील कच्चा माल स्वस्तात नेवून पक्का माल पुन्हा भारतातच महाग किंमतीत विकून एकीकडे नफा खोरी आणि दुसरीकडे भारतीय उद्योगांना संपविण्याचे जे दुहेरी शोषण चालविले होते त्याकडे ज्या नेमक्या द्रष्ट्या महापुरूषांनी जनतेचे लक्ष वेधले त्यामध्ये लोकमान्य टिळक होते. त्यामुळे स्वदेशीचा पुरस्कार आणि विदेशी मालाचा बहिष्कार असा दुहेरी कार्यक्रम त्यांनी दिला होता. मँचेस्टरची धोतरे बंद करण्यापुरती आजची चळवळ नाही, तर आम्हास गोऱ्यांचे सर्व हक्क मिळावेत व त्यांनी ते न दिल्यास त्यांच्याकडून आम्ही अडवून घ्यावे, म्हणून आजची स्वदेशी चळवळ निघाली आहे. असे बेळगावच्या गणेशोत्सवातील सभेत स्वदेशीतून स्वराज्य या विषयावर बोलताना सांगितले होते.[3]

लोकमान्य टिळकयांचा केसरी अग्रलेखात स्वदेशी चळवळ विषयी मत

स्वदेशी चळवळ म्हणजे केवळ सुखाचा मार्ग नव्हे; त्यात थोडी गैरसोय आहे व ती लोकांनी सोसली पाहिजे. आता कोणी असे म्हणतील, की किमती जास्त चढल्याने पूर्वी इतका माल घेण्यास जास्त खर्च करावा

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

लागेल; व तसा खर्च करण्यास प्रत्येकास सामर्थ्य नाही, ही गोष्ट खरी आहे; पण ज्यास अशा रीतीने सामर्थ्य नाही त्याने विलायती माला पेक्षा थोडा कमी स्वदेशी माल तितक्याच किमतीत खरेदी करून त्यास त्यांत आपला निर्वाह करता येण्यासारखाआहे. उदाहरणार्थ, कापडचघेऊ, दरसाल एका कुटुंबास वीस रुपयांचा विलायती कपडा लागतो, तर याच वीस रुपयांत जितका देशी कपडा येईल तितका घेऊन काही वर्षे त्यास जास्त खर्च न करिता निर्वाह करता येणार नाही असे नाही. कारण देशी कपडा विलायती पेक्षा थोडा अधिक टिकाऊ असतो, हे प्रसिद्ध आहे. अशा दृष्टीने विचार केला म्हणजे विशेष खर्च न होता पण थोडीशी झीज सोसून स्वदेशी चळवळीस सर्वांना मदत करता येणारआहे. यात कोणाचेही नुकसान नाही व काही अशक्य ही नाही. जी गोष्ट सरकार परकीय नसते तर त्याने केली असती, तीच आपल्यास करावयाची आहे. यात अडचणी पुष्कळ आहेत; पण त्या सर्व निश्चयाने उद्योग केल्यास हळूहळू नाहीशा होण्यासारख्या आहेत. नुकसानीची भीती व्यर्थ आहे, इतकेच नव्हे तर केव्हाही झाले तरी यापासून हितच होणार आहे. सारांश ‘स्वल्प मप्यस्य धर्मस्य त्रायतेमहतो भयात्’ असे जे याबद्दल मागे आम्ही लिहिले आहे ते अक्षरश: खरे आहे व आम्हास अशी उमेद आहे, की लोक या योगाचा अवलंब करण्यात कदापी ही मागे येणार नाहीत. स्वार्थाने किंवा अन्य कारणाने मधून मधून काही आक्षेपक, लोकांस या मार्गापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतील. पण हे प्रयत्न मायावी आहेत असे समजून, त्यास भीक न घालता आमच्या लोकांनी अंगीकृत कार्य तडीस न्यावे, अशी त्यांस आमची आग्रह पूर्वक विनंती आहे.बाळ गंगाधर टिळक (‘केसरी’चा अग्रलेख (१२ डिसेंबर १९०५)[4]

बंगालमधील विद्यार्थ्यांनी प्रामुख्याने स्वदेशी चळवळीत भाग घेतला. त्यांनी स्वदेशी आचरणात आणल; तिचा प्रचार केला. परदेशी कापड विकणाऱ्या दुकानदारांना समोर निदर्शने केली. सरकार विरोधी चळवळीच्या एक आवश्यक भाग म्हणून आत्मशक्ती आणि स्वयंपूर्णते वर भर देण्यातआलेला खास भर हा स्वदेशी चळवळीचा एक महत्त्वाचा पैलू होता. स्वदेशी चळवळीत जमीनदार, कनिष्ठ,मध्यम वर्गीय व महाविद्यालतीन विद्यार्थी फार मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. स्त्रिया प्रथमच घरातून बाहेर पडून मिरवणुका व निदर्शनांत भाग घेऊ लागल्या. लोकमान्य टिळकांनी देशातील विदेशी वस्तूंचा वापर टाळण्याबरोबरच स्वदेशी उत्पादकांना ठामपणे उभे करण्याचाही विचार केला. त्यासाठी पैसा फंडाची कल्पना आणून त्यामधून काच कारखाना, डालडा फॅक्टरी, कापडगिरण्या उभारण्याची कल्पना आणली. टिळकांनी शेतकरी आणि कष्टकरी यांचा विचार अतिशय बारकाईने केला होता. टिळक म्हणत देश म्हणजे शेतकरी, देश म्हणजे काबाडकष्ट करणारी जनता. शेतकरी हा देशाचा कणा आहे, राष्ट्राचा आत्मा आहे असे सांगणारे लोकमान्य पहिले पुढारी. या काबाड कष्टकरणाऱ्यां ची आर्थिक स्थिती जोपर्यंत सुधारत नाही तोपर्यंत देशाची परिस्थिती सुधारली असे म्हणता येणार नाही.

स्वदेशी आणि बहिष्कार आंदोलन परकीय वस्तूंची विक्रीकरण्यावर बहिष्कार व परदेशी कापडचे सार्वजनिक ठिकाणी होळीकरणे, बंगालच्या सर्व भागांत तसेच देशभरातील अनेक महत्त्वाच्या शहरातहि चळवळ दिसून आली. स्वदेशी चळवळीचा एक प्रमुख भाग म्हणजे बंगाल मधील विद्यार्थ्यांनी फक्त स्वदेशीचाच स्वीकार केला नाही, तर परदेशी कापडविक्रीच्या दुकानांचाही विरोध केला. महिलांनी परदेशी बांगड्याआणि परदेशी भांडी

वापरण्यास नकार दिला, धोबीनी परदेशी कपडे धुण्यास नकार दिला,परदेशी साखर असलेले पदार्थ नाकारले. परदेशी वस्तूंचा वापर, खरेदी आणि विक्री करणारे लोक सामाजिक बहिष्कारांच्या अधीन होते. स्वदेशी मालाचा वापर वाढविण्यासाठीआणि परदेशी वस्तूंचा बहिष्कार करण्यासाठी शहरे आणि गावांमध्ये कित्येक सभा आयोजित केल्या गेल्या. स्वदेशी चळवळीत मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणारे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणावर लोकांचे लोकसंवर्धन करत होते. पारंपारिक लोकप्रिय उत्सव, लोक रंगमंच स्वरूप आणि 'यात्रा' (उत्सव) जनतेपर्यंत पोहचण्याच्या साधन म्हणून वापरल्या जात होते. 'आत्मनिर्भरता' हे स्वदेशी चळवळीचे एक महत्त्वाचे पैलू होते म्हणून विविध क्षेत्रांमध्ये,विशेषत: शिक्षण आणि रोजगाराच्या गरजा पुरवण्याकरिता व्यावसायिक उद्योगांमध्ये' आत्मनिर्भर' होण्याचे प्रयत्न केले गेले होते.

महात्मा गांधी आणि स्वदेशी चळवळ

महात्मा गांधीजींच्या काळात स्वदेशी चळवळ ही असहकार चळवळ म्हणून ओळखली गेली. नागपूर अधिवेशनात काँग्रेसने असहकार कार्यक्रमावर प्रचंड बहुमताने शिक्कामोर्तब केल्यानंतर काँग्रेसनेते प्रचार कार्याला लागले. देशाच्या सर्व भागांचा दौरा करून ठिकठिकाणी सभा घेऊन असहकाराच्या कार्यक्रमाचे स्वरूप व महत्त्वते सामान्य जनतेला पटवून सांगू लागले यामुळे अशिक्षित त्यांचे शिक्षण मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. पीजी व इतर सहकाऱ्यांच्या मदतीने असहकार कार्यक्रमाची लोकप्रियता इतकी वाढली की पन्नास लक्ष्यावर स्वयंसेवकांची नोंदणी झाली आणि एक कोटी रुपयांच्या लोकमान्य स्वराज्य फंड गोळा करण्याचा संकल्प एका वर्षाच्याआतच सिद्धीस गेला. यातून सुमारे वीस लाखावर चरखे वाटले गेले.ज्येष्ठ नेत्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकला, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक संस्थांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला ब्रिटिश सरकारने दिलेल्या सन्मानाच्या उपाधी व पदव्यायांचा त्याग केला.[5]असहकार चळवळीत स्वदेशी वस्तूंना उत्तेजन देण्यात आले. परदेशी कापडाची होळी करण्यात आली. सूतकताई व वीणकामाला महत्त्व देण्यात आले.त्यामुळे मोठ्या प्रमाणात हिंदुस्थानात खादीची निर्मिती झाली. खादी विकण्यासाठी खादी केंद्र उघडण्यात आली. त्यामुळे इंग्लंडवरून येणाऱ्या कापडावर फार मोठा परिणाम झाला. मॅचेस्टरच्या गिरण्या बंद पडतात की काय अशी भीती इंग्रजांना वाटू लागली. कायदे भंगचळवळी मध्येही विदेशी वस्त्रावर बहिष्कार, विदेशी कपड्यांची होळी हे महत्त्वाचे सूत्र या चळवळीचे होते.[6] जसजसा हा परदेशी कपडा बाजारात येऊ लागला तसतशी सुती कपड्याची मागणी कमी होऊ लागली. शेकडो विणकरी आपला रोजगार गमावून बसले. पण या बिकट प्रश्नातून वाट काढली ती महात्मा गांधींनी. स्वतः चातीवर सूत कातून आणि सुती कपड्याचा स्वीकार करून महात्मा गांधींनी या एतद्देशीय कपड्याला पुनर्जीवन दिले. परकीयप्रांतांमधून आलेल्या कपड्यावर किंवा इतर वस्तूंवर बहिष्कार घालून स्वदेशी वस्तूंकडे वळावे या गांधीजींच्या आग्रहामुळे प्रेरित होऊन लाखो लोकांनी पुनश्च खादीचा स्वीकार केला. गांधीजींनी परदेशी वस्तू, विशेषत: इंग्रजी वस्तूंवर बहिष्कार घालण्यासाठी स्वदेशी धोरणाची मागणी केली. ते म्हणाले की, सर्व भारतीयांनी इंग्रजांनी बनवलेल्या कपड्यांऐवजी आपल्या स्वत: च्या लोकांनी हाताने तयार केलेली खादी घालावी. त्याने पुरुष व स्त्रियांना दररोज सूत फिरण्यास सांगितले. त्याशिवाय

ISSN 2231 4342

ब्रिटनच्या शैक्षणिक संस्था व न्यायालयांवर बहिष्कार घालण्याची, सरकारी नोकरी सोडावी व ब्रिटीश सरकारकडून मिळालेला सन्मान व सन्मान परत करण्याची विनंती ही महात्मा गांधींनी केली

स्वदेशी आंदोलन आणि महिला

महात्मा गांधीजींनी परदेशी कापड व दारूची दुकाने यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले होते.स्त्रियांनी ही या चळवळीत त्यांनी प्रमुख भूमिका पार पाडावी, असे आवाहन गांधीजींनी केले होते.यानुसार घराबाहेर न जाणाऱ्या स्त्रिया, नेहमी बुरखा वापरणाऱ्या स्त्रिया, तरुण माता व विधवा, अविवाहित मुली अशा सर्व जणी दारूच्या व परदेशी कापडाच्या दुकानांसमोर आणि अफूच्या अड्डाबाहेर उभे राहून रात्रंदिवस शांतपणे निदर्शनेकरीत होते. या आंदोलनात स्त्रियांनी ही प्रमुख भूमिका बजावली.महात्मा गांधीजींनी 1921 मध्ये पुण्यात सभा घेतली त्यात सत्यभामाबाई कुवळेकर व इंदिराबाई देवघर यांच्या नेतृत्वा खाली चारशे ते पाचशे स्त्रिया या सभेसाठी उपस्थित होत्या. जमलेल्या स्त्रियांना गांधीजींनी सूतकताईच्या संदेश दिला. गांधीजींनी दिलेल्या संदेशानुसार पुन्हा स्त्रियांनी सूतकताई कमिटी स्थापन केली. सत्यभामाबाई महात्मा गांधीजींच्या विचाराने इतक्या भारावून गेल्या की त्यांनी सोन्याच्या चार बांगड्या आंदोलनाच्या मदतीसाठी तर दिल्याच पण अखंड खादी वापरण्याची शपथही घेतली. अनेक स्त्रिया या सूतकताईच्या संदर्भात निर्भय बनविले होते. सूतकताई म्हणजे परदेशी मालावर बहिष्कार होय या दृष्टिकोनातून अनेक स्त्रियांनी सूतकताई करण्यास सहभाग घेतलेला होता.[7]

सारांश

औद्योगिक, राजकीय, सामाजिक, नैतिक किंवा सांपत्तिक यांपैकी एक व अनेक किंवा सर्व दिशेने विचार केला, तरीही स्वदेशी चळवळीची आवश्यकता व उपयोग ही पूर्णपणे सिद्ध होतात, ही गोष्ट आता सर्वांच्या प्रत्ययास आली आहे. स्वदेशीचा विचार हा स्वातंत्र्याचा कृतीशील हुंकार होता. मात्र स्वराज्य मिळाल्यानंतर 74 वर्षा नंतरही स्वदेशी चळवळ अजून गतीमान करण्याची गरज निर्माण झाली आहे. अगदी जागतिकीकरण आणि खुल्या अर्थव्यवस्थेचे गोडवे गाता नाही स्वदेशी ही संकल्पना अजून आवश्यक ठरते आहे. स्वराज्याच्या काळात देशाची उभारणी करताना आत्मनिर्भर भारत हा विचार लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी कल्पनेचाच कालसुसंगत अविष्कारआहे हे लक्षात घेतले पाहिजे. या चळवळीत मुसलमान शेतकऱ्यांच्या पाठिंबा मिळाला नाही. स्वदेशी चळवळीमध्ये परिणामकारक संघटना व पक्ष यंत्रणा यांचा अभाव होता. स्वदेशी उद्योग अधिक सक्षम व्हावेत म्हणून स्वदेशीचा आपण जाणीव पुर्वक स्वीकार केला पाहिजे. समाज धुरीणांचा स्वदेशीचा आग्रह आणि आधुनिक तंत्रज्ञानाने प्रभावित झालेले तज्ञ यांची मते परस्पर विरोधी असल्याने व सरकारने उदारीकरणास उदार आश्रय दिल्याने सर्व सामान्य माणूस पुरता गोंधळून गेला आहे व प्रवाह पतिताप्रमाणे नव्या तंत्रज्ञानाच्या भुलभलैयात आपले स्वत्व व हित विसरलाआहे. समाज सुधारकांनी स्वदेशीचा पुन्हा नारा द्यावा आणि तशी सामाजिक चळवळ पुन्हा सुरू करावी असे वाटते.

ISSN 2231 4342

संदर्भसूची:-

1) गोखलेआर. एम. भारताचा आर्थिक इतिहास,भाग 1, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पान नं.82

2) ग्रोवरबीएल, बेल्हेकरएन के, आधुनिक भारताचा इतिहास, एस चंदआणि कंपनी, रामनगरनवी दिल्ली,2003 पान नं522

3) धारूरकर दिलीप,टिळकांची स्वदेशी संकल्पना आणि आत्मनिर्भर भारत, विश्व संवाद केंद्र,पुणे द्वारा प्रकाशित

4)बाळ गंगाधर टिळक‘केसरी’चाअग्रलेख

5) वैद्य सुमन, शांताकोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, द्वितीय आवृत्ती1997 पान नं.4

6)शाह जी बी, वाघ डीएन,भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती2018 पान नं123 ते130

7)https://marathibhau.com/mahatma-gandhi-information-in-marathi/

8) https://vishwakosh.marathi.gov.in/23373/

9) https://maharashtratimes.com/editorial/article/tilak/articleshow/53479629.cms

10) https://www.bbc.com/marathi/india-53611743

11) www.wikipedia.in

12) https://www.sudharak.in/1999/06/2564/

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

दामोदर अच्युत कारेंचा “नन्दादीप”

प्रा. दुर्गा सुदिन जांभळे
फोंडा, गोवा

प्रस्तावना

सर्वांच्या आवडीचा व लोकप्रिय साहित्य प्रकार कोणता असेल तर तो काव्य होय. भारतीय साहित्यातही कविता हा प्राचीन काळापासून प्रचलीत व समृद्ध असा साहित्य प्रकार आहे. कवितेचा जन्म आदिम संस्कृतीच्या मानवाच्या नृत्यातून भाषेच्या पूर्वीच्या अवस्थेत झाला म्हणजे कविता ही गीतातून उत्क्रांत पावली आणि त्यातूनच कवितेचा जन्म झाला. मराठी साहित्यात काव्याचा प्रारंभ मुकुंदराज यांच्या विवेकसिंधूपासून मानला जातो. महदंबा, ज्ञानेश्वर,नामदेव, रामदास,तुकाराम, एकनाथ, इत्यादी संतानी आपल्या काव्यातून जनप्रबोधन केले. बरेच पंथ निर्माण झाले, प्रवाह आले, वेगवेगळे वळण मिळाले व साहित्यात आमुलाग्र बदल झाला त्यानंतर इंग्रजांचे आगमन याचाही बराच परिणाम साहित्यात झाला.आज बहुतांशी व्यक्ती आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी कोणत्याही साहित्यप्रकाराची निवड करतात पण कविता हा प्रकार जास्त लोकप्रिय आहे.

या शोधनिबंधात दामोदर अच्युत कारे यांच्या ‘नन्दादीप’ या काव्यसंग्रहाचा समिक्षात्मकरित्या ऊहापोह करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

इथे कविते विषयीच थोडक्यात स्वरुप व व्याख्या समजून घेणे अगत्याचे आहे.

कविता : स्वरुप व व्याख्या

‘लुडविंग विटगिन्स्टाइन’ या तत्वज्ञानाने म्हटले की, या संकल्पनांची एक वेगळी व्यवस्था करावी लागते त्यांने ‘खेळ’ ही संकल्पना घेऊन असे स्पष्ट केले की, कार्ड गेम्स, बोर्ड गेम्स, बॉल गेम्स आणि आलंपिक गेम्स यातून खेळाचे प्रकार स्पष्ट होतात.

कविता हा वाङ:मय प्रकार आदिमकालापासून आला आहे. कवितेची संकल्पना विशिष्ट काव्यपरंपरेत घडते. कवितेचा एक साहित्य प्रकार म्हणून विचार करताना,कविता या वाङ:मय प्रकाराचे लेखन अनेकविध प्रकारे केले गेले विविध अभ्यासकांनी कवितेसंदर्भात मतमतांतरे मांडली,कवितेचे सत्व म्हणून एक सूत्र विशेष वा काही सूत्रांचा,विशेषांचा संच दाखविणे अशक्य आहे. यासंदर्भाची तुलना करत या सर्वामध्ये समान असे एक गुणवैशिष्ट्य वा अश्या गुणवैशिष्ट्यांचा समुच्चय नाही तरीही या सर्वाचा ‘खेळ’ या एकाच संज्ञेने निर्देश करतो यासाठी विटगिन्स्टाइनने कुलसाम्याचे प्रतिमान योजले. म्हणजेच एकाच कुळात जन्मलेल्या पाच भावंडामध्ये कोणतेही एक समान सत्व नसून ते एकाच कुळातील आहेत अशी ओळख वेगवेगळया साम्यभेदात्मक नात्यांनी

अशी पटते, तशीच ती या प्रकारच्या संकल्पनेने निर्देशित केल्या जाणाच्या वस्तूंमध्ये असलेले साम्यभेदात्मक नाते पाहूनएकाच वर्गातील आहेत अशी ओळख पटते.

कोणत्याही साहित्यप्रकाराची व्याख्या ही परिपूर्ण असते असे सांगता येत नाही अनेकदा अव्याप्ती आणि अतिव्याप्तीची सदोषता असू शकते. काव्याच्या व्याख्या अनेकांनी आपापल्यापरीने केल्या आहेत त्या अशा-

पौर्वात्य साहित्यकारांच्या काव्यविषयक व्याखा

१. शब्दार्थौ सहितौ वक्रकविव्यापारशालिनि । बन्धे व्यवस्थितौ काव्यं तद्विदाल्हादकारिणि ।।

(सहृदय रसिकांना आल्हाददायक अशा कवीच्या विदग्ध अथवा वक्रोक्तीपूर्ण पदबंधामध्ये योजिलेले शब्दार्थ म्हणजे काव्य) — **कुंतक**

२. शब्दार्थौ सहितौ काव्यम् ॥(शब्द आणि अर्थ यांचे सहितत्व म्हणजे काव्य) - **भामह**
३.ननु शब्दार्थौ काव्यम् ॥ (खरोखर शब्द आणि अर्थ म्हणजेच काव्य)- **रुद्रट**

४.रीतिः आत्मा काव्यस्य ॥ (रीती म्हणजे विशिष्ट गुणांनी युक्त अशी पदावली, हाच काव्याचा आत्मा होय) - **वामन**

५. शरीरं तावदिष्टार्थव्यवच्छिन्ना पदावली ॥ (इष्ट अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजे काव्यशरीर) - **दण्डी**

६. काव्यम् ग्राह्यम् अलंकारात् । सौंदर्यम् अलंकारः ॥(काव्य अलंकारामुळेच ग्राह्य होते ; सौंदर्य हाच अलंकार होय.) - **वामन**

७. तत् अदोषौ शब्दार्थौ सगुणौ अनलंकृती पुनःक्वापि ॥(दोषरहित , गुणयुक्त,क्वचित स्फुट अलंकाररहित शब्दार्थ म्हणजे काव्य.) - **मम्मट**

८.वाक्यम् रसात्मकम् काव्यम् ॥(रसात्मक वाक्य म्हणजे काव्य होय.) - **विश्वनाथ**

९.शब्दार्थौ सहितौ काव्यम् ॥(शब्दार्थाचा यथोचित समभाव म्हणजे काव्य) - **राजशेखर**

१०. रमणीयार्थप्रतिपादक: शब्दः काव्यम् ॥(रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारा शब्द म्हणजे काव्य होय) - **जगन्नाथ**

११.ध्वनी हाच काव्याचा आत्मा होय. - **आनंदवर्धन**

ISSN 2231 4342

पाश्चिमात्य साहित्यकारांच्या काव्यविषयक व्याखा

१."The Language of the imagination and the passion"

(काव्य ही कल्पना आणि भावना यांची भाषा होय)- **हॅजलिट**

२." The best words in the order" (उत्तम क्रमात विणलेले उत्तम शब्द म्हणजे काव्य होय)- **कोलरीज**

३. "The art of producing pleasure by the just expression of imaginative thought and feeling in metrical language. ("छंदोबध्द भाषेत कल्पनारम्य विचार आणि भावना अभिव्यक्तीने आनंद उत्पन्न करणारी कला

म्हणजेकाव्य होय.) - **कोर्टहाप**

४."The rhythmic creation of beauty" (सौंदर्याची लयबध्द निर्मिती म्हणजे काव्य)-**एडगर ॲलन पो**

५.मानवी शब्दांच्या झेपेची अत्युच्च शक्यता दाखविणारे अतिशय रमणीय आणि परिपूर्ण असे उच्चारीत म्हणजे काव्य होय -**अर्नोल्ड**

६. " The spontaneous overflow of powerful feelings" (उत्कट भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार म्हणजे काव्य होय.)-**वर्डस्वर्थ**

काव्यविषयक आधुनिक व्याखा

१. हृदय संवेद्द अर्थ आणि रसाळ तालबध्द समपर्क शब्दयोजना पाहिजे. हि दोन्ही जेथे आहेत ते काव्य.- **पटवर्धन**

2. प्रतिमांची सेंद्रीय रचना म्हणजे कविता होय. - **सुधीर रसाळ**

. कविता ही सुघटीत भाषिक कृती असते आणि भाषा ही शब्दामधील अर्थाच्या संबंधाची संरचना असते कारण ती तपशिलाची मर्मे किंवासमग्रतेचे निष्कर्षच असते. कवितेतील शब्दांना पराकोटीची जिवंतता प्राप्त होते कवितेच्या शब्दांच्या वाट्याला इतर साहित्यप्रकारामधील शब्दापेक्षा फार निरळी भूमिका येते.विश्वविराटाची मर्मे कवितेला शक्य तेवढ्या कमी शब्दामधून मांडायची असतात.-**डॉ. यशवंत मनोहर**

वरील सर्व कवितेच्या व्याख्या वरुन काव्याची परिभाषा कशी बदलत गेली आहे याचा अंदाज येतो.

कवितेची वैशिष्ट्ये

१.आदिमानवाने संवेदना ,शब्द, कल्पना जाग्या केल्या त्यामुळे विचार भावना ,स्मृती हे कवितेचे मूलद्रव्य बनले.

 ISSN 2231 4342

२. कविता ही पद्यातून साकार होत असल्याने तिच्या मुळाशी भाषेतील ध्वनीची रचना व लयबध्दता असते.

३. कविता ही लय आणि शब्द घेऊन अवतरली आहे.

४.काव्यधर्म हा कवितेचा एकनिष्ठ धर्म आहे.

५.कवितेत प्रतिक, प्रतिमा, रुपक व शब्दाची सर्जकता असते.

६.ज्या भाषेत कवितेची रचना असेल त्या भाषेतील नियम आणि व्याकरण तिला पाळावे लागतात.

७.कविता अलंकारयुक्त असते, तिच्यात गण, वृत्त, छंद, मात्रा इ.असतात.

८.आधुनिक काळात ती मुक्तछंदात अवतरली आहे.

९. कवितेत लयबध्दता,सुचकत्व,अनेकार्थता,अल्पाक्षरत्व,व्यापक जीवनानुभव, कालातीत वर्तमान, सेंद्रिय एकात्मता व संवेधता इत्यादी घटक आहेत.

१०. कवितेचे कथाकविता, भावकविता व भाष्यकविता असे तीन प्रकार आहेत.

वरील कवितेच्या स्वरुप,वैशिष्ट्ये व व्याख्या पाहून कविता म्हणजे काय व ती कशी असते याचा अंदाज येतो. आता दामोदर अच्युत कारे यांच्याविषयी व 'नंन्दादीप' या काव्यसंग्रहाचा परीचय करुन घेऊयात.

दामोदर अच्युत कारे —परीचय

मराठी गोमंतकीय कवी. हे बा.भ. बोरकरांचे समकालीन होते. या दोघांचे सौहार्द होते. समांतरपणे त्यांची काव्यनिर्मिती चाललेली होती. गोवा त्याकाळात पोर्तुगीज राजवटीखाली होता. परिस्थिती सर्वतोपरी प्रतिकूल होती. मराठी भाषेवर अनेक बंधने होती. अशाही काळात दा. अ. कारे यांनी मराठीत काव्यनिर्मिती केली हे विशेष. यांचा जन्म काकोडे येथे ४ मार्च १९०९ रोजी झाला. ते अवघे तीन वर्षाचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले व चौदाव्या वर्षी त्यांना पितृवियोग सहन करावा लागला. मराठी प्राथमिक शिक्षणानंतर त्यांचे पोर्तुगीजमधून लिसेवच्या तिसऱ्या वर्षापर्यंत शिक्षण झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांना शिक्षण घ्यावे लागले. मडगांव हे त्या काळात गोमंतकातील एकमेव राजकीय, सामाजिक, आणि सांस्कृतीक चळवळीचे केंद्र होते. एकीकडे प्रचलीत राजकीय आणि सामाजिक विचारप्रवाहाशी त्यांचा परिचय होत होता तर दुसरीकडे नियतकालिकांतून प्रसिध्द होणाऱ्या त्या काळातील नामवंत कवींच्या कविता त्यांच्या वाचनात येत होत्या. विशेषतः केशवसुतांच्या कवितेतील क्रांतीप्रवणता, समतावाद, आणि मानवतावाद,बालकवींची भावकोमलता,गोविंदाग्रजांच्या कवितेतील भावनांचे नाट्य,ना. वा. टिळकांच्या कवितेतील ऋजुता इत्यादींचा प्रभाव कारेंच्या मनावर झाला व ते काव्य लेखनास प्रवृत्त झाले.

 ISSN 2231 4342

दा.अ. कारेंच्या कविता 'लोकशिक्षण', 'प्रतिभा', 'ज्योत्स्ना', 'वागीश्वरी', 'पारिजात' आणि 'रत्नाकर' या नावाजलेल्या नियतकालिकांतून प्रसिध्द झाल्या. कवितेशिवाय त्यांनी काही लघुनिबंध लिहिले. थोडेफार समिक्षात्मक आणि संशोधनात्मक लेखनही केले आहे. कारे हे जुन्या पिढीतील कवी असले तरी कवितेतील नव्या प्रवाहाकडे स्वागतशील दृष्टीकोनातून ते पाहत होते. कारे यांच्या सदभिरुचीसंपन्न व्यक्तिमत्वाचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांची समाजिक बांधिलकी आणि शिक्षणाविषयी आस्था होय. त्यामुळेच गोव्यातील मडगावच्या समाजसेवा संघाच्या महिला आणि नूतन मराठी विद्यालयाच्या व्यवस्थापनाशी अनेक वर्षे ते निगडीत होते. गोमंतविद्या निकेतन या नामवंत संस्थेशी त्यांचा अत्यंत निकटचा संबंध होता. गोवामुक्तीनंतर १९६२ साली पणजी येथे भरलेल्या ११ व्या "गोमंतक साहित्य संमेलनाचे" स्वागताध्यक्षपद त्यांनी भूषविले. ते मितभाषी व विनम्र असून प्रसिध्दीपेक्षा कुटुंबाकडे त्यांचे लक्ष असायचे त्यांनी गोव्यात छापखाना घातला पण या कामात लागल्यामुळे त्यांचा दुसरा काव्यसंग्रह तयार होऊ शकला नाही. "काही कारणामुळे म्हणावी तशी साहित्यसेवा माझ्याकडून घडली नाही" अशी खंत त्यांनी गोमंतक साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्ष भाषणाच्यावेळी व्यक्त केली. अश्या विनम्र, मितभाषी, भावनाशील, संयमी, संवेदनशील कवीचे निधन २३ सप्टेंबर १९८५ रोजी मडगांव येथे झाले.

दामोदर अच्युत कारेंच्या काव्याची गुण वैशिष्ट्ये

'नन्दादीप' हा सतत तेवत राहणारा दिवा आहे. महाराष्ट्र व गोमंतक या भूप्रदेशातील सांस्कृतीक अनुबंध लक्षात घेऊनच मडगांव येथे १९३० मध्ये "महाराष्ट्र साहित्य संमेलन" प्रा. वामन मल्हार जोशी यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटात संपन्न झाले. याचा परिणाम म्हणून की काय १९३४ साली दा.अ. कारेंचा "नन्दादीप" हा पहिला काव्यसंग्रह प्रसिध्द झाला. या काव्यसंग्रहाला प्रा. वामन मल्हार जोशी यांनी प्रस्तावना लिहिली यात दुमतच नसावे. या दोन प्रदेशातील वाङ्मयीन सौहार्दाचे ते द्योतक होते. प्रा. वामन मल्हार जोशी यांनी "नंन्दादीप" या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत कारेंच्या काव्याची गुण वैशिष्ट्ये सांगितली आहेत ती थोडक्यात पाहूयात.

दा. अ. कारेंच्या काव्याचा पहिला गुण म्हणजे भाषा शुध्द, सरळ व प्रसादयुक्त होय. त्यांनी व्याकरणाकडे कधीच दुर्लक्ष केले नाही. कारेंच्या काव्यात उपमा व उत्प्रेक्षा हे अलंकार प्राचुर्याने सापडतात. अभिप्रेत अर्थ ते लिलयेने व मधुरतेने व्यक्त करत असत. ते गोमंतकातील कवी असल्यामुळे काही गोमंतकीय शब्दांची सरमिसळ काव्यात झालेली पहावयास मिळते. उदा. बावता(कोमेजता), साळीक(कमळ) इत्यादी.तसेच त्यांच्या कल्पनाविलासांना सुरम्य व सात्विक भावनांची जोड मिळाल्यामुळे त्या रसिकांना विशेष आल्हाददायक झाल्या आहेत. त्यांच्या काव्यातील दुसरा गुण म्हणजे भाषाप्रभुत्व व कल्पनाविलास हा होय. भाषाप्रभुत्व व कल्पनाविलास ही नेहमी कोमल व सात्विक भावनांशी निगडीत असतात. त्या सर्व कोमल व सुसंस्कृत आहेत आणि सगळ्यात महत्वाचे अधिक म्हणजे असे की, त्या जितक्या नाजूक आहेत तितक्याच सफाईची त्यांची भाषा असून भावनातील सुक्ष्म छटा यथार्थतेने परिणामकारक रितीने व अर्थात मधुरतेने व्यक्त करण्याचे तिच्यात

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

बरेच सामर्थ्य होते. यावरुन त्यांच्या कवित्वाची कल्पना येते. त्यांच्या काव्यातील तिसरा गुण म्हणजे अकृत्रिम निसर्गभक्ती. प्रत्येक कवीचा निसर्गाकडे बघण्याचा कल वेगवेगळा असतो. काहीजण सृष्टीतील कोमल व कठोर, सुंदर व कुरुप दृष्ये बारकाईने पाहून त्यांची यथार्थ वर्णने करण्यातच आनंद मानतात तर काही मानवी भावनातील, स्वभावातील किंवा प्रसंगातील विशेष छटा चित्रित करताना सृष्टीतील देखाव्यांचे दाखले उपयोगात आणतात पण कारेंच्या "नन्दादीप" काव्यसंग्रहात मात्र सर्व प्रकारची उदाहरणे सापडतात. त्यांच्या सॄष्टीविषयक उल्लेखात त्यांची सुक्ष्म निरीक्षणशक्ती दृगोचर होते. स्वानुभवाचा सुवास येतो व अकृत्रिम मोकळेपणाचा खुला आवाज ऐकू येतो. काव्यात प्रतिबिंबीत झालेल्या बव्हंशी अकृत्रिम छटा आहेत पण त्यात अलौकिक किंवा अधिकाराचा दर्प नाही. गोमंतकातील वनश्री त्यात दिसून येते पण प्रादेशिक दुराभिमानाचा गंध नाही.

कारे यांच्या काव्यातील आणखी एक महत्वाचा गुण सांगावयाचा म्हणजे त्यातील अंतःकरणपूर्वकता. जगातील अनेक व विविध प्रकारची दृष्ये पाहून त्यांचे मन हेलावते व एकाअर्थी त्यांच्याशी सह-कंप पावते आणि अशा सहकंपातच त्यांच्या कवितांचा उगम झालेला आहे. त्यांच्यातला विशेष म्हणजे मनाला जे खरेखुरे वाटते, हृदयात जे कंप पावले तेच त्यांच्या काव्यात प्रतिबिंबीत झाले आहे पण ती सत्यगर्भ आहे म्हणून शिष्टसंमत होण्यासारखी व आनंददायी आहे.

'नन्दादीप' गोवा-महाराष्ट्राच्या कोंदणातील अनमोल हिरा

'नन्दादीप' या काव्यसंग्रहाला प्रा. वामन मल्हार जोशी यांनी प्रस्तावना लिहिली असून सुप्रसिध्द चित्रकार रघुवीर चिमुलकर यांचे निराळ्या शैलीतील कलापूर्ण मुखपृष्ठ लाभले आहे. 'नन्दादीप' हा काव्यसंग्रह १९३४ ला प्रसिध्द झाला.

'नन्दादीप' या काव्यसंग्रहात एकूण अठ्ठावन्न कविता आहेत. साधारणतः १९२५ ते १९३३ या दरम्यानच्या काळातील या कविता आहेत म्हणजे कारे तेव्हा अवघे सोळा वर्षाचे होते. एवढ्या कमी वयातील त्यांच्या प्रतिभेची झेप दिसते ती स्तिमित करणारी आहे. 'नन्दादीप' मधील "हृदयमंदीर" ही त्यांची पहिली कविता असून ३० सप्टेंबर १९२५ ची ही रचना आहे आणि ही रचना वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांना स्फुरली.

हे प्रेमभक्तीचे स्निग्ध दीप उजळील

दिव्यता-प्रभेनें मन्दिर कोन्दूनी गेलें ।

गुम्फिली सुनिर्मल भावसुमांची माला

अणुअणूंत आदर-सौरभ हा दरवळला।

हा अंतःकरणातील ॠजू भाव त्यांनी त्यातून व्यक्त केला आणि आपल्या काव्यारंभाला सुरुवात केली.

ISSN 2231 4342

'नन्दादीप' मधील बहुतांश कविता निसर्गवर्णनपर आहेत. या संदर्भात 'उषःकाल', 'सागरास','पावसाळ्यातील दृष्य', 'शिखरावरुन', 'चांदणे','हिमालयास', 'प्रभात-पूजा', 'बिजेची कोर', 'दुपार', 'सृष्टीच्या अंगणात','भाताचे रोप', 'चंद्रकिरण', 'गोमंतकगीत' या कवितांचा उल्लेख करावा लागेल. 'जीवनौघ' या कवितेत निसर्गानुभूती आणि जीवनानुभूती यांची एकात्मता आढळते. 'उषःकाल' या कवितेतही निसर्गलय यांची समतानता साधली आहे. कवीने गोमंतकातील निसर्ग तन्मयतेने न्याहाळला आहे आणि तितक्याच उत्कट मनोवृत्तीने चित्रमय शैलीत त्याचे वर्णन केले आहे.

पूर्व दिशेला उभा सह्यागिरी आशिर्वच द्याया ।उंच उचलुनी भव्य आपुल्या शिखरकरांना या ।

यात संपूर्ण गोमंतकातील निसर्गरम्य वनश्रीचे वर्णन आले आहे.

'गोमन्त-देवी' हे वयाच्या विसाव्या वर्षी लिहिलेले गीत एवढे लोकप्रिय झाले की गोव्यातील शाळामधून ते प्रार्थनेच्या वेळी म्हटले जात असे, त्यामुळे नंतरच्या पिढीला ते मुखोदगद झाले होते.

स्मरुनी गोमन्त-देवी। मुर्ती सौख्यदा

प्रेमभरें हृदय भरे, नमन तवं पदा।

अशी ही अतिशय सुंदर कविता आहे. 'बिजेची कोर' यामध्ये कवीला निळ्या आभाळात तारकामध्ये शोभून दिसणारी चंद्रकोर पाहून ती जुईच्या वेलीवर फुलांमध्ये कळी शोभून दिसावी तशी सौंदर्यशाली रुप प्रकट होताना दिसते.'सागरास' या कवितेत कवीला असीम,अथांग सागर पाहून मानवी हृदयाचीक्षुद्रता जाणवते. 'चांदणे' या कवितेत इंदू उदयाला येताना चारुता घेऊन आलेला आहे असे कवी म्हणतो. या कवितेतील भावनामय अत्यंत आल्हाददायी आहे. 'हिमालयास' या कवितेत केवळ निसर्ग वर्णन नाहीतर त्याच्या बाह्यसौंदर्याबरोबर तो भारतीय संस्कृतीचा मानदंड आहे असे त्यांना वाटते. गोमंतक परकीय राजवटीत असताना राष्ट्रवादी विचारांचे बीजारोपण कवीने केलेले आहे. तत्कालीन तरूण पिढीच्या स्पंदनांचा कानोसा हिमालयास या कवितेतून घेतला आहे.

कारे यानी मोजक्याच प्रेम कविता लिहिल्या आहेत 'अलक्षित प्रेम','मधुर तृप्ती', 'लाजरी', 'संगीत परिणती', 'यौवनजागृती'आणि 'सख्या रे ये आता धाऊन' या कवितात प्रीतीविश्वातील मुग्ध भावनांचा संयत स्वरात कवीने आविष्कार केला आहे. अलक्षित प्रेम या कवितेतील नायक उदगारतो,

स्पर्शे ओझरत्या तनू लहरली हृत्सिन्धू हेलावुनी

माझे हृद् गद,-वीज ती न तुज का नेली तये वाहूनी?

या सार्यात न मूक भाव दिसले माझे तुला का कधी ?

 ISSN 2231 4342

व्हावे नष्ट हृदी अलक्षितच ते, योजी असें कीं विधी?

शरीर संवेदनापेक्षा मानसभाव प्रकट करणे हे या कवीचे वैशिष्ट आहे.

'आत्मज्ञान'या कवितेत स्वातंत्र्याविषयीची आकांक्षा कवी उत्कटतेने व्यक्त करतो. कारेंच्या कवीताना नुसत्या निसर्गवर्णनपर कविता म्हणणे हा त्यांच्यावर अन्याय आहे.'आत्मज्ञान' या कवितेमध्ये ते लिहितात,

नेत्रांतुनी सांडू न पाणी; धार चिती सोडून

स्वातंत्र्यदेवीला करुं तनुचित्तवित्त समर्पण

जावू जळोनी हीण सारे, हेम होवो उज्ज्वल

ज्वाला-दले फुलुनी डुलो यज्ञानलाचे उत्पल गुलाम ।

ही १९२९ साली म्हणजे प्रत्यक्ष सालाझारशाहीत केलेली कवीता आहे.

'महात्म्यास' या कवितेत गांधीजींच्या जीवित कार्याचा मुक्तपणे गौरव केला आहे.

मुक्त कराया मायभूमी जी जाहली गुलाम

मांडिसी अभिनव संग्राम

इथे अनत्याचार झुंजतो भयकर शस्त्रांशी

अहिंसा घोर प्रहारांशीं

बंदूकांचा प्रतिकार इथें करि निधडी छाती

खवळल्या सत्तेचा शांती!

मानवांत नच, लढा असे हा जड-चतन्यांत

बघे जग, कोण करी मात !

'अन्तरींची खळबळ' या कवितेतून कवीनी आपल्या आईविषयीची सय,सल, हुरहूर याविषयी लिहिले आहे.'कविमित्रास' या कवितेत काऱ्यांनी आपल्या व बोरकरांच्या व्यक्तिमत्वातील फरकही नमूद केला आहे.

'जीवन विराम' या कवितेत जीवन मम सहज शांत होवो हें अनन्तांत !

मृदू करे उजळिला त्वन्मन्दिरीं नन्दादीप

राहो तेवत सन्तत तव चरणांसमीप

नको तेजाची झळाळी जननेत्र दिपवाया

ठेवीहृदयी ओलावा ज्योत पायीं जागयाया

हा भाव कवीच्या ठायी आहे.

या कवितासंग्रहातील ‘जीवन विराम’ ही शेवटची कविता १९३३ मधील आहे.

डॉ. सोमनाथ कोमरपंत यानी आपल्या लेखात म्हटले आहे की "नन्दादीपमधील काव्यसाधना दा. अ. कारे यांनी वृत्तीगांभीर्याने केली होती". हे खरेच आहे. त्यांचे अक्षरगणवृत्तांवरचे प्रभुत्व तोलामोलाचे होते.या वृत्ताचा त्यांनी आपल्या रचनासाठी सर्रास उपयोग केला आहे. ‘भूपती’,’चन्द्रकांता’, ‘फुलवेल’,‘अवनी’, ‘नवती’, ‘मनमोहन’, ‘दिण्डी’, ‘संगम’,‘मोहिनी’, ‘सूर्यकांत’,‘प्रणयप्रभा’,‘रसना’, ‘बालानंद’, ‘साकी’, ‘माधवकरणी’, ‘गोविंद’,‘मंजरी’,‘कोकिला’, ‘मुद्रिका’,व‘स्वर्गंगा’ ही जातीवृत्ते त्यांनी उपयोजिली आहेत. ओवी व छंदाचाही उपयोग केला आहे.

या कविता संग्रहात आत्मभाव प्रकट करणाऱ्या ‘अकारण’,‘हुरहूर’ आणि ‘विसावा’ या कविता आहेत्.

नन्दादीप हा शांत, संयत भावनांचा नितांत रमणीय आविष्कार आहे.

समारोप

‘नन्दादीप’ हा दामोदर अत्चुत कारे यांचा एकमेव पण अत्त्युच्च दर्जाचा काव्यसंग्रह आहे. त्यांचा दुसरा काव्यसंग्रह प्रसिध्द होऊ शकला नाही कारण त्यानी छापखाना टाकला आणि त्यातच ते व्यस्त राहू लागले. काही कविता नियतकालिकांमधून प्रसिध्द झाल्या शिवाय काही कविता गहाळ झाल्या. वर लिहिल्याप्रमाणे कारे यांच्या कवितांची वैशिष्ट्ये काही औरच आहेत याच कारण म्हणजे, केशवसूत्, बालकवी, नारायण टिळक ,गोविंदाग्रज व इतर कवींच्या कवितेचा जरी कारेंच्यावर प्रभाव पडला असला तरी त्यांनी कोणाचेच अनुकरण केले नाही. कारेंनी अलंकार, ओवी, छंद, वृत्त याद्वारेच काव्यालेखन केलेलं आहे व्याकरणाचा दुरुपयोग त्यांनी कोठेच केलेला नाही. कारेंच्या कवितेची भाषा ही संस्कृतप्रचूर जरी असली तरी ती रसिकांना समजण्यासाराखी आहे. ’नन्दादीप’ मधील कवितेतील भावना सात्विक,कल्पनाविलासी, अकृत्रिम निसर्गभक्ती, आणि अतःकरणपुर्वकता या गुणांनी युक्त आहेत. असा निर्वाळा प्रा. वामन मल्हार जोशी यांनी दिला आहे. या कविता संग्रहात निसर्गवर्णनपर कविता अधिक आहेत म्हणून त्यांना निसर्गकवी म्हणने योग्य ठरणार नाही. निसर्गासोबत काही मोजक्या प्रेम कविता,स्वातंत्र्यविषयक कविता, आत्मभाव प्रकट करणाऱ्ा कवितांही लिहिल्या आहेत. गोव्यातील निसर्गाचे बारकाईने निरीक्षण करून तरल व सुक्ष्म भाव आपल्या कवितात साकार केले आहेत.

 ISSN 2231 4342

'नन्दादीप' या काव्यसंग्रहात त्यांच्या अनेक भावभावनांचे दर्शन घडून येते. आजही हा काव्यसंग्रह अजरामर व अनमोल आहेच पण तो सतत व मंद तेवतो आहे म्हणूनच'नन्दादीप' हे शीर्षक सार्थ ठरते.

संदर्भ ग्रंथ

- नन्दादीप - दामोदर अच्युत कारे - सं. परेश वासुदेव प्रभू
- कविता संकल्पना, निर्मिती आणि समीक्षा - वसंत पाटणकर
- काव्यशास्त्रप्रदीप — डॉ. स. रा. गाडगीळ
- कविता आणि प्रतिमा — सुधीर रसाळ
- कविता - विकीपिडीया
- दामोदर अच्युत कारे - मराठी विश्वकोश
- बीजभाषाण आंबेडकरी काव्यसंगीती —डॉ.यशवंत मनोहर

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

अप्पासाहेब नागदकर यांचे शैक्षणिक कार्य

डॉ. भानुसे कारभारी लक्ष्मण
इतिहास विभाग
शिवाजी महाविद्यालय कन्नड

प्रस्तावना:-

शिक्षण हा मूल्यवान शब्दशिक्षया संस्कृत शब्दापासून आलेला आहे. शिक्षणाचा अर्थ लक्षात घेता असे निष्पन्न होते की शिक्षण म्हणजे ग्रहण करणे, आत्मसात करणे,स्वीकार करणे,वाटचाल करणे,मार्गक्रमण करणे, किंवा प्रगती व विकास करणे होय. शिक्षण या प्रक्रियेमुळे संस्कार आणि सत्प्रवृत्तीला प्रोत्साहन मिळते. शिक्षण म्हणजे माणसाला अज्ञानातून बाहेर काढण्याचा मार्ग होय. माणसाला जीवनात सुगंध, आनंद, कुशलता ,समृद्धी तसेच राष्ट्रीय कार्यकुशलता वजीवनाचा मार्ग सुखकर करण्याचा एक संस्कारच होय. म्हणूनच स्वामी विवेकानंद म्हणतात" शिक्षणाने माणूस जीवनात आपल्या पायावर उभा राहू शकतो ते खरे शिक्षण होय" तर महर्षी वि. रा. शिंदे म्हणतात आयुष्यातील अडचणी सोडवण्यात समर्थ असते ते म्हणजे शिक्षण" तर शिक्षणाचा खरा अर्थ सांगताना महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात विद्या विना मती गेली। मती विना नीती गेली। नीती विना गती गेली। गती विना वित्त गेले। वित्ता विना शूद्र खचले। इतके अनर्थ एकाअविद्येने केले। यावरून आपणास असे लक्षात येते की माणसाच्या जीवनात शिक्षण किती महत्त्वाचे आहे शिक्षण म्हणजे मानवी जीवनाच्या विकासाताल किंवा समाज परिवर्तनातील प्रमुख साधन होईल. तरी सुद्धा भारतातील शिक्षणपद्धतीचा जर विचार केला तर प्राचीन शिक्षणपद्धती ही वेगळी होती. प्राचीन काळात गुरुकुल शिक्षणपद्धती अस्तित्वात होती तर मध्ययुगात त्याची पद्धत वेगळी होती आणि आधुनिक काळात किंवा 21 व्या शतकातील शिक्षणपद्धती ही वेगळी होती. अप्पासाहेब नागदकर यांचे शैक्षणिक कार्य अभ्यास करताना त्यांच्या समकालीन नेतृत्वाचा आणि शैक्षणिक संस्था प्रचलित शिक्षण पद्धती याचा विचार करणे अतिशय गरजेचे आहे. ब्रिटिश राजवट भारतात प्रस्थापित असताना महर्षी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वामी विवेकानंद, महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, इत्यादींच्या शिक्षण विषयीचे विचार आणि त्यांच्या विचाराचा व तत्कालीन नेत्यांचा शिक्षणा विषयी असलेला प्रभाव या दोन्ही गोष्टी अतिशय महत्त्वाच्या वाटतात. १८८२ ला लॉर्ड रिपन यांनी स्थापन केलेल्या भारतीय शिक्षण आयोगा समोर महात्मा फुलेंनी शिक्षणाच्या संदर्भात जो आग्रह धरला तो अतिशय महत्त्वाचा होता. महिलांना शिक्षण मिळावे मागास वर्गातील जाती-जमातींना शिक्षण मिळावे मुस्लिमांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि विशेष म्हणजे ग्रामीण भागात शिक्षणाची मुळे रुजवावी कारण भारतीय समाजात जरी विषमता होती तरी, ती दूर झाली पाहिजे. आणि सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून जर समाजाला मुक्त करायचे असेल, तर शिक्षण हाच प्रभावी मार्ग होता. त्यामुळे या सर्व गोष्टीचा विचार करूनच मा.आप्पासाहेब नागदकर यांनी केलेले शैक्षणिक कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. आप्पासाहेब यांचे शैक्षणिक कार्य विचारात घेता कन्नड व औरंगाबाद शहराचा भौगोलिक विचार करणं अतिशय

महत्त्वाचं वाटतं. कन्नड तालुकात सावंिध्य पर्वत रांगेत वसलेला तालुका आहे. त्याची रचना स्वर्ग, मृत्यु, व पातळासारखी आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणात बहुल भाग असल्यामुळे मोठ्याप्रमाणात आदिवासी राहतात. त्यामध्ये बंजारा बिल्ल असल्यामुळे एकही शिक्षणसंस्था नव्हती. खरंतर आपासाहेबांवर महात्मा गांधी ,पंडित नेहरू, बाबा आमटे ,कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख,यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यामुळे याच समकालीन महाराष्ट्रात काही शैक्षणिक संस्था उदयास आल्या होत्या. त्यामध्ये रयतशिक्षण संस्था, शिवाजी शिक्षणसंस्था, सरस्वती भुवन शिक्षण संस्था, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, खानदेश एज्युकेशन सोसायटी, मराठा शिक्षण संस्था, किंवा मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ होय म्हणून कन्नड तालुक्यात सुद्धा एखादी शिक्षण संस्था असावी याउद्देशाने सुरुवातीला विनायकराव पाटील आणि त्यांच्या समकालीन सर्व नेत्यांसोबत मराठवाडा शिक्षणप्रसारक मंडळाची स्थापना केली व आपल्या शैक्षणिक कार्यास सुरुवात केली पुढे कन्नड सारख्या दुर्गम भागात खासदार बाळासाहेब पवार माननीय बाबुराव जवळकर रामचंद्र पाटील त्रिंबकराव नलावडे, रामराव अण्णा बहिरगावकर , लक्ष्मण राव मोहिते, यासारख्या मंडळींना सोबत घेऊन छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. व त्यासाठी गावातील स्वतःची जागा देऊन शिक्षणाची मुहूर्त मेढ रोवली. आणि त्याचा पुढे वटवृक्ष झाला म्हणूनच त्यांच्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या पेपरच्या संदर्भाने महत्त्वाचा वाटतो.

जीवन वृत्तांत:-

कोणत्याही व्यक्तीच्या जडणघडणीत त्यांच्या भोवतालची कौटुंबिक व त्यासभोवतालच्या परिसराचा मोठा वाटा असतो. ज्याव्यक्ती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष भेटतात त्यांचा प्रभाव त्यांच्यावर असतोच. माननीय आप्पा साहेब नागदकर यांचा जन्म 16 नोव्हेंबर 1920 रोजी तांदळवाडी जिल्हा जळगाव येथे मामाच्या गावी झाला.ते कुटुंब निर्व्यसनी, सुसंस्कारित,असं शेतकरी कुटुंब होतं. त्यांचे नाव नारायणगिरीजी पाटील असले तरी लोक त्यांना अप्पासाहेब नागदकर या नावाने ओळखत असत. आप्पांचे गाव नागद हे जरी आज सोयी सुविधायुक्त असले तरी, तेव्हा मात्र ते एक छोटेसे खेडेगावच होतं. ते सुद्धा पूर्णपणे मागासलेल होत ते जेव्हा घरात बालपणी वावरत असत तेव्हा त्यांच्या घरात सर्वजाती धर्माच्या लोकांना वावर होता. यामध्ये महार मांग चांभार मुसलमान वडार धनगर भिल्ल ठाकर बंजारा इत्यादी जाती धर्माचे लोक असत आप्पासाहेबांचा जन्म झाला तेव्हा नागद येथून तांदळवाडीला 200 गाड्या त्यांना पाहण्यासाठी गेल्या होत्या असं सांगितले जाते. त्यांचे आजोबा दगडू पाटील व वडील गिरमाजी पाटील आणि आईचे नाव लक्ष्मीबाई होते. विक्रम आप्पासाहेब व मंडाबाई असे तीन भावंडे होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण नागद या गावी झाले. पुढे चाळीसगाव या तालुक्याच्या ठिकाणी ए. बी. हायस्कुलमध्ये पाचवीते दहावीपर्यंतचे शिक्षणपूर्ण झाले. पुढे उच्च शिक्षणासाठी म्हणजे, अकरावी बारावीसाठी त्यांनी औरंगाबादच्या सरस्वती भुवन महाविद्यालय प्रवेश घेतला. व पुढे वकीली शिक्षणासाठी हैदराबाद येथे दोन वर्षे पदवी शिक्षण पूर्ण केले. त्यांनी या काळात अनेक भाषणे ऐकली, विचारवंतांची पुस्तके वाचली, आणि 1942 च्या स्वातंत्र्यसंग्रामातील व हैदराबाद मुक्तीसंग्रामात भाग घेणारे ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते

ISSN 2231 4342

म्हणून त्यांचा उल्लेख होतो. ते सोयगाव कन्नड मतदार संघाचे अकरा वर्षे सलग आमदार होते. 1966 ते 1971 आणि 1971 ते 1977 असा त्यांचा कार्यकाल आहे. या त्यांच्या राजकीय कालखंडात त्यांनी कन्नड सोयगाव मतदार संघाचा शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, व राजकीय कार्यात खूप मोठा आमूलाग्र बदल घडून आणला होता. त्यांच्या काळात 150 च्या वर छोटी-मोठी धरणे, शिक्षण संस्था, एम. एस. ई. बी., बसस्टॅन्ड, वस्तीगृह, जवाहर नवोदय विद्यालय, सिंचन विभाग, प्रशासकीय कार्यालय याची निर्मिती केली. सिल्लोड-सोयगाव जोडणारा रस्ता, कन्नड नागद जोडणारा रस्ता, व सिंचनासाठी मध्यम प्रकल्प म्हणजे, पूर्णा नेव पुर प्रकल्प, व टाकळी अंतुर प्रकल्प होय. किंवा अंबाडी सारखा कन्नड शहराला पाणी पुरवठा करणारा मध्यम प्रकल्प होय. असा त्यांचा थोडक्यात जीवन वृत्तांत सांगता येईल.

आप्पासाहेब नागदकरांचे शैक्षणिक कार्य:-

शिक्षण हे आधुनिक काळातील महत्त्वाची गरज बनलेली आहे. आजच्या देशातील प्रत्येक नागरिकास शिक्षण मिळावे ही खऱ्या जाणकारांची इच्छा असते. तेच आप्पासाहेब नागदकर यांना कायमच वाटत असे. महाराष्ट्रात शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. त्यालाच खरा लोक शिक्षक म्हणतात. अप्पासाहेब नागदकरांनी हयातभर लोक शिक्षणाचे कार्य केले. सत्तेवर येण्यापूर्वी, सत्तेत आल्यानंतर, आणि सत्तेतून दूर गेल्यावर या तीनही परिस्थितीत त्यांनी लोक शिक्षणाचे कार्य केले. ते दीर्घकाल शासन दरबारी असल्यामुळे त्यांना काही शैक्षणिक विचारांचा अनुभव प्रत्यक्ष कार्यात उतरवता आला. त्यासंदर्भात त्यांनी विधानसभेत आपल्या भाषणात काही गोष्टी नोंदविल्या होत्या. ते म्हणाले 1957 ते 58 साला पासून बाराशे रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मोफत शिक्षण देण्याची योजना केल्यामुळे. महाराष्ट्रात सर्व ठिकाणी शिक्षणाचा फायदा मोठ्या प्रमाणात झाला. राज्याचे बजेट पाहिले तर शिक्षणाच्या खर्चावर मोठी तरतूद केली जाते. 1961 ला 23 कोटी 12 लाख रुपयांची तरतूद केली होती. म्हणजे एकूण बजेटच्या 19.5 टक्के एवढी रक्कम होती. 1968- 69 ला 74 कोटी 43 लक्ष रुपयांचे तरतूद होती. म्हणजे एकूण बजेटच्या 20.8 टक्के एवढी रक्कम होती. आणि 1970 - 71 साली 83 कोटी 21 लाख एवढी रक्कम होती. होती म्हणजे ही रक्कम वाढतच गेल्याचे आपल्याला जाणवते म्हणून आजच्या प्रचलित परिस्थितीत शिक्षणावरील जो खर्च आहे किंवा सरकारची जी स्थिती आहे ती लक्षात घेता अतिशय दयनीय अवस्था आपल्याला जाणवते. मात्र त्याला दिल्ली सरकारई-मेल घरात दोन आजच्या परिस्थितीत अपवाद आहे. त्यांनी जास्तीचा खर्च आपल्या बजेटमध्ये शिक्षणावर केलेला जाणवतो. त्यांनी विधानसभेत भाषण करताना म्हटले राज्यातील किती विद्यार्थी आय.पी.एस, आय.ए.एस., परीक्षेला बसतात त्यातील किती विद्यार्थी पास होतात हे प्रमाण फार कमी आहे. यापरीक्षेत ग्रामीण भागातील विद्यार्थी बसले पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. सुरुवातीला मॅट्रिक झालेले विद्यार्थी वर्ग 2 चे अधिकारी होत असत. आणि म्हणून मॅट्रिक झालेल्या विद्यार्थ्यांकडून मॅट्रिकच्या वर्गाला शिकवता येणार नाही म्हणून त्यांनी पदवी शिक्षण असलं पाहिजे असं सुद्धा विधानसभेत सांगितले. यावरून त्यांची शिक्षण विषयक तळमळ, विधानसभेच्या कामकाजातील त्यांची भूमिका, आणि तांत्रिकअडचणी त्यांनी ठामपणे मांडले. आपल्याला

 ISSN 2231 4342

जाणवते की त्यांना कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, महात्मा ज्योतिबा फुले, शाहूमहाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना प्रचलित असलेले शिक्षण हवे होते. खेड्यापाड्यात शिक्षण पोहोचले पाहिजे ही त्यांची तळमळ होती. मराठवाड्याच्या दयनीय शिक्षणाची बाजू त्यांनी विधानसभेत मांडली. ते म्हणाले औरंगाबाद जिल्हापरिषदेसाठी बाराशे शिक्षक पाहिजे तर त्याठिकाणी फक्त ७२ तर दिले जातात. ही टक्केवारी खूपच नगण्य होती. शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी त्यांनी विधानसभेत जो मुद्दा मांडला तो अतिशय महत्वाचा होता. ते म्हणाले पदवीधर शिक्षक हे खेड्यापाड्यात राहायला तयार नसतात. बाहेर कुठेतरी घर घेतात, सहा-सात मैलावरुन प्रवास करतात तेव्हा असे न होता ज्याठिकाणी शाळा त्याच ठिकाणी हौसिंग सोसायटी निर्माण केली पाहिजे. आणि शिक्षकांना घरे दिले पाहिजे. म्हणजे शिक्षकांच्या संदर्भातील जाण असणारे लोकशिक्षक आप्पासाहेब नागदकर होते. शिक्षकांना वेळेवर पगार दिला पाहिजे. तो पगार बँकेत झाला तर त्यासाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी शाळेच्या ठिकाणी बँक असली पाहिजे, आणि ज्या भागात आदिवासी भिल्ल राहतात याठिकाणी वस्तीग्रह असली पाहिजे, मुलींसाठी सुद्धा वस्तीग्रह असली पाहिजे, याच उद्देशाने आप्पासाहेब नागदकर, बाबुराव औराळकर, भाऊराव पाटील, रामराव अण्णा बहिरगावकर, सहकार महर्षी बाळासाहेब पवार, त्रिंबकराव नलावडे, यांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून 1961 साली छत्रपती शिवाजी शिक्षणप्रसारक मंडळाची स्थापना केली. सुरवातीला छोट्याश्या जागेत महाविद्यालय सुरू झालं पुढे त्याचे रूपांतर शिवाजी महाविद्यालय या महाविद्यालयात झाले. 1972 पासून शासनाने महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता दिली. इमारतीचा प्रश्न होता तेव्हा 1972 ते 1975 मध्ये तात्पुरती वर्ग चालवण्यासाठी व्यवस्था केली. त्या साठी संस्थेने 70.907 रुपये खर्च केले. संस्थेचे सेक्रेटरी माननीय आप्पासाहेब नागदकर त्यांच्या काळात शासनदरबारी प्रयत्न करून वीस एकर जमिनीवर संस्थेच्या संस्थापक सदस्यांनी मिळून कॉलेजची नवी इमारत बांधली. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सुद्धा ते वर्षे सदस्य होते 35. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून सुद्धा त्यांनी शिक्षणाचे कार्य चालूच ठेवले होते. त्यांच्या प्रयत्नातून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, आणि जवाहर नवोदय विद्यालय अशी शैक्षणिक कामे ही अविस्मरणीय होती.

शैक्षणिक संस्था:-

आप्पासाहेब नागदकर 35 वर्ष मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य होते. यामंडळाच्या माध्यमातून शिक्षणाचे मोठे कार्य चालू आहे तरी सुद्धा माननीय आप्पासाहेब नागदकर यांचे शिक्षण विषयक कार्य कन्नड तालुक्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांच्या अंगी निसर्गदत्त प्रतिभा होती.त्यांच्याकल्पनेतूनछत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातूनते 53 वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत होते. आणि तांड्या वस्त्या वरील विद्यार्थ्यां पर्यंत शिक्षणाची पाळेमुळे पोहोचवली-. यासंस्थेचे 1972चेकलावाणिज्यआणिविज्ञानमहाविद्यालयकार्यरतअसून 3500 विद्यार्थीशिक्षणघेतआहेत.दोन कनिष्ठ महाविद्यालय, मुलींसाठी स्वतंत्र सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय शहराच्या मध्यभागी पाचवी ते बारावी पर्यंत कार्यरत आहे. गौताळा अभयारण्याच्या डोंगराळ भागात कळंकी सारख्या दुर्गम गावातआजही कुठली टेलिफोन

 ISSN 2231 4342

व प्रवासाची सुविधा नसताना माध्यमिक विद्यालय सुरु आहे. कन्नड शहरात भिल पलटन प्राथमिक विद्यालय सुरू आहे. तसेच मुलींचे स्वतंत्र वस्तीग्रह सुद्धा आहे. नवीन मुलींचे वस्तीग्रह ची सुरुवात माननीय मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण साहेब यांच्या हस्ते आली त्याच बरोबर डॉक्टर भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालय सुद्धा संस्थेने सुरू केलेले आहे. रामराव अण्णा बहिर गावकर एम.सी.वीसी. महाविद्यालय कार्यरत आहे. कम्प्युटर अकॅडमी आहे.आणि पी जी वर्ग सुद्धा कार्यरत आहे. गरिबांच्या मुलांना शिक्षण मिळावे हीच यामागची भूमिका होती. जागतिकीकरणामुळे शिक्षणही संकल्पना बदलत आहे म्हणून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शिक्षण घेऊन चालणार नाही तर व्यवसायिक शिक्षणाची जोड असावी असा दृष्टिकोन समोर ठेवून त्यांनी वेगवेगळे अभ्यासक्रम संस्थेत आणले. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कन्नड शहरात चालत असलेल्या न्यूहायस्कूल या शाळेची सुद्धा ते संचालक होते कन्नड बरोबरच मराठवाड्यात सुद्धा शिक्षण बहुजन समाजातील लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे म्हणून 1958 साली महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण, विनायकराव पाटील, दादासाहेब सावंत, यामंडळी सोबत राहून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना झाली.त्यांना नेहमीच वाटायचे महाराष्ट्रात जशी कर्मवीर भाऊराव पाटील यांची रयत शिक्षण संस्था आहे, विदर्भात पंजाबराव देशमुखयांची शिवाजी शिक्षण संस्था आहे, व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन संस्था आहे, अशाच पद्धतीची मराठवाड्यात मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ गेल्या चार तपा पासून कार्यरत आहे. या शिक्षण संस्थेचे ते पस्तीस वर्षे अविरत सदस्य होते. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाने सुरवातीला तीन महाविद्यालये सुरू केली. औरंगाबादचे देवगिरी महाविद्यालय, बीड शहरातील बलभीम महाविद्यालय, आणि परभणीचे शिवाजी महाविद्यालय हे कार्यरत होते. परंतु आज संस्थेचे कनिष्ठ व वरिष्ठ मिळून 31 महाविद्यालय जवळपास कार्यरत आहे.आज या संस्थेला मराठवाड्यातील सर्वात जास्त विद्यार्थी संख्या असणारे मिनी विद्यापीठ म्हणून ओळखले जाते. या शिक्षण संस्थेने आत्तापर्यंत अनेक न्यायाधीश, राजकीय कार्यकर्ते, वकील, इंजिनियर, डॉक्टर्स, आणि राजकीय कार्यकर्ते नावारूपास आणलेले विद्यार्थी यासंस्थेचे आहेत. असा नावलौकिक असले ली संस्था त्याचं काम करण्याचं अहो भाग्य आप्पासाहेब नगरकरांना लाभलेलं होतं. असे दृष्टे नेते 1960 ते 2007 पर्यंत 47 वर्षे आजीव सदस्य म्हणून त्यांनी शिक्षणाच्या कार्य क्षेत्रात काम केले.

जवाहर नवोदय विद्यालय कन्नड:-

राजीव गांधी पंतप्रधान असताना ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारचे शिक्षण घेऊन राष्ट्र उभारणीसाठी तरुण पिढी निर्माण व्हावी, कर्तुत्ववान गुणवान प्रशासकीय वर्ग, विद्यार्थी तरुणामधूनच देशाला मिळावायासाठी आदर्श शाळा, देशातील प्रत्येक जिल्ह्यात एक नवोदयविद्यालय ही योजना सुरू झाली. त्याची अंमलबजावणी व कार्यवाही करण्यात आली. पंतप्रधान योजनेतील असणारे असे जवाहरन वोदय विद्यालय हे आपल्याच गावात आपल्या तालुक्यात व आपल्या जिल्ह्याच्या ठिकाणी असावे यासाठी राजकारणातील अनेक मातब्बर व सक्रिय पुढारी प्रयत्न करत होते. त्यातच हे जवाहर नवोदय विद्यालय

औरंगाबाद जिल्ह्याचे प्राचीन काळातील सातवाहनांची राजधानी असलेले प्रतिष्ठान व एकनाथ महाराजांचे समाधी स्थान पैठण या ऐतिहासिक नगरीत मंजूर झालो होते. पण त्याकाळचे केंद्रीय शिक्षण मंत्री माननीय शंकररावजी चव्हाण साहेबयांच्या सहकार्याने माननीय आप्पासाहेब नगरकरांनी ती योजना कन्नडला आणली. त्यानंतर ही योजना आपल्या संस्थेच्या महाविद्यालयाच्या शेजारी असावी म्हणून शासनाच्या मालकीची असणारी तीस एकर जमिनीचा प्रस्ताव शासनाला पाठवून ही जमीन मिळवून घेतली. तेथे रस्त्याची व्यवस्था करून दिली ही योजना जेव्हा कन्नडला आणली तेव्हा त्याला जागा नव्हती, इमारतही नव्हती, तर माननीय आप्पासाहेब नागदकरांनी यासंस्थेचे सर्वसन्माननीय संचालकांच्या सल्ल्याने त्यांच्या महाविद्यालयाच्या काही वर्ग खोल्या व जागा उपलब्ध करून दिली .जवाहर नवोदय इमारतीची भव्यवास्तू उभी राही पर्यंत आणि आप्पासाहेब नगरकरांनी त्यांना जे जे लागेल ते सर्वतोपरी मदत केली. म्हणून त्यांच्या शैक्षणिक कार्याची साक्ष म्हणून शैक्षणिक संकुल उभारले गेले होते. आज देशातील 27 राज्यव 7 केंद्र शासित प्रदेशामध्ये 575 जवाहर नवोदय विद्यालय कार्यरत आहेत. याजवाहर नवोदय विद्यालयात मराठवाड्यातील सर्वच भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय करून देणे व पंतप्रधान योजनेचा लाभ आपल्या कन्नडच्या आजूबाजूला असलेल्या ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना व्हावा हाच उद्देश मा.आपाचा होता. यांच्या प्रयत्नातून हे केंद्रशासनाचे जवाहर नवोदय विद्यालय कन्नड सारख्या भागात गौताळा अभयारण्यात पितळखोरा लेणीच्या इतिहासिक रम्य वातावरणात सुरू झालं. या विद्यालयात विद्यार्थ्यांना भोजन गणवेश निवास आणि शालेय साहित्याची मोफत व्यवस्था केली जाते या व्यतिरिक्त अनुसूचित जाती-जमातीतील मुला-मुलींना व त्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न दारिद्र्य रेषेखाली आहे, ज्यांची आर्थिक परिस्थिती तुटपुंजी असते त्यांची ही सुद्धा माफ केली जाते .

मुलींसाठी वस्तीग्रह:-

महाविद्यालय परिसरात मुलींच्या वसतिगृहाची सोय व्हावी, खेड्यापाड्याततील मुलीना महाविद्यालयीन शिक्षणासाठी शहरात प्रवेश घेता यावा या उद्देशाने महाविद्यालय परिसरातील संस्थेची दोन एकर जागा देऊन मुलींच्या वस्ती ग्रहाची भव्य अशी वास्तू शासनामार्फत तयार करून घेतली. यावसतीगृहात पन्नास मुली आपल्या शिक्षणासाठी मोफत राहतात. त्याचबरोबर आप्पासाहेब नागदकर मुलींचं दुसरं वस्तीग्रह आता संस्थेने बांधले आहेत. त्यामध्ये दोनशे मुलींची राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे आणि सावित्रीबाई फुले कन्याशाळा यामुळे तालुक्यातील मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण निश्चितच वाढले आहे. प्रियदर्शनी मुलींचे वस्तीग्रह यामध्ये मुलींना जेवण राहण्याची व्यवस्था ही मोफत केली जाते अशा पद्धतीने मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था व्हावी यासाठी सुद्धा आप्पासाहेबांनी शर्तीचे प्रयत्न केले.

निष्कर्ष:-

माननीय आप्पासाहेब नागदकर हे एक लोक शिक्षक म्हणून उदयास आलेल व्यक्तिमत्त्व होतं. त्यांनी कन्नड परिसराचा भौगोलिक अभ्यास करून येथे मोठ्या प्रमाणात आदिवासी भिल्ल ठाकर बंजारा राहतात

 ISSN 2231 4342

त्यांच्यासाठी शिक्षणाची व्यवस्था व्हावी म्हणून शिक्षण संस्था महत्त्वाची आहे हे लक्षात घेऊन शिक्षण संस्थेची उभारणी केली. मराठवाड्यात अजूनही शिक्षणाचे प्रमाण कमी आहे म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ किंवा छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ याची निर्मिती करण्याचा हाच उद्देश होता. तसेच शिक्षणाबरोबरच सिंचनाची रस्त्यांची व प्रशासकीय सोयी-सुविधांची सुद्धा पायाभरणी केली होती. त्यामध्ये शहरात असलेले एसटी महामंडळाचे नवीन बिल्डिंग, स्टेडियम, मुलींचे वस्तीग्रह, कन्याविद्यालयची इमारत, अशी वेगवेगळी उदाहरणे देता येतील. सलग अकरा वर्षे आमदार राहिलेल्या व्यक्तीकडे मृत्युसमयी स्वतःची चारचाकी गाडी सुद्धा नव्हती आणि शेवटपर्यंत महामंडळाच्या बसने प्रवास करणारे ते एकमेव आमदा रअसतील असं मला वाटतं आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये अशा दृष्ट आणि लोकशिक्षक, गांधी विचारवादी आणि त्यांच्या शैक्षणिक विचारांची गरज आहे.

संदर्भ ग्रंथ:-

१) आप्पासाहेब नागदकर गौरव ग्रंथ . शिवारसंस्कृतिकमंचकन्नड 2005.

२) आप्पासाहेब नागदकर जीवन व कार्य गौरव ग्रंथ,२००५.

३) कमांदर एस. जी. ,आप्पासाहेब नागदकर गौरव ग्रंथ.

४) पठाण यू .म., एक गाव मारवाडी 2006

५) विधानसभा डिबेट्स,१९६७

६) विधानसभाडिबेटस,१९६८

७) विधानसभाडिबेटस,१९७२

८) डॉ. डी.डी.शिंदे,अप्पासाहेब नागदकर गौरव ग्रंथ.

९) देशमुख विलासराव,महाराष्ट्रविधानसभाशोकप्रस्ताव,दिनांक२२/४/२००८

१०) पवार नामदेवराव,महाराष्ट्रविधानसभाशोक प्रस्ताव,दिनांक२२/४/२००८

११) शिंदे फ.मु.,अग्निकुंड स्मृतिग्रंथ,२०००

१२) वृत्तपत्रे, अहवाल ,मुलाखती, कार्यालयनोंदी

आधुनिक काळातील भारतीय शिक्षण पद्धतीचा विकास

डॉ. शारदा गोविंदराव बंडे
इतिहास विभाग प्रमुख स्वा.सै.
सूर्यभानजी पवार
महाविद्यालय पूर्णा

सारांश

18 व्या शतकात भारतात शिक्षणाची परिस्थिती खूपच दयनीय होती. काही बोटावर मोजता येतील एवढ्या संस्थानिकांनी आपल्या राज्यात शैक्षणिक सुधारणा केल्या परंतु मोठ्या प्रमाणावर त्या झाल्या नाहीत. इंग्रज भारतात आल्यानंतर त्यांनी आपले राज्य या ठिकाणी रुजावे यासाठी व त्यांना राज्यकारभारात मदत व्हावी या हेतूने सुशिक्षित मनुष्यबळ प्राप्त व्हावे म्हणून शिक्षणाकडे लक्ष दिले. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी भारतात शिक्षणाचा पायंडा पडला परंतु त्यांचे प्रयत्न तोकडे होते इंग्रजांनी भारतात शाळा महाविद्यालय सुरू झाली उच्चशिक्षित भारतीयांनी विविध शैक्षणिक संस्था राष्ट्रवादी भावनेने सुरू केल्या. इंग्रज काळात विविध आयोगने शिक्षण क्षेत्रात विविध उपाययोजना सुचविल्या सरकारने त्या अंमलबजावणीत आणल्या. त्यामुळे शिक्षणात बदलाचे वारे वाहू लागले. स्वातंत्र्योत्तर काळात त्यात आमूलाग्र बदल घडून आला.

प्रस्तावना

अठराव्या शतकात विद्यादान करणारी हिंदु-मुस्लिम विद्या केंद्रे जवळपास लुप्त झाली होती. शिक्षण फक्त उच्चवर्गीय लोकांसाठी सहज शक्य होते त्यात धार्मिक शिक्षणास प्राधान्य दिले जात असे. यावेळी पाश्चात्त्य राष्ट्रात ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान तंत्रज्ञान विविध शास्त्रे विकसित होत होती. भारतात वारेन हेस्टिंग्स या गव्हर्नर जनरल ने आपल्या वरिष्ठाचे लक्ष शिक्षण व्यवस्थेकडे वळवले. त्याने कोर्ट ऑफ डायरेक्टर्सला पत्र पाठवून कळविले की भारतात प्रमुख शहरात विद्येचा प्रसार करण्यासाठी आर्थिक तरतूद होणे गरजेचे आहे १७81 साली त्याने कलकत्त्यात मदरसा स्थापन केला. 1791साली बनारस येथे रेजीनंट म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या डंकन यांनी हिंदू धर्म साहित्य कायदे यांच्या अभ्यासाचा प्रसार व्हावा या हेतूने संस्कृत कॉलेज सुरू केले. इंग्रजांकडून प्रारंभी प्राच्यविद्याचा म्हणावा तसा प्रसार झाला नाही. ख्रिश्चन मिशनरी लोक प्राच्यविद्येला तितकेसे महत्त्व देत नव्हते. त्यांच्या मते ाश्चात्त्यांनी येथे इंग्रजी माध्यमातून पाश्चात्यांच्या साहित्याचा ख्रिश्चन मताचा प्रसार करावा भारतात शिक्षणाची खऱ्या अर्थाने सुरुवात श्रीरामपूर येथील ख्रिश्चन समाजसुधारकांनी केली. १८०० मध्ये लॉर्ड वेलस्लीने फोर्ट विल्यम कॉलेजची स्थापना केली. परंतु हे कॉलेज लवकरच बंद करण्यात आले.

इसवी सन १८१३ साली भारतात विद्येचा प्रसार व्हावा म्हणून एक लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. या पैशातून स्थानिक विद्वानांना प्रोत्साहन देऊन भारतीय साहित्याचा पुनरुद्धार करण्यात येणार होता.

शिवाय इंग्रजांना कंपनीमध्ये असे काम करणाऱ्या लोकांची गरज होती. त्यांना इंग्रजी भाषा येणे गरजेचे होते शिवाय त्यांना भाषेसोबतच अरबी, फारशी, भाषा अवगत असाव्यात जेणेकरून इंग्रजांना स्थानिक राजसत्तांशी पत्र व्यवहार करता यावा. इंग्रज न्यायाधीशांना न्यायदानात मदत करण्यासाठी भारतीय हिंदु कायद्याचा अर्थ लावण्यासाठी मदतनिसांची आवश्यकता होती. हळूहळू इंग्रजांना भारतात आपली सत्ता स्थिर करण्यासाठी भारतीयांना शिक्षण देणे क्रमप्राप्त बनले. भारतात शिक्षणाचा प्रसार वाढू लागला त्यात इंग्रज राज्यकर्ते या नात्याने तर काही मध्यमवर्गीय तरुण समाजाच्या पर्यायाने भारताच्या भल्यासाठी शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून प्रयत्न करू लागले.

संशोधनाचा हेतू

भारतात शिक्षण प्रसारासाठी कोणते घटक कारणीभूत ठरले याचा अभ्यास करणे तसेच शिक्षणप्रसाराची इंग्रज व भारतीयांना का गरज वाटू लागली. या उद्दिष्टात कोणत्या बाबींची भर पडली. या बाबींचा आढावा घेणे हा प्रस्तुत संशोधनाचा हेतू आहे.

भारतात शिक्षणाचे स्वरूप व माध्यम

सुरुवातीच्या काळात भारतीयांना पाश्चात्त्य शिक्षण द्यावे की भारतीय विद्येचे शिक्षण हा मुद्दा उपस्थित झाला. याशिवाय शिक्षणाचे माध्यम इंग्रजी भाषा असावी ही स्थानिक भाषा हा वाद निर्माण झाला. अनेक भारतीयांना वाटत होते की, शिक्षण घेतल्याने त्यांना आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर बनता यावे. त्यांना उपजीविकेचे साधन शिक्षणातून साध्य व्हावे. त्यामुळे पाश्चात्त्य शिक्षण ते सुद्धा इंग्रजीतून मिळाल्यास त्यांना सरकार दरबारी किंवा कंपनीत नोकरी मिळेल. शिवाय त्या काळात राजाराम मोहनराय सारख्या उच्च विद्याविभूषित यांनी इंग्रजी शिक्षणाला पसंती दिली. त्यांना वाटे की, भारतीयांना पाश्चात्त्य ज्ञान, विज्ञान, गणित, तत्वज्ञान, रसायनशास्त्र, शरीररचनाशास्त्र इत्यादी आधुनिक प्रगत विज्ञानचे तंत्रज्ञानाची शिक्षण मिळावे. इ. स. 1817 मध्ये त्यांना हिंदू कॉलेज कलकत्त्यात स्थापन करण्यास अनुदान मिळाले. येथे इंग्रजी माध्यमातून पाश्चात्य विज्ञान व मानव्यविद्देचे ज्ञान दिले जाई याच शिवाय अनेक पाश्चात्य वैज्ञानिक ग्रंथांचा भारतीय प्राचीन भाषेत अनुवाद व्हावयास सुरुवात झाला. भारतात एच टी प्रिन्सेस सारख्या व्यक्ती विद्येच्या समर्थक होत्या. शिवाय काही इंग्रज विद्वान इंग्रजी भाषेचे समर्थन करत होते हा वाद शेवटी गव्हर्नर जनरल पर्यंत गेला. या काळात गव्हर्नर जनरलच्या कार्यकारणीत सदस्य असणाऱ्या मेकॉले यांनी इंग्रजी शिक्षणाचे व इंग्रजी माध्यमाची जोरदार समर्थन केले. रक्त व रंगाने भारतीय परंतु विचार विद्या यादृष्टीने इंग्रज अशा श्रेणीचा वर्ग भारतात निर्माण व्हावा हे मत त्याने मांडले. १८३५ मध्ये लॉर्ड विल्यम बेन्तिंगने मेकोलेचा दृष्ठीकोणच योग्य आहे असे म्हटले. सर्वसाधारण भारतीयांना इंग्रजी शिक्षण द्यावे या मताचा नव्हता तर फक्त उच्चवर्णीयांना ते देण्यात यावे या मताचा होता. त्याच्यामते इंग्रजी माध्यमात शिकलेले भारतीय पाश्चात्त्य व स्थानिक जनता यातील दुवा बनतील. तेच भारतीय साहित्य भाषा यांना समृद्ध बनवतील या काळात भारतीय भाषा शिक्षण यांना प्रोत्साहन देण्याचे फार कमी प्रयत्न झाली.

 ISSN 2231 4342

सर चार्ल्स वुडचा खलिता १854

सर चार्ल्स वूड हा बोर्ड ऑफ कंट्रोल चे अध्यक्ष होता त्यांनी 1854 मध्ये भारताच्या भावी शिक्षणाचा बृहत आराखडा बनवला तो भारतीय शिक्षणप्रणालीच्या इतिहासात मेग्नाकार्टा म्हणून ओळखला जातो. वूडने सुचवलेल्या सर्व शिफारशी लागू करण्यात आल्या व पुढील पन्नास वर्षे ही शिक्षण पद्धती प्रामुख्याने वापरली गेली. त्यांनी शिक्षणाचा उद्देश हा पाश्चात्य कला साहित्य विज्ञान तत्त्वज्ञान याचा प्रसार व्हावा शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असावी परंतु त्याची सक्ती न करता भारतीय भाषेस प्रोत्साहन द्यावे असे म्हटले. कारण देशी भाषेत द्वारेच पाश्चात्य ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवू शकणार आहे. त्याने ग्रामीण भागात प्राथमिक शाळा जिल्हा स्तरावर माध्यमिक तसेच त्या वरच्या पातळीवर कॉलेज असावेत या संस्थांना शासनाने अनुदान द्यावे शिक्षकांना प्रशिक्षित करणारी ट्रेनिंग कॉलेजेस असावीत असे म्हटले लंडनच्या धर्तीवर कलकत्ता मद्रास मुंबई येथे विद्यापीठ असावीत, ही विद्यापीठे परीक्षा घेऊन विविध पदव्या देतील, विद्यापीठात कुलगुरू, उपकुलगुरू,सिनेट सदस्य, प्राध्यापक यांना नियुक्ती केले जावे. महिलांच्या शिक्षणाचे ही समर्थन याखलीत्याने केले. शिक्षण क्षेत्रावर लक्ष देण्यासाठी लोक शिक्षा विभाग स्थापित करण्यास सुचविले.

हंटर शिक्षाआयोग १८८२-८३

1८५४ च्या वूडच्या खलीत्यानंतर शिक्षण क्षेत्रातील झालेला बदल अभ्यासण्यासाठी १८८२ मध्ये डब्ल्यू डब्ल्यू हंटर यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. हा आयोग प्राथमिक व माध्यमिक शिक्षण क्षेत्रात झालेला बदल व त्यात सुधारणा करावयाच्या बाबींचा अभ्यास करणार होता. भारतात प्राथमिक शिक्षणावर मोठ्या प्रमाणात भर देण्यात यावा या शिक्षणावरील जिल्हा तसेच नगर बोर्डाचे नियंत्रण असावे, माध्यमिक शिक्षणाचा हेतू विद्यापीठ प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना तयार करणे एवढेच न राहता विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण देण्याचा असावा सरकारने खाजगी प्रयत्नांना प्रोत्साहन द्यावे. मुंबई, कलकत्ता, मद्रास या ठिकाणी त्यांच्या शिक्षणाची खास व्यवस्था नसल्याबद्दल खेद व्यक्त करत या शिक्षणास प्रोत्साहन द्यावे असे म्हटले आहे. या नंतरच्या काळात भारतीयांनी पाश्चात्य विद्या सोबत प्राच्य विद्येच्या अभ्यासातही रस दाखवला १८८२ मध्ये पंजाब आणि १८८७ मध्ये आलाहाबाद विश्वविद्यालय स्थापन केली गेली.

भारतीय विद्यापीठ कायदा 1904

विश्वविद्यालयीन स्थितीचा आढावा घेण्यासाठी व तत्संबंधी सुधारणा करण्यासाठी लॉर्ड कर्झने सर टॉमस टेले यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला. या आयोगाने सुचविलेल्या शिफारशी वर आधारित भारतीय विद्यापीठ कायदा 1904 संमत केला. विश्वविद्यालयाने अध्यापन आणि संशोधनासाठी प्राध्यापकांची नियुक्ती करावी अत्याधुनिक प्रयोगशाळा ग्रंथालय स्थापित करावी विद्यापीठ सिनेटच्या प्रस्तावावर सरकारला विशेष अधिकार प्राप्त झाला व शासकीय कॉलेजवर सरकारचे नियंत्रण अधिक केले. त्यांना सलग्न करण्यासाठी कडक नियम बनविले वेळोवेळी त्यांचे परीक्षण होणार होते. गव्हर्नर जनरला त्या कॉलेजच्या क्षेत्रीय सीमा ठरविण्याचा अधिकार होता. भारतातील राष्ट्रवादी विचारधारेच्या युवकांनी त्या आयोगाच्या शिफारशी वर अक्षेप घेतला.

 ISSN 2231 4342

सॅडलर आयोग 1917- 19

1906 मध्ये बडोद्याच्या संस्थानात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात झाली होती. गोखले यांनी यावरून सरकारला धारेवर धरले. सरकारने प्रांतीय सरकारांना निर्धन गरीब जनतेसाठी प्राथमिक शिक्षण निशुल्क द्यावे असे म्हटले प्रत्येक प्रांतात एक तरी विद्यापीठ असावे असे म्हटले. सँडलर आयोगाचे अध्यक्ष डॉ एम इ सॅडलर व दोन भारतीय सर आशुतोष मुखर्जी आणि डॉ. जियाउद्दीन अहमद यांचा या योगात समावेश होता. प्राथमिक शिक्षण बारा वर्षे पर्यंत तिथून पुढे हायस्कूल उच्च माध्यमिक परीक्षा व नंतर विद्यापीठीय शिक्षण असा क्रम असावा असे म्हटले. पदवीचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असावा विश्वविद्यालयाने व्यावसायिक शिक्षण कॉलेज सुरू करावीत.१९१६ ते १९२१ च्या दरम्यान म्हेसुर. पाटणा, बनारस अलिगड ढाका व लखनो याठिकाणी विद्यापीठे सुरू झाली

हार्टोग समिती 1929

शिक्षणाचा विकास कितपत झाला हे पडताळण्यासाठी सर फिलिप हार्टोग यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमली गेली. या आयोगाने प्राथमिक शिक्षणाचे राष्ट्रीय महत्त्व मांडले परंतु या शिक्षणाच्या अनिवार्यतेवर आक्षेप घेतला माध्यमिक शिक्षणाचा हेतू केवळ विद्यापीठ प्रवेश मर्यादित न राहता व्यावसायिक व औद्योगिक शिक्षणाचा प्रसार व्हावा. जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यास लायक आहेत त्यांनाच उच्च शिक्षण द्यावे विद्यापीठाने आपला शिक्षा स्तर उंचवावा.

मुलोद्योगी शिक्षण अथवा वर्धा योजना

गांधीजींनी 1937 मध्ये आपल्या द हरिजन या पत्रातून लेखांची शंकरला प्रसारित केली. यात गांधीजीने आपले शिक्षण विषयक विचार मांडले. ही योजना मुलोद्योगी शिक्षण योजना अथवा वर्धा योजना या नावाने ओळखली जाते. डॉ जाकिर हुसेन यांनी ही योजना स्पष्टपणे प्रस्तुत केली. हस्तकलेचे प्रशिक्षण देणारे पाठ्यक्रम तयार करण्यात आले यातून शिक्षणाच्या खर्चाचा शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी लागणार होता विद्यार्थ्यांना मातृभाषेतून सात वर्षे विद्यादान केले जाणार होते. या योजनेत शिक्षकांचे प्रशिक्षण पर्यवेक्षण परीक्षण तसेच प्रशासन या विषयी सविस्तर माहिती होती, दुसरे महायुद्ध सुरु झाल्याने ही योजना व भारतातील प्रांतीय सरकारांनी राजीनामे दिल्याने स्थगित करावी लागली पण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने या योजनेच्या अनेक शिफारशी वर ध्यान दिले.

सार्जेट योजना

भारत सरकारने सरकारचे शैक्षणिक सल्लागार सर जॉन सार्जेट योजनेचे प्रमुख होते. या योजनेनुसार देशातील एलिमेंट्री स्कूल हायस्कूल जूनियर आणि सीनियर स्कूल स्थापन केले जाणार होते. सहा ते अकरा वयोगटातील मुलांना निशुल्क आणि अनिवार्य शिक्षण देणे विद्यालयात अकॅडमिक व प्रोफेशनल असे दोन्ही प्रकारचे शिक्षण देणे हा हेतू होता

 ISSN 2231 4342

राधाकृष्ण आयोग 1948 -49

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने डॉ राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला. या आयोगाने बारा वर्षाचे विद्यापीठ पूर्व प्रशिक्षण परीक्षेचे दिवस वगळून 180 दिवसाचे अध्यापन, उच्च शिक्षणाचे सामान्य शिक्षण संस्कारी व व्यावसायिक शिक्षण असे तीन मुख्य उद्देश, याशिवाय कृषी वाणिज्य विद्या अभियांत्रिकी तंत्रज्ञान विधि, औषध, विज्ञान, इत्यादी विविध विज्ञान शाखेच्या विस्तारावरभर देण्यात आला. प्रशासकीय सेवेसाठी विश्वविद्यालय पदवी अनिवार्य सर्व विद्यापीठाचा स्तर समान तसेच शिक्षणाला समवर्ती सूचीत आणले. सर्व विद्यापीठावर विद्यापीठ अनुदान आयोग देखरेख करेल व विद्यापीठातील प्राध्यापकांच्या वेतनात वाढ करण्यात यावी 1953 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना झाली.

कोठारी आयोग 1964- 66

या आयोगाचे अध्यक्ष डॉ. कोठारी होते या आयोगात भारतासह इंग्लंड अमेरिका रशिया या देशाचे शिक्षण तज्ञ व वैज्ञानिक होते. युनेस्को सचिवालयाचे श्री जे एफ.मेकडोंगल यांचे योगदानही लाभले. या आयोगाच्या मते शिक्षण आणि संशोधन देशाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक विकासासाठी महत्त्वपूर्ण मानले उच्चशिक्षणात समाजसेवा कार्यानुभव हस्तकौशल्य उत्पादनाचा अनुभव यांना सामान्य शिक्षेत समाविष्ट केले. नैतिक, शिक्षण व सामाजिक उत्तरदायित्व या भावनेचा विकास महत्त्वाचा मानला शिक्षकांचे प्रशिक्षण कृषी संशोधन इत्यादींना प्राथमिकता दिली.

नवीन शिक्षण धोरण 1986

कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधारित प्रस्ताव संमत केला गेला यात 14 वर्षापर्यंत अनिवार्य व निशुल्क शिक्षणाच्या वेतनात वाढ भाषेच्या त्रिस्तरीय फार्मूला प्रादेशिक भाषेचा विकास पाठ्यक्रम अधिक उत्तमोत्तम बनविणे एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील 6 टक्के उत्पन्न शिक्षणावर खर्च इत्यादी बाबींची अंमलबजावणी महत्त्वाची मानली.

निष्कर्ष

भारताच्या शैक्षणिक विकासातून पुढील निष्कर्ष काढता येतात

1सुरुवातीच्या काळात शिक्षणाचा उद्देश इंग्रजांना शिक्षित सुशिक्षित व प्रशिक्षित मनुष्यबळ सहज उपलब्ध व्हावे हा होता

2प्राथमिक शिक्षण अनिवार्य व निशुल्क करण्यामागे साक्षरता वाढावी हा सरकारचा हेतू होता

3 प्राच्य विद्येचे महत्त्व हळूहळू मान्यता पावू लागले

4.शिक्षणाचा हेतू फक्त अर्थव्यवस्थेच्या व प्रशासनाच्या गरजा भागवणे हा मर्यादित न राहता राष्ट्राच्या जडणघडणीत योगदान देणारा सुजाण नागरिक बनवणे हा बनला.

5.धर्मनिरपेक्षता देशाचे अखंडत्व सामाजिक एकदा सामाजिक न्याय देशाचे ऐक्य सुजाण पिढी निर्माण करणे हे शिक्षणाचे लक्ष्य बनले

ISSN 2231 4342

संदर्भ ग्रंथ सूची

1एस एन मुखर्जी history of education in India 1957

2 प्रा. अनिल कठारे -आधुनिक भारताचा इतिहास

3 ग्रोवर बी.एल., वेल्हेकर एन के , आधुनिक भारताचा इतिहास

4 डॉ. एन एस तांबोळी -आधुनिक भारत

5 Narulish and naik, history of education in India during the British period 1956

6 डॉ.एन एस तांबोळी आधुनिक भारत आणि इतिहास संशोधन पद्धती निराली प्रकाशन 2012

भारताची फाळणी हिंसाचार आणि महात्मा गांधी

प्रा. बालासाहेब गोविंदराव कानडे
इतिहास विभाग
श्री गुरू बुद्धी महाविद्यालय, पूर्णा

सारांश

पूर्व आणि फाळणीनंतर झालेल्या दंगलीत हिंसाचारात हजारो लोक बळी गेले. हिंदू-मुस्लीम शीख सुडाच्या भावनेने पेटून उठले होते. अशा वेळी लोकांना शांत करणे अतिशय कठीण कार्य गांधीजीने मृत्यूपर्यंत चालू ठेवले. याकाळात गांधीजींनी लोकांना शांतीपूर्ण जीवन जगण्याचे आव्हान केले. सीमा पार कार्य करण्यात जीनांना अपयश आले. भारतातून पाकिस्तान मध्ये गेलेल्या निर्वासितांनी जिना पेक्षा गांधीजींना महान मानले. गांधीजींनी भारतातल्या सर्व पक्षांना आपल्या कार्यात सामील करून घेतले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने चालवलेल्या निर्वासितांच्या छावणीस त्यांनी भेट देऊन त्यांच्या शिस्तीची स्तुती केली पण त्यांच्यावर होणारे आरोप संघाने खोटे ठरवावे ही त्यांची जबाबदारी आहे व त्यांनी आपली ताकद त्यासाठी वापरावी असे निर्भीडपणे सांगितले. परिस्थिती काही असो मात्र भारत लोकशाहीप्रधान धर्मनिरपेक्ष देश आहे तिथे अल्पसंख्यांकांना इतर सर्व नागरिकांप्रमाणेच सर्व हक्क उपभोगता येतील असे म्हटले दंगलग्रस्त भागात पायपीट करुन प्रार्थना, सभा घेऊन शांततेचे आवाहन केले. तर निर्वासितांच्या छावणीत जाऊन त्यांना सांत्वनच दिले नाही तर भारत सरकारला त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सुचवले.

संशोधनाची उद्दिष्टे

भारताच्या फाळणीपूर्व आणि फाळणीनंतरच्या काळात भारतातील विविध भागात हिंसाचाराचा आगडोंब उसळला. भारतातील हिंदू-मुस्लिम एकमेकांच्या जीवावर उठले होते अशा परिस्थितीत भारतातील काही नेते हिंदू-मुस्लीम समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करत होते. अशा नेत्यामध्ये गांधीजींचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. दंगली हिंसाचार रोखण्यासाठी गांधीजींनी कोणते प्रयत्न केले व त्यांना त्यात कितपत यश आले गांधीजींनी कशाप्रकारे या काळातील परिस्थिती हाताळली या सर्व बाबींचा अभ्यास करणे हे या संशोधनाचा हेतू आहे.

प्रस्तावना

महात्मा गांधी हे भारताचे इतिहासातच नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक असामान्य व्यक्तिमत्व आहे. त्यांचे थोर पण त्यांच्या कार्यात दडलेले आहे दक्षिण आफ्रिकेत असताना त्यांनी सत्याग्रह व अहिंसेच्या मार्गाने तेथील कृष्णवर्णीयांना न्याय मिळवून दिला भारतात आल्यानंतर एक सामान्य कार्यकर्ता या नात्याने ते काँग्रेसची जोडली गेले. चंपारण्यातील निळीच्या सत्याग्रह पासून ते भारतात लोक मान्यता पावले. लोकमान्य टिळक नंतर भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व त्यांच्याकडे आले. खेडा सत्याग्रह, अहमदाबादचा गिरणी कामगारांचा लढा,

ISSN 2231 4342

असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग, दांडी मिठाचा सत्याग्रह, इत्यादी विविध आंदोलनाचे नेतृत्व करून त्यांनी आपल्या लढ्याला नैतिक अधिष्ठान मिळवून दिले. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे यात दुमत नाही परंतु गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करण्याच्या मागे फाळणीपूर्व आणि फाळणीनंतरच्या दंगली हिंसाचार शमविण्यासाठी केलेल्या कार्याची खुद्द ब्रीटीशच नव्हे तर जगभरातील लोकांनी त्यांच्यातील महानता मान्य केली. हा काळ खऱ्या अर्थाने भारतीयांची परीक्षा घेणारा होता. यावेळी गांधीजींचे वय 77 होते. त्यांचे मूत्रपिंड निकामी झाली होते, वजन घटले होते, उलटी डोकेदुखीचा त्रास होता. त्यांच्या डॉक्टरांनी त्यांना गंभीर सूचना केल्या होत्या अशाही परिस्थितीत दगडगोटे चिखल तुडवीत त्यांनी भारतातील विविध भागात पायपीट केली प्रार्थना सभा घेतल्या उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांना यशही आले. खुद गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंट बॅटन यांनीच म्हटले की जे काम पंजाबमध्ये 50 हजार सैनिक करू शकली नाहीत की एकट्या निशस्त्र माणसांनी कलकत्त्यात करून दाखवली भारतातील दंगली हिंसाचार शमविण्यासाठी त्याने निकराने प्रयत्न केले त्याला इतिहासात तोड नाही.

भारतातील फाळणी हिंसाचार व गांधीजींचे कार्य

भारतातील सर्वपक्षीय नेत्यांनी 1946 च्या दरम्यान मान्य केले होते की भारताची फाळणी ही अटळ आणि अपरिहार्य घटना आहे असे असताना सुद्धा दोन व्यक्तींना अजूनही अशा वाटत होती की ती टाळता येईल ते दोघे या फाळणीच्या विरोधात होते ते दोघे म्हणजे महात्मा गांधी आणि भारताच्या उत्तर पश्चिम भागातील सरहद गांधी म्हणून ओळखले जाणारे खान अब्दुल गफार खान. गांधीजींच्या मते हिंदू मुस्लीम एकमेकांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही काम करू शकत नाहीत शकणार त्यांनी मुस्लिमांना सांगितले की त्यांनी हिंदूंना शत्रू मानु नये. कारण ते दोघेही एकाच मातीपासुन बनले आहेत. त्यांचे रक्त सारखेच आहे ते सारखेच अन्न खातात एकच पाणी पितात एकच भाषा बोलतात मुस्लिम लीगने जी पाकिस्तानची मागणी केली आहे ती गैर इस्लामिक आहे अशा कृतीस त्यांनी निसंकोचपणे पापापूर्ण कृती असे म्हटले. इस्लाम एकता आणि बंधुभाव याचा समर्थक आहे जे तत्व हिंदू-मुस्लीम यांना वेगळे करतात ते दोघांचेही शत्रू आहेत त्यांनी म्हटले की भलेही माझ्या देहाचे तुकडे झाले तरी चालतील पण ज्या गोष्टींना ते चुकीची मानतात त्या गोष्टी स्विकाराव्यात म्हणून कोणीही त्यांचे मतपरिवर्तन करू शकणार नाहीत.

मुस्लीम लीगने आपली पाकिस्तानची मागणी मान्य करून घेण्यासाठी 19 ऑगस्ट 1946 प्रत्यक्ष कार्यवाही दिवस डायरेक्ट एक्शन डे म्हणून साजरा करण्याचे जाहीर केले. याच दिवशी कलकत्त्यात दंगे भडकले व हिंसाचार अनेक दिवस सुरू होता. यात हजारो लोक मारले गेले 1947 पर्यंत या हिंसाचाराचे लोण भारताच्या उत्तर भागापर्यंत पसरले. 1947 पर्यंत कॉंग्रेसने पंजाबला मुस्लिम बाहूल आणि हिंदू शीख अशा दोन भागात विभागणी याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. कॉंग्रेस बंगालचे विभाजन अशा तत्वावर व्हावे असे वाटत होते. या हिंसाचाराच्या काळात शासनाच्या संस्था कुचकामी झाल्या होत्या. त्या वाढत्या हिंसेला पुरता पायबंद घालू शकत नव्हत्या. मार्च 1947 मध्ये अमृतसरमध्ये हिंसा भडकली असताना पोलिसांनी जमाव कर्त्यावर एकही गोळी झाली नाही. इंग्रज अधिकारी या हिंसेत हस्तक्षेप करण्यास धजावत नव्हते या वेळी जेव्हा हिंसा पीडित इंग्रज

 ISSN 2231 4342

अधिकाऱ्याकडे मदत मागण्यास गेले त्यावेळी त्यांनी त्या लोकांना नेहरू-पटेल जिना यांना शरण जाण्यास सांगितले. महात्मा गांधी वगळता काँग्रेसचे नेते ब्रिटीशासोबत स्वातंत्र्याच्या वाटाघाटीच्या चर्चेत व्यस्त होती. भारतीय प्रशासकीय अधिकारी स्वतःच्या जिवाचा व आपल्या मालमत्तेचे रक्षण करण्यात मग्न होते इंग्रज भारत सोडण्याच्या तयारीत होते याच समस्येत यावेळी समस्येत आणखी भर पडली भारतीय सैनिक व पोलिस यात हिंदू मुस्लिम शीख यांचा भरणा होता ते सुद्धा आपापल्या कर्तव्यापासून दूर जाऊ लागले काही ठिकाणी पोलिसांनी आपल्या धर्माच्या लोकांचे रक्षण केले व इतर समुदायाच्या लोकांवर सूड उगवला.

या सांप्रदायिक धूमचकरीत एक व्यक्ती सांप्रदायिक सद्भाव व शांतता निर्माण करण्यासाठी बहादूर पणे लडत होती. ते म्हणजे महात्मा गांधी यांच्या मते हिंदू मुस्लिमांचे मतपरिवर्तन केले जाऊ शकते ते पूर्व बंगालमधील नवखाली बांगलादेश पासून बिहारच्या गावापर्यंत कलकत्ता पासून दिल्लीपर्यंत पदयात्रा करू लागले. त्यांचे म्हणणे होते की हिंदू मुसलमानांनी एकमेकांना मारू नये ज्या ठिकाणी मुस्लिम अल्पसंख्यांक आहे तेथे हिंदूंनी त्यांचे रक्षण करावे. ज्या ठिकाणी हिंदू अल्पसंख्यांक आहेत तेथे मुस्लिमांनी या कामी पुढाकार घ्यावा. प्रामुख्याने दिल्लीत मुस्लिमांना हिंदूकडून छळाला सामोरे जावे लागले कारण दिल्लीच्या आसपास निर्वासितांच्या छावण्या भारत सरकारने उभारल्या होत्या हे निर्वासित पाकिस्तानातून आपला जीव वाचवून कसेबसे भारतात आले होते. रातोरात त्यांना तिकडे बेघर करण्यात आले होते तेथे त्यांना अतोनात छळाला सामोरे जावे लागले होते काही जणांच्या मुलीवर बायकांवर बलात्कार करण्यात आला होता. त्यांची संपत्ती हिसकावून घेण्यात आली होती त्यांच्या घरादाराना आगी लावण्यात आल्या होत्या त्यांच्या कुटुंबातील अनेक सदस्यांचे शिरकाण करण्यात आले होते त्यांनी इकडे आल्यानंतर आपबीती आपल्या बांधवांना सांगितल्यानंतर भारतातील जनप्रक्षोभ उफाळून आला होता त्यांनी आता मुस्लिमांना आपले लक्ष्य केले होते दिल्लीतून मुस्लिमांना आपल्या घरादारातून बेघर करण्यात येत होते एक प्रकारची सूड भावना वाढीस लागली होती. यावेळी गांधीजींनी लोकांना सूड भावना त्याग करण्यास सांगितले लोकांना आपल्या विचारापासून परावृत्त करण्यासाठी गांधीजींनी उपोषण सुरू केले या उपोषणात आश्चर्य म्हणजे पाकिस्तानातून आलेले निर्वासित सामील झाले आपला जीव वाचविण्यासाठी दिल्लीतील पुराना किल्ला या भागात छावणीत आश्रय घेणाऱ्या शहिद अहमद देहलवी यांनी म्हटले की दिल्लीत गांधीजींचे आगमन म्हणजे लांबत चाललेल्या उन्हाळ्यातील प्रचंड उकाड्यात पावसाची आल्हाददायक सर कोसळावी त्याप्रमाणे जाणवले मुस्लिम आपापसात म्हणू लागली की आता दिली वाचू शकते.

भारताला 15 ऑगस्ट 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाले एकीकडे दिल्लीत आनंद साजरा होत होता तर दुसरीकडे असंख्य निराश्रित भुकेने तडफडत होते. निर्वासितांच्या छावणीत असंख्य वेदना झालेले लोक कसेबसे जीवन कंठत होते त्यांचे नातेवाईक कुटुंबातील सदस्य बिछडले होते. त्यांचा थांगपत्ता नव्हता. स्वातंत्र्यानंतर गांधीजींची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आलेल्या पत्रकाराला गांधीजी म्हटले प्रतिक्रिया काय मागत आहे इथे माझे बांधव भुकेने तडफडत आहेत. कलकत्त्यातील दंग्यांना हिंदूंनी बिहारमध्ये अत्यंत रानटीपणे उत्तर दिले. या कृत्यात त्यांना काँग्रेस कार्यकर्त्यांचे पाठबळ मिळत आहे, हे ऐकून गांधीजी विषणणं झाले. ते तडक हिंसाचारग्रस्त स्थळी पोहोचले या वेळी गांधीजींनी 110 महिलांचा प्रवास दगड-गोटे चिखल असलेल्या बिकट

 ISSN 2231 4342

भागातून केला. खेड्यापाड्यातून लोकांनी शांतता पाळावी यासाठी त्यांनी शंभरच्यावर सभा घेऊन घेतल्या तेथून ते दिल्लीला आले निर्वासितांच्या यायला लागली होती त्यांनी हत्याकांडात सर्वस्व गमावली होती त्यांच्या मनात सूडाची भावना होती काही विरोधी तत्त्वांचा लोकांनी या भावनेला खतपाणी घातले या सोड भावनेला वेसण घालण्याचे कार्य गांधीजीनी केले. त्यांना भीती होती की यातून हिंसाचार अधिक वाढेल. त्या मुस्लिमांनी आणि नंतर भारतात राहणे पसंत केले. ते याचे बळी पडू नयेत गांधीजींना पाकिस्तानात असलेल्या अल्पसंख्यांक हिंदुवर होणाऱ्या अत्याचाराची ही काळजी होती. त्या भागात जाण्याची त्यांची इच्छा होती पण धगधगत्या दिल्लीत जोपर्यंत शांतता होत नाही तोपर्यंत तेथे थांबणे त्यांना गरजेचे वाटले. 15 ऑगस्ट पूर्वी त्यांनी दिल्ली सोडली कलकत्त्याला आले होते कारण वर्षे उलटूनही येथील दंगली थांबल्या नव्हत्या 13 तारखेला ते बालियाघाट मधील मुस्लीम वस्तीत एका पडक्या घरात राहिले. दिल्लीत असताना सुद्धा काही काळ झाडूवाल्याच्या वस्तीत राहिले होते. गांधीजींनी उपोषण करण्याचे ठरवले तेव्हा ताबडतोब शांतता व्हायला सुरुवात झाली. दुसऱ्या दिवशी स्टेटसमन या कलकत्त्यातील ब्रिटिश मालकाचे दैनिक असलेल्या वृत्तपत्राने लिहिले की त्यादिवशी 16 ऑगस्ट च्या दुपारपर्यंत दंगलग्रस्त भागात बंधुभावाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. हिंदूंनी विजयाच्या गुढ्या कमानी उभारल्या मुस्लिमांनी आपल्या घरावर दुकानावर भारतीय ध्वज फडकावला. हिंदू-मुस्लीम दोघेही जय हिंदच्या घोषणा देत उघड्या गाड्या व ट्रकमधून फिरू लागली. त्यामुळे गांधीजींना बरे वाटले गांधीजींनी त्यांना ऐकायला आलेल्या तीन हजार लोकांना म्हटले की हिंदू मुस्लिम आणि एकाच विषयाच्या त्याप्याल्यातून विष प्राशन केले होते आता त्या प्याल्यात मध निर्माण झाला आहे तो असा अधिक गोड लागेल हा बंधुभाव क्षणभर मग क्षणभंगुर आता मनापासून राहावा व टिकावा.

सुरुवातीस भारताच्या इतर भागात हिंसाचार दंगली होत होत्या त्यावेळी पंजाबशांत होता परंतु पुढे पंजाबची राजधानी लाहोरही हिंसाचाराच्या लपेटीत आली. लाहोर हे अनेक धर्म व संस्कृतीचे केंद्र होते. या शहरात औरंगजेबाने बांधलेली भव्य व सुंदर मस्जीद होती. लाहोर ऐकेकाळी शिखांचा गड व राजधानी होती. अलीकडील काळात आर्य समाजाचे केंद्र होते. बंगालची फाळणी स्वातंत्र्यापूर्वीच झाली होती. व कलकत्ता भारतात राहणार होते. पंजाबच्या फाळणीचे भवितव्य स्वातंत्र्यानंतर होणार होते तेही ब्रिटिशांच्या हातात होते. येथे देखील लाहोर व सभोवतालचा प्रदेश कोणाकडे राहणार याचा निर्णय होणार होता. लाहोर पाकिस्तानकडे राहील असा अंदाज होता. कारण या शहरात मुस्लिमांची संख्या अधिक होती. पंजाब मध्ये लिगचे सदस्य एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला अकाली दलाचे समर्थक होते. जानेवारी 1947 पासून पंजाबच्या शहरातून हिंसाचाराच्या घटनांची मालिका सुरू झाली. मार्चच्या पहिल्या आठवड्यात यात भर पडली इंग्लंडमधील हाउस ऑफ लॉर्डशसला सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले गेले की 18 नोव्हेंबर 1946 ते 18 मे 1947 या दरम्यान ४०१४ माणसे दंगलीत मरण पावली. त्यात 3024 एकट्या पंजाबची होती. पंजाब मध्ये शिखांचे पवित्र शहर अमृतसर पूर्व भागात तर गुरुनानक यांचे जन्मस्थान ना नका साहेब पश्चिम भागात होती ब्रिटिशांनी रड्क्लीफ यांच्यावर बंगाल व पंजाबच्या फाळणीची जबाबदारी सोपवली होती. त्यांना भारताबद्दल फारशी माहिती नव्हती त्यांना सीमा निश्चितीसाठी पाच आठवड्याची मुदत दिली होती. हे काम फारच अवघड होते कारण त्यांना येथे

एका देशाचे दोन भाग करावयाचे होते या कामी त्यांना चार सल्लागार देण्यात आली होते. त्यात दोन मुस्लिम, एक हिंदू, एक शीख होता ते आपसात नेहमी भांडत त्यामुळे त्यांना कंटाळून त्यांना काढून टाकले. सीमा आयोगाने निर्णय देण्यास दिरंगाई केली त्याचे परिणाम त्रासदायक होते. शिवाय वाईटही. लवकर निर्णय न दिल्यामुळे बिनबुडाच्या अफवा पसरल्या होत्या 16 ऑगस्ट 1947 ला निवाडा जाहीर झाला. त्यामुळे मुस्लिमांमध्ये भडका उडाला. त्यांच्यामते गुरदासपूर जिल्हा पाकिस्तानमध्ये यावयास हवा होता, तर नानकासाहेब मुस्लिम राष्ट्राच्या वेढ्यात अडकून पडल्याने शीख भडकले. सीमारेषेच्या दोन्ही भागात हिंसाचार भडकला. शिखांच्या टोळ्यांनी शोधून शोधून मुस्लिमांचे शिरकाण केले. पाकिस्तानात शिखावर अनन्वित अत्याचार झाले. रीश्च्या अहवालानुसार पंधरा हजार माणसे मृत्युमुखी पडली. हजारो जखमी झाली. दंगलखोरांनी हातात कुराडी तलवारी हातोडी कोयते काठ्यांनी दहशत बसवली. निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे पायपीट करत तर कधी-कधी बैलगाडीतून आगडीतून सैन्याच्या देखरेखीखाली तर कधी देवावर व देवावर हवाला ठेवून येत होती. नेहरूंनी विमानातून एक लक्ष लोकांच्या दहा मैल लांबीचा निर्वासितांचा काफिला पाहिला. या निर्वासितांना उन्हाळा पाऊस पूर कडक वाजणारी थंडी यातून मार्ग काढावा लागत होता. आजूबाजूच्या वातावरणात धुळीचे लोट, भीती, मानवी मलमूत्राची दुर्गंधी, सडणारी प्रेते होती. 31 ऑक्टोंबर नंतर हा हिंसाचार आणखीन वाढला.

2 सप्टेंबर 1947 ला गांधीजींनी उपोषण करताच दोन्हीकडच्या दंगलखोरांनी गांधीजीकडे रांग लावून शस्त्रे खाली ठेवली. हिंदू-मुस्लीमांनी शांतता प्रस्थापित करण्यासाठी एकत्र मिरवणुका काढल्या. काँग्रेस,मुस्लीम लीग, हिंदुमहासभा इत्यादी नेत्यांनी एकत्र येऊन 17 जानेवारी 1948 ला मध्यवर्ती शांतता समिती स्थापन केली यात काँग्रेसचे पुढारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रतिनिधी जमाते उलेमा तसेच शिखांचे प्रतिनिधी होते. या समितीचे नेतृत्व डॉक्टर राजेंद्र प्रसाद होते. त्यांनी गांधीजींना शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिल्याने गांधीजींनी उपोषण सोडले. याच वेळी काही लोक गांधीजी मुस्लिमांचा अनुनय करतात अशी टीका करावयास सुरुवात केली. 20 जानेवारी 1948 मदनलाल या पंजाबी निर्वासितांने गांधीजी प्रार्थना सभेत असतांना बिल्किस हाऊसमध्ये बॉम्ब फेकला तो गांधीजींच्या जवळ फुटला. सुदैवाने ते बचावले. पण गांधीजी आपल्या कार्यापासून मात्र विचलित झाले नाहीत. 30 जानेवारी 1948 च्या संध्याकाळी तरुण ब्राह्मण नथुराम गोडसे यांनी प्रार्थनेच्या वेळी गांधीजींवर गोळी झाडली. गांधीजींच्या मृत्युने शोकसागर उसळला. अल्बर्ट आईन्स्टाईन, नेहरू-पटेल यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

सारांश

गांधीजींनी आपल्या हयातभर सत्य अहिंसेचा सत्याग्रहाच्या मार्गाने अन्यायाचा प्रतिकार केला. इंग्रजी दैनिक स्टेटसमन यांनी म्हटले की, गांधीजींनी उपोषणाचा(या शास्त्राचा) वापर योग्य कामासाठी तसेच सामान्य जनतेच्या सद्सद्विवेकबुद्धीला परिणामकारक आव्हान करण्यासाठी केला. वर्षानुवर्षे आम्हाला उपवासाचा राजकीय हत्यार म्हणून उपयोग करण्यामागची नैतिकतेची गांधीजींची भूमिका पटली नव्हती. द्न्गाल्र् स्ताना शांतेच्या मार्गावर आणणे सोपे नव्हते. नैतिक अधिष्ठान प्राप्त गांधीजीच ते करू शकले. भारताला स्वातंत्र्य

 ISSN 2231 4342

मिळाल्यानंतर एकीकडे राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी दिल्लीत गर्दी करणाऱ्या नेत्या पेक्षा गांधीजींचे नेतृत्व इथे त्यांना इतरांपासून वेगळे असल्याचे जाणवते.

निष्कर्ष

गांधीजींनी फाळणीपूर्व व फाळणीनंतर उसळलेल्या दंगलींना शमवण्याचे कार्य ्यांनी मनापासून केले. त्यात त्यांना बऱ्याचअंशी यशही आले. स्वातंत्र्यासाठी लढा देणारे गांधीजी आणि स्वातंत्र्य मिळूनही जनतेला सांत्वन देण्यासाठी त्यांचे दुःख कमी करण्यासाठी वणवण फिरणारे गांधी अधिक भावतात. नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे गांधीजींचा प्रभाव फक्त त्यांना मानणाऱ्या पुरता मर्यादित नव्हता तर जे त्यांच्या मताशी असहमत आहेत व त्यांच्यावर टीका करतात त्यांच्यापर्यंत होता. गांधीजींनी निर्वासितांना छावण्यांमध्ये जाऊन त्यांचे दुःख कमी केले. मुस्लिमांना आश्वस्त केले, भारतीयांना प्रेम द्या शांति क्षमा यांचे महत्त्व आपल्या आचरणातून पटवून दिले.

संदर्भ साधने

1 हरिजन 26 सप्टेंबर 1946 कॉलेक्टेड वर्कस ऑफ महत्मा गांधी खंड 92 पृ 229

2 Ramachandra Guha "India after Gandhiji"

3. अलोक भल्ला, स्टोरीज अबाउट द पार्टिशन ऑफ इंडिया

4. अनिता इंदर सिंह, द पार्टिशन ऑफ इंडिया

5. ज्ञानेंद्र पांडे, रेमेंबरिंग पार्टिशन वॉयलेस अँड हिस्ट्री इन इंडिया

6.ग्रोवर बि एल, आधुनिक भारताचा इतिहास

7. कलेक्टर वर्क्स ऑफ महात्मा गांधी खंड 92 पृ 139

ISSN 2231 4342

राजर्षी शाहू महाराजांचे सत्यशोधण

डॉ. विजय रामदास तिरपुडे
इतिहास विभागप्रमुख
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय
अंजनगांव सुर्जी जिल्हा.अमरावती
मो.८८८८७०३१३५

म. फुलेंने १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथापी त्यांच्या निधनानंतर या समाजाच्या कार्याची गती मंदावली गेली. नारायण मेघाजी लोखंडे यांनी आपल्या परीने समाजाचे कार्य चालू ठेवले होते पण १८९७ मधील त्यांच्या दुर्दैवी निधनाने तेही थंडावून गेले. दरम्यान कोल्हापुरातील वेदोक्त प्रकरण सर्व महाराष्ट्रभर गाजले. ब्राम्हणशाहीच्या उद्दाम वृत्तीने संघर्ष करणाऱ्या सत्यशोधक समाजाच्या पुनरूज्जीवनची बहुजन समाजातील विचारवंतांना व पुढा-यांना आवश्यकता भासू लागली. परिणाम १९१० साली मुंबईत महर्षी वि.रा.शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची पुनस्थापना करण्यात आली. आणि १९११मध्ये महात्मा फुल्यांचे सहकारी रामय्या अय्यावारू यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधक समाजाची परिषद आयोजित केली गेली, या परिषदेत म. फुलेंच्या तत्वानुसार सत्यशोधक समाजाची ध्येय, धोरणे जाहीर करण्यात आली. त्यामध्ये सर्व मानव ईश्वराची लेकरे असून त्याला प्रसन्न करण्यासाठी कुण्या मध्यस्थाची गरज नाही, हे प्रमुख सत्यशोधकी तत्व घोषीत केले गेले.

महाराष्ट्र सत्यशोधक समाजाच्या पुनरुज्जीवनाचे वारे सुरु झाले असता कोल्हापुर सारखे बहुजन समाजाचे अस्वस्थ केंद्र त्यास अपवाद म्हणून राहाने शक्य नव्हते. भास्करराव जाधव, अन्नासहेब लठ्ठे या सारखे सत्य शोधकी बुद्धिमत आणि बहुजनाचा कैवार घेणारे खुद्द छत्रपती शाहू महाराज यांच्या अस्तिवातने कोल्हापुरची भूमि सत्यशोधक चळवळीच्या पुनुजिवानस विलक्षण अनुकूल बनली होती.कोल्हापुर सत्यशोधक समाजाच्या झालेल्या स्थापने ला वेदोक्त प्रकारानें पश्वार्भुमी लाभली होती. १९ व्या शतकाच्या अखेरीस सुरु झालेल्या वेदोक्त प्रकरणने कोल्हापुरातील वातावरण ढवलून निघाले व ते अतिशय गढुळ झाले.

११ जानेवारी १९९१ रोजी कोल्हापुरात सत्यशोधक कार्यकर्तची सभा होऊन श्री.शाहू सत्यशोधक समाज स्थापन करण्यात आला. भास्करराव जाधवाची अध्यक्ष म्हणून तर अन्ना साहेब लठ्ठे यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. शाहू महाराजाची केवळ समंतीच नव्हे तर पूर्ण सक्रीय प्रोत्सहन या कार्यास मिळाले होते, हे त्यानी पूढे सत्यशोधक समाजास केलेल्या सहाय्य वरून स्पष्ट होते. कोल्हापुरातिल सत्यशोधक नेत्यानी आपल्या सत्यशोधक समाजाचे नावही श्री.शाहू सत्यशोधक असे ठेवले. तेव्हा त्यांच्या पाठीमागची प्रेरणा महाराजाची होते,हे उघड आहे.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

महाराजांचे नाव जरी सत्यशोधक समाजाचा जोडले असले तरी त्यांची चळवळ पुढे सत्यशोधक चळवळ या नावानेच प्रसिद्धीस आली राजर्षी शाहूंनी सत्यशोधक चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतला नाही एका संस्थांचे अधिपती हे त्यांचे राष्ट्रीय स्थान विचारात घेता त्यांना अशा प्रकारच्या चळवळीत प्रत्यक्ष सहभागी होणे शक्य नव्हते परंतु महाराजांनी सत्यशोधक चळवळीला नेहमी उत्तेजन पाठिंबा दिला होता बाबूराव यादव हे कोल्हापुरातील एखाद्याची सत्यशोधक कार्यकर्ते होते आपले धार्मिक विधी ब्राह्मण पुरोहिताशिवाय करायचे हे तत्व प्रत्यक्ष आचरणात आणायचे ठरवून त्यांनी आपल्या घरी मराठा पुरोहिताकडून वेदांत पद्धतीने २१ ऑगस्ट १९९३ रोजी कोल्हापुरातील पहिली श्रावणी करून आणली ही वार्ता बाहेर पडताच ब्राह्मण वर्गात मोठी खळबळ माजली त्यादिवशी बाबुराव यादो नानासाहेब मुळीक प्रभूती मराठा समाजातील सुमारे १५० लोकांनी एकत्र येऊन एका जाहीर पूजेच्या विधी घडून आणला या विधीच्या शेवटी ब्राह्मण पुरोहित शिवाय मतदार यादीतून बहुजन समाजाच्या मनाची मुक्तता होवो अशी सार्वजनिक करण्यात आली सत्यशोधक कार्यकर्त्यांच्या या कृत्याचे अनुकरण कोल्हापुरात ठिकाणी होऊ लागले युरोपात काचेच्या किल्ला आपल्या हाती ठेवणाऱ्या रोमच्या पोषण विरुद्ध बंड पुकारले तसे ते हिंदू स्वर्गाच्या किल्ला आपल्याजवळ ठेवण्यात आल्या पाटगावचामौणी महाराजांच्यापीठावर श्रात्र जगद्गुरुची स्थापना करण्याचा महत्त्वाचा निर्णय ही महाराजांनी घेतला शाहु महाराजांनी श्रात्र जगद्गुरुची केलेली प्रतिष्ठापना हा खरे तर प्रतिस्पर्धावर मात करण्याचा डावपेचा चा एक भाग होता. ब्राह्मण पुरोहितांच्या मक्तेदारीला आव्हान देण्याचा एक मार्ग म्हणून त्यांनी शात्र जगद्गुरुचे पद निर्माण केले होते. महाराजांनी सत्यशोधक समाजास केलेल्या सह्यामध्ये एक लक्षणीय साहाय्य म्हणजे त्यांच्या प्रेरणेने सुरु झालेले सत्यशोधकजलसे, याजलशातून अन्य जनतेचेही मोठे समाज्रबोधन होई. देव व मानव यांच्यामध्ये ब्राह्मण पुरोहिताची गरज नाही हे म.फुलेंचे सत्यशोधकी तत्व जनतेवर ठसवले जाई. प्रबोधनकार ठाकरे म्हणतात.सत्यशोधक जलशांमुळे गावोगावी भिक्षुकांच्या मध्यस्थीशिवाय साध्या हारांच्या अर्पणावर खेडू तांची लग्ने सर्वत्र साजरी होऊ लागल्यामुळे भिक्षुक वर्गात मोठीच खळबळ उडाली. ठिकठिकाणी जोशी वतनाच्या हक्काच्या जोरावर तसली लग्ने करणाऱ्यावर फिर्यादी होऊ लागल्या. या बातम्या वृत्तपत्रात येताच शाहू महाराजांनी त्या त्या ठिकाणच्या ब्राह्मणेतर वकिलांना हे खटले लढवायला खर्च देऊन रवाना करण्याची तरतूद चालू केली. वकिलांना हे काढले वाढवायला खर्च देऊळ तेव्हा सगळ्यांची तर तू चालू केली.

सत्यशोधक समाजाची विचारप्रणाली शाहू महाराजांनी खऱ्या अर्थाने आत्मसात केली होती. त्या विचारसरणीचा मुख्य आशय सामाजिक समता हा होता. म. फुलेंनी ब्राम्हणांवर केलेली टीका, पुरोहितशाहीला विरोध केला याचे कारण त्यांचा सामाजिक समतेचा आग्रह हेच होते.

सातारा जिल्हात वऱ्हाड येथे १९२० मध्ये सत्यशोधक समाजाची परिषद मुकुंदराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. वऱ्हाड मधील ब्राह्मण वर्गांना येथील मामलेदाराच्या मदतीने १४४ कलम लावून या परिषदेवर बंदी आली होती. पण संशोधकांची साताराच्या मॉ य या कलेक्टराकडे तक्रार करून ही बंदी उठविली

 ISSN 2231 4342

व परिषद यशस्वी केली. माय साहेबांची सत्यशोधकांना सहानुभूती होती म्हणून हे शक्य झाले. भाऊराव पाटलांच्या सत्यशोधक जलशा ने ग्रामीण भागात धमाल उडवून मोठी लोकप्रियता मिळवली होती.

अशाप्रकारे शाहू महाराजांच्या प्रेरणेने व सहाय्याने सत्यशोधक समाजाचे खरे पुनरुज्जीवन होऊन कोल्हापूर संस्थानातच नव्हे तर संस्थानाच्या बाहेर सातारा, पुणे, नगर, खानदेश, वऱ्हाड इ. महाराष्ट्राच्या अनेक भागात सत्यशोधक चळवळ फोफावत केली. वऱ्हाडातही ही चळवळ शाहू महाराजामुळेच वाढत गेली.

ब्राह्मण पुरोहितांविरूध्द व शंकराचार्या विरुध्द बंड केले पाहिजे असा ठरावा या सभेत संमत केला गेला . सत्यशोधक कार्यकर्त आता धीट बनून त्यांनी लग्नासारखे विधी ब्राह्मण पुरोहिताशिवाय करण्याचा सपाट लावला ब्राह्मण पुरोहितास बाजूला सारून आपल्याच जातीच्या पुरोहितांकडून आपले धार्मिक विधी करण्याचा लाट कोल्हापुरात उत्पन्न होऊन ती संस्थानातील खेडयापाडयात पसरू लागली . त्यातून मराठा पुरोहितांना प्रशिक्षण देण्याची कल्पना पुढे आली.जुले १९१३ मध्ये कोल्हापुरात सत्यशोधक शाळा स्थापन केली गेली. त्यास महाराजा शाहु कडून साहाय्य प्राप्त केली गेली. दरम्यान कोल्हापुरातील डांबर प्रकरणानेही चळवळ काही काळ थंडावली. पण १९१६ मध्ये पुन्हा ही चळवळ गतिमान झाली. १९१६ च्या सुमारात महाराजांनी सत्यशोधकी मतानुसार चालणारे एक मिश्र भोजन गृह कोल्हापुरात चालू करण्याचे ठरविले. त्यामुळे बाहेर गावाहून येणाऱ्या सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांची कोल्हापुरात भोजनाची उत्तम सोय होऊ लागली होती.

सत्यशोधक समाजाच्या कार्याला छत्रपतीची केवळ मूकसंमती होती असे नाही तर त्यांनी त्या कार्याला सक्रीय पाठींबाही दिला होता. सत्यशोधकसमाजाची स्थापना झाल्यावर त्या संघटनेला कोल्हापुरात इमारत बांधण्यासाठी देणगी म्हणून जमीन दिली होतो. याशिवाय सरकारी नोकरीत असलेल्या आणखीही काही व्यक्तींना त्यांनी सत्यशोधक समाजाचे काम करण्यात मोकळीक दिली होती. कोल्हापुरातील शोध कवी शाहीर लहरी हैदर हे महाराजांच्या खास विश्वासातील होते त्यांनी हैदर व त्यांचे शिक्षण आपल्या काव्यातून सत्यशोधकी मताचा समाजात प्रसार करीत महाराजांनी त्यांनी अशी भजने म्हणण्याची कायमची सोय व्हावी म्हणून साहाय्य केले 1920 सानी शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाच्या कार्याला पूरक होणारे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले राजवाड्यातील देव-देवतांच्या पूर्वजांच्या समाधीच्या पूजा आजवर जा ब्राह्मण पुरोहिताकडून होत होत्या त्या बंद करून मराठा पुरोहित आता कडून सुरू करण्याचा हुकुम दिला. जगद्‌गुरु चा पाठ संस्थानातील आणि वाडी रत्नागिरीतील ज्योतीच्या देवस्थानातील ब्राह्मण पुजारी यांना काढून टाकून त्या जागी मराठी पुजारी नेमले मराठा पुरोहित तयार करण्यासाठी खास प्रशिक्षण शाळा स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला, आणि सहा जुलै 1950 रोजी शिवाजी वैदिक पाठशाला या नावाची वैदिक शिक्षण देणारी संस्था स्थापन झाली.

निष्कर्ष

महात्मा फुले यांनी १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली तथापि त्यांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाची कार्याची गती मंदावत गेली जेव्हा 11 जानेवारी 1911 रोजी कोल्हापुरात पुन्हा राजेश्री

ISSN 2231 4342

सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि प्रस्ताव विरुद्ध बंड पुकारले ब्राह्मण पुरोहित पुरोहिताशिवाय लग्नासारखी विधी होऊ लागले पुन्हा सत्यशोधक शाळा सुरू केली सत्यशोधकी मतानुसार चालणारे मिश्र भोजन कोल्हापुरात सुरु झाले सरकारी नोकरांना सत्यशोधक समाजात काम करण्याची परवानगी दिली अनेक ठिकाणच्या ब्राह्मण पुरोहितांना काढून त्याच्या जागी मराठा पूर्वी त्यांची नेमणूक केली राजश्रीच्या आशा या निर्णयामुळे भिक्षुक वर्गात मोठी खळबळ उडाली पंधरा वर्षे हे कार्य सामाजिक समतेचा आग्रह होता त्यांच्या कार्यामुळे लेखांमध्ये सामाजिक समतेची जाणीव निर्माण झाली अस्पृश्योद्धार सरकारी नोकरीत रीजर्वेशन मोफत शिक्षण अशा ऐतिहासिक कार्यामुळे राजर्षी शाहू महाराज महाराज शुक्रतारा प्रमाणे या देशातील झालेले आहेत

संदर्भग्रंथ :

1) खराट संभाजी : सत्यशोधक चळवळ वाटचाल आणि चिकित्सा –प्रतिभा प्रकाशन पुणे.
2) मुलटे वासुदेव : सार्वजनिक सत्यधर्म स्वरूप प्रकाशन औरंगाबाद
3) पाटील व्ही.बी.: 20 व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास के सागर पब्लिकेशन्स
4) पवार जयसिंगराव : राजर्षी शाहू स्मारक महाराष्ट्र इतिहास, कोल्हपुर

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

अहमदनगर किल्ला व तेथील राजकीय बंदिवान – ऐतिहासिक अभ्यास

प्रा. डॉ. जाधव बबन भिवसेन
शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये कॉलेज
कळंबोली,
नवी मुंबई, 410218.
Mobile No.- 8779023296
Email id- jadhavbaban21gmail.com

अहमदनगर किल्ला व त्याचे नाव: अहमदनगरचे नाव निजाम शाहीचा संस्थापक अहमदशहा यांच्या नावा वरून दिले. याशिवाय वजीर, काझी व कोतवाल यांचे ही नाव अहमद होते. त्यामुळे मलिक अहमदने आपल्या नव्या राजधानीचे नाव अहमदनगर ठेवले. त्याकाळी या नगरीची तुलना बगदाद, कैरो या सारख्या तत्कालीन सुंदर नगरांशी झाल्याचे उल्लेख इतिहासात सापडतात. 'निजामशाही', 'मोगलाई', 'पेशवाई', 'ब्रिटिश' अशा अनेक राजवटी याकिल्ल्यानं अनुभवल्या. राजवटीनुरूप या वास्तूच्या जडणघडणीत बदल घडले. निजामांनी या किल्ल्यात वास्तव्य केले. मोगलांनी किल्ल्याचा सामरिक वापर केला. तर ब्रिटिशांनी याकिल्ल्याचा वापर कारागृह आणि दारूगोळा निर्मिती केंद्र म्हणून केला. अहमद निजाम शहा याने सीना नदी काठी पूर्वीच्या भिंगार शहराजवळ बहामनी सरदार जहांगीर खान वर ता. ३ रज्जबसन ८९५ हिजरी (२८ मे, इ.स. १४९०) रोजी अजमखान वगैरे सरदार बरोबर घेऊन सैन्यावर एकाएकी छापा घातला व सेनापती जहांगीर खान, सय्यद इसहाक व निजाम खान अशा सर्वांची कत्तल केली. ज्या जागी जय मिळाला तेथे एक इमारत बाग तयार करून त्यास बाग निजाम असे नाव दिले. हा अहमदनगर किल्ल्याचा प्रारंभ होय. येथेआपली मुख्य रहाण्याची जागा करून त्यास दगड, विटांचा तट तया रकेला. त्यावेळेपासून यास कोटबाग निजाम असे नाव पडले. हेच अहमदनगरच्या किल्ल्याचे जुने नाव होते.

तिसरा बादशाह हुसेन निजामशहा यांनी अहमदनगरचा कच्चातट पाडून त्याजागी एक भव्य, उत्तम चिरेबंदी किल्ला व दगडीतट निर्माण केला व त्याभोवती एक खोल खंदक तयार केला. अबुलफजल या इतिहासकाराने किल्ल्याच्या तटाचे व खंदकाचे अकबरनाम्यात असे वर्णन केले की, तटाचे दगड निळसर रंगाचे असून तटाची उंची 27 गज आहे. खंदकाची रुंदी तीस ते चाळीस गज असून खोली सात गज आहे. तोच हल्लीचा शहराच्या पूर्व दिशेला असलेला प्रस्तुत भुईकोट किल्ला होय. हा किल्ला इ. स. १५६० च्या सुमारास बांधला. किल्ल्याचा केवळ सर्वातवरचा भाग रस्त्यावरून दिसतो, उर्वरित भाग दिसून येत नाही.

किल्ल्याचा जुना नकाशा : अहमदनगरच्या किल्ल्याचा एक जुना नकाशा 'मुजदे अहमदनगर' नावाच्या एका उर्दू पुस्तकात प्रसिद्ध आहे व तो अहमदनगरच्या काजी साहेबा जवळ असलेल्या 'तवारी खशहाबी'

वरून उतरला आहे. प्रस्तूत नकाशा कवि जंगाने मोगलांच्या कारकीर्दीत तयार केलेल्या नकाशावरून घेतला असे सांगण्यात येते.



किल्ल्यातील इमारती व बुरूज: किल्ल्यास चोवीस बुरूंज होते. आतील पहारा, मध्य भागचा राजवाडा, जुन्या इमारती, गगन महाल, मुल्क आबाद, दिलकशाद वगैरे महाल, हबशी खाना, चाऊस खाना, सैनिकांच्या इमारती, 4 विहिरी होत्या. इमारतींच्या मध्यभागी एक मदरसाही बांधला होता. या मदरशातच राजघराण्यातील मुलांचं शिक्षण होत असे.

याकिल्ल्याचा दरवाजा एका बुरूजात आहे. इतर किल्ल्यां प्रमाणे येथे दरवाजाच्या दोन्ही बाजूंस दोन बुरूंज नाहीत. खंदक ओलांडण्यास एक पूल आहे. ब्रिटिशांच्या काळात एक झुलता पूल तयार करण्यात आला होता. झुलता लोखंडी पूल 1832 मध्ये ब्रिटिश इंजिनियर कर्नल जेकब यांनी तयार केला होता. किल्ल्यात जाण्यास पुढील दरवाजाच्या आत दुसरा एक दरवाजा आहे. किल्ल्यात सात महाल होते. किल्ला अस्तित्वात येण्या पूर्वी व अहमदनगर शहर वसवण्यापूर्वी जहांगीर खानावर विजय मिळाल्यानंतर अहमदशहाने जी पहिली इमारत तयार केली तिलाच सोन महल म्हणत असत. या महालासाठी पाण्याच्या सोयीसाठी कापूरवाडी व शहापूर येथून पाण्याचे नळ आणले होते. मुल्क आबाद हा महाल अहमदशहाने सर्वात उंच असा बांधला होता. मीना महाल व रूप महाल हुसेनशहाच्या वेळेस तयार झाले असावेत.

ISSN 2231 4342



त्याकिल्ल्यातील बहुतेक इमारती व महाल अहमदशहा, बुरहान शहा व हुसेनशहा या बादशहांच्या काळात तयार झालेले आहेत. किल्ल्यावर पाण्याच्या सोयी साठी गंगा, जमुना, मच्छली बाई, शक्कर बाई अशा चार विहिरी होत्या. अहमदनगर किल्ल्याचा परीघ एकूण 01 मैल व 80 यार्ड (1683 मीटर), तो दीर्घवर्तुळाकार असून त्याची उंची 85 ते 180 फूट असून खोली 14 ते 20 फूट आहे. खंदकाच्या बाहेरच्या बाजूस उंच मातीच्या टेकड्या आहेत.

किल्ल्यावर शत्रूचे आक्रमणे: किल्ला भक्कम होता. परंतु शत्रू पक्षाने वेळोवेळी फितुरीकरून किल्ला जिंकलेला दिसून येतो. चांदबिबीच्या वेळी किल्ल्यास जे दोन वेढे पडले ते सर्वांत महत्त्वाचे होते. पहिला वेढा नोव्हेंबर १५९५ पासून फेब्रुवारी १५९६ महिन्यापर्यंत शहाजादा मुराद यांनी दिला होता. त्यावेळी सुलताना चांदबिबी हिने अतुलनीय पराक्रम गाजवून वेढा उठवून मोगलास तह करण्यास लावले. दुसरा वेढा इ. स. १६०० च्या जुलै महिन्यात शहाजादा दानियल यांनी दिला. त्यावेळी आपसातील भाऊ बंदकीमुळे चांदबिबीचा खून झाला व अहमदनगरच्या किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला. तो तसाचइ. स. १७५९ पर्यंत होता. मध्यंतरी मलिक – अंबर यांनी काही दिवस तो आपल्या ताब्यात घेऊन निजामशाही राज्य चालविले होते. त्यांच्या सोबत शहाजी राजे भोसले हे ही होते. पुढे इ. स. १७५९ मध्ये मोघलांचा सरदार कवीजंग याला वैयक्तिक जहागिरी बहाल करून पेशव्यांनी कोणत्याही रक्त पाता विना, मुत्सुद्देगिरीनं हा किल्ला पेशवाईच्या अंमलाखाली आणला. पेशव्यांनी तो दत्ताजी शिंदे यांच्याकडे दिला होता.

ड्यूक ऑफ वेलिंग्टन: पुढे इ. स. १७९७ मध्ये किल्ला शिंदे यांचे ताब्यात गेला व त्यांचे ताब्यात असताना अहमदनगरच्या किल्ल्यासंबंधी तिसरी महत्त्वाची गोष्ट घडली. १२ ऑगस्ट १८०३ रोजी जनरल वेलस्ली, जे पुढे 'ड्यूक ऑफ वेलिंग्टन' या नावाने प्रसिद्धीस येऊन ज्याने नेपोलियनास जिंकले, त्याने किल्ला सर केला. ९ ऑगस्ट १८०३ रोजी जनरल वेलस्लीने किल्ल्याकडे मोर्चा वळविला व किल्ल्याच्या भिंतीपासून चारशे यार्डावर एक मातीचा बुरूज बांधून त्यावरून तोफांचा मारा सुरू केला. दि. १० ऑगस्टला किल्ल्यात शिंद्यांचा मलबा दादा कुलकर्णी चांभार – गोंदेकर हा होता व दोन पलटणी होत्या. ती फितूर झाली. इंग्रजांनी शिंद्यांचे गोलंदाज फोडले.

त्यामुळे दगा झाला. दि. ११ ऑगस्टपर्यंत जनरल वेलस्लीने किल्ल्यावर मारा चालू ठेवला . मलबा दादा कुलकर्णी याने तह करण्यासाठी दोन माणसे पाठविली. त्यात त्याने' त्याला आपल्या सामानासह बाहेर पडू देणे व सैन्यासही बाहेर जाऊ देणे' अशा मागण्या केल्या. त्या वेलस्ली ने मान्य केल्या. दि. १२ ऑगस्ट रोजी मलबा दादा आपले ४०० सैनिकांसह व सामानासह बाहेर पडला व जनरल वेलस्ली किल्ल्यात शिरला. याहल्ल्यात शिंद्यांचे चौदाशे सैनिक इंग्रजांनी पकडले, असे अलिसन या इंग्रज ग्रंथकाराने म्हटले आहे . अहमदनगरच्या अभेद्य किल्ल्यावर मारा करून तो जिंकणे, ही सोपी गोष्ट नव्हती . त्यासाठी इंग्रजांना भेदी माणसाची जरूरी होती त्याच वेळी भिंगारचे रघुराव बाबा देशमुख यांनी चार हजार रुपये घेऊन किल्ल्याच्या माऱ्याची जागा दाखविली. ड्यूक ऑफ वेलिंग्टनने किल्ला सर झाल्यावर ज्या चिंचेच्या झाडाखाली उपाहार केला ती जागा सरकारने कायम ठेवली आहे व यागोष्टीचे कायम स्मारक म्हणून तेथे तोफा रोवून ठेवल्या आहेत. यानंतर तह नाम्याप्रमाणे किल्ला पुन्हा मराठ्यांचे ताब्यात आला. परंतु इ. स. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाल्यावर तो इंग्रज सरकारच्या ताब्यात गेला. ब्रिटिशांच्या काळात किल्ल्यात बरेच बदल झाले. किल्ल्याच्या पूर्वेला असलेला झुलता पूल १९३२ साली ब्रिटिशांनी बांधला. काडतुसे निर्मितीची प्रयोगशाळा किल्ल्यात उभारली. तिला 'रॉकेट रूम' जायचं.

अहमदनगरचे किल्ल्यातील राजकीय बंदिवान-अहमदनगरचा किल्ला हा निजामशाही मध्ये राजनिवासाची मुख्य वास्तू असल्याने तेथे बंदिवानाना ठेवीत नसत; पण पुढे निजाम शाही नष्ट झाल्यावर किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला, तेव्हापासून राजकीय बंदिवानांचे ते एक स्थान झाले. पेशव्यांचे कारकीर्दीमध्ये याकिल्ल्यामध्ये राजकीय कैदी नेहमी ठेवण्यात येत असत शिक्षणासाठी मदरसा असलेल्या ठिकाणी राजकीय बंदीयांना ठेवण्यात आले. ऐतिहासिक कागदपत्रावरून येथे कोणकोण बंदिवान होते, त्याचा उल्लेख : (१) संभाजी महाराजांची पत्नी येसुबाई - ' येसुबाई व तिची मुलगी भवानी बाई या दोघीस १६८१-८२ मध्ये दिलेर खानाने नगरचे किल्ल्यात पकडून ठेवले . संभाजीने सोडविली' (जदुनाथ सरकारकृत - ' औरंगजेब') औरंगजेबाची बंदिवान असताना येसुबाई दुसऱ्यांदा या किल्ल्यात होत्या . किल्ल्यामधून त्यांनी चिंचवडकर देवास लिहिलेले पत्र हृदयाला चटके देणारे आहे . ' वैशाख शुद्ध पंचमी गुरुवार जाणवून अहमदनगर दुर्गात स्वामींच्या आशीर्वाद करून यथास्थित असे ... चिरंजीव दाजी (शाहूमहाराज) तर पृथ्वी पति (औरंगजेब) समागमे गेले . आम्हास सार्वभौमाची आशा झाली की, ' अहमदनगरास जावे' आज्ञेप्रमाणे आम्हास अहमदनगरास घेऊन आले ... तेथे अहमदनगरी साहुकाराचे पाचसात सहस्त्र ब्रह्मस्य (कर्ज) झाले आताकोणी देत नाही . मागच्याच पैक्यास तगादे लाविले आहेत . त्यामुळे बहुत कष्टी होतो . तो दु:सागर स्वामीस काय म्हणवूनल्या हावा. वरील पत्रावरून येसूबाई यांना दैनंदिन खर्चासाठी मोगलांकडून पाहिजे तेवढी रक्कम मिळत नव्हती हे दिसून येते. तसेच औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत येसूबाई नगरचे किल्ल्यात असाव्यात. पुढे शाहूबरोबर बादशाही लवाजम्यासह त्याउत्तरेकडे गेल्या; पण शाहूमुक्त झाल्यानंतर माळव्यातून दक्षिणेकडे आले व मातुश्री येसुबाई दिल्लीस गेल्या.

(२) तुळाजी आंगरे – मराठी राज्याचा समुद्राचे बाजूने बचाव आंगरे करीत होते . इंग्रजांना आगऱ्यांची दहशत होती. आंगऱ्यांची बंदरे भरभराटीतअसून, त्याचे जवळतीस हजार फौज असे. त्यांचा आरमारी तोफखाना जय्यत

 ISSN 2231 4342

होता. त्याचे जवळ साठ जहाजे होती. तुळाजी आंगरे हा अतिशय कर्तबगार व कडवा होता, तथापि मराठा राज्यास सदैव शाप अशी भाऊबंदकी त्यांचे घरात शिरली. तुळाजीचा सावत्र भाऊ मानाजीस नानासाहेब पेशवे यांनी हाताशी धरले. रामाजी महादेव बिवलकर या अतिपाताळ यंत्री गृहस्थास हाताशी धरून तुळजीचा काटा काढण्याचे पेशव्याने योजले आणि सर्वात दुर्दैवाची गोष्ट अशी की, तुळाजीस पकडण्यासाठी, रामाजी महादेव मार्फत इंग्रज घरात घेतले. इंग्रजांनातेच पाहिजे होते . इंग्रजाने तुळजीचे म्हणजे मराठ्यांचे आरमार जाळले. तुळाजीस धरले. त्याची सर्व जिंदगी लुटली . याकामगिरीबद्दल नानासाहेब पेशव्याने बाणकोट व दासगाव इंग्रजांना दिले! शिव छत्रपतींनी उभारलेले मराठी आरमार बुडवून इग्रजांना घरात घेणे, हा कायमचा कलंक इतिहासकार नाना साहेब पेशव्यांचे माथी मारतात. तुळाजीस कैद केल्यावर बेडी घालून प्रथम विसापूर, चाकण, दौलताबाद व काही दिवस नगरच्या किल्ल्यात ठेवले होते.

(३) सदाशिवराव भाऊ पेशव्याचा तो तया : हाइ . स . १७६७ मध्ये नगर किल्ल्यांत बंदिवान होता . त्यास उपोषणादि दु:खे देऊन येथेच मारले.

(४) (a) मोगलकाळाप्रमाणेच पेशवे काळ यातही किल्ल्याचा उपयोग तुरुंग म्हणून केला जाऊ लागला. 1763-64 ला अहमदनगर किल्ल्यात बाट्या भिल्ल धोपल गावकर, सरीफखान मुसलमान नगरकर, पदाजी शेट या नगरक व चांभार मौजे घोरगावकर येथील एक चांभार अशा चौघा व्यक्तीचे 1-1 हात अहमदनगरच्या किल्ल्यात तोडण्यात आले.

(b) पेशवाईतील प्रसिद्ध सरदार सखाराम हरी गुप्ते — याला नाना फडणवीस यांनी बेडी घालूनइ. स. १७७६ मध्ये नगरचे किल्ल्यात ठेवले.

नाना फडणवीस यांनी किल्ले दाराला जे पत्र पाठवून सूचना देऊन पत्र पाठविले, त्यात' त्यास पक्के बंदोबस्ताने ठेवून भोजन घालीत जावे . प्रभु कारकून जवळ जाऊन देणे ... जेवणाची व वस्त्राची आबाळ न करणे सखाराम हरी' खेळ्या' कारभारी आहे . कोणे गोष्टीस चुकणार नाही . याकरिता एक कोठडी करून बाहेरून कुलूप लावणे .... याकरिता फार चांगला बंदोबस्त ठेवणे'.

(५) चिंता विठ्ठल रायरीकर — हा राघोबा दादा पेशवे याचे पक्षाचा होता . त्याला नगरचे किल्ल्यात कैदेत ठेवले.

(६) नाना फडणवीसाचे चुलत भाऊ मोरोबा दादा फडणवीस याचे व नानाचे लहानपणापासून कौरव — पांडवां सारखे वाकडे होते . मोरोबा दादा फडणीशी वरयेऊन ये हे नानांचे कारस्थान . 'अंगी योग्यता असून मोरोबाला जन्मभर विपत्ती भोगावी लागली .इ. स . १७७८ मध्ये मोरोबा दादास कैद करून नगरचे किल्ल्यात ठेवले . तेथे त्यांची थोडी थोडकी नव्हे, तर बावीस वर्षे गेली . नगरचा किल्ला पेशव्यांनी दौलतराव शिंद्यांचे द्यावयाचे ठरविले . त्यावेळी मोरोबाने त्रागा केला, कारण त्यास आतून बाजीराव पेशव्यांची फूस होती. 'प्राण देईन पण येथून हलणार नाही' असे मोरोबाने बजावले .शेवटी त्याला जबरदस्तीने तेथून हलवायचे अशी कारवाई सुरू झाल्यावर

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

त्याने शिखा, सूत्र व वस्त्रे टाकून किल्ल्याखाली येऊन परमहंस दीक्षा घेतली, उपोषणे करू लागला. राहुरीत येऊन राहिला व' उचलले तर प्राण त्याग करीन' अशी धमकी दिली व संन्यास घेतला; पण रागाने घेतलेला संन्यास हा शास्त्र सम्मत नाही, असा निर्णय घेऊन संन्यासावस्थेतच त्याला रतनगडला हलविले व शिद्यांचे निशाण नगरवर लागले.

(७) इतरांना या किल्ल्यांत कैदेत पाठविणाऱ्या नाना फडणीसाला याच किल्ल्यात त्याचे ललाटी कैद येईल, अशी कल्पनाहीन सेल. नाना फडणीस हे पेशवाईत 'नवकोट नारायण' म्हणून प्रसिद्ध होते . त्यांच्या संपत्तीवर शेवटचे बाजीराव, दौलतराव शिंदे यांचा डोळा होता . यासर्वाचे हातातील मराठा राज्य 'शेवटची घटक' मोजीत होते . कोणाचा पाय पोस कोणास उरला नव्हता. नानाला पकडावयाचे याकटाची सिद्धता दौलतरावाने केली व त्यांच्याशी गोडीगुलाबी सुरू झाली . दौलतराव शिद्यांचा सासरा सर्जेराव घाटगे हा कपट विद्येचा पुढारी होता . नानासारख्या बुद्धिमान व फौजबंद माणसास पकडणे सोपी गोष्ट नव्हती. शिंद्यांचे पदरी मायकेल फिलोज नामक इटालियन सरदार होता. त्याचे कडे ' नानाला जेवावयास बोलवून पकडावयाचे' ही कामगिरी सोपविली गेली. दौलतराव व फिलोज यांनी नानाशी खासगी मसलत करावयाची असे भासवून फौजे पासून दूर काढून त्याला गिरफ्तार केले व त्याच्या बेसावध अरब फौजेचा धुव्वा उडविला. नानाची जिंदगी सर्जेरावाने लुटून फस्त केली व नानाला चार महिने पुण्यातच शिंद्यांचे लष्करात ठेवून बंदिवान म्हणून नगरचे किल्ल्यात ठेवले. इ. स. १७९८ मध्ये नानाचे कडून चांगला ऐवज उपटावा म्हणून त्याला सोडण्यासाठी दोन कोट रुपयांची मागणी दौलतरावाने केली; पण नाना वस्ताद असल्याने त्याने दहा लक्ष रुपये कबूल केले व परत फसणीसीचे जागेवर बसविताच १५ लक्ष अधिक देण्याचे त्याने कबूल केले. या ठरावा नुसार दि. १५ जुलै १७९८ मध्ये नगरचे किल्ल्या मधून नाना फडणीस याला सोडण्यात आले.

(८) शिंद्यांचे जुने दिवाण बाळोबा तात्या व सदाशिव मल्हार हे नगरच्या किल्ल्यात बंदिवान होते . त्यांना उभयतांना पंधरा दिवसांचे अंतरानी देवाज्ञा झाली.

(९) शिंदे बाया पैकी भागिर्थी बाई शिंदे हि लादौलतराव शिंद्यांने विटाळून नगरच्या किल्ल्यात ठेविली. ती नगरला १५.८.१७९९ देवाधीन झाली.

(१०) छत्रपती प्रतापसिंह महाराज (सातारकर) यांचे चिरंजीव शाहूमहाराज (काशीराजे) दुर्वासिंग, परशरामबाबा, भाईसाहेब, राणीसाहेब (परशरामबाबांच्यापत्नी) यांना अटक करून खडकीस नेले . पुढे त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवले व शाहूस पुढे कराचीला पाठविले.


(११) छत्रपती शिवाजी महाराज (चौथे - कोल्हापूर) यांचा हृदय द्रावक मृत्यू- कोल्हापूरचे तरुण शिवाजी महाराज – दत्तक आईचे कारस्थानाने वेडे ठरून त्यांना काठेवाड, निलगिरी, महाबळेश्वर, पुणे इत्यादी ठिकाणी ठेवण्यात आले व शेवटी नगरच्या किल्ल्यातील एका कोठडीत १८८१ मध्ये आणून कोंडून ठेवण्यात आले. शरीर संरक्षक म्हणून ग्रीन नामक एक गोरा दिमतीस देण्यात आला होता . या बंदिवासात महाराजांचा अत्यंत

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

छळ होता . तरी त्याजकडे सरकारने मुळीच लक्ष दिले नाही . २५ डिसेंबर १८८३ रोजी आपल्या मायेचे जवळ कोणी नसलेले, अल्पवयीन महाराज, शरीर संरक्षक ग्रीन याच्या लत्ता प्रहारामुळेच मरण पावले ! हे प्रकरण महाराष्ट्रात फार गाजले व त्यामुळेच टिळक – आगरकरांना डोंगरीवर १०१ दिवसांचा तुरुंगवास भोगावा लागला . प्रेताची वासलत नगर शहरातच लावावी, असे ठरले.

(१२) दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांनी जर्मन कैदी आणून ठेविले होते. त्यांना उत्खनन करण्याची परवानगी दिली. फत्तेबुरूजात त्यांना मनुष्याचा सांगाडा सापडला.

(१३) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील राष्ट्रीय नेत्यांचा पदस्पर्श :अहमदनगरचा किल्ला कारागृह म्हणून पूर्वीही वापरला जात होता. परंतु १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात अखिल भारतीय कांग्रेस कार्यकारिणीच्या पं. नेहरूप्र भृतींना येथे स्थान बद्ध करण्यात आले. ते तीन वर्षे येथे होते. पं. नेहरुनी डिस्कव्हरी ऑफ इंडिया ' (भारताचाशोध) हा मौलिक ग्रंथ लिहिला आणि हे कारागृह एक अद्वितीय ग्रंथाचे जन्मस्थान म्हणून पवित्र क्षेत्र बनले. त्यांच्या स्थानबद्धतेच्या काळातील त्यांचे जीवन याकिल्ल्याच्या भींतीने पाहिले, अनुभविले. त्याला ,काही काळ 'बेईमान झालो पुरापुरा' असे हि वाटले असेल. पण पंडीतजीच्या ग्रंथ लेखन प्रसंगीच्या विचारांचे प्रतिभेचे ,चिंतनशीलतेचा , सहृदयतेचे त्याचे भावदर्शन – न्याहळताना निश्चितच आपण केवढे भाग्यवान आहोत याचा साक्षात्कार झाला असेल.


999

for our individual selves, has been some achievement. "Man's dearest possession is life, and since it is given to him to live but once, he must so live as not to be seared with the shame of a cowardly and trivial past, so live as not to be tortured for years without purpose; so live that dying he can say: 'All my life and my strength were given to the first cause in the world — the liberation of mankind.'"

End

Ahmadnagar Fort
September 7. 1944.
Revised December 1944

Revised 20/9/44
Second revision 31/12/44
AF

डिस्कव्हरी ऑफ इंडिया या पंडित नेहरूंनी बंदिवासाबद्दल स्वत : च माहिती दिली आहे . त्यांनी लिहिले आहे की, ' तीन आठवडे आमचा बाहेरच्या जगाशी संबंध तोडण्यात आला. आम्हास कोणासही भेटू देत नसत. वर्तमानपत्रे देण्यात येत नसत. पत्रे सुद्धा कोणाची येत नसत. रेडिओशी संबंध नाही. इतकेच काय; पण आम्ही

ISSN 2231 4342

यास्थळी बंदिवान आहोत याची ही कटाक्षाने गुप्तता पाळण्यात आली ... 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ मी १९४४ मध्ये एप्रिलपासून सप्टेंबरपर्यंत लिहिला. माझे जे अकरासह बंदिवान होते, ते भाषांचे प्रभुत्व असणारे विद्वान होते . त्यांनी हा ग्रंथ नजरेखाली घालून उपयुक्त सूचना केल्या . मौलाना आझादांची विद्वत्ता पाहून मला संतोष वाटे.'

दुसरे महायुद्ध चालूच आहे. सारे जग भयंकर उद्योगात याभीषण खाईत जळत असताना मी याअहमदनगरच्या किल्ल्यात निरुपायाने पडून आहे. बळजबरीने, सक्तीने मला निष्क्रिय बनविण्यात आले आहे. कधीकधी मी चिडतो, चरफडतो, आदळ आपटकरतो. गेली किती तरी वर्ष किती तरी मोठ मोठी स्वप्ने, मोठ मोठ्या गोष्टी, साहसाचे शुर विचार माझ्या मनात मी खेळवीत आलो. त्यासर्वांचा विचार मनात येतो नि या कोंडीचा संताप येतो. आपण पंच महाभूतांच्या एखाद्या भयंकर उत्पाताकडे ज्याप्रमाणे तटस्थपणे बघतो त्याप्रमाणे मी यायुद्धाकडे त्रयस्थाच्या दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न करितो. परंतु मला यश येत नाही. 1942 हया ऑगस्टच्या आठ तारखेस सायंकाळी गांधीजींनी जे गंभीर शब्द उच्चारले त्यांचे मला स्मरण होते, "जगाच्या डोळ्यात आज घटकेला खून चढला असला तरी आपण शांत व निर्मळ दृष्टीने जगाच्या डोळ्याला डोळा भिडविला पाहिजे".

राष्ट्रीय नेत्यांना अहमदनगरचे किल्ल्यात ठेवले होते, तेथे बाहेर गोऱ्या सोजिरांचा संगिनीसह कडेकोट बंदोबस्त असे. नेत्यांना एकत्र भेटण्यासाठी एक वेगळी खोली होती. त्याखोलीत सर्व जण एकत्र जमत व चर्चा चाले. पंडितजींना बागकामाची आवड असल्याने त्यांनी एक छोटे खानी बगीचा उठविला . याबागेच्या खांदण्यात त्यांना काही मातीत बुजलेले भग्न ऐतिहासिक अवशेष आढळले . पंडितजींचा बंदिवासा मधील वेळ अखंड लेखन, वाचनात जाई . त्याचा परिपाक म्हणजेच 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ होय. १९४५ मध्ये पंडित नेहरूंना अलमोऱ्याचे तुरुंगात हलविण्यातआले.

भारताचे भाग्य विधाते पं . जवाहरलाल नेहरू यांचे अहमदनगरचे किल्ल्यातील निवासस्थान आज तीर्थयात्रे सारखे वंदनीय झाले आहे. पंडितजीने वापरलेले फर्निचर आहे.

१९४२ चे' चले जाव आंदोलनातील अहमदनगर किल्ल्यातील राजबंदी व त्यांचा किल्ल्यातील वास्तव्याचा कालावधी यादी खालील प्रमाणे :

१) सरदार वल्लभ भाई पटेल १० ऑगस्ट १९४२ – १८ एप्रिल १९४५

२) पंडित गोविंद पंत १० ऑगस्ट १९४२ - २८ मार्च १९४५

३) आचार्य नरेंद्र देव १० ऑगस्ट १९४२ – २८ मार्च १९४५

४) आचार्य जे .बी. कृपलानी १० ऑगस्ट १९४२ - २७ मार्च १९४५

५) मौलाना अब्दुल कलाम आझाद १० ऑगस्ट १९४२ – १७ एप्रिल १९४५

६) पंडित जवाहरलाल नेहरू १० ऑगस्ट १९४२ – २८ मार्च १९४५


ISSN 2231 4342

७) असफ अली १० ऑगस्ट १९४२ – ३ एप्रिल १९४५

८) डॉ. पी सी घोष १० ऑगस्ट १९४२ – २० मे १९४४

९) पंडित हरेकृष्ण मेहताब १० ऑगस्ट १९४२ २९ मार्च १९४५

१०) शंकरराव देव १० ऑगस्ट १९४२ १८ एप्रिल १९४५



'चले जाव' आंदोलनातील यासर्व नेत्यांना ज्या खोल्यांमध्ये स्थानबध्द करुन ठेवले होते त्या खोल्यांमध्ये गेल्यानंतर याने त्यांची माहिती छायाचित्रांसह पाहिल्यावर, वाचल्यावर त्यांच्या उत्कट देशप्रेमाची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही. किल्ल्यात 'पंडित नेहरु यांना स्थानबध्द केलेल्या खोलीत एक' कॉफी टेबल बुक' ठेवले आहे. त्यामध्ये स्वातंत्र्य लढयातील अनेक प्रसंगांची तपशिलवार माहिती तसेच दूर्मिळ छायाचित्रे आहेत. याकॉफी टेबल बुकच्या मुखपृष्ठावर `Life of Nehru Fragrance that still remains `(नेहरुंचाजीवनपट- सुगंध अजून दरवळतो आहे) असे लिहिले आहे. हे वाचतांना या खोलीत स्वातंत्र्य लढ्यातील घटनां बरोबरच देश भक्तीचा सुगंध अजूनही दरवळत असल्याचा भास झाल्या शिवाय राहत नाही.

मूल्यमापन :

१४९० मध्ये अहमदनिजामशाहने निर्माण केलेला हा किल्ला स्थापत्य शास्त्राचा उत्कृष्ट नमुना असून जमिनीवर बांधलेला एकमेव किल्ला आहे. किल्ल्याला मोठा इतिहास आहे. किल्ल्यावर शतूने आक्रमणे केली. परंतु किल्ला हा भक्कम असल्यामुळे तो सहजपणे शतूच्या ताब्यात जाऊ शकला नाही. परंतु फितुरी मुळे हा शतूच्या ताब्यात गेलेला दिसून येतो. मोगलांच्या काळापासून येथे राजकीय बंदिवान ठेवण्यात येऊ लागले. पुढे

हीच प्रथा पेशवे काळात, ब्रिटिश काळात सुद्धा चालूच राहिली. त्याचे कारण म्हणजे किल्ला हा भक्कम होता. येथून बंदिवान पळून जाऊ शकत नव्हता. किल्ल्या भोवती खंदक होता त्यामुळे सुरक्षितता होती. शिवाय मुख्य दरवाजा एकच होता. पेशवे काळात पुणे या राजधानीच्या ठिकाणाहून येथे लक्ष देणे सहज शक्य होते. तर ब्रिटिश काळात स्वातंत्र्य लढ्याचे मुख्यठिकाण असलेल्या मुंबईपासून भौगोलिक दृष्ट्या लांब व जनतेला माहीत न होण्याच्या हेतूने अहमदनगरया ठिकाणी राजकीय बंदयांना ठेवण्यात आले. शिवाय अहमदनगर हे रेल्वेस्टेशनने जोडलेले ठिकाण असल्यामुळे राजकीय बंदयांना गुप्तपणे नेणे सहज शक्य झाले. अशा ठिकाणी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी डिस्कवरी ऑफ इंडिया भारताचा शोध हा प्रसिद्ध व मौलिक ग्रंथ लिहिला त्यामुळे या किल्ल्याला ऐतिहासिक दृष्ट्या अजून महत्त्व प्राप्त झाले. सरदार वल्लभ भाई पटेल सारखे पोलादी पुरुष यांचे वास्तव्य या किल्ल्यात झाले. ज्यांनी संपूर्ण भारताचे पुढे नेतृत्व केले असे महापुरुष या किल्ल्यात बंदिवान होते हा महत्त्वपूर्ण इतिहास आहे.

संदर्भ व तळ टीपा:

1) सरदार बाबासाहेब मिरीकर, अहमदनगर शहराचा इतिहास, अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालय, अहमदनगर, तृतीय आवृत्ती- २०१६, पृष्ठ- 57 व 65.
2) पा. न. पटवर्धन, भा. इ. सं. मं. इतिवृत्त,1837.
3) Gazetteer if the Bombay Presudency (Ahmednagar District), Volume XVII, Government Central Press, Mumbai, P.- 696 693.
4) गो. स. सरदेसाई,मराठी रियासत - उत्तर विभाग,३, खरे लेखसंग्रह ६६८५.
5) Gazetteer if the Bombay Presudency (Ahmednagar District), Volume XVII, P.-695
6) (https://www.historicalmaharashtra. info/2018/08/ahmednagar-fort.html- 16/02/2021)
7) द . वि . आपटे, इतिहास मंजरी.
8) गो. स. सरदेसाई, मराठी रियासत - पुण्यश्लोक शाहू .
9) गो. स. सरदेसाई,मराठी रिसायत मध्य.
10) महाराष्ट्रीय ज्ञानकोश खं . १५ व ग्रँट ३ डफ . सदाशिवराव भाऊ – भुस्कुटे
11) वाड पेडा भाग-७, पृष्ठ -२१३, न्याय खाते फौजदारी व गुन्हे .१७६3- ६४ अबी सितैन मया व अलफ जमा दिलावल १२ किल्ले अहमदनगर येथे बंदीवान आहेत त्यास शासन करून सोडून देणे नावा निशी.
12) खरे लेखसंग्रह – १८९४.
13) गो. स. सरदेसाई, मराठी रियासत - मध्यविभाग ४.
14) गो. स. सरदेसाई, मराठी रियासत मध्य विभाग
15) गो. स. सरदेसाई, मराठी रियासत उत्तर विभाग ३.
16) गो. स. सरदेसाई, मराठी रियासत उत्तर विभाग.वासुदेव शास्त्री खरे- नाना फडणविसाचे चरित्र

ISSN 2231 4342

17) वासुदेव शास्त्री खरे - ऐतिहासिक लेख संग्रह खंड १२

18) गो. स. सरदेसाई- मराठी रियासत उत्तर वि.

19) आमचा सातारा

20) Jadhav Baban Bhivsen, Fourth Shivaji Of Martyrdom, International Journal, Golden Research Though, Vol.-IV, Issue-III, September2014, Solapur, Maharashtra, www.isrj.in, pp 1- 4.

21) मालती मालसे - अहमदनगर किल्ल्याचे मनोगत- मालती मालसे

22) पंडित जवाहरलाल नेहरू, 'नगर किल्ल्यातील आमचे बंदी जीवन', रामनाथ झाव सुरेश जोशी (संपादक), पंडित जवाहरलाल नेहरू जन्म शताब्दी महोत्सव, स्मरणिका १९८८-८९, नगर आणि पंडित नेहरू, पृष्ठ-२-३.

23) कित्ता, पृष्ठ-२३.

24) शकुंतला मसानी - गार्डन इन अहमदनगर.

25) रामनाथ झाव सुरेश जोशी(संपादक), पंडित जवाहरलाल नेहरू जन्म शताब्दी महोत्सव, स्मरणिका १९८८-८९.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

डॉ. श्रीधर दत्तात्रय उर्फ तात्यासाहेब नातू - अलौकिक व्यक्तिमत्व!

प्रा. प्रसाद सुरेश भागवत
पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय ता.गुहागर, जि. रत्नागिरी
मोबा. 9421232586
इमेल :- ruchiprabha@yahoo.com

प्रस्तावना: -

महाराष्ट्र राज्याला लाभलेल्या किनारपट्टीच्या बाजूला जे चार जिल्हे वसले आहेत त्यापैकी रत्नागिरी हा एक प्रमुख जिल्हा होय. 'अपरांत' किंवा 'परशुराम भूमी' म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो त्या रत्नागिरीच्या प्रदेशाचा उल्लेख प्राचीन काळातील साहित्यातूनही आढळतो. ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या या जिल्ह्याने आधुनिक काळात अनेक भारतरत्न देशाला दिले आहेत तसेच अनेक थोर कर्तृत्ववान व्यक्ती या जिल्ह्यात जन्मलेल्या आहेत. २० २० व्या शतकात होऊन गेलेल्या अशा महान व्यक्तिमत्वांपैकी एक व्यक्तिमत्व म्हणजे कै. डॉ. श्रीधर दत्तात्रय तथा तात्यासाहेब नातू होय. राजकीय, सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या डॉ. नातू यांच्या व्यक्तिमत्वाचा थोडक्यात आढावा सदर शोध निबंधात घेण्यात आलेला आहे.

डॉ. नातू यांचे पूर्ववृत्त :-

डॉ. तात्यासाहेब नातू यांचा जन्म १४ सप्टेंबर १९२९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यामधील चिपळूण तालुक्यातील माखजन या गावी झाला. त्यांचे वडील प्राथमिक शिक्षक होते मात्र घरची परिस्थिती सर्वसामान्य होती. घरच्या बेताच्या परिस्थितीमुळे शालेय वयापासूनच तात्यांना घरातील गुराढोरांची देखभाल करणे, दुधाचे रतीब पोच करणे अशाप्रकारची कामे करण्याची सवय जडली. जन्मगावी जुन्या मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यावर वैद्यकीय शिक्षण घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला. तात्यांनी वैद्यकीय शिक्षण घेण्यास घरचे अनुभव कारणीभूत झाले त्यापैकी एक म्हणजे त्यांचा लहान भाऊ किरकोळ आजाराने त्रस्त होता. गावातील वैद्यांच्या औषध योजनेचा फारसा उपयोग होत नव्हता. अशावेळी शेजारील बुरंबाड गावातील प्रसिद्ध डॉक्टर श्री.साठे यांचेकडे औषध उपचारसाठी विचारणा केली असता डॉ. साठे यांनी 'गाडीचे पेट्रोलचे पैसे द्यावे लागतील तरच येऊन उपचार करेन' असे सांगितले. ते मान्य केल्यावर घरी येऊन डॉ. साठे यांनी लहान भावाची तपासणी केली. या प्रसंगाचा डॉ. नातू यांच्या मनावर खोल परिणाम झाला. आपल्या सारख्या सुशिक्षित कुटुंबासाठी डॉक्टर अटीशर्ती घालून उपचार करीत असतील तर अशिक्षित व सामान्य कुटुंबातील लोकांची अवस्था किती बिकट असेल याची जाणीव त्यांना झाली. गरीब जनतेला वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्यासाठी आपल्याला काही करता येऊ शकेल का? या प्रश्नातून आपण वैद्यकीय शिक्षण घ्यावे हा निश्चय त्यांनी केला. मुंबई येथील पोद्दार मेडिकल

 ISSN 2231 4342

महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला व कष्टाने डी. ए. एस. एफ. हे तत्कालीन वैद्यकीय शिक्षण १९५२ मध्ये पूर्ण केले.

डॉ. नातू यांचे वैद्यकीय कार्य:-

डॉ. नातू यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले पण स्वत:चा वैद्यकीय व्यवसाय सुरु करण्यासाठी पुरेसे भांडवल जवळ नव्हते. आपल्या ज्ञानाचा उपयोग कोकणातील अंधश्रधाळू, पिडीत लोकांसाठी करणे हा त्यांचा हेतू होता. तात्यांनी रत्नागिरी जिल्हा लोकल बोर्डाच्या एस. एम. पी. सेन्टरवर नोकरी स्विकारली. या नोकरीच्या निमित्ताने तात्यांचा मार्गताम्हाने गावाशी प्रथम संपर्क आला. आजूबाजूच्या गावातील लोक छोट्यामोठ्या आजारासाठी मांत्रिक तांत्रीकाकडे जात, देवदेवस्कीचा मार्ग अवलंबित असत. अशा पारंपारिक समाजातील गोरगरिबांना वैद्यकीय सेवा देण्याचे कार्य तात्यांनी मार्गताम्हाने गावी सुरु केले. मार्गताम्हाने गावाच्या आजूबाजूला असलेली गावे एस. एम. पी. सेंटरला जोडली गेली. इतकेच नव्हे तर लगतच्या चिपळूण व गुहागर तालुक्यातील अनेक गावांमध्ये सायकलवरून प्रवास करून सामान्यांना औषधोपचार देण्याचे धोरण त्यांनी आखले. तात्यांचा दवाखाना हा रुग्णांसाठी आधारवड बनला. डाव्या हाताने तपासणे व डाव्या हातानेच औषध लिहून देणे या त्यांच्या सवयीतून लोकांचा विश्वास त्यांच्या डाव्या हातावर इतका बसली की, तात्यांनी डावा हात लावताच आपण बरे होऊ अशी एक श्रद्धा लोकांच्या मनात निर्माण झाली. वैद्यकीय व्यवसाय हा पैसे मिळविण्याचा मार्ग न मानता ती एक सेवा आहे हे व्रत त्यांनी मानले व आयुष्याच्या अखेरपर्यंत पाळले.

सन १९६० च्या दशकात रत्नागिरी या जिल्ह्याच्या ठिकाणी असलेले शासकीय रुग्णालय वगळता अन्यत्र शस्त्रक्रियेची सुविधा नव्हती. छोट्या शस्त्रक्रियेसाठी रुग्णांना मुंबई, पुणे किंवा मिरज अशा दूरवरच्या ठिकाणी जावे लागत असे. गोरगरिबांना दूरचे खर्च परवडण्यासारखे नव्हते म्हणून डॉ. नातू यांनी १९५६ साली आपल्या दवाखान्यात छोटी ऑपरेशन करणे सुरु केले. तात्यांनी हजारो ऑपरेशन केली पण रुग्णांना परवडणार नाही असे अकारण औषधोपचार कधीही केले नाहीत. सेवाभावी वृत्तीतूनच त्यांनी चिपळूण येथे पहिले एक्स—रे मशीन आणले. त्यांनी आपल्या तिनही मुलांना वैद्यकीय शिक्षण देऊन स्वत:च्या वैद्यकीय सेवेत सामावून घेतले.

विंचू दंशावर लस संशोधन :-

कोकणात विंचू दंशाने माणूस मरतो यावर फारसा विश्वास नव्हता पण विंचू दंशाने मरणाऱ्या लोकांची समस्या मोठी होती. यावर प्रभावी कार्य हे डॉ. नातूनी केले आहे. विंचू दंशावर उपाय योजना काय करता येतील याचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी ब्राझील देशात जाऊन माहिती घेतली. मुंबई येथील हाफकिन इंस्टीट्युट येथील संशोधकांशी सतत चर्चा केली. विधानसभेत यावर चर्चा घडविली. राज्याचे तत्कालीन आरोग्यमंत्री डॉ. भाई जगताप यांचेकडे पाठपुरावा केला व हाफकिनला अनुदान देण्याचा आग्रह धरला. डॉ. नातूंच्या प्रामाणिक प्रयत्नामुळे सरकारकडून विंचूदंशावर लास विकसित करण्यासाठी हाफकिनला वाढीव अनुदान मिळाले व अशाप्रकारे तात्यांच्या प्रयत्नातून विंचूदंशावर औषध निर्माण झाले.

ISSN 2231 4342

डॉ. नातू यांचे शैक्षणिक कार्य:-

वैद्यकीय व्यवसायाच्या निमित्ताने गावोगावी जाणाऱ्या तात्यांना अशिक्षित, अंधश्रध्दाळू समाजाचे दर्शन होत असे. अस्वच्छता व त्यामुळे होणारे साथीच्या आजारांनी ग्रासलेल्या समाजाला शिक्षण मिळायला पाहिजे याची जाणीव त्यांना झाली. त्यांनी स्वतःच्या मार्गताम्हाने गावात तसेच नजीकच्या रामपूर व पाटपन्हाळे गावात शिक्षण संस्थांची स्थापना केली. काही काळात भोम, हेदवी, ओमळी, तळवली, गुणदे या गावामधूनही शिक्षण संस्था स्थापन करण्यात तात्यांनी सक्रीय सहभाग घेतला. विनानुदानित काळात शिक्षकांचे पगारासाठी आपल्या वैद्यकीय मिळकतीचा काही भाग खर्च केला. चिपळूण येथील परशुराम एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्षपद तात्यांनी २६ वर्ष सांभाळले.

बहुजन समाजातील गरीब व होतकरू मुलांसाठी वसतीगृह सुरु करताना मार्गताम्हाने येथे प्रेमजीभाई आसर यांच्या नावाने पहिले वसतीगृह सुरु केले. या वसतीगृहातील सर्व विद्यार्थ्यांना आपल्या कुटुंबातील सदस्यांची वागणूक तात्यांनी दिली.

डॉ. नातू यांचे रोजगार विषयक कार्य:-

रत्नागिरी येथील अप्पासाहेब पटवर्धन यांना कोकणचे गांधी म्हटले जात असे. त्यांनी कोकणभर फिरून खादी व चर्मोद्योग यांचा प्रसार करण्याचे धोरण स्विकारले होते. डॉ. नातू यांनी पटवर्धन यांच्या कार्यात सहभाग घेतला. डॉ. नातू यांनी मेलेल्या गुरांची कातडी सोडविण्याचे काम हौसेने सुरु केले. मेलेल्या गुरांची कातडी ही राष्ट्रीय संपत्ती आहे तीचा विनाश होऊ नये या दृष्टीकोनातून तात्या हे काम करीत असत. सुरवातीला अनेकांनी सामाजिक बहिष्काराला घाबरून तात्यांना मदत केली नाही. पण तात्यांनी मेलेल्या गुरांची कातडी काढून ती कमावून चर्मकार समाजाला स्वस्तात देता यावी यासाठी 'रोहितोत्पादक सहकारी सोसायटी' सुरु केली. गावातील श्री. कृष्णनाथ हळदणकर यांना अप्पा पटवर्धन यांचेकडे कातडी कमविण्याचे शिक्षण घेण्यास पाठविले आणि सोसायटीत चर्म प्रशिक्षक म्हणून नेमले. कातडी कमविण्यासाठी लागणारा हिरडा जमा करण्याचा व्यवसाय लोकांना दिला. जमा झालेल्या हिरड्याची योग्य किंमत दिलीच शिवाय जादा हिरडा मुंबईला विकून हिरडा जमविण्यास प्रोत्साहन दिले.

शेती हा डॉ. नातू यांचा आवडता व्यवसाय होता. ते स्वतः शेतीतील मशागतीची सर्व कामे करीत असत. शेतीच्या जोडीला गाई म्हशी बाळगण्याचा आदर्श लोकांसमोर राहावा यासाठी स्वतः गुरे बाळगली. आपल्या काळात त्यांनी 'एक मूल एक झाड' ही योजना राबविली. गावागावात जाऊन लोकांना गुरे पाळणे, कोंबडी पाळणे, याबाबतचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविले. जपानी पद्धतीने भात लागवड, रासायनिक खतापेक्षा शेणखताचा वापर याबाबत जागृती केली. गुहागर तालुक्यात पहिल्यांदा गोबरगॅस बांधून लोकांना त्याच्या वापराचा आग्रह धरला.

ISSN 2231 4342

डॉ. नातू यांचे राजकीय कार्य:-

डॉ. नातू हे वैद्यकीय व्यवसायामुळे रत्नागिरी जिल्ह्यात खूप लोकप्रिय झाले होते. या क्षेत्रात काम करताना केवळ लोकांच्या आरोग्य विषयक समस्या नाहीत तर अनेक सोयी सुविधांबाबत समाज अनभिज्ञ आहे याची जाणीव त्यांना झाली होती. शाळा, चांगले रस्ते, पिण्याचे पाणी, वीज यासारख्या मुलभूत सोयीसुविधा लोकांना मिळवून द्यायच्या असतील तर राजकीय क्षेत्रात प्रवेश केला पाहिजे या दृष्टीने त्यांनी १९६७ मध्ये रत्नागिरी जिल्हा परिषदेची निवडणूक लढविली व विजय संपादन केला.

जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम करणाऱ्या डॉ. नातू यांची चिकाटी, धडाडी व प्रामाणिकता पाहून तत्कालीन खासदार प्रेमजीभाई आसर यांनी डॉ. नातूना जनसंघात येण्याचे निमंत्रण दिले. जनसंघाचे उमेदवार म्हणूनच १९७२ मध्ये डॉ. नातू विधानसभेवर निवडून आले. १९७५ सालच्या आणिबाणीत सरकारविरोधी भूमिका घेतल्याने डॉ. नातू यांना काही काळ नाशिक येथील मध्यवर्ती कारागृहात कैदेत राहावे लागले होते. आणिबाणीनंतर १९७७ च्या निवडणुकीत डॉ. नातू पुन्हा विधानसभेत निवडून आले. १९८० सालच्या विधानसभा निवडणूकीत तसेच १९८४ व १९८९ च्या लोकसभा निवडणुकीत डॉ. नातू यांना पराभव स्विकारावा लागला होता. मात्र १९८५ व १९९० मधील विधानसभा निवडणूकीत गुहागर मतदार संघातून ते विजयी झाले होते. विधानसभेमध्ये आमदार म्हणून काम करीत असताना केवळ गुहागर मतदार संघातीलच नव्हे तर कोकण तसेच महाराष्ट्राच्या विविध भागातील लोकांचे मुलभूत प्रश सोडविण्यासाठी कार्य त्यांनी केले. विशेषत: सर्वसामान्य जानेतेच्या प्रश्नांबाबत ते सतत जागृत असत. कोकणातील कार्यक्षम आमदार ही त्यांची लोकप्रियता कायम राहिली.

सारांश:-

आदर्श वैद्यकीय व्यावसायिक, शिक्षण प्रसारक आणि सामाजिक जाण असलेला राजकारणी म्हणून डॉ. नातू यांचे कार्य कोकणच्या सर्वांगीण इतिहासात नक्कीच नोंद होईल असे आहे.

संदर्भ:-

१. शिरगांवकर अण्णा (संपा.) 'दयाघन – स्व. डॉ. तात्यासाहेब नातू स्मृतिग्रंथ', १९९४.

२. दीक्षित द. ना., 'अलौकिक श्रीधर', १९९८

३. साप्ताहिक प्रगती टाईम्स, दि. २५ जुलै २०२०

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

स्वामी रामानंद तीर्थ आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ

सर्जेराव चांगदेव बनसोडे
सहयोगी प्राध्यापक आणि इतिहास विभाग प्रमुख
पं. जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, औरंगाबाद
मो.न. ९४२२५६४८५९
sarjeraobansode72@gmail.com

स्वामी रामानंद तीर्थ यांचे नाव उच्चारताच आपल्याला आठवतो तो त्यांच्या नेतृवाखाली हैदराबाद संस्थानातील जनतेने लढलेला हैदराबाद मुक्तिसंग्राम. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या सहिष्णू आणि धर्मनिरपेक्ष नेतृत्वामुळे हैदराबाद मुक्तिसंग्राम सर्वसमावेशक आणि धर्मनिरपेक्षतेच्या विचाराने लढला गेला होता. म. गांधी यांचे अहिंसेचे तत्त्वज्ञान आणि राष्ट्रीय कॉंग्रेसची संस्थांनी चळवळी बाबतची भूमिका यामुळे हैदराबाद मुक्तिसंग्राम बहुतांशपणे अहिंसक मार्गानेच लढला गेला होता. त्यात स्वामी रामानंद तीर्थ यांचे नेतृत्व निर्णायक आणि मध्यवर्ती राहिले आहे. असे असले तरी सुरुवातीपासूनच मराठी भाषिकांचे एक राज्य निर्माण व्हावे, त्यात मराठी भाषा व संस्कृतीच्या विकास व्हावा. त्याबरोबरच त्या राज्यातील जनतेचा आर्थिक विकास व्हावा. हि तमाम मराठी भाषिक जनतेची इच्छा होती[१]. तीच स्वामी रामानंद तीर्थ याचीही होती. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच प्रशासन सुलभता आणि विकास यासाठी लहान लहान घटक राज्यांचा पुरस्कार केला जात आहे. परंतु आकारमान हा एकमेव निकष राज्य निर्मितीसाठी लावता येत नाही. समान संस्कृती, समान प्रदेश, समान भाषा आदी घटक राज्य निर्मितीत महत्त्वाचे आहेत. भाषिक समानता हा राज्य निर्मितीच्या प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतात प्रशासन चालविताना प्रांत निर्मितीत भाषिक तत्व महत्त्वाचे मानले होते. ब्रिटिशकालीन भारतात अकरापैकी आठ प्रांत एक भाषिक होते[२]. २ जुन २०१४ मध्ये अस्तित्वात आलेल्या तेलंगणा राज्याच्या निर्मितीच्या मूळाशी प्राकृतिक आणि संस्कृतीक घटकांबरोबरच भाषिक समानता हा सर्वात प्रभावी घटक होता. स्वातंत्र्य लढ्या दरम्यान भारतीय जनतेत स्वत्वाच्या ज्या जाणिवा विकसित झाल्या, त्यामुळे आपल्या भाषेची, संस्कृतीची जोपासना व उत्कर्ष राष्ट्रीय जाणिवांचा भाग बनला होता. त्यातून निर्मित भाषिक एकतेच्या जाणिवेतून मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र घटक राज्याची कल्पना पुढे आली. मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र राज्य निर्मितीच्या कल्पनेचे अधिक विकसित स्वरूप संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या मागणीत आहे. भाषिक ऐक्याची जाणीव विकसित करण्यात मराठी साहित्यिक आणि साहित्य संघटनांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे[३]. हैदराबाद संस्थानातही मराठी साहित्य संघ, साहित्य परिषदांच्या कार्यामुळे भाषिक ऐक्याची जाणीव निर्माण झाली. तीच निजाम विरोधी संघर्षामागील प्रेरणा बनली होती. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची सुद्धा तीच प्रेरणा होती. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र राज्याची मागणी एक प्रखर

 ISSN 2231 4342

चळवळ बनली. त्यातूनच १ मे १९६० रोजी आजचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. 'मुंबई हे महाराष्ट्राच्या कपाळाचे कुंकू आहे. वैधव्य पत्करून जर महाराष्ट्राला स्वातंत्र्य मिळणार असेल तर आग लागो या अमंगल स्वातंत्र्याला[४]. मुंबईसह मराठी भाषिक राज्य निर्मितीचा आग्रह अचार्य अत्रे यांच्या या वक्तव्यातून स्पष्ट होत असला तरी अशीच भावना सर्व मराठी प्रदेशाबाबत होती. मुंबईसह सर्व मराठी भाषिकांचे राज्य म्हणून संयुक्त महाराष्ट्र संबोधले जाते. असे असले तरी हैदराबाद संस्थानातील मराठी भाषिक मराठवाडयाशिवाय संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती अपूर्ण होती. त्यामुळे मराठवाडा विभागाची आणि येथील नेतृत्वाची संयुक्त महाराष्ट्र निर्मितीबाबतची भूमिका महत्वपूर्ण होती. तत्कालीन मराठवाड्यात आणि हैदराबाद संस्थानात स्वामी रामानंद तीर्थ याचं एक प्रमुख नेतृत्व होत. त्यांची संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीतील भूमिका निर्णायक होती. परंतु त्यांचे नाव हैदराबाद मुक्तिसंग्रामाशी जोडल्या गेल्याने त्यांच्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदानाबाबत फारशे लेखन झाले नाही'. त्यामुळे त्याच्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदानावर प्रकाश टाकण्याच्या उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंध आपल्या समोर सादर करीत आहे.

संयुक्त महाराष्ट्र लढ्यासंबंधी संशोधकांनी विपुल लेखन केले आहे. परंतु त्यामध्ये दोन गोष्टींचा प्रकर्षाने अभाव जाणवतो. तो म्हणजे तत्कालीन हैदराबाद राज्याचे विभाजन झाले नसते तर संयुक्त महाराष्ट्र निर्माण होऊ शकला काय? आणि भाषिक राज्य निर्मिती मागची तात्विक भूमिका काय होती[५]. या दोन्ही गोष्टीचा विचार केल्याशिवाय संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे खऱ्या अर्थाने आकलन होत नाही. मराठवाडा विभागाची आणि या प्रदेशातील स्वामीजी सारख्या नेत्यांची संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील भूमिका आणि योगदान स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर अशा दोन टप्प्यात विचारात घ्यावे लागते. निजाम विरोधी संघर्षात हैदराबाद संस्थानातील जनतेच्या विकासाठी तेथील सरंजामी व्यवस्था मोडीत काढून हैदराबाद संस्थानाचे भाषावार विभाजन करणे आवश्क असल्याची भूमिका हैदराबाद संस्थानातील विविध संघटनांनी घेतली. त्यामध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखालील हैदराबाद स्टेट कॉंग्रेस प्रमाणेच आर्य समाज, कम्युनिस्ट, महाराष्ट्र परिषद इ. संघटना प्रमुख होत्या. त्यामुळे हैदराबाद संस्थानातील निजाम राजवटीच्या विरोधी संघर्षात हैदराबाद संस्थानातील एकतंत्री राजवट नष्ट करून तेथील त्रिभाषिक प्रदेशाचे भारतीय संघराज्यात व त्या त्या भाषिक प्रदेशात विलीनीकरण करणे हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखालील हैदराबाद स्टेट कॉंग्रेस आणि तिच्या प्रांतीय संघटनांचे ध्येय बनले होते. स्वामी रामानंद तीर्थ शेवट पर्यंत या ध्येयाशी प्रामाणिक राहिले.

स्वातंत्र्यपूर्व काळात मराठी भाषिक समाज मुंबई इलाखा, मध्य प्रदेश (नागविदर्भ), पोर्तुगीज अमंलाखालील गोमंतक आणि हैदराबाद संस्थान (मराठवाडा विभाग) अशा विविध विभागात विखुरलेला होता. तेराव्या शतकापासून इस्लामी सत्तेच्या वर्चस्वाखाली असलेला मराठवाडा निजाम सत्तेच्या पाडावानंतर मुक्त झाला. मराठी भाषिक प्रदेशाच्या ओढीने स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण मराठवाडा संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात इतर मराठी बांधवांच्या बरोबरीने सहभागी झाला होता. 'हैदराबाद संस्थानातील मराठवाडा, पोर्तुगीज अमंलाखालील गोमंतक, मध्यप्रदेशातील नागविदर्भ आणि संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र' हे मराठी भाषिक विभाग

 ISSN 2231 4342

एकत्र करून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा ठराव पहिल्यांदा बेळगाव मराठी साहित्य संमेलनात (१९४६) संमत केला होता[६]. एकतंत्री निजाम राजवट नष्ट करून तेथील त्रिभाषिक प्रदेशाचे भारतीय संघराज्यातील त्या-त्या भाषिक प्रदेशात विलीनीकरण करणे, हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या लढ्याचे ध्येय होते. त्यामुळेच हैदराबाद स्टेट काँग्रेसचे प्रमुख स्वामी रामानंद तीर्थ यांनी काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाचा (पं.नेहरू आणि इतर) विरोध असूनसुद्धा हैदराबाद संस्थानाचे भाषिक तत्त्वावरील विभाजन आणि भाषावर प्रांत पुनर्रचनेचा पुरस्कार केला होता. त्यावेळी हैदराबाद संस्थानात निजाम राजवटी विरुद्ध तीन वेगवेगळ्या प्रादेशिक संघटनांनी संघर्ष उभारला होता. मराठवाडयात उर्वरित महाराष्ट्राशी जवळीकता दर्शविणारे नाव (महाराष्ट्र परिषद) तेथील संघटनेने धारण केले होते. लगतच्या सम भाषिक राज्यातील विलीनीकरणाशिवाय हैदराबाद संस्थानाचा स्वातंत्र्य लढा पूर्ण होणार नाही. या धारणेतून स्वामी रामानंद तीर्थ यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र परिषदेच्या लातूर अधिवेशनात (१९४६) हैदराबाद संस्थानातील मराठी, तेलगु आणि कानडी भाषिक प्रदेश लगतच्या सम भाषिक राज्यात विलीन करण्याचा ठराव संमत केला. या अधिवेशनाचे अध्यक्ष आ. कृ. वाघमारे यांनी मराठी भाषिक मराठवाडा महाराष्ट्रात समाविष्ट करण्याची मागणी केली होती[७]. हैदराबाद राज्य अनैसर्गिक राज्य असून त्याचे विभाजन होणे आवश्यक आहे. मराठवाडा संयुक्त महाराष्ट्रात राज्यात सामील होणे केवळ भाषा, संस्कृतीच्या उत्कर्षासाठी नव्हे तर मागास मराठवाडयातील जनतेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी गरजेचे असल्याची भूमिका महाराष्ट्र परिषदेत स्वामीजी आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यानी घेतली. मराठवाडयातील नेतृत्वाची आणि जनतेची ही भावना संयुक्त महाराष्ट्र चळवळीची ताकद बनली होती[८]. थोडक्यात स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण मराठवाडा आणि मराठवाडयाचे नेतृत्व महाराष्ट्रवादी राहिले नसते तर आजचा महाराष्ट्र अस्तित्वात आला असता का ? या बद्दल शंकाच वाटते. मराठवाडयातील जनता जर अटी घालत बसली तर महाराष्ट्र अस्तित्वात येणारच नाही. म्हणून मराठवाडयाच्या एका पिढीचा सत्यानास झाला तरी चालेल, पण महाराष्ट्र व्हावा[९], संयुक्त महाराष्ट्रच्या निर्मितीबाबत मराठवाडयातील नेतृत्वाच्या अशा भूमिकेमुळे मराठवाडा महाराष्ट्राचा घटकच नव्हे तर महाराष्ट्राच्या निर्मितीत सुद्धा भागीदार असल्याचे लक्षात येते.

हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन व्हावे, या प्राथमिक मागणी बरोबरच हैदराबाद संस्थानाचे भाषावर विभाजन करून संपूर्णपणे एकात्म महाराष्ट्राची निर्मिती व्हावी[१०]. अशी भूमिका घेणाऱ्या स्टेट काँग्रेसच्या नेतृत्वाखाली मराठवाडयातील संपूर्ण जनता भाषावर प्रांत रचना आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी आग्रही बनली होती. मात्र देशाची धुरा वाहणाऱ्या राष्ट्रीय नेतृत्वाला भाषावार प्रांत रचना आणि हैदराबाद संस्थानाचे विभाजन अमान्य होते. देशाच्या अखंडत्वाबरोबरच, हैदराबाद संस्थानातील संमिश्र संस्कृती जी हिंदू- मुस्लिम संस्कृतीच्या परिशीलनाचा परिणाम होती, ती कायम राहावी. त्यासाठी हैदराबाद संस्थानाचे त्रिभाषिक स्वरूप कायम ठेवावे, अशी धारणा असणाऱ्या पंडित जवाहरलाल नेहरू सारख्या नेत्यांचा हैदराबाद संस्थानाच्या विभाजनाला आणि भाषावार प्रांतरचनेला विरोध होता[११]. त्यामुळे पंडित नेहरू आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्यात टोकाचे मतभेद निर्माण झाले होते. शेजारील समान भाषिक राज्यातील विलीनीकरणाशिवाय हैदराबाद स्वतंत्र लढ्याला पूर्णत्व प्राप्त होऊ शकत नाही. हैदराबाद संस्थानातील सरंजामी

ISSN 2231 4342

सत्ता पूर्णांशाने नष्ट करण्याचा आणि संस्थानातील जनतेला विकास पदावर नेणारा मार्ग म्हणून हैदराबाद संस्थानाच्या त्रैभाषिक विभाजनाचा आणि भाषावार प्रांत निर्मितीचा स्वामीजींनी जोरदार पुरस्कार केला. त्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू यांची नाराजी ओढून घेतली. हैदराबाद संस्थानाच्या विलीनीकरणानंतर हैदराबादमध्ये होऊ घातलेल्या १९५३ च्या काँग्रेस अधिवेशनला येण्यापूर्वी पंडित नेहरूनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष दिगंबरराव बिंदू यांना पत्र पाठवून, त्यांच्यामार्फत हैदराबाद संस्थानाचे विभाजन देशाच्या ऐक्यासाठी अहितकारक असल्याने आपण आज तरी त्या विरोधात आहोत, असे स्वामीजींना कळवले होते[१२]. तरीसुद्धा प्रत्यक्ष स्वागताध्यक्षीय भाषणात स्वामीजींनी, 'जितक्या लवकर हैदराबादची कृत्रिम रचना नाहीशी होईल, तितकी भारतीय लोकशाही सुदृढ होईल' अशा शब्दात हैदराबाद संस्थानाच्या भाषिक विभाजनाचा प्रखर पुरस्कार केला. एवढेच नाही तर मुक्तीलढ्यानंतर हैदराबाद संस्थानाच्या भाषिक विभाजनासाठी स्वपक्षीय शासन आणि पक्ष नेतृत्वाशी संघर्ष केला. संस्थानातील जनतेचे भवितव्य हैदराबाद संस्थानाचे भाषिक विभाजनाशी निगडित आहे, असे म्हणून स्वतःच्या राजकीय भवितव्याचा विचार न करता, त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी तात्विक राजकारण केले[१३]. मराठवाडयाची प्रादेशिक अस्मिता त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात एकरूप केली. त्याचवेळी महाविदर्भवादी (बियाणी गट) खान्देश, विदर्भ आणि मराठवाडयासह महाविदर्भ म्हणजे एका वेगळ्या मराठी राज्याची मागणी करत होते. परंतु स्वामी रामानंद तीर्थ यांच्यामुळे मराठवाडा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या भूमिकेवर ठाम राहिला.

जुलै १९५३ च्या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे शंकरराव देव आणि भाऊसाहेब हिरे यांच्या बरोबरीने विदर्भवाद्यांबरोबर झालेल्या चर्चेत स्वामीजींनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यातूनच नागपूर करार (२८ सप्टेंबर १९५३) जन्माला आला. त्यावेळी वैदर्भीय नेत्यांनी मागास विभागाच्या विकासाचे अनेक प्रश्न उपस्थित केले होते आणि ते सोडविण्याच्या अटीवर विदर्भ संयुक्त महाराष्ट्रात सामील होईल अशी भूमिका घेतली. या सर्व गोष्टी स्वभाविकपणे मराठवाडयाबाबत घडून येतील, या धारणेतून मराठवाडयाच्या नेतृत्वाने कोणतीही अट सामिलीकरणाबाबत उपस्थित केली नाही[१४]. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेत नागपूर करार महत्त्वपूर्ण टप्पा आहे. त्यात मराठवाडा आणि मराठवाडयाच्या नेतृत्वाची(स्वामी रामानंद तीर्थ) भूमिका निर्णायक होती. म्हणूनच मराठवाडयाचे मागासलेपण लक्षात घेता, त्या भागाच्या सर्वांगीण विकासाकडे खास लक्ष दिले जाईल याची शाश्वती नागपूर करारात मराठवाडयाला देण्यात आली होती[१५]. नागपूर करारानंतर स्वामी रामानंद तीर्थ यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मराठवाडयात जिल्हावार समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या आग्रही भूमिकेमुळे जानेवारी १९५४ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीची पुनर्रचना करताना, मराठवाडयातून स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, देवीसिंग चव्हाण, दिगंबरराव बिंदू, फुलचंद गांधी यांना संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्यकारिणीवर घेण्यात आले होते. त्यांनी वेळोवेळी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बैठकांना उपस्थित राहून महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीने १९४९ मध्ये मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याची मागणी केली. या मागणीला मराठवाडा प्रांतिक काँग्रेसच्या परभणी येथील बैठकीत पाठिंबा देण्यात आला होता.

'संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मराठवाड्याने महाराष्ट्राच्या पाठीच्या कण्याची जागा घेतली आहे. शंकरराव देव यांच्या या वक्तव्यावरून संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत मराठवाडा विभागाच्या भूमिकेचे महत्व स्पष्ट होते. मराठवाडा विभागाची संयुक्त महाराष्ट्र निर्मिती बाबतची हि भूमिका स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वामुळे अधिक प्रगल्भ आणि ठाम बनली होती. थोडक्यात स्वामी रामानंद तीर्थ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांच्या बरोबरीचे योगदान दिले होते. त्यांच्या कार्यामुळे संयुक्त महाराष्ट्रची निर्मिती शक्य झाली.

संदर्भ:

१. शेठे मधु, देशपांडे भगवान इ., 'संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात कम्युनिस्टांचा सहभाग', कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर, २०१०, पृ क्र. ५१.
२. देसाई जीवन (संपा.), 'संयुक्त महाराष्ट्राच्या प्रेरणा : यशापयश', स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, प्र. आ. २०१२, पृ. क्र.१२.
३. चव्हाण यशवंतराव, 'ऋणानुबंध', रोहन प्रकाशन, पुणे,२०१३, पृ. क्र. २०३.
४. मुळे वसंत(लेख), 'संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी', (समा.) जीवन देसाई, 'संयुक्त महाराष्ट्राच्या प्रेरणा : यशापयश', स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, प्र.आ. २०१२, पृ. क्र.४.
५. शेठे मधु, देशपांडे भगवान इ. कित्ता, पृ. ५१
६. अग्रवाल गंगाप्रसाद(लेख), 'मराठवाड्याचा संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात सहभाग', (समा.), जीवन देसाई, संयुक्त महाराष्ट्राच्या प्रेरणा: यशापयश, पृ. क्र. ३७.
७. भालेराव अनंत, 'हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा', मौज प्रकाशन, मुंबई, द्वितीय आवृत्ती २००१, पृ. क्र. ७५ व १९९.
८. शेठे मधू, 'उपरोक्त', पृ. क्र.६०.
९. कुरुंदकर नरहर, 'हैदराबाद विमोचन आणि विसर्जन', रजत प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, १९९८, पृ. क्र. २३.
१०. कित्ता, पृ. क्र. २०.
११. चपळगावकर नरेन्द्र, 'महाराष्ट्राचे शिल्पकार : आनंद भालेराव', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २०१२, पृ. क्र. ६६.
१२. अग्रवाल गंगाप्रसाद, 'उपरोक्त', पृ. क्र. ४२
१३. स्वामी रामानंद तीर्थ, 'हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामाच्या आठवणी' (अनु.) वि.पा. देऊळगावकर, स्वामी रामानंद तीर्थ स्मारक समिती, हैदराबाद, द्वितीय आवृत्ती १९९८, पृ. क्र. २४०.
१४. अग्रवाल गंगाप्रसाद, 'उपरोक्त', पृ. क्र. ३९.

ISSN 2231 4342

१५. पेंडसे लालजी, 'महाराष्ट्राचे महामंथन', पृ. क्र. ७२.

========== ========== ==========

ISSN 2231 4342

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आयुष्याला वळण देणारे शिक्षक : एक अभ्यास

प्रा. डॉ. भावनापौळ
के.के.वाघ कला,वाणिज्य,विज्ञान
आणि संगणक विज्ञान महाविद्यालय
भाऊसाहेब नगर पिंपळस(रामाचे) ता.निफाड
जि.नाशिक
मो.७६२०५५६३७६

प्रस्तावना :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, वैचारिक आणि तात्विक भूमिका व कार्य अभ्यासल्या नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक व्यक्ती नसून ती एक विचारसंस्था असल्याची प्रचिती येते. भारतीय समाज व्यवस्थेतील हजारो वर्षापासून बहिष्कृत उपेक्षित ठेवलेल्या कोट्यावधी लोकांसाठी आंदोलने करून जे लोक स्वत:ची ओळख हरवून बसले होते. अशा अधिकारहीन व्यक्तींना त्यांचे माणूसपण प्राप्त करून दिले. भारतीय इतिहासामध्ये डॉ. बाबासाहेबांनी मानव मुक्तीच्या लढ्यास प्रारंभ करून सर्वार्थाने बहिष्कृत असलेल्या समाजामध्ये अस्मिता जागविली. भारतीय समाजव्यवस्थेने अधिकार नाकारलेल्या दलित शोषित उपेक्षीत आणि बहिष्कृत लोकांना त्याचे न्याय, हक्क व अधिकार मिळवून दिले म्हणूनच ते 20 व्या शतकातील खरे महापुरूष ठरतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ह्या चिरंतन मुल्यांचा स्वीकार करून संपूर्ण भारतातील दलित शोषित उपेक्षीत, बहिष्कृत, स्त्रीया, गावगाड्याबाहेरील आणि गावकुसाबाहेरील भटके व आदिवासी जातीजन जातीच्या प्रत्येक व्यक्तींना त्यांच मूलभूत हक्क व न्याय अधिकार भारतीय संविधानाच्या माध्यमातून मिळवून दिले. म्हणून जेष्ठ समाजवादी विचारवंत मधूलिमये म्हणतात, "डॉ. बाबासाहेब हे समाज क्रांतीकारक होते त्यांनी आयुष्यभर जे विचार मांडले ते विचार पशूपेक्षा हीन जगणाऱ्यांना माणसामध्ये आणण्यास आणि चेतनाहीन बनलेल्या माणसामध्ये जिवंतपणा आणण्यास कारणीभूत ठरले." डॉ. बाबासाहेबांनी देशाचा स्वातंत्र्य लढा चालविण्यासाठी ब्रिटीशांशी तर मानवमुक्तीचा लढा चालविण्यासाठी देशातील सनातनी प्रवृत्तीशी संघर्ष करावा लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मूळ पिंड हा समाजसुधारकांचा होता. आता पर्यंतच्या आयुष्यात त्यांनी अनेक समस्यांचा स्वत: अनुभव घेतला होता. ते एवढे उच्च विद्याविभूती असताना एवढे वाईट अनुभव त्यांना येतात तर त्यांच्या अडाणी, निरक्षर आणि असंघटित समाज बांधवाची काय अवस्था होत असेल. समाज बांधवांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी भारतीय समाजातील उच्च वर्णिय व उच्च जातीयां विरूद्ध बंड केले.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal **ISSN 2231 4342**

भारतीय समाजव्यवस्थेत बदल करण्याची अफाट इच्छाशक्ती डॉ बाबासाहेब आंबेडकरयांच्या मध्ये आली कुठूनतर त्यांनी घेतलेल्या शिक्षणामधून त्यांच्या आयुष्याला वळण देण्याचे कार्य त्यांचे प्रथम शिक्षक म्हणजे त्यांचे वडील सुभेदार रामजी आंबेडकर हे होत परंतु शालेय शिक्षणातील त्यंच्या गुरुजींचे महत्वही अनन्य साधारण आहे ज्यांनी समाजातील अस्पृश्यतेकडे दुर्लक्षित करून बाबासाहेबांना वेळोवेळी वेगवेगळ्या माध्यमातून मदत केली ज्यामधून त्यांना नवीन दिशा मिळाली होती. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या या शिक्षकांच्या प्रती वेळोवेळी कृतज्ञतापूर्वक आपले भाव व्यक्त केले एव्हढेच नव्हेतर आयुष्याचा उत्तरार्धात यांच्या वैचारिक आणितात्विक बैठकीच्या अधिष्ठानाचापाया देखील त्यांनी मानलेल्या बुद्ध –कबीरआणि फुले या तीन गुरुंना त्याचे श्रेय दिले. तत्पूर्वी याठिकाणी त्यांच्या जीवनातील केवळ शालेय शिक्षकांचा याठिकाणी विचार करण्यात आला.

1. **आंबेडकर मास्तर :**

रत्नागिरी येथील शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिकवण्यासाठी आंबेडकर मास्तर होते. ते जातीने ब्राम्हण होते. त्यांचे आंबेडकरांवर खुप प्रेम होते. आंबेडकरांना शाळेच्या मधल्या सुट्टीत जेवण करण्यासाठी खुप लांब घरी जावे लागत असे ते त्यांना आवडत नव्हते. आंबेडकरांना शाळेच्या सुट्टीत घरी जायला आणि भटकायला खुप आवडत असे. त्यामुळे आंबेडकर मास्तरांनी एक योजना आखली होती. ते स्वत: आंबेडकरांसाठी स्वत:च्या घरून जास्त भाजी –भाकरी आणत आणि कधीही न चुकता ती भाजी-भाकरी त्यांना देत असत. फक्त शिवाशिवी होऊ नये म्हणून ती भाकरी छोट्या त्यांच्या हातावर वरून टाकीत असत. पण तरीही त्या भाजी-भाकरीची गोडी अवीट होती असे डॉ. आंबेडकरानी दि. 13.04.1947 लानवयुग साप्ताहिकामध्ये स्पष्ट केले आहे. हे सांगतांना डॉ. बाबासाहेबांचा गळादाटून येत असे. डॉ. आंबेडकर सांगत की, "खरोखरच आंबेडकर मास्तरांचे माझ्यावर खुप प्रेम होते.' एके दिवशी त्यांनीच आंबेडकरांना बोलावून घेतले आणि सांगितले की तुझे जे आंबावडेकर आडनाव आहे ते आडनीड आहे. तू त्यापेक्षा आंबेडकर हे माझे आडनाव लाव ते छान आहे आणि उच्चारायला सोपे आहे". कॅटलॉगमध्ये त्यांनी स्वत:च तशी नोंदही करून टाकली.[2] अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांचे आडनाव नाव बदलले गेले.

डॉ. बाबासाहेबांच्या बालपणी त्यांच्या गावात आणि शाळेमध्ये फारच अस्पृश्यता पाळली जात होती. त्याकाळात आंबेडकर मास्तरांनी मात्र ते ब्राम्हण आहेत यांचा कधीही विचार केला नाही आणि डॉ. आंबेडकरांच्या जेवणाची व्यवस्था केली होती ही गोष्ट त्याकाळात सोपी नव्हती. ज्या अस्पृश्यांच्या सावलींचा ही ब्राम्हणांना विटाळ होत असे. त्याकाळात आंबेडकर मास्तरांनी त्यांचे आडनाव त्यांची ओळख छोट्या भिवाला दिली जी डॉ. आंबेडकरांच्या सर्व पिढ्यांना मिळाली. आंबेडकर मास्तर बाबा साहेबांना खुप प्रेमाने वागवत असत. डॉ. बाबासाहेबांचे ते पहिले गुरूजी होते त्यांच्याबद्दल आंबेडकरांना नितांत आदर होता. जेंव्हा डॉ. बाबासाहेब गोलमेज परिषदेसाठी निघाले होते तेंव्हा आंबेडकर मास्तरांनी त्यांना अत्यंत प्रेमळ पत्र पाठविले होते. ते पत्र बाबासाहेबांच्या संग्रही होते.[3] आंबेडकर मास्तर हे डॉ. बाबासाहेबांना भेटण्यासाठी 1927 साली गेले होते.[4]

 ISSN 2231 4342

तेव्हा ते आल्याबरोबर बाबासाहेब झटकन उठले व त्यांना नमस्कार केला होता. डॉ. आंबेडकरांना आंबेडकर मास्तर बद्दल खुप प्रेम आणि आदर होता. आंबेडकर मास्तरांपासून मानवी स्वातंत्र्या करिता सुरू केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीची ऐतिहासीक सुरूवात त्यांच्या शालेय जीवनापासूनच झाली होती.

2. पेंडसे मास्तर :-

डॉ. आंबेडकरांना 7 नोव्हेंबर 1900 रोजी सातारा हायस्कुलमध्ये इंग्रजी पहिल्या इयत्तेत दाखल करण्यात आले होते. महाराचा मुलगा म्हणून सातारा हायस्कुल येथे त्यांना वर्गापासून वेगळे बसविण्यात येई. स्वत: डॉ. बाबासाहेबांनी खैरमोडे यांना सांगितले होते की, "ते इयत्ता दुसरीत शिकत होते त्यावेळी त्यांची शाळा सातारा कँम्पमध्ये होती. तेथे पेंडसे नावाचे एक मास्तर होते त्यांचे आंबेडकरांवर अतिशय प्रेम होते.[5] एके दिवशी खुप पाऊस पडत होता व आमची शाळेत जाण्याची वेळ झालेली होती. भीमरावाच्या मित्रांनी त्यांना सांगितले की पहारे बुवा पाऊस खूप पडतोय. तू पावसात जाऊ नकोस हं ! उगीच चिंब भिजशील भीमरावांना तेच पाहिजे होते. त्यांचा मोठा भाऊ छत्री घेऊनच जात होता पण भीमरावांनी त्याला जायला सांगितले आणि स्वत: पावसात भीजत गेले होते. पावसात पुस्तके व टोपी भिजेल म्हणून भीमरांवांनी ती भावापाशी दिली आणि स्वत: भिजत शाळेच्या रस्त्याने गेले पाऊस अगदी मुसळधार पडत होता. भीमराव शाळेत पोहोचले तेव्हा पूर्ण चिंब भिजलेले होते. पेंडसे मास्तरांनी भीमरावांना अशास्थितीत आलेला पाहिल्यावर त्यांना फार वाईट वाटले होते. पेंडसे मास्तरांनी भीमरावांना विचारले अरे पावसात छत्री घेऊन का नाही निघालास? तेव्हा भीमरावांनी जवाब दिला की छत्री एकच होती म्हणून मी भिजलो. त्यांनी भीमरावाच्या चौथी तील भावाला बोलावले आणि त्याला विचारले तु किती सदरे घातले आहेस तो म्हणाला एकच तेव्हा त्यांनी त्यांच्या मुलाला भीमरावा बरोबर त्यांच्या घरी पाठविले व मुलाला सांगितले, घरी गेल्यावर याला नीट गरम पाण्याची आंघोळ करायला पाणी दे, त्याला एक लंगोटी दे आणि त्याचे कपडे धोतर व सदरा वाळत घालायला लाव म्हणजे संध्याकाळी ते घालून तो आपल्या घरी जाईल. त्याप्रमाणे मास्तराच्या मुलाने आंघोळीला गरम पाणी दिले व नेसायला एक लंगोटी दिली. संध्याकाळपर्यंत शाळेच्या तडाख्यातून आपण निसटलो म्हणून भीमरावाला खुप आनंद झाला होता. पण मास्तरांनी भीमरावाला वर्गात बोलावले. नुसती लंगोटी घालून सर्व मुलांच्या देखत वर्गात बसण्याची भीमरावाला विलक्षण लाज वाटत असे पण पेंडसे मास्तर त्यांना म्हणाले लाजायची काही आवश्यकता नाही इथे सारे मुलंच आहेत म्हणून भीमराव रडतरडत वर्गात बसले होते पण या गोष्टीची भीमरावांना एवढी लाज वाटली की तेव्हापासून भीमरावाच्या स्वभावातली जिद्दच कमी झाली. [6]त्याकाळी शाळेतील वातावरणात अस्पृश्यता पाळली जात होती तरीपण आंबेडकर व पेंडसे मास्तर त्यांच्या प्रेमळ वर्तनामुळे आणि स्पृश्यवर्गीय मुलांच्या पुंडाईच्या खेळामुळे आनंदराव व भीमराव यांना अस्पृश्यतेचा कटुपणा चाखावयास मिळालेला नव्हता.[7]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाला आकार देण्यासाठी ज्यासर्व लोकांनी कळतनकळत सहकार्य केले त्यासर्वांमध्ये पेंडसे मास्तरांचा सुद्धा फुल नाही फुलाची पाकळी असा सहभाग होता कोणताही व्यक्ती असो त्याच्या जीवनाला आकार देण्याचे काम हे बालपणातच होते. बालपणात योग्य संस्कार आणि संगत मिळाली

तरच त्याव्यक्तीचे जीवन बहरते. तसेच डॉ. बाबासाहेबांचे झाले आहे. त्याच्या शालेय जीवनात आंबेडकर मास्तरांसोबतच पेंडसे मास्तरांनीही त्यांनी प्रत्येक वेळेस मदत केल्याचे दिसून येते. ज्या काळात अस्पृश्यांची सावली देखील सवर्ण लोकांना सहन होत नव्हती. त्यांचा स्पर्शही सहन होत नव्हता. या काळात पेंडसे मास्तरांनी डॉ. भीमरावांना पावसात भिजलेला असतांना घरी पाठवून त्यांना आंघोळीला पाणी दिले. तसेच त्यांच्या मुलांची लंगोटी ही दिली. त्यावरून पेंडसे मास्तरांचा पुरोगामी दृष्टीकोण दिसून येतो. स्वत: तर ते पुरोगामी होतेच पण ते संस्कार त्यांनी त्यांच्या मुलावरही केलेले दिसतात. अशा पुरोगामी विचारांच्या व्यक्तीमुळेच डॉ. भीमरावांना पुढे जाण्याच्या संधी प्राप्त होत गेल्या.

3. **पर्शियन मास्तर खोदाबक्ष बेहेरामजी इराणी :**

डॉ. बाबासाहेब हे अस्पृश्य असल्यामुळे त्यांची आणि त्यांच्या वडिलांची इच्छा असून सुद्धा त्यांना संस्कृत हा विषय घेता आला नव्हता. त्यांची इच्छा नसतांनाही त्यांना पर्शियन हा विषय घ्यावा लागला होता. तेंव्हा त्यांना तो विषय शिकविण्यासाठी खोदाबक्ष बेहेरामजी इराणी नावाचे मास्तर होते. ते कधीही अस्पृश्यता पाळत नव्हते, त्यांना हुशार मुलांचे भारी कौतुक असे. त्यावेळी त्यांच्या विषयात सर्वात हुशार भीमराव आंबेडकरच होते. त्यांना पर्शियन भाषेत 75 च्यावरच मार्क असत. त्यामुळे ते त्यांचा फार लाड करीत असत व त्यांच्या हुशारीची वेळोवेळी स्तुती करत आणि त्यांना अधुन-मधून पुस्तकांसाठी पैसेही देत असत.[8] त्याशाळेत एक अजून गणिताचे शिक्षक होते ते दोघे सोडले तर सर्व शिक्षक हे सनातनीच होते. डॉ. बाबासाहेबांचा नेहमी पाणउताराच करत असत. पण वरील दोन शिक्षकांमुळे आणि त्यांच्या प्रोत्साहानामुळे डॉ. बाबासाहेब खुप अभ्यास करायचे. पुढे डॉ. भीमराव आंबेडकर एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये दाखल झाले. त्यावेळी के. बी. इराणी त्याकॉलेजमध्ये पर्शियन विषयाचे असिस्टंट प्रोफेसर म्हणून आलेले होते. त्यांनी त्यांची खोली डॉ. आंबेडकरांना दिलेली होती.[10] याखोलीत डॉ. आंबेडकर सकाळी येवून अभ्यासाला बसत असत. के. बी. इराणी यांच्या प्रोत्सहानामुळे डॉ. बाबासाहेबांनी खुप अभ्यास केला होता.

4. **नारायण मल्हार जोशी**

भारतातील कामगार चळवळीचे जनक, थोर कामगार नेते व कर्ते सुधारक. 1902-1906 या काळात ते मुंबईच्या एल्फिनस्टन हायस्कुलमध्ये शिक्षक होते. तेंव्हा डॉ. आंबेडकर एल्फिन्सटनमध्ये शिकत असताना ना. म. जोशी त्यांचे वर्ग शिक्षक होते. त्यावेळी आंबेडकर अस्पृश्य असल्यामुळे ते शेवटच्या बाकावर बसत होते. तेंव्हा जोशी मास्तरांनी त्यांना समोर बसावयास सांगितले होते.[11] एके दिवशी जोशी मास्तरांनी भूमितीची आकृती काढली आणि तिची सर्व माहिती त्यांनी वर्गात सांगितली आणि भूमितीची आकृती पुसून टाकली व तीच माहिती आकृतीसह कोण सांगू शकेल? असा प्रश्न विचारला. तेंव्हा वर्गात एकट्या भीवाचाच हात वर होता. म्हणून जोशी मास्तरांनी भीवाला आकृती समजून सांगायला सांगितले. गुरूजींची आज्ञा होताच भीवा आकृती काढण्यासाठी फळ्याकडे जाऊ लागताच मुलांनी एकच कल्ला केला होता. "गुरूजी त्याला थांबवा नाही तर

फळ्या मागे ठेवलेले आमचे डब्बे बाटतील" तेंव्हा जोशी बुवांनी मुलांना डबे दूर सारावयास सांगून भीवाकडून लिहून घेतले व भीवाला शाबासकी दिली.[12] पुढे त्याच जोशी मास्तरांची व डॉ. आंबेडकरांची कामगार चळवळी निमित्य भेट झाली. ना. म. जोशी कामगाराचे नेते होते म्हणून बाबासाहेबांची व त्यांची वारंवार भेट होत होती. 1931 मध्ये हिंदूस्थानला मध्यवर्ती संयुक्त राज्यघटना (Fedral) देण्यात यावी यासाठी फेडरल स्ट्रक्चर कमिटी नेमण्यात आली होती. या कमिटी वर ब्रिटिश व हिंदी असे 38 प्रतिनिधी नेमण्यात आले होते. त्यामध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड (बडोदा), लहान मोठे संस्थानिक, म.गांधी, बॅ.जयकर, सर डॉ. तेजहादूर सपु, बॅ.जीना, डॉ. आंबेडकर, सी. सुबारायन व नारायण मल्हारराव जोशी इ. होते या कमिटीचे अध्यक्ष म्हणून लॉर्ड सँकी यांना नेमण्यात आले होते. 7 सप्टें. ते 4 नोव्हें. 1931 च्या काळात याकमिटीच्या बैठका बकींग-हॅम पॅलेस मध्ये भरल्या होत्या, याकमिटीच्या बैठकांत डॉ. आंबेडकरांनी अनेक मूद्यांवर माहितीने समृद्ध असलेली भाषणे त्यावेळी केली होती. त्याच दरम्यान शुक्रवार, दि. 18 सप्टेंबर 1931 ला याकमिटीची बैठक झाली होती. संस्थानातील प्रतिनिधींची निवड वरिष्ठ कायदेमंडळात कोणत्या पद्धतीने व्हावी याबद्दल याबैठकीत बरीच चर्चा झाली होती. या बैठकीत पहिले भाषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले होते. त्यानंतर ना. म. जोशींनी भाषण केले ते आंबेडकरांच्या मुद्यांना पाठींबा देणारे होते. अस्पृश्यांना कायदेमंडळात प्रतिनिधित्व असावे, त्यांच्या प्रतिनिधींना सरकारने नेमू नये ते लोकनियुक्त असावे असे मत श्री. जोशींनी या भाषणात मांडले होते.[13]

ना. म. जोशी हे प्रथम एक पुरोगामी विचारांचे मास्तर होते ज्यांनी आंबेडकरांच्या लहानपणीच त्यांच्या बुद्धीची परिक्षा घेतली होती. आंबेडकरांची बुद्धीमत्ता सिद्ध करण्यासाठी एक संधी पण दिली होती. शाळेतील सर्व मुलांच्या विरोधात जाऊन एका अस्पृश्य मुलाला संधी देणे त्याकाळात सोपी गोष्ट नव्हती आणि ती ना. म. जोशींनी केली होती. नंतर ही कायदेमंडळाच्या प्रश्नावरून जेंव्हा वाद झाला तेंव्हा ही त्यांनी डॉ. आंबेडकरांना पाठींबा दिला. यावरून त्यांचे विचार आणि त्यांनी आंबेडकरी चळवळीला केलेले योगदान लक्षात येते.

5. कृष्णाजी अर्जुन केळूस्कर :

कृष्णाजी अर्जुन केळुस्कर हे वुईल्सन हायस्कुलचे हेड मास्तर व एक विद्याव्यासंगी ब्राम्हणेत्तर ग्रंथकार होते. ते त्यांचे वाचन करण्यासाठी चर्नी रोडवरील गार्डनमध्ये दररोज 5.30 वाजता जात असत. त्यांना वाचनाची फार आवड होती. त्याच गार्डनमध्ये भीमराव हायस्कुल सुटल्यानंतर, अवांतर पुस्तके वाचण्यासाठी जात असे तेव्हा ते दोघे एकमेकांना रोज बघत असत. एके दिवशी केळुस्कर गुरूजींनी भिमरावाची चौकशी केली. तेव्हा भिमरावाची हकीकत ऐकूण ते फार संतुष्ट झाले. मग केळुस्कर गुरुजींनी भिवाला वाचन कसे करावे याबद्दलची माहिती दिली तसेच त्याला पुस्तकेही दिली तेव्हापासून भिवाच्या विस्तृत वाचनाला सुरूवात झाली व त्यादोघांची अभेद्य गट्टी जमली.[1] [4]के. बी. इराणी व केळुस्कर या दोघांचे उत्तेजन यामुळे सातव्या इयत्तेत भिवाने झटून अभ्यास केला केला होता. 1907 च्या मॅट्रिकच्या परिक्षेत भिवा बसला व तो उत्तीर्ण झाला.[15] डॉ. बाबासाहेबांनी मॅट्रिक परिक्षा पास केल्यानंतर 1908 मध्ये एक सभा घेण्यात आली त्यानंतरच भिवाच्या उच्चशिक्षणाची मुहूर्त

मेढ रोवली गेली. ही सर्व हकीकत केळुस्कर गुरूजींनी डॉ. भीमराव रामजी आंबेडकर याशीर्षका खाली 1932 च्या एप्रिलच्या जनता खास अंकात लिहिलेल्या लेखात सांगितलेली होती[16]

बाबासाहेब मॅट्रिक झाल्यानंतर त्याचा सन्मान व अभिनंदन करण्यासाठी त्यांच्या जाती बांधवांनी परळच्या बाजूला एक सभा घेतली होती त्यात केळुस्कर गुरूजी दोन शब्द बोलले होते. ती सभा आटोपल्यानंतर केळुस्कर गुरूजी रामजी सुभेदारांना भेटले होते आणि भीमरावांना पुढे शिकविण्यासाठी त्यांना सांगितले होते. परंतू रामजींची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती म्हणून केळुस्कर गुरूजी भीमरावाला सयाजीमहाराजांकडे घेऊनच गेले आणि डॉ. बाबासाहेबांना मदत मिळवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. जेंव्हा केळुस्कर गुरूजी भीमरावाला घेऊन सयाजीमहाराजांकडे गेले होते. तेंव्हा केळुस्कर गुरूजींनी सयाजीरावांना त्यांनी नुकत्याच केलेल्या भाषणाची आठवण करून दिली होती. त्यांनी महाराजांना सांगितले की, आपण एक अभिवचन दिले होत की, अस्पृश्य वर्गांपैकी लायक विद्यार्थी मिळाल्यास महाराज त्याला उच्चशिक्षणासाठी अवश्य मदत करतील आणि केळुस्कर गुरूजी पुढे म्हणाले,’ असाच एक विद्यार्थी मी महाराजां पुढे आणला आहे. तो विद्यार्थी महार जाती पैकी आहे आणि तो नुकताच मॅट्रिक झाला आहे’. महाराजांना हे ऐकून खुप समाधान वाटले होते आणि त्यानंतर भीमराव महाराजांना भेटले त्यावेळी तिथे इंदूप्रकाश छापखान्याचे मालक श. दामोदरशेट यंदे हेही हजर होते. महाराजांनी भीमरावांना काही प्रश्न विचारले होते. त्यांची समर्पक उत्तरे भीमरावांनी दिली ती ऐकूण महाराज खुश झाले व महाराजांनी भीमरावांना कॉलेजमध्ये जाऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी दरमहा 25 रू. शिष्यवृत्ती देण्याचे वचन दिले. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनात केळुस्कर गुरूजींचे महत्त्व विशेष होते शिक्षणच नाहीतर वेळोवेळी केळुस्कर गुरूजी हे बाबासाहेबांच्या पाठीशी उभे राहिले होते.[17]

सन 1931-32 मधील लंडन मधील काम संपल्यानंतर डॉ. बाबासाहेब हे मुंबईला आले होते त्यावेळी डॉ. बाबासाहेबांची प्रकृती पूर्णपणे ढासळली होती. त्यांना खुप ताप येत असे आणि भूकही लागत नसे. डॉ. बाबासाहेब त्यांनी थोडे ही वाचले लिहिले तरी त्यांना थकवा येत असे. त्यावेळी वेळ घालविण्यासाठी डॉ. बाबासाहेब केळुस्कर गुरूजीं कडे दादरला येत असत. दोघांच्या गप्पा चांगल्याच रंगत तेंव्हा तेंव्हा केळुस्कर गुरूजी बाबासाहेबांना सांगत असत की, भिवा थोडे तब्येतीकडे लक्ष दे आणि गुरूजींनी एक उपाय सांगितला की, "मी तुझ्याबरोबर दररोज सकाळी समुद्रावर येत जाईल. तु समुद्रात रोज अर्धा तास पोहत जा. हा क्रम आपण महिनाभर करून पाहुया ! तुझी प्रकृती ठणठणीत व्हावी हीच माझी इच्छा आहे". पण बाबासाहेब दुर्लक्ष करीत होते म्हणून गुरूजीच पहाटेस उठून बाबासाहेबांकडे येत आणि त्यांना घेऊन गिरगाव चौपाटीवर अगर शिवाजी पार्क चौपाटीवर जात असत. दोघेही पोहत आणि गुरूजींच्या घरी न्याहारीला जात असते हा क्रम दोन आठवडे चालला. त्यानंतर त्यांना बरे वाटू लागले होते. एकूण महिनाभर हा क्रम चालला आणि त्यांची प्रकृती सुधारली. ही माहिती श्री. ए. एस. आईसकर वकील (हिंदू कॉलनी) यांनी खैरमोडेंना दिली होती.[18] केळुस्कर गुरुजींची 1934 मध्ये गुरूजी आजारी पडले त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

 ISSN 2231 4342

डॉ. आंबेडकरांना गुरूजी पुत्रवत मानत असत आणि त्यांच्या जीवनाला उजाळा देणारा मार्ग गुरूजींनी 1908 ते 1913 मध्ये आंबेडकरांना दाखविला आणि डॉ. आंबेडकरांनी ही दिगंत किर्ती मिळविली.. होतकरू विद्यार्थ्यांना मदत करण्याचा केळुसकर गुरूजींचा पिंडच होता. त्यांच्या पुरोगामी विचारांमुळे त्यांनी कधीही भेदभाव स्पृश्यास्पृश्य हे केले नाही. त्यांनी रामजींची भेट घेऊन डॉ. आंबेडकरां विषयी चर्चा केली. केळुसकर गुरूजींनी डॉ. आंबेडकरांची बुद्धीमत्ता ओळखली त्यांना मदत केली. त्या दोघांत नाते हे गुरू-शिष्याचे होते पण ते पिता-पुत्रा सारखे राहत होते.

निष्कर्ष:-

१) ज्याकाळात अस्पृश्यांच्या सावलींचा ब्राम्हणांनाच नाही तर सर्वांना विटाळ होत असे. त्याकाळात आंबेडकर मास्तरांनी त्यांचे आडनाव त्यांची ओळख छोट्या भिवाला दिली जी डॉ. आंबेडकरांच्या सर्व पिढ्यांना मिळाली. आंबेडकर मास्तर बाबासाहेबांना खुप प्रेमाने वागवत असत. डॉ. बाबासाहेबांचे ते पहिले गुरूजी होते त्यांच्याबद्दल आंबेडकरांना नितांत आदर होता.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाला आकार देण्यासाठी ज्यासर्व लोकांनी कळत न कळत सहकार्य केले त्यासर्वांमध्ये पेंडसे मास्तरांचा सुद्धा फुल नाही फुलाची पाकळी असा सहभाग होता कोणताही व्यक्ती असो त्याच्या जीवनाला आकार देण्याचे काम हे बालपणातच होते. बालपणात योग्य संस्कार आणि संगत मिळाली तरच त्याव्यक्तीचे जीवन बहरते. तसेच डॉ. बाबासाहेबांचे झाले आहे.

३) याकाळात पेंडसे मास्तरांनी डॉ. भीमरावांना पावसात भिजलेला असतांना घरी पाठवून त्यांना आंघोळीला पाणी दिले. तसेच त्यांच्या मुलांची लंगोटी ही दिली. त्यावरून पेंडसे मास्तरांचा पुरोगामी दृष्टीकोण दिसून येतो. स्वत: तरते पुरोगामी होतेच पण ते संस्कार त्यांनी त्यांच्या मुलावर ही केलेले दिसतात.

४) वडिलांची आणि स्वतःची इच्छा असताना पं बाबासाहेबांना संस्कृत विषय घेता नाही आला कारण संस्कृत शिकणे आणि शिकवणे एका जातीची मक्तेदारी होती परंतु खचून न जाता इराणी भाषा विषय घेऊन त्यांनी शिक्षण घेतले तरीसुद्धा बाबासाहेबानी या विषयातही चांगले मार्क मिळवले होते म्हणून ते इराणी सिरांचे आवडते विद्यार्थी होते त्यांनी आंबेडकराना सर्वपरीने मदत केलीली दिसते.

५) नारायण मल्हारराव जोशी यांनी भूमिती शिकवतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जीवनाकडे बघण्याचा नवीन दृष्टीकोन दिला होता. ना. म. जोशी हे प्रथम एक पुरोगामी विचारांचे मास्तर होते ज्यांनी आंबेडकरांच्या लहानपणीच त्यांच्या बुद्धीची परिक्षा घेतली होती . आंबेडकरांची बुद्धीमत्ता सिद्ध करण्यासाठी एक संधी पण दिली होती. शाळेतील सर्व मुलांच्या विरोधात जाऊन एका अस्पृश्य मुलाला संधी देणे त्याकाळात सोपी गोष्ट नव्हती आणि ती ना. म. जोशींनी केली होती. नंतर ही कायदेमंडळाच्या प्रश्नावरून जेंव्हा वाद झाला तेंव्हाही त्यांनी डॉ. आंबेडकरांना पाठींबा दिला.

६) इ. स 1907 च्या मॅट्रिकच्या परिक्षेत भिवा बसला व तो उत्तीर्ण झाला.डॉ. बाबासाहेबांनी मॅट्रिक परिक्षा पास केल्यानंतर 1908 मध्ये एक सभा घेण्यात आली. त्यावेळी केळुस्कर यांनी स्वतः लिहलेले बुद्ध चरित्र डॉ बाबासाहेबांना भेट म्हणून दिले होते. त्यांच्याच प्रयत्नातून भिवाच्या उच्च शिक्षणाची मुहूर्त मेढ रोवली गेली.

संदर्भ :

1. नवयुग साप्ताहिक, दि. 13.04.1947

2. कित्ता, दि. 13.04.1947

3. कित्ता, दि. 13.04.1947

4. कित्ता, दि. 13.04.1947

5. खैरमोडे चांगदेव भवानराव (1952), डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-1, सुगावा प्रकाशन पुणे, पृ. क्र. 54

6. नवयुग, दि. 13.04.1947, आंबेडकरां बरोबर गप्पा गोष्टी.

7. उपरोक्त, खैरमोडे, खंड-1, पृ.क्र.55

8. खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-1, सुगावा प्रकाशन पुणे 1952, पृ. क्र.65.

9. उपरोक्त, पृ. क्र. न. 67.

10. कित्ता, पृ. क्र. न. 67.

11. सुरवाडे विजय, समकालीन सहकार्याच्याआठवणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकवाङ्मय गृह मुंबई, 2002. पृ. क्र.74

12. कित्ता, पृ. क्र. न. 75.

13. खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-4, सुगावा प्रकाशन पुणे, 1968, पृ.क्र.195.

14. युनिव्हर्सिटी कॅलेंडर, भाग-1, पान-414, 1908-1909 (नंबर 872, मार्क्स-282,)

15. केळुस्करांनी डॉ. भीमराव रामजी आंबेडकर याशिर्षका खाली 1933 च्या एप्रिलच्या जनता खास अंकात लिहिलेला लेख

ISSN 2231 4342

16. खैरमोडे चांगदेव भवानराव, (1952) खंड-1, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ. क्र.67

17. पुर्वोक्त, पृ. क्र. 7

18. पुर्वोक्त, पृ. क्र. 9

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

बोरगाव ता. वाळवा येथील व्यायाम मंडळाची प्रगती : ऐतिहासिक दृष्टिक्षेप

संशोधकाचे नाव
प्रा. डॉ. सी.एस. बोधले
इतिहास विभाग प्रमुख,
मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय,
बोरगाव ता. वाळवा जि. सांगली
मोबा.9270687802
drmeghapawarbodhale@gmail.com

प्रस्तावना-

बोरगाव ता. वाळवा जि. सांगली हे क्रीडा क्षेत्राचा वारसा जतन करणारे गाव आहे. या गावाला खो खो कुस्ती या खेळाची परंपरा असून या गावाने अनेक राष्ट्रीय खेळाडू तयार केले आहेत . या गावालाकुस्ती परंपरा प्राचीन होती. बोरगाव चे रामू पैलवान पंचक्रोशीत प्रसिद्ध होते. भिलवडी येथील कुस्ती फडात 1924 मध्ये रामू पैलवान यांनी प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळवून कुस्ती जिंकली होती. सागरेश्वर देवराष्ट्रे येथे कुस्त्या भरविण्यात बोरगाव येथील पैलवानांची योगदान होते. तसेच खो खो संघ हा 1959 पासून बोरगाव गावातील प्रबळ होता. खोखो संघाचा दबदबा क्रीडा क्षेत्रा मध्ये होता. त्यामध्ये जवाहर कांती व्यायाम मंडळ बोरगाव या मंडळाची कामगिरी उल्लेखनीय होती. जय जवान क्रांती व या मंडळ यांनी खोखो संघाला ऊर्जितावस्था मिळवून दिली. त्यानंतर सांगली जिल्हा खो-खो असोसिएशन ची स्थापना झाली अनेक खेळाडू खो-खो च्या माध्यमातून पुढे आले त्यामुळे गावातील असणारे क्रीडा क्षेत्रातील दबदबा कायम राहिला खेळाडूंना अधिकारी पदावर ती नोकऱ्या मिळवून त्यांचे भविष्य उज्वल करण्यात या व्यायाम मंडळांचा मोठा हातभार असल्याचे दिसून येते. तसेच क्रीडा क्षेत्रामध्ये अनेक खेळाडूंनी खेळाबरोबरच शिक्षण क्षेत्रात ही भरारी घेतली.

- **जवाहर क्रांती व्यायाम मंडळ**

बोरगावातील क्रीडाक्षेत्राचा वारसा जतन करण्यासाठी व समाजरुन मानून त्यांची सेवा करण्याच्या उद्देशाने बाळासाहेब मोहनराव पाटील या ध्येयवेड्या तरुणाने जवाहर क्रां**ती** व्यायाम मंडळ 1969 मध्ये स्थापन केले. या मंडळातील खेळाडू विविध खेळात पारंगत असली तरी खो खो या खेळाचे नाव महाराष्ट्रात केली. या मंडळाने बाळू मुल्ला, जयपाल महाजन, युसुफ मुल्ला, याकूब जमादार, भगवान शिंदे, मोहन शिंदे, सर्जेराव शिंदे ,आत्माराम जाधव हे खो खो चे खेळाडू तयार केले. सर्जेराव बीऊरकर , सिकंदर जमादार शिवाजी फाटक गुणवंत कदम या खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. त्यावेळची क्रीडा शिक्षक श्री. बी.टी पाटील ,श्री.डी. ए.पाटील, श्री. एस.टी.पाटील, एम एस देसाई होते. 1970 कालखंडात बी आर पाटील जी एस पाटील सुभाष पाटील भीमराव गायकवाड धोंडीराम मोहिते गणपती पाटील भास्कर चाचे यांनी शिवाजी विद्यापीठातील

 ISSN 2231 4342

नामांकित खो-खो खेळाडू म्हणून नाव कमावले. पी आर पाटील हे पुणे विद्यापीठाच्या खो खो संघातून खेळले. बबन शिंदे, भीमराव डांगे यांनी या खेळात चांगली कामगिरी केली. 1972 ला बाळासाहेब मोहनराव पाटील यांचे अकाली निधन झाले त्यामुळे खोखो खेळाला खो बसला दरम्यानच्या काळात वाळवा येथील खोखो संघाने आपला दबदबा निर्माण केला.[1]

- **जय जवान क्रांती व्यायाम मंडळ.**

क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या बाळासाहेब पाटील यांचा आदर्शाचा वारसा पुढे नेणारे त्यांचे कनिष्ठ बंधू श्री माणिकराव मोहनराव पाटील (आबा) यांनी क्रीडा क्षेत्राचा वारसा चालवला. त्यामुळे या क्रीडा क्षेत्राला ऊर्जितावस्था प्राप्त झाली. श्री मानसिंग शिंदे यांची शिवाजी विद्यापीठ खोखो संघात निवड झाली. 1986- 87 मध्ये खोखो इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहावे अशी कामगिरी खोखो खेळाडूंनी केली. महाराष्ट्र राज्य शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये 14 वयोगटातील बोरगाव हायस्कुल बोरगाव च्या खो खो संघाने प्रथम क्रमांक. पटकावला महाराष्ट्र खो-खो संघाचे उपकर्णधार संदीप शिंदे यांची निवड झाली. सांगली जिल्हा खो-खो असोसिएशन[2]

जय जवान क्रांती व्यायाममंडळ हे सांगली जिल्हा असोसिएशनला संलग्न झाले. प्रथमच या मंडळाचे खेळाडू श्री जितेंद्र पाटील श्री धनंजय शिवाजीराव पाटील यांची लक्ष्मणराव पुरुष/ महिला अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी संघात निवड झाली. तसेच श्री. विजयकुमार शिंदे श्री. हनुमंत शिंद संजय वाटेगावकर यांची कुमार गटात राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी संघात निवड झाली. [3]

26 जानेवारी 1988 ला बोरगाव मध्ये प्रथमच श्री माणिकराव मोहनराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जय जवान क्रांती मंडळाने राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेचे आयोजन केले. इचलकरंजी, विटा, फलटण, सोलापूर येथील नामांकित संघांनी सहभाग घेतला. 1986-87 मध्ये महाराष्ट्र असोसिएशनच्या मान्यते ने निमंत्रित खो-खो गटाची आयोजन केले. बाळासाहेब मोहनराव पाटील या नावाने स्टेडियम उभा केलं होतं . या स्पर्धेमध्ये बँक ऑफ महाराष्ट्र पुणे, बँक ऑफ इंडिया मुंबई, विजय क्लब पुणे, सहकार क्लब मुंबई , ईगल्स पुणे , रमणबाग पुणे, न्यू सोलापूर या सारख्या नामांकित संघांनी सहभाग घेतला. प्रेक्षकांसाठी भव्य गॅलरी उभारण्यात आली होती. दिवस व रात्री प्रकाश झोतात स्पर्धा घेण्यात आल्या. बोरगाव आणि वाळवे तालुक्यातील क्रीडा प्रेक्षकांसाठी न भूतो न भविष्यती अशी पर्वणी होती. मा.मुराराराव शिंदे यांनी स्पर्धेच्या आयोजनामध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली. बाळासाहेब मोहनराव पाटील या नावाने स्टेडियम उभा केलं होतं. सर्व खेळाडू अधिकारी यांच्या भोजनाची मोफत व्यवस्था करण्यात आली. या स्पर्धेत राष्ट्रीय खेळाडू निर्मल थोरात, बिपीन पाटील, नरेंद्र शहा, मिलिंद मराठे, राहुल मराठे, नितीन जाधव या खेळाडूंनी आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. [4] राजकीय सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रातील जाण असलेले कल्पक नेतृत्व श्री माणिकराव पाटील (आबा) यांनी चालवलेली क्रीडा क्षेत्राची विजयी घोडदौड आबाच्या प्रयत्नाने महाराष्ट्र राज्य स्पर्धा यशस्वीरित्या बोरगाव सारख्या ग्रामीण भागामध्ये संपन्न झाली. बोरगाव गावातील श्री विकास सूर्यवंशी कु. प्रतिभा पाटील यांची शिवाजी विद्यापीठ पुरुष/ महिला खो-खो अजिंक्यपद स्पर्धेत निवड झाली. 22

ISSN 2231 4342

ते 25 डिसेंबर 1988 रोजी शिवाजी विद्यापीठ पुरुष महिला खो-खो अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन बोरगाव गावांमध्ये करण्यात आले. राज्यातून साहसी खेळाडू व 50 पदाधिकारी या स्पर्धेत सहभागी झाले होते. सर्जेराव पाटील यांची सात राष्ट्रीय विद्यापीठ खो खो संघात निवड झाली. मुबारक पटेल, लालासो पाटील, बापू जाधव, रवींद्र पाटील, नितीन पाटील, शशिकांत सोरटे यांनी ग्रामीण राष्ट्रीय स्पर्धेत चमकदार कामगिरी केली. अरुण तिवारी , मनोज ओतारी, सचिन पाटील, विकास पाटील, अशोक गावडे, नरेंद्र पाटील यांनी शालेय राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले. हिंद माता कन्या शाळा बोरगाव कडून स्वाती झेंडे, वनिता निकम, मनिषा पाटील, वैशाली पाटील, आशा मोरे, कु.वैशाली झेंडे यांनी राष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य मिळवले. कु.वनिता निकम या सध्या खेळाडू मधील राखीव जागा मधून क्लासवन पदावरील अधिकारी पदावर कार्यरत आहेत. श्री सुनील निकम, स्मिता गावडे यांची फेडरेशन कप महाराष्ट्र राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली. धनंजय कुमार शिंदे यांनी सलग दोन वर्षे राष्ट्रीय ग्रामीण क्रीडा खो-खो स्पर्धेत रौप्यपदक मिळवले.[5]

- **सारांश**

बोरगावातील क्रीडाक्षेत्राचा वारसा जतन करण्यासाठी व समाजाची क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्यासाठी बाळासाहेब मोहनराव पाटील या ध्येयवेड्या तरुणाने जवाहर व क्रांती या मंडळाची 1969 मध्ये स्थापन केली आणि बोरगाव सारख्या ग्रामीण भागात क्रीडा क्षेत्रात भरीव योगदान दिले. नजीकच्या काळात जय जवान, क्रांती व्यायाम मंडळाने बोरगावातील 14 खेळाडू व मार्गदर्शक व एक संघटक यांना सांगली जिल्हा परिषदेचा पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. खोखो खेळाला वैभवशाली परंपरा असलेले हे गाव महाराष्ट्रात प्रसिद्ध होते. तसेच खो खो संघ हा 1959 पासून बोरगाव गावातील प्रबळ होता. खोखो संघाचा दबदबा क्रीडा क्षेत्रा मध्ये होता. त्यामध्ये जवाहर, कांती व्यायाम मंडळ बोरगाव या मंडळाची कामगिरी उल्लेखनीय होती. जय जवान, क्रांती व या मंडळ यांनी खोखो संघाला ऊर्जितावस्था मिळवून दिली. त्यानंतर सांगली जिल्हा खो-खो असोसिएशन ची स्थापना झाली अनेक खेळाडू खो-खो च्या माध्यमातून पुढे आले.

संदर्भ

1 . समृद्ध बोरगाव पृष्ठ क्रमांक 30
2. उपरोक्त पृष्ठ क्रमांक 31
3.स्मृतिगंध, मोहनराव पतंगराव पाटील प्रथम स्मृतीदिन, पृष्ठ क्रमांक 32
4. पाटील, माणिकराव मोहनराव, आत्मभान, प्रकाशन, आभाळमाया फाऊंडेशन, सांगली पृष्ठ क्रमांक 56
5. उपरोक्त,पृष्ठ क्रमांक 33.

ISSN 2231 4342

घारापुरीचा महादेव

रश्मी (सरला) भिरूड
बिल्डिंग18/c फ्लट नंबर 4/7
सकाळनगर, बाणेररोड, औंध, पुणे 7
e-mailsarlabhirud@live.com
ph: 9423006683

मुंबई येथील गेट वे ऑफ इंडिया जवळून दहा किलोमीटर अंतरावर पुर्वेकडील एका बेटावर एक तासाच्या अंतरावर बोटीतून घारापुरी हे बेट येते. तीन बाजूंनी या बेटावर जाता येते. मोराबंदर, राजबंदर आणि शेटबंदर होय. या तीन नावातच घारापुरी लेणीचा इतिहास दडलेला आहे. कोकणातील मोरे यांच्या ताब्यात हे बंदर मुस्लिम शासन काळापुर्वी असावे. नंतर गुजरातच्या बहादुरशहाकडून हे पौर्तुगिजांनी ताब्यात घेतले, एका जहाजावर वाटाघाटी करत असतांनाच दगाफटका करून बहादुरशहाला मारण्यात आले. ही साधारणपणे पंधराव्या शतकातील घटना आहे. येथे असलेल्या प्रचंड हत्तीच्या शिल्पावरून या बेटाला एलिफंटा हे नाव पडले.

या बेटाचे आधीचे नाव श्रीपुरी हे होते, तिथल्या एका लेणीजवळ असलेल्या पाण्याच्या टाक्यात एक तांब्या सापडला आणि त्यावर श्रीपुरी हे नाव कोरलेले असल्यामुळे एक भक्कम पुरावा मिळाला. काळाचा उल्लेख दहाव्या शतकातील आहे. श्रीपुरी नाव असणे स्वाभाविक आहे कारण मोठमोठे जहाजे ही बंदरावर न जाता थोड्या पाण्यातच नांगर टाकतात. त्यामुळे परदेशी व्यापारी कल्याण किंवा चौल या बंदरात जाण्यापूर्वी येथेच विश्रांती घेत असावीत. विशेषतः काही श्रीमंत व्यापारी येथेच वाटाघाटी आणि व्यवहार करत असावेत असे शेटबंदर या नावावरून वाटते.

या बेटावर काही लेणी कोरलेली आहेत. सर्वात महत्वपूर्ण लेणी आहेत लेणी नंबर एक ही होय. साधारणपणे सहाव्या शतकातील असावी असा शिल्पांवरुन अंदाज व्यक्त केला आहे. कारण तिथे शिलालेख सापडलेला नाही. एक शिलालेख कोरलेला दगड पौर्तुगिजांना सापडला होता आणि त्यांनी तो त्यांच्या राजाकडे पाठवला आणि तो महत्वाचा पुरावा गहाळ झाला.

दोन टेकड्या विभागलेल्या पण जोडलेले असे हे बंदर आहे. दुसऱ्या एका टेकडीवर इसवीसन पुर्व दुसऱ्या शतकातील काही विटांच्या स्तुपाचे अवशेष तसेच दोन कोरीव गुफा स्तूपाजवळ सापडलेली आहे. काही अवशेष पडलेले आहेत, त्यावरून त्याकाळापासून अथवा त्यापैकी येथे वर्दळ आणि मानवी वस्ती असावी, शिवाय येथे असलेली गावे ही भात पिकवतात तसेच बोटी दुरूस्तीचे काम करतात. काही नाणी जी क्षत्रपांची आहे सापडलेली आहे.जी साधारणपणे चौथ्या शतकातील आहेत. स्टेला कॅमरिश या विदुषीने लेणींचा काळ हा पाचव्या ते आठव्या शतकातील काढला आहे आणि त्या मोठ्या हत्तीच्या शिल्पावरून काही तज्ञ राष्ट्रकुटांनी

ISSN 2231 4342

कोरली तर काही जण कलचुरी कृष्ण राजाने कोरलीअसा दावा करतात कारण तांब्यावर राष्ट्रकुट कृष्ण राजाचे नाव आहे.

मुख्य लेणी भव्य आणि विशेष आहे. समोर असलेली जी त्रिमूर्ती म्हणून ओळखली जाते. ती मुर्ती बरोबर मध्यभागी आहे. लेणीला तीन प्रवेशद्वारे आहेत आणि डावीकडचे मुख्य प्रवेशद्वार असावे असे वाटते कारण तिथून शिवलिंग समोर दिसते. लांबुनच शिवलिंग एका वेगळ्या देवळीत बांधलेले आहे, त्याच्या आकारावरून तो स्तूप होता की काय अशी शंका येते. उजव्या कोपऱ्यात कोरलेली ही देवळी चारही बाजूंनी प्रवेश करता येतो आणि चारही द्वारावर प्रचंड मोठी द्वारपाल कोरलेली आहेत. असे आठ व्दारपाल एकदम भव्यता प्रदान करतात. उजवीकडच्या बाजूने आल्यास समोरचे व्दारपाल हे अजिंठा येथील नंतरच्या काळातील कोरलेले पद्मपाणी आणि चक्रपाणी? यांची आठवण होते.ही लेणी शिवमंडल या पध्दतीची आहे.

राजबंदराकडून प्रवेश केल्यावर दोन्ही बाजूला एका बाजूला लकुलिश तर दुसरीकडे नटेश्वर कोरलेला आहे. डावीकडून प्रवेश केल्यावर एका बाजूला रावणानुग्रह तर दुसरीकडे शिवपार्वती सारीपाट खेळत असल्याचे दृश्य कोरलेले आहेत. उजवीकडच्या बाजूने प्रवेश केल्यावर कल्याणसुंदर आणि अंधकासुर वध ही शिल्पे आहेत. मध्यभागी त्रिमूर्ती आणि बाजूला अर्धनारीश्वर तर दुसरीकडे गंगाधर शिव कोरलेला आहे. नटराज्याच्या बाजूला कार्तिकेय गणपती तसेच जवळपास प्रत्येक शिल्पात गरूडारूढ विष्णू कोरलेला दिसतो. या शिल्पात भव्यतेची तसेच वास्तवाची झलक दिसते त्यामुळे कलात्मकता उच्च दर्जाची आहे.

जी मुर्ती मध्यभागी आहे आणि त्रिमुखी शिव म्हणून ओळखला जातो. तो सदाशिव म्हणजे चार मुखी आणि पंचमुखी आहे अशी संकल्पना आहे. यात शिवाचे तत्पुरूष म्हणजे महादेव,अघोर म्हणजे भैरव व वामदेव म्हणजे पार्वती ही रुपे येतात. संज्योत हा नंदी म्हटला जातो. लकुलिशाच्या शिल्पावरून ही लेणी पाशुपत संप्रदायांशी संबंधित असावी. शिवाय अर्धनारी श्वरावरून जी सांख्य तत्व दर्शवते असे गो.बा. देगलूरकर यांनी प्रतिपादन केले आहे. पंचशिव ही संकल्पना विष्णुधर्मोत्तर पुराणानुसार आहे. (संदर्भ स्टेला कॅमरिश १९४६)

बाजूला असलेल्या लेणीत सुरवातीला दोन सिंहांचे शिल्पे आहेत तर उजवीकडे असलेल्या गॅलरीत अभ्या असलेल्या अष्टमातृका आणि कार्तिकेय, गणपती, द्वारपाल ही शिल्पे आहेत. औरंगाबाद येथील लेणीत अगदी हुबेहूब असेच शिल्प कोरलेले आहेत.

घारापुरी पुरी या नावाने बहुतेक आधीच्या कलचुरींचे मांडलिक असावे. पुरी येथून राज्य करत होते, म्हणून म्हणूनच त्रिपुरांतक शिवाची शिल्पे आहेत असा एक प्रवाद आहे. ऐहोळे येथील पुलकेशी दुसरा याच्या शिलालेखात इ.स. ६३४ मध्ये किर्तीवर्मन हा नल, मौर्य आणि कदंबांशी युध्दात विजयी झाल्याचा तसेच मंगलेश हा कलचुरींचे भविष्य असल्याचा उल्लेख आहे.

 ISSN 2231 4342

घारापुरी सर्वात आधी एडवर्ड मुर यांनी १८१० मध्ये (Iconography book first Hindu Panthons) उल्लेख केला.

गंगाधर मुर्तीची विशेषतः आहे की ती त्रीमुखी दाखवलेली आहे. बदामीच्या लेणीतही तशीच दिसते यात आकाशगंगा, गंगा आणि पाताळगंगा अशी तीन रूपे दिसतात. गंगावतरणाती कथा साहित्यात दंडीच्या दशकुमारचरीत आणि पाशुपत शैवीझम मध्ये तसेच पुराणांतही आहे. महादेव शिवाची येथील शिल्पात दिसणारे त्रीमुर्ती कपाल, भय आणि कमळ फुले तसेच मोतीमाळा ही परंपरा वाकाटक काळांत अजिंठा येथील लेणीत दिसते. तिच शिल्प परंपरा येथेही सुरू राहिलेली दिसते. शिवाय लकुलिश या मुर्तीवर बौध्द मुर्तीचा प्रभाव दिसतो. ही लेणी रंगवलेली होती, याचे पुरावे दिसतात. अजिंठा येथील तसेच औरंगाबाद येथील साम्यस्थळे म्हणजे व्यापारी संबंध पैठणशी होते. तर कोकणातील मोरे हेच चाळीसगाव तालुक्यातील वाघळी शिलालेखात दिसणारे वलभीचे मौर्य घराणे एकच होते का?

घारापुरी ही वर्ल्ड हेरिटेज दर्जा दिला आहे. प्रमुख लेणी शिव या देवतेची रूपे तर काही अपुरी लेणी आहेत. नटराज शिव तसेच योगेश्वर शिव ही रूपे दिसतात. क्षत्रप नाणी आणि स्तुप हिलवर मोठ्या स्तुपाच्या बाजूला सात लहान स्तूप आहे असा उल्लेख केला आहे.

ब्रह्मानंद देशपांडे त्यांच्या डेटिंग ऑफ एलिफंटा, जोगेश्वरी अन्ड अदर केव्हज या पेपर मध्ये त्यांनी डॉ. मिराशी आणि डॉ.वॉल्टर स्प्रिंग यांचे म्हणणे खोडत या लेणी या चालुक्य राजांच्या काळात कोरल्या गेल्या असा दावा करतात आणि त्याला पूरक म्हणून बदामी येथील शैव लेणींचा हवाला देतात. तसाच त्यांच्या ताम्रपट आलेला सप्तमातृकांचा उल्लेख आणि गणेश याचा दुजोरा दिला आहे. हा काळ बदामी लेणी पुर्ण केल्यानंतर म्हणजे काळ इसवीसन ५७०-६८५ मधील आहे. तसेच पुलकेशी पहिला याचा काळ असावा हा पण याचा उल्लेख आहे, त्यावरून हे कारागीर बदामी वरून कोकणात स्थलांतरित झाले असावे असा त्यांचा अंदाज आहे.(Bramhanand Deshepande, 1989)

दुसरा लेख आहे, जॉन विलियम यांचा वेरूळ येथील महाकाय हत्ती तसेच कलचुरी राजघराणे यांचा संबंध त्यांनी लावला आहे. तर ओरीसा येथील धौली येथील हत्ती,कोणार्क येथील हत्ती, दक्षिण भारतातील ममल्लापुर येथील, यांची सर्वकश चर्चा केली आहे. (Joanna williams, 2013)

त्यानंतर दुसऱ्या महत्त्वाच्या बाबीची चर्चा केली आहे ती म्हणजे हत्ती आणि लकुलिश मुर्ती तसेच पाशुपत संप्रदायांशी संबंधित असावी, याची चर्चा केली आहे,चार्ल्स कोलीन्स यांनी (Charls D.Collins1982), यात त्यांनी एलिफंटा लेणीतील शिल्पे ही लकुलिश पाशुपत संप्रदायांशी संबंधित आहेत आणि तशा प्रकारचे साहित्य उपलब्ध आहे हे प्रतिपादन केले आहे. या साहित्यात पंथाची परंपरा आणि त्यासंबंधी विधींची माहिती आहे. शिल्पे तसेच लेणीचा आकार यांचा परस्परसंबंध आहे. लेणीतील शिल्पे, रावणानुग्रह, पार्वती सारीपाट, कल्याणसुंदर, गंगावतरण, आणि नटराज तसेच अर्धनारीश्वर ही शिल्पे स्टेला कॅमरिश यांच्या मते या सांख्य


 ISSN 2231 4342

तत्वज्ञान सांगतात. यांनी आपल्या लेखात प्रत्येक शिल्पांची त्या अनुषंगाने चर्चा केली आहे.त्यानंतर येणारे विशेष शिल्प म्हणजे गंगा त्रिपथ्य अवतरण शिल्पात ती तीन रूपाने दाखवली आहे, (Kirit Mankodi,1973)रामायण महाभारतातील वर्णनात गंगावतराणीची कथा येते. ऐहोळे येथील शिल्पातही ती तीन रूपाने दाखवली आहे. तज्ञांनी तिला गंगा, यमुना, सरस्वती म्हटले आहे पण गंगा ज्या तीन मुख्य प्रवाहांनी बनते ते तीन म्हणजे भगीरथी, अलकनंदा आणि मंदाकिनी या तीन होय.

Hans bakkerयांनी शिवपर्वती विवाह, स्वयंवर त्यात दिसणारे देवदेवता त्यांचे स्थान यांचा सखोल अभ्यास केला आहे त्यासाठी त्यांनी शतपथ ब्राम्हण, ब्रम्हपुराण, लिंग पुराण, शिवपुराण, स्कंदपुराण, महाभारत,वायुपुराण महेश्वर खंड यातील उल्लेख यांचा उपयोग आणि शिव आणि इतर देवतांचे स्वरूप याची चर्चा केली आहे. त्यांच्या मते पार्वती स्वयंवराचे मिथक हे स्कंदपुराणाच्या आधीच लोकप्रिय झाले होते. त्यांनी म्हणून पार्वती स्वयंवर याची संगती साहित्यात आलेल्या उल्लेखावरून लावली आहे.

फोटो

मुख्य लेणीचा प्लॅन मुख्य लेणीचे प्रवेशद्वार





डावीकडची शाक्त लेणी आणि प्रवेशद्वार, मंडप आणि खांब





योगीश्वर किंवा लकुलीशसदाशिव त्रिमूर्ती

ISSN 2231 4342





गंगाधरगंगा





त्रीगंगा अर्धनारीश्वर

ISSN 2231 4342




अंधकासुरकल्याणसुंदर





नटराजरावणानुग्रह




सारीपाटलेणी तीन





लेणीचारमुंबई येथीलसंग्रहालयातीलहीच ती गजमुर्ती




Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

संग्रहालय येथील मुर्तीआठ द्वारपाल





सप्तमातृका पॅनेल लेणी नंबर दोन मधील गणेश





लेणी नंबर दोन मधील सिंह



सहा ते सात लेणी समोरच्या बाजूला कोरलेली आहेत. एक स्तूप टेकडी आणि दुसरी कनान टेकडी ओळखली जाते. दोन लेणी ज्या दाट झाडीतून आहेत त्या शोधणे हे एक दिव्य आहे. स्तूप एक आणि दोन हे जरा मातीतच गाडलेले आहेत. दुसरा जरा समुद्राकडील बाजूला आहे. तो केवीन स्टँडेज यांनी शोधून फोटो आणि वर्णन केले आहे त्यांची फोटो आणि वर्णन मी शेयर करत आहे.

"ही पायवाट फार जुनी आहे आणि पाम,चिंच आणि आंब्याची झाडे आहेत. एक सुकलेले तळे जे मानवनिर्मित आहे आणि त्यानंतर दगडांची अशी रचना आणि बांधीव टाकं दिसते. येथूनच सरळ स्तूपाचे अंडे दिसते.अगदी मोजमाप केले तर सांची येथील स्तूप नंबर दोन एवढा हा स्तूप म्हणता येईल. अनेक वर्षे तिथली स्वच्छता केली नाही.विटांचा स्तूप असे वर्णन मी वाचले होते पण फक्त काही विस्कळीत पडलेल्या विटा मला दिसल्या, शिवाय पण सगळीकडे दगडच पसरलेला दिसला.शिवाय एक दगडी कोरीव खांब दिसला".





 ISSN 2231 4342









वरील सर्व पुरावे आणि चर्चा यावरून लक्षात येते की, दुसऱ्या बाजूला दिसणारे स्तूप आणि नंतरच्या काळात दिसणाऱ्या लेणी यावरून प्रत्येक काळात येणाऱ्या राजसत्तेला हे बंदर ताब्यात हवे होते. कारण ते आंतरराष्ट्रीय व्यापाराचे केंद्र होते. एका प्रकारे ते म्हणजे आजचे ताज हॉटेल होते,घारापुरी लेणी आणि औरंगाबाद येथील बौद्ध लेणी तसेच येथील मौर्य घराण्याचा संबंध काय होता हे पुढील अभ्यासासाठी संशोधन होण्याची गरज आहे.

संदर्भ:

- Bramhanand Deshpande, Dating of the Elephanta, Mandaleshvar and Jogeshwari: annual of Bhandarkar oriental research institute, volume 70,1989, assessed 20-1-2016)

- Charls D.Collins , Elephanta and the ritual of the Lakulisa Pasupata , author published American oriental society volume 102, 1982, accessed 18-2-2013)
- Joanna Williams, eponymous elephant of Elephanta, ars orientalis, volume 30 supplement 1, assessed 18-2-2013)
- Kirit Mankodi, Ganga tripathaga, Artibus asiae publishers, 1973, accessed 20-1- 2016
- Kevin standage, in search of Elephanta stupa, KEVINSTANDAGEHOTOGRAPHY ON MAY 9, 2018
- Mirashi V.V. 1966. Kalachuri, Nripati ani Tyancha Kala. Nagpur
- Spink, Walter. 1975. "Ellora's Earliest Phase". Bulletin of the American Academy of Banaras. Vol-I
- Qureshi, Dulari. 2010. The Rock Cut Temples of Western India. New Delhi: Bharatiya Kala Prakashan

विशेष आभार:

या लेणी बघायला मी डॉ. मंजीरी भालेराव या तज्ज्ञांबरोबर गेले होते.

या लेणीविषयी काही लेख मला श्रीकांत पाठक यांनी घारापुरी वर्कशॉपमध्ये अभ्यासलेले उपलब्ध करून दिले.

काही फोटो आंतरजालावरून साभार.

 ISSN 2231 4342

महात्मा गांधी यांच्या सामाजिक विचाराची सद्यस्थितीतील उपयुक्तता

डॉ. संतोष सुधाकरराव कोटुरवार
इतिहास विभागप्रमुख,
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय,
नांदेड जि. नांदेड
भ्रमणध्वनी – 9860938138
E-mail:sskotur1976@gmail.com

1 ऑगस्ट 1920 रोजी लोकमान्य टिकांचा मृत्यु झाला. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत टिळक युगाच अस्त झाला व गांधी युगाचा उष:काल झाला. तेव्हापासून स्वातंत्र्य चळवळीवर व समाज जीवनावर गांधीजींच्या कार्य व तत्वाचा प्रभाव आहे व तो प्रभाव सातत्याने देशाच्या भौगोलिक सीमा ओलांडून विस्तारत आहेत. आज जगभरातील जवळपास 150 पेक्षा जास्त राष्ट्रात महात्मा गांधीजींच्या विचार व तत्त्वांचा प्रसार झाला आहे. वर्तमान वर्षातही म.गांधीजींची 150 वी जयंती साजरी करीत आहोत. हा योगायोग पेक्षा गांधीजींच्या विचार व कार्याची मुलाधार आहेत. सत्य, अहिंसा, सत्याग्रह व सर्वोदय ही तत्त्व म.गांधीजींच्या विचार व कार्याची मुलाधार आहेत. या तत्त्वाच्या आधारे अन्याय, दडपशाही व शोषणाचा अंत करून संपूर्ण विश्वातील मानव जातीसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. म्हणून असे म्हटले जाते की, म. गांधीजींच्या विचारांचा व तत्त्वज्ञानाचा केवळ भारतावरच नाही तर संपूर्ण जगावर प्रभाव पडला आहे. त्यांचे तत्त्वज्ञान आजही जगाला प्रेरणादायी आहेत व चिरकाल प्रेरणादायी राहील याची शाश्वती आहे.

म.गांधीजींनी सार्वजनिक जीवनात कार्य करीत असताना स्वातंत्र्य व स्वच्छता या क्षेत्राच्या पुर्ततेसाठी देह झिजवला आहे. प्रसंगी राष्ट्रपिता म.गांधीजींनी म्हटले आहे की, Sanitaion is more important tan Independance 'स्वच्छता स्वातंत्र्यापेक्षाही अधिक महत्त्वाची आहे' तसेच ईश्वरानंतर सर्वात जास्त श्रद्धा माझी स्वच्छतेवर आहे असेही मत मांडले आहे. कारण स्वच्छतेचा सरळ संबंध आरोग्य व समृद्धी यांच्याशी आहे. स्वच्छता आणि मानवी जीवन यांचा अनन्यसाधारण संबंध आहे. स्वच्छतेशिवाय मानवी जीवनाची सुदृढता आणि निकोपता दृष्टीक्षेपात घेणे कठीण आहे. यावरून स्पष्ट होते की, म.गांधीजींना केवळ भौतिक स्वच्छता अपेक्षित नसून आत्मिक स्वच्छता अपेक्षित आहे. मानव अंतर्मनातून स्वच्छ झाला की, आत्मनिर्भर होतो आणि असाच मानव राष्ट्राला सुदृढ व कोणत्याही समस्याचा मुकाबला करण्याची क्षमता निर्माण करतो असा मौलिक सल्ला गांधीजींच्या विचारातून स्पष्ट होतो. तसेच व्यक्तीच्या सामाजिक व राजकीय जीवनात नैतिक अधिष्ठाण देणे हे गांधीजींच्या कार्याचे ध्येय होते. नैतिक मानव व समाज घडविण्यासाठी व्यक्ती संकोचितता दूर करण्याची आवश्यकता गांधीजींच्या विचारातून स्पष्ट होते.

सत्य, अहिंसा, सत्याग्रह व सर्वोदय या माध्यमातून समाज जीवनातील विविध प्रकारचे विचार व कृतीची अस्वच्छता दूर करण्याचा मार्ग गांधीजींनी दाखविला आहे. वर्तमान परिस्थितीत सर्वत्र सत्ता व संपत्तीची लालसा व ती प्राप्त करण्यासाठी अनैतिक आचरण कृतीसाठी टोकाची तयारीतून निर्माण झालेली सामाजिक अस्वच्छता समाजाला भेडसावतच नाही तर पोखरून टाकत आहे. तसेच महापुरुषासारखे आयुष्य घडविण्याऐवजी महापुरुषसारखे दिसण्याकडे समाजाचा कल वाढत आहे. स्वार्थासाठी महापुरुषांचा वापर करण्याची वृत्ती बळकावत आहे. किंबहुना महापुरुषांची जात शोधून त्यांना जातीत बंदिस्त करण्याकडे समाजाचा कल वाढत आहे. अशा प्रसंगी गांधीजींच्या विचारांची उपयुक्तता अधोरेखित होते. याबरोबरच वर्तमान परिस्थितीतील तरुणामधील वाढलेली व्यसनाधिनता, त्यातून निर्माण झालेली राष्ट्रीय आपत्ती दूर करण्यासाठी सुद्धा गांधीजींच्या विचारांची उपयुक्तता स्पष्ट होते. गांधीजींच्या मते मद्यपान व वाईट रुढी यामुळे शारिरीक, आर्थिक व सामाजिक हानी होते. यातून व्यक्तीगत कौटुंबिक सुखाचा नाश होतो. कौटुंबिक अध:पतन होते. म्हणून गांधीजींनी ग्रामीण सर्वोदय समाज स्थापन करून दारूबंदी, व्यसनाधिनता, वाईट रुढी निर्मुलनाबाबत विचार मांडले आहेत. ग्रामीण जीवन सुदृढ व सशक्त करण्यासाठी ग्रामोद्योगाचे पुनरूजीवन करण्याची कल्पनाही गांधी विचारातून पुढे आली आहे. वर्तमान परिस्थितीत ग्रामीण भागात दारिद्य, बेकारी, विषमता निर्मुलनासाठी ग्रामोद्योगाचे पुनरूजीवन करण्याशिवाय पर्याय नाही, कारण भारताची मोठी संपत्ती (नैसर्गिक व मानवी) खेड्यात आहे याची जाणीव वेळोवेळी म.गांधीजींनी करून दिली आहे.

याबरोबरच सद्यस्थितीत संपूर्ण जगाला भेडसावणारी सर्वात मोठी समस्या म्हणजे ढासळते पर्यावरण होय. त्यामुळे मानवाने केवळ मुलभूत जिवनावश्यक गरजा भागतील एवढ्या प्रमाणातच या नैसर्गिक साधन संपत्तीचा उपभोग घ्यावा. या व्यतिरिक्त अतिशय समृद्ध असलेल्या सजीवसृष्टीचे महत्त्व कमी करण्याचा काही एक अधिकार नाही हा विचार समाजासमोर महात्मा गांधीजींनी मांडला व पर्यावरण विषयक साक्षरता वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. नैसर्गिक साधनसंपत्ती ही आपल्याला पूर्वजांकडून दान करण्यात आलेली नसून पुढील पिढ्यासाठी आपण घेतलेले कर्ज आहे याची जाणीव ठेवूनच या साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर करावा हे गांधीजींचे पर्यावणरविषयक विचार आहेत. प्रत्येक मनुष्याला पुरेल इतक्या गोष्टी पृथ्वी आपल्याला देते. प्रत्येक मनुष्याची हाव पुरेल एवढे नाही. नैसर्गिक संसाधने व संपत्तीचे अयोग्य विनियोगामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. परिणामी विविध समस्या भेडसावत आहेत. याबरोबरच वाढते शहरीकरण व प्रदुषणातून सुरक्षा, आरोग्य, स्वच्छता इत्यादी समस्यांनी मानवी जीवन व्यापून टाकले आहे. या समस्यांच्या निर्मुलनासाठी गांधीजींनी जागरुक पिढी निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. म.गांधीजींनी सामाजिक स्वच्छता निर्मितीच्या प्रक्रियेत अस्पृश्यता निर्मुलनासाठी अटोकाट प्रयत्न केले आहेत. अस्पृश्यता हा भारतीय जीवनावरील कलंक आहे व राष्ट्रीय एकात्मतेला अडथळा आहे याची जाणीव करून दिली. शिक्षणातून व योग्य आर्थिक सुधारणेतून अस्पृश्यता दूर करण्याचा मार्ग गांधीजींनी सांगितला आहे. अस्पृश्यता ही अमानवी प्रथा ईश्वर निर्मित नूसन मानव निर्मित आहे. कोणत्या धर्मशास्त्रात अस्पृश्यतेला आधार नाही. समाजातील काही विशिष्ट जातीसमूहांनी आपले स्वार्थी हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी जाणूनबुजून निर्माण केलेली अवस्था आहे.

 ISSN 2231 4342

मानवनिर्मित जातीव्यवस्था, अस्पृश्यता, अंधश्रद्धेला तीव्र विरोध कण्यातच मानवाचे मोठे हित आहे असा संदेश गांधी विचारातून मिळतो.

महिलांच्या सन्मानासाठी व जागृतीसाठी म.गांधीजींनी वेळोवेळी विचार व्यक्त केले आहेत. ज्या जातीत व देशात स्त्री जातीला मान दिला जात नाही त्या देशाला सुसंस्कृत म्हणता येणार नाही. त्याग, सहनशीलता आणि धैर्य या तीन युगात स्त्रिया पुरुषांपेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ असतात. तसेच बुद्धी, कर्तव्य आणि चातुर्य याबाबतीत पुरुषांपेक्षा कुठेच कमी नाहीत. म्हणून स्त्री-पुरुष समानता असावी असा विचार म.गांधीजींनी दिला आहे.

म.गांधीजींनी सामाजिक अस्वच्छता दूर करण्यासाठी सत्य, अहिंसा बरोबरच सर्वोदय मार्गाचा अवलंब करण्याचे सुचित केले आहे. 'सर्वोदय' याचा अर्थ सर्वांचा उदय, म्हणजे सर्वांचे कल्याण होय. गांधीजींच्या मते, सर्वोदयाचा अर्थ जेथे शुद्धता व विद्वत्ता यांचे अस्तित्त्व असते. सर्वोदयात प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळविण्याचा अधिकार असतो. सर्वोदयमध्ये समाजातील सर्व घटकांचे हित/कल्याण साधण्याचे उद्रिदष्ट असते. सत्य व अहिंसा हे महात्मा गांधीजींच्या सर्वोदय तत्त्वज्ञानाचे मोठे आधार आहेत.

सारांश रूपाने सर्वांगिण सुद्दढ आणि निरोगी व्यक्तीगत व सार्वजनिक जीवन म्हणजे स्वच्छता होय. असा विचार आपल्या कार्यकर्तृत्वातून म.गांधीजींनी जगासमोर ठेवला आहे व शाश्वत रचनेचा आदर्श मार्ग दाखविला आहे. या मार्गातूनच सामाजिक अस्वच्छता दूर करून सशक्त व समर्थ राष्ट्राची पायाभरणी म.गांधीजींनी केली आहे. गांधीजींनी आयुष्यभर समर्पक जीवन जगून भारतासमोरच नव्हे तर जगासमोर आदर्श ठेऊन गेले. त्यामुळे वर्तमान परिस्थितीत म.गांधाजींना भारतीयच नव्हे तर संपूर्ण जगाने स्वीकारले आहे. म्हणून मानवी जीवनाविषयी सर्वांगिण चिंतन करणारे तत्वज्ञान अशी म.गांधीजींची ओळख संपूर्ण विश्वात आहे.

संदर्भ सूची :

1. डॉ.ग्रोवर बी,एल., डॉ.बेल्हेकर एन.के. (अनु.), आधुनिक भारताचा इतिहास, एस.चंद आणि कंपनी, नवी दिल्ली.
2. सुरेश द्वादशीवार, गांधीजी आणि त्यांचे टीकाकार, साधना प्रकाशन, पुणे, 2018.
3. डॉ.सुमन वैद्य / डॉ.शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, फेब्रुवारी, 2015.
4. डॉ.श्रीनिवास सातभाई, आधुनिक भारताचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जानेवारी, 2014.
5. समाधान महाजन, आधुनिक भारताचा इतिहास, द युनिक ॲकडमी, पुणे, 2014.
6. डॉ.रमेश रामराव बैनवाड (पाटील), समकालीन भारतीय राजकारण : महात्मा गांधी, आदित्य पब्लिकेशन्स, नांदेड.
7. Dr.S.G.Talnikar / Dr. P.B.Pahl, Relevance of Gandhian Thoughts at Present Era, Academic Book Publication, Jalgaon, 2017.

ISSN 2231 4342

8. सिताराम पुरुषोत्तम पटवर्धन (अनुवादीत), सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदीर, अहमदाबाद, फेब्रुवारी, 1997.
9. गांधी विचार (OPN-74), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
10. रामचंद्र गुप्ता, साजिक इनामदार (अनु.), गांधी विरोधकांचा पंथ निर्माण करताना, साधना प्रकाशन, 2019.
11. डॉ.एस.एस.गाठाळ, आधुनिक भारताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, जुलै,2019.
12. महात्मा गांधी, माझ्या स्वप्नातील भारत, परमधाम प्रकाशन, वर्धा.

डॉ. एम. के. ढवळीकरांच्या प्राचीन भारतीय कृषिविषयक इतिहासलेखनाची मिमांसा

दशरथ प्रल्हाद लोडे
संशोधक विदयार्थी
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विदयापीठ औरंगाबाद
मो. 9552899002
dashrathlode@gmail.com

❖ **प्रस्तावना —**

इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात भारताचे वर्णन कृषीप्रधान देश असेच केले जाते. भारताला लाभलेली भौगोलीक समृध्दता त्यास पोषक ठरते. आजही भारतातील बहूतांश समाज हा शेतीव्यवसायावर पूर्णत: अवलंबून असल्याचे निरीक्षण व आकडेवारीवरून आपणास कळते. भारतातील शेती आजही बहूतांश व्यापारी तत्वापेक्षा निर्वाह तत्वावर व पारंपारीक पध्दतीने केली जाते. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा तर आहेच पण तदdवतच समाजाच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधनही आहे. अलीकडील कालखंडात कृषी विषयावर ब-याच प्रमाणात संशोधन व लेखनकार्य झाले असले तरी त्यात मध्यकाळ व आधूनिक काळावर जास्तीचा भर देण्याचा प्रयत्न अभ्यासक, इतिहासकार तथा संशोधांकडुन झालेला दिसतो. भारताच्या प्राचीन काळातील कृषीजीवनावरही ही बराच प्रकाश टाकला असला तरी इतिहासकाळाच्या दृष्टीकोणातून जो सुरूवातीचा प्राचीन काळ व इतिहासपूर्व कालखंडावर मात्र कृषीविषयक इतिहासलेखनाचे महत्वपूर्ण कार्य करणा-यांमध्ये पूरातत्वज्ञ पदमश्री डॉ. एम.के.ढवळीकर यांचे नांव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. त्यांचे प्राचीन भारतातील कृषीविषयक इतिहासलेखन पूरातत्वीय व ऐतिहासीकदृष्टया महत्वपूर्ण आहे.

❖ **विषयनिवडीचा हेतू:-**

आज भारताला आपण कृषीप्रधान देश म्हणून ओळखत असलो व शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानत असलो तरी आजमितीला कृषी क्षेत्राचा झालेला हा विकास काही अचानक उदdभवलेली बाब नाही, तर कृषी क्षेत्राचा उगम हा खरे तर ऐतिहासीक संशोधनाचा विषय आहे. म्हणूनच कृषी क्षेत्राची भारतातील सुरूवात कशी झाली ? आणि सुरवातीच्या कालखंडातील तिची भारतातील अवस्था काय होती ? हे डॉ.एम.के.ढवळीकरांनी त्यांच्या पूरातत्वीय व ऐतिहासीक संशोधनातून वस्तूनिष्ठ व चिकीत्सक पणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ज्याच्या अभ्यासातून भारताच्या प्राचीन कालखंडातील अपेक्षीत दृष्टीक्षेपात न आलेल्या कृषीक्षेत्राचा अभ्यास करण्याच्या जिज्ञासेतून व डॉ.एम.के.ढवळीकरांच्या इतिहासलेखनाचा अभ्यास करण्याच्या हेतूने प्रस्तूत संशोधन विषयाची शोधनिबंधासाठी निवड करण्यात आली आहे.

❖ **उदddदीष्टये :-**

-भारतातील कृषी क्षेत्राच्या उगमाचा व विकासाचा अभ्यास करणे

-भारतातील सुरूवातीच्या शेतीव्यवसायाची परिस्थीती अभ्यासणे.

-डॉ.एम.के.ढवळीकरांच्या कृषीविषयक इतिहासलेखनाचा अभ्यास करणे.

❖ **गृहीतके-**

-भारतातील कृषी क्षेत्राचा उगम व विकास हा मानवाच्या गरजांमुळे झाला.

- भारतातील सुरूवातीची शेती ही मुख्यत्वे निर्वाह स्वरूपाची होती.

- डॉ.एम.के.ढवळीकरांचे प्राचीन भारतातील कृषीविषयक इतिहासलेखन महत्वपूर्ण आहे.

❖ **संशोधन पध्दती-**

सदरील शोनिबंध पूर्ण करण्यासाठी संशोधनाच्या ऐतिहासिक, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करून प्रस्तूत शोधनिबंध तयार करण्यात आला आहे.

❖ **विषय विवेचन** —

पदdमश्री प्रा.डॉ.एम.के.ढवळीकर हे एक इतिहासकार, इतिहाससंशोधक तथा पूरातत्वज्ञ यासोबत प्राध्यापक म्हणूनही इतिहासजगतासमोर आले व त्यांनी त्यात स्वत:ला सिध्दही केले. त्यांनी डेक्कन कॉलेज, पुणे, नागपूर विदयापीठ याठिकाणी अध्यापनाचे कार्य केले. गुजरातमधील कूंतासी, महाराष्ट्रातील कंधार, नेवासा, इनामगांव आदी ठिकाणी तर देशाच्या बाहेर ग्रीसमधील पेला याठिकाणी सुध्दा त्यांनी पूरातत्वीय उत्खनने करून भारताच्या पूरातत्वीय अभ्यासात एक महत्वाचे योगदान दिले. भारतीय पूरातत्व विभाग, भारतीय इतिहास परिषद, महाराष्ट्र इतिहास परिषद अशा संस्थामध्ये विविध पदांचे ते मानकरी ठरले. या सर्व बाबींसोबत त्यांनी भारताच्या प्राचीन इतिहासलेखनात मोलाची कामगिरी बजावली त्यांच्या इतिहासलेखनाची शैली ही मुख्यत्वे पूरात्वीय आधारावर असल्याने तेवढीच तर्कसुसंगतही होती. त्यांनी भारताच्या प्राचीन कालखंडात इतिहासलेखन करतांना आर्याचां प्रश्न, सिंधू लोक, पर्यावरण, संस्कृती यापासून ते मानवाच्या प्राचीन अस्तीत्वांचा शोध घेण्याचा प्रयत्न. अशाप्रकारच्या अनेक मुदयांना आपल्या ऐतिहासीक लेखनीतून शब्दबध्द केले ज्या प्रक्रियेत एक महत्वपूर्ण विषय म्हणजेच 'प्राचीन भारतातील कृषी व्यवस्था' होय. ज्यावरही डॉ.ढवळीकरांचे महत्वूर्ण लेखन आढळते.

शेतीचा शोध हा मानवाच्या गरजेपोटी लागला असावा अशी अनेक इतिहासकारांनी आपली मते मांडली आहेत. पर्यावरणात होत असलेल्या बदलामुळे मानवाला शेतीची गरज निर्माण झाली असावी. जगात शेतीची सुरूवात नेमकी कधी झाली हे सांगणे कठीण असले तरी त्यावर वेगवेगळी मतांतरे आपणांस अभ्यासण्यास मिळतात. त्यात डॉ.ढवळीकरांनी सुमारे दहा हजार वर्षापुर्वी जगात शेतीची सुरूवात झाली असावी असे मत मांडले. पर्यावरणातील बदल हे शेतीच्या शोधाला कारण असावे, पण शेतीचा उगम भारतात कसा झाला हे निश्चित सांगता येत नाही.[1] असे ते म्हणतात. जगभरात पूरातत्वज्ञांनी जी काही पूरातत्वीय स्थंळाची

ISSN 2231 4342

उत्खनने केली त्या संशोधनातून अशी निष्पती मिळते की भारताबाहेरील देशांमध्ये पिके घेण्याची जी सुरूवात झाली त्यामागे इतर ठिकाणांची प्रेरणा होती. जसे की बलूचीस्तानात जे काही शेतीचे पूरावे मिळतात त्यामागे इराण-इराकचा प्रभाव आहे. पण भारतातील गंगेच्या खो-यात सुमारे दहा हजार वर्षापूर्वी भातशेतीची सुरूवात झाली, ती स्वयंप्रेरणेने.[2] डॉ.एम.के.ढवळीकरांच्या या मतावरून आपणांस कळते की भारतात जी शेतीची सुरूवात झाली त्यामागे इतर देश किंवा प्रदेशापासून प्रेरणा मिळाली नव्हती तर भारतात पर्यायाने गंगेच्या खो-यात जे शेतीचे पूरावे सापडतात तेथील शेती स्वयंप्रेरणेतून सुरू झाली. अलीकडे डॉ.राकेश तिवारी यांची उत्तरप्रदेशातील लहूरादेवी याठिकाणी केलेल्या संशोधनातून डॉ.ढवळीकरांच्या मताला ऐतिहासीक पाठबळ मिळते. गंगेच्या खो-यातील शेतीचा उदय होण्यास पूष्ठी देणारी महत्वाची बाब म्हणजे गंगेच्या सुपीक प्रदेश ही होय आजही आपण गंगेच्या मैदानी प्रदेशाचे अवलोकन केले तर जगातील महत्वाच्या सुपीक प्रदेशांपैकी एक प्रदेश होय. सोबतच तो प्रदेश भरपूर पर्जन्यमानाचा पटdटा आहे.

भारतात गंगेच्या खो-यात शेतीला सुरूवात झाली असावी हे वरिल विवेचनावरून आपणांस सांगता येते. जगभरात ज्याप्रकारे एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी शेतीचा प्रसार झाला त्याचप्रकारे भारतात गंगेच्या खो-यातून शेतीचे लोण सध्याच्या बिहार व बंगाल राज्यात पोहोचले. बिहारमधील चिरांड व बंगालध्ये पांडू राजार ढिपी या ठिकाणी उत्खननातून सापडलेल्या पूरावशेषांवरून तत्कालीन व तेथील शेतक-यांची जिवनशैली समजण्यासही मदत होते. निसर्गत: शेती उत्पादन व पिक पध्दतीतही विकास होत जाणे स्वाभाविक आहे. तेथील शेतकरी गहू, तांदूळ बार्ली, मुग, मसूर वाटाणे अशा प्रकारच्या पिकांचे उत्पादन घेत होता.[3] या मताचा तर्कसुसंगत विचार करता गंगेच्या प्रदेशात भाताचे उत्पादन होत होते ते विकासात्मक पायावर पूढे वाढत गेले असावे. ज्याचाच परिणाम आज आपणास विभीन्न पिकांचे उत्पादन भारतात घेतले गेलेले प्रत्यक्ष अनुभवावरून दिसते.

एखादया क्षेत्राचा निसर्गत: विकास होत जाणे हे स्वाभाविक असते. त्यानुसार कृषी क्षेत्राचा विकास होत गेला. पण या विकासात पूर्णत: सुरूवातीपासून ते आजपर्यत सातत्यता होती असे म्हणणे ऐतिहासीक अंगाने विचार करता संशोधनाची बाब ठरते. त्याला सर्वात मोठे कारण म्हणजे पर्यावरणातील बदल होय. सुरूवातीपासून आजपर्यत पर्यावरणात सतत बदल होत आले आहेत त्यासंबंधीची अनेक संशोधकांची विवेचने आपणांस पाहावयास मिळतात. पर्यावरणातील बदल हे सुध्दा एक शेतीच्या उदयाचे कारण ठरते. शुष्क पर्यावरणाच्या अनुभूतीमूळे मानवाला धान्य साठवून ठेवण्याची गरज भासू लागली त्यातूनच मानवाची शोधक पावले शेतीकडे वळलेली अभ्यासावरून दिसतात. डॉ.ढवळीकरांनी सुध्दा त्यांसंबंधीचे लेखन केलेले दिसते. सिंधू संस्कृतीच्या कालखंडाचा उदाहरणादाखल आपण विचार केला तर नागरी सिंधूकाळात पाऊस चांगला पडत होता. त्यामुळे शेतीला चांगले दिवस आले आणि सुबत्तेमुळे भरभराट झपाटयाने झाली. पण उत्तरसिंधूकाळात पर्यावरण बदलामुळे शेतीचा —हास झाला. त्यामूळे ते लोक इतर प्रदेशात गेले. ते जिथे जात तेथील लोकांना गहू, बार्ली ही पिके घेण्यास सांगत. जसे महाराष्ट्रात ज्वारी — बाजरीची पिके सिंधू लोकांनी आणली असे डॉ.ढवळीकर लिहीतात. कारण महाराष्ट्रात गहू- बार्ली सारखी पिके घेण्यास उपयूक्त हवामान

नसून इथे ज्वारी –बाजरीस अनूकूल जमीन, पाणी व हवामान आहे. अशा प्रकारे ज्वारी बाजरीची लागवड महाराष्ट्रात इ.स.पू.2200 -2000 पासून आपल्याकडे सुरू झाली.[4] आज आपल्याला महाराष्ट्रातील बराचसा प्रदेश या दोन्ही पिकांसाठी हमीचा असलेला प्रत्यक्षदर्शी दिसतो.

इ.स.पू.2000 पासून इ.स.पू 500 पर्यतच्या कालखंडाचा विचार केला तर आपणास शेतीची तिच अवस्था दिसते. जी या अगोदर झाली. तांदूळ, गहू, ओट, ज्वारी, रागी, मसूर, वाटाणे, कूळीथ, मूग तसेच बादाम व आक्रोड अशी पिके घेतल्या जावू लागली. नांगरासारख्या अवजारांचाही वापर केला जावू लागला. काही प्रमाणात जलसिंचनही होवू लागले. विशेषत्वाने या सर्व बाबींचा प्रभाव सप्तसिंधूच्या प्रदेशात जाणवतो. तेथे वाहणा-या नदयांमुळे हा प्रदेश सुपीक बनला होता. पण हा प्रदेश भलेही सुपीक असेल किंवा वरिल विवेचन केल्याप्रमाणे शेतीत विकास झाला असेल तरी तो मर्यादीतच होता. पण ऋग्वेद कालखंडात पुन्हा शुष्क हवामान झाले वैदीक कालखंडात ब-याचदा दूष्काळ पडले असल्याची वर्णने ऋग्वेदात केलेली आढळतात. वैदीक आर्यांच्या काळात शेती फारशी प्रगत असावी असे ऋग्वेदातील पूराव्यावरून वाटत नाही. त्यांची अर्थव्यवस्था संपूर्णणे पशुधनावर आधारीत होती. शेती त्यामानाने दुय्यम होती[5] डॉ.एम.के.ढवळीकरांनी वरिल विवेचनापेक्षा पूढील विवेचन भिन्न स्वरूपाचे केलेले आहे. सिंधू संस्कृतीचा काळ वैदीक काळाच्या अगोदरचा असून हा भरभराटीचा होता.ती एक नागरी संस्कृती होती या कालखंडात भारताचा व्यापार भरभराटीस येवून देश-विदेशापर्यत पोहोचला होता. म्हणून तो काळ सुबत्तेचा आर्थिक उन्नतीचा होता. या उन्नत अर्थव्यवस्थेचा भक्कम पाया हा शेती होता. सिंधू संस्कृतीचा प्रदेशही तसा सुपिक असल्याने नदयांच्या पाण्याच्या उपलब्धतेमुळे शेतीला अनुकूलता लाभली.सिंधू स्थळांमध्ये उत्खननातून सापडलेल्या धान्यांच्या कोठारांमुळे आपल्याला तशी कल्पना आल्यावाचून राहणार नाही.सिचंनासंबंधीचे ठोस पूरावे उपलब्ध् झाले नसले तरी घरांमध्ये किंवा इतर काही ठिकाणी विहींरींचे वगैरे जे अवशेष सापडतात त्यावरून सिंचनव्यवस्था प्रचलीत असावी असा कयास बांधण्यात वावगे ठरणार नाही. एकंदरीत हया सर्व उदाहरणांचा विचार करता सिंधू संस्कृती ही प्रागैतिहासीक काळातील भरभराटीस आलेली संस्कृती असून तिला शेतीचा भक्कम पाया होता.[6] म्हणजे सिंधूकाळ, उत्तरसिंधुकाळ आणि वैदीक काळ यांचा एकमेकांशी उहापोह केला तर सर्वच कालखंडात शेतीचा समतोल असलेला दिसत नाही आणि तसे होणे सुध्दा स्वाभाविक आहे. कारण आजही प्रत्येक वर्ष शेतीसाठी सारखेच असते असे अनुभवावरून तरी दिसत नाही.

- **सारांश:-**

सारांशत: असे सांगता येईल की भारतात शेतीची सुरूवात ही अतिप्राचीन काळात झाली असून इतर ठिकाणाची प्रेरणा त्यापाठीमागे नव्हती तर स्वयंप्रेरणेतून झाली. पर्यावरणातील बदल हे प्रमुख कारणांपैकी एक असावे. काळाच्या ओघात व मानवी गरजांच्या पूर्ततेसाठी त्यात विकास होत गेला असला तरी सुरूवातीपासून आजपर्यतचाही विचार करता उदरनिर्वाह हा मात्र कृषी क्षेत्राचा मुख्य उददेश असलेला दिसतो. भारतात वेगवेगळया प्रदेशात तिचा विकास होत गेला व कालातंराने पिकांमध्ये वैविध्यही निर्माण झाले. सोबतच

डॉ.एम.के. ढवळीकरांचे उपयुक्त कृषीविषय इतिहासलेखन हे पूरानतत्वीय पूराव्यांच्या व इतर ऐतिहासीक साधनांच्या भक्कम पाठबळामुळे ऐतिहासीक दृष्टया तर्कसुसंगत वाटते.

❖ **निष्कर्ष :-**

-भारतात अतिप्राचीन काळात शेतीचा उगम झाला व नैसर्गीकरित्या तीचा विकास होत गेला.

-भारतात सुरूवातीच्या कालखंडात शेतीचा उपयोग उदरनिर्वासाठी करण्यास जास्त प्राधान्य दिलेले दिसते.

- डॉ.एम.के. ढवळीकरांचे प्राचीन भारतातील कृषीविषयक इतिहासलेखन एक महत्वाचा टप्पा आहे.

❖ **संदर्भ सुची:-**

1. ढवळीकर एम.के.,पूरातत्वविदया, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुबंई, प्रथम आवृत्ती, 1901, पृ.क्र.195.

2.ढवळीकर एम.के., भारताची कूळकथा, राजहंस प्रकाशन, पूणे, दूसरी आवृत्ती, 2018, पृ.क्र. 64.

3.ढवळीकर एम.के., भारताची कुळकथा, राजहंस प्रकाशन, पूणे, दूसरी आवृत्ती, पृ.क्रं. 69

4.ढवळीकर एम.के., कोण होते सिंधू लोक?, राजहंस प्रकाशन पूणे, पहिली आवृत्ती, 2019, पृ. क्र. 94.

5.ढवळीकर एम.के., आर्यांच्या शोधात, राजहंस प्रकाशन, पूणे, चौथी आवृत्ती, 2015, पृ.क्र.61.

6.ढवळीकर एम.के.,कोण एके काळी सिंधू संस्कृती, राजहंस प्रकाशन पूणे, पाचवी आवृत्ती,2016, पृ.क्रं.34

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

ब्रह्मदेव मूर्ती: एक ऐतिहासिक अभ्यास
(बेंबळी, जि. उस्मानाबाद)

डॉ. कुंभार अनिल भिमराव
सहा .प्राध्यापक,
श्रीमंत. बाबासाहेब देशमुख महाविद्यालय,
आटपाडी, जि.सांगली.

प्रस्तावना:

तेर हे महाराष्ट्रातील एक धार्मिक स्थळ संत श्रेष्ठ गोरोबा कुंभार यांचे जन्म ठिकाण प्राचीन व्यापारी शहर म्हणून सातवाहन काळामध्ये नावारुपास आले होते. तसेच तेर हे प्राचीन काळी तगर या नावाने प्रसिध्द होते. या ग्रीक ग्रंथामध्ये तगरचे उल्लेख आलेले आहेत. असे हे तेर हे ठिकाण उस्मानाबाद शहराच्या पूर्वेस ११ कि.मी. अंतरावर आहे. या ठिकाणी वेगवेगळ्या कालखंडामध्ये विविध राजवटींनी आपले वर्चस्व निर्माण केले होते. त्यामध्ये सातवाहन, चालुक्य, वाकाटक, कलचुरी बहामनी, यादव, आदिलशाही, मोगल इत्यादी काळाच्या ओघात जरी ही घराणी नष्ट झाली असली तरी तेर आणि तेरच्या आसपासच्या प्रदेशाचे महत्त्व प्राचीन काळापासून टिकून असल्याचे या ठिकाणी असलेल्या विविध दुर्मिळ मुर्ति, अवशेष, मंदिरे, बौध्द स्तुप, शिलालेख, नाणी, ताम्रपट यावरून दिसते. अशा या ऐतिहासिक व दुर्मिळ वस्तू तेर येथील वस्तुसंग्रहालयामध्ये पाहावयास मिळतात. वस्तुसंग्रहालयाचा अभ्यास करीत असताना ब्रह्मदेव मुर्ति अपघातानेच नजरेस पडली. अशा या दुर्मिळ मुर्तिचा सदर शोध निबंधामध्ये अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

तेर गावाच्या पुर्वेस २२ कि.मी. अंतरावर बेंबळी हे गाव आहे. या गावाच्या पश्चिमेस सदर ब्रह्मदेवाचे मंदिर असून त्याच्यासमोर बारव (पुष्पकर्णी) आहे. सर्वसाधारणपणे ब्रह्मदेवाचे मंदिर हे क्वचितच आढळते. परंतु या ठिकाणी ब्रह्मा, विष्णु आणि महेश अशा या त्रिमुर्तिंचे मंदिर आहे. असे हे मंदिर दक्षिण भागामध्ये क्वचितच सापडते. या मंदिराचे वैशिष्टय हे की, या तिन्ही मुर्ति एकाच मंदिरात आहेत. अशा या ब्रह्मा, विष्णु व महेश या मंदिराचा उल्लेख जिल्हा गॅझेटमध्येही सापडत नाही. असे हे दुर्मिळ मंदिर बेंबळी या गावामध्ये पाहावयास मिळते. अशाप्रकारच्या ब्रह्मदेवाच्या मुर्ति महाराष्ट्राबरोबरच भारताच्या इतर राज्यामध्येही पाहावयास मिळतात. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये असणाऱ्या विविध संग्रहालयामध्ये ब्रह्मदेवाच्या मुर्ति जतन करून ठेवल्या आहेत. अशा या ब्रह्मदेवाचे पूजन प्रतिक स्वरूपात केले जाते. तर काही ठिकाणी मुर्ति स्वरूपात त्याचे पुजन केले जाते. सदर मंदिरातील मुर्ति उभी असून एक मुखी आहे. डोक्यावर मुकुट, सरळ दाढी, स्मीत हास्यवदन करत असून पुर्वाभिमुखी आहे. तर प्रतिक रूपात म्हणजे दगडाच्या सपाट किंवा शिळारुपी ब्रह्माची पुजा ही प्रचलीत असल्याची दिसते. त्यामध्ये भोसे ता. पंढरपूर येथील सर्वे नं.७२७ या ठिकाणी श्री अर्जून .ष्णा कुंभार यांच्या शेतामध्ये अशाप्रकारची ब्रह्मदेवाची प्रतिक स्वरूपाच्या मुर्तिची पुजा केली जाते. या ठिकाणी मंदिर नसून ते प्रतिक उघडावर आहे.

भारतामध्ये विविध देवतांची व विविध पंथीयांची मंदिरे आढळतात. म्हणून भारतास मंदिराचा (देवळांचा) देश म्हणून ओळखले जाते. सुरुवातीस सृष्टीचा निर्माता ब्रह्मा, सृष्टीचा पालनकर्ता विष्णू आणि सृष्टीचा विनाशकर्ता महेश (शंकर) या देवतांची मंदिरे आणि त्यांचे विविध पंथ व उपपंथ पाहावयास मिळतात. परंतु विश्वाचा निर्माता ब्रह्मदेव यांची मंदिरे क्वचितच आढळतात. शिवाय त्यांचा पंथ किंवा उपपंथही पहावयास मिळत नाही. अशा या देवतेची मंदिरे व मूर्ती भारतामध्ये दुर्मिळ स्वरूपात आढळतात. त्यापैकी काही मूर्ती भारताच्या विविध राज्यांच्या प्रादेशिक संग्रहालयामध्ये पाहावयास मिळतात. प्राचीन काळात मंदिरे ही विश्वाची प्रति.ती आहे ही भावना मंदिरांच्या निर्मितीस कारणीभूत ठरली. पुढे विश्वविषयीच्या कल्पना मंदिराच्या वास्तुमध्ये आणि मूर्ती कामामध्ये दिसू लागल्यावर ही मंदिरे केवळ धार्मिक वस्तू न राहता ती त्या-त्या ठिकाणच्या समाजिक व सांस्.तिक जीवनाची प्रमुख ठिकाणे बनली. पुढील काळात नृत्य, गायन, वादन, शिल्पकला, चित्रकला व धातुकाम इत्यादी कलांना मंदिरांमुळेच प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे विविध जाती-धर्माची व पंथांची उपासना केंद्रे म्हणून विविध देव देवतांच्या मंदिरांची निर्मिती झाली. त्यामध्येच विष्णू आणि महेश (शंकर) या देवतांच्या तुलनेत ब्रह्मदेवाची मंदिरे फारच कमी प्रमाणात आढळतात.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये बेंबळी, जि. उस्मानाबाद येथील ब्रह्मदेव मूर्तीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

ज्ञात असलेल्या मंदिरांपैकी एक मंदिर गुजरातमधील 'खेडब्रह्म' या ठिकाणी आहे. तर दुसरे मंदिर राजस्थानमधील 'पुष्कर' या ठिकाणी आहे. सुरुवातीस सृष्टीचा निर्माता म्हणून ब्रह्मदेव, सृष्टीचा पालनकर्ता विष्णू आणि विनाशकर्ता शिव यांची पूजा केली जात असे. एकूणच विष्णू आणि शिव यांच्याबरोबर ब्रह्मदेवाची पूजा केली जात असे. परंतु ब्रह्मदेवाने असूरांना (राक्षसांना) दिलेले प्रोत्साहन, कन्या आसक्तीमुळे त्यांचे महत्व कमी होत गेले. याविषयी विविध अध्यायिका सांगितल्या जातात. त्यामध्ये एके दिवशी ब्रह्मदेवाने यज्ञाच्या वेळी आपली पत्नी सावित्रीस बोलावले असता ती लवकर आली नाही तेव्हा ब्रह्मदेवाने गायत्री या दुसऱ्या पत्नीसोबत यज्ञकार्य केले. हे पाहून सावित्रीस राग आला व तिने ब्रह्मदेवास अपूज्य होशील असा शाप दिला. याशिवाय दुसरी एक प्रचललित अख्यायिका म्हणजे, ब्रह्मदेवापासून एका मुलीचा जन्म झाला व ब्रह्मदेव७ स्वत:च्या मुलीवर आसक्त झाला. तसेच ऐतरेय ब्राह्मणांत प्रजापति (ब्रह्मदेव) द्यौं व उषा या दोन मुलींशी रत झाला असे सांगितले आहे.८ या कारणांमुळेच ब्रह्मदेव अपूज्य झाला. यामुळे ब्रह्मदेवाच्या मूर्ती व मंदिरे कमी प्रमाणात आढळतात. ज्याकाही मुर्ती सापडल्या आहेत त्यांचेही प्रमाण कमी आहे.

ब्रह्मदेवाच्या मूर्तीस चार तोंडे, चार हात असून तो कमळावर आरुढ आहे व त्याचे वाहन हंस आहे. ब्रह्मदेवाच्या एका हातात पुस्तक (चार वेद, ग्वेद, सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद), अक्षमाला,९ कमंडलू, यज्ञपात्रे व वराभय मुद्रा आहे. युध्दाशी ब्रह्मदेवाचा संबंध नसल्यामुळे त्याच्या हातात शस्त्र दिसत नाही.१० मध्ययुगीन काही चित्रांमध्ये यज्ञ करीत आहे व समोर मोरावर आरुढ सरस्वती दाखविली आहे.११

 ISSN 2231 4342

दक्षिण भारत आणि भारतातील ब्रह्मदेव मूर्ती

दक्षिण भारतामध्ये सुरुवातीस चोल घराण्याच्या काळामध्ये बांधलेल्या नर्तमल्लई व तिरुमल्लईच्या मंदिरामध्ये ब्रह्मदेवाचे स्वतंत्र स्थान होते. कर्नाटकमध्ये बदामी, ऐहोळे, धारवाड या ठिकाणी ब्रह्मदेवाच्या मूर्ती सापडल्या आहेत. या मूतीच्या संदर्भात श्री आर. पी. श्रीवास्तव म्हणतात की, दक्षिण भारतामध्ये सुरुवातीस ब्रह्मदेव पूज्यनीय असून त्यांची मंदिरेही होती मात्र पुढील काळात ब्रह्मदेव अपूज्य होऊन इ.स. १० व्याशतकाच्या सुमारास ब्रह्मदेवाची पूजा बंद झाली१२ आणि ब्रह्मदेवाचे स्थान सुब्रमण्यम१३ या देवतेने घेतले.

महाराष्ट्रामध्येही विविध ठिकाणी ब्रह्मदेवाच्या मर्ती मिळालेल्या आहेत. त्यामध्ये नागपूर जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यात मांढळ येथील उत्खननामध्ये वाकटक नृपती प्रवरसेन यांच्या ताम्रपटाबरोबर ब्रह्मदेवाची मूर्ती मिळाली आहे. ही मूर्ती महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन मूर्ती आहे असे मानले जाते. वेरुळ येथील कैंलास लेण्यामध्ये लिंगोद्भव शिवमूर्ती ही ब्रह्मदेव व विष्णू यांच्या संदर्भात असून या शिल्पामध्ये ब्रह्मदेवाच्या कथा आलेल्या आहेत. हे कथाशिल्प राष्ट्रकूट काळातील आहे. मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स वस्तुसंग्रहालयामध्येही ब्रह्मदेवाच्या मूर्ती पहावयास मिळतात. या ठिकाणी इ.स. ६ व्या शतकातील एक मूर्ती असून एलिफंटा लेणी संग्रहातील आहे. औरंगाबाद येथील प्रादेशिक वस्तु संग्रहालयामध्येही ब्रह्मदेवाच्या मूर्ती आहेत. ठाणे येथे डॉ. बेडेकर यांना शिलाहार कालीन एक ब्रह्मदेवाची मूर्ती मिळाली आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील थेरगी, होट्टल, बधणी, तळणी, हिमायतनगर, कंधार व शिरढोण या ठिकाणी ब्रह्मदेवाच्या मूर्ती मिळाल्या आहेत.१४ याशिवाय वसंतगढ (राजस्थान), महाबलीपुरम, दुधई इत्यादी ठिकाणी व मद्रास आणि मथुरेची वस्तुसंग्रहालये यामध्येही ब्रह्मदेवाच्या मूर्ती पहावयास मिळतात.१५ अशीच एक मूर्ती बेंबळी (ता.जि.उस्मानाबाद) या ठिकाणी गावाच्या पश्चिमेस एका मंदिरामध्ये असून या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्या मूर्ती एकत्र आहेत. या प्रमाणेच कोल्हापूर जिल्ह्यातील कौलगे या गावी यादवकालीन ब्रह्मदेवाची मूर्ती सापडली आहे. आणि अशाच प्रकारची ब्रह्मदेवाची मूर्ती मंगळवेढा (जि.सोलापूर) या ठिकाणीही सापडली आहे.

ब्राह्मणी संस्.तीच्या आजकालच्या स्वरूपात ज्या सात देवतांना अतिशय महत्व आहे. त्यापैकी ब्रह्मा ही एक देवता आहे. या देवतेय ब्रह्मा, स्वयंभू, पितामह, विधाता, प्रजापति, कमलासन इत्यादी विविध नावाने ओळखले जाते.१६ ब्रह्मदेवाने जी मूर्ती धारण केली आहे ती केवळ स्वेच्छेने केली आहे. त्यामुळे त्यास स्वयंभू व आत्मभू अशी नावे असून, उपवेदांसहीत चार वेदांचे पूर्वादि दिशा क्रमाने ब्रह्मदेवास उत्पत्ती स्थान मानले जाते. म्हणून ब्रह्मदेवास चतुर्मुख, चतुरानन या नावानेही ओळखले जाते.१७

या मूर्तीमध्ये ब्रह्मदेवास .श्यमान अशी तीन तोंडे आहेत. त्यापैकी मधल्या तोंडास लांब दाढी, कोरीव मुकूट१८, कानात कर्णभूषणे१९, यज्ञोपवीत२०, हार, कमरेवर कटीसूत्र२१ इत्यादी अलंकार असून पायात तोडे आहेत. या मूर्तीस चार हात आहेत. मूर्तीचा उजवा समोरील हात अभय मुद्रेत२२ असून अंगठामध्ये अक्षमाला आहे. उजव्या मागील हातामध्ये भृक पोथी२३ आहे, तिसज्या मागील डाव्या हातामध्ये पाश२४ आहे. चौथ्या

ISSN 2231 4342

समोरील डाव्या हातामध्ये घट२५ असून या हाताला टेकू लावले आहे. मूर्तीच्या पायाजवळ हंस असून उजवीकडे गायित्री व डावीकडे सावित्री या दोन पत्नी आहेत. ब्रह्मदेवाला मूर्ती स्वरूपात पूजला जाणार नसल्याचा शाप असल्याने त्याच्या मूर्ती खूपच कमी प्रमाणात मिळतात.

हिंदू धर्मामध्ये शिवाची पूजा करणारा शैव पंथ, विष्णूची पूजा करणारा वैष्णव पंथ, शक्तीची पूजा करणारा शाक्त पंथ, गणेशाची पूजा करणारा गणपत्य पंथ इत्यादी विविध पंथ उदयास आले. परंतु ब्रह्मदेवाची पूजा करणारा कोणताही पंथ उदयास आलेला नाही. कारण ब्रह्मदेवास अपूज्येचा शाप असल्याने त्याची पूजा करणारा पंथ उदयास आलेला नाही. परंतु सुरुवातीस ब्रह्मदेवाची पूजा केली जात होती हे वरील विविध ठिकाणच्या मूर्ती व मंदिरावरून स्पष्ट होते. डॉ. किप्पी यांच्या मते, दक्षिण भारतातील ज्या ब्रह्मदेव मूर्तीला दाढी व हंस वाहन दाखविले नाही. अशा मूर्ती किंवा प्रतिमा इ.स. ९ व्या ते १० व्या शतकातील आहेत. अशा या ब्रह्मदेव मूर्तीचे जतन आणि संवर्धन होणे गरजेचे आहे.

संदर्भ सूची:

१. महाराष्ट्र राज्य परिचय खंड १, महाराष्ट्र स्थलदर्शन, पृ.क्र.७६४-७६५.

२. चौधरी डी.एम., पंढरपूर नगरीचा इतिहास, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध (इतिहास), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००६, पृ.क्र.७.

३. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा), भारतीय संस्.ती कोश, खंड-१६, भारतीय संस्.ती कोश निर्मिती मंडळ, पुणे, १९७०, पृ.क्र.६३३-६३४.

४. भारतीय इतिहास आणि संस्.ती, त्रैमासिक वर्ष २४ वे, पुस्तक ९५, पृ.क्र.३.

५. जोशी महादेवशास्त्री (संपा), उपरोक्त, पृ.क्र.६३३-६३४.

६. अभ्यंकर शंकर वासुदेव, भारतीय तीर्थक्षेत्रे व मंदिरे, भक्तिकोश, खंड-५, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, २००६,पृक्र.११४८.

७. ब्रह्मदेव: हिंदू देवतांच्या त्रिमूर्तीमधील पहिली देवता व सृष्टीचा निर्माता ब्रह्मदेव या देवतेचा त्रिमुर्तीमध्ये पहिला क्रम असला तरी महात्म्य व संप्रदायाची व्यापकता या.ष्टीने ब्रह्मदेवाचे स्थान शेवटचे आहे. या देवतेस ब्रह्मा, प्रजापती, पितामह, स्वयंभू, परमेष्ठी इत्यादी नावांनी ओळखले जाते. बृह, किंवा वृदू (वाढणे-विस्तारणे) या संस्.त शब्दापासून ब्रह्मन् हा शब्द बनला असून ग्वेदात नपुसकलिंगी ब्रह्म शब्दाचा अर्थ मंत्र असा आहे. आणि उपनिषदामध्ये ब्रह्मन् या शब्दाचा अर्थ जगाचे मूळ कारण असा आहे. ग्वेदामध्ये (९.९६.६) ब्रह्मा असा उल्लेख आला आहे. परंतु त्याचा अर्थ संदिग्ध आहे. वैदिक काळात विश्वकर्मा, प्रजापती इत्यादी देवता या निर्मिती करणाज्या मानल्या आहे. ब्राह्मण काळातील प्रजापतीचेच पुराणकाळामध्ये ब्रह्मदेवामध्ये रुपांतर झालेले दिसते. (शर्मा लिलाधर, भारतीय संस्.ती कोश (हिंदी), रजपाल प्रकाशन, दिल्ली, १९९६, पृक्र.६२३.)

ISSN 2231 4342

८. खरे ग.ह., मूर्तिविज्ञान, यशोदा चिंतामणी स्ट, पुरस्.त ग्रंथमाला क्र. ९, वर्ष १९३९, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुरस्.त ग्रंथमाला क्र.३५, पृक्र.३.

९. अक्षमाला: रुद्राक्ष, कमलाक्ष, स्फटिक इत्यादी मण्यांची (जपमाळ) माळ म्हणजे अक्षमाला होय. कित्ता, पृ.क्र.२११.

१०. जोशी नी.पू., भारतीय मूर्तीशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९९, पृ.क्र.३०४.

११. माटे, म.श्री., प्राचीन कलाभारती, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९८, पृक्र.१४०.

१२. जोशी नी.पू, उपरोक्त, पृ.क्र.३०५.

१३. सुब्रमण्यम्: दक्षिण भारतामध्ये सुब्रमण्यम् या देवतेस कार्तिकेय किंवा स्कंद या नावाने ओळखले जाते. कर्नाटक राज्यातील कनाडा जिल्हयातील सुब्रमण्यम् या क्षेत्रास कौमार क्षेत्र म्हणूनही ओळखले जाते. पुराणामध्ये याचे महत्व वर्णन आलेले आहे. व परशुराम क्षेत्रातील सात तिर्थांमध्ये या तिर्थक्षेत्राचा समावेश होतो. सुब्रमण्यम या ठिकाणी मयूर वाहन असणाज्या भगवान सुब्रमण्यम यांचे मोठे मंदिर आहे. या मंदिराशिवाय या ठिकाणी उमा-महेश्वर, भैरव, नृसिंह यांचीही मंदिरे पाहावयास मिळतात. (शर्मा लिलाधर, उपरोक्त, पृ.क्र.९७५) उपाध्याय भगवतशरण, भारतीय व्यक्तिकोश, आर्य बुक डेपो, नई दिल्ली, प्रथम संस्करण, १९७६, पृ.क्र.२४६.

१४. भामरे (डॉ.) राजेंद्रराव, गद्रे (डॉ.) प्रभाकर (संपा), संशोधक, त्रैमासिक, इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, सप्टेबर २०११, वर्ष ७९, अंक ५, पृ.क्र.२१.

१५. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा), उपरोक्त खंड ११, पृ.क्र.९८६.

१६. खरे ग.ह., संशोधकाचा मित्र, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रथमावृत्ती १९७१, पृ.क्र.१८१.

१७. गोडबोले रघुनाथ भास्कर, श्री भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९२८, पृ.क्र.२४३.

१८. मुकूट: मुकूटाचे वेगवेगळे प्रकार असलेले दिसतात. त्यामध्ये जटामुकूट, किरिटमुकूट, करंडक मुकूट इत्यादी डोक्यांच्या जटांच्या मुकूटासारख्या रचनेस जटामुकूट असे म्हणतात. फेस टोपीसारखे परंतु वर कळस असलेल्या मुकूटास किरिटमुकूट असे म्हणतात. करंडाप्रमाणे एकावर एक पण लहान होत गेलेल्या वर्तुळांनी बनलेल्या मुकूटास करंड मुकूट असे म्हणतात.

१९. कर्णभूषणे: कानात घालावयाच्या अलंकारास कर्णभूषणे असे म्हणतात. भारतामध्ये रामायण, महाभारत काळापसून कर्णभूषणे प्रचलित आहेत. तत्कालीन कर्णभूषणांचे दोन प्रकारचे असलेले दिसतात. १) कर्णिका: कानांच्या वरच्या भागात घालावयाचे कर्णभूषणास कर्णिका असे म्हणतात. २) कुंडल: कानात खालच्या पाळीत घालावयाच्या अलंकारास कुंडल असे म्हणतात. (जोशी लक्ष्मणशास्त्री, उपरोक्त खंड क्र.३, पृ.क्र.३४५)

२०. यज्ञोपवीत (जानवे): यज्ञोपवीत यालाच जानवे असे म्हणतात. कुषाण् काळात जानव्याच्या वापर कमी प्रमाणात होत होत. हे विष्णूच्या प्राप्त झालेल्या प्रतिमांवरून (मूर्तीवरून) दिसते. कुषाणकाळानंतर गुप्तकाळात जाणण्याचा वापर वाढलेला दिसतो. यज्ञोपवीत मोत्यांपासून तयार केले जात असे. सुरुवातीस यज्ञोपवीत हे धाग्यापासून तयार केले जात असावे. एकूणच (यज्ञोपवीत) जानव्यास एका अलंकाराचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसते.

२१. कटीसूत्र: प्राचीन भारतामध्ये धोतरावरून कमरेभोवती गुडाळलेली एक अरुंद पट्टी शिष्टसंमत पोशाखाचे महत्वपूर्ण अंग मानले जाते. कटिसूत्र म्हणजे आधुनिक करदोडा किंवा करगोटा होय. गुप्तकाळामध्ये करगोटे हे रेशमापासून बनविले जात असत. अशा या पिळदार दोज्यास श्रोणीसूत्र असे म्हणत असत. (कित्ता, पृ.क्र.५४).

२२. अभयमुद्रा: कोपरापासून पुढील हाताचा भाग उभा करणे यालाच अभय मुद्रा असे म्हणतात. जवळच्या व्यक्तिस थांब म्हणण्यासाठी किंवा एखाद्या व्यक्तीस आशीर्वाद किंवा वर देण्यासाठी ही मुद्रा वापरली जाते. (खरे, ग.ह., मूर्ती विज्ञान, उपरोक्त, पृ.क्र.२०९)

२३. सृक (भृक): लाकडी दांडास वर्तुळाकार टवळे असलेली यज्ञीय पळी किंवा यज्ञामध्ये हवन करण्याची पळी तिलाच सृक किंवा भूक असे म्हणतात. (कित्ता, पृ.क्र.२१२)

२४. पाश: एक किंवा अनेक दोज्यांच्या फाशास पाश असे म्हणतात. (कित्ता, पृक्र.२११)

२५. घट (जलपात्र): घाट यालाच जलपात्र असे म्हणतात. कुषाणकालीन विष्णूच्या काही प्रतिमांमध्ये शंखांचा पर्याय म्हणून घट (जलपात्र) दाखविलेले आहे. हे पाण्याचे भांडे मैत्रेय बोधीसत्वाच्या हातामध्ये दिसणाज्या अमृत घटासारखे म्हणजे उंच गळ्याच्या लांबट गोल बाटली सारखे दिसते. त्यालाच कमंडलू असेही म्हणतात. ही शंख येण्याच्या पूर्वीची स्थिती मानली जाते. मथुरेमध्ये मिळालेल्या एका विष्णू प्रतिमेच्या जलपात्रावर दोन्ही बाजूला अलंकारण म्हणून दोन शंख दाखविलेले आहेत. अशा प्रकारचा घट (जलपात्र) ब्रह्मदेवमूर्तीच्या समोरील डाव्या हातामध्ये असलेले दिसते. (जोशी नी.पू., उपरोक्त, पृ.क्र.५४).

२६. खरे ग.ह., मूर्तीविज्ञान, उपरोक्त, पृ.क्र.७.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद
राष्ट्रीय ई- परिषद २७ व २८ फेब्रुवारी २०२१
शोध निबंध

महानयोगिनी अक्कमहादेवी

सादरकर्ती
डॉ. राजश्री निकम
कृष्णा महाविद्यालय, रेठरेबुद्रुक
ता. कराड, जि. सातारा.
ई-मेल : rdnikam73@gmail.com
Mobile No. 9284685240

प्रस्तावना —

मध्ययुगीन कालखंडातील महात्मा बसवेश्वरानी केलेल्या सामाजिक सुधारणामध्ये स्त्रीमुक्ती चळवळीला महत्वाचे स्थान देता येते. यातून अनेक महान स्त्रियांना प्रेरणा मिळाली व मोठया आत्मविश्वासाने त्यांनी निर्भिडपणे आपले कार्य पार पाडले. यामध्ये महानयोगिनी अक्कमहादेवी यांने कार्य विशेष उल्लेखनीय आहे. त्याचा थोडक्यात आढावा. या ठिकाणी घेण्यात आला आहे.

उद्दिष्टे —

1. स्त्री चळवळीचा थोडक्यात आढावा घेणे.
2. अक्क महादेवीचे जीवन कार्य अभ्यासणे.
3. अक्क महादेवीच्या कार्याचा सामाजिक परिणाम अभ्यासणे.

प्राचीन स्त्री जीवन —

प्राचीन काळातील स्त्री जीवनाचा आढावा घेता वैदिक पूर्व काळातील समताधिष्ठित समाजरचनेचा आढावा घेतानि ऋती ही समताधिष्ठित समाजव्यवस्थेचे निर्मिक आहे; 1पूर्व वैदिक काळात गार्गी, मैत्रेयी, घोषवर्ती, विदुषी नीऋचारचल या परंतु उत्तर वैदिक कालखंडात स्त्रियांवर अनेक बंधने लादली. तीचे स्वातंत्र्य काढून घेतले. मनू, पाराशरने स्त्रीला शुद्र मानले. अनेक क्रूर बंधनात तिला जखडून ठेवले.

ISSN 2231 4342

अशा या क्रूर बंधनात जखडलेल्या स्त्रीला मुक्त करण्याचे महान कार्य महात्मा बसवेश्वरानी केले व आपल्या कांतीच्या खडगाने कठोर प्रहार केला.[2] स्त्री पुरूष समान आहेत बाळंतपण, रजस्व काळात स्त्रीला अस्पृश्य मानले यासारख्या गोष्टी खोडून काढल्या व लिंग धारणेचा एकच दिक्षा संस्कार एकाच मंचावर स्त्री व पुरूष यांना देवून अपवित्राच्या शापातून स्त्रीची मुक्तता केली.[3] बसवेश्वरानी राबवलेल्या अनेक स्त्री मुक्ती उपक्रमातून अक्क महादेवी सारखे आदर्श व्यक्तीमत्व उपक्रमातून निर्माण झाले व कुंडलिनी योग सारखी कठिण साधना स्त्री करू शकते हे त्यांनी आपल्या कृतीने दाखवून दिले.

अक्क महादेवी :-

बसवेश्वरानी चालवलेल्या स्त्रीमुक्ती चळवळीतील एक महान व्यक्तिमत्व म्हणून अक्क महादेवी यांना उल्लेख केला जातो. तसेच त्याप्रसिध्द कन्नड कवियत्री म्हणूनही ओळखल्या जातात.

वीर शैव पथातील शिवभक्त असणा-या अक्क महादेवी यांचा जन्म कर्नाटक राज्यातील शिमोगा जिल्ह्यातील उडुतळी या गावी झाला. प्रभु लिंगलेले या काव्य ग्रंथात त्यांची माहिती मिळते. तसेच हरि हर व राचय्या या दोन कन्नड कवीनी ही त्यांची माहिती दिली आहे. विद्यासंपन्न अक्क महादेवीना उडुतडीच्या जैनधर्मीय राजा कौकशियाने मागणी घातली. वीर शैवपंथाची दीक्षा राजाने घ्यावी अशी त्यांनी मागणी करून विवाहास मान्यता दिली. परंतु नंतर राजानेही अट मोडल्याने तीने राजाचा त्याग केला. व ती चेन्नमलिकार्जुनाचे ध्यान करततोच आपलापती मानला व कल्याणाला बसवेश्वरच्या घरी गेली व तेथे शिवशरणांच्या मेळयात सहभागी झाली.[4] व त्यांचा योगाग त्रिविधी' नावाचा 62 त्रिपदी हा ग्रंथ असून त्यात अध्यात्मिक अनुभव व्यक्त झाले आहेत. त्यांनी उपासनेतून मोठी अध्यात्मिक प्रगती साधली. समाजातील काही अनिष्ठप्रथांच्या विरोधी धाडसाने उभ्या राहिल्या निर्भीडपणे अनेक अनिष्ठ प्रथानां विरोध केला. सर्वसुखे असताना धाडसाने पती बरोबर घटस्फोट घेवून स्वताला सामाजिक कार्यात झोकून दिले. कुंडलिनी योग साधना स्त्री करू शकते हे सिध्द करून जगाला दाखवून दिले, स्त्री जन्म, स्त्री देह धारण करून स्त्री मोक्ष मिळवून शकते याजाणीवेतून आपले कार्य निर्भिडपणे चालवले. त्यांच्या कार्याच्या सामाजिक परिणामातून अनेक स्त्रियांचा आत्मविश्वास वाढला. स्त्रीला मानाले स्थान प्राप्त झाले अक्क महादेवीयांना प्रत्यक्ष देवता स्वरूपात स्विकारने कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेशात त्यांची मंदिरे बांधण्यात आली व स्त्रीयांना मान सन्मान व गौरव वीर शैव धर्मात मिळाला. अक्क महादेवी कार्य अनेक स्त्रियांना मानवतावादी भावनेतून वागणूक मिळण्यास उपयुक्त ठरले. कन्नड साहीत्य त्यांच्या अनमोल वचानानी समृध्द केले. त्यांच्या काव्यातून त्यांनी पुढीलउ ल्लेख केला. ''लिंगा मुळे मी शरीराच्या वेदना पार करू शकले, ज्ञानामुळे मनाच्या वेदना पार करू शकले. शिवाच्या अनुभूतीतून हरवलेले स्वत्व शोधू शकले.''

अक्क महादेवी यांनी 430 वचन लिहिली आहेत. यामुळे कन्नड साहित्यात त्यांचे महत्वाचे योगदानठ रते.

संदर्भ :-

1. कद्राळे नितीत : पुरूष प्रधान संस्कृतीची गुलाम स्त्री मित्र प्रति प्रकाशन, औरंगबाद 2007, पाननं. 11
2. माताजी विश्व विभूती बसवण्णा, कृष्ण प्रिंटीग बेंगलोर, 1977, पाननं. 65
3. डॉ. निकम आर. डी., संशोधन लेख स्त्री मुक्ती चळवळीचे जनक महात्मा बसवेश्वर, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, कोल्हापूर 2010, पान नं. 23
4. मुर्ती एम चिदानंद, श्री बसवेश्वर,नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, पान नं. 44

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

'राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री विषयक विचार'

संशोधक विद्यार्थी
रामेश्वर कडूबा सहाने,
इतिहास विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद
email:ramsahane.२१४@gmail.com,
mob:९४२०००००३०

प्रस्तावना:

छत्रपती शिवाजी महाराजानंतर मराठा साम्राज्याची विभागणी झाली .कोल्हापूर आणि सातारा अशा दोन ठिकाणावरून स्वतंत्र कारभार पहिला जात होता. सातारा गादीचे वारसदार नाकारल्यामुळे राणीसाहेब ताराबाई यांनी कोल्हापूरच्या नवीन गादीची स्थापना करून कारभार पाहण्यास सुरवात केली याच कोल्हापूर गादीचे वारसदार छत्रपती शाहू महाराज होते .त्यांनी कोल्हापूर संस्थानाचे चौथे शिवाजी यांची पत्नी आनंदीबाई यांनी घाडगे कुटुंबाकडून दत्तक घेतले होते. राजर्षी महाराज अत्यंत हुशार,तल्ल्क बुद्धीचे,पुरोगामी विचाराचे तसेच समतावादी दृष्टीकोन बाळगणारे होते.अशा उदारमतवादी राजाने १८९४ साली राज्यकारभाराची सर्व सूत्रे हाती घेऊन संस्थानात समता प्रस्थापितकरण्यास सुरवात करून एक आदर्श राज्य घडवले.

कोल्हापूर संस्थानात समता प्रस्थापित करत असताना त्यांनी परंपरावादी अनिष्ठ चालीरीती परंपरा या दूर करून समाजाला पुनर्जीवित करायचे ठरवले.त्यातून त्यांनी आपल्या कार्याला सुरवात केली .हे कार्य करत असताना समाजाचा समपातळीवर विकास झाला पाहिजे या दृष्टीकोनातून विचार करत असताना स्त्री हा समाजाचां अर्धा महत्वाचा घटक आहे आणि त्यांची हि विकास समप्रमाणात झाला पाहिजे.जेवढा पुरुषांचा होत आहे.या हेतूने राजर्षीनी स्त्री उद्धाराचा वसा हाती घेतला.तेव्हा त्यांनी संस्थांत स्त्री शिक्षांचे कार्य हाती घेतले.

त्यावेळी भारतीय समाज जीवनात स्त्रीला धर्म आणि स्त्री परंपरांनी जकडून टाकले होते .वैदिक काळापासून तर १९ व्या शतकापर्यंत समाजात हिच परिस्थिती दिसून येत होती इंग्रजांच्या आगमनामुळे व इंग्रजी शिक्षणामुळे येथील तरुणांना पाश्चत्य संस्कृतीची ओळख होऊ लागली .स्त्रीवरील सामाजिक रूढी,परंपराचा निषेध करावयास सुरुवात केली .त्यातूनच एक परिवर्तनवादी चळवळ उभी राहिली. याच काळातील समाजसुधारकांनी वृत्तपत्रातून सदर केलेल्या लोकांनीही लोकजागृतीचे कार्य केले. तसेच ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री-पुरुष तुलना' हे पुस्तक सत्य परिस्थिती वर प्रकाश टाकणारे आहे.

विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारकांनी शिक्षणाबद्दल,विशेषतः स्त्री शिक्षणाबाबत व दलितांच्या शिक्षणाबाबत नुसतेच विचार मांडले नाहीत तर त्यासाठी स्वतः शिक्षण संस्था काढून स्त्री शिक्षणाला आणि दलितांच्या शिक्षणाला चालना दिली.यात महर्षी धोंडो केशव कर्वे, यांनी तत्कालीन समाज जीवनात स्त्री शिक्षणविषयक जी क्रांती केली त्याची इतिहासाने सुवर्णाक्षरात नोंद केली आहे. यात त्यांनी अनाथ बालिका श्रमाची ,महिला विद्यालयाची स्थापना, महिला विद्यापीठाची स्थापना हे त्याचे शिक्षण क्षेत्रातील कार्य असून अनाथ, विधवा व स्त्री शिक्षण हे त्यांच्या जीवनातील सर्वात महत्वाचे ध्येय होते.अशाच प्रकारचे ध्येयवादी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे येथील स्त्री-पुरुष समानतावादी विचाराचे पुरस्कर्ते होते.मुलांमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव करू नये असे त्याचे मत होते. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार हा त्यांच्या मुलभूत विचारांचा पैलू होता.स्त्री शिक्षण विषयक कार्य करत असताना राजर्षी संस्थानातील सर्व समान घटकातील स्त्रियांना शिक्षण घेता येईल अशा उपाय योजना आणल्या आणि स्त्रियांना विकासाची संधी उपलब्ध करून दिली.त्यांनी स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून संस्थानात समताधीष्टीत समाज रचला.यासाठी त्यांनी नेमके कोणते कार्य स्त्री शिक्षण प्रसार ,प्रचारासाठी केले ,ज्यामुळे कोल्हापूर संस्थांत समता प्रस्थापित झाली या विषयीचा राजर्षी शाहू महाराजांच्या स्त्री शिक्षण विषय कार्याचा आढावा प्रस्तुत शोध निबंधात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री शिक्षविषयक कार्य:

राजर्षी शाहू महाराज गादीवर आल्यापासून त्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले .बहुजन समाजाच्या मुलांसाठी कोल्हापुरात प्रथम मराठा,जैन,लिंगायत,मुस्लीम आदी वसतिगृहांची स्थापना केली ,राजर्षी यांनी करवीर राज्याचे सूत्रे हाती घेतली . त्यामुळे बहुजन समाजास शिक्षण घेण्याची जाणीव हि नव्हती आपल्या मुलांना शिक्षण देण्याने त्यांची उन्नती होईल,याचे आकलन अशिक्षित बहुजनांना नव्हते.अशा परिस्थितीत मुलींना शिक्षण देणे हे त्यांच्या स्वप्नातही नव्हते.अशा प्रकारे स्त्रियांची अवस्था फारच दयनीय होती.स्त्रिया या शुद्र मानल्या गेल्या होत्या.बालविवाह या प्रथेमुळे तर मुलींचे शिक्षणही अशक्य कोटीतील गोष्ट होती .काही वर्गातील मुलींचे शिक्षण हे प्राथमिक शाळे पुरते मर्यादित होते ."इ.स १८९३-९४ साली करवीर संस्थानात मुलींच्या फक्त २६ शाळा होत्या आणि १ अध्यापक विद्यालय होते.कोल्हापूर संस्थानात सामाजिक सुधारणा घडून आणताना समाजातील असणाऱ्या समस्यामागील मूळ शोधून त्यात बदल करणे गरजेचे आहे आणि हा बदल करावयाचा असेल तर शिक्षण यावरील जालीम उपाय असून सर्व समस्यांचा नायनाट करील अशी मनात खुणगाठ बांधून राजर्षी शाहूनी संस्थानात शिक्षणाचा प्रसार प्रचार केला."आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या ३/४ वर्षाच्या प्रारंभी काळातच त्यांनी कोल्हापूरा बाहेर भूदराड, आजरा या डोंगरी ग्रामीण भागात मुलीच्या शाळा सुरु केल्या".

शिक्षणाचा प्रसार करताना संस्थानातील पद्द्लीत,वंचित,पिडीत शोषित समाज घटकाला याचा उपयोग कसा घेता येईल याची योजना तयार केली.तसेच यात स्त्री -पुरुष असा भेद केला नाही.ते नेहमी सांगत की,समाजातील स्त्रिया सुशिक्षित झाल्यास आपोआपच समाज सुधारेल.त्यांच्या या विचारातून त्यांच्या मनात स्त्रियांन बद्दल असणारा आदर्श लक्षात येतो.संस्थानात शिक्षणाचा प्रसार करताना प्रथम त्यांनी पद्दलित आणि

स्त्रियांना प्राधान्य दिले.पूर्वी स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे पापाचरण करणे ही कुळचट कल्पना रूढ झाली होती.शाहूंनी स्त्री शिक्षणाबाबतची वैचारिक भूमिका त्यांनी आपल्या धाकट्या सुनबाई इंदुमती राणीसाहेबांनी लिहिलेल्या पत्रातून दिसूमहाराज त्यांना प्रोत्साहन देताना लिह्तात की,"तुम्ही जशा जशा शिकाल तसतशी तुमची मानसिक क्षितिजे विस्तारेल आणि तुमचे विचार अधिक उदात्त होतील .सबब शिक्षणाकडे दुर्लक्ष करु नाकात.यावरून असे दिसून येते की,महाराजांनी केवळ स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला नव्हता तर त्याची सुरवात स्वतः च्या घरापासून केलेली होती .त्यांनी राणीसाहेबानी शिक्षित होऊन संस्थानातील पुढील शैक्षणिक व राज्यकारभारात मदत करावी असा विचार या पत्रातून अभिव्यक्त झालेला दिसून येतो.

कोल्हापूर संस्थानात त्यांनी एकाधिकार पद निर्माण केले आणि संस्थानातील स्त्री शिक्षणाची सर्व जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली होती.या पदावर प्रथम स्त्री शिक्षण 'मिस एच.लिटल यांची नेमणूक केली होती.१८९५ साली २० ओगस्ट रोजी मिस एच.लिटल यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. तेव्हा राजर्षी १ नोव्हेंबर १८९५ पासून संस्थांतील सौ. रमाबाई केळकर याची नेमणूक केली.त्यापुढे १९२२ पर्यंत सेवा करून निवृत्त झाल्या.संस्थानात स्त्री शिक्षणाचा प्रसार करताना केवळ प्राथमिक शिक्षण घेऊन न थांबता उच्च शिक्षण हि स्त्रियांनी घ्यावे असे त्याचे मत होते.त्यासाठी त्यांनी आपली सुनबाई इंदुमती राणीसाहेबांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करावे यासाठी पूर्ण तयारी केलीं.मात्र काही कारणास्तव त्या शिक्षण पूर्ण करू शकल्या नाहीत. हि उणीव भरून काढण्यासाठी महाराजांनी श्रीमती रखमाबाई च्या न्या श्रीमती कृष्णाबाई केळकर यांच्या वैद्यकिय शिक्षण स्वतः महाराजांनी पुढाकार घेऊन त्यांना मुंबईच्या ग्रांट मेडीकल कॉलेज मध्ये शिक्षणासाठी संस्था स्थापन केल्या व त्या माध्यमातून राजघराण्यातील व संस्थानातील सर्व स्त्रियांना शिक्षणाची सुविधा करून दिली .

संस्थांनातील सर्व समाजातील स्त्रियांना शिक्षण घेता यावे यासाठी महाराज सतत प्रयत्नशील राहत असत .त्यासाठी त्यांनी समाजातील सर्व स्त्री शिक्षणासाठी राजाज्ञा काढली होती की,"तमाम लोकांस जाहीत करण्यात येते की,ज्यांच्यात पडदापाल हि रीत नाही आणि मुलींना व स्त्रियांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे अशा मागासलेल्या वर्गातील लोकांनी अप्पासाहेब तथा मामासाहेब सुर्वे यांच्याकडे तसे अर्ज द्यावेत म्हणजे त्या विद्यार्थिनीची राहण्याची,जेवणाची व शालेय पुस्त्कांची फी वैगेरे सर्व सोय सरकारी खर्चाने करण्यात यईल. "या वरून स्त्री शिक्षानाबाबातचा उदात्त हेतू लक्षात येतो. केवळ महाराज राजाज्ञा काढून थांबले नसून पुढे महाराजांनी मुलींच्या उच्च शिक्षणासाठी सतत प्रयत्न केले.त्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा दाखला पुढील पुराव्यावरून दिसून येतो. "मुलींच्या उत्तम शिक्षणासाठी कोल्हापूर संस्थानातील हुशार मुलीना 'सेट कोलंबो गर्ल्स हायस्कूल,मुंबई 'या संस्थेत शिक्षणासाठी पाठवण्यात आले होते .मुलींच्या शिक्षणासाठी सर्व जबाबदारी राजर्षींनी घेऊन या स्कूलला २६ मार्च १९२० रोजी ५०० रुपये देणगी दिली होती." या त्यांच्या कार्यातून स्त्री शिक्षणाबद्दल महाराजांची असणारी तळमळ दिसून येते.

महाराजांनी संस्थानातील प्रत्येक समाजातील स्त्रियांना शिक्षण घेता यावे .यासाठी सतत प्रयत्न केला होता.कारण राजर्षी समतेचा पुरस्कार करणारे कर्ते समाजसुधारक होते.शाहू महाराजांनी केवळ संस्थानातील

 ISSN 2231 4342

उच्च जातीतील मुलीनीची शिक्षण घ्यावे असे मुळीच वाटत नव्हते .त्यांनी पददलित ,अस्पृश्य समाजातील मुलीनीही उच्च शिक्षण घ्यावे जेणे करून या समाजाची उन्नती साधेल असे मनोमन वाटायचे यासाठी शाहू महाराजांनी अस्पृशांच्या मुलीना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी महाराजांनी या कामासाठी एक सेविकेची निवड केली .या सेविकेने अस्पृशांच्या मुलींचे शिक्षणाबाबत मन वळवण्याचे काम केले.या कार्यातून महाराजांचा अस्नता समतावादी दृष्टीकोन लक्षात येतो .कारण राजा तोच असतो जो राज्यातील तळागाळातील समस्याच शोध घेऊन त्याचे निरसन करतो या युक्तीची महाराज आपल्या कार्यातून जाणीव करून देतात.महाराज संस्थानातील आणि संस्थाना बाहेरील देखील मुलींच्या शिक्षणाचा विचार करत.याचे उदाहरण म्हणजे,"कोल्हापूर संस्थानातील गुजराती मुलीना राजर्षी यांनी गुजराती मुलींसाठी शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यासाठी भावनगर राज्याच्या खजिन्यात २४०० रुपये ठेव म्हणून ठेवले होते.

शिक्षणातील मुलीचे प्रमाण वाढण्यासाठी शाहू वेगवेगळ्या मार्गाने सतत प्रयत्न करत असत .मुलीना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी " १९१४ साली प्रोत्साहनात्मक पारितोषिके म्हणून २४५ रुपये तर १९१५ साली ३१० रुपये खर्च केले."तसेच इतर मुलींपुढे आदर्श निर्माण करण्यासाठी महाराजांनी "अंबिकाबाई डेनियलबेकरया ख्रिस्ती मुलीस दरमहा १६ रुपये याप्रमाणे सलग दोन वर्ष शिष्यवृत्ती मंजुन्न करून १९२१ साली पुण्यात ट्रेनिक कॉलेज मध्ये प्रशिक्षणासाठी पाठवले."या मागचा त्यांचा हेतू एवढा होता की,संस्थानातील इतर मुलींनी जिद्दीने शिक्षण घ्यावेत, म्हणजे त्यांच्या विकास झपाट्याने होईल.या कार्यातून महाराजांचा स्त्री शिक्षनाबाबाटचा उदात्त हेतू लक्षात येतो.

निष्कर्ष:

याप्रमाणे राजर्षी शाहू महाराजांनी संस्थानातील सामाजिक सुधारणा करीत असताना समाजातील समाज घटक असणाऱ्या स्त्रियांचा उद्धार करणे गरजेचे आहे .याची खून गाठ मनाला बांधून स्त्री शिक्षणाचा वसा हाती घेतलेला फत्य त्यांच्या कार्यातून दिसून येतो.ते केवळ बोलके समाजसुधारक नसून समतेचा पुरस्कार करणारे कर्ते समाजसुधारक होते . यासाठी त्यांनी संस्थानातील प्रत्येक स्त्रियांना शिक्षण कसे घेता येईल या कडे लक्ष केंद्रित केले होते .शाहू केवळ उच्च जातीचेच राजे नव्हते,तर तळागाळातील आम जनतेचे उधत्कर्ते होते.म्हणूनच त्यांनी स्त्रियांचा उद्धार कर्ता राजा,बहुजनाचा कैवारी असे संबोधले जाते.

राजर्षी शाहू यांनी कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणाची सुरवात करून समस्त भारतीयांना स्त्री शिक्षणासाठी प्रोत्साहन केलेले दिसते व समतेची एक लाट पसरवलेली दिसते. या कार्यामुळे राजर्षी शाहू महाराजांची आजही देशात समतेच पुरस्कार करणारा आदर्श राजा अशी ओळख आहे.ही त्याच्या समताधिष्टीत कार्याची खरी ओळख असलेली दिसून येते.

ISSN 2231 4342

संदर्भ :

१. सूर्यवंशी कृ.गो.'राजर्षी शाहू :राजा व माणूस 'ठोकळ प्रकाशन ,पुणे,प्रथम आवृत्ती १९८४,पृ.क्र.१६९.

२. आ .ब. लेट्ठ.श्रीमहच्छत्रपती शाहू महाराज यांचे'१९२५,पृ.९१-९४

३. 'प्रशासकीय अहवाल':१९२१-१९२२,पृ.५२

४. नाईकवाडे अशोक : 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज :गौरव ग्रंथ ',विद्या भारती प्रकाशन ,लातूर,प्रथम आवृत्ती २०१२(डॉ.रा.मा.देवस्थळी यांच्या'राजर्षी शाहू महाराज शिक्षण विषयक विचार आणी कार्य ' या लेखातून पृ.क्र.६९)

५. सूर्यवंशी कृ.गो.'राजर्षी शाहू :राजा व माणूस ' ठोकळ प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती १९४८,पृ.क्र.१८६

६. 'अभिलेखागार कार्यालय' हुजूराता ३५४,दि.५/१/१९२० व २६/३/१९२०

७. 'अभिलेखागार कार्यालय' हुजूराता ४९,दि.५/१/१९२० व २६/३/१९२०

८. 'अभिलेखागार कार्यालय' हुजूराता २४९,दि.५/१/१९२० व २८/३/१९०९

९. 'अभिलेखागार कार्यालय' हुजूराता ६९८,दि.५/१/१९२० व ८/२/१९९३

१०. 'अभिलेखागार कार्यालय' हुजूराता ३\१०५,दि १०/६/१९९

****

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

दौलतराव शिंदे व गॅरंटी जहागिरदार

मार्गदर्शक
प्रा. डॉ. जे. व्ही. भेलोंडे
इतिहास विभाग प्रमुख
शिवाजी विद्यालय, कन्नड

संशोधक विद्यार्थी
गौळण दत्तराव झाडे

प्रस्तावना:

18 व्या शतकात मराठयांनी छ.शाहू महाराज व बाजीराव पेशव्यांच्या नेतवाखाली उत्तर भारतात आपला अधिकार प्रस्तापित केला यात राणोजी शिंदे उज्जैन- ग्वाल्हेर, उदाजी पवार धार व मल्हारराव होळकर- इंदोर राज्याची स्थापना केली या काळात शिंदे राज्यकर्त्यांनी अकबरा प्रमाणे दुहेरी नितीचे पालन करत ऐकीकडे आपल्या विरोधकांना नेस्तनाबुत करणे तर दुसरीकडून मित्रत्वासाठी हात पुढे करणे त्यात विशेषत: महादजी शिंदे यांनी शतूनांही मित्र ब नवून ग्वाल्हेेर राज्याचे रक्षण केले. राजपूत जहागिरदारांच्या प्रबळ विरोधानंतरही त्यांच्याशी मैत्रीचे संबंध बनवून त्यांच्याशी नवीन करार करुन त्यांची जहागिरे वापस करुन राजनैतिक संतुलन निर्माण केले.

दौलतराव शिंदेचा अधिकाररहोन :

महादजी शिंदे यांच्या म्रत्यूनंतर इ.स. 1795 ला दौलतराव शिंदे महादजी शिंदेचा वारसदार बनला यानंतर मराठा राजपूत संबंधातील राजनैतिक संबंध बिघडू लागले आणि त्याच काळात मराठा- इंग्रज व तिसरे युध्द झाले ज्यामुळे इंग्रजांची शक्ती वाढली होती. आपसातील सहाय्यक तहामुळे मराठा-राजपूत संबंधात हस्तक्षेप करण्यास वाव मिळाला. याचा परिणाम त्रिकोणी संघर्षात अडकावे लागले.

इ.स.1804 ते 1816 पर्यंत दौलतराव शिंदे यांनी मराठा-राजपूत संबंध सुधारण्याचा व ते पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला यात त्यांना पूर्णत: यशही मिळाले असते. तिस-या इंग्रज- मराठा युध्दाने त्यांच्या आशेवर पाणी फेरले यात इंग्रजांच्या विजयाचे गॅरंटी जहागिरदारांचा उदय झाला. इ.स.1818 नंतर मराठा-राजपूत संबंधात नविन अध्यायाला प्रारंभ झाला.

दौलतराव शिंदे विरुध्द इंग्रजांची निती :

3 जून 1803 ला लॉर्ड वेलस्लीने खालील सिध्दांताच्या आधारे दौलतराव शिंदे विरुध्द आपली निती निश्चित करुन त्यानुसार कार्य करण्यास सुरुवात केली.

1) गंगा व यमुनेच्या मध्यल्या संपूर्ण प्रदेशावर अधिकार प्राप्त करणे.
2) शहा आलम याला आपल्या सुरक्षीतते खाली घेणे.
3) शिंदे राज्यास उत्तर भारतातून नष्ट करण्याकरिता राजपूत राजे, जहागिरदाराशी मैत्रीचे संबंध प्रस्तापित करणे.

 ISSN 2231 4342

4) बुन्देलखंडवर अधिकार मिळविणे.

याच नितीवर कार्य करुन पुढे दौलतरावाशी युध्द करुन त्यांच्यावर 30 डिसेंबर 1803 ला सजी अर्जूनगांवचा तह लादला.

दौलतराव शिंदे आणि गॅरंटी जहागिरदाराचा उदय :

तिस-या इंग्रज-मराठा युध्दात इंग्रजांनी काही स्थानिक राजपूत राज्यांची मदत घेतली होती मुख्यत: पेंढा-या विरोधात कारण या पिढा-यांना मराठयांचे संरक्षण प्राप्त होते. या युध्दानंतर इंग्रजांनी राजपूतांना हाताशी धरण्या करिता एका नवीन धोरणाचा अवलंब केला ज्याचे फळ म्हणजे गॅरंटी जहागिरदाराचा उदय झाला या धोरणाचे दोन कारण होते पहिले इंग्रज राजपूत राजाच्या मदतीमुळे त्यांचा सन्मान करु पाहात होते. दुसरे जहागिरदारांच्या शक्तीला मराठयांच्या विरुध्द वापरु इच्छित होते.

डॉ.आनंद मिश्रा लिहितात की, "दुस-या इंग्रज-मराठा युध्दा पासून ते तिस-या इंग्रज-मराठा युध्दा दरम्यान मराठयांनी कोणत्याही राज्यात आपल्या शक्तीचा विकास आणि संघटन केले नाही. कोणत्याही मराठा नेतत्वाने पुढे येवून सर्व मराठयांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. मराठयांना नेता पेशवे बाजीराव हा इंग्रजांच्या ताब्यात होता. मराठा संघात दौलतराव शिंदे यांची परिस्थिती चांगली होती. इतर सरदारांच्या तुलनेत तो शक्तीशाली होता. त्याचे सैन्यबळ विशाल होते. इंग्रजांशी तो नाराजही होता. परंतु त्यांच्या विरुध्द लढण्यासाठी सर्वांना एकत्र करुन संघटन करु शकला नाही. त्याने परिस्थितीनुसार वागायच ठरवले होते. त्यामुळे इंग्रजांना आपली शक्ती वाढविण्यास वाव मिळाला."

दौलतरावच्या हतबलतेचा फायदा घेवून इ.स.1896 ला लॉर्ड हेस्टींगने कानपूरवरुन शिंदे विरुध्द युध्दा सुरु केले. हेस्टींग कलकत्याहून अलाहाबाद मार्गे बांद्रा येथे कानपूर- राजस्थान, भोपाळ तसेच असीरगड या प्रदेशांशी त्यांचा संपर्क तोडला इतकेच नव्हे तर त्यांच्या राज्यातील सैन्याचा मुख्य भाग त्याच्या राज्याच्या दक्षिणेकडील जिल्हयात असतांना त्यांच्या राजधानीला वेढा घालण्यात आला. त्यावेळी त्याच्याजवळ फक्त 8 हजार फौज होती. त्यामुळे दौलतरावला 5 नोव्हेंबर 1896 रोजी नाइलाजाने तह करावा लागला. या तहानुसार इंग्रजांना पेढा-यां विरुध्द मदत करणे, असीरगढ व हिंदाल हे दुर्ग इंग्रजांना देणे व सर्वात महत्वपूर्ण शर्त होती की ज्यामुळे शिंदेशाहीच्या वर्चस्वावर प्रहार होता ते म्हणजे राजपूत राज्यावरील हक्क सोडणे. यामुळे भविष्यात इंग्रज स्वत: राजपूत राज्यावर आपला अधिकार वाढवू शकत होते.

तिस-या इंग्रज मराठा युध्दानंतर गॅरंटी जहागिरदारांच्या उदयाचा मार्ग प्रशस्त झाला. डॉ.मनमोहनसिंह लिहितात की, लॉर्ड हेस्टींग गव्हर्नर बनला त्या वेळी राजपूत राज्याची स्थिती चांगली नव्हती. प्रशासन अस्ताव्यस्त झाले होते. हे राज्य आर्थीक व सैन्य दष्टया कमजोर झाले होते. त्यात मराठयांचा आक्रमणामुळे त्यांची परिस्थिती अधिकच हलाकीची झाली त्यांच्याकडे संघटित होवून संघर्ष करण्याचे धैर्य नव्हते. त्यांच्यापुढे एकच मार्ग होता इंग्रजांच्या संरक्षणाखाली जावून स्वत:चा बचाव करणे. त्यांच्या या परिस्थितीचा लाभ इंग्रजांनी अचूक घेतला. लॉर्ड हेस्टींगला सुध्दा वाटत होते की, पूर्ण भारतावर इंग्रजांचा प्रभाव निर्माण करायचा असेल तर राजपूत राज्यांना आपल्या अंकित बनवून त्यांचा उपयोग आपली सुरक्षा व शक्ती वाढविण्यासाठी करायचा.

ISSN 2231 4342

या बाबतीत सर जॉन मालकचे मत महत्वाचे आहे तो म्हणतो की, "हे छोटे छोटे रजपूत जहागिरदार मोठया शक्तीपुढे नतमस्तक होतात. त्यामुळे त्यांना इंग्रज सरकार कडून गॅरंटी दिली की, इंग्रज आहेत तोपर्यंत त्यांना कोणीही नष्ट करु शकत नाही. हे धोरण इंग्रजांनी प्रमुख ठरवून त्याप्रमाणे जहागीरदाराशी चर्चा केली तर अपेक्षे पेक्षाही त्यांना अधिक यश आले.

सर्वात पहिल्यांदा इ.स.1816 ला लॉर्ड हेस्टींगने कोटा येथील राज्याशी जालीमसिंहाशी चर्चा केली परंतु जालीमसिंहाचे दौलतराव शिंदेकडे जाण्याचे मन होते. परंतू त्यात यश न आल्याने चार्ल्स मेटकाफशी चर्चा करुन त्यांच्यात तह झाला हाच तह इतर राजपूत राजाकरिता मार्ग (नमुना) बनला. या तहातील काही मुख्य कलमे.
गॅरंटी प्राप्त जाहगिरदारांना इंग्रजाकडून त्यांच्या अधिकाराची गॅरंटी या अटीवर दिली गेली की, ते आपल्याराज्यात कायदा आणि सुव्यवस्था ठेवतील.

1) या जहागिरदारांचे संबंध त्यांच्यावर अधिकार असलेल्या राज्याशी या पध्दतीने तयार करुन गॅरंटी घेतली की, त्यांच्यावर अधिकार असलेला राजा जो की, दौलतराव शिंदे होता तो त्यांच्या अंतर्गत मामल्यात हस्तक्षेप करु शकत नव्हता.
2) जे राजपूत राजे लुट देणे, लुट करुन जिवन जगत होते. जिवन जगत होते त्यांना जहागिर दिले अट ही घातली की, ते भविष्यात शांतीपूर्ण जीवन जगतील व त्यांच्या जहागिरीची गॅरंटी सरकारवर राहिल.
3) ज्या राजपूत राजांना जमिन स्वरुपात जहागिर मिळणार नाही त्यांना नमुद स्वरुपात प्रतिवर्षी रक्कम मिळणे व ती रक्कम त्यांच्यावर अधिकार असलेला राजा मार्फत देण्याची व्यवस्था केली.

या व्यवस्थेच्या जन्मासंबंधीच्या परिणामासंबंधी लिहिताता की, "It tesulted in the, "Surrender of the supemancy over the petty states and chiefs of the British Government, the education of the military classes of the control of the British power and the cessation of ruinous interference of the affairs of the smaller states on the part of their more powerful neighbours."
यावरुन हे स्पष्ट होते की, गॅरंटी जहागिरीचा उदय हा इंग्रजांच्या कुटनितीचा परिणाम होता. त्याच बरोबर राजपूतांच दिर्घकालीन दमन आणि मराठयांच्या अधिकारातून त्यांना मुक्त करणे हा पण उददेश होता.

<u>नरवर :</u>

हे राज्य कच्छवाह राजपूतांचे होते दौलतरावाचा तह नरवरचा राजा आचलसिंहाशी झाला. शिंदे यांच्या मते नरवर ठिकाण हे सध्या असलेल्या ठाकूरांचे नाही. परंतू इंग्रजांनी गॅरंटी दिली की, नरवर ठिकाण ठाकूरांचे आहे. या गॅरंटीद्वारे नरवरला तीन गांव नरवर, मघाखेरी व घूमरी हे मिळाले त्याबददल 1000रु. वार्षिक शिंदे यांना द्यावे लागेल तसेच रु.1400/- वार्षिक प्रतिवर्षी वेतन स्वरुपात देण्याचे ठरविले.

<u>बागली :</u>

हे राजपूतांचे जूने ठिकाणहोते इ.स.1819 ला सर जॉन मालकाचे गॅरंटी तह केला. त्यानुसार ठाकुर जालिमहसिंह यांनी पिपलिया व अन्य 4 गाव ग्वाल्हेर दरबारातून प्राप्त केले होते त्याच्या बददल त्यांनी 5562 रु. सालना ग्वाल्हेर द्यावे व 901 रु. वार्षिक देय पैसे द्यावे.

ISSN 2231 4342

<u>आगर बडखेडा :</u>

गॅरंटीसंधी द्वारा जे 12 गांव दौलतराव शिंदे याचे ठाकूर निर्भयसिंह जवळ होते त्याची खात्री करुन त्यांच्या बदल्या 1001 रु. सालना ग्वाल्हेर दरबारास द्यावे.

अशाच प्रकारे राघोगट, जबरिया भिल, कालुखेडा, करोदिया, कढाऊ, नौगाव, पाडोन, खरसिया, पडरिया, पिपलिया व मकसुदगड या प्रमुख राजपूत जहागिरदारांशी दौलतराव शिंदे यांनी इंग्रजांच्या मध्यस्तीने काही रक्कम देवून समझोता केला.

<u>निष्कर्ष :</u>

दौलतरावांच्या वेळी इंग्रजांची शक्तीही वाढली होती पाऊलो पावली त्याला इंग्रजांशी संघर्ष करावा लागला. इंग्रजांनी महादजी शिंदे द्वारा मिळविलेल्या अनेक क्षेत्रांवर ताबा मिळविला होता. दौलतरावाने हतबल होवून 30 डिसेंबर 1803 ला सुर्जी अर्जुनगावाचा तह केला. यानंतर झपाटयाने मराठयांच्या पतनास प्रारंभास सुरुवात झाली. दौलतरावाने ग्वाल्हेर राज्याचे जहागिरदारांना आपल्या नियंत्रणात ठेवण्याचा भरपूर प्रयत्न केला. परंतु जेव्हा खराब वेळ असते तेंव्हा स्वकीय ही परकीय होतात त्यानुसार राजपूत जहागिरदार ही शिंदे यांच्या अधिपत्या खालून आलग होण्याचा प्रयत्न करु लागले.

राजपूत राजांनी देशातील सर्वात प्रबळ राजाच्या आधीन राहण्यात मोठेपणा मानल्याचे दिसते जेव्हा मोगल प्रबळ झाले तेंव्हा त्यांचे अंकीत झाले पुढे मराठयांचा उदय होवून ते प्रबळ झाले तेंव्हा त्यांच सार्वभौमत्व स्विकारले यावेळी इंग्रज सत्ता प्रबळ दिसली तेंव्हा त्यांच्या शरण गेले.

ग्वाल्हेर राज्याच्या राजपूत जहागिरदारांची अशी कोणतीच निती नव्हती जीचा उल्लेख करता येईल इंग्रजांनी तेंव्हा त्यांना गॅरंटी देण्याचा प्रस्ताव ठेवला त्यांनी तो सहर्ष स्विकारला गॅरंटी जहागिरी अशी जहागिरी होती त्यांना इंग्रजाद्वारे लिहुन वचन दिले की, त्यांना इतर कोणतीच शक्ती नष्ट करु शकणार नाही. मुळात हा तह दौलतराव शिंदे यांच्याशी झाला परंतु मधस्त हेतू इंग्रज शासक उपस्थित राहत होता. इंग्रजांनी राजपूतांवर नियंत्रण मिळवून शिंदे यांना खाली पाहायला लावले व आपली प्रतिष्ठा वाढविली. गॅरंटी जहागिरदारांच्या उदयानंतर ग्वाल्हेर राज्य व शिंदे यांचे संबंध नेहमी बिघडलेले राहिले. ते बिघडावे व ग्वाल्हेर राज्य कमजोर रहावे याकरिता इंग्रज गॅरंटी जहागिरदारांना प्रोत्साहन देत होते.

<u>संदर्भ सूची :</u>

1) सरदेसाइ गो.स.मराठयांचा इतिहास,भाग-3,पृ.829.
2) डॉ-मिश्रा आनंद, ग्वाल्हीयर राज्य के राजपूत जहागिरदार पृ.46
3) कायदेकर वि.रा.,दौलतराव शिंदे काळ आणि कतृत्व, पृ.105.
4) मिश्रा जे.पी.आधुनिक भारत का इतिहास, पृ.288.
5) कित्ता पृ.239-232.
6) डॉ.मिश्रा आनंद, उपरोक्त पृ.55

ISSN 2231 4342

7) ऐचीरुन सी.यू.,ए.कलेक्शन ऑफ ट्रीटीज एंगेजमेटस एन्ड सनद, सभाग-4 पृ.314.

8) मिश्रा जे.पी.उपरोक्त, पृ.253.

9) ऐचीरुन सी.यू.उपरोक्त, पृ.253.

10) कित्ता भाग -5, पृ.260.

11) कित्ता पृ.260.

12) कित्ता पृ.260.

13) कित्ता पृ.260.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

लोहारा येथील एकाश्मक मंदिरे

प्रा. डॉ. महाके माधवी गोपीनाथराव
इतिहास विभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

प्रस्तावना

अमर अर्थात देव आणि मरणाधीन मानव अचल किंवा चल स्वरूपात ज्याठिकाणी वस्ती करतात त्या सर्व ठिकाणांना विद्वानांनी वास्तू म्हटले आहे.[1] वास्तूची निर्मिती होताना वास्तू केवळ निवास ह्या हेतूने निर्माण झाल्या किंबहुना 'वस' म्हणजे राहणे, 'वसति निवास करणे' आणि वास्तू म्हणजे घर, जिच्यावर इमारत उभी आहे. त्या भूमीस किंवा बांधल्या गेलेल्या इमारतीस वास्तू म्हणतात.[2] प्रारंभी गुहा, वृक्ष हेच मनुष्याच्या विकासाचे स्त्रोत होते. मात्र कृत्रिम निवा-याची सोय त्याने केल्याचे पुरावेही महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यातील ब्राम्ही, पिंपळगाव येथील अश्म निवा-याच्या (Dolmen-डॉल्मेन) स्वरूपात पहावयास मिळतात. तीत चार उभ्या शिळावर मोठा सपाट पाषाण हे या निवा-याचे स्वरूप होते.[3] धर्मभावना वाढीस लागल्यानंतर स्वतःच्या निवासाप्रमाणे देवतांचे घर अगत्याचे वाटू लागल्याने देवगृहे, देवायला संकल्पना उदयास आली. लहान मंदिरे, एकाश्मक मंदिरे, बांधीव मंदिरे या ढोबळ स्थापत्य प्रकाराने मंदिरे निर्माण झाली तरी त्यांच्या निर्मित प्रक्रियेचा, कालखंडाचा, विविध शैली प्रकारांचा विचार प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश नाही. भारतभर लहान मंदिरे व बांधीव मंदिरे आढळतात. त्या तुलनेत एकाश्मक मंदिरांची संख्या कमी नाही. दक्षिण भारतात महाबलीपुरम, कोल्हापुरातील पळसंबे येथील 4 मंदिरे, मंडगड येथील कोंझरचे मंदिर, विदर्भात व कोकणात काही प्रमाणात ही मंदिरे आढळतात. मात्र मराठवाड्यात अद्याप अशा मंदिराची नोंद नाही. अलीकडील संशोधनानुसार मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यात उदगीर तालुक्यात लोहारा येथे सहा एकाश्मक मंदिर आढळून आली आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात मंदिर स्थापत्य दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या मंदिर स्थापत्यप्रकाराचा प्रथमतःच शोध मांडण्यात आला आहे. या मंदिराची अद्याप कोठेही दखल वा नोंद नाही.

एकाश्मक मंदिर अर्थ

केवळ एकच शिलाखंड वापरून त्याला खोदून तयार केलेल्या स्थापत्य प्रकारास एकाश्मक, एकपाषाण मंदिर म्हणतात. यात शालाच्छादन, गर्भगृह, स्तंभ, सभामंडप, मंदिराचे शिखर हे सर्व एका पाषाणात निर्माण केलेले असते. गर्भगृहात अथवा गर्भगृहाच्या आतच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यास दर्शन भिंतीला देवकोष्ठ करून पूजनीय देवता स्थापित केलेली असते. मात्र लयन मंदिरे व एकाश्मक मंदिरे यात भेद आहे.

लोहारा येथील एकाश्मक मंदिराचे स्थान

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

लोहारा हे गाव लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्यात उदगीर लातूर महामार्गावर आहे. उदगीरपासून सात कि.मी. अंतरावर व लोहारा गावापासून 2 कि.मी. अंतरावर एका टेकडीवर दोन लेणी व सहा मंदिरे आहेत. हे ठिकाण 18^{0}24’ 22.2’’ उत्तर ते 77^{0}00’ 42.9’’ पूर्व भागात स्थित आहे. टेकडीच्या माथ्यावर गैबीसाहेबचा दर्गा हे मुस्लीम धर्मियांचे पवित्र ठिकाण असून तेथे उत्सवही होतो. तर खालच्या बाजूस लेणी आणि एकाश्मक मंदिरे आहेत. लोहारा लेणीचे संशोधनही प्रस्तुत संशोधक करत असून या दोन लेणीपासून प्रदक्षिणा क्रमाने अभ्यासाच्या दृष्टीने एकाश्मक मंदिरास क्रमांक देण्यात आलेले आहेत.

एकाश्मक मंदिर क्र.1



हे मंदिर लोहारा लेणीलगत आहे. या मंदिरासाठी 4.5 मी. उंचीचा व 1.86 मी. लांबीचा पाषाण वापरलेला आहे. या मंदिरात देवकोष्ठ नाही. वरील भाग ओबडधोबड आहे. मंदिराला शिखर नाही. स्तंभही मत्ताहीत अंतर्गत भाग कोरून सपाट बनवलेला आहे. दर्शनी भाग सपाट बनवून अस्थष्ट द्वारशाखायुक्त द्वार आहे. मंदिरात पूजनीय देवता नाही.



एकाश्मक मंदिर क्र.2

हे मंदिर सहाही मंदिर समुहातील मंदिरात उंच पाषाण वापरून तयार केले आहे. या मंदिरासाठी 6.32 मी. उंचीचा पाषाण वापरला आहे. मंदिराचे द्वार भग्न आहे. एक बाजू कोसळली आहे. मंदिराचा दर्शनी भाग सपाट आहे. पाषाणाचा शिरोभाग पसरट आणि ओबडधोबड आहे. मागील बाजूही तशीच आहे. गर्भगृहाच्या भग्न दारातून आत गेल्यानंतर मात्र आतील भाग कोरून सपाट केल्याचे दिसते. प्रवेश केल्यानंतर दर्शनी भिंतीत समोरच एक देवकोष्ठ आहे. ज्यात 45.72 से.मी. व 35.56 से.मी. रूंद आकाराचे शिवलिंग आहे. लिंगाच्या जागी 17.78 से.मी. खोल चौकोनी खड्डा आहे.



एकाश्मक मंदिर क्र.3

ISSN 2231 4342

लोहारा एकाश्मक मंदिर समुहातील हे अत्यंत देखणे परंतु सर्वांत लहान उंचीचे मंदिर आहे. चौकोनाकृती पाषाण याठिकाणी वापरला असून सहज दिसेल असे हे मंदिर नाही. पाषाण लहान असल्याने व झाडा-झुडपाने हे मंदिर चटकन लक्षात येत नाही. केवळ 1.8 मी. उंची या मंदिराच्या पाषाणाची आहे. मंदिराचा शिरोभाग सपाट आहे. तसेच दर्शनी भागही कोरून सपाट केला आहे. द्वाराला शाखा कोरल्या आहेत. मंदिराचे गर्भगृह हे 0.68 मी. खोल आहे. आत उतरून जावे लागले. सध्या मंदिराच्या आतील भागाची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे निश्चित माहिती जमा करता आली नाही. मात्र पूजनीय देवता त्यात असावी. मंदिराचा आतील भाग सपाट आहे. सुबक द्वार आणि स्पष्ट द्वारशाखा विशेष वैशिष्ट्यपूर्ण आहेत.



एकाश्मक मंदिर क्र.4

या मंदिराचा पाषाण हा 4.8 मी. उंचीचा आहे. याही मंदिराचा शिरोभाग सपाट आहे. मागील दोन दिशांचा भाग ओबडधोबड असला तरी दर्शनी भाग सपाट केला आहे. द्वाराच्या वरचा भाग विशेष तासल्याचे दिसते. मंदिरासाठी 4.8 मी. उंचीचा पाषाण वापरला नाही. गर्भगृहाची लांबी रूंदी 1.6 चौ.मी. असून 1.2 मी. उंचीचे द्वारशाखायुक्त द्वार या मंदिराचे आहे. या मंदिराच्या द्वारास शाखाही असून 0.178 मी. उंच उदुंबरही यास आहे.



एकाश्मक मंदिर क्र.5

या मंदिरासाठी 6 मी. उंचीचा पाषाण वापरला आहे. या पाषाणाचा दर्शनी भाग 2 मी. पर्यंत सपाट केला असून मंदिराच्या गर्भगृहाची आतून उंची 1.43 मी. तर लांबी व रूंदी 1.2 मी.



ISSN 2231 4342

आहे. या मंदिरास 1.4 मी. उंचीचे द्वारशाखा युक्त द्वार आहे. गर्भगृहात प्रवेश केल्यास दर्शनी भिंतीत देवकोष्ठक आहे. सध्या ते रिक्त आहे. आतील भिंती व छत तासून सपाट केले आहे.

एकाश्मक मंदिर क्र.6

वरील पाचही मंदिराच्या विरूद्ध बाजूला व टेकडीच्या मागील बाजूस लेणीकडून प्रदक्षिणा क्रमाने हे शेवटचे मंदिर आहे. या मंदिरासाठी आयाताकृती पाषाण वापरल्याने साहजिकच इतर मंदिरांपेक्षा याच्या उंचीपेक्षा विस्तार जास्त दिसतो. प्रवेशद्वार, सभामंडप व गर्भगृह अशी याची रचना आहे. प्रवेशद्वारातून आत गेल्यास 4.5 मी. लांब व 1.42 मी. रूंद सभागृह लागते. सभामंडपालगत 1152 मी. उंच तर 1.36 मी. रुंद गर्भगृह असून त्यास अस्पष्ट द्वारशाखा आहेत.



गर्भगृहात सध्या कोणतीही देवता नाही. याम मंदिराचा बाह् दर्शनी भाग विशेष उल्लेखनीय आहे. प्रवेशद्वाराच्या वर छज्जासम रचना केली आहे. मात्र मंदिराच्या पाषाणास सध्या तडा गेला आहे आणि हे मंदिर कधीही नष्ट होवू शकते. मंदिराची बाहेरून व आतून बरीच झीज झाली आहे. या टेकडीवर या वरील सहा मंदिरांशिवायही एका मंदिराचे अवशेष आहेत. परंतु ते अत्यंत भग्न आहेत. ज्यांचा अभ्यास करणे शक्य झाले नाही. टेकडीचा प्रदेश हा अत्यंत काटेरी झाडा-झुडपांनी व्याप्त आहे. मंदिरातही जंगली पशूंचा निवास आहे.

मंदिराचा कालखंड

या मंदिर परिसरात कोणताही शिलालेख अथवा लिखित पुरावा अद्याप हाती आला नाही. त्यामुळे सध्या तरी या मंदिराचा कालखंड केवळ स्थापत्यशैलीच्या आधारे निश्चित करणे दुय्यम ठरते. एखादी शैली एखाद्या राजवटीच्या कालखंडात निर्माण जरी झाली तरी पुढे अनेक शतके तिचे अनुकरण होत असते. किंबहुना नवीन शैली निर्माण करण्यापेक्षा पुढील काळात तीच शैली वापरी जावू शकते. बदामी चालुक्य कालखंडाच्या नंतरच्या काळात ही मंदिरे निर्माण झाली असावीत असे अनेक तज्ञांशी चर्चा केल्यानंतर निष्पन्न झाले असले तरी कालनिश्चितीबाबत अजूनही संशोधन सुरू आहे.

समारोप

 ISSN 2231 4342

लोहारा येथे सातही मंदिरे एक पाषाण मंदिरे असली तरी त्यांच्यात पूर्णतः समानता नाही. येथे 4.8 मी. उंचीचा पाषाण वापरून सर्वात मोठे मंदिर निर्माण केले आहे. मंदिर क्रमांक 2 मधील शिवलिंग हे कोल्हापूर येथील पळसंबे एकाश्मक मंदिरातील शिवलिंगासम आहे. मंदिर क्रमांक तीनचे गर्भगृह हे खोल आहे तर उंची कमी आहे. द्वारशाखा तुलनेने सुबक आहेत तर मंदिर क्रमांक 6 चा उंचीपेक्षा विस्तार जास्त दिसतो. शिवाय त्यास सभागृहही आहे. सर्व मंदिरांची निर्मिती ही शोभनियता या दृष्टीने झाली नाही. किंबहुना अत्यंत प्राथमिक स्वरूपात याची निर्मिती केल्याचे दिसते. केवळ एकांतसाधना हा उद्देश याठिकाणी असावा असे वाटते. प्रथमदर्शनी केवळ दगडी मोठे पाषाण असल्याचे ही मंदिरे भासतात. मात्र अंतर्गत रचना, पूजनीय देवता, द्वारशाखा हे बारकावे संशोधनाने सिद्ध होतात. लेणी परिसरातच ही मंदिरे आहेत. त्यामुळे निश्‍चितच काहीतरी धार्मिक महत्वपूर्ण उद्देश या मंदिराचा असावा मात्र सध्या या मंदिराच्या जतन संवर्धनाची आवश्यकता आहे.

संदर्भ व टिपा

1) अमत्र्याश्चैव मत्र्याश्च यत्र यत्र वसन्ति हि।
त्रद वरित्वतिमतं तज्ज्ञैस्तभ्देदं च वदाम्यहम (मयतम अ.2)

2) धोंड जयवंत फोंडू, वास्तुजागर, जयस्मिता वास्तुसाधना, मठग्राम, 2012, पृ.41

3) जामखेडकर अ.प्र. (संपा. पाठक अं.श.) महाराष्ट्रः इतिहास प्राचीन काळ खंड 1 भाग-2, दार्शनिका विभाग, मुंबई, 2009

4) प्रभुदेसाई योगेश-कोल्हापुरातील मंदिरसंपदा, अक्षरदालन प्रकाशन, कोल्हापूर, 2015

5) प्रत्यक्ष मुलाखत - रमाकांत भोसले (सरपंच लोहारा) 11 मार्च 2019

6) प्रत्यक्ष मुलाखत पठाण पाशा, मु.पो.लोहारा 26 मे 2019

7) प्रत्यक्ष मुलाखत - रोडेवाड, मु.पो.तोंडार दि.20 एप्रिल 2020

8) प्रत्यक्ष मुलाखत-स्वामी शिवसांब, मु.पो.लोहारा, दि.10 जून 2020

ISSN 2231 4342

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

राष्ट्रीय इ परिषद

दि. 27 व 28 फेब्रुवारी 2021

पेपरचे नांव : संत विसोबा खेचर आणि शडूस्छळि ग्रंथ एक अभ्यास

संशोधिकेचे नांव
प्रा. मनिषा श्रेणिककुमार पाटील
के.बी.पी. कॉलेज, उरूण इस्लामपूर
ता. वाळवा, जि. सांगली
मो.नं. 8669012681

महाराष्ट्र म्हणजे संताचीं भूमी ज्ञानेश्वर, तुकाराम, बंका, सावता, एकनाथ, जनाबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा आदी. ज्ञानेश्वर माऊलींच्या कहाण्यांमध्ये संत विसोबा खेचर खलनायक म्हणूनच ओळखले जातात. संन्यासाच्या पोरांचा जाच करणारे विसोबा ज्ञानदेवांच्या पाठीवर मांडे भाजण्याचा चमत्कार पाहतात आणि संपूर्णपणे बदलून जातात. पांडूरंगाचे भक्त बनतात.

विसोबा खेचरांच्या शडुस्छळि (षटस्थल) ग्रंथात ते आपली गुरू पंपरा सांगतात. ती नाथपंथीय आहे. आदिनाथ-मच्छिंद्रनाथ-गोरक्षनाथ- मुक्ताई चांगदेव कृष्णनाथ- विसा खेचर अशी आहे. चांगदेव हे विसोबांचे गुरू त्यांनी मुक्ताबाईना गुरू मानले. भक्तांना मुक्त करणारी खमकी स्त्री मुक्ताई असावी.[1] विसोबा खेचर नाथ संप्रदायी चांगा वाटेश्वर उर्फ चांगदेव हे नाथ संप्रदायाचे समर्थक पाईक होते. विसोबांच्या नाथ संप्रदायाबरोबरच मध्ययुगात शैव, दत्त, शाक्त जैन बौध्द (धर्म) संप्रदायही अस्तित्वात होतेच. वारकरी संप्रदायाचा मध्ययुगात प्रभाव वाढला तरी वैदिक, जैन, शैव, वैष्णव लिगांयत सुफी असे पंथ ही मध्ययुगात अस्तित्वात होतेच.

वीरशैव पंथांची स्थापना ब्रिज्जल राजाचे प्रधान बसवेश्वरांनी (1131-67) केली असे काही विद्वान मानतात. तर काही विद्वान ही परंपरा बसवेश्वरांच्याही अगोदरची असल्याचे सांगतात. शिवाच्या सद्योजाताही पंचमुखापासून रेणूक दारूक आदी पंचाचार्य अवतरले. कलियुगात त्यांची नांवे रेवणाराध्य मरूळाराध्य, एकोरामाराध्य, पंडिताराध्य आणि विश्वाराध्य अशी आहेत. यांची उत्पत्ती शिवलिगांपासून झाली असे म्हणतात. या पंचाचार्यांना जगद्‌गुरू असे म्हटले जाते. त्यांचे गोत्रपुरूष अनुक्रमे वीरभद्र, नंदी, वृषभ, भृंगी आणि स्कंद असे आहेत. शिष्य संततीला पंचम असे म्हणतात. पंचचार्यांची पीठे गुरू पीठे म्हणविली जातात. विशेषत: कर्नाटकात गुरूपीठे, गुरूमठ आहेत. महात्मा बसवेश्वरानी पाशुपत कालामुख अशा पंथाना एकत्र आणले. बसवेश्वरांप्रमाणेच अल्लमप्रभु (12 वे शतक), अक्कमहादेवी (12 वे शतक), चेन्नबसव, (12 वे शतक) सिध्दरामेश्वर, नीलांबिका

ISSN 2231 4342

यांनीही वीर शैव पंथाला भक्कम केले.[2] वीरशैव आणि महाराष्ट्राच्या अनुबंधाचे द्रृश्य स्वरूप मराठी वीरशैव धर्मग्रंथ आहेत. समाज बांधवाना सांप्रदायिक आचार-विचारांची देवाणघेवाण या ग्रंथांमुळे शक्य झाली. यादवकालीन खेचर विसाच्या शडूस्छळि या वाडमय ग्रंथापासून हा प्रवाह सुरू झाला. हा ग्रंथ तसा दुर्लक्षित ग्रंथच होता. मराठी वरीशैव वाडमयाचे जनकत्व एकनाथकालीन शांतलिगांकडे दिले गेले एका अर्थाने शांतिलिगं मन्मथ परंपरेचा विचार मोठया प्रमाणात झाला. या परंपरेतील सदतीस ग्रंथ उपलब्ध आहेत. परंतु खेचर विसा कृत शडुस्छळि उर्फ षट्स्थल ग्रंथाच्या उपलब्धीमुळे मराठी वीरशैव वाडमय निर्मितीचा काळ 300 ते 350 वर्षे मागे गेला. वीरशैव वाडमय निर्मितीचे श्रेय शांतिलिगां ऐवजी खेचर विसांना द्यावे लागते.[3] रा. चिं. ढेरे यांना 30 ऑगस्ट 1969 रोजी दुर्मिळ ग्रंथसामग्रीचे विक्रेते श्री. पारखीशास्त्री यांच्याकडे हस्तलिखिताच्या गळाठ्यात शडूस्छळि ग्रंथ मिळाला. या ग्रंथावर आधारित षट्स्थल: एक अध्ययन हा प्रबंध पीएच.डीसाठी सादर केला.[4] तेव्हाच खऱ्या अर्थाने शडूस्छळि ग्रंथाचे ज्ञान जगास झाले. विसोबा खेचर हेच खेचर विसा होत त्यांनीच शडूस्छलि हा ग्रंथ लिहिल्याचे समोर येते.

विसोबा खेचर –

एक कर्मठ ब्राम्हण अशी पारंपारिक प्रतिमा कथांमधून आढळते. कधी त्यांचे गाव पैठण नजीकचे मुंगी असे सांगतात. तर काहींच्या मते ते सावकारी व्यवसाय करीत असत. दासोदिगंबरांच्या संतविजयमधून ही अशीच माहिती मिळते. महिपतींच्या भक्त विजय ग्रंथातून आळंदी निवासी विठोबा कुटील ब्राम्हण व चाटी म्हणजे कापड व्यवसाय करणारे ठरतात. रा.चि.ढेरेंच्या मते विठोबा खेचर एक शिवब्राम्हण होते आणि सोनारकाम करीत होते.[5] ज्ञानदेव व त्यांची भावंडे यांचा सन्याशाची पोरं म्हणून दुस्वास करणारे विसोबा ज्ञानदेवांनी पाठीवर मांडे भाजल्यावर ज्ञानदेवाचे उष्ट खाण्यासाठी झडप घातली. तेव्हा ज्ञानेश्वर त्यांना म्हणतात. ''तु कां होती गा खेचर। सर परता वेंगसी। अशाप्रकारे विसोबांना खेचर हे उपनाम मिळाले असे संतचरित्रकार महीपतीबाबत सांगतात.खेचर शब्दाचे अर्थ अनेक आहेत. गाढव, घोडा, मिश्र संतती, पक्षी, ग्रह, नक्षत्रे, योगी, यक्षा, यती, समंध, पिशाच्च, भूत वगैरे यामध्ये विसोबा योगी यती होते हेच खरे आहे. [6]

धर्माचे श्रेष्ठत्व शुद्राचे सामिलीकरण –

मध्ययुगात उदयास आलेला वारकरी पंथ हा सर्व धर्मसंप्रदायांना सामिलकरुन घेणारा ठरला. संत ज्ञानेश्वर रेडयामुखी वेद वदवितात. अशी दंत कथा मुढ समाजातील जागृती दाखविते. मनुस्मृती ग्रंथात ब्राम्हणेतरांनी ब्राम्हणांशी स्पर्धा करु नये असे सांगितले आहे. त्यांचा नियम म्हणजे, ''वेदांचे अध्ययन करताना शुद्र जवळपासही असू नये शुद्राला ज्ञानू देवू नये. वेद ऐकणा-याचे कान शिसे व लाख यांनी भरावे.[7] असे कठोर नियमांचे पालन करणारा कठोर समाज असताना वारकरी संप्रदायातील संत सर्वसामान्य कामकरी कष्टकरी वर्गातील होते असे दिसून येते.

अहंकाराचा नाश करुन परमात्म्यास एकरुप होण्यास ही संतमंडळी तत्पर होती असे दिसते. नामदेवांचे गर्वहरण मुक्ताई करते. नामदेव व विसोबा ही गुरु शिष्याची जोडी मानतात. नामदेवाला सोपी भक्ती करायला लावणारे विसोबा एक गुढ बनून राहिले. नामदेव त्यांना भेटायला गेले तेव्हा ते शंकराच्या पिंडीवर पाय ठेवून झोपले होते. विसोबांनी नामदेवाना पींडीवरुन पाय खाली पींड नसणा-या ठिकाणी ठेवण्यास सांगितले. परंतु विसोबांचा पाय जेथे ठेवला तेथे पींडी निर्माण झाली अशी अख्यायिका आहे. तेव्हा नामदेवांचे गर्वहरण होवून 'चराचरात देवाविण ठाव रिता नाही.' हे त्यांना उमगले. [8] असे विसोबा गुरुजात देणारे नामदेवांचे गुरु झाले. नामदेव तसे प्रसिध्दी पावले पण विसोबा मात्र उपेक्षितच राहिले. चांगदेवाचे गुरुपद मुक्ताबाईना मिळते. मुक्ताई ही महायोगिनी मानतात. कारण योग हे शैव पंथातच आहे. नाथ संप्रदायी भावंडासोबत मुक्ताई रहात होत्या. नामदेव वारकरी संप्रदायाचे विस्तारक मानले जातात. त्यांची गुरु परंपरा नाथसंप्रदायाशी जोडलेली आहे. परंतु नामदेवानी गुरुदक्षिणा व्यक्तिपुजनास महत्व दिले नाही. ज्ञानेश्वरही कोणाचे गुरु झाले नाहीत. सोपानदेवांचा अनुग्रह विसोबांनी घेतला. तरीही ज्ञानदेवांनाच गुरु मानण्याची परंपरा आहे.[9]

एकनाथ महाराजांची गुरुपरंपरा दत्त संप्रदायांशी जोडलेली आहे. गुरु जनार्दन यांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यामुळे ते आपल्या साहित्यात एका जनार्दनी असा उल्लेख करतात.

तुकाराम महाराजांची गुरुपरंपरा चैतन्यसंप्रदाय महाविष्णुंपासून परंतु तुकाराम महाराज स्वत:ला वारकरी म्हणवून घेतात. 'रामकृष्ण हरी' हा उघडा मंत्र देतात कानात मंत्र सांगण्याची परंपरा हाणून पाडतात.[10]

शैव संप्रदायातील वामाचार तंत्रसाधना दूर केल्याने उपासना पध्दतीचे उन्नयन घडले. विसोबा खेचरांचे गुरु गुरु चांगदेव यांनी वटेश्वर शिवाची उपासना केली. त्यामुळे चांगदेव परंपरेत शिवाचे वटेश्वर नाव प्रसिध्द झाले. विसोबांचा शडुस्छळि ग्रंथ प्रसिध्द झाला.

शडुस्छळि ग्रंथकर्ता विसोबा खेचर -

विसोबांनी लिहिलेल्या षट्स्थल अथवा शडुस्छळि ग्रंथात आत्मोन्नतीच्या सहा पाय-या सांगितल्या आहेत. त्या म्हणजे भक्त, महेश, प्रसादी प्राणलिंगी, शरण आणि ऐक्य होय. षटस्थल म्हणजे मानवाचा महादेव होणे. जीवाचा शिव होणे, शिवरुपात समरस होणे, यामध्ये पिंडस्थल, पिंडज्ञान स्थल, संसारहेयस्थल , गुरु कारुण्यस्थल, लिंगधारण स्थल, विभुतीधारण स्थल, रुद्राक्षधारण स्थल, मंत्रधारण स्थल अशा संज्ञा आहेत.

षट्स्थलाच्याही सहा पाय-या विसोबा सांगतात. भक्तस्थल, माहेश्वरस्थल. प्रासादीस्थल, प्राणालिगीं स्थल, शरणस्थल ऐक्य स्थल, वीरशैव उपासकांमध्ये बदस्थलदर्शन महत्वाचे मानले जाते. खेचर विसांच्या या ग्रंथाच्या उपलब्धीनंतर त्यांच्या गुरूपरंपरेची धूसरता कमी होत जाते. वारकरी पंथापेक्षाही जास्त त्यांचा विचार वीरशैव संप्रदायाच्या पार्श्वभूमीच्या करता येतो

या हस्तलिविताची भाषा यादवकालीन आहे. ग्रंथरचना ओवी छंदातील आहे

 ISSN 2231 4342

या वोविया पुष्पे प्रासिं।

समप्रिली मनोभावे सिं।

यापरि हरीख जाले ।
वटेश्वरासि। खेचर विसा म्हणजे ।।[11]

या ओळीतून ग्रंथकार विसोबाच होते हे दिसून येते.

नाथपंथ, वीरशैव, महानुभव, वारकरी अशा भिन्न पंथसंप्रदायाचे अनुबंध शोधण्यास हया ग्रंथाची मदत होईल. उपेक्षित विसांबची ओळख या ग्रंथातून होते. ते ज्ञानदेवकालीन खलनायक नव्हे. तर एक जबाबदार व तारतम्य तादात्मभाव जाणणारे व्यक्ति होते हे समजते.

निष्कर्ष -

1. विसोबा खेरच यांची शडुस्छळितील परंपरा आदिनाथ मत्सेंद्रनाथ, गोरखनाथ, मुक्ताई, चांगावटेश्वर, कृष्णनाथ, रामकृष्णनाथ वा रामकृष्णनाथ खेचर विसा याप्रमाणे आढळते.
2. विसोबा हे योगाधिकारी पुरूष होते. शडुस्छळि ग्रंथातून त्यांचा नाथपंथीय ऋणानुबंध स्पष्ट होतो.
3. विसोबांच्या कालखंडात वारकरी संप्रदायाबरोबर शैव संप्रदायही प्रभावशाली होता. मंगळवेढा-सोलापूर-शिखर शिंगणापूर, पंढरपूर ही क्षेत्रे वीरशैवांच्याही प्रभावाखाली होती.
4. मध्ययुगीन भारतीय धर्मसाहित्याचा विचार करता महाराष्ट्रीय भक्तिपरंपरेत आढळून येणारा समन्वयशीलतेचा पैलू दिसून येतो.
5. शडुस्छळि ग्रंथाच्या उपलब्धतेमुळे मराठी वीरशैव वाङ्.मयाची पायाभरणी करण्याचे श्रेय शांतलिगांऐवजी खेचर विसांकडे जाते.

संदर्भ साधने -

1. विशेषांक - रिंगण संत विसोबा खेचर विशेषांक -सं.पा. सचिन परब, डॉ. श्रीरंग गायकवाड आषाढी 2017 अंक पाचवा पृष्ठ क्र. 15
2. वीरशैव पंथ मराठी विश्वकोश

3. समाजप्रबोधन पत्रिका जानेवारी मार्च 2007 वर्ष 45, अंक 177 पृष्ठ क्र. 38

4. कित्ता पृष्ठ क्र. 39

5. कित्ता पृष्ठ क्र. 40

6. विशेषांक रिंगण विसोबा खेचर पृष्ठ क्र. 37

7. कित्ता पृष्ठ क्र. 50

8. कित्ता पृष्ठ क्र. 84

9. समाजप्रबोधन पत्रिका मार्च 2007 पृष्ठ क्र. 47

10. विशेषांक रिंगण संत विसोबाखेचर पृ. क्र. 95

11. कित्ता पृष्ठ क्र. 97

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ईश्वर विषयक दृष्टिकोन

प्रा. डॉ. सचितानंद शंकर बिचेवार
श्री पी. डी. जैन महा. अनसिंग
जि. वाशिम
bichewarss@gmail.com
Mob. 9421831538

मानवाच्या विचारशीलते मधूनच ईश्वरी संकल्पना उदयाला आली आहे. यामध्ये कृतज्ञता, भय, आश्चर्य व स्वार्थ या सर्व बाबींची सरमिसळ आहे. हे खरे आहे की, पुढे निसर्गातील शक्तीला शरण जाण्याचा, त्या शक्तीचीच आराधना करण्याचा प्रयत्न श्रद्धेतून निर्माण झाला. हळूहळू विश्वातील जवळपास सर्व मानव समुदाय कुठेतरी, कोणत्यातरी ईश्वराच्या श्रद्धेमध्ये बांधलेले दिसून येतात. आत्मविश्वासाच्या दृष्टीने या श्रद्धेचा मानवाला मोठा लाभही मिळाला आहे. सोबतच धूर्त, स्वार्थी लोकांनी सामान्यजनाच्या धार्मिक श्रद्धांचा गैरफायदा घेऊन स्वस्वार्थही साधला आहे. याला बळी पडलेल्या, अंधश्रद्धा व कर्मकांडात सापडलेल्या लोकांचे यामुळे मोठे शोषणही, नुकसानही झाले आहे. हे वास्तव असले तरी, धर्म अथवा समाजसुधारणा करण्यासाठी संत-महात्मे व सुधारकांनी याच धार्मिक बाबींचा आधार घेतलेला दिसून येतो. मध्ययुगात महात्मा बसवेश्वरांनी तर आधुनिक काळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ईश्वरी संकल्पनेचा आधार घेऊनच धर्म व समाजसुधारणा करण्याचा महत्त्वाचा प्रयास केलेला आहे. त्यांच्या या ईश्वर विषयक दृष्टिकोनाचा आढावा प्रस्तुत संदर्भाने घेतला आहे.

एकेश्वरवादाचे पुरस्कर्ते :-

मध्ययुग हे धर्माचा, ईश्वराचा मोठा पगडा असलेले महत्त्वाचे युग मानले जाते. महात्मा बसवण्णावरही लहानपणापासूनच ईश्वराचा मोठा प्रभाव होता. ईश्वरी श्रद्धेचे अनेक संदर्भ त्यांच्या विविध वचनातून दिसून येतात. तरीपण त्यांचा ईश्वरा बाबतचा दृष्टिकोन त्या काळाच्या कसोटीवर वेगळा, प्रगल्भतेचा असल्याचे दिसून येते. बसवपूर्व व बसव काळात देवदेवतांचा मोठा सुकाळ झाला होता. जेवढे देव तेवढे अनुयायी, तेवढेच विधि, तेवढेच पंडित अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे देव संकल्पना मानवाच्या हितापेक्षा अहिताची अधिक ठरत असल्याची जाणीव महात्मा बसवेश्वरांना झाली होती. म्हणूनच बसवेश्वरांनी निसर्गाचा निर्माता खरा देव हा एकच आहे, तोही शून्य स्वरूपी त्या एकाच ईश्वराची आराधना करणे क्रमप्राप्त असल्याचे त्यांनी सांगितले होते. यासंदर्भात एका वचनात ते म्हणतात,

“देव एक, नावे अनेक,
परम पतिव्रतेस पती एकच हो.
अन्य देवापुढे नतमस्तक झाल्यास,

ISSN 2231 4342

नाक-कान कापेल.

अनेक देवांचे उष्टे खाणाऱ्यांना काय म्हणावे,

कूडलसंगमदेवा”.[1]

यावरून महात्मा बसवेश्वर एकेश्वर वादाचे पुरस्कर्ते होते, त्यांना एकदेव उपासना महत्वाची वाटत होती हे स्पष्टपणे दिसून येते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेच्या पहिल्या अध्यायाच्या प्रारंभीच्या

ओवीत महाराज म्हणतात,

ओम नमोजी विश्व चालका।

जगत वंद्य ब्रम्हांडनायका।

एकचि असोनि अनेका।

भासशी विश्वरूपी।[2]

परमेश्वर विश्वचालक, विश्वव्यापी आहे, तो ब्रम्हांडनायक आहे. हे सांगताना तो वेगवेगळ्या भूमिकेत, वेगवेगळ्या नजरेत अनेक स्वरुपात भासत असलातरी तो एकच असल्याचे तुकडोजी महाराजही स्पष्ट करतात., हर देश मे तू । हर भेश मे तू । तेरे नाम अनेक । तू एक ही है। प्रत्येक देशात, प्रत्येक वेशात अनेक नावाने ओळखला जाणारा परम कृपाळू ईश्वर एकच असल्याचे ते या ठिकाणी सांगतात. याच बरोबर हा ईश्वर सर्वांच्या कल्याणार्थ सेवारत असल्याचेही महाराज सांगतात. यावरून महात्मा बसवेश्वर असो वा संत तुकडोजी महाराज यांनी ब्रम्हांडरुपी ईश्वर म्हणजेच निसर्ग शक्ती ही एकच असून आपण सर्व त्याची अपत्य असल्याने; सहाजिकच त्यामुळे आपणही भावा-भावा प्रमाणे वागलो पाहिजे असा संदेश ते याठिकाणी देऊन जातात.

आराधना प्रतिके :-

मानवी श्रद्धेतूनच मूर्ती पूजेचा अविष्कार झालेला असून बाराव्या शतकापर्यंत देवतांची, मूर्तींची संख्या वाढून मंदिर महात्म्यही मोठ्या प्रमाणात वाढू लागले होते. चिंतनशील प्रवृत्तीच्या बसवण्णाना मात्र हे कदाचित पटले नसावे ! म्हणूनच त्यांनी तत्कालीन ईश्वरी प्रतीकांना, मूर्ती-मंदिरांना फाटा देऊन परंतु ईश्वरी अस्तित्व मान्य करूनच “इष्टलिंग” ईश्वरी शक्तीच्या प्रतीकात्मक स्वरूपात पुढे आणले. विशाल विश्वाचे लहान रूप म्हणजे इष्टलिंग होय. अनादि-अनंत निराकार असलेल्या सर्व नियंत्रक, विश्वशक्तीची त्यांनी इष्टलिंग स्वरूपात आराधना करावयास सांगितली.[3]

तुकडोजी महाराजांना एका श्रोत्यांने जर देव सर्वव्यापी आहे, कोणत्याच पंथात विभागला नसेल तर मूर्ती पूजेची आवश्यकता काय ? असा प्रश्न विचारला असता त्यावेळी महाराज म्हणतात,

याचे ऐकावे उत्तर। प्रेम निर्मावे एका मूर्तीवर।

तेचि क्रमाने करावे विश्वाकार। हाच हेतू पूजनाचा।।[4]

 ISSN 2231 4342

देव, मूर्ती बाबत ते म्हणतात,

मनास पाहिजे काही आधार। म्हणोनि आरंभि मानिले साकार।
देव व्यापिले चराचर। तेथे मूर्ती तद्रुपची।।[5]

मूर्ती पूजेचा अर्थ सांगताना महाराज म्हणतात,

आपण मूर्तिच व्हावे सम्यक। म्हणजे करावी तैसे वागणूक। अभ्यासाने।।[6]

मूर्तिपूजे मागचा हेतू स्व चिंतन, स्व जाणीव, स्व ओळख करून घेणे असा महाराजांना अभिप्रेत होता. प्रतिकाची पूजा कोणत्याही ही जरूर करा, पण सत्कर्म मात्र अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले होते. ज्या आदर्शाची आपण आराधना करतो तसे आदर्श आपण बनलो पाहिजे, असा व्यापक दृष्टिकोन महाराजांनी यावेळी दाखविला होता॰ सर्वांना प्रेम, सर्वांप्रति समतेची भावना, व्यवहार ठेऊन आपले जीवन संपन्न करण्याचा ध्यास म्हणजेच खरी ईश्वरी आराधना असल्याची व्यापक भूमिका राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मांडली होती.

बाह्य अवडंबराला विरोध :-

महात्मा बसवेश्वरांनी ईश्वर, धर्म ह्या बाबी व्यक्ती, समाजहितासाठी महत्त्वाच्या आहेत, हे मान्य केले होते. परंतु ईश्वरी आराधना व त्याच्या नावाखाली सुरू असलेले बाहय अवडंबर, कर्मकांड जे बसव पूर्वकाळात मोठ्या प्रमाणात वाढले होते याला त्यांनी विरोध केला. महात्मा बसवेश्वर एक वचनामध्ये म्हणतात,

अवडंबरयुक्त भक्ती म्हणजे
कमरेला चुनकळी बांधून
पाण्यात बुडी मारल्याप्रमाणे
अवडंबर हे सर्व नाशाचे मूळ होय.
हे मना, अवडंबर त्यागून
कूडलसंगमदेवाचे स्मरण कर.[7]

म्हणजेच कमरेला चुनकळी बांधून पाण्यात उडी मारल्यास आपला सर्वानाच जसा होऊ शकतो. त्याचप्रमाणे अवडंबरासह बाह्य, दिखाऊ कर्मकांडसहित ईश्वरी प्रसन्नतेसाठीचे मार्ग आपले नुकसानच करतात. म्हणून ईश्वरी साधना डोळस पद्धतीने करण्याचा उपदेश बसवण्णा देतात.

तुकडोजी महाराजही प्रचंड धार्मिक श्रद्धा असणारे संत होते. त्यांच्या मते, धर्माचा उद्देश अखिल मानव जातीला सुखी आणि समृद्ध करणे असा आहे. म्हणूनच माणूस पहिले खरा धार्मिक, कर्तव्याला जागणारा, चारित्र्यसंपन्न बनणे महत्त्वाचे आहे, असे त्यांना वाटत होते. तुकडोजींच्या काळातही मंत्र-तंत्र, नवस व बळीप्रथा मोठ्या प्रमाणात प्रचलित होत्या. याबाबत महाराज म्हणतात, याद ठेवा, कधी बळी द्याल जीवा। कूळामध्ये न राहील दिवा ।। सर्वप्रती प्रेम, सत्यदृष्टी, सदाचार अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. याशिवाय इतर बाहय अवडंबराचा मार्ग अनुसरून ईश्वरी आराधना केली, वाटचाल केली तर चुकीच्या ठिकाणी आपण जाऊ शकतो. याबाबत एका उत्तम उदाहरणांनी ते सांगतात की,

कलकत्त्याच्या गाडीत बसावे। आणि म्हणे देवा पंढरिसी न्यावे।
ऐशा प्रार्थनेसि फळ यावे। कोण्या प्रकारे ?।[8]

म्हणजेच आपल्या साधनेला यश मिळवायचे असेल तर, बाह्य अवडंबर कामी येणार नाहीत. आपल्याला योग्य मार्गच निवडावे लागतील तरच आपण योग्य ठिकाणी पोहोचू शकतो.

कर्मातच ईश्वरी अस्तित्व :-

ग्रीक, रोमन आदि श्रेष्ठतम मानल्या जाणाऱ्या संस्कृतीनेही शारीरिक श्रमाला गुलामाचे कार्य, कनिष्ठ दर्जाचे कार्य मानले होते. भारतातही शारीरिक श्रम करणारे शूद्र किंवा कनिष्ठच मानल्या गेले होते. महात्मा बसवेश्वरांना मात्र हे मान्य नव्हते. विश्वातील सर्व मानवाच्या कार्याचे मूल्य समान आहे, श्रमाचे मूल्य समान आहे. म्हणून श्रमिकांच्या कार्यालाही तेवढेच मोल आहे. हे सांगून कष्टकऱ्यांचा, श्रमिकांचा आत्मविश्वास वाढविण्याचा, प्रत्येकांना कार्यप्रवण बनविण्याचा त्यांचा मानस होता. यासाठी त्यांनी ईश्वरी सिद्धांताचा आधार घेतला होता. जीवनात प्रामाणिक कष्ट केल्यास शाश्वत आनंद मिळू शकतो, म्हणजेच ईश्वराची प्राप्ती होऊ शकते, यालाच "कायकवे कैलास" कर्मातच ईश्वर, श्रमातच स्वर्गप्राप्ती, कर्तव्यपूर्ती हीच ईश्वरप्राप्ती[9] असे बसवेश्वरांनी स्वरूप दिले होते. प्रत्येक मनुष्याचे जीवन सुखी आणि संपन्न करून समाजात शांती, सौख्य निर्माण करायचे असेल तर, दैववादापेक्षा प्रयत्नवाद महत्त्वाचा आहे, हेच त्यांना सांगावयाचे होते.

संत तुकडोजी महाराजांनाही परमेश्वराचा साक्षात्कार माणसाच्या प्रामाणिक कष्टातच दिसून येत होता. प्रत्येकाने आपापले कार्य, कर्म प्रामाणिकपणे करणे, निष्ठेने करणे म्हणजेच परमेश्वराची पूजा करणे होय, असे ते म्हणत असत. तुकडोजी महाराज म्हणतात,

जैसी ज्याची भावना। त्याने तैसेची मानावी देवता मना।
परि न चुकावी उपासना। सत्कर्माची।।
प्रामाणिकतेने करणे काम। हेचि आमुचे ईश्वरनाम।
सर्व जीवमात्रासी ऐक्य प्रेम। धर्म हा आमुचा।।[10]

महात्मा बसवेश्वर, सर्व वारकरी संत ते तुकडोजी महाराज यांच्या वाणी- लेखणीतून कर्तव्य कर्मालाच ईश्वर मानलेले, ईश्वर स्वरूप दिलेले दिसून येते. यामुळे निश्चितच निराशीत, आळसी, न्यूनगंडाने पछाडलेले लोकांना ईश्वरी साधने करिता कर्मशील, कर्तव्यरत करण्याचा महत्त्वाचा प्रयास उभयद्वयांनी केलेला आहे.

सारांश :-

महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ईश्वरा संदर्भातील दृष्टीकोन अत्यंत व्यापक आणि मानवाच्या कल्याणाचा होता. विश्व निर्माता एकच असल्याने त्याची अपत्य वेगवेगळी श्रेष्ठ-कनिष्ठ होऊ शकत नाहीत हे सांगून समाजात सलोखा निर्माण करण्याचा महत्त्वाचा प्रयास त्यांनी केला. ईश्वरी अस्तित्व, ईश्वरी आराधना महत्त्वाची मानणाऱ्या उभयवंतांनी परंपरागत अर्चना पद्धतीला मात्र फाटा देऊन बाह्य अवडंबर, कर्मकांड त्याज्य मानून विश्वाची, विश्वातील प्रत्येक जीवात्म्याची सेवा, त्याचीच आराधना महत्त्वाची मानली.

ISSN 2231 4342

आपणही ईश्वरासमान, आदर्श बनण्यासाठी सदाचारयुक्त बनावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती. महत्त्वाचे म्हणजे कर्मातच ईश्वर शोधण्याचा त्यांचा दृष्टीकोन त्या-त्या काळासाठी समाजासाठी मोठा उपयुक्त ठरला होता. महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यामध्ये आठशे वर्षाचे अंतर असले तरी, ईश्वर आणि धर्म संकल्पनेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन जवळपास समान व प्रगल्भ असल्याचे दिसून येते. आजही त्यांचा हा दृष्टिकोन ईश्वर, धर्मश्रद्धा जोपासण्यासाठी तेवढाच महत्त्वाचा व प्रेरणादायी स्वरूपाचा आहे.

संदर्भ व टीपा :-

1. कलबुर्गी एम. एम.,पाटील श्री शंकर म., नडकट्टी सौ. सविता
(म. अनु) वचन,बसव समिति,बेंगळुरू 2012 पृ. 59
2. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, सावरकर स्व सुदाम (संपा.),ग्रामगीता,
म.रा.पा.नि.व अ.स.मंडळ, पुणे पृ. 01
3. बिचेवार सचितानंद, प. म. महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन, पूर्णा, 2015 पृ 96
4. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,उपरोक्त, पृ. 277
5. कित्ता
6. कित्ता पृ. 279
7. मेनकूदळे अशोक, आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर, म.ब.परिषद,भालकी, पृ. 90
8. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,उपरोक्त, पृ. 439
9. बिचेवार सचितानंद, उपरोक्त, पृ. 74
10. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,उपरोक्त, पृ. 279

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

‘रांगोळी कला’ : एक ऐतिहासिक परिप्रेक्ष

डॉ. गीतांजली भीमराव बोराडे
सहयोगी प्राध्यापक,
इतिहास आणि प्राचीन भारतीय संस्कृती
विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद.
मो. ९४२१४६२२८१
gitanjaliborade2011@gmail.com

गोषवारा :

चौसष्ट कलांमध्ये रांगोळी या कलेचा उल्लेख वात्सायनाच्या कामसूत्रात आढळतो. इ. स. सनाच्या तिस-या शतकात धान्याचा वापर करून रांगोळी काढत. सातव्या शतकात ‘वरांगचरित’ मध्ये पंचरंगी चूर्णे, धान्ये व फुले यांनी रांगोळीचे चित्रविचित्र आकृतीबंध तयार करीत. ‘नलचंपू’ या दहाव्या शतकातील ग्रंथात उत्सव प्रसंगी घरापुढे रांगोळी काढत असल्याचा उल्लेख आढळतो. वादीभसिंहाच्या (अकरावे शतक) ‘गद्यचिंतामणी’ या ग्रंथात भोजनसमारंभात मंगलचूर्ण रेखा काढत असल्याचा उल्लेख येतो. अकराव्या-बाराव्या शतकात हेमचंद्राच्या ‘देशीनाममाला’ या ग्रंथात तांदळाच्या पिठाने रांगोळी काढत असल्याचे उल्लेख येतात. बाराव्या शतकातील सामेश्वराच्या ‘मानसोल्लास’ मध्ये ‘धुलिचित्र’ असा तर श्रीकुमार यांच्या ‘शिल्परत्न’मध्ये धुलिचित्र किंवा क्षणिक चित्र या नावाने रांगोळीचे उल्लेख येतात. (मिरिंगकर, ११२) ऐतिहासिक परिप्रेक्षातून रांगोळी कलेचा विचार जेव्हा केला जातो, तेव्हा लक्षात येते की, भारताबरोबर महाराष्ट्रातही रांगोळी ही एक लोककला म्हणून पूर्वापार पासून जपली गेलेली कला आहे. कालौघात त्यात झालेले बदल ऐतिहासिक पद्धती शास्त्र व विविध दृष्टीकोनाच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात संशोधिकेने केला आहे. अॅनाल्स स्कूलच्या परंपरेत मानवी जीवनाच्या सूक्ष्मातल्या सूक्ष्म पैलूसही महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे. तसेच **पर्यावरणवादी दृष्टीकोनातून** रांगोळी या कलेने अभिरुची, कलासक्ती व नैसर्गिक घटकांच्या जोपासने बरोबरच मानवी मुल्य, नातेसंबंधाची जपणूक केलेली दिसते. प्राचीन काळात विशेषत: पुराणात श्रीरामचंद्र आयोध्येत १४ वर्षाचा वनवास भोगून येतात, तेव्हा सडा-रांगोळीने रस्ते सजवल्याचा उल्लेख येतो. रांगोळीतून संस्कृतीचा विकासही होतो. तत्त्वचिंतन व लोकधारणेचा वारसा जपला जातो. रांगोळी कलेचा अभ्यास **शोषित अंकित जनवादी दृष्टीने** (सबाल्टर्न) तसेच मार्क्सवादी दृष्टीकोनातून तसेच **उत्तर आधुनिकतावादी दृष्टिकोनातूनही** करता येतो. रांगोळी ही कला ग्रामीण ते शहरी भागाला साधणारा दुवा जसा आहे तसाच तो वर्ण, जात, पंथ, लिंग, जमाती, विविध धर्माच्या संकुचित बेड्या तोडून सार्वत्रिक, सर्वसमावेश व सर्वमान्य असा कलाप्रकार बनलेला

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal **ISSN 2231 4342**

दिसतो. कालौघात जागतिकीकरणाबरोबरच व बदलत्या जीवनशैलीबरोबरच रांगोळी कलेत काही अमूलाग्र बदल झालेले दिसतात. संस्कार, धार्मिक मूल्य, पावित्र्य, शुद्धतेबरोबरच व्यवहारिकता, व्यापारी दृष्टिकोन, गृहीणी स्त्री, मुलींपुरता मर्यादीत न रहता म्हणजे केवळ 'बायकां' पुरता मर्यादीत न राहता पुरुषी हातांनीही रांगोळी हातात घेतली. ग्रामीण भागातील सारवलेल्या अंगणापासून, वाडे, राजमहाल, श्रीमंताच्या हवेल्यांपासून ते मध्यवर्गीयांच्या घरांपासून ते कुडाच्या झोपड्या, वाड्या, वस्त्यावरील, गरीब हातांतील रांगोळी कला पार गुहेपासून ते शहरापर्यंतचा रांगोळी कलेचा इतिहास हा जागतिक स्तरावर विश्वविक्रम करून अक्षरश: परमोच्च शिखरावर पोहचलेला दिसतो. भास्करभट्ट बारीकरांच्या 'शिशुपालवध' या काव्यात रांगोळीचा उल्लेख 'रंगावली' असा केला आहे. कवी केशसुतांनीही रांगोळी कलेची आपल्या कवितेतून स्तुती केली आहे. लो. टिळकांनी सुरु केलेल्या गणेशोत्सव, शिवजयंती उत्सवात रांगोळी कलेला घरगुती ते सार्वजनिक रूप प्राप्त झाले. विविध सण समारंभात, जेवणाच्या ताटाभोवती, हॉटेलमध्ये, शाळा, महाविद्यालयांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमात रांगोळीस महत्त्वपूर्ण स्थान आहे. विविध मिरवणूकीचा प्रारंभ ते सांगता, पालखी समारंभात रांगोळ्यांच्या पायघड्या टाकून केला जातो. रांगोळी केलेने एकूण अर्थकारणातही मोठी भर घातली आहे. **तळापासूनचा इतिहास पाहत असताना रांगोळी** कलेचा प्रभाव निषाद, किरात, पारध, भिल्ल, मुंड, कोला, नाग, वारली, चेंचू, ठावूâर, कातकरी या आदिवासी जमातींमध्येही रांगोळी कलेचा अविष्कार दिसून येतो. वारली पेटींग, रांगोळी सातासमुद्रापार केली आहे. परंपरा व आधुनिकता, अभिजन ते बहुजन अशा सर्वच स्तरांवर रांगोळी कला अविष्कृत झालेली दिसते. प्रबोधन घडवण्यासाठी, शासनाच्या विविध योजना लोकांपर्यत पोहचवण्यासाठी प्रचार-प्रसाराचे मोठे माध्यम म्हणून पुढे आली. संत गाडगे महाराजांनी स्वच्छतेचा मूलमंत्र दिला तोही रांगोळतून पावित्र्याचे लेणं लेवून रांगोळी कलेचा प्रभाव वारकरी संत परंपरेतूनही दिसून येतो. संताच्या कवनांमध्यमेही, भूपाळी, कीर्तनामध्ये रांगोळीचा उल्लेख पहावयास मिळतो. तसेच विविध कथा, कादंब-या, आत्मकथनामध्येही रांगोळीचा उल्लेख येतो. प्रस्तुत लेख हा संशोधकाला दैनंदिन जीवनात आलेल्या रांगोळी कलेच्या अनुभूतीवर व विविध सण, उत्सवाच्या वेळी दृश्य स्वरूपात मिळालेल्या आकृत्यांवर व इंटरनेटच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या तसेच वृत्तपत्रीय लेख, बातम्या, व इतर दुय्यम संदर्भ साधनांवर प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली आहे. दैनंदिन जीवनात विविध प्रसंगात रांगोळी कलाकृतीची दृश्य अनुभूती हेच या शोधनिबंधासाठी वापरलेली प्राथमिक सामग्री आहे. तिचा संबंध ऐतिहासिक पद्धतीशास्त्रशी संगती लावून रांगोळी कलेची ऐतिहासिकता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

मुख्य मुद्दे - अॅनाल्स परंपरा, शोषित अंकित जनवादी इतिहास प्रवाह, अभिजन व लोकप्रिय संस्कृती, तळापासूनचा इतिहास, रांगोळी कलेचा प्राचीन ते आधुनिक काळातील प्रवास, रांगोळी कलाविष्कार, रांगोळी कलेची ऐतिहासिकता, उत्तर आधुनिकतावादी दृष्टिकोन.

प्रस्तावना :

भूगोल आणि पर्यावरणाशी आलेल्या संबंधातून मानवाचा प्रारंभीचा इतिहास अस्तित्वात आला. त्यानंतर परिवर्तनीय समाजव्यवस्थांच्या आणि लहान-मोठ्या परंतु शारीरिक गुणधर्माच्या समानतेने जोडलेल्या विविध समाजघटकांच्या इतिहासाचा विचार अॅनाल्स परंपरेचे जनक फर्नांद ब्रॉदेल मांडतात. भोवतालचे पर्यावरण, वनस्पती, पशू, शेतकीची विशिष्ट पद्धती आणि प्रचंड उलथापालथीशिवाय मानवाची मुक्तता होऊ न शकणाNया परिस्थितीचा माणूस नेहमीच गुलाम राहिला आहे. सांस्कृतिक क्षेत्रात देखील अशाच सातत्याचा संचार असतो. (फर्नांद ब्रॉदल, पृ. ८१-८८) सिव्हिलायझेशन अॅण्ड कॅपिटॅलिझम फिफटिन्थ एटिन्थ सेंच्युरिज' या ब्रॉदलच्या पुस्तकात लोकसंख्याशास्त्र, आहार, वेशभूषा, राहणीमान, तंत्रज्ञान तसेच नागरी जीवनाच्या वेगवेगळ्या पद्धती, आर्थिक इतिहासकारांनी सामान्यत: न स्पर्शिलेल्या आणि सामाजिक व सांस्कृतिक इतिहासकारांनी दुर्लक्षिलेल्या अनेक विषयाच्या विश्लेषणातून स्वतंत्र आर्थिक दृष्टिकोन तयार करतात. पारंपरिक इतिहास लेखनास अॅनाल्सच्या संपादक मंडळाचा प्रखर विरोध होता. (वांबूरकर, ६२) समग्र लक्ष्यी इतिहासाबरोबरच अंशलक्षी इतिहास लेखन हे अॅनाल्स परंपरेत झालेले दिसते. याच संदर्भातून रांगोळीचा सुक्ष्म अभ्यास केला आहे. महाराष्ट्राच्या प्रादेशिक इतिहासाचे रांगोळी कला हे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये राहिले आहे. स्थानिक पातळीवरील वाड्या, वस्त्या, आदीवासी, भटक्यांच्या पालांपासून ते गावपातळींवर सारवलेल्या घरांपासून गरीब ते श्रीमंत तसेच शहरी भागातील उत्तुंग, गगनभेदी इमारतींमध्ये, मध्यमवर्गाबरोबरच श्रीमंत वर्गात व अभिजन जातींसह लोकप्रिय संस्कृतींमध्ये (रेगे, ०९) रांगोळी हा कलाप्रकार आपणास पहावयास मिळतो.

निवारा ही माणसाची मूलभूत गरज आहे. भटक्या अवस्थेतून माणूस डोंगरातील गुहेत राहू लागला. आदिमानवाने गुहा विविध चित्रांनी शुशोभित केल्या. भुपाळ जवळ 'भीमबैटका' म्हणून प्राचीन गुहा आहे. तिथे भिंतीवर चित्र काढलेली दिसतात. रांगोळी हा प्रकारही चित्रातच मोडतो मग तो कायमस्वरूपी असो किंवा क्षणिक, रांगोळीला धूळीचित्र म्हटले जाते, जे सुक्या भुकटीचा वापर करून काढले जाते तर द्रव रंगाने काढल्या जाणा-या चित्राला रसचित्र म्हटले जाते. रांगोळीला भूमीवर काढली जाणारी म्हणून 'भौम' म्हटले जाते. (मिरिंगकर, 132) घर आणि अंगन या दोन्हीच्या सजावटीसाठी रांगोळी वापरली जाते. सांस्कृतिक समारंभ प्रसंगी, शुभकार्य प्रसंगी, घरासमोर, अंगणात, उंब-यावर, देवघरासमोर, चौरंग वा पोटाभोवती, रांगोळी रेखाटली जाते. पूजापाठ, यज्ञ, अभ्यंगस्नान, औक्षण, नामकरण, भोजन अशा नानाविध प्रसंगी रांगोळी काढली जाते. पेशवाईच्या भोजन पंक्तीत चांदीच्या ताटाभोवती सुबक महिरपी काढल्या जात. जमीन सारवल्यावर आवर्जुन छोटी का हाईना रांगोळी काढलीच जाते. ते शुभ संकेत मानले जाते.

दररोज नव्या पहाटे सोबत नवीन रांगोळी, पहिली रांगोळी मोडली जाणार हे माहित असतानाही रोज तितक्याच तन्मयतेने ऊन, वारा, पाऊस काहीही असो रांगोळी काढली जाते. वा-याची झुळूक, लहान मुलांच्या खोड्या, कुत्रा-मांजराच्या पायाने रांगोळी विस्कटेल हे माहित असूनही ती नव्याने काढली जाते. बंगाली रांगोळी 'अल्पना'मध्ये पिक पेरणीपासून ते कापणीपर्यंत सगळ्या शेतीतील क्रिया रांगोळीत दाखवल्या जातात. कणीस, रुजलेले रोप, लक्ष्मीचे पाऊले सुबत्तेचे प्रतिक मानले जाते. आंध्रप्रदेशातील मुग्गु पॅटर्न कठीण आहे. त्यात जत्रा,

 ISSN 2231 4342

महत्त्वाच्या सणाला मंदिराभोवती मोठ्या रांगोळ्या काढल्या जातात. अनेक महिला, पुरुष हजारो मीटर परिघात रांगोळी काढतात. संस्कारभारतीची रांगोळी समूहाने काढली जाते. या ठिकाणी रांगोळीची स्त्रियांची मक्तेदारी जावून पुरुषांनीही या क्षेत्रात प्रवेश केलेला दिसतो. **स्त्री-पुरुष समानता** रांगोळी कलेत निर्माण झालेली पहावयास मिळते.

रांगोळीचा शब्दश: अर्थ 'रंगाच्या ओळी'. 'रंगवली' म्हणजे संस्कृतमधील 'रंगवलेली' असा होतो. चौसष्ट कलेतील हा सहावा कलाप्रकार शिल्प किंवा मूर्तीकला आणि चित्रकलेच्या आधिचा मानला जातो. वात्स्यायनाचा कामसूत्र हा ग्रंथ इ. स. च्या तिस-या शतकातील मानला जातो. सौंदर्य, मांगल्य, सात्विकता, पावित्र्य, या सा-यांचे प्रतिक म्हणून कोणत्याही शुभ प्रसंगी धार्मिक कार्यात, आरंभी रांगोळी काढली जाते. रांगोळीतील स्वस्तिक हा शब्द सु+अस् (अस् - सत्ता) चांगली सत्ता, अस्तित्व या अर्थाने येतो. स्वस्तिकाच्या चार भूजा म्हणजे ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यासश्रम होय. जगन्नाथपूरी येथील मंदिर स्वस्तिकाच्या आकाराचे बनले आहे. स्वस्तिक चार पुरुषार्थाचे प्रतिक मानले जाते. (मिरिंगकर, ५९-६०)

पूर्वीच्या काळात मुलींचे बालविवाह होत. मुलींना विरंगुळा म्हणून हलकी फुलकी कामे दिली जात. पूजेची पूर्वतयारी करणे, रांगोळी काढणे इत्यादी कामे दिली जात. रांगोळीतील ठिपका म्हणजे शून्य. त्याच्यापासून सर्व गोष्टींचा प्रारंभ होतो. शेवटही शून्यानेच होतो. रांगोळीत ठिपक्याला महत्त्व आहे. ठिपका दिसला पाहिजे पण तो ठळक असता कामा नये. ठिपक्याभोवती रांगोळी रेखाटली जाते. ठिपक्याप्रमाणे स्त्रियांचे अस्तित्वही घरात महत्त्वाचे आहे. संयुक्त कुटुंबाचा सर्व डोलारा स्त्रियांकडे परंतू कर्त्या पुरुषाच्या नावाने घर ओळखले जाते. घर जमीनजुमला कुटुंबप्रमुखाच्या नावाने सत्ता. निर्णयही त्याचेच. ठिपका (स्त्री) महत्त्वाचा तरीही कधी दिसतो न दिसतो असा ठिपक्याप्रमाणे स्त्रियांचे अस्तित्व असूनही नसल्यासारखेच होते. यातून पारंपरिक पितृसत्ताक मानसिकता व टिंबातून व्यक्त होणारे स्त्रियांचे दुय्यमत्व रांगोळीतून व्यक्त होते. रांगोळीतूनच स्त्री स्वत:च्या जीवनाचे अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करते. रांगोळी काढल्यानंतर ती जशासतशी राहते की विस्टकटते. यावरूनही काही अलिखित संकेत पितृसत्तेच्या संदर्भात समाजात रुढ झालेली दिसतात. रांगोळीच्या बाजूला चप्पल बूट असतील आणि रांगोळी विस्कटली असेल तर त्या घरातील पुरुष तापट, रागीट स्वभावाचा असेल, किंवा त्या घरात पाळीव प्राणी व लहान रांगत्या मुलांचा वावर असेल असे अंदाज बांधले जातात.

रांगोळीमधून पर्यावरण संरक्षणाचा मूलमंत्रही मिळतो. नागपंचमीला नागांना पकडून पूजा करण्यापेक्षा नागांची रांगोळी काढून त्याची पूजा केली जाते. वटपोर्णिमेला वडाच्या झाडाच्या फांद्या तोडून निसर्गाला हानी पोहचवण्यापेक्षा वडाच्या झाडाची, सावित्री-सत्यवानाची रांगोळी काढून आधुनिक काळात वटपोर्णिमा साजरी केली जात आहे. शिवजयंती, गणेशोत्सवात पर्यावरण पूरक गोष्टींचा वापर करुन रांगोळी काढली जाते. केरळमध्ये श्रावण महिन्यात ओणम, फुलांची रांगोळी म्हणजे पुकोलम काढून साजरा केला जातो. फुलांच्या रांगोळीचे गालिचे डोळ्यांना सुखकर वाटतात. नवरात्रामध्ये पानाफुलांबरोबरच धान्याची रांगोळी काढली जाते.

पूर्वी मुलांना दस-याला शाळेत पाठवत विद्येची देवता सरस्वतीची प्रतिकात्मक रांगोळी दस-याच्या दिवशी पाटीवर, अंगणात काढली जायची. दिवाळी सणामध्ये दिव्यांबरोबरच रांगोळीची प्रचंड सजावट केली

जाते. चैत्र महिन्यात चैत्रांगण (गुप्ते, ८), माघ महिन्यात रथसप्तमी, होळीला रंगीत रांगोळी काढली जाते. गुरुपोर्णिमा, राखी पोर्णिमा वगैरे सणांमध्ये रांगोळीद्वारे आपल्या गुरुप्रती, भावाप्रती आदर सन्मान व्यक्त केला जाई. आदिवासी व लोकप्रिय संस्कृतीमध्ये एकलव्याची व द्रोणाचार्याची प्रतिमा असणा-या रांगोळ्या काढल्या जात. कोरोना महामारीच्या पूर्वी जेव्हा वारक-यांच्या दिंड्या निघायच्या तेव्हा दिंडी जिथून जाते तिथे मोठमोठ्या रांगोळ्यांच्या विशेषत: संस्कारभारती रांगोळ्यांचे गालिचेरूपी पायघड्या वारक-यांच्या स्वागतासाठी सज्ज केले जात असत. (दै. लोकसत्ता १८ जून २०१७) त्यातून प्रबोधनपर संदेश लोकांपर्यत पोहचवले जात. स्वच्छता, स्त्रीभ्रूण हत्या बंदी, पाणी बचाव, इत्यादी नानाविध विषय घेतले जात. अनेक सेवाभावी संस्था, रांगोळी स्पर्धांचे आयोजन करतात. विविध सामाजिक प्रश्नांवर प्रबोधन व जाणिवजागृती घडवून आणतात.

रांगोळी कला केवळ श्रीमंतच जपतात असे नाही, तर गरीब, कष्टकरी हात सुद्धा आपल्या परीने परिसर स्वच्छ ठेवून रांगोळी काढताना दिसतात. झोपडीत राहणारे लोकही स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी रांगोळी काढून आपले राष्ट्रप्रेम व्यक्त करतात. (दै. हेरॉल्ड १२ ऑगस्ट २०१७) कष्टकरी इवलेसे हातही आपले देशप्रेम आपल्या झोपडीच्या बाहेर व्यक्त करतात. याला दाद द्यावी तेवढी कमीच आहे. रांगोळीच्या माध्यमातून आर्थिक व सामाजिक स्तरीकरणाचे पदरही उलगडताना दिसून येतात. महाराष्ट्रात दरवर्षी साधारण तीन लाख किलोपर्यंत रांगोळी तर लाखोंच्या वर रंग विकले जातात. शिवप्रेमी मंडळी आपले घरदार गहान ठेवून शिवछत्रपतींची महाकाय रांगोळी हजारो एकरात साकारतात. (दै. पुढारी, १८ फेब्रुवारी २०१९) रांगोळी बनवणारे हातही अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत काम करत असतात. रांगोळीसाठी लागणारे कच्चे मटेरियल उदा. चाळण्या, छापे, इको प्रेंâडली मटेरियल वापरून नकली रांगोळ्याही जागतिक बाजारपेठेतून भारतात येताना दिसतात. धकाधकीrच्या जीवनात रांंगोळी काढण्यास तास न तास देऊ शकणा-या स्त्रिया कृत्रिमरित्या तयार साधनांच्या रांगोळ्यांचे स्टिकर, नक्षीकाम असणारे महिरप विकत घेतात. नदीच्या पात्रातले संगमरवराचे तुकडे किंवा दगड गोळा करून ते भट्टीत भाजून त्याची कुटून भुकटी केली जात असे. ही भुकटी वस्त्रगाळ करून रांगोळी तयार होई. आज संगमरवराच्या फॅक्टरीत संगमरवर कापताना जी पूड निघते ती रांगोळी म्हणून वापरली जाते. डोलोमाईट दगडांपासूनही रांगोळी तयार केली जाते. हे दगड पांढरा, पिवळा, करड्या रंगाचे असतात. पारदर्शकही असतात. भाताची फोलपटे जाळून केलेली राख, तांदुळाचे पीठ, बारीक केलेली वाळू, लाल वीटांचे पावडर, नारळाचा पांढरा चोथा वाळवून रंग टाकून रांगोळी बनवली जाते. त्यात रंग भरल्यानंतर रांगोळी पूर्णत्वाला येते. (दै. हेरॉल्ड, ४ नोव्हेंबर २०१७) सुबक रांगोळी काढणा-या बरोबरच रांगोळी बनवणारे हातही तितकेच महत्त्वाचे आहेत. हे मार्क्सवादी गणित लक्षात घेणे गरजेचे आहे. भांडवलशाही छंद जोपासण्याचे काम गरीब कष्टकरी हात करत असतात. फ्लॅट व्यवस्थेत हल्ली आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून परंपरा जपल्या जातात. रांगोळीचे रेडीमेड छापे मिळतात. दक्षिणेकडे काही विशिष्ट पूजेसाठी तांदुळाची पीठ भीजत घालून केलेली पेस्ट रांगोळीसाठी वापरली जाते. ओल्या पिठात बोटे बुडवून रांगोळी काढली जाते. फुले, पाने, पाकळ्या, झाडांची पाने, दुर्वा, कडधान्य वापरून पर्यावरणपूरक रांगोळी काढली जाते.

ISSN 2231 4342

रांगोळी ही ठिपक्याची, दोन बोटांच्या चिमटीतून टाकायची त्याला कमी रांगोळी लागते. हा रांगोळीचा पारंपरिक प्रकार, संस्कारभारती रांगोळी काढण्यास रांगोळी खूप मोठ्या प्रमाणात लागते. पुणे-मुंबईसारख्या मोठ्या शहरात ऑर्डर देवून व्यावसायिकांकडून रांगोळी मोठ्या प्रमाणात काढून घेतल्या जातात. तसे कलाकारही निर्माण झाले आहेत. रेडीमेड रांगोळ्या, विविध आकृत्यांचे छापे घेऊन त्यात नंतर रंग भरले जातात. पाण्यावरती सुबक रांगोळी वेगवेगळ्या वस्तूंचा वापर करुन काढली जाते. रांगोळीमध्ये कासव, नाभिकमळ, ज्ञानकमळ, चक्रव्यूह, परशु, गदा, त्रिशूळ, हत्ती, सूर्य, चंद्र, तारे, डमरु, तुळशी वृंदावन, नागफणी, दिंडी, धनुष्य बाण, खण, कलश, समई, पणती, गायवासरु, मोरपीस, हळद पिंजर करंडे, गुढी, ध्वज, शंख, चक्र, गोपद्मे, स्वस्तिक, ओम, श्री, लक्ष्मीची पाऊले, कोयरी, नारळ, सरस्वती, बिल्वपत्र इत्यादी चिन्हे शुभ मानली जातात. रांगोळीमध्ये ठिपका, रेषा, त्रिकोण, चौकाण, पंचकोण, षटकोन, अष्टकोन अशा अनेक भौमितिक रचना रांगोळीत दाखवल्या जात. पणजी, आजी, काकू, आईकडून मुलीकडे ही रांगोळीची परंपरा पिढ्यान पिढ्या जपली जायची. आता विभक्त कुटुंब पद्धतीमुळे हा प्रभाव कमी होताना दिसत आहे. स्त्रियांची मक्तेदारी मोडून मुले, पुरुष मंडळी ही सहभागी होतात. घरगुती स्वरूप आता विस्तारीत होऊन व्यवसायिक, सामूहिक रुपही प्राप्त झाले आहे. तर दुसरीकडे कला टिकवण्यासाठी प्रशिक्षण वर्ग, कार्यकाळा घ्याव्या लागतात. हेही तितकेच दुर्दैवी आहे. रांगोळी शिकवण्याचे क्लासेस लावले जातात. पिढ्यान पिढ्या चालणारी कला व्यवसायिक बनली आहे. रांगोळीतून मानसिक स्वास्थ्य, शांतता लाभते, मांगल्य, पावित्र्य दिसून येते. जागतिकीकरण, वाढत्या समस्या, प्रदुषण, शहरीकरण, बकालीकरण, ग्रामीण भागातील लोकांचा कल कमी होऊन शहरात येण्याच्या ओढीमुळे गावे ओस पडू लागली आहेत. त्यामुळे विविध समस्या सोडवण्यासाठी शेवटी रांगोळीचाच आधार घेऊन सामाजिक प्रबोधनपर रांगोळ्या काढव्या लागत आहत. अलीकडे कोरोना महामारीच्या विळख्यातून बाहेर येण्यासाठी रांगोळी हे माध्यम वापरून आरोग्यविषयक जाणीव जागृती केली गेली.

महाराष्ट्राबरोबरच भारतात रांगोळीचे विविध प्रकार विविध राज्यांमध्ये पहावयास मिळतात. तो एक संशोधनाचा स्वतंत्र विषय होऊ शकतो. आदीवासी, भटक्या विमुक्त जाती-जमातींनीही आपल्या परंपरा रांगोळीच्या माध्यमातून जपण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रात चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील चारही वर्णात, भटक्या जाती जमातींमध्ये रांगोळीचा प्रभाव पहावयास मिळतो. रांगोळी केलेच, लोकसंस्कृतीचे अभिजनीकरणाकडून बहुजनीकरणाचा प्रवास म्हणजे लोकप्रिय संस्कृतीमध्ये रांगोळी कलेची झालेली जोपासणा मन थक्क करणारा आहे. रांगोळी काढणारे भांडवलशाहीचे द्योतक असणारे हात जेवढे सुकुमार, संस्कारक्षम आहेत तेवढेच रांगोळी बनवणारे कष्टकरी कामगारांचे हात, कौशल्य, त्यांची चिकाटी, गरीबीतूनही नवचैतन्य, समाधान शोधणारे, समाधान देणारे कष्टकरी हातही महत्त्वाचे आहेत. रांगोही कलेला असलेले दुहेरी पदर हे आपण लक्षात घेतले पाहिजेत.

 ISSN 2231 4342

निष्कर्ष :

१) रांगोळी ही ६४ कलांमधील एक महत्त्वपूर्ण कला आहे.

२) भारतीय उपखंडाबरोबरच महाराष्ट्रात विविध सण समारंभात रांगोळीला महत्त्वाचे स्थान आहे.

३) ग्रामीण, शहरी, वाड्या, वस्त्या, हॉटेल्स, रस्ते, कार्यालये, औपचारिक, अनौपचारिकरित्या सर्व सण उत्सव समारंभात रांगोळी महत्त्वपूर्ण आहे.

४) रामायण, महाभारत, वेद वाङ्मय, सिंधू संस्कृती, हडप्पा, मोहनजोदडो वगैरे काळात रांगोळीचा वारसा सांगितला जातो.

५) अफ्रिका, अमेरिका, क्युबा, तिबेट येथील वांशिक जनजातीमध्ये चित्ररचना जमीनीवर करत.

६) रांगोळीमध्ये प्रतिकांना महत्त्व आहे. ही प्रतिके चारही वर्णांमध्ये मान्यता पावलेली आहेत. अभिजन ते बहुजन सर्वशुत, सर्वमान्य व निसर्गातील विविध घटकांना महत्त्व देणारी मूल्य रचना, पर्यावरणपूरक दृष्टीकोन रांगोळीतून व्यक्त होतो.

७) अध्यात्मिकता, पावित्र्याबरोबरच व्यवहारिकताही व आत्मोन्नतीबरोबर भौतिक प्रगती रांगोळी कलेतून होताना दिसते.

८) इ. स. १२७८ मध्ये लिळाचरित्रात रांगोळीचे संदर्भ सापडतात.

९) संत जनाबाई, संत एकनाथ, केशवसुत, भास्कर बोरीकर, व.पु. काळे अशा अनेक संत व कवींच्या, साहित्यिकांच्या काव्यात रांगोळी कलेचे उल्लेख येतात.

१०) कालौघात जागतिकीकरण, आधुनिकीकरणाबरोबर रांगोळी कलेस व्यवसायिक रूप आलेले पहावयास मिळते.

११) घरगुती सण उत्सव, मंदिरे, पालखी सोहळे, मंगलकार्यालये, परिषदा, प्रदर्शने, सांस्कृतिक, राजकीय, नियोजित कार्यक्रम, मिरवणूका, शैक्षणिक उपक्रम, स्पर्धा, सण उत्सव, प्रसंगोपात रांगोळी स्पर्धा, प्रदर्शने, रांगोळीची दालने उघडली, आयोजित केली जातात.

१२) स्त्रियांच्या मक्तेदारीचे क्षेत्र पुरुषांनी हस्तगत केले. अर्थार्जनाचे रांगोळी हे एक साधन बनले.

१३) पुणे, कोल्हापूर, या ठिकाणी रांगोळी कलेचे प्रस्थ मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसते.

१४) देशात विविध प्रांतात रांगोळी कलेचे वैविध्य, नाविण्य पहावयास मिळते. प्रबोधन, उद्बोधन, समाज परिवर्तन घडवणारे रांगोळी हे फार मोठे माध्यम बनले आहे.

१५) प्रिंट मिडीया, युट्यूब, इंटरनेट या प्रसार माध्यमांद्वारे रांगोळी कलेचा प्रसार-प्रचार व नवीन-नवीन कलाकौशल्य विकसित होताना दिसत आहे.

१६) शालेय स्तरापासून ते उच्च माध्यमिक स्तरावर प्रभावी अध्यापनाचा मार्ग म्हणून रांगोळी कलेस आणखी प्रोत्साहन देण्याची गरज म्हणून शैक्षणिक अभ्यासक्रमात रांगोळीचा समावेश करून घ्यावा. केवळ फाइन आर्ट (ललित कलेतच नव्हे) तर इतिहास विषयात स्वतंत्र अभ्यासक्रम केला जावा. जेणेकरून इतिहास विषयाची उपयुक्तता व नाविण्य टिकून राहिल, वृद्धींगत होईल.

 ISSN 2231 4342

१७) गृहीणींच्या कलाविष्काराचे माध्यम व पितृसत्ताक मानसिकतेतून थोडा विसा घेऊन छंद सकाळच्या वेळेस जोपासल्या गेल्याने गृहिणींच्या मानसिक स्वास्थ्याची जपणूक रांगोळी करते.

१८) तळापासूनचा इतिहास पहात असतानाही रांगोळी कला महत्त्वपूर्ण ठसा उमटवते.

१९) ऑईल पेंटच्या सहाय्याने ही विविध ठिकाणी रांगोळ्या काढल्या जातात.

२०) रांगोळी रेखनाच्या माध्यमातून अनेक विश्वविक्रम नोंदवले गेले आहेत.

२१) रांगोळीचा खप, उत्पादन व रांगोळी कलेची जोपासना ही घराघरातून केली जावी. वाढत्या शहरीकरणामुळे, घरांच्या समस्यांमुळे काही प्रमाणात ही कला लुप्त होताना ही दिसत आहे ही दुर्देवी बाब म्हणावी लागेल.

२२) मानसिक आरोग्य जपण्यासाठी व स्त्रियांना व्यक्त होण्यासाठी रांगोळी ही एक मोठा मनोविश्लेषणात्मक परिवर्तन करणारी कला आहे ती अधिक प्रभावी, सर्वमान्य, बहुश्रुत केली पाहिजे.

संदर्भ ग्रंथसूची व टिपा :

१) मिरिंगकर दीपा जयंत, **रंगरेषा** ठिपक्यांची रांगोळी, ई साहित्य प्रतिष्ठान, गोवा, प्रका. १८ मार्च २०१८, **www.esahity.com**

२) फर्नांद ब्रॉदेल, **हिस्ट्री ऑफ सोशल सायन्स**, लाँगदयुरे, मॅरिस एमर्ड, हरबन्स मुखिया, (संपा) फ्रेंच स्टडीज इन हिस्ट्री, द इनहरिटन्स खंड-१, ओरियंट लॉगमॅन न्यू दिल्ली, १९८८, पृ. ८१-८८

३) रेगे शर्मिला, **लोकप्रिय संस्कृती व भारतातील आधुनिकता, लिंगभाव परिप्रेक्षातून**, प्रका. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे, विद्यापीठ, पुणे २००९, पृ. ९, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या सुरुवातीला संस्कृतीचे संपूर्ण जीवनशैलीचा अभ्यास व अभिजन साहित्याचा अभ्यास हे दोन अर्थ दिले गेले. याचा संबंध वसाहतवादाशी आहे. सांस्कृतिक पायावर वसाहतवादाचे अधिष्ठान देताना आपली संस्कृती श्रेष्ठ ठरवून वसाहतीतील संस्कृतीला दुय्यम, रानटी ठरवले. त्यामुळे वसाहती प्रस्थापित करून तो रानटी समाजाला सुसंस्कृत करण्याचा दावा होता. युरोपमध्ये १८ व्या शतकापासून राष्ट्रवाद्यांनी लोककथा संकलन करणा-यांनी लोकसंस्कृती (Folk culture) हा शब्दप्रयोग आणला. लोकसंस्कृती म्हणजेच लोकप्रिय संस्कृती (Popular culture) अशी मांडणी केली. जनसामान्यांची उत्स्फूर्त संस्कृती हीच लोकसंस्कृती होय. राष्ट्रबांधणीसाठी समान इतिहास रेखाटण्याची गरज निर्माण झाली. लोककथा, गाणी, संगीत यात ती समान संस्कृती शोधण्याचा प्रयत्न झाला. लोकप्रिय संस्कृतीच्या क्षेत्रात लिंगभाव, वर्ग, वंश आधारित सत्तासंबंध उत्पादित व पुनर्उत्पादित होत असतात. लोकप्रिय संस्कृतीच्या क्षेत्रावर या सत्तासंबंधाना प्रतिकार / शह दिला जातो. आंदोलनेही उभी राहतात. सांस्कृतिक व्यवहाराचे उत्पादन व वितरण कसे होते व त्याचा उपभोग कसा घेतला जातो. याचा शोध घेणे महत्त्वाचे असते. सर्व सांस्कृतिक व्यवहार 'वरून-खाली' लादलेले असतात किंवा प्रतिकारात्मक असतात.

४) गुप्ते बी.ए., हिंदू हॉलीडे अँड सेरेमनियलस विथ डेझरटेशन्स ऑन ओरिजीन **फोल्कलोरा** अॅड सिम्बॉलस ISBN 9788120609532 पृ. १८ इ. प्रत.

५) दै. लोकसत्ता, रविवार इ. पुरवणी मधील लेख, 'महाराजांच्या पालखीसाठी रांगोळी साकारणारे देखणे हात सज्ज. वारीची वाट होणार आकर्षक आणि प्रबोधन करणारी, दि. १८ जून २०१७

६) दै. हेरॉल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी दि. शनिवार १२ ऑगस्ट २०१७ मधील मिरंगीकर दिपा यांचा लेख.

७) दै. पुढारी, कोपरगाव १८ फेब्रुवारी २०१९ शिवाजी राजांची रांगोळी अकरा एकरात, कोपरगावात, वृत्तलेखक महेश जोशी, www. thinkmaharashtra. com

८) दै. हेरॉल्ड, ठिपका ठिपका रांगोळीचा, दीपा मिरींगकर यांचा लेख, शनिवार, दि. ४ नोव्हेंबर २०१७ मुक्ता पुरवणी, गोवा.

९) व.पु. काळे यांचे प्रसिद्ध वाक्य आहे. यश म्हणजे ताटाभोवतीची रांगोळी सतत अस्तित्व दर्शविणारी रांगोळीच्या भुकेशी संबंध नाही म्हणून ती पचवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अपयश हे वाढलेल्या ताटासारखं अन्नावर वासना नसली तरी ते वाढण गिळाव लागतं. पचवाव लागतं चेह-याची रांगोळी विस्कटु न देता आपल्या जेवनाला म्हणजे पूर्ण ब्रह्माला पूरक अशी ही महिरपी रांगोळी पोटपूजा करताना आनंदी व नयनरम्य वातावरण निर्माण करणारी आपल्या संस्कृतीचे खरे प्रतिकच होय.

१०) प्रस्तुत लेख तयार करत असताना लक्ष्मण गणगे व दिगांबर जाधव यांचे यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले त्याबद्दल त्याचे आभार.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

सिंदखेडचे जाधव घराणे हे यादवांचे वंशज एक अभ्यास

प्रा. डॉ. गणेश हरीभाऊ घुगे
(इतिहास विभाग प्रमुख)
नारायणराव नागरे महाविदयालय, दुसरबिड,
ता. सिंदखेडराजा जि. बुलडाणा - 443308.
मो. 9850571026
ई-मेल. g9850571026@gmail.com

प्रस्तावना :-

क्षत्रियांच्या मुख्य दोन शाखा आहेत, एक सुर्यवंशी व दुसरी सोमवंशी (चंद्रवंशी) सुर्यवंशामध्ये श्रीरामचंद्र यांचा जन्म् झाला. या वंशामध्ये भोसले घराण्याचा उदय झाला. चंद्रवंशामध्ये श्रीकृष्णाचा जन्म झाला.[1] सिंदखेडचे लखुजीराव जाधव यांचा वंश म्हणजे चंद्रवंश होय. यादव उर्फ जाधव वंश सोमवंशाशी (चंद्रवंश) संबंधित आहे. याच वंशामध्ये ययाती नावाचा राजा होऊन गेला. चंद्रचा मुलगा बुध व बुधापासुन ययाती हा राजा झाला. ययातीला शुक्राचार्याच्या मुलीपासुन यदू नावाचा मुलगा झाला. ययातीला यदु, पुरु,ऊर्व अशी मुले होती. ययातीचा मुलगा यदु वरुनच त्यांच्या घराण्याला यादव असे नाव प्राप्त झाले.[2]

यादवांची उत्पत्ती-

प्राचीन काळापासुन अनेक राजघराण्यातील व्यक्ती आपला वंश अतिप्राचीन असल्याचे मानून त्याप्रमाणे कोणत्या तरी देव देवतांशी आपला संबंध जोडतांना दिसतात याला यादवही अपवाद नाहीत. चंद्रवंशाचा मुळ पुरुष समुद्रातुन निर्माण झाला त्याला चंद्र समजल्या जाते. यदु म्हणजेच यादव यदु-यादवा-यादव असे रुपसिध्द आहे.

उदीष्टे -

1) सिंदखेडचे जाधव हे चंद्रवंशी (सोमवंशी) आहेत अभ्यास करणे.
2) जाधव घराणे हे श्रीकृष्णाच्या वंशातले आहेत अभ्यास करणे.
3) सिंदखेडचे जाधव हे यादवांचे वंशज असून यादवांचे जाधव झाले अभ्यास करणे.

श्रीकृष्णाचे मथुरेला वास्तव्य -

यादवाच्या घराण्यातील पूर्वा नावाच्या राजाने मथुरेस आपले राज्य स्थापन केलेले यादव वंशजच ययाती नंतर श्रीकृष्णाचा जन्म झाला यादव घराण्यात एकंदर 56 जाती आहेत, या जातीमध्ये भांडणे होऊन यातील काही जाती नाहीशा झाल्यात.

 ISSN 2231 4342

यादवांचे सौराष्ट्रात आगमन-

कंस वधानंतर मथुरेवर जरासंघ व काल यवन यांचे दुहेरी आक्रमण झाले त्यामुळे श्रीकृष्णाने यादवांसह राजस्थान मार्गे रेवतक पर्वताच्या पायथ्यांशी सागरतीरावर विश्वकर्माच्या हस्ते व्दारका नगरीची उभारणी केली तेथेच ते वास्तव्य करुन होते.[3] यादव श्रीकृष्णासह सौराष्ट्रात काठेवाड येथे राहू लागले. व्दारका ही त्यांची राजधानी होती. कौरव पांडव यांच्यात कुरुक्षेत्र (पाणीपत) येथे (महाभारत) युध्द झाले. बहुतेक कौरव राजांचा संहार होऊन ते मृत्युमुखी पडले. श्रीकृष्ण, कौरव व पांडव हे यादव वंशातले असून वरील युध्दात श्रीकृष्णाची प्रमुख भूमिका होती. कौरव पांडवाचे युध्द संपल्यानंतर श्रीकृष्ण कुळातील (56 कोटी) जाती यादव 56 घराण्यामध्ये आपआपसात तंटे होऊन यादवांनी आपला नाश करुन घेतला. यावरुन मराठीत यादवी होणे नावाची म्हण रुढ झाली.

चांदभाट याने जाधवरावास सौरठ (सौराष्ट्र कोठेवाड) दिल्याचा उल्लेख आहे —

दिये दिल्ली तोंवरन । दई चावंड सुपटन ॥
दय संभरि चहुआन । दई कनवल कमधज्जन ॥
परिहार मुरदेश । सिधु बारडा सु चालं ॥
दै सौरठ जददन । दई दच्छिन जावांल ॥ 1795 ॥

वरील दोहयावरुन जाधवाला काठेवाड प्रांत दिला (दई सौरठ जददन) असे चांदभाट याने स्पष्ट लिहिलेले आहे. गिरनार ऊर्फ जुनागड येथील राजे श्रीकृष्णाचे वंशज असल्याचे टॉडने ही आपल्या राजस्थानच्या इतिहासात म्हटले आहेत.[4]

श्रीकृष्णाचे वंशज महाराष्ट्रात —

श्रीकृष्णाचे वंशज सुबाहूचा मुलगा द्दढ प्रहार दक्षिणेत आला तसा उल्लेख हेमाद्रीच्या व्रतखंडात खालीलप्रमाणे-

सर्वेणि पुर्व मथुरा धिनाया ।
कृष्णादितो व्दारावती स्वरास्ते ॥
सुबाहु सुनोरतु दक्षिणाशा ।
प्रशासिनो यादव वंशवीर ।[5]

सुबाहुचा सर्वात लहान मुलगा द्दढ प्रहार इ.स.50 मध्ये दक्षिणेत आला.

 ISSN 2231 4342

यादवांचा सेऊन देश —

यादवांच्या एका शाखेने महाराष्ट्रात नाशिक जिल्हयात श्रीनगर (सिन्नर) व चांदुर (चांदवड) या ठिकाणी आपल्या राजधान्या स्थापन केल्या.[6] सेऊन देशाच्या राज्यात नाशिक — नगर - औरंगाबादच आणि खानदेश या जिल्हयातील बराचसा भाग येत होता. दृढ प्रहारचा मुलगा सेऊनचंद्र याने सेऊनपुर नावाचे एक शहर वसवून तो ज्या देशावर राज्य करीत होता त्याला सेऊन देश असे म्हणत. सेऊन चंद्रहानंतरचे पाचव्या भिल्लम पर्यंतचे यादव राजे चालुक्य व राष्ट्रकुटांचे मांडलीक होते.

यादवांचे देवगिरीस राज्य —

सेऊन चंद्रानंतरचे यादव राजे चालुक्य व राष्ट्रकुटांचे मांडलीक होते. सेऊण चंद्रानंतर यादवंशी भिल्लम पाचवा हा पराक्रमी राजा झाला. पाचव्या भिल्लमने स्वकर्तृत्वाच्या जोरावर इ.स.1187 मध्ये महाराठवाडयात देवगिरी येथे आपली राजधानी नेली. यादवांचे स्वतंत्र राज्य देवगिरी येथे स्थापन झाले. म्हणुन त्यांच्या कुळास देवगिरीचे यादव या नावाने ओळखतात.[7]

पाचव्या भिल्लम नंतर देवगीरी येथे पहिला जैतुगी ऊर्फ जैत्रपाळ, सिंघन, कृष्ण ऊर्फ कान्हर व महादेव या यादवराजांनी सत्ता उपभोगल्या.

देवगिरी येथे रामदेव ऊर्फ रामराय ची सत्ता-

कृष्णाचा मुलगा रामचंद्रदेवाने आमणदेवास ठार करुन देगिरीची सत्ता हस्तगत केली रामचंद्रदेव हा पराक्रमी राजा होता.

अल्लाउददीन खिलजीची देवगिरीवर स्वारी —

अलाउददीन खिलजीने देवगिरी येथे आक्रमण करुन संपत्ती मिळविली, हिंदू राजा रामचंद्रदेव याला पराभुत करणे हया उदेशाने त्यांने 26 फेब्रुवारी 1296 ला देवगिरीवर आक्रमण केले. व रामचंद्रदेवाला पराभूत केले.[8] रामचंद्रदेवाला तह करण्याशिवाय पर्याय राहीला नाही रामचंद्रदेवाने अल्लाउददीन खिलजीसी तह केला तहात अमाप संपत्ती अल्लाउदीनला मिळाली. ही गोष्ट रामचंद्रदेवाचा मुलगा शंकरदेवास सहन झाली नाही त्यामुळे अल्लाउददीन खिलजीने त्याचा मुलगा वजीर मलिक काफुरला देवगिरीवर पाठविले. मलिक काफुरने देवगिरी वर स्वारी करुन रामचंद्रदेवाला ठार केले. पुढे रामचंद्रदेवाचा मुलगा शंकरदेवाला मलिक काफुरने ठार केले.

देवगिरीवरील यादवांच्या सत्तेचा शेवट —

मलिक काफुरने शंकरदेवाला ठार करुन देवगिरी जिंकून घेतली काफुरने देवगिरीचे यादवांचे राज्य खालसा केले. गोविंददेवाच्या काळात यादवांचे जाधव - शंकरदेवाच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा गोविंददेव यादव ऊर्फ जाधव यांचे पालणपोषण शंकरदेवाचा मेहुणा हरपालदेव याने केले. पुढे गोविंददेवाने खानदेशात स्वतंत्र

राज्य स्थापन केले. त्यांची राजधानी हतनुर येथे होती. गोविंददेवानंतर त्याचा मुलगा ठाकुरदेव यादव (जाधव) नावारुपास आला. ठाकुरदेवानंतर भुकनदेव व अचलोजी हे यादव ऊर्फ जाधव सत्तेवर आले.

लखुजी यादव उर्फ जाधव —

अचलोजीचा मुलगा विठठलदेव हा निजामशाहीत पाचहजारी मनसबदार होते. विठठल देवानंतर लखुजी जाधव हे निजामशाहीत मनसबदार म्हणुन नावारुपास आले विठठलदेव इ.स.1570 मध्ये मरण पावला. त्याच्या पाश्चात त्याच्या ताब्यातील सत्ता निजामशहाने आपल्या ताब्यात घेतली. लखुजी जाधवांचा उदय होई पर्यंत यादव घराण्याचे अस्तित्व जवळजवळ नामशेष झाले होते. लखुजी जाधवरावांनी यादव उर्फ जाधव घराण्याची भरभराट घडवून आणली.

शिवजन्मापुर्वी सिंदखेडचे जाधव घराणे अधिक सामर्थ्यशाली होते. अल्लाउददीनने देवगिरीचा किल्ला जिंकुन घेतला. देवगिरीचा किल्ला निजामशहाला मिळवून देण्याचे काम लखुजी जाधवरावांनी केले. लखुजी निजामशाहीत स्वकर्तत्वाने नावारुपास आले. लखुजीने सिंदखेडच्या शिरजोर रविराव ढोण्यास ठार करुन तेथील देशमुखी वतन मिळविले. यमुनाबाई मुळे हिची रविराव ढोण्याच्या तावडीतुन सुटका केल्यामुळे तीने इ.स.1576 मध्ये सिंदखेडचे वतन लिहून दिले. तेव्हांपासून लखुजी जाधव हे सिंदखेड येथे वास्तव्यास होते. लखुजी जाधव यांचे घराणे सिंदखेडचे जाधव घराणे म्हणुन नावारुपास आले. सिंदखेडचे जाधव हे यादवांचे वंशज असुन ते यादव शब्दाचा अपभ्रंश होऊन जाधव झाले.

चंद्रवंशी (सोमवंशी) श्रीकृष्णाचे वंशज यादव घराण्याची जाधव घराणे ही एक शाखा आहे. यादव या शब्दाचे जाधव हे केवळ अपभ्रंशात्मक रुपांतर असून यादव उर्फ जाधव हा एकच वंश होय. यादवांचे जाधव झाले असे वि.का.राजवाडे म्हणतात.[9] ययाती चा मुलगा यदु यावरुन त्यांच्या घराण्याला यादव नाव पडले.

पुढे यादवांचे जाधव झाले य आणि ज यात भाषापरतवे भेद नाही.[10] उदा. यजमान-जजमान,यज्ञ-जज्ञ, यदु-जदु इत्यादी यादव म्हणजे जाधव असे झाले. य च्या ठिकाणी ज हे अक्षर योजितात यदुनाथ या शब्दाबददल जदुनाथ त्याचप्रमाणे यादव या शब्दाला पुढे जाधव म्हणुन उच्चारल्या जाऊ लागले.[11] पुढे लखुजी हे जाधव नावाने सिंदखेडराजास नावारुपास आले.

निष्कर्ष —

सिंदखेडचे लखुजीराव जाधव यांचा वंश चंद्रवंश होय. यादव ऊर्फ जाधव वंश सोमवंशासी (चंद्रवंश) आहे. ययातीचा मुलगा यदुवरुन त्यांच्या घराण्याला यादव नाव पडले. पुढे यादवांचे जाधव झाले यादवाचे जाधव झाले असे वि.का.राजवाडे आपल्या ग्रंथात नमुद करतात. अनेक पुराव्याच्या आधारे यादव हेच पुढे जाधव नावाने ओळखल्या जाऊ लागले.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

संदर्भ साधने-

1) गो.दा.दळवी	:-	जाधव घराण्याची कैफियत अर्थात मराठी कुळाचा इतिहासात पृ.203
2) डॉ.उत्तम हनवते	:-	सेनापती धनाजी जाधव पृ.22
3) सरदेसाई गो.स.	:-	A HISTORY of Modern India Maratha Period Vol-I पृ.16 क्र.1902
4) टॉड	:-	राजस्थानचा इतिहास पृ.91
5) Sharma Dashrat	:-	1966 History of Rajastha the Age Vol-01- P.43
6) Bhandarkar R.G.	:-	1975 - Early Histroy of Decean P - 76.
7) Kincaid / Parasnis	:-	1918 History of maratha peple vol-1- P-35.
8) Sharma Desharat	:-	1964 The Founding of Maratha freedom P-40-41
9) राजवाडे वि.का.	:-	मराठयांच्या इतिहासाची साधने खंड- 15 ले.03 पृ.13
10) डॉ.एस.ए.बाहेकर	:-	सिंदखेडकर जाधव घराण्याचा चिकित्सक इतिहास भाग-1 पृ.38-39.
11) देशमुख के.बी.	:-	क्षत्रियांचा इतिहास भाग-3 पृ.5152.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

तुळजाभवानीला केले जाणारे नवस: एक सामाजिक परंपरा

प्रा. सुमन लक्ष्मणराव केंद्रे,
सहाय्यक प्राध्यापक,
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,
पंढरपूर.
मो. न. ८२७५१५९८१७

शतकानुशतके मुस्लिमांचा अन्याय सहन करणाऱ्या हिंदूंची मुक्तता करून हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवाजी राजांच्या जीवनात प्रेरक ठरलेली शक्ती म्हणजे तुळजाभवानी. हे राज्य व्हावे ही 'श्री" ची इच्छा यावरूनच शिवाजी राजांची आई तुळजाभवानीवरची भक्ती आपणास दिसून येते. ही तुळजाभवानीम्हणजेच महिषासुरमर्दिनी दुर्गेच्या रूपातील होय. महिषासुरमर्दिनी तुळजाभवानी हे जागृत दैवत आहे.

रामदासापासून दासगुणपर्यंत हीच महिषासुरमर्दिनी तुळजाभवानी भारताच्या स्वातंत्र्यसमरची संजीवक आणि प्रेरक शक्ती बनली. हे सर्व स्वातंत्र्यवीर स्वत:ला दुर्गादास मानण्यात, दुर्गेच्या प्रेरणेत लढण्यात धन्यता मानीत होते. भिन्न जाती-जमातीत जन्मलेले, भिन्न भाषा आणि भिन्न प्रदेश यांच्या अस्मिताचा वारसा घेऊन येणारे असंख्य स्वातंत्र्यवीर स्वातंत्र्यप्राप्तीच्या समान शक्तिशाली जगदंबेच्या चरणाचे दास बनले. या लक्षावधी वीरांच्या पुढे सतत तरळत राहिले होते. ते दुर्गेश महिषासुरमर्दिनीचे रूप. संकटकाळात अनेक थोर पुरुषांनी तिला हाक दिली. जसे १७ व्या शतकात महाराष्ट्रात शिवाजी राजानी तिला हाक दिली. १९ व्या शतकात १८७० मध्ये बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी वंदे मातरम् हे प्रख्यात गीत रचून तिचे जागरण घडविले. १८९० मध्ये अरविंद घोष यांनी भवानी मंदिराच्या संकल्पनेतून बंगालमधील आणि उर्वरित भारतामधील जनतेच्या अंतकरणाने "सामर्थ्याची जननी"म्हणून तिची प्रतिमा प्रतिष्ठित केली. त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनामागे ते प्रेरणा उभी केली.

तुळजापूर हे भवानीचे क्षेत्र उस्मानाबाद जिल्ह्यात असून तुळजापूर तालुक्याचे मुख्य केंद्र आहे. ते सोलापूर पासून ४५ कि.मी. अंतरावर आहे. तुळजाभवानीचे मंदिर पूर्वाभिमुख आहे. गर्भगृह, गूढमंडप आणि सोळखांबी मंदिराची रचना आहे. त्यात परिवार देवता आहेत. कल्लोळ तीर्थाशिवाय मंदिरात मुसलमानपूर्व बांधकाम दिसत नाही.[१]

मुख्य मंदिरातील भवानी अष्टभुजा महिषासुरमर्दिनीच्या रुपात आहे. तिच्या मस्तकावरील अंगाच्याच मुकुटावर संयोनी-शिवलिंग असून हातात त्रिशूळ बाण चक्र, शंख. धनुष्य, पानपात्र आणि महिषासुराची शिखाधारण केलेली आहे. पाठीवर बाणाचा भाता आहे. दावा पाय भूमीवर टेकलेला असून उजवा पाय महिषासुराच्या शरीरावर दाबलेला आहे. दोन्ही पायाच्या मध्यभागी महिषासुराचे शीर पडलेले आहे. देवीमुखाच्या

ISSN 2231 4342

उजव्या, डाव्या बाजूंना चंद्रसूर्य कोरलेले आहेत. महिषासुराच्या धडाच्या उजवीकडे सिह हे भवानीचे वाहन आहे. ही मूर्ती १७ व्या, १८ व्या शतकात घडविलेली असावी. स्थानिक लोक या शिल्पाकनांना अनुभूती म्हणतात.[२]

तुळजाभवानीचे नित्य आणि नैमितिक उत्सव:

भवानीची नित्योपासाना ५-५.३० वाजल्यापासून सुरु होते. सकाळी ९.०० वाजता अभिषेक पूजा सुरु होते. अभिषेक पूजेनंतर भवानी मूर्ती वस्त्रालंकारानी सजवितात. नैवेद्य अर्पण झाल्यानंतर देवीची आरती केली जाते. सायंकाळी पुन्हा पंचामृताचा अभिषेक होते.९.०० वाजण्याच्या सुमारास पुन्हा आरती होऊन उपासनेचा नित्यक्रम संपतो. अश्विनी नवरात्र, पौषातील शांकभरीचे नवरात्र आणि चैत्र पौर्णिमा हे येथील मुख्य उत्सव अश्विन शुद्ध, प्रतिपदेच्या दिवशी मध्यान्ह समयी घटस्थापना होते. तेव्हापासून भाविकांची गर्दी होते. तर दसऱ्याच्या सीमोल्लंघनाच्या सोहळ्यापर्यंत. तसेच नवरात्रात गरुड, मोर, वाघ, सिंह अशा वाहनाची दृश्ये वापरून निघणारा छबिना भाविकांच्या दृष्टीने पारणे फेडणारा असतो.[३] श्रीच्या सिंहासनापुढे वर्षापासून ६ बकरी बळी देण्यात येतात. टी प्रत्येक खेपेस देवी उठवताना एक व बसविताना एक याप्रमाणे होत. यापैकी ५ बकरी या क्षेत्रातील खाटिक लोकांचा म्हेत्रे आहे, त्याच्याकडची असतात व एक नगरकर टेली पालखीवाला याची असते.[४]

लोक देवीला जे नवस करतात त्याचे प्रकार खालील प्रमाणे-

भोगी:

देवीचा मुख्य नवस भोगी पूजा करणे हा आहे. याच पंचामृत स्नान वस्त्र नेसविणे आणि ओटी भरणे या तीन गोष्टींचा समावेश होतो. या ठिकाणी येणारे ब्राह्मण लोक, श्रीमंत लोक, सर्वसामान्य लोक या भोगीचा नवस पूर्ण करतात. याला दही, दुध, मध, लिंब, केळी, साखर हे पंचामृताचे सामान लागते. याशिवाय ओटीचे सामान सुपारी५, नारळ१, तांदूळ ओंजळभर इतके लागते. शिवाय वस्त्र व हळदकुंकूही लागते.

ओटी भरण:

ओटी भरणाचा नवस पूर्ण करण्यासाठी पंचामृत स्नान, वस्त्र नेसविणे समावेश होतो. तसेच दही दुध मध, लिंबू केळी साखर हे पंचामृताचे सामान लागते. याशिवाय ओटीसाठी सुपारी खोबरे, बदाम, खारका, नारळ, तांदूळ, हळद-कुंकू, इत्यादी लागते.

जावळ :

ज्यांची मुले वाचत नाहीत अशा स्त्रियां आपली मुले वाचवण्यासाठी हा नवस करतात. आई भवानी नवसाला पावली म्हणून त्या मुलाचे जावळ श्री देवीच्या पुढे भवानी शंकराचे देवालय आहे. त्याचेपुढील चौकात काढतात आणि आपला नवस पूर्ण करतात.

दंडवत:

यात्रेकरू ज्या पुरोहिताच्या घरी उतरला असेल त्याच्या घरापासून श्रीच्या सिंहासनापर्यंत दंडवत घालतो. दंडवत म्हणजे साष्टांग नमस्कार घालीत जातो आणि आपला नवस पूर्ण करतात.

लोटांगण:

लोक आपला नवस पूर्ण करण्यासाठी देवालयाच्या प्रदक्षिणामार्गात लोटांगण घालतात.

 ISSN 2231 4342

भद:

लिंगायत (वाणी) वगैरे लोकांच्या लाग्नामधून धूप म्हणून एक प्रकारचा विधी होत असतो. तो बहुतेकाच्या पाहण्यात असेल. त्या धुपाप्रमाणेच एक डेऱ्याच्यावरील अर्धा भाग फोडून टाकतात. खालच्यात ओंजळ दोन ओंजळी तांदूळ घालून त्यावर कणकेचा दिवा ठेवून नवस फेडणाऱ्याच्या डोक्यावर तो दिवा दिला जातो.पुरोहिताच्या घरापासून देवालायापार्यंत हा दीप वाजतगाजत नेतात. यास भद असे म्हणतात.[५]

लिंब नेसणे:

नवस फेडणारा आपल्या अंगास लिंबाचे डहाळे गुंडाळतात व श्रीचे दर्शन करतो. यालाही वाजतगाजत जावे लागते.

माळ, परडी व पोत:

देवीचा नवीन भक्त होण्यासाठी माळ, परडी व पोत घ्यावा लागतो. माळ कवड्याची लागते, परडी वेळूची असते व पोत नवीन कापडाचा असतो. आडवाड्यातील मंगळवार किवा शुक्रवार दिवशी किवा आमावस्या किवा पौर्णिमेच्या दिवशी जगदंबेच्या नावाने जागरण करून हा नवस पूर्ण केला जातो.

पानांची प्रभावळ:

हा नवस फेडणारे लोक देवीची थोरली प्रभावळ आहे. विड्यांच्या पानांच्या विड्या करून बसवितात व ही प्रभावळ रात्रीची पूजा झाल्यानंतर प्रक्षालन पूजेच्या पूर्वी देवीच्या मागे लावतात.

फुलांचे घर:

देवीच्या मूर्तीच्या वर एक मंडपी बांधलेली आहे. नवस फेडणारे लोक त्या मंडपास जागोजागी फुलांच्या माळा बांधतात. या फुलांचे घर असे म्हणतात आणि आपला नवस पूर्ण करतात.

हळदी कुंकवाचा सडा:

सौभाग्यावरील संकट टाळून सौभाग्य कायमचे मिळविण्यासाठी सुवासिनी स्त्रिया हा नवस करतात. हा सडा सर्व देवालयभर शिंपडण्यात येतो. हा नवस दिवसातून कोणत्याही वेळी फेडला जातो.[६]

गोंधळ:

गोंधळाला खालीलप्रमाणे सामान लागते. खारका, सुपारी, दिवटी, जुन्या चिंध्या, नवे कापड, विड्याची पाने, हळदकुंकू, कडकन्या , नारळ, अगरबत्ती, कलश, घटमाळ, तेल इत्यादी सामान गोंधळी यांना दिल्यावर भवानी शंकराच्या पुढच्या चौकात गोंधळी समोर चौक मांडून त्यांच्या मागे कथा करण्यासाठी उभे राहतात. चौक मांडल्यावर नवस फेडणारा जो असेल त्याच्याकडून पूजा करवितात. आपल्या मराठवाड्यातही गोंधळ घालण्याची चाल सर्वत्र आहे. लग्न कार्यात अखेरच्या दिवशी बहुतेक करून गोंधळ घातला जातो. गोंधळ घालण्याचे काही वेगवेगळे प्रकार नसून तो चोहीकडे एकसारखा आहे. हे गोंधळी चार असतात. एकाजवळ संबळ, एकाजवळ तुणतुणे असते. निरुपण करणारा आणि निरुपण चालत असताना मध्येच काहीतरी विनोंदी प्रश्न करून हसविणारा अशा प्रकारे चौघांची ही मंडळी असते. निरुपण करणाऱ्यास नाईक म्हणतात.

नाईक गोंधळला गणेशस्तवन करून प्रांरभ करतात. यानंतर जगदंबेच स्तवन करून तिच्या गोंधळात प्रत्येक हिंदू देवतेला बोलविण्यात येते. गोंधळी कथा करतात. या कथा देवाच्या भक्तीच्या असतात. कथा

 ISSN 2231 4342

संपल्यावर गोंधळी गोंधळ करणाऱ्याकडून काही शिरपाव मागून घेऊन जगदंबेची आरती करतात आणि गोंधळ संपवितात. गोंधळ सायंकाळी ६.०० पासून प्रक्षालन पूजा होईपर्यंत असतो.[७]

नवस बोललेली काही ऐतिहासिक उदाहरणे:

करवीरकर छत्रपतीच्या परंपरेतील बुवासाहेब महाराजांनी (राजाराम महराजांचे पुत्र) कोल्हापूरच्या गादीवर आले. या बुवासाहेबानी पुत्र प्राप्तीसाठी तुळजाभवानीला नवस केला. त्यांना पुत्रप्राप्ती झाली देवीचा नवस फेडण्यासाठी ते तुळजापूरकडे निघाले.[८] पंढरपुरचे दर्शन घेऊन ते तुळजापूरला निघाले पण वाटेतच अचानक त्यांची प्रकृती बिघडली आणि २९ नोव्हेंबर १८३८ रोजी त्यांचे निधन झाले. नवस फेडीसाठी झालेल्या विलंबाबद्दल तिची क्षमायाचना करून नवस फेडण्याचा त्यांचा संकल्प तसाच राहून गेला.[९]

लखुजीरावांची पत्नी म्हाळसा बाईनी सिंदखेड मधील कुलस्वामिनीला, रेणुकेला कन्यारत्न प्राप्तीसाठी नवस केला होता. त्यांना कन्यारत्न प्राप्त झाले.[१०] म्हाळसाबाईच्या पोटी १५९७ च्या पोष पौर्णिमेस सुर्योदयासमयी लखुजीना कन्यारत्न प्राप्त झाले. मुखावर तेज असे कि जशी कडकणारी वीजच प्रत्यक्ष जगदंबाच त्यांच्या पोटी आली होती. अवघी कुळी पोरीने उद्धरली. लखुजीचा हत्ती साखर पाणे वाटीत चाळीस हजार वस्तीच्या सिंदाखेडात झुलू लागला. महाली मंत्रघोष सुरु झाला. भाटबंदी गरजू लागले.

उदोऽस्तू अंबे ![११]

निष्कर्ष :

अनेकवेळा इतिहासकारांनी ऐतिहासिक चरित्र लिहित असताना दैवी लीलेचा आधार घेतलेला आहे. जितके म्हणून शिवचरित्रकार झाले त्या सर्वाना हा साक्षात्कार मान्य असल्याचे प्रयोजन दिसत नाही. तर शिवाजी राजांच्या चरित्राशी असा संबंध आहे कि ते चमत्कार वगळून शिवाजी राजांचे चरित्र लिहिता येणार नाही. या आजच्या काळात दैवी कला कदाचित कुचकामी वाटल्या तरी त्यांची पूर्वकालीन योग्यता कमी होत नाही. आज २१ वे शतक चालू झाले आहे. आजच्या २१ व्या शतकात विज्ञान तंत्रज्ञानान आघाडी घेतलेल्या या युगात सुद्धा या श्रद्धेचे महत्व कमी झाल्याचे दिसून येत नाही.

एका बाजूला आपण म्हणतो ईश्वर नाही. या अंधश्रद्धा आहेत आणि दुसऱ्या बाजूला लाखो भाविक नवरात्रात पौर्णिमेच्या आणि आमावस्येच्या दिवशी तुळजाभवानीच्या दर्शनास जातात. अनेकजण आपल्या मनातील अतृप्त इच्छा पूर्ण होण्यासाठी देवीला नवस बोलतात आणि ते नवस पूर्ण केलेलेही प्रसंग आपणास दिसून येतात. म्हणून ईश्वर आहे किवा नाही हा प्रश्न आल्खी अज्ञानाच आहे. परंतु माणूस हा ईश्वरी श्रद्धेने भारावलेला जरूर आहे.

ISSN 2231 4342

तळटीपा:

१. ग.ह.खरे , महाराष्ट्राची चार दैवते, पुणे प्रकाशन १९५८

२. ग.ह.खरे , उपरोक्त , पृ.१७३.

३. रा. चि. ढेरे, श्री. तुळजाभवानी पद्मगंधा प्रकाशन, २००७. पृ. २०.

४. द. मा. कुलकर्णी, महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी, गोवर्धन प्रकाशन,१९२०. पृ. ९५.

५. द. मा. कुलकर्णी,उपरोक्त पृ. ९६.

६. द. मा. कुलकर्णी,उपरोक्त पृ. ९७.

७. द. मा. कुलकर्णी,उपरोक्त पृ. ९८.

८. रा. चि. ढेरे, उपरोक्त, पृ.१४०.

९. स. मा. गर्गे, करवीर रियासत, गो. य. राणे प्रकाशन, पुणे १९८०. पृ.४९२-४९३.

१०. विजय देशमुख, महाराजांच्या मुलखात, वैशाली प्रकाशन, नागपूर,१९७८. पृ. ३२-३३.

११. विजय देशमुख, सिंदखेड राजा, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई-१९८२. पृ. ३.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

दलित नाटकाचे स्वरूप आणि वाटचाल

डॉ. नवनाथ ज्ञानोबा पवळे
कालिका देवी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, शिरूर (का)
ता. शिरूरका. जिल्हा- बीड
मोबाईलनं – 9421477854
ई-मेल – pawalend@gmail.com

प्रस्तावना :

दलित वांगमयाचा उदय 1960 नंतर झालाची ड आणि बंडही दलित चळवळीची दोन प्रमुख वैशिष्ट्ये होती. नंतर वेदना ,विद्रोह आणि नकार ही या साहित्यातील महत्त्वाची तत्त्वे होती. स्वातंत्र्य, समता ,बंधुता, विज्ञान निष्ठा न्याय आणि लोकशाही ही मुल्य दलित साहित्याची मूलाधार आहेत. दलित साहित्यामध्ये विविध साहित्य प्रवाहामध्ये लेखन झाले. दलित साहित्यामध्ये कविता, आणि आत्मकथन हा वाड्मय प्रकार जास्त प्रमाणात हाताळला गेला. तितकासा कादंबरी आणि नाटक हा वाङमय प्रकार हाताळलेला आपणास दिसून येत नाही. हिंदू समाज व्यवस्थेमध्ये जातीची उतरंड आहे त्यामुळे उच्च जात व कनिष्ठ जात अशी विषमता असून दलितत्व हे या विषमतेचे आपत्ती आहे.

दलितांवर या विषमतावादी समाजव्यवस्थेने पिढ्यान पिढ्या अन्याय केला त्याला विरोधकरण्यासाठी साहित्य हे दलितांनी त्यांच्या विरुद्ध लढण्याचे एक हत्यार बनविले आहे. त्यामुळे दलित लेखकाची जबाबदारी याविषमतेच्या विरुद्ध लेखन करून लढा देणे ही आहे असे हा साहित्य प्रवाह मानतो. ही जबाबदारी स्पष्ट करताना अण्णा भाऊ साठे म्हणतात आम्ही दलित साहित्यिक आणि दलितांना वास्तव जगण्याच्या सर्व जुलमातून मुक्त करणारे साहित्य निर्माण केले पाहिजे. असे यांनी सांगितले आहे. शतूवर मात करण्यासाठी हत्यारा पेक्षा विचार हे फार मोठे शस्त्र आहे. ही इतिहासाची साक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील रक्तपात विरहित समाज परिवर्तनासाठी शब्दशस्त्राचाच वापर करून आपल्या तत्त्वज्ञानाच्या सामर्थ्यांव रभारतीय समाजात परिवर्तन घडवून आणली. अण्णा भाऊ साठे यांनी त्याच शब्दसामर्थ्याची जाणीव ठेवून समाज प्रबोधनासाठी लेखन माध्यम उपयुक्त असल्याचे दलित साहित्यिकांनी सांगितले. त्याच प्रमाणे स्वतःही लेखन केले दलित कथा लिहून त्यांनी मोलाचे योगदान दलित साहित्याला दिलेले आहे.

 ISSN 2231 4342

दलित साहित्यातील नाटके :

वाटा-पळवाटा दत्ता भगत, अमली ऋषिकेश सुलभ, अश्मक दत्ता भगत ,आगट अशोक बुरबुरे, आग्या वेताळ जॉनी मेश्राम, उचक्का लक्ष्मण गायकवाड, कथा खैरलांजी प्रा. अनिल कुमार साळवे ,कॅम्पस वामन तावडे, कालचक्र हेम चंद्रजा , काळोखा च्या गर्भात भि.शि. शिंदे, कैफियत रुस्तुम अचलखांब ,कोर्ट मार्शल स्वदेश दीपक ,खेळिया गांडू बगीच्या नामदेव ढसाळ यांच्या कवितावर आधारित एकांकिका, गावकी आत्मचरित्र रुस्तुम अचलखांब चक्रांत,जयजय रघुवीर समर्थ ,जाता नाही जात सिद्धार्थ तांबे ,झाडा झडती शिल्पा मुंबिसकर, झुंबर विदूषक प्रभाकर दुपारे, बाबा भांड लिखित या कादंबरीवर आधारित तंट्या तनमाजोरी, तृष्णा पारफ. मु शिंदे, थांबारामराज्ययेतआहेप्रकाशत्रिभुवन, देवनगरीकिरवंतप्रेमानंदगज्वी ,धादांन्तखैरलांजीप्रज्ञापवार ,पांढराबुधवार ,पुन्हा एकदा नव्याने भगवान हिरे, पैदागीर , पोतरा जबळी अडगुळ गुणशेखरण, भाई तुम्ही कुठे आहात .डॉ. ऋषिकेश कांबळे, महाभोज मनू भंडारी ,युगयात्राम. भीचिटणीस ,रापी संजय जीवने, शिवाजी अंडरग्राऊंड भीमनगर मोहल्ला राज कुमार तांगडे , सुनो शेफाली कुसूम कुमार, सुबरान रामदास कांबळे, कमल अधिक नेस्मारक कुमार देशमुख ,आदी नाटकाचा दलित साहित्यामध्ये उल्लेख असलेला आपणास दिसून येतो. सन 1982 मध्ये पहिला दलित नाट्य महोत्सव भरवण्यात आला होता.

दलित रंगभूमीचा उदय :

सन 1955 मध्ये मिलिंद महाविद्यालयात स्नेह संमेलनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाहुणे म्हणूनआले होते .त्यांनी तेथे विद्यार्थी व प्राध्यापकांनी सादर केलेली नाटके पाहिली सर्व साधारण विषयावर नाटके लिहिण्यापेक्षा दलित जीवनावर नाटके लिहा असे त्यांनी सांगितले आणि तिथून दलित रंगभूमीची मुहूर्त मेढ रोवली गेली. मिलिंद महाविद्यालयाचे प्राचार्य म. भि. चिटणीस यांनी युग यात्रा 1956 मध्ये लिहून आंबेडकरांच्या समाज प्रबोधनाला हाक किंवा प्रतिसाद दिला. 1956 मध्ये नागपूरच्या दीक्षा भूमीवर डॉ. आंबेडकर यांच्या या नाटकाचा प्रयोग झाला. त्यानंतर काही वर्षात दलित व अन्य लेखकांनी अनेक दलित नाटके एकांकिका लिहिल्या. दलित याशब्दाचा अर्थ मुळी पिडलेले, नाडलेले ,तुडवलेले, शोषित ,वंचित ,उपेक्षित असा आहे. अशा समूहाचा दडपलेला आवाज या नाटकांमध्ये त्यांनी प्रकट केला आहे. ज्या जाणीवेने प्रगट होतो. ते दलित नाटक होय.

दलित नाटकाची वैशिष्ट्ये :

1)मराठी नाट्य परंपरेच्या इतिहासात दलित नाटकाचे वेगळे अस्तित्व आहे. हे मान्य करायला हवे. आजपर्यंत लिहिण्यात आलेली दलित नाटके ही समाज परिवर्तनाची आणि समाजबांधिलकीचे केंद्रबिंदू आहेत. म्हणजेच सामाजिकतेला व परिवर्तनाला सामोरे जाणारे विचार प्रवाह दलित नाटकाला मंजूर आहेत.

2) यादेशातील समाज व्यवस्थेला एक जबरदस्त हादरा देणारे धारदार हत्यार म्हणून दलित नाटकाचे एक वेगळे अस्तित्व आहे. दुसरी गोष्ट म्हणजे नाट्य परंपरेतील नाटकीपणा दलित नाटकाला मान्य नाही.

3) प्रस्थापित वर्गाकडून दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य दलित नाटकांनी केले आहे.

4)आपल्या वेदना दलित नाटकांनी नाटक व एकांकि कातून मांडल्या. दलित इतर दलित साहित्य प्रमाणे वेदना विद्रोह नकार ही दलित नाटकाची वैशिष्ट्ये आहेत.

5) दलित नाटक सामाजिक दु:खातून जन्माला येते. दलित नाटकातून येणारा इतिहास हा केवळ एक इतिहास म्हणून येत नाही तर मानवी संस्कृती म्हणून येतो.

6)दलित नाटक हे इतिहासाचे गोडवे गात नाही तर इतिहासाचे विश्लेषण करून भविष्याचा वेध घेते. मानवते विषयी माणुसकी विषयी दलित नाटक आग्रही आहे.

7) दलित नाटक हे वैचारिक बांधिलकी मानणारे अखिल मानव कल्याणासाठी सिद्ध झालेले व हया जगात जे सर्वोत्तम असे मूल्य माणूस त्याच्या रक्षणासाठी सिद्ध झालेले आहे.

दलित नाटकाचे स्वरूप आणि वाटचाल :

मानवी मन निर्भय करणारे रोख ठोक पणाची भाषा बोलणारे, प्रस्थापितां विरुद्ध उघडपणे संघर्ष करणारे हे दलित नाटक मनोरंजन पेक्षा प्रबोधनाची कास पत्करते. विद्रोही जाणिवांचा पेटता अविष्कार म्हणजे दलित नाटक. वेदनांचा हुंकार म्हणजे दलित नाटक काही नव्या विरोधी आणि विद्रोही जाणिवा पोटात घेऊन दलित रंगभूमीने आपल्या प्रवासाला सुरुवात केली. या अनुभवांना जीवनाला दलित नाटकांनी आकार दिला. ते अनुभव विदारक रीतीने आपल्या उघड्यानागड्या स्वरूपात समोर आले. त्यामुळेच दलित विषयावरील ही नाटके लक्ष वेधी ठरतात. महत्त्वाची ठरतात तर कधीकधी प्रस्थापितांच्या जाणिवेला चमत्कारिक ओंगळ, प्रक्षोभक व अस्वस्थ अशा स्वरूपाची वाटतात. उदा. तनमा जोरी व देवनवरी या नाटकाचा शेवट इत्यादी तेव्हा ह्या दलित नाटकात नाटककारांनी आपले विशिष्ट अनुभव मांडले आहेत. त्याचे वेगळेपण लक्षात घेण्यासारखे आहे. गेल्या दोन दशका पूर्वी (केव्हा पासून मोजायची?) मराठीत दलित विषयावरील व दलित जाणिवा विषयीच्या नाटकांना बहर आला.

दलित लेखकांनी दलित नाटक व रंगभूमी दलित चळवळीचे एक साधन बनविले आहे. यावर्गाच्या वाट्याला आलेले दैन्य व अप्रतिष्ठाही माणसाला किती खालच्या पातळीवर नेते याचे भीषणकरणारे दर्शन यानाटकात घडते. उदा. तनमाजोरीतील वेठबिगारी, खेळी यातील नारायणचा खून इत्यादी तरी देखील दलित समाजाला हळूहळू प्रबोधनाची चाहूल लागल्याने या दलित रंगभूमीच्या माध्यमातून दलितांच्या जीवनातच नव्हेतर सबंध समाजात होत असलेल्या परिवर्तनाची कल्पना येऊ शकते. (उदा. युग यात्रा व कैफियत नाटक) दलित नाटक हे केवळ आंबेडकरी विचारांच्या प्रचारासाठी जन्मले नसून त्याविचारांच्या साक्षात्कारासाठी जन्मले आहे. दलित रंगभूमी आणि चळवळीतील हा जिवंतपणा आंबेडकरी विचारांच्या चळवळीमुळे आणि चळवळीतून जन्माला

आला आहे. यालढ्याने सांस्कृतिक क्रांतीला जन्म दिला तेव्हा यादलित नाटकाचा निर्मितीचीमुळ प्रेरणा म्हणजे आत्मशोध होय. स्वत्वाचा शोधा विषयीचे प्रश्न दलितांच्या जीवनात निर्माण झाले. जगण्याच्या दणकट जिद्दीमुळे सोसाव्या लागणाऱ्या यातनां मधून जन्मलेले हे प्रश्न आहेत म्हणून दलित रंगभूमीवरील चळवळीच्या नाटकांमध्ये अनुभवाचा जिवंतपणा असलेला आपल्याला दिसतो. या दलित नाटकाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यात आढळून येणारा सामाजिक संदर्भ होय. आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवन विषयक दृष्टीकोनाच्या आधारे स्वतःला आणि स्वतःभोवतीच या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप अविष्कार म्हणजे दलित नाटक असे प्राध्यापक दत्ता भगत यांनी एके ठिकाणी म्हटले आहे.

आंबेडकरी तत्त्वज्ञानाची शक्ती घेऊन कोणत्याही संघर्षात सिद्ध झालेले आंबेडकरी चळवळही दलित नाट्यचळवळीची प्रेरक शक्ती आहे. दलित शोषितांच्या अस्मिता जागृत केली म्हणून आंबेडकरी चळवळीशी दलित रंगभूमीचे नाते आहे ते विसरता येत नाही असे डॉ. भालचंद्र फडके यांचे मत आहे. ते योग्यच म्हटले पाहिजे मराठी नाटकांच्या इतिहासातील हा दलित नाटकाचा प्रवाह अविभाज्य भाग आहे हा दलित नाट्य चळवळीचा नवोन्मेष प्रवाह म्हणजे नाविण्याचा, नव समाज जाणिवांचा एक नवा आकृति बंध आहे असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही. मानवी जीवन विषयक मुल्यपरिवर्तनशील समतेचा प्रवाह बलदंड करणारी अशीही नाटके आहेत. उदा. न्याय, मन्वंतर इत्यादी तसेच मध्यम वर्गीय जाणिवांवर आघात उदा. आम्ही देशाचे मारेकरी याचबरोबर अंधश्रद्धा विरोधी जागृती थांबा रामराज्य येतंय ,पोतराज, देवनवरी इत्यादी. परिवर्तनाचा विचार देणाऱ्या नाट्य कृती भिक्षुणी वासव दत्ता, न्यायमुख्य म्हणजे बुद्धधम्मातील सिद्धम्माचा विचारही काही दलित नाट्य कृतीत आढळतो. विषम समाजरचनेचा व अर्थव्यवस्थेचा धिकार आदर्श मानवी जीवनाचा स्वीकार ही दलित नाटकाची प्रयोजने आहेत. तेव्हा दलित नाटक ही सामाजिक व सांस्कृतिक चळवळ आहे. निव्वळ मनोरंजन हा उद्देश तिच्या पाठी मागे नाही. येथील रुढी परंपरेने जाती धर्माने एका विशिष्ट समाजाने माणूसकीचे अधिकार नाकारणे त्याविरुद्ध विर्दोह करण्याची दलित रंग भूमीची भूमिका आहे. शिवाय दलित रंगभूमीने ही प्रस्थापित परंपरा ही नाकारली आहे .

दलित नाटकाचा सबंध वर्तमानाशी आहे. कारण दलित नाटक हे दलितांच्या वर्तमान चळवळीतून जन्माला येत आहे. चळवळ जन्म दात्री असल्यामुळे येथे हाडाचा जिवंत आहेत साहा जिवंतपणा येथील मातीतून उगवला आहे. त्यामुळे या नाटकात तंत्राची ही मोडतोड केलेली आढळते. (उदा.थांबा राम राज्य येतंय) दलित नाटकात मूळ संकेताचे भंजन केलेले आढळते. दुःख टोकदार करण्यातून कधी वक्तृत्वाचा तर कधी आवेशाचा आधार घेतलेला आढळतो. (उदा. काळोखाच्या गर्भातील सूत्रधाराच्या सुरुवातीचा व शेवटचा भाग) दुःखाची उत्कटता व्यक्त करण्यासाठी दलित नाटक कधी कवितेकडे सरकते उदा. साक्षी पुरम, न्याय,युगयात्रा ,कैफियत मधील काव्यपंक्ती इत्या. अशा तऱ्हेने दलित रंगभूमीवर सादर होणाऱ्या नाट्यकृतीना एक दिशा आहे. स्वतःची गती आहे एक इतिहास आहे स्वतःचे असे एक तत्वज्ञान आहे भारतीय समाज हा विषमतेवर आधारित असल्यामुळे

माणूस माणसापासून अलग झाला वेगळा झाला. आता तसे न होता समान मानवी मूल्यांची समाज मंदिरात प्रतिष्ठापना करण्याचे ध्येय बाळगणारे दलित नाटक आज आपल्या समोर उभे आहे.

दलित नाटकांचे विषय दलितांवरील अत्याचार त्याची उपेक्षा त्याची त्याच्या जीवनातील दु:ख आणि सर्वप्रकारच्या अन्याया विरुद्ध बंड असे असावेत हे स्पष्टच आहे. परंतु दलित नाटके म्हणजे केवळ एवढेच नव्हे त्या सर्व दलित नाटकातून धर्मशास्त्रातून निर्माण झालेली अंधश्रद्धा, दैववाद ,जाति वाद यावर कठोर आणि मर्म ग्राही आघात आहे. शिवाय या दलित नाटकात विद्रोह व बंडखोरीचे लक्षण असून दु:ख आणि आक्रोशही त्याच्या जोडीला जाणवतो. परंतु ही नाटके निराश आणि कवैफल्यग्रस्त नाहीत हे लक्षात घेणे आवश्यक आहे. यादलित रंगभूमीवरील नाटकाचे आणखी वैशिष्ट्य सांगताना ते केवळ दलितांच्या दु:खा पुरते मर्यादित नाही तर मजुरांची होणारी पिळवणूक तनमाजोरी, आणि साऱ्या जगात जगभराच्या मानवी अन्यायविरुद्ध दंड थोपटून उभे राहण्याची क्षमता व निर्धार या नाटकाच्या शब्दाशब्दांतून व्यक्त होतो. या दलित रंगभूमीवरील नाटकात अस्पृश्यांच्या वाट्याला आलेले हिणकस जीवन ,दारिद्र्य, उपासमार पोटासाठी चाललेली धडपड अस्पृश्यतेमुळे समाज जीवनात होणारी उपेक्षा दलितावर सुवर्णाकडून होणारे अत्याचार ,अंधश्रद्धा ,गैरसमजुती याचे प्रामुख्याने चित्रण आलेले आहे. तसेच दलितेतर समाजाबद्दल आणि त्यांच्या सर्वकष परंपरेबद्दल दलितांना आलेली चीड ही समजून घेता येते.

दलित रंगभूमी आणि चळवळीचे नाटककार सामाजिक बांधिलकी मानणारे आहेत या बांधिलकीमुळेच समाज व्यवस्थेने निर्माण केलेल्या विषमतेची व अन्यायाची चित्रे चळवळीच्या नाटकातून रेखाटण्यात आलेली दिसतात. या जाणिवेने निर्माण होणारे ताण-तणाव त्यांनी बारकाईने चित्रित केलेले आहेत. आजच्या दलित रंगभूमीवरील नाटकाचे स्वरूप प्राधान्याने प्रतिक्रियात्मक, निषेधानात्मक आणि नकार प्रचुर असे आहे. त्यात बंडखोरी ,संतप्तता , आक्रमकता, त्वेष पूर्णता, झालेल्या अन्यायाचा दंश, सरळ सरळ आणि उघड स्वरूपात बहुतांशी प्रकट झाल्याचे दिसून येते. जळजळीत वेदना भोगणारा दलित माणूस या दलित नाटकात प्रथम भेटतो देव, दैववाद ,अंधश्रद्धा ,कर्मकांड , पुराणमतवाद, किंवा पारंपारिक संकल्पना नाकारणे तसेच बद्धविचारातून आलेला अनिश्चिवरवाद, तर्कवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, निती वाद स्विकारणे हेच दलित जाणिवेचे नाटक होय.

समारोप :

सामाजिक क्रांतीचे एक साधन म्हणून दलित नाट्य चळवळीचा विचार होत असला तरी या विषयाच्या अनुषंगाने कलात्मकतेचाही विचार होणे आवश्यक आहे. दलित रंगभूमीवरील नाटके ही प्राचारी असल्यास हरकत नाही. पण प्रचारालाही कलात्मकतेचे भान असणे आवश्यक आहे. आक्रस्ताळी लेखनातून काहीच साध्य होत नाही हे लक्षात घेऊन दलितांना सोसाव्या लागणाऱ्या दु:खाचे, व्यथाचे दर्शन या नाटक काराने जरूर दाखवावे पण त्याचे प्रदर्शन करण्याची वृत्ती असू नये हे महत्वाचे आहे. या सगळ्या दलित नाटकात आता एक प्रकारचा एक सुरीपणा जाणवू लागला आहे. त्याच एक आवर्त निर्माण झाले आहे. त्या दलित नाटकाच्या मुळाशी जी बंडखोर

 ISSN 2231 4342

वृत्ती आहे त्याचा परिपोष करण्याऐवजी आपले नाटक हे एका मोठ्या व्यापक चळवळीचे शक्तिस्थान आहे याचे या दलित नाटककारांनी अजिबात भान विसरता कामा नये. या सर्व दलित नाटकामध्ये नाट्य प्रयोगाचे सर्व गुण ओतपोत भरलेले आहेत. त्यातील आशय व्यापक आणि सखोल आहे. अभिव्यक्ती चैतन्यपूर्ण आणि नाविन्यपूर्ण आहे. आणि तांत्रिक दृष्ट्या ही ते अधिक योग्य आहेत. मात्र या सर्व नाटकामध्ये अनुभवाची खोली वाढवणे आणि मानवी समाजातील गुंतागुंतीचे योग्य दर्शन घडविणे आवश्यक आहे. दलितांना येणारे विदारक अनुभव एका नाट्यात खच्चून भरण्यापेक्षा एका-एका अन्यायाच्या उपेक्षेच्या घटना-घडामोडी या भोवती कथा सूत्र गुंफून त्यातून मानवी मनाच्या स्वभावाच्या क्रिया-प्रतिक्रिया आघात प्रत्याघात याचे कौशल्यपूर्ण कलापूर्ण चित्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होणे या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

संदर्भग्रंथ :

1) दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळ, डॉ. मधुकर मोकाशी

2) दलित रंग भूमी, भालचंद्र फडके

3) दलित साहित्य उगम आणि विकास, डॉ. योगेंद्र मेश्राम

4) दलित चळवळ आणि साहित्य, डॉ.कृष्णा किरवले

5) दलित नाटक आणि रंग भूमी, डॉ. ईश्वर नंदपुरे

6) दलित रंग भूमी ,संपादक डॉ. भालचंद्र फडके

7) दलित साहित्याची चिकित्सा, डॉ. स.दाकराडे

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

शोधनिबंध

"ग्राहक संरक्षण व ग्राहक जागृती - एकविसाव्या शतकाची गरज"
शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड
ता. कन्नड जि. औरंगाबाद
अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे दोन दिवसीय अधिवेशन
दिनांक. 27 व 28 फेब्रुवारी 2021
विषय- एकविसाव्या शतकातील नवे दृष्टीकोण
राष्ट्रीय ई - परिषद

संशोधकाचे नाव
श्री. मिलिंद भिमराव पवार,
M.A,LL.M, M.B.A
पी.एचडी संशोधक
आर आय टी कॉलेज समोर, इस्लामपूर,
ता. वाळवा जि. सांगली
मोबा.9822037717
advmilindpawar@gmail.com

❖ प्रस्तावना -

आपण रोज सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत इतरत्र फिरत असतो, वस्तू व सेवा खरेदी करत असतो. बऱ्याच वेळा घरात टीव्ही पाहत असतो पेपर वाचत असतो अशा अनेक ठिकाणी आपणाला अनेक प्रकारच्या जाहिराती प्रलोभने दिसून येत असतात. अशा जाहिराती करण्याचा प्रमुख उद्देश हाच असतो की ग्राहकांना आकर्षित करणे. परंतु याठिकाणी प्रश्न असा निर्माण होतो खरंच या जाहिराती ही प्रलोभने ग्राहकाच्या साठी उपयुक्त आहेत का ? त्यावेळी मात्र आपण या सर्व गोष्टीचा विचार करतो त्यावेळी नक्कीच आपली मान नकारार्थी हलवली जाते. परंतु पण प्रत्यक्षात जेव्हा आपण एखादी जाहिरात पाहतो त्यावेळी मात्र आपण लगेच त्या वस्तू आणि सेवा खरेदी करण्यासाठी पुढे जाण्याचा प्रयत्न करतो, विशेषतः मोबाइल किंवा कम्प्युटरवर ऑनलाइन जाहिराती पाहिल्यानंतर आपले हात आपसुकच त्या वस्तू खरेदी करण्यासाठी मोबाईलच्या किंवा कॉम्प्युटरच्या बटनावर पडतात. त्यामुळे अशाप्रकारे जी ग्राहकांची एक प्रकारे प्रलोभने दाखवून फसवणूक केली जाते किंवा त्याची सत्यता तपासली जात नाही त्या वेळी एक मुद्दा समोर येतो खरोखरच ग्राहक हक्कांचं संरक्षण व त्याची जागृती होणं गरजेचं आहे का? आणि त्यावेळी प्रश्न निर्माण होतो. ग्राहक संरक्षण म्हणजे नेमकं काय ? ग्राहक कोणाला म्हणायचं? ग्राहक संरक्षणाची जबाबदारी कोणाची ? ग्राहक जागृती म्हणजे नेमकं काय ? या सर्व गोष्टीचा प्रामुख्याने विचार करणे गरजेचे ठरते.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

❖ **ग्राहक म्हणजे कोण** ?

'ग्राहक' या शब्दाचे विश्लेषण करताना समोर येतात त्यात दोन महत्त्वपूर्ण गोष्टी म्हणजेच व्यक्तीने विकत घेतलेली 'वस्तु' आणि त्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारामध्ये पुरवावी लागणारी ' सेवा'. ह्या प्रमुख दोन संकल्पनांचा विचार करणे आवश्यक ठरते. त्या अनुषंगाने वस्तु विकत घेतल्याने तत्संबंधी मिळणा-या ' सेवा ' प्राप्त करण्यास ती व्यक्ती पात्र ठरते. अशा व्यक्तीला 'ग्राहक ' असे समजण्यात येते.[1]

वरील संकल्पनांचा विचार करता, व्यापार आणि ग्राहक ह्या संज्ञा आजच्या नाहीत. अनेक काळापासून सातत्याने चालत आलेल्या सामाजिक विकासाच्या प्रक्रियेतून नागरीकांच्या गरजांच्या गरज पुर्तते करिता निर्माण झालेली ही व्यवस्था आहे. समाज घटकाला जसजशी ग्राहक हक्काची जाणीव होत गेली तससशी ग्राहक संरक्षणा संबंधीची यंत्रणा निर्माण करण्या विषयाच्या हालचाली राजकीय स्तरावर सुरु झाल्या. प्रत्यक्षात पहिल्या महायुध्दानंतर इंग्लंड मध्ये ग्राहक चळवळीला प्रथमतः सुरुवात झाली आणि त्याला ' ग्राहक चळवळ ' असे नाव देण्यात आले. जसजशी ही चळवळ सक्षम आणि सशक्त होत गेली, तेव्हा कुठे इंग्लंड सरकारने ग्राहक संरक्षणा संबंधी वैधानिक तरतुदी करण्यास सुरुवात केली.[2]

अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉन एफ केनेडी यांनी दिनांक 15 मार्च 1962 रोजी कॉंग्रेस समोर बोलतांना ' ग्राहकांच्या हक्का विषयी आपण सर्वांनी जागृत असले पाहीजे आणि त्या दृष्टीकोनातून ग्राहक हक्कांच्या संरक्षणा करिता जाणीवपुर्वक प्रयत्न केल्या जाणे आवश्यक आहे ' असे आवाहन केले. ग्राहक हक्काच्या उद्दीष्ठां बाबत बोलतांना पुढे त्यांनी जनतेचे आरोग्य किंवा जीवन धोक्यात येईल, अशा वस्तु व पदार्था पासून उत्पादकाला परावृत्त करण्यासाठी उपाययोजना करणे, वस्तु व पदार्था बाबत ग्राहकांना वस्तुनिष्ठ माहिती देणे, वस्तुंची किंवा पदार्थांची निवड करण्याचे स्वांतत्र्य देणे, तसेच ग्राहक आणि पुरवठादार यांच्यात काही वाद निर्माण झाल्यास ग्राहकाला आपले म्हणने मांडण्याची संधी देणे इत्यादी ग्राहक हक्का बाबतची आपली भुमिका जाहीर केली आणि म्हणूनच दरवर्षी '15 **मार्च'** हा दिवस **'जागतिक ग्राहक हक्क दिन'** म्हणून सर्वत्र साजरा केला जातो.

संयुक्त राष्ट संघाच्या आमसभेत दिनांक 9 एप्रिल 1985 रोजी ग्राहक संरक्षणाची संकल्पना सदस्य राष्ट्रासमोर ठराव क्र. 39/248 नुसार मांडण्यात आली. आर्थीक, सामाजीक तथा सांस्कृतीक विकासाच्या दृष्टीकोनातून ग्राहकांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करणे किती करजेचे आहे आणि त्याकरिता जागतिक स्तरावर सर्व राष्ट्रांनी संघटीतपणे प्रभावी प्रयत्न केले पाहीजे, असे आवाहन युनोच्या आमसभेने केले. उपस्थीत सर्व सदस्य राष्ट्रांनी ह्या संकल्पनेच्या घोषणेला सकारात्मक प्रतिसाद देवून सदरचा ठराव मान्य करण्यात आला. युनोचे सदस्य राष्ट्र म्हणून भारतिय प्रतिनिधींनी पण ह्या संकल्पनेचे स्वागत केले आणि त्या ठरावाचे बाजूने सही केली. युनोच्या आमसभेतील ह्या ठरावाचा मुख्य हेतू जनतेच्या आरोग्याला व

जीवीताला धोकादायक ठरतील अशा वस्तुंच्या किंवा पदार्थापासून संरक्षण करणे आणि ह्या संबंधातील निर्माण झालेल्या वादांना जलद गतीने अल्पशा शुल्कात न्याय देणे, अशा स्वरुपाचा होता. प्रत्येक सदस्य राष्ट्रांनी आप-आपल्या देशाकरिता ग्राहक हक्काचे संरक्षण करण्याकरिता स्वतत्र कायदा तयार करावा, असे सुचविल्या गेले. आणि त्यानंतर भारतात सुद्धा भारतीय संसदेने ग्राहक संरक्षणाचा कायदा, 24 डिसेंबर 1986 रोजी अस्तीत्वात आणला त्यामुळे दरवर्षी '24 **डिसेंबर**' हा दिवस '**राष्ट्रीय ग्राहक दिन**' म्हणून भारतात सर्वत्र साजरा केला जातो.[3]

❖ ग्राहकांचे मूलभूत हक्क व अधिकार :-

ग्राहक संरक्षण व ग्राहक जागृती या विषयावर आपण चर्चा करत असताना मूलत: ग्राहकांचे कोणते हक्क व अधिकार आहेत हेही जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे ग्राहकांचे प्रामुख्याने खालीलप्रमाणे हक्क व अधिकार आहेत.

1. धोकादायक वस्तु पासून ग्राहकांचे व इतर मालमत्तेचे नुकसान होणार नाही, या बाबत हक्क.
2. वस्तुचा किंवा पदार्थाचा संख्यात्मक व गुणात्मक दर्जा, शुध्दता,प्रमाणितता आणि त्याचे मुल्य या बाबत माहीती मिळण्याचा हक्क.
3. आवश्यक मालाच्या सहज उपलब्धतेचा हक्क आणि त्या संदर्भातील सेवा पुरविण्याची हमी मागण्याचा हक्क
4. वाद निर्माण झाल्यास दाद मागण्याचा हक्क.
5. सदोष वस्तु किंवा त्रुटीपुर्ण सेवा दिल्यास दाद मागण्याचा हक्क.
6. ग्राहक म्हणून न्याय मिळणेकरिता आवश्यक माहितीचे शिक्षण मिळण्याचा हक्क.

वर नमूद प्रमुख हक्क वा अधिकार ग्राहकांच्या बाबतीत आहेत·

ISSN 2231 4342

❖ ग्राहक संरक्षणासाठी आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे –

वर नमूद ग्राहकांचे हक्क व अधिकाराची जर पायमल्ली होत असेल तर त्याकरिता निश्चितच काही मार्गदर्शक तत्त्वे असणे सुद्धा अत्यंत आवश्यक ठरते. ज्याचा विचार यापूर्वी अनेक आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सुद्धा झालेला आहे. त्यामधील काही मार्गदर्शक तत्त्वे ही खालील प्रमाणे आहेत.

1. ग्राहक म्हणून देशातील नागरीकांच्या हक्काचे संरक्षण करणे.
2. राष्ट्रा-राष्ट्रा अंतर्गत ग्राहक संरक्षण चळवळी संबंधांबाबत सुसंवादाचे व सहकार्याचेधोरण स्विकारणे.
3. व्यावसायिक नैतिकतेचे उल्लंघन होणार नाही. हया करिता उत्पादक व पुरवठादार यांचेवर नियंत्रण ठेवणे
4. ग्राहकांचे आरोग्य व जीविताचे रक्षण करण्यासाठी धोकादायक वस्तु व पदार्थांच्या उत्पादनावर नियंत्रण ठेवणे, ग्राहकांच्या आर्थिक क्षमतांचा, वस्तुचे भाव ठरवितांना विचार करणे.
5. नागरीकांच्या गजरेनुसार वस्तुंची निर्मिती व वितरण व्यवस्थे बाबत उपयुक्त धोरण ठरविणे.
6. स्वतंत्र ग्राहक संघटनांच्या निर्मितीला प्रोत्साहन देणे.
7. वस्तुच्या बाजार मुल्यावर नियंत्रण ठेवणे, ज्याद्वारे चांगल्या प्रतीचा माल ग्राहकांपर्यंत कमी किंमतीत पोहचविता येईल.
8. उत्पादक किंवा पुरवठादार यांनी वस्तुंच्या निर्मिती मध्ये किंवा त्या संबंधीच्यावितरणसेवे मध्ये व्यावसायिक नैतिकता पाळावी, जेणे करुन मानवी मुल्यांचे उल्लघन होणार नाही.
9. ग्राहकाला एखादे व्यवहारात झालेल्या अनुचितप्रकरणात दाद मागावयाची असल्यास त्याचे तक्रारीच्या निवाराणार्थ व्यवस्था निर्माण करणे.
10. प्रलोभने दाखवणाऱ्या जाहिरातींवर योग्य ते नियंत्रण ठेवणे.[5]

ISSN 2231 4342

उपरोक्त नमूद मार्गदर्शक तत्त्वांचा विचार करता आंतरराष्ट्रीय ग्राहक संघटनेने, जगातील सर्व विचारवंतांनी व ग्राहक हितांच्या समर्थकांनी ग्राहक संरक्षण चळवळीला सक्षम करण्याकरिता ठोस प्रयत्न करावे. जीवीताला हानीकारक ठरणारी सदोष वस्तुची निर्मिती व्यावसायिक सेवा शर्तीचे उल्लंघन करणे उत्पादक तथा व्यावसायिक किंवा बँकांच्या गैरव्यवहारावर जर नियंत्रण आणवयाचे असेल तर संपुर्ण विश्वातील जाणकारांनी उपचारात्मक तथा उपयुक्त ठरणारे धोरण स्विकारण्याकरिता शासन व्यवस्थेला प्रवृत्त करावे. अशा पध्दतीने आपली सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बांधीलकी स्विकारुन ग्राहक संरक्षणाच्या कार्याला गती दिल्या जावी,. समृध्द राष्ट्रे, आर्थीक विकसनशिलतेच्या मार्गावर असलेली राष्ट्र, आणि विकसनशिल राष्ट्रे अशा सर्वांना लाभान्वीत करणारे हे महान कार्य ठरेल. ग्राहकांच्या हक्काचे संरक्षण करणे, संवर्धन करणे तसेच त्यांच्या तक्रारीचे सुलभतेने विनाविलंब आणि अल्पखर्चात निवारण करणे हा ग्राहक संरक्षणचा मूळ उद्देश आहे.

❖ सारांश

उपरोक्त सर्व विवेचनाचा आधार घेता जर सर्वसामान्य ग्राहकाने योग्य ती काळजी घेतली, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता कृती केली तर ग्राहक संरक्षणाचा कायदा, ग्राहक हिताचे काही प्रमाणात निश्चितपणे रक्षण करेल, किंबहूना त्याहीपेक्षा त्या कायद्याच्या आधाराने सामान्य ग्राहकांना न्याय मिळवून देवून एक सुदृढ समाज निर्माण करेल व ग्राहक संरक्षणाची चळवळ प्रभावीपणे तथा निष्ठेने कशी गतीमान करता येईल, याचा विचार जागतिक स्तरावर व देश पातळीवर कार्य करणा-या ग्राहक संघटनांनी करावयाचा आहे असे केल्यास एक सक्षम, सुदृढ तथा सुरक्षित समाज 21 व्या शतकातील ग्राहक संरक्षणाची आव्हाने पेलण्यास समर्थ ठरतील .

❖ संदर्भ :-

1. Consumer Protection Act.1986,
2. ग्राहक राजा होवो, ह.शी घारे, पृष्ठ क्रमांक,1
3. ग्राहक ग्राहक हित, मासिक.
4. कंझ्युमर प्रोटेक्शन लॉ, जस्टीस एम बी शहा , 2004, पृष्ठ क्रमांक 4
5. उपरोक्त, पृष्ठ क्रमांक 52

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

अण्णाभाऊ साठे आणि त्यांचे श्रमिक समाजासाठी योगदान

Dr. Vinayak Uddhavrao Patil
Head, Dept. Of History,
Shankarrao Jawale Patil College,
Lohara,
Dist. Osmanabad (MS) India
Email: vujp29@gmail.com
Mo. No. 09422002567

गोषवारा:

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतातील औद्योगिकीकरणाची सुरूवात झाली आणि भांडवलशाही आणि कामगारवर्गाला जन्म दिला. कामगार वर्ग भांडवलशाही वर्गाचा बळी ठरला आणि अधिकाधिक नफा घेण्याच्या प्रक्रियेत त्यांचे शोषण झाले. कामगारांच्या या शोषणामुळे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या तिमाहीत भारतातील कामगार चळवळीला चालना मिळाली. नेत्यांनी व व्यक्तींनी कामगारांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले आणि भारतीय कामगार चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. अण्णा भाऊ साठे हे त्यांच्यातील प्रमुख व्यक्ती होते. त्यांनी विविध लेखन व भाषणांद्वारे कामगारांच्या समस्या व समस्या यावर आपले मत व्यक्त केले. कादंबरी, लघुकथा, बॅलड्स (पोवाडा), लोकनाट्य (लोकनाट्य), कविता इत्यादी साहित्याच्या अनेक शैलींतून त्यांचे कामगारमुक्तीचे तत्वज्ञान विसाव्या शतकातील कामगार चळवळीचे उत्प्रेरक असल्याचे सिद्ध झाले. त्यांच्या लिखाणांत सबल्टरन गटांच्या प्रश्नांबद्दल तीव्र संवेदनशीलता दिसून येते ज्यात कामगारवर्ग, अस्पृश्य, महिला इत्यादींचा समावेश आहे. त्यांचे बहुतेक लेखन साहित्यिक दृष्टीकोनातून असल्याने त्यांची रचना आणि ऐतिहासिक चळवळीतील कामगार चळवळीतील योगदानाचे संदर्भ देणे आवश्यक आहे. अण्णा भाऊंनी भारतीय कामगार चळवळीसाठी अभूतपूर्व भूमिका निभावली असली तरी इतिहास वृत्तीने त्याकडे दुर्लक्ष केले गेले आहे आणि भारतीय कामगार चळवळीच्या मुख्य प्रवाहातील इतिहासापासून वगळलेले आहे. त्यांच्या विविध साहित्यातील विविध प्रकारांद्वारे भारतीय कामगार चळवळी संदर्भातील त्यांचे विविध योगदान समजून घेण्याचा हा पेपर आहे.

सुचनक शब्द : अण्णा भाऊ साठे, साम्यवाद, भारतीय कामगार चळवळ, सबटलर्न, कामगारवर्गइ.

1. **परिचय :**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शहरे सामाजिक-आर्थिक वाढीच्या परिणामी भारतातील औद्योगिकीकरणाची सुरूवात झाली. त्यानंतर याने भांडवलदार आणि कामगारवर्गाला जन्म दिला. कामगार वर्ग

भांडवलशाहीवर्गाचा बळी ठरला आणि अधिकाधिक नफा घेण्याच्या प्रक्रियेत त्यांचे शोषण झाले. कामगारांच्या या शोषणामुळे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या तिमाहीत भारतातील कामगार चळवळीला चालना मिळाली. नेत्यांनी व व्यक्तींनी कामगारांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले आणि भारतीय कामगार चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. अण्णा भाऊ साठे हे त्यांच्यातील प्रमुख व्यक्ती होते. त्यांनी विविध लेखन व भाषणांद्वारे कामगारांच्या समस्या व समस्या यावर आपले मत व्यक्त केले. कादंबरी, लघुकथा, बॅलड्स (पोवाडा), लोकनाट्य (लोकनाट्य), कविता इत्यादी साहित्याच्या अनेक शैलींतून त्यांनी कामगार मुक्तीचे तत्वज्ञान लिहिले आहे. त्यांचे लिखाण आणि नाटकं विसाव्या शतकाच्या कामगार चळवळीसाठी उत्प्रेरक ठरली. त्यांनी प्रामुख्याने मराठी भाषेत लिखाण केले जे भारतीय कामगारवर्गासाठी सामूहिक शिक्षणाचे वाहन बनले. त्यांच्या साहित्यिक कामांव्यतिरिक्त, ते त्यांच्या समकालीन काळातील सर्व सामाजिक आणि राजकीय चळवळींमध्ये कार्यकर्ते होते. सर्व सामान्य माणूस, शेतकरी आणि कामगार यांच्या दैनंदिन जीवनाचे वर्णन करण्यासाठी साहित्याचा त्यांनी अतिशय प्रभावीपणे उपयोग केला.

अण्णा भाऊ साठे यांना 'सेंद्रिय बौद्धिक' म्हणण्याची पात्रता आहे ज्यात केवळ त्यांच्याबरोबरच त्यांच्या जाती-वर्गाचाच नव्हे तर मोठ्या जनतेचा विचार करण्याची राजकीय आणि बौद्धिक क्षमता होती. त्यांच्या लिखाणांत सबल्टरन गटांच्या प्रश्नांबद्दल तीव्र संवेदनशीलता दिसून येते ज्यात कामगारवर्ग, अस्पृश्य, महिला इत्यादींचा समावेश आहे. त्यांचे बहुतेक लेखन साहित्यिक दृष्टीकोनातून असल्याने त्यांची रचना आणि ऐतिहासिक चळवळीतील कामगार चळवळीतील योगदानाचे संदर्भ देणे आवश्यक आहे. अण्णा भाऊंनी भारतीय कामगार चळवळीसाठी अभूतपूर्व भूमिका निभावली असली तरी इतिहास वृत्तीने त्याकडे दुर्लक्ष केले गेले आहे आणि भारतीय कामगार चळवळीच्या मुख्य प्रवाहातील इतिहासापासून वगळलेले आहे. त्यांच्या विविध साहित्यातील विविध प्रकारांद्वारे भारतीय कामगार चळवळीसंदर्भातील त्यांचे विविध योगदान समजून घेण्याचा हा पेपर आहे. हे त्या अति महत्त्वाच्या लोकांवर आणि त्यांच्या साहित्यकृतींच्या भूमिकेबद्दल देखील प्रकाश टाकेल ज्यामुळे त्यांच्यामध्ये त्यांच्या हक्कांबद्दल जागरूकता निर्माण झाली.

2. अण्णा भाऊ साठे यांचा भारतीय कामगार चळवळीत सहभाग:

अण्णा भाऊ साठे यांचा जन्म 1 ऑगस्ट 1920 **रोजी महाराष्ट्रातील** सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे झाला आणि ते मंग किंवा मातंग समाजातील होते जे महाराष्ट्रातील अस्पृश्य जातीं पैकी एक होते. त्यांचे बालपण अत्यंत दयनीय स्थितीत व्यतीत झाले. गरीबीने त्याला औपचारिक शिक्षणापासून वंचित ठेवले आहे. नोकरीच्या शोधात तो मुंबईला शिफ्ट झाला आहे आणि त्याला विविध प्रकारची कामे करावी लागली. गिरणी कामगार म्हणून त्यांनी बॉम्बेच्या टेक्सटाईल गिरण्यांमध्ये ही काम केले आहे. त्यावेळी मुंबईत याच घटना घडून आल्या. मुंबईतील कामगार वसाहतीतील संप, बाजारपेठा बंद, मोर्चा यांचे त्याच्यावर नकारात्मक तसेच सकारात्मक परिणाम झाले. मुंबईतील माटुंगा कामगार शिबिरात मुक्काम असताना ते कम्युनिस्ट पक्षाच्या अभ्यास मंडळाच्या कामकाजाकडे आकर्षित झाले. प्रख्यात कम्युनिस्ट नेते कॉम्रेड एस. ए. डांगे यांच्या कार्यामुळे ते कम्युनिस्ट

पक्षात सामील झाले आणि 1936 मध्ये 'लालबावट (लालध्वज) युनियन' चे सदस्य झाले. कम्युनिस्ट पक्षाची धोरणे, उद्दीष्टे आणि कार्यक्रमांचे त्यांनी सखोलपणे पक्षांच्या बैठका आणि परिषदांद्वारे अभ्यास केले ज्यामुळे त्यांचे बौद्धिक क्षितिजे विस्तृत करण्यात मदत झाली. गिरणी मालक कामगारांचे वेतन वाढण्यास तयार नसल्याने कामरेड डांगे यांनी अण्णा भाऊंना त्यांच्याच गिरणीत संप जाहीर करण्यास सांगितले जेथे ते काम करीत होते. अण्णा भाऊंनी आपल्या सहकारी गिरणी कामगारांना संपा विषयी आणि कामगारांना संपाबद्दल अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी आणि त्यांना प्रेरित करण्यासाठी माहिती दिली. त्यांनी 'स्टालिनग्राचा पोवाडा' (बॅलॅड ऑफ स्टालिनग्राद) गायले.

3. अण्णा भाऊ साठे यांचे लेखन आणि भारतीय कामगार चळवळ:

कम्युनिस्ट चळवळीसह अण्णा भाऊ साठे यांचे कार्य आणि दलितांनी त्यांचे विपुल विचार आणि लिखाण तयार केल्यामुळे त्यांच्या जीवनावरील त्यांच्या गंभीर दृष्टीकोन. त्यांच्या 35 कादंबऱ्या, एकनाटक, एक प्रवास विषयक कथा, 10 लोक साहित्य नाटकं, लघु कथांचे 23 संग्रहआणि 10 बॅलड्स (पोवाडा) मराठीत प्रकाशित झाले आहेत. त्यांनी सर्व त्याच्या वास्तविक जीवनातील अनुभवांवर आधारित लिहिले आणि त्यांच्या कादंबऱ्या जीवनातल्या सर्व विरोधाभासांविरूद्ध काम करणाऱ्या त्यांच्या पात्रांमधील लढाऊ भावना प्रतिबिंबित करतात. त्यांचा दृष्टीकोन क्रांतिकारक आणि व्यावहारिक होता. सामर्थ्यशाली आणि अत्याचारी दोन्ही प्रकारच्या व्यवस्था आणि दयनीय परिस्थिती यादोहोंवर त्यांनी सामाजिक वास्तवाचे चित्रण केले. त्यांचे लेखन उपयुक्त आहेत आणि सबलटरन समुदा याची जाणीव समजून घेण्यासाठी अद्वितीय साधने आहेत. अण्णा भाऊ यांच्या म्हणण्यानुसार वर्गाचा प्रश्न केवळ जाती प्रश्नांच्या मुक्ती नंतर सोडवला जाऊ शकतो. जातीच्या प्रश्नाकडे जाण्यासाठी तो आपल्या वर्ग विश्लेषणाने परिचित साधने वापरतो.

अण्णा भाऊंनी आपल्या लेखनात कामगार आणि शेतकऱ्यांच्या जीवना संदर्भातील अनेक विषयांवर भाष्य केले. आपल्या श्रमजाणीवामुळे त्यांनी वस्त्रोद्योग कामगार व मजुरांच्या समस्येवर शहरी मुंबईच्या जीवनावर लिखाण केले आणि ग्रामीण साहित्याच्या विविध साहित्यात त्यांनी चित्रित केले. साम्यवादाच्या इतिहासाचे वर्णन सोप्या भाषेत करावे आणि कामगारांना भारतीय कामगार चळवळीत सामील होण्यास प्रवृत्त करावे अशी त्यांची इच्छा होती. ते तत्वज्ञानाच्या शैलीत गेले नाही तर आपल्या साहित्याचा उपयोग सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी भारतीय कामगार चळवळीत भाग घेण्यास प्रेरित केले. भारतीय कामगार चळवळीतील त्यांचे योगदान त्यांच्या लेखनातून दिसून येते.

बॅलेड्स (पोवाडा):

अण्णा भाऊ साठे यांनी सुमारे 15 बॅलड्स (पोवाड्स) रचले आणि त्यांच्या कित्येक बॅलॅड्स तत्कालीन कामगार प्रश्नांवर प्रकाश टाकतात. ते मुख्यत: कामगार आणि शेतकरी जागृत करण्यासाठी आणि त्यांना शक्ती आणि प्रेरणा देण्यासाठी वापरले जात होते. त्यांची एक काम स्टालिनग्राचा पोवाडा (बॅलॅड ऑफ स्टालिनग्राद) प्रभावी आहे. हे जगभरातील लोकांना प्रेरणा देणाऱ्या संघर्ष आणि इतिहासांना समर्पित आहे. प्रख्यात कम्युनिस्ट

 ISSN 2231 4342

नेते आणि कामगार यांनी या गीताचे खूप कौतुक केले. जगाच्या घटना माहित असल्यामुळे अण्णा भाऊंचे ज्ञान ट्रान्स-नॅशनल होते, हे त्यांनी आपल्या लेखनात समाविष्ट केले. दुष्काळ ग्रस्तांसाठी निधी गोळा करण्यासाठी त्यांनी बंगालची हाक (बंगालचा कॉल) देखील तयार केला आहे.

लोक नाट्य आणि नाटकं:

1944-1962 दरम्यान अण्णा भाऊंनी सर्व पंधरा लोकनाटकांत (लोकनाट्य) लिहिले. परंतु दुर्दैवाने, त्या सर्व आज उपलब्ध नाहीत. त्यांच्या लोकनाट्यांमागील दोन प्रमुख उद्दिष्टे असल्याचे दिसते, एक म्हणजे कॉंग्रेस पक्षाची टीका करणे, त्याचा कार्य प्रणाली आणि त्याची कार्यशैली आणि दुसरे म्हणजे कम्युनिस्ट पक्षाची विचार सरणी आणि त्याचे कार्यक्रम लोकांना अनुकूल प्रकाशात मांडणे.

लघु कथा:

अण्णा भाऊ साठे हे प्रख्यात लघु कथा लेखक होते. त्यांनी बऱ्याच लहान कथा लिहिल्या ज्यामध्ये त्यांनी सबल्टर जनतेचे जीवन चित्रित केले. त्यांच्या छोट्या कथांमध्ये ग्रामीण आणि शहरी दोन्ही स्तरावर विविध सामाजिक प्रश्न आणि समस्यांचा सामना केला गेला. त्यांनी कामगार चळवळीच्या प्रसारास हातभार लावला कारण त्यांनी कामगारांमध्ये कामगार चेतना निर्माण केली. या छोट्या कथांमध्ये विविध पात्रे, सामाजिक परिस्थिती आणि कालखंड यांचा समावेश आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कामगार, गरीब, दलित आणि महिलाही मुख्यपात्र होते. जातीचे वर्चस्व, दारिद्र्य, बेरोजगारी, कामगारांचे शोषण इत्यादी विविध बाबी त्यांनी हाताळल्या.

कविता (पद्य):

अण्णाभाऊ साठे यांनी वेगवेगळ्या पैलूंशी संबंधित अनेक काव्य कविता लिहिल्या. त्यांच्या कविता आणि लावणींनी मराठी साहित्याच्या कविता समृद्ध केल्या आणि भारतीय कामगार चळवळीच्या विकासासाठी हातभार लावला. कामगार चळवळीशी संबंधित असलेल्या त्यांच्या कवितांचे तीन मुख्य प्रकारात वर्गीकरण केले जाऊ शकते.

मार्क्स वादी रचना:

अण्णा भाऊ साठे यांनी मार्क्स वादी झुकाव असलेल्या अनेक कवितांची रचना केली. कामगर स्तवन (मजुरांची स्तुती) हे दर्शविते की कामगार वास्तविक पृथ्वी मूवर्सकरणारा आणि अत्याचारी शक्ती नष्ट करणारा आर्किव्ह व्होल्यूशनरी कसा आहे. काळा बाजार (ब्लॅक मार्केट) काळया बाजारात आणि होर्डर्सना जीवनावश्यक वस्तूंची कृत्रिम कमतरता कशी निर्माण होते याविषयी चर्चा केली जाते.

महाराष्ट्र आणि संस्कृतीच्या स्तुती मधील रचना:

महाराष्ट्राच्या इतिहासाची आणि संस्कृतीची स्तुती करण्यासाठी अण्णा भाऊ साठे यांनी बऱ्याच कविता आणि लावणी देखील रचल्या. यात कामगार चळवळीलाही कारणीभूत ठरले कारण त्यांनी कामगारांचे जीवन आणि परिस्थिती आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि कामगार चळवळीत त्यांचा सहभाग दर्शविला होता. महाराष्ट्राच्या इतिहासाची आणि संस्कृतीची स्तुती करण्यासाठी अण्णा भाऊ साठे यांनी बऱ्याच कविता आणि लावणी देखील रचल्या. यात कामगार चळवळीलाही कारणीभूत ठरले कारण त्यांनी कामगारांचे जीवन आणि परिस्थिती आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि कामगार चळवळीत त्यांचा सहभाग दर्शविला होता. माझी मैना गावावर राहीली (माझा प्रियकर नगरात सोडले) ही त्यांच्या सर्वात लोक प्रिय, बहु चर्चित आणि रचनांमध्ये खूप उद्धृत असलेली एक आहे. यालावणीमध्ये त्यांनी मुंबईची जीवन आणि आर्थिक स्थिती दर्शविली. त्यांनी मजूर, बेरोजगार लोकांची दारिद्र्य आणि इतर अनेक गोष्टींचे वर्णन केले. हे महाराष्ट्रात खूप लोकप्रिय झाले. इतर कम्युनिस्ट लेखकांप्रमाणेच अण्णा भाऊंनी जातीच्या मुद्द्यांना जास्त महत्त्व दिले जे जग बदल घालुनी घाव, सांगुना गेल मला भीमराव (भीमरावयांनी मला हातोडीच्या झटक्याने जग बदलण्याचा सल्ला दिला) या शीर्षकाच्या प्रसिद्ध रचनातून दिसून येते. डॉ.आंबेडकरांच्या मोहिमे पासून प्रेरणा घ्यावी आणि डॉ.आंबेडकरांनी सांगितल्या प्रमाणे हे जग बदलण्याचे आवाहन त्यांनी केले. डॉ.आंबेडकरांच्या अण्णा भाऊ साठे यांच्यावरील प्रभावाचे महत्त्व याकवितेतून समजले. कार्ल मार्क्स आणि डॉ. बी. आर. च्या आपल्या समजुतीच्या मदतीने त्याने जाती आणि वर्ग दोन्ही हाताळले. आंबेडकर आणि त्यांचे तत्वज्ञान त्यांनी अस्पृश्य आणि कामगार दोघांचे ही जीवन जगले.

बॉम्बे कविता:

अण्णा भाऊ साठे यांनी मुंबईच्या जीवनशैलीचे क्षमतेने निरीक्षण केले आणि त्यांच्या कवितांमध्ये कामगारांच्या जीवनाचे वर्णन करण्याचा प्रयत्न केला. मुंबईशी संबंधित असलेल्या त्यांच्या कवितांमध्ये मुंबईतील समृद्धी आणि दारिद्र्य, चकाकी आणि अंधकार, संस्कृती आण क्रौर्य या दोहोंच्या जीवनातील दोन बाजू आहेत. कथा मुंबाईची (मुंबईची कहाणी) दोन वेगळी विरोधाभास करणारी दुनिया सादर करते जी मुंबईत एकमेकां समवेत बरेच अस्तित्त्वात आहे. याकवितेच्या माध्यमातून त्याला आपल्या भाऊबंदांना मुंबईतील दोन भिन्न जगातील फरक दाखवायचा होता आणि कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यक्रमांद्वारे कामगार यापरिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी एकत्र कसे होऊ शकतात. 1949 मध्ये त्यांनी मुंबैची लावणी (मुंबईचे कविता) देखील लिहिले. ही कविता मुंबईतील दु:ख आणि दुर्दैव यांचे प्रतिबिंबित करते. मुंबैची लावणी मध्ये त्यांना कामगारांना सांगायचे होते की, मुंबईत इतके असमानता असूनही, लाल झेंडाखाली कामगार संघटित होऊ शकतात आणि कामगार क्रांती होऊ शकते. आयुष्याबद्दलचा त्यांचा सकारात्मक दृष्टीकोन आणि कामगारांना भेडसावणाऱ्या समस्येची ही कविता प्रतिबिंबित करते. त्यांना मुंबईतील कामगार चळवळीला प्रेरणा व सामर्थ्य द्यायचे होते ज्यामुळे भारतातील कम्युनिस्ट क्रांती होईल.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

कादंबऱ्या:

अण्णा भाऊ साठे यांनी सुमारे पस्तीस कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्या वेगवेगळया क्षेत्राशी संबंधित आहेत जसे की रोमांच आणि धैर्य, महिला, शेतकरी आणि कामगार समस्या, प्रेम आणि ग्रामीण जीवन. वारणाच्य खोर्यत, मंगला, फकीरा, वारणेचा वाघ, मास्टर, धुंड, अग्निदिव्य, चित्रा, चंदन, चिखलते लकमल, फुलपाखारू, टीला लवटे मी रक्ताचा, अवाडी, वैर आणि रत्नइ. याकादंब्यांच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण जीवन, जमीनदार व सावकारांचे शोषण आणि कामगार व शेतकरी यांच्या शोषणाविरूद्ध संघर्षाची चित्रण देऊन वर्ग विदानाचे तत्वज्ञान पसरविले. त्यांच्या कादंबर्यांची संख्या चित्रपटांसाठी वापरली जात असे, ज्याद्वारे त्यांचे कार्य समाजातील मोठ्या वर्गा पर्यंत पोचले आहे.

प्रवास:

त्यांच्या संपूर्ण लेखन कारकीर्दीत अण्णा भाऊंनी माझा रशियाचा प्रवासी (रशिया मधील माझा मार्ग) नावाचा एकच प्रवास लिहिला. 1961 **मध्ये इंडो-सोव्हिएट यांनी रशियाच्या प्रायोजित केलेल्या त्यांच्या प्रवासावर आधारित होते. बॉम्बेच्या कामगारांनी आर्थिक पुरस्कृत केले होते. तो मुंबईतील कामगारांमध्ये इतका लोक प्रिय होता की रशियात सुटल्यावर ते विमानतळावर त्यांना भेटायला आले.** रशियाला जाण्यापूर्वीच त्याची कामे रशियाच्या लोकांना चांगलीच ठाऊक होती. त्यांच्या बऱ्याच कामांचे रशियन भाषेत भाषांतर झाले. रशियन भाषेत भाषांतरित झालेल्या "बॅलड ऑफ स्टालिनग्राड मुळे तो रशियामध्ये खूप लोकप्रिय होता. त्यांनी संपूर्ण रशियाचा प्रवास केला आणि बऱ्याच शहरांचा दौरा केला आणि अनेक रशियनने त्यांची भेट घेतली. या सहलीने त्यांना प्रवास विषयक लिखाण करण्याची प्रेरणा मिळाली ज्यामुळे जागतिक श्रमजीवी चैतन्य आणखी वाढू शकले. यू एस एस आर विरोधी प्रचार कसा खोटा आणि दिशा भूल करणारा होता हे त्यांनी या प्रवास विषयाच्या माध्यमातून दाखवून दिले होते. ते कम्युनिझमचे अनुयायी असले तरी त्यांचा प्रवास वर्णन अत्यंत संतुलित होता.

संकीर्ण लेखन:

मी कथा कशी लिहितो (मी एक कथा कशी लिहावी) या शीर्षकाखाली कथा लेखनाच्या प्रक्रिये सारख्या साहित्यिक विषयावर अण्णा भाऊ साठे यांनी विविध मासिकांत अनेक लेख लिहिले. 2 **मार्च** 1958 **रोजी पुण्यात झालेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनासाठी त्यांनी एक लेखही लिहिला होता, त्यापैकी ते संयोजक होते.** त्यांनी आपले स्वागतार्ह भाषण सादर केले आणि त्यांचे सर्वात प्रसिद्ध विधान केले: "**हि** पृथ्वी शेषनागा**च्या** मस्तकवार तरली नसुन ति दलित, कषटकार्यंच्य तला हातर तरेली अहे." यावरून हे स्पष्ट झाले आहे की ही पृथ्वी दलित आणि कामगारांनी जतन केली आहे, विकसित केली आहे आणि सुशोभित केली आहे, नाही देव किंवा संरक्षक यांनी. या माध्यमातून या वर्गाच्या निरंतर प्रयत्नांद्वारे त्यांनी याविश्वाच्या निर्मिती व संरक्षणासाठी दलित आणि कामगारांचे योगदान स्पष्ट केले आहे.

ISSN 2231 4342

4. **सारांश:**

सारांशात असे दिसून येते की अण्णा भाऊ साठे हे एक ठराविक शैक्षणिक लेखक नव्हते, परंतु त्यांचे पेन त्यांचे कार्यकर्ते म्हणून त्यांचे जीवन घडविणाया दैनंदिन वास्तविकता आणि सामाजिक संवादाचे विश्लेषण आणि प्रतिबिंबित करते. त्यांनी कामगारांना एकत्र केले आणि तत्कालीन सामाजिक-आर्थिक आणि राजकीय समस्यां विषयी त्यांना जागरूक केले. एक कामगार म्हणून तो कामगारांच्या हक्कांचा उत्कट समर्थक होता आणि कामगारांमध्ये वर्गाची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांच्या साहित्याने हातभार लावला. त्यांनी मार्क्सवादाची विचारसरणी कामगारांपर्यंत पोहचवण्यासाठी विविध प्रकारच्या साहित्याचा वापर केला आणि कार्यकर्त्यांमध्ये लिप्यं तरित केले. त्याचे कार्य त्याच्या आयुष्यातील अनुभव प्रतिबिंबित करते. त्यांचे साहित्य सुधारणेसाठी, कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी आणि समस्या उपस्थित करण्यासाठी उत्प्रेरक होते. भारतीय कामगार वर्गाला जागृत करण्यासाठी त्यांनी मार्क्सवादआणि आंबेडकरवाद आणि जाती- वर्ग विश्लेषण यादोन्ही तत्वज्ञानाचा उपयोग आपल्या लेखनात केला. यादोन्ही विचारसरणी पछाडलेल्यांच्या संघर्षाची स्पष्ट समज देण्यात मदत करते. त्यांनी हा संघर्ष ठळकपणे मांडला तो केवळ कामगारांचा संघर्ष नव्हता तर त्या परिघामध्ये असणाऱ्या लोकांचा संघर्ष होता.

अण्णा भाऊ साठे यांनी इतर लेखकां पेक्षा भारतात जाती आणि वर्ग या दोघांना समान महत्त्व दिले. त्यांनी मराठी साहित्यातील उल्लेखनीय नवीन थीम व विषयांची एक खाण उघडली ज्या योगे मराठी साहित्याचे केंद्र शहरी मध्यम वर्गा पासून ग्रामीण लोकांमध्ये गेले आणि तेथून पूर्वीचे अस्पृश्य, दलित, भटके, आदिवासी, कामगार, शेतकरीइ. त्यांनी कार्लमार्क्स, महात्मा फुले, एन. एम. लोखंडे आणि डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या परंपरेचे अनुसरण केले आणि आपल्या लेखनातून निम्नवर्ग आणि कामगार जागृत केले. कामगार म्हणून जगताना आणि अस्पृश्य जातीं मधून आलेल्या कामगारांच्या समस्या समजून घेण्यासाठी त्यांनी जाती आणि वर्ग यादोघांना एकत्र केले. त्यांच्या लिखाणात जाती-वर्गाचे प्रतिबिंब उमटलेले आहे आणि त्यांनी ज्या संघर्षाचा उल्लेख केला तो केवळ वर्गावर आधारित नाही तर जातीवर आधारित आहे. त्यांच्या सर्व लेखनात आणि साहित्याच्या विविध प्रकारांमध्ये यासंघर्षांचे वर्णन केले गेले. कला पाठक यांच्या अभिनयामुळे ते भारतीय समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचले. त्यांनी आपले संपूर्ण जीवन भारतातील कामगार चळवळीसाठी वाहिले. कामगारांच्या संवेदनशीलतेसाठी त्यांनी आपली विविध प्रकारची साहित्यं वापरली आणि भारतीय संदर्भात त्यांची जात आणि वर्गाची विचारसरणी एकत्र केली. ग्रॅम्सीच्या शब्दात ते खऱ्या अर्थाने एक 'सेंद्रीय बौद्धिक' होते. अशा प्रकारे भारतीय कामगार चळवळीतील त्यांच्या योगदानाचा भारतातील कामगार चळवळीच्या मुख्य प्रवाहात समावेश केला जावा.

ISSN 2231 4342

संदर्भ:

1. Awad, Milind. 2010. The Life and Work of Anna BhauSathe: A Marxist- Ambedkarite Mosaic. Mumbai: GaurPublishers.
2. Dangle Arjun (ed.) 1992. Poisoned Bread: Translationfrom Modern Marathi Dalit Literature. Bombay: OrientLongman Ltd.
3. Dangle Arjun and Others (eds.) 2006. LokshahirAnnabhau Sathe Nivadak Vangmay (Marathi).Mumbai: Secretary Maharashtra Board of Educationand Culture.
4. Dangle, Arjun. 2007. Ambedkari ChalvalincheAntarang (Marathi). Mumbai: Lokvangmaya GrihaPrakashan.
5. Gupte, Vasant. 1981. Labour Movement in Bombay:Origin and Growth upto Independence. Bombay:Institute of Workers Education.
6. Gurav, Baburao. 2010. Annabhu Sathe — SamajikVichar ani Sahitya Vivechan (Marathi). Mumbai:Lokvangmay Griha Publication, Fourth Edition.
7. Jadhav, Kishor. 2006. Nilya Akashatil Lal Tara —Comrade Annabhu Sathe — Sahitya Ani Rajkaran(Marathi). Pune: Mahakavi Ashwaghosh Prakashan.
8. Kadam, Manohar. 1995. Bhartiya KamgaarChalvaleeche Janak: Narayan Meghaji Lokhande(Marathi). Mumbai: Akshar Prakashan.
9. Kathale, Nanasaheb. 2001. Annabhu Sathe — Jivanani Sahitya (Marathi). Nagpur: Samata Sainik DalPrakashan.
10. Korde, Bajrang. 1999. Anna Bhau Sathe: The Makerof Indian Literature. Mumbai: Sahitya AkademiPublication.
11. Korde, Bajrang. 2000. Selected Stories of AnnabhauSathe. Mumbai: Sahitya Akademi. Publication.
12. Omvedt, Gail. 1994. Dalit and the DemocraticRevolutions: Dr. Ambedkar and the Dalit Movement inColonial India. New Delhi: Sage publication.
13. Patil, Sharad. 1993. Marxwad Phule Ambedkarwad(Marathi). Pune: Sugava Prakashan.
14. Patkar, Rameshchandra. 2009. Adhunik Shahiri AniKamgaar Rangabhumi (Marathi). Mumbai:Lokvangmay Griha Publication.
15. Phadke, Y.D. 2007. Vishavya Shatkateel Maharashtra(Marathi). Mumbai: Mauj Prakashan Griha.

ISSN 2231 4342

संयूक्त महाराष्ट्र चळवळीत मराठवाडाः महाराष्ट्र - कर्नाटक सीमावाद

शिवाजी काशीनाथ गायकवाड
इतिहास विभाग संशोधक विद्यार्थी
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.
shivaji.gaikwad32@gmail.com ,
मो. न. ९९६०१५१४७०

प्रस्तावनाः

आंदोलने अथवा चळवळी कोणत्याही असोत याद्वारे समाजाला,व्यक्तीला ,राष्ट्राला वा समाजव्यवस्थेला पूरक घटणातून आपला जीवनव्यवहाराचा मार्ग शोधावा लागतो. चळवळी,आंदोलने ही समाजाच्या शाश्वत विकासासाठी पूरक ठरतात.विविध चळवळी,आंदोलने,सत्याग्रह भारतात व भारताबाहेरही झालेली आहेत.त्या ऐतिहासिक घटणांमधून जगाचा उषःकाल त्यात सामावलेला असतो.पण सत्ता आपल्याभोवती नांदावी असं सत्ताधीशांना वाटत असते.त्यातून विविध पक्षीय ,सामाजिक ,सांस्कृतिक ,शैक्षणिक,क्रीडा,भाषिक, अस्मितेला धक्का लागून जनक्षोभास, वादविवादास कारणीभूत घटणा घडतात.सत्तेच्या लालसेपोटी समाज समाज न राहता केवळ संघर्ष उभा राहतो यात केवळ सामान्यजन होरपळून निघतात.यामूळे अधोगती ही समाजातील तळागळात काम करणाऱ्यांची होते.कित्येकजण आपल्या अस्मितेला आपल्या डोळ्यादेखत चूरगळा झालेले पहतात.सत्ताधारी सत्तेच्या लोभापायी सामान्यांचे बळी घेतांना दिसतात. सत्ता टिकवून कशी राहील या राजकीय कारणांसाठी वाद उभे करुन त्याकडे समाजमनाचे लक्षवेधतात खिळवून ठेवतात अशी आंदोलने चळवळींची धार बोथट करतात. सत्तापक्ष आपला राजकीय डाव साधून सत्ता अबाधीत ठेवण्याचा प्रयत्न करतात. अशा राजकारणातुन समाजपयोगी ठोस निर्णय होत नाही.भले होते ते सत्ताधीशांचे चळवळी आणि आंदोलनाच्या ध्येयनिष्ठेत शाश्वत विकास असेल तरच ती आंदोलने,चळवळी यशस्वी होतात. आंदोलनाच्या मूळाशी विशिष्ठ ध्येय,निष्ठा,त्याग,सातत्य प्र माणिकपणा आणि राष्ट्रविकास असावा लागतो तीच आंदोलने समाजात आपली अस्मिता टीकवून ठेवण्यात यशस्वी होतात.अशी काही आंदोलने जगाच्या पाठीवर झालेली आहेत.आंदोलने ही समाजाची अस्मिता,भाषेची अस्मिता ,देशाच्या स्वांतत्र्यासाठी,गूलामीला विरोध करण्यासाठी आणि राष्ट्रोद्धारासाठी झालेली आहेत. गेली ६० वर्षापासून महाराष्ट्र - कर्नाटक यांच्यात सीमावादावरुन आंदोलन चालू आहे.

कित्येक लोकांनी आपल्या प्राणाची आहूती दिल्यानंतरही यश मिळत नाही याला जबाबदार कोण ? का ? आत्तापर्यंत हा प्रश्न केंद्र आणि दोन्ही राज्यसरकारला आत्तापर्यंत सोडवता आला नाही ? कोणत्या कारणामूळे अजूनही येथिल सामान्यजनतेला लढावे लागत आहे ? आंदोलन तानून ठेवल्यापाठीमागचे कारण काय ? यावर

 ISSN 2231 4342

उपाय काय करता येईल ? काय केल्याने हा प्रश्न संपूष्ठात येईल त्यावर प्रकर्षाने उहापोह होणे हा संशोधन लेख लीहीण्याचे उद्दीष्ट आहे.

मराठवाडा येथिल ठराविक कर्मयोगी यांची माहीती घेण्याचा अल्प प्रयत्न केला आहे.महाराष्ट्र राज्य संकल्पनेचा उदय व स्थापना यामागे राज्य कारभाराच्या सोयीसाठी भाषावार प्रांतारचना,एकभाषी प्रांत एकत्र करुन मराठी भाषकांचे स्वायत्त राज्य स्थापन करणे आणि सर्वागिणविकास साधून घेणे ही प्रेरणा होती.संशोधनासाठी विषय निवडल्यावर त्याच्या कक्षा एकदम रूंदावतात .निवडलेल्या विषयाचे कालचे,आजचे आणि उद्याचे पैलू मांडलेले आहे.एका ऐतिहासिक दृष्टीने मागील संचिताची मांडणी करत अभ्यासाची साधने तपासत चिकीत्सकपणे पारखण्याचा प्रयत्न करावा लागत आहे.

यातूनच सद्यःस्थितीतील चालू असलेल्या कर्नाटक - महाराष्ट्र सीमावादावर दोन्ही राज्यांच्या सत्ताधीकांरयामधील चालू असलेला भाषणवाद अथवा रस्सीखेच याची पाडताळणी करता येणार आहे. खरंच हा प्रश्न सूटू शकतो का ? याला जबाबदार राजकीय उदासीनता आहे का ? सामान्यजन वेठीस ठेवून राजकीय स्वार्थ साधण्यापूरता सत्तालोलूपणे घोळत ठेवलेला हा प्रश्न आहे ?(१)अशा शास्त्रीय अंगाने या प्रश्नाचे उत्तर मिळवण्याचा प्रयत्न करणार आहे .

मराठवाड्यातील त्यागीवृत्तिचे आणि स्वतःच्या आयूष्याची पर्वा न करता वेळप्रसंगी स्वतः चा मूलगा प्राणास मूकलेला असतांनादेखील संयूक्त महाराष्ट्र चळवळीसाठी झोकून दिलेले ,राष्ट्रीय प्रश्नांची जाण असणारे शे.का.प.चे नेते उस्मानाबाद येथिल भाई उद्धवराव पाटील यांनी स्वकर्तृत्व आणि प्रतिकूलपरीस्थितीशी दोन हात करत राजकारणात ऊभे राहीलेले नेते होते.आज असे राजकीय पूढारी ,नेते शोधतांना कठीण जाते. परीस्थीतितच चळवळीची बीजं असतात.तसे कार्य भाई उद्धवरावांनी शे.का.प.चे पूर्णवेळ काम केले. संघटना तळागळापर्यंत पोहचवून कार्यकर्ते तयार केले. हैदराबाद मूक्ती लढा यानंतर संयूक्त महाराष्ट्र चळवळ,त्याहीनंतर कूळपरीषदा,शेतकरी लढे लढण्यात अग्रेसर राहीले.आणि तळमळीने लोकांसाठी विविधांगी लढे उभेकरुन जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केला.(२)

अशीच माणसं विशिष्ठध्येय घेवून जगणारी होती म्हनून तत्कालीन संयूक्त महाराष्ट्र लढ्याला यश मिळाले. या लढ्यात असंख्य सामान्य कष्टकरी लोकांनीही आंदोलन यशस्वी करण्यासाठी आपले योगदान दिले आहे. आज तशी स्थीती असायला हवी होती.तसे राजकीय नेते असायला हवे होते.परंतु आजच्या परीस्थितीत अशी विचारसरणी असलेल्या नेत्यांची वाणवा आहे असे पहायला मिळते.म्हनून महाराष्ट्र- कर्नाटक सीमावाद आजतागायत सोडवण्यासाठी अनंत अडचणीचा सामना करावा लागत आहे

वीसवीस वर्ष संयूक्त महाराष्ट्र निर्मितीचे उद्दिष्ट घेवून सातत्याने झटत राहीलेले आणि आपली मते निर्भय व स्पष्टपणे ज्यांनी मांडली ,नेहरु सारख्या आपली पाठराखण करणाऱ्या जेष्ठ नेत्याचा रोष पत्कारत आपल्या कर्मयोगाने कार्यरत असलेले, पूढे संपूर्ण महाराष्ट्रभर कामगार चळवळीसाठी संघटन मजबूत बनवनारे तिसरे नेते स्वामी रामानंदतिर्थ सन १९२६ दरम्यान स्वामीजींनी मूंबईत आणि मराठवाड्यात कामगार संघटणांच्या

 ISSN 2231 4342

माध्यमातून आपल्या कामाला सूरुवात केली . या दरम्यान गिरणी कामगारांचे प्रश्न,वसाहती आदि बाबत संघटांच्या माध्यमातून गिरणी कामगारांचे प्रश्न सरकार दरबारी,गिरणी मालक ,व्यवस्थापकापर्यंत मांडले व कामगारांचे संघटन तयार करुन कामगारांच्या प्रश्नांवर चळवळी सूरु केल्या.या काळात त्यांना ना.म.जोशी यांचाही सहवास आणि मार्गदर्शन लाभले होते.(४) संयूक्त महाराष्ट्र लढ्यात सहभागी असलेले मराठवाड्याचे परभणी येथिल चौथे जेष्ठ सर्वोदयी नेते गंगाप्रसाद अग्रवाल होय .(५) ते असे कार्ययोद्धे होते की, त्यांच्याकडे संयूक्त महाराष्ट्र स्थापन करण्यामागे दूरदृष्टी होती. राज्यकारभाराच्या सोयीसाठी ,भाषावार प्रांतरचना,एकभाषी प्रांत,एकीकरण,मराठी भाषकांची स्वायत्त संकल्पना व सर्वांगीण विकासाची प्रेरणा होती.असेच आ.कृ.वाघमारे,अनंत भालेराव यांनी आपल्या लेखनीतून मराठवाडा सप्ताहीक चालवून नवतरुणांना चळवळीत सहभागासाठी प्रेरणा दिली.(६)

महाराष्ट्र राज्य स्थापण करण्यासाठी मराठी माणसांचा निर्धार ,सलगता,जनतेचा निर्धार आणि चळवळ उभी राहावी म्हणून झटलेले असंख्य मराठी बांधव ,वृत्तपत्र,साप्ताहीके,शाहीर, लोककलावंत, साहीत्यिक, कामगार, स्थानिक, नेते चारवंत,अभ्यासक,राजकीय पूढारी ,पत्रकार,कष्ठकरी,सामाजिक कार्यकर्ते,महीला,यूवक यांच्या शक्तीमूळे महाराष्ट्र राज्य स्थापण होवू शकले.परंतु आजही महाराष्ट्रात निपाणी,बेळगाव,भालकी आदि मराठीभाषिक कर्नाकातून महाराष्ट्रात सामील होण्यासाठी वाट पाहत आहेत. म्हनून दरवार्षी पंचवार्षिक निवडणूकीत हा प्रश्न प्रकर्षाने पूढे येतांना दिसतो.यासाठी प्रबोधनकार ठाकरे यांच्यासारख्या ध्येयनिष्ठा असणाऱ्या विचारांचा बहूअयामी, बहूजनपालक पूरोगामी विचारप्रेणेची,आणि सडेतोडपणे निर्णय घेवून कार्याला लागणाऱ्या कृतिशिलविचाराची अवश्यकता वाटते. ही ठोस निर्णय घेण्याची वेळ आहे.सन २० जानेवारी १९५७ रोजी दादर मूंबई येथे दादरचे हूतात्मा नरेंद्र उर्फ पप्पू प्रधान यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सेनापती बापट यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात आली तेव्हा प्रबोधनकार ठाकरे भाषणाच्या शेवटी म्हणाले की, "रक्ताचा बदला रक्ताने घेण्याचे दिवस आता नाहीत.त्याऐवजी आज तूमच्या हाती मताचे चिरोटे आले आहे". (७)अँटमबाँम्बपेक्षाही प्रखर ताकद आपल्या मतात आहे, खानदानाला जागून,हूतात्म्यांच्या रक्ताची जाणीव ठेवण्यासाठी मतदान केंद्रापर्यंत जायची तसदि घ्या

आणि संयूक्त महाराष्ट्र समितीच्या उमेदवारांच्या पेटीत आपले मत टाका असे ते म्हणतात. लोकशाही मार्गानेच आपल्याला संयूक्त महाराष्ट्र निर्माण करता येईल. म्हनून जास्तीत जास्त मतदारांनी बेळगाव आणि परीसरातिल मराठी भाषक बांधवांच्या सहकार्याने, कायद्याच्या चौकटीत राहून कर्नाटक- महाराष्ट्र सीमा प्रश्न सोडवता येवू शकतो.सीमा भागात आजही निवडणूका आल्यावर हा प्रश्न सतत ऐरणीवर असतो.आणि तसा प्रत्येक पक्षाच्या निवडणूकीतील जाहीरणाम्यातही असतो ,मग का ? हा प्रश्न सूटू शकत नाही .तत्कालीन परीस्थीतीत संयूक्त महाराष्ट्र हा प्रश्न अस्मितेशी निगडीत होता परंतु सद्यःस्थितीला हा प्रश्न अनूरूप नसून किंवा अस्मितेचा उरला नसून तो राजकीय झाला आहे .त्यामूळे या प्रश्नाला राजकीय वळण मिळाले असल्यामूळे दोन्ही

ISSN 2231 4342

सरकारसाठी हा प्रतिष्ठेचा मूद्दा झाला आहे.एकमेकांवर भाषणातून ,सभेतून,वर्तमानपत्रांमधून ,ईलेक्ट्रॅानिक मिडीयामधून चिखलफेक होतांना दिसत आहेत.

अलीकडेच मनसे नेते राज ठाकरे यांच्या मता प्रमाने हा प्रश्न अस्मितेच्या पलीकडे जावून व्यावहारिक पातळीवरील विचाराने सोडवला जावू शकतो तशी तयारी दोन्हि सरकारांनी ठेवायला हवी .मूळात संयूक्त महाराष्ट्र बेळगाव - कारवार - भालकी निपाणीसह झालाच पाहीजे म्हनून आंदोलनकर्त्यांवर १८ जानेवारी १९५६ रोजी गोळीबार होवून त्यात कित्येक सामान्यांना आपल्या प्राणाची आहूती द्यावी लागली होती. तेव्हांपासूनच हा संघर्ष तिव्रतेने पेटलेला आहे.या गोळीबारात ठार झालेल्या कूटूंबियांना आजही दारीद्र्याचे जीवन जगावे लागत आहे. त्यांचे राहणीमान, जीवनमान उंचावणे व मूलभूत प्रश्न सोडवने हा आजच्या परीस्थितीचा मूद्दा आहे .त्या कूटूंबियांना उन्नत करण्यासाठी शासकीय पातळीवर ठोस उपाययोजनांची आवश्यकता आहे. याचा विचार प्रशासकीय पातळीवर होणे अपेक्षित आहे.येथिल संस्कृतीवर मराठीचा पगडा आजही कायम आहे (८) सीमा प्रश्नाबाबत जनमत आणि सांस्कृतिक मूल्य,भाषा,भौगोलिकस्थीती,संस्कृती,चलनवलन याबाबींचा शास्त्रीय आधार घेवून न्यायालयीन प्रक्रीयेद्वारे न्यायालयात दाद मागता येईल .कर्नाटक सरकारातील अधीकारी व कन्नडींगांचा त्रास ,छळ मराठीभाषकांना सहन करावा लागत आहे.सूडाच्या राजकारणाचा व येथिल मराठी संस्कृती नष्ट करणाऱ्याचा त्रास वाढत आहे.याला कायद्याच्याच मार्गाने उत्तर देणे महत्त्वाचे ठरेल.

सं.म.एकीकरण समितीची तेथिल सद्यःकालिन राजकारणाच्या अनूशंगाने ग्रामपंचायतिच्या निवडणूकांतून विजय महत्त्वाचा वाटतो.निकालातून मराठी भाषकांच्या न्याय हक्काचे प्रतिबिंब दिसून येते.निव्वळ आंदोलन करणे,मागण्या मागणे याच्या पलीकडे जावून प्रशासकीय पातळीवर मताचे विभाजन होवू न देता छाप पाडणे गरजेचे आहे. आपल्या ध्येयधोरणात स्थानिक स्वराज्य संस्था व प्रशासकीय मार्गातून दबाव वाढवायला हवा तसे प्रोसडींग शासकीय कागदपत्रांद्वारे सरकारच्या कार्यालयीन व्यवहारात आणता येवू शकतात. भौगोलिक आणि व्यावसायिक दृष्ट्या परीस्थीचाही अभ्यासातून मार्ग शोधता येवू शकतो.२६ नोव्हेंबर १९५८ रोजी प्रा.मधू दंडवते आपल्या भाषणात म्हणाले होते,"आपला लढा शांततेने व लोकशाहीच्या मार्गाने चालला पाहीजे असा आग्रह धरतो " याचे कारण आम्हाला नवा महाराष्ट्र निर्माण करायचा आहे.(९)याच आर्थाने नव महाराष्ट्र घडवण्यासाठी व कर्नाटक- महाराष्ट्र सीमावाद संपवण्यासाठी केंद्र सरकार - दोन्ही राज्य सरकार लोकशाही विचार समन्वयातून प्राधान्य महत्त्वाचे आहे.

निष्कर्ष:

प्रबोधनकार ठाकरे यांच्या विचाराप्रमाणे म्हणजेच रक्ताचा बदला रक्ताने घेण्याचे दिवस आता नाहीत, त्याऐवजी आज तूमच्या हाती मताचे चिरोटे आले आहे. अँटमबाँम्बपेक्षाही प्रखर ताकद मतामधे आहे म्हनून तेथे मतदानाच्या माध्यमातून मराठीभाषकांनी आपण एकसंध आहोत याची शाश्वती करुन देणे गरजेचे वाटते. महाराष्ट्र- कर्नाट सीमावाद सोडवण्यासाठी राजकीय स्थित्यांतरे, इच्छाशक्तीचा अभाव दिसून येतो.नवा महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी केवळ निवडणूंकापूरताच येथिल जनतेचा वापर न होता ठोस प्रशासकीय व न्यायालयीन

ISSN 2231 4342

प्रक्रीयेचा वापरानेच महाराष्ट्र - कर्नाटक सीमावाद संपूष्टात येवू शकतो.तशी ध्येयनिष्ठा व प्रमाणिकपणा राज्यकर्त्यांनी आवश्यकता आहे. महाराष्ट्र -कर्नाटक सीमा वाद सद्य:स्थितीत अस्मितेचा व राजकीय विषय झाल्यामुळे राजकीय प्रतिष्ठतेचा होवून गेला आहे .लढ्यात सामाजिक ,राजकीय ,साहीत्यिक ,शाहीर,महीला,यूवक ,पत्रकार ,आदि नेत्यांसह सामान्यातिल सामान्य लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता.

कायद्याच्या चौकटीत राहूनच सीमावादाचा प्रश्न मार्गी लावला जावू शकतो यासाठी लोकशाही मार्गाने प्रशासकीय पातळीवर ग्रामसभा ,ग्रामपंचयतीच्या ठरावाद्वारे ,स्थानिकांच्या मदतिने प्रश्न सोडवता येवू शकतो केंद्रसरकारच्या इच्छाशक्ती, राजकीय ,भौगोलिकरीत्या,सामाजिक ,सांस्कृतिक आदान - प्रदान व व्यापार दळणवळणाच्या सोयीसवलती याच्या पूरक अभ्यासातून सीमाभागात कार्य उभे राहणे गरजेचे वाटते. संयूक्त महाराष्ट्र चळवळ आंदोलनावेळी गोळीबारात ठार झालेल्या कूटूंबियांना आजही दारीद्र्याचे जीवन जगावे लागत आहे. त्यांचे राहणीमान, जीवनमान उंचावणे व त्यांचे सामाजिक,शैक्षणिक ,सांस्कृतिक याविषयीचे मूलभूत प्रश्न सोडवने हा आजच्या परीस्थितीचा मूद्दा आहे .त्या कूटूंबियांना शासकीय पातळीवर उपाययोजना करता येवू शकतात. सर्वांगीन विकासाला प्रशासकीय पातळीवर हातभार लावता येईल याचा विचार होणे महत्त्वाचे वाटते.

संदर्भः

१) मालशे ,स.ग.शोध निबंधाच्या लेखन पद्धति,लोकवाड्मयगृय,सूधारीत आवृत्ती ,संपादन मालशै मिलींद मुंबई, प्रभादेवी,डीसेंबर २००८ पृष्ठ-१२

२) भालेराव ,निशिकांत ,समग्र अनंत भालेराव (संपा) खंड पहीला,दर्पण प्रतिष्ठाण,नांदेड. २०११,पृष्ठ ४२०

३) गजेंद्रगडकर भारत,श्रमिकांचा नेता भाई उद्धवराव (संपा.),ग्रंथाली,१२ जूलै २०१६ पृष्ठ-१३३

४) प्राचार्य देसाई, जीवन (संपा.),संयूक्त महाराष्ट्राच्या प्रेरणाः यशापयश,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था, औरंगाबाद , २०१२ ,पृष्ठ-मलपृष्ठ

५) उपरोक्त, पृष्ठ ५.

६)भालेराव ,निशिकांत,समग्र अनंत भालेराव (संपा) खंड पहीला,दर्पण प्रतिष्ठाण,नांदेड,२०११, पृष्ठ- ४३२

७) कुदळे ,अजय,संयूक्त महाराष्ट्र आंदोलनातील प्रबोधन,संपादकआचार्य अत्रे यांच्या दैनिक 'मराठा'वृत्तपत्रातिल प्रबोधनकार ठाकरे यांचे १९५६ ते १९६० पर्यंतच्या कालावधीतिल विविध लेख ,भाषणे,पत्रप्रपंच यांचा संग्रह, यूक्ता पब्लीकेशन, ,एलफिन्स्टन रोड ,मूंबई,२०१२ पृष्ठ १८.

८) कूदळे अजय,संयूक्त महाराष्ट्र आंदोलनातिल प्रबोधन,संपादकआचार्य अत्रे यांच्या दैनिक 'मराठा'वृत्तपत्रातिल प्रबोधनकार ठाकरे यांचे १९५६ ते १९६० पर्यंतच्या कालावधीतिल विविध लेख ,भाषणे,पत्रप्रपंच यांचा संग्रह, यूक्ता पब्लीकेशन, ,एलफिन्स्टन रोड ,मूंबई.२०१२,पृष्ठ ६३

९) दै.महाराष्ट्र टाईम्स,दि.१९/०१/२०२१ ,सीमाप्रश्न पून्हा एकदा संपादकीय लेख .पृष्ठ ४

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

गफारखानांचा पख्तुनिस्तानसाठी अखेरचा संघर्ष

प्रा. डॉ. बालाजी शंकरराव चिरडे
पीपल कॉलेज, नांदेड
मेल- balajichirade@gmail.com
मो. नं. 9545093311

खान अब्दूल गफारखान हे भारतात सरहद्द गांधी म्हणून ळखले जातात. त्यांच्या भारतीय स्वातंत्र्यलढ्.च्या योगदानाबद्दल त्यांना भारताने सर्वोच्च नागरी किताब भारतरत्न देऊन त्यांचा १९८७मध्ये गौरव सुद्धा केलेला होता. ते १९३०मध्ये काँग्रेसमध्ये आले व १९४७पर्यंत ते काँग्रेसच्या सोबतच राहिले. ते काँग्रेसच्या बरोबर राहून पाकिस्तानच्या कल्पनेला विरोध करीत होते. या मागणीसाठीच ते मुस्लिम लीगलाही विरोध करीत होते. त्यांच्या या मागणीच्या शेवटच्या टप्पायतील संघर्ष या शोध निबंधामध्ये घेण्यात येणार आहे.

कॅबिनेट मिशन योजनआणि गफारखान

.भारतात सार्वत्रिक निवडणुकीनंतर राजकीय पेच सोडवण्याची प्रक्रिया ब्रिटिशांनी गतिमान केली .भारताचे राजकीय भविष्य निर्धारीत करण्यासाठी ब्रिटिश शासनाने उच्चस्तरीय त्रिमंत्रिमंडळ भारतात पाठवले (भारतमंत्री)त्यात लॉर्ड पॅथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स बो)र्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष .व्ही .व ए (रोजी ते भारतात आले१९४६ मार्च२३ .होते (नौदल प्रमुख)अलेक्झांडर. १ ते १७ एप्रिल या कालावधीत १८२ बैठका घेऊन ४७२ नेत्यांशी चर्चा केलीएप्रिल रोजी २७ लीग व काँग्रेसच्याही प्रमुख नेत्यांशी बोलून .मु . या .उभयसंमत अशी योजना मांडली योजनेला पुढे मु मे१६ शेवटी .लीगने व काँग्रेसनेही काही मागण्या केल्या . रोजी शासकीय प्रस्ताव जाहीर केला यालाच १९४६'कॅबिनेट मिशन योजना' म्हणतात .

ही योजना पुढील प्रमाणे होती : 'स्वतंत्र भारत अखंड राहीलव संस्थाने यांचे मिळून (राज्ये)प्रांत ,ते केंद्र . संघराज्य असेल .व्यवहार व दळणवळण या तीन विषयांचाच अधिकार असेल-परराष्ट्र ,केंद्राकडे फक्त संरक्षण . प्रांतांचे दोन गट असतील .असेल (राज्यांकडे)उर्वरित सर्व विषयांचा अधिकार प्रांतांकडे: एकबहुसंख्याक -हिंदु , ओरिसा ,मद्रास ,मध्य प्रांत ,बॉम्बे ,बिहार) प्रांतांचा अ गट आणि उत्तर प्रदेशमुस्लिम बहुसंख्याक ,व दुसरा (तसेच संस्थानांना केंद्राशी करार करून (बंगाल व आसाम) क (सिंध ,पंजाब ,वायव्य सरहद्द प्रांत) प्रांतांचा ब गट संघराज्यात सामील होता येईल'या कॅबिनेट मिशनमधील गट कल्पना ऐच्छिक नसून ती अनिवार्य (४४१-मोरे) गफार .होतीखानांना आपल्यावर होऊ घातलेल्या कोणत्याही वर्चस्वाला विरोधच करावयाचा होतात्यांना . पंजाबसारख्या मुस्लिमबहुल गटात समावेश होणे म्हणजे त्यासोबत कायम दुय्यम दर्जा मिळेल अशी भिती वाटत .होती

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal **ISSN 2231 4342**

कॅबिनेट मिशन पर्यंत पठाण काँग्रेसबरोबर अखंड भारतासाठी संघर्ष करीत होते. त्यांना अखंड भारतात स्वातंत्र्य मिळेल किंवा पूर्ण स्वायत्तता मिळेल अशी आशा होती पण .'बदलत्या परिस्थितीमुळे ते जास्तीतजास्त स्वायत्ततेची मागणी करू लागले जेणेकरून कोणाच्याही हस्तक्षेपाशिवाय त्यांना प्रशासन करता येईल' -शाह) दुसरी अत्यंत महत्त्वाची व पठाण (७७ाांच्या जिव्हाळ्याची बाब म्हणजे वायव्य प्रांतात पर्वतीय भागाचे एकीकरण करण्याची मागणी वाढायला लागली ,भाषा ,नातेसंबंध ,परंपरा ,रूढी ,दोन्ही भागातील लोकांचा धर्म . तो परत एकत्र करावा .ब्रिटिशांनी आपल्या सोयीसाठी हा प्रशासकीय विभाग बनवला होता .संस्कृती एकच होती अशी मागणी होऊ लागलाअनिवार्य गट निर्मितीला वायव्य सरहद्द प्रांत काँग्रेस कमिटीने एकमताने विरोध . .केला'त्यांना पंजाबी लोकांच्या वर्चस्वाची भिती वाटत होती.' ,पण हेही स्पष्ट केलं की (१९२-.गु..अ) 'हजारो मैल अंतरावर असलेल्या हिंदूबहूल गटात आपण कधीही सामील होणार नाही.' मे१६ गफारखानांना (७७-शाह) ते .ची योजना अमान्य होती१९४६'ब' गटात सामील व्हायला तयार होते पण त्यांना या गटात विशेष दर्जाची व खुदाई खिदमतगारांशी उत्तम वर्तनाची हमी पाहिजे होती गफारखानांना वाटत होते की (७७-शाह).'आम्ही आमचे भविष्य निश्चित करण्यात आनंदी आहोत'होऊ घातलेल्या राजकीय ,आम्हाला एकटे राहू द्यावे (१५२-.गां .रा). त्यांचे वडील भाऊ .घडामोडींमध्ये पठाणांना सन्मानाचे स्थान मिळावे यासाठी गफारखानांची धडपड चालू होती खान साहेब यांनी घोषित केले की .तत्कालीन मुख्यमंत्री डॉ'सरहद्दीच्या जनतेला कोणीही कोणत्याही गटात जाण्यासाठी जबरदस्ती करू शकत नाही'(१९२-.गु .कु .अ .उद्ध).

पंजाबी व पठाण हे मूलतः कसे भिन्न आहेत हे स्वतः जिनांनीच १९३०मध्ये सांगितलेले होतेत्याबद्दलचे . ,अधिक स्पष्टीकरण देताना वायव्य प्रांताच्या विधानसभेचे अध्यक्ष नवाझखान म्हणाले होते "पठाण व पंजाबी हे कोणत्याही व्याख्येने वा कोणत्याही राष्ट्राच्या कसोटीने वेगळे राष्ट्र आहेतकेवळ वायव्य सरहद्द प्रांत पंजाबला . ,भाषेचे ,सभ्यतेचे ,आम्ही स्वतंत्र संस्कृतीचे .जोडण्याची कल्पनाही पठाणांना बंड करायला लावणारी आहे णिनाव आ ,कलेचे व स्थापत्याचे ,साहित्याचे परिभाषामूल्यांची समज व प्रमाण असेलेले लोक , .कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणे पठाण हे पंजाबींपासून निश्चितच भिन्न आहेत...आहोत"-.गां .रा .उद्ध) गफारखान यांना (१५३'त्यांच्या कृतीवर बंधन घालणारी कोणतीही योजना त्यांचा अनादर करणारी होती , जून१६ त्यामुळे तेच्या योजनेचा जबरदस्त विरोध करीत होते.' त्यांच्या मते अशा प्रकारची (१५२-.गां .रा) 'गटनिर्मिती' वायव्य सरहद्द प्रांतासाठी 'अनिवार्य होऊ शकते'यांना -त्यांच्या काही सहका (१५२-.गां .रा) .पंजाबसोबत जावे वाटत होते पण गफारखान त्यांच्या पूर्ण विरोधी होते

वायव्य प्रांताचे मुख्यमंत्री डॉ १ .खानसाहेब हे या कॅबिनेट मिशनला साक्ष देणारी पहिली व्यक्ती होती . रोजी ते मिशनला भेटले१९४६ एप्रिल. त्यांच्या भेटीबद्दल तत्कालीन गव्हर्नर जनरल वेव्हेल यांनी आपल्या रोजनिशीत लिहिलेले आहे की ,"त्यानी निश्चितच पाकिस्तानच्या समस्येबद्दल विचारच केलेला नव्हता आणि त्याच्या शक्यताही ते फेटाळून लावत होतेत्यांचे संपूर्ण .हिंदूंचे केंद्रामधील वर्चस्वही त्यांनी नाकारलेले होते...

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

.जसे पठाण हे स्वतंत्र राष्ट्र आहेत व पठाणिस्तानमध्ये ते राहात आहेत ,बोलणे हे प्रांतिय दृष्टिकोनातून होते" .रा)(१४९-.गां

१६ मे रोजी खान बंधुंनी हे स्पष्ट केले की 'प्रांताच्या गट वा विभाग पद्धतीमुळे ते अजिबात चिंताकुल झालेले नाहीतया कोणत्याही गटात -पठाणांचे पूर्ण स्वातंत्र्य व विकासाला संधी बहाल करण्याची खात्री देणा . सामिल होण्यात त्यांना आक्षेप नाही'शताब्दी) अंक६८-रे-; प्यारेलाल १ ,गफारखान म्हणतात (१६७-"मला कोणत्याही एका गटात ज्यात पंजाबसिंध आणि बलुचिस्तान आहेत त्यात जाण्यात काहीही आक्षेपार्ह नाही पण , त्यांनी हे म्हटलं पाहिजे की: अशा प्रकारच्या भागीदारीमध्ये प्रवेश करण्यापूर्वी आपण सगळे भावाप्रमाणे एकत्र बसण्याबद्दल व एकमेकांच्या मनातील किल्मिषे दूर करण्याबद्दल एकमेकांना आश्वासित केले पाहिजे की असे गट करणे प्रत्येक प्रांताच्या हिताचे आहेधर्माशी .काही लोक याला धार्मिक रंग देत आहेत पण ते बरोबर नाही . याचे काय संबंध आहे? बळाने काहीही होणार नाहीत नआजकाल बापही मुलाला बळजबरी करी .ाही. याशिवाय आणखी एक महत्त्वाचा प्रश्न आहे ज्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे तो म्हणजे हिंदू बहुसंख्याक प्रांतात सामिल होण्याचा-आपल्या शेजा .सिंध व बलुचिस्तानने वेढलेले आहोत ,जेव्हा की आम्ही सर्व बाजुंनी पंजाब , कांयाकडे दुर्लक्ष करणे कसे शक्य आहे जेव्हा ते एकमेना लागून आहेतजर कधी काळी आम्ही गट बनवला तर . कारण सगळे हिंदू बहुसंख्याक प्रांत ,यांचा नसेल-सिंध आणि बलुचिस्तानचाच असेल आणि दुस ,ते फक्त पंजाब शेकडो मैल आमच्यापासून लांब आहे."९-६८-रे-शताब्दी); प्यारेलाल११६७-; प्यारे२ही अतिशय (४२-गफार महत्त्वाची बाब होती कीखान स्पष्ट शब्दात हे सांगत आहेत की जो पक्ष त्यांना त्यांच्या मागण्या पूर्ण करणारा आहे त्यांच्या सोबत ते जायला तयार आहेत .

राजकीय घडामोडी अत्यंत वेगाने घडत होत्यामिशन योजना ही प्रामुख्याने दोन भागात विभागलेली . सदस् पहिली म्हणजे केंद्रीय विधिमंडळातील .होतीयांची घटनासमिती स्थापन करून त्या घटनेद्वारे भारताच्या राजकीय भवितव्याचा निर्णय घेणे व दुसरी म्हणजे तात्काळ अंतरिम सरकार स्थापन करून त्यांच्या हाती भारताचा कारभार सोपवणेकाँग्रेसने दिर्घकालीन घटना निर्मितीची योजना मान्य केली व अंतरिम सरकारची . कयोजना अमान्यरून २६ जुलै रोजी ती मिशनला कळवलीत्यामुळे अंतरिम सरकारची स्थापना करण्याचा . लीगने सुरूवातीला यात पाकिस्तानचा .मु .कार्यक्रम अनिश्चित काळासाठी पुढे ढकलून मिशन परत गेले जी जुलै रो १० पण .समावेश होत असल्यामुळे घटनासमिती व अंतरिम सरकार दोन्हीलाही संमती दर्शवली नेहरूंनी पत्रकार परिषदेत जाहीर केले की काँग्रेस त्याच्या अर्थाने कॅबिनेट मिशन स्विकारत आहे व घटनासमिती सार्वभौम असून ती अंतरिम सरकारबद्दल निर्णय घेऊ शकतेकाँग्रेसच्या या भूमिकेमुळे जिनांनी . कृती रोजी प्रत्यक्ष१९४६ ऑगस्ट१६ मिशन योजनेचा पाठिंबा काढून घेतला व दिन साजरा करण्याची घोषणा केली .या प्रत्यक्ष कृती दिनाचे पडसाद वायव्य प्रांताच्या सुलैमान पर्वतापर्यंत पडलेले होते .

ISSN 2231 4342

अंतरीम सरकार स्थापन झाल्यानंतर...

२ सप्टेंबर १९४६ रोजी पंया .नेहरूंच्या नेतृत्त्वाखाली अंतरिम सरकारची स्थापना करण्यात आली . ने .पं सरकारमध्येहरू यांना व्हाइसरायच्या नंतरचे सगळ्यात महत्त्वाचे असे व्हाइस प्रसिडेंट म्हणजे उपाध्यक्ष असे पद मिळाले ते नंतरच्या पंतप्रधान पदाचे समकक्ष होतेलीगसाठी .या मंत्रिमंडळातही अर्ध्या जागा मु . मुळेलीगची फाळणीची मागणी मान्य झाल्या .पण मु .आरक्षित ठेवलेल्या होत्याव ते मान्य होईपर्यंत कोणत्याही राजकीय तडजोडीस मुलीगचे सदस्य मंत्रिमंडळात येईपर्यंत या जागा काँग्रेसच्या नेत्यांनी .मु .लीग तयार नव्हती . .स्वीकारायच्या व लीगचे सदस्य मंत्रिमंडळात सामील झाले की त्या जागा त्यांना द्यायच्या असे ठरवले गेले होते परिस् कोणत्याहीथितीत मुऑगस्टच्या प्रत्यक्ष कृती १६ .लीग या मंत्रिमंडळात सामिल व्हायला तयार नव्हती . दिनामुळे समग्र देश मु. लीगने पेटवलेला होताजर मुस्लिमांच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर आम्ही काय . कळालेली ह करू शकतो याची रंगीत तालिम या प्रत्यक्ष कृती दिनामुळे लोकांनाोतीसगळा देश जातीय . नेहरूंनी गफारखानांच्या विनंतीवरून वायव्य .अशा अत्यंत पेटलेल्या काळातही पं .दंगलींनी पेटलेला होता सरहद्द प्रांताच्या पर्वतीय भागातील पठाणांची माहिती घेण्यासाठी व तेथील स्थितीचा आढावा घेण्यासाठी निमंत्रित १९४ बरऑक्टो २० ते १६ .केलेले होते६ या काळात स्वतः पंपरराष्ट्र ,नेहरू देशाच्या उपाध्यक्षाच्या नात्याने . हा प्रवास करू नये यासाठी अनेकांनी त्यांना .धोरणाचे प्रभारी म्हणून पर्वतीय प्रदेशाचा दौरा करायला गेलेले होते वास्तव दर या निमित्ताने वायव्य प्रांताचे .सुचवूनही त्यांनी या भागाला भेट दिली्शन त्यांना झालेजागोजागी . खानसाहेब .खुद्द गफारखान सोबत असताना व त्या प्रांताचे मुख्यमंत्री डॉ .त्यांच्या गाड्या आडवण्यात आल्या वास्तविकपणे .मुर्दाबादच्या घोषणेला सामोरे जावे लागले ,सोबत असताना त्यांना लोकांच्या शिव्याशापाला काय चालू पठाणांच्या मनात नेमकेआहे याचे यथार्थ दर्शन पंया सगळ्या गोंधळाच्या मागे तेथील .नेहरूंना झाले . नेहरूंनाही त्यामध्ये तथ्य वाटायला .गव्हर्नर ओलाफ कॅरो आहेत असा आरोप गफारखान उघडपणे करीत होते त्यामुळे .नंतरच्या काळात ज्या पद्धतीने वायव्य प्रांतातील कायदा व सुव्यवस्था बिघडली .लागलेनेहरूंनाही या आरोपाची खात्री पटायला लागली .त्यांनीही कॅरोच्या राजीनाम्याची मागणी लॉर्ड वेव्हेलकडे केली .

मुपण ती .रोजी सरकारमध्ये सामील झालेली होती १९४६ ऑक्टोबर २६ लीग अगदी शेवटी म्हणजे . अडथळे निर सरकारला सहकार्य करण्यासाठी सामील झाली नाही तर सरकारला मधून्माण करण्यासाठी सामील झालेली होतीरोजी घटनासमितीच्याही कामकाजाला सुरूवात झालेली होती १९४६ डिसेंबर ९ .. या घटना परिषदेवरही मुया निर्णयामुळे .लीगने बहिष्कार टाकला व त्यात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला . मंत .झाली काँग्रेसचा संताप अनावर झाला व ती अधिक आक्रमक्रिमंडळात येऊन सहकार्य न करणाया - .लीगच्या मंत्र्यांचा ब्रिटिशांनी राजीनामा घेतला पाहिजे अशी आग्रही मागणी काँग्रेसने करायला सुरूवात केली अशा .भारतातील वातावरण इतके स्फोटक बनलेले होते की ब्रिटिश कोणताही निर्णय घेऊ शकत नव्हते दिनांकाच परिस्थितीत सत्तांतराच्याी घोषणा झाली व भारताच्या स्वातंत्र्याचा तिढा सुटलाआता गफारखानांच्या . .स्वातंत्र्याचाही प्रश्न सुटणार होता

ISSN 2231 4342

क्लेमेंट अटलीची २० फेब्रूची घोषणा व पुढील घडामोडी१९४७ .

भारतातील राजकीय पेच फाळणीचा दिवस ठरल्याशिवाय सूटणारा नव्हताफेब्रु २० .. १९४७ रोजी पंतप्रधान अटली यांनी भारताच्या संबंधात अत्यंत महत्वाची घोषणा केली ,ते म्हणाले .“फार पूर्वीपासून पासून१९१९१))मध्ये शासनाने हे १९४०...ब्रिटिश शासनाचे धोरण भारतात स्वराज्य आणणे हे राहात आले आहे... तत्त्व मान्य केले होते की, भारतीयांनीच१ .तयार करावी स्वतःकरिता नवी राज्यघटना...९४२मध्येघटनासमिती ... गतवर्षी कॅबिनेट मिशन याचयाठी पाठविण्यात आलेले होते ...स्थापन करण्यासाठी त्यांना निमंत्रित केले होते ,की...भारताची भावी राज्यघटना तयार करण्याच्या पद्धतीवर समझोता होण्यासाठी भारतीय नेत्यांना मदत करता यावीरेने सत्तांकी जेणेकरून सुरळीतपणे व त्व ,तर करता येईलकॅबिनेट मिशन ,शासनाची इच्छा आहे की . परंतु .मंडळाकडे सत्तांतर करण्यात यावे-योजनेनुसार सर्व भारतीय पक्षांनी मान्य केलेल्या घटनात्मक अधिकार त स्थिती सध्याची अनिश्चि .मंडळ प्रत्यक्षात येण्याची चिन्हे दिसत नाहीत-दुर्दैवाने अशी घटना व असे अधिकार धोकादायक असून ती अनिश्चित काळापर्यंत राहून देणे शक्य नाही,शासन स्पष्ट करू इच्छिते की ....जून १९४८च्या पूर्वी जबाबदार भारतीय सत्तांकडे)hands) सत्तांतर करण्यासाठी पावले उचलण्याचे त्यांनी निश्चित केले आहेराज्यघटना तय जर या वेळेपर्यंत पूर्ण प्रातिनिधिक घटनासमितीने...ार केली नाहीतर नियत , ते सर्व .दिनांकाला केंद्र शासनाचे अधिकार कोणाकडे हस्तांतरित करावे याचा विचार शासनाला करावा लागेल ...एखाद्या(अंतरिमकिंवा भारतीय जनतेच्या ,किंवा काही भागांत सध्याच्या प्रांतिक सरकारकडे ,केंद्र सरकारकडे (दृष्टितून व अधिकाध अधिकतम हिताच्याि‍क योग्य अशा अन्य पद्धतीने केले जाऊ शकेल.”ही (५३२-मोरे) लीगने निर्माण केलेल्या राजकीय पेचातून बाहेर .या घोषणेमुळे मु .घोषणा काँग्रेससाठी अत्यंत आनंददायी होती शेषराव मोरेंच्या भाषेत सांगायचे झाल्यास .पडण्याचे मार्ग मोकळे झाले होते‘काँग्रेसचे नेते ज्या दिवसाची वाट पाहात होते तो दिवस आता उजाडला होता ब्रिटिशांचा .‘छोडो भारत’चा दिनांक ठरल्यामुळे ‘बाप दाखवा नाही तर श्राद्ध कर’ असे निग्रही भाषेत जिनांना सांगता येणार होतेजातीय ,समान वाट्याचे तत्त्व ,दुर्बल केंद्र सरकार . स्वतंत ,नकाराधिकार्र मतदारसंघदररोज उठून दाढी कुरवाळण्याचे प्राणायाम असल्या अखंड भारतीय , .कुर्निसातांना रामराम ठोकता येणार होते‘हे घ्या छोटे पाकिस्तान नि जा कबरस्तानात’ असे म्हणता येणार होते . .एकसंघ व प्रबल असा सेक्युलर हिंदू पद्धतीचा भारत उभा करता येणार होता’’(५३३-मोरे)

आतापर्यंत गफारखान व त्यांची संघटना ‘खुदाई खिदमतगार’ काँग्रेसच्या सोबत राहून मुलीगच्या . अटलीच्या घोषणेमुळे आता .अखंड भारताचे समर्थन करीत होते .फाळणीच्या प्रस्तावाला विरोध करीत होती फाळणीची व वायव्य सरहद्द प्रांताच्या भविष्याचीही घ ,भारताच्या स्वातंत्र्याचीटिका जवळ आलेली होती . अखेरीस तेथे सार्मत घेण्यात ले व सार्वमतामध्ये पठाणांनी बहुसंखेने पाकिस्तानच्या बाजूनेच मतदान केलेले होते. १४ ऑगस्ट १९४७ रोजी जगाच्या नकाशावर पाकिस्तान नावाचे नवे राष्ट्र निर्माण झाले. त्यानंतर गफारखानांनी १९८८पर्यंत अविरतपणे प्रयत्न केले. पण पाकिस्तानच्या सरकारने त्यांना १९४८पासून १९६४पर्यंत जवळपास १५ वर्षे तुरूंगात ठेवले. त्यांचे स्वप्न शेवटी अपूर्णच राहिले.

ISSN 2231 4342

संदर्भग्रंथ

१. कॉंग्रेसने आणि गांधीजींनी अखंड भारत का नाकारला? शेषराव मोरे, राजहंस प्रकाशन, पुणे (२०१२)

२. North Western Frontier Province: History and Politics, Sayed Wiqar Ali Shah, Qaid -I Azam University, Islamabad (2007)

३. Ghaffar Khan Non Violent Badshah of Pakhtuns, Rajmohan Gandhi, Penguin, New Delhi (2004)

४. A Pilgrimage for Peace, Pyarelal, Navjivan Publishing House, Ahmedabad (1950) (प्यारेलाल-१)

५. Thrown to the Wolves Abdul Gaffar, Pyarelal, Eastlight Book House,m Calcutta (1966)

६. North West Frontier Province Legislature and Freedom Struggle (1932-47, Anil Kumar Gupta, ICHR, New Delhi (1976)

७. Khan Abdul Gaffar Khan A Centennial Tribute, Har-Anand Publications, New Delhi (1995)

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

राष्ट्रीय ई परिषद

दिनांक २७ व २८ फेब्रुवारी २०२१

"छोडो भारत चळवळीत साप्ताहिक तरुण भारत(बेळगाव) या मराठी वर्तमानपत्रांचेयोगदान – एकअभ्यास"

संशोधक
माणिक पोपट पाटील
श्री शेठ मु. मा. महाविद्यालय पाचोरा
जि. जळगाव.
मो. ९९६०९५१६९७
Email- manikpatil2011@gmail.com

मार्गदर्शक
प्रा. डॉ. प्रशांत सुधाकरराव देशमुख
अर भा गरुड महाविद्यालय शेंदुर्णी
ता. जामनेर,जि.जळगाव.

प्रस्तावना-

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वाचे आंदोलन म्हणजे 'छोडो भारत' चळवळ होय.१८५७ च्या उठ्वानंतरचा एक प्रखर लढा म्हणून या आंदोलनास पहिले जाते.१९४२ चा छोडो भारतचा लढा एक आगळाच लढा होता.त्याची तीव्रता आणि त्याची व्याप्ती पाहता आझाद हिंद सेनेने दिलेला लढा वगळता भारतीय स्वातंत्र्यासाठी दिलेला तो शेवटचाच एक निर्णायक लढा होता.[१] यालढ्यास अनेक लेखकांनी, संशोधकांनी ववृत्तपत्रांनी अनेक नावे दिली. 'छोडो भारत', 'चलेजाव','ऑगष्ट क्रांती', 'ऑगष्ट १९४२ चा लढा','ब्रिटीशानो चालते व्हा', 'Quit india' अशा अनेक नावानी या चळवळीला ओखले जाते.[२] ब्रिटीशानपासून भारताच्या विमोचनासाठी निर्णायकलढा सुरु करण्याचा निर्णय काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीत महात्मा गांधींनी १४ जुलै १९४२ रोजी सेवाग्राम आश्रम वर्धा येथे 'छोडो भारत'चळवळीचा ठराव संमत केला.[३]

वर्धा येथे संमत झालेला ठराव मुंबई येथे अखिल भारतीय कॉंग्रेस वर्कीग कमिटीच्या ७ व ८ ऑगष्ट १९४२ रोजी सर्वानुमते पास करण्यात आला. या वेळी म.गांधीनी 'करेंगे या मरेंगे' हा संदेश हि देशाला दिला.हा ठराव पास झाल्यानंतर महात्मा गांधी भारतीय स्वातंत्र्याची मागणी व्हाईसराय ने मान्य करताच चळवळ न उभारत ब्रिटीशाना दुसऱ्या महायुद्धात सहकार्य करायचे अन्यथा स्वातंत्र्याची चळवळ प्रखरपणे उभारायची असे सर्वानुमते ठरले परंतु त्याअगोदरच ९ ऑगष्ट च्या पहाटेच बिर्ला भवन मध्ये महात्मा गांधी व इतर ठिकाणाहून पं. जवाहरलाल

नेहरू, मौलाना आझाद सरदार वल्लभभाई पटेलयांच्यासह कॉंग्रेस च्या सर्व प्रमुख पुढार्यांना अटक करुन पोलिसांनी त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी तुरुंगात डांबले आणि येथूनच खऱ्या अर्थाने छोडो भारत चळवळीला प्रारंभ झाला.[४] कॉंग्रेसच्या सर्व प्रमुख पुढाऱ्याना अटक होताच व पोलिसांची सर्वत्र धरपकड सत्र सुरु होताच आता हि चळवळ बारगळणार असेच चित्र सर्वत्र दिसत असताना याचळवळीस जनसामान्यापर्यंत पोहचविण्याचे काम मराठी वर्तमानपत्रांनी केले.महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील मराठी वर्तमानपत्रे दैनंदिन घडामोडीचा आढावा घेत व खेड्यापाड्यापर्यंत वर्तमानपत्रातून त्याचा प्रचार आणि प्रसार करत यात महाराष्ट्राबाहेरील 'साप्ताहिक तरुण भारत (बेळगाव)हे मराठी वर्तमानपत्र अग्रेसर होते.

म.गांधींच्या 'यंग इंडिया' या नियतलीकापासून प्रेरणा घेऊन बाबुराव ठाकूर यांनी इ.स१९१९मध्ये काही तरुण मित्रांच्या सहकार्याने 'तरुण भारत' या वर्तमानपत्रांची सुरुवात केली. [५] 'तरुण भारत' साप्ताहिक रुपात १ ऑगष्ट १९२८ पासून सुरु झाला. मराठी भाषिकांचे प्रचार व विचारांचे पत्रक म्हणून या वर्तमानपत्राने काम केले.तरुण भारतचेमुद्रक व प्रकाशक चारुदत्त रामचंद्र देसाई हे होते.[६] लोकशिक्षण आणि स्वातंत्र हे पूर्वी महत्वाचे घटक होते.म्हणून हि स्वातंत्र्याची उपासना आहे.जनजागृती करण्यासाठी जनतेचे जनमत तयार करण्यासाठी वर्तमानपत्रांची गरज असते हे बाबुराव ठाकूर यांनी जाणले होते.[७]

तरुण भारत वर्तमानपत्राचे इ.स.१९३८ ला संपादक म्हणून बा. द.सुंठणकर होते. तर इ.स. १९४३ ला अच्युत सदाशिव देशपांडे हे संपादक होते.बाबुराव ठाकूर यांचा पींड कार्यकर्त्याचा होता. म.गांधींच्या चळवळीत ते स्वतःसहभागी होते.[८] जनतेच्या न्याय व हक्कासाठी तरुण भारत(बेळगाव) ने वेळोवेळी आवाज उठविला.१९४२च्या काळात वर्तमानपत्रांच्या प्रकाशनांवर ब्रिटीश सरकारने निर्बंध घातलेले असताना देखील तरुण भारत (बेळगाव) ने आपले लोकसेवेचे कार्य सुरूच ठेवले. ब्रिटीशांच्या अन्यायाला न जुमानता 'छोडो भारत' चळवळीचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम या वर्तमानपत्राने केले.बाबुराव ठाकूर हे म. गांधीजींच्याचळवळीत सतत सहभागी असल्याने त्यांच्या तुरुंगातील वाऱ्या सतत सुरु असे.[९]

छोडो भारत चळवळ आणि साप्ता. तरुण भारत (बेळगाव) —

दुसऱ्या जागतिक महायुद्धात भारताने सहकार्य करावे यासाठी ब्रिटीश शासन प्रयत्नशील होते. परंतु साप्ता तरुण भारत 'स्वातंत्र्या शिवायसहकार्य नाही' या मथळ्याखाली अग्रलेख लिहून हिंदुस्थान वासियांचा दुसऱ्या जागतिक महायुद्धाला विरोध असल्याचे नमूद केले.[१०] ऑगष्ट १९४२ च्या मुंबई येथे भरलेल्या अ.भा.कॉं.व.कमिटीच्या अधिवेशनात पं.जवाहरलाल नेहरू यांनी १४ जुलै च्या वर्धा ठरावास मान्यता देणारा ठराव मांडला त्यास मंजुरी देण्यात आली या सर्व अधिवेशनाचे वृत्त साप्ता.तरुण भारतने प्रकाशित करून 'हिंदुस्थान या पुढे कोणाचे गुलाम राष्ट्र राहणार नाही स्वराज्य द्या आणि तुम्ही जा'यामथळ्याखाली अग्रलेख लिहून आपली भूमिका मांडली. ब्रिटीश सत्ता भारतातून काढून घेताच सर्वाचे हित साधले जाईल असेही साप्ता.तरुण भारत लिहितो.[११]

ISSN 2231 4342

९ ऑगष्ट १९४२ च्या पहाटे बिर्ला भवनातून म. गांधीसह सहकाऱ्याना अटक झाली याचे कारण काँग्रेसने सत्ता त्यागाचा ठराव संमत करताच हि चळवळ देशव्यापी बनणार याची खात्री सरकारला पटताच सरकारकडून दडपशाहीला सुरुवात झाली. म.गांधी, सरदार पटेल, पं.जवाहरलाल नेहरू,मौलाना आझाद, मुरारजी देसाई मुंबईचे महापौर मेयर मेहेरअली, महादेव देसाई, सौ सरोजिनी नायडू, मीराबेन, बाळासाहेब खेर, एस के पाटील, आदि ५४ पुढार्यांना अटक करण्यात आली. तेव्हा देशात सर्वत्र अराजकतेचे वातावरण निर्माण झाले. दंगेधोपे होण्यास सुरुवात झाली. लोकांनी ट्रम्स गाड्या आडवून त्यावर दगडफेक करून जाळपोळ करण्यास सुरुवात केली. पोलीस आणि आंदोलक यांच्यात झाटापटी सुरु झाल्यात, शाळा कॉलेजात हरताळ सुरु झाले,विद्यार्थ्यांनी पिकेटिंग सुरु केले, पोलिसांनी लाठीचार गोळीबार सुरु केले. पोलिसांच्या त्रासाला उत्तर म्हणून आंदोलकांनी सरकारी मालमत्तेचे नुकसान करण्यास सुरुवात केली. अशावेळी साप्ता तरुण भारत(बेळगाव) अग्रलेख लिहितो 'सरकारची दडपशाही सुरु झाली' यातून सरकारने चालविलेल्या हिंसक कृत्यामुळे जनतेने टोकाचे पावूल उचलावयास सुरुवात केली.जनतेला 'अहिंसाव्रतापासून ढळू नका' हा संदेशही साप्ता तरुण भारत देतो. कारण म.गांधी यांनी हि चळवळ अहिंसेच्या मार्गाने चालवली जाईल असे सूचित केले होते. म्हणून अहिंसेची आर्त हाक साप्ता तरुण भारत ने दिली.[१२]

ऑ.इ.कॉ.कमिटीने समंत केलेला ठराव त्याचा सारांश काय आहे हे साप्ता तरुण भारत ने जनतेसमोर आणले पारतंत्र्यामुळे भारत स्वतःचे संरक्षण करण्यास असमर्थ बनत चालला आहे, सामर्थ्य असणे म्हणजे साम्राज्यात भर घालणे आणि ब्रिटीश साम्राज्य आता भारतीयांना नको आहे. भारताला स्वातंत्र्य दिल्यास आशियातील व आफ्रिकेतील जनतेत नवी आशा व उत्साह निर्माण होईल,अशी अनेक कारणे साप्ता तरुण भारत (बेळगाव) नमूद करतो. यासाठी ब्रिटीशानी हिंदुस्थानातील सत्ता सोडून द्यावी आश्वासने देऊन चालू परिस्थिती सुधारता येणार नाही. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य जाहीर झाल्याबरोबर हिंदुस्थानातील सर्व राजकीय पक्ष 'हंगामी सरकार' स्थापन करून परचक्राचे संकट निवारण्यासाठी स्वतंत्र हिंदुस्थान सक्षम असेल या पद्धतीने ऑगष्ट ठरावाचा सरकारने लावलेल्या चुकीच्या अर्थाला साप्ता तरुण भारत उत्तर देतो.[१३] छोडो भारत चळवळीची व्यापकता नोंदविताना ठिकठिकाणी होणारे सत्याग्रह, निरोधाने, हरताळ यांची नोंद घेताना साप्ता तरुण भारत निपाणी व बैलहोंगल येथील, बेळगाव पुणे, मुंबई, सातारा, कोल्हापूर, सांगली अशा ठिकाणच्या विविध ठिकाणी घडलेल्या घटनाची नोंद घेतो. यात निपाणी व बैलहोंगल येथील झालेल्या गोळीबाराची दखल साप्ता तरुण भारत ने घेतली याबरोबरच दिल्ली कराची, वर्धा, नागपूर, हुबळी, बंगलोर, मद्रास,येथील घडलेल्या घटनांची देखील नोंद साप्ता तरुण भारत घेतो. व यातून चळवळीची व्यापकता लोकांपर्यंत पोहचवून लोकजागृतीचे काम केले.[१४]

छोडो भारत चळवळीच्या काळात हिंदुस्थानातील जनतेचा चळवळीला जसा पाठींबा होता तसाच काही लोकांनी ब्रिटीश शासनाच्या धोरणाला देखील पाठींबा दिला त्यात सर सी.पी.रामास्वामी अय्यर सारखे नेते या चळवळीच्या विरोधी भूमिकेत होते तेव्हा 'राष्ट्र विरोधी कारवाया सोडून द्या' असा अग्रलेख लिहून त्यांच्या

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

धोरणाचा खरपूस समाचार साप्ता तरुण भारत घेतो.[१५]'सरकारने चालविलेल्या दडपशाहीच्या धोरणावर टीका करत सरकारने आपले धोरण सोडून द्यावे लाठीचार, गोळीबार, तुरुंगात डांबने झडती घेणे, हे धोरण सरकारने सोडून द्यावे यावर साप्ता.तरुण भारत लिहितो की, 'दडपशाहीने भागणार नाही लवकर समेट करा' असेही साप्ता तरुण भारत सुचवितो यावर असेही सुचविण्यात आले की, हिंदुस्थानभर इतकी व्यापक प्रमाणात चळवळ उभी राहील असे सरकारला कदाचित वाटले नसावे. परंतु 'हिंदुस्थानचे वातावरणच असे आहे की, निरभ्र आकाशात तळहाता एव्हढा ढग दिसावा परंतु अत्यंत कमी काळात मोठा होऊन जशी प्रजन्यवृष्टी करतो' तसेच या चळवळीचे आहे. यासाठी सरकारणे आपले धोरण सोडून द्यावे व लवकर समेट करावा. हि चळवळ दडपशाहीने दाबली जाणार नाही. असेही साप्ता तरुण भारत नमूद करतो.[१६] सरकारने चळवळीतील लोकांबद्दल खोटी सहनुभूती दाखविण्याचा प्रयत्न केला असता यावर 'न्यायचे ढोंग नको' असा खरमरीत अग्रलेख तरुण भारत लिहितो व सरकारी धोरणावर कडक टीका करतो.[१७]

कॉंग्रेसच्या सर्व पुढाऱ्याना वेगवेगळ्या ठिकाणी तुरुंगात सरकारने डांबून ठेवले अशावेळी चळवळीला योग्य मार्गदर्शन करणारे कुणी नसल्याने जनतेने आपल्या परीने ही चळवळ चालविण्याचा प्रयत्न केला. निदर्शने, सभा मिरवणुकाना बंदी घालण्यात आली. हिंदुस्तानभर अनेक ठिकाणी शाळा महाविद्यालायातील मुला मुलीना अटक करण्यात आली. अनेक ठिकाणी गावठी बॉम्बचा स्फोट झाला. दिवसेंदिवस देशातील वातावरण खराब होत चालले आहे. देशात कुणाला स्वातंत्र्य नको आहे असा एकही व्यक्ती शोधून सापडणार नाही. हिंदुस्थानी जनता स्वतांत्र्य मिळविण्यासाठी आतुर झाली आहे. या सर्व बिघडलेल्या परिस्थितीला सरकार जबाबदार आहे.देशात शांतता नांदावी असे सरकारला वाटत असेल तर देशाच्या सत्तेची सूत्रे स्थानिक पुढाऱ्याच्या हाती द्यावी यावर 'सरकारला सत्य पटणार कधी' असा अग्रलेख लिहून सरकारचे लक्ष वेधून घेण्याचे काम साप्ता तरुण भारत (बेळगाव) ने केले.[१८] देशातील परिस्थितीचे वर्णन या मराठी वर्तमानपात्रांने केले 'देशातील पेचप्रसंग सोडविण्याची सरकारची इच्छ्याच नाही' याअग्रलेखातून सरकारच्या धोरणावर प्रहार केला.[१९] 'चालूपेचप्रसंग केव्हा व कसा काय सुटेल' असेही अग्रलेख या वर्तमानपत्राने लिहिले.[२०] देशातील चालू पेचप्रसंग सुटावा यासाठी म.गांधीनी पुणे येथे येरवडा तुरुंगात २३ दिवसाचे प्राणांतिक उपोषण केले. या काळातील म.गांधीचे विचार लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम साप्ता तरुण भारत ने केले. उपोषण संपल्यावर पुन्हा 'उपोषण संपले आता पुढे काय' असा प्रश्नही साप्ता.तरुण भारत विचारतो.[२१] काँग्रेसच्यापुढाऱ्याच्या अटकेपासून ते सुटके पर्यंत त्यांच्यावर झालेले अन्याय,अत्याचाराची दखल साप्ता तरुण भारत ने घेतली. वेळोवेळी 'काँग्रेसच्या पुढाऱ्याची मुक्तता करा' असेही अग्रलेख लिहिले. सरकारने हिंदुस्थानला स्वातंत्र्य जाहीर करावे यासठी साप्ता तरुण भारत चे प्रयत्न रहेले.[२२] इतकेच नव्हे तर लोकजागृती करत असताना देशातील अंतर्गत वातावरण राजकीय पुढाऱ्यामधील वाढतेमतभेद थांबावे यासाठी 'हिंदुस्थानचे भवितव्य उज्वल होण्यासाठी ऐक्याची जरुरी आहे' असे अग्रलेख लिहून देशातील राजकीय मतभेद व हेवेदावे बाजूला ठेऊन सर्वांनी एकमताने राष्ट्रहित साधावे यासठी तरुण भारत ने प्रयत्न केले.[२३] महाराष्ट्रातील व भारतातील संपूर्ण चळवळीचे दैनंदिन वृतांत देऊन छोडो भारत चळवळीच्या सुरुवातीपासून ते शेवट पर्यंत देशातील घटनाची नोंद घेऊन आपल्या अग्रलेखातून चळवळीची

ISSN 2231 4342

माहिती देशातील सामान्य माणसापर्यंत पोहचविण्याचे काम साप्ता तरुण भारत ने केले. अग्रलेख, ठळक मथळे व कणखर बातम्या व देशाभिमान यामुळे बऱ्याचदा दंडात्मक कारवाई सुद्धा या वृत्तपत्रावर झाली.

निष्कर्ष:

छोडो भारत चळवळीच्या काळात काँग्रेसचे सर्व पुढारी तुरुंगात असताना या चळवळीचीप्रखरता कमी न होऊ देता सर्व सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे काम वर्तमानपात्रांनी केले आणि त्यातही खास म्हणजे साप्ता तरुण भारत (बेळगाव) सारख्या मराठी वर्तमानपत्रांनी केले. स्वतः साप्ता तरुण भारत (बेळगाव) चे संपादक बाबुराव ठाकूर हे म. गांधीच्या विचारांनी प्रेरित झालेले असून छोडो भारत चळवळीची तिव्रत कमी न होऊ देता चळवळ सर्व सामन्यापर्यंत पोहचविण्याचे काम त्यांनी केले.बऱ्याचदा तुरुंगवास हि सोसावा लागला. सरकारी निर्बंधाना न जुमानता दंड भरूनही जमीन मिळवून आपली पत्रकारीता सुरू ठेवली साप्ता तरुण भारत ने आपले लोक जागृतीचे काम थांबविले नाही.

संदर्भ सूची :

१जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री : मराठी विश्वकोश खंड ६,म.रा.स.सं.मं.मुंबई,पृ८७.

२.साप्ता.नवयुग (मुंबई) : दि.१८ ऑक्टोबर १९४२,पृ.४.

३.चौधरी,डॉ की. का : महाराष्ट्र राज्य गँझेटियर, जळगाव जिल्हा, मुंबई दर्शनिका विभाग,सांस्कृतिक कार्य विभाग म.शा.मुंबई तृतीय आवृत्ती १९९४, पृ.१४०.

४.मा.सत्याग्रही विचारधारा :दि.जानेवारी २०११, पृ.२३.

५. तरुण भारत (बेळगाव) : दि. ११.जानेवारी २०१०,पृ १३.

६.देशमुख,डॉ.प्रशांत. : हैद्राबाद मुक्ती संग्रामातील मराठी वर्तमानपत्रांची भूमिका, स्वा.रा. तीर्थ म.वि. नांदेड,पीएच डी. अप्रकाशित शोध प्रबंध नोव्हेंबर२००९, पृ ६५.

७.प्रभू,आरती. : समरांगण हे जीवन ज्यांचे,तरुण भारत प्रेस,बेळगाव प्रथमावृत्ती १९७५ ,पृ.०२.

८. देशमुख,डॉ प्रशांत. : उपरोक्त

९. लेले,रा.के. : मराठी वृत्तपत्रांचाइतिहास कॉनटीनेनटल प्रकाशन, पुणे३०,पृ.८०७.

१०. साप्ता.तरुण भारत (बेळगाव) : दि.६ जानेवारी.१९४२,पृ.०२.

११.साप्ता.तरुण भारत (बेळगाव) : दि. ११ ऑगष्ट १९४२,पृ.०२.

१२. कित्ता : पृ.०४.

१३. कित्ता : पृ.०९.

१४. साप्ता.तरुण भारत (बेळगाव) : दि. २५ ऑगष्ट १९४२,पृ.०२.

१५. कित्त :

१६. साप्ता.तरुण भारत(बेळगाव) : दि.०१.सप्टेबर.१९४२, पृ.०४.

१७. साप्ता.तरुण भारत (बेळगाव) : दि. २२.सप्टेबर.१९४२,पृ.०४.

१८. साप्ता.तरुण भारत (बेळगाव) : दि.०६.ऑक्टोबर १९४२,पृ.०४.

१९. साप्ता,तरुण भारत(बेळगाव) : दि.१३ ऑक्टोबर १९४२,पृ.०५.

२०. साप्ता.तरुण भारत (बेळगाव) : दि. २३ मार्च १९४३,पृ.०४.

२१.साप्ता.तरुण भारत (बेळगाव) : दि.०९मार्च.१९४३,पृ.०४.

२२. साप्ता.तरुण भारत (बेळगाव) : दि. १८ जानेवारी १९४४,पृ.०२.

२३. साप्ता तरुण भारत (बेळगाव) : दि. १३ एप्रिल १९४४,पृ.०२.

मराठा इतिहास लेखन परंपरेची वाटचाल

प्रा. नाजीर पठाण
पदव्युत्तर इतिहास विभाग ,
एस पी डी एम आर्ट्स,
एस बी बी &एस एच डी कॉमर्स,
एस एम ए सायन्स कॉलेज, शिरपूर,
ईमेल–nsf.his@gmail.com
मोबाइल - 9423772866

आपल्याला मराठा इतिहास लेखन परंपरेचा अभ्यास करीत असताना आणि त्यातील वैचारिक संघर्ष पाहतांना सर्वात आधी मराठा इतिहास लेखन परंपरेचे आजपर्यंतची वाटचाल पाहणे आवश्यक ठरते. शास्त्रशुद्ध इतिहास लेखन करण्याची परंपरा महाराष्ट्रात गेल्या शंभर-दोनशे वर्षा पासूनची आहे. इंग्रजी राजवटीत खऱ्या अर्थाने इतिहास लेखनाची प्रक्रिया महाराष्ट्रात सुरु झाली. मात्र असे असले तरी याआधी काही परकीय इतिहासकारांनी मराठ्यांचे इतिहास लेखन केले होते. यात पोर्तुगीज , डच, फ्रेंच आणि इंग्रज यांचा समावेश होतो. त्यातील काही इतिहासकार मराठ्यांचा कालखंडाचे प्रत्यक्ष साक्षीदार होते. अनेक युरोपीय प्रवाशांनी भारताला आणि महाराष्ट्राला भेट देत असताना आपल्या प्रवासाचे वर्णन लिहून ठेवले होते. या प्रवासवर्णनांमधून मराठ्यांचा इतिहास काय आहे, याची ओळख युरोपियनांना या आधीच आलेली होती.या परकीय पवाश्यांमध्ये जॉन थेवेनो, बॅर्थलेमयू करे, डॉ. जॉन फ्रायर , फ्रांसिस बर्णीयर, ट्रवेर्णीयर, निकोलाय मनूची, फ्रान्सिस मार्टिन यांचा समावेश होतो. मराठ्यांच्या इतिहासात शिवाजी महाराजांचा उदय ही घटना अतिशय महत्त्वपूर्ण मानली जाते. शिवाजी महाराजांनी स्वपराक्रमाने हिंदवी स्वराज्य स्थापन केले. शिवाजी महाराजांची धोरणे व पराक्रम पाहून संपूर्ण महाराष्ट्र अचंबित झालेला होता. शिवाजी महाराजांच्या नंतर छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम, ताराबाई यांनी मोगलांशी लढा देऊ मोगल सत्तेला जेरीस आणले होते. इसवीसन १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाल्यानंतर परत एकदा मराठी सत्तेचे महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्व अधोरेखित झाले. यामुळे मराठ्यांचा इतिहास भारतीय इतिहासाच्या आणि महाराष्ट्रीयनांच्या दृष्टीने मौलिक आहे. त्यामुळे त्याचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. या प्रकरणात मराठा इतिहास लेखनातील विविध प्रवाहांचा थोडक्यात आढावा घेण्यात आलेला आहे.

अ) सतराव्या शतकातील मराठा इतिहास लेखन :

पूर्वापार भारतीय आणि युरोपीय इतिहासकारांना मराठ्यांच्या इतिहासाचे आकर्षण होते. जवळपास एक शतकाहून अधिक काळापर्यंत मराठ्यांनी भारतीय जनमानसात राज्य केले. इंग्रजांना मराठ्यांचा पाडावकेल्यानंतरच त्यानं येथे निर्विवादपणे सत्ता स्थापन करता आली. मराठ्यांचे राज्य असतानाच मराठ्यांच्या

ISSN 2231 4342

इतिहासाची ओळख जगाला करून देण्यात येत होती.[१] सतराव्या शतकात पुढील इतिहासकारांनी मराठ्यांच्या इतिहासावर लिखाण केले आहे.

१कॉस्मो-द-ग्वार्द

भारतात पोर्तुगीज व्यापारी पंधराव्या शतकापासून येत होते. शिवकाळात पोर्तुगीज पश्चिम किनाऱ्यावर स्थायिक झाले होते. या पोर्तुगीजांमध्येच एक वृत्तांत लेखक होता. त्यांचे नाव कॉस्मो-द-ग्वार्द होय. त्याने युरोपातील लोकांसाठी शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिले. 'Vida de Celebre Sevagy' अर्थात ' Life of the Celebrated Shivaji' हा कॉस्मो-द-ग्वार्द लिखित ग्रंथ होय. त्याचे प्रकाशन सन १७३० मध्ये झाले.[२]मराठ्यांची गुप्तहेर व्यवस्था, मराठा आणि मुस्लिम सैन्याची तुलना, किल्ले रायगडाचे वर्णन, मुस्लिम सैन्याचे दैनिक जीवन याविषयी कॉस्मो-द-ग्वार्द अतिशय मौलिक माहिती देतो. शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिणारा पहिला इतिहासकार म्हणून कॉस्मो-द-ग्वार्द ओळखला जातो.त्याच्या लिखाणाला एक वेगळे मूल्य आहे.

२ कॅप्टन जेम्स कॅरे

कॅप्टन जेम्स कॅरे याने सर्वप्रथम इंग्रजीमध्ये मराठ्यांचा इतिहास लिहून काढला.३ कॅप्टन जेम्स कॅरे यांच्या पदरी असलेल्या एका मुंशीने फारसी ग्रंथ अनुवादीत केला होता. कॅप्टन जेम्स कॅरे याने त्या ग्रंथाचे रूपांतर इंग्रजी मध्ये केले.[३] त्याचे लिखाण अधिकृत आणि शास्त्रीय आधारावर लिहलेले दिसत नाही. त्यामुळे यात अनेक त्रुटी दिसतात.

३ रॉबर्ट ऑर्म

रॉबर्ट ऑर्म याने '*Historical Fragments of the Mogul Empire, of the Morattoes, and of the English Concerns in Indostan from the year 1659*' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्याने शिवकाळाची माहिती दिली आहे. शिवाजी महाराजांनी १६७४ मध्ये राज्याभिषेक केला होता, त्याची काय कारणे होती याविषयी ऑर्म त्याच्या ग्रंथात माहिती देतो.[४]

४ मारथिअस ख्रिश्चन स्प्रेनगेल –

मारथिअस ख्रिश्चन स्प्रेनगेल हा जर्मनीमधील एका विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम करीत होता. त्याने भारताला भेट न देता मराठ्यांचा इतिहास लिहून काढला. त्याचा ग्रंथ आपल्याला सन १७८२ पर्यंतची हकीकत सांगतो. या ग्रंथाच्या लिखाणासाठी त्याने इंग्रजी, फ्रेंच, डच, इटालीयन, जर्मन व लॅटिन भाषेतील ग्रंथांचा वापर केला.[५]

ISSN 2231 4342

५ एडवर्ड स्कॉट वेअरिंग

एडवर्ड स्कॉट वेअरिंग हा ईस्ट इंडिया कंपनीच्या पदरी पुना रेसिडेन्सी मध्ये काम करत होता. त्याच्या मते मराठ्यांचा इतिहास लिहिणे अतिशय आव्हानात्मक काम होते.[६] एडवर्ड स्कॉट वेअरिंगला फारसी साधने मान्य नव्हती. त्यावर विश्वास ठेवायला तो तयार नव्हता. मराठी मांसाविषयी त्याने गौरवोद्‌गार काढलेले आहे. त्याने त्याच्या ग्रंथात शिवाजी महाराजांच्या जीवनातील प्रारंभिक घटनांची माहिती दिली आहे.

ब) अठराव्या शतकातील मराठा इतिहास लेखन

अठराव्या शतकात महाराष्ट्रात इंग्रजी सत्ता रूढ झालेली होती. या काळात आपल्या सोईचा इतिहास ब्रिटिशांनी लिहिला. हा इतिहास त्यांच्या साम्राज्याला बळकटी देणारा असेल यावर त्यांचा कटाक्ष होता. या काळातील इतिहासकार पुढील प्रमाणे होय.

१ जेम्स मिल

भारतीय इतिहासात हिंदू, मुस्लिम आणि ब्रिटिश कालखंड अशी विभागणी करणारा हा पहिला वासाहातिक इतिहासकार होता. त्याला भारतीय संस्कृतीच्या अभ्यासाची आवड होती.[७] त्याने दुय्यम साधनांवर आधारित मराठ्यांचा इतिहास लिहून काढला. त्याच्या लिखाणात भोसले कुळाची माहिती, शिवाजी महाराजांचे कार्य, मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध, पेशवाईची अखेर यांची आपल्या लिखाणात माहिती दिली आहे.[८]

२ माउंट स्टूअर्ट एल्फिन्स्टन

माउंटस्टूअर्ट एल्फिन्स्टन आणे स्वत: मराठ्यांचा इतिहास लिहिला नाही. मात्र त्याने इतरांना मराठा इतिहास लेखनासाठी मोठ्या प्रमाणावर मदत केली. त्यांचे हे योगदान नजरे आड करता येत नाही. माउंटस्टूअर्ट एल्फिन्स्टन हा इंग्रजांच्या पदरी पुणे येथील पेशवे दरबारात सेवेत ऋजु झाला. त्याच्या विषयी जेम्स ग्रँट म्हणतो की माउंटस्टूअर्ट एल्फिन्स्टन याने मराठ्यांचा इतिहास लिहिण्याचा मनोदय व्यक्त केला होता, मात्र प्रशासकीय कार्यामुळे त्यासाठी त्याला पुरेसा वेळ देता आला नाही.[९] असे असले तरी त्याच्या कार्याचे महत्व निर्विवाद आहे. त्याच्या कार्यामुळे पुढे अनेकांना मराठा इतिहास लेखनासाठी साधने उपलब्ध झाली. त्यायोगे मराठा इतिहास लिखाण अधिक समृद्ध झाले. मराठ्यांची विविध साधने उजेडात आली.

३ जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ

जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफयाने सन १८२६ साली ‘The Rise and Fall of the Maratha Rule’ हा ग्रंथ प्रकाशित केला. महाराष्ट्रात विविध शाळा आणि महाविद्यालयात सन १८६६ पर्यंत ग्रॅण्ट डफने लिहिलेला इतिहास शिकवला जात होता यावरून आपल्याला इतिहासाचे महत्त्व कळते.डच , पोर्तुगीज, फ्रेंच आणि इंग्रजी कागदपत्रांच्या तसेच मराठी मध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचा सूक्ष्म अभ्यास करून मराठ्यांचा इतिहास

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

लिहून काढला. न. र. फाटक म्हणतात की , ‘ त्याच्या लिखाणामध्ये असलेल्या चुका सोडून दिल्या तर हा पहिला इंग्रजआहे की ज्याने मराठ्यांचा इतिहास आपल्यासमोर मांडला.’[१०] यावरून आपल्याला डफच्या कार्याचे महत्व लक्षात येईल.

क) एकोणिसाव्या शतकातील मराठा इतिहास लेखन

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात आणि भारतात देखील हळूहळू एतद्देशीय इतिहासकारांचा उदय होत होता. या इतिहासकारांनी मराठ्यांचा इतिहास लिखाणात मोठ्या प्रमाणावर मोलाची भर टाकली , त्यामुळे मराठा इतिहास लेखन परंपरा अधिक समृद्ध झाली. वासाहतिक राजवटीच्या लिखाणाला प्रत्युत्तर म्हणून एकोणिसाव्या शतकामध्ये भारतीय व महाराष्ट्रीयन इतिहासकारांनी लेखन करायला सुरुवात केली होती. या प्रत्युत्तरांमुळे त्यांचे लिखाण एकांगी झालेले दिसून येते. या कालखंडात पुढील इतिहासकार झालेले दिसू येतात.

१ वासुदेव वामन खरे ९१८५८-१९२४)

वासुदेव वामन खरे हे सुरुवातीला मिरजमधल एका शाळेत संस्कृतचे शिक्षक होते. त्यांनी मिरज मध्ये असताना तेथील पटवर्धन घराण्याकडे असलेला कागदपत्रांचा संग्रह आपल्या ताब्यात घेऊन त्याचा सखोल अभ्यास केला. त्यातील कागदपत्रांच्या आधारे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील महाराष्ट्राची माहिती सांगणारे १४ खंड प्रकाशित केले. त्यात नाना फडणीसाचे चरित्र, इचलकरंजी संस्थानाचा इतिहास, मालोजी-शहाजी हे काही महत्त्वपूर्ण ग्रंथ होय. ए. एम. वैरात त्यांच्या विषयी सांगतात की जरी त्यांची विश्लेषण पद्धत राजवाड्यांसारखी नसली तरी ते एकमेव मराठी इतिहासकार आहेत की ज्यांची पद्धती सर्वांना आवडली आहे, आणि यावरूनच त्यांचे मूल्यमापन व्हावे. [११]

२ विश्वनाथ काशीनाथ राजवाडे (१८६३-१९२६)

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे हे महाराष्ट्राला ‘इतिहासाचार्य’ या नावाने ज्ञात आहे. प्रसंगी खिशाला कात्री लावून महाराष्ट्रात आणि देशात देखील भटकंती करून राजवाड्यांनी मराठ्यांच्या इतिहास लेखनासाठी उपयुक्त ठरणारी कागदपत्रे शोधून काढून त्यांचे प्रकाशन केले. या सर्व कागदपत्रांचे नंतर त्यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने या शीर्षकाअंतर्गत २२ खंडात प्रकाशन केले. या खंडांना त्यांनीज्या प्रस्तावना लिहिल्या त्या देखील मोठ्या प्रमाणावर गाजल्या. याशिवाय त्यांनी अनेक ग्रंथांचे लेखन केले. इतिहास संशोधनासाठी त्यांनी पुढाकार घेऊन पुणे येथे भारत इतिहास संशोधन मंडळ या संस्थेची स्थापना केली. पुढे मतभेद उद्भवल्यावर ते धुळे येथे स्थायिक झाले. ग. ह. खरे यांच्या कार्याचे वर्णन करताना म्हणतात की,‘त्यांनी केलेल्या परिश्रमाला तोडनाही. त्यांची निष्कांचन वृत्ती, त्यांचे कार्य अतुलनीय आहे.’[१२]

 ISSN 2231 4342

३ दत्तात्रय बळवंत पारसनीस (१८७०-१९२६)

दत्तात्रय बळवंत पारसनीस सातारा येथील प्रसिद्ध इतिहासकार होते. त्यांनी ऐतिहासिक साधने जमा करायला सुरुवात केली होती. अनेक इंग्रज अधिकाऱ्यांशी त्यांचे चांगले संबंध असल्यामुळे त्यांना कागदपत्रांचे संकलन करत असताना अडचणी आल्या नाही. त्यांनी या कागदपत्रांमध्ये अनेक दुर्लभ ग्रंथ व जुनी चित्रे मोठ्या प्रमाणावर गोळा केलेली होती. पुढे त्याचे सातारा येथे एक संग्रहालय तयार करण्यात आले. पारसनीस यांनी सन १८९६ मध्ये 'भारतवर्ष'[१३] व सन १९०८ मध्ये 'इतिहास संग्रह' या नावाची दोन मासिके सुरू करून त्यांनी केलेली कागदपत्रे व इतर माहिती प्रकाशित केली. त्यांच्या कार्याचा गौरव करतांना यदुनाथ सरकार म्हणतात,'ते मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासकांचे फार मोठे उपकारकर्ते आहे.'[१४]

४ न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे (१८४२-१९०१)

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांना आधुनिक मराठा इतिहास लेखनाचे जनक म्हणतात. विद्यार्थीदशेतचन्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी *'सिव्हिलऍडमिनिस्ट्रेशन ऑफ शिवाजी'*[१५]या नावाने एक निबंध लिहिला होता. या निबंधात त्यांनी शिवाजी महाराजांच्या काळातील प्रशासन व्यवस्थेची तुलना ब्रिटिश प्रशासन व्यवस्थेसोबत केली आणि शिवकालीन प्रशासन व्यवस्था उत्तम दर्जाची असल्याचा निष्कर्ष काढला. १८५९ मध्ये न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी 'दि राईज अंड प्रोग्रेस ऑफ मराठा पावर' हा निबंध लिहिला.[१६]हा निबंध देखील खूप गाजला. यानंतर सन १९०० साली न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा ' राईज ऑफ द मराठा पावर' हा ग्रंथ प्रकाशित झाला. त्यांचा हा ग्रंथ म्हणजे त्यांनी वेळोवेळी लिहीलेल्या बारा निबंधांचे संकलन आहे. या ग्रंथात त्यांनी मराठ्यांचा इतिहास उपलब्ध साधनांच्या आधारे शास्त्रशुद्ध आणि तर्कशुद्ध पद्धतीने व् अतिशय स्वरूपात लिहून काढला आहे. यासाठी त्यांना न्यायमूर्ती तेलंग यांची मोलाची साथ मिळाली. न्यायमूर्ती रानडे यांनी सर्वसामान्यांना शिवाजी महाराजांच्या प्रशासनाचे महत्त्व पटवून देण्याचे कार्य केले आहे आणि त्यांचे हे कार्य अतिशय मौलिक आहे.[१७]

ड) आधुनिक काळातील मराठा इतिहास लेखन

१ गोविंद सखाराम सरदेसाई (१८६५-१९५९)

गोविंद सखाराम सरदेसाई यांना आपण 'रियासतकार' या नावाने ओळखतो. बडोदा नरेशांच्या मुलांना इतिहास शिकविण्यासाठी त्यांची नेमणूक झाली होती. त्यासाठी त्यांनी काही टिपणे तयार केल्या. त्याला पुढे पुस्तक रूप देण्यात आले. याच आज 'रियासती' म्हणून ओळखल्या जातात. सुरुवातीला या रियासती मध्ये 'मुसलमानी रियासती' दोन खंड , 'मराठी रियासती'तीन खंड, 'ब्रिटिश रियासती' दोन खंड यांचा समावेश होता. गोविंद सखाराम सरदेसाईयांनी पेशवे दप्तरातील कागदपत्रांचे संकलन करून त्यांचे एकूण ४५ खंड प्रकाशित केले. 'मेन करंटस इन मराठा हिस्ट्री' हा त्यांचा ग्रंथ म्हणजे त्यांनी पाटणा विद्यापीठात दिलेल्या व्याख्यानांचे संकलन होय. या ग्रंथाचे एकूण तीन खंड असून त्यात जवळपास १५०० पानांमध्ये मराठ्यांचा इतिहास त्यांनी

 ISSN 2231 4342

चितारला आहे.[१८] त्यांच्या कार्याचे गुणगान करताना डॉ. व्ही. डी. राव म्हणतात, 'मराठ्यांचा सलग इतिहास लिहिणारे गोविंद सखाराम सरदेसाईहे पहिले इतिहासकार आहे. त्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनापासून तर सातारा राज्याचा शेवट होईपर्यंत मराठ्यांचा सलग इतिहासमांडला आहे.'[१९] सरदेसाई स्वत:ला इतिहासकार न मानता इतिहासाची उत्सुकता आलेला आणि त्यावर सतत काम करणारा एक सामान्य व्यक्ति मानत असे. [२०]

२ सर जदूनाथ सरकार (१८७०-१९५८)

सर जदूनाथ सरकार हे बंगाल मधील प्रसिद्ध इतिहासकार होते. त्यांना अनेक भारतीय आणि परकीय भाषा अवगत होत्या. त्यांच्या बहुभाषिक असण्याचा त्यांनी इतिहास संशोधनात खूपच फायदा झाला. सुरुवातीला त्यांनी मुगलांच्या इतिहास संशोधनावर भर दिला होता. औरंगजेबाच्या जीवनावर लिखाण करत असताना ते मराठ्यांच्या इतिहासाकडे वळले. [२१] येथून पुढे त्यांनी स्वतंत्रपणे मराठ्यांचा इतिहास अभ्यासायला सुरुवात केली. यासाठी त्यांनी मराठी, फारसी, फ्रेंच, जर्मन, पोर्तुगीज, इंग्रजी अशा विविधभाषेतील कागदपत्रांचा आधार घेतला. फारसी कागदपत्रांचा वापर करणारे ते पहिले इतिहासकार होते. सन १९१९ मध्ये त्यांचे *'हाऊस ऑफ शिवाजी'* आणि *'शिवाजी अँड हिज टाइम्स'* हे ग्रंथ प्रकाशित झाले. 'सत्याच्या शोधात माझी बदनामी झाली, निंदा झाली, तरीही मी सत्याचा शोध घेणे सोडणार नाही. सत्याचा शोध घेऊन मी ते सत्य पारखून घेतल्यानंतर सर्वांसमोर ठेवेल. इतिहासकाराने अशीच भूमिका घेतली पाहिजे', असे त्यांचे स्पष्ट मत होते.[२२]

३ डॉ. सुरेंद्रनाथ सेन (१८९०-१९६२)

डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी मराठ्यांच्या युद्धपद्धती आणि प्रशासन या विषयावर सखोल संशोधनकरूनयावरअतिशय मौल्यवान माहिती आपल्यासमोर ठेवली. मराठ्यांच्या इतिहासाविषयी मराठा इतिहासाबद्दल भारतात आणि परदेशात सुद्धा काही गैरसमज होते, त्याचप्रमाणे काही अनावश्यक मते निर्माण झाली होती. डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांच्या कार्याने हे गैरसमज दूर होण्यास मदत झाली. डॉ. सुरेंद्रनाथ सेनयांनी १९२३ साली *'ऍडमिनिस्ट्रेटीव सिस्टम ऑफ द मराठा'* आणि १९२८ साली *'मिलिट्री सिस्टम ऑफ द मराठा'* हे महत्त्वाचे लिहिले. मराठ्यांचा प्रशासकीय व्यवस्थेचा डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी पाच वर्षांहून अधिक काळ अभ्यास केला आणि त्याचे निष्कर्ष १९२३मध्ये ग्रंथरूपाने प्रसिद्ध केले. डॉ. सुरेंद्रनाथ सेन हे मराठ्यांच्या इतिहासाचे गाढे अभ्यासक म्हणून बंगाली इतिहासकारांमध्ये उठून दिसतात. त्यांनी 'शिव दिग्विजय' आणि 'चिटणीस बखर' या दोन्ही बखरीमधील काही भाग भागांचे भाषांतर केले होते. तसेच त्यांनी 'सभासद बखरी' चे सुद्धा मराठीतून भाषांतर केले. पुढे या तीनही भाषांतराचे एकीकरण करून त्यांचा 'शिवछत्रपती' हा ग्रंथ तयार झाला. इतर देशी कागदपत्रांमध्ये मराठ्यांच्या आरमाराविषयी अतिशय कमी माहिती मिळते. यामुळे डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी लंडन, लिस्बन, पॅरिस, गोवा, इवहोरा येथील हस्तलिखितांचा व इतर दुर्लभ कागदपत्रांचा अभ्यास केला. त्यांचे मत होते की,'मराठ्यांच्या इतिहासाचे चांगले आकलन व्हावे याकरिता पोर्तुगीज भाषेच्या अभ्यासाला महत्त्व देणे आवश्यक आहे'.[२३]डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी 'फॉरेन बायोग्राफी ऑफ शिवाजी' हा ग्रंथ लिहिला. यासाठी त्यांनी

विविध परकीय कागदपत्रे अभ्यासली आणि हा महत्त्वपूर्ण ग्रंथ सिद्ध केला. [२४]डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना डॉ. एस. सी. बॅनर्जी म्हणतात, 'डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी इतिहासाला जे योगदान दिले आहे, त्याचे ऋण मान्य करावे लागेल. येणाऱ्या काळात आपण सेन यांच्या संशोधनामध्ये, लिखाणाबद्दल भर टाकू शकतो परंतु त्याला मात्र पूर्णपणे रद्द करू शकत नाही. कारण त्यांचे लिखाण अतिशय तर्कशुद्ध, सखोल अभ्यासावर आधारित, ऐतिहासिक कागदपत्रांच्या पायावर उभे आहे आणि त्यांनी काढलेले निष्कर्ष हे समतोल बुद्धीचे कोणत्याही प्रकारे तडजोड न करता केलेले आहे.'[२५]इतिहास संशोधनासाठी डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी पुढाकार घेतला . कलकत्ता विद्यापीठात प्रादेशिक इतिहासाच्या अभ्यासाला सुरुवात झाल्यानंतर डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी तेथे मराठ्यांच्या इतिहास संशोधनासाठी पुढाकार घेतला.

संदर्भ:

१. कुलकर्णी, अ. रा. *मध्ययुगीन महाराष्ट्र* , पुणे, पृ. २५८

२. पिसुर्लेकर पां. स्. – *शिवाजी महाराजांचे एक पोर्तुगीज चरित्र* , *विविध ज्ञान विस्तार* , खंड ६, १९, १९, पृ. ५५

३. Captain James Kerr- A Short Historical Narrative of the Rise and Rapid Advancement of the Mahratta StateTo the Present Strength and Consequence it has Acquired in the East, London,1782.

४. Robert Orme, *Historical Fragments of the Mogul Empire, of the Morattoes, and of the English Concerns in Indostan from the year 1659,* London, १७८२ पृ. ३४-३५.

५. Chapekar R. N., *Translation of Springall's German book into English*, copy preserved in Bharat Itihas Sanshodhan Mandal, Pune , पृ. Preface.

६. Edward Scott Waring , *A History of the Mahrattas*, Printed for John Richardson, London – 1810, पृ. Viii.

७. चिपळूणकर विष्णु शास्त्री , *निबंध माला* , पुणे १९१७, पृ. ९२

८. James Mill, *The History of India,* Vol. 2, London, 1817., पृ. ३५८

९. *जेम्स ग्रँट यांचे माउंटस्टूअर्ट एल्फिन्स्टन याला पत्र, दि. २०.०४.१८२१,* MSS EUR F 128, Box 7. India office library, London.

१०. Dsouza and Kulkarni C. M. (ed.) , Phatak N. R. *Historiography in Maharashtra*पृ. १४९.

११. Sen S. P., (ed) *Historians and Historiography in Modren India.* पृ. २२०.

१२. पूर्वोक्त , पृ. २०६.

१३. *भारतवर्ष*, पुणे, द. ब. पारसनीस संपादित एक मासिक, अंक-१, १८९६ पृ. १.

१४. जदुनाथ सरकार,*'House of Shivaji'*, कलकत्ता , तिसरी आवृत्ती, १९५५, पृ. ३०६.

१५. फाटक न. र. , *न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे,* नीलकंठ प्रकाशन, पुणे, पृ. १५

१६. उपरोक्त , पृ. १६.

१७. Sen S. P., (ed) *Historians and Historiography in Modren India.* पृ. १८१.

१८. ताटके अरविंद, *संशोधन सप्तर्षी* , पुणे, १९६२ पृ. ७०

१९. Sen S. P., (ed) *Historians and Historiography in Modren India.* , पृ. २२४

२०. Sardesai G. S., *New History of the Marathas, Vol. 3,* पृ. ५.

२१. Tikekar S. R., *On Maratha Historiography,* Mumbai, 1964, पृ. ४.

२२. गर्गे स्. मा., *इतिहासाची साधने,एक शोध यात्रा,* कॉन्टिनेंटल प्रकाशन , पुणे . पृ. १०१

२३. Sen S. N., *Military System of the Marathas, Calcutta, 1927,* पृ.प्रस्तावना vii.

२४. Sen S. N., *Foreign Biography of Shivaji, Calcutta, 1927,* पृ. ३.

२५. Sen S. P. , *Historians and Historiography in Modern Idia,* Calcutta, 1973, पृ.३५८.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

मराठा जात आणि संस्कृती

संशोधक विद्यार्थी
डिगांबर राधाकिसन जाधव,
पीएच.डी इतिहास, इतिहास विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ,औरंगाबाद
digambarjadhav77@gmail.com
मो. 9673345461

प्रस्तावना :

जाती व्यवस्था हे भारतातील समाजातील वास्तव आहे. व्यक्तीचा जन्म ज्या जातीमध्ये झाला त्या जातीच लेबल घेऊनच आयुष्यभर जीवन जगावे लागते. कारण व्यक्तीला जात बदलता येत नाही. मराठा जातीच्या लोकांची महाराष्ट्रात लोकसंख्या जवळपास ३२ टक्के आहे. बहुतांशी लोकांची उपजिविका शेतीवर अवलंबून आहे. महाराष्ट्रात मराठा जात इतर सर्व समाजाच्या तुलनेत संख्या बळाने सर्वात मोठी आहे. त्यामुळे त्याचा राजकारणात वरचष्मा आहे. मराठा समाजाला सत्तेची उपजत प्रेरणा आहे. मराठा ही महाराष्ट्रातील एक उच्चवर्णीय क्षत्रिय जात आहे. मराठा जातीत विविध पोटजाती सुद्धा आहेत. कुणबी, कुणबी मराठा, मराठा कुणबी इत्यादी मराठा ही लढाऊ जात आहे. महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तमिळनाडू, हरियाणा तसेच मध्यप्रदेश, गुजरात ही मराठा लोकसंख्या असलेली राज्य आहेत. मराठी, तमिळ, तेलगू, तंजावर या मराठ्याच्या भाषा आहेत.

मराठा या शब्दाचे संस्कृत रुप महाराष्ट्र आहे. अर्थात ज्याचे राष्ट्र मोठे आहे ते मराठे, मरहट्टा, महारट्टा, महारथ, महारथी म्हणजेच मराठा उर्फ राष्ट्रपती या संज्ञा प्राचीन काळी अत्यंत शाैर्यशाली रणधुरंधर क्षत्रिय राजबिंड्या पुरुषांनाच लावीत असत. महाराष्ट्रात मराठा जातीला तुल्यबळ अशी दुसरी जमात नाही हे महाराष्ट्राच्या स्थिरतेचे एक महत्वाचे कारण आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्राबाहेरचे लोक महाराष्ट्राचा किंवा मराठा राजकारणाचा उल्लेख मराठा असा करायचे. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व केले. त्यांनी जी वर्तमानपत्रे चालू केली त्याची नावे मराठा आणि केसरी अशी आहेत.

महाराष्ट्र मराठी माणसाचा की मराठ्याचा महाराष्ट्र मराठी माणसाचा की मराठ्याचा म्हणजे हा प्रश्न ब्राम्हण आणि मराठ्याच्या सत्ता संघर्षातला होता. मराठा ही संज्ञा पूर्वी सकल मराठा समाजासाठी वापरली जायची ती

आता जातीपुरती मर्यादित झाली. मराठा जातीची पार्श्वभूमी आणि प्रचलित रुप, रुढी, परंपरा आणि संस्कृती, मराठा जातीचे मुळ स्वरुप, मराठा जात कोठून उदयाला आली. या प्रश्नांची उकल केली जाईल. महाराष्ट्राचा इतिहास पाहत असतांना मराठा जातीला वगळून काही महाराष्ट्राचा इतिहास लिहिता येणार नाही. महाराष्ट्राच्या जडणघडणीत मराठा जातीचा सिंहाचा वाटा आहे. उत्तर मध्ययुगीन काळात मराठयांचा इतिहास हा महत्वाचा इतिहास आहे.

'मराठा राज्य' म्हणजे महाराष्ट्राच्या प्रादेिशक अस्मितेची जागृती. जुलमी मुसलमानी राजवटी विरुध्दचे हिंदू प्रत्यूत्तर म्हणजे 'मराठा राज्य'. हिंदू समाजात आमूलाग्र बदल घडवून,तळागाळातील लोकांच्या उन्नतीसाठी केलेला एक धाडसी प्रयत्न म्हणजे मराठा राज्य. आजचे इतिहासकार काही मूलभूत, मुख्य प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करताना दिसतात."[१]

मराठा :

'मराठा' या संज्ञेच्या व्युत्पत्ती विषयी भिन्न मतप्रवाह असून त्यातील एकही संपूर्ण समाधानकारक नाही. या संज्ञेचा उगम त्याचा व्यवहारातील वापर आणि त्यातून निर्देशित होणारे सामाजिक घटक याविषयीचे स्पष्टीकरण आढळून येत नाही. व्युत्पत्तीविषयी भाष्य करणारा एकही मतप्रवाह ही संज्ञा एका विवक्षित काळातच का उदयाला आली आणि कोणत्या विविक्षित घटनाक्रमामुळे उदयास आली हे सांगू शकत नाही. तसे पाहता ' मराठा' ही संज्ञा 'बंगाली' किंवा ' तमिळ' या संज्ञापेक्षा वेगळी आहे. बंगाली भाषिक प्रदेशात पूर्वापार राहत अालेला, बंगाली बोलणारा प्रत्येक जण हा बंगाली म्हणून समजण्यात येतो. त्याचप्रमाणे तामिळी ब्राह्मण अथवा तामिळी ख्रिश्चन हे सगळे तामिळीच समजण्यात येतात. परंतु, सगळे मराठी हे मराठा समजले जात नाहीत, जसे राजस्थानातील सगळ्यांना रजपूत म्हणण्यात येत नाही.

'मराठा' ही संज्ञा जुनी असली तरी शिलालेख अथवा इतर स्वरुपात मांडणारे त्यासंबंधीचे पुरावे दुर्मिळ आणि संदिग्ध आहेत. उदा. बेडसा येथे असलेल्या गुफेतील शिलालेखात (इ.स पहिले शतक) एका राणीचा नामोल्लेख ' महाराठिणी' असा आढळून येतो. त्याचप्रमाणे इस सनाच्या पाचव्या शतकातील सिंहिली बखर दस्तऐवजात या भूभागाचा उल्लेख ' महारठ्ठा' असा आढळतो. या पुरातन पुराव्यामध्येही ' मराठा' या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्रातील रहिवासी एवढाच मर्यादित आहे. आधीच्या मुस्लिम बखरकाराची धारणाही सर्वसाधारणपणे अशीच होती. अलबिरुनी (इ.स. १०२०) नर्मदा नदीच्या दक्षिणेकडील भूप्रदेशाचा उल्लेख ' मरहट देश' असा करतो. तर इब्न बतूता (इस १३४०)च्या नोंदीनुसार दौलताबादच्या भोवती असलेल्या लोकांना 'मराठा' असे संबोधण्यात येत असे."[२]

पुढील २०० वर्षाच्या काळात 'मराठा' या संज्ञेला एक नवीन वजन प्राप्त झाल्याचे आढळते. मराठा पुढाऱ्याकडे आपल्या अनुयांसह बहमनी साम्राज्याची चाकरी करणारे अथवा त्याविरुद्ध बंडखोरी करणारे अशा दृष्टीने पाहण्यात येऊ लागले. 'मराठा' या संज्ञेकडे पहाण्याचा हा दृष्टीकोन फरिश्ताने इ.स. १६०० च्या सुमारास

 ISSN 2231 4342

‘दख्खनाचा इतिहास’ लिहित असताना चांगलाच रुढ झाला होता. आर्थिक स्थैर्य आणि सुबत्तेमुळे नवीन जातीवर्गाची निर्मिती हाेते. या सर्वसामान्य सिध्दांताला अनुसरुनच हा घटनाक्रम घडल्याचे दिसून येते. ‘मराठा’ आणि ‘रजपूत’ या दोन्ही संज्ञेच्या उगमामध्ये आणि त्या त्या कुळांच्या उत्कर्षामध्ये बरेच साधर्म्य आहे. रजपूताची लढाऊ वृत्ती मुघल साम्राज्याच्या चाकरीतून वृध्दिगत झाली. कालौघात नातेसंबंध आणि वैवाहित मर्यादांमुळे या राजपूत कुळांना राजस्थानातील इतर समाजापेक्षा वेगळी ओळख प्राप्त झाली. यशस्वी लष्करी कारकिर्द आणि स्थानिक पातळीवरील मोठेपणा याव्दारे कोणतेही कूळ स्वत:ला राजपूत म्हणवून घेऊ शकत असे राहणीमान आणि खाण्यापिण्याच्या सवयीमधील श्रीमंत बदल, महान परंपरेला अनुसरुन जवळपासच्या तीर्थक्षेत्रांना आश्रय देणे आणि कुटूंबातील विधवा पुनर्विवाहांना अटकाव करणे ; या गोष्टीमुळे राजपूत होण्याची प्रक्रिया सुकर होत असे. भिन्न परंतु आर्थिक दृष्टया दुर्बळ अशा राजपूत कुळाशी जोडलेले विवाहसंबंध आणि लष्करी कामिगिरीतील सततचे यश या भांडवलावर एखादे कूळ राजपूत ठरत असे. या अनुसंगाने राजपूत आणि भिल्लासारख्यामध्ये भारतातील इतर जातीमधील संबंध दस्ताऐवजामधून नोंदले गेले आहेत. ‘मराठा’ ही संज्ञा याच पध्दतीने विकसित झाली असावी असे वाटते. प्रथम काही कुळांना लष्कारातील चाकरीमुळे इतर सामान्य शेतकऱ्यांपेक्षा वेगळी ओळख प्राप्त झाली . त्यांना मिळालेल्या जहागिऱ्या आणि वतनामुळे ते महसूल वसुलीतही सहभागी झाले. यामुळे स्थानिक पातळीवर त्यांच्या प्रतिष्ठेत आणखी भर पडली. याचबरोबर या कुळाच्या जीवनशैलीत लष्करी शिक्षण, शिकारी, वेगळी उठावदार वेशभूषा (उदा.: जास्त पेचदार पगडी) आहारातील फरक, वंशावळ आणि कुळ श्रेष्ठत्वाविषयीच्या जाणकारांची स्वत:च्या चाकरीत नेमणूक आणि विधवा पुनर्विवाहावरील बंधने या गोष्टीचाही अंतर्भाव झाला. पुढील काळात या वैशिष्टयाची परिणती मराठा कुळांच्या रितीभाती विषयी जागरुक असलेल्या दृढ नातेसंबंधामध्ये अाणि एकात्म समाज निर्माण होण्यास झाली. या प्रक्रियेला जहािगरींमुळे आर्थिक सुबत्तेचा आधार होता. ‘मराठा’ ही संज्ञा नातेसंबंधामधून आणि परस्परामधील व्यवहारांमधून उदयास आलेल्या लष्करी कर्तृत्वान समाजाचे द्योतक म्हणून रूढ झाली आहे.”[३]

रजपूतांप्रमाणे मराठा या नवीन जाती वर्गाचा विकासही संपूर्ण मराठा राजवटीच्या कालखंडात आणि नंतर एकोणविसाव्या शतकातही चालू होता. अस्सल मराठा कुळे निश्चित करून त्यांची यादी बनवण्याचे आणि ‘मराठा’ जात मर्यादित करण्याचे प्रयत्न करण्यात आले. यासाठी गरिब ,सामान्य शेतकऱ्यांना शक्य नसलेली जीवनशैली आणि विशेष रितीभातींचा अवलंब करण्यात आला. उदाहरणार्थ सामान्य शेतकऱ्यांच्या िस्त्रयांना शेतात किंवा घराबाहेर काम करावेच लागत असे. पण मराठयांनी आपल्या कुळातील स्त्रियांवर या बाबतीत निर्बंध घातले. अस्सल मराठ्यांनी लष्करी पेशाच स्वीकारण्यावर विशेष भर दिला गेला.”[४]

शब्द उत्पत्ती :

मराठा या शब्दांचे संस्कृत रुप महाराष्ट्र आहे. अर्थात ज्याचे राष्ट्र मोठे आहे ते मराठे, मरहट्टा, महारट्ठ म्हणजे राष्ट्र ,रठ्ठा मार देणे , महारथ ,महारथी म्हणजे मराठा ऊर्फ राष्ट्रपती या संज्ञा प्राचीन काळी अत्यंत शौर्यशाली

रणधुरंदर क्षत्रिय, राजबिंड्या, पुरुषानाच लावीत असत.याला आधार रघुवंशाच्या ६ व्या सर्गामधील पुढील श्लोक आहे.

‘’एको दस सहसाणी योधयेदयस्तु धान्विनाम। शस्त्रशास्त्र प्रवीणश्च सर्वे प्रोक्तो महारथ:। आमितान्योधयेदयस्तु संप्रोक्तोडि तिरथस्तु स: रथस्वेकेन योध्दा स्यात्तन्यूनोर्ध्दरथ:स्मृत। ।। **भावार्थ** : शस्त्र शास्त्रात म्हणजे रणविदयेत प्रवीण होऊन जो एकटा क्षत्रिय दहा हजार योध्या बरोबर लढू शकतो. त्या रणधुंरधरास मरहटट्-महारथी म्हणतात. या संबंधाने डॉ. भांडारकर म्हणतात, महारथ, महारथी, मरहटठा व मराठा यांचे संस्कृरुत रुप महाराष्ट्र असे आहे. अर्थात महाराष्ट्र म्हणजे महारथीचा, महारटट्यांचा उर्फ मराठा क्षत्रियाचा देश होय. ख्रिस्ती सनापूर्वी सातव्या शकात क्षत्रिय दक्षिणेत आले. विध्य पर्वताच्या दक्षिणेकडील देशासंबधाने पाणिनीच्याही कात्यायनाने आपल्या वार्तिकांत उल्लेख केला आहे. हा या बाबीस सबळ पुरावा होय. तसेच ख्रिस्ती शकाच्या पूर्वी तिसऱ्या शतकाच्या अशोकाच्या शिलालेखावरून जास्त पुरावा मिळतो. या लेखात राष्ट्रीक पैठेणिक अशी नावे आढळतात. पैठण येथे राहणाऱ्यांना पैठणिक व हल्लीच्या मराठ्यांचे पूर्वज ते राष्ट्रीक होत. अशोकाच्या कुंडे येथील शिलालेखात महाभोजनाचाही उल्लेख आहे. याप्रमाणे पतंजलीच्या १०० वर्ष आधी उत्तर दक्षिणेत दळवळण चालू होते. महाराष्ट्रात, राष्ट्रीक, महाराष्ट्रीक व भोज लोकांची राज्ये होती.’’[५]

तसेच हरिवंशात नाग उपनावाच्या क्षत्रिय राजकन्येपासून झालेल्या यदूच्या ४ पुत्रांनी सह्याद्रीपासून थेट कन्याकुमारी पर्यत ४ राज्ये स्थापिली असा उल्लेख सापडतो. त्याचप्रमाणे विदर्भ देशाचे भोज राजे सोमवंशी असून ते यदुच्या कुळात उत्पन्न झालेले आहे. असा उल्लेख हरिवंशात आढळतो . यावरून महाराष्ट्रात व वऱ्हाडात राहणारे लोक चंद्रवंशी यादव-जाधव मराठे क्षत्रिय होते हे सिध्द होते. ख्रिस्ती सनापूर्वी ७ शतकापासून इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापर्यंत वऱ्हाडवार व महाराष्ट्रावर राष्ट्रे (रठठे) उर्फ महाराष्ट्रे (महारठठे) यांचे राज्य होते. पुढे ते अशोकाचे मांडलिक झाले आणि पुढे स्वतंत्र्य होऊन त्यांनी इसवी सनाच्या ६ व्या शतकापर्यंत राज्ये केली .

मराठ्यांचे प्राचीनत्व :

श्री वाल्मीकी रामायण-अयोध्या कांड, सर्ग ५१ श्लोक ६ यात दशरथाला महाराष्ट्रे (महारे**ट्ठ**) िववर्धन असे म्हटले आहे. तसेच इसवी सनापूर्वी ६ व्या शतकात जैन लोकांच्या ‘कृतांग सुत्र’ या भद्रबाहूने लिहिलेल्या ग्रंथांत महाराष्ट्र शब्द आढळतो . या ग्रंथाच्या आधाराने दुसऱ्या शमाचार्यांनी लिहिलेल्या ‘श्री प्रज्ञापना उपाग सूत्र’ यात महाराष्ट्र शब्द आढळतो . पश्चिम घाटात कार्ल्याजवळ भाजे नामक कोरीव लेणे आहे. तेथील पाण्याच्या हौदावर ‘महारथी साकोसिकी पुतसा विष्णुदत्तसा देयाधमपोदी.”

म्हणजे कौशिकपुत्र महारथी / महारठी / महारट्ठी विष्णुदत्त याने हे बांधले असे लिहिले आहे आणि या लेण्याचा काळ इ.स पूर्व ३०० वर्षाचा आहे. मगध देशावर नंदाचे राज्य असतांना म्हणजे सुमारे २३०० वर्षापूर्वी वररूची

होऊन गेला. त्याच्या पाकृत प्रकाश या ग्रंथात "शेष महाराष्ट्रीवत"असा उल्लेख आहे. यावरुन महाराष्ट्र व मराठा शब्दाचे प्राचीनत्व स्पष्ट होते .

महाराष्ट्रकुलवंशावली ग्रंथात पुढील श्लोक आढळतो. "सर्वेषु एक वर्णा ये कृष्यादि कर्मतत्परा :। नमस्कारेण मंत्रेण पंचयज्ञा सदैवहि। एषां ज्ञाति समुध्दोतु कुलाि न षण्णवत्यपि । वंशाश्चत्वार एवात्र सूर्यचंद्र यदू शेषक :।"

भावार्थ :

महाराष्ट्रीक महाराष्ट्रे उर्फ मराठे हा एक वर्ण आहे. या वर्णाचे लोक शेतकऱ्यांपासून राजापर्यंतच्या सर्व कार्यात तत्पर असतात. ते नमस्कारात्मक मंत्राने स्वत:च पंचयज्ञ करतात. त्यांच्या जातीत ९६ कुळे आणि सूर्यवंश, चंद्रवंश, यदुवंश व शेषवंश असे चार वंश आहेत. यावरून मराठा व महाराष्ट्र शब्दाची प्राचीनता सिद्ध होते."[६] यानंतरचा महत्वाचा पुराव म्हणजे शवरभाष्य (इसवी सनाचे ३ रे शतक) यातील पुढील वाक्य " ननुजनपदपुररक्षण वृत्तिमनुपजी त्यपि क्षेत्रिय राजशब्दमांधा: पयुंजते" यावर कुमारिलाने (सातवे शतक) पुढील टिप्पणी जोडली आहे. " दक्षिणात्य सामान्ये आध्राणामिती भाष्यकारेणोक्तम् शवराच्या वेळी महाराष्ट्रात आंध्राचे राज्य होते. यामुळे शवर नुसतेच म्हणतो की, आंध्रामध्ये क्षेत्रियकर्म करीत नसलेला म्हणजे देश किंवा पूर यांचे रक्षण न करणारे क्षेत्रियसुद्धा आपल्यास राजा असा शब्द लावतात. कुमारिलच्या वेळी महाराष्ट्र स्वतंत्र झाला होता, म्हणून त्याने असे लिहिले की, दक्षिणात्य सामान्यात: राज्य न करणारे क्षत्रिय आपल्यास राजा ही पदवी लावतात. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात आजही ९६ कुळी मराठा राज्य नसतांनादेखील स्वत:स राजे म्हणवितात, म्हणजे शवरने तिसऱ्या शतकात व कुमारिलने सातव्या शतकात वर्णविलेले महाराष्ट्रातील क्षेत्रिय हे मराठाच होतं हेच सिद्ध होते."[७]

संस्कृती :

मानव हा एक बुद्धीजिवी प्राणी आहे. काही अशा जैविक शक्ती आहे. ज्या मानवाला मानवेत्तर प्राण्यापासून वेगळ्या करतात. त्याची (key) किल्ली म्हणजे संस्कृती होय. संस्कृती ही मानव निर्मित आहे. तिच्या निर्मितीला मानव कारणीभूत आहे. मानव अनेक अर्थाने पशुपेक्षा भिन्न आहे. मुख्य फरक म्हणजे मानवाकडे संस्कृती आहे. पशु संस्कृतीची निर्मिती करु शकत नाही. कारण त्यांच्याकडे संस्कृती निर्मितीसाठीची शारीरिक व मानसिक पात्रता नाही. जी मानवाकडे आहे.

संस्कृती म्हणजे काय?

" मनुष्यमात्राची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरुप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण, विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टि म्हणजे संस्कृती." अशी संस्कृती समाजाची असते.व्यक्तीमध्ये संस्कृती साकारते जीवंत होते. व्यक्ती जन्माला आल्यापासून परंपरागत वस्तुरूप संस्कृतीने वेढलेली व अव्यक्तपण दृढ अशा सामाजिक परंपरेत गुरफटलेली असते. डॉ. इरावती कर्वे यांच्या मते, माणसाच्या मरणाबरोबर वस्तुरुप संस्कृती नष्ट होत

नाही तर ती मागे ठेवूनच जावे लागते. बापाने बनवलेल्या वस्तु आपोआपच मुलाला म्हणजे पुढच्या पिढीला मिळतात. भाषेमुळे व्यक्तीला विशिष्टापासून सामान्याकडे,दृश्यापासून अदृश्याकडे व वर्तमानातून भविष्याकडे जाता येते. माणसामाणसात जो फरक दिसतो. तो शरिर रचनेवर अवलंबून नसून बहुतांशी संस्कृतीवर अवलंबून असतो."[८]

मधमाशा, वाळवी व मुंग्या या प्राण्यामध्ये राणी, नर व कामकरी अशा तीन वर्गाचे जीव दिसून येतात. एका वर्गातील जीवांना एका विशिष्ट शरिररचनेमुळे दुसऱ्या वर्गातील जीवनक्रम जगणे अशक्य असते. मनुष्याची स्थिती याउलट असते. तो जे उपभोगितो त्यातील त्याच्या स्वत:च्या कमाईचे असे फार थोडे असते. बहुतेक पूर्व संचितच असते. दैवभोगाने तो ज्या देशात ज्यावेळी जन्माला येईल त्याप्रमाणे त्याला कमी अधिक वाटा मिळतो. हे जे पूर्वसंचित मानवाला उपभोगायला मिळालेला ठेवा तीच संस्कृती मानवी जीवनात जो फरक दिसतो. त्याच्या मुळाशी सांस्कृतिक परंपरेतील फरक असतो. शारिरीक परंपरेचे कार्य अत्यल्प असते. परिस्थिती ही संस्कृतीची निर्मिती नाही, पण संस्कृतीची मुरड घालणे, वळण लावणे वगैरे कार्य परिस्थितीच्या द्वारे होत असतात. भौगोलिक परिस्थिती संस्कृतीला वाकवीत असते. तर संस्कृती भौगोलिक परिस्थितीवर मात करीत असते. त्याचा संबंध आहे पण, तो कार्यकारण रुपाचा नाही.

विकासावाद :

मानव समाज आणि संस्कृती याचा विकास टप्याटप्याने होतो. याचे विवेचन करताना त्या मानवाच्या मर्कटावस्थेपासून आजच्या प्रगत मानवापर्यंत वेध घेतात. समाज व्यवस्थेतील बदलही असे असतात. प्रथम पशुची शिकार करून जंगलात कंदमुळे खावून जगणे, नंतर शेती पशुपाल, नागरी समाज निर्मिती, यंत्रयुग, दैवतवाद, एकेश्वरीयुग, मातृप्रधान पद्धती , प्रथम बहुपत्नीत्व, बहुपतीत्वनंतर उच्चतम समाज एक पत्नीव्रताने राहतात. मानवाचा व समाजाचा विकास हा टप्याटप्याने होत असतो. विकसित होणे हा मानव समाजाचा गुणधर्म आहे. पण, पूर्वीपासूनच जर इतिहास पाहिला तर कोणत्या समाजात किती प्रगती होती हे ठामपणे सांगता येत नाही. प्राणीशास्त्र आणि जीवशास्त्र त्याचे बरेचसे सिद्धांत मनुष्य समाजाला लावता येतात. तसाच व्यक्ती जीवनाचा सिद्धांत समाज जीवनाला लावता येतील का? तर त्याचे उत्तर नाही असे येते. समाज जीवनात मानले तर त्याचे जीवन (संस्कृती) व्यक्तीच्या जीवनासारखी आहे. प्रत्येक व्यक्ती जन्मवर्धन व मरण या चक्रातून जात असते. तसेच संस्कृतीही नष्ट होत असते.

प्राचीन काळी कोणता समाज कोणत्या वस्तुचा कशासाठी उपयोग करीत हे अ ाज सांगणे अशक्य असले तरी "सकळा इंद्रिया लाविलेले ते विशिष्ट वळण आहे." वळण किंवा संकेतांनुसार उपयोगाची पद्धत दृढ होते. वळण, संकेत हे संस्कृतीत महत्वाचे मानले आहे. मनुष्याचे खाणे-पिणे, निजणे, वगैरे गरजा सामाजिक संकेतांशी संबंधित असतात. प्रत्येक समाजाची संस्कृती वेगळी असते. जन्माला आलेली व्यक्ती मृत्यू पावते. पण, समाजाची दोरी तुटू देत नाही. अ ापल्या परंपरा त्या पुढच्या पिढीला देवून जातात. प्रत्येकाचे जीवना ाचे स्वरुप

ISSN 2231 4342

वेगवेगळे असते. संस्कृतीची निर्मिती, संचय व संक्रांती परंपरेमुळे शक्य आहे. संस्कृतीची स्थिरता एक ही अनेक भारतीय संस्कृती खंडीत की अखंडीत भारतीय संस्कृती व महाराष्ट्रीयन संस्कृती यासारख्या संस्कृती विषयक अनेक मुद्यांचा त्यांनी विचार केलेला आहे. संस्कृतिमय विकास, भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतो. तेव्हा त्याचाही विचार करणे आवश्यक वाटते."[९]

भारत एक शेतकरी राष्ट्र आहे. भारतीय संस्कृती ही शेती संस्कृती आहे. मूलत: शेतकरी समाजामुळेच भारतीय संस्कृती घडलेली आहे आणि दृढही झालेली आहे. भारतीय शेतकरी ही एक जात नसून तो एक वर्ग (कम्युनिटी) आहे. या वर्गाच्या समस्या रहिवासांचे ठिकाण, धर्म, संस्कृती, इतिहास, शोषण, सोशीकता, तडफड, तळमळ, भावविश्व, धारणा, श्रद्धा, आकांक्षा, आक्रोश, दु:ख, सामाजिक स्तर, शैक्षणिक स्तर, अंधश्रद्धा, राजकीय आकलन या सर्व गोष्टी सारख्याच आहेत म्हणून तो एक जीव आणि एकरस असा व्यावसायिक वर्ग आहे. कुणबी अथवा मराठा कुणबी ही त्या वर्गातील एक जात आहे. या जातीतील सुमारे ९९ टक्के वंश परंपरेने शेती करून पोट भरतात. त्यातील काही कुटुंबे आज शहरात स्थिर झाली आहेत तर अन्य काही दुसऱ्या व्यवसायाकडे वळलेली आहेत. तरीही त्यांची मुख्य ओळख शेतकरी अशीच आहे. मराठा कुणबी जातीची नाळ सुख, दु:खे शेतकरी वर्गाशीच अधिक निगडित आहेत."[१०]

सामाजिक मागासलेपण ही एक गुणात्मक विषयवस्तू आहे. संख्यात्मक नाही. सामाजिक मागासलेपणाची काही वैशिष्ट्ये शेवटी व्यक्तीसापेक्ष असतात. एखाद्या समुहाचे सामाजिक मागासलेपण सर्वसामान्य होईलच असे नाही. सामाजिक जीवन पद्धती, दैनंदिन जीवनातील कामकाजाचे स्वरुप, पारंपारिक सामाजिक श्रद्धा, देव-देवता, अंधश्रद्धा, प्रथा-परंपरा, राहणीमानाचा दर्जा, बदलत्या काळाबाबत उदासीनता, जागतिक स्पर्धेबाबत अनभिज्ञता, वर्तमान काळातील प्रगतशील प्रवाहापासून दूरी, समुहातील स्त्रियांना दुय्यम सामाजिक स्थान, स्त्रियांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा अभाव, स्त्रियांचे सामाजिक मागासलेपण, खुल्या सामाजिक संवाद प्रक्रियेचा अभाव, सामुहिक विचार प्रक्रिया, प्रगतीचे धोरण व नियोजनाचा अभाव, मध्ययुगीन सरंजामी प्रवृत्तीचे नेतृत्व निसर्गावलंबी उपजिविका आणि प्रथा परंपरा, गाव-गणगोत यात जखडलेली आदिम मानसिकता, अशा अनेक वैशिष्ट्ये मराठा समाजाची सामाजिक मागासलेपणाच्या निष्कर्षापर्यंत पोहोचवण्यास उपयुक्त ठरु शकता."[११] संस्कृती ही सतत बदलत जाते. काळानुरूप त्यात बदल होत जातात.

निष्कर्ष :

१. मराठा संस्कृती ही उच्च राहणीमान, रुढी, परंपरा मानणारी आहे.
२. मराठ्याच्या इतिहासात निष्ठा मिळवण्यासाठी काही विशिष्ट पद्धती वापरण्यात येत असत.
३. मराठा संस्कृतीत लढाऊवृत्ती दिसून येते.
४. जुन्या रुढी-परंपरा, सण, समारंभ यांचा मोठ्या प्रमाणात अवलंब केला जातो.

ISSN 2231 4342

५. काळानुसार मराठा समाजात शिक्षण घेऊन स्त्रियांच्या राहणीमानात, विचार स्वातंत्र्यात फरक जाणवू लागला आहे.

६. मराठा जातीत पितृसत्तेचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. स्टुअर्ट गॉर्डन, **द मराठाज्,** डायमंड पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती, डिसेंबर, २०१६, पृ. ७
२. उपरोक्त स्टुअर्ट गाॅर्डन, पृ.१४
३. उपरोक्त स्टुअर्ट गाॅर्डन, पृ. १७
४. स्टुअर्ट गाॅर्डन, **' द मराठाज्'** डायमंड पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती, डिसेंबर, २०१६, पृ. १८
५. भांडारकारकृत, **' दक्षिणेचा इंग्रजी इतिहास'** पृ.११
६. देशमुख के.बी., **'क्षत्रियांचा इतिहास; भाग-२'**, पृ. ११५ ते ११७.
७. उपरोक्त, देशमुख पृ.११९
८. कर्वे इरावती, **' संस्कृती**; देशमुख आणि कंपनी पब्लिकेशन्स, दुसरी आवृत्ती, २००६ पृ. ९८ ते ९९
९. उपरोक्त, कर्वे इरावती, पृ. १०७
१०. सराटे बाळासाहेब, ' मराठा आरक्षण लढा सामाजिक न्यायाचा; छत्रपती शिवाजी प्रबोधिनी, औरंगाबाद, पहिली आवृत्ती सप्टेंबर २०१५, पृ. ४२
११. बाळासाहेब सराटे व इतर, **'सामाजिक मागासलेपणाचे समाजशास्त्रीय विश्लेषण'** हर्मिस प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती जुलै २०१८, पृ. १०

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

खानदेशातील राजपुत समाजाचा सामाजिक जीवनाचा अभ्यास

राजपूत सरिता
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ औरंगाबाद.

खानदेशात सत्ता उपभोगल्यानंतर साम्राज्याच्या राजवटीने खानदेशात सत्ता उपभोगल्यानंतर खानदेशावर सातवाहन घराण्याची सत्ता प्रस्थापित झाली होती. प्राचीन कालखंडतील या नामांकित घरांनानच्या सत्तेमध्ये शुंग,राष्ट्रकुट यादव,चालुक्य,शिलाहार इ.घराण्याची सत्ता होती . माद्यायुगीण कालखंडात फारुकी, मोगल घराण्यांनी वर्चस्व निर्माण केला. १८१८ नंतर खानदेश इंग्रजांच्या अधिपत्याखाली गेला. या खान्देशला ,कांदेश, दान्देश , सेउन्देश, कान्हेरी देश म्हणून ओळखले जाते .

भौगोलिक दृष्ट्या खानदेश महाराष्ट्राच्या उत्तरेकडील एक प्रादेशिक विभाग आहे . म्हणून त्यास उतार महाराष्ट्र म्हणून ओळखले जाते. या विविध समाज , धर्माचे लोक गुण्या , गोविन्द्याने नांदत आहे. अश्याच विविधतेतील समाजात राजपूत समाज हा आपल्या रूढी , परंपरा,जपून येथे एकवटलेला आहे . संशोन्दक येथे राजपूत समाजाच्या सामाजिक जीवनाचा थोडक्यात आढावा गेट आहे .

सामाजिकजीवन:-

खानदेशातील राजपूत समाजामध्ये पितृसत्तात्मकपरिवारआहे. कुंटुबातील प्रमुख व्यक्ती हा कुंटुंब प्रमुख असतो . परिवारातील सर्वच सदस्य कुंटुंब प्रमुख असतो . त्यांचाआदेश हा सर्वात महत्वाचा असतो . परिवारातील सर्वच सदस्य एक सोबत राहतात . आजही या समाजात एकत्र कुंटुंब पद्धती आहे . या समाजाने आपली संस्कुती आजही जपून ठेवलेली आहे .

संस्कुती म्हणजे मानसिक उत्तीचा दर्शक असा जीवनक्रम किंवा आदर्श वर्तन पद्धती होय.(१)

“ वासुदेव कुटुंब“(२) असा आदर्श ठेवून हा समाज पुढे जात आहे .

संस्कृती आणि परंपरा :-

“ सामाजिक संस्कार हे भारतीय जीवन प्रणालीचे एक महत्वपूर्ण अंग आहे . झालेला असावा . संस्काराचे शास्त्रीय अर्थ सर्वप्रथम ‘वृह्दाण्यीकोप्रिश्दमध्येआहे.(३)

१) बालकाचाजन्मोत्स वाजविले जात असे

‘मुल जन्माला येणे हा आन्दाचा क्षण म्हणून त्त्याच्याकडे बघण्याचा प्रघात आहे . मुलाच्या जन्माच्यावेळी सूप(सुपडा) वाजविले जात असे .(४) आजही न्हावी,भाट,मांग, यांच्यामार्फतमुलीच्या सासरी निरोप पाठवला जातो . मध्ययुगीन काळात मुलीस अपशकून समजून तिला जन्मताच तंबाखू खाऊ घालून मारले जात असे आज च्या २० व्या शतकात ह्या मुली पुरुषांच्या बरोबरीने उद्धोग ,व्यवसायात, पुढे आहे .

 ISSN 2231 4342

माजी राश्रापती प्रतिभाताई पाटील (शेखावत) ह्या पाटील राजपूत असून त्यांनी ह्या भारताचा कारभार चांगला सांभाळला.

२} विवाह पद्धती :-

मानवी संस्कारामध्ये विवाह संस्था मुख्य असून सोळा संस्कारामध्ये ती केंद्रशनी आहे . विवाहानेकुंटुबाची स्थापना होते. यामध्ये स्त्री – पुरुषांचा अंतर्भाव असतो . या विधीस दर्माची , कायद्याची मान्यता असते .

लुघडी:-

राजपूत समाजात मुलगी – मुलगा पसंद आल्यानंतर लुध्दीचा कार्यक्रम ठेवतात . लुघाडीलाच साखरपुडा म्हणतात . ब्राम्हणाच्या मंत्र उक्च्चाराने वधूच्या घरी हा लुध्दीचा कार्यकम केला जातो . फळ, नवीन वस्त , अंगठी बोटात टाकतात .

२) पत्रिका लिखी :-

विवाहाची तारीख निश्चित झाल्यानंतर ब्राम्हणाच्या हातून कुल, गोत्र पाहून पत्रिका लिहिली जाते . त्या पत्रीकाला लाल कुंकूनेस्वस्तिक काढली जाते .

३}लगन रखना :-

माद्यायुगीण कालपासूनच राजपुतांच्या लग्नाचा विधी हा १५ – २०दिवसाचाअसतो पूर्वी सकाळी पाहते ४ वाजता लग्न लागायचे आता हा कार्यक्रम ७ ते ९ दिवस अगोदर सुरु होतो . ह्यामध्ये वाढू कडून लाल रंगाचे लुगडे , साडी येत असते . भाऊबंद, सगे सोयरे गोळाकसार होऊन ब्राम्हणाच्या हस्ते हे लुगडे वरच्या हातात कुंकू , अक्ष्द लाऊन दिले जाते . व येथे सर्वांच्या सामोर पत्रिका वाचली जाते .

खान माती :-

राजपूत समाज हा निसर्ग पूजक असल्यामुळे , सात सुवासिनीच्या हातून(पंढरीतील) शेतातील माती कुदळीने खादून त्यावर शेन ठेवून त्यावरहरभर्याचीडाळ ,तांदुळाचाकासार, पूवे, करून भू-मातेला लग्नासाठी अम्त्रीत केले जाये . व त्या मातीचे घरी चूल , कोठी बनवली जाते .

बनवाली जाते .

बनायक ठेवणे :-

संध्याकाळी लगन ठेवल्यानंतर वर व वधूच्या संराख्श्राष्टी गणपती म्हणून एका कुवार्या लहान मुलास बनायक केले जाते . वर, वाढू जेथे जातील तेथे हा बनायक सोबत असतो .

सोन्दाड पूजन:-

सोन्दाड हे वृक्ष असून ह्या वृक्षाला ह्या समाजात अत्यंत महत्व आहे . आपल्याभाऊ ब्द च्या हातानी ह्या झाडाखाली पूजा करून पितृ लोकांना आव्हान करून गायीच्या गोत्रीचा धुपार करून पितृ लोकांना आव्हान

करून गायीच्या गोवरीवर अग्यारी टाकून , तुपाची आहुती दिली जाते . पूर्वीलग्ना अगोदरबोकड कापला जात असे . पशु बळी न देता लग्न प्रसंगी शुभ मानून तील व गुल मिश्रित बोकड च्या आकाराचा बोकड तयार केला जातो . वतोवर वाढू च्या हस्ते कापून तो भाऊ बंद च्या हातून नारळ फोडून प्रसाद म्हणून वाटला जातो .व ठ वर , वधूचे पाच केस आत्याच्या हातून कापले जातात .

ह्या समाजाचे लग्न वैशिते म्हणजे ह्यांच्या प्रत्येक कार्यक्रमात गीत गायले जाते.(५)

हळदी:-

लग्नाच्या एक दिवस अगोदर हळदीचा कार्यक्रम असतो .हि हळद घरीच जात्यावर दलाली जाते .१.२५ किलो हळदीचा वापर वर ,वाढू ला लावण्यासाठी केला जातो .

सात फेरे :-

हळदी लग्नानंतर वधु ,वरचेमंगलस्तान झाल्यानंतर वधू हिरव्या मंडपात पिवळे वस्त्र परिधान करून धने झालेण्यसाठी जाते. व त्या नंतर नववस्त्र परिधान करून हिरव्या मंडपात येऊन बसल्यानंतर कान्यादान केले जाते . नंतर ब्राम्हणाच्या मंत्र उच्चारणे सात फेरे फिरले जातात . सहा फेरे वधु वराच्या पुढे असते तर सातव्या फेऱ्याला वर वधूच्या पुढे असतो . अग्नीला साक्षी मानून हे सप्तपदी पूर्ण केले जाते . दुसऱ्या दिवशी वधू व वर दुधा –भाती खेळतात. ताव्याच्याभाडनात पाणी,दुध, दुवा,चांदीचा देला टाकून वधू व वरला सात वेळेस शोधावे लागते . येथून पुढे त्यांच्या वैवाहिक जीवनाला सुरुवात केली जाते.

अंत्येष्टी संस्कार:-

हा मनुष्याच्या जीवनातील अंतिमसंस्कार असतो, जो मानवाचे निधन झाल्यानंतर संपन्न केला जातो . म्हणून ह्या संस्काराला सोळा संस्कारापैकी अशुभ समजले जाते . म्हणून अधिकांश ग्रहसूत्रामध्ये ह्या संस्काराचा उल्लेख नाही .

संदर्भ:-

१) आहेर पी . – शेक्षणिक विचारवंत आणि समाजसुधारक प्र .॥
२) मंदार रामदाशी – श्री शिवछत्रपती – समर्थ योग्य
३) उपकार प्रकाशन प्राचीन भारताचा इतिहास ,मानसिक प्र .८
४) डॉ. नरेसिंह परदेशी – खानदेशातील राजपुतांचा इतिहास प्र .५८
५) मुलाखत – परदेशी आहिल्याबाई ईश्वर १०/०२/२०२१

छत्रपती शिवाजी महाराज यांचे शेती विषयक धोरण

संशोधक
प्रा. डॉ. देशमुख बी. जी.
राज्यशास्त्र विभाग
शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय कन्नड

प्रस्तावना

मध्ययुगीन भारताचा इतिहास समजून घेत असताना मराठा कालखंडातील इतिहास समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे त्याशिवाय या देशाच्या इतिहासा सपूर्णत्व येऊ शकत नाही छत्रपती शिवाजी महाराज या सर्व घटनांचे पूजा स्थान होते ना कष्टकर्‍यांना स्वाभिमानी लोकांना सोबत घेऊन त्यांनी स्वराज्याची स्थापना केली राज्य आपले आहे आणि मी त्या सत्तेत प्रत्यक्ष सहभागी आहे ही भावना यादुर्लक्षित शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाली यातूनच स्वराज्याचा पाया हा आपणास भक्कम झालेला दिसतो.

जगाच्या इतिहासात भारत देश हा शेती प्रधान देश म्हणून ओळखला जातो येथील जनतेचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे पेरले ते उगवते प्राचीन इतिहास पूर्वकाळात शेतीचा शोध हा स्त्रियांनी लावल्याचा समजते व तेव्हा पासूनच मनोहर ताई जीवन जगू लागला होता शेतजमीन लागवडी खाली आणत असताना मानवाला बऱ्याच गोष्टीची गरज भासू लागली मशागतीची कामे करण्यासाठी स्त्रिया व पुरुष यांनी कामाची वाटच केली त्याच बरोबर शेतीची अवजारे बी-बियाणे जनावरे आणि पिकांसाठी पाण्याची सोय अशा विविध गोष्टी आल्या आणि शेती करणारा एक वर्ग तयार झाला वेगवेगळ्या राजवटीमध्ये तुरळक राज्यकर्त्यांनी शेतीसाठी व शेतकऱ्यांच्या साठी सेवा व सुविधा देण्याचे काम केले परंतु राजा बदलला की शेती व शेतकरी विषयीची परिस्थिती सुद्धा बदलत असते आणि आजच्या काळातही शेतकरी वर्ग दुर्लक्षित आहे ही एक शोकांतिका आहे

शिवकाळ आणि शेती

मध्ययुगीन काळात महाराष्ट्रमध्ये मराठ्यांची सत्ता स्थापन झाली आणि खऱ्या अर्थाने कृषी व्यवसायाच्या विकासाला सुरुवात झालेली आपणास दिसून येते या अगोदरच्या मुस्लिम शासकांनी अधिकाधिक शेतसारा वसूल करून कृषी व्यवसायाच्या विकासाकडे दुर्लक्ष केलेली आपणास दिसून येते त्यानंतर मात्र महाराष्ट्रमध्ये मराठ्यांची सत्ता स्थापन झाली आणि यावेळी महाराष्ट्रातील कृषी व्यवसायाची भरभराट झालेली आपणास दिसून येते शिवकालीन समाजात आर्थिक व्यवहाराचा केंद्र बिंदू म्हणजे खेडे होय शेती व्यवसाय हा प्रमुख होता आणि तू निर्वाहाचे साधन होते ज्यांना गावात शेती असेल तेच गावाची प्रमुख रहिवासी असत यात प्रामुख्याने गावचे वंशपरंपरागत अधिकारी वतनदार जमिनीचे मालक मिरासदार आणि ग्रामसेवक व बन्सीधर यांचा

 ISSN 2231 4342

समावेश असे ज्यांना शेतसारा माफ असे अशा लोकांना वतनदार म्हणत पाटील कुलकर्णी चौगुला हे गावचे तर देशमुख देशपांडे परगण्याची वतनदार असत सरकार व रयत यांना जोडणारा दुवा म्हणजे पाटील आणि देशमुख

छत्रपती शिवाजी महाराजांचे महसूल विषयी धोरण

छत्रपती शिवाजी महाराजांनी महसूल वसुलीसाठी स्वराज्यातील शेतीच्या उत्पादकतीन नुसार क्रम ठरविलेला आपणाला दिसून येतो त्यांनी महसूल वसुलीसाठी प्रत्यक्ष प्रशासन व्यवस्था स्थापन केली त्यामुळे परंपरागत महसूल वसुलीमध्ये शेतकऱ्याकडून जो अतिरिक्त महसूल घेतला जात होता तो बंद झाला जे आधीच शासकांनी केले नव्हते ते छत्रपती शिवाजी महाराजांनी मध्ययुगीन महाराष्ट्रातील कृषी व्यवसाय विकसित करण्यासाठी आणि उपाय योजना केलेल्या आपणाला दिसून येतात शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील शेतीचा विकास करण्यासाठी तीन महत्त्वाचे उपाय योजना केलेल्या आपणास दिसून येतात 1. नापिक जमीन पिकाऊ करणे 2. पिकांचे व शेतकरी यांचे रक्षण करणे 3. राज्यातील सर्व जमिनीचे मोजमाप करून सारा आकारणी करणे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतसारा वसूलमध्ये मध्यस्थांची उच्चाटन करून महाराष्ट्रातील शेतीव्यवसायाला एक प्रकारचे उत्तेजक दिलेली आपणास दिसून येते महाराष्ट्रातील शेती व्यवसायाच्या विकासातील महत्त्वाचा अडथळा ठरणारा जमीनदारवर्ग यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रत्यक्ष आपल्या नियंत्रणामध्ये ठेवण्याचे महान कार्य केलेले दिसून येते

शेतसारा आकारणीसाठी सरकारच्या दप्तरात लागवडीखाली जमीन तिच्यात येणारी पिके आणि अंदाजे उत्पन्न यासर्वांची माहिती असावी लागे शेतसारा बहुदा उत्पन्नाच्या 2/5 इतके असे राज भाग पचादुई असा उल्लेख आढळतो जय देश शकावलीतील संदर्भा नुसार 1677 साल पासून शिवाजी महाराजांनी आपल्या प्रदेशात बटाट्याचा अंमल सुरू केला भटाई म्हणजे उत्पन्नाचा निम्मा भाग बटआईचा तह ज्या भागात असेल तेथेच शेतकऱ्यावर इतर सरकारी कर लादली नाही

जमीन मोजणी

शिवाजी महाराजांनी जमीन मोजण्यासाठी वापरलेल्या गजाला शिवशाही काठी म्हणत ती पाच हात व पाच मोठी लांबीची असे हात हात मुठीच्या बरोबर असे एक मुठ दोन तसूच्या बरोबर असे 20 चौरस काठ्याचा एक पांड होई व वीस पांडचा एक बीघा होई आणि एक शेवीस चौरस बीघे म्हणजे एकचावर होय दुसऱ्या शब्दात 80 तसू बरोबर एक काठी व 400 चौरस काठ्या एक बिघा असे चिटणीस बखरीत नमूद केल्या प्रमाणे शिवाजी महाराजांच्या काळात जमिनीची मोजणी ती नवेळा झाली होती. प्रत्येक बिगयास किती पीक व्हावे हे उभ्या पिकांची पाहणी करून ठरवित याउत्पन्नाच्या पाच तक्षिमा करून तीन तक्षिमा लागवड करणाऱ्या शेतकऱ्याने भोगावे व दोन तक्षिमा सरकारला द्यावा असा करार असे हे सरकार देणे शेतकऱ्यांनी धन्याच्या किंवा नगदीच्या रूपाने द्यावे दहा अवर्षणदी संकट समयी शेतकऱ्यांना सढळ हाताने तगाई देत ही तगाई ची रक्कम त्यांनी चार व

 ISSN 2231 4342

पाच वर्षाच्या हप्त्याने फेडावी लागवडीस न आलेल्या जमिनीन व्या रयतेस द्याव्या झाल्यास म्हणजे त्यांच्या पाशी गुरे ढोरे नसल्यास त्यांना ती सरकारातून द्यावी तिला बीजास व दाना द्यावा व पीक होई पर्यंत निर्वाहासाठी धन्य व पैसा द्यावा दोन-चार वर्षांनी हा ऐवज उजवून द्यावा याप्रमाणे रयतेस कॉल देऊन जमिनी इस्ताव्याने दिल्या व बहुतेक सुपीक जमीन लागवडीखाली आणली उत्पन्नाचा आजमास पाहून रयतेवर कर बसवावा जुलुम असा कोणावर करू नये अशी अधिकाऱ्यास सक्त ताकीद असे

शेती साठी उपाय योजना

छत्रपती शिवाजी महाराज शिवापुरम आल्यावर त्यांना अमराई तयार करण्याची इच्छा झाली म्हणून त्यांनी पाण्यासाठी कालवा खोदण्याचा आदेश दिला होता शिवकाळामध्ये जो कोणी पुढाकार घेऊन पाटबंधारा बांधून ते पाणी शेतीसाठी वापरीत असे त्यास महाराज हे शेतजमीन इनाम देत असे शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांना आदेश दिला होता की शेतीसाठी कालव्याचे पाणी दर आठ दिवसांनी एकदाच वापरले जावे त्याकाळामध्ये दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांच्या डोक्यावरील आर्थिक बोजा कमी करण्यासाठी सर्व कर रद्द केल्याचे आपणास दिसून येते

शिवाजी महाराजांचे कृषी विषयक धोरण कल्याणकारी राज्याच्या स्वरूपाचे होते त्यांनी वेगवेगळ्या सुभेदारांना लिहिलेली पत्रे प्रसिद्ध झालेली आहे या पत्रांमधून रयते विषयी महाराजांची किती तळमळ होती हे स्पष्ट होते रयतेला काडीचा जरी पत्र झाला तरी महाराज तो सहन करणार नाही असा इशारा त्यांनी प्रभावळीचा सुभेदाराला लिहिलेल्या एका पत्रांमध्ये आढळतो जलश शेतकरायची कुवत आहे पण त्याच्याकडे बैल नांगर बी-बियाणे नाही त्यांना सर्व साहित्य पुरवावे शेतकऱ्यावर कर्ज वसुलीसाठी बळजबरी करू नये युद्ध काळात शेतकऱ्यांचे रक्षण करणे ही वतनदारांची विशेषतः देशमुखांची जबाबदारी मानली जात शेतकऱ्याला दिलेला पैसा हा बिनव्याजी असेल शेतकऱ्याकडून भाजीच्या देठाची ही अपेक्षा करता कामा नये अशी अधिकाऱ्यांना सक्त ताकीद देण्यात आली होती शेतकऱ्याने गाव सोडून जाऊ नये म्हणून हर तऱ्हेचे प्रयत्न केले जात

सरांश

अशा प्रकारे हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे शेती विषयक व शेतकऱ्याविषयक कल्याणकारी शेतकऱ्यांना तारक असेच धोरण होते शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे या न्यायानेच त्यांचा सन्मान केला त्यामुळेच इथली प्रजा छत्रपती शिवाजी महाराजांना आपला मानत असे व त्यांच्या साठी प्राण देण्याचे ही तयार होत असे अशाच रयतेच्या आपलेपणातूनच स्वराज्य निर्माण झाले होते

ISSN 2231 4342

संदर्भसूची

1. कुलकर्णी अ रा आणि खरे गह,मराठ्यांचा इतिहासखंड1, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे 2006 ,पृ. 340

2. चिटणीस के एन, मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग 2, विशाल प्रिंटर्स, पुणे 1985 पृ. 28 व 29

3. उपरोक्त, पृ. 12

4. पृष्ठ, 344

5. उपरोक्त, पृ. 344

6. देशपांडे प्रन, छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

वेरूळ लेणीतील चामुंडा

डॉ. भेलोंडे जगदीश व्यंकटराव
इतिहास विभाग प्रमुख
शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय,
कन्नड ता.कन्नड जि.औरंगाबाद 431103
मो.नं. 9860171998
jayeshbhelonde2008@gmail.com

औरंगाबाद जिल्ह्यातील वेरूळ येथे डोंगरामध्ये लेणी स्थापत्याची निर्मिती करण्यात आली. याठिकाणी असलेल्या एकूण 34 लेणी पैकी लेणी क्र. १ ते १२ ह्या बौद्ध धर्मीय व लेणी क्र. १३ ते २९ ह्या हिंदू धर्मीय तर लेणी क्र.३० ते ३४ ह्या जैन धर्मिय लेणी आहेत. बदामीचे चालुक्य व राष्ट्रकूटांच्या कारकिर्दीत या लेणींची निर्मिती झालेली आहे. हिंदू धर्मिय लेणींची निर्मिती ही प्रामुख्याने शिव या देवतेसाठी झालेली असल्याचे दिसते. शिव या देवतेबरोबरच विष्णु व त्याच्या परिवार देवता बरोबरच शक्ति देवतांचीही निर्मिती करण्यात आली आहे. शक्ति देवतांमध्ये सप्तमातृका शिल्पांची निर्मिती करण्यात आली आहे. या सप्तमातृकाशिल्पांमध्ये चामुंडा देवीचे मूर्तीशिल्प आहे. सप्तमातृका मूर्तीशिल्प व चामुंडा मूर्तीशील्पांच्या निर्मिती मागे काय प्रयोजन होते. स्थानिक इतिहासाच्या अनुषंगाने तत्कालीन समाजामध्ये सप्तमातृकांचे काय महत्व होते. या बद्धलच्या अभ्यासाच्या उद्देशाने सप्तमतृका व चामुंडा मूर्तीशिल्पाचा आढावा घेण्यात आला आहे.

भारतामध्ये प्राचीन काळापासून मातृदेवतांची उपासना केल्या जात होती. भारतातील प्राचीन संस्कृती असलेल्या सिंधु संस्कृतीच्या उत्खननात मिळालेल्या मूर्तीशील्पांपैकी बहुतांश स्त्रियांच्या प्रतिमा ह्या वेगवेगळ्या प्रकारातील आहेत. हडप्पा येथे मिळालेल्या मातृमूर्तीच्या योनीतून निघणारे रोपटे हे तिचे मातृत्व दर्शवते. अशा प्रकारच्या मातृत्व व प्रजननशक्तीच्या स्वरुपातील अनेक प्रकारच्या स्त्री मूर्ति मिळालेल्या आहेत. कृषक संस्कृती असलेल्या सिंधुजनांनी प्रजनन शक्तीचा संबंध पर्जन्याशी जोडला त्यामुळे जलदेवतांची मातृकांच्या स्वरुपात पूजा केली. मातृकांच्या मूर्ति शिक्के, भांड्यावरही पाहावयास मिळतात. मातृप्रधान सिंधु संस्कृतीमध्ये स्त्रियांचा समाजात असलेला दर्जा नंतरच्या काळात राहिला नाही. परंतु मातृदेवतांची उपासना परंपरेने कायम राहिली.

वैदिक काळातील ऋग्वेदामध्ये ‘अग्नायी,इंद्रायनी,वारूणायनी, शेदसी, महि, श्रक्षा, दक्षिणा, नद्य:(नदी), आप:(जल), पृथ्वी, औषधाय:राका(ज्योत्स्ना), रात्री(अंधार), उषस(सूर्यपत्नी), सूर्या(सूर्यपुत्री) गौरी(गाय),सीता(हराई) व अरण्यानी’[1] या मातृदेवतांचा उल्लेख आलेला आहे. मौर्य काळातील कौटिल्य याने लिहीलेल्या अर्थशास्त्र या ग्रंथात कोणत्या दिशेस कोणत्या देवतेचे मंदिर बांधावे हे सांगत असताना नगराच्या मध्यभागी देवींचे मंदिरे बांधावीत व देवांची मंदिरे ही नगराच्या चारी दिशेस असावी असे म्हटले आहे.[2] यावरून

 ISSN 2231 4342

मौर्य व मौर्योत्तर काळात देवींची पूजा केली जात होती. अनेक देवींच्या पूजा-अर्चा बरोबरच सप्तमातृकांच्या पूजनाची सुरुवात झाली. सप्तमातृकाची संख्या पुढे 8 व 64 पर्यंत होऊन 64 योगिनींचे मंदिर व मूर्तीशील्पांची निर्मितीही करण्यात आली. ओरिसातील हिरापुर येथे 64 योगिनींचे मंदिर आहे ज्यामध्ये त्यांचे मूर्तीशिल्पही आहेत. सप्तमातृकांची उपासना भारतातील विविध भागात केल्या जाते. आसरा किंवा जलदेवता म्हणूनही त्यांची उपासना केली जात. मातृकांचे मूर्तीशिल्प स्वतंत्र व मंदिरावरही आढळतात.

सप्तमातृकांच्या नावाविषयी मतभिन्नता आहे. देवी भागवत पुराणामध्ये "ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी व चामुंडा या सात मातृकांबरोबरच लक्ष्मीचा उल्लेख आलेला आहे."[3] डॉ.ग.ह. खरे यांच्या मते, वाराही, वैष्णवी, ऐंद्री, वामनी, नारसिंही या वैदिक अंश दाखविणाऱ्या तर गणेश, वीरभद्र, भैरव हे व माहेश्वरी, कौमारी, चामुंडा या अनार्य अंश सुचवितात.[4] मुळात अनार्य संस्कृतीशी, सिंधू संस्कृतीशी संबंधित असलेल्या जलदेवता, सातीआसरा विषयी असलेली परंपरा भारतीय कृषक संस्कृतीने आजही सप्तमातृकांच्या मूर्तीशिल्पांच्या व कृषक विधींच्या माध्यमातुन जपलेल्या आहेत.

चामुंडा देवी व शिल्प :

चामुंडा देवी शैव देवता परिवारातील आहे. कालिका ही देवी म्हणजेच चामुंडा होय. कालिका या देवीने चंड व मुंड या राक्षसांचा पराभव केला त्यामुळे ही देवी चामुंडा या नावाने ओळखली गेली. श्रीदुर्गासप्तशतीमध्ये चामुंडा या देवी विषयी अशा प्रकारे उल्लेख आढळतो की, "अत्यंत विस्तृत मुखे आणि विक्राळ दाढा असणाऱ्या देवी, काली ! तुझ्या गळ्यात रुंडमाळा व त्यातून लोंबणारे वाळलेले मांस,हे तुझ्या अघोररूपाचे दर्शन. त्या रूपाने चामुंडा बनून तू चण्ड-मुण्ड मारलेस. हे नारायणी,तुला आमचे वंदन !"[5] चामुंडा या देवीच्या मूर्तिची लक्षणे वेगवेगळ्या ग्रंथामध्ये वेगवेगळी आलेली आहेत. "अग्निपुराणाप्रमाणे या देवीला चार हात असून, त्यात शक्ती, चाकू, मुंड आणि शूल अशी आयुधे असावेत. अंशूमदभेदागमाप्रमाणे मुंड, शक्ति, वर आणि अभय तथा पूर्वकारणागमाप्रमाने मुंड, शक्ती, अग्नी आणि साप अशी आयुधे तिच्याकडे असावेत. प्रत्यक्ष मूर्तीत मात्र यापेक्षा बरेच फरक दिसतात खट्वांग हे चामुंडेचे अनिवार्य आयुध असून, खप्पर, तलवार, ढाल(खेटक), त्रिशूल वगैरेही तिच्याकडे रुचीभेदाने असतात. चामुंडा देवीला स्थानक, नृत्यरत, दोन्ही पाय टेकून किंवा सुखासनात बसलेली दाखवितात."[6]

या चामुंडा देवीची वाहने वेगवेळी असल्याचे दिसते. या देवीच्या वाहनांचे कार्य प्रेत, घुबड किंवा गाढवाला दिलेले आहे.[7] घुबड हे वाहन चामुंडा सुस्वरूप, जीवनदात्री, दुष्टविनाशिनी असल्याचे दर्शविते. तर प्रेत हे वाहन चामुंडा ही जीवन नष्ट करणारी दैन्यदायी होती, हे दर्शविते. चामुंडेची बदललेली वाहने तिच्या दोन वेगवेगळ्या स्वरूपाचे निदर्शक वाटतात.[8]

वेरूळ लेणीतील चामुंडा मूर्तीशिल्प :

वेरूळ येथील हिंदू लेणी मध्ये लेणी क्रमांक 14,15,16,21,व 22 मध्ये सप्तमातृकांचे शिल्प आहे. या सप्तमातृकांमध्ये चामुंडादेवीचे मूर्तीशिल्प आहे. लेणी क्र. 14 मध्ये गर्भगृहाच्या बाहेरील डाव्या बाजूच्या भिंती

 ISSN 2231 4342

मध्ये सप्तमातृकांचे शिल्पपट आहे. येथे सर्व मातृका सव्यललीतासनात असनस्त असून सप्तमातृकांच्या मांडीवर बालक बसलेले आहे. चामुंडादेवीच्या मुर्तीशिल्पाखाली देवीचे वाहन खुबड दाखवलेले आहे.

लेणी क्रमांक १५ मध्ये अंधकासूर मूर्तीशिल्पाच्या शिल्पपटामध्ये शिवाच्या पायाशेजारी डाव्या बाजूसा पार्वती व चामुंडा देवीचे मूर्तीशिल्प आहे.या ठिकाणी चामुंडा देवीचे वाहन घुबड दाखवण्यात आले आहे. चामुंडा देवीने आपला डावा हात वरकेलेला असून तिच्या हातात पात्र आहे. अंधकासुराला मारल्या नंतर त्याच्या रक्ताचे थेंब जमिनीवर पडू नये यासाठी चामुंडाने पात्र धरलेले आहे.

लेणी क्रमांक 16 मध्ये कैलाश लेणीच्या उजव्या बाजूच्या भिंतीवर अंधकासुराचे शिल्प आहे या शिल्पामध्ये शिवाच्या पायाजवळ चामुंडा दाखवलेली आहे. परंतु याठिकाणी चामुंडापेक्षा तिचा हातच स्पष्ट दिसतो. त्या हातामध्ये पात्र आहे. याच लेणी मध्ये चामुंडा देवीचे दुसरे शिल्प कैलाश मंदिराच्या मागच्या बाजूस शिवाच्या कल्याणसुंदर मूर्तीच्या डाव्या बाजूस असलेल्या शिल्पपटामध्ये अंधकासुराचे शिल्प आहे येथेही चामुंडा दाखवलेली आहे. या शिवाय यज्ञशालेतील सप्तमातृकाशिल्पपटामध्ये चामुंडा मूर्तीशिल्प असून देवीच्या मूर्तीचा वरील भाग पूर्ण भग्न अवस्थेत आहे परंतु मूर्तीच्या खाली दाखवलेल्या कुत्रा या वाहनावरून हे मूर्तीशिल्प चामुंडा देवीचे आहे हे स्पष्ठ होते.

लेणी क्रमांक 21 व 22 मध्ये सप्तमातृका शिल्पपटामध्ये चामुंडा दाखवलेली असून दोन्ही ठिकाणी तिचे वाहन अस्पष्ठ आहे.

थोडक्यात वेरूळ लेणीतील हिंदू लेणीमध्ये चामुंडा मूर्तीशिल्प दाखवताना शिवाच्या अंधकासुरवध मूर्तीशिल्पामध्ये व सप्तमातृकाशिल्प पटामध्ये दाखवले आहे. देशातील विविध भागात चामुंडेचे वेगवेगळे वाहन असलेले व वेगवेगळ्या स्वरुपातील मूर्ति पाहावयास मिळतात. परंतु वेरूळ लेणीमध्ये तीची मूर्ति संरक्षक व मातृका स्वरुपात आहे. चामुंडाचे वाहन येथे यज्ञशाळेतील मातृकाचे अपवाद वगळता घुबडच दाखवलेले आहे.

संदर्भ

1. डॉ. देशमुख किरण, डॉ. जगदाळे दत्तात्रय-महादेव्यै नमो नमः-निर्मल प्रकाशन नांदेड-2010 पृ. 25
2. डॉ. कुलकर्णी र.पु. कौटिलीय अर्थशास्त्रातील शिल्पशास्त्र- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुणे-2004 पृ.87
3. डॉ. कठारे अनिल,डॉ. साखरे विजया- मंदिरे आणि मूर्तिशिल्प-अल्फा पब्लिकेशन्स, नांदेड- 2008 पृ.146
4. डॉ. खरे गणेश हरी- मूर्ती विज्ञान- भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे - 2012 पृ.186
5. श्री दुर्गासप्त शती (मराठी अर्थासह) पृ.क्र.२११
6. डॉ. देशमुख किरण, डॉ. जगदाळे दत्तात्रय-उपरोक्त - पृ.50-51
7. भारतीय मूर्तीशास्त्र- डॉ.नि.पू. जोशी - प्रथमावृत्ती 1979 पृ.243
8. डॉ.देशमुख किरण,डॉ.जगदाळे दत्तात्रय-उपरोक्त - पृ.51

ISSN 2231 4342





लेणी क्रमांक १५ मधील चामुंडा   लेणी क्रमांक १६

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342





लेणी क्रमांक १६

लेणी क्रमांक १६

ISSN 2231 4342

शारीरिक शिक्षण आणि आरोग्य

संशोधक मार्गदर्शक
डॉ. उदय परमेश्वर डोंगरे
क्रीडा संचालक
शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, कन्नड
डॉक्टर भूषण पोपटराव जाधव
क्रीडा शिक्षक
सेक्रेड हार्टस्कूल ,ठाणे

प्रस्तावना

अन्न वस्त्र आणि निवाराया मानवाच्या मूलभूत गरजा आहेत परंतु सर्वात महत्वाची गरज म्हणजे आरोग्य होय आणि आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी चांगला आणि समतोल आहार गरजेचा आहे म्हणून सर्वात महत्वाची गरज म्हणून आराखडे पाहिले जाते व्यक्तीला वस्त्र निवारा मिळाला नाही तरी तो जिवंत राहू शकतो परंतु अण्णाविना जिवंत राहणे अशक्य आहे त्यातही खेळाडूंना स्वतःचे आरोग्य व तंदुरुस्तीकी ठेवायची असेल तर योग्य आहाराची गरज आहे जसे वाहन रस्त्यावर डिझेल किंवा पेट्रोल शिव्या देऊ शकत नाही तसेच व्यक्तीचे शरीर आहारा शिवाय कार्य करू शकत नाही.

मानवी शरीरात उष्णता निर्माण करण्यासाठी आणि शरीर कार्यरत ठेवण्यासाठी समतोल आहाराची नितांत आवश्यकता असते शरीराला आतून सर्व प्रकारचे घटक योग्य प्रमाणात मिळतात तो आहार म्हणजे उत्कृष्ट आहार होय पेशींची नवनिर्मिती करण्यासाठी आहाराची आवश्यकता असते खेळाडूंच्या दैनंदिन जेवणात पिष्टमय पदार्थ सिग्नपदार्थ प्रथिने जीवनसत्व शार आणि पाणी या घटकांचा उपयोग योग्य प्रकारे केल्यास खेळाडूंच्या आरोग्यावर चांगला परिणाम होऊन खेळाडूंच्या क्रीडा कार्यक्रम मनावर चांगला परिणाम होतो.

चांगल्या आरोग्यासाठी संतुलित आहार आणि स्वच्छ परिसर असणे गरजेचे आहे आरोग्यामुळे आपल्या इंद्रियांची कार्य सुरळीत पारपडत असतात काम करण्यास उत्साह वाटतो शारीरिक आणि मानसिक सामर्थ्य वाढते आणि त्याच्या पोषण मूल्ययासंबंधी असलेल्या गैरसमजुती आणि अज्ञानामुळे शरीर पोषण नीट होत नाही त्यामुळे आरोग्य ढासळून धोक्यात येते केळी खाणे तेलकट पदार्थांचा अती समावेश मिठाचा अतिरिक्त चहा-कॉफीचे व्यसन शीतपेये मद्यपान तंतुमय पदार्थांचे अतिसेवन अतिमांसाहार व्यायामाचा आभाव आणि जंगपुढचे पॅशन यामुळे आरोग्य धोक्यात येते जंकफूड उर्फ फास्टफूड हे पाचशे त्यांनी आपल्या देशाला दिलेली एक विशेष आहे आपल्याकडे चविष्ट चटपटीत आणि खाद्यपदार्थ मिळत नाही आपल्या डोक्यात जंकफूडचे फॅड वाढत चालले आहे याच पाश्चात्त्यांच्या फास्टफूडमुळे त्यांचे या covid-19 काळात त्यांचे आरोग्य किती धोक्यात

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

आले आहे हे आपल्याला समजते त्यांची प्रतिकार क्षमता किती कमी आहे हे कळते त्यापद्धतीने विचार केला तर आपल्याकडे covid-19 चे पेशंट वाढत असले तरी भारतीयांची प्रतिकार क्षमता चांगली असल्याने ते या विषाणू प्रतिकार करू शकत आहेत त्यामुळे भारतीयांचा योग्य आहार असल्यामुळे त्यांचे आरोग्य चांगले असल्याचे दिसून येते.

***खेळाडूंचे आरोग्य व आहार;**

1. **पिष्टमय पदार्थ:**

खेळाडूंच्या शारीरिक आरोग्यासाठी पिष्टमय पदार्थांचे सर्वात महत्त्वाचे कार्य असते कारण पिष्टमय पदार्थमुळे शरीरात उष्णता आणि शक्ती निर्मितीचे महत्वाचे कार्य होते गहू ज्वारी बटाटे तांदूळ बाजरी मोड आलेले धान्य रताळी विविध फळे आणि साखर इत्यादी पदार्थांमध्ये कार्बोहायड्रेट्स भरपूर प्रमाणात मिळतात केवळ पिष्टमय पदार्थांच्या अति सेवनामुळे सुद्धा खेळाडूंच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

2. **प्रथिने :**

प्रथिने यास इंग्रजीमध्ये प्रोटीन असे म्हणतात प्रोटीन याशब्दाचा अर्थ प्रथम स्थान घेणारा असा आहे प्रतिनिधी हे शरीर विकासासाठी पोषकतत्व आहेत प्रथिने शरीराच्या सर्व कार्यावर नियंत्रण ठेवतो प्रथिनेचे महत्त्वाचे कार्य म्हणजे शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढविणे पाचक द्रव्यांची निर्मिती करणे जखमा भरून काढणे शरीराची झीज भरून काढणे पेशींची निर्मिती करणे इत्यादी होय प्रथिने वृद्धीच्या दृष्टीने आहार म्हणजे अंडी दूध मांस मासे व इतर मांसाहारी पदार्थ सर्व प्रकारचे कडधान्य मसूर मटकी सोयाबीन आणि राजमा होय.

3. **स्निग्ध पदार्थ:**

खेळाडूंच्या आहारामध्ये स्निग्धपदार्थ सेवन अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते स्निग्ध पदार्थाच्या सेवनामुळे शरीरात उष्णता आणि शक्ती निर्माण होते निधन पदार्थात प्राणी जन्य व वनस्पतिजन्य असे दोन प्रकार पडतात लोणी तूपमलाई इत्यादी पदार्थ आणि कर्डी आणि भरमुग इत्यादीच्या त्यात त्याचे प्रमाण अधिक असते निधन पदार्थाचे सेवन प्रमाणात असणे आवश्यक असते अतिसेवनामुळे सुद्धा खेळाडूंच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

4. **जीवनसत्वे:**

खेळाडूंच्या शारीरिक रक्षणासाठी जीवनसत्वे अत्यंत उपयुक्त ठरतात कारण जीवनसत्वे शरीर संरक्षक पोषण तत्वे असतात शरीरातील पेशींची कार्यक्षमता वाढविण्यासाठी जीवनसत्त्वाची नितांत आवश्यकता असते जीवनसत्वाची अ ब क क ड इ इत्यादी प्रकारात विभागणी करण्यात आली आहे जीवनसत्वाच्या अभावी त्वचा आजार आतड्यांचे आजार रोगप्रतिकार शक्तीचा अभाव हाडांचा ठिसूळपणा बालकांना मुडदूस नावाचा आजार रातांधळेपणा रक्तशय आणि वंध्यत्व इत्यादी दोष निर्माण होतात दूध हिरव्या पाले भाज्या पालक मेथी मासे अंडी

गहू आणि विविध मोड आलेली कडधान्य आवळा विविध फळे इत्यादीच्या माध्यमातून आपणास जीवनसत्वे मिळतात.

5.क्षार:

मानवी शरीरात सर्वात जास्त प्रमाणात असणारे खनिज द्रव्य म्हणजे कॅल्शिअम होय शरीराची निकोप वाढ करण्यासाठी व चांगल्या आरोग्यासाठी क्षार हा घटक अत्यंत महत्त्वाचा असतो खेळाडूंच्या शरीरामध्ये अनेक प्रकारची असतात उदाहरणात कॅल्शियम फॉस्फरस लोह आयोडिन क्लोरीन सल्फर मॅग्नेशियम पोटॅशियम सोडियम क्लोराइड आणि झिंक इत्यादी असतात हे क्षार दूध हिरव्या पालेभाज्या पालक मेथी मासे अंडी गहू व कडधान्य इत्यादीच्या माध्यमातून मिळत असतात.

6. **पाणी :**

जल ही जीवन आहे असे म्हटले जाते जीवन जगण्यासाठी पाणी अत्यंत महत्त्वाचे असते पाण्या अभावी व्यक्तीचे जीवन काहीच नाही माणसाचे शरीर हे 70 टक्के ते 80 टक्के पाणी यापासून बनलेले आहे व्यक्ती पाण्यावाचून काही दिवसच जिवंत राहू शकतो शरीराचा दोनच दिवस भाग पाण्याने व्यापलेला आहे पाचकरस निर्मिती करणे पोषक तत्त्वांचा पुरवठा करणे अन्नाचे पचन करणे शरीरातील निरूपयोगी द्रव्यांचे उत्सर्जन करणे शरीराचे तापमान नियंत्रण ठेवणे इत्यादी कार्य पाणी करते प्रत्येक व्यक्तीने दररोज भरपूर पाणी पिले पाहिजे त्यामुळे शारीरिक आरोग्य चांगले राहते.

आपणास समजते की शारीरिक शिक्षण आणि आरोग्ययात आहाराचा किती महत्त्वाचा भाग आहे विविध माध्यमातून जंतू माणसाच्या शरीरात जात असले तरी खाणे आणि पिणे यातून सर्वात जास्त विषाणू पसरतात त्यामुळे आपल्या खाण्यापिण्यावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे कुजलेले वास येणारे किंवा आडव्यापडलेल्या पदार्थांची ताबडतोब विल्हेवाट लावावी चांगले जेवण रस्त्यावर टाकण्यापेक्षा इतरांना दान केले पाहिजे किंवा जनावरांना घातल्यास त्यावरची दुर्गंधी कमी होईल नैसर्गिक आंबट असलेल्या पदार्थांचा म्हणजेच चिंच लिंबू पातळ ताक इत्यादी पदार्थांचा समावेश आपल्या जेवणात करावा घेण्यापेक्षा फळे चावून खाल्ल्यास पचण्यास लवकर येतात मिरी लसूण हिंग सुंठ हळद कोथिंबीर जिरं या सारख्या मसाले पदार्थांचा योग्य प्रमाणात समावेश करावा जेवणा वेळी भारतीय बैठकीत सारखे बसून अन्नग्रहण करावे टीव्ही समोर बसून जेवण टाळावे कारण त्यामुळे आपले जेवण पचण्यास कठीण जाते ज्यांची आहाराची पद्धत उत्तम त्यांचे आरोग्य उत्तम आणि म्हणूनच म्हणतात की आरोग्यम्धन संपदा

निष्कर्ष :

मानवी शरीरात उष्णता निर्माण करण्यासाठी आणि शारीरिक कार्य ठेवण्यासाठी अतुल आराची नितांत आवश्यकता असते पेशींची नवनिर्मिती करण्यासाठी आहाराची आवश्यकता असते खेळाडूंच्या दैनंदिन आहारात पिष्टमय पदार्थ स्निग्ध पदार्थ प्रथिने जीवनसत्त्वे पाणी याघटकांचा उपयोग योग्य प्रमाणात केल्यास खेळाडूंच्या आरोग्यावर चांगला परिणाम होऊन खेळाडूंच्या क्रीडा कार्य मनावर चांगला परिणाम होतो

संदर्भग्रंथ:

1. धनवडे दीप्ती, निरोगी जीवनासाठी आहार , ओमपब्लिकेशन , कोल्हापूर, 1987.

2. गंदग के एन , मारतळे , आरोग्य शिक्षण योग आणि प्रथम उपचार,समर्थपब्लिकेशन,नांदेड.

3. डॉ.बाखरू हरेकृष्ण, आरोग्यदायी जीवनसत्वे, रोहनप्रकाशन,पुणे, 2003.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

शारीरिक शिक्षण आणि भविष्यातील संधी

प्रा. डॉ. सुरेश माणिकराव नलावडे
क्रीडा विभाग प्रमुख
श्री शिवछत्रपती कला महाविद्यालय,पाचोड
मो. नं.8975966875

प्रस्तावना:

आपण लहानपणा पासून वेगवेगळे खेळ खेळत असतो इतकेच काय जन्माला आल्यापासून हातपाय यांच्या हालचालीतून व्यायाम करत असतो अशा वेळी हे खेळ आपण फक्त मनोरंजन म्हणून खेळतो परंतु आज घडीला खेळाकडे फक्त मनोरंजन म्हणून न बघता त्यातून आपले भविष्य घडविण्याच्या दृष्टिकोनातून पाहिले जात आहे.

आज एक विसाव्या शतकात जग लहान होत चालले आहे आपण खेळत असलेले खेळ आता केवळ आपली गल्ली आणि आपला गाव इथपर्यंत मर्यादित राहिलेले नाहीत आज आपण ग्रामस्तरावर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळत आहोत शालेय तालुका जिल्हा विभाग राज्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळांचे आयोजन होते आणि मुले खेळून येत आहेत शालेय स्तरापासून अथवा ग्रामस्थांनापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत जाण्यासाठी खेळाडूचा किती तरी वेळ व वर्षया मध्ये जात असतात संपूर्ण शारीरिक कष्टमानसिक स्थिरता संयम जिद्द आणि चिकाटी याठिकाणी दिसून येते अशावेळी असा खेळाडू आपल्या भविष्याकडे व रोजगाराकडे पाहत असतो तसेच तो आपल्या खेळाकडे खेळातिल गुणवत्तेकडे पाहत असतो खेळातील सर्वोच्च स्थान मिळविण्यासाठी धडपडत असतो परंतु खेळातील गुणवत्ताही शारीरिक क्षमतेवर अवलंबून असते कालांतराने शारीरिक क्षमता कमी झाल्यानंतर गुणवत्ताखाली येते अशावेळी आपण त्याच्या मध्ये राहुन खेळाची वेगळ्याबाजूने सेवा करू शकतो आणि आपले उर्वरित आयुष्य आनंदाने व्यतीत करू शकतो खेळ हे असे क्षेत्र आहे जे आपल्याला खेळाबरोबरच वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून देत असते अशा भविष्यातील कोणकोणत्या संधी आहेत त्या खालील प्रमाणे

***शारीरिक शिक्षण व भविष्यातील संधी;**

मार्गदर्शक:

आपण जरी एक चांगला खेळाडू असेल तर आपण एक चांगला मार्गदर्शक बनू शकतो आजघडीला खेळामध्ये नवनवीन नियम येत आहेत खेळ अधिक गतिमान होत आहेत उदाहरणात क्रिकेटमध्ये ट्वेन्टी ट्वेन्टी क्रिकेट कबड्डीमध्ये प्रो कबड्डी अशावेळी बदललेले नियम त्यातील कौशल्ययांची माहिती खेळाडूला नसते अशावेळी एक मार्गदर्शक त्याखेळाडूला यासर्व गोष्टींची माहिती देऊन त्यांच्याकडून एक चांगला खेळाडू निर्माण

करू शकतो आजघडीला प्रत्येक खेळासाठी त्याच्या खेळातील मार्गदर्शकाची आवश्यकता असते म्हणून महाराष्ट्र सरकारने आणि भारत सरकारने देखील एन आय एस यांची आपल्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि साई या सारख्या सरकारी खात्यामधून मार्गदर्शक यांची तालुका स्तरापासून आंतर राष्ट्रीय स्तरापर्यंत मार्गदर्शक म्हणून नियुक्ती केलेली आहे यामुळे खेळाडूंना मार्गदर्शक म्हणून काम करण्याची एक चांगली संधी प्राप्त झालेली आहे

क्रीडाशिक्षक:

पारंपारिक अभ्यासात शिक्षकाचे जसे महत्त्व असते त्याच प्रमाणे एक चांगला व्यक्ती एक चांगला विद्यार्थी एक चांगला खेळाडू निर्माण करण्यासाठी क्रीडा शिक्षकांची आवश्यकता असते म्हणून खेळातील शिक्षण बी पी एड एम पी एड आणि एन आय एस घेतल्यानंतर शाळेमध्ये महाविद्यालयामध्ये विद्यापीठांमध्ये शारीरिक शिक्षण शिक्षकांची नोकरी मिळू शकते ज्या आधारे आपण शालेय स्तरावर चांगला खेळाडूची निवड करून त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून शालेय स्तरापासून राज्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत आपण आपल्या खेळाडूंना खेळवून आणू शकतो आणि असे कितीतरी विद्यार्थी आपण घडवू शकतो अशा प्रकारे एक चांगला क्रीडा शिक्षक बनण्याची संधी आपल्याला याशारीरिक शिक्षणातून प्राप्त होऊ शकते.Type equation here.

क्रीडा पत्र कारिता:

नियमित सुरू असणाऱ्या स्पर्धा त्यांचे प्रक्षेपण करणे त्यातून विविध प्रक्षेपणाचे हक्क मिळविणे यासारखी कामे स्पोर्ट मीडियामार्फत करू शकतात तसेच स्पोर्ट मीडिया प्रमाणे क्रीडा पत्रकारिता ही देखील अतिशय चांगली अशी शाखा आहे की ज्यामधून दररोजच्या खेळाबद्दलची माहिती बातम्या आपण देऊ शकतो यासाठी पत्रकारितेचा अभ्यासक्रम खेळाडूंनी पूर्ण करणे महत्त्वाचे असते.

स्पोर्ट क्लब:

एखादा चांगला खेळाडू नवनवीन खेळाडू निर्माण करण्यासाठी स्पोर्ट क्लबची निर्मिती करून चांगल्या खेळाडूंची निर्मिती करू शकतो चांगले खेळाडू घडवून आणू शकतो पंच म्हणून काम करणे ही एक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्यास ती एक चांगली संधी खेळाडूंना उपलब्ध झालेली आहे यासाठी ग्राम स्तरापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत काम करता येते.

संचालक:

आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये सर्वसामान्य व्यक्तींना आपल्या शरीराकडे लक्ष द्यावयाला वेळ नाही त्यामुळे वेगवेगळे आजार निर्माण होऊ लागले आहेत कमीत कमीवेळे मध्ये जास्तीत जास्त शारीरिक हालचाली घडावी यासाठी ते जिम योगा व्यायाम यांची निवड करू लागले आहेत आणि त्यासाठी त्यांना एका चांगल्या संचालकाची आवश्यकता भासू लागली आहे आणि ही संचालकाची भूमिका एखादा शारीरिक शिक्षण घेतलेला

खेळाडू अतिशय चांगल्या रीतीने पार पाडू शकतो आज घडीला खाजगी संचालकही संकल्पना उदयास आलेली आहे आणि ही खेळाडूंच्या दृष्टीने एक चांगली संधी आहे असे म्हणावे लागेल .

फिजिओ थेरपी:

आज घडीला क्रिकेट असो की कोणताही खेळ असो त्या-त्या संघांमध्ये फिजीओथेरपी असतो त्यांची भूमिका ही महत्त्वाची असते या फिजिओथेरेपीला खेळामध्ये अनन्यसाधारण असे महत्व प्राप्त झालेले आहे खेळाडूंना आता कायमस्वरूपी फिजिओथेरपीची गरज भासू लागलेली आहे राष्ट्रीय आणि आंतर राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना त्यांच्या संघांना शासना मार्फत फिजिओथेरपीची नियुक्ती केलेली असते याचप्रमाणे आर्थोपेडिक रुग्णांकरिता देखील फिजिओथेरपीची भूमिका महत्त्वाची ची आहे एखादा शारीरिक शिक्षण घेतलेला खेळाडू फिजिओ थेरपीचा कोर्स करून फिजिओ थेरपीची भूमिका चांगल्या रीतीने बजावू शकतो.

मसाज थेरेपी:

आजघडीला सर्व सामान्य लोकां प्रमाणे खेळाडूंना आपल्या शारीरिक कष्टातून आराम मिळावा म्हणून मसाज थेरपी अतिशय उपयुक्त ठरत आहे म्हणून खेळाडू मसाज थेरपी उपयोगात आणू शकतात मसाज पार्लर अथवा एखाद्या संघाचे मसाजर म्हणून एखादा शारीरिक शिक्षण घेतलेला खेळाडू काम करू शकतो.

आहार तज्ञ:

सर्व सामान्य लोकांना जगण्यासाठी आहार आवश्यक असतो परंतु हा आहार योग्य प्रमाणात घेणे आवश्यक आहे खेळाडूना तर तो योग्य प्रमाणात घेणे फारच आवश्यक आहे खेळाडूंना योग्य आहाराची गरज असते आणि यासाठी प्रत्येक खेळाडू आणि टीम बरोबर आहारतज्ञाची आवश्यकता असते. यातील एखादा अभ्यासक्रम पूर्ण खेळ करून खेळाडू आहार तज्ञ म्हणून काम करू शकतो त्याच प्रमाणे सर्व सामान्य लोकांनाही आहार तज्ञ म्हणून मार्गदर्शन करू शकतो.

क्रीडा मानस उपचार तज्ञ

खेळाडूला उत्तम आहार प्रशिक्षण व सोयी सुविधा यांची जशी आवश्यकता असते तसेच त्यांना मानसिक तणाव येत असल्यामुळे मानस उपचार तज्ञची आवश्यकता असते आजघडीला सर्व राष्ट्रीय आंतर राष्ट्रीय विविध खेळामध्ये त्या त्या संघात एक मानसोपचार तज्ञ असतो.

इतर व्यवसायिक संधी:

याचबरोबर सरकारने चांगल्या खेळाडूंसाठी प्रत्येक विभागांमध्ये खेळाडूंसाठी काही ठराविक जागा राखीव ठेवलेल्या आहेत की त्याजागेवर ती फक्त खेळाडूच भरले जातात इतकेच काय तर आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक विजेत्या खेळाडूंना कोणतीही परीक्षा न घेता सरळ श्रेणीतील सेवे मध्ये समाविष्ट करून घेतले जात आहे त्यामुळे आंतर राष्ट्रीय स्तरावरील पदक विजेत्या खेळाडूंना शासनदरबारी नोकरी ही एक नामी संधी प्राप्त झालेली आहे वैद्यक ही एक नवीन उदयास आलेली शाखा आहे की ज्यामध्ये खेळाडूंचे आरोग्य या संबंधीचा

अभ्यासक्रम पूर्ण करून एखादा खेळाडू खेळाडूंसाठी वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देऊन त्यांच्या साठी सेवा उपलब्ध करून देऊ शकतो याच प्रमाणे खेळासाठी खेळाडूंसाठी आवश्यक असणारे सर्व प्रकारचे क्रिडा साहित्य निर्माण करणे त्यांची विक्री करणे या सारखे उद्योग व्यवसाय शारीरिक शिक्षण घेतलेले खेळाडू चांगल्या तऱ्हेने करू शकतात.

यासर्वा प्रमाणेच खेळाडू घडविण्याबरोबरच स्पर्धा भरविणे आंतरराष्ट्रीय स्पर्धा भरविणे त्यासाठी खेळाडूंना नेणे आणणे त्यांची राहणे खाणे पिणे यासारख्या गोष्टींची पूर्तता करणे त्याचबरोबर विविध खेळांचे कॅम्प शिबिरे भरविणे यासारख्या गोष्टी करणे म्हणजे इव्हेंट मॅनेजमेंट करणे होय शारीरिक शिक्षण घेतलेल्या खेळाडूंसाठी एक चांगली संधी आहे.

निष्कर्ष:

आजच्या एकविसाव्या शतकात परंपरिक शिक्षणाबरोबरच व प्रोफेशनल शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षणास चांगले महत्त्व आहे कारण खेळाडूच नव्हे तर सर्व सामान्य लोकांनाही उत्तम फिटनेसची आवश्यकता आहे विविध रोगाला दूर ठेवण्यासाठी शारीरिक शिक्षणाची आवश्यकता आहे त्यामुळे शारीरिक शिक्षण घेऊन खेळाडूंना विविध क्षेत्रांमध्ये भविष्यात करियर करण्याची उत्तम संधी आहेत अशा प्रकारे खेळाडूंना भविष्यामध्ये वेगवेगळ्या संधी प्राप्त होऊ शकतात यांचा विचार करणे गरजेचे आहे.

संदर्भ सूची:

1. जरदे श्रीपाद,योगा भ्यास सुखी जीवन,चंद्रमा प्रकाशन कोल्हापूर, 1995.

2. शर्मा पीडी योगासन प्राणायाम करा आणि निरोगी रहा,नवनीत प्रकाशन मुंबई,2013.

3. आले गावकर पम प्रगतमानस शास्त्र 1996.

4 डॉक्टर शंकरराव पोतदार आरोग्य सांभाळा 1985.

5. प्राध्यापक गंदग के एन शारीरिक शिक्षण आणि क्रीडा व्यवस्थापन 1998.

6. करमकर अके शारीरिक शिक्षा प्रशासन संघटन पर्यवेक्षण येऊ शिबिर 2002.

ISSN 2231 4342

वसंतराव नाईक यांचे आपत्ती व्यवस्थापन - कोयना भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन

डॉ. शर्मिला अशोक साबळे
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय,
रूकडी ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर.
भ्रमणध्वनी- ९७६३८७६८८९
ई-मेल--sabalesharmila@gmail.com

वसंतराव नाईक हे विसाव्या शतकातील असे नेतृत्व होते की ज्यांच्या कार्यकर्तृत्व मुळे महाराष्ट्र घडला व त्यांनी इतिहास घडविला. 5 डिसेंबर 1963 साली वसंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. 23 फेब्रुवारी 1975 पर्यंत म्हणजे अकरा वर्षाहून अधिक काळ महाराष्ट्राचे ते मुख्यमंत्री राहिले. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून आजपर्यंत एवढा प्रदीर्घ काळ वसंतराव नाईक यांच्या खेरीज कोणालाही विभूषित करता आला नाही महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील ही विक्रमी नोंद असल्याचे दिसून येते. 1972 चा भीषण दुष्काळ, कोयना भूकंप या नैसर्गिक आपत्तीमध्ये विचलित न होता या आपत्तींना धैर्याने तोंड देऊन त्यांनी महाराष्ट्राचा राज्य कारभार सुरळीत चालविला.प्रस्तुत शोधनिबंधामध्ये 'वसंतराव नाईक यांचे आपत्ती व्यवस्थापन--कोयना भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन' या विषयावर शोधनिबंध सादर करत आहे. यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे.मी या शोध निबंधासाठी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या कार्यकाळातील कागदपत्रांचा व त्यांच्यावर प्रकाशित झालेल्या ग्रंथांचा शोध निबंधासाठी उपयोग केलेला आहे.

प्रस्तावना

स्वातंत्र्य प्राप्ती पासून एकापाठोपाठ एक अशा अनेक आपत्तींना महाराष्ट्राला यांना तोंड द्यावे लागले होते. कधी पूर तर कधी अवर्षण, कधी दुष्काळ तर कधी युद्ध अशी संकटे येतच राहिली आणि ही संकट परंपरा अद्यापही चालूच आहे. भूकंप ही त्यात पडलेली नवी भर. वस्तुतः दख्खन पठाराच्या भागात इतक्या तीव्र स्वरूपाचा भूकंप होईल असे कोणाच्या कधी स्वप्नात सुद्धा आले नव्हते. या दृष्टीने हा भाग जगातील सर्वात अधिक सुरक्षित समजला गेला होता. तरीसुद्धा कोयनेच्या परिसरात आणि महाराष्ट्राच्या व देशाच्या इतर काही भागात भूकंपाचे हादरे बसले होते. हा केवळ भूमी लाच बसलेला हादरा नव्हता तर विज्ञानातील सर्वसामान्य झालेल्या सिद्धांत नाही.तो एक हादरा होता. तथापि एवढ्या प्रचंड स्वरूपाची आपत्ती ओढवली असताना सुद्धा लोकांनी या प्रसंगाला अत्यंत धैर्याने व आत्मविश्वासाने तोंड दिले.तसेच महाराष्ट्रातील जनतेला केवळ आपल्या राज्यातच नव्हे तर देशाच्या इतर भागातही कोसळलेल्या संकटाना अनेक वेळा तोंड द्यावे लागले होते. अशावेळी जनतेने स्वावलंबन आणि स्वार्थत्याग यांचे उत्तम उदाहरण घालून दिले होते.

कोयना भूकंप-

कोयना भूकंप ही महाराष्ट्रावर कोसळलेली फार मोठी नैसर्गिक आपत्ती होती. दिनांक 11 डिसेंबर, 1967 रोजी पहाटे कोयना नदीच्या परिसरात भूकंपाचा प्रचंड धक्का बसला. सातारा, रत्नागिरी, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील विशेषता पहिल्या दोन जिल्ह्यातील 1,600 हून अधिक खेड्यातून फार मोठ्या प्रमाणात पडझड आणि नुकसान झाले होते. 180 व्यक्ती प्राणास मुकल्या होत्या. दहा हजार लोक जखमी झाले होते. 55000 हून अधिक घरे नष्ट झाली होती. साठ हजार घरांचे काही ना काही नुकसान झाले होते. रस्ते, पूल, नाले आणि शाळा यांचे भयंकर नुकसान झाले होते. चार जिल्ह्यातील आठ लाख लोकांना भूकंपाचा तडाखा बसला होता. यावेळी महाराष्ट्र काँग्रेसची बैठक सांगली येथे भरली होती. या भीषण आपत्तीची माहिती मिळाल्यानंतर ताबडतोब श्री यशवंतराव चव्हाण, श्री वसंतराव नाईक आणि इतर नेते कोयनेच्या भागात धावून गेले. कोयना नगरला झालेला भूकंप म्हणजे महाराष्ट्राच्या कर्तृत्वाला एक प्रकारचे आव्हान होते. वसंतराव नाईक यांचा हा कसोटीचा काळ होता. त्यांच्या नेतृत्वाची खरी परीक्षा होती. या नैसर्गिक संकटांना तोंड देण्याचे वसंतराव नाईक यांनी आव्हान स्वीकारले. त्यांनी एकंदर परिस्थितीचा आणि नुकसानीचा अंदाज घेतला आणि भूकंपग्रस्त जनतेला सहाय्य देण्याच्या कार्यक्रमास शीघ्र गतीने आरंभ केला. अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना योग्य त्या सूचना दिल्या व नववर्षानिमित्त आकाशवाणीवर भूकंपग्रस्तांना आधाराचा हात देण्यासाठी आपल्या भावना व विचार व्यक्त केले. ते म्हणाले, 'नववर्षाच्या निमित्ताने तुमच्याशी बोलताना माझ्या मनात संमिश्र भावना आहेत. सामान्यपणे नव्या वर्षाचे आगमन हा एक उत्सवाचा प्रसंग असतो परंतु यंदा आपल्या राज्यात नुकत्याच झालेल्या भूकंपाच्या विध्वंसामुळे मी तुमच्यापुढे व्यथित अंतःकरणाने उभा आहे.

अपार मनोधैर्य-

भूकंपामुळे ज्या कुटुंबाचे सर्वस्व गमावले होते व त्यामुळे त्यांना आपल्या आयुष्याची नव्याने सुरुवात करावी लागली होती. इतके क्लेश आणि यातना सहन कराव्या लागल्या असताना सुद्धा त्यांचा धीर खचलेला नव्हता. आलेल्या संकटास तोंड देण्यास ते खंबीरपणे उभा होते. हे पाहिल्यावर त्यांच्याविषयी अभिमान व कौतुक मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना वाटले. त्यांच्या या अपार मनोधैर्य यामुळेच पुनर्वसनाचा अत्यंत बिकट प्रश्न सोडविण्यासाठी वसंतराव नाईक यांची उमेद वाढली.

भूकंपाने 180 लोक प्राणास मुकले होते. दहा हजार लोकांना दुखापती झाल्या होत्या. ५०० लोकांना उपचारासाठी इस्पितळात ठेवावे लागले होते. सुमारे 400 चौरस मैलहून अधिक इतक्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विध्वंस झाला होता. यात सातारा, रत्नागिरी, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील मिळून 1100 गावे येतात. एकूण तीन लाखाहून अधिक लोक भूकंपग्रस्त होते.

भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाचे हे कार्य प्रचंड स्वरूपाचे होते. सुमारे 50000 कुटुंबाचे पुनर्वसन करण्यासाठी पैसा व शक्ती लागणार होती. पण हे काम झपाट्याने उरकावे लागणार होते. कारण काही थोड्या महिन्यांच्या आत पावसाळ्यास सुरुवात होणार होती.

सबंध देश पाठीशी आहे-

भुकंप पीडितांच्या पुनर्वसन शिवाय कोयनानगरचे गाव पुन्हा नव्याने बसवायचे होते. अनेक शाळा, सरकारी कचेऱ्या, प्राथमिक आरोग्य केंद्र व नोकरवर्गाची घरे पुन्हा बांधावी लागणार होती. कित्येक पूल, मोऱ्या आणि विहिरी दुरुस्त कराव्या लागणार होत्या. हे सर्व केल्याखेरीज लोकांचे पूर्णांशाने पुनर्वसन होणार नव्हते. त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करावे लागणार होते. या महान आपत्तीचा परिणाम म्हणजे आपल्या राज्यात तीव्रतेने जाणवावा हे स्वाभाविकच होते. तथापि आपल्या या संकटात संबंध देश आपल्या पाठीशी उभा होता ही गोष्ट स्फूर्ती पद होती. देशाच्या ऐक्याचे व एकात्मतेचे हे उत्तम प्रतीक होते व त्याचा आपणा सर्वांना रास्त अभिमान होता. पुनर्वसनाचे कार्य पावसाळा सुरू होण्यापूर्वी पूर्ण करणे क्रमप्राप्त होते.[२] भूकंपग्रस्तांना ताबडतोब सहाय्य मिळण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने यापूर्वीच आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. अन्न, औषधे यांची मोफत मदत, कर्जे, सबसिडी, आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले होते. सहा कोटी रुपयांहून अधिक बांधकामाचा माल मागविण्यात आला होता. भूकंपग्रस्तांचे कायम स्वरूपात पुनर्वसन करण्याच्या योजनांची छाननी चालू केली व लवकरच त्या तयार झाल्या.

केंद्राची मदत निश्चित-

महाराष्ट्राच्या या भूकंपावर सहाय्य करण्यासाठी शासनाने केंद्राकडे मदत मागितली होती. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी 31 डिसेंबर, 1967 रोजी भूकंपग्रस्त भागांना भेट दिली. केंद्रीय गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा तर या भागात काही दिवस मुक्काम होता. केंद्रीय मंत्री डॉ.के.एल. राव यांनी या भागात दोनदा भेटी दिल्या. या प्रश्नांचे स्वरूप किती गंभीर व प्रचंड आहे याची केंद्रीय मंत्र्यांना पूर्ण जाणीव झालेली होती. महाराष्ट्राची साधन संपत्ती त्याच्या गरजा भागवण्यास पुरेशी असते परंतु भूकंपाच्या आपत्तीचा तडाखा एवढा प्रचंड होता की त्याचे निवारण केवळ आपल्या एकट्याच्या बळावर करणे आपल्याला त्यांना शक्य नव्हते फार थोड्या वेळात फार मोठे काम त्यांना दूर करायचे असल्याने मिळेल तेथून व मिळेल तेवढ्या सहकाऱ्यांची त्यांना गरज होती. त्यासाठी वसंतराव नाईक यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली होती

मदतीचा ओघ-

शेकडो खाजगी संघटना व व्यापारी संस्था स्वतः पुढे येऊन भूकंपग्रस्तांच्या संकट निवारणाचे जे काम करीत होत्या त्याला तोड नव्हती. भूकंपाचा पहिला धक्का बसला त्या दिवसापासून तर पैशाचा सारखा ओघ इकडे वाहत होता. भूकंप पुनर्वसन निधी समिती मध्ये यापूर्वीच पंधरा लाख रुपयांहून अधिक निधी जमा झाला

 ISSN 2231 4342

होता. या शिवाय मालाच्या स्वरूपात भरपूर मदत येत होती. ज्यांनी यापूर्वीच सहाय्य केले होते त्या सर्वांचे वसंतराव नाईक यांनी आभार मानले होते त्याचबरोबर उद्योगपती कारखानदार व्यापारी मंडळी व व्यापारी संस्था सरकारी संस्था शेतकरी कामगार नोकरीपेशा करणारे मध्यमवर्गीय वगैरे सर्व क्षेत्रातील लोकांनी जास्तीत जास्त मदत करून या थोर कार्यातील आपला वाटा उचलावा अशी कळकळीची विनंती वसंतराव नाईक यांनी केली होती.

अशा प्रकारच्या संकटांना तोंड देताना आपण सर्वांनी एकदिलाने व एकजुटीने उभे राहिले पाहिजे. परंतु आपल्यातील काही मंडळी आजही लोकांमध्ये दुही व दुफळी माजेल अशा प्रकारची कृत्ये करीत आहेत व महाराष्ट्राच्या नावाला बट्टा लावीत होती. हे पाहून वसंतराव नाईक यांना दुःख वाटत होते. संकुचित दृष्टी व असहिष्णुता या गोष्टी आपल्या सांस्कृतिक परंपरेशी विद्रोह करणाऱ्या आहेत आणि अनादी काळापासून आपल्या थोर नेत्यांनी जी मूल्ये जोपासली त्यांना मातीमोल ठरवणार आहेत. हे या लोकांनी लक्षात ठेवावे असे त्यांनी सांगितले होते.

भूकंप पीडितांसाठी जमा करण्यात आलेला निधी

भूकंप पीडितांसाठी सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्र्यांच्या निधीत (कोयना भूकंप पुनर्वसन निधी) दिनांक 24 जानेवारी 1968 पर्यंत रुपये 3,10,641.45 इतका निधी जमा झाला होता याशिवाय भूकंपग्रस्तांसाठी मुख्यमंत्र्यांच्या निधीत दिनांक 11 डिसेंबर 1967 ते 22 जानेवारी 1968 पर्यंत 26, 67,115.99 इतकी रक्कम जमा झाली होती या जमा होणाऱ्या निधीत सुसूत्रता निर्माण व्हावी या दृष्टीने शासनाने "कोयना भूकंप पुनर्वसन निधी समितीची स्थापना पुरस्कृत केली". समिती सोसायटी रजिस्ट्रेशन कायद्याखाली नोंदवलेली होती. शिवाय जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समिती स्थापन करण्यासंबंधी शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले होते. जिल्हा समितीने निधी गोळा करून दर आठवड्याला जमा होत असलेली रक्कम कोयना भूकंप निधीला पाठवावा असे वसंतराव नाईक यांनी आदेश दिले तसेच निधीचा हिशोब व्यवस्थित ठेवण्यासबंधी सुद्धा आदेश दिले होते. याशिवाय सरकारच्यावतीने कोयना भूकंप निधी समिती व काहीही रजिस्टर्ड झालेल्या सोसायट्या अधिकृतरित्या निधी गोळा करण्याचे काम करत होत्या.[3]

कोयना भूकंप पुनर्वसन निधी समिती-

भूकंप पिडीत लोकांना भरीव साहाय्य कसे करता येईल याचा विचार करण्यासाठी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी ब्रह्मण मुंबईतील प्रतिष्ठित नागरिकांची एक बैठक बोलावली होती. या बैठकीत यांच्या अध्यक्षतेखाली कोयना भूकंप पुनर्वसन निधी समितीची स्थापना करण्यात आली.

सदर समिती निधी गोळा करण्याचे तसेच सर्व प्रकारचे मदत घेऊन आपदग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे कार्य करत होती. या बाबतीत साहाय्य करणाऱ्या इतर संस्थांच्या कार्यातही समन्वय साधण्याचही ही समिती प्रयत्न करत होती

ISSN 2231 4342

26 जानेवारी 1968 पर्यंत भूकंप पुनर्वसन निधीसाठी जनतेकडून सुमारे वीस लक्ष रुपयांच्या देणग्या मिळाल्या होत्या.

कोयनानगर तसेच या परिसरातील विभागात ज्या ठिकाणी सर्व घरे कोसळली होती अशा भागातील लोकांना वाचवण्याचा आणि आपद्ग्रस्त कुटुंबांना इतरत्र हलवण्याच्या बाबतीत वसंतराव नाईक यांच्या आदेशानुसार त्वरीत हालचाली करण्यात आल्या. या कामासाठी जिल्ह्यातील नेहमीच्या पोलीस दलाखेरीज राज्य पोलिस दलाच्या आठ खास पथकांची नियुक्ती करण्यात आली होती. या शिवाय देखरेख व पहारा करण्यासाठी सदर्न कमांडचे जनरल ऑफिसर कमांडिंग यांनी 156 जणांचे एक पथक पाठवले होते. या कामी मिलिटरी, इंजिनिअरिंग यांनी सुद्धा सहाय्य केले होते. तसेच सुमारे दीडशे ग्रह रक्षकांची ही वरील कामासाठी या भागात नेमणूक करण्यात आली. वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य खात्याच्या नोकर वर्गाने 852 गावांना भेटी दिल्या. 698 विहिरी निर्जंतुक करण्यात आल्या आणि 12,368 व्यक्तींना खोल्या प्रतिबंधक लस टोचण्यात आली. दाखल करण्यात आलेल्या मोठ्या स्वरूपाच्या केसेस ची संख्या 116 तर अपघाताच्या स्थळी उपचार करण्यात आलेल्या केसेसची संख्या 9,195 इतकी होती या विभागात औषधे व ड्रेसिंग यांचा तर पुरेसा पुरवठा होताच परंतु याच्याशिवाय उपसंचालक वैद्यकीय सेवा, पुणे यांनी 1 लाख विटामिन गोळ्या, 300 ग्लुकोज सोल्युशन बाटल्या, ३७बाटल्या रक्त व ब्लड प्लाझमा, पाच ऑक्सीजन सिलेंडर आणि चाळीस प्रथमोपचाराच्या किट यांचा या भागात त्वरित पुरवठा केला होता.

सचिवांच्या उच्चस्तरीय समितीची जवळजवळ दररोज बैठक झाली व त्या समितीने भूकंप पीडितांना त्वरित मदत देण्याच्या बाबतीत व त्यांचे पुनर्वसन करण्याच्या बाबतीत पुढील निर्णय घेतले होते.

१. ज्या व्यक्तींची घरे संपूर्णपणे कोसळलेली आहेत, ज्यांनी आपले सर्वस्व गमावले आहे आणि ज्या व्यक्ती संपूर्णपणे निराधार झालेल्या आहेत त्यांना 15 दिवसापर्यंत दररोज प्रत्येकी १.५०रू. देण्यात आला होता तसेच त्यांना एक महिनाभर पुरेल इतके म्हणजे दहा किलो अन्नधान्य मोफत देण्यात आले होते. प्रत्येक सर्व साधारण कुटुंबाला 100 फूट सी.जी.आय. पत्रे,२५ बांबू, १० बत्त्या आणि ५०० चौरस फूट बांबूच्या तट्ट्या इतके घर बांधणीचे साहित्य देण्यात आले होते.

२. ज्या व्यक्तींची घरे कोसळली नाहीत परंतु त्यांच्या घरांना नुकसानी पोहोचल्याने ती राहण्यास धोकादायक झालेली असतील अशांना वरील प्रमाणे ग्रहनिर्माणचे साहित्य देण्यात येत होते आणि ज्यांना धान्य विकत घेणे अशक्य आहे अशा व्यक्तींना सुद्धा दहा किलोपर्यंत मोफत धान्य देण्यात आले होते.

३. ज्या व्यक्तींच्या घराची किरकोळ स्वरूपाची हानी झाली होती, ती घरे पुन्हा दुरुस्त करण्याजोगी असतील,अशा प्रत्येक कुटुंबाला ते जर सुस्थितीतील नसतील तर त्यांना प्रत्यक्ष दुरुस्तीच्या खर्चा इतके (रू.250) साहित्य देण्यात आले होते.[4]

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

भूकंप ग्रस्तांचे मदती करता व पुनर्वसन करण्याकरिता उभारलेली शासकीय यंत्रणा-

भूकंपग्रस्त भागातील लोकांना तातडीने मदत करण्यासाठी मदत केंद्राची उभारणी करण्यात आली होती. सातारा जिल्ह्यामध्ये एकूण सात तालुक्यांमध्ये भूकंपाचा उपद्रव पोहोचला होता. या सात तालुक्यांमध्ये 51 मदत केंद्राची उभारणी करण्यात आली होती. प्रारंभी प्रत्येक केंद्रावर मामलेदारांचया दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. केंद्राच्या समूहावर देखरेख करण्याकरता प्रारंभी उपजिल्हाधिकारी यांच्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली होती यानंतर या कामावर तहसीलदाराची नेमणूक करण्यात आली होती. सातारा जिल्ह्यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचलेली असल्यामुळे त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना नेहमीच्या कार्यातून मुक्त करण्या करिता अप्पर जिल्हाधिकारी यांची नेमणूक करण्यात आली होती. तसेच विभागीय आयुक्तांच्या मदती करता हि अप्पर आयुक्त पुणे यांची नेमणूक करण्यात आली होती. अशाप्रकारे जिल्हाधिकारी सातारा आणि विभागीय आयुक्त पुणे यांना मदत आणि पुनर्वसन कार्याकरीता सर्वस्वी मोकळे ठेवण्यात आले होते.

मदत आणि पुनर्वसन कार्याकरिता सरकारने गृह उपयोगी आणि बांधकामाचा माल फार मोठ्या प्रमाणावर खरेदी करून भूकंपग्रस्त भागांमध्ये पाठविला होता. हा माल स्वीकारून त्याचे पुढे वाटप करण्याकरिता पाटण, कराड, सातारा आणि चिपळूण या ठिकाणी गोदामे उघडण्यात आली होती. या गोदामावर देखरेख करण्याकरता जबाबदार अधिकारी नेमण्यात आले होते. आणि आलेल्या मालाचा चोखपणे हिशोब ठेवण्यात आला होता.[5] अशा प्रकारे आपत्तीच्या काळात वसंतराव नाईक यांनी चोखपणे शासकीय यंत्रणा निर्माण केली होती.

भूकंपग्रस्तांचे कायमचे पुनर्वसन-

भूकंपग्रस्तांचे कायमचे पुनर्वसन करण्यासाठी वसंतराव नाईक यांनी कार्यक्रमाची रूपरेषा आखली होती. भूकंपग्रस्तांचे कायमची पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने मध्यवर्ती सरकार कडून मिळणाऱ्या मदतीचे प्रमाण व स्वरूप राज्य सरकारकडे असलेली साधनसामग्री व जनतेकडून मिळणाऱ्या देणग्या यांचे चित्र स्पष्ट झाल्याने भूकंपग्रस्त जनतेचे प्रतिनिधी व समाजाच्या विविध स्तरातील पुढारी यांच्याशी विचारविनिमय केला. जनतेच्या किमान गरजा, उपलब्ध साधन संपत्ती, पुनर्वसनासाठी असलेला फारच थोडा अवधी ह्या गोष्टी लक्षात घेऊनच पुनर्वसनाची रूपरेषा त्यांनी आखली. घरबांधणीसाठी मिळणारी कर्जे निराधार व बेघर लोकांना पेलतील व सहज करता येतील याविषयी काळजी घेतली. ह्या गटातील लोकांना देण्यात येणारे कर्ज, जनतेकडून मिळालेल्या देणग्या व त्यावरील व्याज यातून घेण्याची तरतूद केली.

अंतिमरीत्या निश्चित केलेल्या घरांच्या आराखड्यानुसार १२'×१०'आकाराची एक राहण्याची खोली बांधण्यात येईल. तिच्यावर पत्र्याचे छप्पर असेल व दोन्ही बाजूस 12'×7' व 12' 8'चा व्हरांडा असेल.[6]

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

कुटुंबाच्या गरजेनुसार या घराचा विस्तार करण्याची या आराखड्यात तरतूद करण्यात आली होती. त्या घराच्या उभारणीसाठी सुमारे 1500 रुपये खर्च येणार होता. 1250 ते 1300 रुपये किमतीचे बांधकाम साहित्य पुरविण्यात आले. त्याशिवाय सुतार .गवंडी वगैरेवर खर्च करण्यासाठी उरलेली 200 ते 250 रुपयाची रक्कम रोख देण्यात आली. जर एखाद्या कुटुंबास आपल्या पडलेल्या घराचे काही साहित्य नवीन बांधकामासाठी वापरणे शक्य झाले तर त्या कुटुंबास रोख रकमेच्या रूपाने मिळणारी मदत तेवढ्या प्रमाणात वाढवून मिळणार होती.

वरील आराख-ड्याप्रमाणे घरासाठी खाली दिल्या प्रमाणे साहित्याची गरज होती

१ जस्ती पत्रे-१० फुटी, १२आणी८फुटी-१२

२ बल्या-४०

३ बांबू -१२५

४ खिळे-U आकाराच्या लोखंडी पट्ट्या वगैरे-१००रु.

५ सिमेंट-५ पोती

कुटुंब प्रमुखाला खडी दरवाजे चौकटी आणि जोते व कुडाच्या भिंती बांधण्यासाठी लागणारी मजुरी याचा खर्च करावा लागणार होता सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता संपूर्ण सरकारी व बिन सरकारी यंत्रणा कामी आणली सातारा जिल्ह्यातील निदान 30 व रत्नागिरी जिल्ह्यातील निदान दहा गावात घर बांधण्याचा कार्यक्रम हाती घेऊन तो पूर्ण केला या कामाकरिता 40 आवेक्षक, 80 मिस्त्री 1440 सुतार, 720 गवंडी आणि 120 बुरुड आधी कर्मचाऱ्यांची गरज पडली याशिवाय ग्रामस्थांचे सहकार्य मिळवण्याच्या दृष्टीने प्रत्येक गावा करता कमीत कमी एक ते दोन सामाजिक कार्यकर्त्यांनी ही मदत केली अशा प्रकारचे गट तरी स्थापन केले गेले व अतिशय अल्प काळात अशा गटाची उभारणी केल्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला गावाची पाहणी करून त्यासंबंधीचे आराखडे तयार करणे व बांधकाम साहित्य नीट वेळेवर खरेदी करून ते पुरवणे या कामासाठी शासनाच्या वतीने ही याच धर्तीवर आवेक्षक, सर्वेक्षक आणि मंडळ अधिकारी यांचेही गट स्थापन करण्यात आले[7]. फेब्रुवारीच्या अखेरपर्यंत अशा प्रकारच्या अनेक बाबी उपलब्ध झाल्या त्यामुळे बांधकामाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेणे शक्य झाले.

शेतकी महामंडळाच्या नोकर वर्गाची देणगी-

महाराष्ट्र राज्य शेतकी महामंडळाच्या नोकर वर्गाने कोयना भूकंप पुनर्वसन निधीसाठी 28,278 रुपयांचा चेक महसूल मंत्री श्री बाळासाहेब देसाई यांना दिनांक 28 फेब्रुवारी 1968 ला समारंभपूर्वक सादर केला. उसाच्या दर टनास दोन रुपये प्रमाणे यापूर्वीच या महामंडळाने कोयना भागातील भूकंप पिडीत पुनर्वसन निधीसाठी 13 लाख रुपये दिले होते.

रशियन रेड क्रॉस चे सहाय्य-

कोयनाभूकंप पीडितांसाठी रशियन रेड क्रॉस ने भारतीय रेड क्रॉस मार्फत साखरेच्या 200 पेट्या भूकंप पीडित पुनर्वसन समितीच्या उपाध्यक्ष तारा चेरियन यांच्याकडे पाठवल्या होत्या.

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची देणगी-

कोयना भूकंप पीडित निधीला पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी 34,37,111 रुपयांची देणगी दिली होती. सदर रकमेचा चेक पोलीस महानिरीक्षक श्री के. जी. राजाध्यक्ष यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री वसंतराव नाईक यांना दिनांक 28 जून 1967 रोजी सचिवालयात सुपूर्त केला. पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी कोयना भूकंप पीडित पुनर्वसन निधीसाठी एकूण 11,90,037 रू. देणगी म्हणून दिली.[8]

कोयना भूकंप पीडितांच्या पुनर्वसनाच्या कार्याचा आढावा-

फेब्रुवारी 1968 पर्यंत 60,576 घरे बांधून पूर्ण झाली होती. 5,500 घरेपूर्ण व्हायची होती. तथापि त्यातून लोकांनी तात्पुरता निवारा उभारला होता. 22,000 टन पत्रा, नऊ लाख 18 हजार बांबू, इतके साहित्य पुरविण्यात आले होते. शासन यंत्रणेवर आपला विश्वास आहे हे जनतेने दिलेल्या (पुनर्वसन कामासाठी) एक कोटी 16 लाख रुपये या निधीवरून दिसून येते[9]. बांधकामाचे लाखो रुपयाचे सामान उघड्यावर पडले असताना चोरीचे एकही प्रकरण नोंद नोंदविले गेले नाही. म्हणजेच या प्रसंगी जनतेने सुद्धा शासनास प्रामाणिकपणे मदत केली होती.

अशाप्रकारे कोयना भूकंप नैसर्गिक आपत्तीच्या वेळी वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली वरील सर्व कामे होऊन त्या दुर्दैवी जिवितांना मदतीचा हात तातडीने देण्यात आला होता. नुकसान झालेली घरे चार महिन्यांच्या कालावधीत दुरुस्त करण्यात आली होती. नष्ट झालेली घरे पावसाळा सुरू होण्यापूर्वीच उभी करण्यात आली. शाळांची सोय सुद्धा ताबडतोब करण्यात आली.[10] कठीण परिस्थितीला वसंतराव नाईक नेहमी धैर्याने तोंड देत होते. ते या वेळीही प्रत्ययास आले. त्यांचे नेतृत्व पुन्हा उजळले. वसंतराव नाईक यांनी सारी शासकीय यंत्रणा भूकंपग्रस्त जनतेसाठी कामाला लावली. युद्धपातळीवर कार्य सुरू केले. त्या परिसरातील लोकांना धीर दिला. त्यांची विचारपूस केली. त्यांनी केवळ दिलासा दिला असे नाही तर स्थानिक लोकांना आपले दु:ख बोलून दाखवायला लावले. अशाप्रकारे कोयनेचा भूकंप या कसोटीच्या प्रसंगांमध्ये महाराष्ट्र शासन कसे शरतीने काम करते त्याचा पडताळा देणारा ठरला

समारोप-

वरील शोधनिबंधाचे अवलोकन करता असे दिसून येते की महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपदी विराजमान असताना वसंतराव नाईक यांनी अनेक योजना राबविल्या. लोकोपयोगी कामे केली. शेती क्षेत्रामध्ये विकास घडवून आणला. त्याच प्रमाणे दुष्काळ, भूकंप यासारख्या अनेक आपत्तींवर मात केली. त्यांनी आपली संपूर्ण प्रशासन

व्यवस्था कोयना भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी वापरली. स्वतः जातीने लक्ष घालून, सर्व माहिती घेऊन भूकंपग्रस्तांचे पुनर्वसन केले. त्यांच्या आपत्ती व्यवस्थापनाचे हे आदर्श उदाहरण दिसते. त्यांच्या अपार मनोधैर्यामुळेच पुनर्वसनाचा अत्यंत बिकट प्रश्न त्यांनी सोडविला. हे त्यांचे आपत्ती व्यवस्थापनाचे उदाहरण आजही आपणास प्रेरणा देईल यात शंका नाही.

संदर्भ साधने

1 लोकराज्य, 1 जानेवारी, 1968, पृष्ठ क्र.2

2 कित्ता, पृष्ठ क्र.3

3 महाराष्ट्रमहाराष्ट्र विधान परिषद कार्यवाही, खंड 23, क्रमांक 2 ,9 फेब्रुवारी, 1968 पृष्ठ क्रमांक 35, 36

4 लोकराज्य, 26 जानेवारी, 1968, पृष्ठ क्रमांक 24, 25

5 महाराष्ट्र विधान परिषद कार्यवाही, खंड 23, क्रमांक 26, 2 एप्रिल, 1968, पृष्ठ क्रमांक 630

6 लोकराज्य, 1 मार्च, 1968, पृष्ठ क्रमांक 11

7 कित्ता, पृष्ठ क्रमांक 12

8 लोकराज्य, 16 जुलै, 1968, पृष्ठ क्रमांक 20

9 महाराष्ट्र विधान परिषद कार्यवाही, खंड 24, जुलै, 1968, पृष्ठ क्रमांक- 273

10लोकराजय , 18 मे, 1968, पृष्ठ क्रमांक- 2, 3

इतर संदर्भ ग्रंथ

१ पाटील पंढरीनाथ, सामान्यातील असामान्य

2 कर्णिक मधु मंगेश, दूत पर्जन्याचा

3 राठोड राजाराम, संपादित, वर्षा

4 देसाई दिनेश, आवाहन

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

सेतु माधवरा व पगडी यांचे इतिहास संशोधनातील योगदान

प्रा. डॉ. शिल्पा शेटे
श्री. पद्ममणी जैनकला व वाणिज्य
महाविद्यालय, पाबळ, ता. जुन्नर,
जि. पुणे, पिन-४१०५०५.
फोन. नं. ९९६०७१८२२६
shilpasrujan@rediffmail.com

सेतु माधवराव पगडी हे मराठ्यांच्या इतिहास संशोधकां पैकी एक महत्त्वाचे संशोधक होते. त्यांनी मराठ्यां च्याच नव्हे तर भारताच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पडली. पगडींचा जन्म उस्मानाबादेतील निलंगा येथे २७ ऑगस्ट १९१० रोजी झाला. पगडींचा जन्म एका कर्मठ, परंपरागत कुटुंबात झाला. त्यांचे वडील अत्यंत उदार अंतकरणाचे, पुण्यशील, दानशूर अत्यंत कडक व धार्मिक प्रवृत्तीचे व्यक्ती होते. ते सरकारी नोकरीत मामलेदार कचेरीत कारकून होते. कोणत्याही संकटात ते डगमगले नाहीत. पगडी त्यांच्या बद्दल म्हणतात, "त्यांना मी निराश झालेले कधीच पहिले नाही. त्यांची वृत्ती त्यांच्या परमेश्वरी श्रद्धेतूनच निर्माण झाली होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा माझ्या मनावर खोल ठसा उमटलेला आहे. परमेश्वरावरील श्रद्धे बद्दल मला काही समजत नाही, इतकेच मी म्हणू शकेन. पण माणसाच्या सद्भावनांवर मात्र माझी पुरेपूर श्रद्धा आहे." पगडींचे बालपण अतिशय आनंदात गेले. मात्र वडिलांच्या निवृत्ती नंतर पगडींना अतिशय संघर्ष करावा लागला. त्यांचे बालपण महाराष्ट्रात गेले. प्राथमिक शिक्षण हैद्राबाद येथे झाले.पुढील शिक्षण पुणे, बनारस व अलाहाबाद येथे झाले. तर नोकरी हैद्राबाद व महाराष्ट्र येथे केली. पुण्यात वसतिगृहात त्यांचे प्रमुख पटवर्धन (माधव ज्युलियन) हे होते. शिक्षणासाठी ते घरातून पळून बनारस येथे गेले. तेथे अक्षरशः धर्मशाळांमध्ये जेऊन व अन्नछत्रांमध्ये जेऊन आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले. पुढे पदव्यूत्तर शिक्षण त्यांनी अलाहाबाद येथे पूर्ण केले.

बनारस व अलाहाबाद याठिकाणी त्यांना अनेक सहाय्यक भेटले. प्रा. अण्णा साहेब पाटणकर, यांसारख्या गुरूमुळे संस्कृतची गोडी लागली. जीवनाला मार्ग मिळाला. तर पुणतांबेकर सरांमुळे चांगल्या शिक्षणाबरोबरच विवा ही होऊ शकला. पुढील काळात नावारूपाला आलेले अनेक उच्चपदस्थ त्यावेळी त्यांचे मित्रमंडळी होते. यात जगजीवनराम सारखे मंत्री तर अनेक सचिव, न्यायाधीश इ. ही होते. अनेक पुढाऱ्यांची भाषणे स्वतः ऐकली. इंदिरा गांधींना कॉलेज जीवनात आंदोलन करताना पहिले. शिक्षण पूर्ण करून आल्यावर त्यांना प्राध्यापक होण्याची इच्छा होती. मात्र घर सावरण्यासाठी नोकरीची आवश्यकता असल्याने मिळेल ती नोकरी करण्यास ते तयार झाले व निजामी राजवटीमध्ये तहसीलदार म्हणून रुजू झाले.

पगडी हे स्वत: स्वातंत्र्य युद्धकाळात वावरत असल्यामुळे तत्कालीन राजकारणाचे तसेच इतिहासाचे पगडी हे स्वत: साक्षीदार होते. म्हणून त्यांनी लिहिलेले आत्मचरित्र व तत्कालीन विविध विषयांवर जे लेखन

 ISSN 2231 4342

केले, ते इतिहासाचे प्राथमिक साधन ठरले. त्यांचेलहानपण तसेच पुढे नोकरी निमित्ताने अनेक वर्षे निजामी राजवटीत गेल्यामुळे तेथील हिंदू-मुस्लीम प्रश्नावरही त्यांच्या लेखनातून महत्त्वाचा प्रकाश पडला. तसेच सुरुवातीचे शिक्षण फारसी भाषेतून झाले असल्यामुळे पुढे अनेक फारसी साधनांचे त्यांनी केलेले अनुवाद यांनी मराठ्यांच्या व भारताच्या इतिहासात मोठी व महत्त्वपूर्ण भर घातली.तसेच ते अनेक भाषाकोविद होते.त्यांनामराठी,हिंदी,इंग्रजी, बंगाली, फ्रेंच, कन्नड, संस्कृत, फारसी, उर्दू, तेलगू, गोंडी, कोलामीइ, भाषाअवगतहोत्या. त्याचाही उपयोग त्यांना इतिहाससंशोधनात झाला.म्हणून त्यांच्या संशोधनात वैविध्य दिसते. त्यांनीअनेक विषयावर लेखन केले. यात मराठ्यांचा इतिहास, मुस्लीम प्रश्न, काश्मीर प्रश्न, सुफी संप्रदाय, समर्थ संप्रदाय, पानिपत संबंधीची विविध प्राथमिक साधने,फारसी साधनांचे अनुवाद, टिपू सुलतान, औरंगजेब, वारंगळचा इतिहास अशा अनेक विषयांवर इंग्रजी व मराठी भाषेत लेखन केले. याशिवाय साहित्यातही त्यांनी महत्त्वपूर्ण लेखन केले आहे.

मामलेदार म्हणून अनेक गावांशी त्यांचा प्रशासक म्हणून संबंध आला. निजामाच्या राज्यात ८० टक्के अधिकारी मुस्लिम होते. व ते अत्यंत मग्रूर होते. तेथील ८० टक्के हिंदूंशी ते अत्यंत मग्रुरीने व जेते असण्याच्या अविर्भावात वागत असत. त्यांच्या या वृत्तीचा फटका व अनुभव पगडीं नाही बसला. निजामी राजवटीचे स्वरूप, रझाकार, निजामाचे मंत्री, सरकारी अधिकारी, तेथील सरंजामी व्यवस्था, त्या व्यवस्थेतील चैन, डामडौल व एक प्रकारची स्थूलता, विलास प्रियता यांचे वर्णन पगडींच्या लेखनात आपणांस वारंवार आढळताना दिसते. आदिवासींचा विशेष अधिकारी म्हणून पगडींना आदिलाबाद जिल्ह्यात बदली झाली तेव्हा तेथे खेडे न खेडे हिंडून आदिवासींच्या प्रश्नाचा अभ्यास केला. उटनूर या आदिवासी पट्यात काम करताना पगडीनी गोंड भाषा शिकून घेतली. या भाषेला लिपी नव्हती. तेव्हा त्या भाषेची लिपी त्यांनी तयार केली. त्या भाषेचा एक शब्द कोश तयार केला. कोलामी जमातीची भाषाही शिकून घेतली. एवढेच नव्हे तर त्यांचे व्याकरणही पगडींनी तयार केले. या आदिवासी लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. हजारो आदिवासींच्या जमिनींचा प्रश्न सोडवला. त्यांच्यासाठी प्राथमिक शाळा काढणे आणि असलेल्या शाळा तपासणे,त्यांच्या सहकारी पतपेढया स्थापन करणे इ. कामे पगडींनी केली. अदिलाबाद जिल्ह्यात आदिवासींची एकंदर तेवीस हजार कुटुंब होती. पगडींच्या काळात त्यांच्या पैकी दहा हजार कुटुंबांना एक लाख साठ हजार एकर जमिनीवर मालकी हक्क देण्यात येऊन त्यांना जमिनी देण्यात आल्या. शहात्तर शाळा स्थापन झाल्या. त्यांवर ब्याऐंशी आदिवासी शिक्षक काम करीत. याशाळांतून गोंड, कोलाम इ. आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या सोळाशेवर गेली. सहकारी संस्थांपैकी को ऑपरेटिव्ह स्टोअर्स, रूरल बँक, मल्टिपर्पज को ऑपरेटिव्ह सोसायटया, आणि ग्रेन बँक यांची स्थापना करण्यातआली. लहान सहान तंटे निकालात काढण्यासाठी अकरा पंचायती स्थापन करण्यात आल्या. खरे तर आदिवासी भागात बदली होणे म्हणजे नोकरदारांना ती शिक्षा वाटत असे. परंतु पगडी प्रत्येक गोष्टीकडे संधी म्हणून पाहत असत. हेच या व इतर अनेक प्रसंगावरून दिसते. अर्थात निजामाची नोकरी करताना ते हिंदू असल्यामुळे उच्च व कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या त्रासालाही त्यांना तोंड द्यावेलागले. मात्र ते कधीच त्यांच्या सापळ्यात अडकू शकले नाहीत. अनेक वर्षे त्यांना बढतीही नाकारली गेली. बरेच उशिराने ते डेप्युटी कलेक्टर बनले. याच राजवटीत भारताच्या

ISSN 2231 4342

स्वातंत्र्यानंतर गांधी हत्या व त्यानंतर हैद्राबाद मुक्ति संग्राम यांची माहिती मिळते. निजामाची सर्व सत्ता रझाकारांनी आपल्या हाती घेतली होती व भारता विरूद्ध लढण्याची पूर्ण तयारी केली होती. भारत सरकारच्या पोलीस ॲक्शनच्या वेळी हैद्राबादमध्ये निर्माण झालेली स्थिती स्वत:पगडींच्या जीवाची हमी राहिली नव्हती. हैद्राबाद मधील दंगे यांचे वर्णन पगडींनी केले आहे. शेवटी १९४८ मध्ये भारत सरकारनी हैद्राबादवर आक्रमण करून ते भारतात विलीन केले व तेथे ही स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्यानंतर पगडी जिल्हाधिकारी, शिक्षण सचिव व पुनर्वसन समिती इ. वर नियुक्त झाले. महसुली व्यवस्थेच्या पुनर्रचनेत त्यांचा सिंहाचा वाटा होता. पुढे अनेक ठिकाणचे जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी उत्तम काम केले.

औरंगाबाद व लातूर याठिकाणी त्यांनी पुस्तके वाचनाचे महत्त्व ओळखून शेकडोंनी ग्रंथालये उभी केली. ज्या ज्या ठिकाणी पगडी गेले, तेथील सर्व ठिकाणे पाहणे, भौगोलिक स्थान पाहणे, तेथील महत्त्वाची ठिकाणे व व्यक्तीं विषयी संशोधन करणे व पुस्तक लिहिणे हे महत्वाचे कार्य त्यांनी केले. नोकरी करत असताना पगडींनी स्फुट लेखनास सुरवात केली. प्रथम काही कथा, कथा संग्रह, ललित लेखन इ. चे लेखन केले. ते कृष्ण कुमार या टोपण नावाने केले. नोकरी निमित्त अनेक गावांना ते फिरत असत. त्या गावांच्या प्रशासकीय माहितीशी त्याचा संबंध येत. ते त्यातूनच इतिहास लेखनाकडे वळले. यातूनच महानुभाव, सुफी परंपरा व इतिहास यांचे संशोधन त्यांनी केले. उर्दू कवी गालिब यांची शायरी हाही त्यांच्या अभ्यासाचा व आवडीचा विषय होता. सर्वात शेवटी त्यांनी मुंबईत नोकरी केली. निवृत्ती नंतर ही पगडींनी व्याख्यानांच्या निमित्ताने संपूर्ण भारतभर प्रवास केला. तेथील वैशिष्टयांचा अभ्यास केला व त्याचवेळी अनेक माणसेही जोडली. अशा पद्धतीने पगडींच्या आयुष्यात त्यांनी केलेल्या कामाचे थोडक्यात पण उत्कृष्ट दर्शन आपणास त्यांच्या आत्मचरित्रातून मिळते. आत्म चरित्रामधून त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंगांबरोबरच हैद्राबादची सखोल माहिती मिळते. तेथील चळवळींची माहिती मिळते. अनेक गावांचा इतिहासही समजतो, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती समजते. याद्दष्टीनेही ते महत्त्वाचे आहे. पगडींचे आत्मचरित्र हे त्यावेळचा समकालीन इतिहासच असल्याने एक ऐतिहासिक साधन म्हणून ही ते महत्त्वाचे आहे.

पगडींनी शिवकाळा विषयी व पेशवे काळा विषयी बरेच लेखन केले आहे. त्यांनी लिहिलेले शिवचरित्रम हत्त्वाचे मानले जाते. पुढे पगडी यांनी मराठयांच्या स्वातंत्र्य संग्रामा विषयी ही बरेच लेखन केले आहे. पगडींचे इतिहास लेखनातील अजून एक महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी केलेले अनुवाद होय. पगडींना अनेक भाषा अवगत होत्या. मराठयांचा इतिहास लिहित असताना मोगल मराठयांबद्दल काय विचार करतात, हे ही समजणे महत्त्वाचे होते व फारसी हे पगडींचे बलस्थान होते. पगडींनी फारसी भाषेतील मराठ्यांसंबंधीचे लेखन मराठीत अनुवादित केले. त्यामुळे मराठा इतिहास संशोधनात एक महत्त्वाचा खजिनाच मोकळा झाला असे म्हणावे लागते. परिणामी मराठा मोगल स्वातंत्र्याविषयी यातून अनेक पैलूंवर नव्याने प्रकाश पडण्यास मदत झाली. मराठ्यांच्या साधनांमध्ये असण्याऱ्या कमतरता या साधनांतून भरून निघण्यास मदत झाली. पगडींचे हे काम म्हणूनच खूप महत्त्वाचे ठरते. पगडींनी याशिवाय मुस्लिम प्रश्न, हैद्राबाद मुक्ती संग्राम, काश्मीर प्रश्न यांवरही

ISSN 2231 4342

लेखन केले आहे, ते ही महत्त्वाचे आहे. सूफी संप्रदाय, भक्ती चळवळ याधर्म विषयक बाबींवर पगडींनी लेखन केले आहे. मोगलकालीन महाराष्ट्राच्या आर्थिक इतिहासावरही त्यांच्या लेखनातून प्रकाश पडतो. तसेच अनेक फारसी पत्रे, पानिपत,मराठे व निजाम संबंध, मॉरिशियस यांच्या दैनंदिनीतील वृत्तांत यांसारख्या लेखनातून ही इतिहासाचे महत्त्वपूर्ण लेखन झाले आहे. आत्मचरित्र वाङ्मयाचे वाचन हा एक पगडीचा आवडता छंद आहे. इंग्रजी, मराठी, उर्दूआणि फारसी या भाषांतून त्यांनी जवळ जवळ शंभर आत्मचरित्रे वाचून काढली आहेत. मराठी आत्मचरित्रांत त्यांनी जवळजवळ चाळीस ग्रंथ वाचले. यासंदर्भात पगडी म्हणतात, “हे वाङ्ममय वाचून मला वाटू लागले की, आपल्या जीवनात आलेले अनुभव मांडून ठेवण्यास काय हरकत आहे? राष्ट्रीय चळवळीच्या काळची आमची पिढी. महात्मा गांधी, पंडित नेहरू इ. च्या प्रभावाने देशात त्यावेळी प्रचंड जागृती झाली होती. ते संस्कार आमच्या व रक्षणो क्षणी होत होते. बनारस येथे खडतर विद्यार्थी जीवन माझ्या वाटयाला आले होते. पण त्याबरोबरच अनेक सज्जनांशी माझा संबंध आला आणि माझे जीवन पार बदलून गेले. निजामी राजवटीतील जीवन जितके कठीण तितकीच माझी जिद्दही वाढत गेली. साहित्याकडे मी वळलो याचे कारण ती जिद्दच होय. निजामी राजवट, रझाकार चळवळ, पोलीस ॲक्शन ही सर्व मला जवळून पाहण्यास मिळाली. त्यापूर्वी १९२६ पासून १९३३ याराजकीय चळवळीच्या काळात मी बनारस आणि अलाहाबाद येथे होतो. या दीर्घ काळातील मला आलेले अनुभव इतरांना सांगावे, हीच माझ्या आत्मचरित्राच्या मागची भूमिका आहे.” महाभारत आणि भागवत यांचा पगडींच्या मनावर अतिशय खोल असा परिणाम झाला आहे. पगडी म्हणतात, “महाभारतातील कौरव-पांडवांच्या कथा, अठरा दिवसांचे युद्ध, त्यातील अभिमन्यू, द्रोण, भग्दत्त, घटोत्कच, करण,दुःशासन, दुर्योधनइ. वधांची वर्णने, महाभारताची ती संस्कृत प्रचुर प्रौढ आणि विरश्री युक्त भाषा यासर्व गोष्टींत मी अगदी रंगून गेलो होतो.” पगडींनी देशातील अनेक नेते पहिले होते. सायमन विरोधी आंदोलनात ते सहभागी झालेहोते. महात्मा गांधीजींचे भाषण त्यांनी ऐकले होते. त्याच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे वर्णन पगडींनी केले आहे. गांधी, जवाहरलाल नेहरू, डॉ. अन्सारी, जतींद्र मोहन, सेनगुप्त, बिपिन चंद्र पाल,श्री प्रकाश, ॲनीबेझंट, बिकानेरचे महाराज सरगंगा सिंग, लॉर्ड इर्विन,जनरल बर्ड वूड, फ्रेंच सेनापती जनरल गुरार्ड, लॉर्ड लिनलिथगो, गणेश दामोदर सावरकर, डॉ. सुबलरायन, रामानंद चॅटर्जी, विठ्ठलभाई पटेल, शिवप्रसाद गुप्त, आचार्य कृपलानी, दरभंग्याचे महाराज,नेताजी सुभाष चंद्र बोस इ. ची भाषणे पगडींनी ऐकली होती. एकदा आर्य समाज मंदिरात एका मुसलमानांच्या शुद्धीकरणाच्या समारंभाला पगडी हजर होते. त्याचे नाव अब्दुल शकूर होते. तो सहारणपूरचा राहणार होता. मंदिरात शुद्धीकरणाच्या निमित्ताने होम हवन झाले, त्या इसमाचे नाव ग्यानचंद ठेवण्यात आले. तो समारंभ पाहून मनात कुठे तरी समाधान वाटले, असे पगडी म्हणतात. अयोध्या सारख्या शहरात पगडींनी अनेक मंदिरे पाडून मशीदी बांधल्याचे पहिलेआहे. पगडींचा ज्योतिषशास्त्रावर विश्वास होता असे त्यांच्या आत्म चरित्रावरून वाटते. आपल्या वाचना संबंधी लिहिताना पगडी म्हणतात, “कॉलेज जीवन संपे पर्यंत एकंदरीत नऊशे पुस्तके मी वाचून काढली होती. १९२५ ते १९३३ पर्यंत माझी वर्षाला शंभर पुस्तके वाचून होत.” “ पण नोकरीला लागल्यानंतर वाचनाचे प्रमाण कमी होऊ लागले १९३३ पासून १९५६ च्या अखेरीस मी मुंबईला येई पर्यंत म्हणजे तेवीस वर्षांच्या काळात तीनशे ब्याऐशी इंग्रजी पुस्तके वाचून झाली.”

ISSN 2231 4342

पगडी म्हणतात,

“ मला इस्लाम बद्दल कडूभावना असण्याचे कारण नव्हते. मला चीड येई हैद्राबाद राज्यातील शेफारलेल्या आणि धर्म द्वेषी अविचारी मुसलमानांची. निजामाच्या सत्तेच्या बळावर मुसलमान हिंदूंना अतिशय तुच्छ लेखत, याचा मला त्वेष येई.”

पगडींनी मुस्लीम प्रश्ना विषयी लेखन केले आहे. औरंगाबादमध्ये असताना ते फकीर आणि औलियाचें दर्गे पाहत असत. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, बऱ्याच ठिकाणी पूर्वीच्या मंदिराच्या जागी सूफींचे दर्गे स्थापन झाले आहेत. अनेक ठिकाणी मोडतोड करून त्याजागी सूफी संत स्थानापन्न झाले असावेत. सूफी हे राजकारणापासून अलिप्त होते, असा जो गैरसमज विद्वानांत पसरला आहे त्याला काही आधारही नाही. मुस्लीम राज्यकर्त्यांच्या आक्रमक धोरणात सूफींनी पूर्णपणे सहकार्य केले हे उघड आहे. पगडींनी सुफी पंथीयांसंबंधी अत्यंत चिकित्सक व परखडपणे लेखन केले आहे. प्रथम त्यांनीच सुफी पंथीयांचे खरे स्वरूप पुढे आणले. पगडींनी हिंदुस्थानच्या सर्व भागांचा इतिहास वाचून काढला होता. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचा सभासद सचिव म्हणून आठ वर्षे पगडींनी काम केले. मुंबईला आल्यावर पगडी उर्दू आणि फारसी काव्याच्या अभ्यासात वेळ घालवत होते. इतिहास संशोधनाकडे त्यांचे लक्ष एका प्रसंगाने गेले. १९७५ मध्ये सरदेसायांनी लिहिलेले नानासाहेब पेशव्यांचे चरित्र त्यांच्या वाचण्यात आले. त्यातील निजामशाहीचा अपकर्ष या एका प्रकरणात पगडींना तेवीस चूका आढळल्या. मराठेशाहीतील मोडी कागद पत्रात अनेक फारसी शब्द येतात. ती भाषा अवगत नसल्यामुळे मोडीच्या वाचनात इतिहासलेखकांनी चुका केल्या आहेत. यातील सरदेसाई, वासुदेव शास्त्री खरे इ. च्या चूका पगडींनी दाखवून दिल्या आहेत. अशा प्रकारे पगडींची चिकित्सक वृत्ती दिसून येते. यावरून निजाम घराणे व मराठयांच्या संबंधी फारसी भाषेतून जी साधने आहेत, त्यांचा मराठीतून इतिहास अभ्यासकांना परिचय करून देण्याचे पगडींनी ठरविले व अशा प्रकारे ते इतिहास संशोधनाकडे वळले.

इतिहास व कल्पित या आपल्या लेखात पगडींनी इतिहासलेखन कसे शास्त्रीय पद्धतीने करावे व ते कसे वस्तुनिष्ठ असावे यांविषयी लेखन केले आहे. तसेच इतिहासाच्या तत्त्वज्ञासंबंधी चर्चा केली आहे. तसेच इतिहासकाराने इतिहास लिहित असताना सत्याचे व वस्तुनिष्ठा याचे भान कसे ठेवले पहिले यांवरही अत्यंत महत्त्वपूर्ण चर्चा केली आहे. तसेच इतिहासलेखनातील इतिहासकाराच्या भूमिकेवरही अत्यंत महत्त्वाची चर्चा केली आहे. तसेच इतिहासाचे महत्त्वही सांगितले आहे. तसेच इतिहासाच्या व्यापकतेवर व वैविध्यावरही विचार मांडले आहे. इतिहासाच्या साधनांसंबंधी चर्चा केली आहे. इतिहास लेखनात साधनांना ते खूप महत्त्व देतात.

पगडींनी खूप मोठ्या प्रमाणावर मराठ्यांच्या इतिहासासंबंधी फारसी भाषेतील अनेक साधनांचे मराठी भाषेत अनुवाद केला.कारण मराठ्यांच्या स्वातंत्र्यायुद्धाविषयी मराठी भाषेतील साधनांपेक्षा फारसी भाषेतील साधनांचे प्रमाण चौपटीने अधिक आढळले. याबाबतीत पगडींचे योगदान खूप मोठे आहे. पगडींनी अनेक ठिकाणी भारतभर ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या व तेथील इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न केला. कारणत्याच्या मते,

“संशोधकास प्रवास हा अत्यंत आवश्यक आहे. ज्याचे चरित्र लिहावयाचे किंवा ज्यांचा काळ रेखाटवयाचा त्यांच्या संबंधित घटनांचा अभ्यास करण्यासाठी चरित्रातील निर्देशिलेल्या स्थळांना भेटी देणेही आवश्यक असते. क्वचित प्रसंगी स्थानिक माहितीमुळे काही घटनांवर विलक्षण प्रकाश पडून जातो. ह्यासाठी स्थळांना भेटी आणि संबंधित जनतेशी संपर्क ही संशोधकाची महत्त्वाची कर्तव्ये ठरतात.” असा त्यांचा विश्वास होता.

अशा पद्धतीने पगडींनी इतिहासविषयी अत्यंत मौलिक संशोधन केले आहे. भारताच्या व मराठ्यांच्या इतिहाससंशोधनातमोलाची व महत्त्वपूर्ण भर घातली. असे म्हणावे वाटते.

संदर्भ आणि टीपा:

1) संपा., डॉ. द. पं. जोशी, डॉ. उषाजोशी, *समग्र सेतु माधवराव पगडी, खं. १*, मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, आंध्रप्रदेश, २७ऑगस्ट२०१०,पृ. २४.
2) कित्ता,पृ. ७५.
3) सेतु माधवराव पगडी, *जीवन सेतू,* कॉन्टिनेन्टलप्रकाशन ,पुणे ,१९६९ ,पृ. ३.
4) प्रा. शिल्पा शेटे, *सेतु माधवराव पगडी यांचे इतिहास संशोधनातील योगदान,* अप्रकाशित पी. एच. डी. प्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. २९ फेब्रुवारी २०२०, पृ. २१.
5) कित्ता,पृ.२२८.
6) कित्ता,३२७..
7) कित्ता.
8) कित्ता.
9) कित्ता, पृ. २०९ते२५२.
10) प्रा.नरहर कुरुंदकर, *हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन*, भाग्यनगर, नांदेड, द्वितीय आवृत्ती, १९९८,पृ.३५
11) पूर्वोक्त, *समग्रसेतुमाधवरावपगडी, खं.* १, पृ. ७५.
12) कित्ता, पृ. २४.
13) कित्ता, पृ. १२०, १२१.
14) कित्ता, पृ. २१.
15) कित्ता, पृ. १२३.
16) कित्ता, पृ. ९४.
17) कित्ता, पृ. २१८.
18) कित्ता, पृ. २१९.
19) कित्ता, पृ. २८२.
20) कित्ता, पृ. ३८५.
21) कित्ता, पृ. ४०३.

ISSN 2231 4342

22) कित्ता, पृ. ४१५.
23) कित्ता, पृ. ४१६, ४१७.
24) कित्ता.
25) कित्ता, पृ. ८६४, ८६५.
26) कित्ता, पृ. ८९२.
27) कित्ता, पृ. ६२९.

मराठवाड्यातील गड-किल्ले : एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप

प्रा. डॉ. अशोक कानडे
इतिहास विभाग प्रमुख,
बाबूजी आव्हाड महाविद्यालय,
पाथर्डी, जि. अहमदनगर.
Kanadeashok001@gmail.com

प्रस्तावना.

मराठवाड्याची भूमी ही साधू संतांची त्याचप्रमाणे ऐतिहासीक वारसा जपणारी भूमी म्हणून ओळखली जाते. मराठवाड्याचा इतिहास तसा मोठा आहे.पार यादवकालापासून, तसेच त्रेतायुगातील घटनांचे संदर्भ सांगणारी काही ऐतिहासिक स्थळे इकडे आहेत अजंठा-वेरूळ लेणी, देवगिरी साम्राज्याचा साक्षीदार, तुघलकाच्या विक्षिप्तपणाचा पुरावा, बौद्धकालिन शिल्पकला असणारी खारोसा लेणी, घटोत्कच लेणी, पितळखोरे लेणी.. रामायणातील दंडकारण्यातील काही भाग मराठवाड्यात येतो.हिंदवी स्वराज्याची कुलदेवता 'आई तुळजाभवानी'चे मंदिर हे मराठवाडा भागात आहे. तर असा हा इतिहाससंपन्न मराठवाडा.या भूमीत अनेक ऐतिहासिक वास्तू आजही आहेत.त्यातील किल्ल्यांचे स्थान आजही महत्वपूर्ण मानले जाते.ऐतिहासीकदृष्टीने संशोधन,अध्ययनाच्या दृष्टीने किल्ल्यांचे अस्तीत्व विचारवंत कौटिल्य याने स्पष्ट केले आहे.त्याने प्राचीन काळात लिहिलेल्या अर्थशास्त्र या ग्रंथात किल्यांचे महत्व विशद केले आहे .लढाया जिंकण्यासाठी किल्ले महत्त्वपूर्ण ठरू शकतात.छत्रपती शिवाजी महाराज यांनी किल्ल्यांच्या आधारेच स्वराज्याचे आस्तित्व निर्माण करून ते टिकविले.त्यांच्या काळात अनेक किल्ले अजिंक्य ठरले. किल्ल्याच्या द्वारे स्वराज्याचे संरक्षण भक्कमपणे होऊ शकते. मराठवाड्यामध्ये देखील तत्कालीन प्रकारचे मजबूत किल्ले होते.त्यांचे अस्तित्व आजही आढळून येते.परंतु,मराठवाड्यातील किल्ल्यांचा विचार करता मराठवाड्याची भूमी पठारी असल्याकारणाने या विभागात भुईकोट किल्ल्यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.हे मराठवाड्यातील किल्ले प्रत्यक्षपणे इतिहासाची साक्ष देताना दिसून येतात.मराठवाड्यात अनेक महत्त्वपूर्ण किल्ले आहेत.त्यात प्रामुख्याने देवगिरी,नळदुर्ग,परंडा,उद्गीर,धारुर.कंधार,औसा,माहूर इत्यादी ठिकाणी किल्ल्यांचे अस्तित्व आढळून येते.या किल्ल्यांनी अनेक आक्रमणांच्या वेळी सक्षमपणे तत्कालीन आव्हानांना यशस्वी तोंड दिले असल्याचे ऐतिहासिक विवेचनावरून स्पष्ट होते.मराठवाड्यातील अशा महत्वपूर्ण किल्ल्यांची ऐतिहासिक माहिती प्रस्तुत करण्याच्या उद्देशाने शोधनिबंधासाठी या विषयाची निवड करण्यात आली आहे.

शोधनिबंधाचे उद्देश :-

१) मराठवाड्याचा ऐतिहासिक वारसा विवेचीत करणे .

२) मराठवाड्यातील गड किल्ल्यांचे ऐतिहासिकदृष्टीने अध्ययन करणे.

ISSN 2231 4342

३) मराठवाड्यातील गड किल्ल्यांची उपयुक्तता व महत्व विश्लेषित करणे .

मराठवाड्यातील प्रमुख असणाऱ्या किल्ल्यांची माहिती व महत्व पुढीलप्रमाणे विशद करण्यात आले आहे.

देवगिरी किल्ला :-

देवगिरीचा किल्ला हा मराठवाड्यातील प्रसिद्ध किल्ला आहे. मराठवाड्यातील हा एक प्रमुख किल्ला असून त्याचे ऐतिहासिक महत्व अनन्यसाधारण असे आहे. हा किल्ला औरंगाबाद जिल्यात आहे. औरंगाबादपासून जवळच असलेल्या दौलताबाद या ठिकाणी हा किल्ला स्थित आहे. हा किल्ला राष्ट्रकुट राजा श्रीवल्लभ यांनी उभारला असून तो आठव्या शतकात निर्माण करण्यात आला असल्याचे ऐतिहासिक संदर्भावरून स्पष्ट होते.या किल्ल्याला विविध नावाने ओळखले जाते जसे दौलाताबाद,धारगीरी,देवगीरी,देवगड अशी विविध नावे आहेत. युद्धशास्त्राच्या दृष्टीने हा किल्ला अभेद्य असून यात अनेक चोरवाटा,भूयारीमार्ग,फसवे रस्ते,दुर्गम खंदक, तासलेले कडे,अभेद्य तटबंदीने युक्त असे वैशिष्ट्य या किल्ल्यामध्ये आहे. या भुईकोट किल्ल्याला सात वेशी असून दोन किलोमिटर लांबीचा अभेद्य तट आहे.या किल्ल्यातील तट मजबूत असून बुरुजावर बुलंद तोफा आहेत. किल्ल्यावरील जयस्तम्भाच्या समोर बंदिस्त पटांगण आहे.तसेच यातून जे भूयारी मार्ग निर्माण करण्यात आले आहेत त्यांना मोठी अंधेरी किंवा माशाल्का बंगला असे म्हणतात. हा अंधेरी मार्ग अत्यंत खडतर आहे.याबरोबरच त्यात अनेक फसव्यावाटा आहेत.अगदी शेवटी एक जाड लोखंडी तवा आहे.जो शत्रूला नष्ट करण्यासाठी महत्वपूर्ण ठरतो. अशाप्रकारे किल्ल्यातील युद्धाशस्त्राच्या दृष्टीने अनेक महत्वपूर्ण घटक अस्तित्वात असल्याचे दिसून येते.आजही पर्यटक ऐतिहासिक निरीक्षण, अभ्यास करण्यासाठी किल्ल्यावर गर्दी करतात.

विसागड किल्ला

विसागड किल्ल्याची नक्की निर्मिती कुणी व कधी केली ह्याचा आपल्याला अजून मागोवा लागलेला नाही. काही इतिहास संशोधकांनुसार सोळाव्या शतकात ह्या किल्ल्याचा ताबा अहमदनगरच्या निजामाकडे होता तर सतराव्या शतकाच्या सुरुवातीला शाहजहानाने मराठवाड्यातील इतर अनेक किल्ल्यांबरोबरच इथेही कब्जा मिळवला. पुढील दोन शतके ह्या प्रदेशावर हैदराबादच्या निजामाचा अंमल होता. निजामाच्या अखत्यारीतील इतर किल्ल्यांप्रमाणे हा विसागड ही स्वतंत्र भारतात सामील झाला महाराष्ट्रातील अवाढव्य किल्ल्यांपैकी एक मानला जाऊ शकेल असा काहीशे एकरांचे क्षेत्रफळ व्यापलेला हा वैशागड किंवा विसागड किल्ला. ह्या किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे पठारावर वसलेल्या जंजाळा गावाच्या दिशेने भूदुर्ग आणि इतर दिशांना डोंगरउतार असल्यामुळे गिरिदुर्ग अशी किल्ले धारूरसारखी रचना.अमीबासारख्या अस्ताव्यस्त पसरलेल्या किल्ल्याची तटबंदीसुद्धा काही किलोमीटर आहे. उत्तर पश्चिमेचा जरंडी दरवाजा, दरीत उतरणाऱ्या वाटेवरून वेताळवाडी किल्ल्याकडे पाहणारा आणि भव्य बुरुजांचे संरक्षण लाभलेला वेताळवाडी दरवाजा, एक चोर दरवाजा आणि ५२ बुरुज असा

 ISSN 2231 4342

जामानिमा ह्या किल्ल्याला आहे. प्रत्येक किल्ल्याला देवड्या आणि काही खोल्या जोडलेल्या आहेत. वेताळवाडी दरवाज्यालगत फारसी भाषेतील शिलालेख आहेत. जंजाळा गावाच्या दिशेने ह्या भूदुर्गाच्या संरक्षणासाठी एक खंदकाची योजना दिसते. आता हा खंदक पूर्णच बुजला आहे. इथून तटबंदी फुटलेली असल्यामुळे आज किल्ल्यात जायचा सोपा मार्ग झाला आहे. मात्र ह्या बाजूला एखादे प्रवेशद्वार असेल का हा अंदाज आज लागणे अवघड आहे. ह्या भागात खंदकाच्या बाहेर पूर्वी सुरेखशी एक तोफ पडलेली होती. संरक्षणरचनेबरोबर किल्ल्यात आज राणी महाल, पडका सहा खोल्यांचा वाडा, तीन कमानींची मशीद, सय्यद कबीर कादरी ह्या पीराचा दर्गाह अशा काही इमारतींचे अवशेषमात्र दिसतात. पीराच्या दर्ग्यामागे तीन ओळींचे दोन शिलालेख आहेत. त्यांचे सुयोग्य वाचन अजून झालेले नाही. सुतोंडा किल्ल्यासारखी इथली पाण्याची गरज किल्ल्यावरचे काही मोठी टाकी आणि एक तलाव यातून भागवलेली आहे.

धारुर किल्ला :

धारुरचा किल्ला देखील ऐतिहासिक दृष्टीने महत्वपूर्ण किल्ला आहे. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील धारुर या ठिकाणी एक भुईकोट किल्ला आहे. या वरूनच किल्ले धारुर हे नाव रूढ झाले आहे. हा किल्ला आदिलशाहीच्या काळात बांधण्यात आला आहे. हा किल्ला डोंगरावर असून त्यास १० मीटर उंचीचे तटबंदी आहे.किल्ल्यात जागोजागी टेहेळणी बुरुज आहे. या किल्ल्याचे निजामशाही आणि आदिलशाही मधील युद्ध आणि संघर्षाचा काळात महत्वपूर्ण स्थान असल्याचे ऐतेहासिक विवेचावरून स्पष्ट होते.देखील ऐतिहासिक दृष्टीने महत्वपूर्ण किल्ला आहे.मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील धारुर या ठिकाणी एक भुईकोट किल्ला आहे .या वरूनच किल्ले धारुर हे नाव रूढ झाले आहे .हा किल्ला आदिलशाहीच्या काळात बांधण्यात आला आहे .हा किल्ला डोंगरावर असून त्यास १० मीटर उंचीचे तत्बंधी आहे .किल्ल्यात जागोजागी तेहेणी बुरुज आहे. या किल्ल्याचे निजामशाही आणि आदिलशाही मिल युद्ध आणि संघरशायाचा काळात स्थान असल्याचे ऐतेहासिक विवेचावरून स्पष्ट करा.

कंधारचा किल्ला :

मराठवाड्यातील दुसरा महत्वपूर्ण असा किल्ला म्हणजे कंधारचा किल्ला होय. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील कन्धार या ठिकाणी एक भुईकोट किल्ला आहे. तो म्हणजे कंधारचा किल्ला होय.या किल्ल्याभोवती ९० फुट रुंदीचे खंदक असून तो बारा महिने पाण्याने भरलेला आसतो.त्यात खंदकात अनेक जीवन झरे आहेत. राष्ट्रकुट राज्याच्या काळात हा किल्ला बांधण्यात आला आहे.त्यानंतर चालुक्य, यादव या घराण्यानी यावर साम्राज्या स्थापन केले.या किल्ल्यात इस्लामी स्वरूपाच्या इमारती यात हमामखान,जनानखान अशा नव-नव्या इमारती बंधण्यात आल्या.युद्धशास्त्राच्या दृष्टीने या किल्ल्याचा प्रचंड तट तसेच किल्ल्यातील बुरुज,इमारती महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

ISSN 2231 4342

नळदुर्गचा किल्ला :

उस्मानाबाद जिल्ह्यातील नळदुर्ग या ठिकाणी एक किल्ला आहे.बोरी नदीच्या किनाऱ्यावर हा किल्ला असून त्याचे बांधकाम इ.स.१३०० मध्ये झाले आहे.किल्ल्याच्या तीनही बाजूंनी भक्कम व सरळ रेषेत खडकांनी व्यापलेला डोंगर आहे.या किल्ल्यातील निसर्गरम्य परिसर पर्यटकांच्या दृष्टीने आजही आकर्षणाचे केंद्र बनत चालले आहे.या किल्ल्यातील अनेक वैशिष्ट्य ऐतिहासिक दृष्टीने अध्ययनाच्या,संशोधनाच्या साठी अत्यंत उपयुक्त ठरतील अशी आहेत.त्यातील महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे यात दोन धबधबे आहेत.जे नर आणि मादी धबधबे म्हणून ओळखले जातात. अशाप्रकारे किल्ल्यातील आकर्षणाचे दृष्टीने अनेक महत्वपूर्ण घटक अस्तित्वात असल्याचे दिसून येते.आजही पर्यटक ऐतिहासिक निरीक्षण, अभ्यास करण्यासाठी किल्ल्यावर गर्दी करतात. तसेच प्राचीन काळात या किल्ल्याचे युद्ध व लढायाच्या दृष्टीने महत्वपूर्ण स्थान असल्याचे दिसून येते. किल्ल्याचा प्रचंड तट तसेच किल्ल्यातील बुरुज,इमारती महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

परांडयाचा किल्ला:

मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्हयातील हा दुसरा किल्ला आहे. प्राचीन काळात पलीयंड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या परांडयामध्ये किल्ल्याचे महत्वपूर्ण स्थान आहे.हा किल्ला बहामनी सम्राट वजीर महम्मद गावान याने १४७७ मध्ये बांधला. किल्ल्या भोवती मोठे खंदक आहे. या किल्ल्यास एकून २६ बुरुज असून त्याचा तट अत्यंत मजबूत आहे.या किल्ल्याची रचना युद्धशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त व बळकट अशा स्वरुपाची आहे.बुरुजांच्या द्वारे भक्कम संरक्षण किल्लायामध्ये आहे.किल्ल्यातून अनेक भुयारी बाहेरील खंदकाच्या बाजूस निघताना दिसतात. या किल्ल्याच्या बुरुजावर तोफा आहेत.याती काही लहान तर काही मोठ्या आहेत.हा किल्ला अभेद्य असून निजामशाही,आदिलशाही,मुगाल्शाही,साम्राटांनी या किल्ल्यावरील वर्चस्व प्राप्त करण्यासाठी सतत संघर्ष केलेला दिसून येतो.

समारोप:

गडकिल्ल्यांच्या देशा, महाराष्ट्र देशा, असे महाराष्ट्रास म्हटले जाते.त्याप्रमाणेच मराठवाड्यासही गड किल्ल्यांचा वारसा लाभला आहे. मात्र आसे असले तरी मराठवाड्यातील किल्ल्यांच्या नशिबी आज पुनर्रचना करण्याची आवश्यकता आली आहे. गड संवर्धन करुन मराठवाड्यातील किल्ल्यांचे रूप पालटणे आज गरजेचे आहे.मराठवाड्यातील किल्ल्यांची दुर्दशा पाहता या किल्ल्यांचा विकास करुन ऐतिहासिक वारसा जतन करण्याचे मोठे अव्हान आहे.राज्यात ५५० गड किल्ले आहेत. पैकी ३६० किल्ले छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित आहेत. मराठवाड्यात १५ किल्ले आहेत. यात दौलताबादचा देवगिरी, भांगसीमाता गड, अंतुर, कंधार, नळदुर्ग, परांडा, धारूर, औसा, वेताळवाडी, जंजाळा, सुताडा, उदगीर, पाथ्री (परभणी), परळी आणि माहूरच्या किल्ल्यांचा समावेश आहे.महाराष्ट्राइतके मोठ्या संख्येने किल्ले देशाच्या कोणत्याही इतर प्रांतात सापडणार नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांनी याच किल्ल्यांवरून हिंदवी स्वराज्याची निर्मिती केली. हेच गड-कोट-दुर्ग

ISSN 2231 4342

महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचे, शौर्यशाली परंपरेचे साक्षीदार आहेत. छत्रपती शिवराय आणि किल्ले यांचे एक अतूट नात आहे. अनेक किल्ल्यांना महाराजांचा प्रत्यक्ष सहवास लाभला आहे.महाराष्ट्राच्या इतिहासाला जागतिक पातळीवर जी ओळख प्राप्त झाली आहे, ती इथल्या किल्ल्यांमुळेच हे विसरून चालणार नाही.

संदर्भ ग्रंथ सूची:

१) म.श्री.माटे.-मराठवाड्याचे कला वैभव.
२) अ.रा.कुलकर्णी.-शिवकालीन महाराष्ट्र.
३) सोमनाथ रोडे-मध्ययुगीन भारताचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास.
४) सेतू माधवराव पगडी.- महाराष्ट्र आणि मराठे.
५) श्रीकांत तापीकर-महाराष्ट्रातील किल्ले.
६) दै.दिव्य मराठी.८ सप्टेंबर २०१९.
७) दै.लोकमत.७ जुलै २०१८.

ISSN 2231 4342

चारठाणा येथील बारव स्थापत्य : एक अभ्यास

प्रा. डॉ. जि. एस. पिसे
इतिहास विभाग प्रमुख
ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

प्रस्तावना :-

मंदिराचे गांव म्हणून चारठाणाची ओळख आहे. जिंतूर पासून 22 कि. मी. आंतरावर असून या ठिकाणी मिळालेला एक शिलालेख डॉ. श. गो. तुळपुळे यांनी प्रकाशित केला आहे. त्यांच्या मते हा शिलालेख शके 1124 म्हणजे 12 व्या शतकातील आहे. चारठाणा येथे 13 व्या शतकात निर्माण झालेल्या यादव कालीन मंदिराचा एक मोठा समूह आहे. त्यामुळे येथील वैभव सपन्नतेची कल्पना येते. गोकुळेश्वर मंदिर हे एक दक्षीण अधिष्ठानावर बांधलेले त्रिदल पध्दतीचे एक महत्व पूर्ण मंदिर आहे. मंदिराच्या दक्षिण बाहुज एक मठ असून दुसऱ्या बाजूस बारव आहे. बारवेला उत्तर व दक्षीण बाजुने मुख्य प्रवेशद्वार असून तिसरे प्रवेश द्वार पश्चिम बाजुस आहे. त्यास उप-प्रवेश द्वारही म्हणतात.

चारठाणा येथील बारवेचे एक आगळ-वेगळ वैशिष्ट्य म्हणजे बारवेला चारही बाजूने मंडप आहेत. जल मांडवी प्रवेशाच्या दृष्टीने तीन मुख्य आणि प्रत्येक मुखाच्या दोन्ही बाजूस कुट असलेली आहे. भद्रा याप्रकारात याबारवेचा समावेश होत असावा. बारवेचा आकार 22.50 X 32.25 मीटर आहे. संरक्षक भिंतीस आतील बाजूने असलेल्या कुंड खडकात कोरलेले आहे. त्यांची खोली दोन मिटर पेक्षा जास्त असावी यानंतर 25 से. मी. उंचीच्या तिन पायऱ्या आहेत येथे सोपानाची रुंदी 48 से. मी. आहे. येथील पायरीची लांबी 11.60 मीटर असून यावर प्रत्येकी एक मीटर उंचीचे तीन टप्पे आहेत.

पहिल्या दोन टप्प्यावर असलेल्या सोपानाची रुंदी 51 से. मी. आहे तिसऱ्या टप्प्याच्या बांधकामा नंतर मंडपाचा सोपान आहे. एकुण मंडपाची रुंदी 2.20 मी. असुन बारवेचा आकार 18 X 18 मीटर आहे. एकुण मंडपा पासून तीन मीटर खोलीपर्यंत असलेल्या बांधकामाचे स्वरुप नेहमीच्या बांधकामापेक्षा वेगळे आहे. येथील मंडपातून उत्तर व दक्षीण भागास प्रवेशासाठी सरळ रेषेत खाली उतरण्यास पायऱ्या ठेवल्या आहेत. अशा प्रकारे रुठ बारव स्थापत्य कुंडाचा क्रमवारीने सारख्या प्रमाणता होत जाणारा विकास येथे दिसत नाही. बारवेच्या पश्चिम भागास कुंडापर्यंत येणाऱ्या पायऱ्यामध्ये परिवर्तन केल्याचे दिसून येते एकूण सहा टप्प्यात असलेली ही बारव मंडपासाठी महत्वाची ठरते. मंडपापर्यंत असलेला प्रवेश 24 देवकोष्ट आणि पूर्व-पश्चिम भागास दोन गर्भ गृहे ठेवलेली आहे. बारवेसाठी एकुण 68 स्तंभ उभारण्यात आले आहे. यापैकी अर्धस्तंभ भिंतीत असून 24 पूर्ण स्तंभ हे भौमितीक नक्षी असलेले पूर्ण विकसीत आहेत. गोकुळेश्वर तीर्थ किंवा पुष्करणी म्हणुन ओळखली जाणारी ही बारव आहे. उत्तरेकडील एका दगडी स्तंभाव मिथून शिल्प आहे. काही स्तंभावर यक्ष व काही स्तंभावर सुंदर अप्सरा कोरलेल्या आहेत. बारवेच्या आवऱ्या मध्ये 24 देवकोष्ट असून जैन धर्मियांच्या मते 24 देवकोष्टमध्ये

जैन तीर्थ कारांची स्थापना केलेली असावी. परंतु पुरावा नाही परंतु बारवेच्या बाहेरच्या बाजूस असलेल्या सर्व खांबावर हिंदू देवता आढळतात. शिवाय हे बारव गोकुळेश्वर हिंदू शिवमंदिराला लागून आहे. हे योग साधनेसाठी त्याचा उपयोग करत असे वाटते. यादवाचा पंतप्रधान हेमांद्री पंत हा चारठाणा येथून सहा मैलावर असलेल्या हेलसगावचा असून तो मोठा शिवभक्त होता त्याने 13 व्या शतकात येथील मंदिरे बांधली असावी हे यावरुन लक्षात येते.

निष्कर्ष :-

1. बारव स्थापत्याच्या निर्मितीत धार्मिक महत्व देण्यात आले आहे.
2. मंदिर स्थापत्य निर्मिती बरोबर बारवेच्या विकास झाला.
3. 11 व्या व 13 व्या शतकापासून बारवेची निर्मिती झाली असावी.
4. बारव निर्मितीमध्ये गणितीय प्रकीया होती दिसून येते.
5. बारवेच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस संरक्षण भिंतीत तसे सोपा नावरदेव कोष्टाची निर्मिती होत गेली.
6. परिसरातील लोकांनी पाणी सुविधेसाठी बारवेच्या उपयोग केल्याचे दिसून येते.

समारोप :-

वरिल विवेचनावरुन असे दिसून येते की, चारठाणा येथील बारव ही धर्मश्रध्देच्या दृष्टीकोणातून अत्यंत उपयुक्त ठरते. त्याच बरोबर जलव्यवस्थापनाच्या दृष्टीने सुध्दा महत्वाची आहे. यादवकाळात बांधलेलीही बारव फार महत्वाची व उत्कृष्ट असा नमूना आहे. त्यामुळे चारठाणा गावातील मंदिर निर्मितीत व बारव स्थापत्याला अनन्य साधारण महत्व आहे.

संदर्भसुची

1. पाठक अरुण चंद्र, महाराष्ट्रातील बारव स्थापत्य, मराठवाडा संशोधन मंडळ, 2001.
2. महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर, परभणी जिल्हा संपादक कि. का. चौधरी, महाराष्ट्र शासन 1988.
3. देशमुख ए.बी. परभणी जिल्हा विशेष.
4. मुलाखत दिनेश मुळे, चक्रपाणी.
5. प्रत्यक्ष सर्वेक्षण.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

कोल्हापूर जिल्ह्यातील काही दीपमाळा

डॉ. खंडेराव शिंदे
मो. नं.९८५०११७१९४
इतिहास विभाग, राजर्षी शाहू कला व
वाणिज्य महाविद्यालय, रुकडी,
जि. कोल्हापूर.

प्रस्तावना :

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचे अठराव्या शतकाच्या पहिल्या दशकात महाराणी ताराबाई व छत्रपती शाहू महाराज यांच्यातील संघर्षातून सातारा व कोल्हापूर अशी दोन राज्ये निर्माण झाली. छत्रपती शाहूंनी सन१७०८ मध्ये आपल्या सातारा राज्याची राजधानी 'सातारा' येथे स्थापन केली. तर महाराणी ताराबाईंनी सन१७१० मध्ये आपल्या कोल्हापूर राज्याची राजधानी 'पन्हाळा' येथे स्थापन केली. सन १७१० पासून ते १ मार्च १९४८पर्यंत कोल्हापूर राज्य एक स्वतंत्र राज्य होते.

अशा या कोल्हापूर राज्यात सध्याच्या कर्नाटकातील चिकोडी व मनोळी तालुक्यांचा समावेश होता. पुढे १९६० मध्ये भाषावार प्रांतरचनेनुसार विभागणी होऊन पूर्वीच्या कोल्हापूर राज्याचा आताचा कोल्हापूर जिल्हा अस्तित्वात आला. अशा या कोल्हापूर जिल्ह्यात अनेक महत्त्वाची धार्मिक स्थळे आहेत.ज्यास दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते त्या करवीरक्षेत्री अंबाबाई देवालय आहे. येथे वर्षभर भाविक येतात. याशिवाय जेथे मोठ्या जत्रा-यात्रा भरतात, जेथे महाराष्ट्राबाहेरील भाविक लोक येतात अशी अनेक धार्मिक स्थळे कोल्हापूर जिल्ह्यात आहेत.

या धार्मिक स्थळांमध्ये वाडी रत्नागिरी (ता. पन्हाळा) येथील ज्योतिबा, पट्टणकोडोली (ता. हातकणंगले) येथील विठ्ठल– बिरदेव, गडहिंग्लज (बड्याची वाडी) येथील काळभैरव,नृसिंहवाडी (ता. शिरोळ) येथील नृसिंह सरस्वती व दत्त महाराज, आणि आदमापुर येथील बाळूमामा यांचा समावेश होतो. जेथे जत्रा - यात्रा भरतात तेथील मंदिर प्रांगणात लहान मोठ्या दीपमाळा (Lamp Pillor) आहेत. या दीपमाळा यात्रेवेळी प्रज्वलित केल्या जातात. यातील अनेक दीपमाळा वास्तुकलेचा नमुना आहेत. म्हणून अशा या दीपमाळांचे बांधकाम कसे केले जाते, त्या प्रज्वलित कशा करतात, आणि या दीपमाळांचे वैशिष्ट्ये नेमके काय? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने या शोधनिबंधाचा प्रपंच आहे.

यात्रा:

नेहमीच्या जीवनशैलीपेक्षा वेगळेपणा या यात्रांमध्ये असतो म्हणूनच यात्रा म्हणजे ग्रामीण लोकांचे स्नेहसंमेलन होय. या यात्रांना ग्रामीण लोक पारंपरिक वस्त्रे परिधान करून मोठ्या संख्येने जात असत. जेव्हा

ISSN 2231 4342

दळणवळणाची फारशी साधने नव्हती तेव्हा लोक घोडा किंवा बैलगाडीतून जात असत. बैलांना सजवून गाडीला सावलीसाठी तट्या बांधले जात. तेव्हाही व आधुनिक काळातही या यात्रा आठवडाभर भरतात. या यात्रांमुळे सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक आदानप्रदान होते. आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणावर होते. यात्रा म्हणजे लोकोत्सव असतो.

श्रद्धा:

जीवन सुखकर होण्यासाठी मानवाच्या ठिकाणी श्रद्धा महत्त्वाचे आहे. श्रद्धा हीच मानवी जीवनातील एक फार मोठी अद्भुत शक्ती आहे. या श्रद्धेमुळेच मानवी जीवनात चांगल्या घटना घडून आल्या आहेत. आपली जशी माता — पित्यांवर, गुरुजनांवर श्रद्धा असते तशीच श्रद्धा निसर्गातील गुढ शक्तीवरही असते. या गुढ शक्तीला प्रसन्न करून घेण्यासाठी मानवाने तिची पूजा करायला सुरुवात केली. अशा श्रद्धेतूनच मानवाने लेणी कोरली, मंदिरे बांधली, सुंदर मुर्त्या घडविल्या आणि मंदिर प्रांगणात उंचच उंच दीपमाळाही बांधल्या आहेत.

दिव्यांचे प्रकार:

ज्या देवतेवर आपली श्रद्धा आहे अशा देवतेची पूजा करण्यासाठी मानवाने विविध प्रकारच्या दिव्यांचा वापर केला. या दिव्यांमध्ये अखंड जळणारा नंदादीप (Votive Lamp), बैठकीचे दिवे (Pedestal Lamps) व पूजा - विधीतले लहान आकारांचे निरांजन दीप व ओवाळण्याची आरती हे दिव्यांचे प्रकार आहेत. मंदिराच्या गाभाऱ्यात असणाऱ्या मूर्तीच्या दोन्ही बाजूला रात्रंदिवस तेवत असतो तो नंदादीप होय. गर्भगृहापुढे दोन्ही बाजूस तेवत असते ती दीपलक्ष्मी होय.

मंदिर प्रांगणात व महाद्वारापुढे असतात त्या दीपमाळा होय. या दीपमाळांच्या घडणीत मखराकार कोनाडे असतात. आजू—बाजूला, वर-खाली दगडाच्या कोरीव, तासीव शाखा बसवलेल्या असतात. अशा कोनाडे व शाखांवर पणत्या (Terracotta Bow Lamps) ठेवण्याची सोय असते. अशी दीपमाळपेटली म्हणजे सारा मंदिर परिसर प्रकाशाने उजळून निघतो.

दीपमाळांचे बांधकाम:

या दीपमाळा एका मोठ्या चौथऱ्यावर बांधल्या जात. दीपमाळेच्या उंचीनुसार या चौथर्याची लांबी, रुंदी व उंची अवलंबून असते. दीपमाळा या पायाकडे बऱ्याच रुंद असून वरच्या बाजूला त्या निमुळत्या होत गेलेल्या आहेत. दीपमाळा या अत्यंत देखण्या व सुबक असतात. म्हणून आजच्यापेक्षा त्या काळातही स्थापत्य कला प्रगत होती असे वाटते. दीपमाळांच्या बांधकामासाठी विशिष्ट आकाराचे चौकोनी दगड व चुन्याचा वापर केला जाई. काही दीपमाळांमध्ये प्राण्यांच्या आकाराचे दगडी कोनाडे (पायऱ्या) आहेत या कोनाड्यांची संख्या दीपमाळेच्या उंचीनुसार कमी - जास्त प्रमाणात असते.दीपमाळेच्यासर्वात उंच ठिकाणी छोटी दगडी कुंडही असते.ही कुंडी यात्रेच्या शेवटी पेटवली जाते.

ISSN 2231 4342

दीपमाळ प्रज्वलन:

यात्रेच्या मुख्य दिवशी दीपमाळा पेटवल्या जात. या दीपमाळा पेटवण्यासाठी गोडतेल व सुतीकपड्यांचा वापर केला जाई. दीपमाळ पेटवण्यासाठी भाविक लोक गोडतेल, कापूर, उदबत्ती दीपमाळेस अर्पण करतात. यात्रेदिवशी मुख्य दीपमाळेचे पूजन करून पेटवली जाते. दीपमाळेच्या भोवती असणाऱ्या कोनाड्यांवरून आपण शिडीवर चढतो त्याच पद्धतीने पण गोलाकार पद्धतीने वर जाऊन कुंडी पेटवली जाते. ही कुंडी पेटविण्यासाठी सुपाऱ्या, खारका, खोबरे, गोडतेल, कापूराचा वापर केला जाई. त्यानंतर प्रत्येक कोनाड्यांवर पणती ठेवून दीपमाळ वरून खाली पेटवली जाते. संपूर्ण दीपमाळ किंवा दीपमाळा पेटवल्यावर मंदिर व परिसर प्रकाशाने उजळून निघतो.

कोल्हापूर जिल्ह्यातील जवळ जवळ सर्वच मंदिर परिसरात अशा दीपमाळा आहेत. पण ज्या ठिकाणी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशातील भाविक लोक मोठ्या प्रमाणावर येतात अशी जिल्ह्यातील कोल्हापुर, वाडी रत्नागिरी,गडहिंग्लज व पट्टणकोडोली ही महत्त्वाची यात्रा ठिकाणे आहेत.

या ठिकाणांशिवाय कोल्हापूर येथील पंचगंगा घाटाजवळील छत्रपती घराण्याच्या स्मशानभूमीत कोल्हापूरच्या गतकालीन छत्रपतींची समाधी मंदिरे आहेत. येथेही दीपमाळा आहेत. याशिवाय पन्हाळा व संभापुर (टोप) येथील करवीर छत्रपती संभाजी पहिले यांची समाधी मंदिरे आहेत तेथेही दीपमाळा आहेत.

कोल्हापूर :

कोल्हापूर शहर पंचगंगेच्या काठी वसले असून ते 'करवीर' म्हणूनही ओळखले जाते. अशा या करवीरक्षेत्री अंबाबाईचे देवालय आहे. महाकाली व महासरस्वतीचीही मंदिरे अंबाबाई देवालयातच आहेत. अंबाबाईचा उत्सव चैत्री पौर्णिमेला व अश्विन शुद्ध पंचमीला असतो. याशिवाय कार्तिक व माघ महिन्यात किरणोत्सव असतो. अश्विन महिन्यात अंबाबाई मंदिरात घटस्थापना होते. घटस्थापनेवेळी नंदादीप पेटवला जातो. तो नऊ दिवस असतो.

अंबाबाई देवालयास चार मुख्य दिशेला चार दरवाजे आहेत. उत्तरेला घाटी दरवाजा असून त्याच्यासमोर एक आकर्षक अशी दीपमाळ आहे. या दीपमाळेची उंची २० फुटांपर्यंत असून काळ्या पाषाणाचा वापर केला आहे. याशिवाय देवालय प्रांगणात गरुड मंडपाशेजारी एक दगडी चौथरा आहे. या चौथर्‍याची उंची आठ ते दहा फूट असून या चौथऱ्याच्या चारी कोपऱ्यावर चार व मध्यभागी एक अशा दीपमाळा आहेत. याची उंची २० फुटांपेक्षा जास्त आहे. महादरवाजाजवळ दोन दीपमाळा आहेत. या दीपमाळा चैत्री व अश्विन पौर्णिमेला प्रज्वलित केल्या जात. अलीकडील काळात या दीपमाळांवर विद्युत रोषणाई केली जाते.

वाडी रत्नागिरी:

वाडी रत्नागिरीस 'जोतिबा डोंगर' असे म्हटले जाते.जोतिबा हे ठिकाण पन्हाळा तालुक्यात असून कोल्हापूरच्या वायव्येस आहे. सध्याची जोतिबा मंदिर ग्वाल्हेरच्या दौलतराव शिंदे यांनी बांधले. मंदिराच्या उत्तरेस भव्य असे प्रवेशद्वार असून त्याच्यासमोर तीन-चार दीपमाळा आहेत. या दीपमाळा पेटवल्या म्हणजे मंदिराचा आसमंत प्रकाशाने उजळून निघत असावा. यात्रेकरूंना उजेड मिळत असावा.

चैत्री पौर्णिमेला जोतिबाची मोठी यात्रा भरते. अनेक मानाच्या सासनकाठ्या येतात.जोतिबाची पालखी निघते तेव्हा गुलाल खोबऱ्याची उधळण केली जाते.जोतिबा मंदिर परिसरात अनेक लहान मोठ्या दीपमाळा आहेत. दक्षिण बाजूला जोतिबा मंदिरासमोर चार मोठ्या दीपमाळा, पुढे बाहेरही लहान दीपमाळ आहे.जोतिबाला गुलालाचा मान आहे. त्यामुळे गुलाल उधळल्याने मंदिर परिसर गुलाली झालेला असतो.

गडहिंग्लज (बड्याची वाडी):

गडहिंग्लज हे कोल्हापूरच्या आग्नेयेस असून संकेश्वर-अंबोली रस्त्यावर आहे.गडहिंग्लजच्या उत्तरेला पाच किलोमीटर अंतरावर बड्याचीवाडी येथे काळभैरवाचे देवालय आहे. येथे माघ पौर्णिमेच्या तिसऱ्या दिवशी यात्रा भरते. यात्रेच्या दिवशी पालखी मंदिराला प्रदक्षिणा घालते. प्रदर्शनावेळी गुलाल-खोबऱ्याची उधळण केली जाते. यानंतर दीपमाळा पाजळल्या जातात. दीपमाळा पाजळल्यानंतर बोकड-कोंबड्याचा बळी दिला जातो.

मंदिर प्रांगणातील दीपमाळा पूर्वेकडे असून त्याची उंची २०-२५ फुटापर्यंत आहे. या दीपमाळा पेटवल्यानंतर त्यांचा उजेड एक किलोमीटरपर्यंत डोंगरात पडतो.

कसबा बीड :

बीड हे गाव तुळशी व भोगावती नद्यांच्या संगमावर वसले आहे. बीड ते कोल्हापूरच्या नैऋत्येस १४ किलोमीटर अंतरावर आहे. बीड व शिलहार राजांचा निकटचा संबंध होता. कसबा बीडचे ग्रामदैवत कल्लेश्वर किंवा बीडेश्वर महादेव आहे. कल्लेश्वर मंदिराला ३० चौरस मीटर चे प्रशस्त आवार आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वारी भव्य अशी एक दीपमाळ आहे. या दीपमाळेच्या तळाला गजशिल्पे आहेत. ही दीपमाळ शके १८५४ मध्ये मारुती व विरुपाक्षा बाबाजी गाडवे यांनी बांधली आहे. अतिशय देखणी दीपमाळ आहे. तिची उंची २० फुटापर्यंत आहे.

किल्ले रांगणा:

रांगणा उर्फ प्रसिद्धगड हा कोल्हापूरच्या पश्चिमेला असून किल्ल्याजवळील पाटगाव येथे मौनी महाराजांचा मठ आहे. या किल्ल्यावर रांगणाईदेवीचे मंदिर आहे. हे मंदिर शिवकालीन असून त्याचा जीर्णोद्धार राजश्री शाहूपुत्र राजाराम महाराज यांनी केला. या मंदिरासमोर किल्ल्याचे आभूषण असलेली दगडी दीपमाळ आहे.या दीपमाळेचा वरचा भाग पडला होता. तो निसर्गवेध परिवार कोल्हापूरने पूर्ववत केला आहे. अशाच प्रकारची दीपमाळ भुदरगडावर असणाऱ्या भैरवनाथ मंदिर परिसरातही आहे.

हातकणंगले तालुक्यातील अल्लमप्रभू मंदिरासमोर २० फूट उंचीची दीपमाळ असून ती काशीबाई पाटील यांनी सन १९२२ मध्ये बांधली आहे. ही दीपमाळ पाच ते सहा फूट उंचीच्या चौकोनी कट्ट्यावर उभी असून दीपमाळेच्या पायथ्याला चार गजशिल्पे आहेत. जणू काही या हत्तीनीच ही दीपमाळ आपल्या पाठीवर तोलून धरली आहे असे वाटते. याशिवाय धुळोबा येथेही दीपमाळा आहेत. पटणकडोली, खोची येथेही दीपमाळा आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात अनेक मंदिरात दीपमाळा आहेत. पण शोधनिबंधाच्या लेखन मर्यादा लक्षात घेता काही महत्त्वाच्या दीपमाळांची माहिती दिली आहे.

निष्कर्ष:

आज भरपूर प्रकाशासाठी चौकात किंवा इतर ठिकाणी आपण जसे हॅलोजन बल्ब उंच खांबावर लावतो. पण महाराष्ट्रात वीज येण्याअगोदर यात्राकाळात मंदिर प्रांगणात उजेडासाठी दीपमाळा पेटवल्या जात. समुद्रातील दीपगृह जसे समुद्रावरील जहाजांना ५०-६० किलोमीटरवरून दिशादर्शनाचे काम करतो त्याचप्रमाणे दीपमाळा पेटवल्यावर यात्रा भरली किंवा संपली असे यात्रेकरूंना सहज समजत असावे.

या दीपमाळानी महाराष्ट्रातील जनमनावरही आपला प्रभाव निर्माण केला आहे. बँक ऑफ महाराष्ट्राचे बोधचिन्ह दीपमाळ आहे. कोल्हापूरच्या छत्रपती घराण्यामार्फत जी शाळा चालवली जाते त्यांच्या बोधचिन्हात दीपमाळ आहे. थोडक्यात दीपमाळा जशा मंदिर परिसरातील अंधार संपवतात त्याप्रमाणे मानवी मनातील खिन्नता आणि दु:खाचा अंधार नाहीसा करण्याची प्रेरणा दीपमाळा देतात.

संदर्भ :

१. गर्गे स. मा.- करवीर रियासत २००३ पृ – ९१ व १०३
२. चौधरी किका - कोल्हापूर गॅझेटिअर १९८९ पृ-२
३. शिंदे डॉ. खंडेराव - कोल्हापूर राज्याचा इतिहास (१८३८ – १८९४) २००९ पृ – १२५
४. ढेरे रा. चिं. - लोकदैवतांचे विश्व, प.१८८
५. किणीकर रॉय –शिल्पायन, पृ.२५
६. कित्ता –
७. दैनिक पुढारी, सातारा दि.०५-०१-२०१० पृ.५
८. कित्ता –
९. ढेरे रा. चिं. - करवीर निवासिनी श्री.महालक्ष्मी, २०१० पृ.३१
१० कित्ता– पृ.३१ ते ३३
११. बाबर डॉ. सरोजिनी - कुलदैवत पृ.६८९
१२. कित्ता – पृ.४४३
१३. खोत डॉ. एस. के. - कोल्हापूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळे पृ.९०-९१
१४. दामले डॉ. आनंद - कसबा बीड पृ.३२-३३
१५. चिले भगवान - दुर्गवैभव कोल्हापूर जिल्ह्याचे पृ.४७
१६. अक्कलकोट सतीश–दुर्ग पृ.५२०
१७. प्रत्यक्ष भेट.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयी चिंतन

प्रा. विठ्ठल गुंडे
इतिहास विभाग प्रमुख,
कालिका देवी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय शिरूर (का) जि. बीड.
मो.नं.9421453308

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध पैलूंचा अभ्यास करत असताना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते की केवळ दलित, शोषित ,पीडित यांनाआपल्या उराशी कवटाळून उभारी दिली असेन सून कामगार ,श्रमिक ,शोषित, पीडित गुलामगिरी, दारिद्र्यात खितपत पडलेल्या असंघटित कामगार यांच्यासाठी कायदे बनवून त्यांच्या हिताचे रक्षण कशा पद्धतीने होईल त्याचाही विचार त्यांनी केला. आहे अठराव्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे भारतातही उद्योग व्यवसायांना सुरुवात झाली सामान्यता व हाकाळ 1850 ते 1870 दरम्यानचा आहे डलहौसीच्या कारकिर्दीत 1853 पासून भारतात दळण-वळण व्यवस्था वापर सुरू झाला रेल्वे रूळ टाकण्यासाठी आणि यंत्रांना लागणारा कोळसा काढण्यासाठी हजारो मजूर काम करू लागले .भारतीय कामगारांचा एक वर्ग यादरम्यान उदयास आला यातच मुंबईमध्ये कापड गिरण्या चालू झाल्या कलकत्यात जूट उद्योग सुरू झाला चहा व्यवसायातही हजारो मजूर कार्यरत होते हे सर्व स्थित्यंतर औद्योगिक क्रांतीमुळे झाले होते हळूहळू खेड्यातील लोकांचा ओढा शहराकडे मोठ्या प्रमाणात वाढू लागला त्यामुळे जास्त कामगार उपलब्ध झाले त्याचा परिणाम असा झाला की कामगारांना यंत्रापेक्षा कमी दर्जा प्राप्त होत असल्याचे दिसून आले कामगारांच्या मनावर कामाचे तास ठरवली जात होते एखादा अपघात झाला तर त्याच्या जागी लगेच दुसरा कामगार बोलवायला जाईल एवढी वाईट अवस्था कामगारांची झाली होती की त्यांना पंधरा पंधरा तास काम करावे लागत होते अशा या कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक कार्य केल्याचे दिसून येतात.

स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना :

भारतात ज्यापद्धतीने मजुरांची कामगारांची संख्या वाढत गेली तसे त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी पहिल्यांदा आवाज उठवला तो नारायण मेघाजी लोखंडे यांनी 1890 मध्ये मुंबई गिरणी कामगार संघ स्थापन केला यानंतर अनेक संघटना उदयास आल्या परंतु या संघटना इंग्रज व भांडवलदार असल्याने कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे त्यांनी पद्धतशीरपणे नाकारले होते परंतु पुढील डॉ. आंबेडकरांनी कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आणि त्यांना न्याय देण्यासाठी 15 ऑगस्ट 1936 रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली नुसती स्थापना करून ते थांबले नाहीत तर त्यांनी पक्षामध्ये काय असतं बहुजन समाज मराठी वर्ग

वगैरे जातींचा समावेश करण्यात आला होता त्यापक्षाची ध्येय धोरणे ही त्यांनी निश्चित केली होती ती पाहिल्यानंतर कळते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मजुराची किती तळमळ होती ते.

* कामगारांच्या कामाचे तास कमी करून मजुरीचे किमान मर्यादा ठरवणे.

* कारखान्यातील व गिरणीयातील कामगारांच्या नोकरीची शाश्वती व बढती याबाबत कायदेशीर तरतूद करणे.

* केलेल्या कामाचे योग्य वेतन दिले पाहिजे.

* कामगारांना राहण्यासाठी स्वस्तात घरे देणे.

* कामगारांच्या आरोग्याची काळजी घेऊन त्यांना आजारी रजा देणे.

* अपघाती नुकसान भरपाई देऊन वर्धात्वाचे पेन्शनही दिले पाहिजे.

* कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक सुविधा निर्माण करणे.

यापद्धतीची ध्येय धोरणे आपल्या पक्षाची जाहीर करून कामगारांच्या कल्याणाचा डॉ. बाबासाहेबांनी विचार केला आहे.

मजूर मंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका :

20 जुलै 1942 रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मजूर मंत्री पदाची सुत्रे हातात घेतली सहाजिकच दलित श्रमिक व कामगार वर्गाला मनापासून फार आनंद झाला मजूर व कामगारांच्या हिताच्या अनेक सुधारणा त्यांनी घडवून आणल्या त्यात प्रमुख्याने.

* स्त्रियांना कारखाना कायद्यान्वये रात्री काम करण्याची बंदी घातली गेली.

* स्त्रियांना प्रसुती काळात विशेष पगारी रजा मिळविण्यासाठी प्रयत्न केले.

* कारखान्यातील बारमाही कामगारांना भरपगारी रजा मिळवून दिली.

अशा अनेक सुधारणा कामगारांच्या जीवनात घडवून आणलेल्या दिसतात थोडक्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांच्या प्रश्नाला वाचा फोडून देण्याचा प्रयत्न केला आहे याबरोबरच त्यांनी कामगारांना पूर्ण पगारी सुट्ट्या देण्याची दुरुस्ती विधेयक तयार केले होते कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी लवाद इलाज नाही कारखान्यात कामकरणाऱ्यांचा सुविचार केला आहे असे नाही तर शेतीवर काम करणारयांचाही प्रश्न त्यांना सतावत होता कामाचे तास प्रॉव्हिडंट फंड आरोग्य विषयक विमा मालकाची असणारी जबाबदारी नुकसान भरपाई असे अनेक कायदे ज्याप्रमाणे औद्योगिक कामगारांना लागू आहेत त्याप्रमाणे शेतीवर राबणाऱ्या

कामगारांनाही ते लागू करावेत असे त्यांना वाटत होते त्यांनी कामगारांच्या बाबत जे काम मजूर मंत्री म्हणून केले त्यामुळेच आजच्या परिस्थिती त्यांना हक्क मिळालेले आहेत.

बहिष्कृत वर्गातील कामगार संबंधी विचार :

कामगार संघटना आणि कामगार संघटनांनी वेळोवेळी केलेली संप आणि या संपामुळे बहिष्कृत वर्गातील कामगारांचे कल्याण होण्या ऐवजी त्यांचे नुकसानच अधिक झालेली आहे कामगार संघटनांचे संपाचे हत्यार हे बऱ्याच वेळा बहिष्कृत वर्गावर अधिकच आलेले दिसते म्हणून वारंवार संप करणे सर्वदा हितकारक असते असे नाही 26 ऑक्टोबर 1929 संपा विषयी आंबेडकर कडाडून टीका करतात यामध्ये अनेक मुस्लिम गिरणी कामगार सहभागी झाले नव्हते शिवाय मुस्लिम कामगार असणाऱ्या कापड गिरण्या सुरळीत सुरू होत्या त्यामुळे जॉब बहिष्कृत वर्ग या संपामध्ये सामील झाला होता त्यांच्यावर आजपर्यंत अन्याय झाला होता वर्गास कापड गिरण्यामधील कापड खात्यात प्रवेश नव्हता स्पृश्यलोकं अस्पृश्यलोकांना तिथे प्रवेश देत नव्हते मग जर स्पर्श कामगार कडूनच स्पर्श कामगारांवर अन्याय होत असेल तर अशा चळवळीशी बहिष्कृत वर्गात देणे घेणे नव्हता नाही अशा पद्धतीचा चळवळीशी बहिष्कृत वर्गात देणे घेणे नाही अशा पद्धतीचा चळवळीस विरोध करणे हे आपले कर्तव्य त्यांनी मानले पाहिजे असे बाबासाहेब सांगतात प्रत्येक चळवळीची सूत्र आहे बहिष्कृत वर्गात न्याय व समतेची वागणूक वागणूक हीच असली पाहिजे व जे बहिष्कृत वर्गातील लोकांना न्याय देऊन त्यांची गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी अंतपूर्वक चळवळी करतात त्यांना सहकार्य करण्यास काहीच मागे हटू नका असे ते म्हणतात.

कामगारांच्या कुटुंबा विषयी विचार :

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आजच्या परिस्थितीचे वास्तव्य कामगार यांच्या लक्षात आणून देतात व भविष्य मात्र आपले सफल असले पाहिजे त्यासाठी आपण आपल्या मुलांना चांगले शिक्षण दिले पाहिजे या परंपरागत व्यवसायपासून वेगळे सन्मानाचे जीवन जगता आले पाहिजे तसा प्रयत्न केला पाहिजे 13 जुलै 1941 रोजी जहांगीर हॉलमध्ये मिनी सिंपल कामगार संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली सभेच्या अध्यक्ष स्थानी डॉक्टर बाबासाहेब होते याप्रसंगी कामगारांना मार्गदर्शन करत असताना ते म्हणतात की मी यासभेत तुम्हाला उपदेश करतो याचा अर्थ असा नाही कि मी तुम्ही आणि तुमच्या मुलांनी मुलींनी तुम्ही जे काम करीत आहात तेच काम सतत करावे तुम्हीजे काम करीत आहात ते फार घाण आहे परंतु सध्याच्या वाईट परिस्थितीत चोऱ्या दरोडे इत्यादी गोष्टी करण्यापेक्षा हे काम बरे आहे असे मला वाटते परंतु तुम्ही तुमच्या मुला मुलींना शिक्षण देऊन तुम्ही जे काम करता त्याकामात तुमच्या मुलांना न पडू देण्याची खबरदारी घ्या तसेच तुम्ही जे काम करतात तेच काम इतर जातीच्या लोकांना किती ही पैसे देणे करणार नाही एवढे असून सुद्धा तुमच्या कामाचा योग्य मोबदला मिळतो का तुम्ही जर हे काम करायचे नाकारले तर मुंबईतच राहणारे लोक कॉलर येणे व इतर रोगाने पटापट मिले शिव्या राहणार नाहीत मुंबईची किल्ली तुमच्या हातात आहे तुमच्या करिता दुसऱ्याने काही ही करण्याची

ISSN 2231 4342

जरुरी नाही तुम्ही तुमचे भले करू शकता एवढे सामर्थ्य तुमच्यात आहे या गोष्टीची जाणीव झाली तर सगळ्या गोष्टी सुरळीतपणे चालतील"

शेतकरी कामगार विषयी मत :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ कारखान्यात काम करणाऱ्यांसाठी लढा दिला असे नव्हे तर शेतकरी व शेतमजुरांसाठी ही त्यांनी लढा दिला कोकणात अस्तित्वात असलेल्या होती पद्धती विरुद्ध त्यांनी आवाज उठवला होता कोकणात खोत हा सुलताना सारखा वागत होता तो गावातील सावकार असून शेतकऱ्यांना वाटेल तसे मिळून काढीत असे गावातील सावकार असून शेतकऱ्यांना वाटेल तसा पिऊन काढीत असे शेतकऱ्यांच्या मुलांनी शिकू नये चांगली कपडे वापरू नये कुणब्याच्या बायकोने विशिष्ट पद्धतीचे लुगडी नसावे अशी सक्ती होती थोडक्यात होती म्हणजे शेतकरी व शेतमजुरांची गुलामगिरीत होती याविरुद्ध आवाज उठवण्यासाठी 14 एप्रिल 19 29 रोजी चिपळूणला शेतकरी परिषद भरवली अध्यक्षीय भाषण करताना ते म्हणतात शेतकरी वर्ग आज खोती पद्धतीमुळे गुलामगिरीत कितपत पडला आहे याअन्यायाच्या चौकटीत कोणत्याही समाजात स्वास्थ होणार नाही शांतता टिकवायची असेल तर सरकारने न्याय दिला पाहिजे कुणबी लोकांनी आपल्या स्वाभिमानाला जागून वरिष्ठ लोकांची हलकी हलकी कामे करून स्वतःचा सामाजिक दर्जा मुळीच कमी करून घेऊ नये यापरिषदेमध्ये एक ठराव सुद्धा संमत करून घेतला व त्याची लवकरात लवकर अंमलबजावणी व्हावी यासाठी दहा जानेवारी 1938 रोजी मजूर पक्षाने विधिमंडळावर मोर्चा नेला होता त्यात काही मागण्या होत्या 1) जमीन कसणाऱ्याला त्याच्या मेहनतीचे फळ मिळावे 2) खोत इनआमदारांमध्ये मध्यस्त नको 3) कमी उत्पन्नावर सारा माफ करावा 4) खोती व इनामदार पद्धती कायद्याने नष्ट करावी 53 वर्षे जमीन कसणाऱ्या कुळाला कायम समजली जावी 6) सहकारावर नियंत्रण ठेवणे इत्यादी एकंदरीत उपरोक्त कार्याचे अवलोकन करता असे लक्षात येते की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे नुसती बोलके कामगार नेते नव्हते तर प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी कामगार व शेतमजूर यांच्या हिताच्या व त्यांच्या हक्कांच्या संवर्धनाच्या अनेक योजना व कायदे निर्माण केले याकायद्यामधून स्वातंत्र्य पूर्व व स्वातंत्र्योत्तर हातात कामगारांना शेतमजुरांना व स्त्री कामगारांना न्याय मिळाला ते संघटित झाले व ते आपल्यावर अन्याय होत असेल तर त्याचा संघटितपणे विरोध करू लागले त्याचे संपूर्ण श्रेय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला दिल्यास वावगे ठरू नये.

संदर्भ ग्रंथ :

1. आंबेडकर गौरव ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई.
2. धनंजय कीर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पापुल रप्रकाशन मुंबई.
3. राव साहेब कसबे डॉक्टर बाबासाहेब आणि मार्क्स सुगावा प्रकाशन पुणे.
4. सी एच निकुंभ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्र वादी वास्तव व विपर्यास सुगावा प्रकाशन पुणे.

Shodh Nibandh Sangrah
Peer Reviewed
Multi Disciplinary International Research Journal
ISSN 2231 4342

एक विसाव्या शतकात वाचन आणि व्यक्तिमत्व विकास

प्रा. संतोष देशमुख
ग्रंथपाल
शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, कन्नड
मो. नं. 9604304358

प्रस्तावना :

वाचनही काळाची गरज असते काळ कोणताही असो प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक किंवा आजचे एकविसावे शतक वाचन हे गरजेचे आहे म्हणून कुठेतरी म्हटले होते' वाचाल तर वाचाल' या एकविसाव्या शतकात लॅपटॉप, इंटरनेट, मोबाईल त्या युगात माणूस कितीही पुढे गेला तरी वाचन महत्त्वाचे आहे. अन्न, वस्त्र, निवारा याबरोबर वाचन सुद्धा महत्त्वाचे आहे. पोटाला जसे अन्न लागते मेंदूलाही तसे वाचन लागते डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांनी म्हटले की, "पुस्तकांच्या सहवासात ज्ञानाबरोबर नेहमीच मला आनंद मिळाला आहे ग्रंथ ही माझी सर्वात मौल्यवान अशी ठेव आहे" म्हणजे हीच मौल्यवान ठेव जी आपली आकलन शक्ती वाढविते व्यक्तिमत्त्वाचा विकास करते तेच आजच्या इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांमुळे इंटरनेटच्या मोहोळ जाळयामुळे पुस्तक रुपी वाचन खूपच कमी झालेले आहे लहाणापासून ते मोठ्यापर्यंत पुस्तक हा अनेकांच्या जिव्हाळयाचा विषय आहे किंवा होता परंतु वाचकाला जो आनंद पुस्तक वाचून मिळतो तो काही निराळाच असतो तोच आनंद आज या इंटरनेटच्या काळात हिरावून घेतला आहे. म्हणूनच आजच्या काळात वाचनाची नितांत आवश्यकता आहे कारण वाचनातूनच मनुष्य हा मूल्य घेतो व त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो आज आपण पाहतो की लोकांना विचार मांडण्यासाठी शब्द अपुरे पडत आहेत हे लक्षात येत आहे या वीस वर्षात मध्ये माहिती व तंत्रज्ञान यामध्ये झालेली उत्क्रांती व व्यक्तिगत सामाजिक बौद्धिक क्षेत्रात झालेली अधोगती ही सध्याच्या काळात प्रकर्षाने जाणवते.

वाचनाचे पुनरावलोकन :

लोकमान्य टिळकांचा संदेश होता की, "तुम्हाला तुमचे व्यक्तिमत्व घडवायचे असेल तर वाचन करा" यासर्वांच्या मध्ये त्यांना असे सुचवायचे असेल या धावत्या युगात जर टिकायचे असेल आणि त्याच बरोबर सर्वांगीण विकास घडवायचा असेल तर वाचन आवश्यक आहे प्राचीन भारताचा इतिहास ज्ञानाने संपन्न असा आहे संस्कृतमध्ये 'भारथ' याशब्दाचा उल्लेख केला आहे 'भा' म्हणजे सर्वज्ञान सर्व प्रकारच्या संस्कृती, सर्वप्रकारच्या भाषा, सर्वप्रकारच्या कलाविद्या, सर्वप्रकारचे धर्म, सर्व व्यापक निसर्ग इत्यादींना वाहून नेणारा 'रथ' म्हणजे भारत असा आपला देश व त्याचा इतिहास हजारो वर्षे जुना आहे प्राण्यांची मानवा पर्यंतच्या उत्क्रांतीचा

उल्लेख असलेले मत्स्य पुराण असो की माणसाचे आचार विचार कसे असावेत याचा उल्लेख असलेले वेद असोत सर्व काही आपल्या देशा मध्ये अगणित स्वरूपा मध्ये उपलब्ध आहे.

आपले चार वेद ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद यांचा अर्थज्ञान म्हणून घेतला जातो मनुष्य जीवनाकरिता लागणारे सतत चित्त आणि आनंद असेच स्वरूप असलेले वेदच आपल्या जीवनात आयुष्ययांचे मूल्य सांगत आलेले आहेत यासर्वांची अध्ययन आपल्या देशांमध्ये गुरुकुल पद्धतीतून नालंदा, तक्षशिला विद्यापीठा मार्फत समाजापर्यंत पोहोचवली जात असत गुरुकुल पद्धती मधूनच पंचतंत्राच्या गोष्टीचा जन्म झाला.

इतिहासामध्ये आजपर्यंत आपल्या देशाने वाचन कलेची संस्कृती जोपासण्याचा प्रयत्न केल्याचा उल्लेख आढळतात.

वाचनाने जीवन उन्नत होते :

कोणत्याही गोष्टीचा आपल्याला सार्थ काढणे इतके सोपे नाही जीवनाचेही तसेच आहे पण आपल्या आजवर माहीत असलेले जीवन म्हणजे चार अवस्था ब्रह्मचर्य म्हणजे विद्यार्थी अवस्था, आश्रम व्यवस्था, वण प्रस्थावस्था आणि संन्यास या अवस्था जीवन हे सतत पुन्हा तिकडेच वाटचाल करीत असते प्रत्येक अवस्थेत आपली भूमिका कोणती हे समजून घेण्यासाठी योग्य मार्गदर्श न होणे अत्यंत जरुरी असते.

पूर्ण विकसित असे जर व्हायचे असेल तर त्याला आपण समृद्ध असे म्हणू शकतो त्याला लागणारी सर्व पोषकतत्वे अथवा पोषक वातावरणही आपल्यालाच निर्माण करावी लागतात किंवा ते साध्य करण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतात हे सर्व प्रयत्न सोयीस्कररित्या करू शकतो आणि ते म्हणजेच आपण वाचन केल्यानेच होय.

महाभारतात कृष्णाने अर्जुनाला सांगितलेली कथा गीता असो किंवा पैगंबरांना अल्लाने सांगितलेले कुरण असो किंवा येशूला असलेली बायबल असो हे सर्व ग्रंथ मानवी जीवन जगण्यासाठी असलेले धार्मिक मार्ग व त्याचे आचरण होईल हे सर्व ग्रंथ आपल्याला वाचनानेच समजतात वाचनाने आपले विचार व त्यावरून पडणारे प्रश्न आपल्याला चर्चेत सहभागी व्हायला लावतात आपले विचार योग्य आहे की अयोग्य याची सांगड घालण्याचे त्यासाठी वाचन आवश्यक आहे कारण वाचनातून विचार येतात याविचारातून आपली भौतिक प्रगती होत असते आणि बुद्धी करता ते फार उपयुक्त असे आहे.

मनुष्याला प्रत्येक व्यवस्थित आलेले अनुभव हे लेखनाच्या माध्यमातून तो व्यक्त करत असतो त्याचे मनोगत, अभ्यास,अ नुभव इत्यादीचा वापर आपण आपल्या जीवनामध्ये करण्याचा प्रयत्न करतो वाचनाने आपली शब्द संपदा वाढतेच व त्याचबरोबर आपले संभाषण चातुर्य आकलन क्षमता सभ्यता इत्यादींमध्ये देखील भर पडत असते जीवनाच्या प्रत्येक वाटचालीवर आपल्याला वाचन मदत करीत असते तसेच वाचनाचे व्यासंग वाढविल्याने जीवनामध्ये जगत असताना जो व्यवहारिक संघर्ष त्यामुळे होणारा ताण असतो तो कमी होत जातो

ग्रंथ संगती हे सर्वात सुंदर संगत आहे त्यामुळे आपण वाईट गोष्टीपासून दूर राहतो चुकीच्या मार्गावर जाण्यापासून परावृत्त होत असतो व आपले जीवन हे सुंदर बनत असते वाचन हे प्राथमिक कौशल्य विकास करण्यासाठी अत्यंत उपयोगी असते त्याला इंग्रजीमध्ये फंडामेंटल स्किल बिल्डिंग असेही म्हणतात.

वाचनातून ध्येयाकडे जाण्याचा मार्ग:

बौद्धिक तरुण हे फक्त वाचूनच व्यसनाने टिकून शकते उदाहरण घ्यायचे म्हटले तर दे निश्चिती करण्यासाठी शिवखेरा असो चेतन भगत असो किंवा देवदत्त पटनायक किंवा अशी अनेक लेखकांची पुस्तके असून ती वाचली तर वाचकाला योग्य दिशा कशी निवडावी व तसेच आपल्या ध्येयाकडे कसे वाटचाल करावी याचे मार्गदर्शन प्राप्त होत असते त्याच प्रमाणे नवनवीन कल्पना उपायोजना व त्याकरिता लागणारी पोषक मानसिकताही सुद्धा आपल्याला वाचनातूनच मिळत असते

असे म्हणतात की वाचन केल्याने जे मिळते ते ज्ञान दूर पळते ते आपले अज्ञान आपले वैचारिक विश्व भाव विश्व समृद्ध होण्याकरीता वाचन एक चांगले स्तोत्र आहे त्याचा उपयोग अनाकलनीय आहेच व तसेच व्यक्तिगत विकासाचा हा एक अविभाज्य भाग आहे किंवा पाया आहे असे म्हटले तरी चालेल वाचनाने वाचकाला नवी उमेद निर्माण होते असे म्हटले जाते.

ग्रंथालय व वाचनालय हे ज्ञानमंदिरे आहेत:

वाचन कला संस्कृती जोपासण्यासाठी ग्रंथालय वाचनालय यांच्याकडे मंदिर म्हणून बघितले पाहिजे आजच्या एकविसाव्या शतकात देवतांचे मंदिर बांधण्यापेक्षा गावागावामध्ये वाचनालय ग्रंथालय उभी करावीत त्यांनाच मंदिरे मानून तिथे चारित्र्यवान मनुष्य घडविण्याचे काम झाले पाहिजे त्यामुळे माणसामाणसातील दरी कमी होऊन एकता निर्माण होईल आधुनिक काळात वाचनाची माध्यमे बदलत चालली आहेत पण वाचन संस्कृती कमी झालेली नाही वाचनाच्या माध्यमाचा विनियोग वाढला असून सध्याच्या काळात इंटरनेटचा वापर झपाट्याने होत आहे माहितीची माध्यमे विचारमाध्यमे व वैकल्पिकमाध्यमे ही सर्वमाध्यमे पूर्वीच्या काळी मासिके व वर्तमानपत्रे पुस्तके इत्यादी स्वरूपात लोकांपर्यंत पोहोचायची सध्याच्या इंटरनेट युगातही सर्व माध्यमे आपल्या हातामध्ये स्मार्टफोन लॅपटॉप यांच्या माध्यमातून सतत असतात आजच्या युगात सर्व वेदग्रंथ उपन्यास पुराण अशास्वरूपाची सर्व वाचन साहित्य हे इंटरनेटवर उपलब्ध झाल्यामुळे वाचकांना ज्ञानाची शिदोरी उपलब्ध आहे परंतु हे इंटरनेटवरील ज्ञान फार काळ माणूस वाचू शकत नाही किंवा ते लक्षात राहत नाही त्याकरिता प्रत्यक्ष ग्रंथालयात जाऊन पुस्तकातून वाचूनच आपल्याला ते ज्ञान अधिक मिळते व आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो.

काल सर्व ठिकाणी असे आठवते कि कसे वाचावे यावर जास्त भरदिला जातो काय वाचावे याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे सध्याची तरुण पिढी कोणत्याही प्रकारच्या वाचनाकडे म्हणजेच पुस्तके असो किंवा

ISSN 2231 4342

तंत्रज्ञानावर उपलब्ध असलेले कोणतेही ज्ञान असो याकडे पाठ फिरवून आहे सध्याच्या यामुलीच्या मागे धावणारे पिढीला मग वारंवार कमी वयातच समुपदेशन देण्याची गरज भासत आहे अल्पवयातच वैचारिक गुंतागुंतीमध्ये ही नवीन पिढी गुरफटत आहेत समाजाच्या सर्व स्तरावरून वाचन प्रेरणेने किंवा प्रबोधनाची गरज निर्माण होताना दिसते घरामध्ये एका माणसाने वाचन सुरू केले तर त्याच्या घरांमध्ये जर त्याने वाचनाच्या व्यासंगाचा वारसा आपल्या परिवाराला दिला तर ते पुढे जाऊन एका कुटुंबाप्रती न राहता संपूर्ण समाजामध्ये व संपूर्ण देशामध्ये विस्तारित होण्यास वेळ लागणार नाही.

समारोप:

एकूणच शिक्षक आई-वडील घरातील मोठी माणसे यांच्याकडून मार्गदर्शन घेऊन पुस्तके वाचली पाहिजेत घरांमध्ये लहानमोठे स्त्रिया यांच्या करता पुस्तके असली पाहिजे एक छोटीशी ग्रंथालय घरात असले पाहिजे आपला वाढदिवस आपण पैसे उधळून हॉटेलमध्ये जाऊन साजरा करण्याऐवजी वाढदिवसाला छान-छान पुस्तके वाटली पाहिजे दिवाळीमध्ये फटाके जरूर वाचावे वाजवावीत परंतु मर्यादे पेक्षा जास्त न वाजवता त्यावर खर्च न करता दिवाळी अंक विकत घेऊन वाचले पाहिजे गाव तेथे ग्रंथालय ही लोकचळवळ झाली पाहिजे आपण स्वतःपुस्तक वाचले पाहिजे व इतरांनाही वाचण्यास प्रोत्साहित केले पाहिजे म्हणजेच प्रत्येक व्यक्तीने याकरिता शिक्षकांची भूमिका घेऊन वाचन प्रेरणा निर्माण करावी व प्रत्येकाने आपल्या जीवना मध्ये वाचनाचे महत्त्व जाणून घेऊन आपले व आपल्या जीवनात संपर्कातून येणाऱ्या सर्व व्यक्तींचे जीवन व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा समृद्ध होईल याचा विचार करावा

संदर्भग्रंथ

1. गोरे अनुराधा, वाचन संस्कार,लोकसत्ता 1 डिसेंबर, 2014.

2. खिरी उषा, वाचन आणि लेखन कौशल्य,नाशिक यशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापीठ प्रकाशन, 2016.

3. आपटेवाशी, वाचनका आणि कसे,, वरदा प्रकाशन,पुणे, 2012.

4. काळसेकर सतीश, वाचणाऱ्याची रोजनिशी, लोक वांगमयगृह, मुंबई, 2010.

5. पोरे सतीश, वाचन संस्कार, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 2016.

6. The South Asian Research Chronicle: Areferred Interdisciplinary indexed international Open Aces Monthly e- journal vol. no2 issue3 March 2015.

Journal Name	Shodh Nibandh Sangrah
ISSN	22314342
Country	IN
Frequency	Yearly
Discipline	Multi disciplinary
Editor	President, Akhil Maharashtra Itihas Parishad
E-mail	
Phone No.	
Year of Publication	

Akhil Maharashtra Itihas Parishad
XRBTA, Marketyard Pune - 411037